PRINT ISSN : 2395-6011
ONLINE ISSN : 2395-602X

CONFERENCE PROCEEDINGS

IJSRST

TECHNO SCIENCE ACADEMY
THE INTERNATIONAL OPEN ACCESS PUBLISHER

# International Multidisciplinary E-Conference On Contribution of Various Aspects In Nation Building

Date : 11th to 13 th October 2021

Organised by

Department of [ English, Marathi, Sociology, History, Commerce, Home Economics, Chemistry, Botany and Mathematics ]
Shetkari Shikshan Sanstha's
Arts, Commerce & Science College, Maregaon Dist. Yavatmal, Maharastra, India

INTERNATIONAL JOURNAL OF SCIENTIFIC RESEARCH IN SCIENCE & TECHNOLOGY

VOLUME 9 - ISSUE 5 , SEPTEMBER-OCTOBER-2021

Email : editor@ijsrst.com Website : http://ijsrst.com

# Conference Proceedings – Part 2

# International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building

# (CVAINB-2021)

11th to 13th October 2021

**Organised by**

**Department of [ English, Marathi, Sociology, History, Commerce, Home Economics, Chemistry, Botany and Mathematics ]**
**Shetkari Shikshan Sanstha's**
**Arts, Commerce & Science College, Maregaon Dist. Yavatmal, Maharastra, India**
**In Association With**
**International Journal of Scientific Research in Science and Technology**

**Print ISSN: 2395-6011 Online ISSN : 2395-602X**

**Volume 9, Issue 5, September-October-2021**
**International Peer Reviewed, Open Access Journal**

**Published By**

**[ www. technoscienceacademy. com ]**

<u>MESSAGE</u>




I am extremely happy to know that the Arts, Commerce and Science College, Maregaon is organizing an International e-Conference on '**Contribution of Various Aspects in Nation Building (CVAINB-2021)'** on October 11-13, 2021 and bringing out e-proceeding on the occasion. I hope that the conference will be meaningful, purposive, relevant and credible worth remembrance and will be the best platform for dealing with all issues related to the field.

The format of the conference will provide immense opportunities for interaction among the participants and the resource persons and detailed discussion in the conference will motivate the young, budding scientists, research scholars and students.

I convey my best wishes to the organizers and all those who are associated with this conference.

I wish the conference a grand success.



**Mr. Jivanpatil Kapse**

**President**

Shetkari Shikshan Sanstha, Maregaon

# MESSAGE



It is pleasure for me to extend my heartiest greetings to the Principal, organizing secretary, conveners, co-conveners as well as the participants on three days International Multidisciplinary E-Conference on "**Contribution of Various aspects in Nation Building", (CVAINB-2021)**.

I am confident that this conference would provide a platform to the research scholars for sincere presentation and discussion to come out with reasonably acceptable conclusions.

I wholeheartedly congratulate the convener, co-conveners and editorial board for this academic venture and extend best wishes for the grand success.

I wish this mega event of the institute will turn out to be a memorable.



**Adv. Sudhir Damle**

Shetkari Shikshan Sanstha, Maregaon

# MESSAGE



It is with great pleasure that I extend a warm welcome to all the participants of International e-Conference on '**Contribution of Various Aspects in Nation Building (CVAINB-2021)**' organized by Department of English, Marathi, Sociology, History, Home-Economics, Commerce, Mathematics, Botany, and Chemistry, Arts Commerce and Science College, Maregaon (Road) during October 11-13, 2021 on the Occasion of India celebrating '**Azadi ka Amrut Mahotsav**' and bringing out e-proceeding to commemorate the occasion.

This conference will provide a unique platform to all the participants to widen their knowledge domains and to explore and exchange new ideas, techniques and models in the area of the theme of the conference. It will motivate young scholars and researchers in a meaningful way. It is indeed a fulfilling and enriching experience to organize an event of this scale on e-platform where great minds will come together. The conference will offer opportunity for in depth talks and discussions which will go a long way to help create an academic ambience in the various Departments and the college.

The quest for knowledge has been from the beginning of time but knowledge only becomes valuable when it is disseminated and applied to benefit humankind. It is hoped that **CVAINB-2021** will be a platform to gather and disseminate the latest knowledge in recent advancements in emerging areas of diversified research fields covered during this conference.

Further, this conference will also bring together the renowned experts from the core field and other allied areas to a common platform to deliberate on such an important theme and forge linkages and bonds for mutual research benefits.

I congratulate the organizers for organizing **CVAINB-2021** and wish them all success in this scientific endeavor.

**Dr. A. N. Gharde**
Chairman, CVAINB-2021
**Principal**

प्रो० डा० राजाराम यादव
पूर्व कुलपति
वीर बहादुर सिंह पूर्वांचल विश्वविद्यालय,
जौनपुर – 222003 (उ. प्र.)
Prof. Dr. Raja Ram Yadav
Former Vice-Chancellor
Veer Bahadur Singh Purvanchal
University, Jaunpur – 222003 (U.P.)

Professor of Physics
Physics Department
(UGC Centre of Advanced Studies)
University of Allahabad,
Prayagraj-211002
E-Mail.:rryadav1@rediffmail.com
Tel.: (O) 0532-2460987
Mob.: +91-9415347913



## MESSAGE

I am pleased to know that Arts, Commerce & Science College, Maregaon Organizing 3 days international multidisciplinary e- conference on **Contribution of Various Aspects in Nation Building (CVAINB-2021)** during 11 to 13 October 2021.

The theme of the international e- conference is very important and relevant. I hope that the conference will bring together professionals and experts from the academia, industry and young scientists and researchers in the various field and to provide the relevant solution related to the challenges in environmental sector, energy sector, space science, health sector, medical science etc. It is expected that conference will held constructive results.

I extend my best wishes to organizers of the international e- conference and the participants

With best regards,

**Prof. (Dr.) Raja Ram Yadav**

10 October 2021

**DR. F. C. RAGHUWANSHI**
**Dean, Faculty of Science & Technology**
**SGB Amravati University**



## MESSAGE

I am delighted to write this message for International e-Conference on **'Contribution of Various Aspects in Nation Building (CVAINB-2021)** which is to be held at Arts Commerce and Science College, Maregaon (Road) during October 11-13, 2021 on the Occasion of **India celebrating 'Azadi ka Amrut Mahotsav'.**

The conference focusses on multidisciplinary research in the various fields of Arts and Humanities, Commerce and Science with an eye on various aspects on Nation Building.

The conference covers topics such as, The role of art, literature and the media in Nation Building, Folk literature: A vital part of Nation Building, Significant role of constitution in Nation Building, Role of Nationalism in Indian, The role and contribution of Home Economics in Nation Development, Goals of sustainable development, Industrialization and sustainable development, Various developments in Science and Technology, Innovative research in medicinal plants, Drug design and drug development, environmental chemistry, Operations research and optimization techniques, Industrial and financial mathematics, etc. There are a number of foreign delegates and invitees who will deliver scientifically vital role of various aspects of Nation Building. The diverse disciplines to which the conference caters has made a beeline of researchers to the conference.

**CVAINB-2021**'s will help the researchers, scientists, academician and delegates from all over the world to present and exchange their knowledge, thoughts and research to establish research environment for Nation Building as well as to find the international linkage for future collaboration in their career path.

The conference would be a feast and delight for researchers to enhance their research and innovations. It also provides an excellent platform to researchers for developing their new ideas about multidisciplinary innovative research. I'm confident that every delegate will learn something new and take back with him inspiration to excel. I hope that participants enjoy the conference and have a memorable experience at Maregaon. I convey my best wishes to the organizers and all those who are associated with this conference.

I wish the conference a grand success.

<u>MESSAGE</u>



It is my great pleasure to invite all of the eminent scientists, academicians, young researchers, delegates and students from all over the world to attend the International e-Conference on **'Contribution of Various Aspects in Nation Building (CVAINB-2021)** organized by Arts, Commerce and Science College, Maregaon (Road) during October 11-13, 2021 on the Occasion of **India celebrating 'Azadi ka Amrut Mahotsav'.**

I am sure that this global meeting brings together the knowledge with diverse experiences and orientations. I wish to inform the young researchers to explore new ideas and links that will widen our networks of collaborations.

**CVAINB-2021** be organized to discuss a wide variety of topics related to various aspects in Nation Building and to cater especially to academicians of English, Marathi, Sociology, History, Home-Economics, Commerce, Mathematics, Botany, and Chemistry.

**CVAINB-2021** will provide the right environment for the participants to discuss and interact with the eminent scholars, scientists and academicians. The key-note address, technical talks, invited talks and paper presentations of stalwarts will open up a new vista of knowledge before blooming researchers and scientists.

**CVAINB-2021** is an opportunity not to be missed and an event to be harnessed for establishing synergy of collaborations for realising the end objective of better quality of life on this wonderful earth planet, in a sustained manner. I have no doubt that the conference will upgrade the knowledge and skill of the participants in such a futuristic area.

I am confident that participants will have effective and wonderful deliberations through this conference. I thank the management, Principal and all who have contributed in their own way to make this conference a success.

I am looking forward to an excellent meeting with great scientists from different countries around the world. I welcome you to this conference and look forward to your participation

**Prof. Dr. S. K. Khade**
**Organizing Secretary, CVAINB-2021**

# MESSAGE



I am honored and delighted to welcome you to the International e-Conference on '**Contribution of Various Aspects in Nation Building (CVAINB-2021)'** being organized by the Department of English, Marathi, Sociology, History, Home-Economics, Commerce, Mathematics, Botany, and Chemistry, Arts Commerce and Science College, Maregaon (Road) during October 11-13, 2021 on the Occasion of India celebrating '**Azadi ka Amrut Mahotsav'.**

I hope this conference will provide a unique platform to young and developing scientists, scientific community and academician to enlighten the knowledge on Various Aspects in Nation Building. The theme of the conference is challenge to the academic institutions and research scholars and provides an excellent forum for exchanging information and discussion on a wide variety of topics related to nation building.

Further, the conference is organized with an aim, to exchange new thoughts and share the latest knowledge on the theme of the conference by the eminent experts and to motivate academician, researchers and scientists. I trust all the participants and delegates would be with some value addition to their current knowledge after attending the conference. The Proceedings brought out include a number of original research papers received from various regions of the world. Our technical program is rich and varied with 1 keynote speech, 9 plenary talk and 10 invited talks by the experts and around 250 research papers split between 3 parallel oral sessions 3 each day.

I wish the **CVAINB-2021** will be an enjoyable, memorable and productive for the participants. The Organizing Committee has made great efforts to create this momentous event. I believe all delegates will benefit substantially from the conference through the presentations of expert speakers and exchanges of ideas with one another.

I am grateful to all the renowned speakers and delegates for their participation that makes this conference possible. I thank the management and all who have contributed in their own way to make this conference a success.

Looking forward you all to come enhance your experience and to make this conference a success!

**Dr. D. A. Gundawar**
**Convener, CVAINB-2021**

**Patron**

Mr. Jivanpatil Kapse

Chairman, Shetkari ShikshanSanstha, Maregaon

**Co-Patron**

Mr. Adv. Sudhir J. Damale

Secretary, Shetkari ShikshanSanstha, Maregaon

**Co-Convenor**

Dr. A. B. Yawale, ACS College, Maregaon

Dr. V. C. Ghodkhande, ACS College, Maregaon

Mr. B. R. Deshmukh, ACS College, Maregaon

Dr. S. B. Gaikwad, ACS College, Maregaon

Mr. A. P. Jenekar, ACS College, Maregaon

Dr. A. D. Adsare, ACS College, Maregaon

Mr. S. G. Atram, ACS College, Maregaon

**Chairman**

Dr. A. N. Gharde

Principal,

ACS College, Maregaon

**Convenor**

Dr. D. A. Gundawar

Assistant Professor, Department of English, ACS College, Maregaon

Dr. V. N. Chavhan

Assistant Professor & HOD, Botany, ACS College, Maregaon

Dr. P. P. Kulkarni

Assistant Professor, Department of Commerce, ACS College, Maregaon

**Organising Secretary**

Dr. S. K. Khade

Professor & HOD, Sociology, ACS College, Maregaon

Dr. G. L. Sodnar

Associate Professor & HOD, History, ACS College, Maregaon

Dr. R. R. Chaware

Assistant Professor & HOD Marathi, ACS College, Maregaon

COMMITTEE

INTERNATIONAL ADVISORY COMMITTEE

Dr. Beedun Abba, Mauritius

Prof. Dr. Arun Muktibodh, Institute for Basic Research, Palm Harber, USA

Dr. Ambalangodage Dayananda, Sri Lanka

Dr. Arun Chainit, Department of Public Administration, Bangkok, Thailand
Dr. Amandeep Kaur, Dr. Ambedkar Mission Society, Germany
Dr. Kirandeep Kaur, Austin Hospital, Australia
Dr. Lehlohonolo F. Koao, University of the Free State, South Africa
Dr. Abdul Hakeem Deshmukh, Guangdong University of Technology, Guangzhou, China
Dr. Bogumil B. J. Linde, Poland
Dr. V. V. Petrov, Russia
Mr. Gautam Chakrabaty, London
Mr. Sohanlal Sampala, Germany
Dr. Santosh Panchal, Research Scientist, WuerzburgUniversity, Germany
Dr. Rajarshi Roy, J. Heyrovsky Institute of the CzechAcademy of Sciences, Praha, Czech Republic
Dr. Ghulam Dastgeer , Dept of Physics and Graphene
Research Institute Sejong University, Seoul , South Korea

## NATIONAL ADVISORY COMMITTEE

Dr. B. R. Pandey, Former Principal Lokmanya Mv. , Warora
Dr. Avinash Moharil, Dean, Faculty of Arts and Humanities, SGBAU, Amravati
Dr. Dinesh Nichit, Dean, Faculty of Commerce andManagement, SGBAU, Amravati
Dr. F. C. Raghuwanshi, Dean, Faculty of Science
And Technology, SGBAU, Amravati
Dr. W. K. Sarwade, Dean, Faculty of Commerce and Management, BAMU, Aurangabad
Dr. Narayan Kamble, Chairman, BOS Sociology, SRTMU, Nanded
Dr. Sandesh Wagh, Chairman, BOS History & Archeology, Mumbai University, Mumbai
Dr. Vashishth Choubey, Chairman, BOS English, SGBAU, Amravati
Dr. P. Vitthal, Coordinator, Dr. Babasaheb Ambedkar Chair& Study Center SRTMU, Nanded
Dr. Santosh Bansod, Chairman, BOS History, SGBAU, Amravati
Dr. Prabha Y. Bhogaonkar, Ex- Director, GVISH, Amravati
Dr. Uday Navalekar, Principal, Abasaheb Parwekar Mv. , Yavatmal
Dr. V. B. Raut, Principal, Mungasaji Maharaj Mv. , Darwha
Dr. Agarkar, Principal, Indira Gandhi Mv. , Ralegaon
Dr. Prasad Khanzode, Principal, L. T. Mv. , Wani
Dr. Shankar Warhate, Ex. Principal, Moghe Mv. , Pandharkawada
Dr. J. A. Tidke, Professor & HOD Botany, SGB AmravatiUniversity, Amravati
Dr. D. T. Tayade, Professor, Department of Chemistry, GVISH, Amravati
Dr. S. A. Jawanjal, Professor & HOD Home Economics, Smt. Radhabai Sarda ACS College Anjangaon Surji Di. Amravati

Dr. Baburao Gaikwad, Retd. Prof. & Head KarnatakaUniversity, Dharwad
Dr. S. N. Malode, Asso. Professor & HOD Botany, GVISH, Amravati
Dr. V. C. Borkar, Associate Professor & HOD Mathematics, Yeshwant Mv. , Nanded
Dr. N. R. Giri, Associate Professor & HOD Home Economics, Y. D. V. D. ACS College, Tivasa Di. Amravati
Dr. Vivek Polshettiwar, Associate Professor, TIFR, Mumbai
Dr. Vivek Vishwarupe, Associate Professor, AmolackchandMv. , Yavatmal
Dr. Dinesh Khedkar, Associate Professor, Shivaji ScienceCollege, Amravati
Dr. Sagar Jadaho, Amolakchand Mv. Yavatmal
Dr. Shivraj Bokade, Yeshwant Mv. Nanded
Dr. Kalyan Sakharkar, P. N. College, Pusad
Dr. Rahul Bhagat, S. N. Mor College, Tumsar
Dr. Ram Isankar, Assistant Professor, GVISH, Amravati
Dr. N. R. Pawar, HOD Physics, Arts, Commerce & ScienceCollege, Maregaon

## ORGANIZING COMMITTEE

Dr. Abhijit Aney, L. T. College, Wani
Dr. Sunil Bidwaik, S. P. College, Gadchandur
Dr. Jayant Choudhari, GVISH, Amravati
Dr. Alfred Shaikh, Indira Gandhi Mv. Ralegaon
Mr. Mahadeo Bhujade, L. T. College, Wani
Dr. Sunanda S. Aswale, L. T. College, Wani
Dr. V. S. Jagtap, SPM College, Ghatanji
Dr. R. S. Matte, L. T. College, Wani
Dr. Shrinivas Pilgulwar, Lokmanya Mv. , Warora
Dr. Sujata Shende, Moghe Mv. Pandharkawada
Dr. Ninad Dharkar, SPM Gilani College, Ghatanji
Dr. Umesh Kanerkar, Tompe Mv. Chandur Bazar
Dr. S. M. Deosthale, B. P. Science College, Digras
Dr. M. J. Dagwal, SRS Mv. Anjangaon Surji
Dr. Manoj Kakpure, Bharati Mv. Arni
Dr. R. B. Patil, Amolackchand Mv. Yavatmal
Dr. M. M. Dhore, B. P. Science College, Digras
Dr. P. R. Mandlik, Shivaji Science College, Amravati
Dr. Sandeep B. Gaikwad, Shree Mukudband Mv. Gangapur
Dr. Shivaji
D. Takalkar, Arts, Commerce & Science College, Narangaon, Junnar
Dr. Rashmi Gjare, Smt. Nankibai Wadhvani Kala Mv. , Yavatmal

Dr. Usha Rakhunde, Moghe Mv. Pandharkawada
Dr. Bandu Kirdak, Borgaon Manju
Dr. Daya Pande, Amravati
Dr. Harish Petkar, Chikhaldara
Dr. M. K. Tanurkar, ACS College, Maregaon
Dr. S. R. Kelode, ACS College, Maregaon
Prof. S. S. Kamble, ACS College, Maregaon
Prof. V. S. Bhagat, ACS College, Maregaon
Prof. S. T. Bhandakkar, ACS College, Maregaon
Dr. M. M. Kamble, ACS College, Maregaon
Prof. M. P. Shende, ACS College, Maregaon
Dr. N. B. Raut, ACS College, Maregaon
TECHNICAL COMMITTEE
Prof. A. P. Jenekar, ACS College, Maregaon
Dr. A. D. Adsare, ACS College, Maregaon
Prof. S. G. Atram, ACS College, Maregaon
Prof. P. R. Makade, ACS College, Maregaon

**Publication Editors**
Dr. S. K. Khade
Dr. D. A. Gundawar
Dr. G. L. Sodnar
Dr. R. R. Chaware
Dr. M. K. Tanurkar
Dr. V. N. Chavhan
Dr. S. B. Gaikwad
Mr. B. R. Deshmukh
Dr. V. C. Ghodkhande
Mr. A. P. Jenekar

## Our Guests, Resource Persons and Eminent Experts




## ABOUT CONFERENCE

To enhance synergy within the community and build toward a strong nation, Arts Commerce and Science College, is hosting an International E-Conference on‘ Contribution of Various Aspects in Nation Building(CVANB-2021) is scheduled on 11, 12 & 13 October2021, on the Occasion of India celebrating ‘Azadi kaAmrut Mahotsav’. Nation-building can involve the use of propaganda or major infrastructural development

to foster social harmony and economic growth, it requires a sense of belonging and a sense of pride, both of which cannot be instilled amidst exclusions, discriminations, inequities, injustices and inequalities. The CVANB-2021 will bring together leading experts and young researchers, numerous delegates, academia, researchers, standards organizations and research institutes with aims to explore an eco-system that supports the nation to live together in an orderly manner and to provide an allied platform for galvanizing partnership from multi-key stakeholders to capacitate human capital in becoming good, smart and courageous people who have a shared identity, ideology and goals. In the modern era, nation-building referred to the efforts of newly independent nations, to establish trusted institutions. It also focuses on various modernization and innovation paradigms that maybe applied to present practical and creative solutions to diverse issues in society. The key intention is to provide opportunity for the global participants to share their ideas and experiences in person with their peers expected to join from different parts of the world. In addition to this, the gathering will help the delegates to establish research environment as well as to find the international linkage for future collaboration in their career path.

## About College

Arts, Commerce and Science College, Maregaon is apremier college of excellence, engaged in knowledge building for inclusive social development and moldingglobally competent and socially sensitive professionals towards social transformation and enlighten students of rural and tribal area and to contribute their services for universal development by promoting education. The college had a meteoric rise and developed into an excellent institution for education. The college impart knowledge in various disciplines to meet global challenges of the 21st century. Giving appropriate emphasis on curricular and co-curricular activities, college attempts to develop rounded personalities through teaching, learning and evaluation and committed to empowering students to think independently. The college outreaches to the widest range of students from backward area. College is situated in an eco-friendly environment which makes students energetic. Upholding the noble traditions lay down by the founders, the institution surges ahead towards excellence.

## CONFERENCE SUB-THEMES

**English**

The role of Art, Literature and The Media in Nation Building

Folk Literature, a vital part of Nation Building.

The Role of Literary Artist in Contemporary Society

Role of e-books and e-literature

Use of digital platform in teaching languages.

Contribution of e-library during covid-19 pandemic

**History & Sociology**
Significant role of constitution in Nation Building
Role of Nationalism in Indian Independence Movement
Importance of Democracy in Nation Building
Role of Social Thinkers in Indian Society
Contribution of Dr. Ambedkar in Nation Building
Contribution of Indian Women in Nation Building
Social Movements and Nation Development

**Home Economics**
The Role and Contribution of Home Economics in Nation Development
Malnutrition
Importance of Nutrients for Human Life
Dietary Issues and Solutions for Workingwomen

**Commerce**
Goals of Sustainable Development
Poverty Alleviation
Sustainable Economic Development
Banking and Financial Sector
Urbanization
Industrialization and Sustainable Development
Industrial Development
Trade & Service
E-Commerce

**Botany**
Various developments in Science and Technology
Innovative research in medicinal plants
Present Challenges and Opportunity in Plant research
Photochemistry, Pharmacology and Drug Designing
Ethno botany, Biodiversity & Classic Botany
Genetics, Molecular biology, Enzymology
Biotechnology and Bioinformatics

**Chemistry**
Organic and Inorganic Chemistry
Pure and Applied Chemistry
Green Chemistry
Nanotechnology and its Application
Drug Design and Drug Development
Environmental Chemistry

Supramolecular Chemistry

**Mathematics**
Pure and Applied Mathematics
Mathematical Modeling
Mathematical Physics
Cosmology and Relativity
Operations Research and Optimization Techniques
Numerical analysis and Scientific Computing
Industrial and Financial Mathematics
Probability and Statistics

**Marathi**

राष्ट्रबांधणीसाठी मराठीतील परिवर्तनवादी
साहित्याची भूमिका
संत साहित्य आणि परिवर्तनवाद
मराठी साहित्यातील बदलते प्रवाह
या विषयानुषंगाने मराठी साहित्यातील
बहुविध साहित्यप्रवाह / प्रकारातून केलेले
लेखन स्वगातार्ह असेल

## Index


| Sr No | Article/Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | **संतसाहित्य आणि परिवर्तनवाद**<br>**प्रो.डॉ.चारुशिला राजेश्वर रुमाले** | 1-6 |
| 2 | स्त्री संत साहित्यातील सामाजिक बंडखोरी<br>डॉ. पद्मरेखा धनकर | 7-12 |
| 3 | मराठी साहित्यातील बदलते प्रवाह<br>प्रा.रिता द. वाळके (डंभाळे) | 13-16 |
| 4 | थेरीगाथा : जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा<br>प्रा. डॉ. विष्वजीत कांबळे | 17-22 |
| 5 | **स्त्रीप्रतिमा : एकआकलन**<br>**प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे** | 23-25 |
| 6 | **परिवर्तनाचे वाटसरु**<br>**माधुरी मनोहरराव पाटील** | 26-28 |
| 7 | राष्ट्रबांधनीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनाचे योगदान<br>प्रा.डॉ. अन्नपूर्णा अ. चौधरी | 29-31 |
| 8 | 'उपरा' स्वकथानातील जीवनवास्तव<br>दीपक महाजन | 32-33 |
| 9 | संतसाहित्य आणि राजकीय परिवर्तन<br>प्रा. डॉ. प्रदीप राऊत | 34-38 |
| 10 | भाषिकविविधता : भारतीय वाङःमयाची उत्क्रांती<br>सुचिता एस. ढेरे. | 39-40 |
| 11 | तुकारामांच्या साहित्यातील अस्तित्वभान व विश्वात्मकता<br>रेणुकादास उबाळे | 41-45 |
| 12 | राष्ट्रसंतांच्या विचारातील परिवर्तनवाद<br>डॉ. आर. आर. दिपटे | 46-49 |
| 13 | **संत साहित्य आणि परिवर्तन**<br>**डॉ.श्रीकांत डी.पानघाटे** | 50-55 |
| 14 | कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या विचारातील प्रबोधन क्षमता<br>डॉ. श्रीकृष्ण वामन पदमणे | 56-58 |
| 15 | संत तुकाराम : एक सामाजिक परिवर्तनवादी संत<br>नवाजी गेंदलाल घरत | 59-63 |
| 16 | **राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्वातंत्र्य प्रेरक काव्य**<br>**स्वप्नील राजेश इंगोले** | 64-71 |
| 17 | **साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध** | 72-75 |

| | | |
|---|---|---|
| | प्रा. प्रफुल्ल विलासराव काळे | |
| 18 | संतांच्या परिवर्तनवादी विचारांची उपयुक्तता<br>डॉ. सुवर्णा गाडगे | 76-80 |
| 19 | मराठी साहित्यातील बदलते प्रवाह<br>डॉ. प्रीती किशोर उमाठे | 81-86 |
| 20 | सामुदायिक प्रार्थनेमागील राष्ट्र संताची भुमिका<br>प्रा. डॉ. सिध्द्राम किषनराव मुंडे | 87-91 |
| 21 | डॉ. आनंद यादवांचा वाड्.मयीन प्रवास<br>प्रा. नितीन जगदिष टेकाम | 92-94 |
| 22 | मराठी साहित्यातील बदलत्या प्रवाहात' बाप्तिस्मा ते धर्मांतर' या आत्मकथनाचे मूल्यमापन.<br>गजानन श्यामसुंदर राऊत | 95-99 |
| 23 | समाज स्वास्थ्याचे सुधारक रघुनाथ धोंडो कर्वे: राष्ट्रउभारणीतील द्रष्टा कर्मयोगी<br>प्रा. डॉ. जयश्री प्रकाश शास्त्री | 100-106 |
| 24 | परिवर्तनवादी प्रबोधक जोतीराव<br>प्रा. डॉ.राजेश चवरे | 107-116 |
| 25 | संत श्री गोविंदप्रभूंची सामाजिक परिवर्तनवादी भूमिका<br>डॉ अभिजित नाना पाटील | 117-121 |
| 26 | लोकशाहीतील सर्वात मोठा अडसर.....जातिवाद<br>डॉ.राजेंद्र श्री. कोरडे | 122-126 |
| 27 | भारतातील दारिद्रय<br>Prof. Kalpana K. Kale | 127-132 |
| 28 | वृध्दांची स्थिती एक अवलोकन<br>प्रा कु. वैशाली उत्तमराव कांबळे | 133-139 |
| 29 | मानवी जीवनात पोषक आहाराचे महत्त्व<br>प्रा.सौ.वासंती देवनाथ खाडिलकर / देवीकर | 140-146 |
| 30 | " शाश्वत विकासाचा सहकार क्षेत्रावर झालेला परिणाम अभ्यासणे"<br>प्रा.डी.एन.घाणे, प्रा.डॉ.जी.डीबोर्डे | 147-153 |
| 31 | ई-कॉमर्स: फायदेआणिआव्हानांचाअभ्यास<br>प्रा. दिवेकर हरी लक्ष्मण, प्रा. दिघे वैभव किशोर | 154-160 |
| 32 | औद्योगिकीकरण<br>प्रा. डॉ. के. जी. राजपूत | 161-164 |
| 33 | भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती व समस्या<br>प्रो. मनोहर रामचंद्र चौधरी | 165-174 |

| | | |
|---|---|---|
| 34 | किशोरावस्थेतील (वयोगट 12 ते 15 वर्ष) बदलतेपालक—बालकसंबंध<br>कु. रूपाली सुभाषराव कणसे | 175-181 |
| 35 | भारतामध्ये कुपोषण : कारणेआणिउपाय<br>डॉ. कविता आर. बोरकर | 182-186 |
| 36 | **कुपोषण**<br>**डॉ.अर्चना आ. निखाडे** | 187-191 |
| 37 | मानवी जीवनात पोषक घटकांचे महत्त्व<br>प्रा. डॉ. मिनाक्षी कांबळे | 192-195 |
| 38 | ''मानव विकासात पोषक घटकांची आवष्यकता''<br>प्रा. डॉ. पल्लवी शामसुंदर देषमुख | 196-202 |
| 39 | देषाच्या विकासात गृहअर्थषास्त्राची भूमिका<br>प्रा डॉ. साधना डी. वाघाडे | 203-208 |
| 40 | **नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या आहार विषयक समस्या**<br>**प्रा.डॉ. संगीता घुईखेडकर** | 209-213 |
| 41 | नोकरदार महिलांचे आरोग्य आणि आहार<br>डॉ. प्रा. स्मिता गजभिये | 214-220 |
| 42 | शाष्वतविकास ध्येये आणि भारताची स्थिती<br>डॉ. माधुरी किषनराव तानुरकर | 221-224 |
| 43 | **भारतात ई-कॉमर्सचा विकास**<br>**प्रा. डॉ. जया सवाई थूल** | 225-229 |
| 44 | **मानवी जीवनात पोषणाची भूमिका– एकचिंतन**<br>**डॉ. वैशाली मेश्राम** | 230-233 |
| 45 | नौकरी करणाऱ्या महिलांचा मानसीक ताण व आरोंग्याच्या समस्या<br>प्रा. डॉ. कु उषा नानाजी राखुंडे | 234-238 |
| 46 | वं.राष्ट्र संतांचे संतत्व, व्यक्तिमत्व आणि कार्य<br>प्रा. सौ. धनश्री लोकचंद राणे | 239-242 |
| 47 | **कुपोषण एक जटिल समस्या**<br>Dr.Vibha C. Ghodkhande | 243-246 |
| 48 | मानवीजीवनामधे पोषक घटकांचे महत्व<br>लेखक डॉ. विद्या धर्मेष ध्रुव | 247-251 |
| 49 | **सविनय कायदेभंग' चळवळीमध्ये स्त्रियांचे योगदान.**<br>**पूजा हिरामण गांगोडे** | 252-255 |
| 50 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>प्रा. डॉ. बबन शामरावजी सेलकर | 256-258 |
| 51 | **आदिवासींचे कर्ज घेण्याचे स्त्रोत आणि कर्जाच्या मोबदल्यात तारण वस्तूंचे विश्लेषणात्मक अध्ययन** | 259-263 |

| | | |
|---|---|---|
| | प्रा. डॉ. योगेश प्रल्हाद महाजन | |
| 52 | डॉ. इरावती कर्वे यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान<br>डॉ. सुनिता संजय धोपटे | 264-269 |
| 53 | राष्ट्रनिर्माणामध्ये महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या योगदानाचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>डॉ. अमरिष एस. गावंडे | 270-276 |
| 54 | देश विकासात चळवळीचे योगदान<br>डॉ. अनिल विजयराव देशमुख | 277-285 |
| 55 | ''सावित्रीबाईफुलें यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य''<br>डॉ. बळीराम परषराम अवचार | 286-289 |
| 56 | राष्ट्रउभारणीसाठी आपत्तीव्यवस्थापनातील विविध घटकांची भूमिका : शाश्वत पर्याय<br>प्रा.डॉ. सुनिता प्रमोद चौधरी | 290-295 |
| 57 | राष्ट्रनिर्मितीमध्ये समतेच्या मुल्यांचे योगदान<br>डॉ. एच. यु. पेटकर | 296-300 |
| 58 | संविधान निर्मितीच्या माध्यमातून भारतीय राष्ट्रउभारणीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>डॉ- होमराज टी.राठोड | 301-314 |
| 59 | समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>डॉ.बी.एच.किर्दक | 315-322 |
| 60 | ''भारतीय समाजषास्त्राच्या विकासात डॉ. जी. एस. घुर्ये यांचे योगदान एक समाजशास्त्रीय अध्ययन''<br>प्रा. किशन काशिनाथ घोगरे | 323-327 |
| 61 | 19 व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन<br>प्रा. नितिन नागनाथ मुंडलोड | 328-333 |
| 62 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीत योगदान<br>डॉ. पुरूषोत्तमरा. बांडे | 334-337 |
| 63 | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे राष्ट्रउभारणीसाठी योगदान- एक आढावा<br>सहा.प्रा.स्मिता रामेश्वर देवर | 338-352 |
| 64 | राष्ट्रनिर्मितीमध्ये महिलांचा अविरत संघर्ष आणि योगदान<br>डॉ. तक्षशिला मोटघरे | 353-356 |
| 65 | राष्ट्र निर्माणामध्ये भारतीय महिलांचा सहभाग<br>डॉ. अस्मिता आर. ठोंबरे | 357-359 |
| 66 | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान : एक | 360-356 |

| | | |
|---|---|---|
| | समाजशास्त्रीय अभ्यास<br>प्रा.लक्ष्मण बापूराव नैताम | |
| 67 | "स्त्री मुक्ति चळवळी"<br>प्रा. पांडुरंग रुस्तुम पाचपुते | 366-368 |
| 68 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजसुधारणाबाबतचे विचार<br>डॉ. आर. एम. सरपाते | 369-372 |
| 69 | राष्ट्रउभारणीमध्ये महिला चळवळीचे योगदान<br>विषेष संदर्भः स्वातंत्र्यपुर्व काळातील चळवळी<br>डॉ. माधुरी झाडे | 357-360 |
| 70 | भारतातील षेतकऱ्यांच्या चळवळी<br>प्रा.डॉ. रावसाहेब षंकरराव ठोके | 377-379 |
| 71 | राष्ट्रउभारणीमध्ये पंचायतराजव्यवस्थेच्या योगदानाचे समाजषास्त्रीय अध्ययन<br>प्रा.डॉ. अनिल के. ठाकरे | 380-383 |
| 72 | आधुनिक भारताच्या जडणघडणीत महात्मा गांधींच्या विचारांचे योगदान<br>डॉ. अशिष जयराम मुठे | 384-387 |
| 73 | भारतीय शेतकऱ्यांच्या समस्या आणि शेतकऱ्यांच्या चळवळी<br>कु. स्वाती एम. उगेमुगे | 388-399 |
| 74 | महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य एक : अध्ययन<br>प्रा- नवनाथ बंकट बडे | 400-402 |
| 75 | "भारताच्या राष्ट्र उभारणीत महिलांचे योगदान"<br>डॉ. कल्पना दिलीप भारंबे | 403-407 |
| 76 | आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>प्रा. डॉ राहुल दत्ता मांडणीकर | 408-412 |
| 77 | ''राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान''<br>प्रा. जयमाला पुंडलिकराव लाडे | 413-416 |
| 78 | "राष्ट्रउभारणीसाठी शिक्षण आणि राष्ट्रभाषा हिंदीचा आग्रह धरणारे लोकसेवक मधुकरराव चौधरी"<br>डॉ. भारती प्रमोद गायकवाड | 417-421 |
| 79 | बाबा आमटेचे सामाजिक समतेचे कार्य<br>प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर | 422-432 |
| 80 | jk"VªmHkkj.khrhy MkW- ckcklkgsc vkacsMdj ;kaps ;ksxnku MWk- lfork HkkÅjko fpoaMs | 433-439 |
| 81 | MkW- ckcklkgsc vkacsMdj vkf.k jk"Vªh; ,dkRerk<br>izk-MkW-mYgkl ,u- jkBksM | 440-443 |
| 82 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान<br>प्रा. सुधीर वि. बानुबाकोडे | 444-447 |

| | | |
|---|---|---|
| 83 | राष्ट्रकवि मैथिली षरण गुप्त के काव्य में सामाजिक, सांस्कृतिक चेतना<br>डॉ. निभा षांतीलाल उपाध्याय | 448-451 |
| 84 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीत योगदान<br>प्रा.सौ. सुहास चंद्रषेखर नागापूरे/षिवणकर | 452-459 |
| 85 | सामाजिक परिवर्तन और कबीर<br>प्रा. लक्ष्मण किसनराव पेटकुले | 460-462 |
| 86 | राष्ट्रीय विकासात लोकशाहीची भूमिका<br>सचिन आर. वानखेडे | 463-473 |
| 87 | साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध<br>प्रा. प्रफुल्ल विलासराव काळे | 474-477 |
| 88 | भारताच्या विकासात सहकारी चळवळीचे योगदान<br>डॉ. श्याम सोमवंशी | 478-481 |
| 89 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या श्रमिक उत्थानविषयक योजना ;<br>एक दृष्टीक्षेप<br>प्रा. अरविंद बाबुराव हटकर | 482-486 |
| 90 | भारतातील दारिद्रय निर्मूलन<br>प्रा.डॉ.मनिष कुमार काषिनाथ कायरकर | 447-493 |
| 91 | कोळसा खनिज उद्योगाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान<br>सागर शंकर बरषेट्टीवार/करमसिंग राजपूत | 494-498 |
| 92 | दारिद्रयाचे मापन आणि उपाययोजना<br>डॉ. नितीन ज्ञानदेव चौधरी | 499-504 |
| 93 | अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारने शिक्षणावर केलेल्या खर्चाचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>अभिषेक संजय पद्मावार, डॉ. करमसिंग रा.राजपूत | 505-509 |
| 94 | भूमिहीन अनुसूचित जातीच्या आर्थिक विकासात कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमानी योजनेची भूमिका<br>भिमराव परमेष्वर वाघमारे | 510-516 |
| 95 | राजर्षी शाहू महाराज – एक राष्ट्रपुरूष<br>प्रा. डॉ. डी. डी. जोंधळे | 517-519 |
| 96 | ताराबाई षिंदे यांचा “स्त्री–पुरूष तुलना” मधुन स्त्री मुक्तिचा हुंकार<br>प्रा. डॉ. गजानन लिंबाराव सोडनर | 520-523 |
| 97 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान<br>डॉ. कैलाश फुलमाळी | 524-529 |
| 98 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार व देश स्वावलंबन<br>डॉ. मंगला गोरे | 530-533 |

| | | |
|---|---|---|
| 99 | भारतीय नारी द्वारा राष्ट्र निर्माण के प्रयास और स्वदेशी आन्दोलन<br>डा. नुज़हत फ़ातिमा | 534-537 |
| 100 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रवादाची भूमिका<br>Role of nationalism in Indian Independence Movement.<br>डॉ.षिवाजी सोमला पवार | 538-554 |
| 101 | डॉ. रखमाबाई राऊत यांचे योगदान<br>प्राध्यापक डॉ. सु. सं. माळशिखरे | 555-557 |
| 102 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे ऐतिहासिक विश्लेषण<br>प्रा. युगंधरा यशवंत शिवणकर | 558-564 |
| 103 | भारतीय राष्ट्रवादाच्या जडणघडणीमध्ये भारतीय भाषिक वृत्तपत्रांचे योगदान<br>डॉ. प्रमोद ना. घ्यार | 565-570 |
| 104 | चंद्रपूर जिल्ह्यातील दलीतांच्या चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन<br>डॉ. मिलिंद बळीरामजी भगत, प्रविण गौतमराव वाळके | 571-576 |
| 105 | भारतीय राष्ट्रवादाची स्वातंत्र्य लढयातील भूमिका<br>प्रा.डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे | 577-580 |
| 106 | स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळीचे योगदान<br>प्रा. विजय देविदास वाकोडे | 581-586 |
| 107 | **मेलघाट वनपरिक्षेत्र में कुपोषणग्रस्त आदीम जनजीवन तथा विशेष रूप से प्रभावित महिला एवं बालक : कारण एवं उपाय**<br>**डॉ. निता गिरी** | 587-591 |
| 108 | मानवी जीवनाचा आधारस्तंभ - कॅल्शियम<br>प्रा. डॉ. स्वप्ना एस. देशमुख | 592-599 |
| 109 | माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांमधील पोषण जागृकता अभ्यासणे<br>प्रा. डॉ. लता ज. वाघेला | 600-607 |
| 110 | पोषक आहाराच्या अभावामुळे 0 ते 6 वषष वयोगटातील बालकांमध्ये वाढणारे कुपोषणाचे परीणाम<br>डॉ. सुजाता ब. सबाने (झाडे) | 608-612 |
| 111 | मानवी जीवनात पोषणाची भूमिका - एकचिंतन<br>डॉ.वैशाली मेश्राम | 613-615 |
| 112 | **राष्ट्र निर्माण में महात्मा गांधी के आर्थिक विचारों का योगदान**<br>**सबीहा नूरी** | 616-620 |
| 113 | रत्नाकर मतकरी यांच्या नाटकातून घडणारे समाजदर्शन | 621-624 |

| | | |
|---|---|---|
| | डॉ. प्रवीणा नागपूरकर | |
| 114 | स्त्री भ्रुण हत्या आणि सामाजिक स्थिती<br>प्रा. डॉ. पुनम चौधरी (देशमुख) | 625-628 |
| 115 | संत नामदेव यांचे साहित्य आणि सांप्रदायिक कार्य<br>प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे | 629-634 |
| 116 | संत साहित्य व परिवर्तन<br>प्रा डॉ अनंत सूर्यभान सूर्यकार | 635-638 |
| 117 | समताधिष्ठित राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>डॉ. टी. एस राठोड | 639-644 |
| 118 | सावीत्रीबाई फुले यांचे सामाजिक योगदान<br>डॉ. संजय भगत | 645-647 |
| 119 | घाटंजी तालुक्यातील आदिवासी बालकांमधील कुपोषणाचा अभ्यास<br>डॉ. कविता किर्दक | 648-650 |
| 120 | राष्ट्रविकासात महिलांचे योगदान<br>प्रा. डॉ. माधुरी ना. कोकोडे | 651- 658 |
| 121 | स्त्री मुक्ति चळवळी<br>प्रा. पांडुरंग रुस्तुम पाचपुते | 659-663 |
| 122 | भारतातील आर्थिक सर्वसमावेशकता आणि आव्हाने<br>प्रा.डॉ.सुनिल एन. ढेरे. | 664-667 |

# संत साहित्य आणि परिवर्तनवाद

**प्रो. डॉ. चारुशिला राजेश्वर रुमाले**
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय अकोला.

**सारांश: भारत ही संतांची भूमी आहे. ज्ञानाची संपन्न परंपरा याच भूमीवर सुरू झाली. संत साहित्य हे साहित्याचा समाज. मराठी भाषेच्या प्रारंभ काळातील वैशिष्ट्यपूर्ण साहित्य साहित्याचा समाज जीवनाशी वैशिष्ट्यपूर्ण साहित्य आहे. तेथील संस्कृती, लोक संस्कृती धर्म, नीती, राजकीय परिस्थिती याच्याशी जवळचा संबंध असतो संत साहित्याची सुरुवात महाराष्ट्रामध्ये ज्ञानेश्वरांच्या भागवत संप्रदायाने झाली. त्यांनी भागवत संप्रदायचा पाया रचला. या संप्रदायामध्ये समाजातील सर्वच स्तरातील भक्त होते. येथे त्यांना पूर्वापासून चालत आलेल्या तात्कालीन समाज वर्णाश्रमाची घट्ट पकड असलेला समाज होता. भेदाभेद विरहित समानतेचा अनुभव आला उच्च वर्णीयांकडून स्त्री शुद्रांना मिळणारी वागणूक अन्यायाची होती. न्याय व्यवस्थेमध्ये समानता नव्हती. त्यांना त्यातुन बाहेर काढण्याकरीता त्याच्यापर्यंत ज्ञान समाज अतिहलाखीचे जीण जगत होता पोहोचविण्याची नितांत गरज आहे. याची तळमळ संतांना होती त्यांनी तळागळातील लोकांना भक्ति मार्गाच्या धारेत आणले व भक्तीचा साधा सोपा मार्ग दाखविला भक्तीचा अधिकार सर्वांना आहे हे नैतिक व सामाजिक मूल्ये संतांनी प्रचारात आणली. सांगून त्यांच्या आचार विचारांमधील विकृती दूर केली. भूतदया, प्रेम, परोपकार, शांती, द्या, क्षमा, करुणा कर्मनिष्ठा अश्या मानवतावादी मूल्यांची रुजवण संतांनी केली. स्त्री शूद्रांना आत्मविश्वासाची वाट खुली केली व आत्मोध्दाराची संधी दिली व समाजामध्ये परिवर्तन उलट ज्ञान आणि कर्म यांची सांगड. विद्रोहाची भाषा संतांनी कधीच वापरली नाही. घडवून येऊ लागले समाज व्यवस घालून विवेक आणि नीतीचा प्रसार केला. या विस्कळीत होईल तिला हादरे बसतील असे कोणतेही बंडखोर विचार किंवा विद्रोह त्यांच्या विचरांमध्ये आढळत नाही. उलट प्रापंचिक दु:खावर मात करण्यासाठी जनलोकांना नैतिक सामर्थ्य दिलासा व बळ दिले. म्हणून संत साहित्याने केलेल्या परिवर्तनाचे स्वरूप हे मूलगामी होय यात शंकाच उरत नाही.**

## प्रस्तावना

संत साहित्य हे मराठी भाषेच्या सुरवातीच्याकाळात निर्माण झालेले साहित्य आहे .त्या आधी निर्माण झालेल्या साहित्याची बहुतांश भाषा संस्कृत होती व संस्कृत जनसामान्यांना न समजणारी भाषा होती .त्या भाषेची कोंडी फोडून भागवत धर्माचे संस्थापक श्री ज्ञानेश्वरांनी देशीकारलेणे घडविले .याचा पूर्वीच्या साहित्याशी त्यातील परंपरेशी विविध प्रकारचे नाते होते .त्याला इतिहस होता. काळानुसार नवीन साहित्य निर्माण होते. मध्ययुगीनकाळामध्ये जे साहित्य निर्माण झाले ते विशिष्ट परंपरेशी निगडित आहे. त्या साहित्याचे वाङ्मयीन परंपरेशी कधी साम्याचे तर कधी विरोधाचे असे नाते आहे . महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात संत साहित्याचे फार मोठे वैशिष्ट्यपूर्ण योगदान आहे.

**उद्दिष्टे**

१ (संत साहित्य म्हणजे काय ?

२ (संत वांड्मयाच्या प्रेरणा कोणत्या ?

३ (संत वांड्मयामागील भूमिका कोणती याचा शोध घेणे..

४ (तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थिती काय होती ?

५ (तत्कालीन धार्मिक व सांस्कृतिक जीवन कसे होते ? त्याचा संत वाड्मयाच्या निर्मितीवर काय परिणाम झाला.

६ (संतांनी मराठी भाषेत वांड्मय निर्मिती का केली ?

७ (संत साहित्याच्या प्रभावाचा कालखंड

८ (संत साहित्याचे स्वरूप

९ (संत साहित्याच्या परिवर्तनाचे स्वरूप

संशोधन पद्धत - विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

**संत साहित्य :**

संत साहित्य म्हणजे महाराष्ट्रातील भागवत संप्रदायाच्या संतानी निर्माण केलेले साहित्य.

"शके बाराशे बारोत्तर टिका केली तै ज्ञानेश्वरे
सच्चीदानंदबाबा आदरे लेखकु जाहला॥"

तेराव्या शतकाच्या सुरवातीला ज्ञानेश्वरांनी' ज्ञानेश्वरी, किंवा भावार्थदीपिका, ही गीता टीका लिहिली .नंतर 'अमृतानुभव'हा तत्वज्ञानाची उंची असलेला ग्रंथ श्री निवृत्तीनाथाच्या आग्रहास्तव लिहिला, चांगदेव पासष्टी, हरिपाठाचेअभंग, पद, गौळणी, भूपाळ्या, स्फुट अभंग रचना केली. हिच परंपरा पुढे संत नामदेव, चोखामहार, गोराकुंभार, सावतामाळी, सेनाव्हावी, विसोबाखेचर, संतएकनाथ, संततुकाराम, ही पुरुषमंडळी तर मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मळा, संत बहेणी या स्त्रीया या संत मंडळीमध्ये स्त्रीसंत होत्या त्यांनी पुढे नेला .या संतांनी तेराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत विठ्ठलभक्तीच्या परंपरेत हे साहित्य लिहिले ते संतसाहित्य म्हणून संबोधले जाते.

म्हणजेच आपल्याला असे म्हणता येईल की ज्ञानेश्वरी आधीची रचना मुख्यत्वे संस्कृत भाषेत होती . संस्कृतसाहित्य हे सर्वसामान्यजनांना पासून दूर होते .ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून गीतेतील तत्वज्ञान सर्वांसाठी खुले केले .सर्वांना समजेल पचेल रुचेल अशा उपमादृष्टांताच्या साह्याने ही विवेकाची गोठी, गहनकथा तळागाळातील लोकांसाठी खुली केली अध्यात्माचा आनंद व मार्ग सर्वांसाठी खुला केला .संत तत्कालीन व्यवस्थेला बदलू शकत नव्हते त्यांनी धर्माचे खरे स्वरूप समजावून सांगितल्यामुळे अठरापगड जातीतील लोक एकत्र झाली .त्यांनी अनेक दैवतांनी गजबजलेला जो देव्हारा होता .तो गोंधळ दूर करून त्यांनी 'हरिहर ऐक्य साधले जाती भेदातील समतावादी तत्वज्ञान या देवतांच्या भक्ती मधून त्यांनी आणल्यामुळे भागवत संप्रदाय सर्व समावेशक झाला व आध्यात्मिक लोकशाही निर्माण झाली त्यांनी आपले विचार ओवी, अभंग, पद, गौळणी, भूपाळी, वीराव्या या पारंपरिक व्यक्त केले.

**सामाजिक व राजकीय परिस्थिती**

महाराष्ट्राला अडीच ते तीन हजार वर्षाचा इतिहास आहे .तत्कालीन राजकीय इतिहासावरुन यादवकालीन समाज जीवनाची कल्पना येते. हा समाज वर्णाश्रम व्यवस्थेवर जातीभेदाने विभागलेला होता .धर्म व कर्मकांडाचे प्रभुत्व, त्रैवर्णिकांना सन्मानाचे स्थान. व गावरचना उच्चवर्णीयांनी केली असल्यामुळे शूद्रांना गावाबाहेर अन्यायाचे, पशुवत व अतिदयनीय जीवन जगावे लागत होते .स्त्रीसुद्धा शूद्रामध्ये गणल्या जाई, बालविवाहाची रीत, बहुपत्नीत्वाची चाल, वतनदारीवर आधारित ग्रामसंस्था, अलुतेदार व बलुतेदारी, जात पंचायत व ग्रामपंचायत यांचे ग्रामीण जीवनावर नियंत्रण होते .उच्चवर्णीयांकडून शूद्रांना मिळणारी वागणूक अन्यायाची व अत्याचाराची होती .न्यायव्यवस्था वरिष्ठांच्या हाताखालचे बाहुले होते .एकंदरीत समाज हलाखीचे जीवन जगत होता कोणतेही प्रभावीनेतृत्व सामाजिक व आर्थिक स्तरावर नव्हते .अशा या समाजाला या अन्याय परिस्थितीतून बाहेर काढण्याची तळमळ संतांना होती.

महाराष्ट्रामध्ये मुख्यतः लहान लहान गावेच होती मोठी नगरे मोजकीच जुन्नर, पैठण, नाशिक, देवगिरी, सिन्नर, कोल्हापूर, ठाणे, माहीम, चौटम, सोपारा, कल्म्याण, पंढरपूर सारख्या ठिकाणाला धार्मिक महत्त्व होते.

सांस्कृतिक जीवनामध्ये घरे मातीची, देवळे, मठ, ओवऱ्या, धर्मशाळा यांच्या आश्रयाने जगणारा मोठा वर्ग होता .विविध प्रथा - परंपरा, व्रत-वैकल्य, रीती-भाती, श्रद्धा-अंधश्रद्धा, शकुन-अपशकुन, गंडे-दोरे-ताईत, तंत्रविद्या, मांत्रिक, भूत-प्रेत यावर विश्वास यातूनच सुटका करण्याकरिता यज्ञ-जप-तप-अनुष्ठाने यांचे सहाय्य घेतल्या जात असे .देवळे हे सांस्कृतिक केंद्र होती .पुराण, प्रवचन, कीर्तन, धर्मसभा, शास्त्राची चर्चा चाले यांच्या आधारानेच विविध कलांचा विकास झाला .संगीतकला ही राजश्रेयाने नांदत होती.

संस्कृत भाषेत श्रेष्ठ दर्जाचे साहित्य निर्माण करणारे साहित्यिक मराठी मातीतून जन्माला आले, ज्ञानेश्वरी, पूर्वी शंभर वर्षे आधी, मुकुंदराज यांच्या विवेकसिंधुची, निर्मिती झाली.

**संतसाहित्याचे स्वरूप**

संत वांङ्मयाच्या निर्मितीमागे सुद्धा वाङ्मयीन प्रेरणा नव्हती .वैयक्तिक महत्वकांक्षा की व्यक्तिगत यशाची अपेक्षा नव्हती. भागवत संप्रदायात, सर्व स्तरातील लोक सहभागी झाले आजपर्यंत दुर्लक्षित असलेल्या स्त्रीशूद्र यात भक्त म्हणून सामील झाली त्यांना भक्तीच्या पातळीवर समानतेचा अनुभव आला .त्यांनी आपल्या देवतांची भक्त म्हणून सेवा केली आपली सुख दुःख सांगितली व त्यांना या संतमेळ्यात आनंद मिळाला या मेळ्यात कोणताही भेदभाव नव्हता. श्रमची चौकट नव्हती तेही श्रेष्ठ कोण न होती सार्वजनसमा. कनिष्ठ, पवित्र - अपवित्र स्पृश्य-अस्पृश्य, विटाळ न मानणारी ठरू शकतो त्यामुळे आपण आपली प्रगती व उध्दार कर्मकांडशिवाय हा आत्मविश्वास त्यांना आला आपल्या व्यवसायाला भक्तीरुप देऊन त्यांनी आपले गाऱ्हाणे मांडले तेही ओवी अभंगातून ,अशा प्रकारे त्यांनी अभंग रचना केली.

पुरोहितांकडून समाज नाडल्या जात होता .मुस्लिम आक्रमण अस्मानी सुलतानीचा प्रकोप त्यामुळे समाजाला मरगळ आलेली सामान्यजनाचे हाल संतांना पाहवत नव्हते. बुडली हे जनन देखवे डोळा, या कळवळ्याने अभंग, ओवी रचना झाली.

यादवांच्या राजवटीत उतरताकाळ आणि मुसलमानी आक्रमणे व समाजजीवन यापासून संत अलिप्त नव्हते . भागवत संप्रदायमुळी समाजाच्या परम आर्थिक उन्नतीसाठी निर्माण झालेला होता .म्हणून संत साहित्याच्या प्रेरणा संतांच्या वैयक्तिक जीवनात नव्हे तर व्यापक अशा समाज जीवनात शोधाव्या लागतात.

समाजहिताची व्यापक दृष्टी त्यांच्या ठिकाणी असल्यामुळे समाजाला बाहेर काढण्याची तळमळ संतांना होती .त्यासाठी प्रथम धर्मशुद्धीची आवश्यकता त्यांना वाटली. त्यांनी धर्माचे खरे स्वरूप स्पष्ट केले. . परमेश्वर हा एकच आहे आणि तो सर्व प्राणिमात्रांमध्ये भरलेला आहे. सर्वाभूतीभगवंतभाव, म्हणून सर्व माणसे समान आहेत .उत्तम व स्वच्छ चारित्र्य सुंदर माणसा विषयी प्रेम यांच्या समन्वयाने मनुष्याची प्रगती होऊ शकते. त्या करिता पुरोहित, यज्ञ-जप, व्रतवैकल्यपशुहिंसेची, गरज .नाहीसंतांनी आपले विचार अभंगाच्या, कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमा द्वारा लोकांपर्यंत पोहोचविले .त्यावेळी जना लोकांना संतांच्या साहित्यामागे समानतेची करुणेची भावना समाजापर्यंत पोहोचविण्याची उत्कृष्ट प्रेरणा असल्याचे दिसली.

**देशी भाषेची आवश्यकता.**

ज्ञान प्रसाराची मौखिक पद्धत व मुद्रण कलेचा अभाव त्यामुळे समाजाच्या सर्व स्तरापर्यंत ज्ञान पोहोचत नव्हते .समाज नाडल्या जात होता .त्यामुळे संतांना त्याबद्दल कळवळा होता ज्ञान पोहोचविण्याची तळमळ होती .ही गरज ओळखून मराठी भाषेतून अभंग रचना केली व तत्वज्ञान परग्रंथही रचिले संस्कृत भाषेच्या तुलनेत देशी भाषेचे समर्थ्य आणि सौंदर्य सिद्ध करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले व देशी भाषेत वाङ्मय निर्मिती हा हेतू साध्य केला. यातूनच त्यांच्या साहित्याच्या परिवर्तनाचे स्वरूप दिसून येते.

**संतांच्या साहित्यातील परिवर्तनाचे स्वरूप**

संतांनी आपल्या साहित्याचा समाजातील अनिष्ट बाबींच्या परिवर्तणासाठी परमार्थ क्षेत्रातील परिवर्तणासाठी वापर केला प्रथम त्यांनी प्राथमिक क्षेत्रात परिवर्तन केले व त्यांचे परिणाम सामाजिक जीवनावरही उमटले.

धर्म संस्थांच्या शुद्धीकरणाचे प्रयत्न संतांनी विविधता मिटवून समता व एकता स्थापित करण्याची त्यांची धडपड होती .त्या करिता त्यांनी चारित्र्य हा मूलभूत सुधारणेचा बिंदू ठेवला व चारित्र्य शुध्दीचा आग्रह समाजाला पटवून दिला. नीतीमत्ता असलेला समाज त्यांना अपेक्षित होता असा चारित्र्य संपन्न समाज

कर्मकांडापासून मुक्त असलेला भक्तीचा साधा सोपामार्ग सर्वांना सुलभ आसानामस्मरणाच्या द्वारा ईश्वरी उपासनेचा मार्ग घालून दिला . नजावेलागे वनांत रासुखे येता घरानारायण, व आचार-विचारातील विकृती दूर केली.

प्रपंचात राहून परमार्थ साधता येतो त्याकरिता संसार त्याग करण्याची गरज नाही .असा उपदेश संतांनी केलाप्रपं. चव त्यांचीभक्तीहीप्रवृत्तिमार्.परमार्थयाचालाभजनलोकघेत गीहोती .निवृत्ती मार्गी नव्हती. साधी-सोपी भक्तीची संकल्पना नैतिकतेच्या आधारावर उभी होती .याद्वारा चारित्र्य शुद्धी व धर्मशुद्धी घडून आली व देवभक्त याचा सरळ संबंध प्रस्थापित केला त्यामुळे पुरोहितांचे प्राबल्य कमी झाले.

ईश्वराची उपासना भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे .स्त्री-शूद्रांना भागवत संप्रदायात स्थान मिळाले .त्यामुळे विषमता कमी झाली "हरिहरऐक्य"घडविले देवतांचा गोंधळ दूर केला.

तळागळातील खालच्या स्तरातील व्यक्तीपर्यंत ज्ञान पोहोचावे याकरिता संतांचा आग्रह होता .म्हणून लोकांना समजेल अशी त्यांच्या बोलीभाषेत साहित्य निर्मिती केली .संतांनी आपले साहित्यातून विचार

मांडलेत्यांचीमाध्यमेहीलोक. कीर्तन.ांनापरिचितलोकसंस्कृतीमधीलवापरली, प्रवचन, भजन, भारुडे, गौळणी, स्तोत्र, आरत्या, भूपाळ्या ही माध्यम चिरकाल टिकली रुजली व बहरली.

भक्तीचा अधिकार सर्वांना आहे असे संतांनी दाखवून दिले .त्यामुळे समानतेचे तत्व परमार्थापुरते तरी अमलात आले .समाजातील विषमतेची धार कमी झाली .देवांशी भक्ताचे नाते हे मायलेकराचे आहे असेसांगून.ए मानवी विविध नातेसंबंधातून त्यांनी देवाला पाहिले आणि त्यांच्याशी संवाद साधला .आपले दुःख सुख देवालासांगितल्याने प्रत्येकजण हळूहळू का होईना बोलू लागला.

**समारोप**

यादवकालीन समाजजीवन रूढी-परंपरांनी जखडलेले होते .चातुर्वर्ण्यावर समाज विविध धर्म-पंथ यांमध्ये जाती-जमाती आणि बहुधा चार वर्णात विभागला होता .मंत्र-तंत्र उपासनांना महत्त्व व कलामंदिराच्या परिसरात वाढत्या विवेकसिंधु हा तेराव्या शतकातील एकमेवग्रंथ.

संतांच्या वाडमय निर्मितीमागे प्रसिद्धी व यश ही प्रेरणा नव्हती .समाजातील माणसाचे त्याच्या चरित्राचे उन्नथन करणे .जातीभेद नष्ट करणेसर्व. लोकएकाचईश्वराचीलेकरंआहेतविविधधर् मए पंथए आचार-विचारांचा गोंधळ दूर केला .कर्मकांड व पुरोहिताचे वर्चस्व कमी केले .साधासोपा भक्तिमार्ग सांगितला .संतांचे कार्य धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील होते.

देवाला प्रियकर मांडणारी मधुराभक्ती प्रसारित झाली तिचा शिरकाव महाराष्ट्रात आला नाही आणि त्यातील विकृती ही भक्तीत आली नाहीसामान्यमाणसापर्यंतज्ञानपो. .होचविलेसर्वसंतांनालहान-मोठे जे अनुभव आलेत्यांनी आपल्या जाती धर्मानुसार आपल्याच भाषेत मांडल्याने त्याचा गोडवा अधिक वाढलासुलभरचना. परिचित वृत्तांचा देशी छंदाचा वापर केला. लोकभाषा. लोकसंस्कृतीमध्ये त्यांनी अध्यात्माची लोकगंगा प्रवाहित केली. वरील विवेचनातून खालील निष्कर्ष निघतात.

**निष्कर्ष**

१ (तेराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत विठ्ठलभक्तीच्या परंपरेत निर्माण झालेले साहित्य ते संत साहित्य .

२ (तेराव्या शतकाआधी वर्णाश्रम पद्धती होती त्रैवर्णिकांचे प्राबल्य तर शूद्रांना गावकुसाबाहेर हालाखीचे अपमानाचे जीणे जगावे लागे.

३ (संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माची स्थापना केली व हरिहर ऐक्य निर्माण करून अठरागड जातीतील लोकांना एकत्र आणले.

४ (ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टीका तत्कालीन भाषेत लिहून सर्वांसाठी अध्यात्मिक ज्ञान खुले केले गेले.

५ (परमेश्वर हा एकच आहे आणितो सर्व प्राणिमात्रांमध्ये भरलेला आहे म्हणून सर्व माणसे समान आहेत.

६ (कर्मकांडापासून मुक्त साधासुधा भक्तीचा मार्गसर्वांना, सुलभ नामस्मरणाच्या द्वारा उपासना असा घालून दिला.

**संदर्भसूची**

१ (ल.रा.नसिराबादकरए प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, १९९७.
२ (वि .लभावे, मराठी सास्वत. पॉप्युलर, मुंबई, १९६३.
३ (बी.एन पाटील, प्राचीन महाराष्ट्र वांड्मय वैभव.  प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००९.
४ (ग.बा. सरदार, संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, म.सा.प पुणे, १९७०.
५ (श.गो. तुळपुळे, पाच संतकवी, सुविचार प्रकाशन मंडळ पुणे १९८४.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# स्त्री संत साहित्यातील सामाजिक बंडखोरी

**डॉ. पद्मरेखा धनकर**
मराठी विभाग
सरदार पटेल महाविद्यालय
चंद्रपूर

भारताच्या मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रामध्ये संत साहित्याची चळवळ 12 व्या – 13 व्या शतकात जन्माला आली. आजच्या काळात संत साहित्याकडे एक दृष्टीकोन जरी टाकला तरी त्याचे ऐतिहासिक महत्व लक्षात येते. विदर्भातील महानुभव पंथाची फोफावलेली चळवळ असो किंवा पष्चिम महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेल्या वारकरी संप्रदायाची चळवळ असो. याचा मागील दोन शतकांपासून सैध्दांतिक अभ्यास केला जात आहे. इंग्रजी षिक्षणातून आणि विचारातून निर्माण झालेल्या विचारवंतांच्या पहिल्या पिढीने समाजप्रबोधनाबरोबर संत साहित्यावरही दृष्टीक्षेप टाकला त्यातल्या त्यात न्या. गोविंद रानडे यांनी 'राईज ऑफ द मराठा पॉवर' या ग्रंथातून खऱ्या अर्थाने संत साहित्य आणि कार्याची दखल घेतली. त्यानंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि.का. राजवाडे, वि.ल. भावे, पु.ग. सहस्त्रबुध्दे, ह.श्री. शेनोलीकर, बा.र. सुंठणकर, ग.बा. सरदार, स.ज. भागवत, डॉ. यु.म. पठाण, रा.ग. जाधव, रावसाहेब कसबे, यशवंत मनोहर, भालचंद्र नेमाडे, म.सु. पाटिल, इत्यांदिनी तर दुर्गाबाई भागवत, कुसुमावती देषपांडे, इरावती कर्वे, सरोजिनी बाबर, तारा भवाळकर इ. स्त्री लेखकांनीही संत साहित्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही आठषे नऊषे वर्षापूर्वी निर्मिण झालेले हे संत साहित्य आजही आपणास खुणावत राहते. याचे कारण म्हणजे संत साहित्य हे तत्कालीन ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणून महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि. का. राजवाडे, पु. ग. सहस्त्रबुध्दे यांच्या संत साहित्यावरील प्रखर टिकेचा भाग बाजुला ठेवला तरीही संत साहित्य हे साहित्य म्हणून श्रेष्ठ स्थानी ठरते. मुद्दा महत्वाचा हा आहे की संतांच्या साहित्याने आजच्या अर्थाची सामाजिक बंडखेरी घडून आलेली नसली किंवा अस्पृष्यता संत नष्ट करू शकले नसले तरीही अध्यात्मिक पातळीवर सर्व जातीपाती, धर्म, पंथ यांना जोडणारी ती एक सामुहिक (सामाजिक) कृती होती हे ही आपण नाकारू शकत नाही. संत साहित्याचे साक्षेपी विचार करतांना त्याला काळाच्या बऱ्याच मर्यादा पडलेल्या आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. संत हे धर्मसंस्थापक नव्हेत किंवा त्यांना दुसरा धर्मही घ्यायचा नव्हता पण स्वधर्मातील ज्या वाईट बाबी आहेत त्या बाबींवरही कठोर टिका करण्याचे सामर्थ्य त्यांच्या साहित्यामध्ये आहे हे नाकारू शकत नाही. त्याला आपण मार्क्सवादी किंवा तर फुटपाटयालावून तपासणी केली तर संतांच्या साहित्यावर अन्यास केल्यासारखेच ठरते. सुरूवातीलाच म्हटल्या प्रमाणे संत हे विविध जाती धर्मातून आणि खालच्या वर्गातून उदयास आलेले आहे. याबरोबर त्या संतांचे कुटूंब त्यांच्या सोबत आहे. संतांच ऐतिहासिक महत्व आणि बंडखोरी सांगतांना एक मुद्दा पुरेसा ठरतो तो म्हणजे संत हे पारलौकिक

जीवनाचे आकर्षण असलेले परंतु संसार न सोडता संसारात राहून लोकांना सन्मार्गावर आणणारे समाज सुधारक आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे म्हणजे संतांचे महत्व अधोरेखित होऊ शकते.

संतांचे दुसरे महत्वाचे वैषिष्टय हे की संत आणि त्यांचे साहित्य स्त्रीद्वेष्टे नाही तर महत्वाची बाब ही की स्त्री संतांनी स्वतःची भूमी नांगरली, स्वतः तयार केली आहे हेही दिसते उदाहरणा दाखल मुक्ताई, जनाई, सोयरा, निर्मला, विठाई, बहीणाई, वेणाबाई आणि कान्होपात्रा या ठळकपणे आपल्या नजरेत भरतात. याचा अर्थच असा आहे की आजच्या काळातील स्त्री–पुरूष समानतेचे तत्व त्याकाळातही दिसून येते. त्या अर्थाने तीही एक सामाजिक बंडखोरी ठरते.

संत साहित्यावरील प्रस्तुत लेखात केवळ ढोबळपणे पुरूष संत कवी आणि स्त्री संत कवी असे दोन भाग सोईसाठी केलेले आहे. स्त्री संतकवयित्रींचे लेखन महानुभावपंथीय महदंबेपासून सुरू झालेले दिसते. मुळात ती जिज्ञासू आणि चर्चक म्हणून चक्रधरांनीही तिच्या सर्व प्रष्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तिच्या समकालीन स्त्री संतांनी फारसे लेखन केल्याचे दिसत नाही. (महानुभावपंथीय स्त्रिया) मात्र वारकरी संप्रदायातील मुक्ताबाई, जनाबाई, सोयरा, निर्मला, यांनी लेखन केल्याचे दिसते. महदेबेचे धवळे वगळता तिच्या लेखनामध्ये सामाजिक बंडखोरी दिसून येत नाही याचा अर्थ असाही नव्हे की धवळयांमध्ये बंडखोरी दिसून येते. तत्कालीन काळात एखाद्या स्त्रीने लेखन करणे हीच बंडखोरी आहे. त्या अर्थाने महदंबेचे महत्व लक्षात घेतले पाहिजे.

खऱ्या अर्थाने स्त्री संत साहित्यातील सामाजिक बंडखोरी जनाबाई, सोयराबाई व इतर संत कवयित्रींच्या अभंगातून दिसते. संतांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा आणि त्यांचे कार्य निरखून पाहिले असता असे दृष्टीपथास पडते ते म्हणजे संतांनी जे स्वतः भोगले व जगले ते अभंगरूप घेऊन प्रस्फुटित झाले. एका एका किंवा सुटया संतांचा विचार जरी केला तरी त्यांच्या वाटयाला आलेले भोग त्यांच्या समूहाषी निगडीत असणाऱ्या त्या सर्वांचा भोगवटा आहे. त्या अर्थाने जनाबाईंच्या वाटयाला आलेले भोग किंवा मुक्ताबाई, सोयरा, निर्मला, विठाबाई यांच्याही वाटयाला आलेले भोग केवळ व्यक्तिगत न समजता ते प्रतिनिधीक स्वरूपाचे आहे. समूहदर्षी आहे. त्याहीपुढे जाऊन असे म्हणता येईल की ते समाजदर्षी आहे. आजच्या काळातही स्त्रीच्या वाटयाचे भोग एखादी स्त्री लेखिका मांडत असेल तर ते तिचे व्यक्तिगत अनुभव न समजता प्रतिनिधीक समजतो हेच सूत्र संत कवयित्रींच्या अभंगांना लागू केलं तर संतकवयित्रींच्या वेदना, दुःख आणि भोग आपल्याला आपले वाटू शकतात. जनाबाईंच्या अभंगातून किंवा मुक्ताईच्या अभंगातून केवळ पुरूषांना समजून घेणे आलेले नसून तत्कालीन समाज व्यवस्थेचेही प्रतिबिंब त्यात आलेले दिसते. ज्ञानेष्वरांना आलेली निराषा घालविण्यासाठी वयाने लहान असलेल्या मुक्ताईने 'ताटी उघडा ज्ञानेष्वरा' अषी साद घातली आहे. लहान असूनही मोठेपणाचा भाव

स्त्रियांमध्ये दिसून येतो तो त्या त्या समाजातील सामाजिक संरचनेमुळे, हे लक्षात घेतले पाहिजे. मुक्ताईने दाखविलेला संमंजसपणा हा दुसऱ्या अर्थाने सामाजिक बंडखोरीचे विधायक रूप आहे.

जनाबाई या स्त्रीसंत कवयित्रींच्या रांगेमधील सगळयात लक्षणिय कवयित्री आहे. स्वतःचे कूळ विदुराषी जोडणारी म्हणजे जात्यातच अंत्यज असनारी ही कवयित्री त्याकाळाचा अवकाष कवेत घेतांना दिसते. विठ्ठलाचे सगुणरूप तुकारामापूर्वी लक्षात आणून देणारी ती महत्वाची कवयित्री आहे. म्हणून ती म्हणते.

'देव खाते देव पिते देवावरी मी निजते'

हे म्हणण्याचे सामर्थ्य जनाबाईमध्ये आहे, कारण जनाबाई आणि विठ्ठलाचे नाते एकजिनसी आहे, ती विठ्ठलाला 'विठ्ठयाविठ्ठया मूळ भायेच्या काटर्या' असे म्हणते तेव्हा त्याच्या बरोबर असलेल्या नात्याचे संसूचन दिसून येते. जनाबाईच्या विठ्ठलाषी एकरूप होण्याच्या कारणाचा शोध घेतला म्हणजे हेही लक्षात येते की नामदेवांच्या घरी तिचे राहणे दासी सारखे आहे. मायबापाचे छत्र डोक्यावरून उठून गेलेले आहे. अषा काळात तिचा संसार उभा होण्याची कुठेच शक्यता दिसत नाही आणि या शक्यतेमुळेच.

स्त्री जन्म म्हणौनी नव्हावे उदास ।
साधुसंता ऐसे केले मज ।।

अषी ती सांगते तिची विठ्ठला विषयीची भक्ती वाढत जाते. जवळच्या व्यक्ती दूर जातांना दिसल्या म्हणजे सामान्यतः व्यक्तीचा कल पारलौकिकाकडे जतो जनाबाईचे ही तसेच झाले आहे. स्वतःला देवाची प्रिया मानणे मात्र इतरांना ती व्याभिचारिणीही दिसते हे दिसले पण जनाबाईच्या अभंगातून उत्कटतेने अवतरले आहे. ती म्हणते

'डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारी जाईन मी ।।
आती घेईन टाळ खांद्यावरी वीणा ।
आता मज मना कोण करी ।।
पांढरीच्या पेठे मांडियेले पाल ।
मनगटावर तेल घाला तुम्ही ।।
जनी म्हणे देवा मी झाले वेसवा ।
रिघाले केषवा घर तुझे' ।।

प्रस्तुत अभंगातून तत्कालीन काव्याचे समाजचित्र आणि स्त्रीविषयक दृष्टीकोन आपल्या लक्षात येतो. त्या अर्थाने जनाबाई या आचरणातून आणि विचारातून सामाजिक बंडखोरी करणाऱ्या पहिल्या संत कवयित्री ठरतात.

जनाबाई नंतर नागरी उर्फ नागी, मंगळवेढयाची कान्होपात्रा, संत चोखामेळयाची पत्नी सोयरा, बहिण निर्मळा आणि वारकरी संत मेळाव्यातील अत्यंत ताकदीची अर्वाचीन स्त्री कवयित्री विठाबाई व तिच्या अगोदर संत तुकारामांची षिष्या बहिणाबाई यांच्याही अभंगाचा शोध घेतला तर असे दिसून येते की सोयराबाई ही स्वंतःला चोख्याची महारी म्हणवून घेते. स्त्रीत्व आणि अस्पृष्यत्व या दोन्ही अंगाने सोयराबाईंचे अभंग लक्षणिय आहे. पंढरपुरच्या ब्राम्हणाने चोखामेळयाला महारजातीचा असल्याने छळले केवळ जातीयतेच्या श्रेष्ठत्वाने किंवा वर्णच्या श्रेष्ठत्वाने व्यक्ती मोठया ठरत नसतात हे चोखामेव्यानेही 'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा' या अभंगातून मांडलेलेच आहे. तत्कालीन समाज व्यवस्था आणि तिचा पीळ संतकवी किंवा कवयित्री कमी करू शकले नसले तरी विठ्ठल भक्तीच्या पातळीवर तो पीळ बराच सैल केलेला दिसून येतो. अठरापगड जातीतून आणि धर्मातून निर्माण झालेली ही संतांची मांदीयाळी विठ्ठलभक्तीपर्यंत जाऊन पोहचते. भक्तीच्या पातळीवरची समानता अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र आणून त्यांना एका विचारात गोवून त्यांच्यात विठ्ठलभक्ती निर्माण होत असेल तर ही भक्ती कुठल्याही अंगाने पळपुटेपणा ठरत नाही उलट ती बलस्थानच ठरते. तत्कालीन काळात देव, धर्म, कर्मकांडे यांचे स्त्रोम मोजले असतांना सर्व समुदायाला विठ्ठलभक्तीच्या छत्रछायेखाली एकत्र आणण्याचे आवाहन संत आपल्या अभंगातून करत असतील तर ती विधायक दृष्टया सामाजिक बंडखोरी ठरते.

स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा प्राचीन काळापासून दुय्यम राहिला आहे. त्यातल्या त्यात तिचे विटाळषी असने तिला तिच्या कुटूंबापासून आणि परमेश्वरापासून दूर ठेवते. याकारणानेही तिला भक्तीच्या मार्गातील धोंडे समजली जाते. परंतु हा निसर्गदत्त देहाचा विटाळ सृजनासाठी किती अपरिहार्य आहे हे सांगण्याचे सामर्थ्य सोयराबाईंनी दाखवले आहे ती म्हणते

'देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुध्दबुध्द ।।
देहीचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो जाला कवण धर्म ।।
विटाळावाचोनी उत्पत्तीचे स्थान । कोण देह निर्माण नाही जगी'' ।

हे कठोर वास्तव आपल्या अभंगातून तिने समाजासमोर मांडले आहे. त्याअर्थाने सोयराबाईचे श्रेष्ठत्वही सिध्द होते.

सोयराबाई नंतरच्या वारकरी संप्रदायातील अत्यंत महत्वाच्या व लक्षणिय कवयित्री म्हणजे विठाबाई होत अठराव्या शतकामध्ये जन्माला आलेल्या विठाबाई अत्यंत ताकदीची कवयित्री आहे. त्यांच्या मातापित्यांनी त्यांच्या मनात लग्नाची इच्छा नसतांनाही तिच्यापेक्षा वयाने खूप मोठया असलेल्या पुरूषाषी लग्न लाऊन दिले. तो कामलंपट असल्यामुळे तिच्याषी तिच्या इच्छे विरूध्द समागत करतो. तिला ते आवडत नाही. ती विरोध करते तेव्हा तो तिला मारायलाही कमी करत नाही. याचे चित्र तिने अगंगातून रेखाटले आहे ती म्हणते.

'भ्रतारहो मजसी ओढतो एकांती ।
भोगावे मजसी म्हणोनी या ।।
ओढूनीया बहूत मारतो मजसी ।
मध्यरात्री जाणा समयासी' ।।

यातून तिच्या मनात कामभावाविषयी विरक्ती निर्माण होते पूढे तिची भेट श्री. चिदंबरस्वामीषी होते. चिदंबर स्वामीकडे विठाबाई गेल्यामुळे तिचा पती व सासू तिला पकडून आणतात, घरी बांधून ठेवतात तिच्यावर अत्याचार करतात त्यामुळे ती म्हणते.

'तुझी सत्ता आहे देहावरी समज
मझेवरी तुझी किंचीत नाही'

तिच्या या बेडरवृत्तीला पती अमानुषपणे उत्तर देतो ते म्हणजे तिला मरेस्तोवर मारतो. त्यातच तिचा देह जातो. विठाबाईच्या तोडीची पुरूष सत्तेच्या विरूध्द आवाज उठवणारी स्त्री संत कवयित्री दुसरी दिसून येत नाही. आजच्या प्रगत समजल्या जाणाऱ्या समाजातही स्त्रीची अवस्था फारषी समाधानकारक नाही आजच्या स्त्रीवाद्यांना मध्ययुगीन काळात जन्माला आलेल्या संतकाव्याचा त्यातल्या त्यात स्त्रीसंत काव्याचा अभ्यास केला म्हणजे स्त्रीवाद्यांना प्रेरणा आणि संदर्भ मोठयाप्रमाणात सापडू शकतात हे ऐतिहासिक सत्य आणि वास्तव नजरेआड करून चालणार नाही.

**सारांष**

सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे संत काव्याचे दोनभाग ढोबळपणे मांडले होते तरीही अभ्यासाअंती हे दिसून येते की पुरूषसंत काव्याहून स्त्रीसंत काव्याचा पोत वेगळा आहे. त्याचे स्वरूप आणि संदर्भ भिन्न आहेत. स्त्रीच्या वाटयाचे भोग एखाद्या पुरूष समजूही शकतो. पण तिचे भोग मात्र तिलाच भोगावे लागतात आणि ते भोग काव्यातून अवतरत असतील तर त्याची दखल घेणे महत्वाचे ठरते. मध्ययुगीन काळात जन्माला आलेला हा स्त्री संत काव्याचा प्रवाह अधिक रूंद अधिक बंडखोर आणि लक्षणिय ठरला आहे. संत कवायत्रिंच्या अभंगातून व्यक्त झालेली भावना, वेदना आणि भोग त्यांचे व्यक्तीगत न ठरता प्रतिनिधीक पातळीवरचे ठरते. त्याकाळात अठरापगड जातींच्या अस्पृष्य आणि स्त्रियांना आपल्या कवेत घेणारा कोणीही जिवंत हाडामासाचा व्यक्ती किंवा समूह पुढे न आल्यामुळे कानडा विठ्ठलाला आपल्या वेदना, दुःख सांगितलेले आहे. हे सांगणे किंवा अभिव्यक्त होते हेच खऱ्या अर्थाने सामाजिक बंडखोरीची प्रागतिक पाऊलवाट वाटते.

## संदर्भ ग्रंथ सुची

1. सुष्णकर बा.रं., महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य
   दु.आ., लोकवाड्.मयगृह, मुंबई 1994.
2. सरदार गं.बा., संत वाड्.मयाची सामाजिक फलश्रृती
   चौ.आ. लोकवाड्.मय गृह, मुंबई 1982.
3. आजगावकर ज.र., महाराष्ट्र संत कवयित्री, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई 1939.
4. ढेरे रा.चीं, प्राचिन मराठी वाड्.मयः शोध आणि संहिता, अंजली प्रकाषन, पुणे 1991.
5. इर्मेकर सुहासिनी, प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाड्.मयिन कार्य,
   परिमल प्रकाषन, औरंगाबाद 1980.
6. इनामदान हे.वि. (संपा) भक्तीगंगेच्या वाटेवर, संजय प्रकाषन, पुणे, 1988.
7. देषपांडे वा.ना, महदंबाः आद्य मराठी कवयित्री कॉन्टीनेन्टल प्रकाषन, पुणे, 1956
8. बाबर सरोजिनी, महाराष्ट्रातील संत कवयित्री, समाजषिक्षण प्रकाषन, पुणे, 1972.
9. भवाळकर तारा, स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर, दु.आ, लोकवाड्.मय गृह, मुंबई 2012.

# मराठी साहित्यातील बदलते प्रवाह

प्रा.रिता द. वाळके (डंभाळे)
अरविंदबाबू देशमुख महा.
भारसिंगी तह.नरखेड
जिल्हा. नागपूर

**सारांश–**

स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक आर्थिक, राजकिय औद्योगिक, तंत्र वैज्ञानिक अशा अनेक क्षेत्रात घडामोडी होऊन प्रचंड स्थित्यंतर झाले. या सर्वाचा एकत्रित परिणाम साहित्यनिर्मितीवरही झाला.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी वाङमयात निर्माण झालेले वाङमय प्रवाह हे जीवनवादी आहेत. मानवी मूल्यांनवर या साहित्याची निष्ठा आहे. समाजातील जिवंत प्रश्नांचे हे साहित्य असून वास्तववादी आहे. माणसाच्या शोषणाविरूद्ध हे साहित्य प्रकट झाले असून नव्या जाणिवांनी तेवढेच बहरलेले आहे. व्यक्तीचे, समाजाचे आणि परिसराचे दैन्य दारिद्र्य ह्या साहित्यात प्रकट झाले आहे. स्वप्नाची भाषा, हक्क अधिकाराची जाणीव आणि लोकशाही व्यवस्थेचे समर्थन करीत हे प्रवाह रूढ होतांना दिसतात.

मराठी साहित्यातील विविध प्रवाह समृद्ध आणि जीवनाच्या विविध स्तरांना स्पर्श करणारे असून व जनवादी भूमिका घेऊन व्यक्त झाले आहेत. या प्रवाहाचे मुख्य प्रयोजन मानव मुक्तीचे आहे. मानवाला केंद्र मानून हे प्रवाह उदयाला आले आहेत. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, कामगार, साहित्य, मुस्लिम, ख्रिश्चन या सर्वच साहित्यप्रवाहातून समाजव्यवस्थेत विविध प्रकारांची कोंडी, कुचंबना, अन्याय, शोषण, दैन्य, दु:ख, उपासमार, ऊपेक्षा मांडली आहे. या सर्वच साहित्यप्रवाहांना सर्वार्थीने समतेची अपेक्षा आहे. शोषणरहित समाजरचना अपेक्षित आहे. सर्व समाज एका पातळीवर एकात्म स्वरूपात हवा आहे. जाति–धर्माचे प्रदेशाचे तटगट तोडून मानवतावादी दृष्टीने व राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेली समाजरचना हवी आहे. या अर्थाने हे सर्व साहित्य–प्रवाह समग्र परिवर्तनवादी आहे. हीच त्यांच्या निर्मितीमागची प्रेरणा आहे.

**प्रस्तावना –**

'साहित्यप्रवाह ही संकल्पना आधुनिक मराठी वाङमयात स्वातंत्र्योत्तर काळात नव्याने रूढझाली. साहित्यप्रवाह या नव्या संकल्पनेतून आजच्या साहित्यप्रवाहांची वेगवेगळी वैशिष्ट आहे. मानवी समाज हा प्रवाही आहे, तसेच या समाजात निर्माण होणारे साहित्यही प्रवाही आहे. ज्या विरोध विकास सिद्धांतानुसार समाज प्रवाहित झालेला असतो तोच सिद्धांत नवनव्या वैशिष्टाचे साहित्य निर्माण व्हायला किंवा नवनव्या साहित्यप्रवाहांचा जन्म व्हायला कारणीभूत झालेला आहे. साहित्यात अंतिमत: मानवी मनाचे, जीवनाचे आणि समाजाचे प्रतिबंध उमटत असते. म्हणून साहित्याचे स्वरूप प्रवाही राहते व वेळोवेळी समाजात नवे, नवे साहित्यप्रवाह जन्माला येते. प्रत्येक नवी साहित्यकृती म्हणजे नवा प्रवाह नसतो. नवी साहित्थ्यकृती आणि नवा साहित्यप्रवाह ह्या भिन्न संकल्पना आहे.

साहित्यप्रवाह ही संकल्पना एखाद्या विशिष्ट समाजातील साहित्यापुरती मर्यादीत असते. त्या समाजाच्या साहित्यात तो प्रवाह विशिष्ट काळात जन्माला आलेला आहे. तो नित्य स्वरूपात अस्तित्वात राहील याची शाश्वती नाही कारण तो एक विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अस्तित्व म्हणजेच सामाजिक परिवर्तन होऊन संपुष्टात आले, तर तो विशिष्ट साहित्यप्रवाह त्या समाजाच्या मूळ साहित्यप्रवाहाशी एकजीव होऊन विसर्जित होतो, तो इतिहास जमा होतो व नंतरच्या काळात त्याचे अस्तित्व जरी ऐतिहसिक स्परूपात राहले व त्याचे महत्व कमी झाले असे म्हणता येत नाही. उलट त्या विशिष्ट समाज स्थितीतून अपरिहार्यपणे निर्माण झालेला तो साहित्यप्रवाह असतो.

स्वातत्र्योत्तर काळात एकूण साहित्यामध्ये काही परिवर्तने आली. साहित्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. विशेषत: स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा–वीस वर्षाच्या काळात मराठी साहित्यात काही नवीन प्रवाह निर्माण झाले आणि हे सर्व एकाएकी घडले नाही. या नवीन प्रवाहांच्या मागे काही वैचारिक दृष्टकोन होता.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण प्रसार, लोकशाही शिक्षण सवलती, व्यक्तीस्वातंत्र्य यांचा प्रभाव जनमानसांवर पडत होता. यामुळे नव्या समाजरचनेची गरज वाटत होती, जुनी मुल्ये, जूने मापदंड, जुन्या धर्मकल्पना, जुन्या संस्कृतीकल्पना, जुने अर्थकारण,

जुने स्तरीकरण सर्व प्रकारची जुनी विषमता यांच्या जाती, पंथ, दैववाद, परंपरा इत्यादी जुन्या व्यवस्थांचा निकडीने आणि नव्याने विचार करण्याची गरज वाटत होती. आजवरच्या उपेक्षित लोकसागराला नव्या जाणीवांची उत्तुंग भरती येत होती. या उतुंग भरतीचा म्हणजे अस्वस्थ जाणिवांचा अविष्कार म्हणजेच अनेक साहित्यप्रवाहाची निर्मिती म्हणजे अनेक साहित्य प्रवाह होत.

दलित, ग्रामिण, जनवादी, स्त्रिवादी, कामगार साहित्य, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन या सर्वच साहित्य प्रवाहांनी समाजव्यवस्थेतील प्रत्येक प्रकारची कोंडी, कुंचबणा, अन्याय, शोषण, दैन्य, दु:ख, उपासमार, उपेक्षा यांच्या कैचीत सापडणारा समाज मांडलेला आहे. या सर्वच साहित्यप्रवाहांना सर्वार्थाने समता हवी होती. जाती—धर्माचे तटगड सोडून— मानवतावादी दृष्टीने व स्वच्छ राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेली समाजरचना हवी होती. सोबतच शोषणरहित समाजरचना हवी होती. म्हणून हे सर्व साहित्य प्रवाह समग्र परिवर्तनवादी आहे.

गेल्या पन्नास वर्षात सामाजिक स्थिती गती, परिस्थिती, प्रेरणा—प्रवृत्ती हळूहळू बदलत गेल्या. त्यांचा परिणाम होऊन विविध साहित्य प्रवाह जन्माला आले.

समाजात जनसामान्यातील तरूण पिढीची सामाजिक आणि मानसिक कोंडी झालेली होती. त्या कोंडीचा स्फोट म्हणजेच विविध साहित्य प्रवाहाची निर्मिती होय.

मानवी जीवन विविध घटकांनी बद्ध असल्याने आणि या घटकांनी संस्कारित होत असल्याने त्याचे आविष्करण साहित्यासाठी महत्वाचे असते हे अविष्करण सामाजिक पर्यावरणातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक घटकांनी घडविलेले असते. ही जाणीव मानसिक संरचनेवर अवलंबून असते. हीच मानसिक संरचना विविध साहित्यप्रवाहातून पुढील प्रमाणे मांडली आहे.

**स्त्रीवादी साहित्य**— स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचा विचार करतांना स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीमधून स्त्रीवादी साहित्याची बैठक तयार होत गेली. स्त्री स्वातंत्र्य ही कल्पना समाजाला नवी, न पटणारी व गैरसोयीची असल्याने वैयक्तिक पातळीवरही जनमताला विरोध करण्याची भूमिका स्त्रीवाद्यांना घ्यावी लागली. स्त्रीचे अस्तित्व असलेला खास अनुभव सांगणे म्हणजे स्त्रीवाद साहित्य होय. स्त्रीवादी साहित्याची भूमिका प्रस्थापितांविरोधी बंड करण्याची आहे. व स्वत:चा शोध घेण्याचा आहे. आपल्याला मिळालेल्या दुय्यमत्वाची जाणीव, स्त्रियांच्या म्हणून पुरूषापासून वेगळ्या असलेल्या जाणिवा व्यक्त होण्यासाठी नवीन भाषा व नवीन वाङमयीन बंधाची स्त्रीवादी साहित्याला गरज वाटते. समाजाने स्त्रीकडून अपेक्षिलेल्या भूमिका पार पाडल्यावरही स्वत:ला समाधान न मिळाल्याचा साक्षात्कार जेव्हा स्त्रीला होतो., त्यावेळी ती स्वत:ला उणे करून इतर चारचौघींसाठी जगते आहे हे तिला समजते. तिला स्वत:चे निर्णय घेण्याचे स्वतंत्र हवे होते व ते तिला हळूहळू मिळत आहे तसेच गेल्या पिढीतील स्त्रीपेक्षा आजच्या स्त्रीचे जीवन पुष्कळ बदलले असून स्त्री स्वातंत्र्य उपभोगतांना दिसत आहे.

**दलित साहित्य**— दलित साहित्य प्रवाह १९७० च्या जवळपास जन्माला आलेला असून दलित साहित्याचा उदय हा मराठी साहित्याचाच नव्हे तर भारतीय साहित्यात एक नवे अनुभवविश्व व एक मूल्यात्मक संवेदना देणारी घटना आहे. या साहित्याच्या जीवनदर्शनाने व वैचारिक तत्वज्ञानाने सामान्य माणसासंचे जीवन बदलून टाकले. एका सांस्कृतिक भावनेने त्याला गतिमान केले. सामान्य माणसाला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. त्याला त्याच्या शोषणाचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. माणसाने चांगला माणूस म्हणून घडावे, स्वत:तील मानवता विकसित करण्यात आयुष्य वेचावे, अशी एक वैश्विक संवेदना शिकविली आहे. लोकशाही जीवनमूल्ये व पारंपारिक समाजातील कौटुंबिक जीवनमूल्ये यामध्ये असलेले अंतर, या मधील दोषांचा विचार करावयास शिकविले. दलित लेखकांनी आपल्या अनुभवांवर आधारलेल्या साहित्याचे नवे दालन उघडून समोर ठेवले. या घटनेने संवेदनाक्षम व विचारी माणूस अंतर्मुख झाला.

**ग्रामिण साहित्य** — ग्रामिण साहित्य प्रवाहातील स्त्रीदर्शनाचा विकास हा प्रामुख्याने शहरनिष्ट, मध्यमवर्गीय व सुशिक्षित स्त्रीच्या मानसिकतेभोवती रेंगाळतांना दिसते. या प्रवाहातील ग्रामिण स्त्रीची दयनिय दर्शन घडते व विविध विषयांचाही परिचय होतांना दिसतो.

**मुस्लिम साहित्य** — मुस्लिम साहित्यासत मुस्लिम समाजातील आपल्या जातीस्तरातील जाणिवा, इथल्या मूळच्या संस्कृतीशी असलेल्या आंतरिक नाते संबंधीच्या जाणिवा, आपल्या दलित सदृश्य अस्तित्वाच्या जाणिवा मोठ्या सुचकतेने आणि ताकदीने अभिव्यक्त केलेल्या आहेत. हिंदू अन्यायाविरूद्ध मुस्लिम साहित्याची निर्मिती होतांना दिसते म्हणजे हिंदू मुस्लिम संघर्षाच्या अनुभवांचे चित्रण करणारे आणि त्यामधून समन्वय शोधण्याचा प्रयत्न करणारे साहित्य म्हणजे मुस्लिम साहित्य .मराठी साहित्याच्या या संकल्पनेतून त्याचे तत्वज्ञान आणि उद्दीष्ट स्पष्ट होते. या साहित्यांनी मुस्लिमांतील जातीव्यवस्थेचा प्रश्न पुढे आणला आहे.

**ख्रिस्ती साहित्य** – आधुनिक मराठी साहित्याचा उदय आणि उगम ख्रिस्ती साहित्यातून झाला आहे. मराठी साहित्याच्या आज दिसणाऱ्या वटवृक्षाचे बीजारोपण महाराष्ट्रात आलेल्या ख्रिस्तांनी केला. परदेशातून आलेल्या ख्रिस्ती धर्माच्या स्विकारामुळे मराठी साहित्य, संस्कृती, भाषा यांचा स्वत:शी काही संबंध उरलेला नाही असा समज असताच मराठी साहित्याचा अभ्यास करणे म्हणजे ते निर्माण करणाऱ्या हिंदू धर्मीय साहित्यकांच्या भावना विचारांचा निदिध्यास घेण्यासारखे आहे.

खिस्तांचे तत्वज्ञान, ख्रिस्तांचे जीवन, खिस्तांचा धर्म, ख्रिस्ती धर्मियांचे चरित्र व चारित्र्य, ख्रिस्ती समाजाची संस्कृती, बायबलमध्ये व्यक्त झालेल्या विचारधारणा, वर्णन केलेल्या विविध घटना अशा अनेक संदर्भाशयांनी समृद्ध असलेले कलात्मक ललित व संशोधन वैचारिक साहित्य मराठीमध्ये अवतरत आले आहे. ख्रिस्ती समाजाच्या धर्मजीवनासाठी असले तरी ख्रिस्ती जीवनाशयाने समृद्ध असलेल्या आणि आधुनिक साहित्यिक अर्थाच्या अपेक्षित ख्रिस्ती साहित्याचे प्रयोजन मराठी साहित्याची निर्मिती हेच आहे.

**आदिवासी साहित्य** – आदिवासी साहित्य हे व्यापक स्वरूपाचे असून जीवनवदी आहे. आजवर अव्यक्त असलेल्या वेदना विश्वाचे दर्शन घडवून देणारे हे साहित्य आहे. आदिमांच्या सर्वांगिण उत्थानाचा प्रश्न घेऊन हे साहित्य प्रस्थापित समाज व्यवस्थेला हाक मारू लागले आहे. तसेच आदिमांच्या सामाजिक बांधणीचा आणि एकात्म जीवनाचा विचारही ते मांडू लागले आहे. वर्णरहित, जातीरहित समाजव्यवस्था आदिम समूहांमध्ये नांदावी हे या साहित्याचे स्वप्न आहे. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे हा समाज थोडाफार प्रमाणात सुशिक्षित होतांना दिसतो. शिक्षणामूळे पुराणमुल्यांना जाणीवपूर्वक नकार देणारी नवी पिढी आदिवासींमध्ये उदयाला येऊ लागली आहे. या नवशिक्षित आदिवासी तरूणांच्या जीवन–जाणीवा टोकदार व विद्रोही सोबतच नवनिर्मितीक्षमही आहेत.

साहित्यप्रवाह एखाद्या समाजाच्या साहित्यात तत्कालीन विशिष्ट सिस्थीत जन्माला येतात व ती स्थिती नष्ट झाली की, ते साहित्यप्रवाह विसर्जित होतात.

**बाल साहित्य** – मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने या साहित्याची निर्मिती झाल्याचे दिसते. बाल साहित्य हे प्रयत्नपूर्वक, जाणीवपूर्वक व अनेक गोष्टीचे भान ठेवून लिहीले जाणारे साहित्य आहे. लोककथा व पौराणिक कथा या साहित्यात दिसते. अलिकडच्या काळात या साहित्याचे आकर्षण 'विज्ञानकथा' असून या काथांच्या माध्यमातून विज्ञान लोकप्रिय करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहे. मनोरंजन, ज्ञानविस्तार, आनंदनिर्मिती या प्रयोजानांमुळे हे साहित्य यशस्वी होतांना दिसते.

**कामगार साहित्य** –आजचा कामगार हा कालच्या कामगारापेक्षा अधिक शिकलेला, कुशल, विविध कारखान्यातून काम करणारा ि वविध जाती–थरातला, भारतीय प्रांताप्रांतातून इथे एकवटलेला व बराचसा शिक्षित असलेला आहे. आपल्यासकट भोवताली असलेले वैविध्यपूर्ण जीवन पसरलेले आहे. त्यातील सुखदु:खांना, खऱ्या मानवी संबंधांना, वास्तववादी व अर्थपूर्ण घटनांना व त्यातील जिवंत मानवी संवेदनांना कलारूप देण्याचा प्रयत्न या साहित्यात होतांना दिसते.

**विज्ञान साहित्य** – समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याच्या दृष्टीने विज्ञान साहित्याची निर्मिती झाल्याचे दिसून येते. विज्ञान हे जिज्ञासेतून निर्माण झाले आहे. विज्ञान साहित्यामुळे अनाकलयीन गोष्टी समजायला मदत झाली. तसेच पृथ्वीबाहेरील अफाट अंतराळात ज्या घटना घडल्या, ज्यांचे आकलन विज्ञानाद्वारे झालेले आहे. अशा घटना पृथ्वीवर घडल्या तर सामान्य माणसाला त्या अनाकलनीय वाटू लागेल. ही समज या साहित्यातून क्लोनिंग, जीववैविध्य, माणूस आणि यंत्रमानव यांचा संकर कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक मानव परस्परसंबंध असे अनेक नवे विषय पुढे आले.

**भटक्या विमुक्तांचे साहित्य** – भटक्या विमुक्त जमाती शेकडो, हजारों वर्षापासून उपेक्षित, दुर्लक्षित, अस्थिर आणि असुरक्षित जीवन जगत आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून तुटलेल्या या जमाती अज्ञान, रूढी परंपरा, अंधश्रद्धा, अगतिकता, दैवाधिनता यांच्या दुष्ट चक्रात अडकलेले दिसते. मात्र शिक्षणामुळे यांच्यात प्रगती होवून या जमातींतील नवशिक्षित तरूणांना या जमातींच्या मागासलेपणाची त्यांच्या आदिम रानटी जीवनाची, त्यांच्यातील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, रूढीपरंपरा, अस्थिरता व त्यातून वाट्यला आलेली अगतिकता यांची जाणीव झाली.

**जन साहित्य** – स्वत्वाचा शोध घेत जन साहित्याची निर्मिती होतांना दिसते. जन साहित्य हा एक मौलिक साहित्यविचार असून मराठी साहित्याच्यास संदर्भात तो स्वातंत्र्योत्तर काळात स्पष्ट संकल्पनेच्या रूपात पुढे आला आहे. जनसाहित्याचा संबंध जिवंत प्रवाही जनजीवनाशी व त्याच्या अनुभवातून वर येणाऱ्या जाणीव–नेणिवांशी आहे. देशातील गतिशील जनजिवनाची संस्कारसमष्टी हीच जन साहित्याची मायकुस होय.

**अनुवादित साहित्य –** अनुवाद या साहित्यप्रकारात विविध साहित्याचे आदान–प्रदान होतांना दिसते. अनुवादित साहित्यकृती वाचकांना जेव्हा आनंद देते तेव्हा उत्कृष्ट प्रतिभा आपल्या समोर उभी राहते. बदलत्या काळानुसार आणि जागतिकरणाच्या रेट्यात अनुवादाचे वाढलेले महत्व जाणले की अनुवादाला दुय्यम समजणारी प्रवृत्ती मागे पडतांना दिसते.

**समारोप**

शिक्षण आणि स्वातंत्र्याचा प्रचार व प्रसार जसजसा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचेल तसतसे अनेक सामाजिक घटक जागे होतील. निरनिराळ्या जाती–जमाती आणि सामाजिक स्तर अजुनही मुके आहेत. त्यांना वाचा मिळेल. हे सामाजिक स्तर आपलं जगणं भोगणं साहित्यात आणल्याशिवाय राहणार नाहीत. प्रत्येक प्रवाह आपल्या मर्यादामध्ये लीन (मशगुल) होत आहे आणि आपआपल्या वेगवेगळेपणाला गोंजारतो आहे. नव्या प्रवाहाला समन्वय आणि सुसंवाद ह्यामुळे नवी वाङमयीन संस्कृती निर्माण होऊ शकते. नव्या साहित्यप्रवाहांची उपेक्षा करून त्यांना नामशेष करण्यापेक्षा ते अधिक समृद्ध कसे होतील याची आत्मियतेने, डोळसपणे काळजी घेतली पाहिजे, कारण ते समाजाचा आणि साहित्याचा विकास साधत असतात.

साहित्यप्रवाह त्यांच्या विविध स्वरूपामुळे वेगळा वाटत असला तरी एकूणच मराठी साहित्य, मराठी समाज, भारतीय समाज व भारत राष्ट्र एकात्म होणे हेच या सर्वच प्रवाहांमध्ये दिसून येते. विविध साहित्यप्रवाह हट्टाने व दुराग्रहाने जर वेगळा ठेवण्याचा प्रयत्न केला तर तो समाज एकूण व्यापक मराठी साहित्य आणि समाज यांच्यापासून वेगळा होईल म्हणून साहित्यप्रवाहांचे ध्येय एकूण मराठी साहित्यसागराला समृद्ध करणे आहे. यांतच प्रत्येक साहित्यप्रवाहाचे साध्य आणि श्रेय आहे.?

**निष्कर्ष –**

१) मराठी वाङमयात निर्माण झालेले वाङमय प्रवाह हे जीवनवादी आहे.
२) समाजातील जिवंत प्रश्नांचे हे साहित्य असून वास्तवादी आहे.
३) मराठी साहित्यातील विविध प्रवाह समृद्ध आणि जीवनाच्या विविध स्तरांना स्पर्श करणारे आहेत.
४) मानवाला केंद्र मानून विविध प्रवाह उदयाला आले आहेत. मानवी मुल्यांवर या साहित्याची निष्ठा आहे.
५) साहित्याचे स्वरूप प्रवाही राहत असल्यामुळे वेळोवेळी समाजात नव–नवे साहित्यप्रवाह जन्माला येत राहील.
६) मानवी जीवन विविध घटकांनी बद्ध व संस्कारित होत असल्याने त्यांचे अविष्करण साहित्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे.
७) जागतिकीकरणामुळे साठोत्तरी वाङमय प्रवाह क्षीण होत आहे.
८) नव–नव्या प्रवाहातील समन्वय आणि सुसंवाद ह्यामुळे नवी वाङमयीन संस्कृती निर्माण होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ –**

१) साठोत्तरी मराठी वाङमयातील प्रवाह : डॉ.शरणकुमार लिंबाळे. दिलीपराज प्रकाशन पुणे
२) १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह : आनंद यादव. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

# थेरीगाथा : जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा

**प्रा. डॉ. विष्वजीत कांबळे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
षिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.

## सारांष

'थेरीगाथा' हा ग्रंथ बौद्ध साहित्यातील सुत्तपिटकातील खुद्दकनिकायमधील ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये तथागत बुद्धांनी स्थापन केलेल्या भिक्खुणी संघातील भिक्खुणींचे पद्यबद्ध जीवन संस्मरण संग्रहित करण्यात आले आहे. विमुक्त सुखाच्या परमोच्च्य आनंदाने थेरींच्या तोंडून सहज निघालेल्या त्या पद्यपबध गाथा आहेत. थेरीगाथातील स्त्रियांच्या जाणिवांचे स्वतंत्र अंग आहे. थेरीगाथाच्या रूपाने संपूर्ण स्त्रीजीवनात नव्या जाणिवांची सुवर्ण मंगलमय पहाट उजाडली. स्त्रियांनी केवळ गुलामगिरीचे जीवन न जगता स्वाभिमान आणि अभिमान राखून जगले पाहिजे या उत्कर्ष विचारांनी 'थेरीगाथा' स्त्रीवादाचा आधुनिक विचार मांडते. स्त्रीवादाचा जागतिक विचार सर्वप्रथम थेरीगाथा मधून व्यक्त होतो.

तथागत बुद्धांनी स्त्रियांना भिक्खू संघात स्थान देऊन स्त्रियांचा भिक्खुणी संघ निर्माण केला. ही जगाच्या इतिहासातील अभूतपूर्व क्रांती आहे. तथागत बुद्धांच्या आधी स्त्री जीवनाची जी वाताहात होती ती तथागत बुद्धांच्या स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता या तत्त्वाने संपुष्टात आली. तथागत बुद्धाच्या धम्मात स्त्रियांना पुरूषांप्रमाणे मानसन्मान आहे. थेरीगाथामध्ये स्त्रीवादी साहित्याची नवी मूल्ये सापडतात. मानवी जीवनात आणि एकूणच मानवी समाजाच्या उत्थानात स्त्रियांचा दर्जा किती महत्त्वाचा आहे हे तथागत बुद्धांनी धम्मामध्ये सांगितले आहे. तथागत बुद्धांनी आपल्या धम्मामध्ये स्त्रियांना सन्मानाचे स्थान दिले. स्त्री–पुरूष समानता हा बुद्धांच्या विचारसरणीतील अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. स्त्रियांनी पुरूषांप्रमाणे 'अर्हत' पद प्राप्त करून आपले जीवन संपन्न करावे अषाप्रकारचा उपदेष बुद्धाने केला आहे. 'थेरीगाथा' मधून व्यक्त झालेल्या थेरींच्या गाथांमधून याची प्रचिती येते.

थेरीगाथातील थेरींनी आपले जीवनानुभव कथन करतांना जीवनातील चांगल्या वाईट घटना–प्रसंगांना चित्रित केले आहे. ही बाब स्त्रियांच्या सुख–दुःखाची ओळख करून देणारी आहे. थेरीगाथाने स्त्रियांसाठी नवे आषयसूत्र निर्माण केले आहे. आदर्ष जीवनाची एक सुंदर संहिता म्हणून थेरीगाथाचे विषेष महत्त्व आहे. थेरीगाथा हा जगाच्या इतिहासातील स्त्रीवादाचा पहिला ग्रंथ आहे. स्त्रीवादाची बीजं थेरीगाथामधून अंकुरली आहेत. अर्थातच थेरीगाथा जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आहे.

**बीजषब्द :** थेरी, थेरीगाथा, स्त्रीवाद, धम्मसंहिता, स्त्री स्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती, अर्हत, सामाजिक समता, संवेदना, जीवनमूल्ये.

## प्रस्तावना

तथागत बुद्धांनी सर्वप्रथम स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल केले. त्यानंतर महात्मा जोतीबा फुले आणि युगनायक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी धोरणात्मक कार्य केले. तथागत बुद्धांच्या समतावादी विचाराने अन्यायकारक विषमतावादी परंपरेला छेद देणारी विज्ञाननिष्ठ विचारसरणी धम्माच्या रूपाने प्रतिष्ठीत झाली. याच धम्मविचारातील भिक्खुणींनी आपले जीवनानुभव 'थेरीगाथा' या ग्रंथांतून व्यक्त केले. स्त्रीवाद संकल्पनेचा जन्मच 'थेरीगाथा' मधून झाला. स्त्रीवादी संकल्पनेचा उदय मानवजातीच्या इतिहासातील एक क्रांतीकारी पाऊल होय.

थेरीगाथामधून व्यक्त झालेले विचार स्त्रियांच्या मनातील भावनांचे सुंदर प्रतिबिंब आहे. प्राचीन भारतामध्ये स्त्रियांची दयनीय स्थिती होती. स्त्रियांना षिक्षण घेण्यापासून सुद्धा वंचित ठेवले होते. स्त्रियांचे जीवन म्हणजे जणूकाही एक 'बंदीखाना'च होते. अषा अमानवीय दलदलीतून तथागत बुद्धांनी स्त्रियांना बाहेर काढून सन्मानित जीवन दिले. अभिव्यक्त होण्याचे स्वातंत्र्य बुद्धाने स्त्रियांना दिले आहे. थेरीगाथामधून याची बरीच उदाहरणं बघावयास मिळतात. बौद्ध साहित्याचे अभ्यासक भरतसिंह उपाध्याय म्हणतात, ''प्राचीन भारत मे स्त्रियो की दयनीय स्थिति थी, समाज मे उन्हे ज्ञान से वंचित रखा जाता था। भगवान बुद्ध के उद्भव के बाद स्त्रियो को अधिकार दिये गये। इसके सैंकडो उदाहरण थेरी गाथाओ मे मिलते है।''[1] यावरून थेरीगाथा हा स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात किती महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे हे आपणास सहज लक्षात येते.

स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात 'थेरीगाथा' चा अन्वयार्थ लावत असताना 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्री जीवनाची आदर्ष आचरणसंहिता असल्याचे लक्षात येते. थेरीगाथाने स्त्रियांना आपल्या विचारांना अभिव्यक्त केले. जगाच्या इतिहासात स्त्रीवादी विचारांचा, स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्रियांच्या आषय–अभिव्यक्तीचा हा पहिला ग्रंथ आहे. त्यामुळे स्त्री जीवनात आणि स्त्रीवादी संकल्पनेत अभिव्यक्तीच्या दृष्टीने आणि वैचारिकतेच्या दृष्टीने 'थेरीगाथा'चे विषेष महत्त्व आहे.

सामाजिक, सांस्कृतिक जीवनाची चौकट न मोडता स्त्रियांना कषाप्रकारे आदर्षवत आणि सन्मानपूर्वक जीवन जगता येईल याची अनुभूती म्हणजे 'थेरीगाथा' होय. आधुनिक षिक्षण प्रणालीत आदर्षवत बौद्ध साहित्याच्या अध्ययन अध्यापनाची अतिषय गरज आहे. स्त्रियांच्या संवेदनांना व्यक्त करणारा कोणताही ग्रंथ थेरीगाथाच्या पूर्वी दिसत नाही. जगाच्या इतिहासात सर्वप्रथम 'थेरीगाथा' मधून स्त्रियांच्या संवेदना व्यक्त झाल्या आहेत. यास्तव थेरीगाथा जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आहे. जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा असलेला 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादी साहित्यातील मूल्यसंस्कृतीच आहे. यादृष्टीने आजही थेरीगाथाचे महत्त्व कायम आहे.

## संषोधनाची उद्दिष्टे

1) बौद्ध साहित्यातील थेरीगाथाचे स्वरूप समजून घेणे.
2) थेरीगाथा हा ग्रंथ जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आहे याविषयी अभ्यास होणे.
3) बौद्ध साहित्यातील थेरीगाथा हा ग्रंथ स्त्री स्वातंत्र्याचा उद्घोष आहे हे अभ्यासणे.
4) स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्रियांच्या उन्नती आणि उत्कर्षाबाबत थेरीगाथाचा अभ्यास होणे.
5) थेरीगाथेतील स्त्रियांच्या आदर्ष समाजजीवनाविषयी जाणून घेणे.
6) थेरीगाथा मानवी जीवनमूल्ये रूजविणारा स्त्रीवादी ग्रंथ असल्याचे अभ्यासणे.

## गृहीतकृत्ये

1) थेरीगाथा हा ग्रंथ जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आहे.
2) स्त्रियांच्या उन्नती आणि उत्कर्षाबाबत आजही थेरीगाथेचे महत्त्व असल्याचे लक्षात येते.
3) थेरीगाथेतील स्त्रियांचे सामाजिक जीवन आदर्ष असल्याचे दिसून येते.
4) थेरीगाथा सामाजिक समतेचा पुरस्कार करताना दिसून येते.
5) थेरीगाथा हा ग्रंथ स्त्री स्वातंत्र्याचा आद्य हुंकार असल्याचे लक्षात येते.

## तथ्यसंकलन

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता लिखित साहित्याच्या आधारे तथ्यसंकलन केले आहे.

## थेरीगाथाचे स्वरूप

बौद्ध साहित्य 'त्रिपिटक' नावाने जगप्रसिद्ध आहे. त्रिपिटकात सुत्तपिटक, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक हे तीन प्रमुख ग्रंथ आहेत. हे तीन ग्रंथ त्यात असल्यामुळे त्याला 'त्रिपिटक' म्हणतात. त्रिपिटकात तथागत बुद्धाच्या धम्मतत्त्वचिंतनाचे संकलन आहे. त्रिपिटकात प्राचीन भारताच्या इतिहासाचे वास्तव चित्रण बघावयास मिळते. मानवाला आदर्ष जीवन जगण्यासाठीचे तत्त्वचिंतन बौद्ध साहित्यातून आविश्कृत झाले आहे. थेरीगाथा त्याचेच प्रतिबिंबन आहे. 'थेरीगाथा' हा सुत्तपिटकातील खुद्दकनिकाय मधील ग्रंथ आहे. खुद्दकनिकायात एकूण पंधरा ग्रंथ आहेत. 'थेरीगाथा' हा नवव्या क्रमांकाचा ग्रंथ आहे.

'थेरीगाथा' या ग्रंथात अर्हतपद प्राप्त केलेल्या बुद्धकालीन 73 भिक्खुणींच्या 522 गाथा आहेत. त्या सोळा निपातात (भागात) विभागल्या आहेत. विमुक्त सुखाच्या परमोच्च आनंदाने त्यांच्या तोंडून अगदी तरलतेने निघालेले ते उदान आहे. आपल्या अनुभवांना स्वच्छंदपणे अभिव्यक्त करणाऱ्या महिलांचे ते स्वकथन आहे. थेरीगाथा एक सुंदर बौद्ध संस्कार आहे, बौद्ध संस्कृती आहे. जीवनातील अपरिमित दुःख, दारिद्र्या, विशमता व अनेकप्रकारच्या यातनांवर मिळविलेल्या विजयाचा मंगल ध्वनी असे थेरीगाथाचे स्वरूप आहे.

## थेरीगाथातून व्यक्त झालेला स्त्रीवाद

'थेरीगाथा' हा शब्द बौद्ध साहित्यातील स्त्रीवादाचा अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. थेरीगाथाने स्त्रियांना अत्यंत सन्मानाची आणि स्वातंत्र्याची जाण करून दिली आहे. आजपर्यंत असलेले स्त्रियांचे गुलामिचे जीवन थेरीगाथाने स्वतंत्र केले आहे. स्त्रीमनातील भाव—भावनांची उत्तम अषी अभिव्यक्ती म्हणजे 'थेरीगाथा' असे सुंदर स्वरूप थेरीगाथामधून प्रतिबिंबीत झाले आहे. स्त्रियांना कितीही दुःख भोगून शेवटी जीवन कंटाळवाने होऊन जीवनाची अधोगती व्हावी ही स्थिती थेरीगाथाने बदलली आहे. आजपर्यंत परंपरेच्या रूढी, अंधश्रद्धेच्या वणव्यात पेटणाऱ्या स्त्रियांना थेरीगाथाने स्वाभिमानाची जाणीव करून दिली. या जाणिवेतून आज स्त्रियांचे जीवन उन्नतीच्या मार्गावर दिसत आहे. स्त्रियांना समाजामध्ये सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा थेरीगाथा मधून मिळते. आजच्या आधुनिक स्त्रीवादाच्या दृष्टीने थेरीगाथाचा विचार करता स्त्रीवादी साहित्याची बीजं थेरीगाथातून अंकुरलेली दिसतात. अर्थात स्त्रीवादाचा आरंभच थेरीगाथापासून होतो.

जगामध्ये अनेक प्रकारच्या संस्कृती आहेत. जगातील या विविध संस्कृतीमध्ये स्त्रियांना वेगवेगळे स्थान आहे. काही संस्कृतीमध्ये स्त्रीला देवीसमान मानून तिला समाजामध्ये आदराचे स्थान दिले जाते. तर काही संस्कृतीमध्ये चेटकीण मानून तिला छळल्या जाते. तिची पिळवणूक केली जाते. म्हणूनच स्त्रीवाद्यांचे असे म्हणने आहे की, ''स्त्रीला देवी मानू नका किंवा चेटकीन ही म्हणू नका, तिच्याकडे मनुष्य म्हणून बघा आणि त्यानुसार तिच्याषी वागा.''[2] स्त्रियांना 'माणूस' म्हणून सन्मानित करणारा विचार 'थेरीगाथा' मध्ये बघावयास मिळतो. तथागत बुद्धांनी स्त्रियांना भिक्खूणी संघामध्ये सामील करून त्यांना निर्वाण प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य दिले. ही मानवतावादी भूमिका थेरीगाथामधील अनेक थेरींच्या गाथामधून व्यक्त झालेली आहे. यामधून स्त्रीवादी साहित्याला नवी प्रेरणा मिळाली आहे.

महाप्रजापती गौतमी, धम्मदिना, विषाखा, उब्बिरी, आम्रपाली, पटाचारा, सोमा सुजाता, खेमा, चाला, उप्पलवण्णा, सुमेधा थेरीगाथतील अषा अनेक युगनायीकांनी थेरीगाथातून स्त्रीवादी जाणिवांना व्यक्त केले आहे.

## थेरीगाथा प्राचीन संस्कृतीची आधुनिक अनुभूती

'थेरीगाथा' हा बौद्ध साहित्यातील प्राचीन ग्रंथ आहे. थेरीगाथाने स्त्रियांना अभिव्यक्त होण्याचा मार्ग मोकळा केला आणि आपल्या जीवनातील सुख–दुःखाना अनुभवांना कथन करण्याची संधी उपलब्ध करून दिली. थेरीगाथा हा बौद्ध संस्कृतीतील स्त्रियांच्या जाणिवांचा जगातील पहिला ग्रंथ आहे. तो प्राचीन असला तरी त्यातून आधुनिक अनुभूतीची संवेदना अभिव्यक्त झाली आहे. आधुनिकी करणातील ही अनुभूती थेरीगाथामधून व्यक्त झाली आहे. आधुनिक काळात तेही अलीकडच्या काळात स्त्रियांना सक्षम करण्याचे उपक्रम राबविले जात आहे. स्त्री सबलीकरणासारखे उपक्रम राबविले जात आहे. स्त्री–पुरूष समानतेचे नगारे वाजविले जात आहे. परंतु थेरीगाथाचा विचार करता थेरीगाथाने स्त्रियांना आधिच सबळ आणि स्वबळ केले आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा संदेष देणारा थेरीगाथा या ग्रंथातून स्त्रियांच्या स्वातंत्र्याची झालेली अभिव्यक्ती संपूर्ण जगाने गौरविली आहे. आज स्त्रियांचा झालेला जो विकास आपण बघतो त्या विकासाच्या मूळाषी थेरीगाथेतील स्वातंत्र्याचा आधार आहे हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. ही आधुनिकता थेरीगाथाने जगाला बहाल केली आहे. म्हणूनच थेरीगाथा प्राचीन बौद्ध संस्कृतीची आधुनिक अनुभूती आहे.

## थेरीगाथा : स्त्री स्वातंत्र्याचा आद्य हुंकार

स्त्रियांचा मानसन्मान करणारे स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल करणारे, स्त्री–पुरूष समानतेचा पुरस्कार करणारे तथागत बुद्ध हे जगातील पहिले महामानव आहेत. तथागत बुद्धांनी स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य दिले होते. त्यामुळे स्त्रियांनी 'थेरीगाथा' या जगविख्यात ग्रंथाची निर्मिती केली. हा ग्रंथ म्हणजे तत्कालीन समाजजीवनात स्त्रियांची स्थिती कषाप्रकारे दयनीय होती याची ऐतिहासिक नोंद होय. 'थेरीगाथा' मधून थेरींनी स्त्री स्वातंत्र्याची अनुभूती दिली आहे. तथागत बुद्धांनी सुमारे तीन हजार वर्षापूर्वी स्त्रियांना भिक्खू संघामध्ये स्थान देऊन स्त्रियांचा सन्मान केला. भिक्खुणी संघाची स्थापना करून स्त्रियांना स्त्री–पुरूष समानतेचा दर्जा प्राप्त करून दिला. स्त्रियांना सुद्धा अर्हतपद प्राप्त करता येऊ शकते. स्त्रिया सुद्धा निर्वाण प्राप्त करू शकतात ही षिकवण बुद्धांनी दिली. या षिकवणूकीतूनच 'थेरीगाथा' हा ग्रंथ उदयास आला. बुद्धांनी स्त्रियांना निर्वाणाचा मार्ग खुला करून दिला हे स्त्रीस्वातंत्र्याच्या लढ्यातील पहिले पाऊल आहे. 'थेरीगाथा' हा स्त्री स्वातंत्र्याची पहिली अभिव्यक्ती आहे.

बौद्ध संस्कृतीमध्ये स्त्रियांना स्त्री–पुरूष समानतेची वागणूक दिली आहे. लता छत्रे म्हणतात, ''जेव्हा आपण आपल्या सांस्कृतिक इतिहासात डोकावतो तेव्हा असे दिसते की, गौतम बुद्धांनी स्त्रियांना आपल्या संघामध्ये प्रवेष देऊन निर्वाणाचे व्दार खुले केले आणि स्त्रियांनीही आपल्याला मिळालेल्या संधीचा सुदुपयोग करून 'थेरीगाथा' म्हणून प्रसिद्ध असलेले जगातील पहिले स्त्रीचरित्र काव्य केले.''[3] स्त्री स्वातंत्र्यामुळे 'थेरीगाथा' हे जगातील पहिले स्त्रीवादी लेखन उदयास आले असे लक्षात येते.

## थेरीगाथा : स्त्री–पुरूष समानतेची नांदी

तथागत बुद्धांनी स्त्रियांना संघामध्ये स्थान देऊन स्त्री–पुरूष समानतेची पायाभरणी केली. बुद्धांच्यापूर्वीचे स्त्री जीवन हालाकीचे आणि गुलामगिरीयुक्त होते. स्त्रियांना पुरूषांप्रमाणे सामाजिक अथवा कोणत्याही क्षेत्रामध्ये स्थान नव्हते. तथागत बुद्धांनी स्त्रियांना संघात प्रवेष दिला आणि त्याचक्षणी स्त्री मुक्तीची दारे खूली झाली. पुरूषाप्रमाणे स्त्री सुद्धा अर्हतपद प्राप्त करू शकते. निब्बाण प्राप्त करू शकते. ही स्वातंत्रता बुद्धाने प्रदान केली. स्त्री–पुरूष समानतेचा हा विचार सर्वप्रथम जगाच्या पाठीवर तथागत बुद्धांनी मांडलेला आहे.

बुद्धांच्या धम्मामध्ये स्त्री आणि पुरूष या दोघांनाही समानतेचे स्थान देण्यात आले आहे. दोघे आपल्या कर्मानुसार चांगले जीवन जगू शकतात. तथागत बुद्धांनी पुरूषाप्रमाणेच स्त्रियांना सुद्धा बुद्धिस्वातंत्र्याचा उपदेष केला. स्त्री–पुरूष समानतेच्या संदर्भात एक उदाहरण देत आहे. एकदा तथागत बुद्ध श्रावस्तीमधील जेतवन विहारात विहार करीत होते. त्यावेळी कोषल नरेष प्रसेनजित तथागताचा उपदेष ऐकत होते. त्यावेळी प्रसेनजित राजाची राणी मल्लीका हिने एका कन्येला जन्म दिला. ही सुखवर्ता एका दुताने राजा प्रसेनजितला कळविली. तेव्हा ही वार्ता ऐकून राजा खिन्न झाला. त्याच्या चेहऱ्यावर उदासभाव दिसू लागले. तेव्हा राजाच्या चेहऱ्यावरची उदासिनता पाहून तथागतांनी राजाला उपदेष केला. आणि स्त्रीजीवनाची महती उपदेषातून विषद केली. की, महाराजा काही काही स्त्रिया पुरूषापेक्षाही श्रेष्ठ, बुद्धीमान, शील संपन्न सासू–सासऱ्यांची सेवा करणाऱ्या व पतिव्रता असतात. तेव्हा कन्येचे चांगले पालन पोषण करा. सर्व दिषा जिकणारा महाषूरवीर सम्राट तिच्यापासूनच जन्म घेतो. तषा चांगल्या स्त्रीचा पुत्र चांगला राजा होऊन राज्याचे अनुषासन करतो. हा उपदेष ऐकून राजा प्रसेनजितला आनंद झाला. अषाप्रकारे स्त्री–पुरूष समानतेचा उद्घोष करून बुद्धांनी संपूर्ण स्त्री वर्गाला सांगितले की, ''महिलांनो तुम्हाला सुद्धा पुरूषासारखा अधिकार आहे.''[4] अशाप्रकारे तथागत बुद्धांनी स्त्री–पुरूष समानतेचे सूत्र मांडले आहे. म्हणून थेरीगाथा हा ग्रंथ स्त्री–पुरूष समानतेची नांदी आहे.

## मानवी जीवनमूल्ये रूजविणारी थेरीगाथा

'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्री जाणिवांना, स्त्रियांच्या भाव भावनांना, व्यथा, वेदना, संवेदनांना अभिव्यक्त करणारा जगातील पहिला ग्रंथ आहे. तथागत बुद्धांच्या धम्मतत्त्वातील मानवमुक्तीचे गीत गाणारा हा ग्रंथ आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यजाणिवांना थेरीगाथाने मानवी जीवनात रूजविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. बुद्धाच्या धम्माची आधारषीलाच नैतिकमूल्यावर उभी आहे. नीती हा धम्माचा प्राण आहे. धम्मामध्ये नैतिकतेला अतिषय महत्त्वाचे स्थान आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर नीति आणि धम्म समजून सांगताना म्हणतात, ''नीति म्हणजे धम्म आणि धम्म म्हणजे नीति.''[5] यावरून धम्मामध्ये नितिला किती महत्त्वाचे स्थान आहे हे लक्षात येते. या नितिमूल्यावर थेरीगाथाची निर्मिती आहे. नीति हे धम्माचे सार आहे. त्याषिवाय धम्म नाही. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टच सांगितले आहे.

प्रज्ञा, शील, करूणा, मैत्री आणि प्रेम त्याचप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही जीवनमूल्ये तथागत बुद्धांनी धम्मात सांगितली आहे. या मूल्यांनी थेरीगाथा ओतप्रोत आहे. ''प्रज्ञा हा विचारधम्म म्हणजे योग्य विचार करण्याची पद्धती, षील हा आचारधम्म म्हणजे योग्य वागण्याची पद्धती.''[6] या जीवनमूल्यांनी थेरीगाथा ओथंबलेली आहे.

## स्त्री संवेदना व्यक्त करणारी थेरीगाथा

'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्री संवेदना व्यक्त करणारा जगातील पहिला ग्रंथ आहे. इ. स. पूर्व पाचव्या – सहाव्या शतकात 'थेरीगाथा' ने स्त्रियांच्या संवेदना व्यक्त केल्या आहेत. थेरीगाथाच्या पूर्वी ग्रंथरूपात स्त्री संवेदना व्यक्त झालेल्या नाही. ज्या काळात स्त्रियांना अतिषय वाईट पद्धतीने वागणूक दिली जात होती. रूढी, परंपरा, जाती, वर्ण, अंधश्रद्धा यांच्या नावाखाली तिला कसलाच सामाजिक दर्जा नव्हता. अषा परिस्थितीत तथागत बुद्धांनी भिक्खुणी संघाची स्थापना केली. आणि स्त्रियांना मानसन्मान मिळवून दिला.

तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांचा होणारा, छळ, पिळवणूक, स्त्रियांचे दुःख, दारिद्र्या या सगळ्याा गोष्टींचा उहापोह थेरीगाथामध्ये बघावयास मिळतो. तथागत बुद्धांनी स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल केल्यामूळे त्या स्त्रियांनी तत्कालीन समाजव्यवस्थेतील विषमता अगदी सडेतोडपणे चित्रित केली आहे. स्त्री मनातील भाव–भावना, वेदना–संवेदना व्यक्त करणारा 'थेरीगाथा' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. थेरीगाथातील स्त्रियांनी मारावर विजय संपादन करून स्त्री जीवनाला जगण्याची नवी दिषा प्रदान केली आहे. स्त्री सुद्धा पुरूषांप्रमाणे ज्ञान संपादन करून आपले जीवन संपन्न करू शकते हे सोमा थेरीने दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे, चाला, उपचाला, सीसूपचाला या थेरींनी सुद्धा मारावर विजय संपादन करून स्त्रिया सुद्धा ज्ञान संपादन करून यषस्वी जीवन जगू शकतात हा संदेष त्यांनी दिला आहे.

स्त्री जीवनासाठी आदर्ष असणारी महाप्रजापतीगौतमी, त्याचप्रमाणे धम्मदिना या थेरींनी आपल्या संवेदनांना मोकळेपणाने व्यक्त केले आहे. आम्रपाली, विमला अड्ढकासी, अभयमाता थेरींनी त्यांच्या जीवनानुभवांना व्यक्त केले आहे. पटाचारा थेरीच्या संवेदना जीवनाचा सार सांगणाऱ्या आहेत. स्त्री जीवनाच्या दुःखाची परिसीमा यातून व्यक्त झाली आहे. सेला, खेमा, सुमेधा जयंती या राजघरान्यातील स्त्रियांनी व्यक्त केलेल्या संवेदना स्त्री मनाला पाझर फोडणाऱ्या आहेत. सुमंगलमाता, किसा गौतमी या गरीब घरान्यातील स्त्रियांनी व्यक्त केलेल्या संवेदना तत्कालीन समाजव्यवस्थेचे चित्रण करणाऱ्या आहेत. भद्दाकपिलानी, नन्दुत्तरा, मित्तकाली, सुन्दरी या थेरी ब्राह्मण कुळातील आहेत, ब्राह्मण कुळात कषाप्रकारे स्त्रियांची कुचंबना केली जात होती. याचे चित्रण यांच्या गाथांमधून बघावयास मिळते. उप्पलवण्णा, अभिरूपनन्दा वासेट्ठी, भद्दाकुण्डलकेसा, उब्बिरी अनोपमा या थेरींच्या संवेदना स्त्री जीवनात आदर्ष निर्माण करणाऱ्या आहेत.

## थेरीगाथा : जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा

बौद्ध साहित्यातील 'थेरीगाथा' हा स्त्रीवादी संवेदनांना अभिव्यक्त करणारा आद्य ग्रंथ आहे. थेरीगाथापूर्वी स्त्रियांच्या अभिव्यक्तीचा ग्रंथ दिसत नाही. 'थेरीगाथा' हा जगातील स्त्रीवादी जाणिवांना व्यक्त करणारा पहिला ग्रंथ आहे. स्त्रियांचे महाकाव्य आहे. आणि स्वकथनही आहे. तथागत बुद्धांनी स्त्रियांना स्वातंत्र्याची आणि निर्वाणाची वाट दाखविली. यामुळे परंपरेच्या जोखडदंडातून सुटून एका नव्या युगाची अनुभूती स्त्रियांना झाली. नव्या विचारांना कोंब फुटले. वर्षानुवर्षे सामाजिकतेच्या, रूढी–परंपरेच्या, अंधश्रद्धेच्या, आणि गुलामगिरीच्या चौकटीत घुसमटत असलेल्या स्त्रियांना मोकळा ष्वास मिळाला. यामुळे नव्या जीवनाची आणि अनुभवाची अनुभूती त्यांना आली. या अनुभूतीचा स्वच्छंद अविष्कार म्हणजे भिक्खुणी संघातील थेरींनी लिहिलेल्या गाथा होय.

'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रियांनी लिहिला आहे म्हणून तो स्त्रिवादी ग्रंथ आहे असे नाही, तर स्त्रिवादी संकल्पनेच्या जाणिवा यातून अभिव्यक्त झाल्या आहेत. स्त्रीवादाची भूमिका यातून व्यक्त झाली आहे. आधुनिक काळात स्त्रीवादाची जी संकल्पना आहे ती संकल्पना थेरीगाथातून व्यक्त झाली आहे. स्त्रीवाद म्हणजे काय? या आधुनिक युगात पडलेल्या प्रष्नाचे उत्तरच 'थेरीगाथा' आहे. थेरीगाथा म्हणजे स्त्रीवादाचे बीज होय. कारण स्त्री जाणिवांना व्यक्त करणारा थेरीगाथा षिवाय तत्कालीन काळातील दुसरा ग्रंथ नाही.

तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांची कषी अवस्था होती हे सर्वज्ञात आहे. तिच्या वाट्याला आलेले दुःख परंपरेची आणि रूढींची बंधनं अंधश्रद्धेचा बळी, पुरूष प्रधान संस्कृतीचा बळी या सगळया बद्दलची घुसमट तीच्या मनात साचलेली होती. बुद्धांच्या

समतावादी विचाराने स्त्रियांना समतेचे नवे आकाष मिळाले आणि यातून स्त्रियांनी आपल्या जीवनाला नवी झळाळी प्राप्त करून दिली. बुद्धांच्या स्वातंत्र्याच्या विचारातून स्त्रियांनी वर्षानुवर्षांची गुलामगिरीची बंधन झुगारून दिली. बुद्धांच्या समतावादी विचारांनी स्त्रियांनी नव्या जीवनाचा अनुभव घेतला. कोंडवाड्य़ाातून बाहेरपडून त्या स्त्रियांनी स्वातंत्र्याचा मोकळा जीवनवादी श्वास घेतला. रूढी–बंधनातून आणि सामाजिक गुलामगिरीतून स्त्रिया मुक्त झाल्या. त्यांना निब्बाणाचे व्दार खुले झाले. त्यांनी आपल्या जीवनातील अनुभवांना शब्दबद्ध केले. याचे आविष्करण म्हणजे 'थेरीगाथा' होय. थेरीगाथामध्ये या स्त्रियांचे तत्कालीन जीवन आणि स्त्रीमुक्तीचा आविष्कार असे दुहेरी स्वरूपाच्या अनुभवांचे दर्षन घडते. म्हणूनच 'थेरीगाथा' जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा ठरते.

'थेरीगाथा' मध्ये स्त्रियांच्या सुख–दुःखाचा अनुभव आपणास बघावयास मिळतो. सामाजिक जीवन आणि स्त्रियांची स्थिती याचाही अनुभव येतो. संसारिक सुख–दुःख, सामाजिक जाणिवा, समाज जीवनातील विविध पातळयांवरचे वेगवेगळे अनुभव याचाही प्रत्यय येतो. स्त्री–पुरूष भेद आणि स्त्री–पुरूष समानता याचा सुद्धा प्रत्यय येतो. गरीब–श्रीमंत ही दरी सुद्धा बघावयास मिळते. आणि मानवी जीवनातील अत्यंत उत्कट अषी प्रेम भावना सुद्धा 'थेरीगाथा' मधून अभिव्यक्त झालेली बघवयास मिळते. अर्थात मानवी जीवनातील एकूणच जाणिवांची मानवी स्वभावाची आणि संस्कृतीची देखील ओळख थेरीगाथाने करून दिली आहे. आधुनिक काळातील स्त्रीवादाची संकल्पना थेरीगाथाने तीन हजार वर्षांपूर्वी व्यक्त केली आहे. 'थेरीगाथा' च्या संदर्भात डॉ. विजय कुमार त्रिषरण म्हणतात, ''विष्व के किसी भी धर्म मे 'थेरीगाथा'की जोड का स्त्री विषयक और समतामूलक कोई ग्रंथ नही है।''[7] बौद्ध साहित्याच्या अभ्यासक लता दिलीप छत्रे म्हणतात, ''जगातील पहिले स्त्रीवादी काव्य म्हणून थेरीगाथांचा गौरव केला तर ती नक्कीच अतिषयोक्ती होणार नाही.''[8] अर्थात 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादाचा पहिला ग्रंथ आहे हे यावरून स्पश्ट होते.

स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास करताना 'थेरीगाथा' चा सर्वप्रथम विचार करावा लागतो. थेरीगाथाचा प्रभाव जगभरातील स्त्रीवादी साहित्यावर पडलेला आहे. जागतिक पातळीवर स्त्रीवादाचा अभ्यास करण्यासाठी 'थेरीगाथा' हा स्त्रीवादाचा प्रमाण ग्रंथ आहे. स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास 'थेरीगाथा' ला मध्यवर्ती ठेवूनच करावा लागतो. 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादी साहित्यातील मूल्यसिद्धांतांचा ग्रंथ आहे. जीवन जाणीवांचा संदेष आहे. अनुभवांच्या अनुभूतीची स्त्रीवादी जाणीव आहे. या सगळ्याा अंगांनी थेरीगाथाने स्त्रियांच्या जीवन जाणिवांना अभिव्यक्त केले आहे.

बौद्ध साहित्याच्या जेष्ठ अभ्यासिका लंडन मधील श्रीमती रायस डेविड्स यांनी 'थेरीगाथा' चा 'साम्स ऑफ दि सिस्टर्स' या नावाने इंग्रजी अनुवाद केला. यामध्ये त्यांनी थेरीगाथासंदर्भात केलेल्या खुलाषाचा संदर्भ डॉ. भगतसिंह उपाध्याय यांनी दिला आहे तो असा, ''युरोपीय विव्दानो के व्दारे चापा और सुन्दरी की गाथाएँ 'प्राचीनतम' भारतीय आख्यान–काव्य मानी गयी''[9] यावरून थेरीगाथा स्त्रीवादी साहित्याची जागतिक प्रेरणा आहे हे सिद्ध होते.

बौद्ध साहित्याचा विस्तार जगभर आहे. श्रीलंका, म्यानमार, जपान, बर्मा, व्हिएतनाम, थाईलंड, इंडोनेषिया, बोर्निया, युरोप, अमेरिका, बांग्लादेष, कंबोडिया, कोरीया, भूतान, त्याचप्रमाणे ताईवान, हॉग–कॉग, सिंगापूर, मॉरीषस व तंझानिया, फूनान, बालीव्दीप, मलय, प्रायव्दीप, फिलिपाईन, बर्निया, अरब (बुखारा) तुर्क, खीबा, कूचा, काषनगर, खोताम, तुर्फान, पोलंड, केपटाऊन, होलंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, अफगाणिस्तान, इत्यादी देषांसह बुद्धांचा धम्मविचार संपूर्ण जगभर विस्तारलेला आहे. बौद्ध साहित्याचा हा विस्तार थेरीगाथाच्या स्त्रीवादी जागतिक प्रेरणत्वाला सिद्ध करते.

## समारोप

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात केवळ भारतातील स्त्रियांपुढेच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, तसेच धार्मिक विषमतेचा आणि अन्यायाचा प्रष्न आहे असे नाही, तर जागतिक पातळीवर या समस्येचा विचार करता जागातील प्रत्येक स्त्री या समस्यांची षिकार झालेली असल्याचे आपल्याला लक्षात येईल. जातीयता आज विकोपाला जात असल्याचे दिसून येते. आजची स्थिती पूर्वीपेक्षा भयंकर होत चालली की काय? असा प्रष्न निर्माण होतो. कारण जातीयता आणि स्त्री समस्यांची दरी आणखी खोल होत जाताना दिसत आहे. आज विज्ञानाच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात देखील आपण अंधश्रद्धेला खतपाणी घालून स्त्रियांचा छळ चालविलेला आहे. ही भारतीय संस्कृतीला अत्यंत लाजीरवाणी बाब आहे. या सगळ्याा समस्याचे निवारण थेरीगाथा स्त्रीवादी भूमिकेतून करताना दिसते. 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादी साहित्यातील मूल्यसंस्कृतीच आहे. विषमतेच्या वृंदावत चाललेल्या दरीला मिटवायचे असेल तर यासाठी समतेची आणि बंधुत्वाची षिकवण देणाऱ्या थेरीगाथाचे आपण अनुसरण आणि अनुकरण करणे अतिषय आवष्यक आहे. स्त्रीजीवनाच्या आदर्षवत अषा नव्या जीवनाची सुरूवातच 'थेरीगाथा' आहे.

1975 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून साजरे करण्यात आले. स्त्रियांच्या कर्तबगारीचा या वर्षाने सन्मान केला. परंतु याच्या मुळाषी थेरीगाथातील महिलांच्या स्वाभिमानाची नाळ जुळली आहे, हे आपल्याला लक्षात घेणे अत्यंत आवष्यक आहे. 1789 मधील फ्रेंच राज्यक्रांतीमधून स्त्रीमुक्ती संदर्भात आषेचा किरण उगवला. 1790 मध्ये फ्रान्समध्ये 'ऑलिंप द गुंझ' या लेखिकेने स्त्रियांच्या हक्कासाठी स्वतंत्रपणे जाहीरनामाच तयार केला. आणि स्त्रियांना सुद्धा पुरूषांप्रमाणे स्वतंत्र स्थान मिळावे ही स्वाभिमानाची मागणी रेटून धरली होती. हे प्रसंग स्त्रीवादाच्या संदर्भाने महत्त्वपूर्ण आहेत.

पाष्चात्य स्त्रीवाद थेरीगाथाच्या प्रेरणेतून जन्मास आला. 'मरी बुलस्टेन क्रॉफ्ट' या लेखीकेचा '।अपदकपबंजपवद वि त्पहीज वि॑वउमद' हा 1792 ला प्रसिद्ध झालेला ग्रंथ स्त्रीवादाची भूमिका स्पष्ट करणारा आहे. 1929 मध्ये व्हर्जिनिया वुल्फ यांचा '। त्ववउ वि व्दमेष ूद' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथाने स्त्रीवादाला चालना मिळाली नंतर 1979 मध्ये 'जेम॑मबवदक॑मग' हा

सिमान द बोव्हा यांचा प्रसिद्ध ग्रंथ आला. या ग्रंथाने स्त्रीवादाची विस्ताराने उकलच केली आहे. 1969 मध्ये प्रसिद्ध झालेल्या जॉन स्टुअर्ट मिल यांच्या "The Subjection of Women" या ग्रंथाने स्त्रीवादाची पायाभरणी केली. आज पाष्चात्य देषात स्त्रीवादाचे भरपूर ग्रंथ प्रकाषित होत आहेत. सुरूवातीच्या काळात या ग्रंथानी स्त्रीवादाचे सुंदर असे स्वरूप आणि संकल्पना स्पष्ट केल्या आहे.

स्त्रीवाद ही संकल्पना खरेतर मूळात भारतीयांचीच आहे. ती पाष्चात आहे असे आपण मानतो. परंतु भारतीय स्त्रीवादाचा अभ्यास केला तर स्त्रीवादाचे मूळ हे बौद्ध साहित्यातील 'थेरीगाथा' या ग्रंथामध्ये आढळून येते. भारतामध्ये त्याचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झाला नाही. कारण त्याला पद्धतषीरपणे बाजुला सारले अथवा त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले त्यामुळे थेरीगाथा बाबत भारतीयांना फारषी माहिती नसावी. बौद्ध साहित्यातील समतावादी संस्कृती पाष्चात्य लोकांनी स्वीकारली. म्हणून स्त्रीवाद आपल्याला पाष्चात्य वाटू लागतो. खरे म्हणजे स्त्रीवाद ही भारतीय संस्कृतीचीच उपज आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे. भारतीय स्त्रीवाद ही संकल्पना आपण संकुचित स्वरूपात न लक्षात घेता तिचा जागतिक पातळीवर विचार करून स्वीवादी साहित्याच्या संदर्भाने जगातील पहिला उद्‌गार म्हणजे 'थेरीगाथा' होय. असे आपण अभिमानाने सांगितले पाहिजे.

## निष्कर्ष

1. 'थेरीगाथा' हा स्त्रीवादी जाणिवांना व्यक्त करणारा जगातील पहिला ग्रंथ आहे. स्त्रीवादी साहित्याची बीजं थेरीगाथातून अंकुरली आहेत
   त्यामुळे 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आहे.
2. तथागत बुद्धांनी स्त्रियांचा भिक्खुणी संघ स्थापन करून स्त्री–पुरूष समानतेचा पुरस्कार केला.
3. 'थेरीगाथा'ने युगनायिका निर्माण करून स्त्रियांना जगण्याचा नीतीमय संदेष दिला असे समजून येते.
4. 'थेरीगाथा' स्त्री अभिव्यक्तीचा आणि स्त्री स्वातंत्र्याचा आद्य हुंकार आहे हे समजून येते.
5. 'थेरीगाथा' मध्ये समाजातील वेगवेगळ्याा जाती धर्मातील, पंथातील स्त्रियांचा समावेष आहे. म्हणूनच 'थेरीगाथा' हा ग्रंथ सामाजिक समतेचा मानबिंदू ठरताना दिसतो.
6. थेरीगाथामध्ये स्त्रियांचे स्थान आदराचे आणि सन्मानाचे आहे यास्तव आदर्ष स्त्रीजीवनासाठी थेरीगाथा धम्मसंहिता ठरते.
7. थेरीगाथाने संपूर्ण स्त्रीजीवनासाठी आदर्ष जीवनमूल्ये प्रदान केली.
8. आषय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने थेरीगाथा वैषिष्ट्यपूर्ण आहे.
9. थेरीगाथा म्हणजे संपूर्ण जगातील स्त्रियांना सन्मान मिळवून देणारी धम्मवाट आहे.
10. थेरीगाथेतील स्त्रियांचे सामाजिक जीवन अत्यंत आदराचे, सन्मानाचे आणि आदर्षवत होते असे लक्षात येते.

## संदर्भग्रंथ सूची

1. उपाध्याय भरत सिंह, थेरीगाथा, गौतम बुक सेन्टर, दिल्ली, प्रथम संस्करण– 2010, पृ.5
2. छत्रे लता दिलीप, बौद्ध धर्मातील स्त्री विचार, सुगावा प्रकाषन, पुणे, व्दितीयावृत्ती, डिसेंबर–2009, पृ.24.
3. तत्रैव, पृ. 61.
4. मेश्राम प्रा. डॉ. शेषराव, थेरीगाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, 30 ऑक्टो. 1993,ग्रंथपरिचय,पृ.3.
5. मोरे मा. श., संयुक्त निकाय–1, कौषल्य प्रकाषन, औरंगाबाद, व्दितीय आवृत्ती 9 मे 2009, पृ. 107.
6. भदन्त तिस्सवंस, सुत्तपिटक, सुगत प्रकाषन, नागपूर, धम्मचक्र प्रवर्तन दिनः सुवर्ण जयंती 2006, पृ. 125.
7. उपाध्याय भरतसिंह, थेरीगाथा, उनि. पृ. 69.
8. तत्रैव, पृ. 62.
9. छत्रे लता दिलीप, बौद्ध धर्मातील स्त्रीविचार, उनि. पृ. 60.

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# स्त्री प्रतिमा : एक आकलन

प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे
सहयोगी प्राध्यापकण् श्रीमती कोकिळाबाई
गावंडे महिला महा. दर्यापूर, जि. अमरावती
Dr.herole@gmail.com
मोबाईल क्रमांक ७७४५८७९९६९

**सारांश :-**

संपूर्ण जगाचा विचार केला तर सगळीकडेच पुरुषप्रधान व्यवस्थेचच वर्चस्व दिसून येतं. विशेषत: भारताचा विचार केला तर भारतात पुरुषसत्ता अधिकच आक्रमक आणि शोषक स्वरुपाची आहे. स्त्री ही नैसर्गिकच शारीरिकदृष्टया दुबळी असून ती अबलासुध्दा आहे. पुरुषचा स्त्रीचं सर्वार्थाने संरक्षण करु शकतो हा सनातनी विचार आजही आपले डोके वर काढतो. स्त्रीयांच्या चळवळीमुळे काही प्रमाणात पुरुषांना धडे शिकविण्याचा प्रयत्न केला. परंतु पुरुषप्रधान व्यवस्थेन निर्माण केलेल्या गुंतागुंती अजूनही सुटलेल्या नाहीत. त्यासाठी पुरुषांनीच मनापासून पुढाकार घ्यायला हवा. जोपर्यंत पुरुषांची सनातन मानसिकता बदलत नाही तो पर्यंत पुरुषांनी केलेल स्त्रीवादाचा पुरस्कार हा केवळ देखावाच ठरणार आहे.

जगात जेवढे काही धर्म होऊन गेले त्या धर्मातील लोकांनी स्त्री ची महानता धर्मग्रंथात उदारपणे सांगितली आहे. स्त्रीला सृष्टीची जननी म्हणून तिचे गुणगाण केलेले आहे. तरी दुसऱ्या बाजूला स्त्री ही दासी, उपभोग्य वस्तू, पुरुषांचा संसार करणारी, कुटुंबाचे पालण-पोषण करणारी अशी पुरुषसत्ताक व्यवस्थेला पोषक रुपात स्त्रीयांचे वर्णन केलेले आहे. स्त्री ही माता, पत्नी, बहिन, मुलगी, नात, सून अशा स्वरुपाचं तिचं नातं केवळ पुरुषाची आयुष्य सांभाळण्यासाठीच असतं अशी शिकवण देऊन ही नाती स्त्रीयांनी पुरुषांच्या सुख समाधानासाठीच जपायची असतात हीच शिकवण स्त्रीला जन्मापासून तर मृत्यूपर्यंत दिली जात आहे.

**बिज शब्द :-**

स्त्री, जीवनवाद, स्त्रीवाद, प्रतिमा, उर्जा, प्रश्न.

**प्रस्तावना :-**

राजकारणाच्या इतिहासात स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देऊन सक्षमीकरणाचा प्रयत्न करण्यात आला. केवळ नोकरी करण्यासाठी बाहेर पडणारी स्त्री राजकारणाच्या निमित्ताने लोकांचे प्रश्न समजून घेऊन समाजकारण करु लागली. पण तिला पूर्ण स्वातंत्र्य वापरता आले नाही. कारण तिचा वडील, भाऊ, पती अशी अनेक नातलग मंडळी तिच्या निर्णयाचे भागीदार झाले. तिला स्वतंत्र विचारशक्तीचा वापर करता येत नाही. जर तिला सन्मानाने जगू द्यायचे असेल तर तीला तज्ज्ञसारखा सल्ला देऊन तिच्या कामासाठी मोठयांनी आशीर्वाद दिला पाहिजे अशी स्त्री नक्कीच उद्याचा बलशाली भारत घडविल्याशिवाय राहणार नाही. स्त्री चे महात्म्य स्पष्ट करताना महात्मा फुले म्हणतात, "स्त्री नऊ महिने आपल्या बाळाला पोटात वाढविते त्याला जन्म देते, त्याला चालायला बोलायला शिकविते

म्हणून ती श्रेष्ठ आहे"[१] असा हा वैश्विकतेचा मानवतावादी सिध्दांत महात्मा फुलेंनी जगाला समजावून सांगितला स्त्री चे विशाल रुप व कर्तृत्व त्यांनी जगाला दाखवून दिले. "पोटात शंख शिंपले, रत्ने, माणके, कोटयावधी सजीव लपवून दुरुन अत्यंत मोहक दिसणारा समुद्र कुठेतरी स्त्रीशी सामर्म्य दर्शवितो"[२] असच काहीच स्त्रीयांच व्यक्तिमत्व माधुरी शानभाग यांनी 'समुद्र' या कथेतून रेखाटलं आहे. ते अत्यंत बोलकं आहे.

वर्तमानात साजऱ्या 'रक्षाबंधन' या सवण उत्सवातून आपण आपल्या पारंपारिक मूल्यांना उजाळा देणे आज आवश्यक आहे. नाही तर दरवर्षी साजऱ्या होणऱ्या रक्षाबंधानामुळे जर देशातील स्त्रीयांवरील अन्याय अत्याचार बलात्कारासारख्या विकृत घटना घडतात. त्या थांबण्यासाठी काही ठोस पावलं उचलनं गरजेचे आहे. नाही तर वर्षानुवर्षे येथील धर्मव्यवस्थेने स्त्रीयांना दिलेलं गौणत्व व समाजाचा स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोण यामुळे स्त्री कायमचीच दुय्यमस्थानी राहिली आहे.

गर्भाशयातच आपण स्त्री-भ्रूण संपवून टाकतो परंतु आपल्याला राखी बांधण्यासाठी बहिण हवी असते अशा कितीतरी कथा आहेत घरी आई पाहिजे पण आईची काळजी घेणारे किती आहेत? हा खरा प्रश्न आहे. पत्नी पाहिजे ? पण तिच्या आरोग्यासाठी तिच्या स्वातंत्र्यासाठी किती? लोक काळजीवाऊ असतात हा समाजातला अनुत्तरीत प्रश्न आहे. याला बगल देत स्त्रीयांना मान-सन्मान कसा मिळेल या विषयी समाजाच्या सर्व स्तरातून स्त्री कर्तृत्वाचं कौतून व्हावयास पाहिजे. सांप्रत काळात "समाजाने स्त्री-पुरुष समानता अंगिकारली आहे असं जरी चित्र दिसत असलं तरी याबाबत आज अनेक समस्या स्त्रियांना भेडसावत आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थित्यंतरांना सामोरे जातांना अनेक नविन प्रश्न निर्माण होत आहेत"[३] ही गुंतागुंत कमी करण्यासाठी प्रयत्नं झाले पाहिजेत.

**समारोप :-**

स्त्रीयांवर होणारे अमर्याद अत्याचार आणि नि:शब्दतेच्या अंधारात त्यांची होणारी घुसमट! याला कारणीभूत असणारे घटक कितीतरी आहेत. उदा. धर्म, जात, अर्थव्यवस्था, राजकारण आणि सर्वदूर भरुन राहिलेली पुरुषप्रधानता यामुळे स्त्री जीवनाचे कसे पतन झाले आहे ते विमल लिमये यांच्या 'दरवाजा' कवितेतून पहावयास मिळते.

'ही घुसमट युगायुगाची | सांगू तरी कुणाकुणाची |
संस्कृतीच्या नावाखाली | दरवाजा बंद आहे ||[४]

स्त्री स्वातंत्र्याची गळचेपी विमल लिमये यांनी तीव्रपणे व्यक्त केली आहे.

स्त्री जीवन हे एक तपोवन आहे असे संबोधणाऱ्या माधवी देसाई आपल्या नाच ग घुमा या आत्मकथनात म्हणतात, "आता गळयात सौभाग्य अलंकार नसतो पण कपाळावर लाल भडक कुंकू असतं ती निशाणी असते माझ्या प्रिय हिंदू धर्माची अनेक रुपात बदलत गेलेल्या भारतीय स्त्री जीवनाची ती कपाळावरची रक्तरंजित खूण असते मी भोगलेल्या वेदनेची शोकाची सुखाची आणि मोहाचीही" असा स्त्री जीवनाचा आलेख त्यांनी 'नाच ग घुमा' या आत्मकथनात मांडलेला आहे.

कुसुमावती देशापांडे म्हणतात, "मराठी साहित्य संमेलनाच्या जवळ-जवळ अर्धशतकाच्या इतिहासात कोणाही स्त्रीची अध्यक्षपदी निवड झाली नव्हती. ही घटना म्हणजे प्रत्येक श्रेतात असलेल पुरुषी वर्चस्व होय. शतकानु शतके चूल आणि मूल सांभाळणाऱ्या स्त्रीला हे फार उशीरा ठाऊक झाले की अर्धे आकाश हे स्त्रियांचे आहे. अशा आत्मबलामुळे स्त्रीयांना मानाचे स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न करता आले.

माधुरी शानभाग म्हणतात, "स्त्रीच्या जगण्याला आज इतक्या नव्या वाटा फुटत आहेत की स्वत:च्या अंतरंगात डोकावून पहायला तिला वेळ नाही व तितकी उर्जाही नाही. वेगाने कोसळणारी नवी ग्लोबलायझेशनची संस्कृती स्पर्धा समस्यांची व्यामिश्रता यामुळे ती गोंधळून गेली." या गोंधळाच्या आणि भितीच्या वातावरण स्त्री स्वत:ला फारच असुरक्षित समजत आहे. तिच्या या अशा वागण्या बोलण्याचा परिणाम तिचे घर, कुटुंब आणि परिसर यावर देखील होत आहे.

**निष्कर्ष :-**

१) स्त्री विषयक कायद्याची योग्य व कडक कार्यवाही करणे.
२) स्त्रीयांना त्यांच्या हक्काविषयी जागृत करणे त्यांना असलेल्या कायदेशीर व मानवी हक्काची जाणीव करुन देणे.
३) स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराविषयी कठोर भूमिका घेणे.
४) आपल्या पारंपारिक सण उत्सावातून स्त्रीला गौण समजल्या जाणाऱ्या व तिला कमी लेखनाऱ्या प्रथांना पायबंद घालणे क्रमप्राप्त ठरावे.
५) प्रत्येक स्त्रीला विचार स्वातंत्र्य व रोजगार मिळाला पाहिजे.
६) मुलगा आणि मुलगी असा भेद न करता ते दोन्ही या जगाची प्रतिकं आहेत असे समजून या प्रमिकांना समतुल्य मानून त्याचा स्विकार केला पाहिजे.
७) स्त्रीयां व त्यांच्या प्रश्नाकडे सहानुभूतीपूर्वक पाहणे.
८) समाजाच्या जीवनप्रवाहात स्त्रीला गुणदोषांसह स्विकारणे.
९) स्त्रीला आर्थिकदृष्टया स्वतंत्र व आत्मनिर्भर करणे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) डॉ. केशव काले, संपादक, 'मानवी जीवनात मानवाधिकाराचे महत्व' अथर्व प्रकाशन जळगाव, प्र.आ.२०१५, पृ.क्र. ७७.
२) माधुरी शानभाग, 'समुद्र', नवचैतन्य पकाशन, मुंबई, प्र.आ. २००८, मलपृष्ठावरील मजकूर.
३) मंजूषा गोसावी,'अनामिका' रोहण प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१०, पृ.क्र.१४०
४) गीताली वि.मं., 'स्त्री प्रश्नसोडवताना', दिलीपराज प्रकाशन प्रा.सि.पुणे प्र.आ. २००९, पृ.क्र.१२०
५) माधवी देसाई, 'नाच ग घुमा' इंद्रायणी साहित्यं प्रकाशन, पुणे, अकरावी आवृत्ती, २००९, मलपृष्ठ
६) अनिल बळेल, 'त्या चौघी' स्नेहल प्रकाश्न, पुणे, प्र.आ. २०१२, पृ.क्र. ३९
७) माधुरी शानभाग, 'पुनर्वसन' नवचैतन्यं प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २००७, पृ.क्र. ७४

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# परिवर्तनाचे वाटसरु

माधुरी मनोहरराव पाटील
मराठी विभाग प्रमुख, मधुकरराव पवार कला महाविद्यालय, मुर्तिजापूर, जिअकोला .

## प्रस्तावना -:

तेरावे शतक हे मराठी वाङ्अर्थात ही धार्मिक पंथानी केलेली .मयनिर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. वारकरी .याकरीता वारकरी पंथ आणि महानुभाव पंथ या दोहोचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो .वाङ्मयनिर्मिती होती पंथाने पद्यातून तर महानुभावपंथाने गद्यातून आणि पद्यातून आपल्या भक्तीभावनेला वाट मोकळी करुन दिलीपरिवर्तनाचे . हा क्रांतीकारक विचार पहिल्यांदाच .यापंथाने मराठी भाषेला आपली धर्मभाषा मानले .पहिले बीज येथूनच रुजल्या गेले .महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांनी केला“जनतेला जो उपदेश करायचा तो तिच्याच भाषेतून केला पाहिजे हे मर्म त्यांनी बरोबर ओळखले होते. आणि म्हणून आपला उपदेश त्यांनी कटाक्षाने मराठी भाषेतूनच केला. एरवी, अस्खलित संस्कृतमध्ये वादविवाद करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होतेहे म्हाइंभटाबरोबर त्यांनी केलेल्या वादविवादावरुन दिसून . पण .येते आपला विशिष्ट उपदेश सर्वसामान्य जनतेसमोर, ब्राम्हणांपासून तो शुद्रापर्यंत नेऊन पोचवायचा होताआणि . त्यांचे अनुयायी नागदेवाचार्य यांनीही या उपदेशाला जनता वंचित .म्हणून त्यांनी तो त्यांच्याच भाषेत म्हणजे मराठीत केला होऊ नये म्हणून केसोबांसारख्या संस्कृत पंडिताला संस्कृतचा उपयोग न करता मराठीचाच उपयोग करायला लावला.”१

त्याकाळी श्रीचक्रधरांनी .हि मराठी गद्यवाङ्मयात चरित्र लेखनाची मुहूर्तमेढ होती असे म्हणने वावगे होणार नाही अशावेळी मराठीला ज्ञानभाषा बनविण्याचा प .लोकभाषेचा वापर केला त्याकाळी ज्ञानभाषा संस्कृत होतीहिला प्रयत्न श्रीचक्रधरांनी केला हा परिवर्तनाचा पहिला वाटसरु ठरलाश्रीचक्रधरांनी त्याकाळात स्त्रियांना दिली जाणारी वागणूक ., त्यांची होणारी विटंबना या सर्व बाबींना आपल्या पंथातून दूर लोटलेस्त्रियांना पुरुषांइतकेच अधिकार प्राप्त करुन देण्याचा . हे त्यांनी आऊसेच्या .म्हणूनच पिंडदान करण्याचा अधिकार केवळ मुलालाच नाही तर मुलीला देखील आहे .प्रयत्न केला श्रीचक्रधरांची शिष्या आउसा .कृतीतून दाखवून दिले“लेकीही मी चि:लेकुही मी ची :” असे म्हणून वडीलांना पिंड प्रदान करते त्यांच्या दृष्टीने माणूस हाच एक वर्ग व माणूसकी .हाच एकमेव धर्म होताउच्चनीय असा भेदभाव त्यांच्या . पुरूषांनी मोकळेपनाने वागावे आपण-स्त्री .खिजगणतीतही नव्हता“स्त्री” आहोत ही भावना मनात न आणता व्यक्ती म्हणून वागावे,“बाई पुरुष होऊनिया असावे” असे सांगणारे चक्रधरस्वामी स्त्रियांच्या मासिक धर्माबद्दल अस्पर्शतेची भावना नष्ट करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला .उमाइसेला विटाळाच्या भ्रामक कल्पनेवर ज्ञान निरुपन केले .“नव्ह व्दारे आहाति :मुत्र :मल : य :नीवर्ते :तैसे हे एकी धातु स्त्रावे :डोळे हागती :सेंबुडाचा वीटाळू धरु नैयेयावरुन श्रीचक्रधरचा हा (४२०.उ.ली) : म्हणूनच .त्यांनी आपल्या निरुपनातून संपूर्ण स्त्रीयांनाच मार्गदर्शन केले .परिवर्तनाचा प्रयत्न दिसतो“चक्रधर हे पहिले समतावादी मराठी संत व आद्य समाज क्रांतिकारक समजले जातात.”२ हे ग माडखोलकरांचे .त्र्यं.म्हणने योग्यच वाटते .

स्त्रीत्यांची शिष्या महदाइसाचा .पुरुष समान मानणाऱ्या श्रीचक्रधरांनी ज्ञानदाना मध्येही कधीच फरक केला नाही- त्यांच्या परिवारात अनेक प्रतिभावान .तिने विचारलेल्या प्रश्नाचे त्यांना भूषन वाटत असे .त्यांनी नेहमी सन्मानच केला स्त्रीयांपैकी महादाइसाहि होतीमहदाइसा ही चक्रधरांची प्रमुख .आणि म्हणूनच तिही या परिवर्तनात समाविष्ठ झाली . ती महानुभाव पंथाची पंथभिमानी स्त्री होय असे महदाइसा विषयी प्रसिध्द साहित्यिक इंदूमती शेवडे .शिष्या होती .म्हणतात”मराठी सारस्वताच्या अगदी महाव्दारापाशीच आपल्याला एक आगळ्या वेगळ्या स्त्रीचे दर्शन होते हीच .“धवळे” कर्ती महादाइसा किंवा महदंबा आद्य मराठी कवयित्री”३ महदाइसा ही स्वयंसिध्द स्त्री होतीत्याकाळातील समाजातील . भ्रामक कल्पनांना मुठमाती देऊन पहिल्या कवयित्रीचा मान या महानुभाव शिष्य महादाइसेला मिळाला ही बाब समस्त

स्त्री वर्गाला अभिमानाची आहे यात शंका नाहीआज यशस्वी पुरुषाच्या जीवनात आणि कुटुंबात स्त्रीचे स्थान हे अत्यंत . .हा विचार भारतीय जनमानसात हळूहळ रूजू लागला .महत्वपूर्ण व प्रभावी असते“स्त्री ही कुटुंबाची एक शक्ती आहेती घर . उभारते, आवरते स्थिर करते.”४ ही स्त्री आज कुटुंबाची धूरा बनली आहेयाचे श्रेय महानुभाव पंथातील या परिवर्तनवादी . .विचारसरणीलाच जाते

जो मानवी समाज स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ह्या प्राणतत्वावर उभा आहेजिथे न्याय ., नीती, अहिंसा, दया, प्रेमाची नितांत गरज आहेअशा समाजाला महानुभाविय पंथीय विचार प्रा .णवायुचे काम करील “जेव्हा समाजव्यवस्था निकोप नसते, तेव्हा तिला निकोप बनवण्यासाठी परिवर्तनाच्या प्रेरणा जागवणं, हे वैचारिक लेखनाचं महत्वाचं उद्दिष्ट असलं पाहिजे असं मी मानतो.”५ असे, आपला निर्भिड व स्पष्ट मत डॉया परिवर्तनाची बिजं हे .साळुंखे मांडतात .ह.आ . महानुभाविय काळातच पेरली गेलीमहानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामीचे गुरु श्रीगोविंदप्रभू याच्या काळाच्या . पतीत झालेला जाती व्यवस्थेचे आत्यंतिक :तो आर्थिक दृष्टीने पिचलेला नैतिक दृष्टीने अध .समाजाचे अवलोकन केले असता स्पश्याला जीव-स्तोम अंगिकारुन स्पृश्यनाचा अविभाज्य भाग मानून अस्पृश्यांच्या सावलीचाही विटाळ मानणाऱ्या वैचित्र्यपूर्ण समाजाचे दर्शन घडते .अशा समाजात गोविंदप्रभूचे विचार त्यांच्या चरित्रातून आपल्या समोर येतो . गोरगरिबांना आपल्या जवळचे द्रव्य वाटुन देणे असा की एखादी आई बापाविणा पोरकी सासुरवाशीनीचॊ लिळा करुन रसाने ओथंबलेल्या आहेतमातंगाच्या घरचे सोले गोविंदप्रभुनी आदराणी ग्रहण .त्यांना गावातील लोकांविषयी आस्था होती . परंतू आजही आपल्यात हिस्त्रुता .हे त्यांनी त्याकाळात केले .समाजातील हा भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला .केले, अहंकार, त्वेष, उच्चनिचतेच्या कल्पना असे अनेक अवगुण आहेत साळूंखे म्हणतात .ह.इथ आ .“आपल्यामधुन या प्रकारची सारी जळमट आपल्या साहित्यामुळ गळून पडण्याला मदत व्हावी, असे मला वाटतंआपल्या साहित्यामुळ एक स्वतंत्र ., निर्भय, सुसंवादी, सामंजस, विवेकी असा समाज निर्माण करु या समाजातील जास्तीत जास्त व्यक्ती संवेदनशील, सहकार्यशील आणि स्नेहशील व्हाव्यात, यासाठी आपली लेखणी आणि वाणी वापरु या.”६

आपल्या साहित्यानं विश्व सुदंर बनवावे हा साहित्य निर्मिती मागचा उदात्त हेतू असावा या प्रयोजनाने साहित्याची निर्मिती व्हावी एवढच परिवर्तनातील वाटसरु मध्ये नागदेवाचार्य ही प्रमुख पात्र आहेत .कारण ते पंथाचे प्रथम आचार्य होते . स्वामीच्या परिसस्पर्शाने त्यांचे जणू सोन्यात रुपांतर झालेजेव्हा म्हाइंभटांनी नागदेवाचार्याना श्रीचक्रधरांच्या लीळा . तेव्हा .सांगण्याचा आग्रह केला“नागदेवाचार्यानी ही केवळ स्वतच्या स्मरणशक्तीवर भिस्त न ठेवता आणि आठवणी : सांगण्याची मक्तेदारी न स्वीकारता चक्रधरांशी संबंधित व्यक्तींच्या मुखातून त्या गोळ्या करावयास आदेशिले आणि प्रत्यंतर पुराव्याने त्यांची मांडणी लीळांच्या स्वरुपात करावयास म्हाइभटास उद्युक्त केले.”७ यातील सत्यान्वेषाणीची आग्रही वृत्ती महत्वाची मानावी लागेलउत्कृष्ठ साहित्याने चांगल्या समाजाची निर्मिती होते व चांगला समाज हा राष्ट .्रबांधीत योगदान देण्याचे सामर्थ ठेवतोची अस्मिता जपणारा कवी नरेंद्र जो मराठीतील पहिल्या दर्जाचा आख्यानकाव्य करणारा :असाच स्वत . कल्पकतेचे अपरंपार वैभव हेच नरेंद्राच्या काव्याचे खरेखुरे वैशिष्ट त्यांच्या .कवी होय“रुक्मिणी स्वयंवर” ८२९ ओव्या असणाऱ्या ग्रंथावर रामदेवराव राजा आपला हक्क सांगू लागला ओवी इतके सुवर्ण देऊ म्हणणाऱ्या राजाला “ना राजे हो आमचे या कवी कुळा, बोलू लागेल” असे उत्तर देऊन कवी नरेंद्राने निलोर्भीपणा बरोबरच कावित्वाचा अभिमान दाखवला . दौलतीत तोलता येत नाही पैसा मिळवण्यासाठी साहि-साहित्याचे मूल्यधनत्याचा जन्म नाहीत्याचे स्वातंत्र्य असे महत्व . .आहे

“तो उत्कृष्ठ आनंदाचा ठेवा आहे याची जाणीव यातून व्यक्त होतेअशी अस्मिता जपणे हा विचार निश्चितच . महत्वाचा आहे”.८ असे डॉ.रमाकांत कोलते म्हणतात .

त्या काळात हा प्रयत्न झाला नसता तर मराठी भाषेला शब्दसंपत्ती मिळाली नसती व ती समृध्द ही झाली नसती . .महाराष्ट्राच्या परिवर्तनात मोलाचा वाटा देणारे हे वाटसरु खरोखर परिवर्तन घडवणारे ठरले यात शंका नाही

**निष्कर्ष -:**

१) सर्वसामान्याचे कल्याण असा श्रीचंक्रधरांच्या कार्याचा प्रबोधनाच्या दृष्टीने लोकाभिमुख दृष्टीकोण होता. लोकभाषेचा वापर करुन त्यांनी समाजाच्या उध्दाराचे व मराठी भाषेच्या उध्दाराचेही महान कार्य केले आहे.

२) श्रीचक्रधरांनी विटाहाच्या संबंधीची पारंपरिक भूमिका नावावरुन पुरोगामी विचार मांडले स्त्रियांना त्यांच्या ठिकाणी असलेल्या ज्ञानाची हक्काची जाणीव करुन दिली. तसेच स्वयंसिध्द स्त्रिया घडविल्याचे दिसून येते.

३) परिवर्तनाच्या ह्या वाटसरुनी एक आदर्श परंपरेची संघटना निर्माण केली. आपल्या विरोधकांचा व्देष करणे संघर्ष करीत राहणे हाच आपल्या जीवनाचा उद्देश ते मानीत नव्हते. असे दिसून येते.

४) महानुभाव पंथीयांनी समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यत तत्वज्ञान पोहचविण्याचा पध्दतशीर प्रयत्न करुन आपली आचारसंहीता समाजाला सुसंघटीत आणि संतुलित करण्यासाठी निर्माण केली. या परिवर्तनात आपला सहभाग नोंदविल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ -:**

१) वि. भि. कोलते ‘प्राचीन मराठी साहित्य संशोधन : लेखन वाचन भांडार पुणे २, प्रथम आवृत्ती १९६८ लेख: चक्रधर आणि ज्ञानदेव पृ.क्र. ७५

२) गं. त्र्यं. माडखोलकर,‘महानुभावपंथ व त्यांचे वाङमय’ व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ.क्र. १५

३) इंदूमती शेवडे,‘संत कवयित्री’ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. १५

४) प्रा. फरकाडे, गोंगे, ‘विवाह आणि कौटुंबिक संबंध, ‘प्रथमावृत्ती, १९९९, प्रकाशक श्री. प्रमोद मुंजे, विद्याप्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ७३

५) डॉ. आ.ह. साळुंखे ‘आपल्या साहित्यान विश्व अधिक सुंदर बनवावं’ (लेख) ‘मराठी साहित्यविचार’ विशेषांक पृ.क्र. १२

६) तत्रैव – पृ.क्र. १९

७) स.ग. मालशे : मराठी वाङमयाचा इतिहास : खंड २ रा. महाराष्ट्र साहित्य परिषद पूणे पृ.क्र. ४४०

८) डॉ. रमाकांत कोलते,‘महानुभावीय साहित्य विचार’ ‘अक्षरगाथा’ २०१४. संपा. डॉ. मा. मा. जाधव पृ..क्र. ५०

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्रबांधनीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनाचे योगदान

प्रा.डॉ. अन्नपूर्णा अ. चौधरी
श्री. बाबासाहेब देषमुख पारवेकर
महाविद्यालय पांढरकवडा जि.यवतमाळ

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र भूमी ही संतांची भुमी मानली जाते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ जवळून पाहिला होता. आत्मोन्नती बरोबरच समाजोन्नती घडवून आणण्याचा प्रयत्न राष्टसंत तुकडोजी महाराज यांनी अविरतपणे केलेला आहे. लोकजागृतीसाठी त्यांनी अखंड कार्य केलेले आहे. समाजपरिवर्तनासाठी त्यांनी आपली लेखनी चालवलेली आहे. समाजसेवा, रुढी, परंपरा आणि आधुनिकता हा त्रिवेणी संगम त्यांच्या जीवनातून, लेखनातून, भजनातून अविश्कृत झालेला आहे. हिंदी व मराठी मिळून त्यांच्या भजनाची पच्चावन पुस्तके प्रसिद्ध आहेत. मराठीत सुमारे चाळीस पद्यग्रंथ व सुमारे वीस गद्यग्रंथ प्रसिद्ध आहे. गीताप्रसाद, हितबोध, युगप्रभात, राष्ट्रसंताची भाषणे, राष्ट्रसंताची पत्रे, राष्ट्रसंताची प्रवचने, सुविचार स्मरणी, सामुदायिक प्रार्थना प्रदिप, समाजोन्नती, विवाहपद्धती यासारखे कितीतरी लेख प्रकाषीत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सर्वस्पर्षी लेखन केलेले आहे. त्यांच्या पद्य रचनेत ईष्वराच्या आराधने सोबत समाजनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा ओतप्रोत भरलेली आहे. महात्मा गांधीजींनी इंग्रजांना 'भारत छोडो, चले जाव' चा आदेष दिला या काळात तुकडोजी महाराजांनी परकियांच्या ताब्यात असलेल्या भारत देषाला मुक्त करण्यासाठी मोठ्या तळमळीने भजनांची निर्मिती केली. राष्ट्रजागृतीसाठी अमृतमधुर भजनांची निर्मिती केली.

**राष्ट्रसंताच्या भजनाचे योगदान :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी भजनाच्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणली. पारतंत्र्याच्या काळात म. गांधीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळ उभी राहिली. हिंदू–मुस्लीम यांच्या मधे दंगे पेटवण्याचा प्रयत्न ब्रिटीषाकडून केला गेला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी हिंदू–मुस्लीमामधील वैमनस्य दूर करण्याचा प्रयत्न केला व त्यांना संघटीत करुन पारतंत्र्यांविरुद्ध लढा देण्याचे प्रोत्साहन दिले. समाजात अवडंबर व अंधश्रद्धेला ऊत आला होता. देवधर्माच्या नावाखाली श्रध्दाळू व भोळ्या जनतेचे अनेक मार्गाने षोषण होत होते. समाजाच्याा मनपटलावर असलेला अज्ञानाचा पडदा सारण्याचे कार्य राष्ट्रसंतांनी भजनाच्या माधमातून केले. ईष्वराचे अस्तित्व त्यांना दीनदुबळयांच्या सेवेतून जाणवलेले होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजामध्ये राष्ट्रवाद रुजवण्याचे कार्य भजनांच्या माध्यमातून केले. संत तुकारामापासून संत गाडगेबाबापर्यंत अनेक संतांनी भजनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केलेले आहे. डॉ.शोभा नाफडे म्हणतात त्याप्रमाणे, ''राष्ट्रप्रेमाने ओथंबलेली व लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करणारी शेकडो भजने लिहून राष्ट्रसंतानी देष उन्नतीच्या षिखरावर नेण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता.'' (1)

भजन या संजीवनीला खंजेरीची साथ देऊन खड्या आवाजाने सारा महाराष्ट्र दुमदुमून सोडला. घराघरात त्यांनी भजन पोहोचवले. भजनांची भाषा सर्वसामान्य लोकांना समजेल अषी साधी सोपी व आषयपूर्ण असल्याने मानवी मनाचा ठाव घेणारी ठरली.''अरे उठा उठा, श्रीमंतानो, साधुसंतानो हाक आली क्रांतीची'' (2) अषी ललकारी त्यांनी दिली.

स्वातंत्र्याची चळवळ धगधगती ठेवण्यासाठी भजने परिणामकारक ठरली. स्वतः खंजेरी वाजवून त्यांनी राष्ट्रवादाचा निनाद हजारो लोकांच्या मनात घुमविला आणि समाजातल्या अंधश्रद्धेच्या शृंखला तोडून टाकल्या. भजनांच्या माध्यमातून प्रचंड वैचारिक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शुद्ध आचरण व समाजोन्नती हा ध्यास त्यांनी घेतला होता. बाबा मोहोड म्हणतात त्याप्रमाणे, ''धर्माचा संबंध त्यांनी आचाराषी जोडला तिर्थाचा अनुबंध गावाषी साधला, पुजेचा समन्वय कर्तव्याषी आहे असे सांगीतले व ईष्वराच्या मूर्तिरुप प्रतिमेचा प्रत्यय हाडामासाच्या माणसांच्या माध्यमातून स्विकारावा असे नवे धर्मषिक्षण सर्वांना दिले.''(3)

''कषाला पंढरी जातो रे बाबा कषाला काषी जातो (विवेक माधुरी पृ.38)या सारख्या भजनातून आपल्यातला देव विसरुन देवालयात तिर्थक्षेत्रात देव धुंडाळणाऱ्या प्रवृत्तीवर प्रहार केला. धर्माचे महत्व विषद करतांना राष्ट्रसंत म्हणतात,

''माझा धर्म न्यारा, अन तुझा धर्म न्यारा ।
करा भांडाभांडी हा अधर्मचि सारा ।।
धर्म पाळा, देव सांभाळा, उद्याचा धोका टाळा'' ।।
(ज्ञानकुंज भजनावली पृ.13)

षुद्धआचरण, सदाचार चारित्र्य या सारख्या मानवतेच्या भावनेला प्राधान्य देण्याचा उपदेष त्यांनी केला. तीर्थाला गेलो म्हणजे उद्धार होतो असे नसून तीर्थाचे पावित्र्य अंगी बाळगून तषी वागणूक ठेवल्याने माणसाचा उद्धार होतो हे त्यांनी सांगीतले.

'' माणूस द्या मज माणूस द्या ही भीक मागता मज प्रभू दिसला।
तीर्था लोक दर्षनासाठी जाती देव दिसावा म्हणूनीया।
देव म्हणजे मज माणूस न दिसे अजब तमाषा हो असला''
(नवजागृती भजनावली पृ.11)

त्यांना हवा तसा माणूस घडविण्याचा प्रयत्न त्यांनी भजनाच्या माध्यमातून केला. प्रत्येक व्यक्ती व राष्ट्र स्वावलंबी बनून राष्ट्र उन्नती उज्वल व्हावे हे स्वप्न त्यांनी पाहिले होते.

''उठ गड्या, दिवस निघाला, रामधून आली घराला।
आतावरि झोपि कां गेला? काय सांगषील जगाला ?
तूच कसा झोपुनी गेला? थोडी समज देई मनाला।।
ऊठ चाल होय रांगेला (राष्ट्रीय भजनावली पृ.45)

अशा प्रकारे आळसावलेल्या निद्रिस्त माणसाला त्यांनी भजनाच्या माध्यमातून जागे केले. देषाला उन्नतीकडे नेण्यासाठी आळस झटकून कष्ट करण्याचे आव्हान देखिल केले.

''बसलास कषाला, आळषी बनायला?
चल पुढे देषाच काम करायला ।।धृ।।
दिसायला धट्टा। शक्तीन लठ्ठा।
जेवायला पाहिजे दही दुध–मठ्ठा।
काय झाले शेतावर जायला?
उगा मागतोस भीक, अरे काहीतरी षिक ।।
अन चाल पुढं देषाचं काम करायला ।।
(नवजागृती भजनावली पृ.13)

आळसावलेल्या समाजाला प्रयत्नवादाची षिकवण देऊन पुरुशार्थाकडे नेण्यासाठी त्यांनी उपदेष केला प्रयत्नातूनच पुरुषार्थ साधता येतो ही षिकवण त्यांनी दिली.

''सोन्यासारखी जमीन सगळी परंतु राबेना कोणी।
उठला सुटला नोकर होतो, पैषासाठी लोभाने'' (विवेक माधुरी पृ. 47)

षेतीकडे दुर्लक्ष करुन नोकरीच्या मागे लागण्याच्या प्रवृत्तीवर त्यांनी ताषेरे ओढलेले आहे.

व्यसनाधीन समाजाला उद्‌देषून राष्ट्रसंत म्हणतात,
''सोड सोडरे दारुला, ओळखी अपुल्या माणुसकीला ।।धृ।।
दारुच्या पायि कितितरी, जाहले नश्ट भूवरी।
तूहि त्या मार्गि लागला, ओळखी आपुल्या माणुसकिला ।।1।।

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण करुन समाजाला प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रबोधन केले.

''अरे रिकामा कषाला फिरतं। तुझ गावच नाही का तीर्थ।
गावी गरीब राहती उपवासी अन्नछत्र घालतो काषी?
हे दान नव्हे काय व्यर्थ।।''(नवजागृती पृ5)

ग्रामोद्‌धार हे त्यांच्या प्रबोधनाचे मूख्य सूत्र होते.
''नका भुलू हो चमत्कारा। जगी ही थापची सारी।
भोंदू हे आपण लुटती। दाऊनी थोरवी भारी ।।धृ।।
(नवजागृती पृ5)

ग्रामोद्‌धार हे त्यांच्या प्रबेधनाचे मुख्य सुत्र होते.
बुवाबाजीपासून देषाला, समाजाला दूर ठेवण्यासाठी राष्ट्रसंत भजन व खजेरीचा आधार घेतांना दिसतातत्र

''मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव।
देव अषानं भेटायचा नाही हो ।।धृ।।
मातीचा देव त्याला, चिखलाचं भेव।
सोन्या चांदीचा देव, त्याला चोराचं भेव।
लाकडाचा देव त्याला अग्नीचं भेव ।
देव बाजारचा भाजीपाला नाही हो
(नवजागृती पृ 14)

माणसाला परमेष्वराने निर्माण केले पण परमेष्वराला माणसाने निर्माण केले. लोकांनी हवा तसा देव निर्माण केला. सोने, चांदी, लाकूड, माती एवढेच नव्हे तर आपले विकारही त्याला लावले. लाच, कबूल करुन भ्रश्टाचारी बनविले.

**सारांष :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनांच्या माध्यमातून समाजाचे वैचारिक परिवर्तन घडवून आणले. देव,धर्म, आचरण याचा खरा अर्थ समाजाला सांगितला. भजनाच्या माध्यमातून अंधश्रद्धेला मूठमाती दिली चमत्कार, बुवाबाजी या पासून समाजाला वाचवण्याचा प्रयत्न केला. बुरसटलेल्या प्रथा परंपरेवर प्रहार केला. सत्याचा आचार, न्यायाचा व्यवहार अन् उपकार हाच खरा धर्म आहे हे लांकांना सांगीतले. कर्तव्य सदाचार व सर्वात्मक मानवतेच्या भावनेला आपल्या भजनातून प्राधान्य दिले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी देषाला देव मानले होते त्यामुळे स्वातंत्र्यलढ्यात स्वतः सहभागी होऊन समाजाला जागे केले. समाजात एकात्मता, बंधूभाव रुजवण्याचे कार्य त्यांनी केले.

''या भारतात बंधूभाव नित्य वसू दे।'' या सारख्या भजनातून एकसंघ समाज निर्मितीला त्यांनी प्राधान्य दिले. समाजोन्नती हे प्रबोधनाचे मुख्य सार होते. समाजाच्या अभ्युद्यासाठी 'ग्रामगीता' सारखा ग्रंथ लिहून राष्ट्रजागृतीचे महान कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ :**

1) डॉ. नाफडे शोभा : स्वातंत्र्योत्तर वऱ्हाडी साहित्य पृ.क्र.63, स्वरुप प्रकाषन औरंगाबाद
2) राश्ट्रसंत तुकडोजी महाराज : ग्रामगीता अ.17 ओवी 114 पृ.161
3) मोहोड बाबा : श्री. गुरुदेव मासिक मे 1953 पृ.8 गुरुदेव प्रकाषन, मोझरी
4) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : ज्ञानकुंज भजनावली, नवजागृती भजनावली, राष्ट्रीय भजनावली, विवेक माधुरी, समाज संजिवनी

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# 'उपरा' स्वकथानातील जीवनवास्तव

**दीपक महाजन**
मराठी विभाग,यषवंत महाविद्यालय, वर्धा

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात 1960 नंतर अनेक स्थित्यंतरे झालेली पहावयास मिळते. त्यानंतर मराठी साहित्यात अनेक प्रवाह उदयास आले. त्यापैकीच एक साहित्य प्रवाह म्हणजे 'स्वकथन' हा होय. या प्रकारात ज्याप्रमाणे दलितांची स्वकथने अवतरली, त्याचप्रमाणे भटक्या विमुक्तांची देखील स्वकथने अस्तीत्वात आली. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर या समाजात काही प्रमाणात बदल घडून आलेला दिसतो. आपल्या हक्क, अधिकाराची जाणीव त्यांना झालेली दिसते. 'षिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' या बाबासाहेबांच्या मूलमंत्राचा प्रभाव दलिताप्रमाणे भटक्या–विमुक्तांवर देखील झालेला दिसतो. त्यातूनच नवीन पिढीने षिक्षण घ्यायला सुरूवात केली. त्यांनी आपल्या व समाजाच्या अनुभवांना 'स्वकथना'च्या माध्यमातून शब्दबद्ध केले.

'उपरा' स्वकथनाच्या माध्यमातून लक्ष्मण माने यांनी कैकाडी समाजाच्या वाट्याला आलेले दुःख, वेदना, भूक, दैववाद, अस्पृष्यता, बेरोजगारी, भटकंती, उष्ट्या पत्रावळी, रूढी, परंपरा, जातपंचायत हे संपूर्ण जीवन वाचक आणि समाजापुढे ठेवण्याच्या लेखकाने प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसतो. यापूर्वी 'माणसं' या पुस्तकाच्या माध्यमातून अनिल अवचटांनी कैकाडी समाजाची स्पंदने रेखाटलेली होती. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेली वैचारिक पार्ष्वभूमी, षिक्षणामुळे निर्माण झालेली अस्मिता, वाचनाने निर्माण केलेली भावनात्मकता, भटक्या–विमुक्तांना माणूसपण मिळवून देण्यासाठी झालेला दृढनिष्चय, समाजवादी युवक चळवळ, दलित साहित्य चळवळ भटक्यांच्या जीवनातील भूक, भीक, उपासमार, देवभोळेपणा, उकीरड्यावरचे जगणे या सर्वांच्या परिपाकांचा विवेकपूर्ण अविश्कार म्हणजे 'उपरा' हे स्वकथन होय. कैकाडी समाजाचे जीवन किती भयावह होते याची कल्पना आपल्याला या स्वकथनातून पहायला मिळते.

साहित्य हे समाज जीवनाचा आरसा असतो. त्याचप्रमाणे कैकाडी समाजाचे संपूर्ण प्रतिबिंब या स्वकथनामध्ये पडलेले दिसते. प्रत्येक समाजाचे प्रष्न, समस्या वेग–वेगळ्या असतात. एकुणच समाजरचनेत प्रत्येक जाती–जमाजीचे स्थान, व्यक्तीची प्रतिश्ठा, मान–सन्मान त्या प्रष्नांच्या तिव्रतेवर अवलंबून असते. आपला जन्म कोणत्या जाती–जमातीमध्ये झाला याचा पत्ता कुणालाच नसतो, व ते आपल्या हातातही नसते. एखाद्याला राजमहालाचे वैभव प्राप्त होते, भोजनासाठी पंचतारांकित हॉटेल्स लाल पायघड्या टाकून वाट बघत असतो. पण भटक्या विमुक्तांचे जीवन मात्र भटकंतीने, उकीरड्याने, षिळ्या–पाक्या, उश्ट्या अन्नाने आणि गावपांढरीच्या उपकाराने निष्चित झालेले दिसते. ज्यांच्या जगण्याला उपेक्षाच वाट्याला आली. वेषी आत आणि बाहेर त्यांना कोणताही मान मिळाला नाही. उपरेपणाच त्यांच्या वाट्याला आली. गुन्हेगार जमात म्हणून ज्यांची समाज आणि षासनाने नोंद केली. अषा भटक्या–विमुक्तांच्या जीवनवास्तवाचा वेध अषा स्वकथनामधून घेता येतो.

'उपरा' स्वकथनामध्ये लक्ष्मण माने यांनी स्वजीवनाबरोबरच कैकाडी समाजाची जीवनदषा प्रकट केली आहे. स्वकथनातील नायक हा नाममात्रच असतो. संपूर्ण समाजच नायक बनून येत असतो. या विपरीत परीस्थीतीमधून बाहेर पडावे, चांगले जीवन जगता यावे अषी स्वतःची आणि त्यांच्या वडीलांची पण इच्छा होती. षिक्षणामुळे व्यक्तिगत जीवन बदलले खरे पण जातीबंधनाने तितकेच घट्ट बांधुनही ठेवले होते. षिक्षण होते पण काही करण्याकरिता त्यांच्याकडे पैसा नव्हता. जाती बंधने मोडीत काढण्यासाठी जातीबाहेर प्रेमविवाह केला परंतु त्याच जातीने त्यांना त्यामुळे वाळीत टाकले. परत जातीमध्ये घेण्यासाठी समाजाची मनधरणी करावी लागली. भटक्या–विमुक्तांचे जीवनच तसे अभावग्रस्त होते. या वास्तवाचे चटके सर्वांनाच बसत होते. उभं आयुश्य पाठीवर बिऱ्हाड बांधुन गावोगाव भटकंती करत जीवन जगणाचा उपेक्षितांची कैफियत लेखकाने 'उपरा' या स्वकथनातून मांडली. त्याचे कारण म्हणजे ''गाढवाचं जीणं जगणाऱ्या मंडळीच्या वदेना हे पुस्तक वाचून समाज समजावून घेऊ शकला तरी खुप झालं''[1] असे लेखकाचे मत आहे.

स्वजीवनाची सुरवात ज्या षिक्षणाने करून दिली त्याबद्दल समाजाचा दृष्टिकोण लेखक सांगतात ''आमची वरात देवळातल्या शाळेच्या अंगणात गेली. सारी पोरं भोवताली जमा झाली. साऱ्यांच्या नजरा माझ्यावर रोखलेल्या. बा मास्तरासंग बोलत होता. आयला कैकाड्याच पोरगं षाळत? साऱ्यांच्या चेहऱ्यावर आष्चर्याचे भाव दिसत होते''.[2] पोटापाण्यासाठी वाटेल ते करावे लागत होते. मिळेल ते काम करणे, भीक मागणे, बाभळीचे फोक कापून आणणे, त्याच्या टोपल्या झाप–कुडूके बनविणे, ते गावात नेऊन गावातील लोक देईल त्या मोबदल्यात विकायचे. भटकंती हाच भटक्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. 'ना घर, ना दार, ना जमीन' अषी त्यांची अवस्था होती. भटकंतीमध्ये शाळापण नियमित होत नव्हती. बिऱ्हाड एका ठिकाणावरून तीन दिवसानंतर दुसऱ्या गावी जायचे. कारण कमीत कमी तीन आणि जास्तीत जास्त पाच दिवसाच्या वर एकाच गावात भटक्यांना राहता येत नव्हते. दुसऱ्या गावात बिऱ्हाड गेलं की, गावच्या पाटलाला वाड्यावर जाऊन वर्दी दयावी लागत असे. त्याबद्दल लेखक सांगतात ''जयसिंग्या बा पाटलाकडे गेले होते. गावात आल्यावर पाटलाच्या वाड्यावर वर्दी दयावी लागते. गाढवं, कोबंडी, कुत्री, माणसं, सगळ सांगावं लागतं''.[3]

भटक्या–विमुक्तांच्या वाट्याला गावंदरीचे जीवन आलेले होते. गावाबाहेर राहण्याचे ठिकाण असल्यामुळे भुता–खेताची नेहमीच भीती वाटायची. सोबतचे कोणी बिमार पडले तर दवाखाण्याऐवजी भटके लोक अंगारा लावून देवाला आजार दुरूस्त करण्याची विनंती करतात. प्रसंगी नवस करतात. देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी कोंबडे, बकरे कापण्याची प्रथा या समाजात दिसून येते. हा समाज पूर्णपणे अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेला दिसतो. स्त्रीजीवनाचा विचार करता, त्यांना तर अपार कष्ट सहन करावे लागत असे. स्त्रीया नेहमीच पुरूषांच्या अन्याय, अत्याचाराला बळी पडलेल्या दिसतात. कुंटुंबात पुरूषांनी घेतलेला निर्णय मान्य करावा लागतो. गरीबी एवढी की, कधी–कधी नवरा आपल्या बायकोला 200 रूपयासाठी गाहाण ठेवायचा, विकायचा. बरेच नवरे दारू पिऊन आपल्या बायकोने मना प्रमाणे वागले नाही तर मारझोड करायचे. स्त्रीयांना चांगले राहण्याचा अधिकार नव्हता. गावातील प्रतिश्ठित लोक स्त्रीयांचा गैरफायदा घ्यायचे.

'जातपंचायत' हा देखील स्त्रीयांवर अन्याय–अत्याचार करणारा महत्त्वपूर्ण घटक होय. जातपंचायती मध्ये सर्व सदस्य पुरूष असायचे. त्यात स्त्रीयांना प्रतिनिधित्व नसायचे. जत्रेच्या किंवा इतर वेळी एक–एक महिना जातपंचायती चालायच्या. जातपंचायतीमधले सदस्य दारू प्यायचे, मटन खायचे व त्यासाठी आपला निर्णय लांबणीवर टाकायचे. बहुतेक निर्णय हे पुरूशांच्याच बाजुने लागत असतात. प्रत्येक जातीजमातीत जातपंचायतीचे नियम, षिक्षेचे प्रकार वेग–वेगळे असतात. उदा. कढईतील तापलेल्या तेलातून पैसे काढणे, एखादया स्त्रीच्या हातून गुन्हा घडला असेल तर तीची जीभ कापणे, स्तन कापणे, विश्ठा खायला लावणे, काही प्रकाराचा दंड हा रोख रक्कमेच्या स्वरूपात दिला जातो. अनेक कुंटुंबाना हा दंड भरणे शक्य नसते. म्हणून त्यांना कर्ज काढावे लागते. अषाप्रकारे भटक्या–विमुक्तांमधील जातपंचायत म्हणजे स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार करणारी समाजमान्य संघटनाच आहे. असे आपल्याला दिसते.

भटक्या, विमुक्त कैकाडी समाजातील लोक देव पुजा वर्षभर करतात. पैसा असो वा नसो देवपूजा केलीच पाहिजे हा प्रत्येक कुंटुंबाचा वारसा. त्यासाठी व्याजाने पैसा काढतील पण देवपुजा निष्चितच करतील. ''सरावण महिन्यातला षेवटच्या सोमारी देवदेव करायचा, पोळ्याा हुयाच्या, निवद केलाच पाहिजे. पाच नारळ, पाच लिंब, पेढं असा गोड निवद''[4] या सर्व क्रियाकर्मासाठी या लोकांना फार ढोर मेहनत करावी लागत होती. संपूर्ण कुटुंब कबाडकष्ट करून पाच पंचवीस रूपये मिळवायचे आणि ते पैसे देवदेव करण्यात खर्च करायचे. इतर वेळी काम मिळायचे पण पावसाळ्याात मात्र काही केल्या काम मिळत नव्हते. तेव्हा चार पैसे आणायचे कुठून हा प्रष्न त्यांच्यापुढे आ वासून उभा रहायचा. पावसाळा संपला दसरा आला की, गाढवाच्या पाठीवर बिऱ्हाड टाकून गावोगाव भटकंती सुरू व्हायची. दसऱ्याला कैकाडी समाजात नवरात्र साजरे केले जातात. लक्ष्मणचे देखील असेच चाललेले होते. काम करणे, देवदेव करणे, षिक्षण घेणे.

लक्ष्मण सारखा एखादाच भटक्या–विमुक्तामध्ये षिक्षण घेणारा परंतु त्याला जातीच्या मर्यादा पडायच्याच. लहाणवयातच विवाह करण्याची प्रथा भटक्या, विमुक्तांमध्ये अस्तीत्वात होती. पण विवाह हा जीतीतच केला पाहिजे असे कडक निर्बंध होते. ''बाबा 'जातीसाठी माती खावी' ध्येनात ठीव. जाती षिवा सत ना गत. बाकीचा काय वाईट–वंगाळ इचार करू नगस''[5] भटक्या–विमुक्त जमातीत जाती बाहेर विवाह करणे म्हणजे महापाप होते. एखादयाने तसा प्रयत्न केलास तर त्याला कायमचे वाळीत टाकले जात होते.

**सारांष :**

'उपरा' स्वकथनातून भटक्या–विमुक्तांचे जीवन दर्षन घडविणारे प्रसंग त्यांच्या जीवन संस्कृतीचे पापुद्रे उलगडणारे आहे. भटकंती, देवीची पालखी, आंतरजातीय विवाह, जातपंचायत, स्त्री जीवन, रीतिरिवाज, देव–देव करणे, अंगात वारं घुमणे, बिनभिकार जीवनाची जाणीव ठेवणे, नाते गोते सांभाळणे, जातीबाह्या कोणताही निर्णय घेण्याची मुभा नसणे, जातपंचायतीचा निर्णय मुकाट्याने स्वीकारणे अषा विविध बाबी भटक्या विमुक्तांचे जीवन बिनभिकार रहायला मजकूर करीत असते.

**संदर्भ सूची :**

1) लक्ष्मण माने, उपरा, ग्रंथाली प्रकाषन, मुंबई, पाचवी आवृत्ती, नोव्हेंबर 2000, पृष्ठ क्र.
2) ततैव, पृष्ठ क्र. 05
3) ततैव, पृष्ठ क्र. 14
4) ततैव, पृष्ठ क्र. 42
5) ततैव, पृष्ठ क्र. 119

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# संत साहित्य आणि राजकीय परिवर्तन

**प्रा. डॉ. प्रदीप राऊत**
मराठी विभाग प्रमुख, शि.प्र.मं.विज्ञान व गिलानी कला वाणिज्य
महाविद्यालय, घाटंजी
e-mail- pradipraut gilanicollege@gmil.com

**सारांश–** खरे तर संत आणि राजकारण याचा सुतराम संबंध जोडता येत नाही. मात्र आधुनिक काळात होवून गेलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा यांच्या विचारातून सामाजिक परिवर्तनासोबतच राजकीय परिवर्तन झालेले आढळून येते. या दोनही महान संताने लेखनीबद्ध केलेल्या विचारांमधून सामाजिक परिवर्तनासोबतच राजकीय परिवर्तन झाल्याचेही आढळून येते. त्यामुळे ''संत साहित्य आणि राजकीय परिवर्तन'' या प्रस्तुत शोधनिबंधातून संत साहित्य व राजकीय परिवर्तन यांचा सहसंबंध नक्कीच जोडता येतो हे सोदाहरण स्पष्ट केलेले आहे.

**प्रस्तावणा–** आपली भूमी ही संताची भूमी मानली जाते. या पवित्र भूमीत संत ज्ञानेश्वरापासून तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व गाडगेबाबांपर्यंत अनेक संत होवून गेले व आपल्या मौलिक विचारधारेणे त्यांनी परिर्वतन घडवून आणले. म्हणूनच 'महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाची जडणघडण झाली त्यात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे स्थान अग्रस्थानी आहे' असे ज्ञानदेवांच्या संदर्भात म्हटल्या गेले. कारण 'दुरितांचे तिमिर जावो।' 'जो जे वांछील तो तें लाहो।' अशाप्रकारचा सर्वात्मक विचार तिच्यातून प्रसृत झाला आहे. तसेच 'अभय, सत्वसंशुद्धी, ज्ञान, योग, व्यवस्थिती, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, अपैशुन, दया, अलोपुपत्व, मार्दव, तेज, क्षमा, धृती, शौच, अद्रोह, नम्रता हे दैवी संपत्तीचे 26 गुण सांगितले आहे.' त्यामुळे 'मराठी संताचे विचार व आजचे सामाजिक वास्तव' या विषयानुरोधाने विचार करता, असा विचार मनात डोकावतो की, ''संतांचे विचार आम्ही आचरणात आणलेच नसल्याचे एक भयावह वास्तव आज दिसून येते.'' संतानी आम्हास काय दिले? याचा लेखाजोखा मांडण्याचे हे स्थळ नव्हे. संत ज्ञानेश्वरांनी आम्हास आध्यात्मिक विचार दिला. संत नामदेवांनी दयाभाव शिकविला. तुकोबारायांनी सकारात्मक क्रांतीचे विचार दिले. रामदासांनी आचारधर्म सांगितला. इतर अनेक स्त्री पुरूष संतांनी मानवता धर्माची शिकवण दिली. नव्या काळात संत विनोबा भावे, संत गुलाबराव महाराज यांनी मानवविकासाचा मूलमंत्र कथन केला. थोडक्यात, सर्वच संतांनी सामाजिक परिवर्तनाचा विचार आपल्याला दिला आहे. मात्र आजचा माणूस या विचारांकडे पूर्णतः दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत दुर्दैवाची अशी बाब म्हणावी लागेल. आज या सर्वांचेच विचार देशाला वाचवू शकतात. गरज आहे फक्त त्यांचे विचार प्रत्यक्षात आणण्याची! म्हणूनच 'संतकृपा झाली, इमारत फळा आली.' हे संत बहिणाबाईचे काव्यरूपी मत, मराठी संतांचा संतमहिमाच सांगणारे आहे.

संत साहित्याचे समीक्षक गं. बा. सरदार यांनी आपल्या 'संतवाङमयाची सामाजिक फलश्रूती' या समीक्षा ग्रंथातून, संतकार्याचा एक विस्तृत पटच आपल्यापुढे ठेवला. इतरही अनेक समीक्षक व लेखकांनी अशा फलश्रूतीचा विस्तृत विचार केलेलाच आहे. त्यामुळे अशाप्रकारची पुनरूक्ती टाळून व सामाजिक वास्तव मांडण्यापेक्षा आजच्या नकारात्मक स्वरूपी भीषण वास्तवावर मात

करण्याची जी शक्ती संतांच्या विचारात आहे त्याचा निष्कर्षात्मक परिचय या शोधनिबंधातून व्हावा हे मला अधिक महत्त्वाचे वाटते. कारण, आजच्या सामाजिक वास्तवाला आजच पायबंद झाला नाहीतर भविष्यात अराजकाची परिस्थिती उद्‌भवू शकते.

प्रस्तुत शोधनिबंधात केवळ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा यांचे दिव्य कार्य व विचार यावरच जाणीवपूर्वक प्रकाश टाकलेला आहे. कारण, कालसापेक्ष विचार करता आजच्या नव्या जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या काळासाठी, संत गाडगेबाबांनी सांगितलेला स्वच्छतेचा मूलमंत्र व राष्ट्रसंत तुकडोजी महारांजांनी आपल्याला दिलेले ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मला सर्वाधिक महत्त्वाचे ठरणारे वाटते. याचा अर्थ असा नाही की, इतर संताचे विचार आजच्या काळाकरिता कमी मोलाचे आहेत. संत तुकडोजी व गाडगेबाबांच्या विचारांमध्येही सर्व संतांच्या विचारांचा सार दडलेला आहे. शिवाय आजवर होवून गेलेल्या संताचे विचार जसे क्रांतिकारी होते तेवढेच त्यांचेही विचार क्रांतिकारीच आहे. मात्र अशा विचारांमधील काही मूलभूत बदल शोधणे व ते आजच्या वास्तवतेशी पडताळून पाहणे हाच माझ्या प्रस्तुत शोधनिबंधाचा शोधविषय आहे.

1930 पासून तर 1954 पर्यंतच्या तुकडोजींच्या विचार व कार्यप्रणालीचा परिपाक म्हणजे 'ग्रामगीता' असा या ग्रंथाचा लौकिक सांगता येईल. तेव्हापासून तर आजपर्यंत सुद्धा या ग्रथाचे महत्त्व तसुभरही कमी झालेले नाही. 1954 मध्ये गीताजयंतीच्या पर्वावर एकाच दिवशी भारताच्या विविध भागात 1000 ठिकाणी सदर ग्रंथाचा प्रकाशन सोहळा साजरा करण्यात आला. अशा या ग्रंथाची उपयुक्तता लक्षात आल्यानेच शासकीय स्तरावर 16 भाषांमध्ये हा गंथ अनुवादीत व्हावा, अशी राष्ट्रपती शंकरदयाल शर्मा यांनी 1996 मध्ये आपली इच्छा व्यक्त केली होती. कारण, 'ग्राम' आणि 'ग्राम' हीच एकमेव प्रेरणा असणारा हा ग्रंथ होता. सर्व संतमंडळी 'कालभान' राखतात शिवाय ते द्रष्टे असतात. तुकडोजींनी कालभान राखले पण या कालभान राखण्यापाठीमागे केवळ 'ग्राम' आणि 'ग्राम' हाच एकमेव विषय होता. ग्रामविकासाचा सिद्धांत मांडणाऱ्या तुकडोजींनी आपली ग्रामगीता 1955 मध्ये लिहिली. आज ती इंटरनेटवरही उपलब्ध आहे. मराठीसह हिंदी, उर्दू, कन्नड, इंग्रजी, गुजराती भाषेतही ती उपलब्ध आहे. या ग्रामगीतेच्या 10 व्या आध्यायात त्यांनी राजकीय स्वरूपाचे ठरतील असे सामाजिक विचार मांडलेले आहे.

प्रामुख्याने दि. 22.9.1947 रोजी नागपूर येथे केलेल्या भाषणात संत तुकडोजींनी मतदानाविषयी आपले विचार मांडले जे राजकीय स्वरूपी विचार ठरतात. आपल्या देशाचे भले करायचे असेल तर आपले पुढारी कसे असावे? आपण कुणास मतदान करावे? हे सांगून त्यांनी मतदानाचे महत्व स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, "**कोण गावासाठी झटे? कोण उठतो रोज पहाटे। घेवूनी हातामाजी खराटे। झाडतो कोण? साध्या राहणीने दिवसभरी। कोण गरिबांचे काम करी। कोण पायी फिरोन करी वारी। गावाची आपुल्या?** ...खोटारडा पुढारी कसा घातक ठरतो, हे सांगताना ते म्हणतात, "**बोलणे एक, चालणे एक। लपविणे एक, दाखविणे एक। हे गावांसि होईन घातक। समजावे श्रोतीं। ऐसें न करावे वर्तन। असतील जे इमानदार सेवकजण। तेचि द्यावे निवडोन। एकमतें सर्वांनी।**" आजकाल सर्वांनाच पुढारी व्हावेसे वाटते. पण आपण कुणाला आपला पुढारी मानले पाहिजे, कुणास मतदान केले पाहिजे, यासंदर्भात ते सांगतात, "**पुढारीपण सेवेनेच मिळे। हेच बोलावे मिळोनी सगळे। तेथे पक्षबाजीचे चाळे। वाढोचि न द्यावे। भवितव्य गाव अथवा राष्ट्राचे। आपल्या मतावरीच साचे।**" खरेच राजकीय व ग्रामोन्नतीचा त्यांचा हा विचार क्रांतिकारी विचार ठरेल!

आपल्या मतदानाची उपयुक्तता सांगताना महाराज म्हणतात, "**मत हे दुधारी तरवार। उपयोग न केला बरोबर।**

**तरि आपलाचि उलटतो वार। आपणावरी शेवटी। दुर्जन होतील शिरजोर। आपुल्या मताचा मिळता आधार। सर्व गावास करिती जर्जर। न देता सत्याशी मतदान। निवडणूक जणू स्वयंवर। ज्या हाती देणे जीवनाची बागडोर। त्यासी लावावी कसोटी सुंदर। सावधपणे।''** देशाच्या विकासात निवडणुका किती महत्वाच्या आहेत, हे महाराजांनी समजावून सांगितलेले आहे. पण त्याचा हा विचार आज प्रत्यक्षात आणण्याचा कुणी फारसा प्रयत्न करीत नाही हीच आपली शोकांतिका आहे. योग्य निवडणुका झाल्या तर सर्व प्रकारचा गोंधळ मिटेल, असा आशावाद महाराज व्यक्त करताना म्हणतात, **''निवडणुकीची पाळू प्रथा। हींच मुळी सदोष पाहतां। म्हणोनि योग्य दृष्टी द्यावी समस्तां। गाववासियां। जीवनाची जबाबदारी। किती आहे निवडणुकीवरी। हे पटवोनि निवडणूक खरी। करवावी न गोंधळता। विचार केलीया हळूहळू। आपसाची मार्ग ये कळू। निवडणुकीचे तत्व जाता आकळू। मिटेल गोंधळ सहजची।''**

खरा पुढारी कसा असतो? तो कसा असावा? हे सांगताना महाराज म्हणतात, **''अहो! पुढारीपण कशाला? सेवा गावची करावयाला। मग सेवेची कसोटी लावा की आपुल्या। समजेल पुढारी कोण तो कोण नितीने असे चांगला। पक्षपात न आवडे कुणाला। हिच त्याची जाणीव ओळख निवडावया।''** पुढारी कसा नसावा? हे सांगताना महाराज म्हणतात, **ऐसा नकोच पुढारी। ज्याने नाही केली कर्तबगारी।''** सर्व मतदारांना सावध करण्याकरिता महाराजांनी अतिशय चांगली उपाययोजना सांगितलेली आहे. आपण आपल्या मतदानाची किंमत ओळखली पाहिजे? एक मत किती महत्वाचे असते हे किमान आता तरी आपणास समजले पाहिजे ही महाराजांची तळमळ आहे. आपली ही तळमळ व्यक्त करताना ते सांगतात, **''सांगा मतदान कुणा करणार? व्हा सावधान लोकहो। उभारूनी बाहो। देशाचे भवितव्य ठरणार। पुढारी दारोदार फिरणार। तुम्ही मतदान कुणा करणार? कुणाच्या धाक दडपणे अथवा लोभाने पैशाने का भाळूनि जाणार? जातीचा म्हणुनि बळी पडणार? सांगा तर काय काय करणार? आज भुलूनि का उद्या रडणार? लोकांत पक्ष निर्मूनि भेद पाडूनी गावागावात भोग शिरणारे शेतकरी मजूरची मरणार पुढारी आर्शीवाद देणार तुम्ही नाही का हे ओळखणार? बहुमोलाचे हे मतदान सोडून मत देवू नका दारू पिणाऱ्यासी लाचखाऊ चोर बाजाऱ्यासी अन्यायी गुंड दंडेल्यासी कराल देशाची सत्यानाशी धुंदीत जावूनी कुणी मते देवूनी पश्च्यातापास प्राप्त होणार करू नका तसा कुणी व्यवहार असो मग प्रजा किंवा सरकार। कानी घ्या तुकड्याची पुकार।''**

अशी ही तुकडोजींची ग्रामगीता. ही गीता काही केवळ पारायण करण्यापुरतीच मर्यादित न ठेवता, तिच्यातील विचारांची पारख करून ते विचार अंगी बाळगले पाहिजे, असेच त्यांना वाटत असावे. म्हणूनच ते सांगतात, **ग्रामगीता नव्हे पारायणासि। वाचता वाट दावी जनांसि। समूळ बदलवी जीवनासि। मनी घेता अर्थ तिचा।''** ग्रामगीतेतील या विचारांमुळेच हा ग्रंथ खरे तर एक भगवद्गीता आहे, असा या ग्रामगीतेचा गौरव करीत, नागपूरसह अनेक विद्यापीठांनी हा ग्रंथ अभ्यासक्रमात समाविष्ट केला. नागपूर विद्यापीठाने तर ग्रामगीतेचा गौरव करताना उल्लेख केला आहे की, ''या राष्ट्रातील जनता खेड्यापाड्यात राहते, तिची उन्नती घडवून आणावयाची असल्यास ग्रामगीतेशीवाय पर्याय नाही.'' तुकडोजींबद्यलही ''महाराज संत असूनही महंत नव्हते, भक्त असूनही निष्फळ कर्मकांडी नव्हते, प्राचीन संस्कृतीचे अभिमानी असूनही त्यांचा दृष्टिकोन शास्त्रीय होता, त्यांच्या वाणीने विदर्भातच नव्हे तर सर्वदूर भारतात सामाजिक आणि राष्ट्रीय जागृतीचे प्रचंड कार्य घडवून आणले.'' अशा आपल्या भावना व्यक्त केल्या. या भावनांमधून त्यांच्या कार्याचा आवाका लक्षात येतो. 16 व्या शतकातील रामदास स्वामींच्या 'दासबोधा'शी गामगीतेची तुलना करीत वि. स. खांडेकरांनीही ग्रामगीतेच्या संदर्भातील आपल्या भावना व्यक्त करताना लिहिले आहे की, ''ग्रामगीतेचा गावोगावी प्रसार होवो, महारांजांचा हा वाङमयीन प्रसाद घेवून महाराष्ट्रातील खेडेगावे प्रयत्नशील बनोत आणि ठिकठिकाणी पसरलेल्या अज्ञात सेवकांपर्यंत ग्रामजीवनाला नवे वळण लावण्याचे जे उद्योग चाललेत त्यांना या ग्रंथाचा हातभार लागो.''

''ग्रामगीता ही कर्तव्यविन्मुख ग्रामांना दीक्षा देण्याचेच कार्य करीत आहे'', असे सांगत पुढे डॉ. वि.भि. कोलते म्हणतात, ''ग्रामगीता' ही भगवद्गीतेचा पुनरावतारच होय.'' ग. त्र्यं. माडखोलकरही म्हणतात, ''ग्रामगीता म्हणजे खेडूतांच्या सात्त्विक जीवनापासून तो धार्मिक जीवनापर्यंत सर्वांगीन जीवनाच्या पुनर्घटनेचा एका परीने सूत्र ग्रंथच आहे असे म्हटले तरी शोभेल.''पुढे ते म्हणतात, ''ग्रामोन्नतीच्या जुन्या व आधुनिक कल्पनांचा मेळ ग्रामगीतेत दिसून येतो.'' यायाच अर्थ असा की, तुकडोजींनी

ग्रामाचाच अधिक विचार केला. याउलट प्राचीन संतांच्या विचारांमध्ये मात्र 'ग्रामा'ऐवजी 'परमेश्वरी चिंतन' व 'सर्वात्मकताच' अर्थात भूतदयावादी दृष्टिकोनच अधिक असलेला आढळतो. असे हे संतांचे वैचारिक योगदान आपण कधीच विसरू शकत नाही.

कवी देशपांडे ग्रामगीतेसंदर्भात म्हणतात, ''आत्मोद्वाराची आणि समाजोद्वाराची जिवंत तळमळ लागलेल्या व्यक्तींला अचूक व भरपूर मार्गदर्शन करण्याचे उदंड सामर्थ्य या ग्रामगीतेत साठवलेले आहे.''कुसुमावती देशपांडेही सांगतात, ''ग्रामगीतेची पारायणे व पठन केवळ खेड्यातीलच नव्हे तर सर्व शहरवासी जनतेलाही सन्मार्गावर नेवो, तिच्या शिकवणीने व प्रसादाने आमचे ग्रामजीवन तसेच शहरी जीवन स्वच्छ व निरामय होवो हीच प्रार्थना!'' पु.य.देशपांडेही सांगतात, ''ग्रामात नवचैतन्य यावे या आंतरीक तळमळीने अतिशय प्रासादिक वाणीने तुकडोजींनी ही गीता विस्तारशः लिहिली आहे. अन्याय, दुःखे, शल्ये, यांच्याकडे लक्ष वेधण्याचे काम शेकडो व्याख्याने करणार नाही ते एकट्या ग्रामगीतेने केले आहे.'' दीनदयाल गुप्ताही म्हणतात, ''ग्रामगीता हे आंतरिक क्रांती घडविण्याचे अलौकिक साधन आहे.'' प्रा.आर. व्ही. सोमन म्हणतात, ''आदर्श ग्रामाचे शब्दचित्र अत्यंत हृदयंगम असून त्यासाठी प्रभावी वाणीने समाजाला प्रेरित करण्यात आले आहे.'' भारताचे माजी अर्थमंत्री चिंतामनराव देशमुख ग्रामगीता व तुकडोजींसदर्भात म्हणतात, ''लोकांच्या हृदयात आत्मोद्वाराची प्रेरणा निर्माण करून त्यांना संघटीतपणे ग्रामसुधारणेच्या कामाला लावणे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामगीतेने मात्र हे कार्य केल्याचे दिसून येते.'' म्हणूनच ग्रामगीतेने केलेले कार्य फार मोठे आहे असेच म्हणावे लागेल.

भवानीशंकर नियोगी लिहितात, ''खरा भारत हा ग्रामात असल्यामुळे भारताची उन्नती करण्याकरिताच तुकडोजींनी ग्रामगीता लिहिली.'' पत्रकार ना.भि.परूळेकर लिहितात, ''खेडेगावातील दुर्धर पीडा व त्यावर तुकडोजींनी सुचवलेले इलाज अत्यंत प्रभावी आहेत.'' प्रा.ना.के.भागवत सांगतात, ''ग्रामगीता हा प्रेरक नि प्रासादिक ग्रंथ लोकसेवा करू इच्छिणाऱ्या सेवकांस भगवद्‌गीतेप्रमाणेच सदैव मार्गदर्शक होईल यात शंका नाही.'' बाबासाहेब खापर्डे लिहितात, ''ग्रामगीतेत अनेक समस्यांची उत्तरे आली आहेत. ग्रामीणांच्या सुखी जीवनाची चिंता वाहिली आहे.''य.कृ.खाडीलकरही सांगतात, ''आपल्या लोकसमाजाची परंपरागत धर्मदृष्टी आणि आधुनिक लोकशाहीचे नवे तत्त्वज्ञान या दोहोंचा मेळ तुकडोजींनी आपल्या ग्रामगीतेत मोठ्या कौशल्याने घातलेला आहे.'' ना. ल. कोकाटे लिहितात, ''हा ग्रंथ खेडुतांनी नित्य पाठात ठेवावा या योग्यतेचा आहे.'' एवढेच नाही तर अशा या आपल्या ग्रामगीतेबद्यल तुकडोजी महाराज स्वतःच लिहितात, ग्रामगीता माझे हृद। त्यात बसले सद्‌गुरूराय बोध त्यांचा प्रकाशमय । दिपवोनि सोडील ग्रामासि। एकूणच ग्रामगीतेच्या वरील अभ्यासकांच्या या सर्व वस्तुनिष्ठ व निरपेक्षपणे मांडलेल्या मतांमधून ग्रामगीतेतील ग्राम तत्त्वज्ञानाची थोरवीच पूर्णपणे स्पष्ट होते.

खरे तर ग्रामगीतेची थोरवी पुन्हा नव्याने मांडण्याची गरजच उरत नाही. अशी ही ग्रामगीता आजच्या तरूणांनी तर निरोपीलीच पाहिजे. कारण, यातूनच आजच्या वास्तवतेला सकारात्मक बळ मिळेल. तुकडोजी म्हणतात, या कोवळ्या कळ्या माजी। लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी।विकसिता प्रकटतील समाजी। शेकडो महापुरूष।। ग्रामसुधारणा करणारे व विचारांची पेरणी करणारे असे ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी महाराजांसारखे महापुरूष निर्माण होण्याकरिता आणि आपल्यात काहीतरी अगम्य दडून बसलेले आहे हे कळण्याकरिता ही ग्रामगीता किती महत्त्वाची ठरते हेच यातून पूर्णपणे सिद्ध होते. म्हणूनच 'ग्राम' अर्थात ग्रामीण भागातील अंतर्बाह्या सुधारणा हाच तुकडोजींच्या विचारांची एक मुख्य प्रेरणा असल्याचे पूर्णतः लक्षात येते. अशा प्रकारची प्रेरणा प्राचीन संतांच्या विचारात तितक्याशा पोटतिडिकीने मुळीच आढळून येत नाही.

संत गाडगेबाबांना तर आधुनिक महाराष्ट्राचे 'तुकाराम' मानले जाते. का? कारण त्यांचे कर्तृत्व अगदी संत तुकारामांसारखेच आहे. त्यांचे कर्तृत्व कथन करण्यासाठी जिथे शब्दही कमी पडतात तिथे त्यांच्याबद्दल किती लिहावे? कीर्तन व झाडू ही त्यांची मुख्य दोन आयुधे. या आयुधांच्या माध्यमातून त्यांनी फार मोठे जनसेवेचे कार्य केले आहे. मुंबई येथे झालेल्या आपल्या शेवटच्या कीर्तनातून तर त्यांनी फार मोठा बोध जनतेला करून दिला. व्यसनाधिनता, दुर्गुण, जातिभेद, भाउबंदकीचे वाद, नवसायास, यात्रा, बुवाबडवे यासह अनेक विषयांवर त्यांनी प्रबोधन केले. भुकेलेल्यांना अन्न, आजाऱ्याले औषधी, निरास झालेल्यांना धीर, आंधळ्यापांगळ्याला मदत, अनाथाला आसरा, गरिबाच्या लग्नाला मदत अशाप्रकारची शिकवणूक त्यांनी जनमानसाला व स्वतःला पुढारी समजणाऱ्या नेत्यांना दिली. म्हणूनच त्यांच्या कीर्तनास हजारो माणसे जमायची व गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला असा जयघोष करायची. महाराष्ट्र शासनाने तर त्यांच्या नावाची 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान' ही योजना सुरू करून त्यांना जणू आदरांजलीच वाहिली आहे. मात्र त्यांनी दिलेल्या विचारांचा वसा आजचा माणूस विसरला आहे. त्यामुळेच त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव सामाजिक व्यवस्थेवर व इथल्या जनमानसांवर तितक्याशा जोरकसपणे पडू शकला नाही. नाहीतर महाराष्ट्रातील एकाही खेड्यात अस्वच्छता, अंधश्रद्धा, अनागोंदी, नैराश्यता दिसली दिसली नसती. एकूणच, या दोन्ही संतांच्या विचारसरणीमुळे आजची वाढती लोकसंख्या, वाढती बेकारी, शिक्षणातून येणारे नैराश्य, वाढते शहरीकरण, शोषण, अनैतिकतेचा आगडोंब, भ्रष्टाचार, माणसाला माणसाबद्दल वाटणारी अनास्था, रोखल्या जावून ग्रामोद्धारक अशा बाबींचा स्वीकार करणे शक्य होणार आहे. मात्र आमची स्वार्थप्रेरित मानसिकता आम्हाला बदलावी लागणार आहे. राजकीय पुढाऱ्यांनी त्यांचे राजकीय स्वरूपी विचार अंगीकारले व मान्य केले तर सर्वसामान्य माणसांचे नक्कीच भले होईल.

**निष्कर्ष–**

1. संत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा यांच्या राजकीय विचारसरणीमुळे आज राज्यात दृश्य अदृश्य स्वरूपाचा बदल जाणवतो. राजकीय पुढाऱ्यांनी त्यांचे राजकीय स्वरूपी विचार अंगीकारले व मान्य केले तर सर्वसामान्य माणसांचे नक्कीच भले होईल.
2. ग्रामीण भागाची सुधारणा हाच तुकडोजींच्या विचारांची मुख्य प्रेरणा आहे. ग्रामीण भागात वैचारिक स्वरूपाचा आमूलाग्र बदल व्हावा, हाच विचार तुकडोजी व गाडगेबाबांच्या एकूण विचारांचा गाभा आहे.
3. संत तुकडोजी व संत गाडगेबाबांच्या राजकीय विचारातून ग्रामीण तरूणांना क्रांतीची प्रेरणा मिळते. प्रामुख्याने ग्रामगीतेतील राजकीय तत्त्वज्ञान आजच्या नकारात्म सामाजिक वास्तवावरचा ठोस उपाय ठरतो.

**संदर्भ–**

1. राष्ट्रसंत तुकडोजी विरचित ग्रामगीता, श्रीगुरूदेव ग्रामगीता प्रतिष्ठण, गुरूकुंज, आ. विसावी 2010
2. श्रीज्ञानेश्वरी, महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. पुनर्मुद्रण, 1991
3. ज्ञानेश्वरी अध्याय सोळावा, संपादक–डॉ. प्रमोद गारोडे, देवयानी प्रकाशन, मुंबई. आ. प्रथम 2010

–––––

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भाषिक विविधता : भारतीय वाङःमयाची उत्कांती

**सुचिता एस. ढेरे.**
**अणे महिला महाविद्यालय,यवतमाळ**

**प्रस्तावना–**
भारत हा साहित्याचा,वाङःमयाचा देष आहे. अगदी अनंतकाळापासुन ही भुमी साहित्य निर्माण करणारी भुमी आहे. जेव्हा आपण मानवी समाज आणि नागरी संस्कृतीच्या इतिहासाचा आभ्यास करतो, तेव्हा हे असे एक क्षेत्र आपल्याला आढळते,जिथे भारत इतर सर्व नागरी संस्कृती आणि समाजाच्या तुलनेत कितीतरी अधिक उंचीवर, सर्वोच्च स्थानी आहे.सुमारे 3000 वर्षे किंवा कदाचित त्याही पेक्षा अधिक काळ जुन्या असलेल्या भारतीय साहीत्याचे आनखी एक मोठे वैषिष्टय म्हणजे त्याची विविधता. कोणत्याही संस्कृती तसेच भाषेतुन मांडलेल्या सर्व साहीत्यप्रकारांना सामावुन घेण्याची क्षमता आणि इच्छाषक्ती. भारतातील भाषा, भाषेचे प्रकार आणि बोलीभाषा याचीं संख्या विस्मयकारक आहे. या हजारपेक्षाही अधिक भाषा, बोलीभाषा यांतुन भारतातील लोकांना त्यांचे विचार,भावना व्यक्त करण्यास,कल्पनाषक्तीला षब्दरुप देण्यास एक समर्थ व्यासपीठ, एक सषक्त माध्यम मिळाले आहे आणि त्याचाच परीपाक म्हणुन आज आपल्याकडे इतके वैविध्यपुर्ण आणि अप्रतिम वाङःमय आपल्याला बघायला मिळते. देषातली कुठलीही व्यक्ती स्वतःची साहीत्यनिर्मीती करु शकते. त्यासाठी त्याला भाषिक किंवा साहित्यप्रकाराच्या प्रमाणित वर्गीकृत पद्धतींचा विचार करण्याची अजिबात गरज नसते. याच मुळ निर्मितीतुन भारतात प्रत्येक भाषेत अनेक अभिजात आणि सपन्न अषा साहित्यकृती निर्माण झाल्या आहेत.

जगातल्या कित्येक भागात ज्यावेळी नागरी संस्कृतीचा जन्मही झाला नव्हता त्या काळात भारतात वेगवेगळया प्रकारची साहित्य निर्मीती सुरु होती. या प्राचीन काळापासुंच्या साहित्य पंरपरेमुळे जगात कुठेही नव्या प्रकारचे साहित्य निर्माण आणि लोकप्रीय होउन ते भारतात आल्यावर या वारषाचा लाभ भारताला मिळाला.त्यावेळी प्रत्येक नव्या साहित्यप्रकाराचे भारताने दोन्ही बाहु पसरुन स्वागत केले, याचे कारण साहीत्य अभिरुचिचा पाया पक्का होता. साहित्याची मुळे या भूमीत खोलवर रुजलेली होती. विविध साहीत्य प्रकारांचा आस्वाद घेणे आणि नव्याने स्वागत करणे ही पंरपरा तेव्हापासुनच भारतात प्रस्तापीत झाली आहे.

**मौखिक साहित्य** –देषभरात अनेक ठिकाणी वेगवेगळया भाषा मधुन मौखिक साहित्य एका पिढीकडुन दुस–या पिढीपर्यन्त पोचविण्याची समृद्व पंरपरा सुरुच होती त्यातील गीते लोकगिते, लोककथा, म्हणी–वाक्यप्रचार, दंतकथा या स्वरुपातल्या मौखिक साहित्याची पंरपंरा आजही सर्व भाषा मधुण सुरु आहे. प्राचीन काळापासुन ते मध्ययुगीन काळाची सुरुवात होइपर्यन्त, भारतातील बहुतांष साहित्य मौखिक आणि काव्यात्मक तसेच नाटय स्वरुपाचे होते. त्या वेळीही गद्य साहित्य होते,मात्र पद्य अधिक स्वरुपात होते.जसजसे साहित्य प्रकार व्यापक होत गेले,आणि साहित्यात तंत्रज्ञान,खगोलशास्त्र, कृषि, प्रषासन असे विषय येंउ लागले, तसतसे गद्य साहित्याला पण महत्व आले. त्यानंतरही जसजसा भाषांमधे लिपीचा–लिखाणाचा, व्याकरणाचा वापर वाढु लागला,तसतसे लिखीत साहीत्य ही लोकप्रिय होउ लागले. त्यानेही आपली जागा आणि महत्व प्रस्थापीत केले आणि हळूहळू मौखिक साहित्या पेक्षा लिखित साहित्य जास्त अधिक महत्वाचे ठरले. भारतातील भाषा आणि बोलीभाषांची विविधता खोलवर रुजलेली मुळे लक्षात घेता हे आर्ष्चकारक नाही.मध्ययुगीन काळात अनेक भाषामध्ये अनेक प्रकारच्या साहित्याचा झालेला उदय आणि मानवाने पादाक्रान्त किंवा प्रयत्न केलेल्या जवळपास प्रत्येक क्षेत्राविषयी लिहिले गेलेले वाङःमय यामुळे मध्य युगीन काळ भारतीय साहीत्यासाठीचे सुवर्णयुग ठरला आहे.

आज देषातील मौखिक आणि आदिवासी साहित्याचे महत्व कमी झाले असले तरीही, आपण हे लक्षात घेतले पाहीजे की मौखिक साहित्यापासुनच भारतात वाङःमयीन पंरपरा सुरु झाली आणि त्यातुनच लेखी साहित्य विकसीत होत गेले. लेखी साहित्य पंरपरेला या देषात वेळोवेळी नवनवा चेहारा मिळत गेला,प्रिंटीग प्रेस आल्यावर भारतीय साहित्याने कधीही मागे वळुन पाहीले नाही.

**आधुनिक काळ**–आधनिक काळाकडे वळायचे झाल्यास, 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 20 व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात अनेक लेखकांनी आपल्या समकालीन पच्छिमी लेखकांचे अनुकरण करणाचा प्रयत्न केला विषेषता कथा आणि कांदबं–याच्या बाबतीत हे अनुकरण अधिक झाले सर्व प्रकारच्या साहित्यात विषेषता गद्य आणि काव्य प्रकारात कमी अधिक प्रमाणात देषभक्तीच्या भावनेला महत्वाचे स्थान मिळाले. भारताला स्वातंत्र मिळाल्या नंतरच्या दोन दषकात जेव्हा देषात विकास आणि आधुनिकतेचे वारे वाहत होते त्यावेळेच्या भाषांमधल्या अनेक कविता,कथा, कांदब–या आणि नाटकांमधे ग्रामीण जीवनाच्या चित्रणावर भर दिलेला दिसतो.

**भारतीय साहित्यातील प्रवाह**–भारतीय साहित्यात असा टप्पा आला जिथे,साहित्याने एक वेगळे नवे वळण घेतले. पुढच्या तीन दषकात,निर्वासित, स्थलांतरीत मजुर,नोकरदार महिला,षहरी आयुश्यातील कथा कादंब–या अषा सगळया गोष्टीना स्थान मिळाले. समाजातल्या या नव्या समस्या आणि प्रष्नावर साहित्य लिहीले जाउ लागले याच काळात भारतीय चित्रपट सृस्टीतही मोठी

उत्क्रांती झाली. या काळातले अनेक चित्रपट कथा आणि कांदबं—या या वर आधारीत होते. भारतीय साहित्य प्रवाहात काहि अडथळे असले तरीही साहित्याने कायमच स्वतःला नवनव्या स्वरुपात साकार करण्याचे मार्ग स्वतःच शोधले.भारतीय साहीत्याची सुरुवाती पासुनच स्वतःची एक खास, एकमेवाद्वितीय अषी शैली राहीलेली आहे. विस वर्षापुर्वि असा एक सर्वसाधरण समाज होता की भारतीय साहित्य पाष्चिमात्य वळनानेच जाईल मात्र तसे झाले नाही.उलटपक्षी भारतातील पौरानीक साहीत्य आज नव्या रुपात उदयाला आले असुन, अनेक भाषामधुन ते नव्या स्वरुपात, एकविसाव्या ष्तकातील विचाराषीं तर्कसंगत प्रकारे मांडले जात आहे.

**नवतंत्रज्ञानाचा विकास–** प्रचंड वेगाने विकसीत होत असलले तंत्रज्ञाान आणि डिजीटल जग या मुळे लेखकाने आणि वाचकामधीलं अंतर कमी झााले आहे किंबहुना युवापिढी साहित्याकडे गांभीर्याने बघु लागली आहे.स्वतःच स्वतःचे लेखन प्रकाषित करण्याची सोय आणि त्यासाठी उपलब्ध असलेले डिजीटल व्यासपीठ यामुळे ही आधुनिक साहित्य प्रकार लोकप्रीय होत आहे.

**निष्कर्ष –**

भारतीय साहित्याच्या प्रवासाची पाळेमुळे त्याच्या विविधतेत रुजली असून या साहित्याचे विषय, कल्पना आणि शैली यांच्या मधे वारंवार बदल झाले आहे मात्र हे बदल झाले असले तरी भारतीय उपखंडातील भाषीक वैविद्य आणि प्रत्येक भाषा व संस्कृतीतील चांगल्या बाबी निवडून त्या आत्मसात करण्याची मनोवृत्ती प्रचलीत असल्यामूळे भारतीय साहित्य लोकांषी निगडित राहिले आहे केवळ लेखणीच्या बळावर दलित व विविध जमातीच्या समुहानी त्यांच्या समस्या पीढयानपिढया केलेला संघर्ष, सोसलेला अन्याय आदि बाबत व्यक्त होउन मागासलेल्या वर्गाच्या सामाजिक फजीती बाबत निषेध व्यक्त करायला सुरवात केली. साहित्याची उत्क्रान्ती व आधुनिक लेखन यांच्या व्यापक वृतांता इतकेच महत्व त्यांच्या सुरेख मांडणीला देउन हे साहित्य अधिक आंनददाई करण्याचा प्रयत्न करण्यात आला. आधुनिक जगातील जनसंपर्क माध्यमांचा विचार अजुन सामाजिक भाषा वेज्ञानिकानीं फारष्या खोलात जाउन केलेला नाहि परंतु वर्तमान चत्रे व नियतकालीके, आकाषवाणी, दुरचित्रवाणी व इतर इलेक्ट्रानिक माध्यमे ही भाषिक संदेषनाचे काय कोणत्याप्रकारे करु शकतील हा अभ्यासहि या पुढे महत्वाचा ठरेल यात शंका नाहि. नागरीकरन व आधुनिकीकरण या प्रक्रियामुळे विविध समाजांमधे, विषेषतः विकसनषील समाजांमध्ये, विविध प्रकारचया समस्या निर्माण होतांना दिसतात.

**संदभ ग्रंथ –**

1. आधुनिक भाषविज्ञानःसिध्दांत आणि उपयोजन– मिलींद मालषे
2 मराठी भाषा : भाषाषास्त्र आणि व्याकरण– डॉ. विजय इंगळे
3 भाषा आणि भाषाषास्त्र – श्री. न. गजेद्रं गडकर.

**––– समाप्त––––**

# तुकारामांच्या साहित्यातील अस्तित्वभान व विश्वात्मकता

रेणुकादास उबाळे,
मराठी विभागप्रमुख,
एस. एन. मोर कला व वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ
विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी धर्म, मराठी संवेदन स्वभाव व एकंदरच मराठी संस्कृतीला साडेतीनशे वर्षांहून अधिक काळ व्यापून राहणारा संतकवी तुकाराम म्हणजे मराठीतील अत्युच्च मानबिंदू मानला जातो. म्हणूनच मराठी भाषेसंदर्भात तुकारामांचा विचार करणे ही साधी गोष्ट नसून अनेक आयामी गोष्ट ठरते. समाजजीवनातील प्रत्येक क्षेत्रामध्ये तुकारामांनी काव्यरचना केल्याचे आपल्याला दिसते. एवढेच नव्हे तर, संपूर्ण मराठी भाषाच तुकारामांच्या व्याक्तित्वाने व काव्याने पूर्णतः भारलेली आहे. कधी म्हणींच्या, कधी वाक्प्रचारांच्या, तर कधी सुविचारांच्या रूपाने तुकारामांच्या ओळींना, अभंगांना मराठी माणूस कधीही न सरणा–या शिदोरीप्रमाणे वापरीत असतो. तुकारामांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे ती कविता आत्मनिष्ठ असतानाच सामाजिकही ठरते व शेवटी विश्वात्मक जाणिवेशी आपले नाते सांगू लागते.

तुकारामांचे काव्य आणि कार्य केवळ आध्यात्मिक, धार्मिक वा संतवाङ्मयाच्या दृष्टीनेच महत्त्वाचे नाही तर त्यांच्या काव्याला सामाजिक व वैश्विक नैतिकतेचीही जोड आहे. म्हणूनच तुकारामांचा विचार करताना त्यांच्याभोवती साचलेले अलौकिकत्वाचे मळभ बाजूला सारत त्यांच्या व्यक्तित्वाचा व काव्याचा लौकिक पातळीवरुन विचार करावा लागतो. मराठी संस्कृतीमध्ये शेकडो वर्षांपासून मुरलेला तुकाराम केवळ पुस्तकी अभंग व शाब्दिक पांडित्य यांच्यापुरता मर्यादित राहत नाही, तर तो जनसामान्यांच्या जीवनातील प्रत्येक घटीताशी जोडला जातो. यातच त्यांच्या अभंगाचे खरे यश आहे. महाराष्ट्रातील खेड्याा–पाड्याामध्ये रात्रंदिवस काबाडकष्ट उपसीत जीवनाचा खरा अर्थ शोधणा–या असंख्य ग्रामीण, निरक्षर, सर्वसामान्य लोकांना जगण्याचा नैतिक आधार देण्याचे काम तुकारामांच्या अभंगातून सातत्याने घडत असते.

कोणत्याही भाषेतील, प्रदेशातील साहित्याच्या यशापयशाची चर्चा करताना त्या भोषतील किती साहित्य जागतिक दर्जावर पोचलेले आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. यादृष्टीने मराठी काव्यपरंपरेतील तुकाराम हा एकमेव कवी आपल्याला समर्थ वाटू लागतो. त्यांच्या अभंगातील भावना व विचारांना अखंड मानवतेची मजबूत बाजू असल्याने जागतिक पातळीवरही तुकारामांचे काव्य महत्त्वाचे ठरते, म्हणूनच संत वाङ्मयातील विश्वात्मक अर्थ ख–या अर्थाने तुकोबांच्या अभंगात सापडतो.

तुकोबांच्या अभंगातील जाणिवेच्या कक्षेमध्ये समाज जीवनातील कुठलाही घटक अस्पृश्य ठरला नाही. मानवी जगण्याशी निगडीत असणा–या निसर्ग, प्रथा–परंपरा, आधुनिक मूल्य, मानवी स्वभाव, वृत्ती–प्रवृत्ती इ. असंख्य विषयांवर त्यांनी काव्यनिर्मिती केली. यातूनच त्यांच्या संवेदनेची व्यापकता लक्षात येते. म्हणूनच *''तुकोबांची कविता म्हणजे संपूर्ण सृष्टीविषयी असलेली त्यांची प्रगल्भ संवेदना आहे, अवघ्या संसाराविषयीची अनुकंपा आणि सहानुभूती आहे. ते त्यांचे माणूसपणाचेच भान आहे.''*हे दि. पु. चित्रे यांचे मत अर्थपूर्ण आहे. तुकारामांच्या कवितेला आलेल्या या व्यापक संवेदनेचे व प्रगल्भ चिंतनशीलतेचे मूळ त्यांच्या प्रत्यक्ष जीवनातील अनेक घटनांमध्ये व अपघातांमध्ये आहे, असे आढळते.

तुकारामांच्या साहित्याचा समग्र अभ्यास करीत असताना त्यांचे साहित्य ज्या कालावकाशामध्ये घडले, त्या कालखंडाच्या प्रवृत्तीकडे आपल्याला पहावे लागते. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व वैयक्तिक पातळीवरुन रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग अनुभवणा–या तुकोबांच्या काव्यावर भोवतालच्या परिस्थितीचा व घटीतांचा परिणाम कसा झाला व यातून त्यांचे सामाजिक तथा वैश्विक भान प्रगल्भ झाले, हे पाहणे येथे गरजेचे ठरते. कारण *'तुकोबांचा काव्यसंग्रह फार मोठा आहे. त्यातील सामाजिक व*

*पारमार्थिक शिकवण अबालवृध्द, शिक्षित–अशिक्षित, सर्वांनाच चित्ताकर्षक वाटते, ते वाङ्मय जसे सुलभ व सोपे आहे तसेच ते अनुभवपूर्ण वास्तववादी आहे. अशा वाङ्मयाचे खरे हृद्‌गत समजून घेण्यास लेखकाचे सत्य स्वरुप व तत्कालीन परिस्थितीचा पूर्ण बोध होणे आवश्यक आहे.'*[2]

इ. स. 1608 साली पुण्याजवळील देहू या खेडेगावी तुकारामांचा जन्म झाला. त्यांचा जीवनकाळ म्हणजे 1608 ते 1650. हा कालखंड म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राच्या व भारताच्या दृष्टीने प्रचंड उलथापालथीचा काळ होता. मुख्यतः महाराष्ट्रामध्ये इस्लामांच्या जुलूमी राजवटीखाली सर्वसामान्य जनता भरडल्या जात होती. तत्कालीन आदिलशाही, निजामशाही व कुतूबशाही यांच्या परस्परसंघर्षातही सामान्य मराठी माणूसच भरडल्या जात होता. राजकीय दडपशाही व सामाजिक शोषणाची ही अवस्था तुकोबांच्या काव्यातील सामाजिक बांधिलकी प्रगल्भ करण्यास कारक ठरली असे दिसते.

तुकारामांच्या वैयक्तिक आयुष्यातील परिपाक म्हणून त्यांची काव्यजाणीव व नैतिक मूल्यजाणीव पाहण्याजोगी ठरते. त्यांचा जन्म सर्वसामान्य ग्रामीण कुटुंबात झाला असला तरी आर्थिकदृष्टया सधनता त्यांनी सुरुवातीच्या काळात अनुभवली. कालांतराने मात्र त्यांच्या आयुष्याला निराळी कलाटणी मिळाली. त्यासंदर्भात क्रमवार घडणारे एकेक प्रसंग लक्षणीय आहेत. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी तुकोबांचे आई–वडील वारले. नंतर इ. स. 1629–30 च्या दरम्यान दोन–तीन वर्षाच्या काळात दख्खनमध्ये भयंकर दुष्काळ पडला. या दुष्काळात तुकोबांची शेती संपुष्टात आली. धंदा बुडाला. कर्ज बुडाले. एवढेच नव्हे, तर या दुष्काळाची तीव्रता एवढी होती की, अन्नाअभावी गुरा–ढोरांसोबत माणसेही तडफडून मरू लागली. तुकारामांची पहिली बायको रुखमा या दुष्काळामुळे वारली. त्यापाठोपाठ मुलगा संतूही वारला. सख्ख्या नात्यातील आप्तजनांच्या सलग मृत्यूमुळे तुकारामांना जीवन–मृत्यूच्या रेषेपलीकडे पाहण्याची उर्मी मिळाली. सामाजिक, वैयक्तिक व कौटुंबिक स्तरावरील अशा अनुभवातून तुकारामांची अस्वस्थता वाढली व जीवनातील मानवी अस्तित्वाची क्षणभंगुरता त्यांना प्रकर्षाने जाणवली. यातूनच त्यांचे स्वतःचे अस्तित्वभान तीव्र झाले. आसपास घडणा–या या संपूर्ण घटनांमुळे तुकारामांच्या काव्याला एक विशिष्ट खोली प्राप्त झाली. त्यांच्या आयुष्यातील या सर्व घटनांचे संदर्भ त्यांच्या अभंगातूनही व्यक्त होतात. विशेष म्हणजे अशा सर्व दुःखदायक व क्लेशकारक अनुभवातही तुकारामांचे सामाजिक भान जागरुक होते. कारण तुकोबांच्या अस्तित्वभानात सामाजिकता समाविष्ट होती आणि ती जागरुक होती. याची जाणीव ठेवून त्यांच्या काव्याचे वाचन केल्यास अनेक आश्चर्यकारक गोष्टी आपल्याला सापडू लागतात. तुकोबांची गाथा हे निव्वळ काव्यात्मक किंवा आध्यात्मिक आत्मचरित्रच नाही, तर समाजाच्या, संस्कृतीच्या, भाषेच्या आणि दैनंदिन जीवनाच्या सर्व अंगावर प्रकाश टाकणारा एक असाधारण संदर्भग्रंथ आहे, याचा विसर पडता कामा नये.

तुकोबांच्या आयुष्यात घडणा–या अनेक गोष्टीचे संदर्भ व पडसाद त्यांच्या अभंगातून व्यक्त होतात. परंतु या व्यक्त होण्याला एक काव्यात्म मूल्य प्राप्त झाल्याचे दिसते.

जसे –

''बाप मेला न कळता। नव्हती संसाराची चिंता।।
विठो तुझे माझे राज्य। नाही दुस–याचे काज।।
बाईल मेली मुक्त जाली। देवे माया सोडविली।।
पोर मेले बरे जाले। देवे मायाविरहित केले।।
माता मेली मज देखता। तुका म्हणे हरली चिंता।।''

प्रस्तुत अभंगांत तुकारामांच्या जीवनातील स्थळ–काळातील विशिष्टता तर व्यक्त होतेच परंतू ती व्यक्त होताना एक विरोधलय व उपरोधपूर्ण अर्थगहनता घेऊन तो आशय व्यक्त होतो. तुकोबांच्या अभंगातून क्वचित जागी संस्कृतीनिष्ठ पृथगात्मकता

जाणवत असली तरी त्यांच्या एकूण अभंगांच्या आशयाला संपूर्ण मानवी अस्तित्वाच्या एकात्मतेची छटा आहे. त्यांचे बहुतेक अभंग निसर्गप्रतिमा व मानवी स्वभाव, वृत्ती–प्रवृत्ती यांच्यातील परस्परसंबंध दर्शविणारे आहेत. उदा :

''चंचळी चंचळ। निश्चळी निश्चळ।।
वाजवी खळाळ। उदकासी।।
सोपे वर्म परि। मन नाही हाता।।
हा हा भूत चित्ती। भ्रम गाढा।।
रविबिंब नाही। तुटत उदका।।
छायेची ते नका। सरी धरु।।
तुका म्हणे भय। धरी रज्जूसाटी।।
नाही साच पोटी। कळले तो।।''

या अभंगातील शब्दकळा *नादमाधुर्य,*[3] व शब्दविन्यास लक्षणीय आहेच शिवाय सूर्य, पाणी, सावली, इ. प्रतिमा, प्रतीके यांचा मानवाशी वैश्विक पातळीवर अतूट संबंध आहे, हे देखील ते समर्थपणे व्यक्त करतात.

समकालीन जगण्यातील अनेक घटनांचा अन्वयार्थ तुकारामांनी तिरकसपणे लावल्याचेही ब–याचदा दिसते. दुष्काळ, उपासमारी इ. घटना पाहून मानवी स्वभावातील उथळपणा त्यांनी नेमकेपणाने टिपला आहे. मानवाच्या व्यवहारीपणाचा, ढोंगीपणाचा व स्वार्थीपणाचा प्रत्यय त्यांना या निमित्ताने आला. ते म्हणतात,

''साइरे धाइरे। दिल्या घेतल्याचे।
अंत हे काळीचे। नाही कोणी।।
सख्या गोत्रबहिणी। सुखाचे संगती।
मोकलुनी देती। अंतकाळी।।
आपुले शरीर। आपणा पारिखे
परावी होतील। नवल काई।।''

मानवाच्या स्वभावातील पराकोटीच्या स्वार्थाची प्रचिती आल्यावर तुकारामांना एक विशिष्ट परात्मता आल्याचे जाणवते. याच परात्मतेतून त्यांची अस्तित्वभानाची जाणीव स्पष्ट झाल्याचे दिसते. यादृष्टीने त्यांच्या अभंगाचा 'अस्तित्ववादी' परिप्रेक्ष्यातून अभ्यास महत्त्वाचा ठरतो. तुकोबांच्या काव्यातून जाणवणा–या या अस्तित्वभानाची व परात्मतेची जातकुळी मात्र भारतीय संस्कृतीच्या खास संदर्भामुळे निराळी असल्याचे आढळते. कारण, तुकारामांच्या परात्मतेचे कारण भारतीय जातिव्यवस्था व जातीनिहाय विषमता यामध्येसुद्धा आहे, हे लक्षात घ्यावे लागते. म्हणूनच 'याती शूद्र वंश, केला वेवसाय' असे तुकोबा म्हणतात. पाश्चात्य अस्तित्ववाद व्यक्तिकेंद्री विशिष्ट जाणिवेकडे झुकलेला आहे. मात्र, तुकारामांचा अस्तित्ववाद वा त्यांचे अस्तित्वभान त्यांच्या ठायी असलेल्या सामाजिक जाणिवतेमुळे व्यापक व प्रगल्भ झाल्याचे दिसते. तत्कालीन जातिव्यवस्था व ब्राह्मणकेंद्री जीवन व्यवहाराविरुध्द तुकारामांनी जो विद्रोही प्रतिकार केला त्या प्रतिकाराला संपूर्ण बहुजनांच्या असंतोषाचा संदर्भ होता. म्हणून ही जाणीव व्यक्तिगत असली तरी ती समूहनिष्ठ व व्यापक ठरते. या अस्तित्वभानाला सामूहिक भावनेचाही गडद स्पर्श आहे, असे दिसते. म्हणूनच तुकारामांच्या कवितेतील वैचारिक मांडणी जात, वर्ण, वर्ग व लिंगभाव यांच्या पलीकडे जात असतानाच जागतिक समतेच्या भावनेशी नाते सांगू पाहते. तुकोबांच्या विरक्तीच्या अभंगातून हे विशेषत्वाने जाणवते.

तुकारामांना आलेली विरक्तीसुध्दा आध्यात्मिक वा दैवी प्रेरणेने आली नसून मानवी संसारातील नित्य सुखदुःखाच्या घणाघाती आघातामुळे आलेली ही विरक्ती आहे हे ध्यानात घ्यावे लागते. जाणीव—नेणिवेच्या स्तरावर दुःख प्रचितीमुळे आलेली प्रगल्भ मानवतावादी दृष्टीच यामधून व्यक्त होते. आपल्या डोळयादेखत झालेले स्वकीयांचे मृत्यू तुकारामांच्या संवेदनशीलतेला प्रत्यक्ष मृत्यूचा नव्हे, त्याहूनही पुढच्या पातळीवरील आकलनाचा अनुभव देऊन जातात व यातून तुकारामांनी जणू पुनर्जन्माचाच अनुभव घेतला असे वाटू लागते.

''मी चि मज व्यालो। पोटा आपुलिया आलो।।
आता पुरले नवस। निरसोनी गेली आस।।
जालो बरा बळी। गेलो मरोनि ते काळी।।
दोहीकडे पाहे। तुका आहे तैसा आहे।।

दोन्हीकडे पाहणे म्हणजे नेमके काय? याचा अर्थ येथे वाचकाला उमगू लागतो. जन्म आणि मृत्यू या दोन टोकांमधील ओंजळभर आयुष्याच्या अवकाशातून विश्वचौतन्यवादी तत्त्वज्ञानाच्या तिस—या दिशेकडे पाहण्याची ताकद मात्र तुकोबांना आपल्या जीवनातील अपघातांमुळेच मिळाली, ही बाब लक्षणीय आहे.

तुकारामांची कविता म्हणजे खरे पाहता त्या काळातील बुध्दिप्रामाण्यवादी व भौतिकवादी भूमिकेचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. आत्मनिष्ठा, समूहनिष्ठा, सत्यान्वेषी दृष्टी व तथ्यानुषंगी स्वभाव यांमुळे त्यांची कविता ही एका निरंतर चालणा—या सत्यशोधनाची सुरुवात ठरते. तटस्थ प्रामाणिकपणातून त्यांचे अभंग फुलले. सत्य—असत्याचा ठाव आपल्या विवेकनिष्ठ भूमिकेतून लावत समतावादी मराठी संस्कृती त्यांनी घडविली. सत्य असत्यासी। मन केले ग्वाही। मानियेले नाही। बहुमतां।।या वृत्तीने समाजातील धर्माच्या नावावर चाललेल्या ढोंगी, धूर्त, ब्राह्मण्यवादी प्रवृत्तीवर त्यांनी घणाघाती प्रहार केले. तुकोबांच्या वैचारिक व तत्वज्ञानात्मक सम्यक काव्यामुळे समाजातील सर्वसामान्य माणूस त्यांच्याकडे आकर्षित होत गेला. वेदपठन, मंत्रपठन, पूर्वजन्म, पुनर्जन्म, कर्मकांड इ. असंख्य बाबींचा त्यांनी कडाडून विरोध केला. ते म्हणतात,

वेदांची वचने याज्ञिके घोकावी।
आम्ही न ऐकाची श्रवणी ती।
वेद आम्हावरी रूसोनिया गेला।
आम्ही त्याचे बाला धरीले कंठी।।

वेदपठनाचा अधिकार बहुजनांना मिळत नसेल तर वेदांचाही बाप म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर आमच्याशी एकरुप झालेला आहे अशी अद्वैती तत्वज्ञानाची भूमिका त्यांनी घेतली. मात्र, तुकारामांसारखा सामान्य शूद्र, कुणबी आपल्या हितसंबंधांना धोका निर्माण करतोय याचा सनातन्यांना मोठा राग आला. परिणामी तुकारामांचा अनेक पध्दतीने छळ करण्यात आला. त्यांचे अभंग नदीत बुडविण्याचा प्रसंग सर्वांना माहीतच आहे. थोडक्यात, ब्राह्मणकेंद्रीत जातिव्यवस्थेतील अनेक —हासकारक प्रवृत्तींनी तुकारामांना छळले, परंतु, नाठाळाच्या माथी काठी हाणण्याच्या परखड स्वभावामुळे तुकाराम आपल्या वैचारिक भूमिकेवर ठाम राहिले, हे महत्त्वाचे आहे.

संत तुकारामांनी वारकरी पंथाला व पर्यायाने मराठी संस्कृतीलाच सामाजिकतेचे व वैश्विकतेचे भान आणून दिले. सर्वसामान्यपणे, संतानी अध्यात्मिक लोकशाही आणली असे म्हटले जाते. परंतु 'अध्यात्म' या संकल्पनेचीच तुकारामांनी नव्याने मांडणी केली असे दिसते. विठ्ठलभक्ती हा पर्याय म्हणजे केवळ सामाजिक समतेसाठी स्वीकारलेली निमित्तमात्र गोष्ट आहे, असा संदेशच त्यांनी दिला. किंबहुना, तुकारामांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन विज्ञाननिष्ठच आहे. म्हणूनच 'माझे लेखी देव मेला।

असो त्याला असेल।।' किंवा 'देवाची ते खूण। आला ज्याच्या घरा। त्याच्या पडे चिरा। मनुष्यपणा।।' असे तुकाराम सहजपणे सांगून जातात. समाजात विधायक परिवर्तनासाठी लोकसंघटन व्हावे या मुख्य हेतूने वारकरी पंथाची स्थापना करण्यात आली. अध्यात्माच्या निमित्तमात्र प्रयोजनातून एकेश्वरवाद व बंधुभावाचे मूल्य त्यांनी मराठी माणसांत रुजविले. म्हणूनच तुकारामांचा विठ्ठल हा सरूप, अरूप, अनेकरूप, विश्वरूप असा मानवी स्वरूपाचा आहे. वारकरी पंथाने समाजाला वर्ण, वर्ग, लिंग व जातमुक्त करण्याचा प्रयत्न केला व या प्रयत्नाचे अध्वर्यू तुकारामच होते हे लक्षात घ्यावे लागते.

तुकारामांच्या अस्तित्वभानामध्ये, जगण्याच्या निरिक्षणामध्ये, सत्यशोधनाच्या तळमळीमध्ये आणि त्यांच्या अभंगातून व्यक्त होणा—या नैतिकतेमध्ये विश्वात्मक जाणिवेचा धागा सातत्याने जाणवत राहतो, हे महत्त्वाचे आहे.

सर्वसामान्य साहित्यिकांच्या जाणिवेपेक्षा व संवेदनशीलतेपेक्षा अधिक उंच पृष्ठस्तरावर तुकोबांची जाणीव, संवेदनशीलता व काव्यवृत्ती असल्याचे आढळते. पूर्वापार परंपरेने व्यक्त न केलेल्या आशय—अभिव्यक्तीच्या असंख्य कक्षांना तुकोबांनी सहजपणे स्पर्श केला, हे पाहताना आपल्याला आश्चर्य वाटते. म्हणूनच त्यांच्या विलक्षण प्रतिभेबाबत व अस्तित्वभानाच्या चौथ्या मितीबाबत रा. भालचंद्र नेमाडे म्हणतात, *''बहुतेक पशुपक्ष्यांचे आकलन द्विमितीत असते परंतु मानवाने स्वतःची उत्क्रांती करत त्रिमितीतून विश्वाचे आकलन प्राप्त केले. यापुढील उत्क्रांतीत चौथी मिती विकसित होते. म्हणजे वर्तमान—भूत—भविष्याच्या पलीकडचे, उत्पत्तीलयाच्या वरचे काही वास्तव असते ते सापडते, तुकारामांसारखा युगातून निर्माण झालेला एखादा महामानव या चौथ्या मिचीची जाणीव विकसित झाल्याचे सिध्द करतो. त्यांच्या कवितांमध्ये या चौथ्या मितीची प्रत्यक्ष अनुभूती व्यक्त होते.''*[4] तुकोबांची हीच चौथी मिती त्यांच्या कवितेला सामाजिकतेवरून थेट विश्वात्मक पातळीवर घेऊन जाते.

**संदर्भ व टीपा :**


1) चित्रे दि. पु., *'पुन्हा तुकाराम'*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु. आ. 1995, पृ. क्र. 29

2) बेंद्रे वा. सी., *'तुकाराम महाराज यांचे संतसांगाती'*, मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. 1958, पृ. क्र. 3

3) तुकोबांच्या अभंगवाणीचा अभंगरचनेच्या परिघात ध्वनिपरिणामाच्या दृष्टीने विचार करता येऊ शकतो. तुकोबांची कविता ही कानांनी ऐकायचीही कविता आहे हे लक्षात येते. कुठल्याही कवीला आपले म्हणणे ठसवायचे असते, भावनेच्या तीव्रतेवर तिचे प्रस्तूतीकरण अवलंबून असते. तुकोबांची भक्त म्हणून आर्तता व संत म्हणून उध्दाराची तळमळ यादृष्टीने त्यांच्या कवितेतली आवृत्ती महत्वाची ठरते. (दिलीप धोंडगे यांनी तुकोबांच्या अभंगांचा नादमाधुर्य व शैलीशास्त्रीय दृष्टीने विस्तृत विचार केला आहे. पहा. धोंडगे दिलीप — *'शैलीमीमांसा'*, शब्दलय प्रकाशन, श्रीरामपूर.')

4) नेमाडे भालचंद्र (संपा.), *तुकाराम गाथा (निवडक अभंग)*, साहित्य आकादमी, नवी दिल्ली, प्र. आ. 2000, पृ. क्र. 12 (प्रस्तावना)

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्रसंतांच्या विचारातील परिवर्तनवाद

डॉ. आर. आर. दिपटे,
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर

**सारांष :**

महाराष्ट्रातील संत व परंपरा, प्राचीन काळ, पारतंत्र काळ, शिक्षण अभाव, अनिष्ट चालीरीती, जात धर्म प्रभाव, समान संधीचा अभाव, श्रेष्ठ–कनिष्ठ भाव, विषमता, तुकडोजी प्रचार–प्रसार, गाव–शहर भेद, स्वयंरोजगार, मानवतेचा पुरस्कार, आधुनिक विचारमूल्यांची कास, अन्यायाविरुद्ध बंड, व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी आग्रह, स्वयंरोजगार, स्त्री कल्याणाचा आग्रह, समतावादी समाज निर्मितीसाठी आग्रह, अमुलाग्र परिवर्तनासाठी लढा, सत्तेचे विकेंद्रीकरणासाठी आग्रह, स्वदेशी वापर, प्रचार, गावगाड्याचे महत्त्व, एकजुटता महंती, भ्रामक कल्पना, विरोध.

**बीजशब्द :** नवसमाज, ग्रामविकास, शिक्षण.

महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी असली तरी सोबतच या महाराष्ट्राला वैचारिकतेचा मोठा वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळात असलेली समकालीन परिस्थिती अत्यंत विषम व अत्यंत बिकट होती. शिक्षणाच्या अभावामुळे तत्कालीन समाज अंधारात खितपत पडलेला होता. जातीय वर्चस्व, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा अशा गर्तेत समाज सापडलेला होता. वैचारिक मंथन केवळ समाजातल्या मूठभर लोकांपर्यंतच मर्यादित होते. सर्वसामान्य बहुजन, दलित, आदिवासी, कष्टकरी समाजापुढे शिक्षणाच्या अभावामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. एका बाजूने मोगलशाही, इंग्रजी, भांडवलशाही व्यवस्था तर दुस–या बाजूने स्वकीयांकडून झालेला छळ अशा व्यवस्थेत देशातील सर्वसामान्य माणूस फसलेला होता. अष्या समाजाला दिशा दाखविण्याचे काम महाराष्ट्रातील संतांनी केल्याचे दिसून येते.

हा समाज सुधारावा, यांच्यातील अंधःकार दूर रहावा, हा सर्वसामान्य माणूस विचारप्रवण व्हावा. जीवनाच्या सर्व क्षेत्रात तो अग्रेसर असावा, अन्यायाविरुद्ध, अनिष्ट प्रथेविरुद्ध तो पेटून उठावा, यासाठी महाराष्ट्रातील संतांनी आपल्यापरीने हा वैचारिक वारसा सर्वसामान्य माणसांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील एकंदरीत संत परंपराचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात येते की ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, संत चोखामेळा, सेनान्हावी, तुकडोजी, गाडगेबाबा या सर्वांनी नवसमाज निर्मितीसाठी वेगवेगळया माध्यमाद्वारे लोकांमध्ये नवजागृती, नवपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

या संताच्या मालिकेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा उल्लेख येथे करणे महत्त्वाचे ठरते. राष्ट्रसंताचे हे कार्य मानवतेच्या कल्याणासाठी असून त्यांची दृष्टी व केलेले कार्य हे व्यापक असले तरी काही मूलभूत कार्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. ''समाजातील श्रेष्ठ कनिष्ठता ही त्यांच्या आचार, धर्मावर व गुणधर्मावर अवलंबून आहे. ती जन्मावर अवलंबून नाही.''[1] भारतीय जनमानसात हिंदू समाजात पशुतुल्य बनविणारी चिव्वट व दृष्ट रूढी जर कोणती असेल तर ती जातीयता होय. भारतीय जनमानसात विषमतेवर आधारलेली ही समाजव्यवस्था विकासाच्या दृष्टीने खिळखिळी झालेली आहे. जात–धर्म यामुळे माणसाच्या विकासाच्या सर्व वाटा बंद केलेल्या या व्यवस्थेने समाजात विषमता निर्माण केली. त्यामुळे देष, समाज, गाव यांचे कसे नुकसान होत आहे. हे तुकडोजींनी विविध माध्यमातून पटविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

''तू नीच, मी उच्च'' म्हणोन। म्हणोन वाढविले अवडंबर पूर्ण
त्यानेच जाहले पतन। वर्गाचे आणि गावाचे''

जातीविषयक आपले स्पष्ट विचार मांडून राष्ट्रसंतांनी हया व्यवस्थेवर कडाडून हल्ला चढविला आहे. माणसाचे श्रेष्ठत्व हे जन्मावरून नव्हे तर त्यांच्या कामाच्या पद्धतीवरून ठरविले जावे. हयासाठी ते सतत आग्रही असत.

समाजाची मानसिकता ही पिढ्यानपिढ्यांच्या संकटामुळे चमत्काराची झालेली होती. लोकांमध्ये भोंदूगिरी, खोटे आष्वासन, अंधश्रद्धा यांच्या आहारी गेलेल्या समाजाला त्यांनी खडेबोल सुनावले. ''नका भुलू हो चमत्कारा, जगी ही या थापची सारी, भोंदू घे आपणा लुटती, दावूनी थोरवी भारी''[2] राष्ट्रसंताचे विचार अगदी पुरोगामी होते. समाजातील अंधश्रद्धा, भोंदूगिरी, हुंडा देण्या–घेण्याची प्रथा, विवाहातील चाली, कर्ज काढून धर्मकार्य करण्याची लोकांची प्रथा यावर टीका ते करतात. साधू हस्तकौशल्याचा वापर करून भोळया स्त्री–पुरुषांना फसवितात. आपल्या नादी लावतात व त्यांची फसवणूक करतात, असा चमत्कार करून दाखविण्याच्या मागे लागू नका. हयासाठी विविध दृष्टांत याचा वापर ते करतात.

केवळ दैवावर अवलंबून राहता कामा नये. माणसाने कर्तव्य करीत असताना आपल्या हक्काप्रती जागृत असले पाहिजे. ''सेवामय जीवन हाच खरा धर्म आणि सत्यमय सेवा हीच खरी भक्ती.''[3] असा संदेश ते देतात. खरा विश्वधर्म आधी गावात नांदावा; विश्वकल्याणाची कल्पना माणसांमध्ये रुजावी अशी खटपट करणारा मी माणूस आहे, असे सांगून ते स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करतात.

राष्ट्रसंताचा धर्म मानवतेचा आहे. सर्व प्राणिमात्रांचे कल्याण हे त्यांच उद्दिष्ट आहे. त्यांच्या आव्हानामध्ये तुम्हा–आम्हाला प्रेरित करण्याचे सामर्थ्य आहे. त्यांची ओढ विश्वात्मतेसाठी आहे. ''त्याची ग्रामगीता ही जशी कालसापेक्ष आहे. तशीच ती कालातीत आहे.''[4] एकविसाव्या शतकातील सर्व मानव जातीला नवचेतना व नवप्रेरणा देणारी आहे. राष्ट्रसंतांच मन हे समृद्ध असले तरी भाबडे नाही. ते विवेकाच अधिष्ठान कधीच सोडत नाही. म्हणून यांची प्रार्थना कार्य हे सर्वव्यापी, सर्वधर्मीय व सर्व कल्याणकारी असते. त्यांच्या संपूर्ण साहित्यात, व्यक्तिमत्त्वात कुठेही अंधश्रद्धा, रूढी, परंपरा ते नाकारतात. एक विज्ञाननिष्ठ समाज निर्माण व्हावा, यासाठी ते कास धरतात. कुठल्याही विशिष्ट जाती–धर्म यात त्यांनी आपले विचार अडकू दिले नाहीत.

ग्रामविकास व ग्रामआरोग्य हा मानवतेचा पाया आहे. गावाची संरक्षणाची मानवी एकता सक्षम असली पाहिजे. यासाठी त्यांनी श्रोत्याचे लक्ष वेधले.

गाव असो वा शहर। तेथील बिघले आचार–विचार
म्हणौनिच रोगराईने बेजार। जाहले सारे जनलोक

सर्व रोगराईचे मूळ आपल्या आहार–विहारात आहे. यामागे कोणतीही करणी किंवा कोप नाही. तो मांत्रिकाच्या उपचाराने दुरुस्तही होत नाही. यासाठी पहाटेची शुद्ध वातावरण आवश्यक असल्याने ते सांगतात. ग्रामोन्नतीसोबतच महिलोन्नती हा विषय त्यांच्या जिव्हाळयाचा व कळवळीचा विषय होता. सा–या समाजात आज पुरुषसत्ताक समाज अस्तित्वात आहे. त्यामुळे स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. स्त्रीयांवर होणारे अत्याचार, अपमानाचे प्रसंग, जाळण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. हे सारे स्त्रियांना अबला समजण्याच्या प्रवृत्तीतून होत असते. ज्या स्त्रियांची संख्या समाजात निम्मी आहे. त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीत शक्तीचे रूप म्हणून देवीचे पूजन केले जाते. देवी हे स्त्रीचे एक रूप आहे. मात्र तिला अबला का म्हणावे असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला. स्त्रीयांना आपल्या हक्काचे भान व्हावे. त्या आत्मनिर्भर असाव्यात हयासाठी त्यांनी महिला मंडळाची स्थापना केली. महिलांना लघुउद्योगाद्वारा स्वावलंबी बनविण्याचे कार्य यांनी केले. यासाठी गावागावात प्रचार केला. हया महिलांनी पुढे स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. पुढे विधवा, निराधार, महिलांना आधार दिला. समाजात कुप्रथांना बळी पडण्यात स्त्रियांची संख्या मोठी असते. त्यामुळे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष स्त्रिया या व्यवस्थेचा बळी ठरतात. हे शोषण थांबविणे व त्यांना समाजात पद व प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम तुकडोजींनी केले आहे.

गावातील माणसांच्या रोजगाराची मोठी चिंता तुकडोजींना लागलेली होती. ही खेडी आत्मनिर्भर व्हावीत. त्यांची रोजगाराची साधने गावातच निर्माण झाली पाहिजेत. यासाठी ते आग्रही असत. ''ज्या कला कुसरीला बाहेरील जगात पेठ असेल

अशा कलांचा खेड्यातून विकास व्हावा. खेडी जेव्हा पूर्णतः विकसित होतील. तेव्हा अशा कलाकारांची वाव राहणार नाही. आदर्श भारतीय खेड्यात स्वच्छतेची पूर्ण आणि सुलभ व्यवस्था राहील.''[5] गावातील कुटीर उद्योगांना चालना मिळविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. यासाठी सर्वांनी झटावे असे आवाहन ते करतात.

उत्तम बुद्धी कौशल्य ज्ञान। शक्ती सामर्थ्य इकडे योजून।
गावी वाढवावे स्वालंबन। आळस झाडून सर्वांचा।

गावातील माणसाचे उपजत कला कौशल्य ओळखून ते विकसित करावे. कारण कलेने माणसाची ओळख होते. गावातील कलावंताचा आदर केला पाहिजे. स्वदेशी वस्तूंचे वापर हा यावर उत्तम उपाय असल्याचे ते सांगतात.

भारतीय समाज, व्यवस्थेच्या चौकटीत अडकलेला आहे. त्याला या अंधारपाशातून मुक्त करण्याचा विडा महाराजांनी उचलला होता. नवसाच्या नावाने बळी प्रथा जोपासल्या जात होती. ही प्रथा बंद करण्यासाठी महाराजांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. ''जातिव्यवस्थेच्या साखळदंडांनी भारतीय समाजाच्या प्रगतीला बांधले होते. हे साखळदंड तोडून मुक्त प्रगतीला वाव देण्यासाठी तुकडोजींनी वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेवर हल्ला चढविला. माणूस जन्माने शूद्र नसतो तर तो कर्माने होतो. शूद्र म्हणून विशिष्ट जातीच्या लोकांना मंदिर प्रवेश दिला जात नव्हता. तेव्हा तुकडोजींनी मंदिरे कुणाची खाजगी मालमत्ता नाही व देव कुणाचा गुलाम नाही असे म्हणत मंदिरे सर्वांसाठी खुली करण्याचा पुरस्कार केला, समतावादी समाजच स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतो.[6] म्हणून त्यांनी मंदिर सर्वांसाठी खुले करण्यासाठी आंदोलन केले. देशाचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी समृद्ध समाजाची उभारणी झाली पाहिजे. असा त्यांचा आग्रह होता. शेवटच्या घटकापर्यंत विकासाची सरकारी योजना पोहोचली तरच देशाचा, समाजाचा, सामूहिक विकासाचा पाया मजबूत होईल. देशाची भरभराट ही सर्वांच्या कल्याणातून, विकासातून शक्य आहे. देशातील उत्पन्नाची साधने, संपत्तीचे योग्य वाटप झाले पाहिजे. तरच देश सुखी होईल, त्यातून भयमुक्त समाज निर्माण होईल. नवनवीन समाज हा शिक्षण, चिंतन, स्वयंरोजगार, समान संधी, शोषण विरहित व्यवस्था, भ्रष्टाचार मुक्त समाज निर्माण झाल्यास देशात, जगात, कल्याणकारी समाज निर्माण होईल यावर त्यांचा विश्वास होता.

**समारोप :**

तुकडोजी महाराजांच्या हृदयाला हे समाजचित्र पाहून वेदना होत होत्या. डोळयात अश्रू उभे राहात होते. गुरुदेव सेवा मंडळाच्या स्थापनेनंतर त्यांचे हे अर्थ कार्य अधिक जोरकसपणे लोकांपर्यंत पोहोचले. यासाठी भजने, क्रांतिकारी गीते, ग्रामस्वच्छता, लोकजागरण यासारख्या विविध माध्यमांचा वापर त्यांनी केला आहे. देश, समाज, माणूस हा त्यांचा चिंतनाचा विषय होता. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. त्यांचे चिंतन लोकशाही मार्गाने होते. संतसंगती, दारूबंदी, जागरुकता, राष्ट्रजागृती, भ्रष्टाचार विरोधात जनजागरण, भ्रामक कल्पनांना विरोध अशा त्यांच्या कार्याची मोठी यादी असून त्यांचे विचार, प्रेरणा आजही समाजाच्या विकासासाठी अनमोल आहेत.

**निष्कर्ष :**

- ❖ महाराष्ट्राला ज्याप्रमाणे वैचारिक वारसा लाभलेला आहे त्याप्रमाणे संताचेही कार्य तेवढेच महत्त्वाचे आहे.
- ❖ त्यांचा प्रयत्न व नवसमाज निर्मितीसाठी व मानवतेच्या कल्याणासाठी होता.
- ❖ महाराजांची विचाराची दृष्टी सर्वव्यापी असून ग्राम, उद्योग, महिला, निसर्ग, स्वच्छता असे विविध विषय यांच्या लेखनात येतात.
- ❖ विकासशील समाज निर्माण करणे, नवसमाज निर्माण करणे, विचारप्रवण समाज निर्माण करणे हा त्यांचा उद्देश होता.

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

संदर्भ :

1) घोडे राम, 'समर्थ रामदास : संत तुकडोजी तौलनिक दर्शन', राजीव प्रकाशन, लक्ष्मीनगर, नागपुर–22, प्र. आ. 11 ऑक्टोबर 1988, पृ. 121.

2) काळे अक्षयकुमार, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय' प्रकाशन, वीसा बुक्स, नागपूर, प्र. आ. 15 ऑगस्ट 2008, पृ. 101.

3) तत्रैव, पृ. 3.

4) पठाण यु. म., 'संत साहित्य व नवचिंतन', दिलिपराज प्रकाशन, 251, शनिवार पेठ, पुणे–411030, प्र. आ. 15 जून 2011, पृ. 314.

5) राणा अशोक, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन व कार्य', जिजाई प्रकाशन, पुणे, 11 एप्रिल 2008, पृ. 22.

6) सोलापुरे राजशेखर, 'ग्रामोद्धाराचे प्रणेते राष्ट्रसंत तुकडोजी', विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्र. आ. 26 जून 2010, पृ. 30.

7) कडवे खुशाल, 'मानवतेचे पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी', अमोल प्रकाशन, नागपूर, 27 ऑक्टोबर 2010, पृ. 328.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# संत साहित्य आणि परिवर्तन

डॉ. श्रीकांत डी. पानघाटे
विदर्भ कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स,
जिवती, जी. चंद्रपूर- 42908 ( महाराष्ट्र)

**सारांश:**
वारकरी पंथाच्या सोप्या आचारसंहितेमुळे महाराष्ट्रातील सामान्य वर्ग या पंथाकडे विशेष आकर्षित झाला. म्हणूनच हा पंथ महाराष्ट्रात सुदूर प्रसारित व लोकप्रिय झाला होता. वारकरी पंथाची शिकवण ही विठ्ठल भक्तीचा मार्ग अनुसरणे, वर्णाश्रम विरोध करणे, जातीची उच्चता- निम्नता न मानणे, अहिंसा, परस्त्रीला माते समान मानणे अशी मानवी विकासाचा मार्ग प्रशस्त करणारी होती. वारकरी पंथातील संतांची कामगिरी ही महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारी ठरली. वारकरी संतांनी मानवी कल्याण साधण्यासाठी तत्कालीन धर्मवादी आणि जातीवादी व्यवस्थेमुळे महाराष्ट्रीयन जनमानसावर जे औदासिन्य पसरले होते ते, दूर सारण्याचे महनीय कार्य संतांनी केले होते ही वारकरी संतांची मोठी कामगिरी होती. मुख्यता वारकरी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांनी मराठी मायबोलीची प्रतिष्ठा वाढवून दिली. मराठी भाषा, साहित्य, संस्कृती याविषयी महाराष्ट्रीय लोकांत त्यांनी आत्मीयता निर्माण केली. कुळगोथ, जातपात, धर्म-पंथ, गावगाडा, स्त्री-शूद्र याच्या कक्षा ओलांडून जाणाऱ्या प्रादेशिक एकात्मतेची जाणीव मराठीजणात निर्माण करून दिली. यामुळेच 'महाराष्ट्र मंडळ', 'महाराष्ट्र धर्म' आणि 'महाराष्ट्र राज्य' अशा संकल्पना उदयास आल्या. म्हणून परकीय शासकांच्या अंमलाखाली सुद्धा महाराष्ट्राला आपले वेगळेपण टिकवून ठेवता आले. याचे श्रेय संतांना आणि त्यांच्या साहित्याला द्यावे लागते. महाराष्ट्रात मध्यकाळात लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण करण्यात संत साहित्याचे मोठे योगदान आहे. म्हणून संत साहित्य आणि परिवर्तन याचा चिकित्सक आढावा घेणे अगत्याचे ठरते.

किवड्र्स - वारकरी, संत, पंथ, अभंग, भारुडे, ओवी

प्रस्तावना:

साहित्य हे समाज परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. प्रत्येक साहित्यकृती समकालीन समाजाचे प्रतिनिधित्व करत असते. महाराष्ट्रीय मध्यकालीन इतिहासाचा विचार करता, वारकरी संत साहित्याचा विचार अग्रक्रमाने करावा लागतो. जवळपास चारशे वर्षाचा वर्षाचा दीर्घ कालखंड उलटून गेल्यावरही मराठी माणसांच्या तोंडून अभंग, ओवी आणि भारुडे ऐकायला मिळतात. यावरून संत साहित्याने मराठी मनावर आणि माणसावर सोडलेली अमिट छाप आपल्या लक्षात येते. संत साहित्याचा विचार करताना वारकरी संत साहित्याचा विचार अगत्याने आणि प्रकर्षाने करावा लागतो. संत साहित्याचा मागोवा घेताना असे दिसून येते की संतांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून लोकांना एक देव, एक राष्ट्र आणि एक भाषा अशी ओळख ओळख आणि नवी उमेद दिली. वारकरी पंथाला अनेक संतांची परंपरा लाभली असली तरी संत साहित्याचा विचार करता आपण संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांचा मुख्यत्वे विचार करणार आहो. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून तर 17 व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत वारकरी संतांची प्रकाशमान परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली

होती. या संतांनी महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागातून आणि विविध जातीतून समोर येऊन वारकरी पंथाचे प्रचंड जनआंदोलन उभारले होते. भागवत धर्माची पताका पंढरपूरच्या भूमीत श्री विठ्ठलाच्या चरणी फडकवली होती. या दृष्टीने त्यांचे कार्य आणि  त्यांचे साहित्य यांचा मागोवा घेणे आवश्यक बाब ठरते. संत साहित्याचा अभ्यास करत असताना संत साहित्याच्या अभिव्यक्तीचा आणि त्यातील अर्थाचा उलगडा करत असताना अभ्यासकांनी मांडलेल्या मतांमध्ये एक वाक्यता दिसून येत नाही. अनेक अभ्यासकांनी संत साहित्यावर लिखाण करत असता वेगवेगळ्या पैलूंवर विचार मांडत असताना वेगवेगळी अर्थ लावले असे दिसून येते. या सर्व बाबी विचारात घेता संत साहित्य आणि परिवर्तन याचा वेध पुढीप्रमाणे घेण्याचा प्रयत्न करता येईल.

संशोधन पद्धती-

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला गेला. संत साहित्य आणि परिवर्तन हा विषय घेत असताना संबंधित मूळ साधनांचा आणि दुय्यम साधनाचा अभ्यास केला गेला. अशाप्रकारे विविध पुरावे व त्याच्या आधारे माहिती गोळा करून प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन केल्या गेले.

निरीक्षणे-

संत साहित्याचा अभ्यास करत असताना आणि त्यातही वारकरी संत डोळयासमोर ठेवून आणि त्यांच्या साहित्याचा विचार करून आपण काही निरीक्षणे केली तर आपल्याला निष्कर्ष नेमकेपणानं काढता येतील. यादृष्टीने प्रथमता संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या साहित्याचा परिचय करून घेऊ. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला.  "ज्ञानदेवे रचिला पाया, उभारिले देवालया" असा उल्लेख सतराव्या शतकातील संत तुकारामांच्या  स्त्री शिष्य संत बहिणाबाई शिऊरकरांनी आपल्या या अभंगात केलेला आहे. संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तात्विक अधिष्ठान मिळवून दिले. यादृष्टीने त्यांच्या साहित्याचे अवलोकन करणे महत्त्वपूर्ण ठरते. तळागाळातील लोकांना भक्तिमार्गाने अध्यात्मिक उन्नती संभव आहे असा विश्वास सामान्य माणसात संत ज्ञानेश्वरांनी निर्माण केला. प्रपंचावर प्रेम करणाऱ्या सामान्य माणसांनी स्वकर्मरत ज्ञानोत्तर भक्ती सांगून ' मऱ्हाटीयेच्या नगरी ब्रह्मविद्येचा सुकाकू'  करण्यासाठीच त्यांनी ज्ञानेश्वरी सांगितली. त्यांनी विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती करून उभ्या महाराष्ट्राला नवसंजीवनी देण्याचे कार्य केले. त्यांनी ज्ञानेश्वरी, चांगदेवपासष्टी, अभंगाची गाथा, अमृतानुभव या ग्रंथाची निर्मिती केली. वारकरी पंथामध्ये या ग्रंथांना विशेष स्थान आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पायाभरणी चे मोठे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले. ज्ञानेश्वरी ही वारकरी पंथाची गीताच समजली जाते. ज्ञानेश्वराने वारकरी पंथाला तात्त्विक अधिष्ठान देऊन विठ्ठल भक्ती सोबत ज्ञानाची जोड दिली. ज्ज्ञानेश्वरांनी लोकांना अध्यात्माची, मोक्षाची, ज्ञानाची, परमार्थ प्राप्तीची दालने खोलून दिल्यामुळे महाराष्ट्रीय समाज वारकरी पंथाशी जोडू लागला. वारकरी पंथातील अनेक संतांच्या साहित्यनिर्मिती वर ज्ञानेश्वरांच्या साहित्य रचनेचा प्रभाव दिसून येतो. पंढरपूर वारकरी पंथांचे पीठ बनविण्यास महत्वपूर्ण भूमिका त्यांनी बजावली. एकंदरीत संत ज्ञानेश्वरांनी व्रतवैकल्य आणि कर्मकांडात अडकून बसलेल्या लोकांना आणि परमार्थाला पारख्या झालेल्या जनतेला नामसंकीर्तनावर व मनाच्या उदात्त वृत्ती वर आधारलेला मानव धर्म निर्माण करून दिला. यादृष्टीने त्यांच्या साहित्याचे मोठे स्थान आहे. असे म्हणता येते.

वारकरी संत आणि साहित्य याचा विचार करत असताना आणखी एक महत्त्वपूर्ण संत आपल्या डोळयासमोर येते ते म्हणजे संत नामदेव होय. वारकरी संप्रदायाचे खरे प्रणेते हे संत नामदेव होते, असे काही अभ्यासक मानतात. या अर्थाने जर आपण विचार केला तर संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक ठरतात. वारकरी संप्रदाय महाराष्ट्रा बाहेर नेऊन त्याचा प्रसार करण्याचे कार्य त्यांनी केले. उत्तर भारतात पंजाब पर्यंत जाऊन भागवत

धर्माचा त्यांनी प्रचार आणि प्रसार केला. त्यांनी महाराष्ट्राबाहेरही भागवत धर्माला अनुयायी मिळवून दिले. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर आणि इतर संत मंडळींनी तीर्थयात्रेसाठी जो दौरा काढला होता, या तीर्थयात्रेचे नेतृत्व संत नामदेव यांच्याकडे होते. यावरून स्पष्ट होते की वारकरी संप्रदायाला उत्तर भारतातही मोलाचे स्थान मिळवून देण्यात संत नामदेवाचा सिंहाचा वाटा आहे. एक कीर्तनकार म्हणून त्यांचे स्थान ढळ आहे. नामदेवांचे अडीच हजार अभंग आहेत. नामदेवांनी शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली होती आणि त्यांनी जवळपास 94 कोटी लक्ष अभंगाची रचना केली, असे महिपती बुवांनी 'भक्तलीलामृत' या ग्रंथात नमूद केले आहे. नामदेवांनी अभंग रचना आणि कीर्तनाच्या माध्यमातून भक्तिमार्ग आणि ज्ञान मार्ग सर्व जातीतील लोकांना मोकळा करून दिला. त्यांच्या काही रचना शिखांचा धर्मग्रंथ 'गुरुग्रंथसाहेब' मध्ये ही समाविष्ट आहे. वारकरी संप्रदायाचे आद्य कीर्तनकार आणि महत्वपूर्ण साहित्यिक या दृष्टिकोनातून त्यांची कामगिरी अत्यंत महत्त्वपूर्ण होती. 'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी' असे म्हणत त्यांनी आपल्या अभंग आणि कीर्तनाच्या माध्यमातून तत्कालीन महाराष्ट्रीय समाजामध्ये परिवर्तनाला गती मिळवून दिली.

भागवत धर्माचे थोर भाष्यकार आणि संवर्धक म्हणून संत एकनाथाना महाराष्ट्राच्या इतिहासात ओळखले जाते. सोळाव्या शतकात त्यांनी महाराष्ट्राचे उत्थान घडवून आणले. वारकरी पंथाच्या प्रचाराची आणि प्रसाराची बहुमोल कामगिरी त्यांनी केली  वारकरी पंथाच्या इतिहासात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांना वारकरी पंथाचे चार आधारस्तंभ समजले जाते. ज्ञानेश्वरांच्या अपूर्ण राहिलेल्या साहित्यिक कार्याला खऱ्या अर्थाने पूर्णत्वास नेण्याचा प्रयास एकनाथांनी केलेला आपणास दिसून येते. संपूर्ण वारकरी संतांच्या साहित्याचा विचार केला तर संत एकनाथांनी विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती केली होती असे आपणास दिसून येते. संत एकनाथांनी चतुश्लोकी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण इत्यादी प्रकारचे साहित्य लिहिले. हस्तामलक टीका, शुष्काष्टिका, आत्मबोध, चिरंजीवपद, आनंदलहरी, अनुभवानंद, मुद्राविलास, लघुगीता अशी लहान-सहान प्रकरणे लिहली. त्यांनी चार हजार पर्यंत अभंग लिहिले. संत एकनाथांचे भाषिक आणि वाडमयीन कर्तुत्व फार मोठे आहे  ज्ञानेश्वरीच्या संशोधन-संपादनाचे पाठ शुद्ध प्रत तयार करून त्यांनी नवा आदर्श घालून दिला. पदे, गवळणी, आणि भारुडे यासारख्या विविध स्वरूपात त्यांनी विपुल लिखाण केले. संत एकनाथ कालीन महाराष्ट्र समाज हा सामाजिक आणि धार्मिक दृष्ट्या पतनाचा काळ होता. समाजात आणि धर्मात अनागोंदी माजली होती. वारकरी संप्रदायात एक पोकळी निर्माण झाली होती. अशा स्थितीत त्यांनी धर्मावर आलेली अवकळा दूर साधण्याचे कार्य केले. संसारात राहून परमार्थ कसा साध्य करायचा? याचा आदर्श त्यांनी जगाला घालून दाखविला. या अर्थाने संत एकनाथांनी महाराष्ट्रातील समाज, धर्म, संस्कृती या क्षेत्रात परिवर्तनाला चालना मिळवून देण्याची मोठी आणि महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली असे आपण म्हणू शकतो.

वारकरी पंथाच्या समग्र इतिहासाचे चिकित्सक अवलोकन केले तर असे आढळून येते की महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्राला कलाटणी देण्याचे कार्य संत तुकारामांच्या अभंगानी केले. संत तुकारामांचा काळ हा वारकरी पंथाच्या चळवळीच्या विकासाचा शिखर होता. संत तुकारामांनी वारकरी पंथाचे लोन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचविले. नर्मदे पासून तर तुंगभद्रेपर्यंत सर्व प्रदेशात विठ्ठल भक्तीचा प्रसार करण्यात त्यांनी झुंजार भूमिका बजावली. तत्कालीन समाजातील कर्मकांड, भेदाभेद, वर्णव्यवस्था बुवाबाजी, अवडंबर याविरुद्ध त्यांनी

त्यांच्याकीर्तनातून आणि अभंगातून प्रतिकार केला. वारकरी पंथात संत तुकारामांचे विचार म्हणजे स्वतंत्र तत्त्वज्ञान ठरते. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ या तीनही संतांचे गुण संत तुकाराम मध्ये एकवटलेले आपणास आढळते. वारकरी संत परंपरेत संत श्रेष्ठ म्हणून तुकारामांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. संत तुकारामांनी निष्काम कर्म आणि निष्काम भक्ती यांच्यात योग्य समन्वय साधून त्याची शिकवण लोकांना देण्याचा महत्त्व प्रयत्न केला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांनी जे कार्य केले त्याचा अधिकाधिक विस्तार करून करून वारकरी संप्रदायाला महाराष्ट्रात, मराठी माणसाच्या मनात दृढ स्थान मिळवून दिले. संत संत तुकारामांचे अभंग आजही मराठी लोकांच्या ओठातून प्रस्पुटित होताना दिसतात. संत तुकारामांचे अभंग एक स्वतंत्र तत्त्वज्ञान उभे करते जे समाजाला दिशादर्शक आणि मार्गदर्शक म्हणून कार्य करते वारकरी संतांच्या साहित्यात तर संत तुकारामांच्या अभंगाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. आजही सर्वसामान्य मराठी जनतेला त्यांच्या अभंगाची ओढ आहे. तुकारामांच्या अभंगगाथे ची तमहती सांगताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की "याच्चयावत सर्व मराठी पुस्तके व ग्रंथ उद्या कोणी अरबी समुद्रात बुडवून टाकले किंवा जाळून टाकले तरी मला दुःख होणार नाही, फक्त दोन अपवाद वगळून एक तुकारामांची अभंग गाथा आणि दुसरी ज्ञानेश्वरी बस" या बाबासाहेबांच्या उपरोक्त कथनावरून असे लक्षात येते की तुकारामांचे अभंग हे परिवर्तनाला दिशा देणारे होते. संत तुकारामांच्या अभंगात त्यांनी समाजाचे निरीक्षण आणि परीक्षण केले. त्यांच्या अभंगात अस्सल अनुभव आहे, आत्मभान आहे. समाज परिवर्तनाचे उदात्त ध्येय त्यांच्या अभंगात दृष्टीस पडते. संत तुकाराम यांनी सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून जी अभंगरचना केली तिला कदापि विसरता येत नाही. आज वारकरी संप्रदायाविषयी मराठी लोकांमध्ये खोलवर रुजलेला जो श्रद्धा भाव दिसतो तो निर्माण करण्यामध्ये संत तुकारामांचे मोठे योगदान आहे. तत्कालीन स्थिरत्व प्राप्त झालेल्या समाजात परिवर्तनाच्या गतीला चालना देण्याचे कार्य संत तुकारामांनी केले आहे. बहिणाबाई सीऊरकरांनी वारकरी पंथातील महत्वपूर्ण संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांचे महत्त्व आणि कार्य स्पष्ट करणारा अभंग रचला आहे. तो असा

संत कृपा झाली इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया
नामा तयाचा किंकर तेने केला हा विस्तार
जनार्धन एकनाथ स्तंभ दिला भागवत
तुका झालासे कळस भजन करा सावकाश
बहिणी म्हणे फडकती ध्वज निरुपणा केले पूजा

वरील अभंग हा मुख्यत्वे वरील संतांची महती अधोरेखित करतो. वारकरी पंथाच्या समग्र इतिहासाचे चिकित्सक अवलोकन केले तर असे आढळून येते की, महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्राला कलाटणी देण्याचे कार्य संत तुकारामांच्या अभंगानी केले. संत तुकारामांचा काळ हा वारकरी पंथाच्या चळवळीच्या विकासाचा शिखर होता. संत तुकारामांनी वारकरी पंथाचे लोण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचविले. नर्मदे पासून तर तुंगभद्रेपर्यंत सर्व प्रदेशात विठ्ठल भक्तीचा प्रसार करण्यात त्यांनी झुंजार भूमिका बजावली. तत्कालीन समाजातील कर्मकांड, भेदाभेद, वर्णव्यवस्था बुवाबाजी, अवडंबर याविरुद्ध त्यांनी त्यांच्या कीर्तनातून आणि अभंगातून प्रतिकार केला. वारकरी पंथात संत तुकारामांचे विचार म्हणजे स्वतंत्र तत्त्वज्ञान ठरते. संत नामदेव,

संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ या तीनही संतांचे गुण संत तुकाराम मध्ये एकवटलेले आपणास आढळते. वारकरी संत परंपरेत संत श्रेष्ठ म्हणून तुकारामांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. संत तुकारामांनी निष्काम कर्म आणि निष्काम भक्ती यांच्यात योग्य समन्वय साधून त्याची शिकवण लोकांना देण्याचा महत्त्व प्रयत्न केला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांनी जे कार्य केले त्याचा अधिकाधिक विस्तार करून करून वारकरी संप्रदायाला महाराष्ट्रात, मराठी माणसाच्या मनात दृढ स्थान मिळवून दिले.

संत साहित्य आणि परिवर्तनाची क्षेत्रे:

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जडणघडणीत वारकरी संतांनी केलेल्या कार्याचे आणि साहित्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संत साहित्य आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक अशा सर्व क्षेत्रांत परिवर्तन घडून आले. म्हणून महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात झालेल्या परिणामांचे आणि परिवर्तनाचे विवेचन करून पुढीलप्रमाणे काही निष्कर्ष मांडता येईल.

सामाजिक परिवर्तन

१) जातीभेद व अस्पृश्यता कमी होण्यास मदत झाली.
२) बंधूभाव आणि समता महाराष्ट्रात निर्माण होण्यास मदत झाली.
(३) पुरोहितशाहीच्या मक्तेदारीस पायबंद बसला.
४) वारकरी पंथाने स्त्री-पुरुष यांना समान संधी देऊन स्त्री-पुरुष समानतेवर भर दिला. वारकरी पंथाने स्त्री शूद्रातील जडत्व नाहिसे करून त्यांच्या जीवनात एक कार्यप्रवर्तक निष्ठा उत्पन्न केली.
(५) बहुजन समाजात विचार परिवर्तन घडून आले.
६) मोडकळीस आलेल्या महाराष्ट्रीय ग्रामव्यवस्थेला स्थिरता मिळवून दिले. तिला गतिशिलता दिली.
७) हिंदूचे महाराष्ट्रात होणारे पतन रोखले.

राजकीय परिवर्तन:

संत चळवळीच्या कार्यामुळे महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्त्वाखाली राजकीय शक्ती म्हणून मराठ्यांचा उदय झाला. न्या. रानडे यांनी 'Rise of Maratha Power' या ग्रंथात सतराव्या शतकात मराठा राज्याची स्थापना छत्रपती शिवाजीनी केली त्यामागे संत चळवळीचे कार्य महत्त्वाचे आहे, असे ते नमूद करतात.

धार्मिक परिवर्तन:

१) हिन्दू धर्मात सुधारणा घडून आली.
(२) हिन्दू-मुस्लीम वैर कमी झाले.
(३) धार्मिक तत्त्वज्ञान लोकाभिमूक केले.
४) वारकरी संप्रदायात सर्व धर्मिय लोकांना प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. यामुळे अनेक मुस्लीमही वारकरी चळवळीत सामील झाले.
५) हिन्दूचे इस्लाम धर्म स्विकारणे कमी झाले व बहूजन समाजाला धार्मिक नवजगृती चे औषध पाजले.

आर्थिक परिवर्तन:

१) लोकांचा धर्मविधि आणि विविध कर्मकांडावरील खर्च कमी झाला.
२) महाराष्ट्रीय जनतेने कर्मवादाचा सिद्धान्त स्विकारला यामुळे येथील सामान्य जनतेने व्यवसायास प्राधान्य दिले.

सांस्कृतिक परिवर्तन

१) मराठी या लोकभाषेचा विकास घडून आला.

२) वाङमयनिर्मितीचा विकास झपाट्याने होत गेला. वारकरी पंथातील अनेक संतान अभंग, ओवी, भारूडे, गौळणी, हरिपाठ, स्फुट पदे, ग्रंथ लिहून वाडमयविकासात बहुमोल योगदान दिले. यामुळे उभ्या महाराष्ट्रात मराठी वाडमयविकासाचा वेग वाढला.

निष्कर्ष:

एकूणच वारकरी संप्रदायाच्या चळवळीने महाराष्ट्रीयन सर्वांगीण जनजीवन ढवळून निघाले. धर्म, अर्थ, समाज, संस्कृती या क्षेत्रामध्ये विकासात्मक परिवर्तनाच्या युगाचा प्रारंभ वारकरी संत चळवळीच्या कार्यातून झाला. या दृष्टीने वारकरी संत व साहित्याला पुरोगामी महाराष्ट्र निर्मितीच्या इतिहासात महत्त्वपूर्ण आहे, असे म्हणता येते.

संदर्भ-

1) एकनाथ महाराजांच्या अभंगाची गाथा, मुंबई, 1903

2) संत तुकारामांच्या अभंगाची गाथा, (म. शासन सं. प्र.) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 1998

3) संत ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरी ( संपा. काका जोशी), श्री दासबोध कार्यालय, मसूर, जी. सातारा, द्वितीया आवृत्ती, 1985

4) संत नामदेव, श्री. नामदेव गाथा (संपा. महाराष्ट्र शासन) संचालक, शासकीय मुद्रन व लेखन सामग्री, मुंबई-४, 1970

5) संत बहिणाबाई, बहिणा बाईची अभंगगाथा, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, 1956

6) सकल संत गाथा ( संपा. ढेरे रा. ची.), वरदा प्रकाशन, पुणे, 1983

7) कोलते वी. भी. मराठी संतांचे सामाजिक कार्य (अनु. दत्तात्रय कोलते) मलकापूर, 1984

8) गोसावी र. रा., पाच भक्ती संप्रदाय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती, 1998

9) ताहराबादकर महिपती, भक्तालीलामृत, इंदुप्रकाश, मुंबई, 1908

10) तुळपोले श. गो., पाच संतकवी, व्हिनस प्रकाशन, पुणे, 1962

11) पाटील शंकर विठोबा, वारकरी पंथाचा इतिहास चैतन्य प्रकाशन, दुधळगाव, 19904

12) पानसे, मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, प्रथम आवृत्ती, 1993

13) पठाण, यु. म., मध्ययुगीन संत साहित्य- काही आयाम, औरंगाबाद, 2002

14) बेंद्रे, बा. सी., संत तुकाराम, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ही, 1963

15) सरदार, ग. बा.., संत वांडमयायची सामाजिक फलश्रुती, पाचवी आवृत्ती, मुंबई, 2004

16) सुंठनकर, ब. र., महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य, मुंबई, तृतीय आवृत्ती, 2008

# कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या विचारातील प्रबोधन क्षमता

**डॉ.श्रीकृष्ण वामन पदमणे**
(सहायक प्राध्यापक),मराठी विभाग
एम.ई.एस.कला व वाणिज्य
महाविद्यालय, मेहकर, जि.बुलढाणा ४४३३०१,

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीला मिळालेले गाडगेबाबांचे योगदान खूप मोठे आहे. संपूर्ण आयुष्यभर त्यांनी आपल्या कीर्तनातून समाजप्रबोधन केले. परिवर्तनवादी विचार जनसामान्यांपर्यंत उक्ती व कृतीतून पोहोचविले. वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर हे विचार आजही महत्त्वाचे ठरतात. जागतिक महासत्तेकडे वाटचाल करू पाहणाऱ्या या देशातील मानवी जीवनात अंतर्बाह्य बदल होत आहेत. एकीकडे विज्ञान – तंत्रज्ञानाचे नवनवीन प्रयोग सिद्ध करीत असताना दुसरीकडे चंगळवाद, सुखलोलुपप्रवृत्ती, माणसातील तुटलेपण, खुरटेपणा वाढत चालला आहे. नीतीमूल्यांचा ऱ्हास, अहंभाव, फसवेगिरी, पराकोटीचा स्वार्थीपणा, दंगली, दहशत यांची शिरजोरी, कौटुंबिक, वैवाहिक स्तरावर ढासळलेली जीवनमूल्ये यामुळे भयभीत झालेला अगतिक समाज असे अराजकतेचे चित्र आहे. भौतिक सुबत्तेमुळे मनुष्य सुखावला, परंतु त्यांच्या जीवनातून मानसिक शांती व आध्यात्मिक समाधान लोप पावत आहे. त्यामुळे आजही संतांच्या जीवनमूल्यरुपी प्रबोधनाची आवश्यकता निर्माण झाली. संत ज्ञानेश्वरांपासून तर आचार्य विनोबापर्यंत अनेक संतांनी आपल्या शिकवणीतून समाजाला कल्याणाचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. अनुभूतीच्या समाजविद्यापीठात जीवन संशोधन करून अखिल मानवजातीचा उद्धार करणारे गाडगेबाबा कालातीत प्रबोधनकार ठरले. निरक्षर असूनही विज्ञानवादी दृष्टी लाभलेला, पशुपक्षी, प्राणी, रंजले दृगांजले, दुःखी, पिडीत, दलित, महारोगी, कष्टी लोकांचा आश्रयदाता असलेला, समाज जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणारा एक महात्मा म्हणून गाडगेबाबांच्या विचारातील प्रबोधन क्षमतेचा नव्याने विचार करणे, सांप्रत काळात महत्त्वाचे ठरते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१. संत गाडगेबाबा यांचे परिवर्तनवादी विचारांचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीला मिळालेले गाडगेबाबांचे योगदान काय? याची मांडणी करणे.
३. गाडगेबाबांच्या विचारातील प्रबोधन क्षमता समजून घेणे.
४. वर्तमानकाळातही गाडगेबाबांचे विचार जनमानसामध्ये परिवर्तन घडवून आणू शकतात, दिशादर्शक ठरतात, याची पुन्हा नव्याने मांडणी करणे

**बीजशब्द –**

कर्मयोगी गाडगेबाबा यांचे सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक कार्यकर्तुत्व व प्रबोधनातून आलेले परिवर्तनवादी विचार.

**संशोधन पद्धती**

१. ऐतिहासिक संशोधनपद्धती
२. वर्णनात्मक संशोधन पद्धती

**निरीक्षण**

**गाडगेबाबांचे जीवनचरित्र**

गाडगेबाबांचे मूळ नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील 'शेणगाव' या गावी इ.स. २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. वडिलांचा दारूच्या व्यसनापायी मृत्यू झाल्यावर त्यांची आई सखुबाई सोबत ते आपल्या मामाकडे दापोरे या गावी येऊन राहतात. पुढे कुंताबाई बरोबर त्याचे लग्न होते. डेबूजींना आलोका, कलावती, मुदगल, गोविंद ही चार मुले झाली. परंतु समाजाचे वाईट अनुभव आल्यावर त्यांनी १ फेब्रुवारी १९०५ ला साधारणतः रात्रीच्या तीन वाजताच्या सुमारास मायामोहाचा कोणताही पाशात न अडकता गृहत्याग केला. गृहत्याग केला तो सुखाचे दिवस वाट्यला आल्यावर, उत्तम शेतकरी, कर्तबगार पुरुष म्हणून प्रतिष्ठा लाभल्यावर हे विशेष. समाजजीवनाला भरडणारे अन्याय, अत्याचार नि दुर्व्यसन – दुराचार नष्ट करण्यासाठी, जनकल्याणासाठी त्यांनी गृहत्याग केला. शेवटपर्यंत गाडगेबाबा समाजासाठी कार्य करीत फिरतच राहिले. शेवटी २० डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे देहावसान झाले झाले.

**गाडगेबाबांची जीवनशैली**

संत गाडगेबाबा एका गावातून दुसऱ्या गावात जाऊन दिवसभर गाव स्वच्छ करीत व संध्याकाळी कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील घाण स्वच्छ करीत. चिंध्या झालेले कपडे, एका हातात काठी, फुटके गाडगे आणि हातात जगाची स्वच्छता करणारा खराटा असे. संध्याकाळी दोन चिपाड

घेऊन ते कीर्तन करीत. एका गावात दोन दिवसाच्यावर ते राहत नसत. जे काही चटणी –भाकर मिळेल ते खाऊन समाजसेवा करत. प्र. के. अत्रे त्यांना 'खाराट्यचे बादशहा म्हणत .

**गाडगेबाबांचे सामाजिक कार्य**

**१. दारूबंदी, पशुहत्याबंदी व अंधश्रद्धा निर्मूलन**

समाजमन स्वच्छ करणाऱ्या या महापुरुषाने समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता, कर्मकांड दूर करून समाजाची घडी नीट करण्याचा प्रयत्न केला. दारूमुळे कित्येक लोकांचे संसार उध्वस्त झाले होते. त्यांचा बाप झिंगराजी दारूच्या व्यसनापायी उध्वस्त होताना त्यांनी आपल्या कोवळ्या वयात पहिला. व्यसनमुक्तती संदर्भात कीर्तनात आलेल्या महिलांना बाबा सांगत, ''बायांनो हो, नवरा तीर्थाला जाईल. जाऊ द्या. नवऱ्याचा देव डोंगरात असीन पण तुमचा देवाऱ्यात आहे. आपल्या नवऱ्याची सेवा करा. दररोज त्याच्या पाया पडा. नवऱ्याच्या गळ्यात फुलांचा हार घाला. नवऱ्यापुढे उदबत्ती लावा, परंतु तोच नवरा साला दारू पिऊन आला आणि घरात ओकला. मग उदबत्त्या त्याच्या कोणत्या बाजूने लावल्या. गरम चुलीतील राख टोपल्यात भरा अन् त्याच्या तोंडात टाकून द्या, घे तुझी महापूजा''[१] समाजात बारशे, लग्नासारख्या विधीत दारूसह मटणाच्या जेवणाची प्रथा होती. गाडगेबाबांनी आपल्या मुलीच्या बारशाला मटणाऐवजी जिलेबीचे जेवण देऊन अहिंसेचा आदर्श निर्माण केला. शेवटच्या कीर्तनात बाबा म्हणतात, ''बकऱ्याले पोटच्या मुलासारखं वागवता बापा, अन् त्याने मसाला लावून कापून खाता, मानसं नाही तुम्ही. यायले रानडुकरं म्हटले म्हटलं तरी चालेल. गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला गोपाला।।

गाडगेबाबांनी महाराष्ट्रातील ६७ गावांमधून बळी प्रथा कायमची बंद केली. लोकांचे उद्धवस्त होणारे संसार सावरण्याचे काम केले. देवधर्माच्या नावावर निर्माण झालेल्या अघोरी प्रकारांना बाबांनी कीर्तनातून व सहकार्याच्या मदतीने बंद करण्याचा प्रयत्न केला. दैववाद, अंगात येणे, बुवाबाजी याविरुद्ध प्रबोधनाची मशाल पेटवली हे बाबांचे उल्लेखनीय कार्य आहे.

**गाडगेबाबांचे सदावर्त**

समाजातील महारोगी, आंधळे, पंगू, भिकारी, निराधार लोकांसाठी सदावर्ताची निर्मिती केली. लाकरी शिस्तीने बाबा पंगती बसवून जेवू घालायचे. हे त्यांचे मानवतावादी काम होते. रजल्यागांजल्याची सेवा करणे हेच त्यांचे जीवित कार्य होते. पंढरपूर, अकोला, नाशिक, अमरावती इत्यादी ठिकाणी त्यांचा सदावर्त दिसतात.

**गाडगेबाबांचे व्यवहारचातुर्यसंबंधी विचार**

निर्व्यसनी राहून काटकसर करा, प्रपंच सुधारा असे बाबा सांगतात.. ''संसारात काटकसर करायला शिका. मारवाडी, ब्राम्हण, गुजराथी, भाटे हे संसारात काटकसर करतात. म्हणून रोज तुपातला शिरा खातात. त्यांच्या घरी जमाखर्च आहे. काय आहे जमाखर्च ! उत्पन्न किती याची लाईन माहित आहे त्यांना आणि आमच्या मराठ्यले तेल्या, माळ्या, धोब्याला जमाखर्च समजत नाही."[३]

**गाडगेबाबांच्या गोशाळा व गोरक्षणाची कल्पना –**

गाडगे बाबांनी प्राणीमात्रांवर प्रेम केले. गायीबैल हे समाजोपयोगी प्राणी आहेल .ते म्हातारे झाले म्हणजे शेतकरी ते कसायाला विकत असत. गाया बैलांचा सांभाळ करण्यासाठी गोरक्षण संस्था काढली. गाडगेबाबा शेतावर मजूरी करुन धान्याची पेढी मिळाली तर ती उपाशी, थकलेल्या जनावरास खावू घालत बैल विकण्यासंदर्भात बाबा म्हणतात, ''ज्याने जन्मभर सेवा केली, आपल्याला अन्न दिलं, तो फक्त आता काम करू शकत नाही म्हणून त्याला विकायचं? माझा म्हातारा झाला आहे, त्याला बाजारात उभं करायला काय हरकत आहे?''[४] असे सर्वसामान्य लोकांना कीर्तनातून गाडगेबाबा सोप्या भाषेत समजावून सांगत.

**गाडगेबाबा यांचे शैक्षणिक कार्य**

अज्ञानी समाजाचा शिक्षणाशिवाय उद्धार नाही, हे जाणून त्यांनी शिक्षणावर भर दिला. शिक्षणविषयक तळमळ त्यांच्या विचारातून प्रकट होते. शिक्षण हे दारिद्र्याचे कारण आहे. शिक्षणाने काय घडू शकते, या संदर्भात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण देतात... ''आपली माणसं गरीब का राहिली? तर त्यांच्यापाशी विद्या नाही. ज्याला विद्या नसेल त्याला खटाऱ्याचे बैल म्हटलं तरी चालेल. आता तरी सुधरा. आता तरी मुलांना शिक्षण द्या!'' ''. विद्या हे मोठं धन आहे. डॉक्टर आंबेडकर साहेबांच्या पिढ्यनपिढ्यंनी झाडू मारायचं काम केलं. त्यांच्या वडिलांनी सुबुद्धी सुचली आणि आंबेडकर साहेबांना शाळेत घातलं. आंबेडकर साहेबांनी काही लहान–सहान कमाई नाही केली. हिंदुस्थानची घटना केली घटना. अन् ते शाळेत जाते ना अन् शिकते ना, तर झाडू मरायचं त्यांच्या कर्मात होतं. म्हणून म्हणतो, ''मुलांना शिक्षण द्या.''[५] असे उदाहरण देऊन गाडगेबाबा समाजाला उपदेश करतात. कीर्तनाच्या माध्यमातून घराघरात शिक्षणविषयक जागृती करण्याचे काम ते करत असत. कर्मवीर भाऊराव पाटलांना बाबांनी मदत केली. रयत शिक्षण संस्थेचे अनुदान बंद केल्यानंतर ते परत मिळवून देण्यासाठी बाबांनी प्रयत्न केले. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याशीही त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. ही मोलाची शैक्षणिक कामगिरी गाडगेबाबांनी केली.

**गाडगेबाबांची दशसूत्री**

गाडगे बाबांनी आपल्या कीर्तनातून मांडलेल्या विचारांची दशसूत्री मानवाच्या व देशाच्या उद्धारासाठी प्रबोधनाचे सामर्थ्य असलेली मानवी संहिताच आहे. हा दशकलमी संदेश म्हणजे त्यांच्या कीर्तनाचा गाभाच होय. ''भुकेल्यांना : अन्न , तहानलेल्यांना : पाणी, उघड्या – नागड्यांना : वस्त्र बेघरांना : घर, अंध, अपंग, रोग्यांना : औषध, बेकारांना : रोजगार, मुक्या पक्षी प्राण्यांना : अभय, गरीब तरुण–तरुणीचे लग्न, दु:खी व निराशांना : हिम्मत, गरीब मुलामुलींना : शिक्षण हाच आमचा रोकडा धर्म आहे! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे''[६]

गाडगेबाबांच्या कार्याचे मूल्यमापन करताना आचार्य प्र. के. अत्रे म्हणतात,"मार्क्स हा माणूस आहे की, माकड आहे, हेदेखील गाडगेबाबांना ठाऊक नाही. पण गेली पन्नास वर्षे आपल्या जीवनातून आणि कीर्तनातून गाडगे महाराज हे शुद्ध मार्क्सवादाची अज्ञ जनतेला शिकवणूक देत आहेत. गाडगेबाबा हे महाराष्ट्रातले समाजवादाचे एक प्रचंड व्यासपीठ आहे.''[७] प्रेम, दया, कारुण्याचा एकात्मभाव असलेल्या व समाज, देश, आणि मानवेचा उद्धार करणारी दशपदी सर्वांनी आत्मसात केली तर माणुसकीचे दर्शन घडविणारा आदर्श समाज निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

**निष्कर्ष**

१. वर्तमानकाळात गाडगेबाबांचे विचार व कार्य समाजाला विज्ञानाभिमुख बनविणारे तर आहेतच पण नवी दृष्टी देणारे सुद्धा आहेत.
२. गाडगेबाबा मानवजातीचा उद्धार करणारे कालातीत प्रबोधनकार ठरतात.
३. गाडगेबाबांचे कार्य माणूसकेंद्री होते.
४. गाडगेबाबांचे जीवनकार्य हे परिवर्तनवादी असल्यामुळे मानवाच्या उद्धारासाठी प्रेरक, उद्‌बोधक असे आहे.
५. कर्मयोगी गाडगेबाबांचे विचार, शिकवणूक आत्मसात केल्यास माणुसकीचे दर्शन घडविणारा समाज निर्माण होऊ शकतो. ही गाडगेबाबांच्या विचाराची प्रबोधन क्षमता असल्याचे सिद्ध होते.

**संदर्भ**

१. वसंत पोतदार, 'गाडगेबाबा', अक्षर प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती १९९८, पृ. क्र.१०४
२. वसंत पोतदार, 'गाडगेबाबा', तत्रैव, पृ. क्र. १०२
३. उद्धव रसाळे, 'मानवतेचे पुजारी संत गाडगेबाबा', विद्याभारती प्रकाशन, लातूर, द्वितीय आवृत्ती १९९३, पृ. क्र.१६९
४. वसंत पोतदार, 'गाडगेबाबा',उनि, पृ. क्र. ५३
५. वसंत पोतदार, 'गाडगेबाबा', तत्रैव, पृ. क्र. ४७
६. उद्धव रसाळे, 'मानवतेचे पुजारी संत गाडगेबाबा', उनि, पृ. क्र.१९२
७. प्र. के. अत्रे, 'मराठी माणसे मराठी मने', परचुरे प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पंधरावी, पृ. क्र.५८

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# संत तुकाराम : एक सामाजिक परिवर्तनवादी संत

नवाजी गेंदलाल घरत
सहायक प्राध्यापक
एम. बी. पटेल महाविद्यालय, साकोली जि. भंडारा
E-Mail – nawajigharat@gmail.com

महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रातील विविध संप्रदायातील संतानी मराठी साहित्यात मोलाची भर घातली. त्यांचे वाङ्मयीन कार्यकर्तृत्व लक्षणीय आहे. त्यांनी अध्यात्माबरोबरच सामाजिक आषयाचेही लेखन केले आहे. म्हणूनच 'संतसाहित्य' हा मराठी भाषेचा आणि साहित्याचा अत्यंत मूल्यवान वारसा आहे असे म्हटले जाते. ''मध्ययुगीन साहित्याच्या आरंभ काळात वारकरी आणि महानुभाव या दोन पंथानी मराठी वाङ्मयाला समृद्ध केले. संतकवींनी मराठीला काव्य दृष्ट्या समृद्ध केले तर महानुभावांनी काव्याबरोबरच मराठी गद्यषैलीचा विकास घडवून आणला. महाराष्ट्राच्या सामाजिक मानसिकतेत 'समता' या मूल्याची प्रतिस्थापना करण्याचे प्रयत्न संताच्या काव्यधारेतून आणि कार्यातून झालेले आहेत. वारकरी पंथाच्या संतसाहित्याने खऱ्या अर्थाने मराठी सारस्वताची बाग फुलविली. अठरा पगड जातीतून संत निर्माण झाले.

संतानी समाजातील कुप्रवृत्तींचा विरोध केला त्याचप्रमाणे सामाजिक व्यवस्थेचा आदर करून काही संतानी समाजात असलेल्या जातीभेदासारख्या कुप्रथेलाही स्वीकारले. ईष्वरभक्ती करीत अस्पृष्यतेचा जाच सहन केला. अध्यात्म आणि सामाजिक वास्तव या दोहोंच्या संघर्षातून संताचे साहित्य निर्माण झाले आहे. भक्तीरसासह समाजाला आरसा दाखविण्याचे कार्यही संतानी मोठ्या तळमळीने केल्याचे संत साहित्यातून प्रकर्षाने जाणवते. समाजाला कलंकीत करणाऱ्या जातीभेदाला छेद देण्याचे कार्य संतांनी केलेले दिसते. विषेषतः अर्वाचीन काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांनी समाजातील अंधश्रद्धेवर टीका करून श्रम प्रतिष्ठेला अधिक महत्व दिल्याचे दिसते. ''संतांना लोकाद्धाराची अत्यंत तळमळ असल्यामुळे त्यांनी लोकजीवनाच्या सर्व स्तरांचे बारकाईने निरीक्षण केले होते. संताची दृष्टीप्राधान्याने पारमार्थिक असली, तरी लोकांची आधिभौतिक दुःखेही त्यांनी सहानुभूतीने न्याहाळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच आपले अनुभव आणि आपले विचार हे समाजाच्या सर्वस्तरांपर्यंत पोचावेत असा संतांचा आग्रह होता'' तुकारामांच्या स्वानुभाव अनुभवामुळे त्यांनी जे पाहिले, अनुभवले व भोगले त्यांचाच परिणाम म्हणजे त्यांची अभंगवाणी होती. 'बुडते हेजन न देखवे डोळा, म्हणोनी कळवळा येतसे' अठरा पगड जातीजमातींच्या वाट्याला आलेले हाल अपेष्टा, निंदा, अत्याचार व त्यात नडलेला पिचलेला बहुजन समाज त्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याची गाथा म्हणजे चतुका रामांचे अभंग होय.

वैदिक धर्म परंपरे प्रमाणे चार धर्माचे महत्व प्रतिपादित केलेले आहे. मंदिरात देव नाही तर पुजाऱ्यांचे पोट आहे. दानपेटी जर हटवली तर मग कषालाच काही महत्व राहणार नाही. कारण तीर्थक्षेत्री गेल्याने पुण्य लाभते अषी बहुजनांची मनोधारणा आहे. त्यासाठी ते कर्ज काढतात. व चारही धर्माची यात्रा करतात. कबीरदासजी म्हणतात, 'तनको धोया, मनको काहे ना धोया', उपरसे टापटिप अंदरसे रामजाने' अषी समाजाची अधोगती तुकारामांच्या काळात सर्वत्र प्रस्थापित झालेली होती. वैदिकांचा ईष्वर सोवळ्यात ओवळ्यात अडकलेला होता, बहुजनाचा नाही. ''वैदिक मंत्राचा उच्चार करतांना उदात्तस्मरण अनुदात्त झाला. म्हणजे चवरच्या पट्टीऐवजी खलच्या पट्टीत उच्चार केला तरी इष्ट फळ मिळण्याऐवजी संकट कोसळते. मंत्र उच्चारतांना थोडीषी चूक झाली तरी षहाणा माणूसही वेडा ठरतो. असा वैदिक परंपरेचा नियम आहे. याउलट आपल्या विठ्ठलाचे नाव उलटे घेतले, तोंड न धुता घेतले तरी तो प्रसन्न होतो असे तुकारामांनी म्हटले आहे. तुकाराम कालीन समाजव्यवस्था वैदिक कर्मकांडांच्या विळख्यात सापडलेली होती. देवधर्माच्या नावाखाली सर्वसामान्य, भोळीभाबडी जनता नाडली जात असतांनाच तुकारामांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवतार झाला. कर्मकांडाच्या दास्यातून बहुजनाबाहेर काढण्याचे मौलिक कार्य तुकारामांनी केले. अठरा पगड जाती जमातींचे आदराचे स्थान पंढरपूरचा विठ्ठल. ज्यांच्या दालनात, राज्यात, जात, धर्म, पंथ, सोवळे–ओवळे यांना फारसे महत्व देण्यात येत नाही. विठ्ठल हा मात्र सखा, आई–वडील असूनत याच्याषी सदगीतसेच भांडण, प्रेम करण्याचा आपला अधिकार आहे, असे तुकाराम म्हणतात.

संत साहित्याचा आणि चळवळीचा अभ्यास करतांना आजच्या काळातील समाजपरिवर्तनाच्या संकल्पनेच्या फुटपट्ट्या लावल्या तर संतांवर अन्याय केल्या सारखे होईल. संतांना सामाजिक पातळीवर समाज परिवर्तन करता आले नसेलही. मात्र भक्तीच्या पातळीवर अठरा पगड जातीतील खालच्या वर्गातील लोकांना एकत्र आणून त्यांचे दुःख, वेदना आणि प्रष्नभक्तीतून समाजासमोर मांडण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात घडले आहे. हे वास्तव नाकारता येत नाही. संत साहित्याचे तत्त्वज्ञान षोधण्याचा प्रयत्न केला तर तेथे कोठेही वैदिक धर्माचा पुरस्कार केल्याचे दिसून येत नाही. एक ज्ञानेष्वरीचा अपवाद वगळता ज्ञानेष्वरांच्या अभंगातूनही वैदिक धर्माचे पुरस्कार केल्याचे चित्रही दिसत नाही. नामदेव महाराजांच्या संदर्भात स्पष्टपणे वैदिक धर्माविरोधात उभे

असल्याचे चित्र दिसते. अठरा पगड जातीतून आणि खालच्या वर्गातून आलेल्या या संताकडून षोषित व्यवस्थेचे आणि षासनव्यवस्थेचे ही भरभक्कम अधिष्ठान लाभलेल्या धर्मसत्तेविद्ध विद्रोह पत्करणे साधी गोष्ट नव्हती. संत नामदेव, गोराकुंभार, सेनान्हावी, नरहरीसोनार, जनाबाई, चोखामेळा इ. संतांच्या अभंगाकडे एक कटाक्ष जरी टाकला तरी ही कोणत्याच पातळीवर तेथील समाजव्यवस्थेला ते षरण गेले असे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्याकडून जाती तोडण्यात कमी पडले असे म्हणून त्यांचे मूल्यमापण करू गेल्या सत्यांच्यावर अन्याय केल्यासारखेच ठरते.

संत ज्ञानेष्वरांपासून ते संत तुकारामांपर्यत एक बाब प्रकर्षाने दृष्टीपथा सापडते ती म्हणजे त्यांच्या काळातील व्यवस्थेला आपल्या अभंगातून हादरा देण्याचाच प्रयत्न केला. जातीव्यवस्था मोडण्याचे सामर्थ्य संतांमध्ये निर्माण झाले नसेलही, कदाचित तो त्यांचा प्रयत्नही नसेल परंतु भक्तीच्या पातळीवर संतांनी विजय मिळविला, हे लक्ष्यात घेतले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संतांच्या संदर्भात काही विधाने केली आहेत. ते म्हणतात, '' मानवी ब्राह्मण श्रेष्ठ की भक्त श्रेष्ठ असातो लढा होता. ब्राह्मण मानव श्रेष्ठ की षूद्रमानव श्रेष्ठ, हा प्रष्न सोडविण्याच्या वादात साधु संत पडले नाहीत. या बंडात साधुसंताचा जय झाला व भक्तीचे श्रेष्ठतव ब्राह्मणांना मान्य करावे लागले. तरी सुद्धा या बंडाचा चातुर्वर्ण्य विध्वंसाच्या दृष्टीने काहीच उपयोग झाला नाही'' ( बहिष्कृत भारत, 1 फेब्रुवारी 1929 ) हे विधान खरे आहे. यामुळे चातुर्वर्ण्याला धक्का बसला नाही हे खरे असले तरीही तत्कालीन समाजव्यवस्थेला संताच्या साहित्यातून व कार्यातून काहीच हादरा बसला नाही असे म्हणणे योग्य ठरणार नाही. कारण कोणतीच सामाजिक अथवा साहित्यिक चळवळ पाच–सहा षतके समाजावर अधिराज्य गाजवू षकत नाही.

प्रा. गं. बा. सरदार तुकारामांच्या लोकप्रियतेची मीमांसा करतांना म्हणतात, ''तुकारामांच्या अनुभवात उथळपणा व एकांगीपणा नाही. ते सकस व संपन्न आहेत. स्वतःच्या षुद्ध अंतःकरणाची खात्री असल्यामुळे त्यांना कळीकाळाचेही वाटले नाही. समाज कंटकावर हत्यार उपसतांना ते डगमगले नाहीत. त्यांच्या काव्य षैलीत उत्कटता आणि आवेष आहे. त्वेष आणि तिखटपणा आहे. दुर्जनांना दहषत बसेल असे सामर्थ्य आणि प्रतिकार क्षमता सज्जनांनी प्राप्त करून घेतल्याखेरीज जगात सत्याचा व सद्‌गुणाचा जय होणार नाही अषी त्यांची धारणा होती. सौजन्य आणि सामर्थ्य यांचा संयोग घडवून आणण्याची त्यांच्या अंतःकरणातील जी ही आत्यांतिक तळमळ, तिच्यातच त्यांच्या लोकप्रियतेचे बीज आहे. त्याच बरोबर प्रापंचिकांना योग्य सल्ला द्यायला तुकाराम महाराज विसरत नाहीत. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' असे ते सांगतात. तत्कालीन ढोंगी लोकांवर अंगी योग्यता नसतांना पांडित्य करणाऱ्या पंडित लोकांवर जळजळीत टीका त्यांनी केली आहे. एका तऱ्हेने 'भूतांचे पालन कंटकांचे निर्दालन' हाच तुकोबांचा धर्म आहे. या समाजात परद्रव्य व परनारी यांची अभिलाषा धरून ढोंगी साधू वावरत होते. या लोकांचा उपहास त्यांनी केला. गारगोटी आणि हिरा यातला फरक रत्नपारखी ओळखतो. त्याप्रमाणे या ढोंगीसाधूंना संत तुकाराम ओळखतात. ज्याचे अंतःकरण अपवित्र असते त्यांना चांगला उपदेष रूचत नाही. पैषाची किंवा लोभाची इच्छा धरून भक्ती करणे अगर पूजा करणे हे अज्ञानाचे द्योतक आहे, ही अधोगतीच होय. तुकारामांचे हे समाज चिंतन किंवा समाज दर्षन आणि भ्रष्ट जीवनावरील टीका बघितल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सकसपणा व रोखठोकपणा आवडतो.

तुकारामांनी तथाकथित उच्च समजल्या जाणाऱ्या लोकांचा विरोध पत्करून समतेचा स्वीकार आणि पुरस्कार केलेला आहे. समाजातील जातींना मोल नसून माणसातील गुणांना मोल आहे. सर्वांचा सामाजिक अधिकार सारखा आहे. समाजात भेदभाव पाळणे हा भ्रम असून ती अमंगळ कल्पना आहे. तुकारामांनी जन्मसिद्ध उच्च–नीच भेदभावावर हल्ला चढवला असून रांत्रदिवस युद्धाचा प्रसंग स्विकारला आहे संत तुकोबांना त्या काळातच षब्दांचे महत्व कळले होते. षब्दांचा महिमा प्रथम त्यांनीच वर्णिला आहे आध्यात्मिक क्षेत्रातील समतेबरोबरच त्यांनी व्यावहारिक लोकजीवनातही सामाजिक समता प्रतिबिंबित व्हावी असा आग्रह धरून दोंन्ही क्षेत्रात समतेचा स्वीकार केला आहे. तुकारामांनी जातिप्रथेचा निषेध केला आहे. समाजातील विषिष्ट जातीला श्रेष्ठत्व व विषिष्ट जातीलाही नत्व देऊ नये, जातीवरून श्रेष्ठ कनिष्ठतेचा भेदभाव न पाहता या सर्वाभूती भगवद् भावठेवावाही त्यांची धारणा होती. तुकारामांना गुणाधिष्ठित समाज रचना हवी होती. व्यक्ती व्यक्तीतील गुणांना मोल दिल्यास परस्परांमध्ये प्रेम, जातीजातीतील मैत्री, सलोखा राहून अतुट नाती निर्माण होतात, समाजिक स्वास्थ्य अबाधित राहते हे त्यांनी ओळखले होते. सुधारणेचे स्वरूप दुहेरी असते. एक विध्वंसक–म्हणजे विद्यमान अनिष्ट प्रथांचे निमूर्लन आणि दुसरे विधायक म्हणजे समाजाच्या प्रगतीसाठी मानवीमूल्यांचे प्रस्थापन. सुधारणेचे कार्य जमिनीच्या मषागतीसारखे असते. जमीन पिकायोग्य करण्यासाठी नांगरणी करून तण, काटे, धसकट, दगड धोंडे दूर करावयाचे असतात. मग साफ, स्वच्छ झालेल्या जमिनीत सुविचारांचे बीज रूजवायचे असते. तुकारामांनी ही दोन्ही कार्य केली.

तुकोबांच्या कवितेत लोकोद्धाराची प्रेरणा अत्यंत प्रबळ आहे. लोकांना जीवन जगण्याचे सत्याधिष्ठित ज्ञान देणे आणि भक्ती महात्म्य लोकांच्या मनावर बिंबवून, लोकांना एकूणच विष्वाचे जीवन सुखमय करण्यासाठी प्रवृत्त करणे, हाच तुकोबांच्या प्रबोधनाचा मुख्य हेतू होता. केवळ लोकांना ज्ञान द्यायचे आणि आपणमात्र कोरडेपाषाण असायचे, अषी कृतीहीन प्रबोधनाची धुरा

तुकोबांनी कधीच आपल्या खांद्यावरून वाहिली नाही. आधी आपण स्वतः कृतीकरायची आणि आपल्या अनुभवाने सत्याच्या कसोटीवर उतरलेले ज्ञान लोकांना सांगायचे, हीच तुकोबांची प्रबोधनाकडे पाहाण्याची दष्टी होती. संतांची एक मोठीगत चारषे वर्षाची प्रबोधन परंपरा ही तुकोबांच्या समोर आदर्ष होती. संतांच्यागत चारषे वर्षाच्या प्रबोधनानेही पूर्णपणे समाज जागृत झालेला नाही, हे चित्र तुकोबांना दुःखदायक होते. पूर्वसूरींच्या प्रबोधनापेक्षा प्रबोधनाची निराळी पद्धती निवडली पाहिजे, असे तुकोबांना वाटले असावे. प्रबोधनाचे मुख्य माध्यम तर काव्य निर्मिती हेच होते. काव्यातून लोकोद्धारासाठी कीर्तन करण्याची जुनी परंपरा होती. ह्याच परंपरेत राहून परंतु प्रबोधनाच्या पद्धतीत बदल करूनच, लोकोद्धाराचे कार्यकरता येणे षक्य आहे, हे लक्ष्यात घेत तुकोबांनी आपल्या अनुभव सत्यांच्या प्रकटीकरणासाठी, लोकजाणिवेत रूढ झालेल्या भाषिक क्षमतांचा आधार घेतला. लोकांच्या जीवनात नियमित प्रत्ययाला येणाऱ्याबाबींनाच काव्यरूप देत, आपले लोकोद्धाराचे तत्वज्ञान लोकांच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न केला.

संत तुकोबांना त्या काळातच षब्दांचे महत्व कळले होते. षब्दांचा महिमा प्रथम त्यांनीच वर्णिला आहे. ते म्हणतात, आम्ही कवी आहोत. आमच्या घरी केवळ षब्दांचेच धन आहे. आम्हाला कोणत्याही लौकिकार्थाची गरजच नाही. षब्द हेच आमच्यासाठी अमूल्य अषी रत्ने आहेत. सजीव षब्दांच्या रत्नांसमोर नीर्जीव रत्नांना किंमत तरी काय? षब्द माणसांना सुख देतात. भक्तीची आवडी देतात. भक्तीरसात न्हावून काढतात. प्रसंगी हेच रत्नापेक्षाही मौलिक असलेले षब्द, आम्ही षस्त्रांसारखे वापरून, दुर्जनांचा आणि खळांचा निःपात करण्यासाठी ही उपयोग करतो. षब्द आमच्या हाती बाणांसारखे असतात. कळीकाळालाही दरारा निर्माण करण्याची ताकद आमच्या षब्दात असते. कळिकाळाचे षीर भेदण्याचीही षक्ती आमच्या षब्दात असते. षब्द हेच आमच्या जीवाचे जीवन आहे. षब्द हेच आमच्या कवितेचे द्रव्य आहे. आम्हा कवींसाठी षब्द हेच सर्वस्व आहे.

तुकोबांचा निकोप दृष्टीने विचार केला की तुकोबांच्या व्यक्तिमत्वाची उंची लक्ष्यात येते. तुकोबांचे कार्य हे समाज सुधारकाचे आणि धर्म सुधारकाचे होते. तुकोबा युगपुरूष होते. युगधर्म सांगण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी होते. तुकोबांचे जीवन हे समाजासाठी आणि समाजाच्या कल्याणासाठी होते. तुकोबांची धर्मसुधारणा हा समाजसुधारणेचाच एक अविभाज्य भाग होता. धर्माचे खरे स्वरूप तुकोबांनी जाणले होते. धर्म हा अनुभूतीचे अधिष्ठान असतो. धर्म हा कधीच विषमता मूलक नसतो, ही जाणीव तुकोबांना होती. तुकोबा धर्मज्ञानी होते. त्यांचे ज्ञान हे अनुभूतीतून निर्माण झालेले होते. तुकोबा धर्मज्ञानी होते, म्हणूनच धर्माचे ते खरे संरक्षकही होते. धर्माच्या नावाखाली जो धर्माचा बाजार सुरू होता, तो किती किळसवाणा आणि अधर्मचाराचा अवलंब करणारा होता, हे तुकोबांनी अनेक अभंगातून सांगितले आहे.

सत्य आणि असत्य यांच्यातील भेद सांगतांना तुकाराम सत्याचा सुखाषी तर असत्याचा पापाषी संबंध जोडतात. 'असत्य जेवाणी।तेथे पापाचीच खाणी। सत्य बोले मुखे।तेथ्ये उचंबळती सुखे।' असे ते सांगतात. पण सामान्य संसारी माणसांना हे असत्यच जवळचे वाटते, ते फायदेषीर आहे असे वाटते. 'लटिकेते रूचे।साचकोणाही न पचे' अषी खंत तुकाराम व्यक्त करतात. तरी तुकाराम सत्याचीच बाजू उचलून धरतात, लोकांना काय वाटेल याची पर्वा ते करत नाहीत. 'तुका म्हणे सत्य सांगे। योत रागे येतीते' असत्यांचा दृढनिष्चय आहे. 'तुका म्हणे बरास त्याचा सायास।नवनीतानाष नाही पुन्हा' अषी पुष्टी ते जोडतात. नवनीतहे दुधाचे सार आहेत से सत्य हेजी वनाचे सार आहे असे ते ठामपणे सांगतात. भक्तीच्या साम्राज्यात फक्त सत्याचाच व्यवहार असतो तेथे खोटेपणाला अजिबात थारा नाही. 'तुका म्हणे येथे खऱ्याचा विकरा । न सरती येरा खीट्यापरी' असे तुकाराम सांगतात. पण लोक व्यवहार याच्या उलट असतो. या लोकव्यवहाराचे निदान करतांना 'पापाचियामुळे । जाले सत्याचे वाटोळे' असे ते सांगतात. लोक पाप करतात आणि ते लपविण्यासाठी असत्याचा आधार घेतात. म्हणून या पापाचेमुळ काढून टाकल्याषिवाय या समाजात सत्य रूजणार नाही हे तुकारामांना जाणवते. सत्याबरोबर अहिंसे चाहीकैवार तुकाराम आपल्या कवितेत घेतात. पषूहत्या जषी हिंसा आहेत असे संताना त्रास देणे हेही हिंसा आहे. अहिंसेच्या नकारात्मक व्याख्येबरोबर तुकाराम तिचा सकारात्मक व्याख्याही करतात. अहिंसा आणि षांती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणून तुकाराम षांतीचा महिमाही आपल्या कवितेत जागोजागी करतात. सत्य अहिंसा आणि षांती ही ईष्वराची रूपे असल्यामूळे तुकारामांना ती जवळची वाटतात.

संत तुकारामांची कविता ही सर्वव्यापक व सर्वसमावेषक आहे. सतराव्या षतकातील धार्मिक अनाचाराचे वास्तववादी चित्रण करणारी तुकारामांची कविताही ऐतिहासिक दृष्ट्यामहत्वाची ठरते. आपल्या समाजाचे हे धार्मिक अधःपतन तुकारामांना सहन होत नाही म्हणून ते या अपप्रवृत्तीवर कडाडून हल्ला चढवतात. येथे तुकारामांच्याउपरोधाची धार प्रखर झालेली दिसते. तुकारामांच्या काळात या ढोंगी संतांचा सुळसुळाट झाला होता असे दिसते. 'गाजराची पुंगी तैसे नवेजाले जोगी' असे तुकाराम सांगतात. 'टिळाटोपी उंवदावी।जगी मी एक गोसावी' असे त्याचे उपरोधिक वर्णन तुकाराम करतात. कुत्र्याने भगवावेष घतला तरी कोणी फसत नाही, कोल्हाजटा वाढवून फिरला तरी ओळखू येतो असे तुकाराम सांगतात. हे ढोंगी संत कवड्या गळ्यात घालतात.

त्यांच्याहातात परडी, कपाळावर षेंदूर आणि हातात सटवीचे वाद्य असते. असे दारोदार हिंडत हे द्रव्य लोभीपूजेसाठी द्रव्य मागतात. या ढोंगी लोकांनी समाजात माजवलेल्या अनाचाराने तुकाराम अस्वस्थ झालेले दिसतात.

तुकारामांनी 'स्त्री जन्म' म्हणून स्त्रीचा उपहास केला नाही. मातेचे पावित्र्य मानून तुकारामांनी स्त्रीला प्राधान्य दिले. त्यामुळेच मुक्ताबाई व जनाबाईसारख्या साध्वी स्त्रिया संत दिसतात. तुकारामांनी आपले तत्त्वज्ञान लोकांना सांगितले, परंतु गुरूदक्षिणा घेण्याचा परिपाठ स्वीकारला नव्हता. त्यांना दीक्षा विधीची आवष्यकता भासली नाही.तसेच आपले तत्त्वज्ञान तुकारामांनी सर्वांनाच सांगितले. याविषयी वा. सी. बेंद्रे म्हणतात, (आपले तत्त्वज्ञान सांगताना) वय–लिंग–वर्णभेदाची मर्यादाही त्यांना मान्य नव्हती. त्यांचा अनिर्बंध मार्गदर्षनावर विष्वास होता.' तुकारामांनी स्त्रियांना आपल्या मायबहिणी मानण्याचा उपदेष केला. संत तुकारामांनी स्त्रीचा गौरव केला आहे. भगवान बुद्ध ज्याप्रमाणे प्रसेनजिताला उपदेष करतांना म्हणतात की, 'स्त्री देखील आपल्या आई वडीलांचा, सासू–सासऱ्यांचा सांभाळ करते. ती नीतीने वागून आपल्या कुळाचा उद्धार करते. कुळाची कीर्ती सर्व दिषांना पसरविते. म्हणून कन्यारत्न झाले, म्हणून उदास होण्याचे काहीच कारण नाही.' संत तुकाराम देखील तषाच प्रकारचा उपदेष करतात व आईची थोरवी वर्णन करतात. ते म्हणतात, ''बाळ आपल्या आईषी निष्ठूरपणे वागले तरी ती त्याच्यावर प्रेमच करते. परमेष्वरा, तू देखील आमची आई आहेस. आम्ही कसेही वागलो तरी तू क्षणभरही आम्हास विसरत नाहीस. अज्ञान बालके झाली तर ती त्यांना आपल्याकडेवर घेण्यासाठी पुढे होते. आपली भूक, तहान सहन करते, पणत्याचे समाधानकरते. बाळाला दुःख झाले तर त्याच्याकडे धावत जाते. ह्याच्यासाठी आपला जीव देण्यास तयार होते. तुकाराम स्त्रीला परमेष्वराची उपमा देऊन तिला आई, जननी म्हणून स्त्रीचे महत्व वाढविले आहे व स्त्रीसुद्धा उत्तम असते हे सिद्ध केले आहे.''

तुकोबांचे हे समाज चिंतन व समाज दर्षन आणि भ्रष्ट जीवनावरील टीका आपण पाहतो, तेव्हा त्यांचे कणखर व्यक्तिमत्व आपल्या डोळ्यांपुढे उभे राहते. तुकोबांनी केलेले हे समाजदर्षन सत्प्रवृत्तीपेक्षा दृष्टप्रवृत्तीचेच केलेले आहे. अषा दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांषी आयुष्यभर झगडत आल्याने त्यांच्या विचारसरणीत सकसपणा व वाणीत रोखठोकपणा आला. त्यामुळेच त्यांची वाणी इतकी मर्मग्राही व धारदार बनली की वाचकांच्या अंतःकरणाचा ठाव घेतल्याखेरीज राहात नाही. तुकारामांच्या या सामाजिक कार्याचे विवेचन प्रा. गं. बा. सरदार यांनी केले आहे. ते म्हणतात, ''त्यांनी (तुकोबांनी) आपल्या तिखट व मर्मभेदी षब्दांनी समाजातील अनिष्ट प्रवृत्तीवर निर्भिडपणे हत्यार उपसले. बहुजन समाजातील सामान्य व्यक्तीचे राग द्वेष आणि आषा–आकांक्षा त्यांनी आत्मीयतेने बोलून दाखविल्या. त्यामुळे महाराष्ट्रीय जनतेच्या अंतःकरणात त्यांना अढळ स्थानलाभले.''

**समारोप :**

संतांच्या साहित्यातून आजच्या घडीला अभिप्रेत असलेले सामाजिक परिवर्तन घडून आले नसेलही परंतु संतांचे ऐतिहासिक कार्यमात्र दृष्टिआड करूनही चालतनाही. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून विविध जाती, धर्म, पंथ यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा म्हणून संतसाहित्य चळवळीकडे पाहावे लागेल, कारण जी संताची मांदियाळी उदयास आली ती 'नाहिरे' वर्गातून आलेली आहे. ज्या जाती आणि वर्णाला येथील समाज व्यवस्थेने कधी आपले नाही, त्यास माजव्य वस्थेला आम्हीही मानव आहोत. आम्हालाही जगण्याचा अधिकार आहे अणि आम्हाला तो सन्मान प्राप्त व्हावा या उद्देषापोटी संतांची लेखनी झिजलेली आहे. ज्ञानेष्वर असो, नामदेव असो, चोखामेळा असो, जनाबाई असो, तुकाराम असो यांचा समाज व्यवस्थेने अनन्वित छळ केला. असे असतांनाही दुसऱ्यांचे वाईट घडो असे त्यांच्यामनात कधी आले नाही. याचे कारण म्हणजे बुद्ध, जैन, नाथ संप्रदाय आणि अवैदिक तत्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्यावर असल्याचे जाणवते. यामुळे संतसाहित्याचा आणि चळवळीचा अभ्यास करतांना तत्कालीन सामाजिक स्थितीची अवस्था लक्ष्यात येते. संत साहित्याचा सामाजिक परिवर्तनाच्या अंगाने झालेला बदल आजच्या दृष्टिकोनातून घेउ षकत नाही, तसे घेतल्यास संतांच्या साहित्यावर आणि चळवळीवर अन्याय केल्यासारखे होईल, यात षंका नाही.

**निष्कर्ष :**

1. तत्कालीन समाजात दांभिक साधूंचा सुळसुळाट होता. अषा ढोंगी व कामचलाऊ साधूंवर त्यांनी कठोर टीका केली आहे.
2. सामाजिक श्रद्धा अंधश्रद्धा, रूढी–परंपरा, षाष्वत, अषाष्वत या सर्वच घटकांवर संत तुकारामांनी प्रकाष टाकला आहे.
3. तुकारामांनी ईष्वरविषयक असणाऱ्या समज–गैसमजातून लोकांवर काढून त्यांनी काव्याच्या माध्यमातून मार्गदर्षन केले.
4. तुकारामांनी स्वंयप्रेरणेतून विठ्ठलमय जगनिर्माण करून खरा भागवतमळा कसा फुलविला व त्यातूनच परिपक्व समाज निर्मिती कषी केली याचे तात्विक विवेचन केले आहे.
5. संत तुकोबांना त्याकाळातच षब्दांचे महत्व कळले होते. षब्दांचा महिमा प्रथम त्यांनीच वर्णिला आहे.
6. संत तुकारामांनी तथा कथित उच्च समजल्या जाणाऱ्या लोकांचा विरोध पत्करून समतेचा स्वीकार आणि पुरस्कार केलेला आहे.

**संदर्भटीपा :**

1. ढेरे रा. चि. –संतसाहित्य आणि लोकसाहित्य, श्री विद्याप्रकाषन, पुणे. प्रथमावृत्ती, जुलै 1978, पृ. 15
2. साळंखे आ. ह. –विरोधी तुकाराम : समीक्षेची समीक्षा, सुगावा प्रकाषन, 562 सदाषिव पेठ, पुणे, जुलै. 2003
3. सरदार गं. बा. 'तुकाराम दर्षन' अर्थात अभंगवाणी प्रसिद्ध तुक्याची मॉडर्न बुक डेपो, प्रकाषन पुणे. 1968 पृ.22
4. जोषी डॉ. मधुकर रामदास–सिद्ध परंपरा आणि महाराष्ट्रातील संत, विजय प्रकाषन, नागपूर. प्रथमावृत्ती, 2002 पृ. 165
5. सानपडॉ. किषोर–समग्र तुकाराम दर्षन, विजय प्रकाषन, नागपूर. संत तुकाराम जन्म षताब्दी वर्ष, 2008
6. केजकर डॉ. प्रकाष देषपांडे– संत कविता एक दृष्टीकोन, स्वरूप प्रकाषन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती. सप्टेंबर, 2006
7. लभाने डॉ. महादेव विठूजी– संत तुकारामांवर बौद्धधर्माचा प्रभाव, सुगावा प्रकाषन,562,सदाषिवपेठ, पुणे. प्रथमावृत्ती. जून, 2000
8. माळीगजमल, पिंगे श्री. म. संपा. –तुकारामांचे निवडक 100 अभंग, व्हीनस प्रकाषन, पुणे. सातवी आवृत्ती, 2017

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्वातंत्र्य प्रेरक काव्य

**स्वप्नील राजेश इंगोले**

**सहायक प्राध्यापक,**

**मराठी विभाग**

**श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.**

## प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विदर्भ प्रांतातील प्रसिद्ध लोकप्रबोधनकार होते. त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली शहीदया गाव 1909 साली झाला. प्रारंभी बाल वयात विदेही अवस्थेमध्ये ईश्वर प्राप्तिच्या अभिलाषेने ते रानावनात परिभ्रमण करीत गेले. त्यानंतर त्यांना त्यांचे सद्गुरु आडकोजी महाराज सान्निध्य लाभले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यामते त्या योगानेच ते समाजाभिमुख होऊन प्रत्यक्ष जनतेमध्ये, लोकांमध्ये हे वावरू लागले. त्याच दरम्यान भारतीय स्वातंत्र्याचा लढा, स्वातंत्र्य संग्राम भरात होता. मातृभूमीची दैन्यावस्था संतवृत्तीच्या महामानवाला बघवत नव्हती. त्यांच्या अत्यंत प्रेरणादायी आणि प्रसंगावधान राखणाऱ्या लेखणीने आबाल वृद्धांना स्वातंत्र्याची प्रेरणा देण्याचा महत्कार्य केलं आहे. त्यांच्यामराठी हिंदी रचनांमध्ये स्वातंत्र्य प्राप्ती जिद्द आणि मिळालेल्या स्वराज्याचे सुराज्यकरण्याची योजना पंक्ती पंक्तीमध्ये पसरलेली दिसते. आओ किस में दर्द भरा है भारतकी बिमारीका। देता है गुरुदेव दवा उस मरीज को होशियारीका। असं म्हणत राष्ट्रसंतांनी देशाच्या आजाराला ओळखून त्या दृष्टीने पाऊल टाकण्याचा आवाहन प्रत्येक भारतीयाला केलेला आहे. राष्ट्रसंतांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीयांच्या राज्यव्यवहाराची त्यांच्या वर्तनाची चिकित्साही केली आहे.एवढेच नव्हे तर भारतीयांनी स्वीकारलेली लोकशाही शासनपद्धती कशी योग्य आहे आणि सर्वांसाठी कशी पूरक आहे हा विचार मांडण्यासाठी राष्ट्रसंतांनी, लोकशाहीचे पोवाडे, नामक पोवाडा संग्रह प्रसिद्ध केला आहे. राष्ट्रीय भजनावली ;मराठी आणि हिंदी, या दोन्ही संग्रहामध्ये राष्ट्रासाठी पेटून उठण्याची आणि प्रसंगी प्राणार्पण करण्याची प्रेरणा ठासून भरलेली आहे. स्वातंत्र्याची व्याख्या, क्रांती आणि परिवर्तनाची अभिलाषा राष्ट्रसंतांनी आपल्या काव्यामध्ये अभिव्यक्त केली आहे.

**राष्ट्रसंतांचे काव्य आणि स्वातंत्र्य प्रेरणाः**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित क्रांति विणा या भजनावलीमध्ये ५३ रचना आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळात स्वातंत्र्याची चळवळ, त्यातील संघर्ष आणि स्वतंत्र भारत या तीनही अवस्था राष्ट्रसंततुकडोजी महाराजत्याचे साक्षीदार राहिलेले आहेत. राष्ट्रसंततुकडोजी महाराजांना अपेक्षित क्रांतीचीची कल्पना या भजनसंग्रहाच्या माध्यमातून मांडलेली आहे. या संग्रहाच्या प्रस्तावनेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात "समाज ज्या कारणांनी अधःपतित झाला ती कारणे नष्ट करणे तसेच समाज व्यवस्था समाजाच्या उत्कर्षास व सुखशांतीस पोषक न होता बाधक झाली असल्यास तीत परिवर्तन करणे आणि ज्या गोष्टी समाजाच्या सर्वांगीण विकासास आवश्यक असतील त्याचे नवनिर्माण करणे, ह्या सर्व गोष्टी क्रांतिच्याच निदर्शक आहेत अर्थात्समाजहितासाठी समाजाचे आवश्यक व उचित परिवर्तन करणे म्हणजे क्रांति! ही क्रांति अहिंसक, शांतता.प्रधान व विधायक मार्गांनी समाजाकडूनच संघटितपणे केली गेली पाहिजे !"

याप्रमाणे तसेच आमची क्रांतीही शांतीचा उद्घोष करणारी, सत्य, अहिंसेवर आधारलेली आणि शोषणविरहित व्यवस्था उभी करू इच्छिणारी आहे. त्याचे प्रतिक कुठलेही शस्त्र नसून जगाला तोषविणारी वीणा आहे. समाज ज्या कारणांनी अधःपतित झाला ती कारणे नष्ट करणे तसेच समाजव्यवस्था समाजाच्या उत्कर्षासव सुखशांती सपोषक न होता बाधक झाली असल्यास तीत परिवर्तन करणे आणि ज्या गोष्टी समाजाच्या सर्वांगीण विकासास आवश्यक असतील त्याचे नवनिर्माण करणे, ह्या सर्व गोष्टी क्रांतिच्याच निदर्शक आहेत अर्थात समाजहितासाठी समाजाचे आवश्यक व उचित परिवर्तन करणे म्हणजे क्रांति! ही क्रांति अहिंसक, शांतता.प्रधान व विधायक मार्गांनी समाजाकडूनच संघटितपणे केली गेली पाहिजे!" ही मांडणी पाहता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शांततेच्या मार्गाने सर्वांनी विकासाची वाट धरू इच्छितात. ही क्रांती घडवून आणण्याची अपेक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी तरुणां कापुन केली आहे. विषमता, जातीभेद, दुजा भाव संपवून, एकात्म राष्ट्राची उन्नती साधण्यात खरी क्रांती आहे आणि तरुणांनी असे वागण्यातच युगधर्म आहे असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रांतीवीणा या भजनावलीच्या पहिल्याच भजनामध्ये सांगतात.

"याचला निघा,करागर्जना गावीरे,
हे सांगसांग तरुणाला।
उन्नत व्हावा देश! बनागोसावी रे,

हे सांगसांग तरुणाला।
;अंतरा} स्वातंत्र्य भारती आले।
झोपडीत अजुनि न शिरले।
हे कार्य करा जे उरले।
तुकड्यासग मे युगधर्मचि हा साजेरे,
हे सांगसांग तरुणाला॥

या भजनावलीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी राष्ट्राच्या उन्नतीसाठी, हितासाठी साधुसंतांना प्रार्थनाकेली आहे. असे अनेक भजनं या संग्रहात येतात.
स्त्री. स्वातंत्र्याचा, स्त्री मुक्तीचा आणि स्त्री सबलीकरणाचा विचारही राष्ट्रसंत या भजनावलीमध्ये मांडतात. हा खरा क्रांतीचा विचार ठरताना दिसतो. पुरुष प्रधान, पुरुष सत्ताक जोखडातून स्वतःला मुक्त करणे ही स्त्रियांसाठी क्रांती आहे. असे राष्ट्रसंत सुचवतात.

''का म्हणता तिला ? ती शक्तिशाली नाही का? देश अबलेचा की तुमचा हा सार कोणी पाही का?
का अबला मला म्हणे कुणी धरुनी त्याच्या मनगटा,
तुकड्या म्हणे सांगात या तुज जन्म फुकटची होईका।।''
हा स्त्रियांविषयीच्या या प्रश्नांचा आणि तक्रारींचा आलेखही त्यांनी मांडलेला आहे. तसेच स्त्री सबलीकरणाचे उपाय सुद्धा संत तुकडोजींनी सुचवलेले आहेत. स्त्रियांनी आता केवळ पुरुषांनाच नाही तर पुरुष प्रधान व्यवस्थेला कुटुंबाला, अबला म्हणून हिनवणाऱ्या प्रत्येकाला त्याचे मनगट धरून प्रश्न विचारावा. असा मनोदय राष्ट्रसंत व्यक्त करतात. जर ती विश्वनिर्मिती करू शकते तर ती अबला कशी हा प्रश्न विचारावा असे राष्ट्रसंत सुचवतात.
आम्ही क्रांती घडवून आणू शकतो आणि आमची क्रांती वेगळी आहे. तिचे प्रतीक वेगळे आणि तिचे ध्येयही वेगळे आहे. त्याचे वर्णन राष्ट्रसंतांनी एका भजनामध्ये केले आहे. समाजाची विस्कटलेली घडी आम्ही नीट बसवू आमची क्रांती घडवून आणण्याची पद्धती वेगळी आहे. काहींना क्रांती तलवार आणि तोफांची हवी आहे ज्याद्वारे केवळ आणि केवळ क्रूरपणा सिद्ध होतो. आम्ही मात्र शांतीमधून बदलाचा विचार मांडत आहोत. असा क्रांती विचार ते मांडतात.

''अम्ही क्रांतीचे वीर गडीरे!
सरळ करू बिघडली घडी॥धृ०।।
क्रान्ति कुणाची क्रूरपणाची।
तर वारीची अन्तोफांची।
अमुची क्रांती शांति शिकविते, प्रतीकत्याचे वीणा. चिपळी॥१॥
सद्भावाचातार गुंगवी।
विशाल बुद्धी हृदयी भरवी।
करि पालट मग जीवनिसाऱ्या,
म्हणुनिच तुकड्या घेई उडीरे॥२॥''

अशी राष्ट्रसंतना अभिप्रेत क्रांतीची मांडणी क्रांतीवीणा या भजन संग्रहाच्यामाध्यमातून झालेली आहे. त्यांना समाजामध्ये समता, बंधुता आणि न्यायाधारित व्यवस्था उभी करणे आणि ती सुद्धा अहिंसा व शांतीच्यामार्गेही राष्ट्रसंत यांना अभिप्रेत क्रांतीची मांडणी प्रस्तुत भजन संग्रहामधून करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय भजनावली मराठी ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची भजन रचना भारतीय स्वातंत्र्याची राष्ट्रीय ऐनभरात असताना तरुणांना प्रेरणा देण्यासाठी तिची निर्मिती झाली आहे. राष्ट्रीय भजनावली मराठी आणि राष्ट्रीय भजनावली हिंदी असे दोन स्वतंत्र ग्रंथ, भजनसंग्रह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सिद्ध केले होते. स्वराज्य प्राप्तीच्या हेतूने प्रेरित झालेले आणि राष्ट्रभक्ती राष्ट्रप्रेमाने ओथंबलेले असे ९१ भजन रचनांचा समावेश यामध्ये आहे. यातील बऱ्याचशा भजन रचना मात्र स्वातंत्र्यगीत वाटतात. तर काही स्वातंत्र्य प्राप्तीसाठीची प्रेरणागीत वाटतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या काव्यामध्ये एक प्रकारची नाट्यमयता जाणवते कधी ईश्वरासोबत तर कधी भारत या राष्ट्रपुरुषासोबत ते संवाद साधताना दिसतात. राष्ट्रीय भजनावली या भजन संग्रहामध्ये

''अवकळा अशी का आली रे भारता तुझ्या देहाला'' असा सरळ प्रश्न विचारलेला आहे.

किंवा

''कधी येशील मनमोहना।
पाहण्या भारत आपला पुन्हा।

भारता ग्रहण लागले,
अती गुलाम जन जाहले।
तोडण्या येई बंधना।
पाहण्या भारत आपला पुन्हा।।''

अशा पद्धतीचे विविध संवाद त्यांच्या रचनांमध्ये आहेत. देश सांभाळण्याचे आणि मिळालेल्या स्वातंत्र्याची स्वराज्यकरण्याचे आव्हान आपल्यासमोर असल्याचे अनेक भाषणांमधून राष्ट्रसंतांनी व्यक्त केले आहे.

'' झर झर झर झर या पुढतीया।
गर्जत गर्जत सांगूज गाया।
स्वतंत्र झाला भारत आपुला
या धावुनि या सांभाळाया।
तुकड्या दास म्हणे देशाला ,
फळाफुलांनी सुखवू त्याला
स्वातंत्र्याच्या उभवू ध्वजाला।
या धावुनि सांभाळाया।।''

अर्थात मिळालेले स्वातंत्र्य सांभाळण्याची आणि राष्ट्र उन्नत करण्याचे आवाहन आणि विनंती अनेक भजनांमध्ये त्यांनी केली आहे. राष्ट्र संतांच्या एकंदरीतच राष्ट्रीय भजनामध्ये यमक हा अलंकार प्रकर्षाने जाणवतो.

''भारताचा पोर तू।
तेजाची कोर तू।
चाल पुढं सेवका मोह सोडूनी।।''

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी देश आणि मातृभूमी हा मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक मानला आहे. तो जपण्यासाठी प्रसंगी प्राणार्पणही केले तरी बेहत्तर अशा आशयाची बहुतांशी ही भजने आहेत. त्यासाठी त्यांनी राष्ट्रधर्म हा शब्द वापरला आहे. आपल्या संस्थात्मक कार्यांमध्येसुद्धा 'राष्ट्रधर्म प्रचार समितीची' स्थापना त्यांनी केली आहे.

''पावोसदाय शाला ह्या राष्ट्रधर्म माझा।
वदवो प्रभू आम्हाला ह्या राष्ट्रधर्म माझा।
श्रीकृष्ण देवकीचा कंसास ठार मारी।
दावी रानात रणातलीला।
श्री राम दशरथाचा सुखवी वनी ऋषींना,
करी ठार रावणाला हा राष्ट्रधर्म माझा।।
शिवराय क्षत्रियांचा, करी नाश दुर्जनांचा,
करक शिरं आला हा राष्ट्रधर्म माझा।।
ऋषी रामदास आले, शुक, नामदेव आले
बहु बोधवी जनाला, हा राष्ट्रधर्म माझा।।
ज्ञानराज माझे, महाराष्ट्र संत गाजे।
प्रभू मार्ग दे जनाला, हा राष्ट्रधर्म माझा।।''

राष्ट्रधर्म सोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महाराष्ट्र धर्मसुद्धा जाणीवपूर्वक उल्लेख केलेला दिसतो. राष्ट्रीय भजनावली या ग्रंथाच्या प्रस्तावनेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात ''आमच्या प्राचीन संतकविचा इतिहास पाहिल्यासहीच गोष्ट प्रामुख्याने त्यात दिसून येईल. छत्रपती शिवाजीने नावारूपास आणलेला महाराष्ट्र आमच्या संत कवींनी धर्म, भक्ती दृष्ट्या आधी जिवंत आणि जागृत करून ठेवला होता आणि म्हणूनच प्राणपणाने लढणारे स्वामी भक्त, स्वामीनिष्ठपाईक त्यांना सामान्य लोकातून शेकड्यांनी मिळू शकले वनवे राष्ट्र बनविता आले. एकनाथ तुकाराम, तुलसीदास, रामदास, कबीर, नामदेव इत्यादी सर्वच महापुरुषांनी आपल्या भजनाने नव्या राष्ट्राचा पाया घातला. इतकेच नव्हे तर अजूनदेखील त्यांची जिवंत वाणी हजारो जातिवंत उपदेशकारापेक्षाही समाजाच्या हृदयावर आपली एकछत्री सत्ता चालवून एका विशिष्ट पक्षाला खेळवीत आहे. त्याच युग प्रवर्तक महान कवींचा आदर्श समोर ठेवून आजच्या काळात प्रत्येक कवी व साहित्यिकांनी राष्ट्रजागृतीचे वन व युवकनिर्मितीचे कार्य केले पाहिजे. आणि हा आज वर्षानंतर कमी करून एकतेजस्वी परंपरा उदयास आणली पाहिजे. हीच अपेक्षा माझ्या हृदयात कळवळत आहे. भजन ही केवळ ईश्वराला संतुष्ट करण्यासाठीच संतांनी केलेले असून जनतेच्या हृदयातील जनार्दन जागृतकरण्यासाठी प्रामुख्याने केले आहे. भजनाच्या प्रेमळ भावनेतून राष्ट्राचे कठीण कार्य मोठ्या कुशलतेने ते करीत आले आहेत आणि काळ पाहूनच वेळी वेगवेगळी भाषा त्यांनी त्यात

वापरली आहे.'' या प्रस्तावनेतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या लेखनाचे उद्देश अधिक स्पष्ट होतात आणि त्या हेतूने राष्ट्राला प्रेरित करणारे संत कवींच्या परंपरेला ते अखंडित करण्याचा मनोदय व्यक्त करतात.

**समारोपः**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा बाल माणिकपासून प्रारंभ झालेला प्रवास हा 'राष्ट्रसंत' होऊन वैश्विक झाला. भारताचे प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी १९४९ मध्ये त्यांना राष्ट्रसंत पदवीने गौरविले. सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता, बंधुता, भूतदया, आर्थिक परिपूर्णता, ग्रामीण आणि मागास समाजाचे उत्थान या हेतूने संपूर्ण आयुष्य एखाद्या झंझावाताप्रमाणे त्यांनी वाहून घेतले होते. राष्ट्रसंतांचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय चळवळीमध्ये सक्रिय सहभाग होता. त्यांचे साहित्य हे मराठी आणि हिंदी भाषेमध्ये लिहिले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासयावर विशेष भर देऊन त्यासाठी सक्रिय योगदान देखील दिले आहे. गाव आदर्श झालीत राष्ट्र अधिक उन्नत होईल ही त्यांची धारणा होती. स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी तुरुंगवासही भोगला. अनेक प्रेरणादायी भजने, गीत आणि पोवाडे रचून तरुणांना, ग्रामस्थांना आणि सैनिकांना प्रेरणा दिली. आष्टी, चिमूर आणि यावलीच्या 1942 च्या संग्रामामध्ये त्यांचीप्रने त्याची भूमिका राहिली आहे. विविध सभा.संमेलने त्यांनी आपल्या खंजिरी भजनांनी गाजविले. ''मैं शब्द की खैरात हूं सब शब्द मेरे पास हैं'' या दुर्दम्य आत्मविश्वासाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सहज कोणतीही सभा जिंकत असत. खेडूत लोकांपासून ते धर्म मार्तंडाचा जमावात किंवा जपानमधील सर्व धर्मपरिषद असो त्यांनी आपल्या समन्वय वादी विचारांनी अद्वितीय आणि अनन्य अशी छाप सोडली होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वतःचा जन्मदिवस ग्रामउन्नतीचा संकल्प दिवस व्हावा म्हणून त्याला 'ग्रामजयंती' चे स्वरूप द्या अशी सूचना केली. राष्ट्रासाठी आयुष्य वेचणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे देहावसान 11 ऑक्टोबर 1968 या वर्षी कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने झाले. इस लोककी यात्रा हमारी सफलतासे हो गई ''असे म्हणत आपले जीवन हे तू सार्थ झाले असे सांगून त्यांनी आपला देह ठेवला.

संदर्भ ग्रंथः

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, *'ग्रामगीता'* श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज मोझरी अमरावती, 2017.

२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज *राष्ट्रीय भजनावली ;मराठी,* श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज मोझरी अमरावती, 2017.

३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज *राष्ट्रीय भजनावली; हिंदी,* श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज मोझरी अमरावती, 2017.

४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, *युगप्रभात* , श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज मोझरी अमरावती, 2017.

५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, *क्रांतीदीप,* श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज मोझरी अमरावती, 2017.

# साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध

**प्रा. प्रफुल्ल विलासराव काळे,**
**संगीत विभाग, यशवंत महाविद्यालय, वर्धा,**

**प्रस्तावना :** साहित्य आणि संगीत यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. समाजामध्ये चालत आलेल्या सर्व चालिरीती, प्रथा परंपरा मांडणारा म्हणजे थोडक्यात साहित्य हा समाजाचा आरसा आहे. संगीत कला म्हणजे साहित्य कलेत येणाऱ्या सर्व गोष्टींची भावनिक अभिव्यक्ती होय. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानव कोणत्या ना कोणत्या मार्गाने अभिव्यक्त होण्यासाठी प्रयत्नशील आहे. भाषा जन्मापूर्वी टाळ्या वाजवणे, पशु-पक्षांचे आवाज काढणे, एका वस्तूने दुसऱ्या वस्तूवर आघात करणे अशा अनेक गोष्टींच्या सहाय्याने मानव अभिव्यक्त होत होता. त्यानंतर भाषा तयार झाली. लेखनकला अस्तित्वात आली. वेगवेगळ्या लिपी पद्धती तयार झाल्या. साहित्य निर्माण झाले. याच साहित्याला त्यात असणाऱ्या सांगीतिक गुणधर्मामुळे संगीताच्या माध्यमातून अभिव्यक्त करून त्याचा प्रगल्भ परिणाम समाजावर होतो याची प्रचिती मानवाला आली. मानवाच्या जीवनात लयबद्धता असणे अत्यंत आवश्यक आहे. लयबद्धता हि सांगीतिक संज्ञा आहे. त्या संज्ञेचा अर्थ असा की एका विशिष्ट लयीत / चालीत, स्वरात जीवन व्यतीत करणे. लय / लयतत्त्व / लयात्मकता म्हणजे त्या विशिष्ट गोष्टीला (सजीव तसेच अस्तित्वात असलेल्या प्रत्येक गोष्टीला) प्राप्त होणारा आकार होय. लयीमुळे सुबकता प्राप्त होते. साहित्य, चित्रण, शिल्प, संगीत किंवा संपूर्ण ललित कलांमध्ये लय / लयतत्त्व असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यात लय नसेल तर कोणताही रस न उत्पन्न झाल्यामुळे ती गोष्ट निरस भासते. साहित्य आणि संगीत या दोहोंमध्ये असलेला लयबद्धतेचा गुणधर्म समान आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध सविस्तर पाहणार आहोत.

**साहित्य :** साहित्याची सर्वसामन्य पद्धतीने व्याख्या करावयाची झाल्यास ती पुढीलप्रमाणे करता येईल- मानवाचे जीवन, चित्रण, विवरण, त्याभोवती घडणाऱ्या घटना अशा अनेक गोष्टींची भाषिक पद्धतीने होणारी मांडणी म्हणजे साहित्य होय. मानवी जीवनामध्ये येणाऱ्या भाव-भावना, अध्यात्म अशा विविध अंगणी घडविलेले सर्जनशील, वैचारिक, कल्पनात्मक, वास्तव अशा भिन्न-भिन्न स्तरांवरचे सर्वांगीण, सम्यक दर्शन साहित्यातून वाचकांस प्रतित होते. “Literature, in its broadest sense, is any written work. Etymologically, the term derives from Latin litaritura / litteratura “writing formed with letters,” although some definitions include spoken or sung texts. More restrictively, it is writing that possesses literary merit. Literature can be classified according to whether it is fiction or non-fiction and whether it is poetry or prose. It can be further distinguished according to major forms such as the novel, short story or drama, and works are often categorized according to historical periods or their adherence to certain aesthetic features or expectations (genre).”[1] कोणत्याही साहित्यामध्ये गद्य-पद्य रचना आणि त्यांचे अनेक प्रकार असल्याचे दिसून येते. साहित्यामध्ये लेखन महत्त्वाचे आहे. “कोणत्याही लेखन परिस्थितीत तिचा खास विशेष अधिक खोलवरच्या पातळीवर अवतरत असतो.”[2] सर्वप्रथम शारीरिक हालचाली तसेच विविध मार्गांचा उपयोग करून मानव

आपापसात संभाषण करत असे. कालांतराने विकास होत गेला आणि भाषेची निर्मिती झाली. पुढे अजून विकास झाल्यानंतर बोली म्हणून असणाऱ्या या भाषेला लिखित स्वरुपात मांडण्यासाठी लिपी पद्धती तयार झाली आणि साहित्याची निर्मिती झाली.

**संगीत :** संगीत म्हणजे समाजाच्या आत्मिक भाव-भावना अभिव्यक्त करणारे प्रभावी साधन होय. संगीताच्या माध्यमातून अध्यात्म, आरोग्य, विज्ञान, मनोरंजन तसेच सामाजिक एकता अशा अनेक गोष्टी मानवाला साध्य करता येतात. संगीत हे चराचरात वसलेले आहे. लय आणि स्वर हे संगीताचे मुख्य घटक आहेत. यावरच संगीताचा पाया रचला जातो. संगीत म्हणजे मानवी देहातून उत्पन्न होणारी अत्यंत प्रभावी कला आहे. लयतत्त्व आणि स्वरतत्त्व यांचे दर्शन संपूर्ण ब्रम्हांडामध्ये होते. दिवसाचे प्रहर, धबधब्याच्या आवाज, पक्षांचे आवाज, नाड्यांचे तसेच ह्रदयाचे ठोके, रक्ताभिसरणाची प्रक्रिया अशी अनेक लयतत्त्व आणि स्वरतत्त्व उदाहरणे दैनंदिन जीवनात पाहायला मिळतात. “पं. अहोबल के अनुसार - गीतं वादित्र नृत्यानाम त्रयं संगीतमुच्यते.”[3] गायन, वादन आणि नृत्य तिन्ही कलांच्या समूहाला मिळून संगीत असे म्हणतात. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या या संगीतामध्ये प्रात्यक्षिक आणि सैद्धांतिक ज्ञान असलेले अनेक सांगीतिक साहित्य / ग्रंथ याचे अनेक पुरावे सापडतात. संगीत श्रवण केल्यामुळे आजार बरे होतात. आध्यात्मिक विकास होण्यासाठी संगीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सर्वसामान्य व्यवहारांमध्ये सुद्धा सांगीतिक गुणधर्म असलेली लय अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक सजीव विशिष्ट लयीत, चालीत, स्वरात दिनचर्या व्यतित करीत असतो. दोन सजीवांमध्ये असलेले सुव्यवस्थित लयतत्त्व हे योग्य व्यवहार,संभाषण घडवते. पण जर त्यांमध्ये लयतत्व साधता आले नाही तर भांडण, तंटे उत्पन्न होतात. त्यामुळे स्वरतत्व आणि लयतत्व यांचा संगीतामध्ये तसेच दैनंदिन जीवनात असलेले महत्व दिसून येते.

**साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध:** ज्याप्रमाणे साहित्यामध्ये आधी भाषेचा विकास झाला, लेखनकला विकसित झाली आणि वेगवेगळया लिपी पद्धती विकसित झाल्या, त्याचप्रमाणे संगीतामध्ये सुद्धा आधी गायन, वादन, नृत्य या कला विकसित झाल्या आणि मग त्यांची लिपी पद्धती विकसित होत गेली, शास्त्र विकसित होत गेले. थोडक्यात सांगायचे झाले तर कोणतीही कला आधी अस्तित्वात येते आणि त्यानंतर त्यांचे साहित्य, शास्त्र बनते.

साहित्य आणि संगीत यांचे जवळचे नाते दर्शविण्यासाठी ललित कला या घटकाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ‘ललित’ या शब्दाचा अर्थ सुंदरता असा होतो. याच पद्धतीने ललित कला या सुंदरतेची अभिव्यक्ती करणाऱ्या कला होत. “ललित कला म्हणजे भावना व्यक्त व उद्दीपित करण्याकरिता स्वतंत्रपणे व विचारपूर्वक, तालबद्ध, गती किंवा ध्वनी किंवा नियमबद्ध आकृती काढण्याचे नियम पाळून केलेली आणि प्रत्यक्ष उपयोगाची दृष्टी न ठेवता केवळ चिरकालिक निरपेक्ष आनंद पुष्कळांना प्राप्त करून देण्यासाठी अधिकाधिक उत्तम केलेली, मनुष्याची उत्तम कृती होय.”[4]या ललित कलांमध्ये पाच कलांचा समावेश दिसून येतो, ज्या कलांपासून उत्पन्न होणाऱ्या सौंदर्याचा परिणाम मानवी मनावर अत्यंत खोलवर होतो आणि चिरकाल टिकतो.त्या पाच ललित कला पुढीलप्रमाणे:- १)संगीत २)साहित्य ३)वास्तु ४)चित्र ५)शिल्प इत्यादी. या कलांमध्ये संगीत आणि साहित्य यांचा समावेश विशेष आहे. संगीताचा इतर प्रत्येक कलेशी घनिष्ट असा संबंध आहे. तरीसुद्धा संगीत ही कला इतर ललित कलांच्या तुलनेत सर्वश्रेष्ठ ठरते. इतर ललित कलांना कोणत्या ना कोणत्या साधनांची, माध्यमांची आवश्यकता असते.

"शोपेन होवर का कहना है - केवल संगीत हि ऐसी कला है जो श्रोतओंसे सीधा संबंध राखती है. इसे किसी भी मध्यम कि आवश्यकता नही होती."[5] ललित कलांमधील चित्रण, वास्तु, शिल्प या कलांमधून जे भाव व्यक्त होत नाहीत ते साहित्यातून होतात. साहित्य कलेला सुद्धा मर्यादा आहेत. सर्व भाव-भावना पोहचविण्यासाठी साहित्याला जिथे मर्यादा येतात तिथून पुढे संगीत कला कार्यरत होते. संगीत हि अमूर्त अशी कला आहे. साहित्यातील कलाकृतीला श्रोत्यांपर्यंत पोहचविण्यासाठी त्याति भाव-भावना अभिव्यक्त करण्यासाठी संगीत ही सर्वश्रेष्ठ कला आहे. साहित्य आणि संगीत यांमध्ये समान असणारा असणारा गुण म्हणजे त्यांमध्ये असणारी लयात्मकता.कोणत्याही कलेला निरस होण्यापासून वाचवायचे असेल तर त्यात लयात्मकता असणे अत्यंत आवश्यक आहे. अक्षर, शब्द, ओळ, गद्य-पद्य या सर्वांमध्ये स्वर, लय, लयतत्त्व, लयात्मकता असणे आवश्यक आहे. हेच स्वरतत्त्व, लयतत्त्व म्हणजे संगीताचा प्राणतत्व आहे. "Music arises when irregular sounds are made regular indiscriminate sounds periodic."[6]म्हणजे सांगीतिक ध्वनी हा नित्य आणि सुव्यवस्थित असतो. संगीतामध्ये कानाला ऐकू येणारा सांगीतिक ध्वनी म्हणजे श्रुती होय. अशा २२ श्रुती संगीतात आहेत. श्रुतीला आईचा तर लयीला पित्याचा दर्जा संगीतात देण्यात येतो. यावरून संगीत आणि साहित्य किंवा इतर कोणतीही ललित कलांमध्ये लयतत्त्व अत्यंत महत्वपूर्ण आहे. साहित्यातील गद्य-पद्य अधिक परिणामकारक होण्यासाठी किंवा श्रोत्यांपर्यंत पोहचविण्यासाठी संगीत कलेची जोड असेल तर ते सांगीतिक साहित्य लोकमनावर अधिराज्य गाजविणारे ठरते. भाषा-साहित्य याला प्रांतवार रचना या दृष्टीने पाहिल्यास मर्यादा येतात. प्रत्येक राज्याची भाषा-साहित्य हे सर्वसाधारणपणे त्या त्या राज्याच्या भाषेमध्ये असते. पण ज्यावेळी साहित्य संगीतामध्ये बद्ध होते तेव्हा त्या परप्रांतीय साहित्याचा अर्थ जरी कळाला नाही तरी त्या साहित्यातील रसात्मकता संगीत कला श्रोत्यांच्या अंतर्मनापर्यंत पोहचविते. अर्थ न समजणारे साहित्याचा गाभा संगीतातून अभिव्यक्त होतो आणि त्याच्या उलट प्रांतीय भाषा-साहित्य आणि संगीत यांच्या मिलाफातून तयार झालेली कलाकृती अजरामर होऊन मानवी मनावर राज्य करते. संतांचे साहित्य, साहित्यातील गद्य-पद्य पक्ष यांना सांगीतिक जोड मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ही गोष्ट संताना माहिती होती. याच कारणामुळे संतांनी, समाजसुधारकांनी साहित्याला गेय स्वरूप दिले म्हणजेच समाजामध्ये सर्वसामान्यांना एकत्रित करण्यासाठी, समाजसुधारणेच्या दृष्टीने साहित्य आणि संगीत यांची सांगड घालून जनजागृती करण्याचे कार्य यशस्वीपणे पार पाडले. संतसाहित्य, कीर्तन, अभंग, भजन, साहित्यातील गद्य-पद्य हे सर्व त्यांच्यात असलेल्या लयात्मकता या सांगीतिक गुणामुळे अजरामर होतात. म्हणजेच साहित्याची परिणामकारकता वृद्धिंगत करून जनसामान्यापर्यंत पोहचवून चिरकाल स्मरणात ठेवण्यासाठी संगीत ही कला आत्यंतिक महत्त्वाची भूमिका बजावत असते. वाग्गेयकार हि संकल्पना संगीतामध्ये प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. "श्रीपाद बंडोपाध्याय के अनुसार वाग्गेयकार का अर्थ है वाक अर्थात पद्य और गेय अर्थात स्वर. इन दोनो शब्दो का संयुक्त रूप हि वाग्गेयकार है."[7] सांगीतिक स्वर, लय आणि साहित्य यांचा अभ्यास असणारा व्यक्ती म्हणजे वाग्गेयकार होय. वाग्गेयकाराला शब्द, साहित्य, व्याकरण, अलंकार, छंद, रस, भाव तसेच संगीत कलेतील गायन, वादन, नृत्य, लय, स्वर, ताल, कला अशा प्रकारे साहित्यिक आणि सांगीतिक दोन्ही गोष्टींचा अभ्यास असणे आवश्यक आहे. यावरून साहित्य आणि संगीत यांचा असलेला घनिष्ट संबंध दिसून येतो.

**निष्कर्ष :**

- साहित्य आणि संगीत यांमध्ये लयात्मकता हा गुणधर्म आहे.
- साहित्य परिणामकारक होण्यासाठी संगीत महत्त्वाची भूमिका बजावते.
- साहित्य आणि संगीत यांचा घनिष्ट संबंध आहे.
- साहित्याला समाजापर्यंत पोहचवून जनजागृती करण्यासाठी संतांनी, समाजसुधारकांनी त्यांच्या साहित्याला गेय / सांगीतिक रूप दिले आहे.
- वाग्गेयकार हि संकल्पना साहित्य आणि संगीत यांमध्ये समन्वय साधते.
- साहित्य आणि संगीत यांचा मिलाप जनसामान्यांच्या चिरकाल स्मरणात राहतो.

**संदर्भ :**

1. Introduction to Literature pdf by Dench Jamie, Lumen learning and IVY tech College, 2015, page no. 1

2. रानडे अशोक, संगीत विचार, पोपुलर प्रकाशन, मुंबई, २००९, पृष्ठ क्र. १५१

3. कुमार अशोक, संगीत रत्नावली, अभिषेक पब्लिकेशन, चंडीगड, २०१८, पृष्ठ क्र. २

4. पुरोहित बळ, हिंदुस्थानी संगीत पद्धती मुलतत्त्वे आणि सिद्धांत, विजय प्रकाशन, नागपूर, २००४, पृष्ठ क्र. ३

5. वसंत, संगीत विशारद, संगीत कार्यालय, हाथरस, २०१०, पृष्ठ क्र. ५६०

6. Kumar Raj, History and Cultural series, Essays on Indian Music, Discovery Publishing House, New Delhi, 2003, page no. 22

7. कुमार अशोक, संगीत रत्नावली, अभिषेक पब्लिकेशन, चंडीगड, २०१८, पृष्ठ क्र. २९९

# संतांच्या परिवर्तनवादी विचारांची उपयुक्तता

**डॉ. सुवर्णा गाडगे**
**सहयोगी प्राध्यापक मराठी, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,अमरावती**

वारकरी संप्रदायाने मराठी संस्कृतीतील अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहे. संतसाहित्य आणि मराठी संस्कृती यांचा संबंध अतुट आहे. संत ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाला तात्त्विक अधिष्ठान दिल्याने महाराष्ट्र परकीय सत्तेच्या अंमलात ही टिकून राहिला. मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदायाची पायाभरणी करून ज्ञानेश्वरांनी एका नव्या युगाचा प्रारंभ केला. संस्कृतीच्या आध्यात्मिक तसेच भौतिक गरजेतून भाषा घडत जाते.या संप्रदायाने मराठी भाषा व मराठी संस्कृती टिकविली. विविधतेत एकता, सर्वसमावेशकता, कालातितता हे या संप्रदायाचे व मराठी संस्कृतीचे वैशिष्टय आहे. संतांची दृष्टी व्यापक असून परधर्मसहिष्णूता व समन्वयाची होती. त्यामुळेच अनेक स्थित्यंतरानंतरही मराठी संस्कृती अबाधित राहू शकली. ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाचा कायापालट घडवून आणून महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. नामदेवांनी आपल्या भावनोत्कटतेने, श्रध्दाबळाने व समर्पणशीलतेने निरनिराळ्या जातींतील विठ्ठलभक्तांची मने वेधून घेतली आणि तत्कालीन धार्मिक आंदोलनात सामील होण्यास त्यांना प्रवृत्त केले. त्यानंतर परधर्मीय अशांततेच्या व अस्थिरतेच्या वातावरणामुळे या कार्यात पुष्कळच खंड पडला. पुढे एकनाथांनी एकंदर कालमान लक्षात घेऊन दूरदर्शीपणाने, निर्धाराने, कल्पकतेने पण सावधानतेने भागवत धर्माच्या चळवळीस चालना दिली. नाथांनी भागवतधर्माचे पुनरुज्जीवन करुन महाराष्ट्र धर्म जागा केला. ''नाथांच्या व्यक्तिमत्वात दत्तसंप्रदाय, वारकरी संप्रदाय आणि पैठणच्या पंडितांची परंपरा या तिहिंचा संगम झालेला होता.'' [१] नाथांनी निजामशाहीकाळात घडवून आणलेले सांस्कृतिक पुनरुत्थान सर्वश्रेष्ठ ठरले. ''नाथांनी जुन्या भागवत धर्माचे पुनरुज्जीवन करुन महाराष्ट्रात एक नवी जागृती निर्माण केली. त्यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील हे कार्य महारा ट्राच्या भौतिक उन्नतीला पोषकच ठरले. नाथांच्या कर्तृत्वापुढे नैतिकदृष्ट्या समर्थ बनलेल्या महाराष्ट्र समाजाच्या मनात राजकीय स्वातंत्र्याची आपल्या भौतिक उत्कर्षाची आकांक्षा उत्पन्न केली.''[२] समन्वय बुध्दी, प्रेमळपणा सौजन्य व शांती हा नाथांच्या व्यक्तिमत्वाचा गाभा आहे. त्यांच्या स्वभावात कटुता, क्षुद्रता किंवा संकुचितपणा नव्हता. याउलट स्निग्धता, समता, प्रेम व औदार्य, उदारपणा या गुणांची आदर्श मूर्ती म्हणजे प्रत्यक्ष वारकरी संप्रदायाला आधारस्तंभ देणारे एकनाथ होत. एकनाथकालीन परिस्थिती विपरीत असतांना देखील त्यांनी आपल्या अलौकिक कर्तृत्वाच्या बळावर समाजाला विठ्ठल भक्तीच्या मार्गाला लावण्याचे कार्य केले. मुस्लिम आक्रमणाने ग्रासलेल्या हिंदूचा नैतिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक छळ होत होता. यावेळी हिंदूचा भागवतधर्म नव्याने समाजाला सांगायची गरज होती. समाजाला गीता, भागवतादी ग्रंथ, विठ्ठलभक्ती व भागवतधर्माच्या पाऊलवाटेने जाण्यास शिकविणारे एकनाथ होत. प्रपंच व परमार्थ यांची सांगड त्यांनी घातली. तुकाराम–रामदासांनी एकनाथांच्या जीवननि ठेतील एकेका प्रवृत्तीचा स्वतंत्रपणे व साकल्याने पाठपुरावा करुन तिचा उत्कर्षबिंदू गाठला आणि धर्म सुधारणेचे व लोकजागृतीचे कार्य त्या काळापुरते पूर्णतेस नेले. या संतमहंतांची ऐतिहासिक कामगिरी तर मोठी आहेच. पण मराठी जनमनावरील त्यांच्या वाङ्‌मयाची छाप अजूनही कायम आहे. त्यांच्या साहित्यातून आलेल्या विचारांनी बहुजन समाजाला आज ही आपल्या उच्चतर अंत:प्रेरणांची मनोमन प्रचिती येते.

वारकरी संप्रदायाच्या आचारात सामाजिक नीतिमत्तेची पातळी उंचावण्यावर अधिक भर दिला गेल्यामुळे दया, क्षमा आणि शांती या उदात्त तत्वांबरोबरच सत्य आणि अहिंसा या दोन तत्वांच्या आधारे चारित्र्यसंपन्न अशा समाजजीवनाची उभारणी होण्यास मदत झाली.''[३] अठरापगड जाती जमातील दीनदलित व स्त्रियांच्या आत्मिक उत्थानाची कळकळ, आत्मानुभूतीचे विवेकनिष्ठ प्रामाण्य, भक्तीने परमात्म्याची परिसीमा गाठणारी अव्दैतदृ टी, जनमानसामध्ये अनुबंध निर्माण करणारी लोकभाषा संतांनी उपयोजिली ."उदात्त जीवनादर्श समाजातून अंस्तगत झाले. तर आपले जीवन नि संस्कृतीच उध्वस्त होऊन जाईल, याच भान तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या सर्व धर्माच्या व पंथाच्या संतांनी कसं ठेवल होत, याची साक्ष त्यांनी लिहिलेल्या ग्रंथातून मिळते. आपल्या या उदात्त विचारांचा नि सुसंस्कारांचा प्रसार संतांनी कीर्तन–प्रवचनासारख्या विविध माध्यमांतून सातत्यांनं वेगवेगळ्यां शतकात केला नि मानवतेचा जनसामन्यांच्या ह्रदयातील नंदादीप विझू दिला नाही."[४]

वारकरी पंथाने ज्ञानाचे महत्त्व मान्य करुन भक्तीला अग्रस्थान दिले. तिला प्रवृत्तिपर वळण लावले व नामसंकीर्तनासारखे सुकर साधन लोकांपुढे ठेवले. अध्यात्म मंदिराचे प्रवेशद्वार जास्तीत जास्त रुंद असावे अशी त्यांची भावना होती. चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी हे सर्व गृहस्थाश्रमी व कुटूंबवत्सल होते. ते आपापले व्यवसाय निर्वेधपणे करीत होते. लोकांपासून ते कधी फटकून राहिले नाहीत. ज्ञानदेव व नामदेव या दोघांच्या प्रभावामुळे भक्तिगंगेचा प्रवाह महारा ट्रात अठरापगड जातींमध्ये पोहोचला व एक प्रकाराची आध्यात्मिक लोकशाही निर्माण झाली. एकूणच वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक आहे. त्याने संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाही. प्रतीकांचा आग्रह धरला नाही. या पंथात विठ्ठलाचा महिमा अधिक आहे. एकुणच मराठी संत हेच मध्ययुगीन महारा ट्राच्या सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्याचे खरे शिल्पकार होते.

भागवतधर्म म्हणजे मानवधर्म. मानवधर्माचे वैश्विक तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरांनी व्यापक भूमिकेतून सांगितले आहे. संतांचे सर्वच वाङ्.मय निर्मिती व अभंगरचना, स्फुट लेखन, गौळणी, विराणी, भारुड, आरत्या, भूपाळ्या, अध्यात्मज्ञान, आध्यात्मिक प्रबोधनातून जनकल्याण साधणारे आहे. काळवेळ नसे नामासंकीर्तनी। उचनीच योनी हेंही नसे' – नामदेव , ''नामस्मरण ही एक मानसिक प्रक्रिया ठरते. यातून परमेश्वराशी एकरुपत्व साधता येते. मात्र या पंथात भक्तिभावाचा जो अट्टाहास आहे तो कर्मठपणाची नांगी ठेचण्यासाठी, कर्मकांडात अडकलेल्या अंधश्रध्द समाजाला नामस्मरणासारखा सोपा मार्ग उपलब्ध करुन देऊन येथे आत्मशुध्दी व सदाचरणावर वारकरी पंथाने भर दिला आहे. नामसंकीर्तनाचा महिमा गाणारा हा वारकऱ्यांचा कीर्तन संप्रदाय म्हणजे धर्मशिक्षणाची प्रचंड मोहिम होती. संतांची ही भक्ती म्हणजे ईश्वराप्रती ध्यान. त्यांनी ईश्वराची प्राप्ती नामस्मरणातून आणि नामसंकीर्तनातून साधण्यासाठी सगुणांचा अवलंब केला. तथापी सगुणातून निर्गुणाच्या साक्षात्काराकडे वाटचाल करणे हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते.''[५] समताधिष्ठित समाजाचे स्वप्न पाहणारे मुक्त विचारवंत अनिष्ठ आचार विचारा विरुध्द, वैचारिक बंड उभारणारे संत तुकारामाचे साहित्य व कार्य सदासर्वकाळ मार्गदर्शक ठरणारे आहे. डॉ. साळुंखे म्हणतात, जो पर्यंत आपल्या समाजरचनेत एक परिपूर्ण संतुलन निर्माण होत नाही तो पर्यंत मात्र आपल्याला विद्रोही तुकारामच हवेत. सर्व सामाजिक व आर्थिक भेदांच्या पलिकडे जाऊन समाजाची समन्वयवादी मानसिकता, सात्त्विक अनुभूतीची प्रतिती नि उदात्त जीवनमूल्यांचे संस्कार संत काव्याने केले. संतांना प्रांत वा भाषेच्या मर्यादा बांधू शकत नव्हत्या.

वारकरी संतांनी आपल्या वर्तनातून व साहित्यातून मानवी मूल्ये, उदात्त ध्येये, वैश्विक प्रेमभाव समाजापुढे ठेवला आहे. जन्मश्रे ठात्वापेक्षा, कर्मश्रेष्ठत्व असावे लागते.''वारकरी पंथाने जातीची वर्णाची पोलादी चौकी मोडून काढून सर्व मानव सारखे अशी व्यापक भूमिका घेऊन सहिष्णुतेची भावना वाढीस लावली आणि सामाजिक पातळीवर मुक्त अभिसरण सुरु केले.''[६] 'देह देवाचे मंदिरा । आत आत्मा परमेश्वर' भारतीय संस्कृतीत शरीराला गौण स्थान दिलेले आहे. देह हा नश्वर आहे. आत्मा देहात वास करतो म्हणून हा देह सुंदर, निरोगी, सदृढ राहिला पाहिजे. ज्याच्याकडे सामर्थ्य असते, बळ असते. त्याच्या पाठीशी परमेश्वर उभा राहतो. वाढत्या ताणतणावाच्या नि ई माध्यमाच्या काळात नवनवीन रोगाचे प्रमाणही वाढले आहे. आज जगभर थैमान घालणारा कोविड – १९ तरुणाईला मात्र घेरू शकला नाही. ज्यांच्या मनाची व शरीराची ताकद बळकट होती. अशांना तो मारु ही शकत नाही. मन व शरीराची क्षमता किती महत्त्वाची आहे हे संतांनी त्याकाळात सांगितले.

कोण पुसे अशक्ताला। रोगीसे बराडी दिसे। – समर्थ रामदास

दुर्लभ नरदेह जाणा हे संतवचन – संत तुकाराम

शरीर उत्तम चांगले। शरीर सुखाचे घोसुले – संत तुकाराम

शक्तीने मिळती राज्ये। युक्तीने यत्न होतसे। शक्तीयुक्ती जये ठाई। तेथे श्रीमंत धावती

युक्त आहारविहार। नेम इंद्रियासी सार

आजची जीवनशैली विपरित झाली आहे. सत्त्वयुक्त आहार घेण्यापेक्षा उघड्यावरचे, जंगफुड खाणे, उभ्याने खाणे–पिणे, रात्रात्र भटकणे, रात्री जागरण दिवसा झोपणे सगळेच बदलले आहे. धावपडीच्या गतिमान जीवनशैलीत स्वत:साठी वेळ नाही, व्यायाम, योगासन, ध्यानधारणा यासाठी सवळ नाही.सध्याची जीवन शैली बदलली आहे. त्याचा परिणाम मोठया प्रमाणत दिसून येत आहे. निरामय मन निरोगी शरीरात वास करते.मनाचे सौंदर्य,

सदृढता, चांगले आचार, विचार, वाचन, मनन, चिंतातून जोपासली पाहीजे. मन आंकठ आनंदात असले पाहिजे. निरोगी मन आकाशाला गवसणी घालते. मन हा अखंड प्रेरणास्त्रोत आहे. संतांनी मानवी मनाची जी महती त्याकाळात सांगितली ती कालातित असून युगायुगाचे वैश्विक सत्य आहे.

मन करा रे प्रसन्न। सर्व सिध्दिचे कारण — संत तुकाराम

मन गुरु आणि शिष्य। करी आपुलेचि दास्य — संत तुकाराम

मन जिंकावे पां आधी। तेणे तुटेल उपाधी — एकनाथ

मना वासना दृष्ट कामा नये रे।

सुखा आंग देऊं नये। प्रयत्ने पुरुषे सांडूं नये।

कष्ट करितां त्रासो नये। निरंतर।। — समर्थ रामदास

आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदची अंग आनंदाचे —संत तुकाराम

प्रयत्नवाद हा मानवाचा बाणा व्हावा, श्रम करण्यामध्ये कोणताही कमीपणा वाटू नये, कष्टानेच धन मिळवायचे असते. राजकीय सत्ताकांक्षा, रागद्वेष, मत्सर, कारस्थाने, निर्ममवृत्तीने केलेल्या खेळी आणि उचापती यांचा सामाजिक परिस्थितीवर अपरिहार्य असा परिणाम होतो.'जनमानस, समाज बिथरतो. लोकांचे अज्ञान, दैन्यदारिद्र्य यांची संतांना जाणीव होती. सामान्य जन अज्ञानी, अडाणी, वंचित यांच्याकरिता संत झटले. स्वउध्दाराची संधी, आत्मोन्नतीची, विकासाची संधी सर्वांनाच मिळाली पाहीजे. अशी लोकशिक्षकाची व्यापक भूमिका संताची होती.

जे जे आपणांसि ठावें। तें तें दुसऱ्यासि सिकवावें। शहाणे करुनी सोडावें। सकळजन। ज्ञान विज्ञानाचा प्रचारप्रसार करुन सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळावी. अशा सर्वधर्म समन्वय, समभावाच्या वातावरणात संत परंपरा विकसित झाली आहे.' तुकोबाराय वारकरी संप्रदायाचे प्रभावी प्रवक्ते. त्यांनी नामदेव — नाथानंतर बहुजनांच्या धर्मश्रध्देला विशुध्द बैठक देत धर्मरक्षणाबरोबरच पाखंड खंडन केले. जुन्या श्रेष्ठ मूल्यांचे रक्षण करण्याबरोबर अनिष्ट व कालबाह्य चालीरीतींचे उच्चटन करण्याचे कार्य संतांनी केले. प्रपंच — परमार्थाचा मेळ घालून समाजात सदगुण सदाचाराचे सामर्थ्य टिकून समष्टीजीवन सामर्थ्यसंपन्न व्हावे यासाठी यशस्वीपणे प्रयत्न केले. नव्या विधायक सामाजिक जाणिवांची योग्य ती बुज राखणे हे समाजप्रबोधकांचे कर्तव्य आहे. स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल स्वागतशील वृत्ती संतांनी दाखविली. वस्तुतः सगुणनिर्गुणातील ईश्वरभक्तीची परंपरा विठ्ठलभक्त वारकऱ्यांनाही चांगली परिचयाची आहे. ज्ञान, योग अथवा शरीरशुध्दी आणि भक्ती यांचा मेळ घालणे आज आवश्यक झाले आहे. ज्ञान, कर्म न भक्ती यांचा मेळ घालणाऱ्या वारकरी परंपरेला तळागाळातील जनसामान्यापर्यंत नेऊन सर्वांमध्ये आत्मविश्वास उत्पन्न करणारे संत आहेत.''आत्मज्ञानाचे अधिष्ठान आणि सदाचाराचे आवि करण असलेल्या 'ज्ञाननिष्ठ कर्मप्रधान भक्तीनेच जीवनातील साफल्य मिळविता येते. अशी मराठी संतांची निष्ठा दिसते.''[७] परिवर्तन नित्य होतच राहील मात्र त्या परिवर्तनाला विधायक दिशा देण्याचे संतांचे कार्य व संतसाहित्य अखंड करीत राहिल. हाती काम मुखी राम , मानसातला देव, कर्मश्रेठत्व, श्रमप्रतीष्ठा इ. मानवीमूल्य संतांनी जनमनात रूजविली. ''संतांनी समाजाला दिलेला विचार हा मानवतावादी आहे. चांगला विचार, जीवनमूल्ये काळ बदलला तरी बदलत नसतात. बदलत्या काळाबरोबर समाजाच्या सर्व स्तरावर अनेक आव्हाने आज उभी आहेत. अशी आव्हाने पेलण्याची क्षमता, सामर्थ्य हे संतांच्या विचारांमध्ये आहे.''[८] कोणताही उच्च, उदात्त विचार काळाच्या आसमंतावर आपला प्रभाव गाजवतच असतात. संतसाहित्य हे मानवी भावभावनांचा तळ गाठणारे आहे. जनमनाचा सखोल व सुक्ष्म अभ्यास संतांनी केल्याची प्रचिती त्यांच्या साहित्यातून आपणास येते. संत विचारातील तार्किकता, वस्तुनिष्ठा, समाजाभिमुखता आणि तर्ककठोरता इत्यादीकडे समाजाचे दुर्लक्षच झाले. संत तुकारामांची परखड सामाजिक भूमिका, रामदासांचा प्रयत्नवाद, एकनाथांची समन्वयशीलता यांचा पुरेशा तटस्थपणे वेध घेतला गेला नाही. ''म्हणौनि जाति कुळ वर्ण। हे अवघेचि गा अकारण। एथ अर्जुना माझेपण। सार्थक एक।।''

''विशिष्ट अर्थी कालसापेक्षतेचे आवरण असलेले संतांचे साहित्य आणि त्यांचे विचार हे ज्ञान, धर्म, पंथ, लिंग, भाषा, काळ, भूप्रदेश या सर्वांच्या पलीकडील होते. संतांचे अंत:करण मानवी कल्याणाच्या भावनेने ओतप्रोत भरलेले होते. कल्याणकारी संतपरंपरेचा कालोचित अन्वयार्थच एकविसाव्या शतकातील मानवसमूहाचे उन्नयन करील. ढासळलेली नीतिमूल्ये, आक्रमक होत चाललेला व्यवहारवाद, माणसाच्या वाट्याला येणारी

अगतिकता, हतबलता, नि नैराश्य यांवर मात करुन संतसाहित्याचा सर्वकष आणि डोळस विचार मानवी मनाला दिलासा देईल. त्यातूनच मानवी जीवनाचे उन्नयन होईल.''[९] कर्तव्यकठोर होऊन कर्मसिध्दांताचे आचरण करणे हा जीवन सुंदर करण्याच्या प्रयत्नातील एक महत्त्वाचा भाग आहे. आपुलिया हिता। जो असे जागता। धन्य मातापिता तयाचिया।। तुका म्हणे मज। घडो त्यांची सेवा।।' मढे झाकोनिया करती पेरणी' संत तुकारामांच्या अशाप्रकारच्या कितीतरी अभंगातून पारमार्थिक गोष्टीबरोबरच सूक्ष्म व्यवहारी दृष्टिकोन दिसतो. कर्मजागृती करण्याचे काम ते आपल्या अभंगातून करतात.

वारकरी संप्रदाय समाजात समतेचा आणि श्रध्देचा, ऐक्य भावाचा पुरस्कार केला. माणसाला माणूसपण शिकविणारा समाजोध्दाराची तळमळ असणारा हा भागवत धर्म लोकाभिमुख, समाजाभिमुख तसेच वैश्विक आहे. समाजात अध्यात्मनिष्ठ, मानवता, आध्यात्मिक लोकशाही धार्मिक समता प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संतांनी केले. परंपरागत असलेली वर्णव्यवस्था, सामाजिक विषमता यांचा स्वीकार संतांनी कधीही केला नाही. मात्र भागवतधर्मात आध्यात्मिक समता, मुक्त भक्ती, ईश्वरनिष्ठा प्रस्थापित केली. त्यामुळे सामाजिक विषमतेच्या वेदना किमान विठ्ठलाकडे मांडण्याचा, भावानुभवाची अनुभूती अभंगातून व्यक्त करण्याचा अधिकार संतांना मिळाला. जीवनातील दु:ख, वेदना विसरुन भक्तीमय एकोपा, अलौकिक सुख उपभोगण्याचा अधिकार त्यांना मिळाला. संतांच्या कार्याचे मूळ मानवतावादात आहे. संतांच्या काव्यामध्ये भावनात्मकता अधिक असून ती विठ्ठलनिष्ठ आहे. वारकरी पंथात संतकवी व संतकवयित्रींची तेजस्वी परंपरा आहे. स्वभावभिन्नतेप्रमाणे संतकवयित्रीच्या रचना भिन्न असल्या तरी 'स्त्री' म्हणून तिचे भावविश्व, स्त्रीमनाची स्पंदने, सामाजिक, कौटुंबिकच नव्हे तर सर्वच स्तरावरील तिचे जीणे याचे सूक्ष्म, सखोल, चिंतन, सल काव्यातून दिसून येते. ''महाराष्ट्रातील संतांनी वर्ण, लिंग, जात आणि स्त्री–पुरुष भेद अमान्य केला. न्यूनगंडाने पछाडलेल्या समाजात तसेच जनसामान्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. कीर्तने, प्रवचने, तीर्थक्षेत्रांच्या यात्रा आणि वाऱ्या यांच्याद्वारे लोकसंघटना बांधली; शिष्यवर्ग निर्माण केला. देशी भाषेचा स्वीकार आणि संतांचे जीवन व साहित्य यांचा लोकसंस्कृतीशी असलेला हा अनुबंध संतपरंपरेचा एक विलोभनीय विशेष आहे. म्हणूनच 'धर्मसुधारक' असलेले संत विशिष्ट अर्थी 'समाजसुधारक' बनले. महाराष्ट्रातील श्रेष्ठ संतांना अनुसरणाऱ्या संतकवयित्री याला अपवाद राहिल्या नाहीत.''[१०] त्या काळाचे, स्थितिगतीचे, विविध सामाजिक स्पंदनाचे प्रतिबिंब संतकवी आणि संतकवयित्रींच्या काव्यात पडले आहे. प्रबोधनाला काळाच्या मर्यादा नसतात. आधुनिक काळातील अशिक्षित, समाजहितैषी, प्रबोधन करणारे संत गाडगे बाबांनी संत तुकारामाचा रोखठोकपणा तसेच संतांच्या विचारांचा, अभंगांचा पाठपुरावा केला. ''गाडगे महाराजांनी आपल्या भजन–कीर्तन–निरुपणातून पुरोगामी विचारांचा पुरस्कार केला. त्यांनी अनेक देवदेवतांना भजणाऱ्या अज्ञानी लोकांना एका देवतेच्या पूजनाचा उपासनेचा संदेश दिला. चराचरात एकच देव भरुन राहिला असे ते निरुपणात पुन्हा पुन्हा सांगत. धर्मापलीकडचा अंतर्यामीचा देव त्यांना प्रिय होता. दाढीजटा वाढविणारे, लोकांच्या अंधश्रध्दांना खतपाणी घालणारे, बुवा बाजी करणारे, गंडेताईत देणारे साधू आणि मांत्रिक गाडगे महाराजांच्या टीकेचे लक्ष्य होते. मूर्तिपूजेपेक्षा दीनदुबळ्यांना, गोरगरिबांना अन्नदान करावे, त्यांना अन्न–वस्त्र व निवारा द्यावा म्हणून गाडगे महाराजांनी समकालीन समाजाला आवाहन केले. एका अशिक्षित संतांचे विचार, आधुनिक आणि तर्कनिष्ठ आहेत. त्यांच्या विचारांची झेप, त्यांची समाजप्रबोधनाची तळमळ आणि अपरिग्रह वृत्ती पाहिल्यावर आजचा बुध्दिवादी माणूसही आश्चर्यचकीत होतो. गाडगे महाराजांनी अंधश्रध्दानिर्मूलन, व्यसनमुक्ती, पशुहत्यानिषेध, मूर्तिपूजानिषेध, संततिनियमन, कुष्ठरोगनिवारण या विषयांना आपल्या कीर्तन–प्रवचनात स्थान दिले''[११]

आज प्रचंड गतीने वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न, बेरोजगारीचा प्रश्न आहे. भारतासारख्या महादेशातील बहुजन असहिष्णू समाजाच्या राष्ट्रीय ऐक्याचा आणि अस्तित्वाचाच प्रश्न आहे. जीवनाला आलेली गती पाहता वेळेचे संयोजन नि कामाचे नियोजन करीत शारीरिक आरोग्य, मानसिक स्वास्थ, स्त्री – पुरुष नोकरदार, मालमत्तेचे रक्षण, विभक्त परिवार, मुलांचे संगोपन व संस्करण असे एक ना अनेक प्रश्न आज निर्माण झाले आहेत. विज्ञान युगातील भौतिक ज्ञानाच्या कक्षा विस्तीर्ण झाल्या आहेत. मनु याने भौतिक विकास साधला आहे. मात्र त्यांच्यातील मानवीमूल्ये, समूहभाव, एकोपा, प्रेम, नीती, धर्म, सदाचार, समन्वय इत्यादी उदात्त जीवनमूल्याचा ऱ्हास होऊ नये म्हणून ती जतन करण्याचे कार्य हा संप्रदाय आज देखिल करीत आहे. गेल्या आठशे वर्षात अनेक राजवटी आल्या व गेल्या, स्थित्यंतरे, परिवर्तने, नैसर्गिक आपत्तीची अनेक आवर्तने आली. मात्र वारकरी संप्रदायाचे स्थान अढळ राहिले. हा संप्रदाय परंपरानिष्ठ तसेच व परिवर्तनशीलही आहे. या संप्रदायाला उच्चनिच, जाती पातीची बंधने चौकटी न मोडता अध्यात्म क्षेत्रात मात्र पूर्णमुक्त, समत्व सुख सोहळा अनुभवता आला.

संतकालीन परिस्थिती आणि आजची परिस्थिती यात महदंतर आहे. वर्णवर्गवाद, उच्चनीचत्व, भक्तिपंथाचे साधनेचे एकालेपण, समाजाचे दुभंगलेपण, बुध्दिभेद विषमता, स्वार्थद्वेष, असहिष्णुता, कर्मकांड यांचा बडिमार यादवकालीन समाजात असल्याने समाज दु:खी, व्यथित होता. ज्ञानदेवांनी त्या सर्वांसाठीच समन्वयवादाची अचूक उपाययोजना केली. त्यांच्या कार्याचे परिणाम नंतरच्या काळात सातत्याने उमटत गेले. महाराष्ट्राचे सांस्कृतिक, धर्मजीवन ज्ञानदेवादी संतकवी—संतकवयित्रींचे हे ऋण कधीही विसरु शकत नाही. संतांनी समाजाला कर्तव्यापासून दूर नेणारा पलायनवाद कधीही सांगितला नाही तर आध्यात्मिक मूल्यांच्या आधारे मानवतावादी विचारांचे मौलिक मूल्यच त्यांनी बहाल केले. संत साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक, परंपरा यांचा शोध घेण्याचे एकमेव चिरंतन साधन असून ज्ञानशाखांना आव्हान देवून भक्तिविचारतून समाज अधिक सक्षम करुन दाखविला आहे. विठ्ठल हा हरिहर, रामकृष्णहरी, विष्णुशिव असा एकेश्वर आहे. ज्ञानदेव—नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इतर संतकवी व संतकवयित्री तसेच गाडगे बाबा यांनी या भगवतभक्ती संप्रदायाला उदंड योगदान देऊन सफल—संपूर्ण व समृध्द केले. सांप्रदायिक मतभेदाला पायबंद घालून सामाजिक ऐक्यातून प्रबोधनकार्य केले.एकविसाव्या शतकात देखील मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजविणारे संत साहित्य आणि वारकरी संप्रदाय यापुढे जनमनात विराजमान राहील इतके सामर्थ्य त्यात आहे. वारकरी संतांच्या परिवर्तनवादी विचारांची उपयुक्तता व संतांचे परिवर्तनवादी साहित्य काल, आज आणि उद्या ही आपला अजरामर ठसा काळावर उमठविणार यात शंकाच नाही.

संदर्भ ग्रंथ सूची :—

१. गोसावी र.रा., ‘‘पाच भक्तिसंप्रदाय’’,प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००८, पृ.क्र. २०९
२. शेणोलीकर ह.श्री., ‘‘प्राचीन वाड्.मयाचे स्वरुप’’, मोघे प्रकाशन, पुणे, १९७५, पृ.क्र. ८७
३. गोसावी र.रा., ‘पाच भक्तिसंप्रदाय’, प्रतिभा प्रकाशन पुणे २००८, पृ.क्र. २३६.
४. डॉ. पठाण यू.म., ‘मध्ययुगीन संतसाहित्य—काही आयाम’ स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २००३ पृ.क्र. १९
५. सौ. सिन्नरकर मंगला, ‘‘सत्वाचा सागर’’, नरहरी सोनार, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९९०, पृ.क्र. २६,२७
६. कुलकर्णी गो.न., संतसाहित्य : काही निरीक्षणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९४ पृ.क्र. ४१
७. शेणोलीकर ह. श्री. ‘मराठी संतवाणीचे मंत्रास्त्व’ मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९० पृ.क्र. ४०
८. संपा. डॉ. मोहीते शिवाजीराव, ‘‘वारकरी संप्रदाय आणि संतसाहित्य संत साहित्य : काळाची गरज, कर्मवीर प्रकाशन, पूणे २००१, पृ.क्र. २७७
९. संत,समाज आणि अध्यात्म, वि. शं. चौघुले, मधुरा प्रकाशन, ठाणे २००६ पृ. क्र. ९३
१०. चौघुले वि.श., ‘‘संत, समाज आणि अध्यात्मा’’, मधुरा प्रकाशन, ठाणे, २००६, पृ.क्र. १२५
११. चौघुले वि.श., ‘‘संत, समाज आणि अध्यात्मा’’, मधुरा प्रकाशन, ठाणे, २००६, पृ.क्र. १९.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# मराठी साहित्यातील बदलते प्रवाह

डॉ. प्रीती किशोर उमाठे
मराठी विभागप्रमुख
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज नागपूर

## प्रस्तावणा –

मराठी साहित्य परंपरेत नव्या वाङ्मयीन प्रवाहांनी एक इतिहास घडविला आहे. त्या आधिच्या मराठी साहित्याला अनेक मर्यादा होत्या. त्या जातीच्या वर्गाच्या आणि लिंगभेदाच्या होत्या. त्याचप्रमाणे त्या परिसराच्या आणि भाषेच्याही मर्यादा होत्या. स्वातंत्र्यानंतर भारतीय जनमाणसात आमुलाग्र बदल झाला. तळागाळात प्रचंड जणजागृती झाली. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि स्वाभिमान हया मानवी मुल्यांची जाणीव झाल्यामुळे राष्ट्र समाज आणि व्यक्तिच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडून आला. नव्या वाङ्मय प्रवाहांनी या मर्यादा ओलांडून सीमोल्लघन केले. मध्यम वर्गाच्या बाहेर जाऊन समाजाच्या सर्व स्तरातील जीवनाचे वास्तव चित्रण केले. उच्चवर्णीय जातीच्या पलीकडे जाऊन अठरापगड जातीची सुखदुःखे त्यांनी समाजासमोर मांडली. 1960 नंतर महाराष्ट्राच्या समाज जीवनाला प्रचंड भरती आली वेगवेगळे सामाजिक स्तर आणि वर्ग आपले प्रश्न समोर घेऊन आले नगरांचे कुंपण ओलांडून हे साहित्य छोटया मोठया खेडयात गावकुसाबाहेर आणि आदिवासीच्या पाडयापर्यंत गेले. मराठी साहित्यात त्याने वास्तववादाचे आणि समाज वास्तवाचे पात्र रूंदावले संपूर्ण महाराष्ट्र चळवळमय होऊ लागला. हयांचे प्रतिध्वनी मराठी वाङ्मयात निनादू लागले. हयात साहित्याचा आशय विषय आणि अभिव्यक्ती वाङ्मयीन परंपरांना धक्के देणारी आणि सर्वस्वी निराळी होती. हया साहित्याच वेगळेपण लक्षात घेऊन त्याची चर्चा सुरू झाली. संमेलन, विशेषांक, परिसंवाद संघटना आणि संघटनांच्या शाखा हया माध्यमातून त्यांच्या साहित्याची तरफदारी सुरू झाली. त्यामुळे मराठी वाङ्मयात अभुतपूर्व जागृती निर्माण झाली. मध्यमवर्गीय मराठी लेखकाच्या त्याच त्या अनुभवांमूळे मराठी साहित्यात साचलेपणा निर्माण झाला होता त्या साचलेपणाला पहिला हादरा नवसाहित्याने दिला. त्यामुळे साहित्यामध्ये ढवळाढवळ सुरू झाली नवलेखकाचा बिनधास्तपणा आणि बेडरपणा हयामुळे वाचक विस्मयचकित झाला नवसाहित्यातील विद्रोह आणि नवेपणा वाचकास वेगळा वाटला दलित, शहरी आणि ग्रामीण कष्टकरी आणि स्त्रींया यांची अस्वस्थता, असंतोष वेगवेगळया प्रकारांनी प्रकट होत गेली या नवलेखकांचे साहित्य, त्यांच्या चळवळी त्यांची संमेलने, मेळावे, संघटना, त्यांची नियतकालीके त्यांच्या नव्यानव्या लाटांनी हा काळ गजबजून गेला.

इ.स. 1860 ते 1980 हया काळाच्या चैतन्याने नवे वाङ्मयीन प्रवाह उदयास आलेले दिसतात त्यावर नजर टाकली असता मराठी वाङ्यमयाचा अभुतपूर्व कायापालट होताना जाणवते. दलित साहित्य, ग्रामीण

साहित्य स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य ख्रिस्ती साहित्य, मुस्लिम साहित्य, बालसाहित्य, विज्ञान साहित्य, कामगार साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य, जन साहित्य आणि समकालिन साहित्य असे विविध प्रवाह हया प्रवाहातील वाङ्मय प्रकार हया बरोबरीने होणारे वाङ्मय प्रयोग हयांमुळे अन्य प्रादेशिक भाषांमध्ये मराठी भाषेतील साहित्य सकस आणि समृध्द झाल्याचे दिसते. प्रस्तुत शोधनिंबधातून नवीन साहित्य प्रवाह आणि नव प्रवृत्तीचा आढावा घेतलेला आहे.

**1) ग्रामीण साहित्य प्रवाह** – मराठी साहित्याच्या क्षेत्रात तसेच महाराष्ट्रात 1970 च्या आसपास बदल होऊ लागले त्याचे पडसाद साहित्यावरही उमडू लागले तसे पाहता महात्मा फुले यांच्या काळापासून ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. 1920 नंतरच्या ग्रामीण साहित्याची नावीन्याचा भाग म्हणून का होईना दखल घेतली गेली. ग्रामीण साहित्याचा स्वतंत्र असा साहित्य प्रवाह आकारण्यापूर्वी देखील ग्रामीण जीवनावरील साहित्य विविध वाङ्यमय प्रकारांमध्ये निर्माण होत होते. या प्रवाहातील साहित्य अगोदर निर्माण झाले व नंतर त्याला ग्रामीण हे विषेषण लावल्या गेले. 1925 च्या दरम्यान उदयाला आलेल्या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा एकुण मराठी साहित्यापेक्षा अनेक बाबतीत वेगळया असलेल्या दिसतात. ग्रामीण साहित्य हे दलित, आदिवासी, स्त्रीवादी, साहित्य या सर्वांमध्ये सामावलेले दिसते. त्यामुळेच ग्रामीण साहित्याची एक विषिष्ट दिषा शोधणे कठीण आहे. साहित्याच्या क्षेत्रात घडणारी कोणतीही लक्षवेधक घटना ही सामाजिक सांस्कृतिक व वाङ्मयीन कारणे व त्याच्या परिणामातून घडत असते. कोणताही प्रवाह हा उद्रेकातूनच पूढे जात असतो. ग्रामीण साहित्यदेखिल त्याला अपवाद नाही. प्रारंभीच्या काळात ग्रामीण साहित्याचा गाभा प्रवका नव्हता 1975 नंतर झालेली संमेलने चर्चा वैचारिक भूमिका मांडणारे ग्रंथ व मराठी ग्रामीण साहित्यपरिषदेच्या संस्थात्मक पातळीवर स्पष्ट विचार केल्यानंतर ग्रामीण साहित्याला एक महत्वाचे अधिष्ठान प्राप्त झालेले दिसते. मराठी ग्रामीण साहित्याचा विचार करताना सामाजिक जडणघडण लक्षात घेणे आवश्यक ठरते. मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण आधुनिक मराठी साहित्याच्या प्रारंभापासूनच थोडयाफार प्रमाणात आलेले दिसते. केषवस्तुतांच्या “एक खेडे गोष्टी घराकडिल”“मी वदता गडया रे” अषा कवितामधून आलेले आहे सुरूवातीला ग्रामीण जीवन हे कवितेतून घडत असले तरी नंतर मात्र कथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारातून ग्रामीण जीवनाचे – चित्रण रेखाटले जाऊ लागले. ग्रामीण साहित्याचे मुळ विविधतेने नटलेले ग्रामजीवन आहे त्याची जाणीव जेव्हा ग्रामीण लेखकांना झाली तेव्हा त्याचे साहित्य हे अधिक वास्तव व जीवनवादी झाले. ग्रामीण जीवनाचा आत्मा असलेली शेती आणि ती करणारे शेतकरी हा ग्रामीण म्हणून उल्लेख करता येईल असे साहित्य निर्माण झाले. यामध्ये प्रामुख्याने व्यंकटेष माडगूळकर, शंकर पाटील द.मा. मिरासदार, रणजित देसाई, उध्दव शेळके या साहित्यिकांचे ग्रामीण साहित्य लक्षवेधी ठरते.

**दलित साहित्य** – मराठी साहित्यात 1980 नंतर अनेक साहित्य प्रवाह उदयाला आले त्यात दलित साहित्य प्रवाह हा लक्षवेधी प्रवाह ठरला आहे. भारतीय दलित साहित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेच्या पायावर उभे आहे. दलित साहित्याचा उदय हा मराठी साहित्यातच नव्हे तर भारतीय साहित्यात एक नवे अनुभवविश्व व एक मुल्यात्मक संवेदना देणारी घटना आहे. या साहित्याच्या जीवन दर्शनाने व वैचारिक तत्वज्ञानाने सामान्य माणसाचे जीवन बदलून टाकले. सामान्य माणसाला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली त्याला त्याच्या शोषणाचा वेध घेण्याची प्रेरणा दिली. दलित लेखकांनी आपल्या अनुभवांवर आधारलेल्या साहित्याचे नवे दालनच उघडून समोर ठेवले.

दलित साहित्य 1960 पासून निर्माण होऊ लागले 2 मार्च 1958 साली महाराष्ट्र दलित साहित्य परिषदेचे पहिले साहित्य संमेलन मुंबईत बी.सी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. अण्णाभाऊ साठे उदघाटक होते. त्या संमेलनात 'दलित साहित्य' हे नाव स्थिर झाले. सर्वांनी दलित साहित्य याच संकल्पनेचा स्वीकार केला वेदना, विद्रोह व नकार ही दलित साहित्याची मूल्ये आहेत.

दलित साहित्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, निबंध, समीक्षा, स्वकथन, (आत्मचरित्र) व ललित निबंध इत्यादी विविध वाङ्मय प्रकार आहेत हे सगळे वाङ्मयप्रकार विविध प्रतिभावंतानी आपल्या सृजनषील निर्मितीव्दारे समृध्द केले. दलित साहित्यात परिवर्तनवादी जाणिवांची अभिव्यक्ती आढळते सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवनातील विविध स्पंदने दलित साहित्यात आढळतात नवी जीवनमूल्ये व नवी वाङ्मयमूल्ये यांचा आकृतीबंध सर्व प्रकारामधून व्यक्त झाला आहे नवे जीवन अनुभव जगण्यातून आल्यामूळे दलित साहित्यांचे स्वरूप मुल्यदर्षी झाले आहे. दलित साहित्याचा उगम मराठी भाषेत झाला आणि भारतातील विविध प्रातिक भाषांमधून तो विकसित होत आहे. या दलित साहित्य प्रवाहाला मानवतावादी, लोकशाहीवादी, परिवर्तनवादी अषा तात्विक नावाने संबोधता येईल.

**स्त्रीवादी साहित्य** – स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा आपल्याकडे पाष्चिमात्य विचारसरणीतून आला असला तरी स्त्रीवादात अभिप्रेत असलेला स्त्री–पुरूष समानतेचा विचार गेल्या 300 वर्षात हळूहळू उत्क्रांत होत गेलेला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतून पुढे आलेला 1789 चा मानवी हक्कांचा जाहिरनामा स्त्रीवादी विचारांना प्रेरक ठरला. 1948 मध्ये अमेरिकेतील गुलामगीरीविरूध्दच्या लढयात सहभागी झालेल्या स्त्रियांनी स्त्रियांच्या हक्काचा राजीनामा घोषित करून मालमत्तेत समान वाटा आणि षिक्षण व रोजगारांच्या समान संधीची मागणी केली भारतातही 19 व्या शतकात स्त्रियांच्या या अवस्थेला पुरूषनिर्मित मूल्यव्यवस्थाच कृषी जबाबदार आहे. याचा उहापोह करणारा 'स्त्री पुरूष तुलना' हा निबंध ताराबाई षिंदे यांनी लिहिला. या निबंधात स्त्रीपुरूष समानतेची

विवेकवादी भुमिका मांडली 1929 चा सतीबंदी कायदा. 1856 चे भारतीय विधवा पुनर्विवाहाचे विधेयक, 1860 चे संमती वयाचे बील हे राजकीय निर्णय स्त्रीवादी चळवळीचे आविष्कार आहेत असे म्हणता येईल.

**मुस्लिम आणि ख्रिस्ती साहित्य** :– भारतीय इतिहासात मुस्लिम साहित्याचा 14 व्या शतकापासुनचा प्रदिर्घ इतिहास आहे. पण भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात षिक्षण प्रसारामुळे दलित ग्रामीण मुस्लिम समाजात हळूहळू निर्माण होत गेला. त्या नंतर महात्मा फुले यांच्या वैचारीक प्रेरणेने त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन 1970 सालीहमीद दलवाई यांनी मुस्लिम सत्यषोधक मंडळाची स्थापना केली. त्यांनी प्रबोधनवादी विचार मांडला मराठी भाषेचा आग्रह धरला. मेळावे, परिषदा यांच्या माध्यमातून प्रबोधनकार हमीद दलवाई यांनी मध्यमवर्गीय मुस्लिम बांधवांना विचार करायला भाग पाडले. मुस्लिम मराठी साहित्य ही संज्ञा रुढ होण्याचे दुसरे कारण असे आहे की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच भारतीय समाजातील विविध समाज घटकात अस्तित्व रक्षणाची आणि आत्मविकासाची जाणिव तिव्र होत गेलेले आहे. मुस्लिम समाज हा भारतीय समाजाचा एक घटक आहे. अनेक मुस्लिम मराठी लेखकांनी मुस्लिम समाजातील आपला जातीस्तरावरील जानिवा, इथल्या मुळच्या संस्कृतीषी असलेल्या आंतरिक नाते सबंधिच्या जाणिवा आपल्या लेखनातुन मांडला आहे. या संदर्भात प्रा. मुमताज रदिभतपुरो, प्रा. अजीत नदाफ, प्रा जावेद कुरेषी या मुस्लिम साहित्यीकांनी आपल्या साहित्य निर्मितीतुन मुस्लिम मानसिकतेचे चित्रण केले आहे.

मराठी साहित्यावर ख्रिस्ती साहित्याचे फार मोठा ऋण आहे. कारण आधुनिक मराठी साहित्याचा उदय आणि उगम ख्रिस्ती साहित्यातून झाला आहे. मराठी साहित्याच्या आज दिसणाऱ्या वटवृक्षाचे बीजारोपण महाराष्ट्रात आलेल्या ख्रिस्ती बांधवांनी केलेले आहे. मराठी भाषेतील ख्रिस्ती लेखकाचे पहिले पुस्तक 'मॅथ्युज शथु वर्तमान' हे 1905 मध्ये प्रकाषित झाले. ख्रिस्ती धर्माचा आषय विषय असलेले 'ख्रिस्त पुराण' हे दहा हजार श्लोकांचे महाकाव्य फादर स्टीफन्स या पोर्तुगीज महाकवीने लिहिले आहे. हे पुस्तक ज्ञानेश्वरी इतके सरस आहे व उच्च दर्जाचे आहे.

**आदिवासी साहित्य** :– 1980 नंतर उदयास आलेल्या नवसाहित्यात आदिवासी साहित्य प्रवाह नवलेखकांसाठी आणि मराठी साहित्य निर्मितीसाठी अतिषय महत्वाचा मानला जातो. स्वातंत्र्यानंतर भारतातील सर्व मुळ रहिवासी जमातींना आदिवासी या नावाने संबोधले जाऊ लागले. आदिवासी हा शब्द विषिष्ट पर्यावरणात राहणाऱ्या विषिष्ट भाषा बोलणाऱ्या विषिष्ट जीवन पद्धतींनी व परंपरांनी नटलेल्या आणि शेकडो वर्ष जंगल पहाडात जीवन जगत असतांना आपली धार्मिक आणि सांस्कृतिक मुल्ये जोपासणा—या मानव समुहाची ओळख करुन देण्यासाठी वापरला जातो. अनेक भारतीय आणि पाष्चात्य समाजषास्त्र व विचारवंतांनी 'आदिवासी कोण?' या

संबंधी सविस्तर चर्चा केली आहे. त्यात गिलीन व गिलीन बोगार्डस, जे पेरी, डी. एन. मुजुमदार, डॉ. गुरुनाथ नागमोडे इ. नावाचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल.

षिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे हा समाज थोडाफार षिक्षणाने आदिवासी तरुणांमध्ये जोर धरु लागला आहे. या जीवनाची चिरवेदना नवपिढीतील आदिवासी तरुनांच्या संवेदनषील मनाला घायाळ करू लागला आहे. त्या—साठी आदिवासी साहित्याचे स्वतंत्र्य व्यासपीठ निर्माण होऊ लागले. 10 नोव्हेंबर 1979 या दिवषी चंद्रपुर जिल्हातील भद्रावती या प्राचीन ऐतिहासीक नगरात आदिवासीचे पहिले साहित्य संमेलन सुरु झाले. आदिवासी साहित्य प्रवाहामुळे आज शेकडो वर्ष उपेक्षित, वंचित असणारा समाज साहित्यिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला हे आदिवासी साहित्याचे योगदान आहे.

**कामगार साहित्य** :— आजच्या भारतीय साहित्यात किंवा मराठी साहित्यात दबलेले, वंचित राहिलेले काही सामाजीक घटकांना त्यांच्या प्रष्नांना न्याय मिळवून देण्यासाठी उदयास आलेले साहित्य म्हणजे कामगार साहित्य होय. आधुनिक मराठी साहित्याचे वय आणि कामगार वर्गाचे वय जवळपास सारखेच आहे फार तर शंभर—सव्वाषे वर्षाचे आहे. महाराष्ट्राच्या नकाषावर कारखाण्याची धुरांडी उभी राहीली व त्यांच्या दारावर समाजातील सर्व थरातील श्रमिकांचे जत्थे श्रम विकण्यासाठी उभे राहु लागले. त्यांचे हात यंत्राषी बांधले गेले. अषा रीतीने श्रम विकणाऱ्यांची एक फौज जी पूर्वी असंघटीत किंवा संख्येने कमी होती ती इथे संघटीतपणे उभी राहिली. आठ ते दहा तास यंत्राच्या सानिध्यात काम करणा—या नवनिर्मिती करणा—या कामगारांनाही मन, भावना असतात याची जाणीव करून देणारे साहित्य मराठीत निर्माण होऊ लागले. यात प्रामुख्याने नारायण सुर्वे यांनी कामगार साहित्याला मुख्य प्रवाहात मानाचे स्थान मिळवुन दिले. पुढे त्यांचा वारसा कामगार कवी अरुण काळे, कैलास पगारे इ. अनेक कवी लेखकांनी आपल्या लेखनातुन कामगार साहित्य निर्मिती केली आहे.

इ.स. 1860 ते 1980 या काळात चैतन्याने नवे वाङमयीन प्रवाह जोमदारपणे पुढे येतांना दिसतात त्यात प्रामुख्याने भटक्या विमुक्तांचे साहित्य,

विज्ञान साहित्य, जनसाहित्य, बालसाहित्य इ. नव्या वाङमयीन प्रवाह उदयास आले. विज्ञान साहित्यांची संकल्पना डॉ. जयंत नारळीकरांनी मराठी साहित्यात आणली. नारळीकरांनी आजपर्यंत सुमारे बीस विज्ञानकथा आणि एक विज्ञान कादंबरी असे लेखन केले आहे. विज्ञान हे जिज्ञासेतून निर्माण झाले. विज्ञानामुळे अकालनिय गोष्टी समजायला मदत होईल हे त्यांच्या साहित्यामागिल उद्देष होते. भटक्या—विमुक्त जमातीविषयी सध्या जे साहित्य लिहिले जात आहे त्यामध्ये आत्मकथनांची संख्या लक्षात घेण्यासारखी आहे. भटक्या—विमुक्त जमाती विषयी साहित्य निर्मितीत प्रामुख्याने लक्ष्मण माने, उत्तम कांबळे,ना. धो. कदम, मोतिराज राठोड, लक्ष्मण गायकवाड यांचा समावेष आहे. बालसाहित्य ही गेल्या काही दषकापुर्वी उदयाला आलेली संकल्पना आहे. लहान

मुलांसाठी गोष्टी, गाणी, पषुपक्षी, चंद्रतारे, उन, पाऊस या सगळयांषी जगण्याचा अनुबंध जातो त्यात प्रामुख्याने मालतीबाई दांडेकर, श्री गोपीनाथ तळवलकर, सोहनलाल व्दिवेदी यांच नाव घेता येईल.

प्रस्तूत शोधनिबंधात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रिवादी साहित्य, मुस्लिम ख्रिस्ती, आदिवासी, कामगार, विज्ञान, बालसाहित्य, जनसाहित्य इ. नवे वाङमयीन प्रवाहांचा विचार केलेला आहे. एक संवेदनषील माणूस म्हणुन समकालीन वास्तवाला प्रतिसाद देण्याच आणि जनजीवनात नवी चेतना निर्मिण्याचे सामर्थ्य लेखकाजवळ असते लेखक साहित्यातुन एका नव्या जगाची मांडणी करित असतो. त्याची साहित्य निर्मिती ही त्याच्या जगण्याषी जोडलेली असते. साहित्य आणि जीवन या दोन्हीवर व्रतस्थ निष्ठा लेखकच करु शकतो.

**संदर्भ सूची –**


1. डॉ. शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह
2. डॉ. वासुदेव मुलाटे – नवे साहित्य – नवे आकलन
3. डॉ. नागनाथ कोतापल्ले, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध
4. गणेश देशमुख : मराठी ग्रामीण साहित्य : विचार आणि चळवळ, आमची श्रीवाणी
5. मा. रा. लामखेडे गौरव ग्रंथ – चळवळ आणि साहित्य
6. भालेराव विमल : आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रीयांची आत्मचरित्रे

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# सामुदायिक प्रार्थनेमागील राष्ट्रसंताची भुमिका

प्रा. डॉ. सिध्द्राम किशनराव मुंडे
श्री. गजानन महाराज महाविद्यालयमुकुटबन, ता. झरीजि. यवतमाळ

भारत ही संत आणि समाजसुधारकांची भूमी आहे. 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूमी' यामध्ये मानवी कल्याणाला प्रमेय मानून समाजसुधारणेसाठी कष्ट उपसण्याची एक अलिखीत जाणीव दिसते. ज्या महाराष्ट्राच्या मातीत ज्ञानदेवाने वारकरी संप्रदायाचा पाया रचून कळस होण्याचे भाग्य तुकोबाने प्राप्त केले. त्याच संत परंपरेचा वारसा २० व्या शतकात वैराग्यमुर्ती गाडगेबाबा आणि वंदनिय तुकडोजी महाराजांनी चालविला. संत हे उपेक्षेचे साधन नसूर समाजाच्या विकासासाठी जन्माला आलेले गुणकारी औषधासम असायला हवे याची जाणीव या संतपरंपरेने आपल्या पुढ्यात टाकली. आम्हाला मस्तकी टिळा लावून समाजाला अधोगतीच्या मार्गाने नेणारा संत अभिप्रेत नसून जो समुदायाच्या कल्याणासाठी रात्रंदिवस देह झिजवितो त्यामुढे आम्ही नतमस्तक झाले पाहिजे. याच परंपरेचे एक पाईक म्हणून राष्ट्रसंताकडे आम्हाला पाहावे लागते.

राष्ट्रसंतानी अनुभव आणि तात्विक विवेचन यांची सांगड घालून मानवी कल्याणासाठी जन्माला घातलेला अमूल्य ग्रंथ म्हणजेच ग्रामगीता होय. मानवाला जीवन जगतांना ज्या विदायक परिस्थितीशी तोंड द्यावे लागते, जे विचार घेऊन सुख दुःखाचा उलगडा करावा लागतो अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे 'ग्रामगितेमध्ये आपल्याला सापडतात. हा मानवी देह स्वकल्याणासोबत परोपकारासाठीही कशाप्रकारे झटला पाहिजे, नरदेहाची संकल्पना कोणती ? यांसारख्या औचित्यपूर्ण प्रश्नांची उत्तरे 'ग्रामगितेंच्या पानोपानी दडलेली आहेत. ग्रामविकासापासून जगाच्या विकासापर्यंतची मौलिक सूत्रे राष्ट्रसंत सांगतात. मानवी श्रम हे या पृथ्वीतलावरील सर्वश्रेष्ठ मूल्य असून जीवनाची सुंदरता त्यामध्ये दडलेली आहे. देह विकास आणि बौध्दिक विकासालाही श्रमाचे पाठबळ मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

"देशात कामाचा उभा डोंगर । दारिद्र्य दुःखाचा वाटतो पूर ।
अर्धनग्न अर्धपोटी लोक अपार । त्यांचे दुःख कां न दिसे ? ।।३१।।
येथे विश्रांतीसि नाही वेळ । निरंतर कार्यकर्ते प्रबळ ।
पाहिजेत ठायी ठायी सकळ । काम ऐसे देशापुढे ।।३२।।[१] (ग्रामगीता, अ. १८,श्रमसंपत्ती)

असे जेव्हा राष्ट्रसंत 'ग्रामगीतेतून चिंतन मांडतात तेव्हा त्यांच्यासमोर कोणती चिंता प्रत्यक्षपणे प्रश्नाचे स्वरूप घेऊन उभी होती याचा उहापोह होतो. दारिद्र्यातून जन्माला आलेल्या अर्धनग्न, अर्धपोटी लोकांच्या जीवनातून दुःखाचा महापूर कमी झाला पाहिजे, म्हणून ठिकठिकाणी प्रबळ कार्यकर्ते देशात निर्माण करण्यासाठी त्यांची निरंतरपणे धडपड चालली होती. लोकांचा (समुदायाचा) विकास हेच त्यांच्या समाजसेवेमागील भुमिकेचे सूत्र होते.

**राष्ट्रसंताची सामुदायिक प्रार्थना कुणासाठी ?**

पृथ्वीतलावरील सर्व जाती–धर्म आणि पंथाच्या लोकांनी कोणत्याही आधारावर परस्परांमध्ये भेदभाव न करता गुण्यागोविंदाने नांदावे यासाठी राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थना लिहिली. ती गोरगरीब मजुरापासून तर महालामध्ये राहणाऱ्या गर्भश्रीमंत माणसांकरीताही आहे. त्यामध्ये मानवतावादी धर्म विकसीत करून सद्‌भावनेचा विचार प्रत्येकाच्या अंगी रूजावा हा गर्भीत इशारा ते देवु इच्छितात. अर्थात अज्ञानी राहून जो व्यक्ती नशिबाला दोष देऊन अपयशाचे खापर फोडतो त्याचा निराशावादी दृष्टिकोन बदलून सकारात्मता प्रवृत्ती वाढीस लागावी या उद्देशातून राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थनेवर भर दिल्याचे जाणवते.

'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे । दे वरचि असा दे ।।' ही आपुलकीपणाची भावना प्रत्येक मानवाच्या मनात पाझरून त्याने स्वकल्याण आणि समाजकल्याणाचा मार्ग अंगिकृत करावा यासाठी गुरूदेवाजवळ ते प्रार्थना करतात. मानवातील भेदभाव गळून प्रत्येकाच्या मनोमनी –

"गुण–धर्म दुनियामें बढे । हर जीव से कर्तव्य हो ।
गंभीर हो सबके हृदय । सच ग्यान का वक्तव्य हो ।
यह दुर हो सब भावना । हम निच है, अस्पृश्य है"।[२] (प्रार्थनाष्ठक)

हा विचारभाव रूजावा यासाठी राष्ट्रसंतानी सर्व मानवजातीच्या विकासाचा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून सामुदायिक प्रार्थना लिहिली. अर्थात ज्ञानेश्वरांनी सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी जे पसायदान मागितले तेच राष्ट्रसंतानी प्रार्थनेतून गुरूदेवाजवळ जगाच्या भल्यासाठी मागितले. त्यामुळे साहजिकच त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेचा कणा 'सब मानवों से प्रिती । उद्योगशिल निती।' या अंगाने कल्याण, समृध्दी आणि प्रेम – ज्ञानाचा मार्ग सोयीस्कर करण्याची सूत्रे मांडणारा आहे.

**सामुदायिक प्रार्थनेची व्यापकता आणि जीवनज्ञान :–**

राष्ट्रसंतांनी 'सामुदायिक जीवनाची व्यापकता 'या विषयावर केलेल्या प्रवचनातून मानवी जीवनाचा ज्ञानप्राप्तीशी आणि समुदायाशी कशाप्रकारे संबंध येत असतो यावर खोलवर चिंतन केले होते. वरपांगी 'आपण कुणावरही अवलंबुन नाही' असे मानसाला वाटत असले तरी त्याची ही कल्पना पूर्णतः चुकीची आहे हे त्यांनी पटवून दिले. आपण बाजारातून एखादा कपडा जरी विकत घेतला तरी त्यामागे कापूस पिकविणारा, वेचनारा, कातणारा, विणणारा, धुणारा असे किती तरी लोकांचे हात लागलेले असतात. या साऱ्यांच्या श्रमातून कपड्याची निर्मिती झाली. नेमका हाच संदेश 'सामुदायिक' या शब्दमय प्रतिमेतून अभिव्यक्त होतांना दिसतो. अर्थात परस्परांच्या सहकार्यात्मक जाणिवेतून सामुदायिक व्यवहाराचा विकास होत असतो. हीच बाब पटवून देण्यासाठी इ. स. १९५८ मध्ये ब्रम्हपुरी येथील जनतेला संबोधित केलेल्या प्रवचनात राष्ट्रसंतांनी, "आपली सामुदायिक प्रार्थना म्हणजे सामुदायिक जीवनाचे ज्ञान मिळविण्याची शाळा आहे. जगात अनेक हेतूंनी अनेक शाळा चालविल्या जात आहे. ब्रम्हविद्येच्या शाळा आहेत. व्यवहार विद्येच्या शाळा आहेत. प्रत्येक विद्येसाठी एकेक शाळा असते त्यानुसार आपली सामुदायिक प्रार्थना हीसुध्दा एक शाळा आहे. मंदिर आहे. अशा प्रकारची सामुदायिक भावना आम्हाला कशी मिळेल. सामुदायिकतेशी आमचा संबंध काय आहे. या गोष्टीचा विचार आम्हाला केला पाहिजे. एकांतात जीवन घालविणाऱ्या माणसाचाही सामुदायिक जीवनाशी संबंध येत

असतो. मग समाजात राहणाऱ्या माणसाविषयी बोलण्याची आवश्यकता काय ?"[३] असा प्रश्न जनतेला करीत त्यावर प्रार्थनेसारखा उपायही सुचविलेला आहे. त्यामुळे व्यक्तीने 'मी कोणाचे काही घेतले नाही, मला कोणाचे काही देणे नाही' या भ्रमात न जगता आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, समाजाच्या उत्कर्षासाठी आपला जन्म झाला आहे ही भावना मनात निर्माण व्हावी हा 'सामुदायिक प्रार्थने'मागे राष्ट्रसंतांचा मुख्य उद्देश होता. अर्थात मानवी जीवन उच्चतम बनविण्यासाठी पहिल्यांदा आपले व्यवहार परमार्थमय होण्याची गरज वेळोवेळी आपल्या भाषणातून पटवून देण्यावर जोर दिलेला दिसतो.

**राष्ट्रसंताची सामुदायिक प्रार्थनेमागील भूमिका** :—

राष्ट्रसंतांच्या सामुदायिक प्रार्थनेचा घटक हा भंगी, चांभार, कुंभार, ब्राम्हण या साऱ्याच जातीधर्मावर आधारलेले लोक आहेत. मात्र त्यांच्यामध्ये जातीधर्मातील उचनिचतेचे भेदभाव न होता दलितांना मदतीचा हात देण्यासाठी साऱ्यांनी धडपडले पाहिजे, कारण मानव हा या पृथ्वीतळावरील सर्वात श्रेष्ठ प्राणी आहे, याअर्थी तो सर्वांचा संरक्षक व्हावा अशी त्यांच्याकडून देवाचीसुध्दा अपेक्षा असली पाहिजे. आपल्यापेक्षा जे मागासले, दलित, दु:खी आणि अपंग, रंजले—गांजले आहेत अशांना मदतीचा हात देऊन त्यांना उन्नत करणे हे माणसाचे बुध्दिवान प्राणी म्हणून आद्य कर्तव्य आहे याची जाणीव प्रत्येकाच्या मनात निर्माण करण्याचे एक यशस्वी साधन म्हणून राष्ट्रसंत सामुदायिक प्रार्थनेकडे आशावादाने पाहतात.

पुराणामध्ये देवाला जागृत करण्यासाठी प्रार्थनेचा वापर केल्याचे दिसते. परंतु सदैव जागृत असणाऱ्या देवाला जागवण्यासाठी प्रार्थना नाही, तर आपल्यातील सुप्त देवत्व जागवण्यासाठी तिचा उपयोग आहे. या दृष्टीने पहिल्यास प्रार्थना हाच देव असून त्याच्या संसर्गाने जीवही देवपणास होतो. त्यामुळे प्रार्थना व प्रार्थनेचा देव हे भिन्न नसून कुणी, कुणाची आणि कशाकरीता प्रार्थना करायची याचे उत्तर व्यक्तिपरत्वे भिन्न असू शकते असे राष्ट्रसंत म्हणतात. यातूनच आमच्यातील काही लोकांमध्ये देवाविषयी अविश्वास उत्पन्न करून घेतलेला आहे. ज्याला आपण देव देव म्हणतो ते सुध्दा शेवटी मानवाच्या अंगी असलेले सद्‌गुण होय. असंम्य सद्‌गुण जेव्हा मानवाच्या ठिकाणी त्याच्या वागण्याबोलण्यातून लोकांना प्रत्ययास येतात त्यालाच आपण देवपण बहाल करीत असतो. हे सद्‌गुण विनम्रपणा अंगी बाळगून श्रध्देच्या ठिकाणी प्रार्थना केल्यास जीवन सफल होत असते. राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थनेमागील सर्वकष दृष्टीकोनातून आपली भूमिका विशद करतांना, "आजच्या परिस्थितीत जनतेत खरे जीवन नि धर्मतेज निर्माण करावयाचे तर, सर्वसाधारण अशा भूमिकेवरच सर्वांना एकत्र आणून, त्यांच्या ह्रदयातील भावनांरूप तारा हळूवारपणे छेडीत त्यांच्यात सुसंवादित्व निर्माण केले पाहिजे. त्यांच्या सद्‌भावनेच्या पातळीवरच सर्व कार्याची बैठक पक्की केली पाहिजे. जी काही कोमल अथवा कठोर भावना त्यांच्यात निर्माण करावयाची असेल ती या मार्गानेच आज सुगमपणे अभिव्यक्त करता येईल आणि तीच अधिक परिणामकारक व दृढमूल होईल. हे सर्व विचार समोर ठेवूनच ही सामुदायिक प्रार्थनेची योजना पुढे मांडण्यात आली आहे."[४] हे प्रयोजन त्यांनी नजरेसमोर ठेवल्याचे निदर्शनात येते.

सर्व जातीधर्माच्या लोकांनी एका विशिष्ट दिवशी, एकाच वेळी, एकाच भावनेने हाक देता यावी आणि खेड्याचा, शहराचा, देशाचा विकास नियोजितपणे साध्य करता यावा या भावनेतून राष्ट्रसंतांनी कार्तिक पौर्णिमेचा दिवस सामुदायिक प्रार्थनादिन म्हणून निश्चित केला. या दिवशी गावकऱ्यांनी सकाळी उठून उत्साहवर्धक वातावरणात आपापले गांव स्वच्छ करावे. त्यानंतर स्वच्छ

कपड्यानिशी सकाळी रामधुन व सायंकाळी नित्याच्या पध्दतीप्रमाणेच सामुदायिक प्रार्थना करून सर्वांना सेवामंडळाचे तत्त्वज्ञान समजावून अत्यंत गंभीरतेने कार्यक्रम आटोपता घ्यावा अशी विनम्रपणे सुचना राष्ट्रसंतांनी त्यावेळी केली होती. या प्रार्थनेचा मुळ उद्देश माणसे जोडून त्यांच्या वागण्या–बोलण्यात परिवर्तन घडून यावे, समाजातील लोकांमध्ये आपापसात असलेले वाद संपुष्टात येऊन खेळीमेळीचे वातावरण तयार व्हावे, लोकांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती होऊन ग्रामविकास, देशविकास व्हावा ही निरपेक्षतावादी भावना त्यांनी सर्वांकडून जोपासली होती. परस्परांशी बंधूभावनेने शांतिसुख भोगीत आयुष्य सफलरित्या पुर्णत्वाकडे जाव एवढी व्यापक आणि आशावादी अपेक्षा 'सामुदायिक प्रार्थनेंतून जगनियंत्यास करतात. हा जगनियंता, ईश्वर म्हणजेच सद्‌गुणी विचारांचा परिपाठ होय.

राष्ट्रसंतांनी आपल्या अनेक भाषणरूपी विचार आणि साहित्यातून विश्वबंधुत्वाची कल्पना मांडली आहे. 'सामुदायिक प्रार्थनेतून मानवाच्या अंगी विश्वबंधुत्वाची जाणीव जन्म घेत असते. समान न्याय हक्काच्या झेंड्याखाली अखिल विश्वाचा मानव सुखी, समृध्द आणि ज्ञानसंपन्न बनून पृथ्वीवर स्वर्गलोक अवतरावा यासाठी राष्ट्रसंताची एकसारखी धडपड लोकांच्या अंगी आणू इच्छितात. यादृष्टीने मानवाच्या सर्वांगीण उन्नतीच्या शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रार्थनेकडे पाहिल्यास त्यापाठीमागे दडलेल्या आशयाचे खरे रंगरूप आपल्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही. जगण्याच्या व्यवहारात कटुता उरी घेऊन वागल्यामुळे शत्रुत्व निपजते. अशावेळी मानवाच्या अंगी 'सामुदायिक प्रार्थनेंचे बीज खोलवर रूजावे म्हणून 'विश्वधर्माची एक नवी जाणीव राष्ट्रसंतांनी करून दिली. त्यात ते म्हणतात, "अनेक प्रकारच्या साधनांद्वारे जगातील मानव परस्परांच्या सानिध्यात आला त्याला प्रेमरज्जूंनी बांधून सुखी आणि समृद्ध करावयास पाहिजे. सर्व धर्मातील लोकांनी प्रेमपुर्वक सहकार्याने क्रूर प्रवृत्तींना जगातून कायमचे नाहिसे करावयास हवे. सर्व राष्ट्रांनी समजूतदारपणे विश्वबंधुत्वाला आपलेसे केले पाहिजे की ज्यामुळे मानवतेची मूर्ती साकार होईल. संहारक प्रवृत्तीचा त्याग करून वरील उपदेश आपण सर्व धर्मातील लोकांनी आपल्या धर्म बांधवांना दिला पाहिजे."[५] हा मानवतावादी धर्मच मानवाच्या व्यवहारातून सृष्टीचे नंदनवन निर्माण करण्यास कारणीभूत ठरणार असल्याची खात्री ते देतात. माणसे सांधण्याचे एक मोठे तत्त्वज्ञान म्हणून आज आम्ही राष्ट्रसंतांच्या प्रार्थनेकडे उदारतावादी अंत:करणाने पाहण्याची गरज आहे. जोपर्यंत हा उदारमतवाद आमच्यामध्ये भिनणार नाही तोपर्यंत राष्ट्रसंतांना अभिप्रेत असलेली विश्वबंधुत्वाची जाणीवही कळणार नाही एवढे मात्र खरे आहे.

'सामुदायिक प्रार्थना' लिहितांना मानवाच्या आणि देशाच्या व्यापक उद्धाराचा एक विशालकाय दृष्टिकोन राष्ट्रसंतांनी नजरेसमोर ठेवलेला होता. आज मात्र ग्रामीण–शहरी भागात त्यांच्या कल्याणकारी मार्गाने चालणारी अनेक माणसे दिसतात. परंतू ज्याला आपण 'राष्ट्रसंतांचे वारस' म्हणावे अशी माणसे हातावर मोजण्याइतकी राहिली आहे. भक्तांचे विभाजन राजकारणात होऊन माणसं चळवळीच्या मागे धावू लागली. पैशाच्या मागे लागून अनैतिकता स्विकारल्यामुळे बंधुभाव, एकता, प्रेम, आपुलकी, राष्ट्रप्रेम यासारखे शब्द हे केवळ शोभेची साधनं बनली आहेत. 'सामुदायिक प्रार्थनेतून साऱ्यांना एकत्र आणणे गरजेचे आहे.

**आधारभूत संदर्भग्रंथ:**

१) स्व. सुदाम खावरकर (संपा.)– "ग्रामगीता," गुरूदेव मुद्रणालय," नागपूर, सतरावी आवृत्ती २००७, पृ. १६५

२) सुदामजी सावरकर (संपा)–"।। सार्थ ग्रामगीता ।।," भू–वैकुंठ आत्मानुसंधान टकळी, अड्याळ, प्रकाशन वर्ष नमूद नाही,

पृ. ७५९

३) प्रा. रघुनाथ कडवे (संपा)– "श्रीगुरूदेव मासिक," श्रीगुरूदेव प्रकाशन, तिवसा, डिसेंबर २०११, पृ. २

४) श्री. रामकृभणदादा बेलूरकर (संपा.) – "पा. ग्रामगीता संदेश," विश्वास्त मानव विकास ज्ञान साधनाश्रम, तळेगाव (शा.पं.), १३ नोव्हें. २०११, पृ. ५ (राष्ट्रसंतांच्या 'सामुदायिक प्रार्थनेचे तात्विक स्वरूप' लेखापूर)

५) डॉ. सतीश तराळ (संपा) – "श्रीगुरुदेव मासिक," श्रीगुरूदेव प्रकाशन, तिवसा, डिसेंबर २०१३, पृ. ९ (राष्ट्रसंतांनी १९५५ साली जपानमध्ये विश्वधर्म परिषदेत केलेल्या भाषणामधून.)

# डॉ. आनंद यादवांचा वाड्.मयीन प्रवास

*प्रा. नितीन जगदिष टेकाम*
*श्री बा. दे. पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.*

## प्रस्तावनाः

1960 नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे साहित्य प्रवाह जन्माला आले त्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य यासारखे अनेक प्रवाह समाजमनापर्यंत पोहोचले. मराठीतीतील वेगवेगळया साहित्य प्रकाराच्या माध्यमातून समाजातील जीवन जाणिवा, रूढी, प्रथा, परंपरा आपआपले प्रष्न, समस्या साहित्यातून मांडायला सुरूवात झाली. त्यात ग्रामीण साहित्यातील लेखकांनी आपला ठसा समाज मनावर उमटवला. काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथनाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेच्या उत्क्रांतीचा इतिहास दिसायला लागला. ग्रामीण वास्तव, ग्रामीण संस्कृती आणि बोली याचा वापर करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य होय. डॉ. आनंद याादव, रा.रं.बोराडे, द.ता.भोसले, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. भास्कर चंदनषिव, वासुदेव मुलाटे यांनी ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण साहित्य चळवळीच्या अनुशंगाने कार्याला गती दिली. ग्रामीण साहित्यात डॉ.आनंद यादव हे ग्रामीण साहित्य चळवळीच्या अध्वर्यू आणि भाश्यकार ठरतात. ग्रामीण साहित्यातील त्यांचे स्थान आणि योगदान हे तितकेच महत्त्वपूर्ण आहे.

आधुनिक मराठीतील ग्रामीण कवी, कादंबरीकार, कथाकार तसेच ग्रामीण साहित्य चळवळीचे समीक्षक म्हणून त्यांच्या वाड्.मयीन कर्तृत्वाची ओळख पटते. ' मराठी लघु निबंध : प्रेरणा, प्रवृत्ती आणि विकास ' या पीएच.डी. प्रबंधास (1974) पुणे विद्यापीठाची केळकर व परांजपे पारितोषिके मिळाली. मराठीतील ज्येश्ठ लेखकांच्या संस्कारामुळे तसेच साहित्याच्या व्यासंगी वाचनाने आणि सखोल चिंतनातून आनंद यादवांचे व्यक्तिमत्त्व फुलत होते. विद्यार्थी दषेतला ' हिरवे जग ' हा काव्यसंग्रह 1960 साली मराठी मनापर्यंत पोचला. त्यानंतर ' मळयाचीमाती ' (काव्यसंग्रह) 1978 साली आला. ग्रामीण कुटुंब आणि आजूबाजूच्या परिस्थितीचे विदारक दर्षन एका संवेदनषील कुमार मनाचे साद पडसाद टिपणारी ती साधी आणि नैसर्गिक वाटते. नंतरच्या कवितेत गावापासून दुरावलेल्या आणि नोकरीसाठी षहराकडे धाव घेणा.या मनाची तगमग अत्यंत उत्कटपणे व्यक्त झालेली दिसते. काव्यातून ग्रामीण बोलीचा होणारा वापर आपल्याला कवितेत खेळवून ठेवते. मळयाच्यामाती मधील कवितेत व्यक्त झालेल्या या वेगळ्याा जाणिवांची नोंद घेताना विष्वास वसेकर म्हणतात. '' हिरवे जग नंतर आनंद यादवांच्या संवेदनषीलतेमध्ये एक विकास झाला आहे. या परिवर्तनानंतरची त्यांची कविता अधिक श्रेष्ठ होवू पाहणारी कविता'' आहे म्हणून आनंद यादवांनी ग्रामीण साहित्याला दिलेली 'मळयाचीमाती' हा कविता संग्रह संवेदनषीलतेच्या दृष्टिकोणातून आविश्कारामधील मैलाचा दगड ठरते. हे आपल्याला समजून घ्यावे

लागेल. काही वर्षानंतर ' मायलेकरू' 1989 हा कविता संग्रह प्रसिध्द झाला. यातही जीवनातल्या अनुभवाबरोबर समाजातलं जिवंत दर्षन तो काव्यसंग्रह घडवतो.

साहित्य हे समाज परिस्थतीचं अपत्य असते त्या परिस्थितीतील जीवनमूल्य कवितेत मावू शकत नाही. याची जाणीव अस्वस्थ करू लागली. कवितेतून कथेत प्रवास करताना ग्रामीण जीवनातले मर्मबंध, ' खळाळ ' 1967, त्यांनतर ' घरजावई ' 1974, ' माळावरची मैना ' 1971, ' आदिताल ' 1980 ' डवरणी ' 1982 आणि ' उखळलेली झाडे ' 1986 ही त्यांची कथासंग्रहे लागोपाठ एकामागून एक वाचकापर्यंत आली. ग्रामीण जीवनातील भावविष्व आपल्या संवेदनषील मनाने अगदी तन्मयतेने, उत्कटतेने अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. वयोगटातील व परिस्थितीतील मानवी मनाचा वेध मर्मदृष्टिने घेताना दिसून येतात. काव्यात्म प्रवृत्तीमुळे त्या–त्या व्यक्तिमनाचा नेमका गाभाच ते आपल्यासमोर उघडा करतात. दुःखानुभवाच्या सूक्ष्म चित्रणातून मानवी मनाच्या तळाला स्पर्ष करतात. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. बदल जसा व्यक्तीच्या स्वभावात होतो, तसाच तो बदल खेड्यातील समाज संस्कृतीत, वातावरणातही होतो. त्या बदलत्या खेळाचा वेध घेणारा काव्यसंग्रह म्हणजे ' उखळलेले झाड ' (1986) हा होय. त्यानंतर ' माती खालची माती ' त्यांचा व्यक्तिचित्र संग्रह प्रसिध्द झाला. आनंद यादवांनी ज्या प्रकारे कवितेची नाळ सखोलतेने, उत्कटतेने व तरलतेने पकडली तषीच कथेनेही पकडलेली दिसतात. सामान्य ग्रामीण माणसाचे सुख–दुःख हा त्याच्या जिव्हाळ्याचा विशय आहे. माणसाचे सुख–दुःख त्यांच्याच भाषेतून ती कथा आविश्कृत करून पाहते. येथेच मराठी ग्रामीण कथेला नव्या आविष्कार माध्यमांचे परिणाम लाभते. याच अर्थाने आनंद यादवांची कथा माडगूळकर आणि शंकर पाटील यांच्या कथेचा विकास करते. कलात्मकता आणि जीवनदर्षन याचा समतोल साधणारी यादवांची कथा ग्रामीण कलासृष्टीत आपले स्थान पक्के करते, असे म्हणता येईल. डॉ. आनंद यादवांच्या कादंबरी लिखाणाचा प्रवास तितकाच महत्त्वपूर्ण म्हणून ओळखला जातो. ' गोतावळा ' 1971, ' नटरंग ' 1980, 'माऊली' 1985 ' झोंबी ' 1987, ' नांगरणी ' 1990, ' घर भिंती' 1982 या कादंब.याही प्रसिध्द झाल्या. ' गोतावळा' ही कादंबरी तषीच लक्षणीय आहे. निसर्ग आणि प्राणीसृष्टीषी नाळ जोडणाऱ्या नारबा या सालगड्याच्या एकाकी जीवनाची कहाणी आहे. या कादंबरीत निसर्गाषी, प्राण्यांषी झालेला मैत्रभाव आविष्कृत तर होतोच पण यांत्रिकीकरणामुळे शेतमळ्याचा मालक, शेतीची काम करण्यासाठी ट्रॅक्टर आणायचे ठरवतो. ट्रॅक्टर मळ्यात आल्यावर सालगडी मजूर नारबा शेतात राहणारी जनावरे उदा. आंधळा घोडा, बैल, गाय, तसेच नाम्या, पांड्या, दोन रेडे, चम्पी कुत्री, कोंबडी या साऱ्यांची होणारी वाताहात. ससेहोलपट कादंबरीत व्यक्त होते. गोतावळा ही कृषी संस्कृतीच्या विलयाची कथा आहे. एका वर्षभरातले ऋतुचक्र आणि त्याच्याषी निगडित असे कृषीजीवन यादवांनी बारकाव्याने मांडीत ही शोकात्मिका साकारते. माळरानाषी, जनावराषी, निसर्गाषी नि भोवतालच्या किडामुंगी झाडापेंडाच्या गोतावळ्याषी असलेले नारबाचे नाते, कोवळ्या संवेदनक्षम मनाच्या नारबाच्या निवेदनातून फारच उत्कटपणे प्रगट झाले आहे.

एकाकीकरण, भय, क्रूरता, मृत्यू आणि काम याचे प्राथमिक पातळीवरील चिंतन आणि चित्रण करणारी कादंबरी मानसाची बध्दता, वंष सातत्याची तहान, मृत्यूची अटळता, निरर्थकता व्यक्त करते. कृषी संस्कृतीवर यंत्रसंस्कृतीच्या आक्रमणाबरोबर एकूण जीवनाचा व्यापक शोकात्म अर्थ व्यक्त करते. प्रा.रा.भि. जोषी म्हणतात की, '' गोतावळा ही इतर कादंबरी सारखी गोष्ट सांगणारी कादंबरी नाही तिच्यात बऱ्याच गोष्टी घडतात आणि एका माणसाच्या नारबाच्या आयुष्याचा एका टप्प्यातून एक वर्षभरात दुसऱ्या टप्प्यापर्यंत ती गोष्ट जाते. पण ही कादंबरी म्हणजे नारबाची गोष्ट म्हणता येत नाही. ती म्हटलीच तर युगांतराची गोष्ट आहे.''

साहित्य प्रकारातले नवनवे प्रकार हाताळत डॉ. आनंद यादवांनी ' रात घुंगराची ' (1978) हे त्यांनी लिहिलेले वगनाट्या, तसेच ' स्पर्ष कमळे ' 1978, ' पाणभवरे' 1982 हे त्यांचे ललित लेखनही तसेच लक्षणीय आहे. उत्कृष्ट ललित लेखनाप्रमाणे ग्रामीण साहित्यावर समीक्षणात्मक ग्रंथही लिहिले. ' ग्रामीण साहित्य' ' स्वरूप आणि समस्या' 1979 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' 1981 (राज्य पुरस्कार), 'मराठी समाज आणि संस्कृती' 1985 ' साहित्य निर्मितीची प्रक्रिया' 1989 यामधील त्यांच्या समीक्षेत अभिनिवेष व आत्मसमर्पण आहे. तरीही ग्रामीण साहित्याला सुप्रतिष्ठित करणारी आहे. मराठी ग्रामीण काव्य, कथा, कादंबरी या साहित्य प्रकाराचे स्वरूप तर यादवांनी विशद करून सांगितलेच पण त्याषिवाय त्यातून निर्माण होणाऱ्या तात्त्विक प्रष्नांची उत्तरे साहित्य षास्त्रीय भूमिकेतून देण्याचा प्रयत्न केला आहे.

एकूणच मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याचे नेमके स्थान काय आहे? हे अत्यंत धिटपणाने यादवांनी सांगितले ग्रामीण साहित्याच्या संदर्भात या गोष्टी प्रथमच चिकित्सक रसिकांच्या समोर आल्या आहेत. ग्रामीण साहित्याची स्वतः निर्मिती करणा.या आनंद यादवांनी एकूण ग्रामीण साहित्याचा केलेला विचार त्यांच्या स्वानुभवाच्या तेजासकट ग्रंथातून प्रगट होताना दिसतो. षिक्षण व नोकरीच्या निमित्याने ते आपल्या घरापासून आणि गावापासून दूर गेले तरी आपली जीवन जाणीव ज्या भूमित पोसली गेली त्या मातीला ते कधीही विसरलेले दिसत नाही. म्हणूनच डॉ. आनंद यादव खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य चळवळीचे अध्वर्यू आणि भाष्यकार ठरतात हे आपल्याला लक्षात ठेवावे. लागेल.

## संदर्भ सूचि

1. ग्रामीण साहित्य! एकचिंतन– दत्ता.भोसले,मेहता पब्लिषियर हाऊस, पूणे,प्र.आ.1988, प्रकाषन.
2. भोसले द.ता., ग्रामीण साहित्य, एक चिंतन, मेहता पब्लिषियर्स हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती, पुणे, 1988, पृष्ठ क्रं. 68,79.
3. यादव आनंद, ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि समस्या, दुसरी आवृत्ती, पुणे, 1984,
4. यादव आनंद, मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती, पुणे., 1985.

# मराठी साहित्यातील बदलत्या प्रवाहात' बाप्तिस्मा ते धर्मांतर' या आत्मकथनाचे मूल्यमापन.

**संशोधक**
गजानन श्यामसुंदर राऊत
विदर्भ कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स, जिवती. जिल्हा. चंद्रपूर.
**मार्गदर्शक**
प्रा.डॉ.राजकुमार आर. मुसने
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय आष्टी. जिल्हा. गडचिरोली.

गोषवारा

समकालीन साहित्य प्रवाहात इसादास भडके यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास करताना, समकालीन साहित्य प्रवाहाचा विचार करणे क्रमप्राप्त असून, समकालीन साहित्य पूर्वपीठिका गोषवारा घेणे महत्त्वाचे आहे. यातूनच इसादास भडके यांच्या साहित्याचे महत्त्व आणि निराळेपण लक्षात घेता येईल. त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यात त्यांचे आत्मकथन 'बाप्तिस्मा ते धर्मांतर' फार प्रसिद्धीस आले आहेत. इसादास भडक्यांच्या आत्मकथनाला दोन महत्त्वाच्या अंगाने महत्त्व आहे. एक म्हणजे धर्मांतरामागे कुठली असहायता कारणीभूत होते, आणि सुटकेची प्रेरणा कशी साकारते याचे समाजशास्त्रीय तपशील त्यातून मिळतात. आणि केवळ आहे त्यातूनच सुटका करण्यासाठी केलेलं नकारी धर्मांतर हे खऱ्या मुक्तीचा आनंद आणि समाधान देऊ शकत नाही. याची जाण ते देते, म्हणूनच प्रस्तुत आत्मकथन ख्रिस्ती झालेल्या दलितांनाही आत्मपरीक्षण करायला लावणारे आहे.

बिजशब्द

आत्मकथनात्मक कादंबरी, भाषाशैली, संघर्षमय जीवन, झाडीबोली.

## प्रस्तावना

मराठी साहित्य प्रवाहात अनेक साहित्यिक झालेत व त्यांनी मराठी भाषेला व साहित्याला समृद्ध व संपन्न केले. वैदर्भीय साहित्य लेखन करणारे अनेक प्रतिभावंत लेखक, कवी, कथाकार, कादंबरीकार होऊन गेले. त्यांनी त्यांच्या लेखणीतून समाज वास्तव शब्दबद्ध केले. समकालीन साहित्याच्या संदर्भात स्वातंत्र्योत्तर, साठोत्तर आणि नव्वदोत्तर समकालीन साहित्य या संकल्पना वापरण्यात येतात. मराठी साहित्यात त्या अनुषंगाने विचार केला गेला आहे. इसादास भडके यांचे बाप्तिस्मा ते धर्मांतर हे आत्मकथन १३ सप्टेंबर १९५६ ला प्रसिद्ध झाले. एकूण १६५ पृष्ठाच्या या आत्मकथनात तीन विभाग आहेत. पहिला भाग बाप्तिस्मा, दुसरा दृढीकरण व तिसरा भाग धर्मांतर असा आहे. बाप्तिस्मा या प्रकरणात वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत दृढीकरण यात वयाच्या तेराव्या वर्षापासून बाबासाहेबांच्या

विचाराकडे आकृष्ट होईपर्यंतचे अनुभव, तर धर्मांतर या प्रकरणात आंबेडकरी व बौद्ध विचारांनी झपाटलेल्या मनाची वैचारिक मांडणी शब्दबद्ध केलेली आहे. तसेच बौद्ध धम्म वैचारिक पातळीवर स्विकृत केल्याचे अनुभव आहेत. प्रस्तुत आत्मकथनात इसादास भडके यांच्या लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यानंतर ही भडके यांना आयुष्य जगतांना किती हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या, आणि त्यांच्याच नातेवाइकाकडून कशी दुय्यम वागणूक मिळत होती, याचे वास्तव चित्रण या आत्मकथनातून जाणवते.

**संशोधन पद्धती:**

या शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य साधनांचा आधार घेतला. यात संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके, लघुशोध प्रबंध, वर्तमानपत्र इत्यादीचा समावेश केला आहे.

**इसादास भडके यांचे बाप्तिस्मा ते धर्मांतर आत्मकथन.**

इसादास भडके यांचे कुटुंब प्रारंभी हिंदू नंतर वडिलांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. आणि तो त्यांच्या वाट्याला वारसाहक्काने मिळाला. पुढील विचारांनी बौद्ध धर्म स्वीकारला. इसादास भडके यांचा प्रवास हिंदू धर्म, ख्रिश्चन धर्म, बौद्धधम्म असा आहे. या साऱ्यांचे वैचारिक रसायन या आत्मकथनात आविष्कृत झालेले आहे. तीन वेगवेगळ्या धर्माच्या प्रभावाच्या रसायनाच्या संक्रमणातून व्यक्त झालेली आत्मकथा आहे. ख्रिश्चन असताना व बौद्ध झाल्यानंतर जे अनुभव वाट्याला आले ते मित्रमंडळीत सांगत होते. दलित साहित्याच्या वाचनामुळे माझे अनुभव मांडायला बळ प्राप्त झाले. धर्मांतर केल्याबरोबर अनुभव मांडण्यापेक्षा बौद्ध म्हणून जगाव आणि नंतर अनुभव लिहावे असं वाटू लागलं. ख्रिश्चनधर्म आणि बौद्ध धर्म याची तुलना करणे हा इसादास भडके यांचा उद्देश नव्हता. पण ख्रिश्चनधर्माचे झालेले संस्कार व बौद्ध जीवन पद्धती याचा आत्मशोध घेणे हा त्यांचा हेतू होता. दोन्ही धर्म जागतिकस्वरूपाचे असून उभयंताच्या संस्कारातुन त्यांची जडणघडण झालेली आहे. माणूस म्हणून जगता यावे आणि मानवी मूल्यांचा प्रगल्भ विकास साधता यावा हा त्यांचा मनापासूनचा हेतू आहे.

बाबासाहेबांनी विचारांनी केलेले धर्मांतर, भारतीय समाज व्यवस्थेत समता, स्वातंत्र्य व बंधुता निर्माण करण्याचं अनोख शस्त्र वाटू लागलं. व ते भडके यांनी आत्मसात केले. याचे समाधान त्यांना वाटते. भडके यांच्या आयुष्याची कमाई म्हणजे बाप्तिस्मा ते धर्मांतर होय. देवप्रीती आहे, इथपासून अत्तदीपभव इथपर्यंतचा हा प्रवास, माझं स्वकथन आणि माझ्याशी केलेला सुसंवाद आहेत. प्रत्येक धर्मामध्ये विविध विधी असतात तसेच संस्कार असतात हिंदू धर्मात नामकरण हा विधी असतो, त्याप्रमाणे ख्रिश्चन धर्मात बाप्तिस्मा झालेला असून, त्यांचे नाव इसादास असे ठेवण्यात आले पिता, पुत्र आणि पवित्र आत्माचे नावाने आमेत म्हणून त्यांचा बाप्तिस्मा झाला. चर्चमध्ये हा विधी केला जातो. ख्रिश्चन धर्माच्या पवित्र शास्त्र बायबल या ग्रंथातील नवा करार यात अनेकांचा बाप्तिस्मा झाल्याचे अनेक उदाहरण आहेत. दृढीकरण हा सुद्धा एक विधी असून तो चर्चमध्ये केला जातो. थोडी समज आल्यावर, म्हणजे बाल्याअवस्थेतून पुढच्या अवस्थेत जाताना होतात. इसादासचे वयाच्या चौदाव्या वर्षी धृवीकरण झाले. दृढीकरणचा हेतू धर्माबद्दल त्यांच्या विचाराबद्दल जाणीव व्हावी हा असतो. व त्या विचारांवर अंमल करणे असतो.परमेश्वराचे स्तवनकरणे,

कोणताही निर्णय ख्रिस्ताला अनुसरून घ्यायचा, प्रभूला न आवडणारे कोणतेही कृत्य करायचे नाही. तर धर्मांतर हा आत्मकथनाचा शेवटचा भाग हा भाग भडके यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. त्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरला १९५६ मध्ये धर्मांतर केले, ते इसादास भडके यांची प्रेरणा ठरली बाबासाहेबांनी केलेले धर्मांतर हे इसादास भडके यांच्या दृष्टीने महनीय आहे. त्या अनुषंगाने त्यांचे वैचारिक मन्वंतर झाले. मला वैज्ञानिक दृष्टी प्राप्त झाल्याचा आनंद झाला. धर्मांतराला एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे एवढेच महत्व इसादास भडके देत नाही,तर अंधारातून प्रकाशाकडे जाणे या अनुषंगाने धर्मांतराला महत्त्व देतात.

**आत्मकथन आतील सामाजिक जाणिवा**

इसादास भडके यांचे बाप्तिस्मा ते धर्मांतर हे सामाजिक जाणिवांचा आविष्कार असलेले आत्मकथन असून, हे एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे आंबेडकरी प्रेरणेच्या दलित साहित्य समाजिक साहित्य जाणिवा पानोपानी दृग्गोचर होताना आढळतात त्याला हे अपवादनाही समग्र दलित साहित्यात सामाजिक जाणिवा केंद्रस्थानी आहे यातील आत्मविष्कार याचे प्रतिबिंब व्यक्तिकेंद्री नसून आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ आहे.

रा. ग. जाधव म्हणतात दलित समाज हा परिवर्तनशीलतेच्या मार्गावर आहे. आणि दलित लेखकांची बांधिलकी परिवर्तनाच्या प्रक्रियेशी निगडित आहे. दलित साहित्याची सामाजिक बांधिलकी विशिष्ट व्यक्तीशी निगडीत नाही. ती माणसाला श्रेष्ठ मानणाऱ्या विचारांशी, आचारांशी त्या आचाराविचाराने प्रवृत्त झालेल्या समाजाचीच त्याची बांधिलकी आहे. ही जाणीव न्यायवादी व आदर्श आहे. ही विश्वजाणीव असून शोषण व्यवस्था या जाणिवेचा शत्रू आहे. या आत्मकथनात लोकगीते, लोककला व लोककथा व्यापक प्रमाणात आलेल्या आहेत. लेखकाच्या आत्मीयतेचा आणि त्यांच्या संपन्न अभिरुचीचा प्रत्यय आणून देणारा असून, त्यांच्या सर्जनशीलतेचे दर्शन घडविणारा आहे.

**व्यक्तिदर्शन**

साहित्य कृतीत व्यक्तींची शब्दचित्रे, व्यक्ती रेखाटने व व्यक्ती दर्शने या घटकांना महत्त्वाचे स्थान आहे. बाप्तिस्मा ते धर्मांतर या आत्मकथनातील व्यक्तिचित्रने ही तत्कालीन समाज जीवनाची महत्त्वाची माध्यमे आहेत. इसादास भडके यांची आई ही या आत्मकथनाची नायिका असून आईच्या भोवताल या विविध व्यक्तिरेखा कार्यरत आहेत. आई, मामाची आई, मामा, अशोकबाला जी जांभुळकर सुगंधाबाई, रानोली, फादरकाका, विश्वास, योहान मिसवॉर्ड अशा अनेक व्यक्तिरेखा कार्य कर्त्यांनी दिसत आहेत. इसादास भडके यांनी साकारकेलेल्या व्यक्तिरेखा त्या त्या काळाचे संदर्भ आहेत. या साऱ्या व्यक्तिरेखा त्यांच्या संपर्कात आल्या. काहींना त्यांनी अनुभवले. त्यांच्यातल्या बऱ्या-वाईट गुण वैशिष्ट्यांचे चित्रांकन त्यांनी केलेले आहे. काही व्यक्तिरेखा उभ्या करताना त्यांची भाषा आणि लेखणी संपन्न आणि प्रगल्भ बनत जाते. याव्यक्ति रेखा या जगलेल्या भोगलेल्या वेदना आणि दुःखयांचे प्रतिनिधी म्हणून, त्यांनी साकारलेल्या आहेत. तद्वतच त्यांच्या जगण्यातील संघर्ष ही उभा केलेला आहे.

### स्त्रियांच्या व्यथा आणि वेदना

या आत्मकथनातील स्त्रीजीवन हा एक तत्कालीन समाज जीवनाचा एक भाग म्हणून लक्षात येतो. स्त्रियांच्या व्यथा आणि वेदनांचे यथोचितरित्या चित्रण लेखकाने केलेले असून, ते स्त्री जीवनाकडे व्यापकदृष्टीने बघतात. स्त्री जीवन त्यांनी डोळसपणे बघितलेले असून, स्त्री जीवनावरील त्यांचे भाष्य त्यांच्या स्त्रीविषयक जीवन आणि जाणिवांचा वेध घेणारे आहे. आई, मामाची आई, सुकराबाई, मिसवार्ड, रेणुका, रानुली, सुगंधाबाई, जनाबाई, मामी इत्यादी स्त्री म्हणून वाट्याला आलेले जीवन तत्कालीन स्त्री जीवनावर प्रकाश टाकणारे आहे' बाप्तिस्मा ते धर्मांतर ' या आत्मकथनामध्ये स्त्रियांच्या जीवनाची भेदक मांडणी केलेली आहे. त्यांच्या जीवनाची भेदकता भावस्पर्शी व हृदयस्पर्शी आहे. बहुतेक स्त्रियांच्या वाट्याला वैधव्य आल्याचे आढळते यातून त्यांच्या जीवनाचा कष्टमय जीवन प्रवास प्रत्ययाला येतो.

### भाषाशैली

बाप्तिस्मा ते धर्मांतर या आत्मकथनाची भाषाशैली हा अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय असून, या आत्मकथनाला भाषिकसौष्ठव प्राप्त झालेले असून, आत्मकथनाला प्रवाहित्व आणि जिवंतपणा आलेला आहे. या मागील कारण इसादास भडके यांनी मनोगत व्यक्त केलेल्या भाषा विषयक संस्कारावर अधिष्ठित आहे. ते लिहितात हे स्वकथन लिहिताना माझ्या मातीच्या झाडीबोलीचा मोह आवरला नाही. आई व मामाची आई कथा सांगायच्या त्या झाडी बोलीत असायच्या. त्यांच्यातील गेयता व कलात्मकता आजही मनाच्या खोलगर्भात हात घालते. त्यांची काव्यात्मशैली व कवीमन त्यांच्या स्वकथनातून प्रत्ययास येते. आत्मकथनाची सहज व सोपी भाषा आत्मनिवेदनाच्या स्वानुभव करणारी मांडणी यामुळे आत्मकथन संवाद साधणं हृदयावर अधिराज्य करते. प्रसंगवर्णनतील त्यांची शैलीही त्या त्या प्रसंगाला साजेशी असून त्या त्या प्रसंगाला अनुरुप झाडीबोली आणि प्रमाण भाषावापरलेली आहे.

आत्मकथनात इसादास भडके यांनी अनुभवांना भाषेची जोड दिल्यामुळे भाषात्मक लेखनशैली आकाराला आली.

### समारोप

सारांश रूपाने असे म्हणता येईल की, इसादास भडके यांचे आत्मकथन व तेथील लेखन साधे आणि सोपे सुलभ पेहरा व लिहून साकार झाले आहे. जीवनात कोणत्याही व्यक्तिमत्त्वाच्या जडण घडणीमध्ये त्यांच्यावर पडलेल्या संस्काराचा फार मोठा वाटा असतो. त्यानुसारच त्याच व्यक्तिमत्व कधी कमी तर कधी उंचावते. त्यांनी भोगलेल्या संघर्ष सामाजिक असो अथवा धार्मिक यातून ते तावून सुलाखून निघाले आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे जीवनात ठेच लागून त्यातून शिकत शिकत अनुभवांनी ते लहानाचे मोठे झालेले असतानाचा संपूर्ण जीवनप्रवास त्यांच्या विविध साहित्य कृतीमधून अधोरेखित होताना दिसतो. अनेक हाल अपेष्टा सहन करत गावातील रुढीशी नाळ जुळवत ते प्रवासकरीत आले त्यांचा प्रवास वाखाणण्यासारखा आहे. त्यात भावनिक तळमळ, वैचारिक तपशील दिसून येतो. त्यांनी वाडमय निर्मिती करावी म्हणून लेखन केले

नाही तर त्यांच्या मनात वाचलेल्या विचारांना उद्रेकित करणारे आहे. त्यामुळे आजच्या साहित्य प्रवाहातसुद्धा इसादास भडके यांची बाप्तिस्मा ते धर्मांतर हे आत्मकथन नव साहित्यकास प्रेरणा देते. परिस्थिती कोणतीही असली तरी माणसाची वैचारिकता जर त्या दृष्टीकोनातून प्रगल्भ असेल, तर साहित्य निर्मिती होऊ शकते. आणि ती जनमानसात रुजूसुद्धा शकते. हे या आत्मकथनाचा माध्यमातून दिसून येते.

सामाजिक बदलाची आणि सामाजिक मानसिकतेची नोंद 'बाप्तिस्मा ते धर्मांतर' मध्ये आहे. 'बाप्तिस्मा ते धर्मांतर' मधील सामाजिक जाणीव माणसाचे सांस्कृतिक मूल्य जोपासणाऱ्या आहे. यातील अनुभवांना सामाजिक जाणिवेची पार्श्वभूमी आहे. समाजाची मानसिकता या आत्मकथनातून साकार झालेली आहे. हे आत्मकथन केवळ व्यक्तिगत अनुभवाचे कथन नाही, तर दोन धर्मातील सांस्कृतिक व वैचारिक आवर्तातील अंतर स्पष्ट करणारे आहे. या स्वकथनाचे मानसशास्त्रीय शोध एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. सामाजिक संदर्भ या स्वकथनाचा स्थायीभाव आहे. इसादास भडके ख्रिस्ती मानसिकता अधिराज्य गाजवत होती, तर पुढे महाविद्यालयीन शिक्षणाच्या सानिध्यात त्यांचे समाजमन बौद्धमय होत गेलेले दिसून येते.

## निष्कर्ष

१ (इसादास भडके यांचे बाप्तिस्मा ते धर्मांतर हे आत्मकथन ख्रीश्चन धर्माकडून बौद्ध धम्माकडे अग्नि दिव्यातून झालेली वाटचाल असून, तो एक मन्वंतरांचा प्रवास आहे. वाट्याला आलेले अनुभव लिहावे या भावनेतून या ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

२ (आत्मकथन एक वैचारिक पातळीवरचे समाजचित्त, धर्मचिंतन आहे.

३ (व्यक्तिचित्रणाचे दर्शन जिवंत साकारलेले दिसून येते. यातील व्यक्तिरेखा अधिक सकस व समर्थ मांडलेल्या आहे.

४ (मानसिक संक्रमण व सांस्कृतिक अभिसरण याचा आलेख मार्मिकरित्या आणि सूक्ष्मपणे मांडण्यात आला.

५ (झाडीबोली या आत्मकथनाचे भाषिकसौंदर्य ठरलेली आहे. मराठीतील अपरिचित असलेले झाडीतल्या शब्दमराठीत साहित्यात भर टाकणारे आहेत.

६ (आत्मकथनतील भाषेमुळे या आत्मकथनाला माय मराठीचा सुगंध प्राप्त झाला.

## संदर्भसूची

१ (भडके इसादास, 'बाप्तिस्मा ते धर्मांतर' लेणी प्रकाशन चंद्रपूर 2005.

२ (खरात शंकरराव, 'दलित वांगमय प्रेरणा व प्रवृत्ती', इनामदार बंधू पुणे 1978.

३ (जाधवरा.ग., 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ' पुणे1975 .

४ (मेश्राम मेघमाला/वानखेडेरणजीत/लाटेलवारसंजय,) सपा( 'प्रवर्धित') इसादास भडके गौरव ग्रंथ ( 2017.

५ (पवार अशोक., 'दलित आत्मकथेत नवाआयाम' समीक्षा, दैनिक सकाळ नागपुर, 2005

.६ (बनसोड विद्याधर, 'बाप्तिस्मा ते धर्मांतर एक आकलन समीक्षा' लोकांनुकंपा 2005.

७ (सप्रेमनोहर,'अस्वस्थमनाची अस्वस्थखळबळ' लेख दैनिक लोकमत मे 2006.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# 'समाजस्वास्थ्या'चे सुधारक रघुनाथ धोंडो कर्वे:राष्ट्र उभारणीतील द्रष्टा कर्मयोगी

प्रा.डॉ.जयश्री प्रकाश शास्त्री
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग प्रमुख,लोकमान्य महाविद्यालय,वरोरा

भारतीय समाजस्वास्थ्याची शिल्पकार म्हणून विशेष कार्य करणाऱ्या लोकोत्तर पुरुषांमध्ये प्रा.र.धों.कर्वेम्हणजेच रघुनाथ धोंडो कर्वे यांचे कार्य अत्यंत लक्षणीय आणि उपकारक ठरणारे असे आहे. विसावे शतक हे जगाच्या इतिहासात क्रांतिकारक शतक म्हणून महत्त्वाचे ठरते. कारण या शतकात घडलेली दोन महायुद्धे ,सोव्हिएत रशियाचा उद्यास्त, अनुस्फोट, नव्या चीनची स्थापना ,भारताला मिळालेली स्वातंत्र्यप्राप्ती ,पाकिस्तानची निर्मिती अशा सर्वच घटनांसोबत संपूर्ण शतकात झालेली फार मोठी लोकसंख्येची वाढ ही संपूर्ण विश्वाला हादरा देणारी चिंतादायक घटना होती. भारताची लोकसंख्या ही स्वातंत्र्योत्तर काळातील पन्नास वर्षांत अडीच पटीहून अधिक वाढली. अशा परिस्थितीत पुढील काळातील भीषण समस्यांची चाहूल विसाव्या शतकातील दुसऱ्या दशकानंतर १९२१ मध्ये प्रा.र.धों.कर्वे यांना लागली. त्यामुळे विल्सन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत असणाऱ्या प्रा.र.धों.कर्वे यांनी पुढील काळात नोकरी सोडून केवळ संततिनियमन कार्यास वाहून घेतले. त्यासाठी त्यांनी जनजागृती म्हणून 'समाजस्वास्थ्य' हे मासिक जुलै १९२७पासून सुरू केले आणि ऑक्टो. १९५३चा अंक प्रकाशित झाल्यावर त्यांच्या निधनाने थांबले.समाजाकडून सतत निंदा-नालस्ती अवहेलना सहन करत प्रा र.धों.कर्वे यांनी संततिनियमन प्रचाराचे कार्य पंचवीस वर्षांहून अधिककाळ कमालीचा निर्धाराने आणि निष्ठेने चालू ठेवले. या कार्यात त्यांना त्यांची पत्नी मालतीचे अनमोल सहाय्य लाभले. श्री.ज शं.आपटे यांच्या मते "महाराष्ट्रातील मध्यमवर्गावर अशिक्षित सुशिक्षित समाजावर त्यांच्या प्रबोधन कार्याचा परिणाम, प्रभाव संथगतीने झाला. महाराष्ट्रातील कुटुंबनियोजन कार्यक्रमासाठीची पूर्वतयारी प्रा.र.धों.कर्वे यांनी करून ठेवली. प्रा. कर्वे यांचे हे महान योगदान आहे आणि त्याबद्दल महाराष्ट्रातील जनसामान्य त्यांचे बद्दल सदैव कृतज्ञ राहतील हे निश्चित."[१]

प्रा.रघुनाथराव यांचा जन्म १४ जानेवारी १९८२रोजी मकरसंक्रांतीच्या दिवशी मुरुड येथे झाला. त्यांचे वडील म्हणजे शिक्षण महर्षी धोंडो केशव कर्वे ऊर्फ अण्णा आणि राधाबाई यांना झालेले पुत्ररत्न म्हणजे रघुनाथराव.

**रघुनाथराव कर्वे यांची कौटुंबिक पार्श्वभूमी-**

संयुक्त कुटुंब पद्धतीच्या घरात दहा-पंधरा माणसांच्या राबत्यात अत्यंत निरुत्साही,क्लेशदायक,त्रस्त वातावरणात राधाबाईंना रघुनाथकडे फार लक्ष पुरवता आले नाही. त्यामुळे रघुनाथरावांच्या भावनिक वाढीत हे प्रकर्षाने आड आले.चरित्रानुसार यांच्या जीवनातील विमनस्क व निराश आणि विफल

जीवनाची मुळे ही बालपणाच्या कठोर वातावरणात होती. रघुनाथरावांनी समाजस्वास्थ्यातील 'शारदेची पत्रे' या सदरात बालपणाविषयीचे विचार व्यक्त करताना लिहिले आहे की,"मुलांचे मानसशास्त्र आई-बापांना बिलकुल कळत नाही आणि मुलांचे दुःख मोठ्या माणसांना शुल्लक वाटले तरी मुलांना तसे वाटत नाही. मला जी लहानपणाची आठवण आहे ती सुखाची मुळीच नाही. जबाबदाऱ्या नसल्या तरी दुःख मात्र भरपूर असते. आई-बाप चांगल्या हेतूनेच तसे वागत असतील तरी पण तीदेखील मुलांना निष्कारण चिडून मारत नाहीत असे नाही.[२]

विलायतेला परदेशी शिक्षणासाठी जाण्याचा प्रयत्न रघुनाथरावांनी केला होता. त्यांच्या तांत्रिक शिक्षणाच्या खास अभ्यासासाठी पूर्णतः पात्र असल्याची तीन शिफारस पत्रे र.पु.परांजपे यांनी रघुनाथरावांना दिली होती. कारण त्याकाळी शिष्यवृत्ती घेऊन विलायतेला जाऊन तेथे इंग्रजी राजवटीविरोधात उद्योग करण्याचे प्रकार भारतातील पूर्व क्रांतिकारकांनी केल्यामुळे विलायतेला शिकण्यासाठी जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची मते जाणून घेणे हा सरकारला चौकशीसाठी महत्त्वाचा विषय वाटत होता. वास्तविक र.पु.परांजपे यांनी रघुनाथरावांसाठीच्या शेवटच्या शिफारस पत्रात म्हटले होते की,"रघुनाथरावांची मते मुळीच जहाल नाहीत आणि राजकीय स्वरूपाच्या लोकांत ते कधीही सहभागी झाले नाहीत."[३]एवढेच नव्हे तर रघुनाथरावांचे शिक्षक गोपाळ कृष्ण गोखले यांनी ही त्यांना असेच शिफारस पत्र दिले होते, पण त्यांना कोणतीही शिष्यवृत्ती मिळाली नाही.विलायतेस जाण्याचे त्यांचे स्वप्न अपुरेच राहिले. म्हणून शिक्षकाच्या पेशाला आवश्यक असलेले सेकंडरी टीचर्स सर्टिफिकेट(डिप्लोमा) मिळविण्यासाठी रघुनाथरावांना १९०६ रोजी मुंबईला सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजमध्ये नाव दाखल केले. शेवटी मुंबई हेच त्यांचे कार्यक्षेत्र ठरणार होते अशी परिस्थिती तयार झाली.र.धों.कर्वे यांच्या जडणघडणीत प्राचार्य नेल्सन फ्रेझर यांचा वाटा महत्वाचा होता.

रघुनाथरावांनी या काळात लैंगिक विषयावरील ग्रंथांचे वाचन सुरू केले. या विषयावरील ग्रंथ इंग्रजी भाषेपेक्षा फ्रेंच भाषेत खूप जास्त होते. रघुनाथराव यांनी मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमधील गणिताच्या अध्यापनाबरोबर एम.ए.साठी गणिताचा अभ्यास करण्याचे ठरविले. तेव्हा अधिक अभ्यासासाठी त्यांना फ्रेंच भाषेचा अभ्यास आवश्यक वाटू लागला. त्यामुळे ते एलफिस्टनमध्ये फ्रेंच भाषेच्या तासांना उपस्थित राहू लागले. तेथेच फ्रेंच भाषेतील संवाद, संभाषणाचा सराव होऊन फ्रेजर यांच्याशी मैत्रीही जमली. रघुनाथरावांना लिंगविज्ञान, संततिनियमन या विषयांचा विशेष अभ्यास करण्यासाठी फ्रेंच भाषेचे ज्ञान उपयुक्त ठरले. १९११मध्ये रघुनाथराव पूर्वाश्रमीच्या गंगू गोडे उर्फ मालतीताई यांच्याशी विवाहबद्ध झाले .मालतीताईंचा त्यांच्याशी प्रेमविवाह होता. त्यांचे फर्ग्यूसन कॉलेजमध्ये इंटर पर्यंतचे शिक्षण झाले होते. मालतीताईंचे वडिलांनी अण्णासाहेब कर्वे यांना मुलीचे लग्न वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत करणार नाही असा बॉन्ड लिहून दिला होता. विवाहानंतर आपल्याला एकही मूल होऊ द्यावयाचे नाही, असे या नवविवाहित दाम्पत्याने एकमेकांच्या संमतीने विचारपूर्वक ठरविले. रघुनाथराव आणि अण्णा यांच्यामध्ये मुले होऊ न देण्याचे एकमत नसले तरी

संततिनियमन याबद्दल मात्र होते. अण्णासाहेब कर्वे यांचे धाकटे चिरंजीव भास्करराव यांनी एके ठिकाणी लिहिले आहे की,"संततीनियमनाविषयी अण्णा नेहमीच मोकळेपणाने बोलत. शंकर,दिनकर आणि मी या तीन बंधूत सरासरीने पाच वर्षांचे अंतर आहे ते योगायोगाने घडलेले नव्हे."४

**संततिनियमन कार्याचा प्रारंभ:**

जेव्हा पहिले महायुद्ध सुरू होते त्या काळात अमेरिकेत मार्गारेटसँगरयांनी १६ ऑक्टोंबर १९१६ रोजी या या कार्याचा शुभारंभ केला.या उपक्रमासाठी 'बर्थ कंट्रोल' असा सुटसुटीत शब्द वापरला जाऊ लागला. र.धों.कर्वे यांनी मात्र संततिनियमन असा अगदी अन्वर्थक शब्द तयार केला आणि महाराष्ट्रात संततिनियमन ही संज्ञा स्वातंत्र्यपूर्व काळात १९२१ ते ४७ या काळातील लेखक,समाजसुधारक, पत्रकार, जनसामान्य, तज्ञ, सर्रास वापरू लागले.मेरी स्टोप्स यांनी इंग्लंड मध्ये पहिल्यांदा संततिनियमन केंद्र १९२१मध्ये सुरू केले. याच वर्षी र.धों.कर्वे यांनी मुंबईत सल्ला, मार्गदर्शन देणारे व संतती नियमन साधनांची विक्री करणारे केंद्र सुरू केले.इंग्लंड अमेरिकेत ही 'बर्थ कंट्रोल' चळवळ १९ व्या शतकात प्रथम सुरू झाली. त्या काळी महाराष्ट्रात महादेव गोविंद रानडे यांनी वयाच्या १९ व्या वर्षी लोकसंख्या नियंत्रण व कमी अन्नधान्य उत्पादन या संबंधीचा निबंध ज्ञानप्रसारक सभेत वाचला होता.'सुधारक'चे निर्माते आगरकर यांनाही स्त्रीदास्य विमोचनासाठी कुटुंब आटोक्यात ठेवण्याची निकड मान्य होती. इंग्लंडमध्ये लोकसंख्या वाढीचे प्रमाण कमी होऊ लागले तेव्हा संततिनियमन प्रसारकार्य कठीण ठरू लागले. बहुसंख्य ख्रिस्ती धर्मोपदेशक संतती नियमनाचे प्रखर विरोधक होते.'समाजस्वास्थ्य' या मासिकात डॉ.रोबिन्सनच्या मतांचा व लेखांचा अनेकवेळा नामनिर्देश करून उपयोग केला आहे. १९१४मध्ये मार्गारेट सँगरयांनी 'द वूमन रिबेल' हे मासिक सुरू केले.आंतरराष्ट्रीय पातळीवर संततिनियमन चळवळ संघटित करण्याचा करण्यात त्यांचा विशेष पुढाकार होता.१९५२मध्ये मुंबई येथे स्थापन झालेल्या 'इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेन्टहुड फेडरेशन'च्या प्रयत्नांमागे सँगर यांची प्रेरणा होती अशी नोंद सापडते. एवढेच नव्हे तर 'फॅमिली प्लॅनिंग'च्या अध्यक्ष आवाबाई वाडिया यांनी आपल्या आत्मकथनात ध्येयाने संकटांना सामोरे जाणाऱ्या सँगर यांच्याविषयी फार छान लिहिले आहे.१९२३ मध्ये विल्सन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना रघुनाथराव आपला फावला वेळ संततिनियमन प्रचार कामासाठी देत. विल्सन कॉलेजच्या नेमणूकीपूर्वी रघुनाथराव आपल्या उदरनिर्वाहासाठी दररोज कुलाबापासून परळपर्यंत शिकवण्या करत. ते उदरनिर्वाहाचे काम करत असतानाही त्यांनी 'संततिनियमन' व 'गुप्तरोगापासून बचाव' या विषयांवर इंग्रजीत पुस्तके लिहिलीत. एवढ्यावर प्रसार होणार नाही हे जाणून त्यांनी कॉलेज मधील नोकरी स्वीकारण्यापूर्वीच 'राईट एजन्सी' सुरू केली व त्यामार्फत संततिनियमन साधन गरजू लोकांना विकण्यास प्रारंभ केला. १९२३ मध्ये र.धों.कर्वे यांचे संततिनियमन हे पुस्तक प्रकाशित झाले. त्या काळात देखील 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राने या पुस्तकाची जाहिरात

छापण्यास नकार दिला. यावरून 'संततिनियमन' विषयासंबंधी त्या काळी जनमत किती प्रतिकूल होते याची कल्पना येते.

विल्सन कॉलेजमध्ये पूर्णवेळ अध्यापक म्हणून नियुक्ती झाल्यावर संततिनियमन प्रसार प्रचारासाठी त्यांच्यावर आलेल्या विरोधामुळे त्यांनी नोकरी सोडली. मधल्या काळात त्यांना आफ्रिकेतील बंधू शंकरराव यांनी बोलावून घेतले.नैरोबीच्या वास्तव्यातच त्यांनी संतती न होण्याची शस्त्रक्रिया करून घेतली. त्यामागे पत्नीचे आजारपण, बेरोजगारी या इतर कारणांप्रमाणेच नसबंदीमुळे षंढत्व येते हा गैरसमज दूर करण्यासाठी स्वतःवरच शस्त्रक्रिया करून घेणे हे उद्दिष्ट होते. हिंदुस्थानात परतल्यानंतर बेरोजगार असताना फ्रान्सबरोबर मोत्यांचा व्यापार करणाऱ्या एका खाजगी कंपनीत त्यांना सेक्रेटरीची नोकरी मिळाली. या नोकरीत असतानाचर.धों.कर्वे यांनी स्वतःच्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकाचा प्रारंभ केला.

समाजस्वास्थ्य या मासिकाचा पहिला अंक १५ जुलै १९२७ या दिवशी संततिनियमन कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून प्रकाशित केला. त्यांनी समाजस्वास्थ्याच्या प्रस्तावनेतच स्पष्ट केले होते की व्यक्तीच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधी उपायांची चर्चा करणे हा या मासिकाचा उद्देश आहे. विशेषतः ज्या विषयासंबंधी लेख छापण्यास इतर पत्रकार लाजतात किंवा भितात असे विषय कितीही महत्त्वाचे असले तरी त्यासंबंधी माहिती मिळवण्यास सामान्य वाचकांना अतिशय अडचण पडते हीच अडचण दूर करण्याचा आमचा विचार आहे. यात केवळ तत्वज्ञानाचा खलच न करता व्यवहार उपयोगी माहितीही दिली जाईल.'कामशास्त्र' या शब्दाचा दुरुपयोग झालेला आहे तरीही 'कामवासनेचा शास्त्रीय दृष्टीने विचार' अशा अर्थाने हा शब्द वापरणे आम्हास भाग पडत आहे त्याबद्दल कोणासही क्षुब्ध होण्याचे कारण नाही.[५]पहिल्या वर्षात 'समाजस्वास्थ'चे १२ अंक नियमित व्यवस्थित स्वरूपात जरी प्रकाशित झाले तरी त्यातून अपेक्षित कोणत्या अर्थाने वैचारिक-आर्थिक लाभ झाला नाही. आमच्या 'समाजस्वास्थ' या एकाच नियतकालिकात अत्यंत चिंतनशीलता सामावलेली दिसते. त्यांच्या एकंदर लेखनाला अनंत देशमुख यांनी बुद्धिवादासंबंधी, देव/ज्योतिष/मोहनिद्रा, विवाह,संततिनियमन,काम विषयक चर्चा, विविध संस्थांचे पदाधिकारी म्हणून वृत्तांतलेखन, साहित्यकलाविषयक लेखन व परीक्षणे तसेच रघुनाथरावांच्या अन्य योजना अशा प्रकारे वर्गीकृत केले आहे.

'समाजस्वास्थ्य'च्या तिसऱ्या वर्षाअखेरीस वर्गणीदारांची संख्या४००पर्यंत गेली. समाजस्वास्थ्याच्या चौथ्या वर्षात त्यांनी कामशास्त्रासंबंधी प्रामुख्याने लिहिले.र.धों.नी 'शारदेची पत्रे' या सदरामधूनही स्त्री-पुरुष समानतेविषयी त्यांचा कमालीचा अट्टाहास आणि आग्रह असे. तत्कालीन सर्व परिस्थितीचे आकलन करून स्त्रियांचे आयुष्य फुकट का जाते, यावर त्यांचे भाष्य लक्षणीय आहे. ते म्हणतात, "....जेवणाच्या बाबतीत मात्र पुरुष अत्यंत स्वार्थी असतात, त्यामुळे बायकांनी नेहमी आपल्या तैनातीला हजर राहिले पाहिजे असे ते म्हणतात. बायकांचे आयुष्य फुकट जायचे हे एक मुख्य

कारण आहे. स्वातंत्र्य कधी मागून मिळत नसते ते घ्यावे लागते किंवा ते घ्यायची ताकद आली म्हणजे ते आपोआपदेखील मिळते. याबाबतीत पुरुषांनी आपला स्वार्थ सोडला पाहिजे पण ते नुसते सांगून सोडणार नाहीत. अर्थात दोन-तीनपेक्षा जास्त मुले होऊ नयेत याकरिता संततिनियमनाची माहिती बायकांना दिली पाहिजे आणि हे बायकांनीच मनावर घेतले पाहिजे. जरूर तर गर्भपातदेखील करण्याची सोय पाहिजे आणि असे कायदे करणे अशक्य नाही. हल्लीची सनातनी पिढी संपली की, ते करता येईल; पण बायकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की,स्वतःच्या अंगात ताकद म्हणजे पोटभरण्याची शक्ती स्वातंत्र्य मागून मिळत नसते. नाहीतर आजच्या हिंदुस्थानला स्वराज्य नसते का मिळाले? पण आपल्याला स्वातंत्र्य पाहिजे हे देखील पुष्कळ बायकांना कळत नाही आणि ज्यांना कळते त्यांना देखील तसे सांगण्याची ताकद नसते; पण ज्यांना स्वतंत्र्य घेता येईल त्यांनी ते घेणे जरूर आहे."[६]अशाप्रकारे स्त्रीजीवनाचा समानतेने विचार करण्याचे आणि अमलात आणण्याचे धोरण त्यांच्या लेखन-कृतीतून दिसते.

रघुनाथराव आणि मालतीबाईंचे सहजीवन संयुक्तपणे प्रसारात गेले. मालतीबाईंनी त्या काळात रघुनाथरावांच्या पाठीशी उभे राहण्यास आपला निर्धार कृतीत आणण्यासाठी नोकरी करून खरोखरच संसाराची जबाबदारी पत्करली होती. फक्त मुलींसाठीच असलेल्या वेगवेगळ्या शाळांतून शिक्षिकेची नोकरी केल्यावर त्या मुंबई महापालिकेच्या मुलींसाठी असणाऱ्या ऊई शाळेत 'ड्रिल टीचर' म्हणून स्थिरावल्या.नोकरीत जम बसताच त्यांनी स्थैर्य मिळाल्यानंतर मालतीबाईंनी रघुनाथरावांच्या कार्यात आस्थेने लक्ष देण्यास प्रारंभ केला.मालतीबाईंनी संततिनियमनाची साधने कशी उपयोगात आणायची याची व्यवस्थित माहिती करून घेतली. कुटुंबनियोजनासंबंधी त्यांनी सखोल अभ्यास केलाअन् हे काम पूर्ण होताच त्यांनी संततिनियमन केंद्र स्थापण्यास रघुनाथरावांना सक्रीय मदत केली. संततिनियमनाची साधने बनवणे ही कामे त्या केंद्रामार्फत चालत असे. त्यासाठी हे कर्वे दाम्पत्य कधीही कंटाळा करत नसे. याची नोंद दिवाकर बापट यांनी 'उपेक्षित द्रष्टा' या ग्रंथातून केली आहे.र. धों. हे बुद्धिप्रामाण्यवादी होते. त्यांच्या एकंदर संततिनियमनाच्या कार्य प्रसाराचा स्वातंत्र्योत्तर काळात परिणाम दिसून येतो.

र. धों.च्या कार्यास मिळालेली शासन मान्यता आणि समाज मान्यता :

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी सुमारे ३४ ते ३६ कोटी लोकसंख्येच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य,शिक्षण आणि मनोरंजन या मूलभूत मानवी गरजा भारताला स्वातंत्र्योत्तर काळात भागवायच्या असल्यामुळे ही लोकसंख्या वाढ आटोक्यात आणण्यासाठी कुटुंबनियोजनाचा प्रचार भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू झाला. १९३५ मध्ये हिंदी राष्ट्रीय सभेने (कॉंग्रेस) राष्ट्रीय नियोजन समिती स्थापन केली. या समितीचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते. कुटुंब नियोजनासंबंधी यांनी शिफारस पूर्वक म्हटले होते की,"सामाजिक अर्थव्यवस्था

कौटुंबिक सुख व राष्ट्रीय नियोजन यासाठी कुटुंब नियोजन व मुलांची मर्यादित संख्या आवश्यक आहे आणि सरकारने या कार्यास चालना व प्रोत्साहन देण्यासाठी धोरण आखावे. संततिनियमनाच्या स्वस्त व सुलभ साधनांच्या माहितीचा प्रचार व आग्रह अगत्याचा आहे. संततिनियमन केंद्र सुरू करावीत व उपद्रवी वापर व जाहिरात यांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजले जावेत."[७]ज.रां.आपटे यांच्या मते, आपल्या देशातील सर्वात मोठ्या राजकीय व संभाव्य सत्तारूढ पक्षाने संततिनियमनाचा एवढा स्पष्टपणे पुरस्कार करावा ही घटना आगामी धोरणांची चाहूल होती असे म्हणायला हरकत नाही.

मार्च १९५० मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय नियोजन आयोगाची नेमणूक केली. नियोजन आयोग देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक योजना कार्यक्रम आखू लागला. त्यात ११ एप्रिल १९५१ ला लोकसंख्या वाढ व कुटुंबनियोजनासंबंधी अहवाल तयार करण्यासाठी उपसमिती नेमली गेली. त्यात लोकसंख्या धोरण, लोकसंख्या संशोधन व कार्यक्रम या दोन विषयासंबंधी समित्या सुचविण्यात आल्या.तत्कालिन जनगणना प्रमुख गोपालस्वामी यांनी जनगणना अहवालात संततिनियमनाची शिफारस आग्रहाने सुचविली. अशा विकासक्रमांचे श्रेय र.धों.कडे जाते.

समाजसुधारकांचे कार्य किती बहुआयामी असते याचे उदाहरण म्हणजे र.धों.कर्वे होय. त्यांच्या महान आणि समाज उपयोगी कुटुंबकल्याण कामगिरीची दखल घेतली जाऊन मुंबईचे तत्कालीन महापौर स. का. पाटील यांच्या अध्यक्षतेत २० जुलै १९५२ रोजी मुंबईतील ब्लॅव्हटस्की लॉजमध्ये त्यांचा सत्कार होऊन ५६०० रुपयांची थैली त्यांना अर्पण करण्यात आली. त्याच प्रसंगी 'समाजस्वास्थ' मासिकांच्या सर्व अंकांचे छोटेसे प्रदर्शनही मांडले गेले. अध्यक्षीय भाषणात स.का. पाटील यांनी रघुनाथ कर्वे यांनी ज्ञानाचाएक दरवाजा खुला करून दिला आणि ते ७० वर्ष वयाचे असतानाही तरुणांच्या जोशात कार्यरत कसे आहेत त्याबद्दल यशोगौरव केला. रघुनाथरावांनी हा लढा ४० वर्ष सातत्याने दिला.

विशेष म्हणजे महर्षी कर्वे यांनीही आपल्या भाषणात रघुनाथरावांना आशीर्वाद दिले."समाजाला अप्रिय वाटणारे प्रश्न मी हाताळले व ते सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यात मला यशही लाभले, परंतु माझ्या चिरंजीवांनी हाती घेतलेला प्रश्न अप्रिय तर होताच पण प्रक्षोभकही होता, या बाबतीत त्यांनी आपल्या पित्याचाही पराभव केला आहे." रघुनाथ कर्वे यांनी 'जनतेला विचार करावयास लावले हे माझे ध्येय होते' या धोरणावरच आयुष्यभर कार्य केले.'फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया' या जुलै १९४९मध्ये मुंबईत स्थापन झालेल्या संस्थेचे रघुनाथराव सदस्य होते.एकूणच त्यांच्या कार्यास शासन आणि सामाजिक स्तरावर मान्यता मिळू लागली. त्यांच्या कार्यास मान्यता मिळत असतानाच रघुनाथरावांची प्रकृती हळूहळू ढासळली. १४ ऑक्टोंबर १९५३ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.

समारोप :

महाराष्ट्रासोबतच भारताच्या कुटुंबनियोजन कार्याच्या इतिहासातर.धों.कर्वे यांचे स्थान अद्वितीय आहे. त्यांच्या आयुष्यातील १९२१ ते १९५३ या काळात त्यांनी शासन,सामाजिक,विरोध उदासीनतेला एकाकीपणे तोंड देत देत मुंबई आणि अन्यत्र स्थळी कुटुंबनियोजनासाठी प्रबोधन,प्रशिक्षण प्रसाराचे जे अतुलनीय कार्य केले त्याला तोड नाही.

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात समाजसुधारकांना आणि विविध प्रश्नांना वाचा फोडल्यामुळेच भारताच्या विकासाची उन्नत अवस्था सतत भारतीय जनतेला अनुभवता आली. महाराष्ट्र या बाबतीत अग्रणी होताच. मात्र अत्यंत नाजुक आणि तरीही एका गंभीर अशा विषयावर अत्यंत चिकाटीने काम करणारे प्रा.रघुनाथ धोंडो कर्वे आणि मालतीबाई यांचे कार्य हे एका द्रष्ट्या विचारवंतांचे कार्य आहे. म्हणून भविष्यातील सर्वच पिढ्यांनी त्यांचे ऋणी असावयास हवे हे निश्चित.

**संदर्भ :**

१. आपटे, ज.शं., समाजस्वास्थकारर.धों.कर्वे, गंधर्ववेद प्रकाशन, नोव्हेंबर २०१०.
२. संपादक कर्वे,र.धों.समाजस्वास्थ्य एप्रिल, १९४४पृष्ठ क्र.२४२-४४
३. आपटे, ज.शं., समाजस्वास्थकार र.धों.कर्वे, उ.नि.
४. अभिरुची दिवाळीअंक १९७७ पृष्ठ १७
५. संपादक अनंतदेशमुख, समाजस्वास्थ्यमधील निवडक लेख, पद्मगंधा प्रकाशन; पुणे
६. समाजस्वास्थ्य वर्ष ११ ,अंक ९,१५मार्च १९३८
७. समाजस्वास्थ्यकारर.धों.कर्वे उ.नि पृष्ठ ९५
८. उ.नि.पृष्ठ-९८

# परिवर्तनवादी प्रबोधक जोतीराव

प्रा.डॉ.राजेश चवरे
प्रमुख,मराठी विभाग,
कला,वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालय,मारेगाव, जि.यवतमाळ-४४५३०३

**सारांश**: प्रबोधनाचा अर्थ भारतीय समाजरचनेच्या क्रांतिकारी परिवर्तनाचा विचार करताना प्रबोधन ही संकल्पना महत्त्वाची भूमिका वठवताना दिसते. प्रागैतिहासिक कालखंडापासून मानवाची एकूणच जीवनप्रणाली ही निसर्ग देव-दैवत अंधश्रद्धा यांवर विसंबून राहून हळूवार मार्गक्रमण करताना दिसते. या प्रवासात निरनिराळ्या वळणावर जीवनास तुच्छ लेखणाऱ्या मानवी मुल्यांचा नाश करणाऱ्या घटनांचा तुरळकपणे विरोध झाला तरी देव-देवतांच्या नावामागे तो दडपून टाकण्यात येत असे. अशा हजारो वर्षांची काळरात्र लाभलेल्या अन्यायग्रस्त शोषित जीवनाची परिवर्तनवादी, पुरोगामी विचारांची सोनेरी पहाट म्हणजे प्रबोधन होय. महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरेची सुरुवात तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात नामदेव, ज्ञानदेवाच्या प्रबोधनातून झालेली आहे. तत्कालीन संत मंडळींचे प्रबोधन हे धार्मिक, भाषिक प्रश्नापर्यंतच मर्यादित होते. याचा अर्थ तेव्हा सामाजिक विषमता, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता यासारखे प्रश्न मोडीत निघाले होते, असे नाही. परंतु या प्रश्नांविषयी परखडपणे आपले विचार मांडण्याऐवजी ही मंडळी कारुणेची, दयेची याचना करताना दिसतात. याचाच अर्थ "संतांना तत्कालीन समाजव्यवस्थेत ढवळाढवळ करायची नव्हती"[१], असा दिसून येतो. प्रबोधन या शब्दाला इंग्रजी मध्ये 'रिनेसन्स' हा पर्याय आहे. याचा अर्थ पुनर्जन्म किंवा नवा जन्म असा होतो. आता प्रश्न पडतो पुनर्जन्म किंवा नवा जन्म कोणाचा? तर 'पुनर्जन्म म्हणजे प्राचीन युगातील रोमन व ग्रीक काळातील ख्रिस्ती धर्माच्या उदयापूर्वीच्या संस्कृतीचा आणि नवा जन्म म्हणजे चर्चच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त झालेल्या मानवाचा.' [२] एकंदरीत जगाच्या इतिहासात त्या त्या प्रदेशातील बहुजन/दलित समाजाचा तेथील उच्चवर्णीयांनी, श्रीमंतांनी धर्माचा आधार घेऊन विषमतापूर्ण भेदभाव व परंपरांची निर्मिती केलेली आहे. तत्कालीन समाजातील वाईट रूढी, परंपरा यांचा विरोध करणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट असली तरी क्रांती होणे, परिवर्तन घडवून आणणे ही काळाची गरज होती. भारतात सतराव्या शतकात संत तुकारामा ने केलेले कार्य या दिशेला पडलेले महत्त्वाचे पाऊल ठरते.

भारतीय इतिहासामध्ये प्रबोधन चळवळीला फार उशिरा सुरुवात झाली. मुळात जागतिक पातळीवर देखील मानवतेचा इतिहास तपासताना आपणास धर्मांधतेचे साम्राज्य अधिकच फोफावलेले दिसते. तेथेसुद्धा प्रतिगामीत्व मांडणाऱ्या अंधश्रद्धेची दीर्घ परंपरा होतीच. त्यामुळे आपल्या परिवर्तनाला अथवा प्रबोधनाला बराच उशीर झालेला आहे, असे म्हणण्यापेक्षा जागतिक परिवर्तनालाच फार उशीर झालेला आहे, असे म्हणणे सार्थक ठरेल. ज्ञान हे प्रबोधनाचे आणि परिवर्तनाचे योग्य

आणि सशक्त माध्यम आहे, हे आजपर्यंतच्या वैश्विक जडणघडणीने सिद्ध केलेले आहेच. ज्याप्रमाणे आपल्या देशातील ज्ञान परंपरेची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गाकडे मर्यादित राहिली त्याचप्रमाणे ज्ञान साधना करण्यासाठी पाश्चात्य देशातील लोकांनासुद्धा तेथे संघर्ष करावा लागलाच. तेथेसुद्धा मक्तेदारीची परंपरा होतीच. यामुळे आपण केवळ भारतीय परंपरेला दोष देऊन वा परिवर्तनाच्या दुरावस्थेबद्दल मत व्यक्त करू शकणार नाही. संघर्ष हा सार्वत्रिक असतोच. संघर्षातून तावून सुलाखून निघाल्यावरच जीवनाचं आणि ज्ञानाचं खरं मर्म व्यक्तीला कळत असते. फुले, शाहू, आंबेडकर ही आपल्या देशातील परिवर्तनवादी प्रबोधकांची पहिली डोळस पिढी ठरते, ज्यांनी स्थानिकांना दृष्टी दिली.संघर्ष शिकविला. संघर्षाच्या पुढची पायरी म्हणजे विकासाची सुरुवात असते. या संघर्षाला कोठेतरी एक मर्यादा असावी, त्या पलीकडे परिवर्तनाने आपली भूमिका मांडावी आणि जगाने आपला विकास साधावा, अशाप्रकारे मांडलेली भूमिका परिवर्तनवादी प्रबोधनासाठी निश्चितच द्योतक ठरते.

भारताच्या प्रबोधन चळवळीला मुख्यत्वे आधार म्हणून आपणास पाश्चात्य शिक्षणव्यवस्था आणि समाज व्यवस्थेकडे बघता येईल. या परदेशी शिक्षण व्यवस्थेने भारतीयांना शिक्षण व्यवस्थेतील मानवतावाद दिला, असे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही. याला कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिराव फुले, शाहू महाराज, प्रथम महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी किंवा या कालखंडातील पहिली जाणकार सुशिक्षित मंडळी. ही मंडळी बहुतांश इंग्रजी शिक्षण व्यवस्थेचेच अपत्य आहेत, हे आपल्या लक्षात येईल. भारतातील परिवर्तनवादाची चळवळ ही जागतिक परिवर्तनवादी चळवळीच्या तुलनेत थोडी मागे असेल पण ती फार दूर सुद्धा नव्हती. याला कारण म्हणजे तत्कालीन बऱ्यापैकी स्थानिक भारतीय पाश्चात्य देशात जाऊन उच्चशिक्षण घ्यावे, या मताचा होता. यापैकी अनेकांना ती संधी  मिळाली नाही, ही खंत मात्र आहेच. ही खंत जरी आपण ग्राह्य धरली तरी जी मंडळी पाश्चात्य शिक्षणाच्या संपर्कात आली, त्यांनी येथे परत आल्यानंतर त्या शिक्षणाची आपल्या देशात वाटचाल कशी यशस्वी होईल, ही एक नवपरंपरा निर्माण केली. ही एक दीर्घ परंपरा आपल्या देशाला लाभलेली आहे. याचे एक टोक आपणास आंबेडकर, फुले, शाहू यांच्याकडे दिसते तर दुसऱ्याटोकावर डॉ.अभय बंग आणि डॉ. राणी बंग सारखे समाजशास्त्रज्ञ डॉक्टर आपणास त्या शिक्षणाचे प्रायोगिक रूप मांडताना दिसतात. आज तर शासनानेच मुक्त अर्थव्यवस्थेच्या आणि जागतिकीकरणाच्या माध्यमातून शिक्षणाची दारे सगळ्यांसाठी मोकळी करून दिली आहेत, परंतु फुले, शाहू, आंबेडकर यांनी घेतलेले पाश्चात्य शिक्षण, त्या शिक्षणाची त्यांनी मांडलेली उपयोगिता, त्यांना मिळालेले त्याचे निष्कर्ष आणि आजची जी पिढी पाश्चात्य देशात जाऊन शिक्षण घेऊन येते आणि त्याची संकुचितपणाने मर्यादित उपयोगिता मांडते; या दोघांमधील अंतर आपणा कोणालाही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. फुलेंना प्रबोधनाची जी दिशा कळली होती, त्या दिशेवर आजची परिवर्तन मांडणारी प्रबोधक पिढी चालताना मात्र दिसत नाही, हे एक नवीन भयानक वास्तव आज आपल्या डोळ्यापुढे निर्माण झाले आहे.

**ठळक शब्द**: परिवर्तन, प्रबोधन, पुरोगामीत्व, प्रतिगामीत्व, दिशा,जाणकार पिढी इ.

**प्रबोधनाचा कालखंड:-**प्रबोधन ही संकल्पना भारतीयांना पाश्चात्त्य देशांकडून मिळालेली देणगी आहे. या संकल्पनेचा भारतातील प्रवेश एकोणिसाव्या शतकातील असला तरी ही परंपरा निर्मिती युरोपमध्ये चौदाव्या शतकातच सुरू झालेली आहे. या शतकापासून आधुनिक युगाचा प्रारंभ होतो म्हणून या शतकाला प्रबोधन कालखंडाचा आरंभकाल म्हणतात. तर पंधरावे आणि सोळाव्या शतकास प्रबोधनाचा उत्कर्षकाल मानतात. युरोपमधील प्रबोधनाचे स्वरुप व्यापक दृष्टीने प्रगतीपथावर वाटचाल करीत होते. भाषाशास्त्र, इतिहास, भूगोल यासारख्या विषयांमध्ये रुढ संकल्पनांना तडा देऊन प्रबोधनाच्या याच कालावधीत धाडसी दर्यावर्दी युरोपीय लोकांनी दूरदृष्टीने नवे देश, प्रदेश शोधून काढले आणि याचा फायदा साम्राज्य विस्तारासाठी तेथील शासनत्यांनी घेतला. वास्को-द-गामा सागर मार्गाने (१४९७-९८) भारतात आला आणि भारत व युरोप यांच्यात व्यापारासाठी नवीन समुद्रमार्ग तयार झाला. व्यापाराच्या निमित्ताने डच, पोर्तुगीज, इंग्रज सोळाव्या आणि एकोणिसाव्या शतकात भारतात आले. नवीन आलेल्या राज्यकर्त्यांनी आपल्या सोबत आपले सांस्कृतिक विचार मांडलेत आणि त्यांचा येथे प्रचार-प्रसार केला.

संयुक्त महाराष्ट्रात इंग्रजी शासनाची सुरुवात होण्यापूर्वी पेशवाई होती. हा कालखंड म्हणजे येथील जनतेच्या शोषणाचा अंधश्रद्धेचा आणि राजकीय दृष्ट्या अस्थिरतेचा होता. या अस्थिरतेचा फायदा घेत अनेक प्रस्थापित मंडळी आपल्या सामर्थ्याच्या बळावर अंधश्रद्धा, विषमता, आराजगता माजवण्यासाठी प्रोत्साहन देत होती. सामान्य जनता मात्र या दुष्टचक्रात नाहक भरडली जात होती. महात्मा फुले यांनी एकंदरीत सर्व परिस्थितीचा अभ्यास करून त्यामागील कारणांचा शोध घेण्याचा पहिला प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी देखील झाले. इंग्रजी शासनाच्या स्थैर्याचा आणि महात्मा फुले यांच्या प्रबोधनाचा कालखंड एकच होता. त्यांनी इंग्रजी शासनकर्त्यांचे धोरण, पेशवाईतील जनजीवन व तत्कालीन समाजव्यवस्था यांचा एकत्रितपणे अभ्यास करून आपल्या प्रबोधनाची दिशा ठरविली होती. इंग्रजांच्या भारतातील आगमनाबरोबरच युरोपातील भारतीय विचारांचा सुद्धा येथे प्रवेश झाला होता. हा प्रवेश चातुर्वर्ण्य, अज्ञान, अंधश्रद्धा यांचा नाश करण्यासाठी आवश्यक असल्याचे फुल्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी १८५७च्या राष्ट्रीय उठावाचे समर्थन केलेले नाही.

युरोपमधील राजकीय अस्थिरता व त्यानंतरचे तेथील बदललेले जीवनमान, त्यांनी स्वीकारलेली विचारशैली या एकूणच गोष्टी भारतीय विचारवंतांसाठी प्रेरक ठरल्या होत्या. व्हाल्टेअर, मार्टिन लुथर, थॉमस पेन, रुसो यांचे साहित्य येथील वाचक वर्गास प्रभावित करीत होते व त्यातून प्रबोधनकारांची एक नवी पिढी उदयास येत होती. वेगवेगळ्या विचारवंतांनी आपल्या आगळ्या शैलीद्वारे मानवी मूल्य, सामाजिक जाणिवा, मूलभूत हक्क यांचा समावेश करून साहित्यनिर्मिती केली आहे. हे साहित्य देशी विचारवंतांना भाषिक सामाजिक व राजकीय प्रबोधन करण्यासाठी उत्तेजित करीत होते. याचा परिणाम म्हणून अव्वल इंग्रजी कालखंडात ज्ञानोपासनेचे वारे वाहू लागले होते.

तत्कालीन मासिके, दैनिके यांची नावे सुद्धा ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षू, ज्ञानचंद्रोदय, ज्ञानप्रसारक, ज्ञानदर्पण, विविध ज्ञानविस्तार आणि ज्ञानसंग्रह अशी होती. यावरून त्या काळातील जनतेची गरज लक्षात येऊ शकते.

**प्रबोधनाचे ऐतिहासित्व:-** आधुनिक भारतातील प्रबोधन परंपरेची सुरुवात आंग्लकाळात झाली आणि तिच्या उत्कर्षाचा कालखंड देखील हाच होता. युरोपातील राजकीय आणि सामाजिक परिवर्तन चळवळीने तेथील जनजीवनाला एक पुरोगामी शैली प्राप्त करून दिली होती. चळवळीचा हा निर्झर हळूवार इंग्रजांच्या माध्यमातून भारतापर्यंत पोहोचला होता. या कालखंडात महात्मा फुल्यांनी थॉमस पेन यांच्या साहित्याचा अभ्यास करून मानवी मूल्ये, हक्क या विषयांवर आधारित लेखन प्रपंच सुरू केला होता. याच कालखंडात केशवसुतांनी समाजप्रबोधनाची जाणीव असलेल्या समताधिष्ठित कविता लिहून साहित्य प्रांतास नवी दिशा सुचविली. हरि नारायण आपटे यांनी 'पण लक्षात कोण घेतो' सारख्या कलाकृतीची निर्मिती करून विधवाविवाह सारख्या सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. बाबा पद्मनजी यांनी सुद्धा या सारख्या प्रश्नांचे चित्रण करणाऱ्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीची निर्मिती केली. तत्कालीन प्रचलित सामाजिक प्रश्नांचे चित्रण समकालीन साहित्यात आले आहे. 'पिराजी पाटील', बळीबा पाटील', 'काळ तर मोठा कठीण आला' यासारख्या कादंबऱ्या तर त्या काळातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या जीवनाचे प्रभावीपणे चित्रण करताना दिसतात. या काळातील निर्मित साहित्य परिस्थितीचे यथार्थ वर्णन करताना दिसतात. महात्मा फुले यांनी निर्मिलेल्या साहित्यामध्ये तत्कालीन समाजातील प्रश्न व त्यामागची कारणे व उपाय आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड' यासारख्या ग्रंथात मांडलेले आहेत. समस्यांची उकल शोधून तिच्या मुळाशी घाव घालण्याची पद्धत महात्मा फुले यांच्या विचारशैली मध्ये आपणास दिसते. भारतीय विचारवंतांना दिशा देण्याचे कार्य युरोपातील प्रबोधनपर्वाने केले आहे. यासाठी त्या काळाचा आणि परंपरांचा अभ्यास करणे देखील क्रमप्राप्त ठरते.

युरोपच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी स्थूलमानाने तीन कालखंडात त्याची विभागणी केली जाते. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंड म्हणून ते प्रचलित आहेत.हे तीन कालखंड विविध राजकीय आणि धार्मिक घटनांना अनुसरून तयार करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ग्रीक आणि रोमन संस्कृतीच्या कालखंडास प्राचीन म्हणतात तर युरोपमध्ये रोमन बादशहा कॉन्स्टटीन याने ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतल्यापासून प्रबोधन कालापर्यंतचा काल म्हणजे तेराव्या शतकापर्यंतचा कालखंड, हा मध्ययुग म्हणून ओळखला जातो. चौदाव्या शतकापासून आधुनिक युगाचा प्रारंभ होतो. याच शतकाला प्रबोधन युगाचा प्रारंभ काळ म्हणून ओळखल्या जाते. पंधरावे शतक मात्र प्रबोधनाचा उत्कर्षकाल होता. याच शतकात नवतेचे वारे वाहू लागले होते. नवे शोध, संशोधन, नव्या जाणिवा यांना लौकिक जीवनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्यामुळे एकूण युरोपीय जीवनशैली प्रगतीकडे वाटचाल करीत होती. याचाच परिणाम जगाच्या इतिहासावर सुद्धा झालेला आहे. तत्कालीन

परिस्थितीचा विचार केल्यास बहुतेक देश गुलामगिरीत खितपत पडलेले होते आणि स्वातंत्र्यासाठी धडपड करीत होते. अशावेळी त्या देशांना सर्वांगीण प्रबोधनाची आवश्यकता होती आणि ती गरज युरोपमधील क्रांतीने मिळवून दिली. भारतात सुद्धा व्यापक दृष्टीने प्रबोधन सुरू झाले होते. बहुतेकांनी प्रबोधनासाठी आपले स्वतंत्र माध्यम निवडून त्यावर कार्य सुरू केले होते. एकंदरीत विचार केल्यास आंग्लकालखंड हा प्रबोधन कार्यासाठी सुपीक वातावरणाची निर्मिती करून गेल्याचे स्पष्ट होते.

**भारतातील प्रबोधनाची सुरुवात:-** प्रबोधन परंपरा आणि भारत यांच्या संबंधाचा विचार केल्यास हा संबंध दोन अडीचशे वर्षांपेक्षा जुना नाही. भारतातील प्रबोधन परंपरेची प्रभावीपणे सुरुवात आंग्लकाळातील आहे किंबहुना याच काळाने भारतीयांना जगाच्या घडामोडीत. या परंपरेत लक्ष घालण्यास भाग पाडले आहे. पाश्चात्त्य देशाची स्थिती, तेथील घडणारी स्थित्यंतरे, समाजव्यवस्था, साहित्य व एकूणच तेथील जीवनशैली या सर्व गोष्टींचा अभ्यास स्वतंत्र चळवळीच्या निमित्ताने तेथील विचारवंत आणि नेते मंडळींनी केला आणि हळूवारपणे का होईना पण हा प्रवाह भारतात आणण्यात आला. आंग्लकालीन भारतीय समाजव्यवस्था ही परंपरा विषमता आणि अज्ञानाने ग्रस्त होती. या सर्व बाबींचा विचार घडवून आणण्यासाठी प्रबोधनाचे स्वरूप देखील व्यापक असणे आवश्यक होते. प्रबोधनाची सुरुवातीची धुरा महात्मा फुले यांनी उचलली असली तरी नंतर बहुतेकांनी त्यास गती देण्याचा प्रयत्न केला आहे. जनक्षोभ, विरोध, आत्याचाराचा सामणा मात्र फुले दाम्पत्यानेच सर्वप्रथम सहन केला आहे. प्रबोधनाच्या प्राथमिक अवस्थेत येथील समाज व्यवस्था कमालीची परंपरेने ग्रस्त होती. अस्पृश्यते सारखे प्रश्न मानवी जीवनच होरपळून काढत होते. याची झळ सर्वात जास्त दलितांनाच बसत होती. या परिस्थितीविषयी महात्मा फुले यांचे मत लक्षणीय आहे. ते म्हणतात,"अस्पृश्यता हा मानवतेवर कलंक आहे. भारतीय समाजाला लागलेली कीड आहे. अस्पृश्यतेमुळे कोट्यवधी लोक माणसासारखी माणसे असूनही त्यांना कुत्र्या मांजरा प्रमाणे नीच लेखले आहे. अस्पृश्यतेच्या भयंकर गुलामगिरीत जीवन जगल्याने अस्पृश्य वर्गाचे अखंड जीवनच मृतवत झाले आहे. शतकानुशतके या अस्पृश्यतेला हिंदू समाजाने जीवदान दिले. हाच भारताचा व भारतीय समाजाचा अधःपात आहे."[3]

भारतीय प्रबोधन परंपरेचा अभ्यास करताना फक्त त्याच्या उगमाचा विचार करून चालणार नाही तर त्यामागील प्रेरणा आवश्यकता आणि परिस्थितीचा विचार करणे अपरिहार्य ठरते. भारतात इंग्रजी राज्य येण्यापूर्वी येथे पेशवाई नांदत होती हा कालखंड सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, अत्याचार यासारख्या प्रश्नांनी ग्रस्त होता. राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना पेशवे परिस्थिती सुधारण्यासाठी हजारो ब्राह्मण, पुरोहितांना अन्नदान व भेटवस्तू देत होते. यावरून त्या काळाची कल्पना करता येईल. या कालखंडात संतमंडळींनी केलेले प्रबोधन हे अध्यात्मापर्यंतच मर्यादित होते. तसेच अप्रत्यक्षपणे त्यांनी चातुर्वर्ण्याच्या स्वीकार केला होता. म. फुल्यांमुळे मानवतावादाचा अंगीकार केलेली प्रबोधन परंपरा उदयास आली होती. महात्मा फुलेंनी या परंपरेला आपल्या चळवळीच्या

माध्यमातून एक दिशा दिली आहे. त्यांनी प्रत्येक समस्येमागची उकल मानवतावादी दृष्टिकोनातून शोधली व सोडविली. समाजाला त्यांनी एक आदर्श जीवन सूत्र दिले होते व स्वतः देखील ते जन्मभर स्वीकारले, अंगीकारले. परंतु त्या काळातील न्यायमूर्ती रानडे, गोपाळ हरी देशमुख, सारखे विचारवंत मात्र आपल्या दिलेल्या आदर्श पासूनच स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. न्यायमूर्ती रानडे यांना विधवाविवाह प्रश्नाची बाजू स्वतःचा सहभाग दाखवून सिद्ध करता आली असती परंतु ते वयाच्या बत्तीसाव्या वर्षी एका तेरा वर्षाच्या मुलीशी विवाहबद्ध होतात. यावरून त्यांची समाजप्रबोधनाची दिशा सर्वसामान्य देखील समजू शकतात.

महात्मा फुले यांच्या कालखंडात भारतात प्रबोधन परंपरेला सुरुवात झाली असली तरी त्यातील नेतेमंडळीमध्ये आपापसात मोठ्या प्रमाणात मतभेद होते. काही लोक एका विशिष्ट कंपूत, कोणाच्यातरी छत्रछायेत राहून त्याच विचारांचा प्रचार करीत होती. प्रबोधन कोणत्याही अधिष्ठानाखाली झाले तरी समाजासाठी ते पोषकच असते फक्त त्याचा मुख्य हेतू मानवतावादी असावा. डॉ. आंबेडकर यांनी महात्मा गांधींना चातुर्वर्ण्य व्यवस्थेविषयी विचारले असता त्यांनी आपणास तिचा स्वीकार आहे, असे सांगितले होते. महात्मा फुलेंची प्रबोधन परंपरा मात्र पूर्णपणे मानवतावादावर आधारित असून महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असा तिचा प्रवाह आहे. या प्रवाहाचा केंद्रबिंदू कोणी एक नसून समाजातील प्रत्येक शोषित, पीडित, ग्रस्त व्यक्ती त्यात सामील होईल अशी उच्च कोटीची विचारसरणीची येथे निर्मिती केली गेली आहे. यावरूनच भारताच्या पहिल्या प्रबोधन कालखंडावर महात्मा फुलेंचा असलेला वैचारिक प्रभाव ठळकपणे अधोरेखित होतो.

**महात्मा फुले आणि प्रबोधन संबंध विवेचन:-**

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनास पुरोगामी दृष्टी देणारे महात्मा फुले हे प्रबोधन पर्वाचे उद्घाटक ठरतात. प्रबोधनाची परंपरा ही जर मानवतावाद या तत्वाला अनुसरूनच राबविली तरच ती सर्वसामान्य पर्यंत पोहोचू शकते, हे सत्य त्यांनी हेरले व त्या दिशेला अनुलक्षून कार्य सुद्धा केले. महात्मा फुले आणि प्रबोधन यांचा सहसंबंध त्यांच्या आयुष्याला मिळालेल्या नैसर्गिक देणगी समान आहे. त्यांनी आपले संपूर्ण सहजीवन त्यासाठी पणाला लावलेले आहे. महात्मा फुलेपूर्व महाराष्ट्राची स्थिती अज्ञानात बुडालेल्या अंधःकारमय जगाची होती. या जगाला महात्मा फुले यांच्या निमित्ताने एक क्रांतीसूर्य मिळालेला आहे. त्यांनी केलेले प्रबोधन व्यापक दृष्टीने मर्म स्थळाचा वेध घेणारे आहे. स्वतःच्या परिस्थितीचा विचार न करता दुसऱ्याच्या सुखासाठी, कल्याणासाठी सतत झटणारा प्रबोधक तत्कालीन पिढीत म.फुल्यांशिवाय कोणीही दिसत नाही. समाजातील रूढी, अंधश्रद्धा, विषमता, अज्ञान त्यांच्या प्रबोधनाचा विषय होताच शिवाय शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी त्यांनी केलेले लेखन आजच्या काळातही मार्गदर्शक ठरलेले आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी

त्यांनी सुचविलेले उपाय आणि याप्रसंगी शासनाची, समाजाची भूमिका कशी असावी? याबद्दलचे चिंतन त्यांनी आपल्या वाङ्मयात केलेले आहे.

महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने ते द्रष्टे समाजसुधारक होते. नि:स्वार्थ भूमिकेतून समाजाचे सर्वकष ज्वलंत प्रश्न आपल्या अमोघ वाणीने आणि जहाल लेखणीने सोडविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न परिवर्तनवादी जाणीवेची नवनिर्मिती करून जातात. ही जाणीव त्यांनी तत्कालीन प्रश्नांसाठी व्यापकपणे वापरलेली आहे. स्त्रीशिक्षण/उद्धार, अस्पृश्यता उच्चाटन, सत्यशोधक समाज स्थापना, शेतकऱ्यांचे प्रश्न, या समस्यांवर केलेल्या कृतीपूर्ण उकली मधून त्यांच्या प्रबोधनाचे आगळेपण प्रतीत होते. समाजाला पुरोगामित्वाच्या वाटेवर आणण्यासाठी येथील बहुजन, दलित समाजाला सर्वप्रथम दिशा देणे आवश्यक आहे, ही आवश्यकता त्यांनी हेरली होती. यासाठी त्यांनी केलेली सत्यशोधक समाजाची स्थापना महत्त्वाची ठरते. या समाजाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये महात्मा फुलेंची दूरदृष्टी व प्रबोधन विषयीची कळवळ दिसून येते. त्यातील काही तत्वे  पुढीलप्रमाणे-

अ) सर्व मानव परमेश्वराची लेकरे आहेत.

ब) ईश्वर एकच असून तो निर्गुण-निराकार आहे.

क( परमेश्वराची भक्ती करण्यास मध्यस्थाची गरज नाही.

ड) माणसाला जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्ठत्व प्राप्त होते

इ) कोणताही धर्म हा ईश्वरप्रणीत नसून त्याची निर्मिती मानवानेच केलेली आहे.

अशा समतावादी विचारांनी बहुजन समाजाला एकत्रित बांधून त्यांची जागृती, प्रबोधन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या निमित्ताने केलेले आहे. जोतिरावांच्या प्रबोधन चळवळीमध्ये बौद्ध धर्मातील तत्वे प्रतिबिंबित झालेली आहेत. 'धम्म हा नैतिकता बुद्धिनिष्ठता, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, जातीविरहित मूल्यांवर आधारित आहे.'[४] त्यांच्या प्रबोधनाच्या चळवळीला सुद्धा विज्ञाननिष्ठा, आदर्शवाद, पुरोगामित्व, मानवतावाद या मूल्यांचे अधिष्ठान आहे. महात्मा फुले यांच्या प्रबोधन चळवळीचा मुख्य केंद्रबिंदू सर्वसामान्य माणूस होता. ज्याद्वारे त्यांनी संपूर्ण परंपरागत समाजव्यवस्थेला हादरा दिला. त्यांनी तत्कालीन प्रत्येक सामाजिक समस्यांचा व्यापक दृष्टीने समाचार घेतलेला आहे. याविषयी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे मत लक्षणीय आहे. ते म्हणतात,"स्त्री शूद्रातिशूद्र म्हणजे सर्व उपेक्षित समाज हा या देशाचा भाग्यविधाता आहे. शेतकरी हाच या देशाचा पोशिंदा आहे. या भूमिकेतून त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड लिहिला. शंभर वर्षापूर्वी सहकाराचा पुरस्कार केला. आधुनिकीकरणाचा त्यांनी आग्रह केला. त्यांनी अनेक आंदोलने उभारली. गिरणी कामगारांच्या संघटना उभारण्यास प्रोत्साहन दिले. देवदासी,परित्यक्ता, भटके, दलित यांच्या मुक्तीसाठी चळवळी केल्या. महात्मा फुले यांना समृद्ध आणि निकोप माणूस घडवायचा होता. यावरून महात्मा फुले यांच्या कार्याची थोरवी स्पष्ट होते.'[५]

महात्मा फुलेंनी येथील समाज व्यवस्थेला प्रबोधनाच्या माध्यमातून एक उज्ज्वल भविष्य देण्यासाठी याच समाजव्यवस्थेच्या वर्तमान आणि भूतकाळाचा सखोल अभ्यास केला होता. आपल्या प्रखर विचार परिवर्तनशैलीद्वारे त्यांनी अनेक कर्मठांना आपल्या बाजूने पडण्यास भाग पाडले. त्यांना एक दिशा दिली. एवढे सर्व करून सुद्धा ही परिवर्तनाची लाट, हा आवेश जो फुल्यांच्या काळात अत्युच्च बिंदूवर पोहोचला होता तो फुलेत्तोर काळात त्याच वेगाने खाली आला. 'धर्म, नीती व समाज यांच्या सर्वांगीण परस्पर संबंधाचे सुसंगत दर्शन घडविणारे तत्वज्ञान त्यांना उभे न करता आल्यामुळे फुल्यानंतरच्या काळात हा वन्ही सैरभैर होऊन गेला. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.'[६]

ज्योतिराव फुले यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव लक्षात घेऊन केलेले परिवर्तन एकोणिसाव्या शतकात सर्वात प्रभावी ठरते. त्यांनी निर्मिलेले वाङ्मय थॉमस पेन यांच्या विचारसुत्रावर आधारित आहे. धर्मसुधारणेच्या बाबतीत थॉमस पेनचे विचार प्रभावशाली आहेत. त्यांनी आपल्या विचाराच्या आधारे तीन सूत्रे मांडली ती आजही महत्त्वपूर्ण ठरतात. मानवतेची प्रतिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह, आणि गुलामगिरीचा निषेध पेनच्या या त्रिसुत्रांचा आधारस्तंभ महात्मा फुले यांच्या वाङ्मयीन प्रबोधन आणि परिवर्तन चळवळीस लाभलेला आहे. या महत्त्वपूर्ण आधार स्तंभाच्या माध्यमाद्वारे पुढे महात्मा फुले यांनी भारतीय समाज व्यवस्थेसमोर मूलभूत हक्कांविषयीचा आग्रह मांडला. भारतीय राज्यघटनेतील हक्कांची रचना स्वातंत्र्य काळातील आहे. ही मागणी महात्मा फुले यांनी मात्र आंग्लकाळातच मांडली. यावरून त्यांचे द्रष्टेपण पुन्हा एकदा सिद्ध होते.

**समारोप**:- महात्मा फुले हे नाव प्रबोधन या शब्दासोबत ठळकपणे जोडलेले आहे. प्रबोधन चळवळीचा प्रवास लक्षात घेता त्यांनी केलेले कार्य एकोणिसाव्या शतकातच भविष्याचा वेध घेणारे ठरले आहे. महात्मा फुले आणि परिवर्तन चळवळ, प्रबोधनपर्व यांच्या संबंधाद्वारेच पुढे त्यांचे स्वभाव पैलू स्पष्ट होतात. अंधश्रद्धा निर्मूलक, पत्रकार, समीक्षक, लेखक, क्रांतिकारी, शिक्षण महर्षी, अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार, धर्मचिंतक, तत्वज्ञ, चळवळीचा केंद्रबिंदू आणि नवसंस्कृतीचा जनक अशा वेगवेगळ्या भूमिकेतून संपूर्ण समाज व्यवस्थेला पर्यायी संस्कृतीचा आधार देणारे महात्मा फुले परिवर्तनवादाचे मुख्य केंद्र ठरतात. त्यांनी प्रबोधन चळवळी सारख्या प्रभावी माध्यमाद्वारे येथील लहानातल्या लहान समस्येला सुद्धा प्रखरपणे विरोध केला. त्यांनी आरंभलेल्या प्रत्येक चळवळीला समकालीन नेतेमंडळींनी संपूर्ण समर्थन दिले, असे नाही परंतु या महत्त्वपूर्ण कार्याची दखल सुद्धा त्यांनी बरेचदा घेतली नाही. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेतून नारायण मेघाजी लोखंडे यांनी ब्राह्मण विधवांच्या केशवपनाविरूद्ध नाभिकांना संघटित करून त्यांचा संप घडवून आणला. भारताच्या हजारो वर्षाच्या प्रतिगामी परंपरेस त्या निमित्ताने हादरा बसला.या ऐतिहासिक घटनेची नोंद लंडन येथून प्रकाशित होणाऱ्या टाइम्स या इंग्रजी वृत्तपत्राने दिनांक ९ एप्रिल १८९०

च्या अंकात घेतली परंतु येथील केसरीच्या अंकात याची साधी नोंद सुद्धा दिसत नाही. या घटनेवरून प्रस्थापित नेतेमंडळींच्या चळवळीची दिशा आणि प्रस्थापिततत्त्व पुन्हा एकदा सिद्ध होते.

आज स्त्री शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, विषमता या सारख्या समस्या बऱ्याच प्रमाणात कमी झाल्या आहेत परंतु अजुनही ग्रामीण भागातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण, विद्यार्थ्यांची गळती, खैरलांजी येथील हत्याकांड, मूर्तीचे दूध पिणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांसारखे अनेक प्रश्न जिवंत आहेत. या प्रश्नांकडे पारंपरिक समस्येची आधुनिक रूपे म्हणून पाहता येईल. 'नवी समाजव्यवस्था, नवे स्नेहबंध उभारण्याचे ज्योतिरावांचे स्वप्न आज पुरते भंगलेले आहे कारण परंपरागत समाजाने विषमतावादी, जातीवादी अशी सामंती मूल्ये सध्या उराशी कवटाळून ठेवलेली आहेत.'[७] डॉ. सुभाष सावरकरांचे हे मत याबाबतीत समर्थनीय आहे.

भारतीय प्रबोधन परंपरेमागील मूळ प्रेरणा ही युरोपीय विचारवंतांच्या साहित्यात दडलेली आहे. महात्मा फुले यांचा कालखंड आधुनिक युगाचा होता. या काळात येथील बऱ्याच विचारवंतांनी पाश्चात्त्य जीवनशैली, साहित्य, राजकारण, विज्ञान या विषयांचा सखोल अभ्यास करून ही आधुनिक विचारांनी नटलेली ज्ञानगंगा भारतात आणली. येथे रुजविली व तिला एक अधिष्ठान प्राप्त करुन दिले. या कार्यात जांभेकर, दादोबा पांडुरंग, राजा राम मोहन राय, बाळकृष्ण, लोकहितवादी, भांडारकर रानडे ,विष्णुशास्त्री पंडित, आगरकर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यांनी आत्मसात केलेले पुरोगामी विज्ञाननिष्ठ विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. परंतु हे सर्व करताना त्यांनी स्वतःला काही मर्यादा आखून दिल्या होत्या. त्यांनी एका विशिष्ट चौकटीतच कार्य करण्याचे ठरविले होते. या बाबतीत महात्मा फुले यांच्या विचारांचे, कृतीचे विशालत्व प्रकर्षाने जाणवेल एवढे मोठे आहे. त्यांनी कोणतीही समस्या फक्त सोडवणुकीच्या अंगाने पाहिली नाही तर ती का निर्माण झाली व ती समूळ नष्ट व्हावी यासाठी कोणते उपाय योजावेत, याचा इत्यंभूत विचार केला. याच पद्धतीने त्यांनी केशवपन, बालहत्या, विधवा विवाह अशा सामाजिक प्रश्नांची सोडवणूक केली आहे. हे प्रश्न सोडविताना त्यांना इंग्रजधार्जिणे सारखी बिरुदे लावली गेली. इंग्रजी शासनाचे समर्थक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले आहे. परंतु जगाच्या प्रगत समाजव्यस्थेच्या तुलनेत भारतीय समाजव्यवस्था ही अजूनही प्राथमिक अवस्थेत असल्याचे त्यांनी हेरले होते. ही अवस्था पार करण्यासाठी प्रतिगामी विचारांच्या पेशव्यांऐवजी आधुनिक विचारांनी युक्त, प्रगत इंग्रजी शासनाची मदत घेण्याचे त्यांनी ठरविले होते. तसेच युरोपीय मिशनऱ्यांनी आपल्यासोबत आणलेला मानवतावाद, मानवी हक्क व शिक्षण या विचाराने युक्त संकल्पना येथे रोज रूजविण्यास प्रारंभ केला होता. ही रूजवात महात्मा फुले यांच्या प्रारंभिक काळात (१८४८ते १८६५) यांच्यावर अनुकूल प्रभाव टाकून गेली. त्यांच्यावर हा प्रभाव असला तरी त्यांनी आपला संयम, विवेक कधीही देशहिताच्या विरुद्ध जाऊ दिला नाही. शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधात असलेल्या नियमांचा त्यांनी आपल्या शैलीत समाचार घेतला. पेशवेकालीन उधळपट्टी त्यांनी सांगितली सोबतच इंग्रजीत

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

कालखंडातील ऐषाराम, मौजीवृत्तीचे सुद्धा त्यांनी परखड वर्णन केले आहे. एकंदरीत प्रबोधनाला परिवर्तनाच्या नव्या उंचीची दिशा देऊन जगाला प्रबोधनाचे नवे दर्शन ज्योतिरावांनीच दिले, याबाबत कसलीही शंका नाही.

**निष्कर्ष:-**

१) भारतातील प्रबोधन ही येथील एक जीवन प्रणाली ठरली आहे.

२) पुरोगामी विचार म्हणजेच प्रबोधन.

३) परिवर्तनासाठी प्रबोधन ही एक आवश्यक बाब ठरते.

४) प्रबोधन ही संकल्पना आधुनिक जीवनशैलीची आधारस्तंभ आहे.

५) साहित्य आणि समाज हा सहसंबंध प्रबोधनाने दृढ होतो

**संदर्भ:-**

१)सरदार,गं.बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, पुणे, पृष्ठ १४.

२) मराठी विश्वकोश, खंड १०, पृष्ठ ३९६.

३) फुले,महात्मा, दलित साहित्याचा इतिहास, प्राचार्य डॉ. म.सु. पगारे, प्रशांत प्रकाशन, २००५, जळगाव, पृष्ठ १२

४)खरात,डॉ.प्रकाश,आंबेडकर वाद: समाज आणि संस्कृती, डॉ. प्रकाश खरात,२००५, पृष्ठ २१

५) पवार,शरद, महात्मा फुले समग्र वाङ्मय, आवृत्ती चौथी, १९६१, प्रस्तावनेमधून साभार.

६) सावरकर, डॉ. सुभाष महात्मा फुले: दुर्मिळ वाङ्मय आणि समकालीन चरित्रे, संपादक डॉ. माळी, डॉ. सावरकर, प्रकाशक- मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, १९९१, पृष्ठ ८६.

७) सावरकर डॉ सुभाष तत्रैव, पृ. ९६.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# संत श्रीगोविंदप्रभूंची सामाजिक परिवर्तनवादी भूमिका

संशोधक लेखक : डॉ अभिजित नाना पाटील
सहायक प्राध्यापक
विद्याभारती कॉलेज,सेलू ता.सेलू जि.वर्धा

---

**शोध निबंधाचा गोषवारा :**

श्रीगोविंदप्रभू चरित्राच्या आधारे सविस्तर विवेचन करून आपणास हे लक्षात घ्यावयाचे आहे की श्रीगोविंदप्रभूंनी आपल्या जीवन जगण्याच्या पध्दतीतून एक नवा सामाजिक मापदंड कसा निर्माण केला आहे.तसेच आपल्या जीवन वर्तनातून त्यांनी समाजातील दीनदुबळया,वंचित,दुर्लक्षित घटकांना जीवनाचा एक नवा दृष्टिकोन कशा प्रकारे दिला. समाजातील अनिष्ठ रूढी,परंपरा,कर्मकांडांच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेची होणारी पिळवणूक, होणारे शोषण इत्यादींतून मुक्ता देण्याचे धाडस कशा पध्दतीने दाखविले. जन्मजात जातीयता,वर्ग भेद नाकाराला.स्त्री वर्गाला,अस्पृश्य वर्गाला समानतेची,मानवतेची वागणूक देऊन जगण्याचे बळ दिले,हक्क दिला.अज्ञानाच्या काळोखात आकंठ बुडालेल्या समाजाला कृतीशील असे डोळस तत्वज्ञान प्रतिपादन करून अज्ञानाच्या काळोखातून बाहेर काढण्याचे काम कसे केले. अनिष्ठ अंधश्रध्दा,रूढी–परंरांच्या दलदलीत खोलवर रूतलेल्या समाजाला बाहेर काढण्याचे काम श्रीगोविंदप्रभूंनी केले. तसेच चातुर्वर्ण्याची चौकट जोरकसपणे मोडून काढण्या–या श्रीगोविंदप्रभूंचे कार्य लोकोत्तर कसे ठरले. त्यांचे कार्य समाज परिवर्तनाची नवे आयाम निर्माण करणारे ,समाजपरिवर्तनाची भूमिका प्रतिपादन करणारे आहे का या भूमिकेतून सदर शोधनिबंधात वेध घेतला जाईल.

---

**प्रस्तावना :–**

भारताच्या राजकीय,सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात महाराष्ट्राचे निराळे स्थान आहे. मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात जे विविध भक्तिसंप्रदाय उदयाला आले,त्यामुळे महारा ट्राची सांस्कृतिक धरोहर अधिक बळकट झाली. शिवाय महाराष्ट्राची सांस्कृतिक श्रेष्ठता सिध्द करण्याकरिता संत वाङ्मयाचा व त्यांच्या कार्याचा मोठा वाटा राहिला आहे.तसेच संत साहित्याने मराठी सारस्वताचे दालन अधिक समृध्द केले आहे.इतकेच नव्हे तर संतांचे साहित्य हे आपल्या संस्कृतीची फार मोठी देणगी ठरले आहे.या सर्व संत साहित्याचा संबध तत्कालीन कार्यरत विविध संप्रदायांशी असून यात महानुभाव,नाथ,वारकरी,रामदासी,दत्त,नागेश,वीरशैव,कबीर,सुफी इत्यादी संप्रदायांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.त्याअनुशंगाने महाष्ट्रात समाज परिवर्तना सोबतच नाविण्यपूर्ण भक्तिपरंपरा रूजवणारा तसेच मराठी वाङ्मयाचा प्रवाह यशस्वीपणे पुढे नेणारा महत्वाचा संप्रदाय म्हणजे महानुभाव संप्रदाय होय.या संप्रदायाने सामान्य जनजीवन कर्मकांडातून मुक्त करून त्याला भक्तीचा सरळ सोपा मार्ग दाखविला.मानवतावादाचा पुरस्कार करून अंधश्रध्दा,रूढी–परंपरा आणि अज्ञानाच्या काळोखात गुरफटलेल्या समाजाला शाश्वत,चिरंतन मूल्यांच्या रूपाने प्रकाशाची वाट प्राप्त करून दिली.परंपरागत व विषमतावादी व्यवस्था नाकारून जन्मजात वर्ण,जातीयता व स्त्री–पुरूष यांच्यातील भेदभाव नाकारला.या संप्रदायाने समाज जीवनाचा राजमार्ग आणि ज्ञानमार्ग ख–या अर्थाने प्रशस्त केला. त्या दृष्टिकोनातून या भक्तिसंप्रदायातील श्रीचक्रधर स्वामी व श्रीगोविंदप्रभू म्हणजे सामाजिक क्रांतीची, सामाजिक परिवर्तनाची ज्योत प्रज्वलीत करणारे महापुरूष ठरतात.

महानुभावांच्या या चतुर्थकृष्णाचे म्हणजे गोविंदप्रभूचे कार्य अलौकिक आहे.कारण श्रीगोविंदप्रभू ज्या काळात वावरले होते तो यादवराजाच्या कारकिर्दीतला काळ वर्णाश्रमधर्माच्या दृष्टीने अतिशय कट्टर व सोवळा समजला जातो. जातिभेदाची बंधने,वर्णाश्रमाची महती समाजजीवनात घट्ट मूळ धरून होती.अस्पृश्यांची सावली सुध्दा अपवित्र गणली जात होती.अशा काळात गोविंदप्रभू ऋध्दिपुरातच नव्हे तर शेजारच्या गावीही घरोघरी जात. मागास वर्गीयांच्या घरचे अन्न सेवन करीत.मातंग पव्हेचे उदक पीत,त्यांच्याही घरी अन्नग्रहण करीत.अस्पृश्य मानल्या जाणा–या वर्गाच्या घरोघरी जाउन सर्व मानवात समत्व मानणारा श्रीगोविंदप्रभूंसारखा संत त्या काळात दुसरा कोणी मिळत नाही.या दृष्टीने सुमारे सातआठशे वर्षापूर्वीचा समाजपरिवर्तनशील संत

म्हणून श्रीगोविंदप्रभूंचा उल्लेख केला तर त्यात अतिशोयक्ती वाटण्याचे काहीच कारण नाही.त्यादृष्टिकोनातून संत श्रीगोविंदप्रभू यांची समाज परिवर्तनाची भूमिका पुढील प्रमाणे लक्षात घेता येईल.

**१) चातुर्वर्ण्याचे उच्चाटन :**

बाराव्या शतकातील यादवकालीन समाजात चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे प्राबल्य माजले होते.स्त्रिाया आणि शूद्रातिशूद्र यांना समाजव्यवस्थेत कोणतेच स्थान नव्हते.धार्मिक समतेचा हक्कही त्यांना प्राप्त झालेला नव्हता.रूढींच्या चाकोरीत रखडणा—या,जुन्या किडलेल्या मूल्यांना उराशी कवटाळणारा हा समाज सर्वांभूती समभाव हे मूलतत्व विसरला होता.अशा या बुरसटलेल्या यादवकालीन समाजव्यवस्थेला,चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या चौकटी धक्का देण्याचे काम सर्व प्रथम श्रीगोविंदप्रभूंनी केले. विधिनिशेधाच्या निर्बंधात बंदिस्त असलेल्या समाजात श्रीगोविंदप्रभूंचा वावर मात्र समाजातील सर्व थरातील लोकांमध्ये होता. कुठल्याही जातीचे बंधन त्यांना आडवे येत नसे.सर्व पारंपरिक बंधने त्यांनी झुगारून दिली होती.जातीपातीचा विचार न करता ते कुणाच्याही घरी बिनादिक्कत जेवायला जात.एकदा ते कुणब्याच्या घरी आरोगणा करीत होते.तेथे त्यांची शिष्या साधा आली. तिनेही श्रीप्रभूंचा प्रसाद घेतला तेव्हा ती स्त्री म्हणाली,''काइ वो जाले या ब्राह्मणांची या रांडांसि: आमचे कुणबीयांचे अन्न खाति असे:'' (श्री.गो.च.ली.६) याचाच अर्थ कुणब्याच्या घरचे अन्न ब्राह्मणाने खाणे तत्कालीन समाजात निषिध्द मानले जात होते.तरी श्रीगोविंदप्रभू मात्र तेथे जाउन जेवत होते,त्यांच्या शिष्यांना प्रसाद देउन त्यांच्या मनातील हा भेदभाव मिटवीत असत. एकदा असेच ते तेलीणीच्या घरी गेले तेव्हा तेलीणीचे लेकरू लांकाची भाकर खात होते.त्यांनी त्या मुलाच्या हातची भाकरी हिसकावून घेतली व ते खाउ लागले.त्यावर ती तेलीण म्हणाली, ''राउळो! राउळो! हे भाकरि तेलीयाची: गोसांवी म्हणीतले ''आवो ! मेली जाए : तेलीयाची नव्हे म्हणे : हे लांकाची भाकरि '' (श्री.गो.च.ली.२९) येथे या स्त्रीच्या वाक्यात जातिभावनेची तीव्रता दिसते तर श्रीगोविंदप्रभूंच्या उत्तरात जातिभेदातीतता ! जातिभेद,वर्णव्यवस्थेने किडलेल्या समाजव्यवस्थेवर श्रीप्रभू येथे एका वाक्यात घणाघाती प्रहार करतात.कुणबी,तेली खाटीक,शिंपी,वाणी यांच्या आणि महारमागांच्या घरी ते नुसते जात नसत तर जेवण करीत,पाणी पीत असत.''गोसांवी माहारवडेयासि बीजें करीति : तैसेचि मातांगाचां घरी करीति : कांही पदार्थू देखेति : तो चाखेति : आणि म्हणेति : ''आवो मेली जाए : गोड आहे म्हणे :'' (श्री.गो.च.ली.४६) अशा वर्तनातून श्रीगोविंदप्रभू उपेक्षित,वंचित व दुर्लक्षित वर्गाचा फार मोठा आधार होते.अस्पृश्यांची सावली देखील अपवित्र मानली जायची अशा काळात श्रीगोविंदप्रभूंनी आपल्या विचारपूर्ण कृतीने पारंपरिक चातुर्वर्ण्य समाजरचनेला तडे देण्याचे काम केले ती चौकट मोडण्याचे काम केले.

**२) अस्पृश्यता निवारण :**

शूद्रातिशूद्र समाजाला ज्या काळात मानव म्हणून प्रतिष्ठा नव्हती त्या काळात श्रीगोविंदप्रभूंनी जे वर्तन केले त्यात त्यांची सामाजिक दृष्टी दिसते.सवर्णाइतेच त्यांनी अस्पृश्यांनाही समभावाने वागविले.सर्वांच्या अडीअडचणीत ते सहभागी झाले.त्यांना आधार दिला,सुखाचा दिलासा दिला.त्यांच्या उन्नतीसाठी,प्रगतीसाठी ,कल्याणासाठी व उध्दारासाठी शाब्दिक तत्वज्ञान न सांगता प्रत्यक्ष कृतीद्वारे समाज परिर्वतन करणारे थोर संत होते. त्यामुळेच ती माणसे आपलेपणाने त्यांना आपली दु:खे सांगायची आणि श्रीगोविंदप्रभूही मायबापांच्या भूमिकेतून त्या दु:खांचे निवारण करायचे.एकदा ते महारवाडयात गेले असता मातंगी विनविले,''राउळ ! आम्ही पाणियेवीण मरते असो : तरि काइ करूजी ?:'' राउळासि अनुकंपा उपजली आवो येथ खांणावेंचि म्हणे : '' म्हणोनि श्रीचरणीचेनि आंगठेनि दाखवीलें : तेथ तीही खांणितले : तव अमर्याद पाणी लागले :'' (श्री.गो.च.ली.४६) श्री गोविंदप्रभू फक्त अनुकंपेच्या भावनेपाशीच थांबले नाहीत,तर ती अनुकंपा त्यांनी कृतीत उतरवली.ज्यामुळे ही स्थिती उद्‌भवली त्या स्थितीचे मूळ कारण त्यांनी हेरले व ते मूळ कारण नाहीसे करण्यासाठी झटले.खाटकाच्या घरी जाऊन,हाडामासाशी खेळून तसाच भरल्या हातांनी ब्राह्मणांघरी येऊन त्यांच्या रांजणात हात धुणारे आणि महारामातांगाच्या घरी जाउन जेवणारे,पाणी पिणारे प्रभू तत्कालीन समाज व्यवस्थेत भ्रष्टाचार करीत होते.त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला.गावातील महाजनांना प्रभूंचे असे वावरणे आवडत नव्हते परंतु तसे ते प्रभूंना सांगू शकत नव्हते. '' राउळ मातांगां माहाराचां घरोंघरी वीचरताति : आणि तैसेंचि दीक्षीतां ब्राह्मणांचां घरी वीचरताति

: ऐसें राउळी भ्रष्टाभ्रष्ट केले : तयांची घरें गावांबाहौरि घाला :'' (श्री.गो.च.ली.४७) अशा प्रकारे त्यांची घरे बाहेर काढली.तरीपण श्रीगोविंदप्रभू तेथे जातच राहीले.राउळांच्या या अस्पृश्योध्दाराच्या अशा कार्यांमुळे रिध्दपूरला यायला देखील लोक घाबरत असत,असा उल्लेख एका लीळेत आला आहे.एका खेडेगावचा आला होता त्याने सोबत शिदोरी आणली होती.तो मनात म्हणाला, '' राउळ येथे भ्रष्टाभ्रष्ट करीत असेति : तरि सीदोरी एथचि जेउ : मग गावांत जाओं :'' (श्री.गो.च.ली.५५) पण तो आंघोळीला गेला आणि श्रीप्रभूंनी ती शिदोरी खाल्लीच. शेवटी त्याचे डोळे उघडले. त्यांच्या अशा या वर्तनातून त्यांनी समाजाला मानवीमूल्यांची,मानवतावादाची जाणीव करून देतांनाच अस्पृश्योध्दाराचे कार्य केले.

**३) स्त्री उद्धार :**

ज्या काळात स्त्रीयांना समाजात मानव म्हणून कुठलेच स्थान तर नव्हतेच,प्रतिष्ठा सुध्दा नव्हती अशा कठीण काळात श्रीगोविंदप्रभू शूद्रातिशूद्र ठरलेल्या स्त्रीयांना सन्मान,आदर व स्वाभीमाने जगण्याची संधी उपलब्ध करून देउन ख—या अर्थाने स्त्री उध्दाराचे अनमोल असे कार्य सर्व प्रथम केले असे म्हणे संयुक्तीक ठरेल. श्रीगोविंदप्रभू आजन्म अविवाहित होते.स्त्री वर्गाविषयी त्यांच्या मनात नितांत आदराची,आपुलकीची, मातृत्वाची व पितृत्वाची भावना होती. त्यांचा वावर सतत स्त्री वर्गामध्ये होता,पण त्यांची दृष्टी निकोप होती,त्यामुळेच स्त्रियांना ते आपले 'माएबापु' वाटत. म्हणून अडल्या— नडल्या स्त्रिया अधिकाराने त्यांना आपले दु:ख सांगायच्या.व श्रीगोविंदप्रभूही 'मायबाप' या भूमिकेतून त्यांचे दु:ख निवारण करीत असायचे.

एकदा एका स्त्रीला पाणी आणायला जायचे होते. घरात लहान मोठे कोणी नव्हते तान्हया बाळाला ठेवायचे कोठे ? असा तिला प्रश्न पडला नेमकी तिला श्रीगोविंदप्रभूंची आठवण झाली.श्रीगोविंदप्रभू तिच्या मुलाला साभाळायचे,खेळवून झोपवायचे आणि निघून जायचे. (श्री.गो.च.ली.०७) या आपलेपणातून स्त्रिया त्यांना हक्काने आपली कामे सांगायच्या आपल्या तान्हया लेकरांना पाळण्यात झोपवून एक तेलीण तेल विकायला बाजारात जायची,तर दुसरी लेकरास सोबत आणायची ; लेकरे रडायला लागली की जवळच खेळणा—या श्रीप्रभूंना त्या म्हणत '' राउळो : घरी होंउनी आमुचे लेकरूं पाळणा घालौनि या का : मग मी तुमचीए माथां डो—भरी तेल घालीन : ऐसे एकीचे नेउनि पाळणां घालिति : एकीचें आणुनि देति : '' (श्री.गो.च.ली.२८) अडचणीत असलेल्या स्त्रीयांना मदत करायला श्रीप्रभूही तत्पर असायचे.एकदा एक स्त्री आपल्या लेकराला स्नान घालत होती घरी कोणी नसल्यामुळे तिला कोणीच वीसान देण्यासाठी नव्हते तेव्हा ती श्रीप्रभूंची वाट बघायची.'राउळी येते कां तरि वीसानं घालीते' आणि तेवढयात हाकेला ओ दिल्यासारखे राउळ यायचे आणि तिला रांजणातील वीसाण द्यायचे. (श्री.गो.च.ली.३९) सामान्य स्त्रीच्या पाठीवरील फोड फोडून तिचे दु:ख निवारण करणे (श्री.गो.च.ली.४४) वेश्या हा समाजातील उपेक्षित घटक,पण तिचेही दु:ख त्यांनी नीरपौनि काढले.तिच्या हातचे आरोगण केले. (श्री.गो.च.ली.४५) तर काही वेळेस श्रीगोविंदप्रभू कोणाला पाट आणून देत,कोणाला तांब्या भरून देत,एकाला मडके धू लागत,एकाचे मुसळ धरत,तर एखादया स्त्रीला जेवण वाढत,तर एकीला जेवण मागत अशा प्रकारे सर्व घरी त्यांचा संचार राहयाचा. (श्री.गो.च.ली.४०) व अशा पध्दतीने स्त्रीयांच्या अडचणीच्या प्रसंगी धावून जायचे.अशाप्रकारे एका संकटात सापडलेल्या स्त्रीचे बाळंतपणही त्यांनी केले. त्याच प्रमाणे श्रीगोविंदप्रभूंनी सुनांना ताक वाढून स्वत: दूध खाणा—या सासुला सुनांसमोर ताक वाढून तीची चूक लक्षात आणून देत (श्री.गो.च.ली.४०) स्त्रीयांवरचा अन्याय सुध्दा दूर करण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे हरघडी त्यांच्या अडचणीच्या,संकटाच्या,दु:खाच्या क्षणी कुटुंबातील वडीलधा—या माणसाप्रमाणे धावून जाणारे होते. त्यामुळे या सर्वच स्त्रियांना श्रीगोविंदप्रभू एखादया आधारवृक्षासारखे वाटले तर नवल नाही.

**४) अनिष्ठ रूढी परंपरा व कर्मकांडांवर प्रहार :**

यादव कालीन समाज हा पारंपरिक कल्पनांनी,अंधश्रध्दा,रूढी—परंपरा व कर्मकांडांनी पक्का बंदिस्त झालेला होता. त्यामुळे श्रीगोविंदप्रभूंचे वर्तन म्हणजे अशा समाजात परिवर्तनवादी वर्तन होते.असे परिवर्तनवादी वर्तन करून श्रीगोविंदप्रभू जणू तत्कालीन समाजव्यवस्थेला धक्का देऊ इच्छित होते. 'राजणी सातरा घालणे' (श्री.गो.च.ली.१६) या लीळेमधील घटनेतून श्रीगोविंदप्रभूंनी उपाध्यांचा भ्रम करा दूर केला ते वर्तन परिवर्तनवादी ठरते. राउळ जेव्हा तिकापाध्याकडे रहात होते,तेव्हा त्यांचे उठणे—बसणे त्यांच्या ओटयावरच असे.एकदा ते नसतांना उपाध्यांची गावित्री नावाची रजस्वला मुलगी त्या ओटयावर बसून जेवण करू लागली.तिच्या आईने तिला बसण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण तिने ऐकले नाही.श्रीगोविंदप्रभू यांनी तिला 'आवो मेली जाय' म्हणून जायला सांगितले,तिने त्यांचेही ऐकले नाही.तेव्हा रागावून श्रीगोविंदप्रभूंनी तिच्या अंथरूणात माती टाकली,ते अंथरूण उचलून सरळ रांजणात नेऊन बुडविले.त्यामुळे लोकसमजुतीनुसार रांजणाला व रांजणातील पाण्याला विटाळ केला.त्यामुळे उपाध्यायांनी त्या भांडयातील पाणी उपसून फेकून देण्यास सांगितले व ते भांडे जाळावर ठेवून तापविण्यास सांगितले म्हणजे त्या भांडयाचा विटाळ जाईल असे त्यांना वाटले.पण त्याच रात्री एक मुंजा त्या रांजणातील पाण्याने आंघोळ करतांना दिसला तेव्हा उपाध्यांनी त्याला तसे करण्याचे कारण विचारले असता तो म्हणाला की ''राउळांनी त्या रांजणात विटाळशीचे अंथरूण टाकले त्यामुळे ते तर महातीर्थ झाले आहे. हे उत्तर ऐकून उपाध्यांचा विकल्प दूर झाला.तसेच 'खाटीकासी खेळु' (श्री.गो. च.ली.४९)या लीळेतून श्रीप्रभूंनी उपाध्यांचा भ्रम पुन्हा एकदा कसा दूर केला ते अधोरेखित होते.त्या लीळेतील घटनेनुसार उपाध्यांनी खाटीकाच्या घरी श्रीप्रभूंना हाडामांसा सोबत खेळतांना बघितले तेव्हा त्यांच्या मनात विचार आला की आज घरी श्राध्द आहे प्रभू आलेत तर त्याच भरल्या हातांनी रांजणात हात धुतील. आणि खरेच श्रीप्रभूंनी उपाध्यांच्या घरच्या रांजणात हात धुतले.तेव्हा त्यांनी स्वत:ची समजूत काढली.या दोन्ही प्रसंगातून राउळांनी असे वर्तन केले होते ते समाजातील रूढ समजुतींना धक्का देणारेच होते,आपल्या भक्तांच्या मनात कोणाही बद्दल भेदभाव राहू नये,तसेच कोणत्याही रूढी परंपरेविषयी भ्रम राहू नये असे वर्तन केल्याचे जाणवते.त्याच प्रमाणे त्याकाळात कर्मकांडाला फार महत्त्व होते.श्राध्द,पक्ष,ब्राह्मण जेवण,नैवेद्य इ.कर्मकांडे कसोशीने पाळली जात.श्रीगोविंदप्रभू मात्र कळत—नकळत या कर्मकांडाच्या विरूध्द वर्तन करीत असत.त्यातून त्यांना काहीतरी सुचवाचचे असे,ज्ञानी ब्राह्मणांना ते समजत ही असे,परंतु पारंपरिक रीती—रिवाज,रूढी यांना एकदम तिलांजली देणे सर्वसामान्य माणसाला सहजपणे शक्य नव्हते.त्यातून अनेक प्रसंग घडत.असाच एक प्रसंग उपाध्यांच्या जावयाच्या श्राध्दाच्या प्रसंगी श्रीगोविंदप्रभूंनी श्राध्दाचे जेवण उष्टे केले तेव्हा त्यांना वाटले की श्राध्द वाया गेले तेव्हा एखादया तीर्थस्थळी जावून श्राध्द घालावे परंतु त्याच रात्री उपाध्यांच्या पूर्वजांनी स्वप्नात येऊन आम्ही तृप्त झालोत असे म्हटले. श्रीगोविंदप्रभूंनी आपल्या कृतीतून कर्मकांडांचे फाजील स्तोम कसे व्यर्थ आहे हे दाखवून दिले.

निष्कर्ष :

श्रीगोविंदप्रभू जसे अलौकीक व्यक्तिमत्व होते तसे ते लोकोत्तर युगपुरूष सुध्दा होते.त्यांचे जीवन तत्वज्ञान हे मानवी उथानासाठी होते.ते समाजातील सर्व थरातील लोकांच्या दु:खाशी समरस होतांना दिसतात.समाजाविषयी अपार करूणा त्यांच्या वर्तणूकीतून प्रत्यास येते.मागासवर्गीयांच्या वाडयावस्त्यातील लोकांनाही मानव म्हणून माणूसकीने वागवावे अशी शिकवण ते आपल्या वागणूकीतून देतांना दिसून येतात.त्याच प्रमाणे समाजातील उपेक्षित,दुर्लक्षित व समाजात पिचणा—या स्त्रीवर्गाला अपार प्रेमाने आधार देण्याचे काम श्रीगोविंदप्रभूंनी केले.त्यामुळेच स्त्रीवर्ग आपले कुठलेही दु:ख,अडचणी त्यांच्या जवळ हक्काने सांगायच्या.त्यात आपलेपणची जाणीव असायची आणि श्रीप्रभूही 'मायबाप'या भूमिकेतून त्यांचे केवळ दु:ख निवारण करायचे असे नाही तर त्यांना मान,सन्मान,समता व प्रतिष्ठा मिळवून देण्यातही कुठलीच कसर सोडत नसत.ज्या काळात भेदाभेद,अपृश्यता पाळण्यात धन्यता मानल्या जात होती त्याकाळात श्रीगोविंदप्रभूंनी अस्पृश्यांच्या घरी जाण्यात,त्यांच्या घरी जेवण्यात,पाणी पिण्यात,त्यांची दु:खे नाहीशी करण्यात जी सामाजिक दृष्टी दाखवली तिला तोड नाही.समतेचे तत्व त्यांनी आध्यात्मिक नव्हे तर सामाजिक क्षेत्रात पाळले आहे त्यामुळे त्यांच्या या कार्याचे मूल्य शतगुणित होते.पारंपरिक सनातन मूल्यांमुळे माणूसकी विसरलेल्या समाजाला त्यांनी आपल्या या वर्तनातून मानवतावादाची शिकवण दिली.तसेच ज्या काळात कर्मकांड कटाक्षाने पाळल्या जात होते त्या काळात श्रीगोविंदप्रभूंनी श्राध्द,पक्ष,ब्राह्मम जेवण इत्यादी कर्मकांडांना व पारंपरिक रीती—रिवाजांना,रूढी यांना आपल्या वर्तनातून मूठमाती दिली व हे त्यांचे वर्तन म्हणजे परिवर्तनाची नांदी होती. त्याच प्रमाणे मानवता मान्या नसलेल्या चातुर्वर्ण्याला आपल्या कृतीद्वारे समाजातून हद्द पार करणा—या श्रीगोविंदप्रभूंना समाजपरिवर्तनशील 'आद्य समाजसुधारक संत' म्हणायला हरकत नाही.

आधार ग्रंथ :—

१) संपादक व.दि.कुलकर्णी — 'श्री गोविंदप्रभुचरित्र' व्हीनस प्रकाशन 'तपश्चर्या' ३८१ क शनिवार पेठ,पुणे,ऑगस्ट १९५ आवृत्ती दुसरी

**संदर्भ ग्रंथ :—**

१) कोलते,वि.भि. — 'महानुभावांचा आचारधर्म',अरूण प्रकाशन,मलकापूर पुनमुद्रण १९७३

२) तुळपुळे,शं.गो. — 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाड्मय' — व्हीनस प्रकाशन पुणे,२००४ दु.आ.

३) नसिराबादकर,ल.रा. — 'प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास' — फडके प्रकाशन,कोल्हापूर,२००५

४) महल्ले,ममता — 'लीळाचरित्रातील लोकजीवन' — देवयानी प्रकाशन,ऐरोली,नवी मुंबई — ४००७०८, ७ मार्च २००९

५) शेणोलीकर,ह.श्री. — 'प्राचीन मराठी वाड्मयाचे स्वरूप' — डायमंड पब्लिकेशन्स,पुणे ४११०३०,२०११

# लोकशाहीतील सर्वात मोठा अडसर.....जातिवाद

डॉ.राजेंद्र श्री.कोरडे
कला व वाणिज्य महाविदयालय, वरवट बकाल
ता.संग्रामपुर जि.बुलडाणा

## प्रस्तावना

भारतास इंग्रजांच्या सत्तेपासून स्वातंर्त्य हे १५ ऑगस्ट १९४७ रोजी प्राप्त झाले त्याचमुळे भारताने लाके शाही शासन पद्धती स्वीकारली. भारत लोकशाही गणराज्य म्हणून अस्तित्वात आले. अर्थात् १५८ स्वतंत्र देशांच्या संविधानांचा अभ्यास करून जाणीवपूर्वक व विचारपूर्वक भारताने लोकशाही शासन पद्धती स्वीकारली व त्याकरिता भारतीय संविधानानुसार राज्यघटना ही २६ जानेवारी १९५० पासून अस्तित्वात आली.

आपला देश १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. धर्माच्या आधारावर देशाचे तीन तुकडे झाले — पाकिस्तान, भारत आणि पूर्व पाकिस्तान (आता स्वतंत्र बांगला देश) असे विभाजन केवळ धर्माधारितच करण्यात आले ज्याकरिता इंग्रजांनी भारतीय समाजाला धर्माच्या आधारावर विभाजित करून समाजाचे खच्चीकरण केले, हे विसरून चालणार नाही. अजूनही भारत या विभाजनाच्या जखमा अंगोपांगी बाळगून अधुन मधून या भळभळणाऱ्या जखमांचे दु:ख भोगतोच आहे. जातीप्रथा ही कुप्रथा आहे हे माहित असूनही देशातील अनेक राजकारणी यावर बोलायला तयार नाहीत. कारण जातीच्या आधारावर त्यांनी निवडणूक लढवून राजकारणी निवडून येतात आणि स्वत:चे हित मात्र साधून घेतात. परंतू देशाच्या एकता व अखंडतेच्या स्वार्थाकरिता राजकारणी कधीही प्रयत्न करतांना दिसत नाहीत. भारतीय समाजात जातीप्रथांना हजारो वर्षांची परंपरा लाभली आहे. ज्याला मुघल काळात व इंग्रजी राजवटीत वेळोवेळी खतपाणी घालून समाजातील जातीव्यवस्था ही अधिकाधिक दृढ कशी होत जाईल याकरिता विशेष प्रयत्न करण्यात आले. कारण त्यामुळे समाज एकवटण्याऐवजी एकसंघ होण्याऐवजी सतत विभाजित राहिल्याने समाजाचा निरंतर शक्तिपातच होत राहिला ज्यामुळे या दोन्ही राजवटी शेकडो वर्षे भारतावर आपले साम्राज्य प्रस्थापित करून स्वातंर्त्य आंदोलनाला म्हणावे तितके यश मिळत नव्हते. मात्र १९४० च्या सुमारास झालले दुसरे विश्वयुद्ध व त्यानंतर इग्रंजी सत्तेची खालावलेली आथिर्क सत्ता, राजकारणावरील व समाजकारणातील ढासळलेली स्थिती व भारतीय समाजातील काही अंशी सुदृढ होत चाललेली एकता व सामाजिक समरसतेचा परिपाक म्हणून इंग्रजांना स्वतंत्र भारतास मान्यता देणे भाग पडले.

तरीही इंग्रजांनी फाळणीची बीजे रोवून जाता जाता भारताचे त्रिभाजन करून पूर्व पाकिस्तान (आताचा बांगला देश), भारत व पाकिस्तान अशी तीन राष्ट्रे उदयास आली. ज्यांच्या नागरीकत्वाचा आधार धर्म असून त्यापैकी पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान ही दोन मुस्लीम राष्ट्रे म्हणून निर्माण झाली. तर भारताने मात्र स्वत:ला धर्मनिरपेक्ष राष्ट्र घोषित केले जेथे राष्ट्रीयत्वाला कोणताही धर्माधार देण्यात आला नाही. भारताच्या पूर्वेस व पश्चिमेस मुस्लीम राष्ट्र निर्माण होऊनही भारताने सहिष्णुता दर्शवित कोठेही लोकसंख्येच्या अदलाबदलीचे धोरण अंगिकारले नाही. मात्र शेजारील या दोन मुस्लीम राष्ट्रांनी मात्र आपआपले प्रांत अधिकाधिक मुस्लीम बहुल कसे होतील, त्यांचे हितसंबंध अधिकाधिक जोपासताना अल्पसख्यक अन्य समुदायावर मात्र अनन्वित अत्याचार, जलुम, जबरदस्ती करून धर्मांतर वा पलायनास भाग पाडले. मात्र भारताने अशा बऱ्याच मोठ्या लोकसंख्येला सामावून घेत आपला ऐतिहासिक वारसा जतन करीत शरणार्थींना देखील सन्मानाने वागवित काही अंशी त्यांना स्वीकाराचे धोरण अंगिकारले.

स्वातंर्त्यपूर्व काळात जातीप्रथांच्या प्रभावामुळे निर्माण झालेली बंधने झुगारून देण्यासाठी आंदोलने झाली. व्यक्तीच्या सामाजिक जीवनातील प्रामुख्याने सामाजिक व कौटुंबिक संबंधातील जातीप्रथांचा प्रभाव नष्ट करण्याच्या हेतूने समाजसुधारकांनी अनेक स्तरांवर प्रयत्नही केले. काहींनी तर आपल्या समाजकार्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून जातीप्रथांमध्ये काही महत्वपूर्ण असे बदल घडून येण्यास प्रारंभ झाला. स्वातंर्त्यानंतर जन्माच्या आधारावर असलेल्या जातींमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता व असमानता नष्ट करण्याचे प्रयत्न करण्यात आले. यासाठी अनेक कायदेशीर तरतुदीही करण्यात आल्या. तसेच समान संधीचा मूलभूत अधिकारही सर्व नागरीकांना संविधानाने मिळवून दिला. समता, स्वातंर्त्य, बंधुता या मूल्यांवर आधारित समाजरचना व लोकशाही व्यवस्था निर्माण करण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले. यासाठी

अनेक स्तरांवर प्रयत्नही सुरू झाले. हे सर्व जरी केले तरी अद्यापही जाती नष्ट झालेल्या नाहीत. म्हणून असे म्हटले जाते की, जन्मापासून जी व्यक्तीला चिकटते व मृत्युनंतरही जी जात नाही तिलाच जात असे म्हटले आहे. यानंतरही जाती प्रथा नष्ट होईल याकरिता भरीव असे कोणतेही काम वा प्रयत्न होतांना दिसत नाही त्यामुळे स्वाभाविकपणे जात नष्ट होईल असे कोणतेही चिन्ह दृष्टिपथात नाही.

संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, शिक्षणाचा प्रसार व विस्तार अनेक प्रबोधने, समाज सुधारकांचे प्रयत्न इत्यादी आपल्या जाती परंपरेनुसार निश्चित असलेले व्यवसाय करण्याचे बंधन आता पूर्वीप्रमाणे व्यक्तीवर राहिलेले नाही. श्रेष्ठ – कनिष्ठ यावर आधारित संबंधांमध्ये बदल घडून आला आहे. हे सर्व मान्य असले तरीही पूर्वी इतके महत्व जाती आधारित शासकीय आरक्षणाचे धोरणामुळे गेल्या दोन तीन दशकांमध्ये प्राप्त झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. सामाजिक व राजकीय नेतृत्व, व्यक्तींचे वर्तन, व्यक्तींचे आपसातील राजकीय संबंध, या सर्व गोष्टींमधील जात या घटकाचा प्रभाव वाढला आहे व दिवसेंदिवस जास्तच वाढत चालला आहे. राजकीय क्षेत्रांमधील राजकारण हे जातीयतेने प्रभावित झाल्याने जातीयवाद ही सर्वात गंभीर समस्या असून समाज जीवनातील विकासामधील सर्वाधिक मोठा अडसर ठरत आहे व स्वाभाविकपणे निरनिराळी आव्हान समाजापुढे उभी करीत आहे.

जात ही भारतीय राजकारणाला लागलेली कीड आहे. लोकशाहीतील सर्वात मोठी समस्या जात ही ठरत आहे. जातीप्रथेविषयी अनेक लेखकांनी तसेच विचारवंतांनी आपआपले विचार मांडलेले आहेत. परंतु अजूनही जात ही भारतीय मानवाच्या मेंदूतून हद्दपार होतांना दिसत नाही. काही ठराविक लोक आहेत की जे जातीप्रथेचे पालन करीत नाहीत. परंतू राजकारणात राजकारणी नेते हे जातीच्या आधारावर राजकारण करीत असल्यामळे देश स्वतंत्र होऊनही जातीप्रथा अधिकाधिक प्रबळ होताना दिसत आहे. जातीप्रथा नष्ट होण्यासाठी ज्या उपाययोजना, प्रसिद्धी, कारणमीमांसा, प्रयत्न पुरेसे जोरकसपणे होतांना दिसून येत नाहीत. जात ही मनुष्याच्या प्रगतीस मारक आहे हे विचार समाजातील प्रत्येक तळागाळाच्या घटकापर्यंत पोहोचत नाहीत. तोपर्यंत जात ही अधिकाधिक दृढ होत जाईल आणि ज्यामुळे सर्वात मोठी सामाजिक, राजकीय, आर्थिक हानी ही मानवाची होत जाईल.

स्वांतर्त्यपूर्व काळापासून पक्ष बांधणीमध्ये जातींचा वापर करण्यात आलेला आहे. राजकीय पक्षाचे भाषिक, धार्मिक, प्रादशिक अस्मिता हे आधार भारतातील जडणघडणीमध्ये मौलिक भूमिका वठवितांना दिसून येतात. ज्या राज्यांची सामाजिक व्यवस्था मागासलेली आहे आणि अपुरे शिक्षण, जातीवाद आणि रूढी परंपरांचा बोलबाला आहे. या राज्यातील महिलांची कौटुंबिक व राजकीय परिस्थिती चांगली नाही. याचाच प्रभाव स्थानिक स्वायत्त संस्थांवर पडलेला दिसून येतो. विशेषत: ग्रामीण भागामध्ये जातीव्यवस्थेचा पगडा जास्त आहे. **जातीपद्धतीचा विकास**

वर्षानुवर्षे वर्णव्यवस्था चालल्यानंतर त्यात दृढता, कठोरता येऊ लागली, विशिष्ट वर्णाच्या पुढच्या पिढीने तेच कर्तव्य पार पाडले पाहिजे असा कोणताही दंडक नसला तरी प्रत्यक्षात मात्र प्रत्येक वर्ण त्या कर्माच्या चौकटीत मर्यादित झाला. परिणामी वर्ण कर्माने न ठरता जन्माने ठरू लागले. हाच जाती पद्धतीचा प्रारंभ होय. अशाप्रकारे वर्ण व्यवस्थेचा आधार कर्म होता तर जाती पद्धतीचा आधार जन्म होता. परिस्थितीनुसार चार वर्ण आता (वैदिक काळाच्या शेवटी) चार जातींमध्ये रूपांतरित झाला. त्यातही ब्राह्मण आणि क्षत्रीय यांना अतोनात महत्व प्राप्त झाले. समाजात नेहमीच उच्च स्थान राहिले आहे. म्हणूनच ब्राह्मण सर्वश्रेष्ठ ठरले. क्षत्रीय आता राजे बनले होते. सत्ता प्राप्तीसाठी ते स्वत:ला ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे मानू लागले. वैश्य पूर्वीप्रमाणेच शेती, व्यापार, उद्योग यांत गुंतले होते. जाती व्यवस्थेचा खरा फटका शूद्रांना बसला. समाजाची सेवा करण्याव्यतिरिक्त त्यांना कोणतेही अधिकार नव्हते. स्वातंर्त्य नव्हते. त्यांना उपनयनाचा (मौंजी बंधन) अधिकार नव्हता. शूद्रांना शिक्षण दिले जाऊ नये, त्यांच्या साठी यज्ञ करू नयेत, त्यांच्याशी शारीरिक संबंध जोडू नये अशा प्रकारचे वर्णन आहे. सारांश धार्मिक व्यवहार, विवाहसंबंध, खानपान, इ. बाबतीत कडक बंधने निर्माण झाली, स्पृश्यास्पृश्यता निर्माण होऊ लागली.

समाजाचे व्यवहार वाढले तसे जातींमध्ये अनके उपजाती निमार्ण झाल्या. वशं परंपरेने एका घरात एकच व्यवसाय चालू लागला. त्या लोकांना ती उपजात चिकटली जसे – सुवर्णकाम करणारे सोनार, लोहकर्म करणारे लोहार, चर्मकर्म करणारे चांभार, सुतार काम करणारे सुतार, रंगकाम करणारे रंगारी, मातीकाम करणारे कुंभार अशा उपजाती निर्माण झाल्यात. त्यांच्यातही परस्पर उच्चनिचतेची भावना होती आणि रोटीबेटी व्यवहार होत नव्हते

## जातीपद्धतीचे गुण

- शेकडो वर्षांपासून भारतात जाती पद्धती विद्यमान आहे. निसर्ग नियमानुसार ती टाकाऊ असती तर केव्हाच समाजातून फेकल्या गेली असती. म्हणून विद्वानांच्या मते निश्चितच ह्या पद्धतीचे फायदे लक्षात आल्याने ती प्रचलित आहे. नव्हे बाहेरच्या जगात जाती पद्धती अस्तित्वात राहिली नसतांना भारतात मात्र सुरू आहे. स्वजातीच्या अभिमानामुळेच परकीय आक्रमकांपासून भारतीय समाजाचे व संस्कृतीचे रक्षण झाले आहे. उदा. राजपूतांमध्ये स्वगौरवाची भावना इतकी जबरदस्त होती की, मृत्यू आला तरी बेहत्तर पण स्वधर्म सोडणार नाही असा त्यांचा बाणा होता. परिणामी ग्रीक, हूण, मुसलमान, इंग्रज कोणीही हिंदू संस्कृतीवर विजय मिळवू शकले नाहीत.
- एकच व्यवसाय पिढ्यनपिढ्य त्या घरात चालत आल्याने कार्यकुशलता निर्माण झाली. आपल्याला पलीकडे कोणता व्यवसाय करावयाचा आहे ह्याचे ज्ञान असल्याने ते काम शिकून घेण्याची व त्या मध्ये विशेष कार्यकौशल्य अंगिकारण्याची जिज्ञासा निर्माण झाली. त्यातून कलेच्या प्रत्येक क्षेत्रात भारताने नांव कमाविले. येथील कलाकुसरीच्या अनेक वस्तुंना विदेशी बाजारपेठेत मोठी मागणी होती. एका बाजूला जातीव्यवस्था कडक बनत होती, भारतावर परकीय आक्रमणे सतत होत होती तर दुसऱ्या बाजूला भारतातील वस्तुंना विदेशातून अधिकाधिक मागणी येत होती.
- जातीजातींचीही कडक बंधने होती. त्यांच्यात अपवाद वगळता परस्पर विवाहसंबंध होत नसत. त्यामुळे वर्णसंकर न होता रक्ताची शुद्धता टिकून राहण्यास फार मोठी मदत झाली.
- वर्णव्यवस्थेची निर्मिती समाजाचे सामाजिक व आर्थिक नियमन होण्यासाठी झालेली होती. पुढे जाती पद्धती अस्तित्वात आल्यावर त्यात कोणताही बदल झाला नाही. प्रत्येक जात, उपजात आपले कर्म, व्यवसाय स्वत:च्या हितासाठी न करता दुसऱ्यांच्या हितासाठी करीत असे. समाजात त्यामुळे परस्पर सहकार्याची भावना निर्माण झाली. वर्णाची निर्मिती ब्रह्मदेवाच्या शरीराच्या विविध अंगांतून झाली हे ईशरीय तत्त्व जोडण्यामागे तीच भावना होती. शरीराचा कोणताही अवयव कमी दर्जाचा वा दुय्यम असत नाही. प्रत्येक अवयव एकमेकांना मदत करतात व एकमेकांवर अवलंबून असतात. असाच प्रकार जाती व्यवस्थेबद्दल कल्पून त्याद्वारे समाजाचे संघटन सुदृढ करण्याचाच प्रयत्न झाला.

## जातीपद्धतीचे दोष

वर आपण जातीपद्धतीच्या गुणांचा विचार केला असला तरी एकूण परिस्थितीचा विचार करता गुणांपेक्षा दोषांचाच भाग जास्त दिसतो. तो पुढील प्रमाणे –

जातीव्यवस्था जन्माच्या आधारावर आहे आणि जन्म कुणाच्याही हाती नाही. त्यामुळे जी गोष्ट नैसर्गिक आहे, ज्यावर मानवाची सत्ता चालत नाही त्याबाबत भेदाभेद करणे इष्ट नाही. विशेषत: स्वातंर्त्य, समानता, बंधुत्व, लोकशाही ह्या कल्पनांचा उदोउदो करण्याच्या ह्या काळात जाती पद्धतीचे समर्थन करणे योग्य नाही. आणखी एखादी गोष्ट घेतली पाहिजे. जातींच्या कठोरतेमुळे भारत देश अनेकदा संकटात सापडला. विशेषत: मुसलमानी आक्रमणे होत असतांना त्यांना राजपूत प्रतिकार करीत त्यावेळी अन्य जाती जमाती राजपुतांच्या मदतीला धावून गेल्या नाहीत. थोड्यफार फरकाने तीच बाब मराठ्यंच्या इतिहासात घडून आली. सारांश, जाती पद्धती राष्ट्रहितविरोधी आणि लोकशाही तत्त्वांविरूद्ध आहे हा त्यातील फार मोठा दोष आहे.

वर्णव्यवस्थेचा आधार गुणकर्म होता पण जाती पद्धतीचा आधार जन्म बनला. त्यामुळे गुणावगुण जातीनुसार ठरू लागले. उदा. एखाद्या राजवंशातील वारस अपात्र असूनही राजा बनत असे तर केवळ जातीच्या अडथळ्यामुळे उच्च योग्यता प्राप्त व्यक्तीला चांगली जागा मिळत नसे. स्पृश्यास्पृश्यतेने तर ह्या देशाचे अतोनात नुकसान झाले. परस्पर मने कलुषित झाली आणि राष्ट्रीय हिताला ती बाब पोषक ठरली नाही.

जसजसा काळ लोटत गेला तसतशी स्पृश्यास्पृश्यता अधिकच कडक बनत गेली. शूद्रांची सावली अंगावर पडणे इतर वर्णियांना सहन होत नसे. विवाह, खाणेपिणे ह्या गोष्टी तर दूरच राहिल्या. त्यामुळे इतर समाजाकडून पिळल्या गेलेल्या जातींनी आत्मसन्मानासाठी, अधिकारांसाठी इस्लाम धर्माचा, ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करणे सुरू झाले. भारताची त्यामुळे प्रचंड हानी झाली.

**डॉ. एस. आर. शर्मा ह्यांच्या मते** जातीपद्धती म्हणजे खोटे नाणे आहे. जे आजच्या युगात चालू शकत नाही. डॉ. शर्मा म्हणतात ते योग्यच आहे. कदाचित भारतीय इतिहासाच्या प्रारंभी असे गुणकर्म विभाजन लाभदायक सिद्ध झाले असेल. पण आज मात्र ते त्याज्य ठरले आहे. त्यामुळे हिंदू धर्माचे, समाजाचे, संस्कृतीचे नुकसान होत आहे. जातीव्यवस्था हा कलंक मानला पाहिजे. तो कलंक पुसून काढल्यास हिंदू धर्म, समाज पुन्हा आपल्या तेजाने तळपेल ह्यात शंका नाही.

यशस्वी लोकशाहीसाठी लोकसमुदाय राजकीय दृष्टीने जागृत असावा लागतो. सामुदायिक जीवनाविषयी आस्था नागरीकांत असणे लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक असते. जातिविग्रह, धार्मिक, संघर्ष, वर्गसंघर्ष आणि सामाजिक विषमता या सर्व गोष्टीस मारक ठरतात. मॅक्सेच्या मते राजकीय लोकशाहीशी समांतर औद्योगिक लोकशाही निर्माण करणे फार महत्वाचे असते. लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आर्थिक समता महत्वाची आहे. आर्थिक आणि सामाजिक समता जोपर्यंत प्रस्थापित होणार नाही तोपर्यंत लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. समाजातील उच्च—नीच, श्रेष्ठ—कनिष्ठ स्पृश्य—अस्पृश्य, इत्यादी भेदभाव नष्ट झाले पाहिजेत. नागरीकांची आर्थिक विवंचनेतून सुटका झाली पाहिजे. कोणत्याही नागरीकाचे आर्थिक शोषण होणार नाही व कोणासही आपल्या उपजीविकेची काळजी राहणार नाही असे वातावरण राज्यात निर्माण झाले पाहिजे. आर्थिक समता हा लोकशाहीच्या यशस्वितेचा मूलाधार आहे.

थोडक्यात नागरीकांची जागरूकता, समता, सहिष्णुता, सक्रीयता आणि शांततेविषयीची त्यांची आस्था यावर लोकशाहीचे अंतिम यश अवलंबन आहे. हीच लोकशाहीची आधारभत तत्वे आहेत. लोकशाही यशस्वी करण्यासाठी वरील आधारभूत तत्त्वाचे पालन केले पाहिजे. आपणासं भारतीय राजकारणातील प्रमुख पाच आव्हानांची आळेख करून घ्यावयाची आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण प्रत्येक आव्हानाचा स्वतंत्रपणे विचार करणार आहोत. प्रत्यक्ष समाजजीवनात व्यक्तीचे वर्तन हे जाती, धर्म, प्रदेश, भाषा व आर्थिक स्थिती अशा सर्व घटकांनी युक्त असते. सोप्या शब्दात जाती, धर्म, प्रदेश, भाषा व आर्थिक स्थिती या सर्वांच्या संमिश्र प्रभावातून व्यक्तीच्या वर्तनक्रिया व कृती घडत असतात. समाजजीवनातील हे वास्तव लक्षात घेऊ जाती, धर्म, प्रदेश, भाषा आणि दारिद्र्य निर्मूलन या पाच घटकांच्या राजकारणातील भूमिकेचा विचार केला पाहिजे, असे म्हणता येईल. स्वातंर्त्योत्तर काळात जन्मतत्त्वाचा आधार असणाऱ्या जातींमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता व असमानता नष्ट करण्याचे प्रयत्न अधिक जोमाने करण्यात आले. यासाठी काही कायदे नष्ट करण्यात आले. तसेच समान संधीचा मूलभूत अधिकारही सर्व नागरीकांना संविधानाने मिळवून दिला. समता, स्वातंर्त्य, बंधुता या मूल्यांवर आधारित समाजरचना व लोकशाही व्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले. या ध्येयाच्या प्राप्तीसाठी सर्व स्तरावर प्रयत्नही सुरू झाले. जातिप्रथांमध्ये बदल घडवून आणण्याची स्वातंर्त्यपूर्व काळातील प्रक्रिया स्वातंर्त्योत्तर काळात अधिक गतिमान झाली. हे सर्व मान्य केले तरी जाती अद्यापही नष्ट झालेल्या नाहीत. नजिकच्या भविष्यात जाती नष्ट होतील अशी कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. याची कारणमीमासा हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होय असे म्हणता येईल.

व्यक्तीच्या सामाजिक जीवनाची रूपरेषा निश्चित करण्यामध्ये जातिप्रथांचा प्रभाव पूर्वीएवढा आज राहिला नाही. या अर्थाने जाती खिळखिळ्या झाल्या आहेत असे म्हणता येते.

जातिप्रथांचा व्यक्तीच्या सामाजिक जीवनाची रूपरेषा निश्चित करण्यामधील प्रभाव कमी होण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. उदा. संविधानाने नागरीकांना मिळवून दिलेले मूलभूत अधिकार, शिक्षणाचा विस्तार व प्रसार, विकास कार्यक्रमख समाजसुधारकाचे प्रयत्न, इत्यादि. आपल्या जातीचा परंपरेनुसार निश्चित झालेला व्यवसाय करण्याचे बंधन आता व्यक्तीवर पूर्वीसारखे राहिले नाही. जाती—जातींच्या संबंधामध्ये (श्रेष्ठ—कनिष्ठतेवर आधारित संबंध) बदल घडून आला आहे व येत आहे. हे सर्व मान्य केले तरीही या पूर्वी कधीही नव्हते एव्हढे महत्व जातींना राजकीय क्षेत्रात गेल्या दोन—तीन दशकांमध्ये प्राप्त झाले आहे. व्यक्तीचे राजकीय वर्तन (मतदार वर्तन), राजकीय नेतृत्व, व्यक्ती—व्यक्तींमधील राजकीय संबंध या सर्व गोष्टींमध्ये

जात या घटकाचा प्रभाव वाढला आहे व अधिकाधिक प्रमाणात वाढत आहे. सोप्या शब्दात राजकीय क्षेत्र जातीयतेने प्रभावित झाले आहे. सामाजिक व प्रामुख्याने राजकीय एकात्मता निर्माण करण्याच्या प्रयत्नांमध्ये जात (जातीयवाद) हे एक प्रमुख आव्हान ठरू लागले आहे. भारतीय लोकशाहीत राजकारणात जातीपुढील आव्हानाचे मुद्देसूद विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) भारताचा इतिहास पृष्ठ ४६ ते ४८ – नी. सी. दीक्षित, मनोहर पिंपळापुरे पब्लिकेशन, महाल, नागपूर

२) भारतीय राज्य व शासन व्यवस्था पृष्ठ २५५, २५६, २५७ – रा. ज. लोटे प्रकाशक – मनोहर पिंपळापुरे, महाल, नागपूर

३) समाजशास्त्रीय संकल्पना पृष्ठ १७६, १७७ – डॉ.प्रदीप आगलावे प्रकाशक – साईनाथ प्रकाशन, भगवाघर कॉंप्लेक्स, धरमपेठ, नागपूर

४) भारतातील राज्यांचे राजकारण पृष्ठ ३४, ३६, ३९ – डॉ.मोहन दिवाण, प्रा. जयंत देवधर, प्रा. विवेक दिवाण, प्रकाशक – प्रमोद मुजें, विद्या प्रकाशन, महाल, नागपूर

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतातील दारिद्रय
# **Poverty in India**

**Prof. Kalpana K. Kale**
**Anand Niketan College, Warora**

ज्या परिस्थितीत समाजातील काही घटकांनाअन्न वस्त्र आणि निवारा यासारख्या मूलभूत वस्तू बराच काळ प्राप्त करणे किंवा मिळवणेअशक्य असते अशी परिस्थिती म्हणजे दारिद्र्य होय. समाजातील बरेच लोक किंवा लोकांचा समूहअथवा गट दारिद्र्याच्या खालच्या पातळीवर जीवन जगत असतो .

अशावेळेससमाज दारिद्र्याने पछाडलेला आहे असे म्हणता येईल. शहरी भागात फेरफटका मारल्यास आपल्यालाअसे आढळून येते की बऱ्याच भागात झोपडपट्टी आहे. अशी लोकांची परिस्थिती पाहता भारतातदारिद्र्याचे मोठे प्रमाण आढळून येते. मानवाच्या तीन मूलभूत गरजांमध्ये अजून दोन गरजांचीभर पडली ती म्हणजे आरोग्य आणि शिक्षण भारतामध्ये समाजातील अनेक घटक असे आहेत की जेजे अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजा सुद्धा भागवू शकत नाही. मग शिक्षण व आरोग्याचीनुसती कल्पना केलेलीच बरी. या लोकांना किमान आवश्यक अन्न, पिण्याचे पाणी, आरोग्य विषयकसेवा, कापड सुद्धा मिळत नाही हे लोक भयंकर दारिद्र्य अवस्थेत आपले जीवन जगतात . भारतातआर्थिक विषमतेची दरी आहे. समाजातील एका घटका जवळ भरपूर प्रमाणात पैसा आहे तर दुसऱ्याघटका जवळ पैसा काहीच नाही. ही आर्थिक विषमता भारतामध्ये सगळीकडे आढळून येते आणि यातूनचदारिद्र्य ꣳꣳनिर्माण होते.

भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्याची कारणे

1. ग्रामीण भागात दारिद्र्याची अनेक कारणे आहेत. भारतात आजही ग्रामीण समाजातील कित्येकलोक जसे:- भूमिहीन शेतमजूर वेट बिगारी अनुसूचित जातीतील व भटक्या जमातीतील लोक शतकानुशतकेदारिद्र्यात जीवन जगत आहे. दारिद्र्याची जणू त्यांना सवय झाली आहे. असे म्हणणे वावगेठरणार नाही. दारिद्र्याच्या वर जीवन जगण्याची त्यांना कुठून प्रेरणा सुद्धा मिळत नाही.

2. आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याची तीव्र इच्छा असली तरी साधनांच्या अभावी ते अशक्यआहे.

भारतात ग्रामीण भागात औद्योगीकरणाचा अभाव असल्यामुळेशेती हे एकमेव त्यांचे उत्पन्नाचे साधन आहे. अल्प जमीन, पाण्याची सोय नसणे शेती करायलापुरेसा पैसा नसणे अशी अनेक दारिद्र्याची कारणे आढळून येतात.

3. बहुतेक ग्रामीण जनता निरक्षर आहे त्यामुळे त्यांच्यामध्ये आधुनिक कौशल्याचा अभाव आढळूनयेतो. स्वाभाविकच परंपरागत पद्धतीने आणि परंपरागत वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या ग्रामीणकारागिरांच्या वस्तूला बाजारात पाहिजे तशी मागणी व किंमत मिळत नाही.

4. कुटुंबातील सदस्यांची संख्या भरपूर, तुलनेत मिळकत कमी पोटभर पुरेसे अन्नसुद्धा काहीकुटुंबात मिळत नाही. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रोजगारासाठी जाण्याची मानसिकता नसणेहे सुद्धा दारिद्र्याचे एक कारण आहे.

5. शेती व्यतिरिक्त पर्यायी रोजगाराचे ग्रामीण भागात पाहिजे तशी सोय नसते. परिणामतः ग्रामीणजनतेच्या दारिद्र्यात अजुनच भर पडते. ग्रामीण भागातील निरक्षरता व अंधश्रद्धा या गोष्टींमुळेपारंपारिक धार्मिक समजुती मध्ये समाज जखडलेला आहे. कुटुंब नियोजनाचा अभाव सदस्यांचीसंख्या कितीही असली तरी कुटुंब नियोजनाला त्यांचा फारसा पाठिंबा नसतो. त्यामुळे दिवसेंदिवसकुटुंब वाढतच जाते आणि उत्पन्न मात्र पुरेसं नसते. अशी अनेक कारणे ग्रामीण भागातीलदारिद्र्याची आहे.

भारतातील शहरी भागातील दारिद्र्याची कारणे

भारतातदारिद्र्य हे फक्त ग्रामीण भागात नसून शहरी भागात सुद्धा आढळून येते सुमारे 40 टक्केनागरिक निकृष्ट दर्जाचे राहणीमान जगताना आपण पाहतो ग्रामीण भागात दारिद्र्याचे कारणनिरक्षरता सांगितले जाते.भारतातील ग्रामीणभागाच्या तुलनेत शहरी भागात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. परंतु सर्वच साक्षर लोकांनारोजगार मिळतोच असे नाही. शहरी भागात पदवीधर सुशिक्षित बेकारांची संख्या फार मोठ्याप्रमाणात आहे. दारिद्र्याची कारणे खालीलप्रमाणे

1.वाढते शिक्षण :-सुशिक्षित असलेल्या माणसाची वेतन विषयक अपेक्षा ही भरपूर असते कमीपगाराच्या नोकरीमध्ये सुशिक्षित बेकार समाधानी आनंदी नसतो.

2यांत्रिकीकरण:-शहरी भागात फार मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्याचेयांत्रिकीकरण झालेले आढळून येते. उद्योगांमध्ये माणसाची जागा आता यंत्राने घेतली आहे.रोजगाराच्या संधी याच करणामुळे कमी झाल्या आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतरितहोणारी लोकसंख्या हे सुद्धा शहरी भागातील दारिद्र्याचे एक कारण आहे.

दारिद्र्य निवारणाचे कार्यक्रम

1अवास्तव यांत्रिकीकरण आतील भर कमीकरणे:-

उद्योगांमध्येयांत्रिकीकरणावर फार मोठ्या प्रमाणात भरदेण्यात आला आहे हा भर कमी करणे आवश्यक आहे.

2 ग्रामीण भागात नवनवीन उद्योग धंदे सुरूकरणे:-

मोठ्याशहरात होणारे लोकसंख्येचे केंद्रीकरण थांबवणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात उद्योग धंदेस्थापन केले तर शहराकडे जाणाऱ्या मजुरांची संख्या निश्चितच कमी होईल.

3 स्वतःचा व्यवसाय स्थापण्यासाठी प्रोत्साहन:-

सुशिक्षितबेकारांना व्यवसाय करण्यास प्रवृत्त केल्यास ते स्वतः चा व्यवसाय टाकू शकतील. राष्ट्रीयीकरणनंतरव्यापारी बँका स्वयम रोजगार योजना राबवितआहेत. त्यामुळे सुशिक्षित व साक्षर लोकांनी स्वतःचे व्यवसाय सुरू केल्यास बेकारी निश्चितचकमी होईल. पर्यायाने दारिद्र्यात घट होईल.

4 घरातील फक्त एका व्यक्तीस रोजगार:-

कुटुंबातीलसदस्यांची संख्या समजा चार असेल तर त्यातील तिघांना नोकरी असेल तर स्वाभाविकच संपत्तीचेकेंद्रीकरण होईल.यात बदल केला आणिघरातील एका व्यक्तीस रोजगार दिल्यास संपत्तीचे केंद्रीकरणथांबवता येते.

5 पैशाच्या स्वरूपात योग्य वेतन:-

ग्रामीणभागातील मजूर अत्यल्प मजुरीवर काम करतो जसे शेतमजूर, वेठबिगार, गुरे राखणारा यांचापैशातील मोबदला अत्यंत कमी असतो. हा मोबदला निश्चित करणे सक्तीचे केल्यास नक्कीच दारिद्र्यालाआळा बसेल.

6 शेतीसाठी नवीन सुविधांची माहिती देणे:-

अनेकसरकारी योजना अशा आहेत की ज्या शेतकऱ्यांपर्यंतपोहोचतच नाही सिंचनाच्या सोयी, बियाण्यांचा पुरवठा इत्यादी गोष्टी शेतकऱ्यांपर्यंतकशा पोचतील याची दक्षता घेणे, लहान शेतकऱ्यांना अतिवृष्टी व दुष्काळाच्या काळात अर्थसाहाय्यकरणे तसेच त्यांचे कर्ज माफ करणे.

7 शेतकरी कुटुंबांना प्रशिक्षण:-

ज्याकाळात शेतीचे कामे कमी असतात अशा वेळेस कुक्कुटपालन, वराहपालन, बांबूच्या वस्तू बनविणेइत्यादी व्यवसाय सुरू करू शकतील. याबाबतीत कुटुंबातील सदस्यांना प्रशिक्षण दिल्यासदारिद्र यापासून ते लांब राहतील.

8 ग्रामीण भागात प्रबोधन वर्ग सुरू करणे:-

ग्रामीणभागात प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण सक्तीचेकरणे तसेच निरक्षरांचे प्रमाण कमी करूनमुली व स्त्रियांना शिक्षणात योग्य सहभाग घ्यायला लावणे. अनेक क्षेत्रात विविध बदलकेल्यास याची माहिती लोकांपर्यंत नक्की पोहोचेल.

9 सावकार व जमीनदार वर्गाचे प्राबल्य कमीकरणे:-

ग्रामीणभागातील सावकार व जमीनदारां चे प्राबल्य कमी करण्यासाठी बँकिंग विषयक सेवांचा प्रसारकरणे म्हणजे त्यांचा आर्थिक व्यवहारात आत्मविश्वास वाढेल. शासनाने रोजगार हमी योजनापिक विमा योजना, व प्रौढ शिक्षण योजना याबाबत प्रयत्न केलेच आहे. लोकसंख्येचेधोरण राबवून शासनाने बरेच प्रामाणिक प्रयत्न सुद्धाकेले. उदाहरणार्थ कुटुंबनियोजन शिबिर, लोकसंख्या विषयक शिक्षण इत्यादी माध्यमातून लोकसंख्यावाढीचा दर कमी करणे आणि दारिद्र्य निवारण याचे काम प्रभावीपणे शासनाने पार पडले आहेत.

दारिद्र्यनिवारणाच्या विविध शासकीय योजना

1 शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्जपुरवठा:-1970-71 मध्ये शेतकऱ्यांना सवलतीच्या दरानेसरकारने अनेक योजना राबवल्या. लहान शेतकरी विकास संस्था(SFDA), शेतकरी आणि शेतमजूरविकास संस्था(MFAL), लहान व सीमांत शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यास सवलतीच्यादराने कर्ज पुरवठा तसेच आर्थिक मदतीच्या दृष्टीने सरकारने अनेक उपाययोजना राबवल्या.

2 ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण:-

ग्रामीणयुवकांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे तसेच ग्रामीण युवकांना स्वयंरोजगाराचेप्रशिक्षण देणे(TRYSEM) कार्यक्रम 1979 ला सुरू करण्यात आला. या कार्यक्रमात दारिद्र्यरेषेखालीयेणारे युवक लाभार्थी होते.

3 एकात्मिक विकास कार्यक्रम:-

ग्रामीणविभागात राबवले जाणारे विकासाचे कार्यक्रम एकाच छताखाली आणण्याच्या हेतूने 1977-78 या काळात पथदर्शक प्रकल्प म्हणून सुरू केलेला हा कार्यक्रम 2 ऑक्टोबर 1980 पासूनसंपूर्ण देशात लागू करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत उत्पादनासाठी आवश्यक वस्तू खरेदीकरण्यासाठी दारिद्र रेषेखालील लोकांना सवलतीच्या दराने आर्थिक मदत दिली जाणार होती.ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये 6400 किंवा त्यापेक्षा कमी आहे अशी कुटुंबे दारिद्र रेषेखाली आहे असे समजलेजाणार होते.

4 बालके आणि स्त्रिया यांच्या विकासासाठी कार्यक्रम:-

ग्रामीणभागातील स्त्रिया आणि बालके यांच्या विकासासाठी(DWCRA)1982 साली हा कार्यक्रम राबविण्यातआला.

5 सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना:-

ग्रामीणकारागिरांना आधुनिक अवजारे पुरविण्याचा कार्यक्रम(SITRA) ग्राम कल्याण योजना आणि दहालक्ष विहिरी (MWS) तसेच 1 एप्रिल 1999 रोजी ग्रामीण भागातील गरीबांच्या उत्पन्नात सुधारणाकरण्यासाठी" स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना" (SGSY) सुरू करण्यात आली. 2000 - 2001 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात या सर्व योजनांवर 1000 कोटीची तरतूद होती.

6 इंदिरा महीला योजना:- गरीब स्त्रियांच्या कल्याणासाठी 20 ऑगस्ट 1995 रोजी इंदिरा महीलायोजना सुरू करण्यात आली होती.

7 प्रधानमंत्री ग्रामोदय योजना योजना:-

इस 2000 - 2001 मध्ये सुरू केलेल्या" प्रधानमंत्री ग्रामोदय योजने"(PMGy) अंतर्गत खेड्यातील गरीब जनतेला पिण्याचे पाणी, मोफत आरोग्य सेवा, राहायला घर आणि शिक्षणया सर्व बाबींची तरतूद होती.

प्राथमिक शाळेतील मुलांना एक वेळचे मोफतजेवण, ग्रामीण गट विमा योजना व राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता योजना इत्यादी गोष्टींमुळेदारिद्र्य बऱ्यापैकी कमी होण्यास मदत झाली.

सारांश

भारतातइतर देशांच्या तुलनेत दारिद्र्याचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आढळुन येते. भारताचीअर्थव्यवस्था मुळात कृषीप्रधान असल्यामुळे सत्तर टक्के जनता शेतीवर आपला उदरनिर्वाहकरीत आहे.भारतातील शेती पावसाच्या पाण्यावरअवलंबून असल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात उत्पन्न मिळत नाही पाऊस कधी नको तितक्या प्रमाणाततर कधी काहीच नाही असा लहरी असल्यामुळे शेतकर्‍यांचे पीक नाहीशे होते. अनेक कुटुंब मजुरीकरून आपला उदरनिर्वाह करतात. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे पोट केवळ मजुरीच्या आधारावरभरत नाही. दारिद्र्यात जीवन जगण्याची ग्रामीण भागातील लोकांना जणू सवयच झाली आहे.दारिद्र्य हे त्यांच्या अंगवळणी पडले आहे.राष्ट्रीय पातळीवर दारिद्र्य निर्मूलनाच्या अनेकयोजना राबविण्यात आल्या. सरकारच्याकाही योजनाजनतेपर्यंत पोहोचल्या सुद्धा नाही. शिक्षणाचा अभाव हे दारिद्र्याचे फार मोठे कारण आहेसमाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणाच्या बाबतीत गांभीर्याने प्रयत्न केले तर दारिद्र्यनिर्मूलनाला बर्‍याच प्रमाणात मदत होईल यात शंका नाही.

संदर्भग्रंथ

1. उद्योजक मासिक.

2. योजना मासिक.

3. भारतीय अर्थव्यवस्था

कै.डॉ .स.श्री. यु. देसाई

4. भारतीय अर्थव्यवस्था

डॉ. देसाई

डॉ .सौ. भालेराव

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# वृध्दांची स्थिती एक अवलोकन

प्रा कु. वैशाली उत्तमराव कांबळे
एम. ए. बी.एड्. सेट (HEC) (P.H.D. Student)
मिलींद हाऊसिंग सोसायटी, शिंदे नगर,
यवतमाळ

प्रस्तावना -

आजच्या माहिती तंत्रानाच्या युगात मणूष्याच्या जीवनचक्राच्या अनेक अवस्थांपैकी वृध्दावस्थेचा संबंध मानसिकतेशी जोडता येतो. कारण वृध्द कोणास म्हणावे ? हा यक्ष प्रश्न सर्व प्रथम डोळयासमोर उभा राहतो. जेव्हा मनुष्याची प्रकृती चांगली असेल तेव्हा सर्वसाधारणपणे तो स्वत:ला वृध्द समजत नाही. तसेच अलीकडे वृध्द किंवा म्हातारे असे संबोधन सहसा वृध्दांना आवडत नाही. असे असले तरी मनुष्याच्या विकासाच्या अवस्थापैकी वृध्दावस्था हा सर्वात शेवटचा टप्पा असून ही अवस्था ऐच्छिक नसल्यामुळे आवडो किंवा न आवडो व्यक्तीला वृध्दावस्थेला सामोरे जावेच लागते या वृध्दावस्थेला सामोरे जाण्यास सर्वसाधारणपणे स्त्रि किंवा पुरूष कोणाचीही मानसिक तयारी नसते. या विषयावर विचार मंथन करण्याची आज आवश्यकता भासू लागली आहे. परंतू वृध्दावस्था ही नको असलेली अवस्था असली तरी त्यातून व्यक्तीला सामोरे जावे लागते. त्यामुळे ही अवस्था नकोशी म्हणून या नकारात्मकते मागे काय कारणे असू शकतात हे संशोधन केल्याशिवाय समजणे अशक्यप्राय आहे. म्हणून जागतिकीकरणाच्या युगात वृध्दावस्था जणू एक आव्हानच असल्यासारखे या अवस्थेकडे वाटचाल करणाऱ्या व्यक्तीला सतत वाटत असते.

मानवी जीवनचक्रातील वृध्दावस्था हा शेवटचा टप्पा आहे. ही अवस्था बहूतेक सर्वांच्या वाटयाला येते. ही दीर्घकालीन प्रौढावस्था आहे. जीवनाच्या अंतापर्यंत ही अवस्था असते. साधारणत: 60 वर्षा वयानंतरचा कालखंड म्हणजे वृध्दावस्था असे समजल्या जाते. व्यक्तीच्या वृध्दत्वाचा काळ हा अल्प किंवा दिर्घ असू शकतो तो मृत्यू येईपर्यंतचा असतो.

वध्दापकाळात मुलांनी आपली देखभाल करावी. अशी प्रत्येक वृध्द मातापित्याची अपेक्षा असते. पारंपारीक मूल्यानुसार वृध्द आईवडीलांची सेवा करणे हे पूत्राचे कर्तव्य होय. असे सैध्दांतीक स्वरूपात भारतीय समाजात आजही मान्य केले जाते. परंतू अलिकडच्या काळात अनेक कुटुंबातील मुले आर्थिक अडचणीच्या कारणास्तव वृध्द आई वडीलांचा सांभाळ करण्याचे नैतिक कर्तव्य पूर्ण करण्यास तयार नसतात. त्यामुळे वृध्द आई वडीलांची स्थिती फारच केविलवाणी झाली असल्याचे दिसून येते.

उद्दिष्ट

1) वृध्दावस्थेच्या अभ्यासाचे महत्व अभ्यासणे.

2) वृध्दांचे कुटुंबातील बदलते स्थान अभ्यासणे.

3) वृध्दावस्थेतील समस्या अभ्यासणे.

4) माहिती तंत्रज्ञान युगातील वृध्दांच्या अपेक्षा अभ्यासणे.

तथ्य संकलन-

या माहितीपर लेखासाठी दुय्यम स्त्रोत म्हणून पुस्तक, जर्नल, सोविनियर, वर्तमानपत्र, मासिक, इंटरनेट इत्यादीचा उपयोग करण्यात आला.

वृध्दावस्थेच्या अभ्यासाचे महत्त्व -

भारतात वृध्दावस्थेशी संबंधित अध्ययन अजूनही बाल्यावस्थेतच आहे. कारण या विषयी जितके अध्ययन व्हायला पाहिजे तेवढ झालं नाही. याला कारणेही बरीच आहेत. भारतात एवढया जास्त समस्या आहेत. जसे की कुपोषणासंबंधी, बालकासंबंधी, महिलांशी संबंधीत, त्यांच्या आहाराशी संबंधीत, आणखीही बऱ्याच समस्या सांगता येतील त्यामुळे वृध्द जसे कुटुबांत, समाजात उपेक्षित घटक किंवा दुर्लक्षित झालेले दिसतात. तसेच या विषयाकडे सुध्दा दुर्लक्ष झालेले दिसून येते.

पुर्वी एकत्र कुटुंब पध्दतीमुळे वृध्दांची देखभाल चांगल्या प्रकारे होत होती. वृध्दांचे महत्त्व त्यांच्या अंतीम क्षणापर्यंत टिकून राहत होते. नंतर हळूहळू यात परीवर्तन होत गेलं. औद्योगीकरण नागरीकरण आणि आधूनिकीकरण या सर्व घटकांच्या प्रभावामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या यात संयुक्त कुटुंब पध्दती लयाला गेली आणि विभक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात आली. शिक्षण आणि अर्थार्जन ह्यामुळे मी आणि माझं ही भावना खोलवर कुठे तरी रूजलेली दिसते. वडीलधाऱ्यांची सेवा-सुश्रूषा करणे प्रत्येकाच्या इच्छेवर अवलंबून असते. त्यामुळे जेष्ठांची होणारी कुचंबना जाणवते.

एकंदरीत सामाजिक परीवर्तनाच्या प्रक्रीयेत नविन मुल्यांचा स्विकार करण्यात येवू लागला आणि जुन्या मुल्यांचा ऱ्हास होण्यास सुरूवात झाली. अशा प्रकारे नविन मुल्यांच्या प्रभावामुळे पारंपारीक मुल्य व्यवस्थेत वृध्दांना अगदी बाजूला टाकण्यात आले. त्यामुळे वृध्दांची मानसिक कुचंबना होऊ लागली. समाजातील वृध्द हे दुर्लक्षित झालेत आणि पुढे वृध्दांच्या विविध समस्या निर्माण झाल्या. म्हणून वृध्दावस्थेच्या अभ्यासाचे महत्त्व आवश्यकता भासू लागली.

वृध्दांचे कुटुंबातील स्थान -

आधुनिक काळात औद्योगिकरण, शहरीकरण, पाश्चीमात्यीकरण, शिक्षणाचा प्रचार व्यक्तीवादी विचार सरणीचा प्रभाव इत्यादी कारणामुळे भारतीय समाज जिवनात परिवर्तन झाले. छपाईची साधने प्रचलीत झाली, ज्ञान ग्रंथीत होवू लागले. नविन - नविन ज्ञान व ग्रंथाची भर पडू लागली. जिवनाच्या विभिन्न अंगात प्रगती होवू लागली. ग्रामीण समुदायाकडून शहरी समुदायाकडे लोक जावू लागले. गृहउद्योग, शेती उद्योगातील पारंपारिक ज्ञान व साधने मागासलेली ठरली. संयुक्त कुटुंबाची जागा विभक्त कुटुंब प्रणाली घेवू लागली. जाती संस्था जाती पंचायत संस्था कालबाह्य मानल्या गेल्या. वैद्यकिय ज्ञान व पशूचिकीत्सेत आमूलाग्र सुधारणा झाली. व्यक्तीवादी विचारसणीचा प्रभाव दैनंदिन जिवनात दिसू लागला. शिक्षणाच्या प्रसारामुळे अर्जित स्थिती ऐवजी प्रदत्त स्थितीचे प्रचलन झाले.वय घटकापेक्षा 'गुणवत्ता', 'प्राविण्य', 'पात्रता या आधारांना स्विकृती देण्यात आली. म्हणजे असे की

वृध्दांचे महत्त्व आणि कार्य ज्या सामाजिक परिस्थितीत होते. ती परिस्थिती बहूतांशी बदलली. त्यामुळे वृध्दाना पारंपारीक भूमिकेत  बदल करणे आवश्यक झाले. त्या सोबतच वृध्दांचा दर्जा परिवर्तीत होवन समाज जिवनातील त्याची मान-मान्यता संपुष्टात आली. वृध्दांची स्थिती व भूमिका निर्धारित करणारी मूल्ये बदलल्यामुळे परीवर्तीत दर्जा व भूमिकेशी अनुकूलन करण्याची आवश्यकता प्रतित झाली. अशा विपरीत परिस्थितीमळे भारतीय समाजात वृध्दांची समस्या निर्माण झाली.

वृध्दावस्थेतील समस्या-

मानव समाजात झपाटयाने होत असलेले नागरीकरण,व्यवसाय प्रधान जीवनपध्दती व त्यातून उद्भवलेली गतीशीलता, तरूण पिढीची व्यवसायभिमुखता व आधुनिक अर्थव्यवस्थेत त्यांना प्राप्त झालेले महत्वपूर्ण स्थान ह्या घटकामुळे आधुनिक उद्योग प्रधान समाजजिवनात वृध्द पिढीला गौण व दुय्यम स्थान पत्करावे लागते. वाढत्या बयाबरोबर उद्भवणाऱ्या वृध्दांच्या शारीरिक-मानसिक व्याधी व तदूनषंगिक समस्या यात लक्षणिय वाढ झाली असून त्यांची उग्रता व गांभिर्य भेडसावणारे आहे.

वृध्दव्यक्तीच्या जिवनातील काही महत्वाच्या समस्या पुढील प्रमाणे आहे

**1)** शारीरिक समस्या -

वृध्दत्वामुळे निर्माण होणारी सर्वात महत्वाची समस्या म्हणजे शारीरिक समस्या होय. वृध्दावस्थेत व्यक्तीची शारीरिक क्षमता कमी होते. त्यातून अनेक प्रकारच्या शारीरिक समस्या निर्माण होतात. वृध्दापकाळात मनुष्याच्या शरीरात अनेक बदल होतात. शरीर झुकणे, शरीरास वाक येणे, अंगावर सुरूकूत्या पडणे, दात पडणे, डोळयांनी कमी दिसणे, कमी ऐकू येणे, हातापायास कंप सुटणे या सारखे अनेक

शारीरिक बदल वृध्दापकाळात होत असतात त्यातून व्यक्तीच्या जिवनात निरनिराळया समस्या निर्माण होतात.

2) आरोग्यविषयक समस्या -

वृध्दावस्थेत मनुष्याच्या शरिरात झालेल्या बदलातून आरोग्यविषयक समस्या उद्भवतात. व्यक्तीची शारीरिक क्षमता कमी झाली की तिच्या आरोग्यासंबंधीच्या तक्रारी वाढू लागतात. वृध्द व्यक्तीची पचन शक्ती कमी होते. रक्तदाब कमी-जास्त होतो, कार्यशक्तीचा -हास होतो. एकंदरीतच वृध्दावस्था ही जैवीक प्रक्रीया असल्याकारणाने या अवस्थेचे मानवी शरीरावर असंख्य परीणाम दिसून येतात. हे परिणाम अंतर्गत तसेच बाह्य स्वरूपाचे असतात. बाह्य परीणाम सहज स्पष्ट होतात. त्यात केस पांढरे होणे, चेहऱ्यावर सुरूकुत्या पडणे, नाकाचा आकार बदलणे, खांदे खाली झुकणे, हातापायाला कंप सुटणे, तर अंतर्गत बदलात अस्थी ठिसूळ होणे, काही पेशींची विभाजन थांबणे, रोग प्रतिबंधक क्षमतेचा -हास, मनोनियंत्रणाचा अभाव, किडणी पचनसंस्थेशी संबंधी समस्या निर्माण होणे इ. आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात.

3) मानसिक समस्या -

वृध्द व्यक्तीच्या जीवनात अनेक मानसिक समस्या ही उद्भवतात. वृध्दापकाळात निर्माण होणाऱ्या शारीरिक समस्यामुळेच व्यक्तीचे मानसिक संतुलन ढळू लागते. शाररिक दुर्बलते बरोबरच तिला मानसिक दुर्बलता येवू लागले. वृध्द व्यक्ती मानसिकदृष्टया दुर्बल व संवेदनशील बनतात. अगदी किरकोळ कारणावरूनही त्याना लकेच राग येवू लागतो. यामुळे त्यांचा स्वभाव चिडचिडा बनतो. काही वृध्द माणसे अतिशय विक्षिप्त वर्तन करू लागगात त्यांच्या विक्षिप्त पणामुळे कुटुंबातील वातावरणही बिघडण्याची शक्यता निर्माण होते. मराठी भाषते साठी बुध्दी नाठी अशी म्हण आहे. वृध्द व्यक्तीच्या विक्षिप्त पणाच्या अनुभवातूनच ती तयार झाली.

4) बौध्दीक समस्या -

वृध्दापकाळात मनुष्याची बुध्दी काम करेनाशी होते.वृध्दांना अनेक गोष्टीचे विस्मरण होऊ लागते. काही वेळा साध्या- साध्या गोष्टीही त्याना लक्षात राहत नाही त्यातून त्यांच्या जिवनात अनेक अडचणी निर्माण होतात. त्यांची विचारशक्ती व तर्कशक्ती कमकुवत बनते त्यामुळे एखाद्या गोष्टीवर समतोल बुध्दीने विचार करणे त्यांना शक्य होत नाही.

5) आर्थिक समस्या -

वृध्दावस्थेत कार्यक्षमतेचा -हास होतो. शारीरिक दुर्बलतेमुळे व्यक्ती सतत काम कर शकत नाहीत गात्रशिथिल होतात. त्यातून लवकर थकवा येतो. कंटाळवाणी वृत्ती वाढते. म्हणून वृध्दांना सेवानिवृत्त केले जाते. त्यामुळे व्यक्तीचा उत्पादनातील सहभाग संपुष्टात येतो त्या व्यक्तीला मिळणारा मोबदला बंद होतो. वृध्दावस्थेत व्यक्तीच्या गरजा वाढलेल्या असतात. वैद्यकिय मदत आणि इतराच्या साहाय्याची आवश्यकता असते. परंतू या कालावधीत आर्थिक प्राप्ती बंद झाल्यामुळे वृध्दांच्या जिवनात आर्थिक परावलंबन येते त्यांना पेशंन. बँकेतील बचत. भविष्यकालीन निर्वाहनिधीवर अवलंबून राहावेः लागते. तथापी ज्यांना शासकीय किंवा इतर कोणतेही नोकरी नसते. अशा अकुशल श्रमीकांची स्थिती अत्यत दयनिय असते. वृध्दावस्थेसाठी ते कोणतेही तरतुद करू शकतनाही.या परिस्थितीत निरीक्षीत वृध्दांना भिक्षा मागणे व इतर समाज असंमत मार्गाचा अवलंब करावा लागतो.

6) कुटुंबातील लोकांकडून होणारी उपेक्षा -

कुटुंबातील अगदी जवळच्या लोकांकडून किंवा नातेवाईकांकडून होणारी उपेक्षा ही वृध्दांची आणखी एक समस्या होय. अशा प्रकारच्या उपेक्षेला अनेक गोष्टी कारणीभूत होत असतात. विभक्त कुटंबात मोजकेच सदस्य असतात. ते सर्व आपआपल्या कामात व्यस्त असतात. त्यामुळे कुटुंबातील वृध्दांसाठी पुरेसा वेळ कोणीच देवू शकत नाही. व्यक्ती स्वातंत्र्याच्या अतिरेकी कल्पनांमुळे काही जणांना कुटुंबातील वृध्द व्यक्तींची अडचण वाटू लागते. वृध्द व्यक्तींमुळे आपल्या स्वातंत्र्यावर मर्यादा पडतात. अशी त्यांची समजून होते. त्यामुळे ते वृध्दांची उपेक्षा करू लागतात.

7) एकाकीपणा -

जीवनात येणारा एकाकीपणा ही देखील वृध्दांची एक समस्या बनू लागली आहे विभक्त कुटुंब पध्दतीत वृध्द व्यक्तींसाठी पुरेसा वेळ देण्यास कुणालाही सवड नसते. त्यामुळे आपण एकाकी पडत चाललो आहोत. असे वाटू लागते. आपण आयुष्यभर आपल्या कटबासाठी कष्ट उपसले पण आपल्याकडे कोणीच लक्ष देत नाही या गोष्टीची त्यांना खंत वाटते. यातूनच त्यांच्या जिवनात नैराश्य निर्माण होते.

8) वृध्दांच्या अपेक्षा

वृध्दापकाळात मुलांनी आपली देखभाल करावी अशी प्रत्येक वृध्द माता-पित्याची अपेक्षा असते. पारनपारीक मुल्यानुसार वृध्द आई-वडीलांची सेवा करणे हे पुत्राचे कर्तव्य होय, असे सैध्दांतिक स्वरूपात भारतीय समाजात आजही मान्य केले जाते. परंतु अलीकडच्या काळात अनेक कुटुंबातील मुले आर्थिक अडचणीच्या कारणास्तव वृध्द आई वडीलांचा सांभाळ करण्याचे नैतीक कर्तव्य पूर्ण करण्यास तयार नाहीत. आजच्या तरुण पिढीला प्रायव्हसी या मोहमयी शब्दाने बधीर केलय, छोटी कुटुंब पध्दती जागा कमी,

घराघरातून टिव्ही, व्हीडीओचे संस्कारहीन वातावरण वाढले. परीणाम असा जाला की घरातील तणावपूर्ण बातावरण बाढले या व अन्यकारणामुळे घरा-घरातून पांढरपेशा मध्यम वर्गातील वृध्द मंडळी अडथळा बनली आहे. अशा वाताववणात वृध्दांचा कोंडमारा होतोय. सुना-नातवंडे व मुलांकडून होणाऱ्या हेटाळणीमुळे त्यांना जिव नकोसा वाटू लागतो. आज तरूण आणि वृध्दांमध्ये वैचारीक दरी निर्माण झाली आहे. बाल्यावस्था आणि वृध्दापकाळ यात खरतर फारसा फरक नसतो. परंतू बालकाकडे जस लक्ष दिल्याजाते.तसे वृध्दांच्या बाबतीत होत नाही. वृध्दांना कुटुंबाकडून प्रेम, आपूलकी, आदर, सन्मान ह्या गोष्टींची अपेक्षा असते.आयुष्यभर कुटुंबासाठी खस्ता खाल्ल्या आता आपला वृध्दापकाळ निवांत घालविण्याची त्यांची इच्छा असते आणि ह्या शेवटच्या कालखंडात आपल्या कुटुंबाने त्यांचे मन दुखवू नये जी स्वप्न आयुष्याच्या धकाधकीत अपूर्ण राहीलीत ती पूर्ण करण्यास कुटुंबियांनी सहकार्य कराव अशी त्यांची अपेक्षा असते. ज्या प्रमाणे त्यांच्या कार्यकाळात किंवा उमेदीच्या काळात त्यांना जो मान-सन्मान होता. तो आजही कायम राहावा आणि इज्जतीने मरण याव अशी त्यांची सार्थ अपेक्षा असते.

सारांश

प्राचीन काळात भारतीय संस्कृतीमध्ये सयुक्तकुटुंब पध्दती अवलंबिली जात होती. परंतु आज 21 व्या शतकात ही पध्दती हळू-हळू न्हास होत चालली असल्याचे दिसून येत आहे. कुटुंब पध्दतीमध्ये कुटुंबातील वृध्द व्यक्तीकडे दुर्लक्ष केल्या जाते. कुटुंबातील त्यांचा मान दिवसेंदिवसकमी होत चाललेला दिसून येतो.

आधुनिक समाजात झपाटयाने होत असलेली नागरीकरण, व्यवसायभिमुखता व त्यातून उदभवलेली गतीशिलता व आधुनिक अर्थव्यवस्थेत त्यांना प्राप्त झालेले महत्वपूर्ण स्थान इ. घटकामुळे आधुनिक उद्योगप्रधान समाज जिवनात वृध्दपिढीला गौण व दुय्यमस्थान पत्करावे लागते. वाढत्या वयाबरोबर उदभवणाऱ्या वृध्दांच्या शारीरिक-मानसिक व्याधी व तदनुषंगिक समस्या यात लक्षनिय वाढ झाली असून त्यांची उग्रता व गांभीर्य भेडसावणारे आहे.त्यामुळे यावर योग्य उपाययोजना शोधून काढणे नितांत गरजेचे आहे. अन्यथा या समाजामध्ये मार्गदर्शक असलेले. अनुभवी वृध्दाअभावी समाजाची अवहेलना व पर्यायाने नाश झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून या विषयाकडे लक्ष देणे अत्यंत निकडीचे असल्याचे निदर्शनास येते.

संदर्भ

1. वृध्द आणी त्यांचे प्रश्न लिमये,वि.रा.इनामदार

2. वृध्दवस्था -जिवन की संध्याबेला. वृंध्दसिंह
3. भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या श.ज. लोटे, डॉ.ए.डी. चौहाण
4. भारतातील सामाजिक समस्या, डॉ. भा.की.खडसे
5. मा,श्री. ब्रिजमोहन फॉफालिया, नेट
6. विवाह आणि कौटुबिक नातेसंबंध, त्रिवेणी फरकाडे

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# मानवी जीवनात पोषक आहाराचे महत्त्व

**प्रा.सौ.वासंती देवनाथ खाडिलकर/देवीकर**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला वाणिज्य महिला महाविद्यालय,बल्लारपूर

सारांश

मानवाच्या सर्वांगिण विकासासाठी पोषण आहार हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. मानवाच्या शारिरीक आणि बौध्दीक क्षमता परिपूर्ण विकसित होण्यासाठी उत्तम व पोषक आहाराचे सेवन आवश्यक मानता येईल. जागतिक आरोग्य संघटनेने एखादया व्यक्तीच्या पुनरूत्पादानासाठी, चांगल्या आरोग्यासाठी आणि वाढीला आधार देण्यासाठी पोषक आहार महत्वाचा घटक आहे असे नमूद केले आहे. WHO ने आवश्यक पोषक घटकांना सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म पोषक घटक अशा दोन श्रेणींमध्ये विभाजन केले आहे. सूक्ष्म पोषक घटक हे शरिराला अगदी थोडया प्रमाणात हवे असतात तथापि या घटकाची कमतरता आजारपणाला कारणीभूत ठरते. जिवनसत्वे आणि खनिजे यांचा सूक्ष्म पोषक घटकामध्ये समावेश होतो. तर अतिसूक्ष्म पोषक घटकांमध्ये पाणी, प्रथिने, कार्बोदके, स्निग्ध पदार्थ आदीचा समावेश होतो. या घटकांची मानवी शरिराला अधिक आवश्यकता असते. अन्न पदार्थ व द्रव्य स्वरूपातील पेय यांचा पोषण आहारात समावेश होतो. ज्या प्रमाणे संतुलित आहारात अन्न पदार्थांचे योग्य प्रमाण राखणे आवश्यक असते त्याच प्रमाणे द्रव्य पदार्थचे सेवन सुध्दा प्रमाणशिर असले पाहिले अन्यथा याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होणाची शक्यता असते. बदलत्या जीवनशैलीनुसार आणि वयोगटानुसार आहारामध्ये बदल करणे क्रमप्राप्त आहे. पोषक आहार हा उर्जा प्रदान करण्याचे तसेच रासायनिक प्रक्रियेला नियंत्रित करण्याचे कार्य करतो. जिवनसत्वे, खनिजे, प्रथिने, स्निग्ध पाणी आणि कार्बोदके हे सहा आवश्यक पोषक घटक आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात पोषक आहाराच्या मानवी जीवनावर होणारा परिणाम व मानवी जीवनातील त्याचे महत्त्व अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

बीजशब्द : पोषक आहार, जीवनसत्वे, सूक्ष्म पोषक घटक, अतिसूक्ष्म पोषक घटक, संतुलित आहार

## प्रस्तावना :

अन्न ही मानवाची प्राथमिक गरज आहे. अन्नास मानवाच्या जीवनातील अविभाज्य घटक म्हणता येईल. मानवाची अनंत काळापासून अन्नात रूची असलेली दिसून येते. अन्नाचा उपयोग केवळ भूक भागविण्याकरिता होत नाही तर आरोग्य उत्तम राखण्याकरितासुध्दा होतो. त्यामुळेच तो कार्यक्षम, सुखी व आनंदी राहू शकतो. भारतात देखील आहारशास्त्राचा विकास होत आहे. प्राचिन अशा उपनिषेद, वेद तसेच रामायण व महाभारत आदींमध्ये विविध प्रकारच्या खाद्यपदार्थाविषयी व आहारासंबंधी माहिती आढळते. त्यात उत्तम स्वास्थासाठी कसा आहार असावा, कोणते अन्न वर्ज्य करावे, पथ्यकर आहार कसा असावा, पाककला, अन्न शिजविण्याचे प्रकार याचीही माहिती मिळते.

आपल्या दैनंदिन जीवनाची सुरवात ही वेगवेगळया पदार्थाचे सेवन करून होत असते. म्हणून आयुर्वेदाने आहाराचे मार्गदर्शन अतिशय उद्‌बोधक व विस्तृत असे केलेले आहे. **'सर्वम् अन्ने प्रति ठमा'** या शब्दात चरकाचार्य अन्नाचे महत्व पटवून देतात. आहार ही प्रत्येक सजीव प्राणीमात्राची मुलभूत गरज आहे. नुसती गरज नाही तर प्राण आहाराधीन असून उचित अन्नपान उत्तम शरीरशक्ती, रोग प्रतिकार शक्ती, उत्तम वर्ण, ओजस म्हणजेच श्रेष्ठ तेजस्वरूप शक्तीसाठी आवश्यक असते. म्हणून फक्त पोट भरण्यासाठी किंवा जिभेला आस्वाद देण्यासाठी आहार करायचा नसून तो जठराग्नीला समर्पित केलेले एक यज्ञकर्म आहे. अशी कल्पना आयुर्वेदात मांडलेली आहे आणि त्यातून साकार झाली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात पोषक आहाराच्या मानवी जीवनावर होणारा परिणाम व मानवी जीवनातील त्याचे महत्त्व अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१. पोषण आहार,आरोग्य या संकल्पनांचा अभ्यास करणे.

२. पोषक आहाराची कारणमीमांसा करणे.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम माहितीवर आधारित असून दुय्यम साधनांच्या मदतीने माहितीचे संकलन केले आहे. यामध्ये संशोधन विषयाशी संबधित संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालीके, वर्तमान पत्रातील विविध लेख, वेबसाईटवरील विविध लेख आदींचा आधार घेतला आहे.

**पोषण आहार :**

पोषण हा आरोग्य आणि विकासाचा एक महत्वपूर्ण भाग आहे जो सजीवांची वाढ करते, पुनरूत्पादन आणि रोग टिकवून ठेवण्यासाठी पोषक तत्वे आणि इतर अन्नपदार्थाचे महत्व सांगते. यामध्ये पचन, शोषन, उत्सर्जन आणि आत्मसात करणे यांचा समावेश होत असतो. आहार हा आनंददायी देणारा असावा, जो मुख्यत: अन्नपदार्थाची उपलब्धता आणि क्षमता यावर अवलंबून असतो. पोषण आहरामुळे चांगले पोषण, सुदृढ नवजात बाळ आणि मातेचे निकोप आरोग्य, रोग प्रतिकारक प्रणाली, सुरक्षित गर्भधारणा आणि बाळंतपण, मधुमेह आणि हृदयरोग यासारख्या संसर्गजन्य रोगाचा कमी धोका असतो. पोषणाच्या अभावामुळे ॲनिमीया, स्कर्व्ही, अंधत्व यासारखे आजार संभवतात.

दरवर्षी १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत देशभर 'राष्ट्रीय पोषण महिना' साजरा करण्यात येतो. या काळात पोषणाचे महत्व लोकांना पटवून देण्यात येते. आहारात घेतलेले अन्न पोषण दृष्टया समतोल हवे. शरीर पोषण व संवर्धन यासाठी प्रथिने, पाणी, जीवनसत्व व खनिज द्रव्ये हयांचा आवश्यक तेवढा पूरवठा व त्याचे योग्य प्रमाण आपल्या आहारात असावे. कोणत्याही एकाच खाद्यपदार्थात हे सर्व घटक योग्य प्रमाणात मिळणे शक्य नसल्याने या सर्व घटकांचे योग्य प्रमाणात रोजच्या आहारात विविध पदार्थ सामाविष्ट करून साधले पाहिजे अशा संमिश्र आहाराला समतोल आहार किंवा संतुलीत आहार म्हणतात.

## पोषण व स्वास्थाचा संबंध :

मानवाचे स्वास्थ उत्तम राहण्यासाठी योग्य प्रमाणात आहारातील पोषक घटक मिळणे अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तीचे वय, आरोग्य, ऋतूमान, सवय इत्यादीवर पोषक घटकांची आवश्यकता अवलंबून असते. आहार खुप जास्त किंवा खुप कमी प्रमाणात घेतल्यास त्याचा स्वास्थावर वाईट परिणाम होत असतो. आहारावरच पोषण अवलंबून असते. आहार आणि पोषण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत कारण आहार भूक शमविते तसेच त्यातील पोषक घटकामुळे वाढ व विकास चांगल्या प्रकारे होत असतो. व्यक्तिची आवड निवड, उत्पन्न, अन्नपदार्थाची उपलब्धता याचा विचार करावा लागतो. कारण योग्य पोषणावरच मानवाची कार्यक्षमता, उत्साह, रोगप्रतिकारकशक्ती अवलंबून असते. उत्तम पोषणामुळे मानसाची हाडे मजबुत राहतात, मासपेशी क्रियाशील होतात. शरीरातील रक्ताचे प्रमाण योग्य राहते, मानसाची वाढ व विकास योग्य प्रकारे होवून मानसिक संतुलन राखण्यास मदत होते.

## पोषक घटक :

व्यक्तिच्या आहाराविषयक सवयी या पोषणावर आधारित असतात. त्यामुळे लहानपणापासूनच आहारसंबंधीचे शास्त्रीय ज्ञान कुटूंबातून, शाळेतून मिळणे आवश्यक आहे. पोषणशास्त्र हे आहाराचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक उपयोग याच्याशी संबंधित आहे. पोषणशास्त्र म्हणजे आरोग्य उत्तम राखण्याचे ज्ञान होय. पोषण हा आरोग्य आणि विकासाचा एक अविभाज्य भाग आहे. वाढ होणे, पुनरूत्पादन आणि रोग मुक्त राहण्यासाठी पोषक तत्वे आवश्यक आहेत. अन्नात असणाऱ्या विविध घटकांमुळे अन्नाची कार्ये पूर्ण होतात त्याला पोषणतत्वे असे म्हणतात. अन्नात असणाऱ्या रासायनिक पदार्थामुळे शरिराची वाढ होणे, पेशीची निर्मिती होणे, पूर्ननिर्मिती, रोगांपासून संरक्षण, शरिराच्या तापमानाचे नियंत्रण इत्यादी कार्ये पूर्ण होतात.

## व्याख्या : —

१. पोषकद्रव्ये शरीरात घेऊन त्यांचा वापर करण्याच्या सजीवांच्या प्रक्रियेला पोषण असे म्हणतात.
२. अन्नातील जे रासायनिक घटक योग्य त्या प्रमाणात घेतले असता शरिरातील अन्नाची कार्ये सुरळीतपणे पार पाडतात त्यांना पोषकतत्वे म्हणतात.

## पोषणतत्वे :—

**१) प्रथिने** — प्रथिनात असलेल्या ऍमिनो ऍसिडवरून प्रथिनेयुक्त अन्न आणि शारिरीक महत्व ठरविता येते. दुध, मास, मासे, सोयाबिन, अंडी, मशरूम पावडर, मिश्र डाळी हे अतिशय महत्वाचे प्रथिने आहे. म्हणून त्यांना अतिशय चांगल्या दर्जाचे प्रथिने म्हणतात. शरिरात सतत होणारी झीज भरून काढण्यास आणि शरीराची बांधनी करण्यासाठी प्रथिने आवश्यक असतात. प्रथिन्यांना आपल्या आहारात महत्वाचे स्थान आहे. ज्या आहारात पुरेशी प्रथिने उपलब्ध होतात तो आहार योग्य मानला जातो. जर प्रथिने योग्य प्रमाणात न मिळाल्यास वाढीवर परिणाम होतो. शारिरीक व मेंदुची वाढ कमी होते त्यामुळे लहान मुलांमध्ये क्वॉशीऑरकॉर (Kwashiorkar) नावाचा रोग होतो.

२) **कार्बोदक (पिष्टमय पदार्थ)** – पिष्टमय पदार्थ आपल्या शरिरातील ऐच्छीक व अनैच्छिक कार्य आणि आपल्या शरिरातील प्रोटीन आणि जड पदार्थाच्या निवडीकरिता मदत करतात. साखर, गुळ, आरारोट, साबुदाना, सुकी फळे, कंदमुळे यापासून कार्बोदके प्राप्त होत असतात. भाजीपाला, फळे आणि डाळीचे कवच (टरफल) हे पदार्थ जास्तीत जास्त पिष्टमय पदार्थ साठवून ठेवतात आणि हे पदार्थ मानवी आतडयांमध्ये फसतात त्यामुळे ते अन्न पचवू शकत नाहीत म्हणून या पदार्थाला किंमत मिळत नाही. त्यामुळेच ते टाकावू म्हणून प्रसिध्द आहेत. आपल्या शारिरीक तंदुरूस्तीसाठी व जिभेच्या वळणासाठी महत्वाचे पिष्टमय पदार्थ आपल्या शरिरातील वजन वाढण्यास मदत करतात. साधारणत: ६० ते ७० टक्के उर्जा (कॅलरी) पिष्टमय पदार्थापासून मिळते नेमके भारतीय पदार्थात ७० ते ७५ टक्के म्हणजेच सर्वात जास्त कार्बोदके असतात. पाश्चिमात्य देशातील पदार्थ फक्त ४० ते ५० टक्के पिष्टमय असतात. कमीत कमी १००ग्राम पिष्टमय पदार्थ चरबीच्या ऑक्सिजनीकरणाला आवश्यक असतात.

३) **स्निग्ध पदार्थ** – स्निग्ध पदार्थ आपल्या दैनंदिन आहारात आवश्यक असते. स्निग्धपदार्थ म्हणजे निरनिराळी तेल, तुप, लोणी, चरबी इत्यादी. स्निग्ध पदार्थाची दोन प्रकारची कामे असतात. एक म्हणजे उर्जा पुरविणे दुसरे काम म्हणजे शरीरातल्या काही कामात आवश्यक घटक म्हणून भाग घेणे. आपले आरोग्य टिकविण्यासाठी विशिष्ट प्रमाणात स्निग्धांची गरज असते पण शरीरातील चरबीचे प्रमाण मर्यादेपेक्षा वाढल्यास शरीरावर त्याचे निश्चितपणे प्रतिकुल परिणाम दिसून येते. आदर्श आहाराच्या तत्वानुसार शरीराच्या एकूण उष्मांक गरजेपैकी ६० टक्के उर्जा टणक पदार्थापासून आणि २० टक्के स्निग्ध पदार्थापासून उर्जा मिळते. कारण या स्निग्धपदार्थापासून उर्जाबरोबरच आणखी काही आवश्यक घटक मिळतात व उरलेली २० टक्के उर्जा प्रथिनांपासून मिळते. जे कमी गोठणारे तेल असतात ते चांगल्या प्रकारची असतात. अशी तेल हृदय, रक्तवाहिन्या व पेशींना चांगली असतात.

४) **जीवनसत्वे** – सर्व सजीव वाढीसाठी कार्बोदके, स्निग्ध, प्रथिने आवश्यक असतात. या पदार्थाव्यतिरीक्त काही विशिष्ट घटकांची (संयुगाची) अल्प प्रमाणात आवश्यकता असते. या घटकांची कमतरता निर्माण झाल्यास सजीवांची वाढ खुंटते तसेच त्यांना काही रोग उद्‌भवतात अशा कार्बनी संयुगांना जीवनसत्वे म्हणतात. शरिराला जीवनसत्वे ही अल्प प्रमाणात लागतात. पण शरिराला अतिशय महत्वाचे पोषक घटक आहे. वाढ व विकास होण्याकरिता, आरोग्य उत्तम राखण्यासाठी अतिशय महत्वाचे जीवनसत्व आहे. जीवनसत्वे स्निग्ध पदार्थात विरघळणारी व पाण्यात विरघळणारी जलविद्राव्य आहे. अ, ड, ई, के ही स्निग्धद्राव्य आण्यि ब, क ही जलद्राव्य जीवनसत्व आपल्या शरिराकरिता अत्यंत आवश्यक असते.

**जीवनसत्व 'अ'** – जीवनसत्व 'अ' हे शरिराला लागणारे एक महत्वाचे पोषकद्रव्य आहे. शरिराला 'अ' जीवनसत्वाचे पचन आणि शोषण होण्याकरिता स्निग्ध पदार्थाची आवश्यकता असते. सर्वसाधारणपणे फक्त दृष्टीसाठी किंवा डोळयाच्या आरोग्यासाठी जीवनसत्व 'अ' लागते हे सर्वज्ञात आहे. परंतु दृष्टीशिवाय सुध्दा इतर बऱ्याच कार्यात जीवनसत्व 'अ' महत्वाचे कार्य करते. आपल्या डोळयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी जीवनसत्व 'अ' चा महत्वाचा वाटा असतो. शरिराच्या योग्य वाढ आणि विकासाकरिता जीवनसत्व 'अ' लागते. आपली रोगप्रतिकारक शक्ती कायम ठेवण्याचेही कार्य करत असते मातेच्या दुधातून बाळाला जे 'अ' जीवनसत्व मिळते ते त्याच्या उत्तम आरोग्याचा पाया बनते. जीवनसत्व 'अ' चा घटक 'कॅरोटीन' हे एक

महत्वाचे एन्टिऑक्सिडट आहे. जीवनसत्व 'अ' हे दुध व दुधापासून बनविलेले पदार्थ, पालक, कोथिंबीर, मका, सुरण, रताळी, टोमॅटो, गाजर, लालभोपळा, पपई, आंबा यात भरपूर प्रमाणात असते.

**जीवनसत्व 'ड'** – साध्याच्या काळात जीवनसत्व 'ड' ची कमतरता हे अगदी सर्वसामान्य झाली आहे. एखादया साथीच्या रोगाप्रमाणे पसरत आहे. जवळपास निम्मे जग जीवनसत्व 'ड' च्या कमतरतेने ग्रासले आहे. यात किशोरपासून जेष्ठापर्यंतच्या व्यक्तिंचा समावेश होतो. सूर्यप्रकाश, मुत्रपिंड आणि यकृताच्या एकत्रित समन्वयाने तयार होणारे हे एकमेव जीवनसत्व आहे. शरिरातील अनेक कार्यायासाठी 'ड' जीवनसत्व महत्वपूर्ण आहे. हाडांच्या विकासाकरिता याची आवश्यकता असते. जीवनसत्व 'ड' तयार होण्याचे तीन टप्पे आहे. पहिल्या टप्प्यात त्वचेमध्ये नैसर्गिक स्वरूपात 'ड' जीवनसत्व तयार होते. आपल्या आहारातून कॅल्शिअमचे अपूरे शोषण होते. शिवाय नवीन हाडांच्या निर्मितीलाही प्रतिबंध होतो. 'ड' जीवनसत्वाच्या कमतरतेचे मुख्य कारण म्हणजे सुर्यप्रकाशात अपूरा वेळ घालवणे. सध्याची जीवनशैली धावपळीची आहे. यात कार्यालयीन काम हे बंद खोलीतील कामामुळे सुर्यप्रकाशाशी फारसा संपर्क येत नाही. त्याचा परिणाम यकृत किंवा किडणीवर होत असतो. त्याचप्रमाणे दुसरे कारण म्हणजे अपुरे सेवन हे होय. जीवनसत्व 'ड' ची आवश्यकता प्रौढ व्यक्तीला ६०० युनिटची गरज असते.

**जीवनसत्व 'ई'** – जीवनसत्व 'ई' शरिराला लागणारे महत्वाचे जीवनसत्व असून स्निग्ध पदार्थात विरघळणारे असतात. हे रक्तात लाल रक्त कोशिका Red Blood cells बनवण्यासाठी उपयोगी असते. हे जीवनसत्व शरिरातील अनेक भगांना सामान्य बनविण्यास मदत करते नवजात शिशुमध्ये जीवनसत्वाच्या कमीमुळे रक्ताची कमी होते. त्यामुळे त्यांच्यात अनिमीया होतो. जीवनसत्व 'ई' च्या कमतरतेमुळे रक्ताची कमी होते. वयस्क लोकांमध्ये जीवनसत्व 'ई' च्या अभावाने मेंदुच्या किंवा डोक्यातील नसांचे किंवा न्युरोलोजीकल समस्या येऊ शकते. प्रौढ व्यक्तिला दररोज सुमारे १५ मिलीग्रॅम 'ई' जीवनसत्व लागते.

**जीवनसत्व 'के'**– जीवनसत्व 'के' हे शरिराला लागणारे एक आवश्यक जीवनसत्व असून स्निग्ध पदार्थात विरघळणारे आहे. के जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे रक्त गोठण्याची प्रक्रिया सुरळीत होत नाही जखम झाली तर तिच्यातून होणारा रक्तस्त्राव चालूच राहते.

**खनिज द्रव्य** – आपल्या शरिराला ज्याप्रमाणे प्रथीने, कार्बोदके, स्निग्ध, जीवनसत्व या पोषक घटकाची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे निरनिराळया खनिजद्रव्याची आवश्यकता असते. शरिराच्या वाढीसाठी व प्रगतीसाठी खनिजाची खुप आवश्यकता असते. आम्लयुक्त पदार्थच त्यामुळे समतोल राखला जातो. मज्जासंस्था, स्नायु पेशी व पाण्याचा समतोल यामुळे राखला जातो. ज्या अन्नामध्ये सल्फर, फास्परस क्लोरीन असते ती अन्न शरिराला पोषक असतात. दुध, चिझ, डाळी, मास, अंडी, कॅल्शिअम, पोटॅशियम, सोडियम, मॅग्नेशियम, लोह, फळ व भाज्या अर्कयुक्त आहार आहे. अन्नपदार्थात खनिजांचा समावेश हा रीर नियंत्रक म्हणून केला जातो. परंतू खनिजांचे जास्त सेवन हे शरिरात असमतोल निर्माण करतो किंवा इतर खनिजांच्या सेवनाला तरी घातक ठरू शकतात.

**कॅल्शियम** – आपल्या शरिरात सर्वात जास्त प्रमाणात असणारा अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे कॅल्शियम. आपल्या हाडांच्या आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी, स्नायु आणि मज्जातंतूच्या योग्यप्रकारे कार्य करण्यासाठी कॅल्शियमची आवश्यकता असते.

नैसर्गिकरित्या कॅल्शियम हे फळांमध्ये पालेभाज्यांमध्ये आढळते. कॅल्शियम वाढण्यासाठी आपल्याला व्हिटॅमिन 'डी' ची गरज पडते. व्हिटॅमिन 'डी' हे सुर्यप्रकाशाच्या संपर्कातून येते सोयाबिन, भेंडी, खसखस, तीळ, ड्रायफूड, दुध इत्यादी पासून कॅल्शियम मिळते.

**फास्फरस** – आपल्या शरिरात दुसरा महत्वाचा घटक म्हणजे फास्फरस होय. शरीरामध्ये फास्फरस हाडांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात असते. पेशींच्या वाढीसाठी आणि उर्जा प्राप्त करण्यासाठी अन्न विघटन करण्यासाठी शरिरास फास्फरसची आवश्यकता असते. आपल्या शरिरातील काही अनुघटकांचा भाग असतो. जसे की, आपले DNA आणि आपल्या शरिरात बनलेल्या अणू उर्जामध्ये देखील समाविष्ट असतो. हाडांच्या आरोग्यासाठीपण फास्फरस आवश्यक आहे.

फास्फरसच्या कमतरतेचे मुख्य कारण अपुरा आहार आहे. फास्फरस अनेक नैसर्गिक खाद्य पदार्थामध्ये असतो आणि म्हणूनच फॉस्फरसची कमतरता फारशी जाणवत नाही. फास्फरसची कमतरता जाणवली तर नियमितपणे काही औषधोपचार घेतल्यास व डॉक्टरांनी सांगितलेला आहार घेतल्यास रोगी बरा होतो.

**लोह** – लोह हे सर्व शरिराला प्राणवायुचा पुरवठा करते. पेशीमधील महत्वाच्या कार्यांना चालना देते. रक्तातील लालपेशी किंवा हिमोग्लोबीनमध्ये लोह असते. लोहाच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होतो. तसेच लोहामुळे रक्ताला लाल रंग येतो. त्याचप्रमाणे काही विशिष्ट जीवनसत्वाची कमतरता अतीरक्तस्त्राव, लाल पेशींचे जास्त प्रमाणात विघटन होणे, काही आनुवंशिक आजार तसेच काही दिर्घकालीन आजार व इतर कारणेही ॲनिमिया होण्याचे मुख्य कारण आहे. लोह हे खनिज आहारातील मास, कडधान्ये, सुकामेवा इत्यादी पासून मिळते. लोहाच्या कमतरतेमुळे शरिरात रक्ताची उणीव भासते.

**सोडीयम** – आपल्या आहारातील सर्वच खाद्यपदार्थात सोडियम असते. सोडियम हे मुलद्रव्य शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहे. निसर्गात ते विविध खनिजात आढळते त्यापैकी NACI म्हणजेच मीठ हे आपल्यासाठी सर्वात महत्वाचे खनिज आहे. आपल्या शरिरातही सोडीयम काही क्षारांच्या रूपात अस्तित्वात असते आणि जगण्यासाठी मुलभूत स्वरूपाची कार्य करते. स्वयंपाक करतांना बहुतेक पदार्थात आपण चवीसाठी मीठ घालतो. त्यामुळे प्रथमदर्शनी असे वाटते की 'वरून घातलेले मीठ' हाच सोडीयमचा स्त्रोत आहे पण तसे नाही दुध, मास, मासे या नैसर्गीक पदार्थातही ते आढळते. त्यामुळे आधुनिक खाद्यशैलीत आपण सगळेच गरजेपेक्षा जास्तच सोडियम खात असतो. सोडीयमचे मुख्य कार्य हे पेशीतील मुलभूत प्रक्रियात आवश्यक आहे तसेच रक्ताचे एकूण आकारमान स्थिर राखते. मज्जातंतूच्या संदेशवहनाला मदत करते.

**आयोडिन**– मानवी जीवनास आवश्क असलेले हे नैसर्गिक मुलद्रव्य आहे. थायरॉक्सीन हारमोनच्या निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक आहे. गरोदर स्त्री व स्तनपान देणाऱ्या मातेला आयोडिनची विशेष गरज असते. ज्या गरोदर महिलेमध्ये आयोडिनची कमतरता असते ती महिला मानसिक, शारिरीक व्यंग असलेल्या बालकास जन्म देण्याची शक्यता असते. प्रौढ व्यक्तीस दररोज सरासरी १५० मायक्रोग्रॅम एवढी आयोडिनची आवश्यकता असते. आयोडिनयुक्त मीठ हे साध्या मिठाप्रमाणेच दिसते. त्याची चव आणि वाससुध्दा साध्या मिठासारखाच असतो. आयोडिन आपल्याला समृध्दी मासे, मीठ, इत्यादी वनस्पती यापासून प्राप्त होत असते.

**पाणी –**

पाणी ही मानसाची मुलभूत गरज आहे. हे हायड्रोजन व ऑक्सिजन या अणूपासून बनलेला द्रव पदार्थ आहे. आपल्या शरिराला निरोगी ठेवण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. शरीराच्या, आकार, रूप, शक्ती लवचिकता पाण्यामुळेच प्राप्त होत असते. दिवसातून ६ ते ८ ग्लास पाणी आपल्या शरिराला आवश्यक असते. द्रव पदार्थातून चहा, कॉफी, दुध, ताक, नारळ पाणी इत्यादीपासून मिळत असते. अन्नाचे पचन व शोषण होण्यासाठी, आपल्या शरीराचे तापमान योग्य राखण्यासाठी पाण्याची, आवश्यकता असते. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१टक्के असुनही ते पिण्यासारखे नाही. समुद्रात पाणी सुमारे ९६ टक्के आहे. पृथ्वीवरील सर्व ताज्या पाण्यापैकी ६१ टक्के भाग आहे. परंतु नियमित वापरासाठी हे मिळवणे शक्य नाही. पृथ्वीतलावर पिण्यायोग्य पाण्याचे प्रमाण फक्त ३ टक्के आहे. त्यामुळे पाण्याचा वापर हा आपल्या आवश्यकतेनुसारच करणे आवश्यक आहे.

## समारोप :

लॉकडाऊन अनेकांच्या जीवनशैलीत बदल झाले आहे. दिवसभर घरातच असल्यामुळे आहारातही बदल झालेले आहे. पण अशा बदललेल्या जीवनशैलीमध्ये कोरोनाशी लढण्याकरिता पौष्टिक आणि संतुलित आहार महत्वाचा असतो. या काळात रोगप्रतीकारकशक्ती वाढवण्यासाठी चौरस आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. दैनंदिन जेवणात स्निग्ध पदार्थ, खनिज पदार्थ, प्रथिने इत्यादी घटक तत्वांनी युक्त सकस व संतुलित आहार नियमीत पुरेसा आणि ताजा आहार व्यक्तीला मिळाल्यास आरोग्य उत्तम राहते. त्याचप्रमाणे सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम आरोग्यावर होत असते. व्यक्तीच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, सामाजिक स्थिती जर चांगल्या प्रकारची असेल तर त्या व्यक्तिचे आरोग्य उत्तम असते. जर व्यक्तिस आरोग्याने साथ दिली तर त्या व्यक्तीस ते काम करण्यास उत्साह राहील शरीर व मन निरोगी असणे ही व्यक्तिच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय उपचार न घेता व्यक्ती खऱ्या अर्थाने सर्व बाबतीत श्रीमंत असते. एखादी व्यक्ती जर निरोगी असेल तर संपूर्ण समाज सुध्दा निरोगी असतो. म्हणून दैनंदिन जीवनामध्ये आरोग्याला विशेष महत्व आहे व आपण त्याची काळजी घेतली पाहीजे आरोग्य बिघडल्यावर सुधारणा करण्यापेक्षा आरोग्य बिघडू नये म्हणून काळजी घेणे हे प्रत्येकाच्या हातात आहे. म्हणतात ना 'आपले आरोग्य आपल्या हाती' आहे हे यावरून स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

१. **मानवी पोषण व आहारशास्त्राची मुलतत्वे १९९६** – डॉ. आशा देऊसकर विद्या प्रकाशन, नागपूर.

२. **आहारशास्त्र** – प्रा. सौ. सरल लेले, डॉ. आशा देऊसकर महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

३. **पोषण व आहारशास्त्र** – त्रिवेण फरकाडे सुलभा गोंगे पिंपळापूर प्रकाशन, नागपूर.

४. **पोषण व आहार** – प्रा. ाोभा वाघमारे विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.

५. **आहार आणि पोषण** – डॉ. लता ग. सावरकर, रजनी प्रकाशन, नागपूर M/s Rajni Prakashan, Nagpur.

६. **Gayatri Kulkarni –** Maharashtra Times [updated April 27, 2016

७. **सकाळ** –September 28, 2021.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# "शाश्वत विकासाचा सहकार क्षेत्रावर झालेला परिणाम अभ्यासणे"

**प्रा.डी.एन.घाणे**
(सहाय्यक प्राध्यापक)
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ

**प्रा. डॉ. जी. डी बोर्डे**
(सहाय्यक प्राध्यापक)
विभाग प्रमुख,पी व्ही पी कॉलेज प्रवरानगर

## प्रस्तावना

शाश्वत विकासामध्ये पर्यावरणीय संतुलन टिकविण्यासाठी नैसर्गिक संसाधनांच्या कार्यक्षम आणि जबाबदार प्रशासनाचा समावेश आहे, जेणेकरून सध्याच्या स्त्रोतांच्या योग्य प्रमाणात वितरण आणि भविष्यातील पिढ्यांसाठी त्यांची उपलब्धता याची हमी दिली जाऊ शकते. टिकाऊ विकासाची कल्पना ही विकासाच्या जुन्या संकल्पनेची उत्क्रांती आहे, कारण ती आर्थिक आणि भौतिक प्रगतीचा विचार करते, परंतु नैसर्गिक संसाधनांच्या जबाबदार वापराद्वारे सामाजिक कल्याणाशी संतुलन साधते. पर्यावरणीय समतोल जीवनाचा स्रोत म्हणून न विचारता, आर्थिक विकासाची पारंपारिक संकल्पना केवळ वस्तू आणि संपत्तीचे उत्पादन आणि वितरण याचा संदर्भ देते .टिकाऊ विकासाची संकल्पना या विकासाच्या मॉडेलने पर्यावरणाची जोखीम पत्करली आहे आणि त्यासह, जीवनशैलीची गुणवत्ता आणि मानवी अस्तित्व यावरती आधारित आहे. शाश्वत विकासाचे उद्दीष्ट म्हणजे पर्यावरण, नैसर्गिक संसाधने आणि मनुष्याच्या जीवनाची गुणवत्ता यावर कोणतीही तडजोड न करता भौतिक प्रगतीची एक विशिष्ट पातळी साध्य करणे हे होय. अशाप्रकारे, व्यवहार्यता, टिकाव आणि समतेवर आधारित सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय क्षेत्राकडे लक्ष देता येईल. शाश्वत विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी मुख्यत्वे प्रदूषण कमी करणे, उर्जास्त्रोतांची बचत करणे, नूतनीकरण क्षम उर्जा वापरणे इत्यादी मुद्द्यांबाबत नागरिकांची आणि कंपन्यांच्या जागरूकता आणि सहभागास प्रोत्साहन देणारी सार्वजनिक धोरणे तयार करण्याच्या सरकारांच्या इच्छेवर अवलंबून आहे .त्यानुसार सहकार आणि सहकाराशी निगडीत जो ग्रामीण समाज आहे त्यांना एक संघ कसे करता येईल याकडे लक्ष देता येईल. शाश्वत विकासाची तत्वे जर सहकाराशी जोडली तर सहकाराचा अधिक विकास साध्य होईल. सहकार : मानव जातीतील समूह जीवन जगण्याची उपजत असणारी सहजप्रवृत्ती तसेच पारस्परिक सहकार्य करण्याची पद्धत . तांत्रिकदृष्ट्या सहकार म्हणजे विशेष पद्धतीने व्यवसायकरण्याचा प्रकार .सहकार हा को-ऑपरेशन या इंग्रजी शब्दाचा मराठी पारिभाषिक शब्द असून तो को-ऑपरेरी या लॅटिन शब्दापासून बनलेला आहे . Co याचा' अर्थ' सह आणि Opereri याचा अर्थ' काम करणे .सहकारी चळवळीतील उपक्रम सहकारी पद्धतीने, स्वेच्छेने व लोकशाही पद्धतीने चालविले जाता एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते आजपर्यंत जगातील विविध देशांनी असंख्य सहकारी कायदे संमत केलेले आहेत .भारतात १९०४ मध्ये पहिला सहकारी पतपुरवठा संस्था

कायदा संमत केला गेला .या कायद्यामुळे भारतात सहकारी चळवळीची वाटचाल सुरू झाली .गरीब शेतकरी, कारागीर, अल्प उत्पन्नधारक आदी घटकांमध्ये बचतीची सवय लावणे, त्यांच्यात सहकार्याची भावना निर्माण करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे इत्यादींसाठी हा कायदा करण्यात आला .शाश्वत विकासाचा सहकारावर काय परिणाम झाला याबाबत आपण माहिती घेणार आहोत .

**उदिष्टे --:**

- शाश्वत विकास आणि सहकार क्षेत्र यावर काय परिणाम झाला त्याचा अभ्यास करणे.
- शाश्वत विकास आणि सहकार यांचा परस्परसंबंध अभ्यासणे.
- शाश्वत विकास आणि सहकार हे एकमेकांना कसे पूरक आहेत हे अभ्यासणे.
- शाश्वत विकासाची काय भूमिका आहे याचा मागोवा घेणे.
- शाश्वत विकासाची तत्वे जर साध्य झाली तर त्यातूने ग्रामीण समाजावर काय परिणाम होतील याचा मागोवा घेणे.

**संशोधनपद्धती- -:**

संशोधनासाठी दुय्यम पद्धती चा उपयोग केला आहे. विषयानुसार दुय्यम पद्धती चा जास्त प्रमाणत उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, विविध लेख, मासिके, वर्तमान पत्रे, शासकीय अहवाल यांचा समावेश करण्यात आला आहे.

**समस्या :-**

- शाश्वत विकास आणि सहकार यांच्या समस्या विचार करणे.
- शाश्वत विकासातील अडथळे शोधणे.
- सहकाराबाबाबत सरकारचे उदासीन धोरण.

**<u>शाश्वत विकासाचा सहकार क्षेत्र यावर काय परिणाम झाला :---</u>**

या संदर्भात खालील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल .सहकारी लोकशाही ज्ञान आणि पद्धती सामाजिक समावेशकता वाढवतात, ज्यामुळे ते शाश्वत विकासाच्या कर्तृत्वाला आधार देतात .आर्थिक संकटाचा सामना करताना सहकारी संस्थांनीही लवचिकता दर्शविली आहे .शिक्षण, प्रशिक्षण आणि त्यामुळे सहकारी, शाश्वत विकासाच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय उद्दिष्टांच्या तिहेरी तळाशी तसेच प्रशासनाच्या अजेंडामध्ये योगदान देण्यासाठी चांगले आहेत, कारण ते असे उपक्रम आहेत जे सदस्यांची आर्थिक प्रगती पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात .सामाजिक -सांस्कृतिक हित संबंध आणि पर्यावरणाचे रक्षण .ते एंटर प्राइझसाठी पर्यायी मॉडेल देतात, ज्यात रोजगार निर्मितीच्या पलीकडे शाश्वत विकासासाठी योगदान देतात .सध्या देशांमध्ये जी डी पी आणि एकूण उपक्रमांमध्ये सहकारी संस्थांचा वाटा तुलनेने कमी असल्याने, शाश्वत विकासध्येय) SDGs (साध्य

करण्यासाठी सहकारी संस्थांचा प्रचार आणि विस्तार हे एकमहत्त्वाचे साधन असू शकते. सहकारी अर्थव्यवस्था हि उत्पादक आणि वितरक यांची सहकारी तत्वावरील केलेली अर्थ रचना आहे ती जशी लोकांच्या जीवन घटकाशी संबधित आहे तशी उत्पादनात सहभागी होणार्या उत्पादक घटकाशी बांधील आहे मात्र नफा आणि स्पर्धा या तिच्या प्रेरणा नसून सेवा आणि सहकार या तिच्या मुलभूत प्रेरणा आहेत.

**तक्ताक्र -: १ ) आकडेवारी ( 19-2018**

| अनु | देश | सहकारी पतपेढी ( संख्या ) | राष्ट्रीय उत्पनात शेकडा वाटा | रोजगार निर्मिती ( लाखात ) | एकून निर्यातीतील वाटा ( शेकडा वाट ) | सभासद संख्या ( लाखात ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भारत | ५,९८,००० | ३४.०० % | १.९२ | १७.०० % | २६० |
| २ | जपान | ६८,००० | १८.०० % | १.२० | १६.०० % | ९८ |
| ३ | अमेरिका | ९०,२०० | ०७.५० % | ०.९१ | ०९.०० % | ३३.८ |
| ४ | आर्जेन्टीना | १२,६७० | १८.२० % | १.१० | १७.०० % | ९.३० |
| ५ | बेल्जिअम | ८९,९३० | २१.१० % | १.२० | १६.३० % | २०. |

वरील देशाच्या आकडेवारीचा विचार करता आपल्या असे लक्षात येईल कि भारतात शाश्वत विकास आणि सहकार यांच्या माध्यमाद्वारे राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा हा **३४.००** % आहे त्यातून रोजगार निर्मिती **१.९२** लाख रोजगार निर्मिती झाली .

## सहकारी आणि प्रस्तावित शाश्वत विकास लक्ष्य - :

शाश्वत विकास ध्येय साध्य करण्यासाठी सहकार अत्यंत प्रासंगिक आणि महत्त्वपूर्ण आहेत. 2013 च्या त्यांच्या अहवालात 2015 नंतरच्या विकास अजेंडामध्ये प्रख्यात व्यक्तींच्या उच्चस्तरीय पॅनेलने प्रस्तावित केलेल्या बारा SDGs मध्ये सहकारांचे प्रत्यक्ष योगदान हायलाइट करते .विशिष्ट उद्दिष्टे आणि निर्देशक यावर सहमत होणार नसले तरी चालू प्रक्रियेचा एक भाग म्हणून सप्टेंबर 2015 पर्यंत, ही बारा प्रस्तावित उद्दिष्टे प्रतिबिंबित करतात जी SDGs द्वारे समाविष्ट केली आहे.

1. गरिबी कमी करणे. 2. मुली आणि महिलांना सशक्त करणे .आणि लिंगसमानता साध्य करणे
3. दर्जेदार शिक्षण आणि आजीवन शिक्षण प्रदान करणे . 4. निरोगी जीवन सुनिश्चित करणे
5. अन्नसुरक्षा आणि चांगले पोषण सुनिश्चित करणे 6. पाणी आणि स्वच्छतेसाठी सार्वत्रिक प्रवेश मिळवने .
7. सुरक्षित शाश्वत ऊर्जा 8. रोजगार, शाश्वत उपजीविका आणि न्याय्य वाढ निर्माण करणे
9. नैसर्गिक संसाधन मालमत्ता शाश्वतपणे व्यवस्थापित करणे 10. सुशासन आणि प्रभावी संस्था सुनिश्चित करणे.
11. स्थिर आणि शांततापूर्ण समाज सुनिश्चित करणे. 12. जागतिक सक्षम वातावरण तयार करणे.

## १ ( गरिबीकमीकरणे -:

गरीबांना वैयक्तिक जोखीम सामूहिक जोखमींमध्ये बदलण्याची परवानगी देऊन त्यांना सुरक्षा प्रदान करतात आणि सभासदांच्या मालमत्तेमध्ये मध्यस्थी करतात ज्याचा वापर ते उदरनिर्वाह करण्यासाठी करतात. उदाहरणार्थ, बचत आणि पतसहकारी त्यांच्या सदस्यांच्या आर्थिक भांडवलावर प्रवेश सुलभ करत असताना, कृषी सहकारी शेतकऱ्यांना पिके वाढवण्यासाठी आणि पशुधन ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या निविष्ठांमध्ये प्रवेश करण्यास मदत करतात, आणि त्यांच्या उत्पादनावर प्रक्रिया, वाहतूक आणि बाजारात मदत करतात . त्याचप्रमाणे, ग्राहक सहकारी त्यांच्या सदस्यांना आणि मोठ्या प्रमाणात सोसायटीला चांगल्या दर्जाचे घरगुती पुरवठा जसे अन्न, कपडे आणि इतर उत्पादने परवडणाऱ्या किमतीत देणे शक्य होते अशा सेवा सदस्यांना गरिबीतून बाहेर काढण्यास मदत करतात. वरीलप्रमाणे रोजगार, उपजीविका आणि विविध प्रकारच्या सेवा प्रदान करून सहकारी दारिद्र्य निवारणासाठी देखील योगदान देतात.

**<u>२ ( लिंग समानता</u> :-**

अनेक भागांमध्ये स्थानिक अर्थव्यवस्था आणि सोसायट्यांमध्ये सहभागी होण्याच्या महिलांच्या संधींचा विस्तार करून सहकारी लैंगिक समानतेसाठी योगदान देत आहेत .ग्राहक सहकारी संस्थांमध्ये, बहुतेक सदस्य महिला असतात. कामगार सहकारी संस्थांमध्येही महिलांची जोरदार उपस्थिती दिसून येत आहे. महिला त्यांच्या स्वतःच्या सहकारी संस्था देखील बनवतात. भारतात, महिला सहकारी स्वयंरोजगाराच्या संधी देतात जे महिलांच्या सामाजिक समावेश आणि सक्षमीकरणात योगदान देऊ शकतात .कामगारांचे व्यावसायिक लिंगविभाजन स्वाभाविकपणे या क्षेत्रातील कामगारांना सेवा पुरवणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये प्रतिबिंबित होते .

**<u>३ ( गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्य :--</u>**

सहकारी शिक्षणासाठी वित्तपुरवठा करण्याचे साधन उपलब्ध करून गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आयुष्यभर शिकण्याच्या संधींमध्ये प्रवेश करण्यास समर्थन देतात; सहाय्यक शिक्षक आणि शाळा; तरुण आणि प्रौढ दोघांनाही दर्जेदार शिक्षण देण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या शाळा स्थापन करणे; आणि आजीवन शिक्षणासाठी केंद्र म्हणून काम करून. घरगुती उत्पन्न वाढवून शिक्षणाचा वापर सुलभ करण्यात सहकारी संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, ज्याचा अर्थ शैक्षणिक खर्च पूर्ण करण्याची क्षमता आहे .सहकारी देखील शैक्षणिक वित्तपुरवठ्याचा थेट स्त्रोत असू शकतात :इतर प्रकरणांमध्ये युवकांची आर्थिक कौशल्ये विकसित करणे आणि बचत करण्याच्या सवयींना प्रोत्साहन देणे, सदस्यांच्या मुलांना शाळेत आणि उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे, शैक्षणिक स्पर्धा आयोजित करणे, उपकरणे आणि स्टेशनरीसाठी निधी देणे आणि ग्रंथालये सांभाळणे समाविष्ट आहे. सहकारी त्यांच्या स्वतःच्या शाळा स्थापन करून दर्जेदार शिक्षणाच्या थेट तरतूदीमध्ये अधिकाधिक सामील होत आहेत. आरोग्यसेवा प्रदान करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करून सहकारी निरोगी जीवन सुनिश्चित करतात; एचआयव्ही/एड्सग्रस्तलोकांसाठी आरोग्यसेवा आणि घर आधारित आरोग्यसेवा पुरवणे.

**४ ( पाणी आणि स्वच्छतेसाठी प्रवेश :--**

सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातील अपयशाची भरपाई करण्यासाठी स्वच्छ पाणी आणि स्वच्छता सेवांमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी सहकारी अधिकाधिक प्रमुख घटक बनत आहेत. सहकारी संस्थांनी शहरी समुदायासाठी स्वच्छ पाणी आणि सुरक्षित सीवरेज सेवा मिळवण्याचे पर्यायीमार्ग उपलब्ध करून दिले आहेत . निवारा उपलब्ध करून देणे आणि झोपडपट्ट्या सुधारणेचा भाग म्हणून सहकारी संस्थांनी स्वच्छतेकडे लक्ष दिले आहे .भारतात, नॅशनल को ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन) NCHF) ने शहरी गरीबांना 92,000 हून अधिक गृह निर्माण सहकारी संस्थांमध्ये एकत्र केले आहे.

**4 )टिकाऊ ऊर्जा:--**

ऊर्जा सहकारी ऊर्जा प्रवेश, ऊर्जा कार्यक्षमता आणि उत्सर्जन कमी करण्याच्या शाश्वत ऊर्जा उद्दिष्टांच्या साध्य करण्यासाठी योगदान देत आहेत .शाश्वत ऊर्जेचा वापर सुलभ करण्यासाठी सहकारी दृश्यमान आहेत, जिथे ते वीज निर्मिती आणि ग्राहकांना वितरीत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत .ते नवीन आणि नूतनीकरणाच्या दत्तक मार्गाकडे देखील जात आहेत .जगाच्या अनेक भागांमध्ये सौर आणि पवन ऊर्जा सारख्या ऊर्जा .ग्रामीण विद्युतीकरण सहकारी संस्था सर्वात प्रसिद्धआहेत..

**( 5रोजगार निर्मिती -:**

रोजगार निर्मिती आणि उत्पन्नात सहकारी संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात .ते थेट लोकांना रोजगार देतात, स्वयंरोजगारास प्रोत्साहन देतात .कर्मचाऱ्यांच्या मालकीच्या उद्योगांमध्ये रोजगारावर चक्रीय मंदीमुळे नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता कमी आहे आणि अलिकडच्या आर्थिक मंदीमुळेया उपक्रमांमध्ये रोजगाराचे सातत्य जास्त आहे .त्यांच्या व्यवसायात गुंतवणूक करताना दीर्घ कालीन क्षितिजे स्वीकारणे, मानवी भांडवलामध्ये अधिक गुंतवणूक करणे आणि सेंद्रीय वाढीवर अधिक लक्ष केंद्रित करणे.

**( 6 शाश्वत निसर्ग संसाधनांचे व्यवस्थापन :--**

नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होणार नाही याची खात्री करतात, जिथे सहकारी संस्थांनी स्थानिक लोकांना त्यांच्या मालमत्ता आणि वापरकर्त्यांचे अधिकार, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन करून पर्यावरण बदलाचे उपाय शोधण्यासाठी एक मंच उपलब्ध करून दिला आहे आणि त्यांच्या आर्थिक क्रियाकलापांमध्ये वैविध्य आणून हरित आर्थिक उपक्रम स्वीकारणे .अनेक सहकारी उपभोगघेण्याच्या अधिक जबाबदार पद्धती आणि सामाजिक आणि आर्थिक उत्तरदायित्वाच्या मूल्यांना व्यवसाय करण्याच्या सहकारी मॉडेलमध्ये प्रमाणित पद्धती म्हणून प्रोत्साहित करतात टिकाऊ कृषी सहकारी त्यांच्या क्रियाकलापांमध्ये विविधता आणतातज्या तपाणी व्यवस्थापन, पर्यटन, दर्जेदार प्रादेशिक खाद्य पदार्थांचे उत्पादन आणि सेंद्रिय शेती समाविष्ट आहे .ते हाय-टेक शेती आणि पर्यावरणीय नियमनच्या संकटाला प्रतिसाद देतात. विकसनशील देशांमध्ये, कचरा

उचलणारे हजारो लोक खराब परिस्थितीत काम करतात आणि पर्यावरण स्वच्छ करण्यात लक्षणीय योगदान देतात.

**( 7प्रभावी प्रशासन --:**

नवीन विकासाचा अजेंडा सोसायट्यांना अधिक न्याय्य जगात जाण्याची संधी प्रदान करतात .जिथे संसाधने अधिक न्याय्यपणे सामायिक केली जातात आणि लोकांचे त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये अधिकमत असते याप्रक्रियेत सहकारी संस्थांची महत्वाची भूमिका असते. प्रथम, सहकारी संस्थांच्या तत्त्वांपैकी एक म्हणजे लोकशाही सदस्य नियंत्रण . सहकारी उपक्रमांचे समान मतदानाचे अधिकार, एक सदस्य, एकमत या आधारावर, स्थानिक विकास उपक्रमांसाठी एक व्यासपीठ तयार करूनते सभ्य कार्य आणि सामाजिक समावेशकतेच्या संधींना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक सामुदायिक संस्थांना एकत्र आणतात.

( 8 स्थिर आणि शांततापूर्ण समाज सुनिश्चित करणे

9 )जागतिक सक्षम वातावरण तयार करणे :--

***निष्कर्ष--:***

वरील सर्व मुद्यांच्या आधारे आपल्याला असे सांगता येईल शाश्वत विकास जर पूर्णपणे साध्य करावयाचे असेल तर सहकाराची जी तत्वे आहे त्यानुसार काम करणे गरजेचे आहे. त्या नुसार शेतकरी, सर्वसामान्य लोक,व्यापारी,मध्यम भांडवलदार या सर्वाना बरोबर घेऊन अधिक विकासाचे ध्येय आपल्याला पूर्ण करता येवू शकते.आर्थिक जागतिकीकरणानंतर जगातील अनेक देशांना जश्या संधी त्याप्रमाणेच मोठ्या प्रमाणात आव्हाने उभी राहिली आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने समजून घेता घेता त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न व्हायला हवा. नवा सहस्रकातील विकास ध्येय यांच्या पूर्ततेसाठी 21व्या शतकात पुन्हा एकदा जागतिकीकरणाच्या परिवेशात सहकाराची नवी मांडणी करावी लागेल जगभर आतंकवाद आणि काळा पैसा यांचे प्रमाण वाढत चालले आहे.सहस्रकातील विकास ध्येय साध्य करण्यासाठी सहकारी व्यवस्था ही समर्थ पर्याय ठरू शकते याचा पाया हा न्याय समता बंधुता या वैश्विक तत्वावर आधारलेला आहे म्हणूनच नव्या सहस्रकातील नवा सहकार जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर यशस्वी करण्यासाठी नवे सहकारी नेतृत्व हवे आहे. आणि त्यातूनच शाश्वत विकास साध्य होवू शकतो.

***संदर्भ :-***

*1) सहकार दैनिक.*

2) प्रा जगन कराडे जागतिकीकरन भारतासमोरील आव्हाने डायमंड प्रकाशन पुणे
3) www.indianeconmy.com
4) कर्ज माफी विशेषांक
5) लोकराज्य मासिक ( जून– २०२१sept- 21 )
6) व्यापारीमित्र मासिक ( मे -२०२१ )
7) अग्रोवन मसिक ( जून -२०२१ )
8) योजना मासिक( जानेफेबमार्चमे -2021 )
9) कृषि धनलेख– प्रा. ( पान– २ )
10) कृषी अर्थशास्त्र प्रकाशन.

# ई-कॉमर्स: फायदे आणि आव्हानांचा अभ्यास

**प्रा. दिवेकर हरी लक्ष्मण**
वाणिज्य विभाग
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सात्रळ

**प्रा. दिघे वैभव किशोर**
वाणिज्य विभाग
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सात्रळ

## प्रस्तावना :-

ई-कॉमर्स ही नवीन संकल्पना असून अलीकडील काळात इंटरनेटच्या जलद विस्तारामुळे त्याचा उपयोग व्यापक प्रमाणात होऊ लागला आहे. इंटरनेटमुळे व्यवहार करण्याच्या पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालाआहे. ई-कॉमर्स ही संकल्पना इंटरनेटद्वारे खरेदी व विक्री पेक्षा अधिक व्यापक आहे. संगणकीय जाळे आणि भ्रमण संदेशवहनाद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने व्यवहार करणे याचा समावेश ई-कॉमर्स मध्ये होतो. थोडक्यात व्यावसायिकउद्दिष्टपूर्तीसाठी व्यापाऱ्यांनी संदेशवहनव माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे म्हणजे ई-कॉमर्स होय. जागतिकीकरणामुळे ई कॉमर्स चे महत्त्व खूपच वाढले आहे. ई-कॉमर्स ही जागतिकीकरण या संकल्पनेची देण आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ऑनलाईन व्यवहारामुळे जागतिक बाजारपेठ फक्त कॉम्पुटर किंवा लॅपटॉपच्या की-बोर्ड वरील क्लिक बटणाचा उपयोग करुन प्राप्त करणे शक्य झाले आहे. शिवाय आपण आठवड्याचे ७दिवसह २४तास ई-कॉमर्सद्वारेऑनलाइन पद्धतीने व्यवहार करू शकतो.

### संशोधनाची उद्दिष्टे:-

१. ई-कॉमर्स ची पूर्ण ओळख करून घेणे.
२. ई-कॉमर्स चे फायदे ओळखणे.
३. ई-कॉमर्स मधील आव्हाने जाणून घेणे.

### संशोधनाच्या मर्यादा:-

वरील संशोधनात केवळ ई-कॉमर्स या संकल्पनेचा अभ्यास केलेला असून कॉमर्स नवीन संकल्पनेचा अभ्यास केलेला नाही. त्याचबरोबर ई-कॉमर्स मुळे होणारे फायदे आणि निर्माण झालेल्या आव्हानांचा अभ्यास केलेला आहे.

### संशोधन पद्धती:-

उपरोक्त संशोधनासाठी संशोधकाने दुय्यम माहितीचा अवलंब केला आहे. सदर संशोधनासाठी वृत्तपत्रे, मासिके, शोध प्रबंध, जर्नल्स आणि संकेत स्थळे याचा वापर केलेला आहे.

### माहितीचे विश्लेषण:-

ई-कॉमर्स ही एक नवीन प्रणाली आहे. कोणीही अधिक माहिती मिळवण्यासाठी वेबसाईटचा उपयोग करून प्रत्यक्ष व जलद गतीने माहिती मिळू शकतो. व्यवसाय आणि ग्राहक यांच्या दृष्टीने ई-कॉमर्स हे अतिशय महत्वाची भूमिका बजावताना दिसून येते. खरेदी-विक्रीच्या व्यवहारात अधिक सुसंगतपणा आणि सुरक्षितता ई-कॉमर्स ने उपलब्ध करून दिलेली आहे.

## ई-कॉमर्स चे फायदे पुढीलप्रमाणे:-

वस्तू आणि सेवा च्या खरेदी विक्रीशी ई-कॉमर्स निगडित असल्याने ते बाजारपेठ विस्तारित करते. तसेच अधिकाधिक ग्राहक ई-कॉमर्स मुळे एकत्रित येऊन त्यांना ऑनलाइन खरेदी करणे सहज शक्य झाले आहे.

**ई-कॉमर्सचे फायदे**

**१. जलद खरेदी प्रक्रिया :-**

ई-कॉमर्स मुळे ग्राहक त्यांना हव्या असलेल्या वस्तूच्या खरेदीसाठी कमी वेळ देऊन ते एका वेळी अनेक वस्तु सहजपणे शोधूनते खरेदी करू शकतात. ऑनलाइन पद्धतीमुळे ग्राहक त्यांच्यापासून दूर असलेल्या भौतिक दुकानामध्ये उपलब्ध असलेल्या किंवा त्यांच्या परिसरात न मिळणाऱ्या वस्तू शोधून खरेदी करू शकतात. म्हणून ई-कॉमर्स मुळे खरेदी ची प्रक्रिया जलद झालेली दिसून येते.

**२. खर्च कमी करणे**

ई-कॉमर्सचा व्यावसायासाठी सर्वात मोठा फायदा म्हणजे जो विक्रेत्यांना ऑनलाइन विक्रीमध्ये आवड निर्माण करून विक्रीखर्च कमी करण्यास मदत करतो. अनेक विक्रेत्यांना त्यांचे भौतिक दुकान सांभाळण्यासाठी बरेच पैसे मोजावे लागतात. तसेच त्यांना भाडे, दुरुस्ती, स्टोअर डिझाईन, इन्व्हेंटरी इत्यादी साठी मोठ्या प्रमाणामध्ये अतिरिक्त खर्च करून देखील दुकानदारांना अपेक्षित नफा मिळत नाही. म्हणून ई-कॉमर्समुळे हा खर्च कमी होण्यास मदत होते.

**३. भौगोलिक मर्यादा नाहीत:-**

ई-कॉमर्स मध्ये मालाची खरेदी विक्री ही ऑनलाइन होत असल्याने अत्यंत दूरवरच्या ग्राहकांना सुद्धा माल सहज रीतीने विकत येऊ शकतो. नेटवर्क वैश्विक आहे म्हणून आपण आपला व्यवसाय कोठेही वाढवू शकतो. आपण आपल्या उत्पादनांची मोठ्या श्रेणी दर्शवून विक्री करू शकतो.

**४. ऑनलाइन खरेदीचा वाढताकल :-**

इंटरनेटचा प्रचार आणि प्रसार झपाटयाने झाला आहे. प्रमुख शहरांपुरताच मर्यादित न राहता इंटरनेटचे जाळे खेडोपाडी विणले जात आहे. ज्यामुळे वेबसाइटवरून होणा-या आर्थिक व्यवहारांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. ई-कॉमर्स मुळे बाजारपेठ वेगाने वाढत असून यात विकासाच्या मोठ्या क्षमता निर्माण झाल्या आहे.ज्यातून अर्थचक्रालाही गती मिळत आहे.ई-कॉमर्स देशांतर्गत व्यापाराला चालना देते आणि दुर्गम ठिकाणचे विक्रेते आणि ग्राहकांना यांना एकत्र आणते.ई-कॉमर्स चे भारतात केरळ, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशामध्ये सर्वाधिक वापरकर्ते किंवा ग्राहक आहेत. तसेच महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यांतर्गत यातून मोठ्या प्रमाणात व्यापार होतो.

**५. समान संधी :-**

ई-कॉमर्स मुळेलघु आणि मोठ्या उद्योजकांना समान संधी उपलब्ध होत आहे. इंटरनेटप्रेरित व्यापारामध्ये प्रवेशाच्या वेळेत कमी अडथळे असतात, त्यामुळे नव्या उद्योजकांना व्यापारात प्रवेश करणं सोपेहोते. त्यामुळे ई-कॉमर्ससारख्या बाजारपेठेवर सकारात्मक परिणाम झाला आहे.

**६. बाजारपेठेतील स्पर्धेला एक सकारात्मक वळण :-**

ई-कॉमर्समुळे बाजारपेठेतील स्पर्धेलाएक सकारात्मक वळण लागले असून वस्तूच्या किंमतीकमी झाल्या आहेत. कारण या व्यापारात प्रवेश करताना खूप कमी आव्हानांना सामोरं जावे लागते. या बाजारपेठांमध्ये सर्वाधिक फायदा दुर्गम ठिकाणच्या खरेदीदार आणि विक्रेत्यांना होत आहे. तसेच ग्राहकांना अनेक पर्याय उपलब्ध झाल्याने त्यांनाही सवलतीत उत्पादने खरेदी करण्याची संधी निर्माण झाली आहे. तीव्र स्पर्धेमुळे किंमती कमी असतात जे ग्राहकांच्या हिताचे आहे. त्यामुळे ग्राहक विविध विक्रेत्यांच्या किमतींची तुलना करू शकतात. ई-कॉमर्समुळे ग्राहकांची पायपीट वाचते आणि ज्या वस्तू विकल्या जात नाहीत त्याही विक्रीयोग्य बनतात.

**७. जाहिरातखर्च कमी:-**

ई-कॉमर्समुळे विक्रेत्यांना त्यांच्या वस्तूंचीजाहिरातकरण्यासाठी भरपूर पैसा खर्च करावा लागत नाही. ई - कॉमर्स हे जगातीलजलद आणि परवडणारेऑनलाईन मार्केट आहे. ई-कॉमर्स हे एक व्हिज्युअल चॅनेल आहे. त्यामुळे याद्वारे विक्रेते त्यांचे उत्पादन ऑनलाइन दर्शवतात. उदाहरणार्थ, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, स्नॅपडील इ. विक्रेते जाहिरातीचे साधने वापरून व्हिडिओ, इन्फोग्राफिक्स आणि चांगल्या दर्जाच्या रिझोल्यूशन प्रतिमा जोडतात आणि त्यामुळे ग्राहक वर्ग मोठ्या प्रमाणात ऑनलाइन मार्केट कडे आकर्षित होतो. म्हणून ई-कॉमर्समुळे विक्रेत्यांचा जाहिरात खर्च कमी होतो.

**८. ग्राहकांसाठी लवचिकता**

व्यवसायासाठी ई-कॉमर्सचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे विक्रेते ग्राहकांना लवचिकता प्रदान करू शकतात. यामधील एक वैशिष्ट्य म्हणजे उत्पादन आणि सेवा ह्या आठवड्यातील ७ ही दिवस २४ तास ग्राहकांसाठी खुल्या असतात.याचा परिणाम असा की विक्रेता आपली वस्तू कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी ग्राहकांना विकू शकतो.ग्राहक नेहमी ई-कॉमर्स या माध्यमाद्वारे उत्पादन संस्थांशी जोडलेले असतात आणि त्यांना मिळणाऱ्या सोयींमुळे ते पुन्हा ऑनलाइन खरेदीसाठी प्रेरीत होतात. या सुविधांमध्ये विनामूल्य शिपिंग, (सामान्यतः किमान कार्ट मूल्यावर), एक्सप्रेस ऑर्डर वितरण, सौदे आणि सूट, हे फायदे समाविष्ट आहेत आणि पुनरावलोकनांमुळे ई-कॉमर्सचे दोन अतिरिक्त फायदे होतात. एक म्हणजे सकारात्मक पुनरावलोकनांच्या संख्येवर आधारित नवीन खरेदीदार तुमच्या स्टोअरमध्ये वस्तूची खरेदी करून विश्वास मिळवतात. दुसरे म्हणजे ते तुम्हाला तुमच्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या वस्तू ओळखण्यात मदत करतात.

**९. उत्पादन आणि किंमतीची तुलना**

ई-कॉमर्समध्येविक्रेते वेगवेगळ्या साधनांचा वापर करून उत्पादनांची तुलना करू शकतात. यामुळे त्यांना उत्पादनाचे उपलब्ध पर्याय, मानक दर, उत्पादनाची गरज याची चांगली कल्पना मिळते. आणि हि प्रक्रीयाऑनलाइन असल्यामुळे याची तुलना करून आपल्या सोयीची व आवडीच्या वस्तूची खरेदी करता येते.

**१०. बाजारातील मागण्यांना जलद प्रतिसाद:-**

जेव्हा आपण ऑनलाइन विक्री सुरू करता तेव्हा प्रत्येक संवाद जलद गतीने होत असतो. ईकॉमर्स हे तुम्हाला सुव्यवस्थित वितरण प्रणाली देते. याचा अर्थ असा आहे की खरेदीदारांची ऑर्डर कार्यक्षमतेने वितरीत केली जाते. प्रॉडक्ट रिटर्न्स मॅनेजमेंट हा आणखी एक प्लस पॉईंट आहे जो पटकन हाताळला जाऊ शकतो - तुम्ही एकतर पेमेंट परत करा किंवा बदली वस्तू द्या.बाजाराच्या मागण्यांना प्रतिसाद देताना वेगवेगळ्या कृतींचा अवलंब केला जातो. उदा. जेव्हा एखादा खरेदीदार पाहतो की एखादी वस्तू स्टॉकमध्ये नाही, तेव्हा तो 'मला सूचित करा' पर्यायावर क्लिक करू शकतो. जेव्हा ती वस्तू पुन्हा विक्रीसाठी उपलब्ध होते तेव्हा हे त्याला सूचित केले जाते. हि सुविधा ई-कॉमर्स मुळे उपलब्ध करून दिली आहे.

**११. विविध पेमेंट पद्धती:-**

खरेदीदारांना पर्सनलायझेशन आवडते. ग्राहकाने वस्तूची खरेदी केल्यानंतर त्या ऑर्डरचे पैसे देण्यासाठी ई-कॉमर्स अनेक पेमेंट पद्धतींचा पर्याय उपलब्ध करून देते ज्यात UPI, डिलिव्हरी ऑन कॅश, डिलिव्हरी कार्ड, नेट बँकिंग, क्रेडिट किंवा डेबिट कार्डवर EMI आणि पे-लेटर क्रेडिट सुविधा यांचा समावेश आहे.

**१२.कमी आर्थिक खर्च:-**

ई-कॉमर्स च्या फायद्यांपैकी एक म्हणजे त्याचा स्टार्टअप खर्च कमी आहे. फिजिकल रिटेल स्टोअर्सना त्यांच्या स्टोअरचे एक ठिकाण भाड्याने देण्यासाठी हजारो रुपयेमोजावे लागतात. तसेच त्यांना स्टोअर चिन्हे, स्टोअर डिझाईन, माल खरेदी, विक्री उपकरणे आणि इतर अग्रिम खर्च आहेत. स्टोअर मालकाला प्रत्येक ठिकाणी काम करण्यासाठी आणि चालवण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावे लागतात.ई-कॉमर्स मुळे या सर्व खर्चा वरती मर्यादा येतात.

**१३.२४/७संभाव्य उत्पन्न:-**

ई-कॉमर्सचा आणखी एक फायदा म्हणजे ऑनलाइन स्टोअर्स हे नेहमी व्यवसायासाठी खुली असतात. वस्तूची खरेदी विक्री आठवड्यातील ७ हि दिवस केली जाते. तसेच दिवसातील २४ तास ती ग्राहकांसाठी खुले ठेवली जाते. त्यामुळे विक्रेत्यांच्या विक्रीत वाढ होऊन आर्थिक उत्पन्नात वाढ होते.

**१४. आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्रीत वाढ:-**

ई–कॉमर्स मुळे नवीन ब्रॅन्ड जगभरातील ग्राहकांना सहज विकलेजातात.यावरून आपल्या उत्पादनाचे ग्राहक कोण कोणत्या देश्यात आहेहे शोधणे शक्य होते.त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्रीत वाढ होते.

**१५.परवडणारे कर्मचारी:-**

ई-कॉमर्सच्या फायद्यांपैकी एक म्हणजे कर्मचार्यांना नियुक्त करणे परवडणारे आहे आणि, आधी नमूद केल्याप्रमाणे, आपण जगात कोठेही काम करू शकतो. आणि ते काम करण्यासाठी आभासी सहाय्यकांची निवड करून आपला कर्मचारी खर्च कमी करू शकतो.

**१६.किंमत आणि उत्पादनाची तुलना:-**

ऑनलाइन शॉपिंगसह, ग्राहक अनेक उत्पादनांची तुलना करू शकतात आणि सर्वात कमी किंमत शोधू शकतात. हे अनेक व्यापाऱ्यांना किंमतीवर स्पर्धा करण्यास आणि त्यांचे नफ्याचे प्रमाण कमी करण्यास भाग पाडते.

**१७. छोट्या व्यवसायासाठी ई-कॉमर्स फायदेशीर:-**




**(स्रोत:www.shiproket.com)**

**ई-कॉमर्स समोरील आव्हाने:-**

**१. साइट क्रॅश दरम्यान कोणीही खरेदी करू शकत नाही :-**

ई-कॉमर्सचे सर्वात मोठे नुकसान म्हणजे जेव्हा आपली साइट क्रॅश झाली. तर कोणीही आपल्या स्टोअरमधून वस्तु खरेदी करू शकत नाही. म्हणूनच आपली वेबसाइट योग्य व्यासपीठावर होस्ट केली आहे हे सुनिश्चित करणे महत्वाचे आहे.

**२.ग्राहक खरेदी करण्यापूर्वी वस्तू हाताळण्याचा प्रयत्न करू शकत नाहीत:-**

ई-कॉमर्समध्ये ग्राहक वस्तू खरेदी करण्यापूर्वी वस्तूला स्पर्श करू शकत नाही. त्यामुळे वस्तूची गुणवत्ता आणि उपयोगिता याची कल्पना करणे त्यांना अवघड जाते.

**३.ई-कॉमर्स ही स्पर्धात्मक बाजारपेठ आहे:-**

विक्रेत्यांना आपली वस्तू विकत असताना इतर उत्पादन संस्थेच्या वस्तूंशी स्पर्धा करावी लागते. आपल्या प्रतीस्पर्धेपेक्षा भिन्न विपणन धोरणाचा अवलंब करावा लागतो.त्याचा परिणाम वस्तूच्या दर्जावर आणि किंमतीवर होऊ शकतो.

**४. प्रतिसादास विलंब:-**

जर एखाद्या ग्राहकाला एखादा वस्तूविषयी प्रश्न असेल तर त्या प्रश्नाचे निराकरण विक्रेत्याकडून लवकर होणे अपेक्षित आहे. परंतु ई-कॉमर्समुळे व्यवसायाचे आकारमान वाढल्याने व्यावसायिकांना ग्राहकांच्या प्रश्नांना प्रतीसाद देण्यास विलंब होतो. त्यामुळे ग्राहक नाराज होऊ शकतात. आणि इतरत्र खरेदी करू शकतात.

**५.शिपिंग टाइम्स लांब असू शकतात:-**

जेव्हा ग्राहक वैयक्तिकरित्या वस्तुची खरेदी करतो, तेव्हा ते उत्पादन लगेच घरी घेऊन जाऊ शकतो. परंतु, ऑनलाइन शॉपिंगमुळे, बहुतेक ग्राहकांना त्याच्या खरेदी केलेल्या वस्तू उशिरा पोहचू शकतात. हा एक ई-कॉमर्स चा महत्वाचा तोटा आहे.

**६.वैयक्तिक वस्तू स्पर्शाचा अभाव:-**

काही ग्राहक भौतिक दुकानात भेट देऊन आणि विक्री सहयोगींशी संवाद साधून त्यांना मिळालेल्या वैयक्तिक वस्तू स्पर्शाला महत्त्व देतात. उच्च दर्जाची उत्पादने विकणाऱ्या व्यवसायांसाठी असा वैयक्तिक वस्तू स्पर्श विशेषतः महत्वाचा आहे. कारण ग्राहकांना केवळ माल खरेदी करायचा नाही तर त्यांना वस्तूची ओळख, दर्जा आणि गुणवत्ता याची माहिती करून घेणे महत्वाचे वाटते.

**७. इंटरनेटची आवश्यकता:-**

हे अगदी स्पष्ट आहे, की तुमच्या ग्राहकांना तुमच्याकडून खरेदी करण्यापूर्वी त्यांना इंटरनेटची आवश्यकता आहे.सर्वच खरेदीदार हे इंटरनेट वापरत असतील असे नाही, त्यामुळे काही संभाव्य ग्राहक यापासून दूर राहू शकतात.

**८. क्रेडिट कार्ड फसवणूक:-**

ई-कॉमर्स च्या वापराबाबत जर ग्राहक अज्ञात असेल तर त्याची ऑनलाइन क्रेडिट कार्ड फसवणूक होण्याची जास्त शक्यता नाकारता येत नाही. ही एक वास्तविक आणि वाढती समस्या आहे.

**९. आयटी सुरक्षा समस्या:-**

मोठ्या व्यवसाय आणि संस्था ह्या हॅकर्सला बळी पडल्या आहेत.हॅकर्सनी व्यवसायसंस्थाच्या डेटाबेसमधून ग्राहकांची माहिती चोरली आहे. याचा परिणाम ग्राहकांचा कंपनीवरील विश्वास कमी होऊ शकतो.

**१०. किचकट कर आकारणी, नियमावली आणि अनुपालन:-**

जर एखादा ऑनलाइन व्यवसाय वेगवेगळ्या प्रदेशातील ग्राहकांना आपली वस्तूचीविक्री करतअसेल, तर त्यांना त्या ठिकाणच्या लेखा, अनुपालन आणि कर आकारणीया नियमांचे पालन करावे लागेल.यामुळे त्या व्यवसाय संस्थेच्या लेखापालनामध्ये आणि करआकारणीमध्ये गुंतागुंत निर्माण होऊ शकते.

**निष्कर्ष:-**

ई-कॉमर्सचे फायदे अनेक पटीने आहेत. यामुळे वेळेची बचत होते आणि आपण फक्त आपले उत्पादन किंवा सेवा जगभरातील मोठ्या प्रेक्षकांना विकू शकतात. इतर व्यवसायांच्या तुलनेत ते स्वस्त आहे. विक्री खर्च कमी करून आणि चांगल्या वितरण साखळी मुळे विक्री वाढवून आपण आपल्या व्यवसायाचा विकास करू शकतो. तसेच ग्राहकांना त्यांच्या आवडीनिवडी नुसार वस्तुची खरेदी करता येते. अलीकडीलकाळामध्ये ग्राहकवर्गाचाकल हामोठ्याप्रमाणामध्ये ऑनलाइन मार्केट कडे असल्याचा दिसून येतो.

**संदर्भसूची:-**

१.व्यवसाय नियामक कायदे. तृतीय वर्ष वाणिज्य,( success publication) – Dr. SudhakarJadhawar

२.Brahm C. (2009)"E- Business and commerce strategy technologies and application"

३.www.shiproket.com

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# औद्योगिकीकरण

**प्रा. डॉ. के. जी. राजपूत**
स्वा. से. क.रा. इन्नाणी
महाविद्यालय, कारंजा जि. वाशिम.

**प्रस्तावना :—**

जलद आर्थिक विकासाची इच्छा असणारा कोणताही देश औद्योगीकीकरणाकडे दुर्लक्ष करण्याचे धाडस करु शकत नाही. शेती, व्यापार, वाहतूक आणि इतर आर्थिक क्रियांचे क्षेत्राच्या विकासामध्ये औद्योगिकीकरण भरीव मदत करु शकतो. औद्योगिकीकरण आर्थिक विकासाची किल्ली आहे. जगातील सर्व प्रगत देश उद्योग प्रधान देश आहेत. औद्योगिकीकरणामुळे देशातील मानवी व भौतिक संसाधनांचा सर्वोत्कृष्ट उपयोग करुन घेता येतो. सर्वप्रकारच्या जनतेसाठी विभिन्न प्रकारच्या वस्तुंचे उत्पादन लघु, मध्यम, कुटीर व मोठया उद्योगांमध्ये करता येते. स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणाला सुनियोजीत चालना देण्यात आली. आणि प्रत्येक पंचवार्षिक योजनेत व औद्योगिक धोरणामध्ये उद्योगांच्या स्थापनेसाठी सरकारने प्रोत्साहन व भरीव आर्थिक मदत दिली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये सर्वप्रकारच्या उद्योगांची स्थापना झाली. औद्योगिक उत्पादनात वाढ होऊन रोजगारांच्या संधीमध्ये सुध्दा भरपुर वाढ झाली. औद्योगिकीकरणाला प्राधान्य दिल्यामुळे लोकसंख्येचा कृषी क्षेत्रावरीलभार प्रचंड प्रमाणात कमी झाला. कारण भारताच्या प्रचंड जनसंख्याचा भार कृषी क्षेत्र सहन करु शकले नसते. त्यामुळे दारिद्रयात प्रचंड वाढ झाली असती. म्हणून औद्योगिकीकरणामुळे आज भारत जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून नावारुपास आला आहे.

## भारतामध्ये औद्योगिकीकरणाची गरज

अर्थव्यवस्थेच्या हित संबंधाच्या दृष्टीकोनातुन विचार करता, रोजगार निर्मिती, रोजगाराच्या संधी, सर्व प्रकारच्या संसाधनाचा पुरेपुर उपयोग करुन घेण्यासाठी, शिक्षण, प्रशिक्षण व संशोधनाला चालना देण्यासाठी, मानवी संसाधनांच्या उत्पादकतेमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि संतूलीत प्रादेशिक विकासासाठी जलद औद्योगिकीकरण अत्यंत गरजेचे आहे.

**१) बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्यासाठी:**

भारतामध्ये बेरोजगारांची समस्या अत्यंत गंभीर आहे. लोकसंख्येच्या शिघ्र वाढीमुळे दरवर्षी लाखो लोक श्रम बाजारात दाखल होतात. दुसऱ्या बाजुला कृषी क्षेत्रात वैकल्पीक रोजगार संधीचा अभाव आहे.

कृषी क्षेत्रातील अतिरीक्त मजुर व बेरोजगार मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शीघ्र औद्योगिकीकरण गरजेचे आहे.

**२) देशात उपलब्ध संसाधनाचा पूरेसा उपयोग :**

औद्योगिकीकरणाकरिता भारतात पोषक वातावरण उपलब्ध आहे. प्रथमत: विभिन्न प्रकारच्या संसाधनाचा जसे, लोह, मॅंगनिज, बॉक्साईड, कोळसा, अभ्रक, विपूल प्रमाणात साठे आहेत. त्याच प्रमाणे ज्युट, कापूस, तेलबीया, ऊस, तंबाखु या सारखा कच्चामाल प्रचंड प्रमाणात उत्पादितहोत आहे. नैसर्गिक संसाधनाचा पुरेसा वापर करुन घेण्यासाठी एकमेव औद्योगिकीकरणच सक्षम आहे. ऊर्जा स्त्रोताच्या विकासासाठी आधुनिक औद्योगिकीकरणाची गरज आहे. उदा. सोलर उर्जेच्या उत्पादनासाठी प्रोत्साहित करणे. देशात पाणी व कोळसा साठे विपूल प्रमाणात आहेत. त्यामुळे औद्योगिकीकरणाच्या मार्गात कोणत्याही अडचणी नाहीत.

**३) कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण :**

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. आधुनिकीकरणासाठी ट्रॅक्टर, स्वंयचलित अवजारे, मोटरपंप, रासायनिक खते, किटकनाशके आणि इतर यंत्रे आवश्यक आहेत. याचा अर्थ असा की, शेतीचे आधुनिकीकरण उद्योगांच्या मदतीनेच करणे शक्य आहे.

**४) आत्मनिर्भरता :**

औद्योगिकी उत्पादनाकरिता दुसऱ्या देशावर अवलंबून राहणे कोणत्याही देशासाठी इष्ट नाही. विदेशातून औद्योगिक वस्तु खरेदी करण्यासाठी विदेशी मुद्रा आवश्यक असते. उद्योगासाठी लागणारा कच्चामाल कमी किंमतीत विकून जास्त किंमतीच्या वस्तू आयात करणे आर्थिक विकासात अडथळा निर्माण करतात. यामुळे वित्तीय तुट वाढते. त्याचप्रमाणे युध्दजन्य परिस्थितीत किंवा जगातील विविध देशासोबत असणाऱ्या कटू संबंधामुळे कधी कधी वस्तुची आयात करणे अशक्य होत जाते. त्यामुळे देशातील नागरिकांना वस्तु प्राप्त करण्यात अनेक समस्या निर्माण होतात. अशा विविध कारणांमुळे आत्मनिर्भरता हे आपल्या नियोजनाचे महत्वाचे ध्येय असले पाहीजे. आत्मनिर्भरता ही उपभोग्य वस्तुंच्या निर्मितीचे उद्योग, मुलभूत उद्योग, अवजडउद्योगांच्या विकासावर अवलंबून असते.

५) आर्थिक विकासाचा पाया :

औद्योगिकीकरण आर्थिक विकासाची प्रक्रिया वेगाने व कार्यक्षमतेने पुढे नेले. पायाभूत सुविधा जसे उर्जा, वाहतूक, संदेशवाहन, पुरक उद्योग, बॅकींग, औद्योगिकीकरणासाठी गरजेचे आहेत. अशा प्रकारे औद्योगिकीकरण पायाभूत सुविधांचा विकास घडवून आणते. म्हणजेच पायाभूत सुविधांना बळकटी देते. औद्योगिकरणामुळे उद्योग, कृषी व इतर आर्थिक क्रियांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचा विकास होतो. पर्यायाने लोकांच्या उत्पन्नात, रोजगारात व राहणीमानात सुधारणा घडून येते.

## निष्कर्ष

आपल्या समस्येचे निराकरण देशाच्या अर्थव्यवस्थेत शिघ्र औद्योगिकीकरण घडवून आणण्यात आहे. सर्व क्षेत्रामध्ये औद्योगिकीकरण घडवुन आणले पाहीजे. कृषी क्षेत्र अनेक समस्यांनी ग्रासले आहे. कृषी क्षेत्रातील अतिरीक्त मानवी संसाधन सामाऊन घेण्यासाठी ग्रामीण भागात उद्योग स्थापन करणे गरजेचे आहे. निरंतर संशोधन, नवीन शोध, नवीन तंत्रज्ञान विकसीत करणे यामुळे औद्योगिकीकरणाला देशात अमर्याद वाव आहे. कृषी मध्ये सर्व प्रकारच्या संसाधनाचा उपयोग करता येऊ शकत नाही. उद्योगामध्ये टाकाऊ पदार्थांचा उपयोग करता येऊ शकतो. औद्योगिकीकरण क्षेत्रीय असामनता निर्मुलन करण्यासाठी सक्षम आहे. कारण ओसाड जमीन औद्योगिकीकरणाच्या उद्देशासाठी उपयोगात आणता येऊ शकते. (सोलर प्लॅन्ट) सुपीकजमीन व सिंचनाच्या साधनांची गरज औद्योगिकीकरणासाठी नसते. जमीनीचे क्षेत्रफळ मर्यादीत आहे परंतू औद्योगिकीकरणाला अमर्याद वाव आहे. सातत्याने वाढणाऱ्या स्फोटक लोकसंख्येचा अर्थव्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी औद्योगिकीकरण अनिवार्य आहे. विविध उद्योगांची स्थापना करुन रोजगारांच्या अधिक संधी निर्माण होऊ शकतात. उद्योगांमुळे श्रम विभागणी व विशेषीकरणाला वाव मिळतो. परिणामत: मानवी संसाधनाची उत्पादकता वाढीस लागते. औद्योगिक विकास देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शिघ्र वाढ घडवून आणतो. मोठया प्रमाणात भांडवल व तंत्रज्ञानाचाउ पयोग करु शकतो. जनतेच्या राहणीमानात सुधारणा घडून येते.

1) Chandraiah, M. and R. Vani (2014) “ The prospects and problems of MSMEs sector in India. An Analytical study,” International Journal of Business & Management Invention 3(8) : 2740.

2) Kamal, N. (2017) “Make in India”, A roadmap for Sustainable Growth” International Journal of Business & Management Invention 7(1) : 8397.

3) GOI (2018) “MSME Annual Report, 2017-18, Ministry of Micro Small, Medium Enterprises, Government of India.

4) Krishna C.V. (2007) Rapid economics Growth and industrialization in India.

5) Neoal W. C. (1956) Social effects of Industrialization The economic weekly, Retrieved Sept. 2, 2014.

6) Rosen G (1957) long term problems of industrialization in India. The economic weekly Retrieved Sept. 1, 2014.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती व समस्या

# (TRENDS URBANIZATION & PROBLEM IN INDIA)

प्रो. मनोहर रामचंद्र चौधरी
आनंद निकेतन कॉलेज, आनंदवन, वरोरा.

**प्रस्तावना :**

जगातील सर्व देश हे सद्या:च्या स्थितीत नागरीकरणाच्या समस्यानी ग्रासलेले आहे. ही एक समस्या पुढे अनेक समस्याना जन्म देते. अशाप्रकारे नागरीकरणाबाबत समस्याची एक माळच तयार होत असते. आजच्या आधुनिक काळात नागरीकरण हे संपूर्ण जगापूढे एक आव्हान बनलेली प्रमुख समस्या म्हणून उभी आहे.

नागरीकरण ही आधुनिक काळातील एक अभुतपूर्व आश्चर्य आहे. प्राचीन काळापासून लोकांना शहराचे आकर्षण राहीलेले आहे. शहरातील वैभव व ऐश्वर्य तसेच तेथील सुखी जीवन यामुळे सामान्य माणसाला शहराचे आकर्षण वाटू लागले आहे. तसेच ग्रामीण जीवनातील अपूर्णता आणि शेतीत करावे लागणारे काबाड कष्ट यामुळे ग्रामीण भागातील सामान्य माणूस हा गाव सोडून शहराकडे जाण्याचा विचार करीत आहे. ग्रामीण भागातील लोकांची शहराकडे जाण्याची आधुनिक काळात कारणे ही वेगळी आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकांचे होणारे स्थलांतर म्हणजे नागरीकरण होय असे ढोबळ मानाने सांगता येईल. नागरीकरणाचा एक अर्थ असाही केला जातो की, ग्रामीण भागातील शेती व्यवसायातील लोकांनी इतर व्यवसाय स्वीकारण्यासाठी ाहराकडे जाणे म्हणजे शहरीकरण होय.

विसाव्या शतकाच्या उतरार्धात विकसीत आणि विकसनशील देशामधील शहराची संख्या वाढत जावून नागरी लोकसंख्या वाढली आहे. आधुनिकीकरण, औद्योगीकरण व शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधा अशा काही कारणामुळे शहरीकरण वाढले आहे. त्याचबरोबर शहरातील वाढत्या वस्त्यामुळे शहरीकरणाच्या अनेक समस्या सुध्दा निर्माण झाल्या.

शहरीकरण ही एक सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. सामाजिक जीवनाकरीता ग्रामीण व शहरे हया यांना सारखेच महत्व आहे. नागरीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण भागाचेच योगदान अधिक महत्वपूर्ण मानले जाते.

**शहरीकरणाचा अर्थ :**

भारतात ग्रामीण भागात राहणारे काही लोक प्रत्येक वर्षी गाव सोडून हे शहराकडे जात असतात. कारण शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेत रोजगाराच्या संधी ही अधिक असते. ग्रामीण भागातील लोक शहराकडे स्थलांतरीत झाल्यामुळे ग्रामीण भागातील स्थलांतरीत लोकांचे राहणीमान व आचार विचार हे शहरी लोकासारखेच होते. हया होणाऱ्या बदलांना शहरीकरण असे म्हटले जाते.

**शहरीकरणाचा आशय आणि विविध पैलू:**

शहरीकरणाला अनेक अर्थाने संबोधले जात असते.

१) ग्रामीण समाजाचे शहरी वातावरणात परीवर्तन होणे किंवा ग्रामीण जनतेव्दारे शहरी जीवनाचा स्विकार करणे म्हणजे शहरीकरण किंवा

नागरीकरण होय. समाजशास्त्राच्या दृष्टीकोनातून ही व्याख्या सांगीतली आहे.

२) लोक संस्कृतीचे शहरी संस्कृतीमध्ये परिवर्तन होणे म्हणजे शहरीकरण होय. मानवशास्त्राचा दृष्टाकोनातून.

३) ग्रामीण प्राकृतीक वातावरणाचे शहरी वातावरणात परीवर्तन होऊन होणाऱ्या शहराच्या उत्पतीला शहरीकरण असे म्हणतात. भौगोलिक दृष्टीकोनातून.

४) लोकसंख्या वाढीमुळे जेव्हा शहरी लोकसंख्येत विस्फोट होतो त्याला शहरीकरण असे म्हणतात.

लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून ही व्याख्या पि. एम. हॉसरस यांनी सांगीतली आहे.

अनेक तंज्ञानी नागरीकरणाच्या काही व्याख्या सांगीतल्या आहे.

१) कोणत्याही देशात नागरी विभागात राहणारी लोकसंख्या व जनसंख्येचे अनागारीय वाढते प्रमाण म्हणजे नागरीकरण होय. हिलडा गोल्डन.

२) ग्रामीण भागातील लोकांचे शहरी लोकात रूपांतर होण्याच्या प्रक्रियेला नागरीकरण असे म्हणतात. ई. ई. बर्गेल.

३) ज्या ठिकाणी उद्योगशीलता अशिक प्रमाणात आढळते व जीवन पध्दती ही नवीन तयार होते त्याला नागरीकरण असे म्हणतात. नेल्स अंडरसन.

शहरीकरणाच्या संकल्पनेत खालील गोष्टीचा समावेश असणे आवश्यक आहे.

१) शहरीकरणाच्या ठिकाणी नगरपालीका किंवा नगर निगम असले पाहीजे.

२) त्या शहराची लोकसंख्या ही कमीत कमी ५००० असली पाहीजे.

३) त्या शहरातील ७५टक्के लोकसंख्या ही कमीत कमी गैरकृषी कार्यात असली पाहीजे.

४) त्या शहराची लोकसंख्येची घनता ही कमीत कमी ४०० असली पाहीजे.

भारतामध्ये सर्वच शहरांना त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर सहा भागात विभाजीत केले आहे.:

| अनुक्रमांक | श्रेणी | लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | पहली श्रेणी | एक लाखापेक्षा जास्त |
| २ | दुसरी श्रेणी | ५० हजार ते ९९९९९ |
| ३ | तिसरी श्रेणी | २०००० ते ४९९९९ |
| ४ | चौथी श्रेणी | १००००० ते १९९९९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | पाचवी श्रेणी | ५००० ते ९९९९ |
| ६ | सहावी श्रेणी | ५००० पेक्षा कमी |

भारतामध्ये सर्वाधिक शहरीकरण झालेल्या राज्यामध्ये प्रथम गोवा ४९.८ टक्के, मिझोरम हे दुसऱ्या स्थानावर असून त्याचे प्रमाण हे ४९.५टक्के आहे तर तामीळनाडू हे तिसऱ्या स्थानावर आहे व त्याचे प्रमाण हे ४४ टक्के आहे आणि चवथ्या स्थानावर महाराष्ट्र असून त्याचे शहरीकरणाचे प्रमाण हे ४२.४ टक्के आहे.

भारतातील प्रमुख राज्यातील लोकसंख्येची स्थिती : (२०११ च्या जनगणनेनूसार)

२०११ च्या जनगणनेनूसार दिल्ली हे भारतातील सर्वाधीक शहरीकरण झालेले राज्य आहे. येथील जनसंख्येचे प्रतिशत प्रमाण हे ९७.५ टक्के इतके आहे. त्यानंतर तामीलनाडू या राज्याचे लोकसंख्येचे प्रमाण हे ४८.४५ टक्के आहे. त्यानंतर केरळचे ४७.७२ टक्के, महाराष्ट्र ४५.७२ टक्के आणि गुजरातचे लोकसंख्येचे प्रमाण हे ४२.५८ टक्के इतके आहे.

| राज्य | शहरी लोकसंख्येचे प्रमाण टक्के | एकूण लोकसंख्या (मिलीयन) |
|---|---|---|
| दिल्ली | ९७.५० टक्के | १६.७५ |
| तामिळनाडू | ४८.४५ टक्के | ७२.१४ |
| केरळ | ४७.७२ टक्के | ३३.३९ |
| महाराष्ट्र | ४५.२३ टक्के | ११२.३६ |
| गुजरात | ४२.५८ टक्के | ६०.३८ |

**भारतातील नागरीकरणाची प्रवुत्ती :**

नागरीकरनाची भारतामध्ये दीर्घ परंपरा असून इ. स. पू. २५०० पासून सिंधू संस्कृतीमध्येच नगराचा विकास झाला होता. कोणत्याही देशाचा आर्थिक विकासाचा वेग, औद्योगीकरणाचा वेग आणि नागरीकरण यांच्यामध्ये जवळचा संबंध दिसून येतो. ज्या प्रमाणात औद्योगीकरणाचा वेग वाढतो, त्याच प्रमाणात नागरीकरणाचा वेग वाढत असल्याचे दिसून येते. भारतामध्ये १९५१ पासून योजनेची सुरूवात झाली. १९५६ पासून देशाच्या औद्योगीकरणाचा वेग वाढला आहे. तेव्हापासून तर आजपर्यंत नागरीकरणाचा वेग हा वाढतच आहे.

**भारतातील नागरीकरणाचे टप्पे:**

भारतातील नागरीकरणाचे प्रामुख्याने तीन टप्पे करण्यात आले आहे.

१) मंद नागरीकरणाचा काळ:

भारतामध्ये १९०१ ते १९३१ हा भारतातील मंद नागरीकरणाचा काळ समजला जातो. या काळात दुष्काळ, साथीचे रोग, तसेच उच्च मृत्यू दर यामुळे नगराची दशकीय वृध्दी ही मर्यादीत होती. या काळामध्ये नागरी लोकसंख्येमध्ये फक्त ०.९८ टक्के ची सरासरी वाढ झाली.

२) मध्यम नागरीकरणाचा काळ :

भारतात १९३१ ते १९६१ हा भारतातील मध्यम नागरीकरणाचा काळ समजला जातो कारण या काळात नागरी लोकसंख्येमध्ये १३५.८७ टक्के ऐवढी वाढझाली आहे. या काळामध्ये स्वतंत्र प्राप्तीनंतर मोठया उद्योगाची स्थापना झाल्याने व आर्थिक विकासाला गती प्राप्त झाल्याने नगराची संख्या व नागरी लोकसंख्येत वाढझाली.

३) तीव्र नागरीकरणाचा काळ:

भारतातील १९६१ ते २०११ पर्यंतच्या काळाला तीव्र नागरीकरणाचा काळ समजला जातो. कारण भारतामध्ये १९६१ ते २०११ पर्यंत नागरी लोकसंख्येत तीव्र वृध्दी झालेली दिसून येते. या काळात नागरी लोकसंख्येत ७९ दशलक्षावरून ३७७ दशलक्षापर्यंत वाढझाली.

**शहरीकरणाचे वैशिष्टये:**

भारतामध्ये शहरीकरणाचे खालील वैशि  टये सांगीतले आहे. ते खालीलप्रमाणे आहे.

१) शहराकडे स्थलांतरण :

ग्रामीण भागातील लोक शहराकडे येऊन वास्तव्य करायला लागतात व यातील बरेच लोक हे नंतर शहरात स्थायी किंवा अर्ध स्थायी होऊन वास्तव्य करतात. हा शहरीकरणाच्या प्रक्रियेचा पहिला टप्पा आहे.

२) रोजगारीचा प्रश्न:

ग्रामीण भागातून शहरात येणारे लोक व्यापार किंवा रोजगार करीत असतात. यामुळे ग्रामीण भागातील लोक आपला परंपरागत व्यवसाय सोडून देत असतात. व शहरात नवीन कामधंद्याला सुरूवात करतात हा शहरीकरणाच्या प्रक्रियेचा दुसरा टप्पा होय.

३) सामाजिक गतिशीलता :

शहरी भागात आल्यानंतर ग्रामीण लोकांच्या सामाजिक गतीशिलतेत वाढ होते. व ग्रामीण भागातील लोक हे शहरी भागातील लोकासोबत मिळून मिसळून वागतात. तसेच ते नवीन विचारसरणीशी जूडण्याचा प्रयत्न करतात.

४) नविन विचारांचा प्रभाव :

शहरातील लोकांची एक वेगळी विचार प्रणाली असते. तसेच लोकामध्ये मिळण्याची एक वेगळी शैली असते. ग्रामीण भागातून आलेल्या लोकांना आपली जुनी परंपरा सोडून नविन विचाराचा स्विकार करावा लागतो. कारण ते नविन विचार धारेच्या प्रवाहात आलेले असते.

५) छोटे कुटूंब किंवा विभक्त कुटूंब :

ग्रामीण भागापेक्षा शहरामध्ये वेगळया प्रकारचे कुटूंब राहतात. निवासाच्या समस्येमुळे मोठी कुटूंबे शहरात राहणे शक्य होत नाही. यातूनच मोठे कुटूंब विभक्त होऊन छोटी कुटूंब अस्तित्वात येतात.

**शहरीकरणाचे सामाजिक प्रभाव:**

भारतात शहरीकरणाचे खालील सामाजिक प्रभाव दिसून येतात.

१) कुटूंब व्यवस्थेचे विघटन :

भारतात शहरीकरणापूर्वी मनोरंजन, शिक्षण, इ. सर्वाचे प्रमुख केंद्र हे कुटूंब हेच होते. शहराचा विकास होण्यापूर्वी संयुक्त कुटूंब पध्दती ही ग्रामीण जीवनाचे वैशीष्टये होते. शहरीकरण झाल्यामुळे कुटूंब ही छोटे होऊन कुटूंबातील सदस्यांची एकमेकाप्रती असलेली सहकार्याची भावना कमी झाली. या कारणामुळे कुटूंब व्यवस्थेचे विघटन झाले.

२) रूढी परंपरेचा ऱ्हास:

शिक्षणाच्या प्रचारासोबत मनुष्याच्या विचारातही परिवर्तन झाले. खेडयातील जनता ही अज्ञानी असल्यामुळे ते कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवतात. ग्रामीण जनतेवर हया रूढी परंपरेचा विश्वास ठेवतात परंतु शहरीकरणामुळे या सर्व बाबी कमी झालेल्या आहे.

३) लोकसंख्या वृध्दी :

शहरीकरणामुळे लोकसंख्याची घनता ही वाढत आहे. लोकसंख्या ही इतकी जास्त वाढत आहे की सर्व लोक एका ठिकाणी एकत्र येऊ शकत नाही.

४) विषम सामाजिक स्तर:

शहरात समाजाच्या अनेक वर्गामध्ये विषमता ही दीसून येते. शहरात एखाद्या ठिकाणी गरीब लोक आहेत तर दुसऱ्या ठीकाणी श्रीमंत लोक आहे. अशाप्रकारे शहरात विषम सामाजिक स्तर आहे.

५) वैवाहिक दृष्टीकोनात बदल:

शहरातील लोकांनी वैयक्तिक स्वातंत्राला महत्व दिल्यामुळे त्याच्या विवाहाच्या वयात वाढझाली.

६) धर्म आणि नैतिक मूल्य :

शहरीकरणात धर्माचे महत्व हे घटत चालले आहे. शहरीकरणामुळे देशातील स्त्री व पुरूष नैतिक परिवर्तन झाले आहे. अशाप्रकारे नैतिक दृष्टीकोनात फरक पडला आहे.

**शहरीकरणाची कारणे :**

भारतात शहरीकरणाची प्रवृती ही खुप वाढलेली आहे. ग्रामीण भागातील लोक हे शहराकडे जात असून यामागे अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारणे हे खालीलप्रमाणे आहे.

१) औद्योगीकरण :

औद्योगीकरण हे एक शहरीकरणाचे प्रमुख कारण आहे. भारतात औद्योगीक धोरणानंतर औद्योगीकरणाचा वेग वाढून अनेक भागात अनेक उद्योग निर्माण झाले. या कारखाण्यात अधिक प्रमाणात श्रमिक व कामगाराची संख्या असते. हे सर्व लोक अनेक भागातून येऊन शहरामध्ये राहतात.

२) राजकिय कारण :

राजकिय कारण हे शहरीकरणाचे एक महत्वाचे कारण आहे.

३) शहरी जीवनाचे आकर्षण :

शहरामध्ये लोकांच्या सोयी सुविधाचे खून साधने असतात. शहरात दैनंदीन जीवनाच्या सर्व सोयी सहज मिळत असल्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे येत आहे.

४) सुरक्षेची भावना :

शहरामध्ये व्यक्ती हा प्राकृतिक व सामाजिक या दोन्ही आपत्तीपासून सुरक्षीत राहतो. कोणताही आजार झाला तरी त्याचा उपचार हा शहरात होतो. तसेच पोलीसामुळे त्यांना सामाजिक सुरक्षा सुध्दा मिळत असते. त्यामुळे शहरे वाढत चालली आहे.

५) धार्मिक कारण :

धार्मिक कारण हे शहरीकरणाच्या वाढीचे प्रमुख कारण आहे. ज्या देशात धर्माला जास्त महत्व दिले जाते तिथे धार्मिक तत्वाच्या आधारावर शहराची उत्पती होऊन शहरीकरण होत असते.

६) मानसिक कारण :

मनस शास्त्राचा सिध्दांतानूसार लोक ज्या ठिकाणी अधिक सोयी सुविधा उपलब्ध होतात तिथेच जातात. याच कारणाने शिक्षीत लोक ग्रामीण भागातून पैसे कमविण्याच्या हेतूने शहरात येतात. हे एक शहरे वाढण्याचे प्रमुख कारण आहे.

**शहरीकरणाची समस्या :**

शहरीकरणाच्या प्रक्रियेनंतर अनेक समस्या निर्माण होतात त्या खालीलप्रमाणे आहे.

१) घाणीचे साम्राज्य आणि वाढते प्रदूषण:

शहरीकरणाचया प्रक्रियेनंतर जसजसा शहराचा विस्तार वाढते तसतसा शहराची स्वच्छता राखणे, विद्युत पाणी व्यवस्था पुरविणे हे स्थानिक स्वराज्य संस्थेला कठीण झाले त्यामुळे ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे, सांडपाण्याचे डबके, असुरक्षेचे वातावरण, असामाजिक तत्वामध्ये वाढ, यासर्व समस्या निर्माण होऊन प्रदूषणात वाढ झाली.

२) आरोग्य विषयी समस्या :

वाढते प्रदूषण, शहरातीचे गर्दीचे वातावरण निवासाच्या अपुऱ्या सोयी या सर्व समस्यामुळे जनतेचे आरोग्य जास्त बिघडले. ही एक समस्या निर्माण झाली.

३) झोपडपट्टीत वाढ :

शहराच्या विस्तारामुळे गाव, वस्त्या, व झोपडपट्टीत वाढ होत आहे. निवासाची कमतरता शिवाय घराचे वाढते दर व शहराच्या औद्योगीक विकासाबरोबर गगणचुंबी इमारती बरोबर झोपडपट्टीमध्ये वाढ होत आहे.

४) गुन्हेगारीत वाढ :

शहरीकरणाच्या विकासासोबतच गुन्हेगारीत मोठया प्रमाणात वाढझाली. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरामध्ये चोऱ्या, खिसेकापू, धोकाघाडी, मारपीट, व छेडखानी इ. गुन्हे शहरी भागात जास्त प्रमाणात वाढले.

५) दळणवळणाची समस्या :

दळणवळण ही एक शहरीकरणाची भारतातील प्रमुख समस्या आहे. शहरामधील लोकांना आपले काम करण्यासाठी बरेच दूर जावे लागते.

६) नागरी सोयी सुविधाचा अभाव :

अनेक शाळा, कॉलेज, शहरात असल्या तरी वाढत्या शहरकरणामुळे अपुऱ्या पडतात. तसेच चांगले दवाखाने असले तरी रोग्यांना दवाखान्यात जागा मिळत नाही ही एक समस्या आहे.

**संशोधनाचे महत्व :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ''भारतातील शहरीकरणाची प्रवृती व समस्या'' याचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच या शोधनिबंधात भारतातील शहरात असणाऱ्या समस्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

१) भारतातील शहरीकरणाची व्याख्या व स्वरूपाचा अभ्यास करणे.

२) शहरीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.

३) शहरीकरणाला कारणीभूत असणाऱ्या घटकाचा अभ्यास करणे.

४) भारतातील शहरीकारांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५) भारतातील शहरीकारांच्या लोकसंख्या वाढीच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

६) भारतातील शहरीकरण झालेल्या शहरातील नागरीकाच्या समस्याचा अभ्यास करणे.

७) भारतातील शहरीकरणाच्या कारणाचा अभ्यास करणे.

**संशोधनाच्या पध्दती :**

''भारतातील शहरीकरणाची प्रवुत्ती व समस्या'' या विषयाच्या अनुषंघाने माहिती संकलीत असतांना संशोधनाच्या खालील पध्दतीचा अवलंब केला जाईल.

१) क्षेत्रकार्य अध्ययन पध्दती

२) ऐतिहासिक पध्दती

३) तुलनात्मक पध्दती

४) सहभागी निरीक्षण पध्दती

५) संख्यात्मक व गुणात्मक पध्दती

**तथ्य संकलन :**

अ) प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी पुढील माध्यमाचा वापर करण्यात येईल.

१) मुलाखत

२) प्रश्नावली

३) निरीक्षण

४) ग्रंथालयाचा वापर

**ब) व्दितीय स्त्रोत :**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी खालील माध्यमाचा वापर करण्यात येईल.

१) संदर्भ ग्रंथ

२) दस्तएवज

३) शोध पत्रिका

४) नियतकालिके

५) वर्तमानपत्रे

६) इंटरनेट

**संशोधनाची गृहीतकृत्ये :**

१) भारतातील शहरातील लोकसंख्या ही स्थलांतरामुळे वाढत आहे.

२) भारतातील शहरात नागरीकांना पुरेशी नागरी सुविधा मिळत नाही या समस्याचा अभ्यास करणे.

३) भारतातील शहरात सांडपाण्याची व घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था पुरेशी आहे.

४) भारतातील शहरात नागरीकांना सामाजिक सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

५) भारतातील शहरीकरणाचे समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

**भारतातील नागरीकरणाचे परिणाम :**

१) नागरीकरणामुळे ग्रामीण भागाचा विकास हा पूर्ण झालेला नाही.

२) नागरीकरणामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्या संख्येत घट झाली.

३) शहरीकारामुळे शहरातील शांतता व सुव्यवस्था ही कोलमडली आहे.

४) शहरीकारामुळे शहरातील लोकांचे आरोग्य हे धोक्यात आले आहे.

५) शहरीकरणामुळे शहर व ग्रामीण भागात विषमता वाढली आहे.

**भारतातील शहरीकरण कमी करण्याकरीता उपाययोजना:**

भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती व समस्या कमी करण्याकरीता खालील उपाययोजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. हया उपाययोजना खालील प्रमाणे आहे.

१) भारतातील ग्रामीण भागातील छोटया शहराचा विकास झाला पाहिजे.

२) शहरामध्ये सक्षम व सोईसस्कर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था झाली पाहीजे.

३) भारतातील शहरात व ग्रामीण भागात स्मार्ट शहराची निर्मिती झाली पाहिजे.

४) भारतातील शहरात उर्जा बचतीचे तत्व अमंलात आणले पाहिजे.

५) भारतात ग्रामीण भगात सोयी. सुविधाचा विकास झाला पाहिजे.

६) भारतातील शहरात व ग्रामीण भागात पर्यायी रोजगाराची निर्मिती झाली पाहिजे.

**निष्कर्ष —**

विकास प्रक्रियेमधील शहरीकरण ही एक अपरिहार्य घटना असली तरी शहरीकरणाच्या विस्तारासाठी व विकासासाठी सरकारने चांगल्या उपाययोजना केल्यास शहरीकरणाची समस्या निर्माण होणार नाही. सरकारने चांगल्या उपाययोजना केल्यास शहरीकरणाची समस्या निर्माण होणार नाही. सरकारने ग्रामीण औद्योकीकरणावर भर देउन ग्रामीण भागातील स्थानिक गरजा पूर्ण करणारे व कृषी क्षेत्रास पोषक व पर्यायी छोटे उद्योग ग्रामीण भागात सुरू केल्यास रोजगार निर्मिती होऊन रोजगाराच्या निमीत्याने शहराकडे होणारे स्थलांतर रोखता येईल. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात पायाभुत सेवा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्यामुळे देखील ग्रामीण भागातून शहरीभागाकडे होणारे स्थलांती कमी करण्यास मदत होईल. तसेच नागरी लोकसंख्येचे विकेंद्रीकरण, झोपडपट्टी सुधारणा, नवीन शहराचे नियोजन, निवासी पायाभुत सुविधा, गर्दीवर नियंत्रण यातून अनेक समस्येचे निर्मुलन होण्यास मदत होईल. शारांशाने सरकारच्या निर्मीतीच्या प्रयत्नाने भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती व समस्येवर उपाययोजना करणे शक्य आहे.

भारतात शहरीकरण वाढत आहे व ते पुढेही वाढतच राहणार आहे. भारत हे एक विकसनशील देश असल्यामुळे भारतात शहरीकरणाला टाळता येत नाही. देशाच्या दरडोई उत्पन्न वाढीमध्ये शहरीकरणाची भूमीका ही महत्वाची असते. हे विकसीत देशाच्या विकासावरून कळते. त्यामुळे भारतात वाढत जाणारे शहरीकरण हे संकट किंवा आव्हान नसून विकासाची संधी आहे. हा व्यापक दृष्टाकोण सरकारने स्वीकारून शहरी विकासाचे धोरण स्वीकारावे.

भारतातील शहरीकरणाने बकालता, अनारोग्य, बेकारी, बेरोजगारी, ग्रामीण अविकास, प्रदूषण असे अनेक प्रश्न निर्माण झाले. यावर नागरी नियोजन करतांना अनुकूल शहरीकरणाचे नियोजन करावे व प्रतिकूल शहरीकरणाच्या दुष्परिणामांवर कठीण नियंत्रण बसवावे.

**संदर्भ सूची :**


| | | |
|---|---|---|
| १) डॉ. सुधाकर शास्त्री | : | भारतीय अर्थव्यवस्था |
| | | विश्व पब्लिशर्स अंड डीस्ट्रीब्युटर्स, |
| २) डॉ. प्रकाश सोमलकर | : | भारतीय नागरी अर्थशास्त्र |
| प्रो. राजेश डोंगरे | | मेसर्स, रजनी प्रकाशन, नागपूर, २०१९ |
| ३) सुमती कुलकर्णी | : | लोकसंख्याशास्त्र |
| तारा कानिटकर | | श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७९ |
| ४) बी. पी. राव | : | नागरीय भूगोल |
| नंदेस्वर शर्मा | : | वसुन्धरा प्रकाशन, गोरपूर, २००९ |
| ५) रूद्रदत्ता/सुंदरम | : | भारतीय अर्थशास्त्र |
| | | एस चांद अंड कंपनी, नवी दिल्ली. |
| ६) एस. बी. कदम | : | मानव पर्यावरण आणि प्रदूषण |
| | | भडके प्रकाशन, कोल्हापूर. |
| ७) ए. बी. सवदी | : | भूगोल व पर्यावरण |
| ८) विकासपीडीया नेटवर्क | : | शहरीकरण |


——————समाप्त—————

# किशोरावस्थेतील (वयोगट १२ ते १५ वर्ष) बदलते पालक–बालक संबंध

कु. रूपाली सुभाषराव कणसे
सहा. प्रा. गृहअर्थशास्त्र
जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा जि. यवतमाळ

## Abstract

भारत देश हा संपूर्ण जगामध्ये तरुण देश म्हणून ओळखला जातो कारण आपल्या देशांमध्ये तरुणांची संख्या जास्त आहे. हा तरुण मानसिक दृष्ट्या शारीरिक दृष्ट्या भावनिक दृष्ट्या परिपक्व सशक्त व सुदृढ असेल तर आपल्या देशाचा विकास जोमाने व्हायला सुरुवात होईल ज्या देशाची पिढी सशक्त असते त्या देशाचा विकास कोणीच रोखू शकत नाही. राष्ट्रसंताच्या संस्काराचा वारसा लाभलेली आपली भारत भूमी आज तरुणांच्या बळावर महासत्ता होण्याची स्वप्न पाहत आहे परंतु ढासळलेली नैतिकता, संस्काराचा अभाव, वाढती गुन्हेगारी, हिंसक प्रवृत्ती, आक्रमकता इत्यादी बाबींमुळे राष्ट्राची खरी असलेली साधन संपत्ती म्हणजेच ही युवा पिढी युवाशक्ती ही ध्येयहीन अविचारी असंवेदनशील होत चालली आहे त्यामुळे त्याचे दूरगामी दुष्परिणाम भेडसावत आहे आणि म्हणून हल्लीची पिढी त्याचे अनेक प्रश्न, समस्या गुन्हेगारी प्रवृत्तीचा त्याचा कारणांचा अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे.

**प्रस्तावना**

कुटुंब म्हणजे परस्पराशी नाती असलेल्या माणसाचा समूह कुटुंब संस्था एकत्र अथवा विभक्त अशी दोन प्रकारची असते. एकत्र कुटुंब म्हणजे साक्षात स्वर्गच म्हणावा लागेल समाजामध्ये ज्या प्रकारची कुटुंब पद्धती प्रचलित असते त्या पद्धतीशी सुसंगत अशी सांस्कृतिक लक्षणे, स्थायीभाव, कल्पना इत्यादी. बाबी कुटुंबात विकसित होत असतात. आजच्या युगात अनेक क्रांतिकारक बदल होत चालले आहे. त्यापैकी एक म्हणजे कुटुंब कुटुंबाचे भावनिक दृष्टिकोनातून निरोगी स्वरूप बदलत चालले आहे. कुटुंबातील सदस्यांची संख्या कमी होऊन एकत्र कुटुंब पद्धती कडून विभक्त कुटुंब पद्धती कडे संक्रमण होत चालले आहे. दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे विवाहाचे स्वरूप होय. आजच्या काळात विवाहाचे पूर्वीप्रमाणे महत्त्व, पावित्र राहिलेले नाही पती–पत्नी संबंधाचे स्वरूप बदलले त्याचा परिणाम किशोरांच्या समस्या वाढत आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या लांब पल्ल्याच्या प्रवासात संरक्षक व मार्गदर्शक या दोन्ही भूमिका पालकांना पार पाडायच्या असतात. तसे झाले नाही तर मुले समस्यात्मक वर्तन करतात, बिघडतात, समाजविघातक कृत्य करतात असामाजिक बनतात असे वर्तन मुलांमध्ये आढळून येते त्यामुळे सामाजिक दृष्टिकोनातून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कुटुंब संस्था ही महत्त्वपूर्ण आहे. तसेच समाजाचे सातत्य टिकविण्यासाठी प्रत्येक घटक जाणिवेने कार्य करत असतो.सामाजिक व्यवस्थेला टिकवून ठेवणारा मजबूत कणा म्हणजे कुटुंब होय. त्याचे विस्तृत स्वरूप म्हणजे गाव आणि गावाचे तालुका आणि तिथून पुढे जिल्हा, राज्य आणि देश होय. मात्र याचा मूलभूत

घटक हा कुटुंब होय आणि या कुटुंबाचा महत्त्वपूर्ण असलेला घटक म्हणजे किशोर त्यावरच आपल्या देशाचा विकास अवलंबून आहे.

किशोरावस्था ही वादळी अवस्था म्हणून ओळखली जाते. माहिती तंत्रज्ञान युगात किशोर हा अधिकच भरकटलेला आहे. गोंधळलेला आहे. त्याचा परिणाम पालक—बालक संबंधावर होऊन बदलत्या पालक—बालक संबंधाची कारणे शोधून त्यावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे. म्हणून संशोधनासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

**उद्दिष्टे**

कोणतेही संशोधन कार्य करताना प्रथम संशोधनाशी संबंधित कार्याची उद्दिष्टांच्या निश्चिती कडे संशोधन कार्यातून एक विशिष्ट दिशा मिळवून सर्वेक्षण करणे सोपे जाते. ध्येय आणि उद्दिष्टे स्पष्ट असतील तर सर्वेक्षण प्रक्रियेला गती प्राप्त होते. म्हणून प्रस्तुत संशोधनाकरिता काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे. ती खालील प्रमाणे

१) किशोरांच्या कुटुंबाचा समाजार्थिक दर्जा अभ्यासणे.
२) कशोरांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून पालकांची भूमिका अभ्यासणे.
३) किशोरावस्थेतील बदलते पालक बालक संबंध आणि पालक—बालक संबंधामध्ये येणाऱ्या समस्या अभ्यासणे.
४) किशोरावस्थेतील बदलत्या पालक—बालक संबंधाची कारणे जाणुन घेणे.
५) बदलत्या पालक बालक संबंधाचा किशोरांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.
६) पालक—बालक संबंध सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

**गृहितकृत्य**

संशोधनामध्ये शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करण्यासाठी संशोधन कार्याला काही विधाने ठरवावी लागतात या विधानाच्या आधारे संशोधक संशोधनासंबंधी अनुमान बांधतो यालाच गृहीत कृत्य असे म्हणतात. गृहीत कृत्य हे अंतिम सत्य नसून ते भावी संशोधनाकरिता तात्पुरते विधान असते.

प्रस्तुत संशोधनामध्ये पुढील प्रमाणे **गृहित कृत्यांची** निश्चिती करण्यात आली आहे.

१. कुटुंबाच्या समाजार्थिक दर्जाचा पालक—बालक संबंधावर परिणाम होतो.

२. माहिती तंत्रज्ञान युगाचा पालक—बालक संबंधावर सकारात्मक परिणाम झाला आहे.

३. किशोरांना मार्गदर्शन करण्यास पालक समर्थ नाही.

४. सुशिक्षित पालक आणि बालकांचे संबंध दृढ असतात.

५. माहिती तंत्रज्ञान युगात किशोरांना समजून घेणे पालकांसमोर एक आव्हान आहे.

किशोरावस्थेचा कालखंड हा वय वर्ष १२ ते १९ पर्यंत समजला जातो. परंतु मुला—मुलींमध्ये ही अवस्था लवकर यायला लागली आहे. म्हणजेच शारीरिक बदल, शारीरिक परिपक्वता ही वेळेच्या आधी लवकर येत आहे.

या अवस्थेमध्ये जे शारीरिक बदल होतात. त्यावरून या अवस्थेला **वादळी अशांततेचा कालखंड** म्हटले जाते. या वयोगटातील मुला मुलींच्या पालकांकडून तक्रारी वाढलेल्या आहेत. मुलांची चिडचिड, तणावग्रस्त, चिडून अंगावर येणे, मोबाईल टीव्ही मध्ये गुंतून राहणे, कुणाशी ही न बोलणे, एकटे राहणे अशा अनेक तक्रारी बालकांच्या वर्तनात संदर्भात पालक सांगताना दिसतात. **पौगंडावस्थेत ची वैशिष्ट्ये लक्षात घेता या अवस्थेत होणारे महत्त्वाचे लैंगिक बदल आणि त्यांचे अनुषंगिक असे शारीरिक भावनिक व सामाजिक परिणाम होणे** हे पौगडावस्थेचे स्वरूप आहे. या अवस्थेचे लैंगिक परिपक्वता हे वैशिष्ट्य आहे. परंतु लैंगिक बाबीसंबंधी उत्तर बाल्यवस्थेच्या मध्यापासून होणारी प्रचंड उत्कंठा याविषयी आपल्याला कोणीतरी हे सगळं नीट सांगावे असं त्यांना वाटत असतं. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे होत नाही. याउलट मुलांवर अनेक बंधने घातली जातात. त्यामुळे मुलांचे पाऊल वाकडे पडते काही मुले गुन्हेगारीकडे वळतात तर काही ना लैंगिक बाबीसंबंधी घ्रुणा निर्माण होते. तसेच याची दुसरी बाजू म्हणजे लैंगिक विषयासंबंधी शास्त्रीय माहितीची मुबलकता औद्योगिक जीवनामुळे व सहशिक्षणामुळे मुला मुलींचे वाढते संबंध, डेटिंग हा प्रकार समाज मान्य आहे किंवा नाही या गोंधळात किशोर अडकलेला दिसतो. याची कारणे शोधली तर या अवस्थेमध्ये जे शारीरिक बदल होतात अंतस्त्रावी ग्रंथीचे स्त्राव कमी अधिक प्रमाणात स्त्रवने इत्यादीमुळे मुलांचा शारीरिक समतोल बिघडतो. **या अवस्थेत होणाऱ्या शारीरिक बदलाचा परिणाम मानसिक वर्तनात होतो आणि हाच काळ पालक–बालक संबंध बदलाला कारणीभूत ठरतो** आणि तिथून पालक–बालक संबंधात दुरावा निर्माण होण्याला सुरुवात होते. होणाऱ्या शारीरिक बदलासंदर्भात मुला–मुलींच्या मनामध्ये कुतूहल, जिज्ञासा असते ते जाणून घेण्यासाठी मुले अयोग्य मार्गाकडे वळतात. त्यातलाच पॉर्नोग्राफी सारख्या प्रकारामुळे मुलांकडून ज्या क्रिया, वर्तन घडते ते अयोग्य असते. तसेच आयुष्यातल्या प्रत्येक महत्त्वाचा टप्पा टर्निंग पॉइंट मध्ये मुले गोंधळलेली असतात. यावेळी मुलांमध्ये मानसिक संघर्ष निर्माण होतो. पालकांकडून योग्य बाबी पुरवल्या जात नाही. मुलांना समजून घेण, वेळ देणे गरजेचे आहे. आजचे जीवन अस्थिर धावपळीचे झाले आहे.

आज आपण म्हणतो की, आम्ही वैश्विक नागरिक बनत चाललोय इंटरनेटने सगळ्या जगाला जोडले गेले पण आपण आपल्या पुरतेच संकुचित झालो. आज पालकांना मुलांकडे बघायला मुलांशी संवाद साधायला वेळ नाही. आज आई वडील इतके व्यस्त झालेत की, मुलांशी गप्पा मारायला वेळ नाही. त्यांना समजून घ्यायला वेळ नाही. मग मुलं आजूबाजूला जे जे बघतात, अनुभवतात त्यावरून त्यांचे विचार बनतात. त्यांना कधी ते व्यक्त करायला संधीही मिळत नाही. ते जे जे टीव्हीवर किंवा अन्य माध्यमातून बघतात. तेच सत्य आहे असं समजून वागण्याचा प्रयत्न करतात. योग्य अयोग्य यात निवड कशी करायची हे संपुर्ण शिक्षण पद्धती मध्ये कुठेही सांगितलं जात नाही.

अनोपचारिक रित्या ज्यांनी ते सांगायचं किंवा आज पर्यंत जे जे मुलांवर सद्सदविवेक बुद्धी जोपासणारे संस्कार संयुक्त कुटुंब करत होते, ते आज नाममात्र शिल्लक राहिले आहेत. पूर्वीच्या काळी घरात संस्कार करणारी आजी–आजोबा असायचे आता विभक्त कुटुंब पद्धतीमुळे मुलांना घरात प्रेम माया देणारा माणूसच कमी झाला आहे.

आई–बाबा असले तरी ते सतत घाईत किंवा कामाच्या व्यापात असतात. मग मुले बोलायला लागली की त्यांना गप्प केले जाते. मुलांशी बोलणं फक्त जर होमवर्क पुरतच असेल तर ती मुले व्यक्त कधी आणि कसे होणार. दुसरं म्हणजे पालकचं कामाच्या

अतिताणामुळे सतत तणावग्रस्त असतील तर तो तणाव घरामध्ये मुलांशी बोलताना व्यक्त होतो. पालकच जर मुलांसमोर हिंसक रीतीने व्यक्त होत असतील तर मुलंही टीप कागदा सारखे तेच टिपतात. मग हिंसक पद्धतीने व्यक्त व्हायचं असतं यात गैर काहीच नाही अशी त्यांची धारणा होते. त्यांचं हरवलेलं बालपण, त्यांची हरवलेली विचार शक्ती जागेवर आणण्याची आज संपूर्ण समाजात कुठेही व्यवस्था नाही.

आज माहिती तंत्रज्ञान युगामुळे किशोरांमध्ये अनेक बदल झालेले दिसून येतात. टीव्ही, मोबाईल, फॅशन, तसेच जाहिरातीचा किशोरांच्या राहणीमानावर प्रभाव झाल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने पालकांकडून अनेक भौतिक वस्तूच्या अपेक्षाही केल्या जातात. आजची पिढी आधीच्या पेक्षा खूप एक्सपोजर आहे. ती अधिक स्मार्टपणे, आत्मविश्वासाने वावरतांना दिसते. पण खरंच ती तशी असतात का? की त्यांच्या मनावरही अनेक प्रकारचे ताण आजच्या संपूर्ण व्यवस्थेने रचलेले आहेत. कारण आई—बाबा दोघेही करिअरच्या पाठीमागे असतात, व्यस्त असतात मुलांसाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. मुलांना समजून घेऊन त्यांच्याशी संवाद साधणारं कोणीच नसतो त्यामुळे हे ताण अधिकच वाढत जातात.

आधीच्या काळात संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. आज आपणास विभक्त कुटुंब पद्धती पहावयास मिळते. संयुक्त कुटुंबातील सदस्य व ज्येष्ठ मंडळी मुलांना नकळत अनेक बाबी मुलांमध्ये रुजवायचे.
किशोर वयात मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक बदलाच्या संदर्भात त्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टिकोनातून वेळोवेळी प्रत्येक बाब समजून सांगितली जात असे. नैतिक मूल्य, संस्कार, योग्य सवयी मुलांमध्ये रुजविल्या जायच्या. मुलांच्या भौतीक गरजांना अवास्तव महत्त्व दिले जात नव्हते. आई—वडिलां सोबत एकंदरीत कुटुंबासोबत अधिक वेळ घालविला जाई. मुलांचे फाजील लाड, अवास्तव अपेक्षा, भौतिक वस्तूच्या गरजा या बाबींना महत्त्व नव्हते. तसेच मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक बदलाचा त्याच्या मानसिक वर्तनावर होणारा बदल याकडे वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन केले जात, समजून सांगितले जात असे. तसेच भावनांवर स्वत:वर नियंत्रण ठेवले जायचे. पालकांविषयी किशोरांच्या मनात आदरयुक्त भीती असायची. हल्लीची मुलांची पिढी बिघडली आहे असे विधान सर्व पालक करताना दिसतात. परंतु याउलट हल्लीची पालकांची पिढी बिघडली आहे असे दिसून येते.

मुलांच्या संगोपनात संदर्भात पूर्वीची पालक आणि हल्लीची पालक यात बराच फरक दिसून येतो. परिस्थिती बदलली परंतु त्यानुसार पालक बदललेले दिसून येत नाही. पालक आम्हाला ज्या कठीण परिस्थितीतून जावे लागले तशी परिस्थिती मुलांवर येऊ नये या भावनेपोटी मुलांना वारेमाप सोयी—सुविधा दिल्या जातात पण मुलांकडून त्यांच्या कर्तव्याबद्दल आग्रह धरण्यात येत नाही. आधुनिक काळात मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीकोनातून केवळ आई—वडिलांचे प्रयत्न अपुरे पडतात. आजचे जीवन अस्थिर धावपळीचे झाले आहे. त्यात मुलांशी संवाद, चर्चा होणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलांचा तणाव कमी होऊ शकतो. मुलांना वेळ देणे अत्यंत आवश्यक आहे.

**संशोधन –**

कोणत्याही समस्येच्या निराकरणासाठी गृहीत कृत्याच्या परीक्षणासाठी नवीन घटनाक्रम अथवा नवीन घटनाक्रमातील संबंधाला शोधण्याच्या उद्देशाने उपयुक्त पद्धतीचे सामाजिक परिस्थितीवर जे प्रयोग केले जातात, त्यालाच सामाजिक संशोधन असे म्हणतात.

सी. ए .मोझर यांच्या मते, ''सामाजिक घटना व समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावी म्हणून केलेल्या क्रमबद्ध संशोधनाला सामाजिक संशोधन असे म्हणतात.''

**संशोधनाचे कार्यस्थळ –**

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्रातील विदर्भ विभागातील आठ जिल्ह्यांपैकी एक जिल्हा यवतमाळ असून प्रस्तुत संशोधनाचे कार्यस्थळ हे यवतमाळ शहर आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

संशोधन कार्य करीत असताना ते निश्चित काळात नियोजित वेळेत नियोजित आर्थिक तरतूद होणे आवश्यक असते त्यामुळे संशोधन कार्याला सर्वप्रथम संशोधन विषयाची कार्य निश्चिती संशोधनाची व्याप्ती व कार्यक्षेत्र निश्चित करावे लागते. संशोधनाची व्याप्ती व कार्यक्षेत्र निश्चित झाल्यानंतरच संशोधन कार्य नियोजित वेळेत पूर्ण होत असते.

**संशोधनाची मर्यादा**

प्रस्तुत संशोधन हे किशोरांशी व पालकांशी संबंधित आहे. यवतमाळ जिल्हयात एकूण १८ विभाग असून त्यातील एकूण कुटुंब संख्येपैकी एक तृतीयांश भाग लॉटरी पद्धतीने निवड करून ६०० पालक व खाजगी व शासकीय शाळेतील ६०० किशोररांची निवड केली. प्रस्तुत संशोधन यवतमाळ शहर पुरते मर्यादित आहे.

**नमुना व नमुना निवड**

जनसंख्येच्या तथ्या विषयी पूर्वानुमान काढण्याकरिता जनसंख्या मधुन निवडलेल्या एककाला (व्यक्ती किंवा वस्तू) नमुना किंवा न्यादर्श म्हणतात. तसेच नमुना निश्चिती करण्याच्या पद्धतीला न्यायदर्शन किंवा नमुना निवड म्हणतात. प्रस्तुत संशोधनात यवतमाळ शहरातील एकूण १८ विभाग असून त्यातील एकूण कुटुंबसंख्या ५३००० असुन त्यापैकी एक तृतीयांश भाग लॉटरी पद्धतीने निवड करून ६०० पालक व खाजगी व शासकीय शाळेतील ६०० किशोररांची निवड केली. २०११ च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण १८ नागरी क्षेत्र आहेत त्यातील सहा नागरी क्षेत्राची यादृच्छिक पद्धतीने निवड केली. गट शिक्षणाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथून मिळालेल्या माहितीनुसार यवतमाळ शहरात एकूण १३७ खाजगी व ९८ शासकीय शाळा असे एकुण २३५ शाळा असून किशोरवयीन १२ ते १५ वयोगटातील १८९६४ विद्यार्थी शिकत आहेत. यातील ६०० विद्यार्थी पुढील प्रमाणे निवडले आहे.

| विभाग क्षेत्र | पालक | किशोर | एकूण |
|---|---|---|---|
| | ६०० (१०X६०) | ६०० (१०X६०) | १२०० |

**तथ्य संकलन**

**प्राथमिक तथ्य संकलन**

या करिता प्राथमिक व दुय्यम पद्धतीचा वापर करण्यात येईल प्राथमिक स्वरूपातील तक्ते संकल्पना करिता अनुसूची, मुलाखत,प्रश्नावली, निरीक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**द्वितीयक तथ्य संकलन**

यासाठी संशोधनाशी संबंधित प्रकाशित अप्रकाशित साहित्य आकडेवारी संशोधन अहवाल नियतकालिके मासिके पुस्तके ई. चा संशोधन कार्य शास्त्रशुद्ध निकषावर उतरेल यासाठी द्वितीय तथ्य संकलन केले.

**संशोधनाच्या प्रामुख्याने तीन पद्धती आहेत.**

१. ऐतिहासिक संशोधन पद्धती

२. प्रायोगिक संशोधन पद्धती

३. सर्वेक्षण संशोधन पद्धती

प्रस्तुत अभ्यासासाठी प्राथमिक तथ्यस्त्रोतासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला.

**परिभाषा**

**माहिती तंत्रज्ञान युग –**

सध्याचे युग हे संगणकाचे युग म्हणून ओळखले जाते. माहिती तंत्रज्ञान म्हणजे योग्य अशी माहिती इंटरनेटच्या माध्यमाने पोचविणे.

**किशोर –**

पौगंडावस्थेतील शारीरिक परिपक्वता एक टप्पा आहे. किशोर वय किंवा किशोरावस्था म्हणजे मोठे होण्याचा काळ. किशोर वय हा अपरिपक्व मुलांचे पूर्ण वाढझालेल्या प्रगल्भ तरुणात रूपांतर होण्याच्या प्रक्रियेचा कालखंड होय. याच वयात होणाऱ्या माणसाच्या लैंगिक वाढ व विकासाच्या टप्प्याला किशोरावस्था म्हणतात.

**पालक –**

जे आई–वडील मुलांना जन्म देतात, मुलांचे पालनपोषण करतात, मुलांना वाढवितात, संरक्षण आणि मार्गदर्शन करतात ते पालक.

पौगडावस्थेतील काळात मुलांच्या दृष्टीने पालकांनी लक्षात ठेवायच्या बाबी.

- मुलांचे आरोग्य रक्षण करणे.

- लैंगिक विकास प्रक्रियेची शास्त्रशुद्ध माहिती मुलांना देणे
- पालकांनी मुलांच्या गोंधळलेल्या अवस्थेत समायोजना बाबत मार्गदर्शन करावे.
- मुलांकडून होणाऱ्या सर्वसामान्य चुकांकडे पालकांनी दुर्लक्ष करावे. पण यथायोग्य वेळी ती चूक समजून सांगावी.
- किशोरावस्थेचा काळ हा गोंधळलेला असला तरी पुढे त्याचे भविष्य अवलंबून आहे. त्यामुळे मुलांचा मानसिक तोल तेवढा काळ सांभाळण्यासाठी प्रयत्न करावेत.

वरील सर्व बाबींचा सद्यस्थितीत कुटुंबांमध्ये अभाव दिसून येतो त्यामुळे किशोरावस्थेतील बदलते पालक—बालक संबंध एक अध्ययन या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली.

**निष्कर्ष**

किशोरांबद्दल आतापर्यंत किशोरांचा आहार, आरोग्य व वर्तन अशा विषयावर बरेच संशोधन झालेले आहे. परंतु पालक—बालक संबंधावर विशेष संशोधन झालेले नसल्याचे आढळलते परंतु किशोरांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांचे आपल्या पालकांशी असलेले संबंध फार महत्त्वपूर्ण ठरतात म्हणून संशोधनासाठी या विषयावर संशोधन होणे गरजेचे वाटले या हेतूने प्रस्तुत विषयाची निवड केली

**संदर्भ ग्रंथ सुची**

१. परुळेकर आशा— सुजन पालकत्व सुंदर बाल संगोपन, उन्मेष प्रकाशन १९९२
२. डॉ.काळेले मीना— मानव विकास भाग २, पिंपळापुरे अँड पब्लिशर्स नागपूर २०१९
३. प्रा चांदावास्कर नलिनी— किशोरावस्था, विद्यापीठ म. ग्रंथ नागपूर १९८२
४. सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर —आरोग्य सेविकांसाठी सेवापूर्व प्रशिक्षण पुस्तिका, सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर शासकीय मुद्रणालय नागपूर जून २००७
५. सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर— किशोरवयीन प्रजनन व लैंगिक आरोग्य सेवा समन्वयक स्वयंसेवकासाठी प्रशिक्षण पुस्तिका, सार्वजनिक
आरोग्य संस्था नागपूर प्रकाशन शासकीय मुद्रणालय नागपूर ऑक्टोबर २०१०
६. प्रा लाठकर प्रियंवदा— मातृ कला बाल विकास व बाल शिक्षण, शशिकांत पिंपळापुरे विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद सप्टेंबर २०१४

**इ. स्त्रोत**

1. https://hi.m.wikipedia.org
2.www.yavatmal.nic.in 2020
3.www.healthychildren.org

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतामध्ये कुपोषण : कारणे आणि उपाय

**डॉ. कविता आर. बोरकर**
सहयोगी प्राध्यापक
गृहअर्थशास्त्र विभाग
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज,
भामटी, रिंग रोड, नागपूर २२.

भारत देश हा विकसनशिल देश आहे. त्यामुळे विकासाची प्रक्रिया ही निरंतर सुरू आहे. मात्र या विकासामध्ये अनेक गोष्टीमुळे अडथळे निमार्ण होत आहेत. आपल्या देशातील अनेक चालीरीती व रूढीपरंपरा वर्षानुवर्षे समाजामध्ये व प्रत्येक माणसाच्या मनामध्ये रूजलेल्या आहेत. त्यामुळे नविन ज्ञान, नविन विचार स्वीकारायला मन आणि समाज सहजासहजी तयार होत नाही. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकासाला जी गती प्राप्त व्हायला पाहिजे व त्यातून जी प्रगती व्हायला पाहिजे ती पाहिजे तशी होत नाही. म्हणूनच आपला देश महासत्ता होण्यामध्ये अडचणी येत आहे. आपल्या समाजाला अनेक बाजूंनी कीड लागली आहे. ही कीड आतून समाजाला पोखरून खात आहे.

कुपोषण, गरीबी, हुंडापद्धती, भ्रूणहत्या, जातीयवाद, आदिवासी भटक्यांवर होणारे अन्याय—अत्याचार व त्यांना मुख्य प्रवाहात सामील न करून घेता त्यांना वेगळे ठेवण्याचे षडयंत्र, जातीयतेमध्ये तेढ निर्माण करण्याचे निच राजकारण, भ्रष्टाचार ह्य सर्व गोष्टी विकासाला मारक आहेत.

विकसनशील राष्ट्र अशा स्वरूपाचे भारताचे स्वप्न असतांना दारिद्र्य, कुपोषण, बेरोजगारी इत्यादी समस्या अजूनही देशात मोठ्य प्रमाणावर आहेत. महाराष्ट्रात ३० टक्क्यांहून अधिक जनता दारिद्र्यरेषेखाली आहे. राज्यातील आदिवासी भागात बालकांच्या कुपोषणाचा भीषण प्रश्न आहे. भारताला आर्थिक महासत्ता म्हणून बघायचे असेल तर कुपोषणाची समस्या युद्धपातळीवर प्रयत्न करून दूर करणे आवश्यक आहे.

बालकांचे संगोपन म्हणूजे उत्तम पालन—पोषण, त्यांचा सर्वांगीण विकास व त्याला प्रेम आणि संरक्षण देणे होय. असे असतांना आई—वडिल दोघेही नोकरी, व्यवसाय किंवा काम करायला घराबाहेर जात असतील तर त्याच्या विपरीत परिणाम बालसंगोपनावर झाल्याशिवाय राहत नाही.

आदिवासी लोकांना अतिदारिद्र्यमूळे आपल्या पाल्यांकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. मुलांचे उत्तम संगोपन व्हावे याला आदिवासी समाजात दुय्यम स्थान आहे. आई—वडिल दोघेही रोजगारासाठी दिवसभर बाहेर जात असल्यामुळे आई—वडिल असूनही मुले अनाथ असतात तर घर असूनही बेघर असतात, अशी परिस्थिती बघावयास मिळते. कुटूंबाची आर्थिक हलाखीची स्थिती, अंधश्रद्धा, अज्ञान, अनिष्ट रूढी व परंपरा, उदासिनता इत्यादी कारणांमुळे आदिवासींमध्ये बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय चिकित्सा अनुसंधान समितीने नवी दिल्लीतील कुपोषित बालकांचे सर्वेक्षण केले असता भारतात ५ वर्षाखालील जवळपास ७५ लाख मुलांना कुपोषणामुळे अंधत्व आलेले आहे. व मुलांमध्ये 'अ' जीवनसत्वाचा अभाव दिसून येतो, असा निष्कर्ष काढण्यात आला.

लियँग व इतर (१९६७) यांनी इंडोनेशियन बालकांचे अध्ययन केले. त्यात सारख्या वयाच्या कुपोषित व सामान्य बालकांची तुलना करतांना कुपोषित बालकांमध्ये सामान्य बालकांच्या तुलनेत 'अ' जीवनसत्वाचा अभाव दिसून आला. कुपोषित बालाकंची बौद्धीक पातळी ही सामान्य बालकांच्या तुलनेत कमी दिसून आली.

भारत सरकारच्या आकडेवारीनुसार (NNMB 2002) ग्रामीण भागात७.२% व आदिवासी भागात१४% मुले तीव्र कुपोषित आहेत. महाराष्ट्र राज्यात जवळपास ८ लक्ष बालके तीव्र कुपोषित तर ३२ लक्ष बालके मध्यम कुपोषित आहेत. आदिवासी भागातील बालकांत कुपोषणाचे प्रमाण फार जास्त असून ग्रामीण महाराष्ट्रातील बालकांपेक्षा दुप्पट आहे.

**कुपोषण म्हणजे काय?**

"कुपोषण म्हणजे भोज्य तत्वे गुण आणि परिमाणाने अपर्याप्त किंवा आवश्यतेपेक्षा जास्त प्रमाणात उपयोगात आणल्याने शरीरावर जे हानीकारक परिणाम होतात अशी शारीरिक स्थिती होय."

अपर्याप्तचा अर्थ एक किंवा अधिक पोषक तत्वे शारीरिक आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात मिळतात त्यावेळी अपर्याप्त पोषण संभवते. भारतातील कुपोषण हे अपर्याप्त पोषणामुळे निर्माण झालेली समस्या होय.

**कुपोषणाची कारणे :**

- गरीबी
- अपूरा व कमी प्रतीचा आहार
- आहाराविषयी व मुलांच्या पोषणाविषयी गैरसमजुती व अंधश्रद्धा
- अपत्य संख्या जास्त असल्याने मुलांकडे दुर्लक्ष
- संसर्गजन्य आजार
- दोन मुलांमध्ये कमी अंतर
- स्तनपान न देणे
- अल्पवयात विवाह
- आहार विषयी अज्ञान

सर्वाधिक कुपोषित मुले दक्षिण आशियात असुन त्यात सर्वाधिक ६.१ कोटी मुले भारतात आहेत असे युनिसेफच्या अहवालात म्हटले आहे. या अहवालानुसार दक्षिण आशियात पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या कुपोषित मुलांची संख्या ८ कोटी ३० लाखाच्या जवळपास आहे. भारतातील ही संख्या ६.१ कोटी आहे. पाकिस्तान आणि बांग्लादेशाच्या तुलनेत कुपोषित भारतीय मुलांची टक्केवारी जास्त आहे ही भारतासाठी चिंताजनक बाब आहे. पाच वर्षापेक्षा कमी वयाची भारतातील कुपोषित मुलांची संख्या ४८%, पाकिस्तानातील४२%आणि बांग्लादेशातील४३% आहे.

भारतापेक्षा जास्त कुपोषित मुलांचे प्रमाण अफगाणिस्तानात आणि नेपाळ मध्ये आहे. अफगाणिस्तानात पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या कुपोषित मुलांची संख्या५९%, तर नेपाळ मध्ये४९%आहे. एकूण संख्या पाहता अफगाणिस्तान, नेपाळच्या पाठोपाठ भारतात सर्वाधिक कुपोषित मुले आहेत.

**कुपोषित मुलांची टक्केवारी :**

| | |
|---|---|
| अफगाणिस्तान | ५९%(२९ लाख) |
| नेपाळ | ४९%(१७.५ लाख) |
| भारत | ४८%(६.१ लाख) |
| बांग्लादेश | ४३%(७२ लाख) |
| पाकिस्तान | ४२%(१ कोटी) |

युनिसेफ मधील दक्षिण आशिया विषयक संचालक डॅनियल येले यांनी ही आकडेवारी चिंताजनक असल्याचे म्हटले आहे. दक्षिण आशियातील अनेक देशांची आर्थिक स्थिती चांगली असली तरी कुपोषणाचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे.

सर्वाधिक कुपोषित मुले असणारे पाचही देश दक्षिण आशियातच आहेत. दक्षिण आशियासाठी हा धोक्याचा इशारा आहे. या पाच देशात ८.३ कोटी मुले कुपोषित असून उर्वरित जगातील कुपोषित मुलांची संख्या ७.२ कोटी आहे.

कुपोषण २०१९ ऑक्टोबरला मध्ये वैश्विक उपासमारी सूचकामध्ये भारत ११७ देशांमध्ये १०२ या स्थानावर होता. वर्षे २०१८ मध्ये भारत १०३ या स्थानावर होता. देशातील कुपोषणांची समस्या विषय माहिती वित्तमंत्रीच्या बजेट भाषणामध्ये सुद्धा दिसून आली. वर्ष २०१७ मध्ये स्वास्थ आणि परिवार कल्याण मंत्रालय द्वारा राष्ट्रीय स्वास्थाविषयी निती २०१७ मध्ये सांगण्यात आली.

द स्टेट ऑफ द वर्ल्ड चिल्ड्रन– २०१९ च्या रिपोर्ट नुसार देशामध्ये ५ वर्ष असलेल्या प्रत्येक ३ मुलांमध्ये एक मुलगा कुपोषित आणि कमी वजन असलेला आढळुन आला. पूर्ण देशात ही संख्या २०० मिलीयन आणि भारतामध्ये प्रत्येक दुसरा मुलगा कुपोषणामुळे कोणत्या ना कोणत्या समस्येने ग्रासलेला आहे. रिपोर्टवरून हे ही लक्षात आले की, वर्ष २०१८ मध्ये भारतामध्ये कुपोषणामुळे ५ वर्षाखालील सुमारे ८.८ लाख मुलांचा मृत्यू झाला. नाइजीरिया (८.६ लाख), पाकिस्तान (४.०९ लाख) आणि कांगो गणराज्य (२.९६ लाख) पेक्षा जास्त आहे.

**भारतीय संविधान आणि कुपोषण :**

संविधान अनुच्छेद– २१ आणि अनुच्छेद– ४७ भारत सरकारने सगळ्य नागरिकांसाठी पर्याप्त भोजनासोबत एक सन्मानित जीवन जगण्याकरिता योग्य उपाय करण्यासाठी प्रेरित केले आहे. परंतु, भारतीय संविधानामध्ये भोजनाचे अधिकाराला महत्वाच्या अधिकाराच्या रूपात मान्यता देण्यात आली नाही.

अनुच्छेद– २१ च्या अनुसार कोणत्याही व्यक्तिला त्यांच्या जीवनात आणि त्यांच्या स्वतंत्रता पासून वंचित करू शकत नाही. संविधानाच्या अनुच्छेद– ४७ च्या अनुसार राज्य आपल्या लोकांसाठी पोषणहारस्तर आणि जीवनस्तर उंचविण्यासाठी आणि लोकांच्या स्वास्थामध्ये सुधारणा करणे आपल्या प्राथमिक कर्तव्याच्या रूपामध्ये समाविष्ट करतील यानुसार संविधानाच्या मुल अधिकाराशी संबंधित प्रावधानामध्ये अप्रत्यक्ष राज्यामध्ये निती निर्देशक तत्वांवर संबंधित प्रावधानांमध्ये प्रत्यक्ष रूपात कुपोषणाला संपविण्या विषयी बोलणे झाले आहे.

**कुपोषणामुळे बालकांच्या विकासावर होणारा परिणाम :**

कुपोषणाचा बालकांच्या सर्वांगिण विकासावर परिणाम होतो, बालकांच्या वाढीचे वय विकास यानुसार आहार नसल्याने त्याचे अपूरे पोषण होते आणि बौद्धिक, मानसिक, शारीरिक विकासाला बाधा निर्माण होऊन बालकांचा विकास खुंटतो.

१) अंधश्रद्धा, अज्ञान, रूढी–परंपरा, गैरसमजुती यामुळे सकस आहाराचा अभाव.
२) पदार्थामध्ये प्रथिन व जीवनसत्वांचा अभाव.
३) आरोग्य विषयक सुविधांचा अभाव, औषधोपचार करून घेण्याचे प्रमाण कमी.
४) शासकीय योजनेच्या माहितीचा अभाव.
५) भेसळयुक्त पदार्थाचे सेवन, गलिच्छ वस्ती, अशुद्ध पाणीपुरवठा, रोजगार व शिक्षणाचा अभाव.
६) रोजगार व उत्पन्नाच्या कमतरतेमुळे सकस आहाराचा परिणाम आरोग्यावर होतो.
७) डाळ, कडधान्ये, दुधाचा वापर अत्यल्प.
८) नविन परिवर्तन घडवून आणण्याची मानसिकता नाही.
९) शाळेतील गळतीचे प्रमाण अधिक व शासकीय योजनांच्या माहितीचा अभाव आढळुन आला.
१०) गैरसमजुती यामुळे दिवसेंदिवस या भागात कुपोषणाची वाढ होतांना दिसून येते.

**उपाययोजना :**

१) आहारा विषयी जनजागृती निर्माण करणे.

२) अंधश्रद्धा, अज्ञान निमुर्लन करून त्याविषय प्रबोधनपर जागृती निर्माण करणे.

३) प्रत्येक व्यक्तिने समाजाचा घटक म्हणून त्यांच्या भावना न दुखावता त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे.

४) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून फिरते दवाखाने काढुन त्यांना आरोग्य व आहार विषयी महत्त्व पटवून देणे.

५) स्वयंसेवी संस्थाची मदत घेवून शासकीय योजनांचा फायदा त्यांच्या पर्यंत पोहचविणे.

६) माता व मुलांकरीता शिक्षण.

७) कुपोषणाची समस्या सोडविण्यासाठी 'कुपोषण हटाव' सारखी योजना राबविणे आवश्यक आहे.

**कुपोषण निर्मुलनामध्ये लोकसहभाग :**

महाराष्ट्र राज्यातील अनेक आव्हानांपैकी एक असलेल्या कुपोषण या आव्हानाचा यशस्वी मुकाबला करण्याचे काम राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना व आरोग्य यंत्रणा करत आहेत. कुपोषण विषयामध्येFocused Approachने जाण्यासाठी राज्यामध्ये युनिसेफच्या आर्थिक व तांत्रिक सहाय्याने शासनाने राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशनची सन २००५ सालामध्ये स्थापना केली. गेल्या नऊ वर्षामध्ये सर्वांनी मिळुन केलेल्या प्रयत्नास यश येत असल्याचे सन २०१२ मधिलCNSM (Comprehensive Nutrition Survey in Maharashtra)अहवालाने दाखवुन दिले आहे. सन २००५—२००६ मधिलNFHS-III (National Family Health Survey-III)व सन २०१२ मधिलCNSMअहवालाची तुलना करता राज्यातील कुपोषणामध्ये मोठ्य प्रमाणात घट झाली आहे. या कामाची प्रशंसा राष्ट्रीय व जागतिक स्तरावरून करण्यात आली आहे.

तथापि अद्याप बरेच काम बाकी असुन याच पद्धतीने काम पुढे नेवून राज्यातील आदिवासी व शहरी भागातीलHigh Burden Pocketsवर जास्त लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. या कामीएकात्मिक बालविकास सेवा आरोग्य यंत्रणा जिल्हा स्तरापासून गाव स्तरापर्यंत/अंगणवाडी केंद्र स्तरापर्यंत प्रभावीपणेFocusedपद्धतीने काम करत आहेत.

परंतु, कुपोषण निर्मुलन ही फक्तICDS वHealthयंत्रणेचीच किंवा फक्त शासनाचीच जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. या भावनेतून शासनाने गेल्या चार वर्षापासून समाजातील सर्व घटकांचा या कामी सक्रिय सहभाग घेण्यासाठी एक प्रभावी मोहिम उघडली आहे. राज्यातील कुपोषण निर्मुलनासाठी जनजागृती (IEC) करणे व लोकसहभाग मिळविणे यासाठी सन २०११ पासून राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण अभियान म्हणून ही मोहिम (Compagin) दर वर्षी दिनांक १४ नोव्हेंबर ते ७ एप्रिल या कालावधीमध्ये राज्यभर राबविण्यात येते. या मोहिमेस सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळत असून राज्यातील जिल्ह्य—जिल्ह्यंमध्ये लोकसभागाच्या अनेक नाविण्यपूर्ण कल्पना राबविण्यात येत आहेत. एका जिल्ह्यत सुरू केलेली एखादी नाविण्यपूर्ण संकल्पना इतर जिल्ह्यंनी आत्मसात करून तशी अंमलबजावणी करण्याचे व पूढे जाण्याचे काम सुरू आहे.

या कामी अधिक जोर यावा व विशिष्ट जिल्ह्यत राबविलेले नाविण्यपूर्ण उपक्रम सर्वच जिल्ह्यत राज्यभर पोहचावेत या हेतूने कुपोषण निर्मुलनाच्या यशोगाथा(Best Practices) संकलीत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या यशोगाथा राबविणाऱ्यांचा गौरव करणे व इतरांना प्रोत्साहित करणे या दुहेरी उद्देशाने या यशोगाथांची संक्षिप्त माहिती सचित्र स्वरूपात पुस्तिकेच्या रूपाने मांडणी करण्यात आली आहे. हे करतांना या यशोगाथा प्रत्यक्षात येण्यासाठी काय—काय प्रक्रिया करण्यात आल्या, कोणते—कोणते उपक्रम राबविण्यात आले, कसे कसे प्रयत्न करण्यात आले यावरही सुरूवातीला दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील कुपोषण रोखण्यासाठी विशेष प्रयत्न :**

महाराष्ट्र राज्यातील कुपोषण रोखण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. या प्रयत्नांमध्ये शासनाच्या सर्व संबंधित विभागांचा सक्रिय सहभाग घेणे, राज्यात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांशी समन्वय ठेवणे व खाजगी क्षेत्राच्या व्यवस्थापन पद्धती व आर्थिक सहकार्य घेणे या बाबींचा समावेश आहे. टाटा ट्रस्ट, जिंदाल स्टिल वर्क्स, रिलायन्स फाऊंडेशन, अवंथा फाऊंडेशन इत्यादी विविध कॉपोरेट्स या कामी पुढे आलेले असून त्यांच्या मदतीने ठाणे, पालघर, नाशिक, नंदूरबार, अमरावती जिल्ह्यंमध्ये काम सुरू आहे.

बालकांच्या पोषणस्थितीचा विचार करता, महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, नंदूरबार, अमरावती (मेळघाट) व गडचिरोली हे जिल्हे कुपोषणासाठी अतिसंवेदनशिल आहे. ह्य आदिवासी भागातील कुपोषण निर्मुलनासाठी शासन विविध उपाय योजना करित आहे. महाराष्ट्रातील कमी वजन असलेल्या बालकांच्या संख्येत सातत्याने घट होत आहे. यामागे प्रामुख्याने लोक सहभागाचे विविध उपक्रम जसे मुठभर धान्य योजना, माता बैठकांच्या माध्यमातून प्रभावी समुपदेशन, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्यातून व एस. टी महामंडळाच्या सहाय्याने हिरकणी कक्षांची स्थापना इत्यादी चांगले उपक्रम सुरू आहेत. औरंगाबाद, अहमदनगर जिल्ह्यतील डिजीटल/आय.एस.ओ./मॉडेल अंगणवाडीचा आदर्श पाहून राज्यातील इतरही जिल्ह्यत मॉडेल/डिजीटल अंगणवाड्य तयार होत आहेत.

राजमाता जिजाऊ माता– बालआरोग्य व पोषण मिशन मार्फत माता सक्षमीकरणाची विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. माता सक्षमीकरणासाठी राज्यस्तावरून 'संवाद मातांशी' चा व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित कार्यक्रमातून एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी करण्यात येत आहे. माता बैठकांमध्ये मातांची उपस्थिती वाढविणे व त्यांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी भूमिका नाट्य, फिल्म शो, विविध खेळ, पाककृती, इत्यादीचा वापर करण्यात येत आहे.

कुपोषण निर्मुलनासाठी राज्यात लोकसहभागातून घडत असलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांचे एकत्रिकरण करण्यात आले असून, त्यामध्ये दिलेली माहिती एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील अधिकारी कर्मचाऱ्यांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल. लोकसहभागातून राबविण्यात आलेले हे उपक्रम राज्यातील बालकांच्या पोषणस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी फायदेशीर ठरतील असा विश्वास वाटतो.

**किवर्ड** : भारत, कुपोषन, आहार, अंधश्रद्धा, पोषण

**संदर्भ :–**

१) लोकराज्य – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन ऑगस्ट २००९
२) बालविकास केंद्र मार्गदर्शिका राजमाता जिजाऊ माता– बाल आरोग्य व पोषण मिशन औरंगाबाद
३) तारणेकर सौ. मिनाक्षी १९७६– 'आहार आणि पोषण' दत्तासन प्रकाशन, नेहरू मार्ग, नागपूर
४) युनिसेफ– बालकांचे हक्क
५) महाराष्ट्र शासन परिपत्रक– महिला व बाल विकास आयुक्तालय. १५५९९/२००७
६) पोषण–कुपोषण –ICDSपुस्तिका
७) महाराष्ट्र टाइम्स – १२ सप्टेंबर

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# कुपोषण

**डॉ.अर्चना आ निखाडे .**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
.तूप / मुरमाडी .विद्या .निर्धनराव पाटील कला महा .स्व
ताभंडारा .लाखनी जि .

**सारांश**

व्यक्तीची वाढ आणि विकास सर्वसामान्य तऱ्हेने होण्यासाठी सुयोग्य पोषण आवश्यक असतेमानवी जीवन . दैनंदिन आहारातील काही पोषक घटकांच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आजाराला कुपोषण .पोषण आहारावर अवलंबून असते कुपोषण हे आजार नव्हे तर अयोग्य आहार .म्हणतात, उपासमार, जीवनसत्वाचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो अशावेळी मुलं लहानश्या आजाराने सुद्धा अशक्त होतातकुपोषणामुळे केवळ शारीरिक वाढ व विकास नाहीतर . जसे मृत अपत्याचा जन्म .व्यक्तीच्या बौद्धिक क्षमतेवर तसेच आकलन शक्ती व वर्तनावर विपरीत परिणाम होतात, अपुऱ्या दिवसांचे मूल, पूर्ण दिवसाचे पण अपुऱ्या वाढीची मुलं इबालपणीच्या पूर्वार्धात कुपोषणा मुळे शारीरिक व . भारतातील विदर्भातील मेळघाट जिल्हा हा दुर्गम डोंगरी भाग असून येथील .मानसिक वाढ मंद होते90 टक्के लोकसंख्या आदिवासी असून येथे कुपोषणाचे प्रमाण भरपूर दिसून येते.

**प्रस्तावना :**

मानवी जीवन पोषण आहारावर अवलंबून असतेसमाजाचे पोषण हे समाजातील मानवाचे पोषण ., त्याच्या आहार व पोषण विषयक गरजाच्या पूर्ततेतील सातत्य व त्यानुसार समाजाचा पोषणात्मक विकास होत असतोयोग्य . प्रत्य .म्हणजेच पर्याप्त पोषणासाठी उत्तम दर्जाच्या पौष्टीक अन्नपदार्थाची आवश्यकता असतेेक व्यक्तीला किती प्रमाणात आणि कशा प्रकारचे अन्न मिळते यावर त्या व्यक्तीचा, समाजाचा विकास व आरोग्य अवलंबून असतेअपुरे अन्न आणि . आहार मिळणाऱ्या कुपोषित व्यक्तींच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकास योग्य प्रकारे होऊ शकत नाहीअशा व्यक्तींच्या वर्तन .ातून समाजात काही समस्या उद्भवतातकुपोषणामुळे बाळमृत्यू ., मातामृत्यू, कमी वजन प्रथिने, कॅलरी, कुपोषण, रक्तक्षय, जीवनसत्व 'अ' चा अभाव यासारख्या समस्या निर्माण होतात .

जगामध्ये कुपोषणाच्या बाबतीत भारताचा पहिला नंबर लागतोभारतात कमी वजनाची मूले जन्मण्याचे . प्रमाणदेखील सर्वात जास्त आहेकुपोषण हे सर्व .भारतात कुपोषण ही एक ज्वलंत गंभीर सामाजिक समस्या आहे . पण त्यातल्या त्यात ० ते ५ वर्षे हा संवेदनात्मक म्हणजेच विकारक्षम गट .वयोगटातील व्यक्तींमध्ये दिसून येते यात गर्भावस्था .कुपोषणाची शिकार म्हणता येईल असा वयोगट आहे, स्तनदामाता, आणि १ ते ५ वर्ष वयोगटातील घटकांचा समावेश होतो.

भारतात बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे % 40 आपल्या देशात एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ . बालकांची संख्या आहेजन्मापासून ५ वर्षापर्यंतच्या कालावधी हा बालकाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातू .न अत्यंत महत्त्वाचा असतो१ ते ४ .वाढीच्या व विकासाच्या काळात पोषक घटकांची पूर्तता न झाल्यास मुलांमध्ये कुपोषण होते .

.वर्षातील बालकांपैकी एका बालकात पोषणाची कमतरता दिसून येते५ ते १४ वर्षे वयोगटातील ३३ बालकात % मात %८८ .कुपोषणाचे एखादे तरी लक्षण आढळून येतोमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असते.

**कुपोषण म्हणजे काय :**

पुरेशा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी असक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तिला कुपोषण म्हणतात.

शरीराच्या वाढीसाठी आवश्यक योग्य पोषणमूल्ये असलेले आहार अन्न न मिळाल्यामुळे वा भूकमारीने / होणारी प्राण्यांच्या शरीराची स्थिती पुरेशा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व (अल्पवयीनांच्या :विशेषत) कुपोषण म्हणजे आजार नव्हे परंतु अयोग्य आहार .आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तिला कुपोषण म्हणतात, उपासमार व जीवनसत्त्वाच्या अभावी यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतोअसे मूल लहानश्या आजाराने सुद्धा अशक्त . अंगावर सूज येणे .उदा .दिसू लागते, मुल लडके होणे, बाळाची वाढ खुंटणे, वजन व उंची वयाच्या प्रमाणात न वाढणे यालाच कुपोषण म्हणतातदैनंदिन आहारातील काही पोषक घटकांच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आजाराला कुपोष .ण म्हणतातहा संसर्गजन्य आजार नसून बालकाच्या आहारातील प्रथिने कर्बोदके ., प्रथिने, जीवनसत्वे, खनिजे यांच्या कमतरतेमुळे होणारा आजार आहेजागतिक आरोग्य संस्थेने केलेल्या व्याख्येनुसार कुपोषण म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या . पोषण आहारातील कमतरता, अतिरेक किंवा असंतुलनकुपोषणामुळे बालकांच्या आजारपणात वाढ होते आणि बऱ्याच . .वेळा बालमृत्यूचे प्रमाण देखील वाढते

अश्या कुपोषणाचे तीन गटात वर्गीकरण केलेले आहे.

**१: उंचीच्या मानाने वजन कमी असणे (** अत्यंत कमी कालावधीत बालकाचे वजन वेगाने कमी होत जातेही लक्षणे . पुरेशा आहार म :मुख्यतिळत नसल्यास, संसर्गजन्य आजार झाला असल्यास, खूप प्रमाणात उलट्या जुलाब झालेल्या मुलांमध्ये दिसून येतातयोग्यवेळी योग्य उपचार केल्यास बाळाला .वेळीच उपचार न केल्यास बालमृत्यू होऊ शकतो . .यातून वाचवता येते

**२ : वयाच्या मानाने कमी उंची असणे (** हा कुपोषणाचा प्रकार मुख्यत्वे सातत्याने अपुरा व सकस आहार न मिळाल्याने, गरीब घरातील बालकांमध्ये, आईला योग्य व पुरेसा आहार न मिळाल्यामुळे, आई सातत्याने आजारी असल्यामुळे, बाळ सातत्याने काही न काही कारणाने आजारी पडत असल्यामुळे आणि बालकाच्या जन्मापासून त्याला योग्य व पुरेसा आहार न मिळाल्यामुळे होतो.अशा बालकांची शारीरिक व मानसिक वाढ पूर्ण होत नाही .

**३: सुक्ष्म घटकांशी संबंधित कुपोषण (** आहारातील जीवनसत्त्वे आणि खनिजांच्या कमतरतेमुळे होणारे कुपोषण होय . जीवनसत्त्वे व खनिजे बालकाच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक असलेल्या विकाराची आणि हार्मोन्सची निर्मिती करण्यासाठी मदत करतातया सूक्ष्म .अ जीवनसत्व व लोह हे मानवाच्या आरोग्यासाठीचे महत्वाचे घटक आहेत . .घटकांच्या कमतरतेमुळे विकसनशिल देशातील लहान मुले व गरोदर माता यांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे

तसेच जास्तीचे वजन आणि लठ्ठपणा एखाद्या व्यक्तीचे वजन त्याच्या उंचीच्या प्रमाणात पेक्षा खूप जास्त असणे म्हणजे जादा वजन आणि लठ्ठपणा होय.जास्तीच्या वजनामुळे आरोग्यास धोका निर्माण होतो .

**कुपोषणामुळे होणारे आजार**

बालवयातील पोषणाचा व्यक्तींच्या वाढ व विकासावर परिणाम होत असतोतसेच प्रथिनांची कमतरता ., प्रथिने कॅलरी कुपोषणामुळे झुरणी, सारखे विकार, रक्तक्षय, रातांधळेपणा, स्कव्हीं,बेरीबेरी, पेलाग्रा अस्थिमृदुता व अस्थीमंग, दातांचे विकार उद्भवतातप्रथिने ., जीवनसत्त्व 'अ', 'ड', लोह, कॅल्शियम, आयोडीन 'क', जीवनसत्व 'ब' समूहातील जीवनसत्वाच्या अभावाचे कुपोषण जास्त प्रमाणात दिसून येते.

प्रथिने कॅलरी कुपोषणामुळे १ वर्षापेक्षा कमी वयातील बालकांमध्ये मॅरासमस तसेच १ .हा आजार होतो (सुकटी) वर्षातील मुलांमध्ये 4 ते'झुरणी' या प्रथिनांच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण मोठा प्रमाणात आढळून येते . गरोदर स्त्रियाव बालकांमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण जास्त आढळून येतेत्यामुळे माता व शिशूच्या मृत्यूचे प्रमाण जास्त . रक्तातील .आहेHB म्हणजेच हिमोग्लोबिन चे प्रमाण कमी होऊन अनेक गंभीर आजार होऊ शकतातगरोदर स्त्रियांमध्ये . गंभीर रक्तक्षयामुळे अकाली प्रसूती, कमी वजनाचे मुल जन्मणे यासारखे परिणाम दिसतातआहारातील लोहाची कमतरता . विशेषतः .प्रौढांमध्ये कॅल्शियमच्या अभावी अस्थी मृदुता हा रोग होतो .हा रक्तक्षयाचा कारणीभूत पोषक घटक आहे .स्त्रियांमध्ये याचे प्रमाण अधिक दिसून येते

जीवनसत्व 'ड' १ ते ५ वर्ष वयोगटातील मुलांमध्ये जी 'ड' च्या अभावाने 'मुडदूस' हा रोग होतो यात .'ड' च्या कमतरते बरोबरच कॅल्शियम, फॉस्फरस या क्षारांच्या असंतुलनामुळे हा विकार होतो.

जीवनसत्व 'अ' च्या कमतरतेमुळे भारतीय वैद्यकीय संशोधन समितीच्या अहवालानुसार दरवर्षी १२ ते १५ हजार मुलांना जीवनसत्व 'अ' अभावी अंधत्व येतेरातांधळेपणा .,डोळे निस्तेज व कोरडे पडणे, डोळ्यांची आग होणे, डोळ्यातला ओलसरपणा कमी झाल्यामुळे डोळ्यांचा जंतुसंसर्ग रोखण्याची क्षमता कमी होते तसेच आयोडीनच्या अभावाने ग्वायटर . बालकांमध्ये त्याच्या अभावी शारीरिक व मानसि .हा आजार होतो (गलगंड)क वाढ खुंटतेशरीरावर सूज येते ., त्वचा जाड व खरखरीत होतेओठ जाड होतात .,खुजेपणा येतो याशिवाय बालवयातील लठ्ठपणा ., दातांचे विकार हे कुपोषणाचे परिणाम आहेत.

**कुपोषणाची कारणे**

भारतात केल्या जाणाऱ्या आहार सर्वेक्षणा आधारे बहुतांश लोकांचा आहार हा पोष्टिकतेच्या दृष्टीने अत्यंत अपुरा असतो असे स्पष्ट झालेले आहे.हे अपुरेपण संख्यात्मक आणि गुणात्मक दोन्ही प्रकारचे असल्याचे दिसून येते .

कुपोषणाची कारणे अनेक आहेत

**१: पोषक घटकाचे असंतुलन (** यामध्ये पोषक घटकांच्या कमतरतेमुळे किंवा आधिक्यामुळे आहार संतुलित बनतो . आधिका :सामान्यतच्या कुपोषणापेक्षा कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येतेकमतरतेच्या कुपोषणाचा . परिणाम हा बालक, गरोदर स्त्री, स्तनदा मातावर अधिक प्रमाणात दिसून येतोप्रथीने ., जीवनसत्व 'अ', 'ब', 'क' व लोहाच्या कमतरतेचे प्रमाण असल्याचे आढळून येते.

**२पुरेशा अन्नाचा अ (भाव :** व्यक्तींचे वय, लिंग, कामाचे स्वरूप, शारीरिक अवस्थेनुसार आहार व पोषक घटकांची गरज वेगवेगळी असते.त्याचप्रमाणे व्यक्तीला आहार ण मिळण्याची परिस्थिती दीर्घकाळ राहिल्यास कुपोषण होते .

**३: आजार (** कुपोषण आणि विविध संसर्गजन्य आजाराचा अतिशय जवळचा संबंध भूक शमवण्या एवढे देखील अन्न न मिळणे यामुळे कुपोषण होऊन कोणत्याही संसर्गजन्य रोगाला शरीरात प्रवेश करण्याची आयती संधी प्राप्त करून दिली जातेअतिसार ., कॉलरा, क्षय यासारख्या रोगामुळे प्रथीने, क्षाराचा नाश होतोत्यातूनच क्वाशीआरकर ., अस्थीविकृती, रक्तक्षय यासारखे आजार होतातकुपोषणामुळे शरीरावर हानीकारक परिणाम होऊन यकृत ., स्वादुपिंड ग्रंथींचे कार्य परिणामीत होवून पचनसंस्थेचे विकार, मधुमेहासारखे आजार होतात.

**४: गरिबी (** भारतात गरीबी ही एक मोठी गंभीर सामाजिक समस्या आहेपैशा अभावी या लोकांना खायला सुद्धा . एकूण लोकसं .मिळत नाहीख्येच्या दारिद्र्य म्हणजे किमान राहणीमान .दारिद्य्ररेषेखाली होते (९४-१९९३) कोटी लोक 32 राहणीमान बरोबरच पोषकघटक घेण्याची क्षमता .मिळवण्याची लोकांची असमर्थता होय, आयुमर्यादा, जन्मतः किंवा शिशू अवस्थेतील बालकांच्या मृत्युदर, बालकांचे शाळेत जाण्याचे प्रमाण इत्यादी गोष्टी दारिद्र्यात विचारात घेतल्या जातात . बहुतांश लोक अर्धपोटी, उपाशी राहतातलोकांची काम करण्याची क्षमता कमी होते व त्यामुळे ते पुरेशी अन्य खरेदी करू . .त्यामुळे कुटुंबातील लोकांचे कुपोषण होते .शकत नाहीत

**५: अज्ञान (** भारतीयांमध्ये आहार नियोजन, पोषणाविषयक ज्ञानाच्या अभावामुळे दोषपूर्ण आहार घेतला जाण्याचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून येतेविविध पोषक घटक कोणते ., त्यांचे स्त्रोत कोणते म्हणजेच कोणत्या अन्नपदार्थ पासून मिळतातवयानुसार) व्यक्तीची ., लिंग, शारीरिक अवस्थानुसारपोषक घटकांची दैनंदिन आवश्यकता या व (िषयीचे ज्ञान नसणेअन्न शिजवण्याच्या अयोग्य पद्धती ., तसेच चुकीच्या पद्धतीने आहार बनवला जाऊन कुपोषण किंवा अपुरे पोषण होऊन शरीर स्वास्थ्य बिघडते.

**६ : अंधश्रद्धा व गैरसमज (** आजही ग्रामीण भागात आजारांच्या उपचारासाठी अंधश्रद्धेचा आधार घेतला जातोआजारी . बालकाला डॉक्टरांकडे नेण्याऐवजी उपचारासाठी मांत्रिका कडे नेले जातेनुसते पाणी किंवा प्रसाद देऊन आजार बरा होणे . गोवर .ऐवजी उपासमार होवून कुपोषण होते, कांजण्या सारख्या आजारात औषध उपचार ऐवजी विशिष्ट देवीला दहीभाताचा नैवेद्य दाखवतातज्याचा परिणाम मुलांचे आरोग्य बिघडून उ .पोषण वाढतेअंधश्रद्दे बरोबरच खाण्यापिण्यात . पपई खाल्ल्यास .गरोदर स्त्रीने पालेभाज्या खाल्ल्यास अतिसार होतो .उदा .बाबत बऱ्याच गैरसमजुती मुळे कुपोषण होते गर्भपात होतो, डाळी खाल्ल्यामुळे गॅसेस होतातमहागडे पदार्थ म्हणजेच पौष्टिक पदार्थ अश्या चुकीच्या समजुतीम .ुळे कुपोषण होते.

**७: सवयी (** आहारविषयक चुकीच्या सवयीमुळे कुपोषण होतेपोषणासाठी उपयुक्त अन्नपदार्थ न खाणे किंवा एखाद्या . .पदार्थाचे सातत्याने अधिक प्रमाणात सेवन करण्याची सवय कुपोषणास कारणीभूत ठरते

८कुटुंबाचे उत्पन्न कमी असल्यास व त्या प्रमाण : **सदस्य संख्या (**ात कुटुंबातील लोकांची संख्या जास्त असल्यामुळे पुरेसा पौष्टिक आहार मिळू शकत नाही व कुपोषण होतेयाशिवाय अस्वच्छ वातावरण ., आरोग्यविषयक समस्या, व्यवसनाधिनता, अन्न भेसळ हे सामाजिक घटक कुपोषणास कारणीभूत ठरतात.

**<u>कुपोषणावरील उपाययोजना</u>**

देशात अन्नधान्याचे उत्पादन करताना कोणते खाद्यपदार्थ पौष्टिक आहेत आणि त्याची लोकसंख्येच्या प्रमाणात किती गरज आहे हे जाणून घेऊन अशा पोषक अन्न पदार्थांचे उत्पादन वाढवल्यास कुपोषणाच्या समस्या सोडविण्यासाठी

त्यांचा उपयोग होऊ शकेलत्यासाठी डाळी ., कडधान्य, दूध, अंडी, भाज्या व फळांचे उत्पादन वाढवल्यास पूर्ण प्रथिने व संरक्षण पोषक घटकांचा पुरवठा होऊ शकेलतसेच मांस ., मासे, अंडी अशा उच्च जैविक मूल्य असलेली प्रथिने, तसेच ज्यात अन्नातील सर्व आवश्यक घटक असतील असा आहार द्यावामुलांना असा आहार द्यावा ., जो सहज पचणारा असेल, ज्यात अन्नातील सर्व आवश्यक घटक असतील आणि वजनाला अनुसरून योग्य तेवढे उष्मांक शरीराला पुरविले जातील तसेच बाळाला एक ते दीड वर्षे स्तनपान करणे, बाळाला पहिला अर्धा तासात मातेचे दूध पाजणे, सहा महिन्यानंतर लगेच स्तनपानाबरोबर वरच्या आहाराला सुरुवात करावी दोन मुलांमधील अंतर कमीत कमी .3 वर्ष असावेमुलांचे सर्व . अशा प्रकारे प्रतिबंधक उपचार .अंगणवाडीचा पोषक आहार मुलांना वेळेवर व नियमित द्यावा .लसीकरण वेळेवर करावे .आहे

तसेच आहार विषयक समस्यांचे संपूर्णता निर्मूलन करण्याचा मार्ग म्हणून 'पोषण शिक्षण' प्रभावीपणे राबवून कुपोषणासारख्या रोगावर यशस्वी उपाययोजना करता येतेअंगणवाडीपासून ते शाळा ., महाविद्यालयीन स्तरावर पोषण विषयक संस्कार देऊन त्या विषयी जाणीव जागृती करणे जेणेकरून मुलांचे तसेच सर्वांचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईलया बरोबरच पूरक आहार शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करणे ., आरोग्य विषयक कार्यक्रम, पोष्टिक अन्नपदार्थांचे उत्पादन व वाटप, सर्वांगीण बालविकास योजना व इतरही कार्यक्रम याचे आयोजन केले जातातततसेच कुपोषणासारख्या . समस्या सोडविण्याच्या हेतूने आहाराविषयक समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय संघटना कार्यरत .असलेल्या दिसून येतातजागतिक स्तरावर उपाययोजना शोधून त्यावर अंमलबजावणी करताना दिसून येतात.

## संदर्भग्रंथ :

१प्रदीप आगलावे (, संशोधन पद्धती

२(नाईक) शोभा वाघमारे .प्रा (, आहारोपचार आणि सामुदाईक पोषण , शशिकांत पिंपळापुरे, विद्याबुक्स पब्लिशर्स , नोव्हेबर २०१०

३ : वेबसाईट (https://www.sanatan.org, कुपोषण, लक्षणे, प्रकार आणि उपचार, सनातन संस्था

४ (https://m.facebook.com/vikaspedia 25 feb. 2014

5) https://mr.vikaspedia.in/child-health

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# मानवी जीवनात पोषक घटकांचे महत्त्व

**प्रा. डॉ. मिनाक्षी कांबळे**
गृह अर्थशास्त्र विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
मारेगांव, जि. यवतमाळ

जेव्हा तुम्ही की मी २४ तासांपैकी १८ तास किंवा त्यापेक्षा थोडे जास्त जागृत असतो तेव्हा आपण विवीध प्रकारच्या खाद्य पदार्थाचा आस्वाद घेत असतो. आपण कधी विचार करण्याचा प्रयत्न केला आहे की आपल्या ज्या गोष्टी वेगवेगळ्या प्रमाणात आणि दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी खातो त्या खरच आपल्यासाठी आवश्यक होत्या की नाही किंवा ज्या प्रमाणात आणि वेळेत आम्ही खाल्ले ते अनुकुल होते की नाही ।

संतुलित पोषक आहाराचे महत्व मनुष्याला अगदी प्राचीन काळापासून समजले आहे. कारण त्याचे वर्णन आपल्या प्राचीन ग्रंथा मध्ये देखील आहे. महाभारतात तर स्पष्ट पणे सांगितले आहे की, योग्य प्रमाणात योग्य आहार घेणारी व्यक्ती केवल दीर्घ आयुष्य जगतेच असे नाही तर निरोगी मजबूत आणि मानसिक दृष्ट्या जागरूक राहते. खरं तर मानवाच्या मूलभूत गरजामध्ये अन्न हे सर्वोच्च आहे पण अन्न फक्त जगण्यासाठी आवश्यक आहे का? आम्हाला त्यातून आनंद सांत्वन आणि सुरक्षिततेचि भावना मिळत नाही का? आणि या सगळ्या व्यतिरिक्त जन्म, विवाह, मृत्यू यासारखे सर्व सामाजिक आणि धार्मिक विधी त्याशिवाय पूर्ण होऊ शकतात का? म्हणजेच सर्व आनंदी व दु:खी प्रसंगी अन्नाची उपस्थिती आवश्यक आहे आदर्श आहाराची व्याख्या करता येत नाही प्रत्येक मानवी शरीर स्वतंत्र यंत्रा सारखे असते म्हणून एक निरोगी पोषक आहार व्यक्ती परत ते बदलू शकतो. व्यापकपणे पाहिल्यास पुरूष, स्त्रिया, मुले, वृद्ध लोकांसाठी पोषक आहार बदलतो आणि आहार समान वय आणि लिंगाच्या व्यक्तीच्या क्रिया काळाकल्पावर अवलंबून असतो. क्रियाकल्प येथे शारिरीक श्रमाचा संबंध देते. कोणत्या व्यवसायात गुंतलेली व्यक्ती किती सक्रिय आहे याचा विचार केला पाहिजे.

**कोणत्या पदार्थापासून पोषकतत्व मिळवायचे:—**

भारतात तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, नट भाज्या, फळे, दूध आणि त्यापासून बनलेल्या उत्पादनाच्या अंतर्गत सुमारे ६६४ प्रकारच्या खाद्य पदार्थांची यादी बनवली आहे हे पदार्थ आपल्याला विविध पोषक घटक पुरवितात. हे पोषक प्रथिने स्निग्ध कर्बोदके खनिजे आणि जीवनसत्वे म्हणून ओळखले जातात या पोषक घटका व्यतिरिक्त आहारात पाणी देखील महत्वाची भूमिका बजावते. जर आपल्याला या घटका बद्दल माहिती असेल तर आपण कमी खर्चात पौष्टिक अन्न घेऊ शकतो. अन्नामध्ये असलेले कर्बोदके स्निग्ध प्रथिने ऊर्जा प्रदान करतात. एक ग्राम कर्बोदके पासून चार कॅलरी एक ग्राम प्रथिनांनपासून चार कॅलरी तर एक ग्राम स्निग्धांपासून ९ कॅलरी ऊर्जा मिळते.

**कर्बोदके**

आपल्याला प्राप्त होणाऱ्या ऊर्जेचा ६० ते ७० टक्के भाग कर्बोदकापासून मिळतो. कारण हे पोषक तत्व आपल्या आहारात मुबलक प्रमाणात असते, भारतीय आहारात अन्नधान्याची विपुलता आहे. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका, तसेच साखर, गूळ, मिठाई, जाम, जेली, केळी, बटाटा आणि इतर कंद या सर्व अन्नधान्यामध्ये कार्बोहायड्रेट्स मोठ्या प्रमाणात उपस्थितीत असतात.

**स्निग्ध**

आपण वनस्पती आणि प्राणी दोन्ही स्त्रोतांमधून स्निग्ध मिळवू शकतो. भाजीपाल्याच्या स्त्रोतामधून शेंगदाणे, मोहरी, तीळ, नारळ इत्यादी आणि प्राण्यांच्या स्त्रोतांपासून विविध प्रकारचे तेल आणि तूप, लोणी, चरबी इत्यादी मधून आपण स्निग्ध मिळवू शकतो. कारण ते कार्बोहायड्रेट्स आणि प्रथिनांपेक्षा दुप्पट जास्त ऊर्जा प्रदान करते. स्निग्ध केवळ शरीराला ऊर्जा देत नाहीत तर ते आपल्या शरीराच्या अनेक पेशींचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या उपस्थितीतच शरीरातील जीवनसत्वे 'ए', 'ड', 'ई' आणि 'के' चे शोषण शक्य होते. तेलबियांमध्येही भरपूर स्निग्ध आढळते.

**प्रथिने :**

प्रथिने हे असे पोषक आहे की जे ऊर्जा प्रदान करत नाहीत, तर शरीराच्या वाढीसाठी आणि विकासासाठी देखील आवश्यक मानले जातात. नवीन पेशींची दुरूस्ती फक्त प्रथिने करतात. स्नायूंची निर्मिती, रक्ताची निर्मिती सर्व प्रथिनांद्वारेच शक्य आहे. हेच कारण आहे की आहारात प्रथिने पदार्थाचे स्वत:चे महत्त्व आहे. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील प्रथिनांद्वारे प्रदान केली जाते. आपल्याला वनस्पती आणि प्राणी दोन्ही पदार्थांपासून प्रथिने मिळतात. कडधान्ये, सोयाबीन, मटार, हरभरा, तीळ, शेंगदाणे, सुकामेवा इत्यादी भाज्यांचे स्त्रोत आहेत, तर दूध, अंडी, मांस, मासे, चीज इत्यादी प्राणी प्रथिनांचे स्त्रोत आहेत. तसे गहु, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका इत्यादी सर्व प्रकारच्या धान्यांमधून मध्यम प्रमाणात प्रथिने देखील मिळतात. प्रथिने सामान्य व्यक्तीच्या दैनंदिन ऊर्जेच्या १०—१२ टक्के भाग पूर्ण करतात. जर प्राणी प्रथिने भाज्या प्रथिने पदार्थांमध्ये मिसळली गेली तर प्रथिनांच्या गुणवत्तेत गुणात्मक सुधारणा होते. वरील तीन पोषक तत्त्वे म्हणजे कर्बोदके, स्निग्ध आणि प्रथिने मुख्य आहेत.

प्रथिने शरीराला ऊर्जा पुरवतात, ऊर्जा देण्याव्यतिरिक्त, ते काही विधायक कार्य आणि संरक्षण प्रदान करण्याचे कार्य देखील करते. जीवनसत्वे आणि खनिजे जे अन्नामध्ये कमी प्रमाणात आढळतात. ते कवेळ शरीराच्या विविध कार्याचे नियमन करत नाहीत तर शरीराचे विविध रोगांपासून संरक्षण करतात.

**खनिज—**

आपल्या शरीराचा ४ ते ६ टक्के भाग या खनिज क्षारांपासून बनलेला आहे. या खनिज क्षारांची यादी खूप मोठी आहे. ज्यात कॅल्शियम, फॉस्फरस, सोडियम, पोटॅशियम, लोह, तांबे, जस्त, आयोडीन, फ्लोरीन इत्यादींचा समावेश आहे. परंतु दात आणि हाडांच्या योग्य निर्मिती आणि विकासासाठी कॅल्शियम जबाबदार आहे. यासह, ते हृदयाचे ठोके नियंत्रित करते, स्नायूंना

कार्यरत ठेवते आणि रक्त गोठण्याच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावते. आपल्याला दूध, दही, इतर दुग्धजन्य पदार्थ, हिरव्या पालेभाज्या, तीळ, कोथिंबीर, नट आणि नाचणी यापासून कॅल्शियम मिळते. लोह किंवा लोह घटक रक्ताच्या निर्मितीमध्ये मोठी भूमिका बजावतात. अंडी, मांसयुक्त पदार्थ, संपूर्ण डाळी, शेंगदाणे, हिरव्या पालेभाज्या, नाचणी हे चांगले साधन आहे. तसे, लोहाच्या भांड्यात अन्न शिजवून लोह घटकाचे प्रमाण वाढवता येते.

**जीवनसत्त्वे :**

जीवनसत्त्वे आपल्या आहारात अगदी कमी प्रमाणात असतात. परंतु शरीर निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या कमतरतेमुळे, विविध लक्षणे दिसू लागतात. जीवनसत्त्वे 'ए', 'डी', 'ई' आणि 'के' स्निग्धात–विद्रव्य जीवनसत्त्वे आहेत, तर 'बी' कॉम्प्लेक्स आणि 'सी' ही पाण्यात विरघणारी जीवनसत्त्वे आहेत.

**व्हिटॅमिन 'ए':**

व्हिटॅमिन 'ए' डोळ्यांच्या आरोग्याशी संबंधित आहे. हे अंधत्व टाळते. या जीवनसत्वामुळे, एखादी व्यक्ती अंधारात किंवा कमी प्रकाशात पाहू शकते. जेव्हा व्हिटॅमिन 'ए' ची कमतरता असते तेव्हा रात्री अंधत्व दिसून येते. ज्यामध्ये व्यक्ती अंधारात किंवा प्रकाशात पाहू शकत नाही. मुलांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी आणि त्वचा निरोगी आणि चमकदार ठेवण्यासाठी हे जीवनसत्व आवश्यक आहे. ते दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, तूप, फिश ऑइल, अंडी, मिल्क पावडर, गाजर, पपई, पिकलेले आंबे, हिरव्या पालेभाज्या, टोमॅटो, संत्री इत्यादींमधून मिळवता येते.

**व्हिटॅमिन 'बी'**

यामध्ये 'बी' कॉम्प्लेक्स ग्रुप १२ व्हिटॅमिनचा समावेश आहे. त्यांना एकाच गटात ठेवण्यात आले आहे कारण ते निसर्गात एकत्र आढळतात आणि त्यांची गुणवत्ता देखील एकत्र दिसते. ते शरीराच्या विविध चयापचय क्रियांमध्ये महत्त्वपूर्ण कार्य करतात. ऊर्जा म्हणून घेतलेल्या अन्नाचा वापर त्यांच्या उपस्थितीत शक्य होतो. भूक लागणे, त्वचा निरोगी ठेवणे, अशक्तपणा टाळणे, शरीराला ऊर्जावान आणि चपळ ठेवणे ही जीवनसत्त्वांच्या या गटाची कार्ये आहेत. याचे चांगले स्त्रोत अंकुरलेले धान्य आणि डाळी, यीस्ट, आंबविलेले अन्न, हाताने कुटलेले तांदूळ, हिरव्या पालेभाज्या, अंडी, दूध आणि दुधाचे पदार्थ, शेंगा, शेंगदाणे इत्यादीचा समावेश होतो.

**व्हिटॅमिन 'सी':**

हे शरीराला प्रतिकारशक्ती प्रदान करते, म्हणून त्याच्या अनुपस्थितीत विविध प्रकारचे संक्रमण दिसतात. हे लोहाचे शोषण वाढवते आणि अशक्तपणा प्रतिबंधित करते. अशा प्रकारे जखमा भरण्यास मदत होते. प्रामुख्याने हे आवळा, पेरू, चुना, संत्रा हंगामी हिरव्या पालेभाज्या टोमॅटो, अंकुरलेले धान्य आणि कडधान्यांमध्ये आढळते त्याचे प्रमाण पदार्थांमध्ये खूप कमी आहे, कारण ते उच्च तापमानावर नष्ट होते.

**व्हिटॅमिन 'डी':**

व्हिटॅमिन 'डी' शरीरात कॅल्शियम आणि फॉस्फरसचे योग्य शोषण करण्यासाठी उपयुक्त आहे. ज्यामुळे दात आणि हाडांमध्ये पुरेसे कॅल्शियम आणि फॉस्फरस आढळतात. मुलांमध्ये या व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे मुडदूस होतो आणि प्रौढांमध्ये ऑस्टिओमॅलेशिया दिसतो. ज्यामध्ये हाडे दुखणे आणि विकृत होणे दिसून येते. हे व्हिटॅमिन सूर्याच्या अतिनील किरणांद्वारे शरीरात तयार होते. हे जीवनसत्व लोणी, मलई अंड्यातील पिवळ बलक, यकृत, मासे, दुधाची पावडर आणि कॉड लिव्हर तेलापासून मिळते.

**व्हिटॅमिन 'ई' :**

हे व्हिटॅमिन प्रजनन क्षमता राखते. त्याच्या कमतरतेमुळे, स्नायूंचे विघटन वाढते, तसेच लाल रक्तपेशींचे विघटन देखील वाढते. हे व्हिटॅमिन तृणधान्यांच्या बी तेलात सर्वाधिक आढळते. तसेच, ते अंड्यातील पिवळ बलक, दुधाच्या स्निग्धमध्ये, शेंगदाणे, वनस्पती तेल, लोणी इत्यादींमध्ये देखील आढळते.

**व्हिटॅमिन 'के':**

हे व्हिटॅमिन रक्तस्त्राव थांबवण्यासाठी उपयुक्त आहे. कारण ते रक्त गोठण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्याच्या कमतरतेमुळे एकदा दुखापत झाल्यास, बरेच रक्त बाहेर येते. अंतर्गत रक्तस्त्राव देखील दिसून येतो. हे पालक, कोबी, कोशिंबिरीसाठी वापरण्यात येणारा एक पाला व त्याचे झाड, फळे, तृणधान्ये, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळते. हे शरीरातील जीवाणूंद्वारे देखील तयार केले जाते. अशा प्रकारे, वरील सर्व पोषक घटकांच्या योग्य संयोगाने पोषक आहार तयार होतो. या पोषक घटकांची कार्ये आणि स्त्रोतांशी परिचित झाल्यानंतर, त्यांना आवश्यकतेनुसार आहारात समाविष्ट केले जाऊ शकते. आपल्या आवडीचे पदार्थ निवडून आपण संतुलित आहार घेऊ शकतो.

**संदर्भ सूची**

१) पोषण व आहार शास्त्र परिचय—सरल लेले

२) पोषण आणि आहार शास्त्र – त्रिवेणी फरकाडे, सुलभा गोंगे

३) मानवी पोषण व आहार शास्त्राचे मूलतत्त्वे—आशा देऊस्कर

४) अन्नशास्त्र—सुमती कुकडे, नीता भावे

# ''मानव विकासात पोषक घटकांची आवश्यकता''

प्रा. डॉ. पल्लवी शामसुंदर देशमुख, गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जुनी, जि.गोंदिया ४४१८०७

**गोवारा:—**

अन्न ही मानवाच्या पाच मुलभूत गरजांपैकी एक महत्वाची गरज होय. अन्नामूळे अत्यंत महत्वाची निरनिराळी कार्ये केली जातात. अन्ननलिकेद्वारा शरीरात अन्न आल्यावर त्यावर निरनिराळया पाचक रसांची क्रिया होऊन अन्नाचे पचन होते व शोषनेंद्रीयांद्वारे पचन झालेल्या अन्नाचे शोषण होते. शोषण झालेले अन्न पुढील कार्य करते.

- शरीरात उष्णता व शक्ती निर्माण करते.
- नवीन पेशी निर्माण करणे व नाश पावलेल्या पेशींची झीज भरून काढते.
- शरीरावर नियंत्रण ठेवते.

एखादे यंत्र ज्याप्रमाणे कोळशाचे ज्वलन होऊन त्यापासून निर्माण झालेल्या शक्तीवर चालते त्याचप्रमाणे मानवी शरीर हे अन्नाच्या ज्वलनांने उत्पन्न होणाऱ्या शक्तीवर चालते. मानवी शरीराच्या ऐच्छिक अनैच्छिक क्रिया सतत सुरळित चालू राहण्याकरित, मेहनतीचे कार्य करण्यासाठी, शक्ती, उष्णता निर्माण होण्यासाठी अन्नाची व अन्नातील विविध पोषक घटकांची नितांत दैनिक आवश्यक्ता आहे. मानव विकासात पोषक घटकांची आवश्यकता आहे. मानवाचा विकास हा जन्मापासूनच नव्हे तर जन्मपूर्व अवस्थेपासून मृत्यूपर्यंत व्यक्तीचा विकास होत असतो. मानवाला निरोगी वाढीसाठी पोषक घटक आवश्यक असतात. अन्नामधील विविध घटकाला पोषकघटक असे म्हणतात.

**बीजशब्द** :— मानव विकास, दैनिक आवश्यकता, विकासाच्या अवस्था, जीवनसत्वे, पोषक घटक

**प्रस्तावना** :— गर्भात सामावल्यापासून मुलाच्या विकासास सुरूवात होते. मनुष्यात सतत बदल होत असतात. प्रत्येक अवसथेत होणारे बदल परिपक्वतेच्या दृष्टीने महत्वाचे असतात. हया दृष्टीने विकास कसा होतो हे माहित असणे अगत्याचे आहे. मानवाच्या सर्व अवस्थांमध्ये विकास एकसारखा गतीने होत नाही. मानवी विकासाचा वेग काही अवस्थांमध्ये अतिशय द्रुत तर काही अवस्थांमध्ये संथ असतो. मानवाचा विकास हा जन्मापासूणच नव्हे तर जन्मपूर्व अवस्थेपासून तर मृयूपर्यंत व्यक्तीचा विकास होत असतो. नवजात बालक हा सुरवातीला आपल्या आवश्यकतेची पूर्ती करण्याकरिता इतरांवर सुरवातीला आपल्या आवयश्यकतेची पूर्ती करण्याकरिता इतरांवर अवलंबून असतो. मात्र हळूहळू बालकाच्या शारीरिक अवयवांमध्ये येणाऱ्या परिपक्वतेमुळे बालक आपल्या भावना, विचार भाषेच्या माध्यमातून व्यक्त करतो. बालकाचा होणारा हा विकास म्हणजेच मानवविकास होय.

## संशोधन उद्देश :—

- दैनंदिन जीवनातील पोषक घटकांची आवश्यकता जाणून घेणे.
- दैनंदिन आहारातील पोषक घटकांचे प्रमाण विश्लेषण करणे.

## गृहितकृत्य :—

मानव स्वास्थ उत्तम राहण्यासाठी दैनंदिन आहारात पोषक घटकयुक्त विविध आहाराचा समावेश केला जातो.

## संशोधन पद्धती :—

प्रस्तुत अध्ययनासाठी द्वितीय स्त्रोताचा वापर केला असून त्या विषयासाठी संबंधीत पुस्तके, इंटरनेट, शोधनिबंध इ. साहित्याचा आधार घेवून पोषक घटकांची दैनंदिन जीवनातील आवश्यकताची माहिती संकलीत केली असून त्यानुसार मांडणी केली आहे.

## पदाच्या कार्यात्मक व्याख्या :—

- **मानवविकासाची परिभाषा :—**

  ''गर्भधारणेपासून प्रौढवस्थेपर्यंत व्यक्तीची होणारी शारीरिक वाढ, त्यातील परिपक्वता आणि होणारा सर्वांगीण विकास याची अविरत चालणारी प्रक्रिया म्हणजे मानवविकास होय.''

- **पोषक घटकाची परिभाषा :–**

  ''जे रासायनिक पदार्थ शरीरात होणाऱ्या विविध प्रकारच्या क्रिया संपन्न करण्याकरिता तसेच उत्तम स्वाथ्य राहण्याकरिता योग्य प्रमाणात आवश्यक असतात त्यांना पोषक घटक असे म्हणतात.''

**मानवी विकासाच्या अवस्था :–**

मानवाचा विकास जन्मापासूनच नव्हे तर जन्मपूर्व अवस्थेपासून मृत्यूपर्यंत होत असतो. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मानवाला विकासाच्या प्रत्येक अवस्थांमधून जावे लागते. विकासाच्या प्रमुख अवस्था खालीलप्रमाणे. ...

| अ.क्र. | विकासाच्या अवस्था | कालावधी |
|---|---|---|
| १ | गर्भावस्था (Prenatal Stage) | ९ महिने / २८० दिवस |
| २ | अर्भकावस्था (Neonatal Stage) | जन्मापासून ते दोन आठवडे |
| ३ | शौशवावस्था (Infancy) | १५ दिवस ते २ वर्षे |
| ४ | बाल्यावस्था (Childhood) | ०२ वर्ष ते १२ वर्षे |
| ५ | किशोरावस्था (Adolescence) | १२ वर्ष ते २१ वर्षे |
| ६ | प्रौढावस्था (Adulthood) | २१ वर्ष ते ४० वर्षे |
| ७ | वृद्धावस्था (Old age) | ६० वर्ष ते मृत्यूपर्यंत |

## मानवी जीवनात पोषक घटकांची दैनिक आवश्यकता

जन्मापासूनच नव्हे तर जन्मपूर्व अवस्थेपासून मृत्यूपर्यंत व्यक्तीचा विकास होत असतो. मानवाला निरोगी राहण्यासाठी पोषक घटक आवश्यक असतात. अन्नामधील विविध घटकाला पोषकघटके असे म्हणतात.

➢ कर्बोदके :–**(Carbohydrates)**

- कर्बोदके, कार्बन, ऑक्सीजन व हायड्रोजन यांच्या अणू पासून बनलेली असतात.
- मानवाला दैनंदिन जीवनात मिळणाऱ्या एकूण ऊर्जेपैकी सुमारे ६० ते ७० टक्केऊर्जा ही फक्त कर्बोदकांपासून मिळते.
- १ ग्रॅम कर्बोदकापासून साधारण ४ कॅलरी ऊर्जा मिळते.

**कर्बोदकांचे स्त्रोत**:– गहू, तांदूळ, बटाटे, रताळी, मुंग, मका, दूध, दुधाचे पदार्थ इ.

➢ प्रथिने:–**(Protine)**

- प्रथिने हा शब्द प्रोटिओज या ग्रीक शब्दापासून आलेला असून प्रथिने ॲमीनोआम्लापासून बनलेले असतात.
- मानवाला दैनंदिन जीवनात मिळणाऱ्या एकूण ऊर्जेपैकी सुमारे १० टक्के उर्जा ही फक्त प्रथिनापासून मिळते.
- शरीर निर्मिती शरीरबांधणीसाठी (केस, नखे, त्वचा) इ.साठी प्रथिने उपयुक्त असतात.
- पेशींची झीज भरून काढण्यासाठी प्रथिने आवश्यक आहेत
- १ ग्रॅम प्रथिनांच्या ज्वलनामुळे ४ कॅलरी ऊर्जा प्राप्त होते.
- शरीर मजबूत व निरोगी ठेवण्यासाठी प्रथिनांची आवश्यकता असते.

**प्रथिनांचे स्त्रोत** :– काजू, बदाम, पालेभाज्या, डाळी, शेंगा, दूध, अंडी, मांस, नारळ, दूधाचे पदार्थ इ.

- **प्रथिनांची दैनिक आवश्यकता :–**

| अ.क्र. | गट | वैयक्तिक | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|
| १ | प्रौढ पुरूष | वजन ५५ किलो | ५५ ग्रॅम |
| २ | प्रौढ स्त्री | वजन ४५ किलो | ४५ ग्रॅम |
| ३ | गर्भवती स्त्री | | ५५ ग्रॅम |
| ४ | दुग्धसर्जनकाळ | १ वर्ष पर्यंत | ६५ ग्रॅम |
| (स्त्रोत : पोषणशास्त्र ) | | | |

➢ **मेद / स्निग्धपदार्थ :–(Fat)**

- कार्बन, ऑक्सीजन व हायड्रोजन यांच्या रेणूपासून बनलेले व पाण्यात अविद्राव्य असणारे चरबीयुक्त पदार्थ म्हणजेच मेद / स्निग्धपदार्थ होय.
- मानवाला दैनंदिन जीवनात मिळणाऱ्या एकूण ऊर्जेपैकी सुमारे १५ ते २० टक्के ऊर्जा ही फक्त स्निग्धापासून मिळते.
- १ग्रॅम स्निग्धपदार्थापासून ९ कॅलरी ऊर्जा प्राप्त होते.
- त्वचेखाली असणारे मेद आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित ठेवतात.
- कोलेस्ट्रॉल हे देखील एक मेदच आहे ज्याचे प्रमाण मानवी शरीरात सुमारे ६० ग्रॅम असते. परंतू रोज मात्र त्यापैकी फक्त १ ग्रॅमच मेद वापरले जाते.

**मेदाचे स्त्रोत** :– शेंगदाणे, सोयाबीन, सुर्यफुल, मोहरी, तिळ, नारळ, तेलबिया, तेले, वनस्पतिज तूप, सरकी, लोणी, इत्यादी.
**दैनिक आवश्यकता** :– शरीराला आवश्यक असणाऱ्या कॅलरीच्या मागणीच्या ३० टक्के कॅलरी किंवा ऊर्जा ही स्निग्धपदार्थापासून मिळायला हवी. यातील ५० टक्के ऊर्जा ही वनस्पतिज तेलांद्वारे मिळायला हवी.

➢ **जीवनसत्वे (Vitamine)**

- जीवनसत्वांना त्यांच्या गुणधर्मानुसार दोन भागात विभाजित करण्यात येते.
  १. स्निग्धद्राव्य (स्निग्ध पदार्थात विरघळणारी) – जी. अ, जी.ड., जी.ई, जी.के.
  २. जलद्राव्य (पाण्यात विरघळणारी) – जी.ब. संयुक्त व जी.क.

**१.स्निग्धद्राव्य जीवनसत्वे**

❖ **जीवनसत्व 'अ' (A):–**

- पाण्यात विरघळत नाही, पण वेदात विरघळते.
- जीवनसत्व अ ला नेत्ररोग अवरोधक तत्व असे म्हणतात. कारण दृष्टी चांगली राहते.
- त्वचा कोमल, चमकदार, मुलायम व स्वस्थ राहण्याकरिता आवश्यक.
- शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याकरिता आवश्यक आहे.
- डोळ्यांचे स्वास्थ उत्तम ठेवण्यासाठी जीवणसत्व 'अ' आवश्यक आहे.

**स्त्रोत** :– पालक, लोणी, टोमॅटो, गाजर, दूध, रताळी, भोपळा, सोयाबीन, आंबा, संत्री, कोथिंबीर, अळू, प्राण्याचे यकृत, मासे, अंड्याचा पिवळा बलक इ. मध्ये जीवनसत्व 'अ' असते
**दैनिक आवश्यकता** :– प्रौढ व्यक्तीला ५००० IU जी 'अ' ची आवश्यकता असते.

❖ **जीवनसत्व 'ड' (D) :–**

- हाडांमध्ये व दातांमध्ये चुण्याचे क्षार जमून हाडे मजबूत होण्यासाठी 'ड' जीवनसत्वाची गरज असते.
- जी 'ड' च्या अभावी लहानमुलांमध्ये मुडदूस व मोठ्या व्यक्तींमध्ये अस्थिमृदूता विकार जडतात.
- रक्तातील कॅलशियमचे प्रमाण कमी होते.

- दात अशिरा व अनियमित येतात.

**स्त्रोत** :– जीवनसत्व 'ड' हे सुर्यप्रकाशात (विशेषत: कोवळे ऊन), माशांच्या तेलात, अंडे दूधपावडर, लोणी इत्यादी.

❖ **जीवनसत्व 'ई' (E) :–**

- ई जीवनसत्व पाण्यात विरघळत नाही परंतु मेदात विरघळतात.
- स्त्री व पुरूषांमधील प्रजोत्पादनशक्ती स्थिर ठेवण्यास हे जीवनसत्व महत्वाचे कार्य बजावते म्हणून याला वांझ विरोधी जीवनसत्व असेही म्हणतात.
- कमतरतेमुळे पुरूषांमध्ये नपुंसकत्व व स्त्रीयांमध्ये बंधत्व, गर्भपात

**स्त्रोत** :– तृणधान्य, गव्हाचे कोंब, पालेभाज्या, हिरवे वाटाणे, कोंडयासहित तांदूळ, नारळाचे व इतर वनस्पतीज तेल हे मुख्य स्त्रोत आहेत.

❖ **जीवनसत्व 'के' (K) :–**

- रक्त गोठण्याकरिता आवश्यक असते.
- गर्भावस्थेत ह्या जीवनसत्वाची विशेष आवश्यकता असते.
- रक्तस्त्राव थांबविण्यासाठी प्रसूतीच्या वेळी आवश्यक असते.
- याच्या अभावामुळे ॲनिमिया, कावीळ हे रोग उद्रभवतात.

**स्त्रोत** :– हिरव्या पालेभाज्या, पालक, कच्चे टोमॅटो, वाटाणा, सोयाबीन, पत्ताकोबी, फुलकोबी, डाळी, तृणधान्ये, अंडे, दूध, मासे, यामध्ये भरपूर प्रमाणात असते.

**स्निग्धद्राव्य जीवनसत्वांची दैनिक आवश्यकता**

| अ.क्र. | स्निग्धद्राव्य जीवनसत्वे | विकासाच्या अवस्था | दैनिक आवश्यकता (µg/mg) |
|---|---|---|---|
| १ | जीवनसत्व 'अ' | प्रौढावस्था<br>गर्भावस्था<br>दुग्धसृजनकाळ | ६००µg<br>६००µg<br>९५०µg |
| २ | जीवनसत्व 'ड' | प्रौढावस्था<br>गर्भावस्था<br>दुग्धसृजनकाळ | ५ µg<br>१०µg<br>१०µg |
| ३ | जीवनसत्व 'ई' | प्रौढावस्था<br>गर्भवती स्त्री<br>दुग्धसृजनकाळ | ८ mg<br>१० mg<br>१० mg |
| **स्त्रोत : पोषणशास्त्र** | | | |

२. **जलद्राव्य जीवनसत्वे**

❖ **जीवनसत्व 'क' (C) :–**

- त्वचा मुलायम व चकचकीत राहते म्हणून याला वार्ध्यक्यविरोधी जीवनसत्व असेही म्हणतात.
- लाल रक्तपेशीचे प्रमाण नियंत्रित ठेवणे, रोगांचा सामना करणे, रक्त गोठवणे साठी उपयुक्त आहे.
- 'क' जीवनसत्वाअभावी स्कर्व्ही रोग होतो. हाडातील कॅल्शियम कमी होते. किडनी स्टोन निर्माण होतो.
- जखम लवकर भरत नाही. रोगप्रतीकारकशक्ती कमी होवून संसर्ग लवकर होतो.

**स्त्रोत** :– रसाळ फळे उदा. लिंबू, संत्रे, आवळा, पेरू, टोमॅटो, आंबा, मोसंबी, अननस, द्राक्षे, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेल्या कडधाण्यात जी. 'क' चे प्रमाण अधिक असते.

### ❖ जीवनसत्व 'ब' समूह (B complex) :–

- जीवनसत्व 'ब' समूहात एकूण ११ जीवनसत्वांचा समावेश होतो.
- ही जीवनसत्वे पाण्यात द्राव्य आहे.
- ही जीवनसत्वे प्राणीज पदार्थ धाण्यातून प्राप्त होतात.
- $B_1$ (थायमीन), $B_2$ (रायबोफलेवीन), $B_3$ (नायासीन), $B_6$ (पायरिडॉक्सिन), $B_9$ (फॉलीक एसीड), $B_{12}$ (सायनोकोबलामाईन) हे याचे मुख्य प्रकार आहेत.
- 'ब' जीवनसत्वाच्या अभावामुळे तोंड येणे, गालांवर चट्टे येणे, तोंडाच्या आत फोड येणे. या खुणा दिसतात, ओठांच्या कडा चिरतात.

**जलद्राव्य जिवनसत्वांची दैनिक आवश्यकता**

| अ.क्र. | जलद्राव्य जीवनसत्वे 'ब' समुह (B Complex) | विकासाच्या अवस्था | दैनिक आवश्यकता (मि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|
| १ | जी. $B_1$ (थायमिन) | अधीक क्रियाशील प्रौढ पुरूष<br>अधिक क्रियाशील प्रौढ स्त्री<br>गर्भावसिा<br>दुग्धसृजनकाळ | १.६<br>१.२<br>+०.२<br>+०.३ |
| २ | जी. $B_2$ (रायबोफ्लेविन) | सामान्य क्रियशील प्रौढ पुरूष<br>सामान्य क्रियाशील प्रौढ स्त्री<br>गर्भावस्था उत्तरार्ध<br>दुग्धसृजनकाळ | १.५<br>१.२<br>+०.२<br>+०.४ |
| ३ | जी. $B_3$ (निआसिन) | प्रौढ पुरूष<br>प्रौढ स्त्री<br>गर्भवती स्त्री<br>दुग्धसृर्जनकाळ | १६-२१<br>१२-१६<br>+२<br>+४ |
| ४ | जी. $B_6$ (पायरीडॉक्झीन ) | प्रौढ व्यक्तीला<br>गर्भावस्थेत | १.२५ - २<br>२.५ |
| ५ | जी. $B_{12}$ ( सायनोकोबाल्मिन ) | प्रौढ स्त्री व पुरूष<br>गर्भावस्था व दुग्धसृजनकाळ | १.०<br>१.५ |
| ६ | फोलिक आम्ल | प्रौढ पुरूष व स्त्री<br>गर्भावस्था व दुग्धसृजनकाळ | १०० µg<br>४०० µg |
| ७ | जीवनसत्व 'क' | प्रौढ पुरूष<br>प्रौढ स्त्री<br>गर्भावस्था<br>दुग्धसृजनकाळ | ४०<br>४०<br>४०<br>८० |
| **स्त्रोत : पोषणशास्त्र** | | | |

### ➢ खनिज पदार्थ (Minerals) :–

- मनवी रीरात २४ टक्के खनिजद्रव्ये उपस्थित असतात. शरीरात एकूण २८ खनिजे असतात. ही सर्व खनिजे आहारातून मिळणे गरजेचे आहे.

- शरीरात उपस्थित खनिज द्रव्यांच्या मात्रेच्या आधारावर दोन भागात खनिज द्रव्याचे विभाजन करण्यात येते.

१. **मूलद्रव्यांचा मुख्य समूह :—**

कॅल्शियम, फॉस्फरस, लोहे, पोटॅशियम, सल्फर, सोडीयम, क्लोरिन, मॅग्नेशियम, सोडियम क्लोराईड.

२. **सूक्ष्म भारावश्यक मूलद्रव्य :—**

कोबाल्ट, झिंक, क्रोमीयम, आयोडीन, क्लोरीन

**यापैकी काही महत्वाची खनिजे पुढीलप्रमाणे**

❖ कॅल्शियम **(Calcium)**:–

- हाडे व दात यांच्या वाढीसाठी व मजबूतीसाठी अतिशय उपयुक्त खनिज आहे.
- वृद्ध व्यक्तीला '**ओईस्टोपोरोसीस**' नावाचा रोग होतो, हाडे कमजोर होतात, कुबड निघते, कंबर वाकते, सांधे दुखतात.
- टेटॅनी नावाचा रोग होतो. यात हातापायाला गोळे येतात.

**स्त्रोत** :— दूध, दुधाचे पदार्थ, पालेभाज्या, फुलकोबी, पत्ताकोबी, अंडे, छोटे मासे, खान्याचा चुना, वटाणा, कवचाची फळे, रागी, नाचणी, इ.

❖ लोह **(Iron)**:–

- सार्वाधिक लोह रक्तामध्ये आढळते व काही अंशी यकृत, मूत्रपिंड या इंद्रियांमध्ये असते.
- लोहाच्या कमतरतेमुळे रक्तक्षय तर अतिसंचयनामुळे सिडेरॉसिस हा रोग होतो.
- शरीरातील वेगवेगळया भागात ऑक्सीजन पुरवण्याचे महत्वपूर्ण कार्य करणारे हिमोग्लोबीन लोहयुक्त असते.

❖ आयोडीन **(Iodine)** :–

- थायरॉईड ग्रंथीकडून स्त्रवले जाणारे पोषणतत्व.
- शरीराची वाढ व विकास होण्यासाठी महत्वपूर्ण.
- कमतरतेने गलगंड हा आजार होतो यामुळे मानवाची मानसिक कार्यक्षमता कमी होते.

**खनिजपदार्थांची मानवी जीवनात दैनिक आवश्यकता**

| अ.क्र. | खनिजपदार्थाचे नांव | विकासाची अवस्था | दैनिक आवश्यकता (मि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|
| १ | कॅल्शियम | प्रौढ व्यक्ती<br>गर्भवती<br>दुग्धसृजनकाळ | ४००-५०० मि.ग्रॅ.<br>१०००-१२०० मि.ग्रॅ.<br>१०००-१२०० मि.ग्रॅ. |
| २ | फॉस्फरस | दररोज साधारणपणे | १-२ ग्रॅम |
| ३ | लोह | प्रौढ पुरूष<br>प्रौढ स्त्री<br>गर्भावस्था<br>दुग्धसृजनकाळ | २० मि.ग्रॅ.<br>३० मि.ग्रॅ. .<br>४० मि.ग्रॅ.<br>३० मि.ग्रॅ. . |
| ४ | सोडियम | गर्भवती स्त्री (पहिल ६ महिने)<br>गर्भवती स्त्री (शेवटचे ३ महीने)<br>दुग्धसृजनकाळ | ६ ग्रॅम<br>३ ग्रॅम<br>१० ग्रॅम |
| ५ | आयोडिन | प्रौढ व्यक्ती | ०.१५ मि.ग्रॅ. |
| ६ | मॅग्नेशियम | प्रौढ<br>शिशू व पूर्वप्राथमिक अवस्थेतील मुले | २००—३०० मि.ग्रॅ.<br>१००—१५० मि.ग्रॅ. |

**संशोधनातील निष्कर्ष :—**

उपरोक्त माहितीच्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, मानव विकासाच्या विविध अवस्था असून प्रत्येक विविध अवस्थेनुरूप मानवाला अन्नातील विविध पोषक घटकांची दैनंदिन अवश्यकता असते. व्यक्तीला पोषक घटाकांची आवश्यकता वेगवेगळी असते. व्यक्तींची शारीरिक क्रियाशिलता, लिंग, अवस्था, वय या घटकानुरूप पोषक घटकांची आवश्यकता असते. दैनंदिन आहारात मानवाने जर विविध पालेभाज्या, विविध डाळी, विविध कडधान्ये, फळे, कंदमुळे आदिंचा समावेश केला तर निश्चितच पोषक घटकेचा मानवाच्या शारीरिक विकासात इ ट बदल होऊन मानवाचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल. मानवाच्या वयोमर्यादित वाढ होईल. पोषकयुक्त आहाराच्या सेवनामुळे मानवाच्या आचार विचारात देखील बदल होतो म्हणूणच म्हणतात **'निरोगी शरीरात निरोगी मन वास करतो.'**

**संदर्भ ग्रंथ सूची :—**


- डॉ. मीना काळेले (२०१७), पोषणशास्त्र, मनोहर पिंपळापूरे पब्लिशर्स.
- https://shodhganga.inflibnet.ac.in
- मनोहर पिंपळापूरे, पिंपळापुरे ॲण्ड के. पब्लिशर्स.
- प्रा.दिनेशचंद्र, आहारशास्त्र, श्री.वैभव प्रकाशन
- डॉ. इंदिरा खडसे (२००८),पोषण आणि आहारशास्त्र, हिमालया पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.
- सौ. लीणा कांडलकर (२०००), मानव विकास विद्या प्रकाशन, नागपूर
- डॉ. स्नेहा महाजनी (२०१०), शास्त्रशुद्ध आहारशास्त्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

# देशाच्या विकासात गृहअर्थशास्त्राची भूमिका

( The Role and Contribution of Home-Economics in Nation Development )

प्रा डॉ. साधना डी. वाघाडे
सहाय्यक प्राध्यापक
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला , वाणिज्य व विज्ञान पदवी महाविद्यालय,
पेट्रोल पंप(जवाहरनगर ) ता.जि. भंडारा

## प्रस्तावना

देशातील कोणत्याही संस्थेची किंवा कार्याची प्रत आणि विश्वासनियता ही त्या देशाच्या आंतरराष्ट्रीय दर्जावर अवलंबून असते. जर का देशाचा आंतरराष्ट्रीय दर्जा उच्च प्रतीचा असेल तर त्या देशातील कार्याला सुध्दा चांगला दर्जा मिळतो. उदा.— जपानचा औद्योगिक क्षेत्रात इतर देशांच्या तुलनेत उच्च दर्जा आहे. कारण त्यांचा औद्योगिक विभाग जपानचा औद्योगिक दर्जा उंचावण्यास मदत करतो. याप्रकारे देशाच्या वेगवेगळया विभागांचे देशाच्या विकासांत योगदान महत्वाचे असते. देशाचा शैक्षणिक विभाग त्यांच्या शैक्षणिक विकासात योगदान देऊन आंतरराष्ट्रीय दर्जा उंचावण्यांस मदत करतो.

गृहअर्थशास्त्र विषयातून शिस्त लागते हे स्पष्ट आहे. कुटुंबासह आणि सर्व पैलूसह चांगले कुटुंब राहणे, यामध्ये कौटुंबिक जीवन, समाज बदल , राजकीय, अर्थव्यवस्था, शारीरिक परिस्थितीचा समावेश आहे. कायदे, परिस्थिती, तत्वे आणि विचारांचा अभ्यास केला जातो. गृहअर्थशास्त्र हा विषय व्यक्ती आणि कुटुंबांना मदत करण्याच्या हेतूने शोधण्यात आले. त्यात होणारे बदल व्यक्ती आणि कुटुंबाच्या दैनंदिन जगण्याच्या समग्र दृष्टिकोनात आहे. ‘‘ कुटुंबाचा आणि व्यवस्थापनाचा अभ्यास मुलभूत गरजांच्या समाधानासाठी व्यक्ती जवळ उपलब्ध असणारे संसाधने, बदलत्या वातावरणातील बदल होय.’’

विकसित राष्ट्र बनण्याच्या मार्गामध्ये बदलाची प्रक्रिया समाविष्ट आहे. विकास हा व्यक्ती आणि त्याच्या समाजासाठी जगण्याच्या अनेक पैलूमध्ये बदल होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय विकासाचा मानवी विकास नमूना आहे.विकासाच्या चौकटीत गृहअर्थशास्त्र कसे बसते? गृहअर्थशास्त्र राष्ट्रीय विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहे.विकास स्वत:च करून त्याचा उपयोग मानसांनी केला पाहिजे. राष्ट्र म्हणून, जे विकासासाठी काम करतात.त्यामुळे परिवर्तन काही प्रमाणांत सफल होतात.

चांगले जीवनमान व त्यांची गुणवत्ताचांगली राहण्यासाठी नेहमीच लोकांची इच्छा असते. गृहअर्थशास्त्राचे योगदान राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक आहे. गृहअर्थशास्त्राची भूमिका निर्धारित आणि त्यांच्या विशिष्ट ओळखण्यासाठी पूढे राष्ट्रीय विकासात योगदानाची धोरणे आहेत. राष्ट्रीय विकासाचे सध्याचे दृश्ये सरकारकडे कार्यरत आहेत. या विषयामुळे शिक्षणासह ,समाजशिक्षण, स्थानिक उद्दि टये सुधारित करून राष्ट्रीय अनुरूप शिक्षण देणे गरजेचे आहे. या अभ्यासाचे क्षेत्र किंवा शिस्ती संबंधित, महत्वपूर्ण माहिती दिली जाते यातून राष्ट्राच्या विकासांचे ध्येय पूर्ण होण्यांस मदत होऊ शकते. गृहअर्थशास्त्राचे योगदान राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक आहे. राष्ट्रीय विकासाच्या संकल्पना आणि व्याख्या ठरविली जाते.यातून मानवी विकासाचे सुधारित जीवनमान सुधारणे होय. मानवी विकास म्हणजे विस्तारीत लोकांची क्षमता आणि विस्तार करणे. अन्न, वस्त्र, आणि निवारा या मूलभूत गरजा राष्ट्रीय विकास आराखडा गतिमान होणे, चैतन्यशिल असणे. सक्षमीकरणांत मानवी विकास प्रत्यक्ष असायला पाहिजे. एकत्रित प्रयत्न, आणि सर्व विकास कार्यात लोकांचा सहभाग आवश्यक आहे. लोकांची उत्पादक क्षमता पातळी वाढवणे, व्याप्ती विस्तृतकरणे आणि उत्पन्नामुळे जीवनाची गुणवत्ता सुधारणे प्रगतीसाठी सर्व प्रयत्नांचे मार्गदर्शक तत्व आवश्यक आहे.

**सर्व विकासाच्या नियोजनामध्ये विकास करतांना खालील बाबी समाविष्ट आहेत.**

| | |
|---|---|
| १.ऊत्पन्न आणि रोजगार | २. आरोग्य आणि लोकसंख्या |
| ३.पोषण | ४. शिक्षण |
| ५.गृहनिर्माण | ६. सामाजिक कल्याण. |

<u>व्याख्या</u> :—गृहअर्थशास्त्र— १.‘‘व्यक्तिला स्वत:ची शारीरिक व भावनिक ओळख पटवून देवून जीवनविषयक शिक्षण देणारा तसेच अर्थार्जनाकरिता मदत करणारा विषय म्हणजे गृहअर्थशास्त्र.’’

२. गृहअर्थशास्त्र म्हणजे असे नियम, स्थिती, सिध्दांत तसेच आदर्शाचे अध्ययन आहे, जे मानवाच्या भौतिक वातावरण तसेच मानवीय प्रकृतीशी संबंधित **आहे.**

**उद्दिष्टे** – १. गृहअर्थशास्त्र या विषयांतर्गत येणारे विविध स्वयंरोजगार याची माहिती व्हावी व आर्थिकदृष्टया सक्षम होणे.
२. गृहअर्थशास्त्र या विषयांचे महत्व सांगून राष्ट्रविकासात होणारी मदत जाणून घेणे.

आजच्या गतिमानतेच्या व स्पर्धेच्या युगात घरातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीने कुटुंबाला आर्थिक सहाय्य करणे आवश्यक झाले आहे. त्यात घरातील स्त्री चे कुटूंबाच्या उत्पन्नातील योगदान ही काळाची गरज झाली आहे. या गरजेची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक गृहीणीने कोणतातरी लघूउद्योग, गृहउद्योग, व्यापार, व्यवसाय, नोकरी करण्याची गरज आहे.या करीता घरातून, समाजातून, स्त्रीयांना प्रोत्साहन देणे, तसेच कार्यशाळा घेवून त्यांना व्यावसायीक मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. ज्यामुळे ती उद्योग,व्यवसायात येवून तो सक्षमपणे सांभाळू शकेल. गृहअर्थशास्त्र विषयाचे ज्ञान असणा–या ज्या ज्या व्यक्तीला मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्या त्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. परंतु अशा व्यक्तींची संख्या फारच कमी आहे. ज्या देशांच्या महिला सक्षम आहेत ते देश आजही विकसित देश म्हणून ओळखल्या जातात.

ग्रामीण मुलींमध्ये व स्त्रियांमध्ये या विषयाच्या माध्यमातून तयार झालेला उद्योगजकतेचा गुण चांगल्या पध्दतीने विकसित केल्यास ग्रामीण परिसरातील सित्रयांना स्वयंरोजगार उपलब्ध होईल. रोजगाराच्या नविन सोयी निर्माण होतील. स्त्रियांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ होईल.बेकारीची तीव्रता कमी होईल.ग्रामीण जीवनात संपन्नता निर्माण होईल.महिलांची आर्थिक उन्नती झाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल गावांचा विकास पर्यायाने देशाचा विकास होईल. देशाच्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा वेग वाढेल. महिलांनी शिक्षण व प्रशिक्षण घेवून उद्योजक क्षेत्राकडे वळल्यांस त्यांच्या कुटूंबाचा, देशाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

जगातील विकसनशील देशात २०० दशलक्ष महिला गृहअर्थशास्त्राचा अभ्यास करून काम करीत आहेत. हे प्रमाण उद्योग क्षेत्रात अर्धे आहे. दिवसेंदिवस सुशिक्षित महिलांचे प्रमाण वाढत आहे. म्हणून देशाच्या आर्थिक विकासांत महिलांचे योगदान महत्वाचे आहे. महिला आर्थिकदृष्टया सक्षम झाल्या की, कौटुंबिक आणि सामाजिक दोन्हीही बदल घडवून आणू शकतात. म्हणून उद्योग व अर्थव्यवस्था या क्षेत्रात महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण वेळोवेळी दिले पाहिजे महिलांमध्ये उद्योजकता व व्यावसायीक कौशल्यात वाढ व्हावी यासाठीच हे सर्व उपक्रम संयुक्त राष्ट्रसंघ राबवित आहे. समाजातील सर्व घटकांची आर्थिक भरभराट व्हावी, निरोगी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्नशील आहे.

आजच्या युवा पिढीचा कल हा जास्त नोकरीकडे दिसून येतो. पूर्वीच्या काळी शिक्षीत तरूणवर्ग कमी होता. त्यामुळे त्यांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होत्या. परंतू सामाजिक परिवर्तन व विज्ञानाच्या विकासामुळे बेकारीची समस्या निर्माण झाली आहे. बेकारीची समस्या कमी करण्यासाठी गृहअर्थशास्त्र या विषयाचे ज्ञान घेतलेल्या स्त्रीयांना अनेक प्रकारचे उद्योगधंदे करण्याची संधी प्राप्त होत आहे. कुठल्याही प्रकारचा उद्योगधंदा सुरू करण्यासाठी व्यक्तीजवळ जास्त मेहनत ,श्रम, कष्ट करण्याची तयारी असावी लागते. तसेच जिद्द व महत्वाकांक्षा असेल तर तुम्ही उद्योगामध्ये चांगले यशस्वी होवू शकता. यातून तुमचा विकास होतो, पर्यायाने राष्ट्राचा विकास होतो.

भारताच्या विकासात आमुलाग्र बदल घडवून कोठारी आयोगाने शिक्षणाला व्यवसायाभिमुख करण्यावर भर दिला पाहिजे असे शिक्षणाचे धोरण सुचविले आहे. गृहअर्थशास्त्र या विषयाचा अभ्यासक्रम उद्योगधंद्याची निर्मिती करण्यासाठी अनुकूल आहे. गृहअर्थशास्त्र हा जीवनाशी सांगड घालणारा उपयोजनशील विषय असल्यामुळे मानवाच्या गरजेची पूर्ती करण्याची क्षमता या विषयात आहे. म्हणूनच गृहअर्थशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या गृहिणी अनेक प्रकारचे उद्योगधंदे करून आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करू शकतात. त्यातून कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा, विकास होऊ शकतो.

**गृहअर्थशास्त्र विषयाचे शिक्षण घेतलेल्या व्यक्ती खालील प्रकारचे उ़द्योग सुरू करून अर्थार्जन प्राप्त करु शकतात**.:–

१.अन्नउद्योग
२. वस्त्रउद्योग
३. मानव विकास आणि कौटुंबिकसंबंध
४. कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन
५. गृहअर्थशास्त्र विस्तार

गृहअर्थशास्त्र विषयांचा मुख्य उद्देश उत्तम घर आणि समृध्द कौटुंबिकजीवन प्रदान करणे हा आहे.कुटुंबातूनच पुढे समाज तयार होतो. म्हणूनच पर्यायाने या विषयामुळे सुखी, आनंदी आणि समाधानी समाजाची निर्मिती होते. गृहअर्थशास्त्रात शिकविण्यांत येणारे विविध विषय वेगवेगळया मार्गानी देशाच्या विकासात योगदान देत आहेत ते खालीलप्रमाणे.

१. **सुखी आणि समाधानी कुटुंब आणि भावी पिढीची, समाजाची निर्मिती** :– प्रत्येक राष्ट्राची उभारणी, प्रगती हे नागरिकांच्या उत्कृष्ट स्वास्थ्य व आदर्शावर अवलंबून असते.बालकांना स्वास्थ्य व कौटुंबिक प्रेमाचीनितांत गरज असते. आजची बालके उद्याच्या देशाचे नागरीक होणार असतात.मुलांवर चांगले संस्कार झाल्यांस त्यांच्यात सन्मान आणि श्रध्दा इ. गुणांचा विकास होतो, जो चांगल्या राष्ट्रनिर्मितीला आवश्यक ठरतो. घराच्या माध्यमातून समाजाला पोषक अशा सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन आणि संकलन होत असते. घराची मुख्य जबाबदारी गृहिणीचीच असल्यामुळे तिच्यावर घरातील खूप जबाबदा–या असतात. जर गृहिणीने या विषयाचा अभ्यास केला असेल तर ती चांगले नागरिक निर्माण करू शकते, घडवू शकते. त्यांच्यावर चांगले संस्कार करु शकते.

गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थीनी नोकरी किंवा स्वयंरोजगार करतात, त्यामागे फक्त ज्ञानाचा प्रसार करून संशोधन आणि विस्तार शिक्षणाचा प्रसार करत नाहीत तर त्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न वाढवितात आणि कुटुंबाच्या सुख आणि समाधानात भर टाकतात, ज्याचा उपयोग देशाच्या विकासात नक्कीच होतो. मर्यादित साधनसंपत्तीचा अपव्यय कसा टाळावा कमीत कमी साधनसंपत्तीच्या मदतीने मोठयातमोठे ध्येय गाठण्यासाठी योग्य व्यवस्थापन कसे करावे याचे ज्ञान या विषयाव्दारे गृहिणींना मिळते. त्यांना मितव्ययता शिकवून देशाच्या साधनसंपत्तीची बचत करण्यांस मदत होते आणि समाजाचा जीवनस्तर उंचावण्यांस मदत होते.

२. **साधनसंपत्तीचा युक्ततम उपयोग** :– स्त्री ही भावी पिढीची निर्मिती आहे. गृहिणीने गृहअर्थशास्त्राचा अभ्यास केलेला असल्यास ती देशाच्या भौतिक साधनसंपत्तीची बचत करू शकते. उदा– आहारशास्त्राच्या शिक्षणाअभावी खाद्यवस्तूंच्या निरूपयोगी समजल्या जाणा–या भागाचा जास्तीत जास्त उपयोग करण्याचा प्रयत्न या शिक्षणाच्या सहाय्याने केला जातो. उदा. फुलांची व फळभाज्यांची साल काढून टाकणे,पोळीची कणिक चाळून घेणे,शिजविलेल्या भाज्या,वरण,भात, यावरील पेज काढून टाकणे. या अनिष्ट गोष्टी टाळून मर्यादित साहित्याचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेतला जातो व त्यामुळे देशाच्या भौतिक साधनसंपत्तीची बचत केली जाते व सर्वांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.

३. **स्वास्थ्यपूर्ण निरोगी समाजाची निर्मिती** :– या विषयांतर्गत कमीत कमी पैशात समातेल आहार कसा घ्यायचा या बद्दल माहिती आणि प्रात्यक्षिके, दाखविली जातात. त्यामुळे सगळयांचे स्वास्थ्य सुधारण्यांस मदत होते. या विषयामध्ये वेगवेगळया रोगांवर आहारोपचार सुचविले जातात. ज्या भागात कुपोषणाची परिस्थिती असेल तिथे त्यांची कारणे शोधून त्यावर उपाय योजना करण्यासाठी सतत संशोधन केले जाते आणि त्यावरुन शासनाला कुपोषणासारख्या समस्येवर ठोस उपाय करण्यांस मार्गदर्शन व मदत केली जाते. अशा प्रकारे समाजाचे स्वास्थ्य सुधारून निरोगी समाजाची निर्मिती केली जाते.

४.**संस्कृतीचे जतन** :– भारत हा विविध धर्म संस्कृतीने नटलेला देश आहे. येथे प्रत्येक धर्म ,जात, त्यांचे रीतीरिवाज,रूढी,परंपरा, यात खूप अंतर आहे. भिन्नता आहे.या विषयाच्या शिक्षणामुळे गृहिणीला विविध खाद्यसंस्कृती, परंपरा, रीतिरिवाज, या विषयीचे ज्ञान मिळते.देशाच्या विकासात एकात्मतेला व असमानता, विषमता कमी होण्याला फार महत्वपूर्ण स्थान आहे. व हया बाबी गृहअर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे शक्य होऊ शकतात.

५. **नवीन गोष्टींना सामावून घेणे** :– भारतात पूर्वापार चालत आलेल्या रीतिरिवाजांना फाटा दिल्याशिवाय नवीन गोष्टी देशात लागू करणे शक्य होत नाही. व देशाच्या विकासाला चालना मिळणार नाही. देशाच्या प्रगतीला आवश्यक नवीन बदल, नवीन बाबी लागू केल्यास देशाची प्रगती होईल व पर्यायाने आपण सर्वांची प्रगती होईल असे जनजागरण होईल याच दृ टीकोनातूनदेशाच्या विकासाला हातभार लावले जाते.

६. **मुलांचे योग्य संगोपण** :– या विषयात मुलांची वाढ व विकास कसा होत असतो याचे शिक्षण दिले जाते. मुले ही देशाची फार मोठी संपत्ती आहे. सुदृढ, सशक्त, सुविकसीत मुले भवि यकाळात देशाचे नेतृत्व करण्यांस समर्थ असतील. देशाच्या सर्वांगीण प्रगतीत सिंहाचा वाटा आहे.

७. **कपडा उद्योगात मोलाची मदत** :– भारतातून ब–याच देशामध्ये तयार कपडयाची निर्यात फार मोठया प्रमाणांत केली जाते. फॅशन डिझाइनिंग, टेक्सटाईल डिझाइनिंग , गारमेंट मॅन्युफॅक्चरींग, हे सर्व विषय गृहअर्थशास्त्रातर्गत शिकविले जातात. या विषयाचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थीनी कपडे तयार करण्याच्या उद्योगांत महत्वाचे कार्य करतात. व भारतास परकीय चलन मिळवून देण्यांस मदत करतात. प्रांतीय भरतकाम, वस्त्रशास्त्र, हे गृहअर्थशास्त्र या एका शाखेअंतर्गत शिकविले जाते.


८. **विस्तार शिक्षणांत सहभाग व भरीव कार्ये** :— विस्तार शिक्षणाचा अभ्यास केलेल्या गृहिणी देशातील ग्रामीण भागात राहून जनतेला साक्षर करू शकतात. आजही भारताची ७० ते ८० °/॰ जनता ग्रामीण भागात राहते आहे. त्यांचा विकास म्हणजे देशाचा विकास होय.

गृहअर्थशास्त्र या विषयांत कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण, व लोकसंख्या शिक्षण हे विषय शिकविले जाते. त्यामुळे सेवाभावी संस्था आणि शासन संस्थांच्या सोबत त्याचा प्रसार होतो. आणि लोकसंख्या नियंत्रण व लोक कल्याण करण्यांसम दत होते.

९. **स्वयंरोजगाराची संधी मिळून उद्योग वाढविणे** :— गृहअर्थशास्त्र हा मुख्यत: स्त्रीयांसाठी शिकविण्यात येणारा विषय आहे. हा विषय बराच लोकप्रिय आहे.यातील ब—याच विषयाचे ज्ञान प्राप्त करून स्वत:च्या पायावर उभे राहून अर्थार्जन मिळवून कुटुंबाला हातभार लावले जाते. स्त्रीयांना शिक्षित करुन आत्मनिर्भर करण्याचे कार्ये या विषयाव्दारे केले जाते. याचा परिणांम देशाच्या विकासावर फार जास्त होतो. अशाप्रकारे देशाच्या विकासात गृहअर्थशास्त्राची भूमिका फार महत्वाची आहे.

**गृहअर्थशास्त्र आणि त्यांचे विविध क्षेत्रे**

Home- Economics and Its Specialized fields




**गृहअर्थशास्त्रांतर्गत अनेक विशेष क्षेत्र म्हणून ओळखली जातात ती खालील प्रमाणे आहेत.**

१. **कला आणि विज्ञान**— या क्षेत्रातील व्यावसायीकांना वैयक्तिक आणि कौटुंबिक ग्राहकांची अत्यंत गरज आहे. कौटुंबिक गरजा हाताळण्यासाठी कलात्मक आणिवैज्ञानिक कौशल्यावर आधारीत आहे.

अ) अन्न विज्ञान आणि पोषण	ब) कपडे , वस्त्र, फॅशन आणि संबंधित कला.

क) आतील रचना, फर्निचर, आणि घरातील सामान	ड) गृहनिर्माण आणि घरगुती उपकरणे.

२.व्यवसायातील (स्पेशलायझेशन ) विशेषज्ञता / पारंगत– गृहअर्थशास्त्र पूर्वसंध्येला व्यवसायात अभ्यासाची क्षेत्रे आहेत. अभ्यासाचे प्रमुख क्षेत्र कुटुंब आणि नातेवाईक, पदवीधर, आणि घरून आईकडून उत्पादन कौशल्य ताब्यात घेतले जाते. ग्राहक आणि कुटुंबाच्या गरजांचे ज्ञान, उत्पादन करण्याची कौशल्ये आणि उत्पादने व सेवा जे गरजा पूर्ण करतात आणि उद्योजक, भावना व प्रशिक्षण त्यांना जोडतात. व्यावसायीक विकासात प्रगती खालीलप्रमाणे गृहअर्थशास्त्र क्षेत्रातून प्राप्त होते.

अ) उद्योजकता. ( Entrepreneurship )  ब) सेवा उद्योग (हॉटेल्स, आणि संस्था )

क) अन्न सेवा  ड) व्यवसाय समर्थन सेवा.

३.शिक्षण आणि विस्तार सेवांमधील स्पेशलायझेशन– सध्या शिक्षणक्षेत्रातील कॅरिअर हे गृहअर्थशास्त्राशी संबंधित व लोकप्रिय आहेत. गृहअर्थशास्त्राच्या ज्ञानाचे विस्तृतपणे प्रसार होवून व्यावसायीक शिक्षण प्राप्त झाले आहे.

अ) गृहअर्थशास्त्र शिक्षण  ब) पूर्वबालविकास शिक्षण

क) प्रौढ शिक्षण  ड) विशेष क्षेत्रात तृतीयक शिक्षण.

ई) व्यावसायीक आणि तांत्रिक शिक्षण

४. मानवी सेवामध्ये स्पेशलायझेशन– मानवी सेवा समाजाच्या अभ्यासाच्या क्षेत्रामध्ये सर्वात महत्वाचे आहे. त्यामध्ये लोकांना मदत केली जाते. कौटुंबिक आणि बाल अभ्यासक्रमाचा पाया या विषयानुसार तज्ज्ञव्यक्तीकडून गेली जाते. विज्ञान, मानवतावादी विषयातील विशेष शिक्षण जसे– मानवी आणि घरगुती संसाधन, व्यवस्थापन, प्रौढ शिक्षण, कामाचे अनुभव, व्यावहारिक आणि सेवामध्ये स्वयंसेवक नियुक्त केले जातात.

अ) कौटुंबिक जीवन आणि बालविकास  ब) कौटुंबिक समुपदेशन आणि मार्गदर्शन

क) सामुदायीक पोषण

हे सर्वात समाधानकारक तज्ञापैकी एक आहे कारण हे व्यावसायीकांना मदत करण्यांस सक्षम आहे. अभ्यासाची ही क्षेत्रे कौटुंबिक समस्यांचे निराकरण करण्यांस मदत करतात.

५.सार्वजनिक धोरण / सरकारमध्ये विशेषज्ञता– कौटुंबिक आणि ग्राहक क्षेत्रात व्यावसायीक संधी प्राप्त होते. गृहअर्थशास्त्रज्ञांसाठी जे कुटुंब , समुदाय आणि सेवा देण्यावर विश्वास ठेवतात.

सारांश :–कुठल्याही देशाचा विकास व्हायचा असेलतर त्या राष्ट्रातील नागरिकांचे स्वास्थ्य उत्तम असावे. तसेच नागरिक शिक्षित असणे आवश्यक आहे. घरातील गृहिणी शिक्षित असेल तर ती स्वत:चा विकास तर साधते,पण त्याचबरोबर ती कुटुंबातल्या इतर सदस्यांचा विकास साधण्यासाठी मदत करते व पर्यायाने राष्ट्राचा विकास साधण्यास मदत होते. गृहव्यवस्थापनाचे शिक्षण घेतलेले असल्यामुळे स्त्री घरातील व्यवस्थापन योग्य त–हेने करु शकते.तसेच आहारशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या स्त्रिया त्यांच्या ज्ञानाचा उपयोग घरात करीत असल्यामुळे तिच्या कुटुंबातील सदस्यांचे स्वास्थ्य चांगले राहते. तसेच कुपोषित व्यक्तिंना चांगले आहार देवून उपाययोजना करू शकते. स्वस्त व स्थानिक पदार्थांचा उपयोग करून समतोल आहार कसा द्यावा याची माहिती मिळते. त्यामुळे निरोगी कुटुंब तयार होऊन निरोगी समाज तयार होऊ शकतो.

या विषयाचे शिक्षण घेतल्यामुळे गृहिणींना आपल्या मुलांचे संगोपन करण्याच्या पध्दती माहिती होतात. मुलांचा विकास योग्यरितीने होण्यास मदत करतात.तसेच त्यांच्या विकासात काही समस्या असल्यास त्या ओळखून समस्या दूर करण्यांसप प्रयत्न करतात.त्यामुळे शिक्षित ,सुदृढ नागरिक तयार होतात.व राष्ट्र विकासाला हातभार लावतात. भारतातील प्रांतीय भरतकला प्रसिध्द आहे. अतिशय सुंदर व रेखीव असे भरतकाम असल्यामुळे त्याची मोठया प्रमाणावर निर्यात केली जाते. तसेच Dress Designing, Textile Designing शिकलेल्या विद्यार्थिनी कपडे बनवण्यात मोलाची मदत करतात. याव्दारे भारताला परकीय चलन प्राप्त होते व त्यामुळे देशाचा विकास होण्यासाठी मदत होऊ शकते.

हा विषय शिकलेल्या विद्यार्थिनी स्वयंरोजगार करू शकतात. स्वत:चा आर्थिक विकास करू शकतात. व कुटुंबाच्या विकासात हातभार लावू शकतात. हया विषयाचे शिक्षण घेतल्यानंतर खेडयातील स्त्रियांना शिक्षण देवून त्यांच्यामध्ये

जागरूकता आणल्या जाऊ शकते. त्यांच्यामध्ये शिक्षणाबद्दल जागरूकता वाढविल्या जाते. तसेच ग्रामीण भागात कुटुंब नियोजनाबद्दल माहिती दिल्या जाते. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवल्या गेल्यास देशाचा विकास होण्यास मदत होऊ शकते.

या विषयाचे शिक्षण घेतलेल्या गृहिणी रोजगार किंवा स्वयंरोजगार प्राप्त करून अर्थार्जन करतात त्यामुळे कुटुंबाचा विकास होण्यास मदत होते तसेच गृहिणीत देखील आत्मविश्वास निर्माण होतो. व या सर्वांचा परिणांम समाजाचा व देशाचा विकास होण्यामध्ये होतो.

## संदर्भ ग्रंथ

१) कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन :— डॉ. विद्या कोल्हटकर
२) गृहव्यवस्थापन आणि आंतरिक सजावट :— डॉ.सुनंदा वसू , डॉ. रजनी मेहरे
३) गृहव्यवस्थापन आणि गृहसजावट :— डॉ. मीना काळेले
४) गृहअर्थशास्त्राची मूलतत्वे :— डॉ. लिना कांडलकर
५) गृहव्यवस्थापन आणि गृहकला :— डॉ. इंदिरा खडसे
६) कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट :— फरकाडे / गोंगे
७) www.google.com

# नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या आहार विषयक समस्या

**प्रा. डॉ. संगीता घुईखेडकर**
मुंगसाजी महाराज महाविद्यालय,
दारव्हा, जि. यवतमाळ
विभाग प्रमुख :- गृहअर्थशास्त्र

**सारांश:-**

स्त्री ही समाजाचा कणा किंवा अविभाज्य घटक आहे. आहार ठरविण्यापासून ते खाऊ घालण्यापर्यंतचे सर्व काम स्त्री करते. पण दुर्दैवाने स्त्रीच्या आरोग्याचे महत्व तिला वाटत नाही. कामाच्या व्यापात ती स्वत:च्या आहाराबाबत कायमच निष्काळजी असतो. विशेषत: नोकरी करणाऱ्या स्त्रि या अशा स्त्रियांनी आपल्या आहाराचे नियोजन कसे ठेवावे, हे सांगणारी एक मार्गदर्शिका केली तर हा आरोग्याचा केंद्रबिंदू माणून तिची लहानपणापासून अखेरपर्यंत जोपासना केली तर समाजाची नाही तर देशाची आरोग्याची पातळी निश्चितच उंचावेल.

**प्रस्तावना :-**

पृथ्वीवर अगदी इतिहास काळापासूनच महिलांचे स्थान हे अनन्य साधारण आहे. शिक्षणाच्या बाबतीत विचार केला तर स्त्री ही पुरूषांच्या तुलनेत बरोबरीने आली आहे. स्त्रीही मुलगी, बहिण, माता, मैत्रीण अशा विविध भुमिका पार करत जीवनाच्या रंगमंचावर ताठ मानेने आणि अभिमानाने उभी आहे. तर आज महिलेने यशाच्या शिखरावर गरूड झेप घेतलेली आपण पाहतो. एका महिलेला सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिले जाते. अगदी सोळाव्या शतकात सुध्दा राणी लक्ष्मीबाई, भारतातील पहिली प्रशासक महिला रजिया सुलतान, राजमाता जिजाऊ, स्वातंत्र्योत्तर काळातील सरोजीनी नायडू, देशातील पहिल्या मुख्यमंत्री सुचेता कृपलानी, पहिल पंतप्रधान इंदिरा गांधी, पहिल्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, महिला पोलीस अधिकारी यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. म्हणजेच कालची अबला म्हणून हिणविले जाणारी स्त्री जगाच्या दृष्टीकोणातून यशाच्या शिखरावर विराजमान आहे.

मुलगी कितीही शिकली तरी शेवटी चुल आणि मूलच सांभाळायच आहे. अशी मानसिकता ही ठाणमांडून आहे. पण "मुलगी शिकली प्रगती झाली" अशा संस्कारातून गेली तर स्त्रियांच्या जिवनाला खरा अर्थ प्राप्त होईल.

स्त्रीच कुटुंबाचा आहार ठरविते, तयार करते, सर्वांना देते. अन्नाची विवंचना करते व अखेरपर्यंत संसाराचा गाडा ओढते. तसेच प्रजननही तीच करते. या सर्वांसाठी आहार शास्त्रच्या दृष्टीकोणातून तिला पोषक तत्वाची पुरूषांपेक्षा जास्त गरज असते. परंतु आजही तिला समाजात दुय्यम स्थान आहे. याला जबाबदार ती स्वत:च आहे. तिला आहाराच्या मुलतत्वांचा आरोग्याशी असणारा संबंधच माहितीनाही. स्वत:च्या आरोग्याचे महत्वही वाटत नाही. कारण खाणे म्हणजे केवळ, पोट भरणे अशीच समजून असल्यामुळे वेगवेगळ्या पाककृती करून अन्न

शिजवीणे व ते आग्रह करून खाऊ घालणेव कुटुंबाला खुश करणे, यालाच ती प्राधान्य देत असते. याला सर्वात महत्वाचे कारण म्हणजे आहाराबाबत अज्ञान हे सुध्दा आहे.

स्त्री हा समाजाचा एक महत्वाचा घटक आहे. त्यात आता नोकरी करणाऱ्या स्त्रिांचा आकडा वाढत आहे. खरं म्हणजे स्त्रिला तिच्या जीवनाच्या प्रत्येकच महत्वाच्या पायरीवर सत्वयुक्त संतुलीत आहाराची गरज असते, उदा. जन्मानंतर पहिली पाच वर्षे, नंतर वयाची 7 ते 14 वर्षे, पौगंडावस्था, विवाहानंतर गर्भावस्था, प्रसुतीनंतर मासीक पाळी बंद होताना परंतु सर्वात अधिक पोषक तत्वांची गरज नोकरी करणाऱ्या स्त्रीची आहे. तिला दिवसाच्या चोवीस तासात अठ्ठवीस तासांचे काम करण्याची क्षमता हवी असते. कारण या काळात ती तिहेरी भुमिका बजावीत असते.

**1)**मुलांना जन्म देऊन वाढविणे, त्यांच्यावर संस्कार घडवीणे, त्यांचा अभ्यास घेणे, त्यांच्या कलागुणांची वाढ करणे.

**2)**घर सांभाळणे, स्वयंपाक, नोकर-चाकर, किराणा, बाजारहाट सांभाळणे.

**3)**आणि जोडीला नोकरीचा ताण व जबाबदारी.

या सगळ्या कामामध्ये तिचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम असणे महत्वाचे आहे. आईचा आहार आधीच अपुरा असेल तर याचा परिणाम तिच्या गर्भावरही होतो. काही वेळेस बाहात जन्मजात दोषही राहू शकतात. नोकरी करणाऱ्या स्त्रिांना खूप जबाबदारी साभाळावी लागते. त्यांची खूप ओढाताण होते. लहान मुलांना घरी किंवा पाळणाघरात सोडून नोकरीवर जातांना तिच्या जीवाची घालमेल होत असते मुलं मोठी झालयावर वेगळ्या प्रकारच्या काळजीचा पाठपुरावा करावा लागतो. चाळीशी नंतर थोडी स्थिरता येते. परंतु प्रकृतीच्या तक्रारी तोंडावर काढू लागतात. नंतर मासीक पाही बंद होतानांच्या त्रासापायी अशक्तपणा, डिप्रेशन, एकटेपणा, आपली कोणाला गरज नाही ही भावना सतत भेडसावत राहातो. या सर्व ताणतणावातून सुखरूप जाण्यासाठी लहापणा पासूनच तिची आरोग्याची पातळी उत्तम असावयास पाहिजे. त्याकरिता अगदी कायमच तिला योग्य आहाराची नितांत गरज असते. त्यात केलेली चालढकल, उपासतापास, दुर्लक्ष यामुळे पुढे चाळीशी नंतर महागात पडते.

निम्न वर्गातील नोकरीवर जाणाऱ्या स्त्रियांची अवस्था खुप वाईट असते. स्वत:च्या खाण्यापिण्याकडे लक्ष द्यायला तिला सवड नसते. कामाच्या व्यापात व गरीबीमुळे ती उरल सुरल, शिळे अन्न ती खाते तर कधी-कधी उपाशीच राहते. यामुळे होणाऱ्या आहार घटकांच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारक शक्तीच्या अभावापायी लवकरच तिचे शरीर थकते. योग्य ते घटक न मिळाल्यामुळे नवीन जोमदार पेशीची निर्मिती करण्यास तिचे शरीर असमर्थ होते. रक्तक्षय, डोकेदुखी, पाठदुखी, अपचन, जीवघबराहोणे, पाळीच्यातक्रारी, पांढरेपाणीजाणे, थकवा, भूकनसणे, सांधे दुखीसारख्या तक्रारीसुरू होतात. याच तक्रारीपुढे एखाद्या रोगाचे उग्ररूप धारण करतात.

स्त्रियांच्या आहारात मुख्यत्वे प्रथीने, लोह, कॅल्शीअमचा खूप अभाव आढळतो. आणि याच पोषक तत्वाची स्त्रिला अत्यंत आवश्यकता असते. स्त्रिच्या शरीरातून दर महिन्याला पाळीमुळे चार दिवस व्यय होत असतो. तो आहाराव्दारेच भरून काढायचा असतो. बऱ्याच स्त्रिया सकाळी नाश्ता करीत नाही. जेवणात फक्त भाजी पोळीच घेतात. दुपारी फक्त चहाच तर रात्री परत भाजी पोळीच असते. वरण फक्त आठवड्यातून एक किंवा दोनदाच असते म्हणून प्रथिनांचा अभाव होतो.

मोठ्या शहरामध्ये जसे पुणे, मुंबई येथे नोकरी करणाऱ्या स्त्रिंचा आकडा खूप मोठा आहे कितीतरी स्त्रिया काही न खाता पिताच सकाळी लवकर घर सोडतात. लोकलने, बसने दूरवर कामाला जातात दुपार करता कोणी भाजी पोळीचा डबा नेतात तर काही जणी डबे बोलावतात. काही जणी तर वडापाव वर राहतात. स्त्री घरी पोहचायला अनेकाना उशीर होतो. मग शॉर्टकट किंवा एकांगी अन्न प्रकारावर निभवितात, अशा तऱ्हेने पोषक तत्वाची गरज भागविल्या जात नाही. तर नंतर प्रकृतीच्या तक्रारी सुरू होतात. अशा स्त्रिया अकाली चवार्धक्याकडे झुकलेल्या दिसतात.

मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गीय नोकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये कुपोषण आढळते. ते कमी खाण्यामुळे नसून अयोग्य खाण्यामुळे असते. या स्त्रिया पौष्टीकतेच्या भ्रामक कल्पना घेऊन स्वयंपाक करतात किंवा करवून घेतात. सुशिक्षित असूनही त्यांच्यात आहार शास्त्राबद्दलचे अज्ञान असते. त्यांची दिनचर्या बघितली तर सकाळीच हा जोडील बिस्कीटे नंतर घरातील कामे, स्वयंपाक व काहीच न खाता अगदी घाईघाईने कामावर जाणे, दुपारी भाजी पोळीचा डबा आणि 2-3 वेळा चहा तसेच कधी समोसे, कचोरी, वडापाव व रात्री चौरस आहाराचे जेवण, अशा दिनचर्येतून हवे तितके प्रथीने, कॅल्शीअम, लोह व इतर महत्वाचे अन्न घटक मिळत नाही. वरील दिनचर्येतून केवळ 1300 ते 1500 कॅलरीज मिळतात. आहारघटकांच्या तालिके प्रमाणे प्रौढ स्त्रिला 2000 पर्यंत कॅलरीज मिळावयास पाहिजे पण नोकरी करणाऱ्या स्त्रिला तेवढ्या कॅलरीज घ्यायला वेळ कुठे आहे?

अन्न हा मनुष्याचा प्राण आहे. स्वस्थ रहाण्यासाठी अन्नाची नितांत गरज असते. शरीररूपी यंत्र जीवित ठेवण्यासाठी शरीराला अन्नाची गरज असते. हे जीवंत अन्न म्हणजेच पौष्टीक अन्न, ज्यात धान्य, डाळी, भाज्या, फळे, दुध, तेल, तुप, असेल ते ज्यातून पोषक अन्न घटक मिळतात. सर्व अन्न घटक आणि त्यांचे एकमेकांशी असणारे प्रमाण यावर शरीर, मन आणि बुध्दी यांचा समतोल अवलंबुन असतो. यापैकी एखादा जरी घटक नसला किंवा कमी पडला किंवा सतत कमी पडत गेला तर शरीरात विघाड होण्यास सुरूवात होते. हे सर्व 40-45 अन्नघटक देण्याची क्षमता कोणत्याही एक किंवा दोन पदार्थात नसते, म्हणूनच मिश्र पध्दतीचा वापर करून रूची वैविध्य साधून आहार घेणे आवश्यक असते. अशाच अन्नाने शरीरात रोग प्रतिकारक शक्ती वाढीस लागते. म्हणूनच अन्न ही व्याख्या सर्वच खाद्य पदार्थांना लागू होत नाही. ज्या अन्नात उर्जा देण्याची शक्ती आहे तेच अन्न, अन्न या व्याख्येस पात्र आहे. बाजाराचे पॅकबंद, डबाबंद, प्रक्रिया केलेले, रिफाइन्ड शिळे अन्न पदार्थ शरीराला आवश्यक असणारी उर्जा देण्यास असमर्थ असतात यातून

कॅलरीज मिळतात पण मेकॅनिकल, त्यातून रासायनिक उर्जेची निर्मिती होत नाही, म्हणून नोकरी करणाऱ्या स्त्रियांनी आपल्या आहारात सुधारणा करायला हवी.

यांप्रमाणे थोड्याफार प्रमाणात बदल केल्यास संतुलीत आहाराचे नियम पुष्कळ अंशी पाळले जातील. हे सर्व करताना सगळ्यात महत्वाचे म्हणजे मेनू प्लॅनिंग करणे होय. उद्याच्या नाश्त्याची, जेवणाची, स्वयंपाकाची तयारी करणे व विशेषत: मानसिक तयारी आज करून ठेवणे आवश्यक आहे. याबाबत आधीच विचार करावा, अशाप्रकारे आपल्या व कुटुंबाचही खण्यापिण्याकडे विचारपूर्वक लक्ष दिल्यास नोकरी करणे सुखकर होईल आणि सर्वांचेच आरोग्य टिकविण्यास मदत होईल.

**नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा आहार**

**1)**सकाळी उठलवर लिंबूपाणी + तीन बदाम भिजवून

**2)**थोडा व्यायाम करावा - सूर्यनमस्कार - 10 तरी

**3)**चहा (बिस्कीट नको) त्यानंतर पारंपरीक नाश्ता,

- ❖ **सकाळचानश्ता** -अंकुरीत कडधान्य, उसकळी, अंडे, सोजी, थालीपीठ, दशम्या, इडली, दोसा, अप्पे, पोहे, उपमा यासारखे पारंपारीक पदार्थच घ्यावे.

**4)**सोबत दुध किंवा ताक किंवा नाचणी खीर असावी, त्याचबरोबर एखादे फळ असल्यास उत्तम

**5)** दुपारच्या डब्यात - भाजी, पोळी, भाजी, बेसन लावून किंवा डाळी, शेंगदाणे, तिळघालून असावी डब्यातच मुळ, गाजर, टमाटर व एखादे फळ द्यावे. (चींच, बोर, आवळा सुध्दा चालेल)

**6)** सायंकाळी - मुरमुरे, फुटाणे, लाह्या, शेंगदाणे, गुळ, चिवडा, सातुचेपीठ, भेळ असे पदार्थ असावे.

**7)** रात्रीचे जेवण - वरण, भात, भाजी, पोळी, कोशींबीर, रोज एकतरी लिंबू खावे.

**8)** झोपताना - दूध घेतल्यास उत्तम, तळलेले व गोडाचे पदार्थ टाळावे.

- ❖ **स्वयंपाक करताना** -
  - कणीक थोडे दुध + पाण्याचे भिजवावी किंवा दूधपावडर कणकेत टाकावी. गहूदळताना 7 किलोगव्हातएककिलोसोयाबीन (रात्रभरभिजवून, वाळवूनभाजून) घालावे, अर्धाकिलोनाचणी, 1/4 किलो ग्रॅम राजगीरा टाकावा.

- शक्यतो वर लोखंडी कढई, तवा, झारे वापरावे.
- रोज थोडेतरी अंकुरीत खावे
- तेल शक्यतोवर घाणीचे वापरावे
- डाळ शिजवितांना त्यात मेथी दाणा व थोडा चुना टाकावा त्यामुळे कॅल्शीयम मिळते.

वरील आहारातून 2000 च्या जवळपास कॅलरीज मिळू शकतात व त्या नोकरी करणार्‍या स्त्रीसाठी आवश्यक आहे. तेव्हाच ती स्वत:चे पोषण व्यवस्थित करू शकेल. व संपूर्ण दिवसभार काम करण्याची उर्जा तिला मिळेल. पण त्याच बरोबर आहार हा नेहमी सात्वीक असावा.

**निष्कर्ष :-**भगवत गीतेमध्ये उल्लेख आहे की, आहाराचा आपल्या मन आणि बुध्दीवर परिणाम होतो. मन व बुध्दी सात्वीक करण्यासाठी आहार सात्वीक असावा. आहार बनविताना ईश्वराचे स्मरण केल्यास तो प्रसाद बनतो. आहार हे भोजन असून, ते इतर अनेक शास्त्रावर आधारलेले आहे. यामध्ये अनेक अन्नपदार्थाची उपलब्धता आहे. याचा आपल्या आरोग्यासाठी आणि वाढीसाठी उपयोग होतो. आहारशास्त्र हे रसायनशास्त्र, जीवशास्त्र, शरीरशास्त्र इत्यादी शास्त्रावर आधारलेले आहे. सर्व जीवनसत्वे व खनीजे असलेल्या व शरीरास पूरक असलेल्या संपूर्ण जेवणास आहार असे म्हणतात.

स्त्रिच्या आयुष्याकडे पाहिले तर शरीराची वृध्दप काहात होणारी वाट चाल होय, या वाटचालीत तिच्या हाडांची स्नायुंची झीज होत असते. त्यामुळे तीत प्रथीनेयुक्त आहार नियमित मिळणे आवश्यक असते. त्याचप्रमाणात शरीरात उर्जा निर्माण होण्यासाठी कॅलरीची आवश्यकता असते. आहारातील जीवनसत्वे योग्य प्रमाणात मिळावे यासाठी स्त्रीने स्वत: व कुटुंबाने देखील जागृत असणे आवश्यक आहे, हीच खरी तिच्या निरामय जिवनाची गुरूकिल्ली आहे.

**संदर्भसुची :-**

**1)** महाराष्ट्र टाईम्स 2019 ऑगस्ट - जयश्री पेंढरकर, आहार तज्ज्ञ नागपूर
"महिलाच्या आहाराच्या समस्या"

**2)** सकाळ 2020 सप्टेंबर - डॉ. स्वाती घोडमारे, आहारतज्ज्ञ, नागपूर
"महिलांची आहाराबाबत जागरूकता"

**3)** भावनगरी 2020 मे - अण्णा धमाटे
"स्त्रीच्या जीवनातील दैनंदिन व्यवहार व आहार"

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# नोकरदार महिलांचे आरोग्य आणि आहार

डॉ. प्रा. स्मिता गजभिये,
श्री. संताजी आर्ट अॅन्ड सायन्य कॉलेज,
पालांदूर, ता. लाखनी, जि. भंडारा

---

नोकरदार महिलांना नोकरी सांभाळतानाच घरातील जबाबदारीही स्वीकारावी लागते. त्यांच्या बहुआयाती, विविध कामे एकाचवेळी करण्याच्या शैलीचे समाजात तसेच घरात कौतुक होते, पण त्याची मोठी किंमत महिलांना मोजावी लागते. महिला स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून काही गो  टी साध्य करतात.

भारतासारख्या प्रगतशील देशामध्ये महिलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. मात्र, आजही समाजात महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती झालेली नाही. त्याबाबत त्यांना फारशी माहितीही नसते. व्यक्ती कितीही उच्चशिक्षित असली, तरी स्वत:च्या आरोग्याबाबत ते स्वत:च अनभिज्ञ असतात. स्त्रिया या कुंटूबाचा महत्वाचा घटक आहेत. त्या कुंटूबाचा पाया आणि स्तंभ म्हणून त्या भुमिका बजावतात. त्यांचे आरोग्य चांगले असले तर कुंटूबाचें, पर्यायाने समाजाचे आरोग्य चांगले राहू  ाकते. स्वत:च्या तब्येतीकडे दुर्लक्ष करण्याकडे त्यांचा ओढा अधिक असतो. वैद्यकीय ज्ञानाची माहिती नसतांना त्याच्या दु  परिणामाची भीती बाळगत असतात. आरोग्याच्या उपचारांवर खर्च होईल ही चिंता असते. तो खर्च टाळण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आरोग्यातील बिघाडामुळे कामाकडे दुर्लक्ष होईल, तसेच कामाचा वेळ कमी होईल याची माहिती त्यांना वाटते. कित्येकदा प्रकृतीविषयी अनामिक भितीही त्यांना असते. या सर्वाबरोबरच समाजातून मित्र मैत्रिणीकडून शेजारी, नातेवाईकांकडून चुकीच्या जाहिरातीतून, व्हॉट्सअॅप संदेशावरून मिळणारी चुकीची माहिती मनात धरून त्यांच्या मनात भीती वाढत जाते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते.

## ❖ महिला आरोग्य जागृती काळाची गरज :–

संपूर्ण राष्ट्रीय आरोग्याचा विचार करता महिलांचे आरोग्य या घटकाला त्यामध्ये अनन्य साधारण महत्व आहे. हे नाकारून चालणार नाही. या देशातील महिलांचे आरोग्य चांगले राहिले तर त्याचा परिणाम निश्चितपणे देशाच्या सर्वांगिण विकासासाठी होऊ शकेल. आज आपल्या देशातील महिलांचे आरोग्य ही चिंतेची आणि चिंतनाची बाब बनली आहे. या महिलांचा विकास लहानपणापासूनच व्हायला हवा. तिच्या शारिरिक व मानसिक आरोग्याची जपणूक होणे आवश्यक आहे.

सध्याच्या बदलत्या जीवनशैलीमुळे विविध आजारांचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. यात शारिरिक आजारांसोबत मानसिक आजारांचे वाढलेले प्रमाण ही चिंताजनक बाब आहे. नैराश्य, ऑटिझम, डायमेंशिया, बायोफ्लोर, डिप्रेशन, न्युरोटीक, स्क्रिझोफेनिया असे न माहित असलेले आजार जडतात. त्यामुळे या सर्व मानसिक आजारांबाबत माहिती आणि जनजागृती आणखी वाढली पाहिजे. ही जागरूकता काही अंशी घडत असली तरी स्त्रियांमधील मानसिक आजारांकडे मात्र पूर्णत: दुर्लक्ष होताना दिसत आहे.

ग्रामीण भागामध्ये तर ही स्थिती आणखी वाईट आहे. शहरात राहणाऱ्या स्त्रियांची स्थितीही फारशी चांगली आहे असे नाही. आधूनिक काळातील महिला घर आणि नोकरी, व्यवसाय अशी दुहेरी जबाबदारी पार पाडत असते. सतत जबाबदारीच्या आणि कामाच्या ओझ्याखाली राहील्याने मानसिक नैराश्य, भीती, चलबिचल होणे अशी साधारण लक्षणे सर्वच महिलांमध्ये दिसून येतात. विविध पातळीवरील जबाबदारी निभावताना त्या मानसिक स्तरावर हळूहळू कमकुवत होत जातात आणि परिणामी मानसिक आजाराला बळी पडतात. शहरांमध्ये राहणाऱ्या नोकरदार महिलांमध्ये मानसिक तणाव आणि नैराश्य जास्त प्रमाणात पाहायला मिळते. घर आणि ऑफिसमध्ये जबाबदारी पार पाडण्याचा दबाव त्यांना नैराश्य आणि मानसिक तणावाची शिकार बनवतो.

विशेषत: स्त्रियांचा कल स्वत:चा कोणताही आजार शुल्लक समजण्याकडे असतो. शिवाय याबाबतची अपूरी माहिती देण्याकडेही कल असतो. महिला आपल्या घरातील सर्व सदस्यांच्या आरोग्याची नियमित काळजी घेत असतात. पण ईतरांच्या आरोग्याची देखभाल करणाऱ्या या महिला स्वत:च्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करत असतात. हैराण करणारी बाब म्हणजे त्यांच्या या त्यागाकडे घरातील लोकही दुर्लक्ष करतात. महिलांना दुय्यम दर्जा देण्याची विचारधारा त्यांच्या आरोग्याबाबतही लागू होते. या महिला आपल्या शारिरिक आणि मानसिक अडचणीबद्दल मोकळेपणाने बोलताना दिसत नाही. परिणामी, त्यांच्यावर योग्यवेळी उपचार केले जात नाही. त्यामुळे महिलांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता बळावते.

महिलांनी आरोग्याकडे वेळीच लक्ष देणे फार महत्वाचे आहे. पुरूषांच्या तुलनेत महिलांना अधिक ताणाला सामोर जावं लागते. कारण महिलांवर ऑफिस व्यतिरिक्त इतर कामांचीही जबाबदारी असते. त्याचबरोबर प्रत्येक काम योग्य पध्दतीने निभावण्याचा दबाव असतो. त्यामुळे महिलांनी पूर्ण झोप घेणं आणि नियमित व्यायाम करणं अत्यंत गरजेचं आहे.

❖ <u>नोकरदार महिलांकरिता सोपे व्यायाम</u> :–

नोकरी करत असलेल्या महिलांना स्वत:च्या फिटनेसकडे लक्ष देताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे अनेक महिला याकडे दुर्लक्ष करतात. परंतु असे दुर्लक्ष करणे आरोग्याच्या दृष्टीने खूप धोकादायक ठरू शकते. घर तसेच कामाच्या ठिकाणच्या जबाबदाऱ्या पार पाडताना थोडा तरी वेळ व्यायामासाठी काढायला हवा. फिटनेस सांभाळण्यासाठी अतिशय सोपे आणि कमी वेळ लागणारे काही व्यायाम प्रकार असून ते केल्यास आरोग्य चांगले राहू शकते.

१) खुर्चीवर बसावे. पायांना ३० सेकंद सरळ ठेवावे. असे थोडया–थोडया वेळाने करा. यामुळे पायांमध्ये सूज किंवा थकवा येत नाही. पायाची दुखनी बरी होतात.

२) खूर्चीवर बसून पायांना सरळ ठेवा. अंगठयाला जमिनीवर टेकवून एकवेळा क्लॉकवाइज आणि नंतर ॲटीक्लॉकवाइज फिरवा यामुळे रक्तप्रवाह वाढतो.

३) खूर्चीवर बसून डोक्याला डाव्या हाताने उजव्या बाजूला घेऊन जा. १५ ते २० सेकंद असेच ठेवल्यानंतर डोक्याला उजव्या हाताने डाव्या बाजूला न्या.

४) व्यायाम करण्यापूर्वी स्ट्रेचिंग करावे. यामुळे लवचिकता वाढते.

५) दररोज वॉकिंग करा. यामुळे खांदे, शरीराच्या खालचा भाग, मांडया, पायांचे स्नायू सक्रिय होतील.

६) जॅपिंग जॅक व्यायाम करा. यामुळे संपूर्ण शरिराचा व्यायाम होतो. वजन कमी होते.

तसेच नोकरदार महिलांनी योग्य आहार घेणे आवश्यक आहे. योग्य आहारामुळे आरोग्य उत्तम राखण्यास बरीच मदत होते.

❖ महिलांनी आहाराविषयी जागृत असावे :—

बालपणी मिळणारा योग्य तो पोषक आहार या महिलेचे पुढील आयुष्य व आरोग्य ठरवत असतो. म्हणून महिलांमध्ये फार मोइया प्रमाणावर त्याच्या आरोग्यविषयी जागृती निर्माण करावी लागेल. स्त्रीयांचे आरोग्य जर उत्तम असेल तर ती इतरांकडे नीटपणे लक्ष देऊ शकते. परंतु तीच स्वत: काही समस्यांनी बेजार झाली तर संपूर्ण कुटूंबच अस्वस्थ होते. महिलांची मानसिकता बऱ्याचदा रोग अंगावर काढण्याची असते. तो बळावला तरच त्या वैद्यकीय सल्ला घेण्यास तयार होतात. तयाही दृष्टीने त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. महिलांमध्ये स्थुलतेचेही प्रमाण चिंताजनक आहे. महिलांनी उपवास कमीत कमी करावेत यासाठीही त्यांचे प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे.

१) योग्य तेवढा व्यायाम, योगासने करण्याचीही गरज महिलांना असते. हे त्यांनी विचारात घ्यायला हवे.

२) मनाचे आरोग्य जपण्यासाठीही आवश्यक ते प्रयत्न महिलांनी करावेत.

३) शतावरी, जे  ठमध, चंदन, भूईकोहळा, कोरपड, आवळा अशा काही वनौषधी महिलांनी नेहमी बाळगाव्यात आणि त्यांचा योग्य तो उपयोगही करावा. या वनौषधी सहज उपलब्ध होणाऱ्या अशा आहेत.

४) खजूर, अंजीर, केळी, द्राक्षे, डाळींब अशा काही फळांचा उपयोग त्यांनी आहारात ठेवावा.

५) बाजरीची भाकरी आणि शरिराला आवश्यक असणाऱ्या योग्य भाज्यांचा समावेश आहारात महिलांनी करावा आणि आरोग्यात काही बिघाड झाल्यास लवकर वैदयकीय सल्ला घ्यावा.

स्त्री हा समाजाचा कणा आहे. आहार ठरण्यापासून ते खाऊ घालण्यापर्यंतचे सर्व काम स्त्रीच करते. मात्र दुर्देवाने स्त्रीच्या आरोग्याचे महत्वही तिला स्वत:लाच वाटत नाही. कामाच्या रगाडयात ती स्वत:च्या आहाराबाबत कायमच निष्काळजी असते. विशेषत: नोकरी करणाऱ्या स्त्रिया स्वत:च्या आरोग्याची ससेहोलपट करून घेतात. अशा महिलांनी आपल्या आहाराचे नियोजन योग्य पध्द्तीने करायला हवे.

निम्न वर्गातील कामावर जाणाऱ्या बायकांची तर फार आवळ होत असते. स्वत:च्या खाण्यापिण्याकडे लक्ष दयायला तिला सवड कुठली? कामांच्या रगाडयात व गरीबीमुळे ती उरलं सुरलं, शिळपाकं खाते तर कधी खातही नाही. मग होणाऱ्या आहार घटकांच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकार शक्तीच्या अभावापायी लवकरच तिचे शरीर थकते. योग्य ते घटक न मिळाल्यामुळे नवीन जोमदार पेशींची निर्मिती करण्यास ते शरीर असमर्थ होते. १) रक्तक्षय, २) डोकेदुखी, ३) पाठदुखी, ४) अपचन, ५) जीव घाबरा होणे, ६) पाळीच्या तक्रारी, ७) पांढरे पाणी जाणे, ८) थकवा, ९) भूक नसणे, सांधे दुखीसारख्या कुरबूरी सुरू होतात. त्याच पूढे एखादया रोगाचे रूप धारण करतात. या स्त्रियांच्या आहारात मुख्यत्वे प्रोटीन्स, लोह कॅल्शियमचा खूप

अभाव आढळतो. याच पोषकतत्वांची तिला अत्यंत आवश्यकता असते. स्त्रीच्या शरीरातून दर महिन्यात पाळीमुळेच चार दिवस व्यय होत असतो. तो आहाराव्दारेच मरून काढायचा असतो. बऱ्याच बायका नाश्ता करत नाहीत. १) जेवणात भाजी पोळी खातात, २) दुपारी चाहा व रात्री पून्हा भाजी पोळीच, ३) वरण आढवडयाभरातून एक दोनदाचा म्हणून प्रोटीन्सचा अभाव असतो. त्यामुळेच शरीराचे वनज कमी असते. सोयीकरिता ब्रेड, टोस्ट, बिस्कीटे, फिंगर्स खाणं असतंच ज्याने शरीराचे पोषण होत नाही.

मुंबई व उपनगर इतरही मोठया शहरामध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा आकडा खूप मोठा आहे. कितीतरी बायका न खातापिताच सकाळी लवकर घर सोडतात. लोकलने, बसने दूर दूर कामावर जातात. दुपारकरता कोणी भाजीपोळीचा डबा नेतात तर कोणी डबे बोलावतात. काही जणी वडा पाववर राहतात. रात्री घरी पोचायला अनेकांना अशीर होतो. मग शॉर्टकट किंवा एकांगी अन्नप्रकाशावर निभवणे, अशा तऱ्हेने पोषकतत्वांची गरज भागत नसते मग लवकरच प्रकृतीला तक्रारी सुरू होतात. या स्त्रिया अकालीच वार्धक्याकडे झुकतात.

मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गीय नोकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये कुपोषण आढळते. ते कमी खाण्यामुळे नसून अयोग्य खाण्यामुळे असते. या स्त्रिया पौष्टिकतेच्या भ्रामक कल्पना घेवून स्वयंपाक करतात किंवा करवतात. सुशिक्षित असूनही त्यांच्यात आहारशास्त्राबद्दलचे अज्ञान असते. ज्यांची दिनचर्या बघितली तर सकाळी चहा जोडीला बिस्कीटे नंतर घरातली कामे, स्वयंपाक व काहीच न खाता अगदी घाईघाईने कामावर जाणे, दुपारी भाजीपोळीचा डबा आणि दोन–तीनदा चहा, कधी समोसे, बोंडे, वडापाव पण रात्री चौरस आहाराचे जेवण अशा दिनचर्येतूनही हेव ते हवे तितके आहार घटक मिळत नाही. यामधूनही प्रोटीन्स, कॅल्शीयम, लोह, जीवनसत्व अ, ई, क, ब चा अभाव आढळतो. यातून केवळ १३००–१५०० पर्यंत कॅलरीज मिळतात. आहार घटकांच्या तालिकेप्रमाणे प्रौढ स्त्रीला १८००–१९०० कॅलरीज हव्यात. नोकरी करणाऱ्या स्त्रीला तेवढया घ्यायला वेळ कुठला! ज्यातून तिला रोज ५०–६० ग्रॅम प्रोटिन्स, १ ते २ ग्रॅम कॅल्शियम, ३०–३५ मिलीग्रॅम लोह मिळायलाच हवे. उदा. एक वाटी वरणातून सात–आठ ग्रॅम प्रोटीन्स, १/२ लीटर दुधातून ६०० ग्रॅम कॅल्शियम मिळते. यावरून आपण मोजमाप करू शकतो. आता केवळ कॅलरीज मोजणे सोडावे. पण प्रोटीन्स, कार्बोहायड्रेट्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स फॅट्स बद्दलची शास्त्रशुध्द माहिती करून घ्यावी व ते मोजायला शिकावे. शरीराला अयोग्य अन्नातूनही भरपूर कॅलरीज मिळतात म्हणजे त्यातून मेकॅनिकल एनर्जी मिळते. त्यातून केमिकल (रासायनिक) एनर्जी मिळेलच असे नाही म्हणून अन्नाचे योग्य आणि अयोग्य अन्न असे वर्गीकरण करता येते. सर्व नोकरी करणाऱ्या स्त्रिया अयोग्य अन्नाच सेवन करतात.

नोकरी करणारीने आपल्या दिनचर्येत सुधारणा ही करायलाच हवी. याप्रमाणे थोडेफार बदल केल्यास संतुलित आहाराचे नियम पुष्कळ अंशी पाळले जातील हे सर्व करताना सगळयात महत्वाचे मेनू प्लॅनिंग उदयाच्या नास्त्याची, जेवणाची, स्वयंपाकाची तयारी विशेषत: मानसिक तयारी आज करून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबद्दल विचार आधीच करावा.

अशाप्रकारे आपल्या व कुंटूबाच्याही खाण्यापिण्याकडे विचारपूर्वक लक्ष दिल्यास नोकरी सुखकर होईल. आणि सर्वांचेच आरोग्य टिकवायला मदत होईल.

❖ महिलांचे आरोग्य उत्तम राहण्याकरिता उपाययोजना :—

दैनंदिन कार्यामध्ये व्यस्त असतांना स्त्रिया स्वत:कडे योग्य पध्दतीने लक्ष देत नाही. परिणामी अनेक आरोग्य विषयक समस्यांचा त्यांना सामना करावा लागतो. अशावेळी मानसिक ताण—तणाव येण्याची दाट शक्यता निर्माण होते. असे होऊ नये म्हणून महिलांनी आपले आरोग्य उत्तम ठेवण्याकरीता खालीलप्रमाणे उपाय करावेत.

१) आहार :— दैनंदिन जेवणात स्निग्ध पदार्थ, खनिज तत्वे युक्त असलेला सकस आणि संतुलित, नियमित पुरेसा आणि ताजा आहार घ्यावा त्यामुळे आरोग्य उत्तम राहण्यास मदत मिळते. आहारावरच आरोग्यविषयक स्थिती अवलंबून असते.

२) स्वच्छता :— खाण्यापिण्यामध्ये स्वच्छता असावी. स्वच्छतेमुळे आरोग्याला पोषक स्थिती निर्माण होते. अस्वच्छतेमुळे मलेरिया, गॅस्ट्रो इत्यादी सारखे रोग उद्‌भवतात वैयक्तीक व सार्वजनिक पातळीवर महिलांनी स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. ज्यामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत मिळेल.

३) करमणूक/मनोरंजन :— मनोरंजनातून महिलांना आनंद मिळू शकतो. मानसिक स्वास्थ योग्य राहण्यास मदत होते. जीवन सुखी समाधानी बनते. महिलांना कामाच्या व्यापातून ताण तणाव आल्यास त्यांनी मनोरंजनाचा आधार घ्यावा. त्यामुळे शारिरिक व मानसिक स्वास्थ चांगले राहते.

४) व्यायाम आणि आराम :— व्यायामामुळे स्त्रियांना आपला आरोग्यविषयक दर्जा उंचावता येतो. नियमित व सुयोग्य व्यायाम असल्यास निरोगी, दीर्घकालीन, सुदृढ आरोग्य लाभते, रोगप्रतिकार शक्ती वाढते. व्यायामाबरोबरच आरामही तेवढीच महत्वाची बाब आहे. विशिष्ट काळपर्यंत व्यक्ती एखादेच काम करू शकते. पुन्हा तिला थकवा येतो. तेव्हा आरामाची गरज असते. योग्य वेळेत महिलांनी व्यायाम व आराम केल्यास शरीर उत्साही बनेल व कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

५) नोकरी/कामाचा प्रकार :— साधारणपणे व्यक्ती दोन प्रकारचे कार्य करते. बैठया स्वरूपाचे आणि बौद्धिक स्वरूपाचे. काही कामे फारशी शारिरिक ताण न पडता व्यक्तीला करावी लागतात. काही कामे व्यक्तीला प्रत्यक्ष शारिरिक कष्ट करून आपली शक्ती उर्जा खर्च करून करावी लागतात. कामाच्या स्वरूपावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते.

नोकरी करत असतांना मानसिक समाधान असणे अंत्यत गरजेचे आहे. मानसिक स्थिती व कामावरील वातावरण यांचा देखील आरोग्यावर परिणाम होत असतो. म्हणून आनंदी वातावरणात काम केल्याने महिलांचा उत्साह व कार्यक्षमता वाढण्यास मदत मिळते.

६) वातावरण :— सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम आरोग्यावर होत असतो. कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती समतोलाची राहू शकेल असे पर्यावरण महिलांना लागल्यास आरोग्याचा दर्जा उंचावण्यात सहाय्य होते.

अशाप्रकारे महिलांना त्यांचे आरोग्य जपण्याकरीता वरील बाबी महत्वाच्या ठरतात. कुंटूबाची, समाजाची, देशाची प्रगती साधायची असेल तर महिलांचे आरोग्य उत्तम असणे अतिशय आवश्यक आहे. ज्या देशातील समाज हा निरोगी असतो तो देश प्रगतीच्या शेवटच्या बिंदूवर जावून पोहोचतो. म्हणून या सर्व बाबींसाठी महिलांचे आरोग्य उत्तम असणे आवश्यक

असते. म्हणून दैनंदिन जीवनामध्ये आरोग्याला विशेष महत्व आहे व आपण त्याची काळजी घेतली पाहिजे. आरोग्य बिघडल्यावर सुधारत बसण्यापेक्षा, आरोग्य बिघडू नये म्हणून काळजी घेणे हे आपल्या हातात असते.

❖ <u>नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा आहार</u> :–

➢ सकाळी उठल्यावर लिंबू, मध, पाणी + ३ बदाम भिजवून खाव्यात

➢ थोडा व्यायाम – सुर्यनमस्कार

➢ चहा (बिस्कीटे नको) त्यानंतर पारंपारिक नाश्ता

❖ <u>सकाळचा नाश्ता</u> :– अंकुरित कडधान्य, उसळी, अंडे, सोजी, थालीपीठ, दशम्या, इडली, दोसे, अप्पे, पोहे, उपमा, थालीपीठ सारखे पारंपारिक पदार्थच घ्यावेत.

➢ जोडीला दुध किंवा ताक किंवा नाचणी खीर असावी त्याबरोबर फळ आणि भिजवलेल्या मनूका असल्यास उत्तम.

❖ <u>दुपारच्या डब्यात</u> :– भाजी पोळीच्या डब्यात भाजी बेसन लावून किंवा डाळी, शेंगदाणे तीळ घालून करावी.

➢ डब्यातच मुळा टमाटर, काकडी गाजर घ्यावे. जमल्यास एक फळ असावे. (अगदी चिंच, बोर, आवळेसुध्दा)

❖ <u>सायंकाळी</u> :– मुरमुरा, फुटाणे, लाहया, शेंगदाणे, गुळ, चिवडा (कच्चा साधा) गोपालकाला, पॉपकॉर्न, सातूचे पीठ, भेळ असे पदार्थ घ्यावे.

➢ घरी यायला वेळ होत असेल तर चिवडा मुरमुरे, फुटाणे, पॉपकॉर्न ऑफिसमध्येच कपाटात ठेवावे आणि खावे.

❖ <u>रात्रीचे जेवण</u> :– रात्रीच्या जेवणात वरण, भात, भाजी, पोळी, कोशिंबीर, रोज एक तरी लिंबू घ्यावे.

❖ <u>झोपताना</u> :– दूध घेतल्यास उत्तम, तळलेले व गोडाचे पदार्थ टाळावे.

❖ <u>स्वयंपाक करतांना</u> :– कणिक दुधातून भिजवावी किंवा त्यात दूध पावडर घालावी. कणिक करताना सात किलो गव्हात एक किलो सोयाबिन (रात्रभर भिजवून, वाळवून, भाजून) १/२ किलो ग्रॅम नाचणी, १/४ किलोग्रॅम राजगिरा बिया घालून करावी.

➢ शक्यतोवर लोखंडाची कढई, तवा, झारे वापरावे.

➢ रोज थोडे तरी अंकुरित कडधान्य खावे.

➢ तेल शक्यतोवर घाणीचे वापरावे. गाळलेले चालेले.

➢ भातात शिजताना चिमुटभर (प्रत्येकी) खायचा चूना घालावा.

➢ डाळ शिजवताना चमचाभर मेथीदाणा घालावा.

➢ रोज लाल भोपळयाचे, पालेभाजीचे सेवन आवश्यक आहे. शक्यतो साखर टाळावी.

➢ हे टाळा – ब्रेड, बिस्कीट, चिप्स, पाव बर्गर, डोनट सारखे पदार्थ टाळा.

➢ संध्याकाळी घरी आल्यावर उगीच काही चटक, मटक तळलेलं करून खाऊ नये.

❖ संदर्भग्रंथ :–

१) डॉ. ह.वि. सरदेसाई – आरोग्यविषयक – श्री. विदया प्रकाशन

२) महिलांचे आरोग्य समस्या व आजार – Women Helth in Marathi

३) स्त्रियांचे आरोग्य आणि समुपदेशन – दैनिक प्रभात

४) मानवी पोषण व आहारस्वरूपाची मूलतत्वे – डॉ. आशा देऊस्कर.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# शाश्वत विकास ध्येये आणि भारताची स्थिती

**डॉ. माधुरी किशनराव तानुरकर**
सहाय्यक प्राध्यापक
वाणिज्य विभाग प्रमुख
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
मारेगांव, जि. यवतमाळ.

**प्रस्तावना :**

'शाश्वत विकास ध्येये' हा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा एक महत्वाकांक्षी जाहिररनाम आहे. ज्यात गरीबी, भुक आणि महिलांच्या बाबतीत होणाऱ्या हिंसेला पूर्णविराम देण्याचे महत्वाचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. तसेच जगातल्या प्रत्येक मानवाला कायदेशीर रित्या स्वत:ची ओळख मिळावी आणि प्रत्येकाला समान न्याय मिळावा हे देखील उद्दिष्ट त्यात समाविष्ट आहे.

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो सध्याच्या पिढीतील गरजांची पूर्तता करतांना भावी पिढीतील गरजांच्या क्षमतेला धक्का न पोहचवता केलेला विकास होय.

आपल्या असर्थिक, पर्यावरणीय व सामाजीक अशा सर्व गरजा पुर्ण व्हाव्यात हेच शाश्वत विकासाचे ध्येय आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व १९३ सदस्य देशांनी सप्टेंबर २०१५ मध्ये एकमताने स्विकारलेला हा जाहीरनामा होय.

ही शाश्वत ध्येये निश्चीत करण्यासाठी आंतराष्ट्रीय स्तरावर ज्या चर्चा झाल्या त्यात विकसनशील देशांची भूमिका मांडण्यात आणि विकसीत देशांचे उत्तरदायीत्व स्पष्ट करण्यात भारताने मुख्य भुमिका बजावली.

या ध्येयांचा मसुदा बनवतांना भौगोलीक अशा आकांक्षा आणि उद्दिष्टांना प्राधान्य देत, भारताच्या मताचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. हा जाहीरनामा आता जगातल्या सगळ्या देशांना लागु आहे. संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकासाची भुमीका क्रांतीकारकरित्या बदलली आहे. यात गरीब आणि श्रीमंत अशा सगळयाच देशांचा समावेश आहे.

**ध्येय किंवा उद्दिष्ट्ये :**

२५ सप्टेंबर २०१५ ला पार पडलेल्या संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास परिषदेच्या शेवटी जगभरातील २९३ देशांनी खालील १७ ध्येयांना मान्यता दिली.

१) सर्व प्रकारच्या गरीबीचे निर्मुलन करणे.

२) भुक संपवणे, अन्न सुरक्षा व सुधारित पोषण आहार उपलब्ध करून देणे आणि शाश्वत शेतीला प्राधान्य देणे.

३) आरोग्यपुर्ण आयुष्य सुनिश्चीत करणे व सर्व वयोगटातील नागरिकांचे कल्याण साधणे.

४) सर्वसमावेशक व गुणवत्तापुर्ण शिक्षण उपलब्ध करणे.

५) लैंगीक समानता व महिला आणि मुलींचे सक्षमीकरण साधणे.

६) पाण्याची व स्वच्छतेच्या संसाधनाची उपलब्धता सुनिश्चीत करणे.

७) सर्वांना अल्पखर्चीक विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनीक उर्जा साधने उपलब्ध करून देणे.

८) शाश्वत, सर्वसमावेशक, आर्थीक वाढ आणि उत्पादक रोजगार उपलब्ध करणे.

९) मुलभुत सोयीसुविधांची निर्मीती करणे, सर्व समावेशक आणि शाश्वत औद्योगीकीकरण करणे व कल्पकतेला वाव देणे.

१०) विविध देशांमधील असमानता दुर करणे.

११) शहरे आणि मानवी वस्त्या, अधिक समावेशक सुरक्षित, संवदनशील आणि शाश्वत करणे

१२) उत्पादन आणि उपभोगाच्या पध्दती शाश्वत रूपात आणणे.

१३) हवामान बदल आणि त्याच्या दुष्परिणामांना रोखण्यासाठी त्वरीत उपाययोजना करणे

१४) महासागर व समूहांचे संवर्धन करणे तसेच त्यांच्याशी संबंधित संसाधनांचा शाश्वतपणे वापर करणे.

१५) परिस्थीतीकिय व्यवस्थांचा शाश्वत पध्दतीने वापर करणे, वनाचे शाश्वत व्यवस्थापन, वाळवंटीकरणाशी मुकाबला करणे, जमीनीचा कस कमी होण्याची प्रक्रिया आणि जैवविविधतेची हानी रोखणे.

१६) शांततापुर्ण आणि सर्वसमावेशक समाज व्यवस्थांना प्रोत्साहन देणे, त्यांची शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल निश्चीत करणे, सर्वांची न्यायापर्यंत पोहोच स्थापीत करण्यासाठी विविध पातळ्यांवर परिणामकारक उत्तरदायी आणि सर्वसमावेशक संस्था उभ्या करणे.

१७) चिरस्थायी विकासासाठी वैश्विक भागीदारी निर्माण व्हावी यासाठी अंमलबजावणीची साधने विकसीत करणे.

शाश्वत विकास ध्येये हा भविष्यकालीन आंतरराष्ट्रीय विकास संबंधीत ध्येयांचा संच आहे. ही ध्येये युनायटेड नेशन्स ने बनविली असुन त्यांची शाश्वत विकासासाठीची जागतीक ध्येये अशी बढती करण्यात आलेली आहे.

भारत नीती आयोग ही दरवर्षी शाश्वत विकास ध्येयांचे इंडेक्स तयार करते. पहिला इंडेक्स डिसेंबर २०१८ ला तयार केला होता. आता नुकतेच १० मार्च २०२१ ला इंडेक्स आलेला आहे.

**गरज :—**

आपल्या करमणुकीसाठी आपण जंगल, पर्वत नद्या, समुद्र, वन्यजीव असलेल्या ठिकाणी जातो. व निसर्गाचा आनंद घेतो. परंतु आपल्या पुढील पिढीला सुध्दा निसर्गाचा आनंद घेता येईल यासाठी आपण विचार केला पाहीजे.

इलेक्ट्रॉनीक वस्तु, धातु व प्लॅस्टीकच्या वस्तूची खरेदी आज मोठ्या प्रमाणावर होत आहे. उपभोक्तावाद वाढला आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, जागतिकीकरण, झपाट्याने बदलणारी जीवनशैली, सहज मिळणाऱ्या चैनीच्या वस्तु आणि उपभोक्तावाद यामुळे नैसर्गीक संसाधने वेगाने कमी होत आहेत व पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. परिसंस्थेतुन मिळणाऱ्या गोष्टींची क्षमता विचारात घेऊन जीवनमान उंचावणे म्हणजे शाश्वतता. पृथ्वीवरील नैसर्गीक संसाधने जर आपण जनत केली, त्यांची निगा राखली व संवर्धन केले तर पर्यावरणीय प्रक्रीया सुरळीतपणे चालतील. उद्योगासाठी लागणारा कच्चा माल, अन्न, पाणी, इंधन, चारा या सर्व गोष्टी

निसर्गातुनच मिळतात. विकास प्रक्रियेतुन निर्माण झालेला कचराही निसर्ग शोषुन घेतो. निसर्ग हा स्त्रोत व शोषक म्हणुन कार्य करतो. म्हणून निसर्गाचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

**समस्या व आव्हाने :**

शाश्वत विकास ध्येये निश्चीत करून त्या दृष्टीने पावले टाकण्याची ही पध्दत जरी क्रांतीकारक असली तरी त्यात काही मुलभुत त्रुटी आहेत. यातली उद्दिष्ट्ये पूर्ण करणे बंधनकारक नसून स्वैच्छिक आहेत. त्यामुळे विकासाची ती परिमाणे सत्यात उतरवणे एक समस्याच आहे. त्यासाठी प्रत्येक देशाने, खास करून जे देश अधिक साधनसंपन्न आहेत. त्यांनी त्या दिशेने निर्णायक पावले उचलली पाहिजेत. जागतीक पातळीवर सर्वांनी सहकार्याची भुमिका स्विकारली नाही तर हा शाश्वत विकास ध्येयांचा जाहीरनामा एक स्वप्न च राहील.

लोकसंख्येतील वाढ. नैसर्गिक संसाधनांचे शोषण, गरीबी, नैसर्गीक संसाधनाचे असमान वितरण, शिक्षण, बेराजगारी, शासकीय धोरण अशी अनेक आव्हाने आहेत.

**निष्कर्ष :**

भारताच्या निती आयोगाने प्रसिध्द केलेल्या अहवालात सविस्तर माहीती दिली आहे. विशिष्ट उद्दिष्टांची परिपुर्ती करण्याची जवाबदारी सरकारी विभागांवर व मंत्रालयावर सोपवण्यात आली आहे. कोणतेही ध्येये गाठायचे असेल तर सरकारच्या विविध मंत्रालयांना आणि विभागांना परस्परांच्या सहकार्याने काम करण्यांशिवाय पर्याय नाही.

मात्र या अहवालात शाश्वत विकास ध्येयांच्या आधारावर भारतातील विविध राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेशामधील विकासाचा जो तुलनात्मक आढावा घेण्यात आला आहे. त्यावरून स्पष्टपणे दिसून येते की, संयुक्त राष्ट्र संघाकडुन अपेक्षीत विकासाच्या दिशेने जायला अजुन फार मोठा पल्ला गाठावा लागणार आहे.

अहवालामध्ये कितीतरी जमेच्या बाजु आहेत. पण त्यासोबतच यात अनेक त्रुटी पण आहेत. स्त्री—पुरूष असमानता हा चिंतेचा विषय आहे. त्याकडे भारताने दुर्लक्ष करून चालणार नाही. भारतासारख्या देशातला मानवसमाज, आर्थीक सुबत्ता, लिंग, वय, वर्ण आणि जात व लोकांचे होणारे विस्थापन, शारीरीक विकलांगता आणि भौगोलीक अंतर अशा अनेक गोष्टीमध्ये विभागला असल्यामुळे अशा समाजात कोणत्याही विकासापासुन वंचीत राहु द्यायचे नसेल तर त्यासाठी समाजातल्या अगदी शेवटच्या टोकापर्यंत पोहचण्साची गरज आहे.

सार्वजनीक ठिकाणी आणि खाजगी क्षेत्रामध्ये स्त्रिया आणि मुलींच्या बाबतीत होणारी विविध तऱ्हेची हिंसा थांबवण्याचे ध्येय गाठण्यासाठी जे मापदंड ठरवण्यांत आले त्या दिशेने अजुन भारताने पावले उचललेली नाहीत. स्त्रियांच्या बाबतीत घडणाऱ्या हिंसेमध्ये पती—पत्नी संबंधामधल्या हिंसेचे ही प्रमाण खुप जास्त आहे. अशा बहुतांश घटना जगासमोरच येत नाहीत. त्यामुळे या बाबतीतले निकष पुन्हा एकदा तपासुन त्यात कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची काळजी घेतली पाहीजे.

या सगळ्या योजनांना कशाप्रकारे आर्थीक पाठबळ मिळणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. सगळ्याच क्षेत्रामधल्या प्रगतीकडे आता विशेष काळजी पुर्वक लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे.

जागतीक स्तरावर निश्चीत करण्यात आलेल्या या विकास ध्येयांच्या पुर्ततेसाठी सरकार जेव्हा पाठपुरावा करेल तेव्हाच त्याचे कौतुक होईल व परिवर्तन घडेल.

संदर्भ :

१) सतत विकास : मुद्दे और चुनौतीया (निरज)

२) Indian Sustainable Development and Good Governance Issues - Binayak Ray

३) बाजी MPSC

४) Sustainable Development Goal-Ajay Anlawat

# भारतात ई- कॉमर्सचा विकास

प्रा. डॉ. जया सवाई थूल,
सहाय्यक प्राध्यापक,
श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती

**सारांश–**
ई-कॉमर्स हा देशातील सर्वाधिक वाढणाऱ्या व्यवसायांपैकी एक व्यवसाय आहे आणि गुंतवणूकदारांना गुंतवणुकीसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देतो. त्यामुळे विदेशी गुंतवणूकदार ई-कॉमर्स क्षेत्राला आर्थिक मदत करत आहेत. देशातील सरकारने जर ई-कॉमर्ससाठी कायदेशीर सुरक्षा आणि चौकट प्रदान केली तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराला त्यांचे मूलभूत अधिकार जसे बौद्धिक संपदा, गोपनीयता, फसवणूक प्रतिबंध, ग्राहक संरक्षण इ. प्रदान केले तर देशात ई-कॉमर्सची संभाव्य वाढ होईल. प्रस्तूत संशोधनपर लेखात देशातील इलेक्ट्रॉनिक कॉमर्स (ई-कॉमर्स) च्या वाढीत विविध विभागाचा सहभाग यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**कीवर्ड** - B2C, ऑनलाईन प्रवास, ई-टेलिंग, वाढ, मार्केट शेअर, विभाग

**प्रस्तावना**

इलेक्ट्रॉनिक कॉमर्स किंवा ई-कॉमर्स म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या सहाय्याने व्यापार-व्यवसाय करणे होय .ई-कॉमर्स एक प्रभावी विक्री साधन असून एक सुलभ वितरण प्रणाली आहे .यातील वितरण व्यवस्था ही ग्राहकांना उत्पादने वितरित करण्यासाठी एक पर्यायी पद्धत आहे .ही पद्धत पारंपारिक वितरण प्रक्रियेपेक्षा भिन्न आहे .या वितरण प्रणालीमध्ये नोकरदार, घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेते यासारख्या मध्यस्थांचा वापर केला जातो .सोप्या भाषेत सांगायचे तर, ई-कॉमर्स प्रणाली थेट वितरण व्यवस्थेसारखीच आहे, कारण ती उत्पादन ऑर्डर मिळवण्यासाठी संकेस्थळाचा वापर करते आणि वितरण प्रक्रियेतून मध्यस्थांना काढून टाकून उत्पादकांकडून वस्तू आणि सेवा थेट ग्राहकांकडे हस्तांतरित करते.

जगभरात माहिती तंत्रज्ञानाच्या (IT) वापरामुळे व्यापार व्यवसायात अनेक बदल झाले आहेत. ई-कॉमर्स उद्योगाने स्वतःला पूर्णपणे डिजिटल करून टाकले आहे. ई-कॉमर्स उद्योग व्यापार-व्यवसायाच्या विकासासाठी एक नवीन व्यासपीठ तयार करत आहे. ई-कॉमर्स व्यवसायाने स्वत:ला नवीन अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून सिद्ध केले आहे. जगभरात व्यवसाय करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग बनला आहे. ब्रँडइंटरनेटचा वापर वाढवण्यासोबतच रोजगार निर्मितीमध्ये ई-कॉमर्स महत्वाची भूमिका बजावत आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे-**

i) भारतातील ई-कॉमर्सच्या वाढीचे विश्लेषण करणे आणि

ii) B2C व्यवसाय मॉडेलवर मर्यादा घालून भारतातील वर्तमान ई-कॉमर्स उद्योग विभागाचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती-**

प्रस्तूत संशोधनपर लेखात दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. ई-कॉमर्सवर आधारित पुस्तके, मासिके, वेबसाइट, जर्नल्सइ. यांचा वापर केला आहे.

ऑनलाइन शॉपिंगमुळे तरूण पिढी जागतिक बाजारपेठेत महत्त्वाचा घटक बनत आहे. विशेषतः, इंटरनेट हा एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या वापराने ऑनलाइन खरेदीचा एक अंदाज लावता येतो. देशाच्या सध्याच्या

व्यावसायिक वातावरणात ई-कॉमर्सने एक महत्त्वाचे स्थान व्यापले आहे. ई-कॉमर्सच्या उत्क्रांतीचे टप्पे खालील प्रमाणे आहेत.

**ई-कॉमर्सच्या उत्क्रांतीचे टप्पे -**

**पहिला टप्पा (1995 ते 2005) -**

1995 मध्ये भारतात इंटरनेटच्या प्रारंभामुळे देशातील ई-कॉमर्सच्या पहिल्या लाटेची सुरुवात झाली. शिवाय, 1991 मध्ये सुधारणा सुरू झाल्यानंतर आर्थिक उदारीकरणाने बहु-राष्ट्रीय निगम (MNCs) ला आकर्षित केले आणि त्यामुळे माहिती तंत्रज्ञान (IT) उद्योगात लक्षणीय वाढ झाली. उदारीकरण धोरण अंमलात आणल्यामुळे परवाना शासन, उच्चकर निती आणि आयातीवरील निर्बंध संपुष्टात आले आणि लघु आणि मध्यम उद्योगांची (एसएमई) वाढ सुलभ झाली. आयटी उद्योग आणि एस एम ई हेइंटरनेट ने सुरुवातीला दत्तक घेतले होते त्यामुळे B2B, नोकरीचा शोध आणि वैवाहिक पोर्टलचा विकास झाला.

- **B2B डिरेक्टरी** -देशाची पहिली ऑनलाईन B2B डिरेक्टरी 1996 मध्ये प्रक्षेपित झाली. देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारधोरणांचे उदारीकरण हे B2B व्हर्च्युअल पोर्टलच्या वाढीस मुख्य घटक होते.
- **आभासी वैवाहिक पोर्टल -** 1996 मध्ये देशात पहिले आभासी वैवाहिक पोर्टल सुरू करण्यात आले, ज्याने "लग्नगाठी स्वर्गात बांधल्या जातात" पासून "लग्नगाठी सायबर स्पेसमध्ये बांधल्या जातात" पर्यंतच्या मॅचमेकिंग प्रक्रियेबद्दलच्या धारणा बदलल्या.
- **आभासी भरती** -देशातील आभासी भरती उद्योगाने 1997 मध्ये आकार घेतला. 1991 मध्ये आर्थिक सुधारणा सुरू झाल्यानंतर सेवाक्षेत्राच्या वाढीमुळे अतिरिक्त नोकऱ्या निर्माण झाल्या आणि इंटरनेट हे एक प्रभावी माध्यम असल्याचे सिद्ध झाले. आभासी भरतीमुळे नियोक्ते आणि नोकरी शोधणारे एकमेकांना जोडले गेले.

देशातीलई-कॉमर्सच्या पहिल्या लाटेत इंटरनेटचा कमी वापर, इंटरनेटचा कमी वेग, ऑनलाइन शॉपिंगला ग्राहकांकडून कमी प्रतिसाद आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा इत्यादीबाबींची कमतरता होती. 2000 मध्ये आयटी क्षेत्रातील मंदीमुळे देशातील 1,000 हून अधिक ई-कॉमर्स व्यवसाय कोलमडले. परिणामतः 2000 ते 2005 दरम्यान भारतात मूक क्रिया कलाप झाला.

**दुसरा टप्पा (2005 ते आतापर्यंत) -**

2000 ते 2005 दरम्यान मूक क्रिया कलापानंतर, ई-व्यवसायात विशेषतः प्रवास, किरकोळ विक्री, गट खरेदी, सामाजिक परस्पर संवाद इत्यादी क्षेत्रांमध्ये लक्षणीय विकास झाला आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.

- **हवाई प्रवास -** 2005 मध्ये देशातील उड्डाणक्षेत्रात कमी किंमतीचे वाहक (LCCs) अर्थात (कमी खर्चात हवाई प्रवासाच्या) प्रवेशाने ई-कॉमर्सच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात झाली. हवाई प्रवास हा सर्वात मोठा विभाग म्हणून विकसित झाला आणि प्रवासाशी संबंधित माहिती शोधण्यासाठी आणि तिकिटे बुक करण्यासाठी लोकांनी इंटरनेटवर विश्वास ठेवण्यास सुरुवात केली. ऑनलाईन ट्रॅव्हलच्या यशामुळे ग्राहकांना ऑनलाईन खरेदी करण्यास सोयीस्कर बनले. यामुळे ऑनलाइन रिटेलमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होण्याचा मार्ग मोकळा झाला.
- **आभासी प्रवास** -इंडिगो आणि स्पाईसजेट सारख्या कमी किंमतीच्या वाहकाने (LCCs) त्यांची तिकिटे ऑनलाईन आणि तृतीय पक्षांद्वारे विकण्याची ऑनलाईन ट्रॅव्हल एजंट्स(OTAs)च्या विकासास सक्षम केले. 2005-2006 मध्ये LCC च्या प्रवेशापूर्वी, हवाई प्रवास ही एक चैनीची वस्तु मानली जात होती आणि ती फक्त श्रीमंत आणि कॉर्पोरेट प्रवाशांसाठी होती. एल सी सी ने मोठ्या संख्येने लोकांसाठी हवाई प्रवास परवडण्यासारखा करून परिस्थिती बदलली. त्यांनी त्यांची स्वतःची वेबसाईट विकसित केली आणि त्यांची तिकिटे ऑनलाईन वितरित करण्यासाठी OTA सहभागीदारी केली आणि अशाप्रकारे खर्च समाविष्ट केला. LCCs द्वारा त्यांच्या ऑनलाइन तिकीट बुकिंग योजना सुरू होण्याआधी भारतीय रेल्वेने ई-तिकीट बुकिंग उपक्रम आधीच लागू केला होता.
- **आभासी विक्री** -अंशतः शहरी भागातील ग्राहकांच्या जीवनशैलीत बदल करून आणि घरी बसल्या खरेदीची सोय करून ऑनलाइन किरकोळ विक्रीत वाढ करण्याची गरज निर्माण झाली. हा विभाग 2007 मध्ये दुसऱ्या चळवळीत अनेक ऑनलाइन किरकोळ वेबसाइट्सच्या प्रारंभासह स्थापित झाला. नवीन व्यवसाय उद्योजकांद्वारे चालवले गेले. उद्योजकांनी ग्राहकांचा अनुभव वाढवून आणि बाजारात मजबूत उपस्थिती दर्शवून स्वतःला वेगळे करण्याचा विचार केला.

- **गटखरेदी -** 2010 च्या सुरुवातीच्या काळात, गट खरेदी आणि दैनंदिन सौदे मॉडेल जागतिक ट्रेंड बनले. गटखरेदी साइट्समध्ये अद्वितीय अभ्यागतांच्या संख्येत लक्षणीय वाढझाली आहे आणि ई-बिझनेसला वृद्धिंगत करणाऱ्या सदस्यांची संख्या वाढली आहे.
- **सामाजिक परस्पर संवाद** -अलिकडच्या काळात, सोशल नेटवर्किंगने भारतीय ऑनलाइन क्षेत्रात खूप प्रगति केली आहे. तो लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सुरुवातीला याचा वापर मित्रांशी संपर्कात राहण्यासाठी केला जात असे, परंतु आता सोशल नेटवर्किंग वेबसाइट्स कोणत्याही कंपनीच्या डिजिटल धोरणात अँकर म्हणून उदयास आल्या आहेत. ई-कॉमर्स खेळाडूंना सोशल नेटवर्किंगमुळे ग्राहकांपर्यंत पोहोचणे सुलभ झाले आहे. ब्रँडिंग ॲक्टिव्हिटीज, अभिप्रायासाठी ग्राहकांशी संपर्क साधणे आणि नवीन उत्पादन प्रक्षेपित करण्यासाठी जाहिरात करणे यासाठी सोशल मीडिया स्पेसमध्ये आपली उपस्थिती दर्शविणे हा उपक्रम प्रमंडळाने सुरू केला आहे.

विपणन प्रक्रियेत ई-कॉमर्सचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. विपणनातीन ई-कॉमर्स हे एक असे आधुनिक तंत्र आहे जे व्यावसायिक प्रमंडळ, व्यापार आणि उद्योग आपले व्यवसाय वाढवण्यासाठी, आपली व्यावसायीक कामे करण्यासाठी इंटरनेटचा वापर करतात. तसेच चांगल्या उत्पादनाच्या जाहिरातीसाठी योजना आखणे, धोरण ठरविणे तसेच विविध उद्योग, प्रमंडळ, संस्था इत्यादींचे आर्थिक आरोग्य वाढवण्यासाठी ई-कॉमर्सचा वापर करतात.

**भारतात ई-कॉमर्सची वाढ -**

गेल्या दोन दशकांमध्ये, वाढत्या इंटरनेट आणि मोबाईल फोनच्या प्रवेशामुळे संदेशवहनाचा मार्ग बदलला आहे. सध्या, ई-कॉमर्सचा इंटरनेट आणि मोबाईल फोनच्या क्रांतीकडे कल वाढत चालला आहे. त्यामुळे ग्राहकांपर्यंत व्यवसायाची माहिती पोहचण्याच्या मार्गात मूलभूत बदल झाले आहेत. तसेच ई- कॉमर्सने किरकोळ विक्री क्षेत्रात वादळ आणले आहे. ई-कॉमर्सने विविध व्यवसाय आणि व्यावसायिक मॉडेलसह, उपक्रमांसह, उद्योजकांच्या संपूर्ण पिढीला मोहून टाकले आहे. देशातील ई-कॉमर्समध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. देशात ई-कॉमर्स बाजाराने 2014 मध्ये त्याच्या आगमनाची घोषणा केली आणि फ्लिपकार्टची' बिगबिलियन डेसेल' आणि त्यानंतर गुगलचा' तीन दिवसांचा ऑनलाइन शॉपिंग फेस्टिवल' सुरू झाला. एकूणच, अनोखे पाहुणे आणि व्यापारी यांच्या संख्येत नाट्यमय वाढ झाली आहे. हॉलिडे पॅकेजेस, मोटारसायकली आणि अगदी घरांसह ऑफरवर उत्पादन श्रेणींमध्ये वेगाने वाढ झाली आहे. ई-कॉमर्स बाजाराच्या आकारावरून हे स्पष्ट होते.

**भारतात ई -कॉमर्स बाजाराचा आकार (2016 ते 2023) -**

- भारतात ई -कॉमर्स बाजाराचा आकार 2016 मध्ये: $ 16अब्ज
- भारतात ई -कॉमर्स बाजाराचा आकार 2017मध्ये: $ 20.5अब्ज
- भारतात ई -कॉमर्स बाजाराचा आकार2018 मध्ये: $ 25.3अब्ज
- भारतात ई -कॉमर्स बाजाराचा आकार 2019 मध्ये: $ 32.3अब्ज
- भारतात 2020 मध्ये ई -कॉमर्स बाजाराचा आकार: $ 40.8 अब्ज
- भारतात ई कॉमर्स बाजाराचा आकार 2021 मध्ये: $ 49.3 अब्ज
- भारतात ई कॉमर्स बाजाराचा आकार 2022 मध्ये: $ 56.7 अब्ज
- भारतात 2023 मध्ये ई -कॉमर्स बाजाराचा आकार: $ 62.3 अब्ज (अंदाजीत)

(स्त्रोत–Statista, February 2019)

इलेक्ट्रॉनिक्स आणि फॅशन/परिधान क्षेत्रासह ई -कॉमर्स उद्योग भारतात तेजीत आहे. स्टॅटिस्टाच्या अभ्यासानुसार, 2017 मध्ये हा उद्योग 20.5 अब्ज डॉलरपासून 2018 मध्ये अंदाजे 25.3 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढला आणि 2023 मध्ये 62.3 अब्ज होण्याची शक्यता आहे. 2020 मध्ये इतरबाजार अंदाज आणखी पुढे जातात. इंटरनेट ब्रँड इक्विटी फाउंडेशनचा अंदाज आहे की ई-कॉमर्स मार्केट 2020 पर्यंत 64 अब्ज अमेरिकन डॉलर आणि 2026 पर्यंत200 अब्ज डॉलर,2017 पर्यंत 38.5 अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

**ई-कॉमर्स उद्योग विभागांचे बाजार आकार -** इंटरनेट आणि मोबाईल असोसिएशन ऑफ इंडिया (IAMAI) आणि इंडियन मार्केट रिसर्च ब्युरो (IMRB) यांनी प्रकाशित केलेल्या डिजिटल कॉमर्स रिपोर्टनुसार देशातील ई-कॉमर्स (B2C मॉडेल) चे वर्गीकरण दोन भागांमध्ये केले गेले आहे, जसे ऑनलाइन प्रवास उद्योग आणि ऑनलाइन नॉन- प्रवास उद्योग.

**ऑनलाईन प्रवास -** या उद्योग विभागात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय हवाई तिकिटे, रेल्वे तिकिटे, बस तिकिटे, हॉटेल बुकिंग आणि टूर पॅकेज/प्रवास विमा यांचा समावेश होतो.

भारतातील काही प्रमुख ऑनलाईन प्रवासी वेबसाइट्स आहेत मेक मीट्रिप, यात्रा डॉट कॉम, क्लियर ट्रिप, एक्सपीडिया. को. इन, ट्रॅव्हलगुरू, मुसफिर डॉटकॉम, बुकिंग डॉटकॉम, रेडबस डॉटकॉम, गोइबिबो, अबिबस डॉटकॉम इ. बाजार

- **ऑनलाइन नॉन- प्रवास उद्योग-**
- **ई-टेलिंग -**पुस्तके, पोशाख, पादत्राणे, दागिने आणि इतर जसे की घरगुती आणि स्वयंपाक घर उपकरणे, ग्राहक टिकाऊ वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स (मोबाईलफोन/संगणक/लॅपटॉप), घरातील सामान इत्यादी विविध ग्राहक उत्पादने/सेवांची खरेदी यांचा ई-टेलिंगमध्ये समावेश आहे. ई-टेलर, फ्लिपकार्ट, ॲमेझॉन, स्नॅपडील, शॉपक्लूजइ. याची उदाहरणे आहेत.
- **वित्तीय सेवा बाजार-** मोबाईल/डेटाकार्डरिचार्ज, पोस्ट-पेडमोबाईल/ डेटाकार्ड बिल पेमेंट्स आणि तृतीय पक्ष वेबसाइट वरून युटिलिटी बिल पेमेंटसारखे व्यवहार समाविष्ट आहेत. पेटीएम, मोबिक्विक, मोफत शुल्क इत्यादी आर्थिक सेवा वेबसाइट्सची सर्वात लोकप्रिय उदाहरणे आहेत.
- **ऑनलाइन विवाह आणि वर्गीकृत बाजार -** मॅट्रिमोनी, कार, रिअल इस्टेट इत्यादी व्यवहारांचा समावेश आहे भारतात अनेक वर्गीकृत मार्केटर्स आहेत जसे की, उबर, ओला cabs.com, इ.
- **इतर ऑनलाइन सेवा बाजार -** ऑनलाईन मनोरंजन तिकीट, ऑनलाईन प्रवास, ऑनलाईन अन्न आणि किराणा सामान वितरण, चित्रपट, क्रीडा, शो/मैफिली इत्यादी ऑनलाइन तिकिटांचा समावेश आहे

**निष्कर्ष -**

देशातील ई-कॉमर्सच्या उत्क्रांतीच्या पहिला टप्प्यात कमी इंटरनेट प्रवेश, वापरकर्त्यावर आधारित असलेली एक लहान ऑनलाइन शॉपिंग, इंटरनेटचा धीमावेग, ऑनलाइन खरेदीला ग्राहकांचा कमी प्रतिसाद आणि अपर्याप्त लॉजिस्टिक इन्फ्रास्ट्रक्चर इ. चा समावेश आहे. सध्याच्या व्यावसायिक वातावरणात देशातील ई-कॉमर्सच्या उत्क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात वाढ करण्याची क्षमता आहे. दुसऱ्या टप्प्यात ई-कॉमर्सच्या वाढीस कारणीभूत असलेल्या मुख्य घटकांमध्ये भारतीय उड्डाण क्षेत्रात एल सी सी चा प्रवेश, ओ टी ए चा विकास, ऑनलाइन तिकीट बुकिंग योजना, अनेक ऑनलाइन किरकोळ वेबसाइट सुरूकरणे, बाजारपेठेत मजबूत उपस्थिती, सामाजिक ब्रँडिंग क्रियाकलापांसाठी मीडिया स्पेस, अभिप्रायासाठी ग्राहकांशी कनेक्ट होणे आणि नवीन उत्पादन प्रक्षेपित करण्यासाठी जाहिरात करणेइ.चासमावेशआहे.

भारतात ई कॉमर्ससाठी एक मोठी बाजारपेठ उपलब्ध असून त्यात आणखी वाढ होत आहे. मोठ्या संख्येने लोकांनी अजूनही इंटरनेटचा वापर केला नसताना, ते हळूहळू बदलत आहे, आणि अधिक इंटरनेट वापरकर्त्यांच्या गर्दीमुळे, ऑनलाइन शॉपिंग आणि ईकॉमर्सदेखील प्रमाणात वाढण्याची अपेक्षाआहे.

ई कॉमर्स स्पेसमध्ये केवळ भरभराट होत नाही, तर ती अत्यंत गतिमान देखीलआहे आणि ग्राहकांचा कल, तांत्रिक प्रगती आणि उत्पादन ऑफरच्या बाबतीत सततबदल पाहत आहे. किरकोळ विक्रेते, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि लघुउद्योगांनी आता स्वतःला भविष्यासाठी डिजिटल पद्धतीने तयार केले पाहिजे. जसजसे अधिक ग्राहक ऑनलाईनजातात आणि ऑनलाईन सेवा आणि ऑनलाइ नपेमेंट शोधणे निवडतात, तस तसा ई-कॉमर्सचा विकास होतो, वाढ होते, आणि म्हणूनच ई कॉमर्सच्या दुनियेत प्रत्येकाने स्वत:ला अपडेट करत राहीले पाहिजे. ई कॉमर्सला वृद्धींगत करत राहीले पाहिजे.

**संदर्भ -**


- Chatterjee, S. (2016). E-commerce in India: A review on culture and challenges. *International Conference on Soft Computing Techniques and Implementations (ICSCTI), art.no.7489547.*
- Gehrt, K.C., Rajan, M.N., Shainesh, G., Czerwinski, D. & O'Brien, M. (2012). Emergence of online shopping in India: Shopping orientation segments. *International Journal of Retail & Distribution Management, 40*(10), 742-758.
- Kalia, P., Kaur, N. & Singh, T. (2017). E-commerce in India: Evolution and revolution of online retail. *Mobile Commerce: Concepts, Methodologies, Tools and Applications, 2*, 736-758.
- https://www.avinashchandra.com/ecommerce-in-india

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# मानवी जीवनात पोषणाची भूमिका - एक चिंतन

**डॉ.वैशाली मेश्राम**

गृह अर्थशास्त्र विभाग,
बाबाजी दाते कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, यवतमाळ

मानवी जीवन हे फार गुंतागुंतीचे असते. मानवी शरीरात विविध अवयव आपआपले कार्य करीत असतात. हे कार्य सुरळीत चालण्यासाठी प्रत्येक अवयवाला आवश्यक असणारा पोषक घटक मिळणे अत्यंत आवश्यक असते, अन्यथा त्या अवयवाचे काम सुरळीत चालत नाही.

आयुष्याची जडणघडण ही योग्य आहारावर अवलंबून असते. म्हणजेच गर्भावस्थेत जर सकस व पौष्टिक आहार मातेला मिळाला तर अर्थातच बाळ सुदृढ जन्माला येतो व तो दिर्घायुषी, आरोग्यदायी जीवन जगुन एक चांगले व्यक्तिमत्व घडवित असतो. म्हणून मानवी विकास हा पुर्णत: योग्य पोषणावर अवलंबून असलेला दिसून येतो. पोषण पक्रियेत अन्नाचे फक्त सेवनच अपेक्षीत नसून त्याचे पचन व शोषण आणि त्याद्वारे प्रत्येक अवयवाला आवश्यक घटकाचा पुरवठा होणे अपेक्षित आहे, तरच त्या घटकाच्या सेवनाला उत्तम पोषक घटक संबोधले जाईल. पोषण हे अश्या प्रकारच्या प्रक्रियांची श्रृंखला आहे, जी मानवी शरीर सुदृढ ठेवण्यास मदत करते. वाढ व विकासासाठी पोषणाची अत्यंत आवश्यकता असते. म्हणजेच पोषण ही एक क्रियाशिल प्रक्रिया असून त्यामुळे व्यक्तिही सतत क्रियाशील राहून कार्यमग्न राहते. त्याच्या शरीराची पुन:निर्मिती करण्यासाठी आणि ऐच्छीक व अनैच्छीक क्रिया सुरळीत चालण्यासाठी अन्नाचे पचन, शोषण व अभिसरण होवून त्यातून पोषक घटक मिळणे आवश्यक असते.

## उद्दिष्ट्ये :

1) पोषणाचे महत्व समजून सांगणे.
2) पोषणाच्या अभावाचे दुष्परिणाम सांगणे.
3) पोषणाची शास्त्रोक्त माहिती पोहचविणे.
4) जीवनसत्वाची माहिती पोहचविणे.
5) योग्य पोषणाकरीता असलेल्या विविधबाबींचे ज्ञान पोहचविणे.

## पोषण म्हणजे काय :

WHO ने केलेल्या व्याख्येनुसार आरोग्य म्हणजे रोग व शारीरिक दुर्बलतेचा अभाव नव्हे तर शारीरिक, मानसिक व सामाजिक स्वास्थ्य म्हणजे आरोग्य होय. पोषण व आरोग्य हे एकमेकांशी सह संबंधीत असतात. पोषण निट झाले तर आरोग्य उत्तम राहते. उत्तम पोषण हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग समजला जातो.शरीराला मिळणाऱ्या पोषणावर शरीर सौष्ठव, आरोग्य पुनर्निर्मिती कार्य तसेच वाढ व विकास अवलंबून असतो. पोषण आहाराचे नियोजन करतांना व्यक्तीचे वय, लिंग, शरीर स्थिती (गर्भावस्था, दुग्ध सर्जनकाळ, इ.), कामाचे स्वरूप, आजारपण यांचा विचार करावा लागतो.

## पोषक घटका अभावी होणारे दुष्परिणाम :

पोषक अन्नाची निवड करतांना योग्य पोषक घटकाची निवड केल्या गेली नाही तर आहार विषयक सवयी पोषणावर प्रभाव करतात. शेतमजुर, नोकरी करणाऱ्या स्त्रिया पोषणाबाबत पुरेसे लक्ष देत नाहीत. त्यामुळे विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. पोषणा अभावी विशेषत: शेतमजुरी करणाऱ्या स्त्रीयांमध्ये आजारांची लक्षणे आढळतात. प्रौढांमध्ये कॅल्शिअम व जीवनसत्वाच्या कमतरतेने अस्थि मृदूता, वाकयेणे, पाठीच्या कण्यात विकृती, पाय-सांधेदुखणे, इ. आजार आढळतात. जीवनसत्व ‘अ’ च्या कमतरतेने डोळे व त्वचेचे रोग झालेले आढळतात. रातांधळेपणा, त्वचेवरपुरळ, तसेच त्वचारोग झालेले आढळतात. जीवनसत्व ‘ब’ च्या कमतरतेने बेरीबेरी, अशक्तपणा तसेच स्नायुंची ठिसुळता आढळून येते.

जीवनसत्व ‘क’ च्या कमतरतेने प्रामुख्याने स्कर्व्ही हा रोग होतो. यामध्ये रक्तस्त्राव जास्त प्रमाणात होणे, हिरड्यांमधून रक्त येणे, दात सैल पडणे अशी लक्षणे दिसून येतात.

लोहाची कमतरता रक्तक्षयाला आमंत्रण देते. यामुळे बाळ व माता मृत्युचे प्रमाण जास्त असते. तसेच अकाली प्रसुती, शिशुचे वजन कमी अशी लक्षणे दिसून येतात. आयोडीनच्या कमतरतेने गॉइटर हा घशाचा रोग होतो. थायरॉईड ग्रंथीतील थॉमरॉक्सीन स्त्रावाच्या निर्मितीसाठी आयोडीन आवश्यक आहे.

वरील दुष्परिणाम टाळण्यासाठी पोषण दर्जा सुधारणे आवश्यक असते. “पोषणाचा दर्जा सुधारणे म्हणजे अनेक अन्नगटांची एकत्र गुंफण करून पाहिजे त्या पोषण मूल्यांचे कमी-अधिक प्रमाणात संघटन करणे आणि आरोग्य वर्धकता त्या खाद्यपदार्थातून प्राप्त करणे, म्हणजे अन्नाचा पोषण दर्जा सुधारणे होय.”यासाठी खालील प्रक्रिया प्रामुख्याने केल्या जातात.

1) मोड आणणे (Germination)

2) खमिरीकरण (Fermantation)

3) पूरक पदार्थाचा पुरवठा (Supplementation)

4) पर्यायी पदार्थ (Substitution)

5) समृद्धीकरण आणि सुदृढीकरण (Fortification and Enrichment)

पोषण मूल्यांचा दर्जा वरील प्रक्रीयेद्वारे वाढवून पोषक घटक घेतल्यास आजाराला काही प्रमाणात आळा घातला जातो. अन्न तयार करतांना वनस्पतीज आणि प्राणित खाद्यपदार्थाचा आवश्यकतेनुसार, रूचीनुसार आणि सोयीनुसार उपयोग केला पाहिजे. खाद्यपदार्थातील मुळघटकांचे प्रमाण भिन्नभिन्न आणि विविध असते. ज्यावेळी अन्न शिजविल जाते, त्यावेळी या मुळ घटकांची एकमेकांवर क्रिया प्रक्रिया होत असते. त्यामुळे पदार्थास चव, वास व रंग प्राप्त होतो. यामुळे पदार्थ रूचकर बनविणे, पोषक घटक कायम ठेवणे, त्यातील जंतूंचा नाश करणे, या सर्वांचा विचार करून पदार्थ तयार केला जातो. अन्न शिजविण्याच्या क्रियेशी रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवजंतूशास्त्र तसेच कला यांचा संबंध येतो.

म्हणून मानवी जीवन सुदृढ राहण्यासाठी कॅलरी, प्रथिने, कॅल्शिअम, लोह, थायमीन, तृणधान्ये, डाळी, पालेभाज्या, कंदमुळे व दुग्धाचा समावेश आहारामध्ये असावा.

विविध आरोग्यविषयक समस्येने ग्रासलेल्या बऱ्याच महिला असून औषधोपचार न घेता किरकोळ तक्रारी समजून त्याकडे दुर्लक्ष करतांना निदर्शनास आले. अश्यावेळी त्यांना आर्थिकदृष्टीने परवडेल असा पौष्टीक आहार तसेच निरोगी स्वास्थ्या विषयी जागरूक असणे महत्वाचे वाटते, तरच खऱ्या अर्थाने मानवी जीवन सक्षम बनेल.

## निष्कर्ष :

1) पोषणाचे महत्व काम करणाऱ्या स्त्रीयांना माहित नाही.

2) योग्य पोषणाअभावी होणाऱ्या विविध दुष्परिणामाला सामोरे जावे लागते.

3) महिलांना पोषणाची शास्त्रोक्त माहिती नव्हती.

4) विविध जीवनसत्वाअभावी होणारे रोग त्यांना माहिती नव्हते.

5) विविध आजार, दुर्बलता यामुळे समाज खिन्न अवस्थेत दिसून आला.

**शिफारशी :**

1) महिलांना आहारासंबंधी शास्त्रोक्त ज्ञान आहे.
2) शासनातर्फे, सामाजिक संस्थेव्दारे पोषणाचे महत्व पटवून देण्याकरीता शिबीरांचे आयोजन करावे.
3) विविध माध्यमांव्दारे पोषक घटकांच्या कमतरतेचे दुष्परिणाम समजून सांगून महत्व पटवून सांगावे.
4) पोषक आहाराचे वाटप करावे.
5) सहकारी पातळीवर विविध कार्यक्रम घेवून महिलांना उत्तम आरोग्य जपण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

# नौकरी करणाऱ्या महिलांचा मानसीक ताण व आरोंग्याच्या समस्या

सहाय्यक प्रा.डॉ. कु उषा नानाजी राखुंडे
गृह–अर्थशास्त्र (विभाग प्रमुख)
शिवरामजी मोघे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केळापूर (पांढरकवडा) जि. यवतमाळ.

---

**सारांश**– बदलत्या काळानूसार कुटूंबाचे सर्वागीण जीवनमान उंचावण्याची गरज आहे. त्याकरिता आर्थिक स्थिती मजबूत असणे गरजेचे आहे त्याकरिता घरातील एकटया व्यक्तींचे उत्पन्न हे पूरेसे नसते म्हणून कुटूंबाला आर्थिक सहकार्य करण्यासाठी स्त्री ही रोजगार, स्वयंरोजगार, व्यवसाय व नौकरीच्या माध्यमातून घराबाहेर पडून कुटूंबाला सहकार्य करित आहे. महिलांचे आरोग्य अत्यंत काळजीचा मुद्दा आहे.मुलांचे संगोपन, शिक्षण, नौकरी, घरातील जेष्ठांची जबाबदारी, इतरांचे आजारपण यातच स्त्रिया गुंतून पडतात. की, स्वत:च्या आरोग्याकडे त्यांना लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. कुटूंबाची काळजी घेणारी महिला कायम आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. याचा परिणाम महिलांच्या आरोग्यावर होतांना दिसून येतो. म्हणूनच प्रस्तुत शोध निंबधात **नौकरी करणाऱ्या महिलांचा मानसीक ताण व आरोंग्याच्या समस्या** यावर प्रकाश टाकण्यात आला. व शोध निंबधाचे उद्दिष्टे व गृहितके ठरविण्यात आले. तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला संबधीत विषयाचे तथ्थ संकलन करून विश्लेषन करण्यात आले व निष्कर्ष आणि उपाय सुचविण्यात आले.

**प्रस्तावना–**

गेल्या ५० वर्षात जगभरातील प्रगत आणि प्रगतशील देशामध्ये किंवा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत लक्षणीय वाढझाली आहे लग्नापूर्वी शिक्षण पूर्ण करुन स्वावलंबी होण्याकडे मुलींचा कल दिसून येतो. जगभरातील स्त्रिया घराबाहेर जावून व्यवसाय, नौकरी करतांना दिसून येत आहे हे करत असतांना मुलांचे सगोपन, घरकाम नातेसंबध, कार्यक्रम हया सर्व बाबीत लढतांना दिसून येतात त्यामुळे घर आणि नौकरी व व्यवसाय या दोन्ही जबाबदाऱ्या साधतांना तीची तारेवरची कसरत होत आहे त्यामुळे स्त्रियांवर अतिरीक्त ताण येत आहे भारतात अजूनही पुरुषप्रधान संस्कृती मध्ये अनेक घरामध्ये स्वयंपाक, घरकाम आणि मुलांचे संगोपन व जेष्ठ नागरीकांचे सांभाळ मुख्यत्वे स्त्री पार पाडते बऱ्याचदा घर आणि नौकरी व व्यवसायातील ताण आणि जबाबदाऱ्या हयाचा ताण हया स्त्रियांच्या मानसीक आणि शारिरीक आजारांच्या समस्या निर्माण होतात.

बदलत्या काळानूसार कुटूंबाचे सर्वागीण जीवनमान उंचावण्याची गरज आहे. त्याकरिता आर्थिक स्थिती मजबूत असणे गरजेचे आहे त्याकरिता घरातील एकटया व्यक्तींचे उत्पन्न हे पूरेसे नसते म्हणून कुटूंबाला आर्थिक सहकार्य करण्यासाठी स्त्री ही रोजगार, स्वयंरोजगार, व्यवसाय व नौकरीच्या माध्यमातून घराबाहेर पडून कुटूंबाला सहकार्य करित आहे.

आपल्या भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीला घर सांभाळून नौकरी करावी लागते याशिवाय काम करण्याची जागा, फर्निचर, वातारवण योग्य नसेल तर तिथे काम करतांना शरिराच्या अवयवांवर व मानसीक ताण तीच्यावर पडते.

आज स्पर्धात्मक, गुंतागुंतीच्या, ताणतणाव जगामध्ये वावरतांना सारेच कमी जास्त प्रमाणात धास्तावलेले आहे वाढती लोकसंख्या, वाढती महागाई, अस्थिर आर्थिक परिस्थीती यामुळे कुटूंबाचा आर्थिक भार उंचवण्यासाठी शिक्षीत व अशिक्षीत महिला दोन्हीही कुटूंबाला आर्थिक मदत करण्यासाठी नौकरी, व्यवसाय, रोजगारच्या निम्मींत्याने घराबाहेर पडत आहे अशाच औद्योगीक क्षेत्रात प्रगतीचाच एक बदल म्हणजे आजचे स्त्रियांचे क्षेत्र व्यापक झाले आहे स्त्री ही चुल आणि मुल यापुरतीच ती मर्यादीत न राहता शिक्षणाच्या मिळालेल्या संधीचा फायदा नौकरीची संधी प्राप्त होत आहे त्यामुळे या सर्व भुमिका पार पाडतांना तीला ताण सहन करावा लागतो या ताणतणावामुळे तिच्या आहार व आरोग्यांच्या समस्या वाढत आहे

**ताण म्हणजे ज्या मानसीक अवस्थेमुळे तिला शरिरीक स्वास्थ प्रभावित होवू शकते तो म्हणजे ताण होय.**

सतत डिप्रेशन ताणतणाव, विचारात राहून मानसीक ताण निर्माण होवून त्याचा शारिरीक आंतरिक क्रियांवर प्रभाव होवून शारिरीक आजार किंवा व्याधी निर्माण होते त्याला मानसीक ताण म्हणतात.

**विन्गेटने ताण याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''शरिराचे नैसर्गिक संतुलन बदलविणारा कोणताही प्रभाव म्हणजे ताण होय.''**

ताणमुळे व्यक्ती सतत विचारात राहून चिंताग्रस्त होतो त्यामुळे झोप न लागणे कुठलेही काम चांगले न होणे त्याचा विपरीत परीणाम शारिरीक व मानसीक स्थितीवर होवून आरोग्यावर होतो.

महिलांचे आरोग्य अत्यंत काळजीचा मुद्दा आहे. घरातील जबाबदाऱ्या, घरातील लोकांचे सांभाळणारी स्त्री स्वत:च्या आरोग्याबाबत उदासीन दिसते.अगदी सहन होण्यापलीकडची परिस्थिती निर्माण होईल तेव्हाच ती दवाखान्याची पायरी चढते.

मुलांचे संगोपन, शिक्षण, नौकरी, घरातील जेष्ठांची जबाबदारी, इतरांचे आजारपण यातच स्त्रिया गुंतून पडतात. की, स्वत:च्या आरोग्याकडे त्यांना लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. कुटूंबाची काळजी घेणारी महिला कायम आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. स्त्रियांच्या आरोग्याबाबत समाजात जागृकता दिसून येत नाही **स्त्रियांचे आरोग्य हे उत्तम आहार, चागल्या सवयी आणि वैद्यकीय सल्ला या त्रिसुत्रीवर टिकणे आवश्यक आहे.**

सामाजीक, आर्थिक व मानसीक ओझ्याखाली आजची भारतीय स्त्री जीवन जगत आहे आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रीया उंच भरारी मारत आहेत. आजची महिला घराबाहेर पडून स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण करित आहेत. या धकाधकीच्या जीवनात महिलांनी कामासोबतच आरोग्याकडे लक्ष देणे आावश्यक झाले आहे. आजची स्त्री नविन आव्हाने स्विकारीत असली तरी तीला दुय्यम दर्जाची वागणूक हि कमी होतांना दिसत नाही. आजही पुरूष व स्त्री यांच्यात असमानता दिसून येत आहे.

**आरोग्याची व्याख्या—(डब्लू. एच. ओ.)**यांच्यामते, '' आरोग्याचा अर्थ फक्त रोगाचा अभाव नसून स्वास्थ शरिराबरोबर मानसीक तसेच सामाजीक तंदुरूस्तीची सकारात्मक अवस्था आहे.''

कोणत्याही देशाच्या समाजीक व आर्थिक विकासात त्या देशातील स्त्रीचे आरोग्य महत्वाचे असते.

**आरोग्य विषयक घटक—** वातावरण, सामाजीक परिस्थिती, तसेच मानवनिर्मित व शैक्षणिक घटकाचा परिणाम आरोग्यावर होतो.

मानवी जीवनात सभोवतालची परिस्थिती, रूढी, परंपरा, धर्म सामाजीक बंधने, वय आणि लिंग तसेच मानवी सुसंस्कृतपणा, राहणीमान, वागणूक, सवयी आणि प्रवृत्ती समाज मनावर सकारात्मक व नकारात्मक परिणाम सोडून जातात आणि याचा परिणाम महिलांच्या आरोग्यावर होतांना दिसून येतो.

म्हणूनच प्रस्तुत शोध निंबधात **नौकरी करणाऱ्या महिलांचा मानसीक ताण व आरोंग्याच्या समस्या**यावर प्रकाश टाकण्यात आला.

**संशोधन साहित्याचा आढावा**

संशोधनाच्या कार्यात लेखक साहित्यींक अभ्यासक व संशोधक यांनी कलेल्या अध्ययनाचा वापर भविष्यात संबधित घटकाला व्हावा हा हेतू बाळगून साहित्याची निर्मिती झालेली असते.त्याच्याच भाग म्हणून प्रस्तुत शोध प्रबंधात विषयाच्या संदर्भात आढावा घेण्यात आला.

- द हिंदू या वर्तमान पत्रातील मार्च २०१४ : मध्ये विविध शहरातील १२० निरनिराळया प्रकारच्या इंडस्ट्रीमध्ये काम करणाऱ्या २८०० स्त्रियांचे सर्वेक्षण केले त्यात असे पाहण्यात आले की भारतातील ७५ टक्के कामकरी स्त्रियांच्या कोणत्या ना कोणत्या प्रकारचे शारिरीक आणि मानसीक आजार आहेत.
- प्रा. प्रभा चिंचखेडे डिसेबर २०१२: नौकरी करणाऱ्या स्त्रियांचा ताण व कौटूंबीक संबंध यावर अध्ययन करण्यात आले असता स्त्रियांना नौकरीची संधी जरी प्राप्त झाली ती स्वाभीमानाने जीवन जगत असली तरी तीच्यावर कामाचा ताण येऊन कौटूंबीक संबध सांभाळतांना तीच्या आरोंग्याचा प्रश्न निर्माण झालेला दिसून आला.
- प्रा. श्वेता गुंडावार मार्च २०१७: नौकरी करणारी स्त्री व तिचे आरोग्य एक निरीक्षण यावर अध्ययन करण्यात आले असता घर आणि नौकरी करतांना तीची ओढाताण होवून मानसीक व शारिरीक ताण निर्माण होतो असे आढळून आले.

वरिल अभ्यासाचा निष्कर्शनावरून पुढील संशोधनाची उद्विष्टे व गृहीतके ठरविण्यात आले.

**संशोधनाची उद्विष्टे :—**

- नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या तणावपूर्ण जीवणाची माहिती जाणून घेणे.
- नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या आहाराची माहिती जाणून घेणे.
- नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या शारिरीक व मानसीक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची माहिती घेणे.
- नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या होणाऱ्या आजाराची माहिती घेणे.

**संशोधनाची गृहीतके:—**

- नौकरी करणाऱ्या स्त्रियां ताणावपूर्ण जीवन जगतात.
- नौकरी करणाऱ्या स्त्रिया आहाराकडे दुर्लक्ष करतात.
- नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या शारिरीक व मानसीक आरोग्यावर परिणाम दिसून येतो.
- नौकरी करणाऱ्या स्त्रिया आजारांनी ग्रस्त आहे.

**संशोधन पद्वती**

**अध्ययन क्षेत्र** :—पांढरकवडा शहरातील विविध क्षेत्रातील नौकरी करणाऱ्या स्त्रिया

**अध्ययन निवड:—**प्रस्तूत शोध निबंधाच्या तथ्य संकलनासाठी यादृच्छीक पद्वतीनेनौकरी करणाऱ्या ५० महिलांची निवड करण्यात आली.

**तथ्य संकलन**:—प्राथमिक स्त्रोत प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखत, व दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यात प्रामुख्याने संदर्भग्रंथ, अभ्यासक्रमीक पुस्तके, संशोधन पत्रिका, मासीकातील अग्रलेख व वर्तमान पत्रातील लेख याचा आधार घेण्यात आला. संबधीत विषयाचे तथ्य संकलन करून विश्लेषन करण्यात आले व निष्कर्श आणि  उपाय सुचविण्यात आले.

**नौकरी करणाऱ्या स्त्रियां ताणावपूर्ण जीवन जगतात**

आज विज्ञानाच्या प्रगतीमुळे गरजेनूसार जीवन सुखकर होण्यास महिलांचा नौकरीचा प्रश्न निर्माण झाला स्त्री जीवनाला प्राधान्य देण्यात आले अनेक क्षेत्रात स्त्रीया उतरल्या व प्रगती करीत आहे आर्थिक बाजूने स्वावलंबी व्हावे तसेच कुटूंबाचा आर्थिक भार सांभाळावा जीवनमान सुधारावे यादृष्टीने ती प्रयत्न करीत आहे आणि ती रोजगार स्वयंरोजगार नौकरी व व्यवसाय करीत आहे त्यामुळे आजच्या स्त्रीचे क्षेत्र हे व्यापक झाले आहे पण घर आणि नौकरी साभळतांना तिची फार मोठी कसरत होत आहे. घराच्या जबाबदाऱ्या जसे मुलांचे संगोपण जेष्ठ नागरीकांची काळजी व नौकरीच्या कामाचा मेळ घालतांना ती वेळेचे व कामाचे नियोजन करतांना ती तनावात जीवन जगत आहे आणि त्याचा परिणाम तीच्या शारिरीक व मानसीकतेवर होतांना दिसला.

**नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या आहाराची माहिती**

स्त्री समाजाचा कणा आहे आहार ठरवण्यापासून ते खाऊ घालण्यापर्यतचे सर्व काम स्त्रीच करते कामाच्या व्यापात ती स्वत:च्या आहाराकडे नेहमी दुर्लक्ष करते विशेषत: नौकरी करणाऱ्या स्त्रीया आरोग्याची नेहमी हेडसांड करतात नौकरी करणारी स्त्रीचा आकडा वाढत आहे तिच्या प्रत्येक जीवनाच्या पायरीवर सत्वयुक्त संतुलीत आहाराची गरज असते जन्मानंतर, किशोरावस्थेत, पौगंडावस्था, विवाहानंतर, गर्भावस्था, प्रसुतीनंतर, मासीक पाळी बंद होतांना परंतु सर्वात अधिक पोषकघटकाची गरज नौकरी करणाऱ्या स्त्रीची आहे तीला चोवीस तास काम करण्याची क्षमता हवी असते कारण ती तिहेरी भूमिका बजावत असते मुलांना जन्म देणे, घर सांभाळणे, नौकरी व व्यवसाय सांभाळणे इत्यादी बहुविध कामासाठी तिचे शारिरीक व मानसीक आरोग्य उत्तम असणे अत्यंत आवश्यक आहे

सर्वसाधारणपणे स्त्रीया हया कुटूंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडत असतांना कुटूंबाचे आरोग्य सांभाळतांना मात्र स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्षीत करून आहार स्वत:च्या आरोग्याला पाहिजे तसा आहार घेत नाही सगळयांचे जेवन झाल्यावर उरेल ते खाणे ती तसेच शिळे अन्न खाणे पसंत करते. वेळ मारुन घेणे त्यामूळे तीच्या आरोग्याला पाहिजे तसे अन्नघटक प्राप्त होत नाही पोषकतत्व विरहीत आहाराचे सेवन करणे अधिक तेलकट पदार्थ, चरबीयुक्त पदार्थ, चहा, कॉफी यांच्या अतिसेवन करते.

**नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या शारिरीक व मानसीक आरोग्यावर होणारा परिणाम**

शहरामध्ये, उच्च शिक्षण, करिअरला महत्व देणाऱ्या मुली उशिरा लग्न करण्याचे प्रमाण  वाढते आहे म्हणजेच वयात आल्यापासून लग्न होईपर्यंतचा टप्पा चागंलाच लांबतो आहे या कालावधीत महिलांना आरोग्याशी संबधीत विविध बाबीनां तोंड द्यावे लागाते.

लग्नानंतर पहिल्या मुलाचा विचार लवकर करावा का उशिरा या विषयी मनात कायम गोंधळ उडालेला दिसतो.भारतात स्त्रियांना आरोग्य म्हणजे केवळ गरोदरपणा व बांळतपण एवढयापुरतेच मर्यादित असल्यामूळे

मानसीक ताणतणाव,झोप न होणे आरोग्याच्या पायाभूत माहितीचा अभाव, डॉक्टरांच्या सुचनेशिवाय घेतलेल्या गर्भनिरोधक गोळयांच्या अतिवापरामुळे नौकरी आणि घरातील जबाबदारी पार पाडतांना होणारी तारांबळ याचा तिच्या शारिरीक व मानसीक आरोग्यावर होतो.

**नौकरी करणाऱ्या स्त्रियांना होणारे आजार**

नौकरी करणाऱ्या मुख्यत्वे खालील आजार आढळून आले. स्त्रियांचे मानसिक आरोग्य, जनन संस्थेंचे आजार, स्तन व गर्भाशयाचा कॅन्सर. रजोनिवृतीच्या वेळी होणारा त्रास. चाळीशीच्या आतच सांधेदूखीचा त्रास.ॲनिमीया (रक्तक्षय), गर्भारपणातील आजार, स्त्रियांमध्ये प्रजननविषयक विकारापासून मानसीक तणाव निर्माण होत आहे.उच्च रक्तदाब, हृदयरोग, मधुमेह, स्थुलता, हाडे व सांध्याचे विकार (ऑस्टिओपोरोसीस संधीवात), रक्ताची कमतरता, अनियीमत मासीक पाळी, निरुत्साह, डोकेदुखी, भुकेचा अभाव, झोप न येणे, हायपर टेशन, पाठदुखी, कमरदुखी, मानेचा त्रास ही आजार दिसून आली.

निष्कर्श :—

- कुठलाही आजार झाल्यास तो झाला आहे हे मान्य करित नाही.
- समाजातील रूढी परंपरा, अधंश्रध्दा यामुळे वैयक्तीक आहार व आरोग्याकडे दुर्लक्ष करणे.
- समतोल आहाराचा अभाव, शांत बसून जेवण न घेणे घाईघाइत जेवण करणे.
- सत्वयुक्त घटकाचा अभाव असल्यामुळे हिमोग्लोबीनची कमतरता काही नौकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये दिसून आले.
- सध्यांची बदलती जीवनशैली,स्तनाचा कर्करोग गर्भाशयाचा कर्करोग,पायांचा त्रास, मानेचा त्रास, पाठदुखी, कमरदुखी, मासीक पाळीचा त्रास, अशा विवीध आजारानां तोंड द्यावे लागत आहे.
- सतत ताणतणाव, झोप व्यवस्थित न होणे. त्यामुळे अस्वस्थता निर्माण होते व क्रयशक्ती कमी होते.
- बऱ्याच नौकरी करणाऱ्या स्त्रियांना पायाचा व गुडध्याचा त्रास दिसून आला.
- कमरेमध्ये व मानेमध्ये गॅप आलेल्या स्त्रिया आढळून आल्या.
- आजच्या काळात कुटूंब संस्था पद्वती बदलल्यामुळे छोटे बाळ असणाऱ्या स्त्रियांचे बालकाचे संगोपन ही मोठी समस्या आढळून आली.
- व्यायामाचा अभाव, अनियमित आहार त्यामुळे मासीक पाळीचा त्रास मधुमेह, हायपर टेंशन, लठठपणा, थॉयरॉइडचा त्रास, हार्मोन्सचा प्रभाव दिसून आला.
- शस्त्रक्रियेद्वारे बाळंतपणाचे प्रमाण वाढत आहे. अशा स्त्रियांना ६ महिने ते १ वर्ष आराम आवश्यक असतो पण तो मिळत नाही व लवकर कामाला लागावे लागते.
- जास्तीत जास्त महिलांमध्ये गर्भपाताचे प्रमाण वाढतांना दिसून येत आहे.

उपाय:—

- महिलांनी कामासोबतच आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
- व्यायामाचे गरज आणि फायदे लक्षात घेवून मानसीक व शारिरीक स्वास्थात सुधारणा घडवून आणणे
- आहाराचे महत्व समजून सत्वयुक्त व समतोल आहाराचा समावेश करणे.
- जेवणाच्या वेळा ठरवून कितीही काम असले तरी वेळेवर जेवण करणे, दुपारचे जेवन मध्ये डिफीनचा वापर करणे.
- कुठल्याही कामाच्या ठिकाणी कमी जास्त प्रमाणात राजकारण असते त्याकडे दुर्लक्ष करून ताण न घेणे.
- स्वत:साठी थोडासा वेळ काढून आवडता छंद किंवा चांगले संगीत ऐकणे, मैत्रिनीसी गप्पा मारणे म्हणजे मनाला आनंद मिळतो व थकवा कमी होतो.
- स्त्री नौकरीमुळे घराबाहेर पडल्यामुळे घराची, मुलांबाळांची, व घरातील जे प्रश्न निर्माण झाले ते सोडविण्यासाठी पतीने व घरातील इतर मंडळीनी मदत करणे आवश्यक आहे.

- घरकाम करायला पुरुषांना कमीपणा वाटतो घरातील कामे बायकांची आहे ही मानसीकता बदलणे आवश्यक आहे.
- कुटूंबामध्ये सर्वांची भूमिका अशी असायला पाहिजे की **ऐकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ या तुकाराम महाराजांच्या म्हणीप्रमाणे** असावे तरच महिलांचे प्रश्न सुटण्यात मदत होईल

**संदर्भग्रंथ सुचीः—**

डॉ. शुभांगी गोरे/गव्हाणे —'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या'
डॉ. कमला सोहोनी — आहार व आरोग्यविचार प्रकाशन— प्रदिप चंपानेरकर, मुंबई.
डॉ. स्मिता मेंहत्रे— भारतीय स्त्री आणि मानवाधिकार. साईनाथ प्रकाशन जुलै २०११
डॉ. सय्यंद तलम्सूम सुलताना — ग्रामीण महिलांच्या मुलभूत समस्या आणि उपाय
पत्रकार अभय मोकाशी — नौकरदार स्त्री प्रश्न आणि मानसीकता सामना वृत्तपत्र.
वृत्तपत्रे— लोकमत, सकाळ, लोकसत्ता, आणि मासीके.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# वं.राष्ट्रसंतांचे संतत्व, व्यक्तिमत्व आणि कार्य

**प्रा. सौ. धनश्री लोकचंद राणे**
सहाय्यक प्राध्यापिका
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
भवभूती महाविद्यालय, आमगांव

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे संत होते. पण त्यांचे संतपण हे माणसापेक्षा वेगळे नव्हते. सामान्य माणूस आणि त्यांची सुखदु:खे यांच्या मुक्तीसाठी करावी लागणारी धडपड म्हणजे संतपण! अशी त्यांची धारणा होती. या धारणेतूनच त्यांनी जीवनभर मानवतेची उपासना चालविली. समाज परिवर्तनाच्या दिशा निर्धारित करून समाजातील अमंगलाचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी आपली वाणी व प्रतिभा वापरली. पशुत्वाकडे वाहत जाणारा माणूस देवत्वाच्या जवळ पोचावा एवढयासाठी त्यांनी आपली संपूर्ण शक्ति पणाला लावली.

वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजात जे जे पाहिले तेच समाजाला सांगितले आणि सध्याच्या काळाला साजेसे उपाय सुचविले. मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करून समाजप्रबोधनाची पताका उंच उंच फडकवित नेली व कृतीशिल समाजपरिवर्तन घडवून आणले. त्यांचे समाजप्रबोधन विज्ञाननिष्ठ होते. अंधश्रद्धेवर त्यांनी अतिशय घणाघाती प्रहार केले. आपल्या अभिनव भजनाने व अपूर्व गायनशैली व खंजरीवादनाने महाराष्ट्रीयन व भारतीय समाजमनाला भारावून टाकले. कधी 'मंगलमय नाम तुझे सतत गाऊ दे ।' अशा भजनांनी भाविकांना देवभक्तीचे वेड लावले तर कधी त्याच भाविकांना टाळ मृदगांच्या नादी न लावता इ.स. १९४२ च्या क्रांतीपर्वात 'झाड झडुले शस्त्र बनेंगे संत बनेगी सेना, पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेगी किनारे ! अशा विस्फोटक देशभक्तीपर भजनाच्या माध्यमातून स्वातंत्र्य संग्रामात उत्स्फुर्तपणे उडी घ्यायला प्रवृत्त केले. अशाप्रकारे देवभक्ती आणि देशभक्ती यांचा पुरस्कार केला.

वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नुसते सत्पुरूष नव्हते; तर समाजपुरूष होते. आपल्या धर्माने आत्मोन्नती, आत्मोद्धार हे मानवाचे परमोच्च ध्येय मानलेले आहे. व्यक्तीच्या उन्नतीवर, तिच्या उद्धारावरावर आणि विकासावर कटाक्षाने भर दिलेला आहे. समाजाच्या उन्नतीवर किंवा उद्धारावर नाही. समाजातील हिन—दीनांची सेवा, दलित पतितांचा उद्धार यांच्यावर आपल्या धर्माचा कटाक्ष नाही. त्यामुळे या भरतखंडात लाखो लोक, लाखो आदिवासी आणि अस्पृश्य, शूद्र आणि अतिशूद्र हे अज्ञानाच्या आणि अस्पृश्यतेच्या गर्तेत शतकानुशतके पिचत राहिले. राष्ट्रसंतांनी या समग्र वर्गाला खिचपत पडलेल्या गर्तेतून काढण्याचा सदैव प्रयत्न केला. समाजमनावर श्री तुकडोजी महाराजांनी "जनसेवा ही ईश्वरसेवा । मान्य खरोखर ती देवा ।" हे तत्व बिंबविले हे त्यांचे सर्वात मोठे कार्य होय.

भारतीय स्वातंत्र्यलढयात त्यांनी जसे अतुलनीय कार्य केले. तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांचे कार्य निरंतर सुरूच राहिले. अजूनही ते हयात नसतानाही त्यांचे कार्य अखंड चालूच आहे. त्यांनी गुरूदेव सेवामंडळ सुरू केले. शेकडो पुस्तके; हजारो भजने लिहिली व याच पुस्तकांच्या, भजनांच्या माध्यमाने जनतेला प्रबोधन केले. हजारो वर्षांच्या रूढीने आणि मृत विचारांच्या ओझ्याखाली वाकलेला हा प्रचंड समाज प्रथम या ओझ्यातून मुक्त होऊन चालू लागला पाहिजे. त्यांची व्यसने, त्यांचे दुर्गुन, त्यांची बेशिस्त नाहीसी झाली पाहिजे. यावर त्यांचा कटाक्ष असे. दारू प्यायची नाही, कणसं चोरायची नाही, मरीआईला बोकड कापायचा नाही, भजनाला बसायचे ते शिस्तीत बसायचे, वहाणा रांगेत ठेवायच्या, पात्रे कशी मांडावी, रांगोळया कशा घालाव्या याबद्दलही ते कटाक्षाने मार्गदर्शन करीत असत.

वं.राष्ट्रसंतांचा 'ग्रामगीता' हा ग्रंथ तर समाजपरिवर्तनाच्या हजारो सूत्रांच्या दिग्दर्शनाचा महासागरच असल्याचे दिसून येते. संपूर्ण विश्वपरिवर्तनापर्यंत मजल मारण्यासाठी कार्य करणे आवश्यक आहे. हे सांगताना महाराज ग्रामगीतेत म्हणतात :

मानवमात्राचे प्रथम माहेर । आपुले गाव त्यांतील घर ।
यातूनि प्रगति करीत सुंदर । पुढे जावे विश्वाच्या ।।

वं.महाराजांचे समग्र आयुष्य खेडेगावात 'आदर्श' खेडी निर्माण करण्याच्या प्रयत्नात गेले. त्यांनी प्रत्यक्षत: सर्व ठिकाणी प्रवास व प्रचार केला असल्यामुळे आपल्या चिकित्सक दृष्टीने ग्रामगीतेत आठ पंचकांमध्ये एक्केचाळीस अध्यायांची गुंफन करून सर्वस्पर्शी असे उद्बोधन समाजघटकांना करण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे. ग्रामगीतेविषयी उद्गार काढताना ४१ व्या अध्यायात राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात :

ईश्वरे व्यापिले हे विश्व । म्हणोनि जगचि आम्हा देव ।
विश्वाचा मूळ घटक गाव । ग्रामगीता त्यासाठी ।। १।।

प्रापंचिक—पारमार्थिक, देवभक्त—देशभक्त, पंथधर्मादिकांचे लोक यांची विरोधी, विसंगत व भ्रमिष्ट स्थिती लक्षात घेऊन ती दूर करण्यासाठी, सर्वांना एका छत्राखाली आणणारे धार्मिक माध्यम त्यांनी निश्चित केले व त्याप्रमाणे एक्के—सप्ताह—चार्तुमास्य—यज्ञ—भजने इत्यादी जुन्या साधनांतून नवे विचार ओतले. १९३० च्या सत्याग्रही शिबिरांतून राष्ट्रीय भजने गायिली. १९३४ चा चिमूरचार्तुमास्य व १९३५ चा सालबर्डीचा अपूर्व यज्ञ यांनी महाराजांच्या कार्याचा व व्यक्तिमत्वाचा अपूर्व ठसा उमटला. पूढे गावोगावी अनेक आरतीमंडळे व भजनमंडळे निर्माण करण्याचे कार्य त्यांनी आरंभिले. आष्टीला एका केंद्राची निर्मिती करून प्रेमीजनांची एक संघटनाच निर्माण केली. १९३५ साली मोझरी (गुरूकुंज) येथे धर्मसेवाग्राम व ग्रंथप्रकाशनाचे कार्य सुरू केले. चातुर्मास्य व धर्मशिक्षणवर्ग यांतून उद्योग, व्यायाम, प्रचारादी विभाग निर्माण केले. यातूनच १९४१ पर्यंत एक तेजस्वी तरूण व होतकरूंची समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने कार्य करणारी संघटनाच निर्माण झाली. राष्ट्रसंतांनी प्रथमत: आता देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे हे हेरले आणि "जाग उठो बालविरो, अब तुम्हारी बारी है" असा संदेश दिला.

१९४२ च्या आंदोलनात महाराजांच्या संदेशाने गावोगावचे उपासक कार्य करून तुरूंगात गेले. चिमूर—आष्टीच्या स्वातंत्र्ययुद्धाबद्दल खुद्द महाराजांनासुद्धा इंग्रज सरकारने चांदा—चातुर्मास्यांतून पकडून, रायपूर व नागपूर जेलमध्ये ४ महिने डांबले आणि 'आते है नाथ हमारे' इ. भजनांवर बंदी घातली.

तुरूंगामधून बाहेर पडताच मृतप्राय शाखांना व हवालदिल लोकांना जनजीवन देण्यासाठी 'विश्वशांती' नामसप्ताहाचे आयोजन करून महाराजांनी संपूर्ण देश जागवला. १९४३ मध्ये श्रीगुरूदेव सेवामंडळाच्या विविध ठिकाणी शाखा निर्माण करून 'श्रीगुरूदेव' मासिकाची सुरवात केली. तसेच शेकडो प्रचारक—प्रचारिका त्यांच्या विधायक कार्यामध्ये स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले. समाजात कसे वावरावे, कसे वागावे याविषयी मार्गदर्शन करून त्यांचा फायदा समाजातील सर्व जनतेला कसा मिळेल या दृष्टीने प्रयत्न केले. शिबिरांचे आयोजन करून प्रत्येकात आस्था, प्रेम व आत्मीयता कशी निर्माण होईल; यातून ग्रामनिर्माणाचे कार्य कसे घडेल; हे करताना त्यात कृषिप्रदर्शन, पशुप्रदर्शन, सहकारी तत्वांचा प्रचार या गोष्टींना विशेष महत्व द्यावे त्यामूळे गावाच्या नवनिर्माणाचे कार्य तर होईलच परंतु खेडयापाडयात राहणाऱ्या लोकांच्या अंतरंगात शिरून त्यांच्यातील एकांगी वृत्ती दूर करता येईल. यावर भर दिला. बलिदानबंदी, यात्राशुद्धी, मंदिरोद्घाटन, सर्वांगिन समाजशिक्षण, आखाडा संघटन, व्यसननिर्मुलन, संतसंमेलन, भूदानयज्ञ, भारतसेवासमाज इत्यादीबाबत महत्वपूर्ण कार्ये महाराजांनी केली.

वंदनीय महाराजांच्या कार्याने सर्व जनतेला स्फूर्तीचा झराच उपलब्ध झाला. हिंदूधर्मातील मानवतेचे तत्वज्ञान नवसंजीवनी देवून महाराजांनी फुलविले. भूतदयेकरिता त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. या देशातील लाखो दलित, मागासलेल्या, गळल्या, फेकलेल्यांचा कोणीही आपंगीता नव्हता अशा समाजाला उचलून माणूसकीची शिकवण दिली. त्यांचे प्रत्यक्ष जीवन हाच संदेश होता.

भारत साधुसमाजांची दिल्लीत जी स्थापना झाली व लगेच सर्व साधूंनी संघटना निर्माण केली. ती ह्याचकरिता की, त्यांच्या विचारांना व आचारांना योग्य वळण लागावे. त्यांनी तिर्थक्षेत्रात, कुंभमेळयात सर्वांना मानवसेवा करण्याचा एकच संदेश दिला व त्यासाठी त्यांनी भारत साधुसमाजाचे अध्यक्षपदही स्विकारले व भूषविले. २३ जुलै १९५४ मध्ये जपान देशातील 'शिमिझु' शहरात विश्वधर्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्यात राष्ट्रसंतांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर २८ देशांच्या प्रतिनिधींच्या समोर त्यांनी खंजरीवर थाप मारली व .......

हर देश में तू हर भेष में तू ।

हे भजन गायिले तेव्हा देशातील उपस्थित प्रतिनिधी व समग्र जनसमुदाय अक्षरश: भारावून गेला, राष्ट्रसंतांची ही परिवर्तनवादी चळवळ देशापर्यंतच राहिली नाही. तर ती विश्वपरिवर्तनापर्यंत जाऊन पोहचली.

विदर्भातील स्वातंत्र्यसंग्रामात प्रसिद्ध पावलेले 'यावली' हे राष्ट्रसंतांचे जन्मगाव. त्यांचे मूळ नाव 'माणिक' परंतु आपल्या ज्वलंत तळमळीने गावोगाव फिरत ते 'तुकडोजी' झाले. समाजपरिवर्तनासाठी ते भौतिक जगापासून अलिप्त राहिलेत. 'जनताजर्नादनाची सेवा हिच खरी ईश्वरसेवा' असा त्यांना साक्षात्कार झाला. नंतर सर्व भारतभर त्यांनी विधायक कार्याच्या हेतूने संचार सुरू केला. चक्रधर, येशू ख्रिस्त, महावीर यांच्याप्रमाणे विशिष्ट धर्मप्रसार हा हेतू न बाळगता अखिल जात, धर्म, पंथ यांना संघटीत करून मानवतावादाचा संदेश देणे हीच त्यांची तळमळ होती. त्यासाठीच त्यांनी श्रीगुरूदेव सेवामंडळाची स्थापना केली. त्याच्या देशभर उपशाखा स्थापून समाजजागृतीच्या कार्याला सुरूवात केली. ग्रामसुधारणा हा त्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश होता. भारतात ८० टक्के खेडी आहेत. खेडयांची सुधारणा म्हणजेच भारत वर्षाची सेवा व सुधारणा होय अशी त्यांची दृढ भावना होऊन त्यासाठी त्या कार्यात त्यांनी जीव ओतला. 'ग्रामगीता' ग्रंथामधून ही सारी तळमळ व्यक्त झालेली आहे. सामुदायिक प्रार्थना, दैनिक रामधून, सुतकताई, सामुदायिक भजन इत्यादी कार्यक्रम करणाऱ्या भारतभर मंडळाच्या ३० हजार शाखा उपशाखा स्थापन झाल्या. यावरून त्यांच्या कार्याची व श्रमाची व्याप्ती लक्षात येते. गुरूकुंज (मोझरी) आश्रम हे या कार्याचे केंद्र भारतातील एक परिवर्तनशील धाम होय.

वं.राष्ट्रसंतांनी अखंडपणे हे कार्य करीत असताना शारीरिक विचार, यातना यांना मुळीच दाद दिली नाही. एकेका गावच्या आदर्श बिंदूतूनच आदर्श राष्ट्रसिंधू आकाराला येईल अशी त्यांची दृढ धारणा होती. सुसंघटीत, सुसंस्कारीत, सुजाण, समंजस, विवेकवादी, प्रगतीपथगामी असा गाव प्रथम निर्माण झाला पाहिजे हे त्यांचे विचारसूत्र होते.

आज महाराज राष्ट्रसंत झालेले असून ते राष्ट्रातील थोरामोठयांपासून तो सामान्य जनांपर्यंत सर्वांच्या श्रद्धेला पात्र बनलेले आहेत. त्यांच्या मानवतावादाचे पडसाद आता केवळ खेडयापाडयातूनच नव्हे, तर राष्ट्रपती—भवनापासून विविध देशापर्यंत उमटू लागले आहेत. आजच्या अणुशक्तीच्या हिंस्त्र युगामध्ये मानवाच्या खऱ्या उत्थानासाठी ज्या मूलभूत प्रेरणांची गरज आहे त्या प्रेरणा महाराज आपल्या वाणीने, साहित्याने जागृत करीत आहेत आणि तिला मूर्त स्वरूपात आणण्याचे कार्य त्यांचे आश्रम, त्यांचे शेकडो शाखांमध्ये पसरलेले श्रीगुरूदेव सेवामंडळ, वार्षिक गांधी—निर्वाण सप्ताह, आदर्श ग्रामनिर्माण, व्यायाम मंडळ या समग्र संस्था व जयंत्या पुण्यतिथ्या (प.पू.आडकोजी महाराज व वं.तुकडोजी महाराज) इ. कार्यक्रम सर्वत्र करीत असलेले आढळत आहेत. या जागृत प्रेरणांना अनुकूल भौतिक स्थिती निर्माण करण्याचे काम शासनाचे आहे. शासनाने अलिकडेच याकार्याला व्यापक स्वरूप प्राप्त होण्याच्या उद्देशाने 'राष्ट्रसंत तुकडोजी व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' ही स्पर्धात्मक योजना जाहिर करून जिल्हयातून व तालुक्यातून सर्वोत्कृष्ठ कार्य दाखविणाऱ्या गावाला प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे लाखाचे पुरस्कारही जाहिर केले आहेत.

वं.राष्ट्रसंतांनी जीवनाच्या सर्वच अंगांचा विचार करून समाजप्रबेधनाची व समाज परिवर्तनाची पताका उंच उंच फडकवीत नेलेली आहे. हे त्यांच्या सर्वस्पर्शी व्यापक कार्यप्रणालीवरून लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. ग्रामगीता — लेखक : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
संपादक : सुदाम सावरकर, प्रथमावृत्ती
२. वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अद्‌भुत आठवणी — लेखक : श्याम लोहबरे, प्रथमावृत्ती
३. युगप्रवर्तक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — लेखक : रा.मो. बेलूरकर, प्रथमावृत्ती
४. विश्व क्रांतीची साधना अर्थात् सामुदायिक प्रार्थना — लेखक : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
संकलन : प्रा.रघुनाथ कडवे
डॉ.सुर्यप्रकाश जयस्वाल
द्वितीय आवृत्ती
५. राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय भाग — १,२,३ — संपादक : प्रा.रघुनाथ कडवे, प्रथमावृत्ती

| | | |
|---|---|---|
| ६. राष्ट्रसंतांची भाषणे | – | संपादक : बाबा मोहोड, चौथी आवृत्ती |
| ७. सत्संगतीचे प्रवेशद्वार | – | संकलन : सौ.शोभा वाघ<br>संपादन : रूपराव वाघ, प्रथमावृत्ती |
| ८. "श्री गुरूदेव" मासिक<br>अंक – जाने.२०१५ ते जाने.२०२१ | – | श्री गुरूदेव प्रकाशन विभाग<br>गुरूकुंज आश्रम, जिल्हा अमरावती |
| ९. राष्ट्रसंत – स्त्रीदर्शन | – | लेखन : प्रा.डॉ.नमिता शेंदरे, प्रथमावृत्ती |
| १०. साने गुरुजी | – | भारतीय संस्कृती, कॉन्टिनेंटल प्रकाशन विजयनगर, पुणे<br>एकविसावी आवृत्ती |

# कुपोषण एक जटिल  समस्या

Dr. Vibha C. Ghodkhande
HOD (Home Economics)
Arts commerce & science
College, Maregaon.

प्रस्तावना -कुपोषण ही भारतातील एक अत्यंत जटिल समस्या आहे . आपण नेहमी बघतो की काही लोकाना प्रमाणापेक्षा जास्त मिळत तर काहीना गर्जेपूर्ते सुद्धा अन्न मिळत नाही आणि ही समस्या सहज बदलणे सोपे नाही. भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे 70% लोक शेती करतात आणि खेड्यात राहतात . त्यांना अज्ञानामुळे सुद्धा योग्य पोषण आहार मिळत नाही. कोणत्या आहारतून कोणते आणि किती पोषक तत्व मिळतात याचे त्यांना पुरेषे ज्ञान नसल्यामुळे त्यांचा आहार समतोल नसतो . त्यामुळे सुद्धा कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. त्याचबरोबर स्त्रिया आपल्या आहारा बद्दल जागरूक नसल्या मुळे  पण काही बालक जन्मता च कुपोषित असतात. हे  सर्व जरी खरे असले तरी पण अपुरे पोषण  मिळाल्याने कुपोषण ही समस्या निर्माण होते. या समस्येचे निरसन करण्यासाठी अनेक स्तरावर प्रयत्न सुरू आहे पण जो पर्यन्त पूर्ण जागृती निर्माण होणार नाही ,आहाराचे महत्व प्रत्येक स्तरातील लोकाना कळणार नाही तोपर्यंत ही कुपोषणाची समस्या दूर होणार नाही. तो  पर्यंत कुपोषणाचा  हा भस्मासुर अपुरे पोषण घेणाऱ्या लोकांना खातच राहील .

कुपोषणाचा अर्थ :-

पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तीला कुपोषण म्हणतात. व त्या व्यक्तीला कुपोषित म्हणता येईल. कोपोषण ही समस्या पोषक आहार आभावी निर्माण होते. अयोग्य आहार, उपासमार व जीवनसत्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो. असे मुल लहानश्या आजाराने सुध्दा अशक्त दिसु लागते. उदा. अंगावर सुज येणे, मुल रडके होणे. बाळाची वाढ खुंटणे, वजन व उंची वयाच्या प्रमाणात ण वाढणे यालाच कुपोषण म्हणतात.

कुपोषण म्हणजे काय, मुळात ते का निर्माण होतं हे समजून घेताना हे लक्षात घेतलं पाहिजे की नवजात बालकापासून वृद्ध व्यक्तीपर्यंत प्रत्येकाच्या शरीराला रोज विशिष्ट अन्नघटकांची व पोषक  तत्वाची एका विशिष्ट प्रमाणात गरज असते. प्रथिनं, कर्बोदके , स्निग्ध पदार्थ,जीवणसत्व , खनिज ,क्षार हे ते घटक. ते आपल्याला आपल्या रोजच्या आहारातून मिळतात. यातली एक किंवा दोन पोषक तत्त्वं खूप काळ मिळाली नाहीत किंवा कमी प्रमाणात मिळाली तर शरीराची त्या घटकांची गरज भागवली जात नाही आणि कुपोषण होतं.तशी ही समस्या सर्वच वयो गटातील व्यक्तींना असली तरी लहान मुलनांमध्ये ही समस्या जास्त तीव्र प्रमाणात आढळते . वाढीच्या वयात असलेल्या लहान मुलांना हे पोषक घटक मिळाले नाहीत तर त्याचा परिणाम त्यांच्या वाढीवर झपाट्याने होतो आणि कुपोषणाची स्थिती उद्भवते. मुलाला आईच्या गर्भाशयात असताना ही पोषक तत्त्वं आईकडून मिळत असतात. त्यामुळे मुलांचं आरोग्य गर्भावस्थेपासून ते ती जोपर्यंत आईचं दूध पीत असतात तोपर्यंत तरी त्याच्या आईच्या आरोग्याशी, आहाराशी निगडित असतं. त्यामुळे मुलांच्या कुपोषणाच्या प्रश्नाचा त्यांच्या आईच्या आरोग्याशी, आहाराशी अन्योन्य संबंध असतो. आईला तिच्या आहारातून सगळे घटक मिळाले, मुळात तिचं कुपोषण झालं नाही तर गर्भावस्थेतील बाळाचं पोषण चांगलं होतं. हा झाला पहिला टप्पा. दुसऱ्या टप्प्यामध्ये जन्मलेल्या बाळाला त्याची पूर्ण वाढ होईपर्यंतच्या काळात सकस, समतोल आहार मिळणं आवश्यक असतं. तो मिळाला नाही तर त्याचं बाल्यावस्थेपासूनच कुपोषण सुरू होतं. साहजिकच त्याची पूर्ण वाढ होत नाही. त्याचा परिणाम त्याच्या सगळ्याच बाबतीतल्या विकासावर होतो.

भारत हा विकसनशील देश आहे एकीकडे आपण मंगळावर जाण्याच्या गोष्टी करतो आणि दुसरी कडे लोकाना पुरेषे अन्न न मिळाल्या मूळे कुपोषण ही मानवनिर्मित समस्या निर्माण होणे ही अतिशय लांछणास्पद बाब आहे . कोपोषणाचे मुख्य कारण आहे. काही लोकांपर्यत पुरेशा अन्न साठा पोहचत नाही यासाठी सरकारच्या अनेक उपाय योजना आहे . तसेच अनेक समाजसेवी संस्था सुद्धा कुपोषण निर्मूलनासाठी हातभार लावत आहे तरी सुद्धा ही समस्या दिवसेन-दिवस भ्रष्टाचारमुळे वाढत जात आहे .

"कुपोषन म्हणजे भोज्य तत्वे गुण आणि परिमाणाने अपर्याप्त किंवा आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात उपयोगात आणल्याने शरीरावर जे हानिकारक परिणाम होतात अशी शारीरिक स्थिति होय ."

कुपोषणाची कारणे :

1 लहान वयात विवाह करणे
2 दोन मुलांमधील कमी अंतर .
3 अतिशय दारिद्र व गरीबी .
4 आहाराविषयी अज्ञान व गैरसमजुती असणे .
5 लवकर अंगावरील पाजणे बंद करणे.
6 पोष्टीक घटकांचा असमतोल असणे .
7 दुधाची बाटली पातळ दूध ही पण कुपोषणाची महत्वाची कारणे आहेत.
8 चयापचय यामध्ये काही दोष असणे .
9 प्रसूतिपूर्व सेवांचा लाभ न घेणे .
10 बाळ सारख सारख आजारी पडत असेल तर ते कुपोषणाचे कारण असू शकते.
11 जन्मताच बाळाचे वजन कमी असेल तर ते कुपोषणाचे कारण असेल.
12 बेरोजगारी ही सुद्धा महत्वाचे कारण आहे .
13 आहारच्या चुकीच्या सवयी .
14 बाळाचा नेहमीचाच आहार व्यवस्थीत असला पाहिजे याची काळजी घेतली पाहिजे.
15 मुलांची संख्या जास्त असेल तर .
16 आरोग्य सेवांचा अभाव.
17 अंधश्रद्धा .
18 लिंगभेद (मुलगा आणि मुलगी यामध्ये भेदभाव करणे .
19 साक्षरतेचा अभाव .
20 फॅशन ही सुद्धा कुपोषणाचे कारण आहे .
21 सभोवतालचे वातावरण .
22 स्वच्छतेच्या अभाव .
23 व्यसन .
24 आहाराविषयी पूर्वग्रह.
25 आहाराविषयी आवड किंवा निवड .
26 वाढती लोकसंख्या .
27. अपरिपक्व बालक

कुपोषणामुळे उद्भवणारे आजार

१ ) मरॅसमस : यामधे मुलांचे वजन झपाट्याने कमी होते. स्नायू खराब व्हायला लागतातत्यामुळे मूल हडकुळे दिसू लागते .

2) कॅाशिऑकर:- प्रथिनाच्या अभावामुळे जी स्थिति निर्माण होते त्याला कॅाशिऑकर असे म्हणतात. या आजारामध्ये केसांचा आणि त्वचेचा रंग बदलतो, शरीरावर सुजन येते. ३) रोगप्रतिकार शक्ति कमी होते:- अपुऱ्या पोषक तत्वामुळे रोगप्रतिकारक शक्ति कमी होते .

4) डोळयांचे विकार:- अ vitamins च्या कमतरतेमुळे डोळ्याचे आजार होतात. बालकांमध्ये रातांधळेपणा येऊ शकतो .

5) पेलाग्रा :-vitamins ब च्या कमतरतेमुळे हा आजार होतो स्नायू कमजोर होतात .

6) रक्तक्षय :-आहाराच्या कमतरतेमुळे हा आजार होतो.

7) बेरीबरी:-vitamins ब च्या कमतरतेमुळे बेरीबेरी आजार होतो .

8 ) गॅाइटर:- आयोडीनच्या कमतरतेमुळे हा आजार होतो.

9 )स्कर्वी :-vitaminsक च्या अभावाने ही समस्या उद्भवते .सुरवातीला रोगप्रतिकारक शक्ति कमी होते.

10)लठ्ठपणा:- लठ्ठपणा मुले संधिवात ही समस्या निर्माण होते .

11) मुडदूस:- ड vitamins च्या अभावामुळे हा आजार होतो ,यात हाडे ठिसुळ होतात,यात बाळाचे कपाळ मोठे होते ,घाम जास्त येतो ,शारीरिक वाढ कमी होते ,बाळ 1 वर्षाचे झाले तरी चालता येत नाही .

प्रतिबंधक उपाय:

कुपोषण होऊ नये यासाठी बाळाचे पूर्ण पोषण होणे गरजेचे आहे. म्हणजेच कुपोषण टाळता आले पाहिजे , यासाठी पुढील उपाय योजना करता येतील:

1) बाळ ६ महिन्याचे होई पर्यंत फक्त मातेचे दूधच बाळाला दिले गेले पाहिजे.

2 )६ महिन्या नंतर बाळाला देण्याचा आहार तयार करताना हात स्वच्छ धुणे बाळाला खाऊ घालताना हात स्वच्छ करावे. अन्न ताजे दिले पाहिजे.

3) ६ महिने ते १ वर्षाच्या बाळाला दर दोन तासांनी किंवा बाळाच्या मागणी नुसार पूरक आहार दिला गेला पाहिजे. गोड खिरी, भाताची भरड किंवा डाळीचे वरण देताना त्यात तेलाचा व तुपाचा भरपूर वापर केला पाहिजे.

4) बाळ २ वर्षाचे पूर्ण होईपर्यंत पूरक आहाराबरोबरच आईचे दुध देखील बाळाला वेळोवेळी दिले गेले बाळाच्या आहारात गुळाचा वापर केला पाहिजे .

5)बाटलीचे दुध देऊ नये . त्याने बाळाला सतत जुलाब होण्याची शक्यता असते

6) बाळाचे वजन, उंची वेळोवेळी डॉक्टरांकडून तपासली पाहिजे किंवा जवळच्या अंगणवाडीत जाऊनतपासली पाहिजे.

7)मुलगा मुलगी भेदभाव न करता प्रत्येक बालकाचे पोषण व्यवस्थित झाले पाहिजे.

8)मुलांच्या खाण्यात सर्व पोषक घटक असले पाहिजेत याकडे लक्ष द्यावे

9)बाळाला शक्यतोपचण्यास त्रास होऊ शकतो असे अन्न देऊ नये

10)जसे बाळ अशक्त होऊ नये यासाठी काळजी घ्यायची आहे तशीच बाळ लट्ठ होणार नाही यासाठी पण काळजी घेतली पाहिजे.

11) बाळाला फक्त घरी तयार केलेलेच अन्न खायला घातले पाहिजे.

12) मुलीचे लहान वयातच लग्न करू नये.

13) पहिले बाळ वयाच्या २०व्या वर्षानंतर झाले पाहिजे.

14)गरोदरपणात आईची काळजी घेतली गेली पाहिजे. अतिश्रम नको, सकस आहार मिळाला पाहिजे, तसेच आवश्यकतेनुसार अंगणवाडीतील पोषक आहार देखील मिळाला पाहिजे. आवश्यकतेनुसार पुरेशी विश्रांती मिळाली पाहिजे.
15)जवळच्या सरकारी किंवा खाजगी दावाखानायातच बाळांतपण करायला हवे .
16)बाळाच्या जन्माच्या पहिल्या एक तासात मातेचे पहिले चिकाचे स्तनपान बाळाला दिले गेले पाहिजे . हे बाळाचे पहिले लसीकरण आहे. या स्तनपाणामुळे बाळाची शक्ती वाढण्यास मदत होते.
17)पोषण आहार विषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करायला पाहिजे .
18)सरकारी कुपोषण निर्मूलणासाठीच्या उपाययोजनाची योग्य अमलबजावणी व्हायला हवी.
19)लोकसंख्या वाढीला आळा घालण्यासाठी कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटऊन द्यायला पाहिजे.
20)अज्ञान,अंधश्रद्धा याविषयी जनजागृती कार्यक्रम घ्यायला हवे.
21)संसर्गजन्य आजार होऊ नये म्हणून मुलांना स्वच्छतेचे महत्व पटऊण द्यावे .

निष्कर्ष :-प्रत्येकाला समतोल आहार मिळणे आवश्यक आहे. पोषक आहार हा प्रत्येकाला शरीर व मानसिक आरोग्यास कार्यक्षम बनवितो. कुपोषण ही अतिशय भीषण समस्या आहे आणि ती सोडवण्यासाठी प्रत्येकाने आपआपल्या स्तरावर प्रयत्न करायला पाहिजे. ही समस्या लहान मुलांमध्ये त्याचबरोबर महिलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येते . तसेच शाशनाने पण अनेक उपाययोजना केलेल्या आहे . त्याचे सुद्धा ज्ञान प्रत्येक स्तरापर्यंत पोहचवायला पाहिजे

संदर्भ सूची :-

1)त्रिवेणी फरकाडे ,सुलभा गोंगे - पोषण आणि आहारशास्त्र
2)डॉ. ज्योति गायकवाड - बालविकासशास्त्र
3) सौ. लिना कांडलकर - मानव विकास
4)डॉ. इंदिरा खडसे - अन्न आणि पोषणशास्त्र
5)मासिके आणि वृत्तपत्र

# मानवी जीवनामधे पोषक घटकांचे महत्व

लेखक डॉ.विद्या धर्मेश ध्रुव
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला

Abstract : मानवी जीवनामधे पोषक घटकांचे अनन्य साधारण असे महत्व आहे. अन्नाशिवाय व्यक्ती जिवंत राहूशकत नाहौ. अन्न हे फक्त जीवन जगण्यासाठीच आवश्यक आहे असे नाही तर व्यक्तीच्या शरीराची जडणघडण, वाढ, विकास, प्रजनन, कार्यक्षमता स्वास्थ अवलंबुन असते.

मानवाच्या स्वास्थ्याचा विचार करतांना फक्त शारीरीक स्वस्थाचाच विचार पुरेसा नाही तर मनुष्य हा समाजशील प्राणी असल्यामुळे त्याच्या सामाजिक, मानसिक, स्वास्थाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. मानवाचे संपुर्ण स्वास्थ अन्नातील घटाकांवर अवलंबून असते. ती पुढील प्रमाणे आहेत. १) प्रथिने, २) कर्बोदके, ३) स्निग्धे, ४) जिवनसत्वे, ५) खनिज पदार्थ, ६) पाणी इत्यादी. या पोषक घटकांचा आहारामधे योग्य उपयोग केल्यास म्हणजेच शारीरीक स्थिती, वय, लिंग, वातावरण, व्यवसाय/कार्य यानुसार उपयोग केल्यास व्यक्तीचे आयु य निरोगी व सुदृढराहण्यास मदत होते. अन्यथा पोषकतत्वाच्या अभावाने होणाऱ्या व संसर्गजन्य आजारांना बळी पडतो. उदा. ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी आहे अश्या व्यक्ती जगभरामधे थैमान घालणाऱ्या कोवीड–१९ या रोगाला बळी पडल्या आहेत. आतापर्यत भारता मध्ये एकुण रूग्णांची संख्या ३,३६,२४,४१९ एवढी आहे तर मृत्य झालेल्यांची संख्या ४,४६,६९० आहे. २४ सप्टेबर २०२१ च्या अहवालानुसार जगभरामध्ये कोविड–१९ च्या एकुण रूग्णांची संख्या २३,०४,१८,४५७ एवढी आहे व मृत्यू झालेल्यांची संख्या ४७,२४,८७६ इतकी प्रचंड आहे.

व्यक्तीला पोषक तत्वांच्या अभावाने व अधिक्याने अनेक रोग होतात. या रोगाचा परिणाम त्या व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होतो. परिणामी कार्यक्षमता कमी होते. त्याचा परिणाम व्यवसायावर होवून त्याची आर्थिक स्थिती कमकुवत होते. व्यक्तीच्या स्थितीचा परिणाम अनुक्रमे कुटुंबाच्या,समाजाच्या एकंदरीत देशाच्या प्रगतीवर होतो. म्हणुनच एकुण जगाच्या कल्याणा साठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटना कार्यकरीत आहेत. सर्वसामान्य लोकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी म्हणून सरकारने ‘‘राष्ट्रीय पोषण महिना’’ साजरा करण्याचे प्रयोजन केले आहे.

**प्रस्तावना—**

**"You are what you eat"**या म्हणीनुसार ‘‘जश्या प्रकारचा आहार तुम्ही घेणार तसेच तुम्ही होणार ’’, ही म्हण अतिशय सत्य आहे. आहार मानवी जीवनातला महत्त्वाचा व अविभाज्य घटक आहे. शरीराला ज्या प्रकारचा आहार मिळेल त्यावर शरीर सौष्ठव, आरोग्य, पुनर्निर्मिती, कार्यशक्ती अवलंबून असते. अन्ना पासून जे घटक प्राप्त होतात त्याला अन्नघटक किंवा पोषक घटक असे म्हणतात. प्रथिने, कर्बोदके, स्निग्धे, खनिजद्रव्ये, जीवनसत्त्वे आणि पाणी इत्यादी पोषक घटक मिळतात. जेव्हा व्यक्ती कोणतेही अन्नपदार्थ खातो तेव्हा शरीर आहारातून पोषक घटक पचन व शोषण कारतो व रक्ताद्वारे संपूर्ण शरीराला पोचविले जाते आणि त्याचे रूपांतर ऊर्जेमध्ये करून शरीराला उष्णता देण्याचे, पेशींची निर्मिती करणे, शरीराचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य करीत असते. हे अन्नघटक योग्य प्रमाणात शरीराला मिळणे आवश्यक असते.अन्यथा कुपोषणाची समस्या निर्माण होते. पोषण आपल्या जीवनात फार मोठी भूमिका बजावत असते. अन्नातील पोषक घटकांचा प्रभाव व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक वाढीवर होत असतो. म्हणूनच हे खूप महत्त्वाचे आहे की आपल्या दैनंदिन जीवनात जे अन्नपदार्थ सेवन करतो त्या अन्नपदार्था विषयी अधिक जागरूक असणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणात आजार फक्त चुकीच्या आहारा मुळेच होतात. एखाद्या पोषक घटकांचे प्रमाण कमी व अधिक झाल्यास कुपोषणाची स्थिती निर्माण होते व विविध आजार होतात. काही आजार पोषकघटकांच्या कमतरतेने वा आधिक्याने होतात. जसे लठ्ठपणामुळे मधुमेह, हृदयरोग इत्यादी. आहाराचा दर्जा उत्तम असल्यास अशा प्रकारच्या रोगांना आळा बसतो व व्यक्ती निरोगी राहतो.

**उद्दिष्टे–**

१. पोषण विषयक जनजागृती निर्माण करणे.

२. पोषक घटकांचे मानवी जीवनतील महत्त्व आभ्यासणे

Key Word– पोषणाचा दर्जा, पोषकतत्व, कुपोषण.

**संशोधन पद्धती–**

या संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**भारताची पोषण स्थिती – २०२०**

इ. स. १९३० मध्ये थॉमस एडिसन यांनी म्हटले आहे की **"The doctor of the future will give no medicine but will interest us patient in the care of human frame diet and the cause and protection of diseases"**

एडिसन ने हे सांगितल्या पासून एका शतकाहून अधिक काळ झाला परंतु अजूनही त्यांच्या शब्दांचे सार समजलेले दिसून येत नाही आता थोडेफार जगामध्ये पोषण व आहाराचे महत्त्व समजायला सुरुवात झाली आहे. भारतामध्ये पोषण व आहाराच्या संबंधित अनेक योजना राबविण्यात येतात. याव्यतिरिक्त सन्माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या *'मन की बात '*या कार्यक्रमा मध्ये सांगितले की *संपूर्ण सप्टेंबर महिना पोषण माह* म्हणून साजरा करण्यात येईल त्यांनी यावेळी अन्नम किंवा अन्नमकल्पनेची आठवण केली. याचा अर्थ असा की मानसिक आणि बौद्धिक विकास थेट आपल्या अन्नाच्या गुणवत्तेशी संबंधित आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेच्या (FAO)नुसार भारत दूध आणि डाळींच्या मोठ्या उत्पादकां पैकी एक आहे तर गहू, तांदूळ, ऊस, शेंगदाणे, भाज्या, फळे आणि कापूस यांच्या उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. एवढे असूनही स्टेट ऑफ फुड सेक्युरिटी ॲण्ड न्यूट्रिशन इन द वर्ल्ड – नुसार २०२० मध्ये भारताची १४ टक्के लोकसंख्या कुपोषित आहे. या अहवालात म्हटले आहे की भारतात १८९.२ दशलक्ष लोक कुपोषित आहेत अशक्त मुलांची संख्या ३८.६ टक्के एवढी आहे, गंभीर स्थिती असणाऱ्या मुलांची संख्या ७.५ टक्के आहे देशात ३५ टक्के कुपोषित मुले पाच वर्षापेक्षा कमी वयाची आहेत. बिहार आणि उत्तर प्रदेश मधील कुपोषित बालकांची संख्या सर्वाधिक आहे.

याव्यतिरिक्त ग्लोबल हंगर इंडेक्स संपूर्ण जगभर मूल्यांकन आतून केलेल्या ११७ देशांपैकी १०२ क्रमांकावर भारत आहे. २०१९ वर्षात भारताचे रेटिंग ३०.३ टक्के गुणांसह खराब श्रेणीमध्ये गेले आहे. त्यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार भारत गंभीर श्रेणीमध्ये येतो. जगातील सर्व देशांमध्ये कुपोषणाचा सामना करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पूरक आहार कार्यक्रम राबविले जात आहेत. करोना महामारीच्या काळामध्ये देशव्यापी लॉक डाऊन मुळे कुपोषणाची शक्यता वाढली आहे या संकटावर मात करण्यासाठी वेळीच उपाययोजना न केल्यास राष्ट्राला मोठी किंमत मोजावी लागेल. भारताने पोषणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका घेतली असली तरीदेशातील लोकांना सुद्धा पोषण व आहाराचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यामध्ये पोषण विषयक जागृती निर्माण होण्यासाठी आहारातील वेगवेगळे पोषक घटकांचा अध्ययन करणे गरजेचे आहे ही पोषक घटक पुढीलप्रमाणे आहेत.

पोषक घटकांचीभूमिका. पोषक घटक व्यक्तीच्या शरीरामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. काही पोषक घटक शरीराला दर्जा देण्याचे कार्य करतात तर काही घटक पेशींच्या निर्मितीचे कार्य करतात. आणि काही पोषक घटक शरीराचे नियम व नियंत्रण करतात ते पुढील प्रमाणे आहेत.

**प्रथिने –**

मानवी शरीरात पेशींचा व द्रवपदार्थांचा, प्रथिने हा महत्त्वाचा घटक आहे. शरीराच्या वजनाच्या १/६ भाग प्रथिने असतात. प्रथिने रासायनिक दृष्ट्या गुंतागुंतीचा घटक आहे मुळात प्रथिने ॲमिनो ॲसिड च्या लांब साखळयांनी बनलेले असतात. आहारातील प्रथिनांमध्ये २२ प्रकारची तिक्ताम्ले असतात. प्रत्येक प्रथिनांचे गुणधर्म व त्यातील अन्नावर अवलंबून असतात. प्रथिने शरीरातील

स्नायू बळकट करतात. शरीरातील पेशींची झालेली झीज भरून काढतात तसेच नवीन पेशींच्या निर्मितीचे कार्य करतात रोगप्रतिकारक शक्ती सुसज्ज ठेवतात. तसेच रक्तातील लाल पेशीमध्ये असणाऱ्या हिमोग्लोबिन तयार करतात व प्राणवायू शोषणास व पेशी पर्यंत पोहोचविण्यास प्रथिने मदत करतात. प्रथिने हार्मोन्स आणि पाचक रस तयार करण्यास मदत करतात. जे मानवी शरीरात विविध भूमिका बजावतात. नलिका विरहित ग्रंथीमधून स्त्रवणाऱ्या हार्मोन्सच्या निर्मितीस प्रथिने मदत करतात उदाहरणार्थ, थायरोक्सिन, इन्सुलिन इ. लैंगिक विकासामध्ये यांची भूमिका महत्त्वाची आहे. शरीराला उष्णता देण्याचे कार्य सुद्धा करतात एकंदरीत प्रथिनांचे कार्य व्यापक आहे. प्रथिने हे अत्यंत महत्त्वाचे पोषक घटक आहे. HRDA नुसार प्रथिनांची दैनिक आवश्यक सर्वसाधारणपणे एक किलोग्रॅम वजनाला एक ग्रॅम इतकी आहे. वनस्पतीज पदार्थापासून जसे धान्ये, डाळी, सोयाबीन, मशरूम इत्यादी तर प्राणिज पदार्थांमध्ये जसे मांस, मासे, अंडी, यकृत, मूत्रपिंड इत्यादी पासून मिळणारे प्रथिने उत्तम गुणवत्तेचे असतात. भारतामध्ये प्रथिने विषयक कुपोषण मोठ्या प्रमाणावर आहे.

**कर्बोदके –**

कर्बोदकांचे मुख्य कार्य म्हणजे ऊर्जा देणे होय. हा शरीरासाठी ऊर्जेचा एक आदर्श स्त्रोत आहे. कर्बोदकांचे ग्लुकोज मध्ये सहजपणे रूपांतर होते ते आपल्या शरीराला सेल्युलर घटक तयार करण्यासाठी ऊर्जा पुरविण्यास मदत करते. सर्वशक्ती चे उगमस्थान सूर्याच्या उर्जेमध्ये आहे. मनुष्याला तिचा प्रत्यक्ष उपयोग करता येत नाही. वनस्पती मात्र त्याचा उपयोग करून आपले अन्न तयार करतात. वनस्पतीद्वारे तयार केलेल्या कर्बोदकांचा उपयोग मानव अन्न म्हणून करतो.

भारतातील ८० टक्के लोक कर्बोदकांवर अवलंबून आहेत. कर्बोदकांच्या आधिक्याने स्थूलपणा येतो. चयापचयाची क्रिया नीट होत नाही मधुमेह, हृदयरोग यासारखे आजार होतात. कर्बोदकांच्या कमतरतेने व्यक्ती अशक्त होतो. स्नायू दुबळे होतात त्वचेवर सुरकुत्या पडतात कर्बोदकांच्या कार्य क्षमतेमुळे शरिरात किटोन्स चे उत्पादन होऊ शकते त्याचा परिणाम किटोसीस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थितीत होऊ शकतो. शरीराला लागणाऱ्या एकुण कॅलरीच्या ४५ टक्के ते ६५ टक्के एवढी कर्बोदकांची दैनिक आवश्यकता असते. फास्टफूड मध्ये कर्बोदकांचे प्रमाण जास्त असते. कर्बोदके हे पोषक तत्व विविध तृणधान्य, साखर, गूळ, कंदमुळे, फळे, साबुदाणा, आरारोट मध्ये मुबलक प्रमाणात असते.

**स्निग्ध पदार्थ –**

स्निग्ध पदार्थ हे सर्वात जास्त ऊर्जा देणारे पोषक तत्व आहे. एक ग्राम स्निग्धा पासून नऊ कॅलरी ऊर्जा मिळते. स्निग्ध पदार्थ सेवन केल्याने लठ्ठपणा येतो असे नाही तर शरीराचे कार्य सुरळीत चालण्यासाठी स्निग्धांची आवश्यकता असते. एकूण कॅलरीच्या १५ ते २० टक्के कॅलरीज स्निग्ध पदार्थापासून मिळणे आवश्यक आहेत. स्निग्ध पदार्थ उच्च तापमानात अचानक होणाऱ्या बदलांपासून संरक्षण करते तसेच आपल्या महत्त्वाच्या अवयवांचे संरक्षण करते. आपल्या शरीराला इन्सुलेटेड करण्याची भूमिका बजावते जीवनसत्व अ, ड, ई, के, च्या शोषणासाठी आवश्यक आहे. व स्निग्धपदार्थाचा शरिरात वंगणासारखा उपयोग होतो. स्निग्ध पदार्थामुळे आहार चविष्ट बनतो स्निग्ध पदार्थ आवश्यकतेपेक्षा जास्त सेवन केल्यास रोहिणी काठिण्य, हृदयरोग आणि रक्तदाब यासारखे विकार जडतात तेल तूप लोणी दूध तेलबिया कठीण कवचाची फळे यामध्ये विपुल प्रमाणात स्निग्धाम्ले असतात. स्निग्धाम्ले आणि ग्लिसरॉल हे घटक आढळून येतात. निरोगी त्वचा आणि रक्तदाब नियमनासाठी महत्त्वाचे असतात. स्निग्धाम्ले दोन प्रकारची आहेत एक संतृप्त स्निग्धाम्ल आणि असंतृप्त स्निग्धाम्ल.

**जिवनसत्वे –.**

जिवनसत्वे ही सेंद्रिय रासायनिक द्रव्य असून शरीरातील विविध जीवरासायनिक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी त्यांची मदत होते शरीर पेशींची कार्यक्षमता वाढविण्यास जीवनसत्वे मध्यस्थाची भूमिका पार पाडतात. शरीर संरक्षक अन्न म्हणून जीवनसत्व ओळखले जाते. शरीराचे संरक्षण संवर्धन करणे हे महत्त्वाचे कार्य जीवनसत्त्वाचे आहे. रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पिष्टमय पदार्थांच्या ज्वलनासाठी व चयापयचयासाठी आवश्यक आहे शरीराचे आरोग्य व

शरीराची वाढ योग्य होण्यासाठी आवश्यक आहे मज्जातंतू सुस्थितीत ठेवण्यासाठी मदत करते निकोटीन ॲसिड पासून चयापचयातील दोन इन्झाइम्स् तयार होतात. त्वचेचे विकार, डोळयाचे विकार होत नाहीत तसेच रोगप्रतिकारक ाक्ती वाढवितात त्यामुळे संसर्गजन्य रोग होण्यास आळा बसतो व व्यक्ती निरोगी राहते. प्रत्येक जीवनसत्वाचे आपले वेगळे महत्व आहे. जसे, जिवनसत्व 'अ' च्या अभावाने डोळयाचे विकार होतात तर जिवनसत्व 'ड' च्या अभावाने हाडे कमजोर होतात. जिवनसत्वे दोन प्रकारची आहेत, १. जलद्राव्य व २ स्निग्धद्राव्य, जीवनसत्व अ,ड,ई,के, स्निग्धद्राव्य आहेत तर जीवनसत्व क, ब,(संयुग) जलद्राव्य आहेत. अतिशय कमी प्रमाणात याची आवश्यकता असते. जीवनसत्वे फळे, हिरवा भजीपाला, फळभाज्या या मध्ये भरपूर प्रमाणत असतात.

**खनिजे–**

खनिजे आपल्या शरीराच्या प्रक्रियांचे नियंत्रण व नियमन करतात. आपल्या शरीरात एकूण २४ खनिजे असतात. १. कॅल्शियम २. फॉस्फरस ३. पोटॅशियम ४. सोडियमक्लोराईड ५. सोडियम ६. गंधक ७. लोह ८. मॅग्नेशिअम ९. आयोडीन १०. तांबे ११. मॅगनीज १२. क्लोरीन १३. कोबाल्ट १४. झिंक १५. क्रोमियम १६. सेलेनियम १७. मॉलेब्डेनियम १८. अल्युमिनियम १९. आर्सेनिक २०. ब्रोमाइन २१. निकेल २२. कॅडमियम २३. सिलिकॉन २४. व्हॅनेडियम इत्यादी. पैकी काही शरीराला अधिक प्रमाणात लागतात तर काही अल्प प्रमाणात लागतात आपल्या शरीराला सर्वात जास्त प्रमाणात कॅल्शियमची आवश्यकता असते. शरीरातील ९९ टक्के कॅल्शियम हाडे व दात यामध्ये असते जवळजवळ बाराशे ग्रॅम कॅल्शियम आपल्या शरीरात असते. दात व हाडात कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशिअम पासुन तयार होतात. मांस पेशी क्रियाशील राहण्यास व हृदयाच्या स्नायूंचे कार्य योग्य रितीने चालण्यासाठी आवश्यक असते. खनिजे न्यूक्लियर प्रोटीनच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे आहे रक्त तयार होण्यासाठी लोहाच्या अभावाने ॲनेमिया यासारखे रोग होतात शरीराचे कार्य सुरळीत चालण्यासाठी खनिजे अत्यंत आवश्यक आहेत.

**पाणी –**

जीवनावश्यक मूलभूत गरजांपैकी पाणी ही एक अत्यंत महत्त्वाची गरज आहे. व्यक्ती पाण्याशिवाय सहा दिवसांपेक्षा अधिक जिवंत राहू शकत नाही. आपल्या शरीराच्या वजनाच्या ६० ते ७५ टक्के भाग पाणी असते. त्यातील १५ ते २० टक्के पाणी जरी कमी झाले तर प्राणघातक ठरू शकते. पाणी पेशींना आकार देतो आणि पाण्यामुळेच शरीर अंतर्गत व्यवहार सुरळीत चालतात सांध्यांमध्ये सायनोव्हियल द्रव्य असते व ते वंगणासारखे कार्यकरते त्यामुळे सांधे ओले राहून त्यांचे घर्षण होत नाही. शरीराचे तापमान कायम राखण्यास मदत करते. टाकाऊ पदार्थ शरीराबाहेर टाकण्याचे कार्य करते. पाचक रस इतर अन्न द्रव्य आणि रक्त यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक असते. पाण्याची दररोज २.५ लिटर आवश्यकता असते. पाण्याची कमतरता झाल्यास ॲसिडॉसिस इस शुष्कता (Dehydration)ताप, बद्धकोष्ठता इत्यादी विकार होतात. पाणी शरीराच्या सर्व भागांमध्ये आवश्यक पोषक द्रव्ये विरघळण्यास आणि वाहून नेण्यास मदतकरते. शरीरातील विषाक्त घटक मूत्रावाटे व घामावाटे बाहेर टाकण्याचे कार्य पाणीच करते. पाणी हे अतिशय महत्वाचे पोषक घटक आहे.

कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील नागरिकांच्या कार्यक्षमतेवर व आरोग्यावर अवलंबून असतो. देशातील लोक स्वस्थ असतील तर देश प्रगती करतो. मानवाच्या आरोग्य आणि त्याचा पोषणाचा दर्जा ह्या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देशातील लोकांचे आरोग्य संपूर्णपणे त्याच्या आहारावर अवलंबून असते म्हणूनच पोषणा विषयी जनजागृती करणे आवश्यक आहे पोषक घटकांचे आहारामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ही पोषक घटक प्रथिने, कर्बोदके, स्निग्ध जीवनसत्वे, खनिजे, आणि पाणीआहारातुन संतुलीत मात्रेमध्ये मिळाल्यास व्यक्ती अनेक रोगांपासून बचाव करू शकतो. त्याची रोगप्रतिकारक क्षमता वाढते परिणामी तो निरोगी व सुदृढ आयुष्य जगतो आणि देशाच्या प्रगतीमध्ये आपला हातभार लावतो.

**निष्कर्ष** –या संशोधनातुन काही महत्वाच्या बाबी निदर्शनास आल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

१. मानवाचे आरोग्य त्याला मिळणाऱ्या पोषक आहार यावर अवलंबून असते.

२. भारतातील १८९.२ लक्ष एवढी लोकसंख्या कुपोषित आहे.

३. भारतामध्ये उत्तर प्रदेश व बिहार मध्ये सर्वात जास्त पाच वर्षाखालील मुले कुपोषित आहेत.
४. जगामध्ये उपासमार होणाऱ्या ११७ देशांपैकी भारत १०२ क्रमांकावर आहे.
५. गरिबी व अज्ञान या दोन प्रमुख बाबी कुपोषणास कारणीभूत आहेत असे दिसून आले.
६. भारतामध्ये कुपोषणाचा सामना करण्यासाठी अन्नवि  ायक कार्यक्रम राबवित आहेत.
७. व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती आहारावर अवलंबून असते.
८. पोषण विषयक जनजागृती निर्माण करण्याची गरज आहे.
९. प्रत्येक व्यक्तीने जर पोषणविषयक शिक्षण घेतले तर नक्कीच बऱ्याच रोगांना आळा बसु  ाकेल.

**संदर्भ ग्रंथ :**

१. अन्नशास्त्र आणि पो  ाण भाग – १: त्रिवेणी फरकाडे, सुलभा गोंगे : पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर.
२. मानवी पो  ाण व आहारशास्त्राची मूलतत्वे : प्रा. डॉ. सौ. आशा देउसकर : विद्या प्रकाशन नागपूर.
३. पो  ाण आणि आहारशास्त्र : त्रिवेणी फरकाडे, सुलभा गोंगे : पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर.
४. मानवी पो  ाण आणि आहारशास्त्र : डॉ. संगीता जवंजाळ, डॉ. किरण बेलूरकर : श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
५. पो  ाण  ाास्त्र : डॉ. मुजु  ाा सुभा  ा मोळवणे : आत्मभान प्रकाशन हिंगोली.
६. पो  ाण एवं आहार विज्ञान : डॉ. जी.पी  ौरी : विनोद पुस्तक मंदिर आग्रा.
७. आधारभूत पो  ाण : डॉ. श्रीमती अरूणा पल्टा. प्रथम संस्करण : २००२ : शिवा प्रकाशन इंदौर,
८. आहार और पो  ाण : डॉ. एल.सी गुप्ता, डॉ. कुसूम गुप्ता अमिताभ गुप्ता : जे.पी ब्रदर्स दरियागज, नई दिल्ली.
९. आहार विज्ञान : डॉ. रेणु त्रिपाठी, डॉ. अपर्णा त्रिपाठी : ओमेगा पब्लिकेशन नई दिल्ली – ११०००२
१०. FOOD & NUTRITION: Volume I : Dr. Swaminathan
११. Food and Nutrition (Fact and Figures) – 6th edition L C Gupta, Kusum Gupta, Abhishek Gupta, Jaypee Brothers Medical Publishers (P) Ltd., New Delhi.
12. DIETETICS: Seventh Multi Colour Edition: B Srilakshmi : New Age International Publishers.
13. Nutrition for developing Countries: Maurice King Felicity King. David Marley, Leslie Burgess. Ann Burgess: Oxford University Press, P.O. Box 72532, Nairobi Kenya.
14. Nutrition and Health Promotion: Bhavana Sabarawal : Commonwealth Publishers Daryaganj, New Delhi 110002.
15. Nutrition for Developing Countries – 2nd Edition: Felicity Savage King, Ann Burgess' ELBS with Oxford University Press Educational low – priced Books Scheme Funded by British Government.
16. www.dailyrounds.org
17. www.globalnutritionreport.org
18. www.scholar.google.co.in

# 'सविनय कायदेभंग' चळवळीमध्ये स्त्रियांचे योगदान.

**पूजा हिरामण गांगोडे**
समाजशास्त्र विभाग,म.वि.प्र. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वणीता. दिंडोरी जि. नाशिक
Email : poojagangode1996@gmail.com

गोषवारा :

१९३० साली महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु झाली. भारत स्वातंत्र्य चळवळीमध्ये 'सविनय कायदेभंगाच्या आंदोलनास' महत्वाचे स्थान आहे. या चळवळीमध्ये प्रमुख सहभाग हा स्त्रिया, शेतकरी, कामगार, इत्यादीचा होता. परिणामत: या स्वातंत्र्य चळवळीला जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. निशस्त्रपणे उभारण्यात आलेल्या या लढ्यात मोठया प्रमाणात नागरिक सहभागी झाले होते. महात्मा गांधी यांनी 'यंग इंडिया' मधील लेखाद्वारे सुत-कताई, परदेशी कापड, आणि दारू यांच्या दुकानांवर निरोधने करण्याच्या कार्यक्रमात स्त्रियांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. इतिहासात प्रथमत: भारतातील विविध भागातील स्त्रिया या आंदोलनात मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. सभा, प्रभातफेऱ्या, मिरवणुका, परदेशी कापडांच्या दुकानांवर निरोधने करण्यात या स्त्रियांनी पुढाकार घेतला.

**Keywords-** Social Movement, Nation Development, contribution indian woman, Nation Building.

**उद्दिष्टे -**

१. सविनय कायदेभंग चळवळीत महिलांची भूमिका आणि योगदान याची माहिती अभ्यासणे.
२. सविनय कायदेभंग चळवळीत महिलांच्या समावेशामुळे भारत स्वातंत्र्याला कशाप्रकारे दिशा मिळाली याची माहिती अभ्यासणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधन अभ्यासाकरिता 'ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा' वापर केला आहे. तथ्य संकलनासाठी द्वितीय स्त्रोतांचा प्रामुख्याने वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनाकरिताप्रकाशित आणि अप्रकाशित साहित्यांचा उपयोग केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे, शासकीय कार्यालयीन माहिती, ग्रामपंचायत मधून मिळवण्यात आलेली माहिती, साप्ताहिके, मासिके, वार्षिक अंक, इंटरनेट, इ. चा समावेश आहे.

**सविनय कायदेभंग चळवळ**

सविनय कायदेभंग चळवळ हि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील महत्वपूर्ण चळवळीपैकी एक आहे. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या या चळवळीत संपूर्ण भारतीय जनता सहभागी झाली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी राष्ट्र सभेला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे होते. पण ब्रिटीशाना ते मान्य नव्हते. महात्मा गांधीना तडजोड म्हणून संपूर्ण दारूबंदी, ५०% शेतसारा माफी, मिठावरील कर रद्द, ५०% लष्कर खर्च कपात, देशी मालाला

संरक्षण आणि राजकीय मुक्तता, अशा सर्व ११ मागण्या ब्रिटिशापुढे ठेवल्या. ब्रिटीशांनी या मागण्या दुर्लक्ष करून दडपशाही सुरु केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून १४ फेब्रुवारी १९३० रोजी राष्ट्रसभेने महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'सविनय कायदेभंगाचा' जनतेला आदेश दिला. मिठावर लादलेला कर महात्मा गांधीना मान्य नव्हता. म्हणून या कायदेभंगाची चळवळ हि मिठाचा सत्याग्रह करून करावी अशी कल्पना त्यांना सुचली आणि १२ मार्च १९३० रोजी साबरमतीच्या आश्रमातून महात्मा गांधीनी मिठाच्या सत्याग्रहासाठी दांडीयात्रेला निघाले ५ एप्रिल १९३० ला मिठाचा कायदा मोडला. महात्मा गांधीनी मिठाचा सत्याग्रह, सरकारी शिक्षण संस्थांवर बहिष्कार, परदेशी माल, अफू, दारू, विकणाऱ्या दुकानावर निदर्शने, परदेशी मालाची होळी, करबंदी, या प्रकारचे प्रमुख आदेश जनतेला देऊन आव्हान केले.

**सविनय कायदेभंग चळवळीमध्ये महिलांची भूमिका आणि योगदान**

सविनय कायदेभंग चळवळीमध्ये भारतातील विविध भागातून जनता आणि महिला सहभागी झाल्या होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून सामाजीक प्रबोधनाला सुरुवात झाली. कायदेभंग चळवळीच्या काळात सत्याग्रही महिलांची संख्या लक्षणीय वाढली होती. यामध्ये ग्रामीण भागातील महिलांचा समावेश प्रामुख्याने होता. याच काळात अनेक महिलांना तुरुंगात देखील डांबण्यात आले. यावेळी अनेक महिलांचे धडाडी नेतृत्व गुण दिसून आले. सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात संपूर्ण भारताला आणि पुरुषांना महिलांच्या कर्तुत्वाचा आणि त्याग प्रव्रुतीचा प्रत्यय आला.प्रत्येक खेड्यांने मीठ बेकायदेशीररित्या मीठ बनवावे किंवा आणावे. भगिनींनी दारूच्या दुकांनावर निरोधने करावी. प्रत्येक घरातील तरून आणि वृद्ध यांनी रोज सुत कातावे. व सुताचे कपडे विणून घ्यावे, परदेशी कापडाची होळी करावी. हिंदुनी अस्पृशतेचा त्याग करावा. अशा अनेक प्रकारची आव्हाने महत्मा गांधीनी केली होती.

गांधीजीची दांडी यात्रा सुरु झाली तेव्हा त्या लढ्यात सहभागी होण्यास स्त्रिया अत्यंत उत्सुक झाल्या होत्या. तेव्हा परदेशी कपड्यांवर बहिष्कार आणि दारूविक्री विरुद्ध निदर्शने करण्याची मोहीम स्त्रियांनी हाती घ्यावी असे आव्हान करण्यात आले. ज्याठिकाणी मिठाचा कायदा मोडणे शक्य नव्हते, तिथे इतर कायदे मोडण्याचे तंत्र सामान्य जनतेने अवलंबिले. सभा, मिरवणुकांनवर बंदी घालणारे, वृत्तपत्रवर निर्बंध लावणारे अनके अध्यादेश मोडले गेले. सदर चळवळ थांबविण्याकरिता ब्रिटीशांनी गांधीजी, वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू, या सारख्या महत्वाच्या नेत्यांना अटक केली. यामुळे सामान्य जनतेमध्ये आजुनच रोष निर्माण झाला. यात संपूर्ण जनतेने आणि स्त्रियांनी यात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. ब्रिटीश शासनाने दडपशाही निर्माण करून स्थानिक पुढार्यांना तुरुंगात पाठविण्यास सुरुवात केली.

**सविनय कायदेभंग चळवळीमध्ये महिलांचे कार्य-**

१. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये स्त्रियांनी दारू दुकानावरील निरोधने, विदेशी कपड्यावरील बहिष्कार, जंगल सत्याग्रह, प्रांतीय युद्ध मंडळास सहाय्य दारूभट्टी, लीलावाविरूद्ध जाहीर सभा, गाढवाल दिनाला सहभाग, यासारख्या अनेक कार्यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. तुरुंगाची पर्वा न करता काही स्त्रिया धडाडीने कार्य करीत होत्या.

२. या चळवळी मध्ये स्त्रियांनी सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत पुरुषांच्या बरोबरीने सर्व कामे केलेली आहेत. सरोजिनी नायडू आणि कस्तुरबा गांधी यांच्या सारख्या काही थोर स्त्रियांनीच मोठी आणि साहसाची कामे केली असे नाही, तर देशातील सर्वच लहानमोठ्या स्त्रियांनीही ती केलेली आहेत. या आंदोलनात प्रमुख सहभाग हा

सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, कमला नेहरु, हंसाबेन मेहता, उर्मिला देवी, अवंतिकाबाई गोखले. आदी स्त्रियांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली. सरोजिनी नायडू या महात्मा गांधी यांच्या सहकारी होत्या. धारासना येथे मिठागारावर झालेल्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनीच केले होते. राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदी विराजमान होणाऱ्या त्या पहिल्याच भारतीय महिला होत्या. कमलादेवी चटोपाध्याय या १९२९ साली भरलेल्या 'Women's League For Peace And Freedom' या संघटनेमार्फत भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदमध्ये त्या हजर होत्या. देशातील युवाशक्तीला संघटीत करण्याच्या कार्यात त्या सहभागी झाल्या होत्या. खादीचा प्रचार प्रसार करण्यामध्ये अवंतिकाबाई गोखले यांनी योगदान दिले. त्या हायस्कूलमध्ये शिक्षिका होत्या तसेच अनेक विधायक कामांमध्ये त्या सहभाग घेत असत. मुंबईत एका सत्याग्रही तुकडीचे नेतृत्व करताना त्यांनी कारावास भोगला. हंसाबेन मेहता यांनी 'ऑनररी मेजिस्ट्रेट' या उच्च पदाचा त्याग करून आंदोलनात सहभागी झाल्या. बंगालमध्ये उर्मिला देवी आणि अन्य महिलांनी 'नारी सत्याग्रह समिती' स्थापन करून तिच्या मार्फत सत्याग्रह केला. जवाहरलाल नेहरू यांच्या मातोश्री स्वरूपराणी नेहरू पत्नी कमला नेहरू यांनी या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता. याच काळात व्ही. टी. स्टेशनजवळच्या मैदानामध्ये स्त्रियांच्या मिरवणुकीवर लाठीमार करण्यात आला. तरीही या स्त्रियानी आपली हि चळवळ सुरूच ठेवली. अनेकदा या सविनय कायदेभंगाच्या या चळवळीत या स्त्रियांना हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या. तुरुंगवास भोगावा लागला. स्त्रियाच्या याच सहभाग आणि योगदानामुळे या चळवळीला उदात्तत प्राप्त झाली.

३. दारू निरोधने, परदेशी मालावरील निरोधणे हि कामे तर स्त्रियांचीच म्हणून ठरली असल्याने ती त्यांनी केलीच. त्याशिवाय मिठाचा सत्याग्रह, जंगलाचा कायदेभंग केला (१४४) कलम मोडून मिरवणुकी काढण्यात आल्या, युद्धमंडळे चालविली, अध्यक्ष, युद्धमंत्री, कॉंग्रेस पत्रिकेच्या संपादिका असे अनेक कामे स्त्रियांनी केले. प्रभातफेऱ्या आणि झेंडावंदनेअखंड चालूच ठेवली, सत्याग्रह प्रोत्साहके वाङ:मय छापले, जप्त वाङ:मयजाहीर सभांमधून वाचले, दौरे कढले, प्रचार केला, चरखा मंदिरे चालविली. राजकीय चळवळीच्या दृष्टीने स्त्रियांनी सत्याग्रह युद्धात भाग घेतला त्यामुळे युद्धाला विलक्षण अशी चालना मिळाली.

४. शेकडो वर्ष घराच्या चौकटीत अडकून पडलेल्या अनेक भारतीय महिलांनी परंपरागत चौकट ओलांडली आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन किंबहुना त्यांच्यापेक्षा देखील जास्त पुढे जाउन ब्रिटिशाविरुद्ध लढा उभारला. सुशिक्षित - अशिक्षित, गर्भश्रीमंत-दरिद्री, भिन्न धर्माच्या, भिन्न- जातीच्या, भिन्न संस्कारांचा प्रभाव असलेल्या लक्षावधी भारतीय महिला धैर्याने स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाल्या. संपूर्ण जगाच्या इतिहासात अपवादानेच आढळणारे हे वास्तव आहे.

५. यामध्ये महराष्ट्रातील दुर्गाताई जोशी, प्रमिलाताई ओक, विजयालक्ष्मीमश्रूवाला, काशीताई लिमये, यशोदाबाई आगरकर, सुशीला गांधी, राधाबाई ओक, उमाबाई मराठे, रमाबाई केळकर, मनुताई कोल्हटकर, कमलाताई भागवत,गंगुबाई बापट, सुंदरबाई देशमुख, सुभगाबाई काशीकर, उमाबाई खपली, पार्वताबाई पटवर्धन, लक्ष्मीबाई दांडेकर, आनंदीबाई दामले, रंगुबाई भीडवाईक, ताराबाई कानिटकर तसेच, अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागाबाई पटवर्धन, दुर्गाताई जोग, यांना कायदेभंग चळवळीमध्ये बुलढाणामधील वकील सिद्धेश्वर गोरे आणि अमरावतीमधील जिल्ह्यातील यावली गावचे लक्ष्मणराव पाचघरे यांनी प्राणाचे बलिदान दिले.

अकोला येथील दुर्गाताई जोशी, ताराबेन मश्रुवाला, यशोदाबाई आगरकर, सरस्वतीबाई मेहेरे, सुशीलाबाई गांधी यवतमाळ मधील लक्ष्मीबाई सोमण, रंगुबाई मिडवाईक, काशीबाई काळे, उमाबाई भालचंद्र अशा अनेक भागातून महिलांनी या संपूर्ण चळवळीत सहभाग घेतला.

या लढ्यात सहभागी झालेल्या महिलांनी तुरुंगाची पर्वा न करता धडाडीने कार्य करीत राहिल्या. काही स्त्रिया पिछाडीची कामे करून चळवळीला मदत केली. भूमिगतांना अनेक ठिकाणी स्त्रियांनी केलेली मदत स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरली. ब्रिटीशांच्या दडपशाहीला न जुमानता विदर्भातील सर्वच जिल्ह्यातील सर्व स्तरामधील असंख्य स्त्रियांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या या चळवळीचा भाग घेऊन स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला. अशा अनेक महिलांची कामगिरी दुर्लक्षित करता येत नाही.

**निष्कर्ष :**

१. समाजात आमुलाग्र परिवर्तन घडवण्यासाठी चळवळी महत्वाची भूमिका बजावतात.
२. कुठल्याही स्वरूपाच्या चळवळीत लोकसहभाग महत्वाचा ठरतो.
३. समाजातील स्त्रियांना देखील पुरुषांच्या बरोबरीने हक्क अधिकार दिल्यास कुठलीही चळवळ दुप्पटीने यशस्वी होऊ शकते.

**संदर्भसूची**

१. गव्हाणे किशोर, शिंदे सुखदेव 'भारतीय राष्ट्रीय चळवळी'जुन २०१५.
२. शाह घनश्याम, भारतातील सामाजिक चळवळी, पुणे, २०१०
३. सुमंत, यशवंत, भारतातीय लोकशाहीचे चर्चाविश्व : काही निरीक्षणे, पुणे, २०१२
४. Rao, M.S., A social movements, old and new a postmodernist critique, new delhi, 2001.
५. oommen, t. k., social movement, new delhi, 1979
६. singh, rajendra, social movements, old and new a postmodernist critique new delhi, 2001.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

प्रा. डॉ. बबन शामरावजी सेलकर
स्व. रा. भारती कला वाणिज्य आणि
श्रीमती सु. रा. भारती विज्ञान महाविद्यालय
आर्णी, जि. यवतमाळ

प्रस्तावना :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर विचारवंत, दलीत, शोषित, पिडीतांचे, कैवारी व मसिहा होते. दलितांमध्ये स्वत्वांची जाणीव निर्माण करणारे क्रांतीकारक महापुरूष, समाज सुधारक व थोर शिक्षणतज्ञ होते. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार होते. जातीभेदाचा त्यांना अत्यंत त्रास सहन करावा लागला. त्यातुन त्यांचे व्यक्तिमत्त्व निर्माण झाले.

जीवनभर खडतर ज्ञानसाधना करून विधीशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यामध्ये प्रभुत्त्व संपादन केले. दलित, शोषित व पिडीत यांच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. ते पत्रकार, शिक्षणतज्ञ, दलितोद्धारक, प्रज्ञासुर्य विश्वभुषण होते. त्यांनी लोकशिक्षण या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य करून आपले शिक्षण विषयक विचार मांडले. स्वातंत्र्य, समता, बंधुता व समान न्याय या चार आधारभुत तत्त्वांचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी भगवान बुद्ध, संत कबीर, आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना गुरू मानले होते.

महात्मा ज्योतिबा फुलेचा शैक्षणिक वारसा चालवला. एक अविद्या केवढा मोठा अनर्थ घडवू शकते हे डॉ. बाबासाहेबांपेक्षा चांगले कोणाला माहित असेल ? म्हणुनच ज्याला देशीय मुलाधार आहे असे शैक्षणिक तत्त्वज्ञान त्यांनी प्रतिपादन केले. निरक्षर जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. त्यांना शिक्षण हे आत्यंतिक ऐहिक हिताचे वाटत होते. शिक्षणाशिवाय जीवनामध्ये दुसरे कोणतेही हित प्राप्त करून घेणे शक्य नाही असे त्यांचे ठाम मत होते. म्हणुन ते शिक्षणाला वाघिणीचे दुध म्हणतात. ते जो घेईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असा त्यांचा विश्वास होता. समाजातील विषमता दुर करण्यासाठी त्यांना शिक्षण हा एक राजमार्ग वाटत होता. त्यांनी म्हटले होते की, शिक्षणाचा हेतू, लोकांचे नैतिकीकरण आणि सामाजिकरण करणे हा होता. सभ्यता आणि संस्कृती यांचा शिक्षणाचा पाया होता. त्यांचा आग्रह होता की, जातीप्रथेवर उघड उघड हल्ला करण्यासाठी अस्पृश्यांनी शिक्षण घेतले पाहिजे.

शैक्षणिक विचार :–

१) शिक्षण जीवन जगण्याचे साधन :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवाला शिक्षण विषयी महत्त्व सांगातांना त्यांनी आपले मत मांडले. त्यांनी असे सांगितले की, शिक्षणा अभावी मानव हा प्राणी आहे. ज्याप्रमाणे माणसावर उपासमारीची वेळ आल्यावर माणुस कुपोषित होतो, तसेच तो अल्पआयुषी होतो. त्याचप्रमाणे मानवाला शिक्षण न मिळाल्यास तो गुलाम बनतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन मानव कल्याण्याच्या तत्त्वास अनुसरून जीवन जगणारा समान शिक्षणातून निर्माण व्हावा असे त्यांना अंत:करणापासुन वाटत होते. त्यासाठी ते जीवनभर सातत्यपुर्ण कार्यरत राहिले.

२) शिक्षण गुलामगिरी नष्ट करण्याचे एक साधन :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाला प्रगतीचे साधन मानतात. शिक्षणाची व्याख्या करतांना ते म्हणतात की, शिक्षण म्हणजे मानसिक व बौद्धिक विकास घडवून आणणारे सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे व आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे साधन होय. ते सांगतात ''गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो या विरूद्ध बंड करून उठेल.'' या क्रांतीकारी पेरणी मानवाच्या मनातकरणे फक्त शिक्षणानेच शक्य होते.

३) संघटीत होण्यासाठी :—

डॉ. आंबेडकर यांनी ‘‘शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा’’ हा नारा सांगितला. समाजात वेगवेगळया प्रकारच्या असमानता असल्यामुळे सामान्य मानवाची यामध्ये पिळवणुक होते. धर्म, वर्ण, जात, लिंग इत्यादी क्षेत्रातील असमानता हि मानवाच्या विकासाला कारणीभूत ठरते. म्हणुन डॉ. आंबेडकरांनी समानता स्थापन करण्यासाठी शिक्षणाला महत्त्व दिले.

४) निरक्षरता :— एक ज्वलंत समस्या

निरक्षरता ही भारताच्या विकासातील मोठा अडथळा आहे. सर्वोत्तम लोकशाही राबविण्यासाठी सुशिक्षित किंवा शिक्षित समाज असणे आवश्यक आहे. यामधुनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिक्षणाविषयीची दूरदृष्टी दिसून येते.

५) जातीव्यवस्था आणि शिक्षण

अस्पृश्यांच्या, शुद्रांच्या आणि बहूजनांच्या विकासाचे सर्वोत्तम साधन म्हणजे शिक्षण होय. क्रांती आणि परिवर्तन शिक्षणातुन साध्य होईल व शिक्षणातुनच परिवर्तन ते त्यांच्या विचाराचे सुत्र होते. शिक्षणाच्या अभावामुळेच भारतात जातीभेद आणि जातीव्यवस्था मजबुत झाली असे आंबेडकरांचे मत होते. बहूजन समाज व अस्पृश्यांना आपला सामाजिक विकास साधावयाचा असेल तर तो शिक्षणातुनच होऊ शकतो.

६) राज्य व शिक्षण :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या देशातील निरक्षरता व शैक्षणिक मागसलेपणा याची पुर्ण जाणीव होती. शिक्षण ही समाजाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. सामाजिक प्रगतीचे ते एक मोठे साधन आहे असे त्यांचे मत होते. शिक्षण हा व्यक्तिच्या प्रगतीच्या व सामाजिक विकासाचा पाया आहे. शैक्षणिक प्रगती आणि शैक्षणिक विकास यांचा जवळचा संबंध आहे हे ते ओळखुन होते. म्हणुन राज्याने दलितांच्या शैक्षणिक उद्धारासाठी लक्ष पुरविले पाहिजे अशी त्यांची मागणी होती. त्यांच्या मते शैक्षणिक सुविधा पुरविण्याची जास्तीत जास्त जबाबदारी राज्यावर आहे. तसेच शासनाने हे ही पाहिले पाहिजे की, पुरविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सुविधांचा जास्तीत जास्त फायदा सर्व वर्गांना मिळतो.

७) उच्च शिक्षण :—

दलीतांच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हे एकमेव औषध आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. दलितांनी फक्त माध्यमिक शिक्षण घेवून थांबू नये कारण अस्पृश्यांची गुलामी नष्ट करावयाची असेल तर त्यांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे. त्यासाठी कितीही कष्ट सहन करावे लागले तरी चालेल. सामाजिक विकास आणि वैचारीक स्वातंत्र्य हे शिक्षणामुळेच मिळू शकते. दलितांनी उच्च शिक्षण घेऊन वरिष्ठ पदे हस्तगत केली तरच शासनकर्ती जमात बनता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२४ ला ‘‘बहिष्कृत हितकारणी सभेची’’ स्थापना करून त्या मार्फत दलितांसाठी वसतीगृहे उभारणे, शिक्षणाचा प्रसार करणे, औद्योगीक आणि कृषी शाळा सुरू करून दलीतांच्या स्थितीमध्ये सुधार घडवून आणण्याचा प्रयत्न केला. १९२८ मध्ये मागासवर्गीय जमातीचे शालेय शिक्षण भक्कम करण्यासाठी ‘‘दलीत वर्ग शिक्षण’’ संस्थेची स्थापना केली. १९४५ ला ‘‘पिपल्स एज्युकेशन सोसायटी’’ ची स्थापना केली. या सोसायटी अंतर्गत मुंबई येथे सिद्धार्थ व औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली.

८) स्त्री शिक्षण :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या सर्वांगिण विकाससाठी स्त्री शिक्षणावर भर दिला. त्यांच्या मते स्त्रीयांना शिक्षण मिळाल्यास कुटुंबाचा खरा विकास होईल. आपल्या पुढील पिढीचा विकास करावयाचा असेल तर स्त्रीशिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. जीवनमान सुधारण्यासाठी चांगले संस्कार करून कुटुंबाला नैतिक वळण लावण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे.

९) स्वातंत्र्य, समता आणि बंधुताची शिकवण :—

फ्रेंच राज्यक्रांतींने जगाला दिलेली अभूतपूर्व देणगी म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुतात्र ज्या ठिकाणी स्वातंत्र्य नसेल तेथे गुलामगिरी किंवा पारतंत्र्य येते. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी केलेली अधिकाराची मागणी म्हणजे स्वातंत्र्य होय. ज्या देशामध्ये धर्म, जात, वर्ग, लिंग इत्यादी कारणामुळे विषमता असते तेथे समानता नाहीशी होऊन समाजात भेदभाव निर्माण होतो. असा भेदभाव राष्ट्राला घातक असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात समान दर्जा व समान संधीची तरतूद करून समता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले आहे.

१०) शिक्षण समाजसुधारणेचे मुळ :—

सर्व समाज सुधारकांनी शिक्षणाला समाजसुधारणेचे मुळ मानले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघटीत होवून संघटन शक्ती मजबूत करून संघर्षाकडे जाण्यासाठी लोकांना त्यांनी सर्वप्रथम शिका हा मोलाचा संदेश दिला. शिक्षणाशिवाय आपली शक्ती जागृत होणार नाही. आपण स्वत:ला ओळखले पाहिजे. आपण कोणत्या पातळीवर आहोत याची जाणीव असली पाहिजे त्याशिवाय आपल्यातील माणूस जागा होणार नाही. या सर्व बाबींकरीता एकच मार्ग तो म्हणजे शिक्षण असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

समारोप :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली शैक्षणिक क्रांतीची लाट या देशात अजुन आलीच नाही. ती यावी असे वाटत असेल तर अजुन वेळे गेलेली नाही. गरज आहे ती शैक्षणिक धोरण राबविणाऱ्या शासनाच्या मनोवृत्तीत बदल होण्याची. आजच्या युगात ज्ञान ही विकासाची गुरूकिल्ली असताना एखाद्या समुहाला त्यापासुन वंचित करणे म्हणजे एक प्रकारे त्यावर नव्या प्रकारची गुलामगिरी लादणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांमुळे, दलित, पिडीत, आदिवासी समुदायात कमालीचे परिवर्तन दिसून येत आहे. त्याचबरोबर भारतीय समाजव्यवस्थेत परिवर्तन घडून येत आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१. धनंजय किर — डॉ. बाबासाहेब आंबेडकर :— मुंबई पॉप्युलर प्रकाशन
२. डॉ. भास्कर भोळे — डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा, पुणे, सुगावा प्रकाशन
३. डॉ. यशवंत मनोहर — निबंधकार डॉ. आंबेडकर नागपुर, संघमित्रा बुक हाऊस.
४. मा. य. वैद्य — वाघिणीचे दुध, अंमळनेर, चेतश्री प्रकाशन.
५. शंकरराव खरात — दलिताचे शिक्षण, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.
६. शेषराव मोटे — डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास, राजहंस प्रकाशन, पुणे.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# आदिवासींचे कर्ज घेण्याचे स्त्रोत आणि कर्जाच्या मोबदल्यात तारण वस्तूंचे विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. डॉ. योगेश प्रल्हाद महाजन,**
**धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित,**
**लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय,**
**जळगाव**

**गोषवारा:**

आदिवासींमध्ये अज्ञानाचे प्रमाण फार मोठे असते. आदिवासींना आर्थिक व्यवहारांविषयी सुद्धा योग्य ज्ञान नसते. त्यांच्यातील या अज्ञानाचा फायदा घेऊन व्यापारी, सावकार, दलाल, ठेकेदार हे त्यांना फसवितात व त्यांची पिळवणूकही करतात. आदिवासींच्या आर्थिक क्रिया या आजही प्रारंभीक अवस्थेतच असल्याचे दिसून येते. मुख्यत्वे अन्न संकलन, वनसंकलन, शिकार, मासेमारी शेती, पशूपालन या प्रक्रियेमधून ते आपल्या जीवनावश्यक आर्थिक गरजांची पूर्तता करीत असतात. या सर्व आर्थिक क्रिया प्राथमिक अवस्थेत असल्याने त्यांच्याकडे बचतीचे प्रमाण फार कमी असते. जीवनात उद्भवलेल्या अडचणींची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असणारा पैसा त्यांना अनेक वेळा सावकारांकडून किंवा व्यापाऱ्यांकडून घ्यावा लागत असतो. अशावेळी सदर सावकार व्यापारी मनमानी पद्धतीने व्याजदर लावून त्यांना पैसे देत असतात. व्याजाचे प्रमाण सवाई, दिड की आणि दुप्पटी याप्रमाणे घेत असतात. त्यासाठी ही त्यांच्याकडील मालमत्ता, शेती, पशूधन हे तारण ठेवले जात असते. अनेक आदिवासींकडून व्याजाच्या मनमानी पद्धतीमुळे या तारण वस्तू सोडविल्या जात नसतात. अगोदरच आर्थिक हलाखीमध्ये असणारे आदिवासी या पद्धतींमुळे अजून जास्त दारिद्र्याच्या खोलीत जावून अनेक समस्यांना सामोरे जात असतात.

**बीज शब्द : आदिवासींचे कर्जाचे स्त्रोत, सावकारीपद्धत, तारणवस्तू**

**प्रस्तावना :**

आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार तसेच व्यापारीलोक कमी पैसे देऊन जास्त पैशांवर अंगठा घेतात. मोठ्या स्वरूपात मालमत्ता, पशूधन तारण ठेवतात. आदिवासी लोक प्रामाणिकपणे दरमहा कर्ज फेडण्याचा प्रयत्न करीत असतात. या परतफेडीची नोंद सुद्धा सावकार व्यापारी नोंदवित नसल्याने कर्ज तसेचेतसे रहात असते व कालांतराने मालमत्ता किंवा पशूधन सावकार व्यापारीलोक आपल्यानावेकरून घेत असतात. काही ठिकाणी सदर कर्ज फेडण्यासाठी आदिवासी पुन्हा नव्याने कर्ज घेतो व पहिले कर्ज फेडतो. मात्र दुसऱ्या कर्जाच्या अधिक व्याजदराने त्याच्यावर अनेक आर्थिक संकटे ओढावत असतात. दूर्गम निवासस्थान असल्याकारणाने रोजगाराच्या संधी ही त्यांच्याकडे उपलब्ध नसतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कौटुंबिक, शारीरिक, आर्थिक, सामाजिक समस्या निर्माण होतात. या समस्यांमुळे अनेक आदिवासी वैफल्यग्रस्त होतात, त्याचा परिणाम ते गाव सोडून पलायन करतात अथवा आत्महत्या करतात.

**संशोधनाचे उद्देश :**

आदिवासींची आर्थिकस्थिती ही अत्यंत हलाखीची असते. आजारांसाठी, कुटुंबातील सदस्यांच्या विवाहांसाठी, दैनिक गरजाभागविण्यासाठी मोठ्या प्रमाणात आदिवासींद्वारे सावकारांकडून, व्यापाऱ्यांकडून, दलालांकडून कर्ज घेतले जात असते. सदर कर्जासाठी कौटुंबिक मालमत्ता घर, शेती, पशूधन हे तारण ठेवले जात असते. सावकाराच्या मनमानी व्याजदरांमुळे तारण वस्तू सोडविणे आदिवासींना फार कठीण जाते. त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर होतो. या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात केलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधातील उद्देश शास्त्रीय आधारावर व वस्तूनिष्ठ स्वरूपात मांडण्यात आलेलेआहेत.

1) आदिवासी समुदायातील कर्जाच्या कारणांचे व स्त्रोतांचे अध्ययन करणे.

2) आदिवासींना कर्जाच्या मोबदल्यात ठेवव्या लागणाऱ्या तारण वस्तू जाणून घेणे.

3) आदिवासींमधील कर्ज व तारण वस्तू यांचे विश्लेषण करणे.

**गृहीत कृत्य :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या उपकल्पना, अध्ययन साहित्याचा आधार घेऊन तयार करण्यात आलेले आहेत. शोधनिबंधांच्या उपकल्पनांची चाचणी घेणे शक्य असल्याने स्वतंत्र व अवलंबीत चलांचा सहसंबंध प्रस्तुत उपकल्पनांमध्ये मांडण्यात आलेल्या आहेत.

1) आदिवासींमधील अज्ञान, दुर्गम निवासस्थान, रोजगारांच्या संधीचा अभाव व प्रथमिक आर्थिकक्रिया यामुळे आदिवासींना जीवनाश्यक गरजापूर्ण करण्यासाठी खाजगी कर्ज घ्यावे लागते.

2) आदिवासी लोकांना कर्ज घेण्यासाठी शेती, घर, पशूधन यासारख्या वस्तू सावकारांकडे तारण ठेवाव्या लागत असतात.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व द्वितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनांमध्ये आदिवासी गावातील कर्ज घेतलेले कुटुंबातील प्रमुख, खाजगी सावकार, व्यापारी, दलाल यांच्या सोबत चर्चा, निरीक्षण यामाध्यमांसोबतच संरचित मुलाखत अनुसूची या तंत्राचा प्रामुख्याने वापर केलेला आहे. तसेच द्वितीय साधनांमध्ये लिखित संदर्भ सिडीज, स्लाईडशो, संदर्भ पुस्तीका, विविध दस्तऐवज, सांख्यिकीय माहिती, शासकीय अहवाल, मासिके, साप्ताहिके व वर्तमानपत्रे, अंतरजाल व संकेतस्थळांचा उपयोग संदर्भांसाठी केलेला आहे.

**संशोधन विश्व :**

प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र हे महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यांच्या सीमावर्तीय भागातील, मध्यप्रदेशातील झिरन्या तालूक्यामधील (खरगोन जिल्हा) निवडक 30 आदिवासी गावे आहेत. झिरन्या तालूक्याची एकूण लोकसंख्या 1,51,824 असून कुटुंब संख्या 23,104 आहे. राज्य सीमेवर वसलेल्या मध्यप्रदेशातील आदिवासी गावांमध्ये कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी कमी असल्याने, रोजगाराचा अभाव, कमी साक्षरता दर, स्थलांतर अशा अनेक अडचणी असलेल्या 20 गावांची निवड संशोधकाने केली आहे.

**नमूना निवड :**

प्रस्तुत अध्ययन क्षेत्रातील 30 गावे व त्यामधील 5473 कुटुंब सदर अध्ययन विश्वामध्ये समाविष्ट आहेत. सदर कुटुंबांची संभाव्यता नमूना निवड पद्धतीमधील स्तरीत यादृच्छिक नमुन्यातील अप्रमाणबद्ध नमुना प्रकाराचा उपयोग करण्यात आलेला आहे. संशोधनासाठी एकूण 375 निवेदकांची निवड संशोधकाने केलेली आहे.

**कर्ज घेण्याचा स्त्रोत :**

आदिवासी लोक हे आर्थिकदृष्टया अतिशय मागासलेले आहेत. सुशिक्षित नसल्यामुळे हिशोब त्यांना कळत नाही त्यामुळे सावकार लोक कर्जाऊ रकमेवर अवाढव्य व्याज आदिवासींकडून घेत असतात. त्याचप्रमाणे जंगलातील माल ज्या व्यापाऱ्यांकडे विकतात ते व्यापारीदेखील आदिवासींची हिशोबामध्ये फसवणूक करतात. विशेषकरुन आदिवासी लोक मुलींच्या लग्नाकरीता कर्ज काढत असतात व सावकारलोक नेहमी त्यांचा फायदा घेत असतात. त्यामुळे सदैव आदिवासींच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा असतो. एकंदरीत आदिवासींचे जीवन अतिशय हालाखीचे दिसून येते. (बी.एन. आकरे, 2009)

प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक स्थितीचा प्रभाव हा त्या व्यक्तीच्या सर्व कार्यावर पडलेला असतो. व्यक्तीप्रमाणेच समाजाची स्थिती असते. मानवी समाजाच्या धार्मिक, राजकीय अशा कोणत्याही अंगाचा अभ्यास करावयाचा असला तरी अशा अभ्यासासाठी समाजाच्या आर्थिक अंगाची ओळख करुन घेणे आवश्यक ठरते. प्राचिन काळातील समाजाच्या तुलनेत सद्यस्थितीतील आधुनिक समाजाचे स्वरुप अधिक गुंतागुंतीचे आहे. आदिवासी उदरनिर्वाहाच्या दृष्टिकोनातून मिळणारा मोबदला हा कमी असेल तर उदरनिर्वाह पूर्ण करता कोठून कर्ज उचलतो व त्यांची परतफेड कशाच्या आधारे करतो याबाबातचा विचार संशोधकाच्या मनात येणे स्वाभाविकच आहे. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे आकलन करण्याच्या दृष्टिकोनातून संशोधकाने केलेले संशोधन उपयुक्त ठरते.

मानवाच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी उत्पादनाचे संघटन, वितरण, नियंत्रण आणि समुदायाची मालकी व अधिकार निश्चित करण्याच्या पद्धतीला अर्थव्यवस्था असे म्हणतात. म्हणजेच जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी मानवाने केलेल्या उत्पादन, वितरण, उपभोग, विनिमय या सारख्या आर्थिक क्रियांच्या संघटनालाच अर्थव्यवस्था असे म्हणतात. मुजूमदार आणि मदन यांनी आदिवासी

आर्थिक जीवनाच्या स्थैर्य व समानता या वैशिष्टयाकडे लक्ष वेधले आहे. आदिवासींच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आहे. तसेच आर्थिक स्वरुपाची समानताही आहे. याचे एकमेव प्रमुख कारण म्हणजे आदिवासी समुह हा अल्पसंतुष्ट असून समाजापासून दूर दुर्गम स्वरुपाच्या डोंगराळ भागात राहतात. त्यांच्या गरजा हया नैसर्गिक साधनसंपत्तीवर असल्याने ते उदरनिर्वाहाकरीता कर्जापेक्षा उपलब्ध साधन सामुग्रीत दिवस भागवितात.

**कर्जाच्या मोबदल्यात तारण वस्तू :**

आदिवासी लोक आर्थिकदृष्टया अजूनही मागासलेले आहेत. त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीचा आहे. त्यात 85 टक्के आदिवासी शेतीच्या कामात असून त्यापैकी 23 टक्के स्वत:ची शेती करतात. इतर शेतमजुरी करतात. उरलेल्या पैकी अन्य मजुरी, हस्त व्यवसाय, व्यापार किंवा नोकरी यात आहेत. असे असले तरी अल्पभूधारक जास्त असल्याने त्यांचे उत्पन्न कमी आहे. ते ज्वारी, कापूस व काही प्रमाणात धानाची शेती करतात. विभागाप्रमाणे धान्योत्पादन बदलते ते परंपरागत पद्धतीनेच शेती करतात. कापूस, तीळ व भुईमूग हयांचेही पीक काही आदिवासी घेतात. डाळी मात्र कमी लावतात. शेतीसाठी घर, जमीन, दागिने इतकेच नव्हेतर घरातील भांडी गहाण सुद्धा टाकतात. त्यामुळे कर्जबाजारीपणा आहे. तशी ही स्थिती सामान्य असून सर्वच शेतकऱ्यांची आहे. बहुतेक  घरांमध्ये खर्च जास्त व उत्पन्न कमी अशी अवस्था दिसून येते. (शैलजा देवगांवकर, 2001)

आर्थिकदृष्टया दुर्बल लोक परिसरात किंवा परिसराबाहेर कामासाठी जात असतात. बहुतेक लोक खाजगी सावकारांकडून कर्ज उचलतात असे आढळते. लग्नामध्ये वधु पित्याला दहेज देण्यासाठी, लग्नातील खर्चासाठी, घरात इंदल बसविण्यासाठी, होळी सणासाठी कर्ज उचलतात. त्याशिवाय शेतीसाठी ही कर्ज उचलतात. त्यासाठी त्यांना एक तर घर, दागदागिने किंवा शेती वा झोपडीच्या तारणावर कर्ज घ्यावे लागते. प्रसंगी मालमत्ता विकावी लागते. त्यामुळे बहुतेक लोकांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा असतो. शेतीतून शेतमालाचे उत्पन्न कमी आले तर कर्ज व व्याज फुगत जाते. (डी.जी. पाटील, 1998) सदर सारणीत ग्रामीण आदिवासी भागातील निवेदकांचे कर्ज घेण्याचे स्त्रोत आणि कर्जासाठी तारण ठेवलेल्या वस्तूयांचा सहसंबंध दर्शविण्यात आलेला आहे. कर्ज घेण्यासाठी तारण ठेवलेल्या वस्तू अनेकवेळा आदिवासींकडून सोडविल्या जात नाहीत. सावकार त्याचे मालक बनत असतात. त्या दृष्टीने कर्जाचे स्त्रोत आणि तारण वस्तू पुढील सारणीत मांडण्यात आलेल्याआहेत.

**आदिवासीचे कर्ज घेण्याचे स्त्रोत आणि कर्जाच्या मोबदल्यात तारण वस्तू**

| ़कर्ज घेण्याचे स्त्रोत | कर्जाच्या मोबदल्यात तारण वस्तू | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | घर | शेतजमीन | पशुधन | अन्य | कर्ज घेतले नाही | |
| बँक | 2 | 16 | 2 | 0 | 0 | 20 |
| | .5% | 4.3% | .5% | .0% | .0% | 5.3% |
| सावकार | 1 | 42 | 6 | 19 | 10 | 78 |
| | .3% | 11.2% | 1.6% | 5.1% | 2.7% | 20.8% |
| नातेवाईक | 7 | 7 | 2 | 14 | 8 | 38 |
| | 1.9% | 1.9% | .5% | 3.7% | 2.1% | 10.1% |
| सहकारी सोसायटी | 3 | 40 | 0 | 3 | 1 | 47 |
| | .8% | 10.7% | .0% | .8% | .3% | 12.5% |
| व्यापारी | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| | .0% | .0% | .0% | .3% | .0% | .3% |
| कर्ज घेतलेले नाही | 0 | 1 | 3 | 0 | 187 | 191 |
| | .0% | .3% | .8% | .0% | 49.9% | 50.9% |
| एकूण | 13 | 106 | 13 | 37 | 206 | 375 |
| | 3.5% | 28.3% | 3.5% | 9.9% | 54.9% | 100.0% |

*($X^2$ = 397.623, df=20, C.C.=0.717, N=375, P > 0.05)*

उपर निर्दिष्ट सारणीत स्वतंत्र चलामध्ये उत्तरदात्यांच्या कर्जाचे स्त्रोत स्पष्ट करत असताना त्याचे कर्ज घेतलेले नाही, सावकार, सहकारी सोसायटी, नातेवाईक, बँक, व्यापारी असे पर्याय देण्यात आले आहेत तर अवलंबित चलात उत्तरदाता कर्जाच्या मोबदल्यात तारण/गहाणवस्तुंची माहिती हे स्पष्ट करताना त्याचे घर, शेतजमीन, पशुधन, अन्य, कर्ज घेतले नाही असे पर्याय देण्यात आले आहेत.

कर्ज घेतलेले नाही असे म्हणणारे सर्वात जास्त (50.9 प्रतिशत) उत्तरदाते दिसून आलेत्यात कर्ज ज्यांनी घेतले नाही असे 49.9 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले तर पशुधन तारण ठेवलेले 0.8 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. शेतजमीन तारण ठेवलेले 0.3 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. सावकाराकडून कर्ज घेतलेले (20.8 प्रतिशत) उत्तरदाते दिसून आले त्यात शेतजमीन तारण ठेवलेले 11.2 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले तर अन्य वस्तु तारण ठेवलेले 5.1 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. कर्ज ज्यांनी घेतले नाही असे 2.7 प्रतिशत उत्तर दाते दिसून आले तर घर तारण ठेवलेले 0.3 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले.

सहकारी सोसायटीकडून कर्ज घेतलेले (12.5 प्रतिशत) उत्तरदाते दिसून आले त्यात शेतजमीन तारण ठेवलेले 10.7 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले तर घर तारण ठेवलेले 0.8 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. अन्य वस्तु तारण ठेवलेले 0.8 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले तर कर्ज ज्यांनी घेतले नाही असे 0.3 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. नातेवाईकांकडून कर्ज घेतलेले (10.1 प्रतिशत) उत्तरदाते दिसून आले त्यात अन्य वस्तु तारण ठेवलेले 3.7 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले तर कर्ज ज्यांनी घेतले नाही असे 2.1 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. घर तारण ठेवलेले 1.9 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. तर शेतजमीन तारण ठेवलेले 1.9 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले पशुधन तारण ठेवलेले 0.5 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. बँकेकडून कर्ज घेतलेले (5.3 प्रतिशत) उत्तरदाते दिसून आले त्यात शेतजमीन तारण ठेवलेले 4.3 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले तर घर तारण ठेवलेले 0.5 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. पशुधन तारण ठेवलेले 0.5 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले. व्यापारींकडून कर्ज घेतलेले (0.3 प्रतिशत) उत्तरदाते दिसून आले त्यात अन्य वस्तु तारण ठेवलेले 0.3 प्रतिशत उत्तरदाते दिसून आले.

यावरून असे सिद्ध होते की, कर्ज घेण्याचा स्त्रोत व कर्जाच्या मोबदल्यात तारण वस्तू या दोन्हीमध्ये धन स्वरूपाचा सहसंबंध आहे. *($X^2$ = 397.623, df=20, C.C.=0.717, N=375, $P > 0.05$)* म्हणजेच आदिवासींमध्ये कर्ज घेण्याच्या स्त्रोतांच्या स्वरूपावर कर्जाच्या मोबदल्यात तारण वस्तुचे स्वरूप निर्धारीत होते कारण आदिवासींमध्ये ज्यांनी कर्ज घेतलेले आहे त्यांच्यात प्रामुख्याने सावकारामार्फत कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. तसेच कर्जाच्या मोबदल्यात तारण म्हणून शेतजमीन ठेवलेल्या निवेदकांचे प्रमाण जास्त आहे.

सावकारांकडून कर्ज घेतल्याने व्याजदर अधिक स्वरूपाचे असते आणि ते लवकर फेडणे आदिवासींना शक्य होत नाही. म्हणून गाव पातळींवर बँकेमार्फत मिळणाऱ्या कर्जाच्या तरतूदी सोप्या करून आदिवासींना त्याचे महत्त्व पटवून द्यावे जेणेकरून कर्जाचा व्याजदर कमी होऊ शकेल.

**सूचना :**

- आदिवासी सुदायात शिक्षणाचे प्रमाण  वाढावे याकरिता शासनस्तरावर राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक योजना स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. प्रत्येक गावात शिक्षणाच्या सुविधांची उपलब्धता वाढवून शिक्षणाची जागृती निर्माण करणे आवश्यक आहे, जेणे करून आदिवासींमधील अज्ञानाचे प्रमाण कमी होईल.
- आदिवासी समुदायांचे स्थलांतर थांबविण्यासाठी त्यांना त्यांच्याच मूळ गावांमध्ये विशिष्ट आधार व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच, विविध शासकीय योजना उदा. रोजगार हमी योजना, अन्नसुरक्षा योजना, यासारख्या योजना पोहोचवून स्थलांतरावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. तसेच, युवकांना, महिलांना, मुलांना स्थायी स्वरूपाच्या विविध योजनांचा त्यांना लाभ उपलब्ध होईल या दृष्टीने पाऊले उचलणे आवश्यक आहेत.
- आदिवासींचे आर्थिक, सामाजिक विकास साधण्यासाठी त्यांच्या कौटुंबिक व्यवसायात कालानुरूप बदल करणे आवश्यक आहे. शेतीसोबतच इतर जोडधंद्यांची उपलब्धता शासकीय योजनांच्या माध्यमातून त्यांना प्राप्त झाल्यास त्यांचे सर्वांगिण जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

- हस्तव्यवसाय किंवा जोडधंद्यातून उत्पन्न मिळविण्यासाठी ग्रामस्तरावर आदिवासींच्या पारंपरिक जीवनाच्या दृष्टिकोनातून विविध जनजागृतीपर शिबिरे, प्रशिक्षणे, मार्गदर्शनांचे आयोजन करणेमहत्त्वाचेआहे.
- आदिवासी क्षेत्रात स्थानिक उत्पन्नावर आधारीत व्यवसाय व उत्पादन विक्रीसाठी बाजारपेठांची निर्मिती झाल्यास मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल व त्याचबरोबर समाजाचा विकास साधला जाईल. यादृष्टीने अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहेत. म्हणून वन उत्पादन संकलन व प्रक्रिया उद्योगनिर्मितीवर अधिक भर देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.
- आदिवासीक्षेत्रात बेरोजगारीची तिव्रता वाढण्याच्या कालावधीत आदिवासींना स्थानिक क्षेत्रातच इतर रोजगारांची उपलब्धता करून दिली तर स्थलांतराचेही प्रमाणकमी होऊ शकेल.
- आदिवासींना कर्जाच्या चक्रातून बाहेर काढण्यासाठी अथवा खाजगी कर्जाच्या होणाऱ्या आर्थिक शोषणा विरूद्ध जागृत करून त्यांच्यापर्यंत आर्थिक विकास व सधनता याबाबतच्या शासकीय योजना पोहचविण्यासाठी प्रयत्न करणेआवश्यक आहे.
- आदिवासी गावांमध्ये सहकारी सोसायट्या, बँक, पतपेढ्या, विविध कार्यकारी सोसायट्या इत्यादींच्या शाखा प्रत्येक गावामध्ये उपलब्ध करून द्याव्यात.

**संदर्भसूची :**


- आकरे, बी. एन., 'आदिवासींच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम', नागपूर : पिंपळापुरे प्रकाशन.
- आकरे, बी. एन. (2009) : 'आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना', नागपूर : पिंपळापुरे बुकडिस्ट्रीब्युटर्स.
- काळे, बी. आर. (2016) : `केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास योजना', औरंगाबाद : संदर्भ प्रकाशन.
- गारे, गोविंद (2009) : आदिवासींचे शिक्षण औरंगाबाद : साकेत प्रकाशन.
- गारे, गोविंद, आदिवासींच्या समस्याआणि बदलते संदर्भ, पुणे : सुगावा प्रकाशन.
- जोशी, सिताराम (1988) : आदिवासी विकासयोजना, पुणे : आदिवासी समाज कृती समिति
- पिचड, नलिनी (1999) : आदिवासींचे शिक्षण, प्रकाशीत पीएच.डी.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# डॉ. इरावती कर्वे यांचे भारतीय समाजशास्त्रातीलयोगदान

डॉ. सुनिता संजय धोपटे
समाजशास्त्र विभाग, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती

**सारांश** :प्रस्तुत शोध निबंधामध्येडॉ.इरावती कर्वे यांचे समाजशास्त्रातीय योगदानावर प्रकाश टाकण्यात आल आहे. विसाव्या शतकातील एक प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व लेखिका. समाजाबद्दलचे लोकांचे आकलन समृद्ध करणाऱ्या; सामाजिक, सांस्कृतिक व शारीरिक मानव- शास्त्रावर प्रभुत्व सिद्ध करणाऱ्या जागतिक कीर्तीच्या संशोधक व तितक्याच उत्कृष्ट लेखिका आणि स्वत:च स्त्री-स्वातंत्र्याचे उदाहरण ठरलेल्या पुरोगामी विचारवंतडॉ. इरावती कर्वे, मानवांमधील सांस्कृतिक-जैविक विविधतेचा अभ्यास करण्यासाठी संख्याशास्त्रातील 'मल्टी-व्हेरीएट' पद्धतींचा वापर करण्यात इरावती कर्वे अग्रणी होत्या. मानवांमधील जैविक विविधतेचा अभ्यास करताना कोणते एकक वापरावे, याबद्दल अनेक मतप्रवाह आहेत. या संदर्भात कर्वे यांनी जातीची व सामाजिक एककाची केलेली व्याख्या आजही समर्पक आहे. विविध जाती-भाषासमूहांच्या संख्याशास्त्रीय अभ्यासाचा त्यांचा हेतू वंशावर आधारित वर्गीकरण करणे हा नसून, जातींच्या उगमाची निरनिराळी गृहीतके तपासणे हा होता. म्हणूनच एक समाजशास्त्रज्ञ असूनही प्रसंगी सहकाऱ्यांची कडवट टीका स्वीकारून त्यांनी समाजशास्त्रात जीवशास्त्रामधल्या आनुवंशिकतेच्या अभ्यासाचा आग्रह धरला होता.इरावतीबाईंनी केवळ खोलीत बसून संशोधनात्मक अभ्यास किंवा लेखन केले असे नाही, तर त्यांनी संशोधनासाठी भारतभ्रमण केले. अनेक वर्षे पंढरीची वारीही केली, अनेक जत्रा-यात्रा जवळून अनुभवल्या.समाजाला 'गोधडी'ची उपमा देऊन त्यांनी त्यामागील व्यापक अर्थ सांगितला. 'वेगवेगळया रंगांच्या आकारांच्या तुकड्यांनी मिळून गोधडी हे अखंड वस्त्र तयार होते, त्याप्रमाणेच समाजातील निरनिराळी माणसे एकत्र येऊन समाज निर्माण होतो, माणसे एकमेकांच्या जवळ येतात. व त्यातून नात्यांची वीण तयार होते आणि अश्या प्रकारे समाज निर्माण होतो डॉ इरावती कर्वे यांनी भारतीय समाजाचे विश्लेषण हे मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून केले आहे.

**बीज संज्ञा** : समाजशास्त्र,मानवशास्त्र, भारतीय समाज, संस्कृती,जातीव्यवस्था,कुटुंबसंस्था आणि नातेदारीव्यवस्था

**प्रस्तावना**:विसाव्या शतकातील एक प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व लेखिका. समाजाबद्दलचे लोकांचे आकलन समृद्ध करणाऱ्या; सामाजिक, सांस्कृतिक व शारीरिक मानव- शास्त्रावर प्रभुत्व सिद्ध करणाऱ्या जागतिक कीर्तीच्या संशोधक व तितक्याच उत्कृष्ट लेखिका आणि स्वत:च स्त्री-स्वातंत्र्याचे उदाहरण ठरलेल्या पुरोगामी विचारवंतडॉ. इरावती कर्वे, मानवशास्त्राबरोबरच त्यांनी पुरातत्त्वविद्या आणि इतरसामाजिक शास्त्रात उल्लेखनीय संशोधनकार्य केले. आज ज्ञानाचे स्वरूप विविधांगी झालेले आहे. मानवी जीवनाच्या अभ्यासासाठी पुरातत्त्व व मानवशास्त्र या सामाजिक शास्त्रांप्रमाणेच गणित, संख्याशास्त्र, जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्रांच्या अनेक शाखा एकत्र येत आहेत. ही गरज इरावती कर्वे यांनी अर्धशतकापूर्वीच ओळखली होती. समाजशास्त्रात मूलभूत बदल घडवणाऱ्या स्त्रीवाद व उत्तर-आधुनिकतावाद या संकल्पना त्यांच्या मानवशास्त्रावरील संशोधनपर आणि ललित लेखनांत जाणवतात. प्राचीन भारतीय समाजजीवनाच्या अभ्यासासाठी कर्वे यांनी निवडलेला प्राचीन भारतीय साहित्याच्या विश्लेषणाचा मार्ग तेव्हा सर्वस्वी नवीन होता. कारण कोणत्याही संस्कृतीचा अभ्यास तिचा इतिहास जाणून घेतल्याखेरीज करता येणार नाही व कोणत्याही समाजाची रचना परंपरा समजून घेतल्या नाहीत तर कळणार नाही, ही त्यांची सैद्धांतिक भूमिका अतिशय महत्त्वाची होती.मानवांमधील सांस्कृतिक-जैविक विविधतेचा अभ्यास करण्यासाठी संख्याशास्त्रातील 'मल्टी-व्हेरीएट' पद्धतींचा वापर करण्यात इरावती कर्वे अग्रणी होत्या. मानवांमधील जैविक विविधतेचा अभ्यास करताना कोणते एकक वापरावे, याबद्दल अनेक मतप्रवाह आहेत. या संदर्भात कर्वे यांनी जातीची व सामाजिक एककाची केलेली व्याख्या आजही समर्पक आहे. विविध जाती-भाषासमूहांच्या संख्याशास्त्रीय अभ्यासाचा त्यांचा हेतू वंशावर आधारित वर्गीकरण करणे हा नसून, जातींच्या उगमाची निरनिराळी गृहीतके तपासणे हा होता. म्हणूनच एक समाजशास्त्रज्ञ असूनही प्रसंगी सहकाऱ्यांची कडवट टीका स्वीकारून त्यांनी समाजशास्त्रात जीवशास्त्रामधल्या आनुवंशिकतेच्या अभ्यासाचा आग्रह धरला होता. इरावतीबाईंनी केवळ खोलीत बसून संशोधनात्मक

अभ्यास किंवा लेखन केले असे नाही, तर त्यांनी संशोधनासाठी भारतभ्रमण केले. अश्या प्रसिद्ध समाज शास्त्रज्ञ, मानव शास्त्रज्ञ,डॉ इरावतीकर्वे यांचे सामाजशास्त्रीय योगदान या अनुषंगाने समाजव्यवस्था, जातीसंस्था, कुटुंब व नातेदारीव्यवस्था या संकल्पनांचे नाविन्यपूर्ण केलेले विश्लेषण या संशोधन लेखामध्ये मांडण्यात आले आहे.

**उद्देश :**

१) विसाव्या शतकातील एक प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे ती स्पष्ट करणे. २) समाजाबद्दलचे लोकांचे आकलन समृद्ध करणाऱ्या जागतिक कीर्तीच्या संशोधकडॉ इरावती कर्वे याच्या समाजशास्त्रीय अभूतपूर्व योगदानावर प्रकाश टाकणे. ३) त्यांनी मांडलेल्या समाज, संस्कृती कुटुंब, जात, नातेदारीव्यवस्था या संकल्पनांचे स्पष्टीकरण करणे.४)

**इरावती कर्वे यांचे शिक्षण व प्रारंभिक जीवन :**

इरावती कर्वे यांचा जन्म ब्रह्मदेशातील एका (म्यिंज्यान) इरावती नदीच्या काठी वसलेल्या मिंगयानमध्ये(आताचा म्यानमार) .मध्यमवर्गीय कुटुंबात झालात्यामुळेच त्यांचे नाव इरावती असे ठेवण्यात आले. त्यांचे वडील गणेश करमरकर हे त्यावेळी तेथे अभियंत्याचे काम करीत होते .लहान वयातच त्या शिक्षणासाठी पुण्यात आल्या.मूळच्या इरावती गणेश करमरकर यांचे शिक्षण पुण्यातील हुजूरपागा शाळेत झाले१९२२ साली त्या मॅट्रिक पास . झाल्या, आणि १९२६ साली फर्ग्युसन महाविद्यालयातून तत्त्वज्ञान विषय घेऊन बी.झाल्या (ऑनर्स) .ए. फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना विख्यात गणिती व तेव्हाचे प्राचार्य रँग्लर परांजपे यांच्यामुळे त्या प्रभावित झाल्या त्यांनी तत्त्वज्ञान विषयात पदवी संपादन . केल्यानंतर त्यांना प्रतिष्ठित असलेली मुंबई विद्यापीठाची दक्षिणा शिष्यवृत्ती मिळाली.पुढे त्यांनी डॉघुर्ये ह्यांच्या . 'चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण' मार्गदर्शनाखाली( – द चितपावन ब्राह्मिन्स'अॅन एथ्निक स्टडी') ह्या विषयावर प्रबंध लिहून एम् ची पदवी मिळविली .ए .व पुढील शिक्षणासाठी त्या जर्मनीला गेल्या. व त्यांनीजर्मनीतीलकैसरविल्यम इन्स्टिट्यूटमध्येमानवशास्त्रात 'दनॉर्मल आसिमेट्री ऑफ ह्यूमन स्कल' ('मनुष्याच्या डोक्याच्या कवटीची नेहमीची असमप्रमाणता') ह्या विषयावर प्रबंध लिहून बर्लिन विद्यापीठातून पीएच् पदवी .डी.प्राप्त केली. त्यांना तेथे त्या काळात गाजलेल्या सुप्रजननशास्त्र )Eugenics) विषयाचे प्रायुजेन फिशर यांचे मार्गदर्शन लाभले.. त्यांचा विवाह महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा मुलगा फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य शिक्षणतज्ज्ञ दि.कर्वे यांच्याशी झाला .धों .त्यांना जाई, आनंद, गौरी अशी तीन अपत्ये झाली. इरावती या स्वतंत्र विचारवंत आणि स्वत .च्या विश्वासावर ठाम असणारी व्यक्ती होत्या: त्यांची .त्यांची राहणी अत्यंत साधी व वृत्ती पुरोगामी होतीमहिलांबद्दलची कल्पना ही आधुनिकवादी होतीपुरूषप्रधान . त्यांच्या मते .संस्कृतीशी लढणाऱ्या स्त्रीयांना त्या संबोधित असत, 'स्त्रीयांनी पुरूषांसोबत लढताना केवळ समान हक्कांसाठी न लढता नेहमी अधिक हक्कांसाठी लढावे '.त्यांनी १९५२ मध्ये पुण्यातील पहिली महिला दुचाकी चालक म्हणून प्रतिष्ठा मिळविली.

**व्यावसायिक जीवन व संशोधन कार्य :**

इरावती कर्वे यांनी काही वर्षे मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठात कुलसचिव म्हणून काम पाहिले. नंतर पुणे येथे डेक्कन कॉलेजमध्ये इतिहासविषयाच्या प्रपाठक या पदावर त्या रुजू झाल्या. त्यांना प्राध्यापकपदावर बढती मिळाली (१९४९). डेक्कन कॉलेजमध्ये इरावती कर्वे व ह. धी. सांकलिया यांनी पुरातत्त्वविद्येमधील आजच्या मानवशास्त्रीय संशोधनाचा पाया घातला व प्रारंभापासूनच हे संशोधन जागतिक पातळीच्या दर्जाचे व्हावे म्हणून प्रयत्न केले. इरावती कर्वे व सांकलिया यांनी गुजरातमधील लांघणज या मध्याश्मयुगीन स्थळाचे उत्खनन केले (१९४९). या ठिकाणी मानवी अवशेषही मिळाले असल्याने हे संशोधन महत्त्वाचे ठरले..१९४७ मध्ये दिल्लीच्या सायन्स कॉलेजच्या मानवशास्त्र विभागाच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या मानवशास्त्रातील संशोधनामुळे त्यांचीमध्ये लंडन विद्यापीठांत व्याख्यात्या म्हणून एक वर्षाकरिता नियुक्ती झाली. बर्कले येथेही व्याख्यात्या असे सन्मान त्यांना मिळाले. Cत्याच साली प्रागितिहासाच्या सकल आफ्रिकी काँग्रेसमध्ये त्यांनी भारत सरकारचे प्रतिनिधित्व केले.इरावती यांनी मानवांमधील सांस्कृतिक, जैविक विविधतेचा अभ्यास करण्यासाठी संख्याशास्त्रातील 'मल्टी व्हेरीएट' (बहुवस्तुनिष्ठता)पद्धतींचा वापर केला. तसेच त्यांनी प्राचिन

भारतीय इतिहास या विषयाचा अभ्यासही केला. मानवांमधील जैविक विविधतेचा अभ्यास करताना कोणते एकक वापरावे, यासंदर्भात यांनी जातीची व सामाजिक एककाची केलेली व्याख्या आजही समर्पक आहे.त्यांच्या किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया (१९५३) या ग्रंथात त्यांनी भारतीय समाजरचनेच्या संदर्भात अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नांबद्दल स्पष्ट आणि नेमकी मांडणी केली. वांशिक व भाषिक गटांच्या दरम्यानचे फरक त्यांच्या बाह्य शरीररचनेच्या व आनुवंशिक संरचनेच्या आधारे अभ्यासता येतील का, हा त्यांच्या संशोधनाचा मूळ गाभा होता. त्याला अनुसरून कर्वे यांनी *हिंदू सोसायटी :ॲन इंटरप्रिटेशन*(१९६१) या आपल्या ग्रंथात महाराष्ट्रातील समाजरचनेचे प्रारूप एका आकृतीत दिले आहे. १९४७ साली दिल्ली सायन्स काँग्रेसमध्ये मानववंशशास्त्र विभागाच्या त्या अध्यक्षा होत्या. प्रागैतिहासाच्या आफ्रिका काँग्रेसमध्ये भारत सरकारचे प्रतिनिधित्व, कॅलिफोर्निया विद्यापीठातर्फे मानवंशास्त्रातील संशोधनामुळे लंडन विद्यापीठामध्ये आमंत्रित व्याख्यात्या, बर्कले येथेही व्याख्यात्या असे सन्मान त्यांना मिळाले. त्यांच्या स्मरणार्थ डेक्कन महाविद्यालयाने ग्रंथालयामध्ये एक संदर्भ विभाग ठेवला आहे. तेथे त्यांना मिळालेली प्रशस्तिपत्रके व पारितोषिके बघायला मिळतात. १९७३मध्ये डेक्कन महाविद्यालयाने एक स्मृतिग्रंथ काढला होता. त्यात काकासाहेब कालेलकरांनी त्यांच्या समग्र कार्याचा आढावा घेणारा गौरवास्पद लेख लिहिला आहे. २००५ साली डेक्कन महाविद्यालयाने त्यांची जन्मशताब्दी साजरी केली. पुणे विद्यापीठाने त्यांच्या स्मरणार्थ समाजशास्त्र विभागाजवळ मानववंशशास्त्र वस्तुसंग्रहालय उभारले आहे. १९९१ मध्ये प्रदर्शन भरवले व १९९३ मध्ये संग्रहालयाला त्यांचे नाव देण्यात आले. येथील आदिवासी काळाविषयीचे दालन, लग्नखांब, मानवी उत्क्रांतीमधील टप्पे वगैरे अनेक गोष्टी अभ्यसनीय व आकर्षक आहेत. त्यांनी जाती व्यवस्थेचा अभ्यास करतांना भारतात आर्य येण्या अगोदरपासून ते सध्यस्थिती पर्यंतच्या घटनांचा मागोवा घेतला होता. १९५३ मध्ये लिहिलेल्या kinshiporganizationinIndia या ग्रंथामध्ये भारतातील विविध सामाजिक संस्थाचा आढावा घेतलेला निदर्शनास येते. याशिवाय *लॅन्ड अँड पीपल ऑफ महाराष्ट्र हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ यामध्ये* विविध सामाजिक संस्था आणि त्यांच्यामध्ये होणाऱ्या विविध धार्मिक विधींचा अभ्यास केलेला होता. *कर्वे यांच्या वंश या संदर्भातल्या* सर्व संकल्पना सध्या जरी मान्य होण्याजोग्या नसल्या तरी त्याकाळात त्यांनी केलेले संशोधन हे आजही अत्यंत महत्वाचे आहे

**ग्रंथसंपदा :**

इरावती कर्वे यांनी मानवशास्त्र, समाजशास्त्र व मानसशास्त्र या विषयांत विपुल लेखन व संशोधन केले आहेत्यांचे सुमारे . .८० संशोधनपर निबंध प्रसिद्ध झाले आहेतत्यांच्या ग्रंथापैकी हिंदू सोसायटी: *ॲनइंटरप्रिटेशन* (१९६१(, किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया (१९५३(, द भिल्ल ऑफ वेस्ट खानदेश (१९५८(, गृप रिलेशन्स इन व्हिलेज कम्युनिटी (१९६३(, द सोशल डायनॅमिक्स ऑफ अ ग्रोवींगटाऊन अँड इट्स सराऊंडींग एरिया (१९६५( महाराष्ट्र लँड अँड पीपल (१९६८(,अन्थ्रोपोमेट्रिक मेजरमेंट्स ऑफ मराठा हे इंग्रजी व परिपूर्ती (१९४९(, भोवरा, मराठीलोकांचीसंस्कृति(१९५१(, हिंदूंचीसमाजरचना(१९६४),युगान्त (१९६७(, धर्म (१९७१), गंगाजल(१९७२(, हिंदू समाज एक अन्वयार्थ (१९७५), आमची संस्कृति हे मराठी ग्रंथ महत्त्वाचे आहेत.इंग्रजी भाषेतील इरावती कर्वे यांचे एकूण बारा वैचारिक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत.त्यापैकी बहुतेक इंग्रजी ग्रंथांस आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली असून युगान्त ह्या महाभारतावरील चिकित्सक ग्रंथास साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासन यांचा पुरस्कार लाभला. युगान्तप्रमाणे रामायणावर असेच एखादे चिकित्सक पुस्तक लिहावे, असा त्यांचा विचार होता. तसेचत्यांनी मराठी नियतकालिकांतून स्फुट लेखनही केले आहे. इतकी समृध्द आणि विविध विषयावरील ग्रंथसंपदा एका बहुआयामी लेखिकेचा परिचय करून देते.इरावती कर्वे म्हणजे जणू चालते बोलते ग्रंथालयच होते.

## *समाजशास्त्रातील योगदान*

**भारतीय समाज व संस्कृती :**

इरावतीबाईंनी केवळ खोलीत बसून संशोधनात्मक अभ्यास किंवा लेखन केले असे नाही, तर त्यांनी संशोधनासाठी भारतभ्रमण केले. अनेक वर्षे पंढरीची वारीही केली, अनेक जत्रा-यात्रा जवळून अनुभवल्या.समाजाला 'गोधडी'ची उपमा देऊन त्यांनी त्यामागील व्यापक अर्थ सांगितला. 'वेगवेगळया रंगांच्या आकारांच्या तुकड्यांनी मिळून गोधडी हे अखंड वस्त्र तयार होते, त्याप्रमाणेच समाजातील निरनिराळी माणसे एकत्र येऊन समाज निर्माण होतो, माणसे एकमेकांच्या जवळ येतात.व त्यातून नात्यांची वीण तयार होते आणि अश्या प्रकारे समाज निर्माण होतो डॉ इरावती कर्वे यांनी भारतीय समाजाचे विश्लेषण हे मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून केले आहे. मानवी संस्कृतीचे आकलन करून घेतल्या शिवाय भारतीय समाजाचे दर्शन होऊ शकत नाही. याचे त्यांनी मराठी लोकांची संस्कृती या पुस्तकात सविस्तर वर्णन केले आहे. भारतीय संस्कृतीला समजून घेण्यासाठी भाषा निहाय प्रदेश निर्मिती, जातीव्यवस्था आणि कुटुंब संघटन हे तीन घटक अत्यंत महत्वाचे आहेत.या तीनही घटकांचापरस्परांशी अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. संस्कृतीचा अभ्यास म्हणजेच मानवशास्त्राचा अभ्यास, संस्कृती ही फक्त मनुष्यप्राण्यालाच मिळालेली देणगी आहे. माणसाचे माणूसपण हे संस्कृतीतच आहे. आजवर संस्कृतीच्या अनेक व्याख्या केल्या गेल्या. मात्र इरावती कर्वे यांनी केलेली संस्कृतीची व्याख्या म्हणजे - 'मनुष्यसमाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती.'संस्कृती ही समाजाची असते. व्यक्तीचे सामुदायिक जीवन म्हणजे समाज. व्यक्तीचे जीवन मर्यादित असते, परंतु समाज हा प्रदीर्घ असतो. पिढ्यांमागून पिढ्या तयार होऊन समाजाचे अस्तित्व हे मात्र टिकून असते. संस्कृती एक की अनेक,संस्कृती स्थिर की प्रवाही... संस्कृतीच्या एकत्वाचे सूत्र याचा ऊहापोह करून भारतीय संस्कृती व महाराष्ट्रीय संस्कृतीकडे बाई वळतात. त्यांच्या मते भारतीय संस्कृती ही खंडित नाही. मधले दुवे जरी झिजले असले तरी परंपरा टिकून आहे. परंतु हीच भारतीय संस्कृती अनेकविध संस्कृतीच्या संघर्षाने आणि साहचर्याने बनली आहे. त्यामुळेच विविध प्रादेशिक संस्कृतींची परंपरा 'भारतीय संस्कृती'त परावर्तीत झालेली दिसते.अर्थातच संस्कृती जाणून घेताना ती कोणत्या भूमीत घडते याला खूप महत्त्व असते. कारण आजूबाजूच्या भौगोलिक घटकांचा संस्कृतीवर परिणाम घडत असतो. संस्कृती जिवंत होते,नव्याने निर्माण होते.किंवा लय पावते. पण कोणतीही व्यक्ती कोणत्याही संस्कृतीचे स्वरूप पूर्णपणे दाखवूच शकत नाही. कारण संस्कृतीला व्यक्ती निरपेक्ष असे स्वतंत्र जीवन असते.मराठी संस्कृतीचा अभ्यास हा खऱ्या अर्थाने मानवशास्त्रीय आहे. महाराष्ट्र हा कुतूहलजनक आहे कारण महाराष्ट्रात भारतातील संस्कृतीचे व मानवाच्या प्रवाहांचे सम्मीलन झाले आहे.

**जातीव्यवस्था :**

भारतातल्या कोणत्याही एका समूहाच्या संस्कृतीची ओळख करून घ्यायची असेल तर भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचा अभ्यास माहित असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे भारतातील नातेदारी व्यवस्थेचा अब्यास करतांना या घटकावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. जसे १)एक अंत:समूह आहे, त्यांनी जातीची व्याख्या करतांना असे म्हंटले आहे कि, "नाते संबंधाचे विस्तारित स्वरूप म्हणजे जात होय", भारतामध्ये प्रत्येक जाती समुह हा उपजाती समुहामध्ये विभागला आहे.आणि प्रत्येक जाती समूहाचा स्वतःचा एक व्यवसाय आहे. अर्थात व्यवसायाच्या आधारेच हे विभाजन दिसून येते. उदा. कुंभार हि एक जात आणि थोर चाके व लहान चाके कुंभार ह्या उपजाती.२) जातीची विशिष्ट श्रेणी रचना आढळते समाजतील कोणत्याहि जाती समूहामध्ये श्रेणी रचना आढळते. जाती व्यवस्थेचा समाजात असणारा क्रम विवाह संबंधाची रचना निश्चित करतो.

**कुटुंबसंस्था :**

ईरावती कर्वे यांच्या साठी कुटुंब हा विषय अत्यंत जिव्हाळयाचा होता आणि त्यामुळेच त्यांनी केलेले कुटुंबसंस्थेचे विश्लेषण हे अत्यंत आगळे वेगळे आहे त्यांच्या मते कोणत्याही समाजातील कुटुंब व्यवस्था समजून घ्यायची असेल तर काही बाबी लक्षात घेणे अत्यंत महत्वाचे आहे जसे संयुक्त कुटुंब, पद्धती हि भारतीय समाजाची एक प्राचीन अशी संस्था आहे. इरावती कर्वे यांनी संयुक्त कुटुंब पद्धतीचे विश्लेषण करतांना असे म्हंटले आहे कि, ज्या व्यक्ती व्यापार आणि नोकरी व्यवसायामुळे संयुक्त

कुटुंबापासून विशिष्ट काळासाठी दूर राहतात त्या सुद्धा कुटुंबाशी निगडीत असतात. संयुक्त कुटुंबाची रचना कुटुंबात कोणकोणत्या व्यक्तीचा समावेश होतो आणि त्यांचे परस्परांशी असलेले संबंध, संयुक्त कुटुंब हे एक प्रमुख केंद्र असते आणि त्यापासून विशिष्ट अश्या नातेसंबंधाची रचना आकाराला येते. या नाते संबंधावरून संयुक्त कुटुंबाचे २ प्रकार केलेत १) पितृसत्ताक २) मातृसत्ताक जसे मराठी कुटुंबपद्धती ही पितृपरंपरेवर आधारलेली आहे. त्याचे बरेचसे साम्य उत्तर भारतीय स्वरूपाचे आहे. कुटुंबाची ओळख हि कुलनामावरून होते महाराष्ट्रीय लोकांची कुलनावे ही झाडांवरून, प्राण्यांवरून,शारीरिक गुणांवरून, हुद्द्यांवरून, वतनांवरून घेतलेली दिसतात. संपूर्ण भारतभर देवकांची पद्धत असावी. कुळाचे देवक ते कुलनाव असावे आणि नंतर आडनाव पद्धती आली असावी. कुळाबाहेर लग्न करण्याची पद्धत सर्वत्र दिसते. उत्तरेत मुलगी ज्या घराण्यांशी काही संबंध नाही अशा घरात जाते, तर दक्षिणेत आत्या किंवा मामाच्या घरी जाते.देशात सर्वत्र पितृप्रधान संस्कृती असली तरी २) केरळात मात्र मातृप्रधान संस्कृती दिसते. येथे कुटुंबात स्त्रीच्या नवऱ्याला विशेष स्थान नसते. पुरुष हा बाहेरून येणारा असतो. मराठी कुटुंब म्हणजे उत्तर-दक्षिणेचा संगम आहे. पितृप्रधान पद्धती असली तरी स्त्रियांना माहेरची ओढ असते. महाराष्ट्रातील कुटुंबपद्धती ही संस्कृती संघर्षाची आहे. महाराष्ट्रातील बऱ्याच जाती-जमातींचे मूळ हे उत्तर भारतीय असावे, परंतु कुटुंबपद्धतीवर दाक्षिणीय प्रभाव दिसतो. म्हणजेच उत्तर-दक्षिण याचा संगम महाराष्ट्रात दिसतो.

**नातेदारीव्यवस्था :**

डॉ.इरावती कर्वे यांच्या मते नाते संबंधाचा विचार करता भारतामध्ये भाषिक प्रदेशांचे अनुकरण किंवा त्याचा प्रभाव विशेष करून आढळून येत असला तरी काही विशिष्ट परिस्थितीमध्ये मात्र नातेसंबंध व्यवस्था आणि भाषिक प्रदेश यांचा एकत्रित संबंध असतोच असे नाही. इरावती कर्वे यांनी भारतातील नातेदारी व्यवस्थेचे विश्लेषण करतांना भारतातील विविध भाषिक प्रदेशाच्या स्वरूपचे विश्लेषण केले आहे. त्यांनी भाषिक प्रदेशातील नातेसंबंधाचे स्पष्टीकरण करताना भारतीय समाजाचे विविध भाषिक प्रदेशात विभाजन केले आहे

१)उत्तर आणि मध्य भारतातील भाषिक प्रदेश २) दक्षिण भारतातील भाषिक प्रदेश ३) पूर्व भारतातील भाषिक प्रदेश इरावती कर्वे यांच्या मते भाषिक समूहाच्या सांस्कृतिक एकजिनसीपणा, वैशिष्ट्यपूर्णता आणि नातेसंबंधाचे स्वरूप आढळून येते. अश्या भाषिक समूहातील लोकांची एकाच भाषा असल्याने त्यांना सुसंवाद साधता येतो., त्याच प्रमाणे त्यांच्या वैवाहिक संबंधाचे स्वरूप सुद्धा त्यांच्या भाषिक समूहापुरते मर्यादित असते.

**निष्कर्ष**

डॉ इरावती कर्वे यांनी भारतीय समाजाचे विश्लेषण हे मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून केले आहे. मानवी संस्कृतीचे आकलन करून घेतल्या शिवाय भारतीय समाजाचे दर्शन होऊ शकत नाही.

त्यांच्या मते भारतीय संस्कृती ही खंडित नाही. मधले दुवे जरी झिजले असले तरी परंपरा टिकून आहे. परंतु हीच भारतीय संस्कृती अनेकविध संस्कृतीच्यासंघर्षाने आणि साहचर्याने बनली आहे. त्यामुळेच विविध प्रादेशिक संस्कृतींचीपरंपरा 'भारतीय संस्कृती'त परावर्तीत झालेली दिसते.

महाराष्ट्रातील बऱ्याच जाती-जमातींचे मूळ हे उत्तर भारतीय असावे, परंतु कुटुंबपद्धतीवर दाक्षिणीय प्रभाव दिसतो. म्हणजेच उत्तर-दक्षिण याचा संगम महाराष्ट्रात दिसतो.

इरावती कर्वे यांच्या मते भाषिक समूहाच्या सांस्कृतिक एकजिनसीपणा, वैशिष्ट्यपूर्णता आणि नातेसंबंधाचे स्वरूप आढळून येते. अश्या भाषिक समूहातील लोकांची एकाच भाषा असल्याने त्यांना सुसंवाद साधता येतो. त्याच प्रमाणे त्यांच्या वैवाहिक संबंधाचे स्वरूप सुद्धा त्यांच्या भाषिक समूहापुरते मर्यादित असते. ***कर्वे यांच्या वंश या संदर्भातल्या*** सर्व संकल्पना सध्या जरी मान्य होण्याजोग्या नसल्या तरी त्याकाळात त्यांनी केलेले संशोधन हे आजही अत्यंत महत्वाचे आहे.

संदर्भ

Cosier Lewis A (1966) : Masters of Sociological Thought'- ideas in historical and social context, second edition : Rawat Publications Jaiput-1996.

Davis, Kingsley: Human Society, Surjeet Publication, New Delhi, 1982.

Ginsberg, Morris: Sociology, Surjeet Publication New Delhi, 1986

Ghurye, G.S. cast and race in India, popular prakashan, Bombay.1969

Ghurye, G.S. cast, class and occupation in India, popular prakashan, Bombay.1961

Kapadiya, K.M. Hindu Kinship, popular book depo, Bombay.1947

Karve, Iravati. Kinship organization in India, Asia publishing house, Bombay.1968

Karve, Iravati. Hindu society an Interpretation, Deccan College of pune.1061

Ritzer George: 'Classical Sociological Theory', second edition, The McGraw - Hill companies, Inc. New York-1996.

डॉ. आगलावे, प्रदीप. मुलभूत समाजशास्त्रीय विचार: पाश्चात्य आणि भारतीय साईनाथ प्रकाशन, नागपूर. २०१९

डॉ. अग्रवाल, जी. के. भारतीय सामाजिक विचारक, (SBPD) पब्लिशिंग हाउस, २०२१

डॉ. अग्रवाल, जी. के. समाजशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन, २०१९

डॉ. कर्वे, इरावती. बंधुत्व संघठन,

डॉ. कर्वे, इरावती. मराठी लोकांची संस्कृती, रा. ज. देशमुख आणि कंपनी, पुणे. १९६२

डॉ. कर्वे, इरावती. हिंदूची समाज रचना, मौंज प्रकाशन, पुणे. १९६४

गुप्ता एस. एल. डॉ शर्मा, डी. .एल. भारतीय समाज, साहित्य भवन पब्लिकेशन, २०२०.

डॉ. घुर्ये, जी. एस. भारत मे जाती एवं प्रजातीया, सेज पब्लिकेशन, २०१७.

वैद्य, नी.स. समाजशास्त्र,विद्या प्रकाशन, नागपूर २००३.

गुप्ता एस. एल. डॉ शर्मा, डी. .एल. भारतीय समाज, साहित्य भवन पब्लिकेशन, २०२०.

https://mr.wikipedia.org

http://mspmonline.com

https://marathivishwakosh.org

http://www.unishivaji.ac.in

https://www.sbistudy.com

# राYट्रनिर्माणामध्ये महाराYट्रातील समाजसुधारकांच्या योगदानाचे समाजशास्त्रीय अध्ययन

**. डॉ. अमरिश एस. गावंडे**
प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
श्री. धाबेकर कला महाविद्यालय खडकी, अकोला

**प्रस्तावना :**

भारतीय समाजाला वर्तमान स्वरूप प्राप्त होण्याकरिता अनेक घटकांचे योगदान आहे. स्वतंत्र्यपूर्व आणि स्वतंत्र्योत्तर काळात भारतात झालेल्या विविध चळवळी आणि सामाजिक कार्यामुळे मोठया प्रमाणात परिवर्तन घडून आलेले दिसून येते. भारतीय समाजापुढे ब्रिटीशांच्या जुलमी सत्तेचा प्रतिकार करण्याचे व त्यासोबतच समाजात असणाऱ्या विविध अनिष्ठ चालीरितींचा सामना करण्याचे आव्हान तत्कालीन परिस्थितीत होते. संपूर्ण देश अनेक वर्षापर्यत या दुहेऱ्या संकटात होता. देशातील विविध भागात अनेक समाजसुधारकांनी समाजातील समस्या कमी करण्यासाठी योगदान दिले व आपले सर्वोतोपरी प्रयत्न केले. आज भारतीय समाजाला प्राप्त सुंदर आकार भारतातील थोर समाजसुधारकांच्या प्रयत्ननांचा परिपाक आहे. आज संपूर्ण जगात जो भारताचा डंका वाजत आहे आणि भारताकडे तिसरी महासत्ता म्हणून पाहील्या जाते त्याची पायामुळे या समाजसुधारकांच्या कार्यात रूजलेली असल्याचे आपणास दिसून येते. भारतीय समाजाला निर्सगाची देणगी तर मिळाली परंतु त्याच बरोबर जातीप्रथा, महिला निर्बध, उद्योगांचा अभाव, आधुनिक ज्ञानाचा अभाव असे शापही या समाजाला मिळाले. त्याचा परिणाम अनेक बाबतीत जगाच्या समोर असणारा देश आज जगाच्या मागे पडलेला दिसून येतो.

ब्रिटीशांच्या अगमनापासून दोन भिन्न संस्कृतिचा परस्परांशी संपर्क आला त्यातून त्यांचा परस्परांवर परिणाम झालेला दिसून येतो इंग्रज भारततातील लोकांना मागासलेले व रानटी समजत होते. जुन्या रूढी, चालीरिती, कर्मकांड यांच्या जाळयात गुरफटलेल्या भारतीय संस्कृतीमध्ये आपल्या धर्माच्या विचारांचा प्रसार व्हावा या उद्देशाने मिशनरी बांधवांनी जोमाने धर्मप्रसाराचे कार्य केले आणि त्याचा परिणाम त्यांना थोडयाफार प्रमाणात अनुयायी मिळाले परंतु बहुतांश भारतीयांना धर्मत्याग म्हणजे प्राणत्याग करणे असे वाटत होते. इंग्रजांनी केलेला राजकिय हल्ला व मिशनऱ्यांनी केलेल्या धार्मिक हल्याचा परिणाम हिंदू समाजातील विचारी पुरूषांच्या मनावर होत गेला आणि पाश्चिमात्य संस्कृती ही नवीन विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या आधारावर उभी असलेली संस्कृती होती. त्यामुळे पाश्चिमात्यांचे समाजजीवन, अर्थव्यवस्था आणि राजकीय संस्था हि नवा युगाची साक्ष देणारी असल्याचे या विचारवंतांच्या लक्षात आले. भारतीयांनी पाश्चिमात्यांच्या प्रभावाला विरोध जरी केला असला तरी काही घटकांच्या बाबतीत पाश्चिमात्य विचारांशी समन्वय साधण्याची प्रक्रीया सुरू केली. या प्रक्रियेला प्रबोधन संबोधल्यास जावू शकते आणि परिवर्तनीय व विकसित विचारांना स्विकारून त्याचा प्रसार करणाऱ्या व्यक्तिला समाजसुधारक संबोधल्या जाते.

भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी झाल्या आणि यामधून समाजसुधारणेची व्रिव तळमळ असणाऱ्या समाजसुधारकांची फळीच निर्माण झाली. भारतामध्ये समाजसुधारची प्रक्रिया सुरू झाली त्याचे जनक म्हणून राजा राममोहन रॉय यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी सती प्रथा आणि बालिका बळी या प्रथाविरूद्ध लढा उभारला व ब्राम्हो समाजाची स्थापना करून धर्म सुधारणा व पाश्चिमात्य शिक्षणाचा आग्रह धरला. त्यानंतर दयानंद सरस्वती, स्वामी रामकृ ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांनी सर्वधर्मसमभाव आणि मानवतावादी उच्च विचारांचा प्रसार करून अज्ञान, अंधश्रद्धा यांच्या गाढ निद्रेत असणाऱ्या भारतीय

समाजाला जागे करण्याचे कार्य केले. देशाच्या विविध भागात होत असलेल्या सुधारणावादी चळवळींना व्रिव गती देण्याचे कार्य महाराYद्वाने केले आणि या समाजसुधारणा चळवळीचे आद्य प्रर्वतक म्हणून महात्मा फुलेंचा उल्लेख केला जातो. याचा वारसा आजपर्यंत महाराYद्र जपत असल्याचे अध्ययनातून दिसून येते.

**अध्ययन पद्धती :**

सामाजिक घटनांचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करून कार्यकारण संबंध प्रस्थापीत करणे आणि ज्ञान वाढविणे यास सामाजिक संशोधन असे म्हणतात. सामाजिक शास्त्रामध्ये संशोधन करित असतांना तथ्य संकलन आणि तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करण्यास महत्व आहे. या संदर्भात पॉलिंग यंग असे म्हणतात, की 'क्रमबद्धता, अर्तंगत संबंध, सामान्य स्पि टकरणे आणि नैर्सगिक नियम यांच्या द्वारे नविन तथ्य शोधून किंवा जुन्या ज्ञानाची पडताळणी घेण्याची सामाजिक संशोधन हि एक पद्धतशीर प्रक्रिया आहे.' प्रस्तूत शोध निबंधामध्ये रा ट्रनिर्माणामध्ये महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या योगदानाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात आले आहे. अध्ययन करित असतांना संशोधन पद्धतीचा यथोजित वापर करण्यात आला आहे. प्रस्तूत शोध निबंधामध्ये तथ्य संकलनासाठी नमुना निवड करतांना संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील यादृच्छिक पद्धतीचा वापर करण्यात आला असून लॉटरी पद्धतीने नमुना निवड करण्यात आली आहे. संशोधनामध्ये वस्तुनि ठता निर्माण करण्यासाठी काही अंशी गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीचा आधार सुद्धा घेण्यात आला आहे.

सामाजिक शास्त्रामध्ये अध्ययन करीत असतांना तथ्य संकलन अत्यंत महत्वाचे आहे. तथ्य संकल नही वैज्ञानिक पद्धतीची पहीली आणि महत्वाची अट आहे. कारण अभ्यास विषयासंबंधीचे निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ व सर्वमान्य होण्यासाठी तथ्यांचा आधार घ्यावाच लागतो. सामाजिक संशोधनामध्ये अनुभवजन्य तथ्य संकलित करावी लागतात. त्यांच्याच आधारावर निष्कर्षाचे प्रतिपादन केले जाते. तांत्रीक साधनांच्या माध्यमातून संकलीत तथ्यांच्या विश्वसनीयतेवर संशोधनाचे यशापयश अवलंबून असते. तथ्य संकलन हे संशोधनामध्ये अत्यंत महत्वाचे मानले जाते. या संदर्भात प्रसिद्ध विचारवंत गुड आणि हॅट असे स्पष्ट करतात, की 'तथ्य एक अनुभव सिद्ध सत्यापनीय निरीक्षण आहे.' प्रस्तूत शोध निबंधामध्ये प्राथमिक तथ्यसंकलन पद्धतीमधील मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात आले आहे. तसेच दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा सुद्धा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला आहे. दुय्यम तथ्य संकलन पद्धतीमधील प्रकाशित आणि अप्रकाशित कागदपत्र, अहवाल लेख, पुस्तके, वर्तमान पत्रे, साख्याकिय माहिती, जणगणना अहवाल इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :**

कोणत्याही शोध कार्यला योग्य दिशेने पूर्णत्वास नेण्याकरीता शोध कार्याचा उद्देश निश्चित असणे आवश्यक आहे. प्रस्तूत शोध निबंधाचे उद्देश पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) राष्ट्रनिर्माणामध्ये असणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे.

२) भारतातील राष्ट्रनिर्माणामधील विविध पैलुंचे अध्ययन करणे.

३) भारतातील राष्ट्रनिर्माणाकरिता विविध समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचे अध्ययन करणे.

४) भारतातील राष्ट्रनिर्माणामधील समाजसुधारकांच्या प्रभावाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

**राष्ट्रनिर्माणामध्ये महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या योगदान :**

देशाला नविदिशा देण्याकरिता आणि समाजात सामाजिक परिवर्तन घडून आणण्याच्या कार्यमध्ये पुरोगामी महाराष्ट्राचा अग्रक्रम आहे. महाराष्ट्राने सदैव आपल्या परिवर्तनीय विचारांच्या आधारावर राष्ट्रनिर्माणामध्ये भरीव योगदान दिले असल्याचे स्पष्ट आहे. राष्ट्रनिर्माणाकरिता राबविण्यात आलेल्या व येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना आणि उपक्रमांची सुरवात महाराष्ट्रातून झाली असल्याचे दिसून येते. महारा  ट्रातील विविध समाज सुधारकांचे राष्ट्रनिर्माणामधील योगदान अतिशय महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. महारा  ट्रातील विविध समाज सुधारकांच्या राष्ट्रनिर्माणामधील योगदानाचे अध्ययन केल्यास लक्षात येते की, राष्ट्रनिर्माणाकरिता आवश्यक विचारांचा प्रसार करण्यात आणि विकसीत विचारांच्या आधारावर योजनाराबण्यिात महाराष्ट्र अग्रधी आहे. म्हणूनच राष्ट्रनिर्माणामध्ये महाराष्ट्रातील विविध समाज सुधारकांचे योगदान अभ्यासने आवश्यक आहे. प्रस्तूत शोध निबंधामध्ये महाराष्ट्रातील विविध समाज सुधारकांचे राष्ट्रनिर्माणामधील योगदानाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्याचा प्रयत्न आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, सावित्रीबाई फुले
सयाजीराव गायकवाड, गापाळकृष्ण गोखले,छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी तत्कालीन परिस्थितीत केलेले कार्य आणि व्यक्त केलेल्या विचारांचा प्रभाव संपूर्ण देशात झालेला पहावयास मिळतो. आज भारतात सुरू असलेल्या स्वच्छता अभियानाची पायामुळे संत गाडगे बाबांनी खूप आधी आपल्या कार्यातून आणि विचारातन रोवली असल्याचे दिसून येते. अशा विविध समाजोपयोगी आणि विकसीत विचारांची देण महाराष्ट्राने देशाली आहे.

**१) महात्मा ज्योतिबा फुले :**

समाजसुधारणा चळवळीचे आद्य प्रर्वतक म्हणून महात्मा फुलेंचा उल्लेख केला जातो. महात्मा फुलेंच्या रूपाने महाराष्ट्रात एक महान समाजसुधारक उदयास आला. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मनावर थॉमस पेन यांच्या 'राईट्स ऑफ मॅन' या ग्रंथाचा प्रभाव झाला. त्यामुळेच त्यांना स्वतंत्र्य समता आणि इतर मानवी हक्काची जाणीव झाली. स्त्री शिक्षणाचा प्रसार, अस्पृश्यता, गुलामगिरी नष्ट करण्यासाठी तसेच रूढी, प्रथा, परंपरा,अंधश्रद्धा दुर करण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने जातिभेदाविरूद्ध लढा दिला. तत्कालीन परिस्थितीत भारतीय समाजात जातीप्रथेचा अतिरेक, स्त्रियांवरील निर्बंध आणि अंधश्रद्धा व अनिष्ठ प्रथा, परंपरा, चालीरितींचे पेव फुटले होते. संपूर्ण समाज ब्रिटीश राजवट व सामाजिक समस्यांनी ग्रस्त होता. शेकडो वर्षाची मानसिक गुलामगिरी आणि ब्रिटीशांची राजकीय गुलामगिरी याच्या विरोधात उभे राहण्याची हिंम्मत कोणाची नव्हती अशा परिस्थीत महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपले दंड थोपाटले येथूनच राष्ट्रनिर्माणाचे कार्य सुरू झाले. म्हणून राष्ट्रनिर्माणामध्ये जेव्हा समाजसुधारकांच्या योगदानाचे अध्ययन केल्या जाते तेव्हा महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचे आणि योगदानाचे अध्ययन अग्रणी असते. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यातून राष्ट्रनिर्माणाकरिता संपूर्ण देशाला चालना मिळाली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रीयांच्या उद्धाराकरिता स्त्री शिक्षणाचे व स्त्रियांच्या सर्वागिण विकासाचे कार्य केले. महात्मा ज्योतिबा फुले केवळ समाजाच्या एकाच घटकाचा विचार केला नाही तर समाजाच्या सर्वागिण विकासाकरिता कार्य केले. महात्मा

ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू करून तत्कालीन परिस्थितीत अद्वितीय प्रयत्न केला. महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाज सुधारणा विषयक कार्य अतिशय प्रभावी होते. शुद्रअतिशुद्राचे शिक्षण, स्त्रीयांचे स्वतंत्र्य, अस्पृश्यता निवारण, चार्तुवर्ण्याचे उच्चाटन, शेतकरी व कामगार यांच्या दु:खाचे परिमार्जन, सावकारशाहीचे निर्दालन, अन्याय, अत्याचार याचे दुरीकरण करण्याकरिता महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपली पुर्ण हयात खर्ची घातली.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी दृष्ट परंपरेच्या पाशामध्ये गुरफटलेल्या समाजाला जुलमी रूढीच्या भक्षस्थानी पडलेल्या जनतेला स्वोद्वाराचा मार्ग दाखवून दिला. प्रौढ विवाह, विधवाविवाह यासारख्या समाजोपयोगी नविन प्रथा सुरू केल्या. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, कारागीरांची संघटना या माध्यमातून त्यांनी समाजातील जनतेला जीवनाचे नवे मार्ग दाखविले. महात्मा ज्योतिबा फुले हे बुद्धिवादाचे कटटर पुरस्कर्ते होते त्यांनी समाजात अस्तित्वात असणाऱ्या परंपरा, जन्म—पूर्नजन्म, मोक्ष, दान, नैवेद्य, पाप—पुण्य, कर्मकांड, पुजाअर्चा याचा कठोरपणे विरोध केला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी शेतकऱ्यांच्या हिताकरिता सातत्याने प्रयत्न केले त्यांच्या मतानुसार देश शेतकऱ्यांचा आहे आणि म्हणून शेतकरी जगला पाहीजे तो विकसीत झाला पाहीजे. यासाठी १८५५ मधील जुन्नर मधील शेतकऱ्यांचा लढा असो किंवा १८९० मधील कॉंग्रेसचे मुंबई मधील अधिवेशन असो हा थोर समाजसुधारक अग्रणी उभा राहून भांडत राहीला. रा  द्रनिर्माणमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेले कार्य संपूर्ण देशाला आजही प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत यात काही शंकाच नाही. म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांचे राष्ट्रनिर्माणाचे कार्य महत्वपूर्ण असल्याचे आपणास स्पष्ट होते.

**२) छत्रपती शाहू महाराज :**

राष्ट्रनिर्माणमध्ये ज्या समाजसुधारकांचे योगदान वाखऱ्याजोगे आहे त्यामध्ये छत्रपती शाहू महाराज यांचा उल्लेख आर्वजून केला जातो. राज घराण्यात जन्म, एश्वर्य संपन्न आयु  य असतांनाही या महामानवाने आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या हिताकरिता व प्रगतीकरिता अर्पण केले. सामाजिक सुधारणा शिक्षणाशिवाय होवू शकत नाहीत याची जाणीव शाहू महाराजांना होती. त्तकालीन परिस्थितीमध्ये शिक्षण हे केवळ राजघराणी, ब्राम्हण आणि सावकारांपुरते मर्यादित होते. शिक्षण क्षेत्रात मोठया प्रमाणात जातीप्रथेचे पालन करण्यात येत असे छत्रपती शाहू महाराज वंचित बहुजनांच्या आयुष्यात ज्ञानाची ज्योत प्रज्वलीत करण्याचे धोरण आखून शिक्षणापासून वंचित समाजापर्यंत शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात जे गाव तेथे शाळा धोरण स्विकारले त्यासंबंधी विचार १९१३ छत्रपती शाहू महाराज यांनी व्यक्त केले. छत्रपती शाहू महाराजांचा दूरदृष्टिपणा राष्ट्रनिर्माणमधील प्रभावी विचार असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रतील अशाच अनेक समाजसुधारकांनी आपल्या कार्यातून आणि विचारातून राष्ट्रनिर्माणामध्ये भरीव योगदान दिले असल्याचे दिसून येते. वर्तमान परिस्थितीत शिक्षकांना मिळणाऱ्या पगाराची संकल्पना छत्रपती शाहू महाराजांनी १९व्या शतकाच्या सुरवातील मांडली असल्याचे दिसून येते. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना फी माफीची घोषणा करणारे छत्रपती शाहू महाराज पहिले संस्थानीक होते. शिक्षकांच्या भरतीसाठी परिक्षा, महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या स्त्रीयांना फी माफीची सवलत छत्रपती शाहू महाराजांनी सुरू केली. छत्रपती शाहू महाराज विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची स्थापनाकेली म्हणून त्यांना वसतीगृहाचे जनक मानल्या जाते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात प्रशासनाचे संपूर्ण अधिकार हे

ब्राम्हणांच्या हाती होते. परंतु शाहु महाराजांचा दृष्टिकोन सर्वागिण असल्यामुळे त्यांनी १९०२ मध्ये प्रशासनातील ५० टक्के जागांवर मागासवर्गीयांना नोकरी देण्याचे जाहीर केले. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर मध्ये अस्पृश्य उमेदवारास सर्व प्रथम महापौर केले. छत्रपती शाहू महाराजांनी महार वतन पद्धती बंद केली त्यामुळे ब्राम्हण त्यांना क्षत्रीय राजा न मानता शुद्र राजा मानत होते. छत्रपती शाहू महाराज समाजाच्या सर्वागिण विकासाच्या विचाराचे होते त्यांनी केवळ शिक्षणाचा एक मार्गच प्रशस्त केला नाही तर धार्मिक कर्मकांड, अनिष्ठ प्रथा परंपरा, शेतीची प्रगती व बहुजनांच्या उद्वारासाठी सर्वागिण व सर्वस्वी प्रयत्न केले. छत्रपती शाहू महाराजांचे शास्त्रीय अध्ययन केल्यास दिसून येते की, शासन आणि प्रशासन आज राष्ट्राच्या निर्माणासाठी ज्या योजना किंवा उपक्रम राबवित आहे त्यांची सुरवात छत्रपती शाहू महाराजांनी तेव्हा केली असल्याचे दिसून येते. म्हणून छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांना व कार्याला राष्ट्रनिर्माणामध्ये अत्यंत महत्व असल्याचे स्पष्ट होते.

**३) संत गाडगे महाराज :**

संत गाडगे महाराज यांनी समाजातील शिक्षणाचा अभाव कमालीचे अज्ञान अनिष्ट चालीरिती व अंधश्रद्धा पाहून निरपेक्ष लोकसेवेचे व लोकशिक्षणाचे व्रत स्वीकारले. अंगावर फाटके कपडे व हातात गोधळी अशी वेशभूषा स्वीकारले असल्याने लोक त्यांना गाडगे बाबा म्हणत आणि सर्वांना ते याच नावाने परिचीत आहेत. भजनाची आवड असल्याने त्यांना अभंग पाठ होते. संत गाडगे महाराज यांनी समाजसूधारणा आणि लोकशिक्षणासाठी किर्तनाचा मार्ग निवडला आपल्या अर्थपूर्ण किर्तनातून सर्वसामान्यांना समजणारी भाषा वापरून अतिशय प्रभावी जनजागृती करत. आज संपूर्ण देशात राबविण्यात येत असलेले स्वच्छता अभियानाची सुरवात संत गाडगे महाराज यांनी केली. म्हणूनच राष्ट्रनिर्माणामध्ये संत गाडगे महाराज यांच्या योगदानास अतिशय महत्व आहे. जत्रा में पथरा बिठाया, तिरथ बनाया पाणी, कैसी भाई दुनिया पैसे की धुलधानी, पैसे की धुलधानी, नवसा साहाय्यासी पुत्र होती तर मग का करावे लगे पती अशा विविध विचारातून समाजात जनजागृती करण्याचे कार्य संत गाडगे महाराज यांनी केले. रा द्राच्या विकासाच्या अनुशंगाने ज्या विविध योजना आणि उपक्रम आज राबविले जातात त्याचे महत्व संत गाडगे महाराज यांनी तेव्हाच सांगितले. भारताचा विकास हा अनेक लोकांच्या विचारांचा आणि कार्याचा परिणाम आहे आणि यात महाराष्ट्र सर्वात पुढे राहीला असल्याचे दिसून येते. गाडगे बाबांनी मनुष्य जीवनाचा विचार करतांना माणसाच्या सुख–दु:खाचा, हित– अहिताचा, समाज रक्षणाचा विचार केला आहे. यासाठी बाबांनी निरंतर प्रवास केला व त्यातून खालचा कष्टकरी समाज त्यांच्या चांगलाच माहीतीचा झाला होता. ज्यांना संस्काराचा गंध नाही, शिक्षणाची ओळख नाही, सावकारशाहीहच्या कचाटयात सापडून त्यांची होत असलेली पिळवणूक या साऱ्या गोष्टींचा अभ्यास करून कोणत्याही गांष्टीची भीडभाड नन ठेवता किर्तनातून शाब्दीक भाडीमार केला आहे. आपल्या किर्तनातून श्रोत्यांचे मनोरंजन व्हावे म्हणून बाबा किर्तन करत नव्हते तर समाजाच्या दु:खावर ईलाज करावयाचा म्हणून किर्तन करित असत. गाडगे बाबांचे समकालीन असणारे महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील हे बाबांच्या अवती भोवती होते त्यांना स्वतंत्र्याचा प्रश्न सोडवयाचा होता. गाडगे बाबांनी स्वतंत्र्याच्या लढयात प्रत्यक्ष सहभाग घेतला नाही परंतु आपल्या किर्तनाच्या माध्यमातून गावागावात स्वतंत्र्याचे महत्व सागतांना पोषक वातावरणाची निर्मिती केली. देशाचे वैभव ज्यांच्या हाती येणार आहे त्यांनी अडाणी, अंधश्रद्धाळू राहून चालणार नाही.

गाडगे बाबांचा दशसूत्री कार्यक्रम आजही समाजाच्या सर्वागिण विकासाचे प्रभावी मापदंड असल्याचे दिसून येते. राष्ट्राचा विकास हा देशातील गोर गरीब आणि पिडीतांच्या विकासातून होईल यावर गाडगे बाबा ठाम होते. गाडगे बाबांना वैज्ञानिक दृष्टिकोन होता त्याच आधारे त्यांनी आपल्या दशसूत्री कार्यक्रमातून सामाजाच्या वास्ताविक कार्याचे विचार समाजासमोर व्यक्त केले व समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ठ प्रथा परंपरांना दुर करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्राच्या निर्माणामध्ये गाडगे बाबांच्या विचारांना व कार्याला अत्याधिक महत्व आहे.

**४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

राष्ट्राच्या निर्माणामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा आणि कार्यचा सिंहाचा वाटा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या विकासाकरिता आणि समाजव्यवस्थेच्या विकासाकरिता जे योगदान दिले त्याचा लाभ देश पिढयांपिढया घेत राहील यात काही शंकाच नाही. भारतात असणारी बुरसटेलेली सामाजिक विचारधारा बदलण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. आज देशाची जी प्रगती होत आहे आणि येथील नागरिकांना सन्मानाची वागणूक मिळत आहे याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच आहे. राष्ट्रनिर्माणामध्ये भारतीय संविधान हे मैलाचा दगड ठरले ज्यातून देशातील जनतेच्या सर्वागिण विकासाचा मार्ग मोकळा झाला. हजारो वर्षापासून शोषीत,पीडीत समाजाला विकासाच्या प्रक्रियेत समाविष्ट करून राष्ट्रनिर्माण करण्याचा इंद्रधनुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उचलला आहे. अष्टपैलु व्यक्तिमत्व असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय समाजाला परिचीत आहेत. भारतीय घटनेचे शिल्पकार दलित नेते म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या सर्वागिण विकासासाठी आपले संपूर्ण जीवन कणाकणांनी झिजवले, भारतीय जीवनमान उंचाविण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्नांची पराका टा केली. कायदेमंत्री असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मांडून स्त्रीयांना कायदयाचे संरक्षण दिले. स्त्रियांना वारसा हक्काची तरतूद, वडीलांच्या मालमत्तेत त्यांना वाटा मिळण्याची तरतूद, धार्मिक विवाहाचे नोंदणी विवाहात रूपांतरण करण्याची तरतूद, स्त्रियांना पूर्नविवाह करण्याचा हक्क, कायदेशिर घटस्फोट घेण्याची तरतूद यासर्व गोष्टींचा अभ्यास केला तर लक्षात येते की, राष्ट्राचे निर्माण करतांना आवश्यक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती प्रभावीपणे मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना सामाजिक, राजकिय, धार्मिक व आर्थिक स्वावलंबी बनवून खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माणाचे कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत:ला संपूर्ण आयुष्य अस्पृश्योद्धारक कार्यात वाहून घेतले. हिंदू समाज केवळ विचारांनी बदलणार नाही तर त्यात प्रत्यक्ष बदल घडून आणण्यास प्रत्यक्ष कृती केली पाहीजे असे त्यांचे मत होते. अहिंसात्मक मार्गानी संघर्ष करून अस्पृश्यांची चळचळ संघटीत करण्याची गरज त्यांना वाटली म्हणून महाडच्या तळयावरील सत्याग्रह व काळाराम मंदिर प्रवेशाची चळवळ त्यांनी हाती घेतली. राष्ट्राच्या उन्नतीसाठी सर्वांना शिक्षणाची आवश्यकता असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले व वाचालानलये आणि रात्रीच्या शाळेची सुरवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्राच्या निर्माणामधील कार्याच्या केंद्रस्थानी होते. आपल्या सर्वागिण विकासाच्या दृष्टिकोनामुळे आज देशातील करोडो जनतेला विकासाच्या प्रक्रीयेत सहभागी होता येत आहे.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

भारत आज अनेक बाबतीत जगाच्या मागे असला तरी ज्या गतीने देशाने स्वतंत्र्यानंतर विकास केला त्याआधारे आज जगात भारताचा दबदबा निर्माण झालेला दिसून येतो यासार्वासाठी देशातील समाजसुधारकांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे आपणास दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजाराम मोहन राय, दयानंद सरस्वती, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद, सयाजीराव गायकवाड, गापाळकृष्ण गोखले,छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या थोर समाजसुधारकांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात समाजात असणारी मरगळ साफ करण्याचे कार्य केले. राष्ट्रनिर्माणामध्ये योगदानाचे समाजशास्त्रीय अध्ययन करतांना स्पष्ट होते की, देशाचा सूवर्ण वर्तमान हा या समाजसुधारकांच्या त्यागाचा, दृष्टिकोनाचा, वैज्ञानिक व पुरोगामी विचारांचा परिणाम आहे. राष्ट्रनिर्माणाचे नेतृत्व सदैव महाराष्ट्राने केले असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सूचि** :

१) ठोंबरे डॉ. सतिश, महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद ४३१००१

२) साळीवकर डॉ. संजय, सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळ, श्री. मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर–१०

३) सारडे अतुलकुमार, बांडे पुरूषोत्तम, राजश्री शाहू महाराज, प्रशांत पब्लिकेशन् प्रताप नगर, जळगाव,४२५००१

४) कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड पब्लीशर्स, नागपूर

५) आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री. साईनाथ प्रकाशन,धरमपेठ नागपूर – १०

६) पांडे डॉ. दया, संत गाडगेबाबांचे समाजशास्त्रीय विचार,श्री. साईनाथ प्रकाशन,धरमपेठ, नागपूर ४४००१०

७) https://hi.wikipedia.org/wiki/ समाजसुधारक

८) https://hi.wikipedia.org/wiki/भीमराव आंबेडकर

९) https://en.wikipedia.org/wiki/Jyotirao_Phule

प्रा. डॉ. अमरिष एस. गावंडे

# देशविकासात चळवळीचे योगदान

**डॉ. अनिल विजयराव देशमुख**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ
anil.deshmukh989@gmail.com
9850933171

**गोषवारा :**

कुठल्याही देशाच्या उभारणी होताना जी प्रक्रिया होते ती फार हळूहळू होत असते. जी लोक त्या देशात वास्तव्यास आहेत त्याचा विचारसरणीवर देशाचा विकास अवलंबून असतो किंवा त्या देशावर कोणाची सत्ता आहे आणि त्याची काय विचारसरणी आहे यावरही बऱ्याच प्रमाणात देशाचा विकास अवलंबून असते. प्रस्तुत पेपरमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय चळवळीचा मागोवा घेऊन काही चळवळीचे योगदान मांडले आहे आणि या चळवळीच्या देश विकासातील योगदानावर चर्चा केलेली आहे. यात शिक्षण विषयक चळवळीचे योगदान, पर्यावरण विषयक चळवळीचे योगदान, भ्रष्टाचार विरोधी चळवळीचे योगदान, सामाजिक चळवळीचे योगदान आणि इतरही चळवळीची माहिती देण्याचा प्रयत्न प्रस्तुत पेपरमध्ये केल्या गेला आहे.

**उद्देश :**

1. विकासाच्या संकल्पनेवर चर्चा करणे.
2. चळवळीचे राष्ट्रविकासातील योगदान अभ्यासणे

**विकासाची संकल्पना :**

विकास म्हटले की आपल्या सर्वांच्या समोर फक्त आर्थिक संपन्नता, आर्थिक भरभराट, डामडौल, श्रीमंतीचा झगमगाट, आलिशान सुखसोई व वैभव अशी चित्रे या संकल्पना तरळू लागतात. वास्तविक याच्या इतकी दिशाभूल करणारा दुसरा समज असू शकत नाही. निव्वळ आर्थिक विकास घेतला तरी केवळ दारिद्र्य दूर करणे म्हणजे विकास नाही. केवळ आर्थिक प्रगती म्हणजे विकास नाही. त्याही पलीकडे अधिक व्यापक व उंचीवर जाणारी अशी संकल्पना आहे. शिक्षण,आरोग्य, स्त्री-पुरुष समानता हे सर्व केरळ ने केले म्हणून ते पुढे गेले असे अर्थशास्त्रातले नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनी दाखवून दिलेले आहे.

याच्या उलट स्थिती पंजाबची आहे. आर्थिक विकास व दरडोई उत्पन्नात पंजाब खुप पुढे गेला आहे पण स्त्री पुरुष समानतेत फार मागे आहे. विकास ही आधुनिक कल्पना आहे तिचा जन्म आधुनिक युगाबरोबर झालेला आहे. विज्ञानाच्या सहाय्याने निसर्गाचे नियम शोधून त्यांचे तंत्रविज्ञानात रुपांतर करुन मानवी जीवन डोळसपणे अधिक चांगल्या स्थितीकडे जाण्याकरिताबदलता येईल ही आधुनिकतेची मूळ प्रेरणा आहे. त्यामुळे जैसे थे परिस्थितीला शरण न जाता गेल्या तीनशे चारशे वर्षामध्ये विविध समाज, व्यक्ती या आता बदल, सुधारणा, परिवर्तन आणि काहीतरी क्रांती अशी भाषा बोलू लागले आहेत. थोडक्यात आपआपल्या वास्तवाप्रमाणे व गरजेनिहाय स्वत:च्या जीवनाला सामाजिक जीवनाला व संस्थात्मक जीवनाला डोळसपणे, प्रयत्नपूर्वक हव्या त्या दिशेने घडविणे व पुढे नेणे असा विचार पुढे आला. हाच विकास नावाचा संकल्पनेचा तात्विक, नैतिक व राजकीय पाया आहे. विकास ही एक जीवनाचा सर्व अंगांना भिडणारी गोष्ट आहे. जीवनाची जेवढी म्हणून दालने आहेत उदा. धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय इ. क्षेत्राचा विकास घडवून आणता येतो. विकास ही एक ठराविक काळापुरती मर्यादित असलेली प्रक्रिया नसून ती सतत अखंडीत स्वरुपात चालणारी प्रक्रिया आहे.

**सामाजिक चळवळीचा मागोवा :**

समाजाच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये समाज जास्त स्थितीप्रीय व स्थीर स्थितीत राहत असे. त्याच्या प्राथमिक गरजांची पूर्ती निसर्गाच्या सानिध्यात होत असे. निसर्गातल्या शक्ती तसेच आपल्या समुहातील प्रबळ व्यक्ती पुढे नमते घेणे हा बहुतांश व्यक्तीचा स्वभाव होता. कालांतराने परिस्थितीत बदल होत गेला त्यासाठी विविध कारणे झाली. मुख्य म्हणजे विषमता वाढत गेली. विषम परिस्थितीबाबत काही व्यक्तींच्या मनात जाणीव जागृती झाली त्यांनी त्यांच्या जीवन कलहाचा भाग म्हणून त्या विरुध्द आवाज उठविला. इतरांचा प्रतिसाद व पाठिंबा मिळून हा आवाज व्यापक व बुलंद झाला आणि परिस्थिती परिवर्तनासाठी काही गट किंवा समुह एकत्र येऊन त्यांनी चळवळी सुरु केल्या. यातूनच जगातील प्रख्यात आंदोलने उभी राहिली व त्यातून क्रांती झाली. अशी आंदोलने सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात फार पूर्वीपासून

झालीत मात्र त्यांना राजकीय आयामही प्राप्त होणे हे अनिवार्यच होते. कारण समाजातले श्रेष्ठीजन, सरंजाम, भांडवलदार इतकेच नव्हे तर धर्म गुरु त्यांच्या हाती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या राजकीय सत्ताही होती. युरोपातील प्रोटेस्टंट चळवळ, फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांती ही मानवी समुहांना सर्व क्षेत्रात स्वातंत्र्य, समता व बंधुत्व प्राप्त करुन देण्यासाठीची झाली. अमेरिकेतील कृष्णवर्णीयांची आंदोलने ही तर कृष्णवर्णीय अध्यक्ष व्हावा यासाठी सुरुच होती शेवटी मार्टीन ल्युथर किंग यांचे स्वप्न बराक ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष निवडले गेल्यावर पूर्ण झाले. भारतातील सामाजिक विषमतेविरुध्द चालविण्यात आलेली वर्णव्यवस्थेतील अन्यायाविरुध्दची आंदोलने, युरोपातील साम्यवादी आंदोलने ही सर्व राज्यक्रांती परिवर्तनसाठी केलेली आंदोलने किंवा चळवळी होय.

**देशविकासात योगदान देणाऱ्या चळवळी :**

**शैक्षणिक चळवळ :**

बहुजन समाजामध्ये विकासाचा नवा आयाम निर्माण करण्यामागे शैक्षणिक चळवळीचे फार मोठे योगदान आहे. यामुळे शुद्र, दलित यांच्यामध्ये जागरुकता निर्माण होऊन नवीन आयाम प्राप्त झाला आहे. शिक्षणामुळे माणसामध्ये नवीन विचार निर्माण होतात, समाजातील सामाजिक विषमता दूर करण्याचे काम शिक्षण करते. सुमारे दोनशे वर्षापूर्वीच्या कालखंडाचा जर विचार केला तर ब्राम्हणोत्तर समाजाला शिक्षणाचा अधिकार नव्हता शिक्षण केवळ आणि केवळ ब्राह्मणांचा अधिकार होता. त्यावेळेस कुणी दलित किंवा बहुजनांनी शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला तर त्याचा छळ त्यावेळी करण्यात आला. शिक्षण ही केवळ एकाच वर्गाची जहागिरदारी होती. सर्वसामान्याला शिक्षण घेता येत नव्हते.

**शैक्षणिक चळवळीत महात्मा फुलेंचे कार्य :**

शैक्षणिक जागृती करण्याकरिता महात्मा फुलेंनी क्रांती केली. महात्मा फुले हे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. बहुजन समाजाने शिकून विकासाकडे वाटचाल केली पाहिजे या उद्देशाने महात्मा फुलेंनी शैक्षणिक चळवळ उभी केली आहे. भारतामध्ये इंग्रज राजवट असताना इंग्रज अधिकाऱ्यांना फुलेंनी

शिक्षणाचे महत्त्व बहुजनाकरिता पटवून सांगितले. प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करुन द्यावी व प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची मागणी शासन दरबारी रेटून धरली. महात्मा फुलेंनी बहुजनाच्या प्रगतीकरिता केवळ शिक्षणच मागितले नाही तर योग्य व प्रगत शैक्षणिक प्रणालीची सुध्दा मागणी केली तसेच केवळ शिक्षण दिल्याने समस्या सुटणार नाही तर शिक्षणाकरिता पैसे व राहण्याची व्यवस्था शिक्षणाची अभिरुची व जिज्ञासा निर्माण करण्याकरिता शिष्यवृतीची सोय करावी, वसतिगृहाची सोय करावी ही पण मागणी होती.

तत्कालीन समाज व्यवस्थेत स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. शिक्षणापासून स्त्रिया कोसो मैल दूर होत्या. समाजाचा मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक होता. स्त्री शिक्षणामध्ये जागृती व्हावी त्यांना सुध्दा शिक्षण मिळावे म्हणून महात्मा फुलेंनी 1948 मध्ये मुलींच्या शिक्षणाकरिता पहिली शाळा सुरु केली. स्त्री शिक्षणाचे महत्त्व पालकांना पटवून सांगितले. स्वत:च्या पत्नीला स्वत: शिकवून त्यांना मुलींना शिकवायला लावले.

**छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक चळवळीतील कार्य :**

मनासारखा राजा आणि राजाचे मन लाभलेला तत्वशील, समाजवादी, दीन दलितांचा कैवारी म्हणून ज्यांचा उल्लेख करावा वाटतो असे व्यक्तीमत्त्व म्हणजे राजर्षि छत्रपती शाहू महाराज होय. एका राजाने शैक्षणिक कल्याण करण्याकरिता महत्वाची भूमिका अदा केली. दीन दुबळे व अस्पृश्यांकरिता शाळेची निर्मिती आपल्या राज्यामध्ये प्रथम केली. त्यांनी सार्वत्रिक मोफत शिक्षणाचा प्रसार केला.

**शैक्षणिक चळवळ उभी करण्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका :**

शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा महामंत्र देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरे शिक्षण तज्ञ व महर्षी होते. आपले बांधव शोषीत पीडीत, दलित असल्याने शिक्षणाशिवाय उन्नती नाही हे त्यांना कळून चुकले होते. ज्या समाजात सार्वजनिक ठिकाणी वावरण्याची व सवर्णांच्या वस्तीत जाण्याची मुभा नव्हती अशा दलितांकरिता शिक्षण तर फार दूर होते म्हणून बाबासाहेबांना वाटायचे दलित समाज एकसंघ राहून

शिक्षण हे शस्त्र असावे आणि समाजातील जातीय विषमता नष्ट व्हावी आणि समानता प्रस्थापित व्हावी की ज्यामुळे बंधुता निर्माण होईल याकरिता शिक्षण काळाची गरज आहे. म्हणून दलिताच्या शिक्षणाचा उध्दार व्हावा याकरिता दलित शिक्षणाची चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभी केली.

**पर्यावरणवादी चळवळ :**

गेल्या अनेक वर्षापासून पर्यावरणाचा असमतोलाबाबत बोलल्या जाते कारण सध्या पृथ्वीवर Global Warming आहे. प्रत्येकाच्या तोंडी हे वाक्य रुढ झालेले आहे. संत तुकाराम यांनी मागील 350 वर्षापूर्वी पर्यावरणाला अनुसरुन काही उद्गार काढले होते. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' संत तुकारामांचा पर्यावरण विषयक दृष्टिकोन त्यावेळी स्पष्ट झाला होता. त्यांना वृक्षाचे महत्त्व कळले होते. वृक्षामुळे वातावरणात समतोल निर्माण होतो. औद्योगिकरण, आधुनिकीकरणामुळे व निरनिराळ्या शोधांमुळे पृथ्वीवरील पर्यावरण दुषित झाले आहेत. पर्यावरण चांगले राहावे, वातावरणामध्ये बदल होऊ नये दुषित वातावरण निर्माण होऊ नये इत्यादीकरिता अनेक लोकांनी चळवळी उभ्या केल्या त्यापैकी चिपको आंदोलन महत्त्वाचे आहे.

चिपको आंदोलनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करताना आवर्जुन सांगावेसे वाटते ते म्हणजे याची सुरुवात जंगल खात्याच्या बाबत निर्माण झालेल्या असंतोषामुळे व सरकारने अंमलात आणलेल्या प्रशासकीय धोरणामुळे झाली. देशातील उत्तराखंड या भागातून ही चळवळ सुरु झाली तसेच मेधा पाटकरांचे नर्मदा बचाव आंदोलन, गुजरात आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील नर्मदा बांधमुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी करण्यात आले होते.

मध्यप्रदेशात भोपाळला विषारी वायुच्या प्रदुषणामुळे अनेक लोक मृत झाले काहींना अपंगत्व आले. अशाच प्रकारच्या भितीमुळे दाभोळ येथील ऐन्रॉन विद्युत निर्मिती जी समुद्री मार्गाने आणण्यात येणाऱ्या गॅसच्या आधारे होणार होती तिच्या विरुध्दही आंदोलने झाली. पंढरपूर जवळ दाऊ कंपनीचा असाच एक

भोपाळ सारख्या गॅस प्रकल्पाला महाराष्ट्र सरकारने मंजुरी दिली होती. तिच्या विरुध्द वारकरी लोकांनी व पर्यावरणवाद्यांनी एकत्रितम येऊन चळवळ उभारली व तो प्रकल्प थांबविण्यात आला.

**आरक्षणासंबंधी चळवळी :**

आरक्षणा संबंधीच्या चळवळीमध्ये दोन प्रकार आढळतात. त्यातील पहिला प्रकार विविध जाती, जमाती, समुहांनी आरक्षण मिळविण्यासाठी केलेल्या चळवळी आणि दुसरा प्रकार एखाद्या जाती जमातीला आरक्षण देऊ नये यासाठी करण्यात आलेल्या चळवळी होत.

आरक्षण मिळविण्यासाठी करण्यात आलेल्या चळवळीमध्ये गेल्या 10 वर्षात राजस्थान मधील गुर्जरांचे आंदोलन सर्वात मोठी तसेच संघर्ष आणि हिंसायुक्त चळवळ म्हणावी लागेल. गेल्या निवडणूकीपूर्वी राजस्थानातील सत्तारुढ पक्षाने गुर्जर जातीला आदिवासी जमात म्हणून आरक्षण देऊ असे आश्वासन दिले होते. सत्तारुढ झाल्यावरही हे आश्वासन पूर्ण न केल्यामुळे ही चळवळ झाली.

महाराष्ट्रामध्येही आरक्षण मिळविण्यासाठी अनेक जाती जमातीच्या मागण्या सातत्याने पुढे येत आहे. विदर्भात नागपूर विभागात मोठ्या प्रमाणावर असलेल्या कोल्ही या जातीने आपण पूर्वाश्रमीचे हलबा / हलबी आहोत म्हणून हलबा आदिवासी प्रमाणेच अनुसूचित जमात म्हणून आरक्षण मिळविण्यासाठी मोठी चळवळ उभारली आहे.

तसेच महाराष्ट्रात मराठा समाज मोठ्या प्रमाणात आहे परंतु तो खुल्या प्रवर्गात आहे. कुणबी या जातीला तसेच कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी या जातींना इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गात आरक्षण प्राप्त आहे. मराठा समाजाला स्पेशल आरक्षण द्यावे अश्या मागणीसाठी मराठा समाजाने प्रचंड मोठे मुक मोर्चे महाराष्ट्रभर समाजाने काढले आहे.

**'निर्भया' वरील अत्याचाराविरुध्द चळवळ :**

सर्वसामान्यपणे कोणत्याही चळवळीसाठी आवश्यक घटकांमध्ये नेता आवश्यक असतो त्याच्या मागे त्याचे अनुयायी असतात. त्यातून चळवळ निर्माण होते व पुढे चालते परंतु अलिकडच्या काळातील ही

'निर्भया' चळवळ उत्स्फुर्त आणि विना नेतृत्व उभी राहिली हे वैशिष्ट्यपूर्ण मानावे लागेल. दिनांक 22 डिसेंबर 2012 रोजी नवी दिल्लीत केंद्र सरकाराच्या सचिवालयाच्या परिसरात 1 लाखाहून जास्त विद्यार्थी, युवक, युवतींनी केलेली ही चळवळ होय.

**भ्रष्टाचार विरोधी चळवळी :**

भारताने गेल्या 3 ते 4 दशकात वाढल्या भ्रष्टाचाराचे किळसवाणे रुप बघितले जे पाहून लोकांच्या मनामध्ये विविध क्षेत्रातील भ्रष्टाचाराबद्दल चीड निर्माण झाली होती. त्याचाच परिपाक म्हणजे भ्रष्टाचाराविरुध्द India Against Corruption या मंडळाची निर्मिती होय. याचा उद्देश भ्रष्टाचार मुक्त भारत निर्माण करण्याचा होता आणि त्यासाठी त्यांनी लोकपाल (Ombudsman) निर्माण करुन त्याला भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर आरोप ठेवून त्यांना कैद करण्याचे अधिकार देणे हा होता. त्यासाठी त्यांनी या चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्रातील राळेगण सिध्दी येथील समाजसेवक आणि समाज सुधारक श्री अण्णा हजारे यांना दिले. इंडिया अगेस्ट करप्शन या चळवळीची सुरुवात इ. स. 2006 मध्ये झाली. इ. स. 2007 ते 2010 या काळात माहितीच्या अधिकाराचा कायदा (R. T. I.) तसेच कॉमन वेल्थ गेम्स मधील भ्रष्टाचार इत्यादी सारख्या अनेक गोष्टीसाठी या संघटनेने काम केलीत. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली जनलोकपाल विधेयक संसदेने करावे यासाठी इ. स. 2011 आणि 2012 मध्ये रामलीला मैदान आाण्ि नंतर जंतर-मंतर येथे सत्याग्रह करण्यात येऊन अण्णा हजारे यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबिला आणि लाखो लोकांनी येथे रात्रंदिवस उपस्थित राहून या आंदोलनात सहभाग घेतला. त्यांच्या या आंदोलनात मध्यम वर्ग, सर्व जाती धर्मातील लोकांचा लक्षणीय पाठिंबा मिळाला आणि हे आंदोलन यशस्वी होऊन 'लोकपाल आणि लोकायुक्त कायदा 2013' हा पारीत झाला.

या कायद्याचा उद्देश सार्वजनिक कार्यालयाच्या पदावर असलेल्या व्यक्तींच्या भ्रष्टाचाराला लगाम घालणे हे असून यात काही सुरक्षित अशा तरतुदी सोडून प्रधानमंत्र्याचेही पद येते.

**निष्कर्ष :**

देशविकासात सामाजिक चळवळीचे योगदान बघताना आपल्याला चांगली आणि वाईट या दोन्ही बाबींचा विचार लक्षात घ्यावा लागेल. तसेच या लिखाणात आपण विषय मांडताना सर्वच चळवळ वेळ आणि अक्षरांची मर्यादा लक्षात घेता घेऊ शकलो नाही पण प्रमुख चळवळीचा मागोगा आपण घेतला आहे. मला असे वाटते की, काही चळवळीमुळे देश विकासात फायदा झाला /त्याचा सकारात्मक प्रभाव देशविकासात दिसून येतो. जसे भ्रष्टाचार विरोधी चळवळी, एखाद्या काळया किंवा जटील कायद्याविषयी चळवळी तर काही चळवळी पर्यावरणाच्या नावाने किंवा राजकीय हेतुने प्रेरीत चळवळीमुळे देशाचे समाजाचे नुकसान झालेले आढळते. कुठलेही आंदोलन ही वाईट गोष्ट थांबवून चांगल्या गोष्टीसाठी असते पण काही कालांतराने ती चळवळ किंवा आंदोलन जर व्यक्ती / नेता केंद्रीत झाले तर त्याचा परिणाम आपल्याला दिसून येत नाही जसे इंडिया अगेन्स करप्शन हे दिल्ली येथील जंतर-मंतर वरील मोठे आंदोलन होऊन यशस्वी झाले आणि लोकपाल आणि लोकायुक्त कायदा-2013 हा पारीत झाला. 2014 मध्ये या आंदोलनामुळे सत्ताबदल झाला. या आंदोलनात असलेले बरेच लोक सत्तेत आले पण ज्यासाठी त्यांनी हे आंदोलन केले, लोकपाल नियुक्तीसाठी तो लोकपाल काही नियुक्त झाला नाही. लोकपाल कायद्यासाठी एवढे मोठे आंदोलन पण त्याच्या नियुक्तीसाठी कुठल्याही प्रकारचे प्रयत्न केल्याचे आपल्याला दिसून येत नाही. यात ना जनता न नेता तर काही आंदोलनामुळे देशाचे फायदे झाले असे जसे माहितीच्या आधिकारासाठी झालेली आंदोलने. यामुळे सरकारची कुठलीही माहिती (काही अपवाद) सोडल्या तर आपण माहिती करुन घेऊ शकतो. त्यामुळे खुप सार्‍या गोष्टी बाहेर यायला लागल्या. बर्‍याच अंशी पारदर्शकता निर्माण झाली लोक भ्रष्टाचार करायला घाबरायला लागले.

म्हणून कुठलाही देश प्रगती करीत असेल किंवा अधोगतीला जात असेल तर त्याला महत्त्वाचे कारण आहे त्या देशात होणारी आंदोलने, चळवळी देशाची जनता कशासाठी रस्त्यावर उतरत आहे किंवा जर काही चुकीच्या गोष्टी घडत असतील तर तो देश नक्कीच अधोगतीला गेल्याशिवाय राहणार नाही म्हणून कुठल्याही देशाचा विकासात सामाजिक चळवळीचे फार मोठे योगदान आहे असे आपण म्हणू शकतो.

**संदर्भग्रंथ सूची :**

साळीवकर, संजय. सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळी.

देवगावकर, ए. जी., देवगावकर, शैलजा आणि डुमरे, जयमाला. सामाजिक चळवळी परंपरागत आणि आधुनिक.

भोंगळे, सुधीर. विकास वाटा.

# ''सावित्रीबाई फुलें यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य''

डॉ. बळीराम परशराम अवचार
(सहा. प्राध्यापक)
श्रीमती पी.डी. पाटील समाजकार्य महाविद्यालय,
खडकी, अकोला

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकास हा त्या देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीवर होतो. तसाच तो त्या देशातील मानवी साधनसामुग्रीवर देखील अवलंबून असतो. ज्या देशातील लोकसंख्या दिर्घायुषी, शिक्षीत, कार्यक्षम आणि कुशल असते त्या देशातील लोकसंख्येची गुणवत्ता व त्या देशातील विकासास देखील चालना मिळते शिक्षण हा मानवी साधनसंपत्तीच्या विकासातील अतिशय महत्वाचा घटक मानला जातो. कारण देशातील विकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे निरक्षरता होय. देशाचा विकास हा शिक्षणावर अवलंबून असतो. कारण शिक्षण ही मानवी विकासातील एक अनिवार्य प्रक्रिया आहे. देशाच्या विकासात स्त्री आणि पुरूष यांना समान महत्व आहे. स्त्री आणि पुरूष ही संसाररूपी विकासरथाची दोन चाके आहेत. परंतु भारतामध्ये स्त्रीयांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते व त्यामुळे स्त्रीया सत्ता वंचित आणि प्रतिष्ठा वंचित राहीलेल्या आहेत.

वैदिक काळामध्ये स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार होता. स्त्रीया पुरूषांच्या खादंयाला खांदा लावून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सहभागी होत असत. परंतु कालांतराने महिलांचे शोषण सुरू झाले. महिलांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादले गेले. स्त्रियांच्या कार्यक्षेत्रात बदल झाले 'चुल आणि मुल' एवढेच मर्यादित कार्यक्षेत्र स्त्रीयांच्या नशिबी आले. प्राचिन काळात शुद्र आणि स्त्रीया यांना कोणीही वाली नव्हता. सर्वच वर्गातील स्त्रियांची दयनिय अवस्था होती स्त्रियांवर धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक

आणि शैक्षणिक निर्बंध लादण्यात आले होते. स्त्रीला स्वत:च्या अस्तिवापासून वर्षानूवर्ष दूर करण्यात आले. अशा अतिशय प्रतिकुल परिस्थितीत समाजातील सर्वच स्तरांचा विरोध स्विकारून महिलांना शिक्षणाचा प्रवाहात आणण्यासाठी आपल्या प्राणाची पर्वा न करता अंगावर घाण घेवून शिक्षणांचा प्रसार करण्याचा प्रथम महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचे कार्य अतोलनिय आहे.

**सावित्रीबाई फुलेंचा जीवनपरिचय :—**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म ०३ जाने १८३१ ला महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील खंडाळा तालूक्यातील नायगांव येथे झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. सावित्रीबाईंना सिंदुजी, सखाराम आणि श्रीपती असे तीन भाऊ होते. खंडोजीचं कुटूंब मुळातच गर्भ श्रीमंत होते. पुणे येथे फुलांचा व्यापार करणारे गोविंद गोरे यांनी आपला मुलगा ज्योतिबाचे लग्न सावित्रीबाई सोबत उरकून टाकले. सावित्रीबाईचा विवाह वयाच्या अवघ्या ९ व्या व र्षीच आद्य क्रांतीकारक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांचेशी झाला १८४० झाली सप्तपदीसह ज्योतिबाच्या पावलावर पाऊल पाऊल टाकीत सावित्रीबाईंना संसार सुरू केला. ज्योतिबाचं शिक्षण सुरू होतं. तेव्हा आपल्या बायकोने शिकावं असं त्यांना वाटत होत. पण त्या काळात मुलींसाठी पुण्यात शाळाच नव्हती. मिशनऱ्यांनी त्यांच्या मुलींसाठी शाळा उघडण्याचा प्रयत्न केला. परंतु धर्ममार्तंडांनी विरोध केल्यामुळे तो प्रयत्नही असफल झाला. अखेर ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाईंना शिक्षण देण्याचा दृढ निश्चय केला. परंतु शिकवायचं कसं? घरात पती—पत्नीचा साधं बोलणं सुद्धा चोरी असायचं. मग त्यांनी मळ्यात काम करता करताच सावित्रीबाईंना शिकवण्याचा निर्णय घेतला. ज्योतीबांनी मळ्यातच मातीवर रेघोट्या पाडून सावित्रीबाईच्या शिक्षणाचा शुभारंभ केला. ज्योतीबांनी सावित्री बाईंना मळ्यात काम करताना शिकवला परंतु त्यांची परीक्षा झाली नव्हती. त्यावेळी मिसेस मिचेल पुण्यात एक नार्मल स्कूल चालवीत असत. ज्योतिबा फुले मेसेस मीचेल त्यांना भेटले आणि छबिलदास वाड्यात भरणाऱ्या स्कूलमध्ये मॅडमने सावित्रीबाईंची कसून परीक्षा घेतली आणि खुश होऊन सावित्रीबाईंना नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश दिला. सावित्रीबाईंनी दोन वर्षात शिक्षिकेचा कोर्स पूर्ण केला व त्या उत्तीर्ण झाल्या. सावित्रीबाईंनी क्रांतीसुर्य ज्योतीबा फुले यांच्या विचारांशी बांधीलकी ठेवून शेतात मातीची पाटी व काडीची लेखणी करून अक्षरे गिरवण्यास सुरूवात करून पुढे भारतातील पहिल्या महिला शिक्षिकेचा उदय झाला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**स्त्री शिक्षणाची सुरूवात :—**

दाम्पत्यांनी व्यक्तीच्या जीवनातील शिक्षणाचे महत्व लक्षात घेवून १८४८ ला समस्त भारतातील स्त्रीयांकरीता पहिली शाळा पुण्यातील भिडेवाडा येथे सुरू केली. या शाळेत सुरूवातीला फक्त ६ मुली होत्या त्यात चार ब्राम्हण, ०१ धनगर, व एक मराठा अशा होत्या. भारतीयांनी सुरू केलेली ही भारतातील मुलींची पहीली शाळा होय. कारण त्यापूर्वी स्त्रीयांना शिक्षण देण्याबाबत अनेक गैरसमजुती होत्या. 'स्त्री शिकली तर तिचे पाऊल वाकडे पडते. स्त्री शिकली तर अक्षरांच्या रूळया होवून पतीच्या ताटात पडतात. स्त्रिया शिकल्या तर ४२ पिढया नरकात जातात, धर्म बुडतो, समाजात अराजकता निर्माण होते. अशी परंपरागत व प्रतिगामी विचारसरणी असलेल्या समाजाला हाक देतांना सावित्री म्हणतात.

सरस्वतीच्या दरबारात शिक्षण घेणेस जाऊ चला
विद्यादेविस प्रसन्न करूनि वर मागू तिजला चला
अज्ञानाची दारिद्रयाची गुलामगिरीही तोडू चला।
युगायुगाचे जीवन आपले फेकून देऊ चला चला।

शिक्षणातून जीवनातील खरे खोटे निवडण्याची क्षमता आली पाहिजे शिक्षणाअभावी समाजात पसरलेल्या अंधारमय जग, गुलामगिरीची बंधने नष्ट करण्याची क्षमता आपणास शिक्षणामुळेच प्राप्त होऊ शकतो म्हणून १ जानेवारी १८४४ ला तात्याभिडे यांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा सुरू केली. ही भारतीयांनी सुरू केलेली भारतातील मुलींची पहिली शाळा होय. या शाळेत सावित्रीबाई स्वत: शिकवित असत. ही शाळा बंद पडावी म्हणून सनातनानी खूप प्रयत्न केले. ज्योतीबांना ठार

मारण्यासाठी मारेकरी पाठविण्यात आले. पण ज्योतीबा व सावित्रीच्या ध्येर्य शक्तीपुढे त्यांचे प्रयत्न असफल ठरले व शेवटी दोन्ही मारेकऱ्यांचे हृदयपरिवर्तन झाले. त्यापैकी रोडे रामोशी त्यांचा अंगरक्षक झाला तर धोंडिबा चळवळीचा आधार झाला.

**पुण्यातील सनातन्यांकडुन अवहेलना : —**

हे कार्य करीत असतांना सावित्रीबाईना अनेक प्रकारे जाता येता त्रास देण्यास सुरूवात केली. त्यांच्या अंगावर शेन, माती, चिखल फेकल्या जात होते. तसेच आपमानास्पद भाषा वापरत, निदानालस्ती करीत व अंगावर खडे मारण्यापर्यंत मजल जायची. तरी त्यांनी त्यांच्या कार्यात माघार घेतली नाही. तर ज्योतीबा प्रमाणे त्यांनी त्यांचे कार्य निष्ठेने चालु ठेवले.

प्रथमत: त्यांनी आपल्या पत्नीला शिक्षीत केले आणि पती पत्नी मिळुन समाजातील अंधार दुर करण्याकरीता निघाले. त्यावेळी त्यांच्यावर दगड, शेन, चिखल, व अपमान शब्द बोलुन अपमानीत केले पण त्या तसुभरही डगमगल्या नाही. त्यांचे काम निरंतर चालुच ठेवले त्यांनी स्त्रियांसाठी सन १८४८ तसुभरही ला पुण्यातील तात्यासाहेब भिडे यांच्या वाडयात पहीली शाळा काढली आणि स्त्रि शिक्षणाची दारे खुली करूण दिली तसेच त्यान १८८१ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत चिपळुन करांच्या वाडयात दुसरी शाळा काढली आणि शिक्षणाचा प्रवाह विस्तारी केला आणि त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणजे त्यांना ''आधुनीक स्त्रि शिक्षणाच्या जनक'' म्हणुन संबोधल्या जाते.

**विधवा पूनर्विवाह सभेची स्थापना :**

सावित्रीबाईच्या काळात स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान होते. एकदा पती निधन झाल्यानंतर आयुष्यभर वैधव्याच्या यातना सहन कराव्या लागत असे पुरूषांना जसे पूनर्विवाह करण्याची किंवा एकाहुन अधिक बायका करण्याची मुभा होती, परंतू बालविधवेला मात्र तशी मोकळीकता नव्हती. उच्चवर्णीयांनी धर्माच्या नावाखाली स्त्रियांना अनेक बंधनात गुरफटून ठेवल्या होत्या. त्यामुळे स्त्रियांना पशुपेक्षाही अत्यंत हिन व अत्यंत अमानुष जीवन कंठावे लागत असे अशा वैधव्य यातना भोगणाऱ्या वाट चुकलेल्या विधवा स्त्रियांसाठी पुनर्विवाह संस्था स्थापून सन्मानाने जीवन जगण्याचे सन्मान विधवा पूर्नविवाह संघटनेमुळे प्राप्त करून दिले. या सस्थेच्या दर पंधरा दिवसांनी बैठका होत असत या बैठकीमध्ये, हळदीकुंकू, रसपान, प्रौढ स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियाचे शिक्षण इत्यादी विषयांवर चर्चा होत असे व प्रत्येक विधवा स्त्रियांना पुनश्च वैवाहिक जीवन जगता यावे, आपल्या अंत:करणातील भावना जगापुढे मांडता येण्याइतपत त्यांच्यात आत्मशक्ती निर्माण व्हावी अशी कार्य करणा—या एकमेव युगस्त्री, राष्ट्रमाता म्हणून सावित्रीचे कार्य आजही अजरामर आहे.

**अस्पृश्यते संदर्भातील विचार :**

स्त्रि शिक्षणाप्रमाणे ज्योतीबांच्या अस्पृश्योव्दाराच्या कार्यातही सावित्रीबाईचा सहभाग होता त्यांनी म्हटले की, ''सर्व मानव ही एक ईश्वराची लेकरे आहेत'' हे जो पर्यंत आपणांस कळत नाही तो पर्यत आपणांस ईश्वरांचे खरे स्वरूप कळणार नाही. या कडे जर दुर्लक्ष करूण आम्ही श्रेष्ठ व महार—मांग निच म्हणुन स्पृश्यअस्पृश्यता मानने मुर्खपणाचे आहे. अस्पृश्यतेचा प्रत्येक व्यक्तीने धिक्कार करणे यातच प्रतेक व्यक्तीचे,समाजाचे किंवा कोणत्याही मानवी संस्कृतीचे परम कल्याण आहे. हयाच उदत्व मानवता वादी विचार सावित्रीबाई मोठेपणाचे रहस्य समजते.

सावित्रीबाईनी अस्पृश्यांना शिक्षण देण्यासाठी आवश्यकता प्रतिपादन केली होती. त्या म्हणतात अज्ञान, आधुनिकता, भ्रामक समजुती यांच्या विस्कळल्यात गुरफटलेल्या शुद्रातिशुद्रांस शिक्षणानेच जाणीव होईल. म्हणुन शिक्षण कुठेही घेण्यास टाळाटाळ करू नये.

२८ नोव्हेंबर १८९० रोजी जोतीबांचे निधन झाल्यावरही त्यांचे सत्यशोधक समाजाचे कार्य त्यांनी पुढे चालविले. या परीषदेच्या अध्यक्षा सावित्रीबाईच होत्या महात्मा फुले यांच्या नंतर त्यांची वैचारीक परंपरा खंडीत होणार नाही. हे पाहण्याचे काम सावित्रीबाईनी केले. एकोणवीसाव्या शतकात समाजातील दोन पुढील घटाकांसाठी इतके महान कार्य करणारी दुसरी स्त्रि नाही असे म्हणावे लागेल.

**बालहत्या प्रतिबंध गृह :**

सावित्रीबाईच्या काळात विधवा स्त्रियांची स्थिती अतिश अनुकंपनीय होती. या वैधव्ययातला भोगणाऱ्या ब्राम्हण विधव मायबाप होऊ त्यांना माहेर देऊ त्यांच्या बाळंतपणाची त्यांच्या बाळं आणि त्यांचीही व्यवस्था करू म्हणून सावित्रीबाईने २८ जानेवारी १८५३ ला स्वत:च्या घराशेजारी उस्मान शेख यांच्या जागेत बालह प्रतिबंध गृह सुरू केले. आणि जिकडे–तिकडे मोठमोठया जाहिर आम्ही लावल्या या जाहिरातीच्या वरच्या भागी ''काळं प टाळण्याचा उपाय''अस मोठया अक्षरात छापलं होतं या जाहिरातीम लिहिल होत. ''विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षित बाळंत व्हा. तूम्ही आपलं मुल न्यावं किंवा इथे ठेवावं हे तूम खूशीवर अवलंबून राहिल त्या मूलांची काळजी हा अनाथआ घेईल''. अशाप्रकारे सुरवातीच्या चार वर्षात अंदाजे १०० विधवांचे बाळंतपण येथे झाले. पुढे पंढरपूर येथे बालहत्या प्रतिबंधगृहाची स्थापना झाली. विधवाच्या पोटीजन्माला आलेल्या शेकडो लेकरांची राष्ट्रा होण्याचे भाग्य सावित्रीबाईंना लाभले.

**न्हावी लोकांचा संप :–**

मातृत्व शक्तीला समाजानं का नाकारलं? मातृत्व हे केव्हाही आणि कधीही आदरणीयच असलं पाहिजे पण या समाजानं अनेक मातांना विहिरीमध्ये फेकले अनेक मातांची अवहेलना केली पती निधनानंतर, स्त्रियांचे सौभाग्याचं लेणं असलेलं कुंकु पुसून टाकलं जाई गाळयातील मंगळसुत्र तोडण्यात येत असे, सौंदर्याचं प्रतिक डोक्यावरीचे केस काढन टाकण्यात येत असे अशा महाभयंकर केशवपनांच्या चाली १२ व्या शतकापासून प्रचारात आली. प्रारंभी केवळ फक्त ब्राम्हण विधवांचच केशवपन केले जात असे परंतू पुढ इतरही समाजात ही चालं पसरली विधवांच्या केशवपनाविरूध्द आपण आवाज उठविला पाहिजे केशवपन करणाऱ्या नाभिकांना एकत्रित आणायला पाहिजे त्यांचा संप घडवुन आणला पाहिजे. फुले दाम्पत्याचे म्हणने न्हाव्यांना पटले भटभिक्षुकांच्या त्या कृत्याचा निषेध म्हणून १८९० साली झालेल्या नाभिकांच्या सभेत पाचशे न्हावी हजर होते. शेवटी सावित्रीबाईच्या अथक परिश्रमाने या कार्यात यश आले. सावित्रीच्या प्रेरणेने जोतिरावांनी घडवून आणलेला हा न्हाव्यांचा संप म्हणजे भारतातील पहिला संप होय.

**निष्कर्ष :**

वरील शोधनिबंधात सावित्रीबाईंनी आजच्या आधुनिक युगात स्त्री संघर्षाशिवाय स्त्री संघटनेशिवाय जीवन जगणे म्हणजे अशक्यच त्या काळात अतिशय विपरित परिस्थीतीतही सावित्रीबाईंनी कंबर कसुन अतिशय पराक्रमी वृत्तीने सनातनी समाज कंटकाशी झंज देऊन स्त्रियांना समाजात सन्मानाचे व हक्काचे घर मिळवून देणारी सावित्रीचे कार्य व नेतृत्व गूण वाखाण्याजोगे आहे. सावित्री ही अत्यंत त्यागी, शुद्रावर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करणारी विशाल अंत:करणाची दयाळू माता, पुरूषांच्याही धैर्याला लाजविणारी स्वयंप्रकाशित व्यक्तीमत्वाची झगमगीत ज्योत होती. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य, स्त्रीसंघर्ष चळवळी, स्त्री सशक्तीकरण स्वातंर्त्य, समता, बंधूता, न्याय व सहिष्णुता या तत्वांची समाजजीवनात स्थापना करण्यासाठी त्यांचे विचार आजही उपयुक्त आहेत. यात तिळमात्र कोणत्याही समाजाला शंका राहणार नाही. हेच सावित्रीच्या जीवन व स्त्रीसंघर्षाचे प्रमुख द्योतक आहे, हे सिध्द होते त्या तत्वाचे अनुकरण करणे हे आजच्या आधुनिक समाजमनाचे अनुकरण केले पाहिजे. तेव्हाच स्त्री स्वातंर्त्य अबाधित राहिल.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय (संपादक) डॉ. सारनाथ सौदंडकर
२. मी सावित्री। सावित्रीजोतीराव फुले। मी यशोधारा (संपादक) यंशवंत मनोहर
३. सावित्रीबाई फुले : काळ आणि कर्तव्य (संपादक) डॉ. सुभाष सावरकर
४. नरके हरी (संपादक) : महात्मा फुले गौरवग्रंथ, प्रकाशक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहु चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई

५. सावित्रीबाई फले – विकिपीडिया
६. http://maharashtraties.indiatimes.com/ स्त्री शिक्षणाच्या अग्रकृत

# राष्ट्र उभारणीसाठी आपत्ती व्यवस्थापनातील विविध घटकांची भूमिका : शाश्वत पर्याय

**प्रा.डॉ. सुनिता प्रमोद चौधरी**
धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचालित,
लोकसेवक मधुकरराव चौधरी
समाजकार्य महाविद्यालय जळगांव.

- **प्रस्तावना**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आज अनेक आपत्ती आपल्या समोर येत आहे जैविक आपत्ती मानवनिर्मित आपत्ती सामाजिक वातावरणीय अशा अनेक आपत्ती "आवासुन "आपल्या पुढे उभ्या आहेत.आंतरराष्ट्रीय पातळीवर अग्रसेर असलेल्याभारतासारख्या देशाला यासारख्या आपत्तीमुळे राष्ट्र उभारणी करतांना अंनत अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

जागतिक आरोग्य संघटना WHO यांची आपत्ती विषयी ची व्याख्या मानवास आलेल्या संकटाची त्यात " कुणीही पूर्वसूचना नसणे आपत्तीमुळे होणारे विध्वंसक परिस्थिती फारच भयानक स्वरूपाची असणे व त्यानुसार होणारी वित्तहानी आणि जीवित हानी सहजासहजी भरून न येणे यास आपत्ती असे म्हणतात"

ऑक्सफर्ड शब्दकोश वरील सर्व व्याख्या " आकस्मिकपणे ओढवलेले दुर्दैवी संकट म्हणजे आपत्ती आहे" आकस्मित संकट भयानक आणि विशाल याच शब्दांच्या भोवती आपत्तीची व्याख्या स्वरूप दर्शन घडवते

आपत्ती हा शब्द ऐकताच एक भयानक चित्र डोळयासमोर उभे राहते आपत्तीमुळे होणारे आव्हान असते व ते स्वीकारावेच लागते त्यासाठी सर्वतोपरी मदत करुन सर्व सामान्यांचे जनजीवन पूर्ववत बनविण्याची जबाबदारी प्रत्येकाची असते त्यासाठी मदत कार्याचे नियोजन हवे त्यामध्ये साधनसामग्रीचा,आपत्तीग्रस्तांचे स्थलांतर, निवारा, पुनर्वसन कार्य,घर बांधणे अशी अनेक प्रकारचे कार्य अंतर्भूत असतात या मदत कार्यात सुसंगतपणा येण्यासाठी तसेच त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी मदत कार्याचे पद्धतशीर योजना आखून अंमलबजावणी करणे हे तितकेच महत्त्वाचे ठरते .

आपत्ती ही नवी संकल्पना नाही मानवी समाजाच्या काळापासून ते ज्ञात आहे मानवी समाजाच्या अनेक पिढ्यांनी विविध प्रकारच्या आपत्ती अनुभवल्या आहेत त्याचे परिणामही भोगलेले आहेत आपत्ती मधून निर्माण झालेल्या समस्या प्रारंभापासूनच भयावह आहे.अलीकडच्या काळात अनेक प्रकारच्या आपत्ती आढळून येतात आपत्तीमुळे समाजजीवन विस्कळीत होत असते.पर्यायाने राज्य व राष्ट्रीय स्तरावर त्याचे अनेक दुष्परिणाम हे घडुन येत असतात.

- **बीज संज्ञा :**

आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्र उभारणी, शासकीय व प्रशासकीय भुमिका राष्ट्रीय सेवा योजना, स्वयंसेवी संस्था व समाज कार्यकर्त्याची भूमिका .

- **उद्देश :** १)नैसर्गिक व जैविक आपत्ती जाणून घेणे.

२राष्ट्र उभारणीसाठी आपत्ती व्यवस्थापन विविध घटकांच्या भूमिकेचे अध्ययन ( करणे.

- **गृहितके :**

नैसर्गिक बदलामुळे काही जैविक आपत्ती निर्माण होवुन राष्ट्र विकासात अडथळे निर्माण होतात.

- **विषयविवेचन :**

नैसर्गिक आपत्ती ज्यामध्ये वादळे अतिवृष्टी , ढगफुटी त्सुनामी, लाटा, दुष्काळ ज्वालामुखी, दरड कोसळणे, जमीन खचणे , हिमपात, हिम वादळे, उल्कापात इ .होतात .

मानव निर्मित आपत्ती

यामध्ये विविध कारणांमुळे लागणाऱ्या आगी व औद्योगिक क्षेत्रात वायुगळती होणे, इमारती , रेल्वे , विमाने, रस्ते व यातील अपघात याखेरीज वाढलेली गुन्हेगारी व दहशतवाद व त्यामुळे होणारे बॉम्बस्फोट शिवाय अपहरण, खुन,सामूहिक हत्याकांड, पर्यावरणाच्या ऱ्हासाची ओढवलेले संकटे, तंत्रज्ञान, माहितीतंत्रज्ञान यांच्या गैरवापरामुळे येणारी आपत्ती.

जैविक आपत्ती प्रामुख्याने मानवनिर्मित आहे मानवाने केलेली तंत्रज्ञानातील प्रगती व मानवाने निसर्गाच्या कार्यात केलेला हस्तक्षेप हे जैविक आपत्तीला कारणीभूत ठरलेली दिसून येतेजनसंख्येचा विस्पोट . .असाध्य रोग इ भारतामध्ये ह्या सर्व प्रकारच्या आपत्ती येतात

- **नैसर्गिकआपत्ती:**

त्सुनामी, महापुर, भुकंप, जंगलातील वणवा, चक्रीवादळ, अवर्षण, अतिवृष्टी, साथीचे रोग, त्सुनामी समुद्राच्या तळाशी किंवा समुद्र किनाऱ्याच्या जमिनीखाली भूकंपाच्या धक्क्यामुळे लाटा निर्माण होतात त्यांना जपानी भाषेत "त्सुनामी"लाटा असे ओळखले जाते त्याचबरोबर ज्वालामुखीचे उद्रेक किंवा समुद्र तळावरील भूभाग भूरचना कोसळण्याच्या घटना सुद्धा त्सुनामी निर्माण करतात एकदा का यांची निर्मिती झाली की त्या लाटा भयानक ऊर्जेची साठवण करीत किनाऱ्याकडे धाव घेतात किनाऱ्यावर आघात करीत प्रचंड नुकसान पोहोचवितात अकल्पितपणे अचानकपणे येणाऱ्या या बंदरातील लाटांनी जनजीवन, प्राणी जीवन विस्कळीत होते आणि मानव जीवनास संकटाचा सामना करण्यास भाग पडते.

- **महापूरः**

महापूर एक आपत्ती आहे ज्यावेळी अतिवृष्टी होते त्यावेळी नद्यानाले दुथडी भरून पाणी वाहत असते -नद्यांच्या खोऱ्यातील विभागात महापूर ही सातत्याने उद्भवणारी एक विपरीत आपत्ती असते ज्यावेळी नद्यांमधून नेहमी वाहणाऱ्या पाण्यापेक्षाअधिक पाणी वाहू लागते व नद्या दुथडी वाहण्याची स्थिती निर्माण होते अशावेळी महापूर आला असे समजण्यात येते त्याचप्रमाणे अति पर्जन्यवृष्टी झाल्यास नद्या नाले ओढे इत्यादी माध्यमातून पाण्याचे प्रमाण वाजवीपेक्षा अधिक असते अशा वेळी ही आपत्ती ओढवली आहे त्यातून अधिक प्रमाणात पात्राबाहेर पाणी वाहत जाऊन लगतच्या परिसरात पसरते त्याचप्रमाणे समुद्राच्या परिसरात पुरामुळे संकट ओढवते ही महापुराची स्थिती म्हणजेच एक आपत्ती असतेआणि ती तेथील परिसर राज्य व पर्यायाने राष्ट्राला घातक म्हणुन सिध्द होते.

- **वणवा :**

जंगलातील वणवा अथवा जंगलात आग लागणे हा नैसर्गिक आपत्ती चा एक प्रकार होय ज्यामुळे जंगलातील वनवा अथवा जंगलात लागलेली आग हे नैसर्गिक बाब समजण्यात येते ज्वालाग्राही पदार्थ भेटल्यास वनवा निर्माण होतो कधी कधी झाडाची घर्षण झाल्याने झाडे पेटू लागतात त्यात अग्नी प्रलय असे संबोधण्यात येते.

- **वादळेचक्रीवादळ/ झंझावात**

वादळे अथवा चक्रीवादळे हे मानवावर नेहमी ओढवणारी आपत्ती आहे ही आपत्ती नैसर्गिकरीत्या निर्माण होत असते त्याचे काय परिणाम होतात हे आपणा सर्वांना माहितच आहे उष्मा आणि दाब हवेत निर्माण झाल्याने त्यात सातत्याने परिवर्तन घडून येते यामुळेच हवेत हालचाली मुख्यतः उभ्या आणि आडव्या दिशांना निर्माण होत असतात त्याची परिणती चक्राकार आवर्तने तयार करण्यास कारणीभूत ठरतात जमिनीवर पाण्याचा प्रभाव अधिक असल्याने अशी झंझावते वादळे समुद्रातच तयार होत असतात चक्राकार भागाच्या मध्यभागी गोलाकार भाग निर्माण होत असल्याने त्यास चक्रीवादळ असे म्हणतात याचा वेग प्रचंड असल्याने त्यास झंझावात असे संबोधले जाते.

- **अवर्षण/ कोरडा दुष्काळ:**

अवर्षण म्हणजे पाऊस न पडणे वा कमी प्रमाणात पाऊस पडणे होय लाकूड तोड व जंगल तोड झाल्याने ओसाड प्रदेश निर्माणहोतात. त्यातून हा दुष्काळ निर्माण होतो.दुष्काळाचे अनेक चटके यापुर्वी देशाने सोसलेले आहे व त्याची दाहकता अजुन ही लोकांच्या मनात पिढ्यान पिढ्या कायम आहे .

- **अतिवृष्टी /ढगफुटी :**

अतिशय कमी पावसाने सजीवसृष्टीला धोका पोहोचतो तसेच अतिवृष्टीने सजीव सृष्टी वर आपत्ती सुद्धा ओढवते अतिवृष्टीमुळे जीवित हानी प्राणहानी आणि वित्तहानी होत असते अतिवृष्टी ढगफुटी या नावानेही ओळखले जाते अति वर्षा होण्यासाठी निरनिराळी कारणे आहेत या सर्व कारणांमध्ये चक्रीय वादळ झंझावात किंवा अचानकपणे झालेला नैसर्गिक बदल हे एक प्रमुख भौगोलिक कारण आहे अतिवृष्टीमुळे पाण्याचा संचय होत असला तरी शेतीसाठी आणि मानवी जीवनासाठी ही एक आपत्ती ठरू शकते व्यवसाय धंदे ठप्प होतात आणि वाहतुकीच्या साधनांना खिळ बसते मोठ्या प्रमाणात अन्नधान्य पिके नष्ट होतात तसेच अन्नधान्य सडण्याची कुजण्याची प्रक्रिया सुरू होते अतिरिक्त जलसाठ्याने बंधारे फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही

- **साथीचे रोग :**

एखाद्या रोगाचा संसर्ग एकदम अनेक व्यक्तींना एकाच वेळी होत असतो तेव्हा अशा रोगांना साथीचे रोग किंवा संसर्गजन्य रोग असे म्हणतात जगाच्या कानाकोपऱ्यात दृष्टिक्षेप टाकल्यास असे निर्देश शासनास देते गेम साथीचा रोगाचा प्रादुर्भाव सर्वत्र होताना दिसतो जगाच्या पाठीवर विकसित देश आणि विकसनशील देश अशी वर्गवारी दिसून येते अशा देशातील काही लोकांचे राहणीमान हे खालच्या दर्जाचे असल्याचे प्रत्ययास येते तेथील सामान्य जीवनमान आणि पर्यावरण विषयक स्थिती कमालीची अनारोग्यकारक असते. नुकतीच कोविड -19 मुळे उदभवलेली परिस्थिती आपण सर्वांनाच ज्ञात आहेजगाच्या पाठीवरील जवळपास सर्वच देशांना कोरोनाची झळ . भारता सारख्या राष्ट्राला तर आर्थिक व सामाजिक दृष्ट्या अनेक .अनेक कुटूंबे उध्दवस्त झाली .बसलेली आहे

दुष्परिणाम भोगावे लागलेआहेआरोग्य यंत्रणेचा मर्यादा व त्यातुन वाढलेला मृत्युदर हा चिंतेचा विषय बनला . .नवीन राष्ट्र उभारणीच्या नवीन पर्वातील हा एक खुप महत्वाचा अडथळा आहे

- **मानवनिर्मितआपत्ती :**

मानव निर्मित आपत्ती हे मानवाच्या निष्काळजीपणामुळे येत असते मानवाच्या सामाजिक राजकीय जीवन गतिमान होत असते दैनंदिन जीवनात अनेक घडामोडी घडून येत असतात कधीकधी आपत्तीची तीव्रता पुनरावृत्ती आणि त्याचे प्रकार यामध्ये कमालीची वाढ होत असते ही वाट मानवाच्या हालचालीमुळे अधिक प्रभावी होताना दिसून येत आहे त्यामुळे मानवाच्या कृतीमुळे निर्माण होणाऱ्या आपत्ती व मानव निर्मिती आपत्ती संबोधली जाते.

- मानवनिर्मितआपत्तीचेप्रकारअग्नि आण्विक जैविक व रासायनिक आपत्ती, दंगली एलपीजी गॅस ची हंडी फुटणे, स्फोट होणे, वाहनामुळे होणारे अपघात, युद्ध, आतंकवाद इ .
- **जैविक आपत्ती** :

जैविक आपत्ती प्रामुख्याने मानव निर्मित आपत्ती आहे मानवाने केलेले तंत्रज्ञानातील प्रगती व मानव आणि निसर्गाच्या कार्य केलेले हस्तक्षेप हे जैविक आपत्तीला कारणीभूत ठरलेले दिसून येते. एव्हीयन लू, कॉलरा, डेंगू ताप, गोवर, हिवताप, मेंदूच्या वेस्टनाचा दाह, पिवळा ताप, एच आय व्ही/एड्स, क्षयरोग, जैविक युद्ध इ.

- **राष्ट्र उभारणीसाठी आपत्ती व्यवस्थापनात विविध घटकांच्या भूमिका :**
  **स्वयंसेवी संस्था व समाजकार्यकर्त्याची भूमिका.**

1. आपत्ती पूर्वीची पूर्वसूचना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य स्वयंसेवी संस्था व कार्यकर्ते करू शकतात.
2. आपत्ती काळात प्रथमोपचाराची केव्हाही गरज पडते त्यामुळे डॉक्टर नर्स यांची माहिती, स्वयंसेवकाची माहिती तसेच रक्तदात्यांची माहिती संस्थेमध्ये उपलब्ध करून देऊ शकतो
3. अपत्त ग्रस्तांसाठी लागणारी मदतवस्तुरूप ), आर्थिक, औषध आपत्तीग्रस्थान पर्यंत ( पोचविण्यास मदत करते.
4. आपद्ग्रस्तांना मानसिक आधार देण्याचे कार्य स्वयंसेवी संस्थेत द्वारा व समाज कार्यकर्ते द्वारा केले जाते.
5. शासन व जनता यांच्यातील दुवा बनून आपत्तीतून काढण्यासाठी स्वयंसेवी संस्था व समाज कार्यकर्ते मदत करू शकतात.
6. आपत्तीपासून बचाव करण्यासाठी कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे गावपातळीवर जाणीव जागृती, आपत्ती संदर्भातील माहिती देण्याचे कार्य स्वयंसेवी संस्था व कार्यकर्ते करू शकतात.कोरोना च्या काळात खुप मदत झालेली आहे.
7. आपदग्रस्तांना साठी मदत करण्याबरोबरच लहान मुले व वृद्धांची विशेष काळजी घेतात.
8. स्वयंसेवी संस्थांचे कार्यक्षेत्र आहे त्या क्षेत्रामध्ये आपत्ती पासून बचाव करण्यासाठी स्वयंसेवकाची तुकडी तयार होऊ शकते त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन गरज पडेल तेव्हा ते तत्परतेने कार्य करू शकतील याप्रमाणे त्यांना तयार करू शकतो.

9. आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात स्वयंसेवी संस्था यशस्वी ऑपरेशन साठी शाश्वतता लवचिकता आणि प्रेरणा हे कीवर्ड आहेत त्यामुळे प्रभावी समन्वय आणि गरजूना ते वेळेवर मदत ते करीत असतात.

- **राष्ट्रीयसेवायोजनाचे योगदान**

1. मानसिक आधार देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आपत्ती काळात करत असतात.
2. पूरग्रस्त किंवा इतर आपत्ती च्या वेळेला त्यांना मदत करण्याचे कार्य रासेयोगचे स्वयंसेवक करीत असतात त्यामुळे त्या ठिकाणी विस्कटलेली घडी पूर्वपदावर आणता येते.
3. आपत्ती घडलेल्या घटनेच्या ठिकाणी पाहिजे ती मदत करण्याचे कार्य करीत असतात.
4. जागृती करण्याचे कार्य ते करीत असतात.
5. आपत्तीग्रस्त साठी लागणारी मदत त्या आपत्तीग्रस्ता पर्यंत पोहोचवण्याची मदत करतात.
6. वृद्धांना महिलांना मुलांना सुरक्षितस्थळी पोहोचविण्याचे कार्य करीत असतात.
7. शासन, प्रशासन यांनी आपत्ती वेळी केलेल्या विविध आव्हानांना प्रतिसाद देता प्रशासनास भरीव सहकार्य केले जाते.
8. आपत्ती प्रतिबंधासाठी तसेच आपत्तीच्या वेळी सजग राहण्यासाठी आपत्ती पूर्व व आपत्ती नंतर व्यवस्थापनाच्या उपाय योजना खात्रीपूर्वक तत्परतेनं प्रभावीपणे घेण्यात यावा म्हणून सैनिकी प्राधिकरण अथवा मदतकर्ताशी समन्वय साधून सेवा पुरविल्या जातात.
9. रा. से. यो. स्वयंसेवकाच्या माध्यमातून मदत शिबिराची उभारणी करून मदत पुरविली जाते.
10. मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना मदत करणे आरोग्य सुविधा अन्नपदार्थ पुरविणे तसेच आपत्ती स्थळावर योग्य ते सहकार्य पुरविण्यामध्ये स्वयंसेवक मदत करतात.
11. ज्या ठिकाणी आपत्ती उद्भवली असेल त्या ठिकाणावर साफसफाई करणे पाण्याच्या सोयी उपलब्ध करून देणे सांडपाणी निर्मूलन करणे जंतुनाशक फवारणी संबंधित यंत्रणा च्या माध्यमातून करणे.

- **शासनवप्रशासनाचीजबाबदारी :**

आपत्ती व्यवस्थापन अधिनियमानुसार पुढील प्रमाणे जबाबदारी

1. केंद्र शासन राष्ट्रीय व्यवस्थापन समितीची राष्ट्रीय प्राधिकरणास मदत करण्यासाठी स्थापन केलेली आहे.
2. आपत्ती व्यवस्थापन समन्वय साधून अवलोकन करणे.
3. अधिकारी कर्मचारी व स्वयंसेवक यांना विशेष प्रशिक्षण शिबिरे भरविणे.
4. शासनास आपत्ती व्यवस्थापनासाठी शिक्षित करून त्यांच्यामध्ये सतर्कता वाढविणे.
5. शासकीय पातळीवर पूर्वतयारीचा आढावा घेऊन आवश्यकता भासल्यास त्यात सुधारणा करणे.
6. गरजेनुसार आवश्यक वाटणारी कार्य आपत्ती प्राधिकरणास करणे.
7. आपत्ती अथवा आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी आपत्ती प्रतिबंधात्मक कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

- **माडीयाची भुमिका :**

आपली व्यस्थापनात आणि राष्ट्र उभारणीत मीडीयाची भुमिका ही अत्यंत महत्वाची आहेमाध्यमे हा तर . आपत्ती पुर्व परिस्थिती आणि आपत्तीत्तोर परिस्थिती ह्या दोन्ही प्रकारांमध्ये .लोकशाहीचा स्तंभ मानला जातो

मीडीयाची भुमिका ही खुप महत्वाची आहेआपत्ती पूर्व स्थितीचा अंदाज हा जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी हा . प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मीडीयाव्दारे जनजागृती केल्यावर जीवीत हानी, वित्तहानी टळु शकते आपत्तीत्तोर परिस्थितीचे सचित्र वर्णन, तीव्रता व घ्यावयाची काळजी याबाबत देखिल माध्यमांतुन समानमाध्यमांतुन प्रसारीत माहितीचा आपत्ती व्यवस्थापन कार्यात महत्वाचा वाटा आहेच पर्यायाने राष्ट्र उभारणी कार्यात देखिल तो अनन्य साधारण असा आहे.

- **सारांश:**

आपत्ती व्यवस्थापन हा प्रत्येक देशाचा अग्रक्रमाचा विषय आहेभारतासारखा देश जो जागतिक महासत्ता . होण्यााचा वाटेवर आहेअशा परिस्थितीत नवीन राष्ट्राची उभारणी करतांना आपत्तीमुळे राष्ट्राचे आतोनात . सामाजिक व आर्थिक स्तरावरच्या नुकसाना बरोबरच जीवित हानी देखिल मोठ्या प्रमाणावर .नुकसान होत आहे शासन व प .होते त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन करणे हे एक महत्वाचे साधन ठरते्रशासनाबरोबरच शाळा महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि स्वयंसेवी संस्थाची भुमिका निर्णायक ठरतेमाध्यमांचा . आज ही व्यवस्था मधील वारा हा अतिशय म्हत्वाचा आहे लोकाना .सतर्थ करणे अधिकृत माहिती पुरविणे याव्दारे होणारी हानी टाळण्यासाठी मीडीया भूमिका देखिल महत्वपुर्ण आहे.एकुणच राष्ट्र उभारणीसाठी आपत्ती व्यवस्थापन हा एक शाश्वत पर्याय म्हणुन सिध्द होतो.

- **संदर्भ ग्रंथ सूची :**

1. तेजस्कर पाण्डेय व ओजस्कर पाण्डेयसमाजकार्य भारत बुक सेंटर :,१७, अशोक मार्ग, Disaster management higher education.
2. आपत्ती व्यवस्थापन, प्रा ए पी चौधरी, प्रा सौ अर्चना चौधरी.
3. आपत्ती व्यवस्थापन, डॉ के यु घोरमोडे , डॉ कला घोरमाडे.
4. धडफळे मोहन, आपत्ती व्यवस्थापन, आपत्ती काळात घ्यावयाची काळजी, यश मंथन, वर्ष पाचवे, अंक दुसरा.
5. आपत्ती व्यवस्थापन, संकल्पना आणि कृती, कर्नल प्र प्र मराठे, प्रा व्ही जे गोडबोले.
6. डॉ- समाजकार्य कोष- निलम ताटके. डायमंड पब्लीकेशन पुणे.
7. www.wikipedia

# राYट्रनिर्मितीमध्ये समतेच्या मुल्यांचे योगदान

डॉ. एच. यु. पेटकर समाजशास्त्र विभाग कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा, जि. अमरावती.

## सारांश:

भारताच्या संविधानाचा मुळ गाभा प्रास्ताविकेत दिलेला आहे. त्यामध्ये स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या प्रमुख मुल्यांचा उल्लेख दिसून येतो व या मुल्यांवरच आपल्या देशाचे अस्तीत्व टिकून आहे. भारतीय संविधानाच्या प्रत्येक कलमांमध्ये समतेचा आशय लक्षात येतो. समतेशिवाय देश खऱ्या अर्थानी एकसंघ राहू शकत नाही, म्हणूनच घटनाकारांनी सारासार विचार करून या मुल्यांचा समावेश आपल्या संविधानामध्ये केलेला आहे. समतेसोबतच स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय याचेही फार महत्वाचे योगदान आहे. कोणतेही राष्ट्र विकसित होण्याकरीता किंवा त्या राष्ट्राचा विकास साध्य करण्याकरिता स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या मुलभूत घटकांना महत्वपुर्ण स्थान आहे.

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेमधूनच आपल्याला राष्ट्राच्या निर्मितीची व अखंडतेची एक झलक पाहावयास मिळते. भारतामध्ये अनेक धर्म, पंथ, राज्य, भाषा यांना एकसंघ बांधून ठेवण्याकरिता व राष्ट्राचे अखंडत्व टिकवून ठेवण्याकरिता भारतीय संविधानाचे महत्वपुर्ण योगदान असलेले दिसून येते.

शासकीय स्तरावरून सर्व प्रकारचे भेदभाव मिटवून समतेचा अधिकार अनुच्छेद १४ ते १८ नुसार देण्यात आला. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली.
भारतीय समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी महत्वपुर्ण संस्थामध्ये सर्वांना संधिची समानता निर्माण करूण देण्यास भारतामध्ये अनेक जाती, धर्म, प्रान्त, भाषा व वर्ण असूनही भारताची एकात्मता कायम आहे.

कोणतेही राष्ट्र निर्माण होण्याकरिता समतेचे मुल्य फार महत्वाचे आहे. ज्या राष्ट्रामध्ये समता मुल्य नसेल ते राष्ट्र अधिक काळपर्यन्त टिकून राहू शकत नाही. जगामध्ये प्रत्येक राष्ट्र निर्माण झाल्यानंतर त्यांनी स्वत:चे एक संविधान स्विकारले मग त्या संविधानाचे स्वरूप लिखित असो की अलिखित, लवचिक असो वा ताठर, या संविधानाच्या आधारेच त्या त्या देशाचा कारभार चालत असतो. स्वातंत्र्यानंतर भारताने सुध्दा एका संविधानाचा स्विकार केला आणि तो लिखित स्वरूपात असून जगातील सर्वात मोठया लोकशाही राष्ट्राचे ते संविधान आहे.

भारताच्या संविधानाचा मुळ गाभा प्रास्ताविकेत दिलेला आहे. त्यामध्ये स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या प्रमुख मुल्यांचा उल्लेख दिसून येतो व या मुल्यांवरच आपल्या देशाचे अस्तीत्व टिकून आहे. भारतीय संविधानाच्या प्रत्येक कलमांमध्ये समतेचा आशय लक्षात येतो. समतेशिवाय देश खऱ्या अर्थानी एकसंघ राहू शकत नाही, म्हणूनच घटनाकारांनी सारासार विचार करून या मुल्यांचा समावेश आपल्या संविधानामध्ये केलेला आहे. समतेसोबतच स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय याचेही फार महत्वाचे योगदान आहे. कोणतेही राष्ट्र विकसित होण्याकरीता किंवा त्या राष्ट्राचा विकास साध्य करण्याकरिता स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या मुलभूत घटकांना महत्वपुर्ण स्थान आहे.

राष्ट्र या संकल्पनेचा विचार करीत असतांना राष्ट्र म्हणजे एका विशिष्ट भुप्रदेशावर कायमस्वरूपी वस्ती करून राहणाऱ्या लोकांचा समुदाय जेव्हा स्वत:चे नियम तयार करून एक सार्वभौम स्वरूपाचे सरकार स्थापन करतो तेव्हा त्यास राष्ट्र असे म्हणतात. हॅरी जॉन्सन यांनी राष्ट्राच्या निर्मीतीकरिता चार घटकांचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये विशिष्ट भुप्रदेश, सर्वसमावेशक संस्कृती, प्रजनन/ लोकसंख्या आणि सार्वभौम सत्ता या घटकांच्या आधारावर राष्ट्राची निर्मिती होत असते. राष्ट्रनिर्मितीकरिता त्या त्या देशातील सर्व नागरीकांना आपन सर्व समान आहोत अशी भावणा निर्माण होते. व ही भावना अधिक बळकट करण्याकरिता प्रत्येक नागरीकांच्या जीवनावश्यक गरजा पुर्ण होणे आवश्यक असते तेव्हाच त्या राष्ट्रचं अस्तित्व दिर्घकालापर्यन्त टिकून रहाते.

राष्ट्र म्हणजे काय हे जाणून घेण्याकरिता काही विचारवंतांच्या व्याख्यांचा आढावा घेणे गरजचे आहे.

**लिकॉक यांच्या मते**, " वांशिक एकता असणाऱ्या लोकसमूदायाच्या राज्याला राष्ट्र असे म्हणतात."

**एम. हॅबर यांच्या मते**, "समान भाषा किंवा वंश यामुळे नव्हे तर लोकांच्या एकत्रीत राहणाऱ्या इछेतून राष्ट्र निर्माण होते."

**हॅन्स कोहोन याच्या मते**, “राष्ट्र म्हणजे निश्चीत अशा भुप्रदेशावर वास्तव्य करणारा लोकसमुदाय की जो स्वत:स स्वातंत्र्य,सार्वभौम, सत्ताधारी राज्यात परावर्तीत करण्याची इच्छा बाळगतो, स्वातत्र्यप्राप्ती पर्यन्त कार्य करतो आणि आपण सर्व एक आहोत अशा समान भावना बाळगतो.”

वरील सर्व व्याख्यांवरून आपणास असे दिसून येते की, एका विशिष्ट भुप्रदेशावर वास्तव्य करून कोणत्या ना कोणत्या तरी घटकाच्या आधारावर एकतेची भावना त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असते. तसेच ते इतर समुदायापासून समूहापासून स्वत:चे स्वातंत्र्य अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात.

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेमधूनच आपल्याला राष्ट्राच्या निर्मितीची व अखंडतेची एक झलक पाहावयास मिळते. भारतामध्ये अनेक धर्म, पंथ, राज्य, भाषा यांना एकसंघ बांधून ठेवण्याकरिता व राष्ट्राचे अखंडत्व टिकवून ठेवण्याकरिता भारतीय संविधानाचे महत्वपुर्ण योगदान असलेले दिसून येते.

**संशोधन पध्दती:**

संशोधनकर्ता हा मागिल विस वर्षापासून समाजशास्त्र या विषयाचा प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे, तसेच त्यांनी संविधानाचे वाचन केलेले आहे. त्यांनी शाहू महाराज संविधान प्रशिक्षक संस्था राधानगरी, कोल्हापूर. येथे संविधान संवादक म्हणून प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे. हे करीत असतांना या कालावधित संविधानावरती चर्चासत्रे, सेमीनार यामधुन संशोधनकर्त्याला रा ट्रउभारणीमध्ये समतेच्या मुल्याचे महत्व जाणून घेण्याची ओढ निर्माण झाली. अनेक तज्ञ व्यक्तिंच्या मुलाखती, संविधानाचे वाचन, संविधानावरील पुस्तकांचे वाचन तसेच समतेवर आधारीत पुस्ताकांचे वाचन यामधून संशोधनकर्त्यांने “राष्ट्रनिर्मितीमध्ये समतेच्या मुल्यांचे योगदान.” या विषयाची निवड केली.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. भारतीय समाजव्यवस्थेचे अध्ययन करणे.
२. भारतीय राज्यघटनेचे अध्ययन करणे.
३. मुलभुत अधिकारांचे अध्ययन करणे.
४. समतेच्या मुल्यांचे सविस्तर अध्ययन करणे.
५. राष्ट्रउभारणीत समतेच्या मुल्यांचे महत्व जाणून घेणे.

**गृहितकृत्ये:**

१. भारतीय राज्यघटनेमुळे देश एकसंघ आहे.
२. भारतीय राज्यघटनेतील समतेच्या मुल्यांमुळे अनेक भेद संपुष्टात आले.
३. समतेच्या मुल्यांमुळे समाजातील सर्व घटकाना विकासाची संधी प्राप्त झाली.
४. समतेच्या मुल्यांमुळे समाजामध्ये शांततेचे वातावरण वाढिस लागते.

भारतीय संविधानाच्या भाग तीन मध्ये व्यक्तिच्या मुलभुत अधिकाराविषयी सविस्तर मांडणी करण्यात आली आहे. या मुलभूत अधिकारांच्या बाबतीत माहिती घेतांना हे पहिल्यांदा लक्षात घ्यावयास हवे की, भारतीय नागरीकत्व असलेल्या सर्व नागरीकांना लींग, जात, धर्म, प्रांत, पंथ, भाषा असा कोणताही भेदभाव न करता हे सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत. संविधानाच्या प्रारंभी एकून सात मुलभुत अधिकार देण्यात आलेले होते.

१. समतेचा अधिकार (अनुच्छेद १४ ते १८)
२. स्वातंत्र्याचा अधिकार (अनुच्छेद १९ ते २२)
३. शोषनाविरूध्दचा अधिकार (अनुच्छेद २३ ते २४)
४. धर्म स्वातंत्र्याचा अधिकार (अनुच्छेद २५ ते २८)
५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (अनुच्छेद २९ ते ३०)
६. संपत्तीचा अधिकार (अनुच्छेद ३१)
७. संविधानिक उपाय योजनांचा अधिकार (अनुच्छेद ३२,३२ क ते ३५)

यापैकी १९७५ ला झालेल्या ४४ व्या घटना दुरूस्तीनुसार संपत्तीच्या अधिकाराच्या यादितून वगळण्यात आले, व तो अनुच्छेद ३०० क नुसार कायदेशीर अधिकार म्हणून घोषीत करण्यात आले. त्यामुळे मुलभूत अधिकाराची संख्या सहा झाली.

शासकीय स्तरावरून सर्व प्रकारचे भेदभाव मिटवून समतेचा अधिकार अनुच्छेद १४ ते १८ नुसार देण्यात आला. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली.

राज्य कोणत्याही नागरीकाला प्रतिकुल होईल अशा प्रकारे केवळ
धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करता येणार नाही. सर्व नागरीकांना समानतेचा अधिकार देण्याच्या दृष्टिने हा भाग अतिशय महत्वाचा आहे. आपल्या देशातच नव्हे तर जगभरात.सामाजिक व्यवस्था ही विषमतेची राहिलेली आहे. आपल्या व्यवस्थेमध्ये 'जात' हा घटक फार प्रभावी तसेच घातक आहे. आपल्याकडे जातीवरून त्या व्यक्तिचे मुल्यमापण केले जाते. धर्मानुसार होणारा भेदभाव देखिल सर्वपरीचित आहे. स्त्री पुरूष असमानता तर पदोपदी दिसून येत होती आणि म्हणूनच स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण करतांना घटनाकारांनी देशातील सर्वच नागरीकांना समान न्याय मिळण्याच्या दृष्टिने व कोणत्याही घटकांच्या आधारे भेदभाव होणार नाही याची आर्वजून काळजी घेवून तशी तरतूद केली आहे.

केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणतीही नागरीक दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॅाटेल, सार्वजनिक करमनुकीची ठिकाणे प्रवेश किंवा पुर्णत: किंवा अंशत: राज्याच्या निधीतून बांधण्यात आलेल्या विहीरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक वापराच्या जागा चांचा वापर करणे, याबाबत कोणतीही अट राहणार नाही.

भारतीय संविधानातिल अनुच्छेद १५ खंड (२) चे महत्व आणि आशय समजून घेण्याअगोदर आपल्याला स्वातंत्र्यपुर्व काळातील भारतीय समाजव्यवस्थेचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. जातीवरून होणारा 'विटाळ'व त्या ठिकाणचे भंग होणारे पावित्र्य यावरून सातत्याने संघर्ष होत होता. सार्वजनिक ठिकाणी काही विशिष्ट जातीसमुहांना प्रवेश निषिध्द ठरविण्यात आलेला होता, आणि त्यामुळे समाजातील ही असमानता सामाजिक असंतोषाचे कारण बनलेली होती. चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, अमरावतीचा अंबा मंदिराचा लढा असे अनेक असमानतेविरूध्दचे झालेले संघर्ष आहेत आणि म्हणूनच अनुच्छेद १५ खंड (२) मध्ये दोन उपखंडात घटनाकारांना सर्व सार्वजनिक ठिकानावर कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून दुकाने, सार्वजनिक हॅाटेल, सिनेमा हॅाल, विहीरी, तलाव, आंघोळीचे घाट, रस्ते अथवा सार्वजनिक वापराच्या जागा इत्यादी ठिकाणी येण्यास वा हया स्थानाचा उपभोग घेण्यास रोखले जाणार नाही अशी तरतुद केली. अनुच्छेद खंड (३) मध्ये लिंगाच्या आधारावर महिलांकरिता व बालकांकरिता विशेष व्यवस्था व उपाय योजना करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. पुरू ाप्रधान समाजात उपेक्षीत राहिलेल्या महिलांकरिता तसेच बालकांकरिता सकारात्मक बाबी करण्यासंदर्भात राज्याला कोणताही प्रतिबंध होणार नसल्याने खंड (३) मध्ये नमुद करण्यात आले आहे. या अनुच्छेद १५ खंड (३) च्या अनुशंगाने घरगुती हिंसाचाररापासून संरक्षण कायदा २००५ केंद्र सरकारने पारीत केलेला आहे. या कायदयाला सर्वोच्च न्यायालयाने " डी पालराज विरूध्द भारत सरकार" या केसचा निर्णय देतांना वैध ठरविले आहे. शासन महिला व बालकांच्या सक्षमिकरणाकरिता अन्य काही उपाययोजनाही राबवू शकते उदा. नौकरदार महिलांना सहा महिन्यापर्यन्त प्रसुती रजा, महिला आयोगाची स्थापणा (१९९०), स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण तसेच बालकांकरिता मोफत पोषण आहार वा मोफत शिक्षण देण्याची तरतुद इत्यादी. खंड (४) या अनुछेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टिमुळे नागरीकांच्या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती, जमातीकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. घटनेतिल हे कलम आरक्षणाच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचे आहे मुळ संविधानात खंड (४) नव्हता. पहिल्या घटनादुरूस्तीने १९५१ साली तो अनुच्छेद १५ ला जोडण्यात आला.

मद्रास राज्यातील काही शिक्षण संस्थांमध्ये काही विशिष्ट जातीसाठी काही जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. त्याविरूध्द दाखल झालेल्या चंपकम दोडाई राजन विरूध्द मद्रास राज्य १९५१ या केसचा निकाल देतांना सुप्रिम कोर्टाने या प्रकरणात अनुच्छेद १५ च्या खंड (१) व खंड (२) चे उलंघन होत असल्याचे सांगून या शिक्षण संस्थांनी दिलेले आरक्षण रद्द ठरविले. सुप्रिम कोर्टाच्या या निर्णयाला रद्द करण्याकरिता व सामाजिक तथा शैक्षणिकदृ टया मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी तसेच अनुसुचित जाती व जमातींना आरक्षणाची तरतूद करण्यासाठी १९५१ मध्ये पहिल्या घटना दुरूस्तीने खंड (४) अनुच्छेद १५ च्या खंड (१) व खंड (२) चा दुसरा सकारात्मक अपवाद मानला जातो. त्यांनतर या तरतुदी विरोधात अनेक केसेस सुप्रिम कोर्टात दाखल झाल्या. त्यापैकी,

१. TMC फाउंडेशन विरूध्द कर्णाटक राज्य २००२
२. इस्लामिक अकॅडमी विरूध्द कर्नाटक राज्य २००३
३. पी. ए. इनामदार विरूध्द कर्नाटक राज्य २००५

ही प्रमुख प्रकरणे आहेत. या प्रकरणाचा निर्णय देतांना सुप्रिम कोर्टाने स्पष्ट केले आहे की, गैर अल्पसंख्यांक व्यावसायीक शिक्षण संस्थांमध्ये तसेच सर्व प्रकारच्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांमध्ये एस. सी., एस. टी. वर्गातील रिक्त अन्य

मागासवर्गिय जातिंना आरक्षण देणे अनुच्छेद १५ च्या खंड (१) व खंड (२) चे उल्लंघन मानले जाईल. मग त्या संस्था शासकीय अनुदान प्राप्त असो अगर नसो. सर्वोच्य न्यायालयाबाबत दिलेल्या निर्णयाला बदलण्यासाठी २००६ मध्ये ९३ वी घटना दुरूस्ती खंड (५) अनुच्छेद ५ मध्ये जोडण्यात आला.

या घटना दुरूस्ती विराधात दाखल झालेल्या ' अशोक कुमार ठाकूर विरूध्द भारत सरकार २००८' या केसेसचा निर्णय देतांना पाच न्यायाधिशांच्या खंडपिठाने या घटनादुरूस्तीला वैध घोषित केले. अलिकडेच २०१९ मध्ये अनुच्छेद १५ मध्ये १०३ वी घटना दुरूस्ती करून खंड (६) जोडण्यात आला आहे. खंड (६) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टिमुळे किंवा अनुच्छेद १९ खंड (१)

उपखड (६०) यातिल कोणत्याही गोष्टिमुळे किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टिमुळे राज्याला पुढिल तरतुदी करण्यास प्रतिबंध होणार नाही. (क) खंड (४) आणि खंड (५) मध्ये उल्लेखलेल्या वर्गाशिवाय नागरिकांपैकी आर्थिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता विशेष तरतूद करणे. (ख) खंड (४) आणि खंड (५) मध्ये उल्लेखलेल्या वर्गाशिवाय नागरिकांपैकी आर्थिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता, त्यांच्या शैक्षणिक संस्थांमधिल प्रवेशाच्या संबंधाने, राज्याद्वारा अनुदानित किंवा विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांमधिल प्रवेशामध्ये अनुच्छेद ३० खंड (१) मध्ये नमूद अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक संस्था वगळता, आरक्षणाच्या संबंधाने सध्या अस्तीत्वात असलेल्या आरक्षणाशिवाय प्रत्येक श्रेणित एकूण जागाच्या जास्तीत जास्त दहा टक्के जागा आरक्षित करणे. खंड (६) वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते की, यात तरतुद केल्याप्रमाणे राज्य अर्थिक दृष्टया दुर्बल घटकांकडेही लक्ष देईल.

अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. कायदयाने समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यात आली असून त्यासंबंधी कोणत्याही प्रकारचे आचरण निषिध्दच नव्हे तर शिक्षापात्र अपराध देखील ठरविण्यात आले आहे. भारतीय समाजात शेकडो जाती हया अस्पृश्य समजल्या जात होत्या. अस्पृश्यच राहते अशी परंपरावादी कल्पना आपल्या समाजात रूढ होती.

भारतीय संविधान तयार करतेवेळी घटनाकारांच्या ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली व त्याप्रमाणे संविधानाच्या अनुच्छेद १७ अन्वये अस्पृश्यता नष्ट केली असल्याचे व अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आल्याचे घोषीत करण्यात आले.

**निष्कर्ष:**

वरील सर्व विश्लेषणावरून आपल्या असे निदर्शनास येते की, समाजवादी राज्यव्यवस्थेतिल सत्तेचे अतिकेंद्रिकरण आणि उदारमतवादी लोशाहीतिल अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य या दोन टोकाचा सुवर्ण मध्य साधण्याचा प्रयत्न भारताच्या संविधानकर्त्यांनी केला. नागरीकत्वाची आधुनिक व समताधिष्ठ संकल्पना संविधानाने स्विकारली असून त्यानुसार व्यक्तिचे राज्यसंस्थेशी घनिष्ठ नाते जोडले आहे. त्यामुळे व्यक्तिविकासाला पुरक अशी समाजव्यवस्था उभी केली.

स्वातंत्र्य, समता, बंधुता या तिन मुल्यांचा समुचित मेळ घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या तिनही तत्वांना जीवनाची पायाभूत तत्वे मानणारी सामाजिक लोकशाही येथे निर्माण व्हावी. अशी अपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केली होती. त्यांच्या मते समतेवाचून स्वातंत्र्य स्विकारल्यास बहुसंख्येवर मुठभराचे अधिपत्य निर्माण होईल तर स्वातंत्र्यविरहीत समता व्यक्तिगत पुढाकारालाच मारक ठरेल.

भारतीय समाजाचे प्रथम वैशिष्टे लक्षात घेतले तर जाती हे आहे. त्यामुळे यामध्ये आज परीवर्तन झाले असले तरी यातील बेटिबंदी कायम आहे. तसेच जातीव्यवस्थेमध्ये व्यक्तिच्या गुणांपेक्षा जातीला महत्व प्रदान करण्यात आले होते. परंतू संविधानकर्त्यांनी संविधानामध्ये सर्वांनी समान संधीची उपलब्धता करूण ठेवली आहे.

अनेक विचारवंतांच्या मते सामाजिक विषमता ही आर्थिक घटकांमुळे अधिक बळकट झाली. परंतू हे खरे नाही. आर्थिक विषमता ही सर्वच समाजात असते, परंतू जातीव्यवस्था ही भारतातच दिसून येते केवळ दिसूनच येत नाही तर खालच्या जातितील लोकांना अस्पृश्यता ही असहय वा घृणास्पद न वाटता ती स्वाभावीक व न्याय वाटावी अशी मानसीकता व सामाजिक व्यवहार प्रचलित होते आणि म्हणून आपल्या असे निदर्शनास येते की, या विषमतेचा प्राथमिक आधार आर्थिक नसून सांस्कृतिक व सामाजिक आहे ज्याला भारतीय संविधानातील समतेच्या मुल्यांनी तडा दिला.

अशारितीने संविधानकर्त्यांनी संविधान निर्माण करीत असतांना भारतीय समाजव्यवस्थेचा अतिशय सुक्ष्मरितीने अभ्यास करून प्रत्येक व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरीकाला अधिकार प्रधान करूण समतेच्या तत्वाचा मोठया प्रमाणात पुरस्कार केला सोबतच स्वातत्र्य, बंधुता व न्यायाचाही आग्रह धरला त्यामुळे भारतीय समाजातील प्रत्येक नागरीकाचा राष्ट्रनिर्मितीमध्ये हातभार लागावा व एक नव समतेचे राष्ट्र उभे राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

भारतीय समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी महत्वपुर्ण संस्थामध्ये सर्वांना संधिची समानता निर्माण करूण देण्यास भारतामध्ये अनेक जाती, धर्म, प्रांन्त, भाषा व वर्ण असूनही भारताची एकात्मता कायम आहे.

**संदर्भ ग्रंथसुची:**


- खोब्रागडे इ. झेड., (२०१९) 'आपले संविधान' संविधान फाउंडेशन नागपूर.
- वारे सुभाष, (२०१७) 'आपले भविष्य भारतीय संविधान' एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन, नवी पेठ पुणे.
- गायकवाड जयदेव, (२००८) 'संविधान सभेत: डॉ आंबेडकर' पद्मगंधा प्रकाशन, पाढुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे.
- भोले भास्कर लक्ष्मण, (२००४) 'विसावे शतक आणि भारतातील समताविचार' सुंगावा प्रकाशन पुणे.
- सुराणा पन्नालाल, (१९९८) 'समतावादी विकासनिती' आंदोलन स्वातंत्र्यदिन विशेषांक.
- सुराणा पन्नालाल, (१९९९) 'लोकशाही समाजवादच का?' एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन, नवी पेठ पुणे.
- प्रसाद अनिरूध्द, (१९९१) 'आरक्षण, सामाजिक न्याय एवं राजनैतिक संन्तुलन' रावत पब्लिकेशन, जवाहर नगर, जयपूर.
- भारताचे संविधान, (२००२) महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनायाद्वारे अनुवादित आणि संचालक, षासण मुद्रण, लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य, यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# संविधान निर्मितीच्या माध्यमातून भारतीय राष्ट्र उभारणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

**डॉ. होमराज टी. राठोड**
समाजशास्त्र विभाग
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ
9421791484

**गोषवारा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे खऱ्या अर्थाने शिल्पकार आहेत. अनेक विषयाच्या त्यांच्या चिंतनशील अभ्यासातून या देशातील सामाजिक, आर्थिक, भौतिक आणि वैज्ञानिक या सर्वच ज्ञानशाखांना एक नवी दिशा मिळाली. डॉ. आंबेडकर हे एक द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ, अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक समाजशास्त्रज्ञ तत्ववेत्ते, राज्सशास्त्राचे गाढे अभ्यासक, कायदेतज्ज्ञ अशा अनेक अगांनी त्यांचे जीवन कार्य व्यापले आहे. या देशात प्रस्थापीत झालेली व रुजलेली जातीव्यवस्था त्याला आधारभूत ठरलेली धर्मव्यवस्था व त्यातून उद्भवलेली जाचक अस्पृश्यता व त्यातून माणसांचे शोषण याविरुध्द डॉ. आंबेडकरांचा लढा हा जागतिक संदर्भ लाभलेला वर्णमुक्तीचा, शोषणमुक्तीचा व मानवतेच्या प्रस्थापनेचा महत्त्वाचा भाग ठरला आहे.

राष्ट्र म्हटले की राष्ट्रात लोक अंतर्भुत असतात आणि भारतीय समाज व्यवस्थेत लोकांमध्ये अनेक अडथळे आहेत जसे विकोपाला गेलेली जातीव्यवस्था होती म्हणजे जातीभेद, लिंगभेद, आर्थिक विषमता ह्या सर्व बाबी राष्ट्राला मारक ठरतात. परंतु भारतीय संविधानाने या सर्व बाबीवर मात करुन समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्वाचा स्वीकार करुन सगळ्यांना संधी निर्माण करुन प्रवाहात आणण्याचे काम करुन राष्ट्रउभारणीला हातभार लावला आहे आणि म्हणून संविधानाची वैशिष्ट्ये लक्षात घेता भारतीय संविधान जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. लोकांची सार्वभौमत्ता हे संविधानाचे ब्रिद असून गणतंत्र लोकशाही प्रणाली आपण स्वीकारली आहे. लोकशाही समाजाभिमुख करण्यासाठी कायदेमंडळ, कार्यकारी

मंडळ, न्यायमंडळ व प्रसार माध्यमे हे चार मजबूत स्तंभ आहेत. संपूर्ण जगाने स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारलेला असताना एक व्यक्ती एक मत एक मूल्य हा महामंत्र देऊन भारतीय स्त्रीला मतदानाचा अधिकार देऊन व समान संधी देऊन राष्ट्राची अर्धी शक्ती उपयोगात आणली तसेच शिक्षणामुळेच वंचितांचा विकास होतो हे लक्षात घेऊन प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. नागरिकांच्या जीवनात पूर्ण सुरक्षितता असल्याशिवाय त्यांना लोकशाहीच्या जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडता येत नाही. स्वत:चा आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येकाला संधी प्राप्त झालीच पाहिजे म्हणून भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते 35 पर्यंत मूलभूत अधिकार संविधानाने प्रत्येकाला बहाल केले आहे म्हणून संविधान निर्मितीच्या माध्यमातून भारतीय राष्ट्र उभारणीला डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मोठे योगदान आहे.

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासाचा आढावा घेताना आपल्या असे लक्षात येते की, भारतीय समाजव्यवस्था ही अतिशय गंुतागुंतीची असल्याचे सहज आपल्या लक्षात येते. वेगवेगळ्या कालखंडातून ही समाजव्यवस्था जात असताना वेगवेगळ्या समस्या असल्याचे दिसते. परंतु मध्ययुगीन समाज व्यवस्थेत असणारी जातीव्यवस्था आणि स्त्रियांची स्थिती पाहिली असता भारतीय संस्कृती ही केविलवाणी वाटल्याशिवाय राहात नाही. जातीव्यवस्थेत उच्च जातीला सगळ्या सवलती व कनिष्ठ जातीला त्या सगळ्या सवलतीपासून वंचित ठेवणारी व्यवस्था तसेच स्त्रियांच्या बाबतीत स्त्रियांकडे एक तर देवता किंवा दासी अशा परस्पर विसंगत दृष्टिकोनातून बघण्यात येऊन तिचे माणूसपण निकाली काढण्यात आले. या दोन्ही वर्गाला सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक अधिकार नाकारुन गुलामीच्या दास्यात अडकविल्यामुळे ही दलित रुपी व स्त्री रुपी शक्ती उपयोगात न आल्यामुळे समाज व्यवस्थेत अनेक अडथळे निर्माण झाले. या शोषणकारी व्यवस्थेमुळे समाजात आर्थिक विषमता निर्माण होऊन राष्ट्राच्या विकासाला बाधा निर्माण झाली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्वतंत्र भारताच्या संविधानानुसार संविधानिक धोरणे राबवून समता, स्वातंत्र्य व बंधुता यावर आधारीत मूलभूत अधिकाराची संकल्पना राबविल्या गेली तसेच समाजाभिमुख अर्थव्यवस्थेचा स्वीकार करुन व सगळ्यांना समान अधिकार देऊन सर्वसमावेशक विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला यामुळे संविधान निर्मितीनंतर सकारात्मक परिणाम आज पाहावयास मिळतो. चातुवर्ण्य व्यवस्थेच्या जोखडातून सोडवून माणसाला महानायक करणारा त्याच्या सामर्थ्याची आणि त्याच्या सौंदर्याची नवनिर्मिती करु इच्छिणारा सिध्दांत बाबासाहेबांच्या महान प्रतिभेचे अपत्य आहे हा एकूण मानवी जिवनाच्या स्वास्थाचा, समृध्दीचा आणि सभ्यतेचा सिध्दांत आहे जो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीय समाजाला दिला आणि म्हणूनच संविधान निर्मितीच्या माध्यमातून भारतीय राष्ट्र उभारणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अतिशय मोलाचे आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

**उद्देश :**

1. भारतीय राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अभ्यासणे.
2. राष्ट्र उभारणीत अडथळे, उपाययोजना व सकारात्मक परिणामांचा तुलनात्मक विवेचन करणे.

**भारतीय राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्राच्या उभारणीत फार मोठे योगदान आहे. कारण भारत हा देश मुळातच वेगवेगळ्या जातीत, धर्मात, पंथात अशा वेगवेगळ्या गटात आणि उपगटात विभाजीत झालेला समुदाय आहे. अशा विविधतेने नटलेल्या समाजाला एकसंघ करणे सोपे काम नव्हते. परंतु डॉ. आंबेडकरांच्या दुरदृष्टी धोरणाने संविधानाच्या माध्यमातून ही किमया डॉ. आंबेडकरांनी साधली. समता, स्वातंत्र्य व बंधुता आणि सुरक्षितता असल्याशिवाय समाज व प्रामुख्याने राष्ट्राची प्रगती होणार नाही ही बाब हेरुन डॉ. आंबेडकरांनी सगळ्याच क्षेत्रात न्याय देण्याचे काम केले. जसे सामाजिक,आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात महिलांना आणि दलितांना प्रवाहात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात समानतेची

संधी संविधानाच्या माध्यमातून निर्माण करुन दिली. म्हणून स्वातंत्र्याच्या या 75 वर्षात समाज व्यवस्थेत आमुलाग्र बदल पाहावयास मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान हे अखिल मानव जातीच्या सर्वांगीण उन्नती व उत्थानासाठी उपयोगी सिध्द झाले आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक विचारांचा उल्लेख तर महत्त्वाचा ठरतोच पण राष्ट्राची अर्धी शक्ती असणारी महिलांच्या प्रगतीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, स्त्रियांची गुणवत्ता वाढली तर समाजाला आणि पर्यायाने राष्ट्राला त्याचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले त्यामुळेच आज स्त्रीया सगळ्यात क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवीत आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवी विकास व कल्याणाच्या प्रक्रियेतील सर्वोेच्च व्यक्तीमत्त्व होय. भारताच्या एकता व अखंडतेला धक्का न लावता सर्व जाती, धर्म आणि राष्ट्राच्या विकासाला प्राधान्य दिले. मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता सामाजिक, आर्थिक विषमता नष्ट करुन राष्ट्राच्या विकासाचा पाया घातला आणि म्हणूनच समताधिष्ठित समाजरचना निर्माण करुन राष्ट्राच्या उभारणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अधिक मोलाचे आहे.

**राष्ट्र म्हणजे काय राष्ट्राचा अर्थ :**

Nation राष्ट्र हा शब्द Natus ह्या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. नेशस या शब्दाचा अर्थ 'जन्म' अथवा 'वंश' असा होतो. याचाच अर्थ राष्ट्र या संकल्पनेचा संबंध वंशाशी वा जन्माशी असतो. ऐतिहासिक परंपरा, भाषा, वंश, धर्म, समान हितसंबंध व समान राजकीय आकांक्षा ह्यामुळे इतर लोकसमुदायापासून स्वत:ला वेगळा समजणारा समाज म्हणजे राष्ट्र होय. थोडक्यात भूभाग, लोकसंख्या, सार्वभौमत्व या सगळ्याच मिळून बनणाऱ्या घटकाला तसेच आपला इतिहास एक आहे. संस्कृती एक आहे. तसेच आपले भवितव्य देखील एकच आहे असे जेव्हा तेथील लोकसमुदायाला वाटते तेव्हा त्याला राष्ट्र असे म्हणतात.

**राष्ट्राच्या प्रगतीतील अडथळे अर्थात संविधान निर्मिती पूर्वी :**

**धर्मांधता :** आपल्या देशाच्या समाज जीवनात आज विविध प्रकारच्या कुटीरवादी कृती शक्ती इतक्या व्यापक प्रमाणात सक्रीय झालेल्या आहेत की हा देश उभा कसा आहे याचेच आश्चर्य समाज चिंतकांना वाटते आहे. धर्मांधतेने पछाडलेल्या शक्तीनी केवळ लोकांच्या ऐक्य भावनेवर प्रहार केले आहेत तर भारताच्या जवळपास सर्वच भागात राष्ट्रीय ऐक्य धोक्यात आणले आहे. म्हणूनच धर्मांधता हे राष्ट्राच्या विकासात बाधा आणणारे घटक ठरले आहे.

**शोषणकारी व्यवस्था :**

भारतावर हजारो वर्षे परकीय शक्तीच्या अमलाखाली असलेला समाज स्वातंत्र्याच्या वेळी लोकांना मिळाला तो असमानता व भेदभावावर आधारीत होता व ही असमानता काही लोकाद्वारे दुसऱ्या लोकांवर जन्मोजन्मीसाठी थोपविल्या गेली होती म्हणून भारतीय समाजव्यवस्था ही अन्यायपूर्ण समाजव्यस्था आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. भारतीय समाजाची संरचना हिंदू समाजाची श्रेणीबध्द रचना असमानतेच्या सिध्दांतावर झाली आहे. ज्यात ब्राह्मण सर्वात श्रेष्ठ व शुद्र सर्वात कनिष्ठ आहेत *** आणि दोघांच्यामध्ये सोपान क्रमाने हजारो जाती अस्तित्वात आहेत. त्यात प्रत्येक जात ही जन्माच्या आधारावर आरोपीत व अपरिवर्तनीय आहे. तसेच असमानता केवळ जातीच्या सामाजिक स्थितीमध्येच नाही तर त्यांच्यातील सुखसोई व अधिकाराच्या वितरणामध्ये सुध्दा आहे. वरच्या जातीना त्यांच्या श्रेणीक्रमानुसार विशेष अधिकार व सवलती मिळाल्या आहेत तर खालच्या जातीवर त्यांच्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने नियोग्यता व निर्बंध थोपविल्या गेल्या आहेत. त्यामुळे खालच्या जातीच्या वाट्याला हालअपेष्टा, अपमान, उपमर्द व हिन वागणूक आल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक अशा सर्वच स्वरुपात शोषण झाले अशा स्वरुपाची शोषणकारी व्यवस्था ही राष्ट्र विकासाचा बाधा ठरते.

**लिंगभेद :**

जाती प्रमाणेच लिंगाच्या आधारावर सुध्दा स्त्री-पुरुष अशी विषमता पाळली जाते. लिंगानुसार पुरुषांचा दर्जा श्रेष्ठ तर स्त्रीचा कनिष्ठ मानला जातो. अशा प्रकारची स्त्री आणि पुरुषामध्ये असलेली विषमता

म्हणजे लिंगभेद होय. अशा प्रकारच्या लिंगभेदामुळेच स्त्रीयांवर सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक अपात्रता लादण्यात आल्या होत्या. या अपात्रतेमुळे स्त्रियांना त्यांच्या व्यक्तीत्वाचा विकास करण्याची संधी नाकारण्यात आली होती. त्यामुळे स्त्री रुपी ही अर्धी शक्ती उपयोगात न आणता आल्यामुळेच राष्ट्राच्या विकासाला बाधा निर्माण होते.

**जातीभेद :**

जातीच्या नावावर अस्पृश्यांना आणि अपवित्रतेच्या नावावर स्त्रियांना हजारो वर्ष प्रवाहापासून वंचित ठेवल्या गेल्यामुळे राष्ट्राच्या विकासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. भारताचा इतिहास हा जातीव्यवस्थेचा, वर्णव्यवस्थेचा इतिहास आहे. ब्राह्मणी समाजाची रचना ही चातुवर्ण्यावर आधारीत होती त्यामुळे एक वर्ग दुसऱ्या वर्गाच्या हक्काचा व हिताचा बळी घेऊन समाज रचनेतील फायदे लुबाडीत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या हिंदू समाज व्यवस्थेला मानवी शोषणाची एक व्यवस्था म्हटले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात चार्तुवर्ण्यव्यवस्था, जातीव्यवस्था, जातीभेद आणि अस्पृश्यता ह्या वेगवेगळ्या बाबी नसून त्या एकच आहे हा सिध्दांत मांडला. ते म्हणतात की, चार्तुवर्ण्य व्यवस्थेतुनच जातीव्यवस्थेचा जन्म झाला आणि जाती व्यवस्थेमध्येच जातीभेदाचे मूळ होते आणि त्यामुळेच समाजात अस्पृश्यता निर्माण झाली व ही समाजव्यवस्था असमानतेवर आणि विषमतेच्या सिध्दांतावर आधारीत आहे व टिकून आहे. त्यामुळे जातीभेद हे राष्ट्रविकासाला बाधक आहे.

**आर्थिक विषमता :**

भारतामध्ये दोन भारत अस्तित्वात आहे. एक अती श्रीमतांचा इंडिया आणि कामगारांचा, कष्टकऱ्यांचा शेतकरी व शेतमजुराचा जे आर्थिक दृष्ट्या खुपच मागास आहेत असा जो वर्ग भारतात राहतो. असे भारताचे आर्थिक विषमतेवर आधारीत एकाच भारतात दोन भारत पहावयास मिळते. एकीकडे खुप श्रीमंती तर दुसरीकडे विकोपाला गेलेली गरिबी अशा स्वरुपाच्या आर्थिक विषमतेला भारतीय समाज व्यवस्था जबाबदार आहे. कारण भारतीय समाज एक प्राचीन आणि परंपरावादी समाज आहे. या व्यवस्थेचा

आधार चार्तुवर्ण्य व्यवस्थेत आहे त्यामुळे येथील जन्म आधाराची कार्यकुशलता आणि श्रमविभाजनाच्या पवित्र सिध्दांताला इतके पंगू बनवून टाकले की सामाजिक व्यवस्था धर्म आधारीत बनून गेली आणि त्याच्या विरुध्द तर कोणी एक शब्दही उच्चारला तर त्याला पाप आणि पुण्याची जोड दिल्या गेली. परिणामस्वरुप समाजाच्या एका मोठ्या वर्गाला अंधारात ढकलून देऊन त्यांना एका कोपऱ्यात बसण्यास मजबूर केल्या गेले. त्यामुळे संपत्तीचे असमान वितरण झाल्यामुळे भारतीय समाज व्यवस्थेत मोठी आर्थिक विषमता निर्माण झाली ती राष्ट्राच्या विकासाला बाधा ठरुन जगाच्या तुलनेत आपण शेकडो वर्ष मागे फेकल्या गेलो.

**उपाययोजना :**

**संविधानिक धोरण राबविणे :**

राष्ट्राचा विकास साधायचा असेल तर संविधानात जी धोरणे सांगितली आहेत त्याची अंमलबजावणी सुव्यवस्थीत पध्दतीने राबविणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे महान उपासक होते. भारतीय लोकशाही बलशाली झाल्याशिवाय भारतीय समाज आणि राष्ट्र बलशाली होणार नाही. लोकशाही हा एक प्रकारचा जीवन मार्ग आहे. खरी लोकशाही ही राजकीयच नसून ती आर्थिक आणि सामाजिकही असली पाहिजे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि समाजवादी अर्थव्यवस्थेच स्वीकार केला त्यामुळे भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात श्रेष्ठ घटना ठरली. विज्ञानवाद व मानवतावाद हे घटनेच्या केंद्रस्थानी आहे. म्हणूनच घटनेला मानव मुक्तीचा पवित्र ग्रंथ म्हणून जागतिक दर्जा प्राप्त झाला आहे. भारतीय समाजाचा विचार करता भारतात जात, पोटजात, प्रथा, परंपरा, रुढी, धर्म, भाषा, संस्कृती या सर्वच आधारावर विषमता प्राचीन काळापासून आहे. त्यामुळे भारतीय जनता हजारो वर्ष राजकीय मानसिक गुलामगिरीत असल्याने समाजातील फार मोठा वर्ग सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या विकासापासून वंचित राहिला. त्यामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. जसे निरक्षरता, जातीयता, अंधश्रध्दा, आर्थिक विषमता, स्त्रियांना कमी लेखने म्हणून या वंचित

समाजाचा विकास व्हावा त्यांना संधी प्राप्त व्हावी म्हणून भारतीय संविधानात अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत त्याची योग्य पध्दतीने अंमलबजावणी आपल्या राज्यकर्त्यांनी केल्यास राष्ट्राचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

**मूलभूत अधिकाराची संकल्पना स्वीकारणे :**

व्यक्तीचा आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास योग्य पध्दतीने होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला योग्य संधी प्राप्त झाली पाहिजे म्हणून मूलभूत अधिकार महत्त्वाचे आहेत. भारतीय संविधानाने प्रत्येकाला काही मूलभूत अधिकार दिले आहेत. जसे समानतेचा हक्क कलम 14 ते 18 मध्ये दिले आहे. स्वातंत्र्याचा हक्क कलम 19 ते 358 मध्ये दिले आहे. शिक्षेविरुध्द संरक्षणाचा हक्क कलम 20 मध्ये दिले आहे, शोषणाविरुध्दचा हक्क कलम 23 व 24 मध्ये दिले आहे. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार कलम 25 ते 28 मध्ये दिले आहे. सांस्कृतिक व शिक्षणाबाबत अधिकार कलम 29 ते 30 मध्ये दिले आहे. हे सगळे मूलभूत अधिकार घटनेने दिले आहे. अधिकारासोबतच कर्तव्य सुध्दा महत्त्वाचे आहे. म्हणून अधिकार व कर्तव्य एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत. म्हणून राज्यघटनेचा आदर करुन त्याचे पालन करणे भारताच्या सार्वभौम एकात्मतेला कायम ठेवण्यासाठी योग्य वर्तन करणे, मानवतावाद, विज्ञानवाद, सुधारणावाद इत्यादीचा विकास घडवून आणते. पर्यावरणाचे संरक्षण करुन राष्ट्राच्या विकासाला हातभार लावणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते.

**समाजाभिमुख अर्थव्यवस्था :**

भारतातील परंपरागत धर्मव्यवस्थेने दलित पिडीत समाजाचे आर्थिक शोषण शतकानुशतके अव्याहतपणे केले. कार्ल मार्क्सने श्रमशक्तीतून शोषण क्रिया कशी होते आणि भांडवलशाहीचे इतिहासातील स्थान नष्ट होणे कसे अपरिहार्य आहे ह्याचे विवेचन केले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विषमता ही खालच्या जातीच्या लोकांना वरच्या जातीचे व्यवसाय करण्यास बंदी असल्यामुळे त्यांच्यासाठी विकासाची दारे बंद करण्यात आली त्यामुळे ते आर्थिक विकासात मागे राहिले. डॉ. आंबेडकरांनी स्टेटस ॲन्ड मायनॉरिटीज या ग्रंथात भारताच्या विकासासाठी अर्थनीती काय असावी याचे अभ्यासपूर्ण विवेचन मांडले

आहे. या बाबतीत त्यांनी गरिबी हटविणे विषमतेच निर्मूलन करुन शोषणमुक्त समाजाची संकल्पना मांडली आहे. शिवाय खाजगी उद्यमशीलतेला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहिल आणि संपत्तीचे वाटप समानशील होईल अशा पध्दतीने आर्थिक व्यवहाराचे नियोजन करणे ही शासनाची जबाबदारी राहिल तसेच आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सरकारी उपक्रमाची निर्मिती करुन उद्योगधंदे काढावेत. भूमिहीनांना जमिनी द्याव्यात जेणेकरुन आर्थिक विषमता कमी होऊन सगळेच विकासाच्या प्रवाहात सामील झाल्यास राष्ट्राच्या विकासाला हातभार लागेल अशी समाजभिमुख अर्थव्यवस्था असावी.

**सर्वसमावेशक विकास :**

सर्वसमावेशक विकास साधायचा असेल तर आपल्याला समाजवादी समाजरचना स्वीकारावी लागेल. कारण समाजवादी समाजरचनेचा आर्थिक समानता हा गाभा असतो. सर्वांचा विकास हा या व्यवस्थेमध्ये होतो. समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी क्रांतीकारक उपाय सुचविले आहेत. उत्पादन साधनावर जनतेची मालकी, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळून संपत्तीचे योग्य वाटप, शेतजमनीचे राष्ट्रीयकरण करणे, शेतजमीनीचे वाटप करताना जात, धर्म, वंश इं. आधार घेण्यात येऊ नये. पायाभूत उद्योगाचे राष्ट्रीयकरण करावे. समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षण, व्यापार इ. समानतेचे अधिकार देण्यात यावे. जेणेकरुन समाजातील सर्व घटकांचा सर्वसमावेशक विकास होईल व राष्ट्राची प्रगती होईल.

**संविधाननिर्मिती नंतर सकारात्मक परिणाम :**

**धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना :**

भारत हा विविध जातीत, धर्मात, पंथात विभाजीत झालेला देश आहे. प्रत्येक जाती धर्माचे वेगवेगळे झेंडे आहेत. जणू बारुदच्या ढिगाऱ्यावर आपण बसून आहोत एवढा जातीभीमान आणि धर्माभिमान भारतीयांमध्ये ठासून भरलेला आहे. परंतु तरीही राष्ट्रभक्तीच्या प्रेरणेने तिरंग्याखाली आपण आलो की आम्ही भारतीय आहोत अशी धारणा सर्वांची होते ही किमया खऱ्या अर्थाने भारतीय संविधानामुळे साधल्या गेली.

कारण संविधानाच्या कलम 25, 26, 27, 28 नुसार प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिल्या गेलेला आहे. तसेच राष्ट्राचा कुठलाच धर्म नसून भारत हा देश धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे अशी तरतुद केल्यामुळे व धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना स्वीकारल्यामुळे आपण एकसंघ राहू शकलो यातच राष्ट्राचा विकास अभिप्रेत आहे.

**शोषणकारी व्यवस्थेला घटनेच्या विविध कलमामुळे आळा बसला :**

विषमतेच्या आधारावर निर्माण झालेली दरी मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी व दलितांना व दुबळ्यांना प्रवाहात आणण्यासाठी संविधानातील लोककल्याणकारी महत्त्वपूर्ण कलमामुळे शोषणकारी व्यवस्थेला आळा बसला. घटनेच्या कलम '17' नुसार अस्पृश्यता नष्ट झाली. कलम '21' नुसार जिवित व व्यक्तीगत स्वातंत्र्याचे संरक्षण कलम '24' नुसार बालकामगार ठेवण्यास मनाई कलम '45' नुसार बालकाकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतुद तसेच कलम '12 ते 35' नुसार मूलभूत अधिकार दिलेत यात समानता हे तत्व महत्त्वपूर्ण ठरले. कलम '340' नुसार मागासवर्गीयांचा सर्वांगीण विकास व्हावा त्यांना समान संधी मिळावी म्हणून आरक्षण दिले आहे. कलम '341 व 342' नुसार अनु. जाती, जमाती, विमुक्त भटक्या जमाती, विशेष मागास वर्ग यांच्या सर्वांगीण विकासासाठी आरक्षण दिल्या गेल्यामुळे हा वर्ग मोठ्या प्रमाणात शोषणाच्या बाहेर येऊन प्रवाहात येण्यास सिध्द झाला आहे.

**संविधानाने महिलांना समतेचा अधिकार दिल्यामुळे राष्ट्राची ही अर्धी शक्ती कामी आली :**

पुरातन, प्राचीन, मध्ययुगीन आणि स्वातंत्र्यपूर्व या सर्व कालखंडात स्त्रियांची अतिशय दयनीय व दुय्यम स्वरुपाची स्थिती होती. स्त्रियांना कोणतेही अधिकार नव्हते. धर्माचरणानुसार त्यांना फक्त पुरुषांची सेवा करणे समाजातील रुढी, प्रथा, परंपरा यांचे पालन करणे म्हणजे स्त्री धर्म अशी संकल्पना समाजात रुढ झाली होती. महिलारुपी अर्धी शक्तीवर ही विविध बंधने असल्यामुळे व शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवल्यामुळे या अर्ध्या शक्तीचा उपयोग राष्ट्राच्या विकासासाठी करता आला नाही. परंतु भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर नवभारताच्या निर्मितीमध्ये संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना

समतेचा व स्वातंत्र्याचा अधिकार दिला. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून भारतीय महिलांना त्यांचे सर्व अधिकार मिळवून दिले. तसेच भारतीय संविधानात स्त्रियांच्या अधिकाराबाबत विविध कलमा अंतर्गत तरतुदी करुन स्त्रियांना कायद्याने भक्कम संरक्षण दिले आहे. घटनेच्या कलम '14' नुसार समतेचा अधिकार स्त्रियांना दिला. कलम '15' नुसार धर्म, वंश, जात, लिंगानुसार भेदभाव करता येणार नाही. कलम '16' नुसार समान संधी देण्यात आली आहे. कलम '39' 'ख' नुसार समान कामासाठी समान वेतनाची तरतुद करण्यात आली आहे. कलम '42' नुसार प्रसुतीविषयक सहायता साठी तरतुद करण्यात आली आहे. कलम '51' (क) भाग '5' (ड) नुसार महिलांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या सर्व प्रथांचे निर्मूलन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य राहिल असे म्हटले आहे. मूलभूत अधिकार निर्देशक तत्वे व राज्य धोरणाच्या भाग III व भाग IV मध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने नागरिक म्हणून गणण्यात आले आहे. महिलांना मिळालेल्या या सर्व अधिकारामुळे ती आज सर्वच क्षेत्रात स्वाभीमानाने जिवन जगताना दिसते आहे व राष्ट्राच्या विकासासाठी पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात कार्य करीत आहे.

**संविधानिक तरतुदीमुळे जातीभेदाला आळा बसला म्हणून राष्ट्राचा विकास झाला :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, भारतात प्रत्येक जात हे स्वतंत्र राष्ट्र आहे. जातीची विषमता पायऱ्याची श्रेणीबध्द विषमता आहे ती घालवायची असेल तर राष्ट्रीय निर्धाराची गरज आहे. हा निर्धार करु शकलो तर भारताला एकोपा असलेले राष्ट्र बनण्यापासून आणि जगाची महासत्ता बनण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. डॉ. आंबेडकरांनी आपल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक चळवळीत 'माणूस' हा केंद्रबिंदू मानला दुर्देवाने आपल्या भारतात माणसाला कधीचे कोणत्याच कालखंडात केंद्रबिंदू मानलेले नव्हते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत धर्मकर्त्यांनी जातीला महत्त्व दिले. धर्माला व जातीला केंद्रबिंदू मानले. रुढी, परंपरेला श्रेष्ठ मानले त्यामुळे माणसाची किंमत माणसाचे महत्त्व याला मातीमोल केले. भारतात माणसांची त्यांच्या गुणांची कर्तृत्वाची पूजा करण्यापेक्षा दगड, पशू, पक्षी, झाडे यांची पूजा धर्माने आणि रुढी परंपरेने करायला शिकविले आणि म्हणूनच धर्मापुढे व धर्मशास्त्रापुढे रुढी

परंपरेमुळे अस्पृश्य म्हणून मानलेला माणूस पशुपेक्षाही हीन झाला. माणसासारख्या माणसाला अस्पृश्य म्हणून हीन लेखल्यामुळे भारताची पिछेहाट झाली. या सर्व बाबी लक्षात घेऊन जाती निर्मूलनासाठी बाबासाहेबांनी पोटजाती नष्ट करणे, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे, धर्मशास्त्राची पवित्रतेची भावना नष्ट करणे अशा काही तरतुदी सांगितल्या आहेत. तसेच कलम '17' अंतर्गत अस्पृश्यता हा सामाजिक गुन्हा ठरविण्यात आला. जे लोक अस्पृश्यता पाळतील त्यांना शिक्षेची तरतुद करण्यात आली. कलम 25 अंतर्गत धर्म, जात व लिंग यात भेद करता येणार नाही सर्वांना मंदिरात प्रवेशाचा अधिकार देण्यात आला. कलम '29' अंतर्गत शाळा महाविद्यालयात सगळ्यांना प्रवेश द्यावा. कलम '275' अंतर्गत अनु. जाती जमातीच्या कल्याणासाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी विशेष निधीची तरतुद करण्यात आली. कलम 164(1) नुसार अनु. जाती जमाती इतर मागासवर्गाच्या कल्याणासाठी स्वतंत्र मंत्री नेमण्याची तरतुद करण्यात आली. कलम 330, 332, व 334 नुसार लोकसभा व विधानसभेच्या मतदार संघात अनु. जाती, जमातीच्या उमेदवारासाठी राखीव ठेवण्याची तरतुद करण्यात आली. या सर्व तरतुदीमुळे जातीभेद कमी होण्यास मदत झाली व ही अर्धी शक्ती उपयोगात आणता आल्यामुळे आपल्या राष्ट्राची विकासाकडे वाटचाल सुरु झाली.

**सारांश :**

आधुनिक भारताच्या सर्वांगीण उभारणीमध्ये ज्या नेत्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहेत त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अग्रस्थानी आहेत. स्त्री पुरुष समानता, जातीनिर्मूलन, संसाधनाचे फेरवाटप, सर्वांना शिक्षण, धर्मचिकित्सा ही मूलभूत विषयपत्रिका घेऊन त्यांनी लढे उभारले. संविधानिक हक्क, समाज प्रबोधन, संघटन, संघर्ष याद्वारा राज्यसत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, प्रशासन, न्यायव्यवस्था, ज्ञानसत्ता, सांस्कृतिक सत्ता यात अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व मिळवून दिले. म्हणून खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आज सामाजिक न्यायाचे प्रतिक बनले आहे.

भारताच्या संविधान निर्मात्याकडे देशातील सर्वसामान्याच्या उज्वल भवितव्याकडे बघण्याची दुरदृष्टी होती. म्हणून राज्यघटना लिहिताना भारताचा प्रदीर्घ इतिहास, चालिरिती, धर्म, पंथ, सर्वमान्य

भावना व लहान मोठ्यासह सर्व घटकांचा विचार करुन घटनेला जे रुप बाबासाहेबांनी दिले त्यामुळे आजही भारत एकाच सुत्रात बांधलेला आहे. जगात ठिकठिकाणी अनेक स्थित्यंतरे झालीत. मोठमोठी साम्राज्ये कोलमडलीत पण आपल्या संविधानाची चौकट भविष्याचा वेध घेऊन सामाजिक बांधीलकी आणि बुध्दीमत्तेच्या पायावर सुरक्षित आहे. आपले संविधान म्हणजे लाखो करोडो सामान्य भारतीयांच्या मनाची स्पंदन आहे, श्वास आहे. आपल्या देशात स्वाभीमानाने, निर्भयपणे जगण्याचा विश्वास आहे. आपली घटना बहुमोल देणगी समजून ती अबाधीत राहिल ही आजच्या व उद्याच्या पिढीची जबाबदारी आहे. संविधान अबाधीत ठेवण्यातच राष्ट्राचा विकास आहे.

**संदर्भ :**

नरके, हरी (संपादन). डॉ. आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 20

पानतावणे, गंगाधर (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख. पुणे : प्रतिमा प्रकाशन.

लांजेवार, ज्योती. फुले आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ. नागपूर : संकेत प्रकाशन.

गणवीर, रत्नाकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोडबील. नेहा प्रकाशन. नागपूरी 17

भारतीय संविधान. समता प्रकाशन.

क्रांतीसूर्य विशेषांक.

सकाळ विशेषांक.

# समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

**डॉ.बी.एच.किर्दक**
प्राध्यापक व प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
श्री सं.ग.म.महा. बोरगाव मंजू, ता.जि. अकोला, महा.

..........................................................................................................................................................

प्रस्तावना

जागतिक समाजाच्या तुलनेत भारतीय समाजाचे एक आगळे–वेगळे वैशिष्ट्य म्हणजे भारतातील वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था होय. ''आर्य भारतात आले तेव्हा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य असे तीन सुस्पष्ट वर्ण निर्माण झाले होते. आर्यांनी त्यांच्यावर स्वामित्व मिळवले होते अशा येथील मूळच्या स्थानिक रहिवाशांचा समावेश शुद्रात करण्यात आला''. हिंदू जातीव्यवस्था ही आर्यानी निर्माण केली या सेनार्ट यांच्या विचारांशी डॉ. घुर्ये सहमत होते. भारतातील चातुर्वर्ण्यव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णाचा समावेश होता. हे चारही वर्ण विषमतेवर आधारित होते. नंतरच्या काळात हे चार वर्ण चार जाती बनल्यात व नंतर शेकडो जाती निर्माण झाल्यात. साधारणत: इ. स. पूर्व ३०० पासून जातीव्यवस्था अस्तित्वात आली असे मानल्या जाते. आज संपूर्ण देशभर जातिव्यवस्था हा सामाजिक स्तरीकरणाचा आधार बनलेली आहे. जातीव्यवस्था भारतीय समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. जातीव्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जात असमानतेवर आधारीत आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे व मधल्या जाती या उच्च जातीपेक्षा कनिष्ठ आणि कनिष्ठ जातीपेक्षा उच्च आहेत. व्यक्तीचा जन्म ज्या जातीत होतो त्या जातीचा दर्जा व्यक्तीला मिळत असतो. समाजव्यवस्थेने ठरवून दिलेल्या निकषानुसार एका जातीचा दुसऱ्या जातीशी व्यवहार होत असे. एका जातीचा दुसऱ्या जातीशी रोटी–बेटी व्यवहार होत नसे. कोण्या जातीच्या व्यक्तीने कोणत्या जातीच्या व्यक्तीच्या हातचे कोणते अन्न घ्यावे वा घेऊ नये यावर कडक निर्बंध होते. पेशवाईत तर एका जातीच्या व्यक्तीच्या स्पर्शाने दुसऱ्या जातीच्या व्यक्तीला विटाळ होत असे. शूद्र समजल्या जाणाऱ्या अस्पृश्य जातीवर तर अनेक निर्बंध घातले होते. त्यांच्या स्पर्शाचाच नाहीतर सावलीचा सुद्धा विटाळ मानण्यात येत असे. शुद्रांनी रस्त्यावर चालताना आपल्या पावलाचे ठसे उमटुन नये म्हणून त्यांच्या कमरेला झाडू बांधण्याची पद्धत प्रचलित होती. ऐवढी पराकोटीची विषमता भारतीय समाजात होती. या व्यवस्थेत काही जातीला विशेषाधिकार देण्यात आले होते तर काही जातीवर कडक निर्बंध लादण्यात आले होते. त्यांना शिक्षणापासून भरपूर पैसे मिळणाऱ्या व्यवसायापासून वंचित ठेवण्यात आले होते. एवढी पराकोटीची विषमता भारतीय समाजात होती.

**चवदार तळ्यवरील सत्याग्रह व मंदिर प्रवेशासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार**

डॉ. आंबेडकरांनी १९२५ मध्ये माधाराव गोविंदरव मेश्राम यांच्या नेतृत्वात अमरावती येथील अंबादेवी मंदिरात जाण्याचा व देवी दर्शनाचा सत्याग्रह सुरू केला. ३ मार्च १९३० ला नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह सुरू केला. बाबासाहेबांच्या कालखंडात चवदार तळे सत्याग्रहाप्रमाणेच मुखेड येथील सत्याग्रह व अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह येतात. या सत्याग्रहाच्या माध्यमातून मंदिरात प्रवेश किंवा जलप्राशन करून तृष्णा भागविण्याचा आंबेडकरांचा प्रयत्न नव्हता. तर बाबासाहेब या घटनांच्या माध्यमातून धार्मिक समतेचा मूलभूत हक्क प्रस्थापित करावयाचा होता. या सत्याग्रहाच्या माध्यमातून अस्पृश्यांना स्पृश्य हिंदूंनी माणूस म्हणून स्वीकारावे ही आंबेडकरांची भूमिका होती. ''चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी पिलो नव्हतो तर आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जायचे ते त्या तळ्याचे पाणी पिण्याकरिता नाही तर इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळ्यवर जायचे आहे.''[६] चवदार तळ्याच्या सत्याग्रहामागे बाबासाहेबांची भूमिका माणसाला माणूसपण मिळवून द्यायची होती.

मंदिर प्रवेशाबाबतच्या सत्याग्रहाची भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणतात की, मंदिर प्रवेश केल्याने आमचे प्रश्न सुटणार नाही हे आम्हाला माहित आहे. पण स्पृश्यांनी (सवर्णांनी) आपले हृदय परिवर्तन करावे असे आमचे प्रयत्न होते. पण असल्या प्रयत्नाने स्पृश्य समाजावर कोणता सकारात्मक परिणाम होत नाही, असे बाबासाहेबांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी १९४४ पर्यंत सर्व मंदिर प्रवेशाला स्थगीती दिली. हीच भूमिका त्यांनी आपल्या 'बहिष्कृत भारतात' स्पष्टपणे मांडली आहे. ''अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील कलंक आहे असे आम्ही मानत होतो. पण आता आमची दृष्टी फिरली आहे व अस्पृश्यता हा आमच्या नरदेहावरील कलंक आहे असे आम्ही समजतो. हा हिंदु धर्मावरील कलंक आहे असे आम्ही जोपर्यंत मानीत होतो तोपर्यंत तो काढून टाकण्याचे कार्य तुमच्यावर सोपविले होते. हा आमच्यावरील कलंक आहे अशी आमची जाणीव झाल्यामुळे तो धुवून काढण्याचे पवित्र कार्य आता आमचे आम्हीच स्वीकारले आहे.[७] शेवटी १३ मार्च १९३५ ला येवला परिषदेतील भाषणात बाबासाहेब म्हणाले की, ''दुर्दैवाने मी अस्पृश्य म्हणून जन्मास आलो. हा काही माझा अपराध नाही परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही.''[८] या यांच्या घोषणेने सर्व हिंदू समाजमन ढवळून निघाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील १९३५ ते १९५६ चा कालखंड हा अतिशय महत्वाचा आहे. या काळात ते अस्पृश्यात राजकीय जाणीवजागृती करण्याचे, त्यांना राजकीय स्वातंत्र्य यासाठी बाबासाहेब प्रयत्नरत होते. १९२८ मध्ये सायमन कमिशन, १९३० नंतरच्या राऊंड टेबल कॉन्फरन्स, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना, मुंबई विद्यापीठातील कार्य, व्हाईसराय कार्यकारणीचे सदस्य या प्रमुख घटना आहेत की ज्याच्या माध्यमातून अस्पृश्यांचा राजकीय हक्क प्रस्थापनेचा त्यांचा हेतू आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू संस्कृतीबाबतचे विचार**

हिंदू संस्कृतीबाबत बाबासाहेब म्हणतात, ''कोणी तिचे मूल्य ठरविण्याचा प्रयत्न केल्यास हिंदू संस्कृतीला संस्कृती म्हणता येणे कठीण आहे. मानवतेवर बंधने लादून तिला गुलाम बनविण्याचा हा अधमपणाचा कावा आहे असेच तिच्यासंबंधी म्हणावे लागेल. बंदफैलीपणा हेच नाव तिला शोभून दिसेल''[९] या बंदफैली संस्कृतीला सोडण्याचा संकल्प मी करीत आहे. कारण हिंदू संस्कृती माणसाची नव्हेच. ब्राह्मण ही माणूस आणि बाकी सर्व पशुची संस्कृती आहे. जिथे माणसाला पशूपेक्षाही हीन वागणूक मिळते, त्या संस्कृतीत माणुसकी नाही, जी संस्कृती दास्यता, गुलामगिरी, लाचारी स्वीकारते, स्वाभिमान, विवेकवाद, प्रामाण्यवाद, बुद्धी तर्कवादी, सौंदर्यवाद कायमचा संपवितो अशा हिंदुत्ववाद बेनाम ब्राह्मणवादाच्या शरणावर कोण बरे राहणार? ज्यांना घाण आवडते, अन्याय सन्मान वाटतो अशा अंधारप्रिय आणि आंधळ्या लोकांची संस्कृती म्हणजे ब्राह्मणवाद हिंदू संस्कृती होय. अशा संस्कृतीचा त्याग करून समतेवर आधारित माणसामाणसात कोणताही भेदभावाला थारा नसणाऱ्या सर्व स्त्री—पुरुषांना समान लेखणाऱ्या बौद्ध धम्माचा बाबासाहेबांने १४ ऑक्टोबर १९५६ ला स्वीकार करून भारतीय समाजात समता निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल होय.

भारतीय समाजात केवळ जात जातीवर आधारितच विषमता नव्हती तर समाजाचा सभासद असणाऱ्या मानवात सुद्धा स्त्री—पुरुष या आधारावर विषमता होती. पूर्वी भारतीय समाजात स्त्रियांवर धर्माने अनेक प्रकारचे निर्बंध लादले होते. त्यांना आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक हक्कापासून वंचित ठेवण्यात आले होते.

**आदिम काळातील स्त्री जीवन**

आदिम काळात स्त्री—पुरुष असे गट नव्हते. मात्र, श्रम विभाजनामुळे पुढे त्यांच्यात स्त्री पुरुष असे गट निर्माण झाले. श्रमविभाजनामुळे निर्माण झालेले हेच गट पुढे स्त्रियांच्या दास्याला कारणीभूत झाले. आदिम काळात स्त्री ही मुक्त होती. शेतकरी गटात तिला जास्त महत्व व स्वातंत्र्य दिले होते. ती स्वतःच्या विकासासोबतच मानवी विकासालासुद्धा हातभार लावत होती. उत्पादनाची नवनवीन साधने ती शोधून तयार करीत होती. स्त्री—पुरुष असा वर्णभेद नसल्याने कोणतेही काम हे 'बायकी' वा 'पुरुषी' ठरविले जात नव्हते. या काळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते.

**वैदिक काळातील स्त्री जीवन**

वैदिक काळात स्त्री—पुरुषाचा दर्जा समान होता. एका रथाची दोन चाके म्हणजे स्त्री—पुरुष असे मानल्या जात असे. ''स्त्रीला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्वातंत्र्य तर होतेच पण स्वतःच्या जोडीदार निवडीबाबतही स्वातंत्र्य होते. स्त्रीशिवाय पुरुषाला पूर्वत्व नाही अशी भावना समाजमनात दृढझाली असल्यामुळे तिच्याकडे पाहण्याची एकंदरीत सामाजिक दृष्टी स्वच्छ होती. ''[२] वेदकाळात आर्यांची कुटुंबसंस्था पितृसत्ताक असली तरी स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ मानला जात नव्हता.

**उत्तर वैदिक कालखंड**

ऋग्वेदकाळानंतर 'ब्राह्मणयुग' ही वैदिक संस्कृतीची द्वितीय अवस्था आहे. वैदिक काळातील स्त्रीयांचा उच्च दर्जा दीर्घकाळ टिकला नाही. उत्तर वैदिक काळात सामाजिक व राजकीय परिस्थितीला उतरती कळा लागली. वैदिककाळात स्त्रियांना असलेला शिक्षणाचा, अध्यात्माचा, विवाहाचा आणि राजकीय अधिकार उत्तर वैदिक काळात संपुष्टात येऊन हळूहळू स्त्रियांवर बंधने येऊ लागली. त्यांची सामाजिक प्रतिष्ठा कमी होऊ लागली. त्यांचा शिक्षणाचा स्तर घसरला. ''ऋग्वेदीक काल के बाद उत्तर वैदिक काल आया और इसीके साथ महिलाओंकी राजनैतिक स्थितीमें कुछ गिरावट आई। 'शूद्रों' के साथ साथ महिलाओको भी वैदिक साहित्य पढने से रोक दिया और 'विदथ' में उसका प्रवेश निषेध कर दिया गया''[३] ''या काळात मुलगी म्हणजे दु:खाचे मूळ असे समजण्यात येऊ लागले. त्याचा वारसा हक्क काढून घेण्यात आला. वंशपरंपरागत मालमत्तेवर तिचा कोणताही हक्क उरला नाही.''[४] मुलगी ही सर्व दु:खाचे मूळ असून मुलगा हाच कुटुंबाचा रक्षक आहे असा समज निर्माण झाला. मुलगीही विवाहानंतर दुसऱ्याच्या घरी जाते म्हणून ती उपयुक्त नाही अशा प्रकारची धारणा या काळात निर्माण झाली.

थोडक्यात वैद्यकीय काळापेक्षा उत्तर वैदिक काळात स्त्रियांवर अनेक बंधने येऊन स्त्रियांचा समाजातील दर्जा पूर्णपणे घसरला होता.

**प्रारंभिक स्मृतीकाळ**

मनुस्मृतीमध्ये सर्व माणसाच्या जीवनप्रणालीचे नियम, अधिकार व कर्तव्य सांगितली आहेत. याच मनुस्मृतीमध्ये स्त्रियांनी कसे वागावे? व कसे वागू नये? काय करावे? काय करू नये? याची कठोर बंधने स्त्रियांवर लादली आहेत. मनुस्मृतीने स्त्रियांना हक्क–अधिकार नाकारले आहेत. पण त्याचवेळी त्यांनी दिलेली कर्तव्य पार पाडली पाहिजेत अशी बंधने स्त्रियांवर लादलेलीत. त्यांच्या विकासाचे सर्व मार्ग बंद करून पुरुषांची दासी व गुलाम बनविणारी बंधने त्यांच्यावर लादली आहेत. स्मृतीकाळ हा स्त्रियांच्या दर्जाच्या बाबतीत संक्रमणाचा काळ आहे. या काळात स्त्रियांचा दर्जा अधिकच खालावला. मनुस्मृतीने स्त्रियांची जेवढी निंदा करता येईल तेवढे केली. म्हणून मनुस्मृतीला स्त्री निंदेची गीता म्हणता येईल. या काळात स्त्रियांवर अनेक बंधने लादल्यामुळे तिचा दर्जा खालावला होता.

**उत्तर स्मृतीकाळ**

उत्तर स्मृतीकाळात स्त्रियांचा दर्जा खालावला होता. स्त्री परतंत्र, पराधीन व असहाय्य ठरली. या काळात स्त्रिची गणना शुद्रात होऊ लागली. या काळात मनुस्मृतीचा हिंदू समाजमनावर फार मोठा प्रभाव पडला होता. धर्मनीतीमध्ये स्त्रियांना शुद्र व गुलामाप्रमाणे दर्जा दिला. कोणत्याही अवस्थेत स्त्रीला स्वातंत्र्य देऊ नये तर तिच्यावर वडील, पती आणि मुलाचा अंकुश असावा असे मनुस्मृतीत सांगितले गेले व मनुस्मृतीचा समाजमनावर पगडा असल्यामुळे स्त्रियांचा दर्जा फारच खालावला होता.

**रामायण व महाभारत काळ**

रामायण व महाभारत ते दोन प्रसिद्ध असे महाकाव्य आहे. ही दोन महाकाव्ये हिंदू धर्माचे महान ग्रंथ म्हणून ओळखले जातात. या महाकाव्यातील कथांचा व घटनांचा अभ्यास केल्यास तत्कालीन जीवनपद्धती लक्षात येते. रामायणातील स्त्रीविषयक विचार, महाभारतातील स्त्रीविषयक विचार यात बरेच साम्य दिसून येते. रामायण, महाभारत ही पुरुषी वृत्तीचे, स्त्रियांच्या दास्याचे समर्थन करणारे आहेत. या काळात सामान्य स्त्रियांचा दर्जा हा शुद्रासारखाच होता. तिचे स्थान गौणच होते. पतिव्रता धर्माचे पालन करणे व पती हाच परमेश्वर यात तिला बंदिस्त केले होते. म्हणूनच पती धृतराष्ट्र आंधळा म्हणून जीवनभर गांधारी डोळ्यावर पट्टी बांधूते, सर्व सुख व राजवैभव नाकारून सीता रामासोबत वनवासात जाते. या स्त्रिया पतिव्रता धर्माचेच पालन करतात. या काळात स्त्रिची स्वत:ची ओळख नव्हती तर पिता किंवा पतीवरूनच तिची ओळख होत होती. गितेतसुद्धा स्त्रीला कनिष्ठ व शुद्र मानले गेले आहे.

**मध्ययुगीन कालखंड**

अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतचा कालखंड म्हणजे मध्ययुगीन कालखंड होय. हा काळ सुलतानशाही, मोगलशाही व मराठेशाहीचा कालखंड आहे. या काळात भारतीय स्त्रियांची अधिकच अवनती झालेली दिसून येते. या काळात स्त्रियांना बंधनात ठेवणाऱ्या व कनिष्ठ मानणाऱ्या अन्यायी मनुस्मृतीचा अमंल चालूच होता. या काळात स्त्रीजीवन अत्यंत दयनीय बनले. त्यांचा दर्जा अतोनात खालावत गेला. भारतीय स्त्रीच्या जीवनातील अत्यंत अंधकारमय कालखंड म्हणजे मध्ययुगीन कालखंड होय. ''या कालखंडात विधवाचा वाट्यला येणारे दु:ख इतके भयंकर होते की, या दु:खाला इतिहासात कुठेही तोड नाही. तिला विद्रूप केले जायचे, तिचे केशवपन करून अंधार कोठडीत तिला जगायला भाग पाडले जाई, अगदी सकाळच्या प्रहरी तिचे तोंड पाहणे अपशकुन मानले जाई, तिच्या खाणेपिणे, कपडेलत्ते यावर सक्त नियंत्रण असे.''[५]

**ब्रिटिश कालखंडातील भारतीय स्त्री**

ब्रिटिश कालखंड हा स्त्रियांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालखंड आहे. याच काळात स्त्री आणि शूद्र यांना कधी नव्हते एवढे स्वातंत्र्य मिळाले. ब्रिटिशांनी उदारमतवादी व सुधारणावादी धोरण स्वीकारले, शिक्षण व औद्योगिक विकासाला चालना दिली. स्त्रियांच्या हिताचे अनेक कायदे केले. अनेक सुधारणा केल्या. त्यांनी कायद्याचे राज्य निर्माण केले. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश राजवटीच्या रुपाने भारतीय स्त्री जीवनात पहाट उगवली. या काळात इंग्रजी शिक्षण घेऊन तयार झालेल्या पिढीने आपल्या समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा ह्य अन्यायकारक वाटू लागल्या. त्यातूनच भारतीय समाजाला प्रगतीच्या व विकासाच्या दिशेने घेऊन जाण्याचे कार्य समाजसुधारक करू लागले.

या काळात भारतात स्त्री सुधारणा चळवळीचे दोन विचारप्रवाह होते. पहिला विचारप्रवाह हा प्रस्तापित समाजातील मूल्यव्यवस्थेमध्ये स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असा आग्रह धरणारा होता. तर दुसरा विचारप्रवाह हा प्रस्थापित समाजातील मुल्ये संस्कृतीच्या चौकटीवर हल्ला करून स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा होता. या काळात अनेक स्त्री–पुरुष समाजसुधारकांनी स्त्रियांची दयनीय स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

एकंदरीत प्राचीन काळापासून तर ब्रिटिश कालखंडापर्यंत स्त्रिजीवनावर अनेक बंधने लादल्या जाऊन त्यांना गुलामगिरीत शुद्राप्रमाणे जीवन जगण्यास भाग पाडले जात असे. अशा या स्त्रिजीवनात स्त्री–पुरुष समस्या निर्माण करून समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान काय ते पाहणे आवश्यक आहे

**स्त्री उद्धाराकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले हिंदू कोडबिल**

बाबासाहेबाचे हिंदू कोडबिल म्हणजे स्त्री गुलामीला लावलेला सुरूंग होता. ते स्त्री जीवनातील अंधार संपविणारा प्रकाशझोत होता. भारतीय स्त्री हिंदू कोडबिलाच्या माध्यमातून स्त्री स्वातंत्र्याच्या प्रकाशत येणार होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण समाजव्यवस्थेत परिवर्तन हवे होते आणि हे परिवर्तन कायद्याच्या माध्यमातून साकार करण्याचा ते प्रयत्न करीत होते. हिंदू कोडबिलमुळे भारतीय स्त्रियांना न्याय मिळणार हे निर्विवाद सत्य होते. कोडबिलाच्या माध्यमातून भारतीय स्त्री परंपराच्या विषारी आणि विषमता मुक्त होणार होती अशी बाबासाहेबांची धारणा होती.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान हक्क प्रदान केले. मात्र, प्रत्यक्षात व्यवहारात स्त्रिया समान हक्कापासून वंचित राहिल्या होत्या. हे लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेबांनी 'सिलेक्ट कमिटीची' पुनर्बांधणी करून विवाह वारसाहक्क, दत्तक विधान, उत्तराधिकार, घटस्फोट पोटगी इत्यादी अनेक गोष्टीचा हिंदू कोडबिलात समावेश करून कायद्याने स्त्रियांना संरक्षण दिले. हिंदू कोड बिलाबाबत आपली भूमिका विशद करताना बाबासाहेब म्हणतात की, हे बिल मी कोणत्याही धर्माच्या विरोधात मांडलेले नाही किंवा द्वेषापोटी मांडलेले नाही तर जगात पुरुषांइतकेच स्त्रियाही आहेत, त्यांना समान हक्क मिळवयासच हवे या मानवतावादी दृष्टिकोनातून बाबासाहेब हिंदू कोड बिलाकडे पाहत होते. आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलात असे काय होते की, ज्यामुळे त्या बिलाला प्रचंड विरोध झाला. काय हिंदू कोड बिलामुळे स्त्री–पुरुषात समता प्रस्थापित होऊ शकत होती? याचा मागोवा घेण्यासाठी हिंदू कोड बिलाची हे प्रत्यक्षात ओळख होणे महत्वपूर्ण वाटते.

हिंदू कोडबिल हे स्त्री स्वातंत्र्याचे नंदनवनच होते. मात्र, हिंदू कोडबिलापूर्वीचा कायदा पाहिला तर तो स्त्रियांवर अन्याय करणारा जुलूम करणाराच होता. मुलगी जन्मताच तिला गुलामीच्या आगीत जाळणारा, गुलामीच्या शृंखलानी जखडणारा होता. स्त्रियांच्या संदर्भात हिंदू कायदा अत्याचारी आणि गुलामीला काळोखाला सन्मानाने पोसणारा होता. या काळात धर्म म्हणजे कायदा, मनुस्मृति म्हणजे कायदा होता.

हिंदू कोडबिलाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, ''पार्लमेंटपुढे यापूर्वी आलेल्या किंवा यानंतर येणाऱ्या कोणत्याच कायद्याची बरोबरी या हिंदू कोडबिलाबरोबर करता येणार नाही असे त्याचे महत्त्व आहे.''[१०] यावरून हिंदू कोडबिल बाबासाहेबांना किती महत्वाचे वाटत होते हे स्पष्ट होते. हिंदू कोडबिल भारतीय संविधानाला पुरक होण्याचे आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही तत्त्वे प्रत्यक्षात अस्तित्वात आणण्याचे महनीय कार्य डॉ. आंबेडकरांचे हिंदू कोडबिल करणार होते. म्हणुनच त्यांनी राज्यघटनेपेक्षा हिंदू कोडबिल अधिक महत्त्वाचे आहे असे घोषित केले होते.

हिंदू कुटुंबपद्धतीच्या मालकीची जी स्थावर–जंगम मालमत्ता असेल तिची व्यवस्था व वाटप पद्धती कशी असावी यासंबंधी अनेक धर्मशास्त्र पंडितांनी टीका लिहिल्या .त्यापैकी दोन टीका प्रमुख ठरल्यात. त्यापैकी एक म्हणजे अकराव्या शतकात विज्ञानेश्वर यांनी जे नियम केले ते 'मिताक्षर' या नावाने प्रसिद्ध आहे. तर दुसरे म्हणजे पंधराव्या शतकात जिमुत वाहनाने जे नियम

केले ते 'दायभाग' म्हणून प्रसिद्ध आहेत. या दोन नियम पद्धती भारताच्या निरनिराळ्या भागात सुरू होत्या. मिताक्षर पद्धत प्रथम गुजरातमध्ये चालू होती. त्यानंतर ती बंगाल सोडून बाकी सर्व भारतात प्रचलित झाली. तर दायभाग फक्त बंगालमध्येच प्रचलित होती. मिताक्षराने स्त्रियांचे सर्व कौटुंबिक वारसाहक्क नाकारले होते. तर दायभागमध्ये स्त्रियांना पोटगीचा हक्क देण्यात आला होता. ही पोटगी द्यावी लागू नये म्हणून धर्ममार्तंडांनी स्त्रियांना सती जाण्यास भाग पाडले.

**हिंदू कोडबिलाअंतर्गत तरतुदी**

डॉ. आंबेडकरांचे हिंदू कोडबिल म्हणजे सामाजिक असमानता, भेदभाव, विषमता पसरविणाऱ्या आणि स्त्रियांना बंदिस्त ठेवणाऱ्या चालीरीतीवरील प्रहार होता. हे बिल सर्व जाती, संप्रदाय, विर–शैव, प्रार्थना समाज, ब्राह्मण, लिंगायत, बौद्ध, जैन आणि शीख या सर्वांनाच लागू करण्यात आले होते. यात विवाह विच्छेद, दत्तक घेणे, संपत्तीत मुलीला मुलाबरोबरचा हिस्सा व उत्तराधिकारी नेमण्याचा अधिकार इत्यादी गोष्टींचा समावेश बाबासाहेबांनी केला होता.

**अ) विवाह**

हिंदू कोडबिलात 'शास्त्रोक्त' व 'सिव्हिल' असे दोन प्रकार स्वीकारले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही शास्त्रोक्त पद्धतीच्याच विवाहालाच मान्यता होती. मात्र आज सिव्हिल विवाहाचा स्वीकार होत आहे. हिंदू कोडबिलात शास्त्रोक्त पद्धतीच्या विवाहाकरिता पुढील पाच अटी ठेवण्यात आल्या होत्या

१. वर अठरा वर्षाचा आणि वधू १४ वर्षांची असली पाहिजे.
२. विवाहाच्या वेळी वराची पत्नी आणि वधूचा पती जिवंत असावयास नको.
३. वधू आणि वराचा असा संबंध नसावा की जो विवाहाच्या निषेधात्मक गोष्टीच्या अंतर्गत येतो
४. वधू आणि व परस्पर सपिंड नसावे.
५. वधू आणि वर पैकी कोणीही मनोरुग्ण अथवा वेडसर नसावा. हिंदू कोडबिलात तत्कालीन कायद्यापेक्षा काही गोष्टी भिन्न होत्या. जशा की, शास्त्रोक्त विवाहासाठी वर वधू समान वर्ण आणि उपवर्णाचे असले पाहिजे. या गोष्टीला बाबासाहेबांनी कुठेही स्थान दिले नव्हते. वर वधू एक वर्णाचे असोत वा नसोत हिंदू कोडबिलाअंतर्गत त्यांच्यात विवाह होऊ शकतो तसेच एकाच गोत्र, प्रवराच्या वधू–वरांत विवाह होऊ शकतो.

**ब) विवाह विच्छेद :**

पूर्वीच्या कायद्यातील बहुपत्नीत्वाला रद्द करून कोडबिलात एकपत्नीत्वाची अट टाकण्यात आली. शास्त्रोक्त विवाह हा अविच्छेदय होता. मात्र, कोडबिलात विवाहविच्छेदाची व्यवस्था करण्यात आली. हिंदू कोडबिलानुसार विवाहबद्ध झालेल्या वधूवरांना तीन उपायांद्वारे विवाहविच्छेद घेण्याचा अधिकार देण्यात आला होता.

१. विवाह रद्द करणे
२. विवाहास अवैद्य घोषित करणे
३. विवाह विच्छेद करण्याचा अधिकार

हिंदू कोडबिलानुसार पुढील कारणामुळे विवाह अवैध घोषित करता येतो

१. जर विवाहाच्या वेळी वराची पत्नी किंवा वधूचा पती जिवंत असेल
२. वधू–वराचा परस्परसंबंध असा असेल की, जो विवाहाकरिता निषिद्ध आहे.
३. प्रजननक्षमता शिण असल्यास
४. वधू–वराचे सपिंडत्व
५. वर किंवा वधू मनोरुग्ण असल्यास
६. जर पालकाची अनुमती, जबरदस्ती, धोका किंवा फसवणूक करून प्राप्त केलेली असेल.
७. घटस्फोटाची सतत शंका येत असेल तर

विवाह रद्द करण्याच्या उद्देशाने विवाहापासून तीन वर्षाच्या काळात कोर्टात केस दाखल करावयास हवी. अन्यथा ही केस चालू शकणार नाही व असेही समजण्यात येईल की विवाह अवैधतेकरिता कोणतेही कारण नाही. विवाह कोर्टातून अवैध घोषित केला तरी त्याचा वैध मुलावर कोणताही प्रभाव पडणार नाही व त्या मुलांना वैधच मानण्यात येईल.

**घटस्फोट**

हिंदू कोडबिलाअंतर्गत खालील सात कारणाद्वारे घटस्फोट दिल्या जाऊ शकत होता

१. परित्याग २. धर्मपरिवर्तन ३. रखेली ठेवणे किंवा रखेली बनणे ४. संक्रमण गुप्तरोग ५. असाध्य उन्माद ६. भयंकर आणि असाध्य कुष्ठरोग ७. क्रुरतापूर्वक व्यवहार

**संपत्तीच्या जन्मसिध्द अधिकाराची समाप्ती :**

दत्तक घेण्यासंदर्भात हिंदू कोडबिलात दोन नियम करण्यात आले होते.

१. जर पती कुणाला दत्तक घेऊ इच्छित असेल तर त्याला कोडबिलानुसार त्याला आपल्या स्वत:च्या पत्नीची स्विकृती आवश्यक राहील. जर त्याला एकापेक्षा अधिक पत्नी असेल तर अशावेळी त्यास कोणत्यातरी एका पत्नीची स्विकृती घेणे आवश्यक राहील.

२. विधवाही केवळ अशाच परिस्थितीत दत्तक घेऊ शकेल की, जेव्हा ती त्याकरिता निश्चित आदेश सोडून ठेवला असेल. कोर्टापर्यंत जाणाऱ्या झगड्यांना आळा घालण्यासाठी मृत पतीने आपल्या पत्नीकरिता कोणातरी आदेश लिहून ठेवला आहे किंवा नाही हे महत्त्वाचे ठरते. कोड बिलानुसार दत्तकाची नोंदणी आवश्यक आहे. त्यात अल्पवयीन व त्याचे पालकत्व याबाबतही कायदा निर्माण झाला होता.

**संपत्ती**

हिंदू कोडबिलात संपत्तीच्या संदर्भात पुढील अधिकार दिलेले आहेत

१. जन्मसिद्ध अधिकाराची समाप्ती व उत्तराधिकाराच्या अनुसार संपत्तीच्या प्राप्तीची उपलब्धी या बिलाने करून दिली

२. मुलांना संपत्तीचा अर्धा हिस्सा देण्याच्या संदर्भात कोड बिलाअंतर्गत सूचना करण्यात आली होती.

३. या बिलाने स्त्रिच्या संपत्तीसंबंधी सीमित अधिकाराला पूर्ण अधिकाराच्या रूपात परावर्तित केले.

४. एकपत्नीत्व ठेवणे

५. घटस्फोटाची तरतुद

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्वांना कोड बिलातून समाजात रुजविण्याचा डॉ.आंबेडकरांचा प्रमुख उद्देश होता. म्हणूनच त्यांनी स्त्रियांही पुरुषांप्रमाणेच समान अधिकार बहाल केले होते. आतापर्यंत हिंदू कायद्याने स्त्रियांवर अन्याय केला होता. या अन्यायाच्या अंधकारातून प्रकाशात आणण्याचा व समाजात स्त्री—पुरुषात असलेली विषमता नष्ट करून समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केलेला दिसून येतो.

**संविधानातील तरतुदी**

संपूर्ण जागतिक समाजव्यवस्थेत भारतीय समाजाचे एक आगळेवेगळे वैशिष्ट म्हणजे भारतातील जातीव्यवस्था होय. जातिव्यवस्थेने भारतीय समाजाचे असंख्य तुकडे केले आहे. समाजव्यवस्थेत सर्वच जातीचा दर्जा हा सारखा नाही. विषमता हा येथील जातीव्यवस्थेचा आधार आहे. प्रत्येकच जात काही जातींना श्रेष्ठ मानते तर काही जातींना कनिष्ठ मानते. ही विषमतेवर आधारित जातीव्यवस्था नष्ट करून समताधिष्ठित भारतीय समाजाच्या निर्मितीत भारतीय संविधानात काही तरतुदी करून विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या तरतुदी खालीलप्रमाणे

१. भारतीय संविधानाच्या १५ व्या कलमानुसार राज्य कोणत्याही नागरिकात धर्म, पंथ, जाती, लिंग, भाषा, व जन्मस्थानाचा आधारे भेदभाव करणार नाही. सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी खुली राहतील.

२. १६ व्या कलमानुसार राज्याच्या अधिकारातील नोकऱ्या व इतर पदावर नियुक्ती करताना धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान, निवास अथवा यापैकी कोणत्याही आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

३. संविधानाच्या २९ व्या कलमानुसार राज्याने दिलेल्या अनुदानावर चाललेल्या कोणत्याही शिक्षण संस्थेत प्रवेश देण्यापासून कोणालाही वंचित ठेवले जाणार नाही.

४. ३८ व्या कलमान्वये राज्य अशा समाजव्यवस्थेची निर्मिती व संरक्षण देण्याचा प्रयत्न करील की, ज्याद्वारे सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायामार्फत लोककल्याण साधले जाईल.

५. संविधानाच्या ४६ व्या कलमानुसार राज्यातील दुर्बल वर्ग विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शिक्षण व आर्थिक हितासंबंधी विशेष काळजी घेऊन उन्नती साधण्याचा तसेच सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण देण्यात येईल.
६. घटनेच्या २४४ व्या कलमानुसार अनुसूचित जाती–जमातीच्या नियंत्रणासाठी विशेष प्रशासकीय व्यवस्था करण्याची तरतूद केलेली आहे. तसेच संविधानाच्या ३३० व ३३२ व्या कलमानुसार राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभा व विधानसभेत राखीव जागाची तरतूद केली आहे.
७. संविधानाच्या ३३५ व्या कलमानुसार संघ व राज्यातील नोकऱ्यात अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद केली आहे.
८. कलम ३३६ नुसार अनुसूचित जाती व जमातीसाठी विशेष अधिकारी नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला आहे.
९. कलम ३४० प्रमाणे मागासवर्गीयांची स्थिती जाणून घेण्यासाठी आयोगाची नेमणूक करण्याचा प्रबंध केला आहे.
१०. संविधानाच्या ३४१ प्रमाणे राष्ट्रपती राज्यपालाच्या सल्ल्याने जाती, वंश किंवा जमाती किंवा यातील कोणत्याही भागाला किंवा जाती–जमातींना घटनेच्या सूचीत समाविष्ट करू शकतात.

वरील सर्व तरतुदीने मागासलेल्या जातींना समानतेच्या पातळीवर आणून त्याचा विकास साधून संपूर्णपणे समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा कार्यात बाबासाहेबांनी मोलाची कामगिरी केल्याचे दिसून येते.

## समारोप

प्राचीन कालीन भारतीय समाज हा विषमतेवर आधारित होता. ही विषमता कधी जातीच्या आधारे तर कधी लिंगाच्या आधारे निर्माण केल्या गेली होती. या विषमतेत एका जातीच्या वर्णाच्या लोकांना श्रेष्ठ तर इतरांना कनिष्ठ मानून त्यांना हीन दर्जाची पशुतुल्य वागणूक दिली जायची. अशा विषमतेवर आधारित भारतीय समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्त्वावर समाजाची उभारणी करून समताधिष्ठित भारतीय समाज निर्माण करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण हयातीत केलेले दिसून येते. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करून देण्यासाठी कधी त्यांना मंदिर प्रवेश सत्याग्रह तर कधी चवदार तळ्याचे पाणी, की जे कुत्रे, मांजरे पीत होती ते पाणी मात्र अस्पृश्य समाजाला बंदिस्त होते. म्हणुन आम्हीसुद्धा माणसे आहोत आम्हालाही माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे, हे सिद्ध करण्यासाठी महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह करावा लागतो. मात्र, एवढे प्रयत्न करूनही तत्कालीन सवर्ण हिंदू समाजाच्या मानसिकतेत काहीही परिवर्तन होत नाही. असे लक्षात आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपुर येथे धर्मांतर केले. हे धर्मांतर करताना सुद्धा त्यांनी संपूर्णपणे समतेवर आधारित असलेल्या विषमतेला कुठेच थारा नसलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार करून भारतीय समाजावर उपकारच केले असे म्हणावे लागेल. कारण बाबासाहेबांनी मुस्लीम वा ख्रिश्चन धर्म स्वीकारला असता तर आज देशाचे चित्र काय असते याची नुसती कल्पना केली तरी देशाचे भयावह चित्र डोळ्यासमोर येते. मात्र, धर्मांतर करताना डॉ बाबासाहेबांनी भारतीय समाजाच्या एकात्मतेला, अखंडतेला बाधा पोहोचणार नाही याची काळजी घेऊन समताधिष्ठित नवभारतीय समाज निर्मितीत मोलाची भूमिका बजावली

तसेच देशाच्या एकूण लोकसंख्येच्या अर्धी संख्या असलेल्या स्त्रियांनासुद्धा डॉ.आंबेडकरकालीन भारतीय समाजात विषमतेची वागणूक मिळत होती. त्यांच्यावर निरनिराळे अन्यायकारक कायदे लादून त्यांना स्वाभिमानशून्य जीणे जगावे लागत होते. तिला आपल्या वडिलांच्या संपत्तीत कुठलाही अधिकार मिळत नव्हता. विवाहाचे सुद्धा स्वातंत्र्य नव्हते. या काळातील स्त्री ही पूर्णपणे परावलंबी पुरुषाची आश्रित होती. मनुने अनेक अन्यायकारक कायदे स्त्रियांवर लागले होते. अशा पराधीन हीन दर्जाची वागणूक असलेल्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा समतेचा हक्क देण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोडबिल तयार करून समताधिष्ठित नवसमाज निर्मितीचा प्रयत्न केला होता. मात्र, अंधश्रद्धेच्या अनिष्ट, अन्यायकारक परंपराच्या ओझयाखाली दबलेल्या तत्कालीन राजकीय नेत्यांनी बाबासाहेबांचे हे बिल पास होऊ दिले नाही तेव्हा स्वाभिमानी बाबासाहेबांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. म्हणजेच स्त्री पुरुष अशा समतेवर आधारित नवसमाजाच्या निर्मितीकरिता डॉ आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला.

शेवटी भारत देशाची राज्यघटना निर्मितीचे काम बाबासाहेबांवर आल्यामुळे व त्यांनी विषमतेचे चटके सहन केल्यामुळे बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून समताधिष्ठित नवसमाज निर्माण करण्यासाठी या देशातील दलित, आदिवासी व

स्त्रियांना समान न्याय मिळवून देण्यासाठी संविधानात निरनिराळ्या तरतुदी करून संपूर्ण समताधिष्ठीत समाज निर्मितीचा प्रयत्न केला.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. आगलावे डॉ.प्रदीप (२०११), 'अभिजात समाजशास्त्रीय विचार', साईनाथ प्रकाशन, नागपूर
२. लांजेवार ज्योती, (२००५), 'भारतीय समाज आणि स्त्री', सुगावा प्रकाशन, पुणे
३. सिंह मीनाची निशांत, (२००९), 'महिला सशक्तिकरण का सच', ओमगा प्रकाशन, नई दिल्ली
४. कोलारकर श.गो. (१९८९), 'भारताचा इतिहास प्राचीन व मध्ययुगीन', मंगेश प्रकाशन, नागपूर
५. लांजेवार ज्योती (२००५), 'भारतीय समाज आणि स्त्री', सुगावा प्रकाशन, पुणे
६. खैरमोडे, चां.भ., 'बाबासाहेब आंबेडकर खंड ३'
७. आंबेडकर डॉ. बी. आर., 'बहिष्कृत भारत'
८. किर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पाप्युलर प्रकाशन, मुंबई
९. सूर्या डॉ. अनिल, 'भारतीय स्त्री', सुगावा प्रकाशन, पुणे
१०. खडसे डॉ. भा. की., 'भारतीय समाज व सामाजिक समस्या', मंगेश प्रकाशन, नागपूर.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# ''भारतीय समाजशास्त्राच्या विकासात डॉ. जी. एस. घुर्ये यांचे योगदान एक समाजशास्त्रीय अध्ययन''

**प्रा. किशन काशिनाथ घोगरे**
लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी

गोविन्द सदाशिव घुर्ये यांचे बौधिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठ नाव आहे. भारतीय समाजशास्त्राच्या त्याचे अभुतपूर्व योगदान आहे. त्यात भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हटले जाते. समाजशास्त्रीय अभ्यासकांचे ते एक भारतीय प्रतिक होते. स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजशास्त्राच्या नवीन पिढीचे ते प्रेरणा स्त्रोत आहेत.

एम. एन. श्रीनिवास यांनी त्यांच्या विषयी विधान केले घुर्ये याच व्यक्तीमत्व महान होते ते एक भारतीय समाजशास्त्र निर्मात्यामध्ये एक होते. भारतीय समाज संस्थापक होते. ते पहिल्या पिढीचे समाजशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारतीय समाजशास्त्राला भविष्य दाखवले. घुर्ये यांचा दोन्ही बाजुने अभ्यास करणे आवश्यक आहे. ते एक शैक्षणिक संस्था निर्माते आणि विद्वानांच्या रूपात भारतीय समाजाच्या विभिन्न क्षेत्रात त्यांनी कलेले संशोधन, मार्गदर्शन केले. समाजशास्त्राच्या अभ्यासास प्रोत्साहन दिले. स्वत:च्या रचना व त्यांच्या सिध्दातांच्या रचना आणि समाजशास्त्रीय रचनांना स्व:ताची दृ टी या दोन्ही मध्ये ते श्रेष्ठ होते.

गोविंद सदाशिव घुर्ये यांचा जन्म १२ डिसेंबर १८९३ मध्ये सारस्वत ब्राम्हण परिवारामध्ये झाला. प्रारंभिच्या काळात त्यांना संस्कृत विषयाची आवड होती. मॅट्रीकनंतर त्यांनी मुंबई येथील एलफिस्टन महाविद्यालयात शिक्षणासाठी गेले त्यांनी बी.ए. प्रथम श्रेणीत पास केले. त्यांना बृध्दीजीवी पुरस्कार प्राप्त झाला. १९१६ ते १९१८ मध्ये त्यांनी इंग्रजी व संस्कृत विषयात प्रथम श्रेणीत पास झाले. व ते संपूर्ण विद्यापीठात प्रथम आले. व त्यांना पुरस्कारात स्वर्ण पदक मिळाले.

मुंबई मध्ये समाजशास्त्र घुर्ये यांच्या नैतृत्वात विकसीत झाले. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राची सुरवात करण्यासाठी पेंट्रीक गिंडीस यांना आमंत्रित करण्यात आले. १९२४ मध्ये घुर्ये हे रिडर या पदावर कार्यरत असतांना मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विभागात अध्यक्ष पद ग्रहण केले. १९३४ मध्ये ते प्रोफेसर झाले. १९५९ मध्ये सेवा निवृत्त झाले.

**संशोधनाचे उद्देश :**

१) डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये यांचे भारतीय समाजशास्त्राचे विकासात्मक योगदान अभ्यासणे.

२) भारतीय समाजशास्त्राचे भारतीयकरणाचा दृष्टीकोण अभ्यासणे.

**विषयाची निवड :**

गरज ही शोधाची जननी आहे. कोणतेही संशोधन विषयी निश्चित उद्देश डोळ्यासमोर ठेऊन केले जाते. डॉ. घुर्ये यांच्या प्राच्चविद्या दृष्टिकोण व भारतीय समाजाचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्राचे भारतीयकरण ही संकल्पना कशा पध्दतीने अभ्यासली हा उद्देश या विषयाची निवड करण्यामध्ये आहे. आणि समाजशास्त्राच्या भारतीय करणामध्ये योगदान व भूमिका किती महत्वपूर्ण आहे? याचा अभ्यास करण्यासाठी म्हणून या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

**गृहितकृत्य :**

१) समाजशास्त्राचे भारतीयकरण विषयक दृष्टिकोण.

२) डॉ. जी. एस घुर्ये प्राच्यविद्या दृष्टीकोण.

३) डॉ. जी. एस. घुर्ये यांनी मांडलेल्या संकल्पनांचा अभ्यास.

❖ **डॉ. जी. एस. घुर्ये भारतीय समाजशास्त्राच्या विकासात योगदान :**

**सैध्दांतिक दृ टीकोण व पध्दतीशास्त्रीय उपयोग :**

भारतीय समाजातील गुंतागुंतीचा अभ्यास करण्यासाठी प्रत्यक्षवादी दृष्टीकोणाचा त्यांनी प्रत्यक्षात उपयोग केला नाही.

घुर्ये यांनी ग्रामिण, शहरी सामुदायिक दृष्टीकोणाचा अभ्यास केला. त्यांनी १९३० मध्ये आध्यात्मिक आणि १९३८ मध्ये प्रकाशित ''सेक्स हैबिट ऑफ मिडिल क्लास पिपल इन बॉम्बे'' आणि ''महादेव कोळी'' यामधुन असे दिसून येते त्यांनी क्षेत्र अभ्यास पध्दतिचा उपयोग केला असे दिसून येते. ते एक क्षेत्रिय अध्ययन पध्दतीचा उपयोग करणारे विद्वान होते. असे म्हणता येईल ते विविध दृष्टीकोणातुन अभ्यासक आहेत. भारतीय समाजाचा यथार्थ अभ्यास करण्यासाठी अनुभवात्मक निगम पध्दतीचा त्यांनी उपयोग केला विशेषता भारताच्या अभ्यासा करिता सैध्दांतिक पध्दतीचा उपयोग केला. जेव्हा त्यांनी अनुभवात्मक व क्षेत्र कार्य पध्दतीचा अभ्यासात उपयोग केला. तेव्हा त्यांनी पारंपारिक पध्दतीचा उपयोग केला नाही. ''सौशल टैन्सन्स इन इंडिया १९६८ यांचे उदाहरण समाजशास्त्रामध्ये सैध्दांतिक किंवा लवचिकतेचे कारण विशेषत: बौध्दीक स्वातंत्र्य ज्यांचे घुर्ये समर्पक होते असे दिसून येतात. घुर्ये यांनी त्यांच्या अभ्यासात ऐतिहासिक व तुलनात्मक पध्दतीचा उपयोग केला. भारत व इतर ठिकाणाचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक–सांस्कृतिक घटकाचा अभ्यास करण्यासाठी याच पध्दतिचा उपयोग त्यांनी केला. त्यांच्यानुसार साहित्याच्या माध्यमातुन समाजाला समजुन घेता येते. समाजशास्त्राचा अभ्यासासाठी घुर्ये यांनी साहित्य व संस्कृतच्या ज्ञानाचा उपयोग केला. त्यांनी वेद, शास्त्र, पुराण, आणि कालिदास हे त्यांच्या अभ्यासाचा भाग आहे. हे साहित्य अनेक भाषांमध्ये होते. मराठी व संस्कृत साहित्या व्यतिरिक्त बंकिम चंद्र चटर्जी यांच्या साहित्याचा सुध्दा समावेश होता.

**गोविंद सदाशिव घुर्ये यांचे साहित्य :**

घुर्ये यांच्या लेखनामध्ये विविधता असलेली दिसून येते. व त्यांनी विविध दृष्टीकोणातुन अभ्यास केला. जाती व कुटूंब यांच्या व्यतिरिक्त घुर्ये यांना अनेक विषयाची आवड होती. १९८० पर्यंत त्यांनी ३२ पुस्तक लिहली होती. १९५० च्या अगोदर पाच आणि १९५९ पर्यंत तेरा पुस्तके लिहली होती. घुर्ये यांचे महत्वपूर्ण लेखन –

1) Caste and Race in India (1932) 2) Culture and Society (1947)

3) Indian Sadhus (1953) 4) Bhartnatyam and its Costume (1958)

5) Family and Kin in Indio European Culture (1955)

6) Cities and Civilization (1962) 7) God and men (1962)

8) Anatomy of a Rural – Urban Community (1962)

9) Scheduled Tribes (1943) 10) Religious Consciousness (1965)

11) Indian Costume (1966) 12) Social Tensions in India (1968)
13) I And other Explorations (1973) 14) Whither India (1974)
15) Indian Acculturation (1977) 16) Vedic India (1979)
17) Bringing Cauldron of north East India (1980)

घुर्ये यांचे लिखान अनेक विषयावर असल्यामुळे त्यांचे वर्गीकरण करणे कठीण आहे म्हणून सर्वसाधारणपणे त्यांच्या लिखाणाचे सहा भागात विभाजन केले आहे.

**१) जाती आणि नाते संबंध :**

सर्व प्रथम आपण घुर्ये यांच्या Caste and Race in India (1932) या ग्रंथाचा विचार करूया. जाती आणि नाते संबंध अभ्यास करण्यासाठी त्यांनी ऐतिहासिक, मानवशास्त्रीय व समाजशास्त्रीय दृष्टीकोणाचा स्विकार केला. जाती व्यवस्थेला समजण्यासाठी त्यांनी प्राचिन ग्रंथ व संरचनात्मक व सांस्कृतिक दृष्टीकोणाचा उपयोग केला. घुर्ये यांनी जाती व्यवस्थेचा अभ्यास ऐतिहासिक, तुलनात्मक आणि समन्वयात्मक दृष्टीकोणातुन केला. त्यानंतर भारत—युरोपच्या संदर्भात त्यांनी नातेसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास केला. जाती व्यवस्था आणि नातेदारी व्यवस्थांचा अभ्यास करत असते वेळेस त्यांनी दोन घटकांकडे अधिक लक्ष दिले.

१) भारत व इतर ठिकाणी असलेली नातेदारीव्यवस्था व जातीमध्ये पारस्पारिक श्रेष्ठ—कनिष्ठता या घटकाकडे लक्ष दिले.

२) नातेदारीव्यवस्था व जातीव्यवस्थेची समन्वयात्मक ऐतिहासिक भुमिका अभ्यासली.

समन्वयाच्या आधारे असे श्रेष्ठ — कनिष्ठता संपूर्ण समाजाला संचालित करत आहे. घुर्ये यांनी जातीव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांचे अध्ययन केले आहे. खंडात्मक विभाजन, स्तरीकरण, पवित्र—अपवित्रता, श्रेष्ठ—कनिष्ठता, व्यवसाय निर्बंध, रोटी—बेटी व्यवहार व त्यांनी जाती व्यवस्थेसंबंधीची महत्वपूर्ण संकल्पना मांडली.

**२) आदिवासी :**

आदिवासी जमातीचा अभ्यास घुर्ये यांनी केला. त्याचे पुस्तक "Scheduled Tribes (1943)" या पुस्तकात त्यांनी ऐतिहासिक दृष्टिकोन प्रशासन व सामाजिक विषयांवर लिखान केले. महाराष्ट्रातील आदिवासी, कोळी जमातीचा अभ्यास केला. हे पुस्तक अशा वेळी लिहली देशातील मानवशास्त्रज्ञ आणि प्रशासकीय अधिकारी एकाच गोष्टीने अडून बसले होते. आदिवासीचे सांस्कृतिक अस्तित्व वेगळे आहे. आणि त्याचे वेगळे अस्तित्व टिकवून ठेवले पाहिजे असे मत त्यांचे होते.

या विरोधी मत घुर्ये यांनी मांडले भारतीय आदिवासी हे दिर्घ काळापासून हिंदुच्या संपर्कात आल्यानंतर ते हिंदू धर्माचे अंग होतील. त्यांना वेगळे करण्याची काही आवश्यकता नाही. ते मागासलेले हिंदू आहेत. असे विचार त्यांनी मांडले. घुर्ये यांनी मध्य भारतातील आदिवासीयांचे विचार सवयी, व प्रथा, परंपराचे विस्तृत असे वर्णन केले. कथोडी, भुइया, ओरांव, गोड, कोरकु इत्यादी आदिवासी जमातींनी हिंदु धर्म आत्मसात केला. त्याचा मते हिंदू धर्म आत्मसात केलेल्यांचे वेगवेगळ्या आदिवासी जमातींना वेगवेगळे फायदे आहेत. ते आपल्या कला—कौशल्य व वेगळे व्यवसाय आत्मसात करत आहे.

**३) ग्रामिण — नागरीकरण :**

घुर्ये यांनी शहरी जीवनाचे लाभ आणि ग्रामिण जीवनाच्या सुन्दरतेचे लेखन केले. त्यांच्या मते भारतातील नागरीकरण हे औद्योगिक प्रगतीचा परिणाम नाही. भारतात नागरीकरणाच्या प्रक्रियेची सुरवात ग्रामिण समाजात झाली. संस्कृत ग्रंथ व इतर तथ्यांच्या आधारे त्यांनी ते सिध्द करण्याचा प्रयत्न केला. बाजाराच्या आवश्यकतेमुळे ग्रामिण क्षेत्रामध्ये नागरीकरणाला सुरूवात झाली. अतिरिक्त उत्पादन विक्री करण्यासाठी बाजारपेठेची आवश्यकता होती. नागरीकरण हे कृषी क्षेत्राच्या विकासाचा परिणाम आहे.

घुर्ये यांच्या मते शहरामध्ये उच्च शिक्षण, संशोधन, न्यायालय, आरोग्य सेवा आणि प्रसारण केंद्रामुळे नगर अधिक विस्तारीत झाले. म्हणजेच नगर हे सांस्कृतिक समन्वयाचे केंद्र आहे. शहर हे आपल्या जवळपासच्या लोकासाठी कार्य करते. पिण्याचे पाण्याचे वितरण, दळणवळण सुव्यवस्थीतपणे करणे, प्रदुषण थांबवने, नविन झाडे लावणे. अशा प्रकारचे नवनविन उपक्रम राबविण्याचे कार्य केले जाते.

**४) संस्कृती आणि सभ्यता :**

संस्कृतीची वाढ आणि संग्रह परस्पर विरोधी विचार आहेत. संस्कृती ही प्रसारांमुळे विकसीत होते. घुर्ये यांच्या मत असे होते की आदिवासी समाजामध्ये संस्कृती प्रसाराचे माध्यम काय आहे? समाज समजुन घ्यायचा असेल तर संस्कृतीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. समाजाचा उदय विकास समजून घेणे महत्वाचा केंद्र बिंदू आहे. त्याचा मुख्य उद्देश संस्कृतीचा उदय विकास अभ्यासणे आणि तो समजुन घेणे हा होता.

घुर्ये यांनी या विचारांना प्रोत्साहन दिले आधुनिक सभ्यतेचा वारसा आणि सभ्यता मानवाचे सामुहिक प्रयत्न आहे. सभ्यतेचा उदय व ऱ्हासामुळे संस्कृतीचा विकास झाला आहे. संस्कृती अगदी प्रभावी पध्दतीने विकसीत झाली. मानवी सभ्यतेच्या विकासात काही असे मुल्य विकसीत व स्थानिक झाले. अशा मुल्यांना घुर्ये यांनी संस्कृतीचे मुळ असे म्हटले. धार्मिक चेतन्य, आत्म्याचा आवाज, न्याय, ज्ञानाचे स्वतंत्र्य, शोध व स्वतंत्र्य अभिव्यक्ती, सहनशीलता.

घुर्ये यांचे असे मत होते सभ्यता सामाजिक स्तरावर प्रदर्शित केलेला वारसा आहे. भारतात कोणताही समाज नाही ज्या समाजात पूर्ण पणे सभ्यता विकसित झालेली दिसून येत नाही. सभ्यता ही निरंतर सुरू आणणारी प्रक्रीया आहे. प्रत्येक सभ्यतेमध्ये विविधता दिसून येते.

**५) धर्माचे समाजशास्त्र :**

कोणत्याही व्यक्तीसाठी धर्म हा मुलभूत आहे. मानवाला काही शक्तीची जाणीव आहे जी तो एकत्र करू शकत नाही. परंतु जे सभ्यतेच्या उदयापूर्वीच निर्माण आहे. धार्मिक श्रध्दांच्या संबंधात पध्दतीच्या संबंधात घुर्ये यांचे मौलीक योगदान आहे. त्यांत (Indian Sadhus) (1953) God and Men (1962) रिलीजस कॉन्स्यसनैस (१९६५) आणि वैदिक इंडिया (१९७९) हि

पुस्तके त्यांनी लिहली यातुन त्यांची धर्मा विषयी आवड दिसून येते. God and Men या पुस्तकात ते लिहतात. घुर्ये हे देवाच्या संबंधात हिंदू विचाराबद्दल समजुन घेण्यासाठी अगदी वेगवेगळ्या कालखंडात देवाची आणि त्यांच्या प्रभावाची चर्चा करतात.

**६) राष्ट्रीय एकात्मता आणि समन्वय :**

घुर्ये समाजशास्त्रज्ञ असाल्यामुळे त्यांनी भारताच्या तत्कालीन व वर्तमान परिस्थीतीमध्ये त्यांना अभ्यास करण्याची विशेष आवड होती. भारतीय एकात्मता आणि समन्वयतेविषयी जागरूक होते. Caste Race In India या पुस्तकामध्ये याविषयी चिंतन केले. घुर्येचे मत होते की समुह हा भारतीय एकात्मतेमध्ये योगदान देतात. पण काही मर्यादिपर्यंत योगदान देतात. आधुनिक समाजात एकात्मतेसाठी पाच संकटे आहेत असे म्हणतात. ते सर्व कारणाचे स्पष्टीकरण ही देतात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती मागास वर्ग, धार्मिक अल्पसंख्यांक, भाषिक अल्पसंख्यांक इत्यादी.

भारताचा विकास आणि निर्मिती मध्ये घुर्ये यांनी भाषेला एक महत्वपूर्ण साधन मानले. स्वत: आदिवासी आणि आदिवास जमाती तेव्हाच विकसीत होऊ शकतात. जेव्हा ते शेजारी समुहाच्या भाषा शिकतील.

**निष्कर्ष :**

घुर्ये यांनी त्यांच्या बौध्दीक क्षमतेमुळे समाजशास्त्र व मानवशास्त्र या विषयांना व्यापक पणे प्रभावित केले. त्यांनी अनेक वेगवेगळ्या विषयाची समिक्षा केली. भारतीय समाजातील दुर्लक्षीत विषयांना त्यांनी प्रवाहात आणले. त्यांच्या लिखानात विविधता दिसून येते. समाजशास्त्राच्या अनेक विषयावर लिखाण केले. कुटुंब, नातेसंबंध, विवाह, धार्मिक मन, वांशिक समुह, जाती, आदिवासी पोशाख पध्दती, सामाजिकसंस्था, सामाजिक विभिन्नता व स्तरीकरण, जाती व वर्ग, शिक्षण, समाज भारतीय राष्ट्रवादी सम्मेलन, सामाजिक संरचना आणि सामाजिक दृष्टीकोण, भारतातील धर्म, नागरीकरण औद्योगिकरण, भारतातील तत्कालीन समस्या इत्यादी घुर्ये यांच्या लेखनाचा भाग आहे.

घुर्ये यांचे संपूर्ण लेखन ज्ञानकोषासारखे आहे. सामान्यत: विश्व सभ्यता व विशेषता हिंदू सभ्यतेच्या अभ्यासाची आवड त्यांना होती. त्यांनी जातीची उत्पती व उदयविकास, आर्य कुटुंबाची रचना, काही विशिष्ट संस्था जशा की गोत्र इत्यादींचा त्यांनी अभ्यास केला. भारतीय समजाच्या उदयविकासाच्या अध्ययना विषयी विशेष लक्ष होते. त्यांनी भारतीय समाजशास्त्राच्या विकासात अमुल्य अशी भुमिका निभावली म्हणूनच त्यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक असे म्हटले जाते.

**संदर्भ :**

१) बी. के. नागला : ''भारतीय समाजशास्त्रीय'', चिन्सन रावत पब्लीकेशन्स.

२) दुरदर्शन, वर्तमानपत्र, साप्ताहीक, इंटरनेट, इत्यादी.

३) Pramanick S. K. (1993) : Sociology of G.S. Ghurye, Jaipur Rawat Publication.

४) Singh Yogendra,: Indian Sociology, New Delhi Vistaur Publications.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# 19 व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन

**प्रानितिन नागनाथ मुंडलोड .**
**वसंतराव नाईक कलाविज्ञान महाविद्यालय ,वाणिज्य ,, वसरनी नांदेड .**

**गोषवारा**

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात विविध सामाजिक चळवळी उदयास आल्या होत्या जसे की ब्राह्मणेतर चळवळ, दलित चळवळ, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ इत्यादी. निशस्त्र पणे उभारण्यात आलेल्या या विविध चळवळीमध्ये समाजसुधारकांचा तसेच नागरिकांनी सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या विकासासाठी पहिली सामाजिक चळवळ म्हणून ब्राह्मणेतर चळवळ ओळखली जाते ( सत्यशोधक चळवळ ).19 व्या शतकात प्रामुख्याने उत्तर पेशवाई काळात तत्कालीन समाजाची विभागणी ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशी झाली होती. या काळात समाजात मोठ्या प्रमाणावर जातीय विषमता पसरले होते म्हणूनच ब्राम्हणेतर समाजातील नागरिकांचा .उद्धार करण्यासाठी विविध चळवळी या काळात उदयास आल्या होत्या ( लोकांचा )

महाराष्ट्रातील विविध सामाजिक चळवळी मध्ये महात्मा फुले,डॉक्टर आंबेडकर, केशवराव जेधे, क्रांतिसिंह नाना पाटील,भास्करराव जाधव, नारायण मेघाजी लोखंडे, डॉक्टर भाऊ दाजी लाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी. प्रमुख समाजसुधारकांनी समाजपरिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. समाजात अस्तित्वात असलेला अनिष्ट रूढी परंपरा,जातीय विषमता, स्त्रीपुरुष - असमानता,अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी तसेच नागरिकांनी महत्त्वाचे योगदान दिलेआणि त्याचाच एक . भाग म्हणून महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी आपला शारदा सदन मधील गोदूबाई या विधवा महिलेशी पुनर्विवाह करून समाजापुढे आदर्श निर्माण करीत समाजात चालत आलेल्या अनिष्ट रूढी यांचा नायनाट केलायातूनच सामाजिक चळवळी या समाज परिवर्तनासाठी निशस्त्र . पणे वापरण्यात येणारी महत्त्वाची लढाई म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अनेक राजकीय आणि सामाजिक चळवळी झाल्या. महाराष्ट्रातील अशा चळवळींची श्रेष्ठ परंपरा आहे. या परंपरेनुसार स्वातंत्र्योत्तर काळात समाज परिवर्तनाच्या अनेक चळवळी येथे उदयाला आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने दलित चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ, आदिवासींच्या चळवळी, शेतकरी शेतमजुरांच्या चळवळी व संघटित आणि असंघटित कामगारांच्या चळवळी यांचा उल्लेख करता येईल. या पीढीनी आपल्या समाजाच्या हितासाठी आणि त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढे दिले आहे. त्यासाठी जनसमुदायाची संघटन करण्याचा प्रयत्न प्रामुख्याने या चळवळीने केला आहे. सामाजिक चळवळी समाजव्यवस्थेत अनुकूल स्वरूपातून सामाजिक बदल घडवून आणतात. समाजातील काही महत्त्वपूर्ण प्रश्नांना समोर ठेवून चळवळ आकाराला येतो. एखादी सामाजिक चळवळ उभी करताना अनेक जातीधर्माचे - .लोक एकत्र येतात समाजात या सवयीमुळे अनेक परिवर्तन झालेले आपणास पहावयास मिळते. महाराष्ट्रातील संस्कृती, परंपरा, अनिष्ट रूढी, चालीरीती यांचा पगडा या समाजातील लोकांवर होता या अनिष्ट रूढी परंपरा यांचा विरोध या चळवळीच्या माध्यमातून करण्यात आलेला आपणास बघावयास मिळतो.

समाजाने जो स्वतःच्या अस्तित्वाला धक्का पोहोचल्यावर त्याविरुद्ध स्वाभाविकपणे प्रतिकार करतो यालाच आपण प्रतिक्रिया असे संबोधतो. सामाजिक चळवळ हे जनसमुदायाच्या मागणे आणि विचार व्यक्त करण्यासाठी उपलब्ध असणारे व्यासपीठ आहे.

भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे. भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्राने केले आहे. महाराष्ट्रातील अनेक प्रखर राष्ट्रवादी विचार मांडत नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला आहे. महाराष्ट्राने जसा भारताच्या राजकीय जीवनावर प्रभाव टाकला तसाच भारताच्या सामाजिक जीवनावरही प्रभाव पडलेला आहे. महाराष्ट्राला थोर संतांची आणि समाजसुधारकांची दीर्घ परंपरा लाभलेली आहे म्हणून आज महाराष्ट्राचा पुरोगामी राज्य म्हणून उल्लेख केला जातो. महाराष्ट्रातील राष्ट्रीय आणि सामाजिक सुधारणेची चळवळ या भागात त्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**संशोधन विषयाची निवड**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे अनेक भाषा, पेहराव ,श्रद्धा, धर्म आणि सांस्कृतिक भिन्नता असणारा देश आहे. असे असून अलीकडील काळात प्रादेशिक अस्मिता येथून प्रादेशिक वादाचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. परंतु प्रादेशिक घटकापेक्षा राष्ट्रगीत राष्ट्र या बाबींची जाणीव होणे आवश्यक आहे .एकूण राष्ट्र निर्मिती आणि राष्ट्रवादीने येथील प्रादेशिक भाषा संस्कृती आणि विविध प्रदेशातील लोकांचा त्यात त्यांचे योगदान यांची माहिती असणे आवश्यक आहे .

त्याचप्रमाणे फुलेआंबेडकर यांसारख्या थोर समाजसुधारकांची पार्श्वभूमी लाभलेला महाराष्ट्राला अनेक सामाजिक राजकीय -शाहू- .चळवळींचा इतिहास लाभलेला आहे कालखंडानुसार महाराष्ट्राच्या प्रत्येक विभागाचा इतिहास वेगळा असला तरी सांस्कृतिक व सामाजिक इतिहास बराचसा समान आहे.

अनेक वेळा चळवळीच्या रुपाने महाराष्ट्रात अनेक क्रांतीकारी बदल झालेले आपणास बघावयास मिळतात. जसे -अस्पृश्यता निर्मूलन, विधवा पुनर्विवाह, बालविवाह प्रतिबंध, स्त्री शिक्षण चळवळीच्या माध्यमातून समाजात अस्तित्वात असलेल्या अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्यात आले असून, भारतीय समाजातील स्त्रियांची विदारक स्थितीत बदल घडवून आणण्यात आला आहे .महाराष्ट्रतील राष्ट्रीय आणि सामाजिक सुधारणेची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेण्याकरिता या संशोधन विषयाची निवड करण्यात आला.

**संशोधन आराखडा**

संशोधन कार्याचे नियोजन करण्यासाठी संशोधन आराखडा तयार करण आवश्यक असतं. संशोधन विषय हा समाजाशी निगडीत आहे. त्याकरिता संशोधन आराखड्याचा कार्य अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. म्हणूनच संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी उपयोगात आणण्याचा संशोधन आराखडा पुढील प्रमाणे स्पष्ट केलेला आहे.

'चळवळ एखाद्या प्रश्नाच्या निराकरणासाठी जेव्हा लोक संघटित होऊन सातत्याने कृती करतात तेव्हा तिला चळवळ असे म्हणतात.' चळवळ या नागरिकांच्या सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढता सार्वजनिक हितासाठी आणि प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी चळवळी होत असतात. लोकांच्या विशिष्ट समस्यांच्या प्रश्नाभोवती निर्माण झालेल्या संघटनेतून चळवळ उभी राहते.

सामाजिक चळवळ म्हणजे काय? सामाजिक चळवळ कशाला म्हणावे ? याबाबतीत समाजशास्त्र विचारवंतांमध्ये मतभेद आहे. याच हेतूने सर्वसाधारणपणे समाजव्यवस्थेत किमान परिवर्तनासाठी अनेक लोक एकत्र येऊन संघटितपणे प्रयत्न करतात.त्या प्रयत्नांना सामाजिक चळवळ समृद्ध सामाजिक संबंध सामाजिक परिवर्तनाची असतो. समाजशास्त्रीय दृष्टीने सामाजिक चळवळी असे म्हणतात. समाज घटकांच्या सामुदायिक प्रश्नांना विचारात घेऊन आकार घेत असतात. या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सामुदायिक आकृतीच्या स्वरूपात जेव्हा संप, मोर्चे, सभा, मिरवणुका अशा कृती बोलू लागतात तेव्हा सामाजिक चळवळीचे खरे रूप समोर येथे. सामुदायिक कृती च्या अगोदर परिवर्तनाचा विचार अस्तित्वात असतो हा विचार एखाद्या व्यक्तीने दिलेल्याअसून अशा चळवळींना त्या व्यक्तीचे नेतृत्व लागते. चळवळ जेव्हा विस्तार रूप घेते तेव्हा त्या नेत्यांनी चळवळीचा प्रसार करतात. म्हणजेच सामाजिक चळवळ हा परिवर्तन घडवून आणण्याचा एक जाणीवपूर्वक व संघटित प्रयत्न आहे .

**सामाजिक चळवळीच्या व्याख्या**

**हर्बर्ट ब्लुमर**"-रूढ सामाजिक संबंधात एखाद्या क्षेत्रात परिवर्तन आणण्यासाठी करण्यात येणारे सांघिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय. मोठ्या प्रमाणातील लोकसहभाग हे अशा चळवळीचे वैशिष्ट्य असते."

ब्रिटिशांनी आपली राजवट हिंदुस्थानात स्थिर केल्यामुळे या देशातील लोकांचा पाश्चात्य संस्कृतीचे सर्वांग संपर्क प्रस्थापित झाला. इ .सन 1818 पेशवाईच्या अस्तानंतर महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने ब्रिटीश अंमल सुरू झाला. प्रारंभीच्या 'एलफिस्टन माल्कम' यासारख्या गव्हर्नरची अत्यंत दूरदर्शीपणा कारभार करून जनतेच्या मनात राज्यकर्त्या बद्दल विश्वास संपादन केला. ब्रिटिश राजवटीतील बदलांचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम होऊ लागले. दरम्यानच्या काळात मिशनरी शासन व काही स्थानिक संस्था यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात नव्या विद्याविभूषित यांचा एक जागृत वर्ग निर्माण झाला. या वर्गाने सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात पुढचा दृष्टीकोण ठेवून, अंतर्मुख होऊन, विचार मंथन करून पाश्चात्त्य संस्कृतीच्या जवळ जाण्याचा प्रयत्न सुरू केले. समाजातील अनिष्ट चालीरीती, अंधश्रद्धा, धर्माचे अवडंबर यामुळे समाजाची अधोगती झाली आहे हे त्यांच्या लक्षात आलं. परिणामी आपल्या समाजात सुधारणा होणे गरजेचे आहे, सामाजिक सुधारणा घडवून आणली पाहिजे, बुद्धिनिष्ठा जागवली पाहिजे तसेच उन्नतीसाठी सर्व

शक्तीनिशी प्रयत्न केले पाहिजे अशा मताचा त्यांनी पुरस्कार केला. व तिच्या आणि सामाजिक सुधारणा योगदान दिलेल्या चळवळींचा थोडक्यात आढावा घेऊ या .

**सामाजिक चळवळीची कारणे**

**सांस्कृतिक दरी-** सर्व संस्कृती या सतत बदलत असतात. परंपरेचे रूपांतर होते, मूल्य विकसित होतात आणि नवीन कल्पना दिसून येतात. जेव्हा एखादी संस्कृती मोठ्या प्रमाणात बदलते तेव्हा समाजातील काही क्षेत्रात सामाजिक चळवळी प्रवृत्त करण्यासाठी संघटित होऊ शकतात. विचार करण्याच्या मार्गाने झालेल्या बदलांमुळे निर्माण झालेल्या काही महत्त्वाच्या सामाजिक चळवळ म्हणजे लोकशाहीचे आगमन सार्वत्रिक शिक्षण किंवा पारंपरिक धार्मिक मूल्ये नाकारणे .

**सामाजिक विघटन-** जेव्हा समाज बदलत असतो तेव्हा ते एक सारखे बदलत नाही. काही भाग वेगाने विकसित होत असताना इतर स्थिर राहतात. असमानता आणि अन्याय  आहे तसेच अनिश्चितता यासारख्या परिस्थिती निर्माण करतात. जेव्हा काही लोकांना असे वाटते की त्यांचे पारंपरिक जीवनशैली यामुळे आधुनिक समाजाच्या मागण्यांचे अनुरूप नाही तर ते उर्वरित लोकांपासून व्यक्त झाल्याची भावना विकसित करू शकतात. परिणामी ते निराश आणि गोंधळलेली असुरक्षित किंवा अग्री संत आपल्या सारखे वाटते. जर ते लोकसंख्येच्या महत्त्वपूर्ण भागात घडले तर या भावना सामाजिक चळवळीचा उदय होऊ शकतात.

**सामाजिक अन्याय-** कधी-कधी सामान्य वैशिष्ट्य असणाऱ्या लोकांच्या गटात असं वाटतं की या वैशिष्ट्यांमुळेच त्यांचा छळ झाला आहे ही धारणा अन्यायाची भावना भडकवते. जे सामाजिक चळवळीसाठी एक उत्तर होऊ शकते.पहिल्या दृष्टिक्षेपात दिसून येणारा गोष्टींच्या विपरीत केवळ सर्वात गरीब किंवा वंचित लोकांमध्येच नव्हे तर समाजातील सर्व क्षेत्रांमध्ये सामाजिक अन्याय होऊ शकतात कारण अन्यायाची भावना मूलभूत व्यक्तिनिष्ठ असते.

**सामाजिक चळवळीचे वैशिष्ट्ये**-1 मूलतः सामूहिक स्वरूप  ,2 नियोजित आणि हेतुपुरस्सर कृती
3विचार प्रणाली आणि उद्दिष्ट यांचे पाठबळ ,4  सामाजिक बदल घडवून आणणे हा उद्देश

**सामाजिक सुधारणेची चळवळ -**

**वर्णव्यवस्था व जातिसंस्था** जन्मापासुनच-वर्णव्यवस्था आणि जातिसंस्था हिंदू समाजात हजारो वर्षापासून चालत येत आहेयाच  . या परिणामा मूळ भारतात .मानसिकतेचा परिणाम भारतीयांच्या मनावर झालेला आहेअनेक जाती आणि प्रत्येक जातीत अनेक उपजाती निर्माण झाला आहेत. त्यामुळे हिंदू समाज आणि तुकड्यांत विभागला जाऊन तो आपली संघटित शक्ती विसरून  बसला आहे . जातिव्यवस्थेने अनेक निर्बंध लाभल्यामुळे सामाजिक, धार्मिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात त्यांच्या विकासाचे सर्व मार्ग त्यांच्यासाठी बंद होते. त्यातच वर्ण, जाती संस्थांना धर्माचा आधार असल्याने ही समस्या अधिकच जटिल झाली होती.महात्मा फुले यांनी या समस्येच्या मुळावर घाव घातला शूद्रातिशूद्र हे परस्परांचे बंधू असून जातिभेद एक कृत्रिम आहेत. अशा वैचारिक प्रबोधनाच्या मार्गाने व प्रत्यक्ष कृतीने सामाजिक समतेचा पुरस्कार केला1.844 मध्ये दादोबा पांडुरंगतर्खडकरयांनी 'मानव धर्म सभेची' स्थापना करून या सभेच्या माध्यमातून जातिसंस्थेचा विरोध केला. राजश्री शाहू महाराज यांनी देखील वर्ण जाती संस्थेला विरोध करण्यास सुरुवात केली. त्यांनी कनिष्ठ जातीच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी आपल्या हातातील राजकीय सत्तेचा वापर केला. डॉक्टर आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्यच जातीचे आणि अस्पृश्यता निर्मूलन यासाठी अर्पण केले होते. याशिवाय महर्षी विठ्ठल रामजी , लोकहितवादी संत गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जातिभेद नष्ट करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले.

**अस्पृश्यता निर्मूलन**19व्या शतकाच्या सुरुवातीला मानवाने मानवाला स्पर्श न करण्याची ही अस्पृश्यतेची कोडी व मानवी स्वरूपाची होती. त्या जातीला सामन्यात कुठेही स्थान नव्हते सर्वांची बरोबर होईल अशी कोणतीही कृती किंवा वर्तन निषिद्ध मानले जात. असेत्या अपराधासाठी त्यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली जात असे. अशा घृणास्पद रूढी मुळे अस्पृश्य समाजाच्या सर्वांगीण विकासाचे सर्व मार्ग बंद केले होते जात.अस्पृश्यतेचा अतूट संबंध असल्याने समाजसुधारकांनी जातिभेद आणि अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याला महत्त्व दिले. महात्मा फुले यांनी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौदअस्पृश्यताकरिता खुला करून अस्पृश्यता निवारणाच्या कृतिशील पाया घातला. त्यांच्यासाठी शाळा काढून अज्ञान, अंधश्रद्धा दूर करण्यास प्राधान्य दिले. छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी शाळा, वसतिगृहे, शिष्यवृत्ती ,संस्थानात राखीव जागा, व्यवसाय करण्यास प्रोत्साहन, त्यांच्या मानसन्मान वाढविण्यासाठी विविध पुरस्कार देणे इत्यादी मार्गाने अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला गती दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभा, समाज समता संघ, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन, पीपल्स एज्युकेशन सोसायटी इत्यादी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक विकास करण्याचा

तसेच त्यांना समाजात समानतेचा दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. महर्षी वि. रा. शिंदे यांचे संपूर्ण कुटुंब अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात सहभागी झाले होते. या शिवाय पंजाबराव देशमुख व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या कार्यात मोलाची कामगिरी केली आहे.

**स्त्री शिक्षण-** पुरुषप्रधान भारतीय संस्कृती आणि धर्माच्या, जातीच्या नावाने स्त्रियांना नेहमीच कनिष्ठ व दुय्यम दर्जा दिला आहे. तिच्यावर क्रूर बंधने लादून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात तिला विकासाची संधी नाकारली आहे. ब्रिटिश राजवटीत काही समाजसुधारकांनी संस्थांना कायदेशीर इतर काही व्यक्तिगत पातळीवर स्त्री उद्धाराच्या कार्याला हातभार लावला आहे. तिच्या नवऱ्याचा आयुष्य कमी होईल किंवा त्यांचे अकाली निधन होणे यांसारख्या अफवा पसरून तत्कालीन सनातन्यांनी स्त्रीशिक्षणाचा विरोध केला आहे शिक्षणाने. केवळ तिच्या कुटुंबाचा नाही तर समाजाचा ही उद्धार होतो हे ओळखून महात्मा फुले यांनी 1848 मध्ये मुलींसाठी पहिली शाळा महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा पाया घातला. जगन्नाथ शंकरशेठ यांनी मुंबईत मुलींसाठी शाळा सुरू केली. याशिवाय बाळशास्त्री जांभेकर, डॉक्टर भाऊ दाजी लाड या सुधारकांनी प्रबोधनाच्या माध्यमातून स्त्री शिक्षणाचा प्रसार केला.छत्रपती शाहू महाराजांनी तर मुलींच्या प्राथमिक शिक्षणावर व उच्च शिक्षणाचे महत्त्व दिले. रखमाबाई केळकर या महिलेला डॉक्टर करून तिचे संस्थानात शिक्षणाधिकारी म्हणून त्यांची नेमणूक केली. पंडिता रमाबाई यांनी शारदा सदन ची स्थापना करून स्त्री शिक्षणाला चालना दिली. महर्षी कर्वे यांनी तर स्त्री शिक्षणासाठी आपले संपुर्ण आयुष्य वाहिले. त्यांनी 1907 मध्ये हिंगणे येथे महिला विद्यालयाची तर 1916 मध्ये एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाची स्थापना केली. याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर सुधारकांनी स्त्री शिक्षणाला चालना देऊन यांना अज्ञान अंधश्रद्धा यातून बाहेर काढून स्व उद्धाराची नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न केला**सत्यशोधक चळवळीची विचारप्रणाली-** समताधिष्ठित समाज रचना प्रस्थापित करा. हे महात्मा फुले यांच्या चळवळीची मुख्य प्रेरणा असून देव आणि धर्माच्या नावाने समाजात बोकाळलेली अंधश्रद्धा, अज्ञान आणि स्त्री, शूद्रातिशूद्रांच्या शोषण नष्ट करणे समाजातील सर्व लोक शांति आणि सुख समाधानाने, बंधुभावाने राहतील अशी नवीन व्यवस्था निर्माण करणं ही सत्यशोधक चळवळीचे मुख्य विचार प्रणाली होती ते . पुढील प्रमाणे

1 देव आणि भक्त यांच्यातील मध्यस्थ ला नकार .2 स्त्री, शूद्रातिशूद्रांच्या शोषणास जबाबदार असणाऱ्या धार्मिक सामाजिक गुलामी व पुरोहितशाही यांच्या गुलामगिरीतून त्यांची सुटका करणे.3जमीनदार व सावकारांना भेटून शेतकऱ्यांची सुटका करणे .4 शिक्षण सर्वांना सहज सुलभ व्हावे व सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न करणे.

1878 मध्ये महात्मा फुले यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. स्थापनेचा उद्देश करताना महात्मा फुले यांनी असे म्हटले की 'ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्याय लोकांच्या दास्यत्व यातून मुक्त करून यास्तव समुपदेशन व विद्यार्थी द्वारे शूद्र लोकास त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता हा समाज आहे.'

**दलित चळवळ** -वर्णव्यवस्थेच्या बाहेर असलेल्या आणि सामाजिक स्तरावर सर्वात खालच्या अंतिम स्थानावर असलेल्या जाती समूहाला अस्पृश्य व पददलित या नावाने संबोधले जाते. सामाजिक सुधारणेच्या चळवळीत सुधारकांनी अस्पृश्य या शब्दाऐवजी इतर शब्दांनी समृद्धी आहे. उदाहरणार्थ श्री म माटे यांनी अस्पृष्य,डॉ.आंबेडकर यांनी 'नॉन कास्ट हिंदू प्रोटेस्टंट''हिंदू बहिष्कृत समाज,' महात्मा गांधीनी हरिजन स्टार्ट कमिटीने 'डिप्रेस क्लास' नावाने संबोधले होते.1935 च्या कायद्यानुसार या जाती समूहाला विशिष्ट सूची मध्ये समाविष्ट केल्याने त्यात अनुसूचित जाती असे म्हटले जाऊ लागले. थोडक्यात 'सामाजिक स्तरीकरण अंतिम स्थानावर असलेल्या, अस्पृश्य मानलेल्या व समाज व्यवस्थेच्या पराकोटीच्या शोषणाला बळी पडलेल्या जातींचा समूह म्हणजे दलित समाज होते.' तसेच 'दलितांच्या उद्धारासाठी दलित वर्गातील सुधारकांनी चालविला चळवळीला दलित चळवळ असे म्हणतात. '**आंबेडकरी चळवळ-** 'अस्पृश्यता निवारणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चळवळीला आंबेडकरी चळवळ असे म्हणतात.' बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेच्या समस्येचा संबंध जाती, धर्म ग्रंथप्रामाण्य, राजकीय हक्क, राजकीय सत्ताअसल्याचे स्पष्ट करतात. त्यामुळे त्यांच्या अस्पृश्यतानिवारण चळवळीची व्याप्ती इतरांच्या चळवळी पेक्षा अधिक होते. त्यांनी सत्याग्रह, सामाजिक संघटना आणि वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. सर्व प्रकारच्या अज्ञानाचे आणि अधोगतीचे मूळ शिक्षण आहे हे महात्मा फुले यांचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पूर्णपणे माहित होते. म्हणूनच उच्चविद्याविभूषित होऊन अस्पृश्य समाजात सर्व प्रकारचे शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षणामुळे अस्पृश्य लोकातील अज्ञान, अंधश्रद्धा, दैववाद, ईश्वरवाद, कर्मवाद यावर विश्वास कमी होईल. अस्पृश्यता ईश्वरनिर्मित नसून ती मानवनिर्मित आहे याची जाणीव होईल. विषमतेविरुद्ध अन्यायाविरुद्ध बंड करून फुटतील आपल्यावर लादलेला रूढी परंपरा गलिच्छ व्यवसाय सोडून देतील. राहणीमानात सुधारणा करतील आणि शासनाच्या मोक्याच्या जागा मिळतील'.पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली आणि या संस्थेमार्फत विद्यालय, महाविद्यालय, मुला मुलींसाठी वसतीगृहे, शिष्यवृत्ती त्यांची सोय करून प्राथमिक

शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या शिक्षणास प्रोत्साहन दिले. त्यामुळे अस्पृश्य समाजातील शिक्षित लोकांचे प्रमाण वाढले त्यांचा अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीचा मोठा फायदा झाला.

**शेतकरी चळवळ-** भारतात इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यावर नव्या राज्यकर्त्यांनी जमीन महसूल विशाल धोरणात काही महत्त्वाचे बदल घडवून आणले होते. त्यापैकी  इंग्रज राज्यकर्त्यांनी जमीन महसुलाच्या पद्धतीत काही सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी जमीन महसुलाच्या कायमधारा पद्धती, रयतवारी पद्धती, महालवारी पद्धती अशा नव्या पद्धती अमलात आणल्या. इंग्रजांच्या जमीन महसूल पद्धतीतील सुधारणांचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना दिलासा देणे हा नव्हे तर जमीन महसुलाच्या मार्गाने जास्तीत जास्त पैसा जमा करणे हा होता. थोडक्यात इंग्रजी राजवटीतही शेतकऱ्यांच्या स्थितीत काही फरक पडला नाही. शेतकऱ्यांच्या नशिबी आर्थिक शोषण, कमालीचे दारिद्र्य, कर्जबाजारीपणा या पूर्वापार चालत आलेल्या गोष्टी तशाच कायम राहिल्या.

**शेतकरी चळवळीची कारणे -** शेती पावसावर अवलंबून, सिंचनाखालील जमिनीचे अल्प प्रमाण, वारंवार पडणारे दुष्काळ,शेतकऱ्यावरील जुलूम जबरदस्ती, सावकारी जुलूमशेतकरी.

**चळवळीचे उद्दिष्टे-** शेतकऱ्यांच्या स्थितीचं वर्णन, शेतकरी परिषदांचे आयोजन, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी चर्चा, सरकारने शेतकऱ्यांना संरक्षण देणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी योजना आखणे, शेतीवर वाजवीत कर  करणे,  शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण.

**कामगार चळवळ** -मुख्य कामगार चळवळ 1900 ते 1920 या काळात अस्तित्वात आल्यानंतर भारतात कापड गिरण्या, रेल्वे कंपन्या असे उद्योग सुरू झाले. या उद्योग करणामुळे देशात कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला. पुढे त्यांच्या समस्या वाढल्या या समस्या सोडविण्यासाठी 1920 मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' स्थापन होऊन कामगार चळवळी जोम धरू लागल्या. देशात भांडवलदार, कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले होते. यामुळे कामगारांची स्थिती अतिशय वाईट व त्यांच्यावर काम करण्याची सक्ती केली जात असे. कामगारांचे कामाचे तास निश्चित असेल त्यांच्याकडून दिवसाकाठी 16 ते 17 तास काम करून घेतले जाईल. तर यातून कामगारांना मिळणारे वेतनही अल्पसे आणि यातूनच कामगारांच्या दुरवस्थेकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी काही समाज कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. यातूनच कामगार चळवळ भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन करण्याचे श्रेय 'नारायण मेघाजी लोखंडे' यांना जातं. त्यांनी 1884मध्ये 'बॉम्बे असोसिएशन' ही भारतातील पहिली कामगार संघटना मुंबई येथे स्थापन केले. ते खऱ्या अर्थाने भारतातील कामगार चळवळीचे जनक ठरतात. तसेच लोखंडे यांनी कामगारांना साप्ताहिक सुट्टी ची मागणीचे एक निवेदन सरकारला आणि गिरणीमालक संघाला सादर केलेल्या या मागणीची दखल घेऊन10 जून 1990रोजी कामगारांना साप्ताहिक सुट्टी मंजूर केली. इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस झालेली स्थापना ही घटना म्हणजे भारताच्या कामगार चळवळीच्या वाटचालीतील मैलाचा दगड. सात जुलै 1924 रोजी मुंबई येथे ऑल इंडिया ट्रेड युनियन .या संघटनेची स्थापना झाली (आयटक)

**गृहीत कृत्य**

1.19 व्या शतकात सामाजिक असंतोष अधिक प्रमाणावर दिसून येतो.

2. 19 व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती समाधानकारक नाही.

3. समाजात अस्तित्वात असणारी घटनात्मक परिस्थितीमुळे विविध चळवळी उदयास येतात.

4. समाजात अस्तित्वात असणाऱ्या अनिष्ट रूढी परंपरा यांना श्रीया आणि मागास जातीतील लोक तोंड देत आहे.

5. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी मुळे समाज परिवर्तन होण्यास मदत होत आहे.

**उद्दिष्टे**

1. 19 व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीची माहिती घेणे.
2. महाराष्ट्रातील सामाजिक स्थितीचा आढावा घेऊन तेथील सामाजिक चळवळीचा विश्लेषण करणे.
3. महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी समाजसुधारणा करिता दिलेले योगदान विशद करणे.
4. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकात स्त्रियांची अस्पृश्य समाजाची स्थिती कशी होती हे विशद करणे.
5. महाराष्ट्रातील समाज सुधारक आणि समाजाच्या विकासाच्या संदर्भात दिलेल्या योगदानाचा वर्णन करणे.

**निष्कर्ष**

1. सामाजिक सुधारणा करायची असल्यास चळवळ ही महत्त्वाची भूमिका बजावत असते.
2. कुठलीही चळवळ एका नेत्याच्या नेतृत्वाखाली सुरू होते परंतु त्यात लोकांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो.
3. चळवळ यशस्वी करण्यासाठी खंबीर नेतृत्व आणि लोकसहभाग असावा लागतो.
4. चळवळीच्या माध्यमातून आपण आपले प्रश्न सरकारसमोर मांडू शकतो.
5. चळवळ ही फक्त लोकसहभाग नसून कोणत्याही अन्यायाविरुद्ध समाजातील अनिष्ट रूढी परंपरा विरुद्ध सातत्याने दिलेला लढा असतो.
6. चळवळ हे एक सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे.
7. चळवळीमुळे निर्णय हे बहुमताने मान्य केले जातात आणि त्यामुळे होणाऱ्या परिवर्तनाची अंमलबजावणी केली जाते.
8. चळवळीमध्ये पारदर्शीपणा असल्यामुळे लोकांना सत्यस्थिती समजावून सांगण्यात अडचणी येत नाही.
9. संदर्भ ग्रंथ ..

1.समाजशास्त्र - इयत्ता बारावी कला, टारगेट पब्लिकेशन, मेघना जाधव,सुरभी जोशी.

2. आधुनिक महाराष्ट्राचा समग्र इतिहास - प्रा व्ही बी पाटील,के सागर पब्लिकेशन.

3. महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळी -द्वितीय वर्ष कला, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव.

4. https://mr.warbletoncouncil.org /movimiento -social -1869

5. me.m.wikipedia. org.

6. https:// emaaymarathi.blogspot.com/2019/05/blog -post _34.html ?m =1

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीत योगदान

डॉ.पुरूषोत्तम रा. बांडे
समाजशास्त्र विभाग जिजामाता कला महाविद्यालय,दारव्हा जि यवतमाळ

**सारांश :—**
राष्ट्र म्हणून जडणघडण विसाव्या शतकात म्हणजेच १९२० ते १९५० च्या दशकांत झाली. या काळात राजकीय स्वांतत्र्य तर मिळालेच होते. पण राज्यघटना, राजकीय—आर्थिक आणि सामाजिक घडी, राज्यांची पुनर्रचना, फाळणी तसेच आर्थिक विकास आणि सामाजिक विकासाचा कृती—कार्यक्रम असे सारे या काळात घडत गेले. या पायावर आधुनिक भारत या राष्ट्राची घडण झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कार्यकाळही हाच आहे. मुबंईत १९१८ साली त्यांचे नेतृत्व राजकीय क्षितीजावर उदयास आले. सुमारे ४० वर्षाच्या (१९१६ ते १९५६) काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानदान आणि नेतृत्व करीत होते आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टीने राष्ट्राच्या उभारणीत योगदान देत होते. तत्कालीण समाजात अनेक सामाजिक प्रश्न व समस्या होत्या. या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी समाजातील अनेक सुधारक प्रयत्न करत होते. परंतु सामाजिक समस्या सोडविण्यासाठी धोरणे सुचविण्याची डॉ.आंबेडकरांची पद्धती त्यांच्या समकालीण नेत्यापेक्षा निराळी होती. विषयाचा सखोल अभ्यास करून, कारणे ओळखून मगच उपाय शोधण्याची शिस्त त्यांच्या अंगी होती. म्हणूनच त्यांनी सुचविलेले उपाय हे आजही कोणत्याही सामाजिक समस्यांचा सामना करण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. राष्ट्रनिर्माता आणि आधुनिक भारताच्या उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अशा दुहेरी भूमिकेतुन डॉ. बाबासाहेब आबेडकराच्या विचार व कार्याचा अभ्यास करावा. लागतो. आंबेडकरांनी भारताची राज्यघटना अश्या पद्धतीने लिहली की, ज्यामध्ये राष्ट्रनिमिती व उभारणीची प्रक्रिया निरंतर होत राहील, अशी व्यवस्था आहे. जगातील अन्य कोणत्याही देशाच्या घटनेत अशी तरतुद नाही. भारतीय समाजातील जात, धर्म, पंथ, लिंग आदीच्या आधारावर प्रस्थापित झालेल्या शोषण व्यवस्थेचा अंत करण्याच्या दृष्टीने राज्यघटनेत जागा निर्माण करून देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. डॉ.आंबेडकरांनी वेळोवेळी मांडलेले मत, केलेल्या सूचना आजच्या काळात 'शिकवण' ठरतात. कारण स्वांतन्त्र्य, राष्ट्र, लोकशाही, यांविषयीच्या त्यांच्या कल्पना आजही राष्ट्रापुढील आव्हानाना सामारे जाण्यासाठी मोलाच्या ठरतात. स्वातंन्त्र्य, समता आणि बधुता ही मुल्ये कोणत्याही सशक्त राष्ट्रजीवनाचा आणि बळकट लोकशाहीचा पाया असतात आणि या मूल्याचे आचरण करताना स्त्रिया, अल्पसंख्याक, यांच्यासह सर्वाची समता, सर्वामधील बंधुता आणि सर्वांना चांगले जगण्याचे स्वातंन्त्र्य अभिप्रेत असते. सामाजिक व्यवहारात आणि आर्थिक संधीमध्ये जर समताच नसेल आणि हिंसक प्रक्रिया घडत असतील, तर अखेर अशा राष्ट्रातील एकोप्याची भावनाच कमकुवत होत राहते आणि म्हणून राष्ट्रजीवनापुढे अनेक आव्हाने उभी राहतात. आजही खऱ्या अर्थाने आपण अशाच वास्तवाला आपण सामोरे जात आहे.

**प्रस्तावणा:—**राष्ट्रनिर्माता आणि आधुनिक भारताच्या उभारणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अशा दुहेरी भूमिकेतुन डॉ. बाबासाहेब आबेडकराच्या विचार व कार्याचा अभ्यास करावा. लागतो. आंबेडकरांनी भारताची राज्यघटना अश्या पद्धतीने लिहली की, ज्यामध्ये राष्ट्रनिमिती व उभारणीची प्रक्रिया निरंतर होत राहील, अशी व्यवस्था आहे. जगातील अन्य कोणत्याही देशाच्या घटनेत अशी तरतुद नाही. भारतीय समाजातील जात, धर्म, पंथ, लिंग आदीच्या आधारावर प्रस्थापित झालेल्या शोषण व्यवस्थेचा अंत करण्याच्या दृष्टीने राज्यघटनेत जागा निर्माण करून देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. भारताची आधुनिक पायावरील राष्ट्र म्हणून जडणघडण विसाव्या शतकात म्हणजेच १९२० ते १९५० च्या दशकांत झाली. या काळात राजकीय स्वांतत्र्य तर मिळालेच होते. पण राज्यघटना, राजकीय—आर्थिक आणि सामाजिक घडी, राज्यांची पुनर्रचना, फाळणी तसेच आर्थिक विकास आणि सामाजिक विकासाचा कृती—कार्यक्रम असे सारे या काळात घडत गेले. या पायावर आधुनिक भारत या राष्ट्राची घडण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कार्यकाळही हाच आहे. मुबंईत १९१८ साली त्यांचे नेतृत्व राजकीय क्षितीजावर उदयास आले. सुमारे ४० वर्षाच्या (१९१६ ते १९५६) काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानदान आणि नेतृत्व करीत होते आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टीने राष्ट्राच्या उभारणीत योगदान देत होते. तत्कालीण समाजात अनेक सामाजिक प्रश्न व समस्या होत्या. या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी समाजातील अनेक सुधारक प्रयत्न करत होते. परंतु सामाजिक समस्या सोडविण्यासाठी धोरणे सुचविण्याची डॉ.आंबेडकरांची पद्धती त्यांच्या समकालीण नेत्यापेक्षा निराळी होती. विषयाचा सखोल अभ्यास करून, कारणे

ओळखून मगच उपाय शोधण्याची शिस्त त्यांच्या अंगी होती. म्हणूनच त्यांनी सुचविलेले उपाय हे आजही कोणत्याही सामाजिक समस्यांचा सामना करण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.

अध्ययन पद्धत:—

तथ्य संकलन व सत्यापनासाठी सामाजिक शास्त्रात विविध पद्धत वापरण्यात येतात. प्रसिद्ध विचारवंत बर्नार्ड यांनी व्याख्या करतांना म्हटले की, शास्त्राची व्याख्या मुख्यत्वे सहा प्रक्रीयांच्या रूपात केली जाते.या प्रक्रीया म्हणजे परिक्षण सत्यापन, व्याख्या, वर्गीकरण संघटन आणि निर्धारण होत ज्यामध्ये भविष्यकथन आणि प्रयोग यांचा समावेश होतो. या आधारावर संग्रहीत केलेल्या ज्ञानास शास्त्र असे म्हणतात. सदर शोध निबंधात वर्णनात्मक आराखड्याचा वापर करण्यात आला असून तथ्य संकलनाकरिता दुय्यम पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ज्यामध्ये संदर्भग्रथ, मासिके, वर्तमानपत्र, इंटरनेटवरील साहीत्य  इत्यादी साधनाचा वापर करण्यात आला. सदर शोध निबंधात पूर्णता वैज्ञानिकता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनाची उदिष्टये —

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली स्वातंत्र्य आणि राष्ट्राची संकल्पना अभ्यासणे.

२. संसदीय लोकशाहीबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विचारांचा अभ्यास करणे.

३. हक्क रक्षणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या कृती कार्यक्रमाचा अभ्यास करणे.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक विकास धोरण अभ्यासणे.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अल्पसंख्याक व स्त्रियांच्या हक्काबाबतचे विचार व कार्य अभ्यासणे.

६. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची राज्य—पूणर्रचनाबाबत भूमिका अभ्यासणे.

प्रस्तुत संशोधनाचे वरील उद्देश असले तरी या सर्व उद्देशाचा समावेश हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीत योगदान अभ्यासणे यामध्ये होतो. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्र उभारणी करतांना वरील मुद्दयांचा वारंवार विचार केला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान हे सैद्धातिंक आणि वास्तविक स्वरूपाचे असल्याने शोधनिबंधाकरिता प्रस्तुत अध्ययन विषयाची निवड करण्यात आली आहे.

स्वातंत्र्याची आणि राष्ट्राची संकल्पना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत:च्या पद्धतीने स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होते. सन १९३०—३२ च्या पहील्या गोलमेज परिषदेत  त्यांनी ब्रिटीशांना सांगितले,''केवळ स्वराज्यातील राज्यघटनेमुळेच दलित वर्गास राजकीय सत्ता सहभागाची संधी मिळू शकते. तसे न झाल्यास आमच्या लोकांना मुक्ती मिळणार नाही.'' मात्र 'स्वातंत्र्या'ची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची कल्पना कॉग्रेस व इतरांपेक्षा वेगळी होती. त्यांच्यामते, राजकीय स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याचा निव्वळ एक भाग झाला. अन्य भाग म्हणजे सामाजिक आणि आर्थिक स्वांतत्र्य, असमान हक्कापासून मुक्ती, अस्पृश्य मानले गेलेल्यांना समान सामाजिक व आर्थिक हक्क. समान नागरीकत्वाचे हक्क देण्यात 'जात' हा अडथळा असल्यामुळे आधी सामाजिक—आर्थिक समानतेच्या हक्काचे संरक्षण करणाऱ्या तरतुदी करा, मग ब्रिटीशांकडून राजकीय स्वातंत्र्य घेवूच, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते. हा एकमेव मतभेद कॉग्रेस आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेत होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जो विषय तेव्हा लावून धरला जो आजही अतिशय महत्वाचा ठरतो. कारण अनुसूचित जातींना समान हक्क नाकरले जाण्याचे प्रसंग आजही येतात.

राष्ट्राची ही संकल्पना विकसीत होण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मदत झालीच, पण 'राष्ट्रीयत्वा'ची एक पूर्वअट आपल्या देशात पूर्ण झालेली नसल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले होते. त्यांचे याबाबतचे निरिक्षण असे आहे की, 'स्वत:स राष्ट्र म्हणविणाऱ्या सर्व लोकांचा संवाद, सहभाग आणि भागीदारी यांतुन आलेली सामाजिक एकोप्याची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व होय.' राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे, हे सामाजिक जीवनात समता आणि बधुता किती आहे, यावर ठरते. देशात आर्थिक व सामाजिक पातळीवर मोठी विषमता असतांना आणि पलिकडल्या काळात आंतर—जातीय, वांशिक आणि धार्मिक तणाव वाढत असतांना 'राष्ट्र' विकसीत होण्यासाठी आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्यक्षात दिसण्यासाठी आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारचे अनुकरण केले पाहीजे.

संसदीय लोकशाहीच्या यशाची देखील एक पुर्वअट  डॉ.बाबासाहेब आंबेकडरांनी स्पष्ट केली होती. 'एक व्यक्ती एक मुल्य' किंवा सर्वाना समान मुल्य, हे लोकशाहीचे मूलभूत तत्व आहे. राजकीय लोकशाहीत 'एक व्यक्ती एक मुल्य' या नियमाने हे तत्व आचारणात आणले जाते. पण राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही पातळीवरही सर्वांना समता आणि स्वांतत्र्य हवे. 'सामाजिक आणि आर्थिक लोकशाही हे राजकीय लोकशाहीच्या पेशी आणि तंतुसारखे आहेत,असे बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. परंतु जातिव्यवस्थेमुळे एकतर सामाजिक आणि त्यामुळे आर्थिक लोकशाही

नाकारली जाते आणि राजकीय लोकशाहीचे स्वरूप जातीय किंवा जाती–आधारीत बनते. म्हणून राजकीय लोकशाहीचे बळकट करण्यासाठी डॉ.आंबेडकरांचा, सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर भर होता. त्याचप्रमाणे लोकशाही बळकट करण्यासाठी अहिंसक मार्गाचा वापर ही त्यांनी पूर्वअट मानली होती. ‘ कोणत्याही रक्तपाताविना क्रांतीकारक बदल घडवून आणणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही’, असे डॉ.आंबेडकरांचे होते. परंतु आज जमावाचा हिंसाचार वाढत असताना डॉ.आंबेडकरांच्या विचार स्विकारण्याची वेळ आली आहे.

हक्क रक्षणासाठी कृती कार्यक्रम

लोकशाहीत अल्पसंख्याकांसाठी काही हक्क–संरक्षक उपाय असावेत, यासाठी डॉ.आबेडकरांनी दिलेले योगदानही तितकेच महत्वाचे आहे. शासनसंस्था धार्मिक बहुसंख्येच्या बळावर सुरू राहणे टाळण्यासाठी त्यांनी तीन संकल्पना पुढे आणल्या. १)बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक यांच्या प्रतिनिधीत्वाचा समतोल २)महत्वाच्या मुद्दयांवरील निर्णय सर्वानुमते करणे आणि ३) बहुमताचा पक्षाइतकाच अल्पमतातील पक्षांनाही मंत्रिमंडळ–निवडीचा अधिकार. डॉ.आंबेडकर यांनी शासनसंस्थेला धामिक बहुसंख्याकतावादाचा धोका असण्याची शक्यता विचारात घेतली होती, म्हणून त्यांनी या सूचना केल्या होत्या. त्याचे भाकीत काहीसे आज प्रत्यक्षात दिसते आहे. अल्पसंख्याकाखेरीज स्त्रियांच्याही समान हक्कांचा डॉ.आंबेडकरांची विचार केला आणि ‘हिंदू कोड बिल’ हे विधेयकाच्या मसुद्याला जोरदार विरोध झाला. आज केरळमध्ये असेच प्रकारचा विरोध दिसून येतात. परंतु त्यावेळी डॉ.आंबेडकरांनी अशा शक्तीपुढे झुकण्याऐवजी, केंद्रीय मत्रिपदाचा राजीनामा दिला.

या खेरीज डॉ.आबेडकरांचे महत्वाचे योगदान म्हणजे राज्य–पुनर्रचनेबाबतची भुमिका होय. प्रादेशिकतावाद बळावू नये, म्हणून एकच भाषा बोलणाऱ्या प्रांताचीही अनेक राज्ये असायला पाहीजेत, अशी त्यांची सूचना होती आणि आकाराने लहान, पण आर्थिकदृष्टया सक्षम राज्ये असावीत, असे त्यांचे मत होते. राज्ये आकाराने लहान असल्यास शासकता चांगली असते आणि अशी राज्ये दलित–अल्पसंख्याकांना अधिक चांगल्या प्रकारे सामावून घेणारी असतात, असा विश्वास त्यांनी मांडला होता. मराठीभाषिक प्रांताची चार राज्ये व्हावीत असे त्याचे मत होते आणि विदर्भ राज्य हे अर्थातच त्यापैकी एक होते.

आर्थिक विकास धोरण

स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असतांना, ‘पुनर्बाधनी आणि पुनर्वसन योजना १९४२–४६’ तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१–५५ च्या पहील्या पंचवार्षिक योजनेते त्या योजनेचा आधार घेतला. डॉ.आंबेडकरांनी कामगारविषयक धोरण आखलेच, पण अनुसूचित जातीविषयीचे धोरण आणि महत्वाचे म्हणजे पाणी आणि विज यांच्या विकासाचे ही धोरण त्यांनी आखले होते.आजही त्या कामगार धोरणाचा आधार घेतला जातो. कलकत्यात आजही पहीले रोजगार–विनिमय केंद्र सुरू झाले तेही याच धोरणामुळे. अनुसूचित जातींसाठी सरकारी नौकऱ्या व शिक्षणामध्ये आरक्षण हे निर्णय त्यांच्या धोरणामुळे झाले. केंद्रीय जल आयोग, विज प्राधिकरण यांची सुरूवात पाणीव विज विषयक धोरणातुन झाली.दामोदर, हीरकुड, शोण ही धरणे तसेच दख्खनचा पाठबंधारे विकास हा या धोरणामुळे मार्गी लागला.

खनिज निर्मिती

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे खनिज निर्मिती हे खातेही होते. त्यांनी औद्योगिकरणाला चालना दिल्याने खनिजनिर्मिती संदर्भात एक धोरण तयार केले. त्यामुळे सुसुत्रता आली. भूगर्भीयशास्त्र सव्हेक्षणाला त्यांनी प्राधान्य देवून अभियांत्रिकी भूगर्भशास्त्र, खनिजाचा उद्योगात वापर, तेल विकास, खनिज निर्मिती मूल्य, त्याचबरोबर खाणकाम परवाने मंजूर करणे, परवान्याच्या अटी व शर्ती निश्चित करणे, परवाने रद्द करणे, खनिजाची निर्यात, वाहतूक, खनिज कामगाराचे वेतन, भत्ते अपघात विमा, सुरक्षितता, कोळशाचे उत्खनन, श्रेणीकरण या बाबीकडे त्यांनी लक्ष देवून राष्ट्रहीताचे निर्णय घेतले.

बाबासाहेबांच्या दुरदृष्टीकोणामुळे आपली राज्ये अनेक बाबतिक स्वायत्त आहेत. परंतु ती सार्वभौम नाहीत. सार्वभौम भारत आहे. बाबासाहेबांनी देशाला एक चलन दिले. एक नागरीकत्व दिले. सर्वांना समान राजकीय, आर्थिक, सामाजिक अधिकार दिले. आम्हाला खऱ्या अर्थाने भारत ही संकल्पणा दिली. आज जी युवा उभी राहत आहे, ती बाबासाहेबांच्या संकल्पनेतील संपूर्ण भारताचा विचार करणारी पिढी आहे. डॉ.आंबेडकरांनी मूर्त स्वरूपातील राष्ट्रराज्याची संकल्पणा आपल्यासमोर मांडली. केवळ भौगोलिक सलगता आणि सांस्कृतिक एकता यानेच राष्ट्र निर्माण होत नाही. याचा अर्थ हया बाबी नसल्या तरी चालते, असेही नाही, त्या तर हव्याच. परंतु राष्ट्राच्या प्राण भावनिक एकतेत असतो. आम्ही एम आहोत.–मग आमची भाषा, धर्म, पंथ, जात कोणतीही असो; आम्ही एक राष्ट्र आहोत. डॉ.आंबेडकरांनी निर्माण केली राज्यघटना आपल्याला लोकशाही देते. भारत ही संकल्पना देते, एक सशक्त राज्य रचना देते, ही सर्व रचना सामाजिक न्यायाच्या मजबूत पायावर उभी करते. म्हणून राष्ट्र उभारणीत डॉ.आंबेडकरांचे मोलाचे योगदान दिसून येते.

सारांश:– डॉ.आंबेडकरांनी वेळोवेळी मांडलेले मत, केलेल्या सूचना आजच्या काळात 'शिकवण' ठरतात. कारण स्वांतन्त्र्य, राष्ट्र, लोकशाही, यांविायीच्या त्यांच्या कल्पना आजही राष्ट्रापुढील आव्हानाना सामारे जाण्यासाठी मोलाच्या ठरतात. स्वातंन्त्र्य, समता आणि बधुता ही मुल्ये कोणत्याही सशक्त राष्ट्रजीवनाचा आणि बळकट लोकशाहीचा पाया असतात आणि या मूल्याचे आचरण करताना स्त्रिया, अल्पसंख्याक, यांच्यासह सर्वाची समता, सर्वामधील बंधुता आणि सर्वांना चांगले जगण्याचे स्वातंन्त्र्य अभिप्रेत

असते. सामाजिक व्यवहारात आणि आर्थिक संधीमध्ये जर समताच नसेल आणि हिंसक प्रक्रिया घडत असतील, तर अखेर अशा राष्ट्रातील एकोप्याची भावनाच कमकुवत होत राहते आणि म्हणून राष्ट्रजीवनापुढे आव्हाने उभी राहतात. आजही खऱ्या अर्थाने आपण अशाच वास्तवाला आपण सामोरे जात आहे.

संदर्भग्रंथ :–

१) खंडारे प्रा.आर.बी. – डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीत योगदान,अथर्व पब्लिकेशन, जळगाव २०२०
२) आगलावे डॉ.प्रदिप –सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन,नागपूर
३) कीर धनंजय – डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, दुसरी आवृत्ती २००६
३) https://www.loksatta.com
४) https://mr.vikaspedia,in/education
५) https://www.bookganga.com/ebook
६) https://divyamarathi.bhaskar.com

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे राष्ट्र उभारणीसाठी योगदान-एक आढावा

सहा.प्रा.स्मिता रामेश्वर देवर
पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग
श्रीमती राधादेवी गोयनका महीला महाविद्यालया,
अकोला.
dewar_smita@rdgakola.ac.in
Mo. No.9657247420

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे महान व्यक्तिमत्त्व आणि हिमालयाच्या उंचीचे कार्य करून ठेवले आहे. ते पाहता त्यांची दूरदृष्टी वर्तमानाचा वेध घेणारी आणि भविष्यातील पावले ओळखली होती याची आपल्याला जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. एका ध्येयाने प्रेरित झालेले हे व्यक्तिमत्त्व होते.भाऊसाहेबांन ची बुद्धि, ज्ञान,आणि दूरदृष्टी अचंबित करणारी होती.

❖ भाऊसाहेबांच्या कारकिर्दीवर एक दृष्टिक्षेप-

- खासदार
- भारतीय घटना समितीचे सदस्य
- केंद्रीय कृषिमंत्री
- कृषी आणि सहकार क्षेत्रात अनेक संस्थांचे अध्यक्ष
- आंतरराष्ट्रीय समित्यांचे सदस्यत्व अध्यक्षपद
- समाजसेवक शिक्षण महर्षी कृषी महर्षी व राजकारणी

डॉक्टर पंजाबराव देशमुख हे विदर्भाला लाभलेले एक मोठे उत्तुंग व्यक्तिमत्व होते. त्यांनी विदर्भासाठी नव्हे तर महाराष्ट्र व संपूर्ण देशासाठी महत्त्वपूर्ण योगदान केलेले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल मत व्यक्त करताना महात्मा गांधी म्हणतात **"शेतकऱ्यांची सेवा करणे सोपे आहे त्यासाठी सोपे कायदे साधे शिष्टाचार व सरळ माणसे हवी आहेत ते तीनही गुण अंगी असले डॉ. पंजाबराव देशमुख हा कदाचित भारतात या युगातला एकमेव माणूस असावा ज्याने पद, प्रतिष्ठा व पैसा यांना तुच्छ लेखून आपल जीवन यज्ञ चेतवला"** भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सुद्धा डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या बद्दल मत व्यक्त केले **" Dr panjabrao Deshmukh had played a notable role in the building of modern India his contribution in the agriculture field was of a unique character and it would be a benefiting tribute to his memory if we ameliorate the condition of village"**

या महान व थोर व्यक्तींकडून डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या बद्दलची हे वाक्य किंवा हे उद्गार आपल्याला निश्चितच कळुन येते ते डॉ.पंजाबराव देशमुख यांचे देश उभारणीसाठी फार मोठे योगदान आहे.

- उद्दिष्टे

1. डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी व शेतकरी विषयक विचारांचा आढावा घेणे.
2. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या राजकीय जीवनाविषयी आढावा घेणे.
3. पंजब्राव देशमुख यांचे शिक्षण विषयक विचारांचा आढावा घेणे.
4. डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन स्पष्ट करणे.
5. पंजाबराव देशमुख यांचा सामाजिक दृष्टिकोनाचा आढावा घेणे.

### 1. डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार व धोरण

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी अन्नधान्याच्या बाबतीत भारत आत्मनिर्भर होता.देशांमध्ये लोकसंख्या वेगाने वाढत होती परंतु त्या तुलनेत अन्नधान्याचे उत्पादन वाढले नाही 1943 मध्ये बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला. त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले .1947 च्या विभाजनानंतर देशाची परिस्थिती अधिक हलाखीची झाली. लोकांना दोन वेळचे पुर्ण जेवण मिळत नव्हते, त्यामुळे लोकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढले,आजार याचे प्रमाण वाढले,या सर्व स्थितीचा फायदा साठेबाजी करणारे उत्पादक व व्यापारी यांना झाला. त्यांनी जास्त किमतीमध्ये अन्नधान्यांची विक्री सुरु केली यामुळे वाढत्या किमतीमुळे लोकांना आपल्या आवश्यक गरज आहे पूर्ण करणे कठीण झाले. सरकारने यावेळेस शिधावाटप आणि मूल्य नियंत्रण लागू केले.विदेशातून मोठ्या प्रमाणावर धान्याची आयात केले यामुळे अन्नधान्यच्या संदर्भात कोसळलेले संकट नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला गेला. अमेरिकेकडून गहू,जव यासारखे धान्य मागविण्यात आले. डॉ.पंजाबराव यांनी तत्कालीन भारतातील शेतीचा आढावा घेतला आणि देशातील लोकांचीच अन्नधान्याची गरज पूर्ण करू शकेल अशा जपानी पद्धतीने तांदूळ शेतीचे प्रयोग भारतीय कृषीत कार्यरत केले त्यामुळेच आज देशातील लोकांची अन्नधान्याची गरज भागवून आपण अन्नधान्याची निर्यात करू शकतो.देशातील अन्नधान्याची सर्व कोठारे भरलेली असून आत्मनिर्भरता प्राप्त केली आहे याचे सर्व श्रेय डॉक्.पंजाबराव यांच्या कृषी विषयक धोरणास द्यायला हरकत नाही. पुरेसे अन्नधान्य तसेच उद्योजकांना पुरेसा कच्चामाल पुरवणे ही शेती व्यवसायाची पहिली गरज आहे किंवा जबाबदारी आहे या शिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास घडून येणार नाही असे मत डॉ.देशमुख यांची होते त्यांनी भारताला अन्नधान्याच्या संदर्भात स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. देशातील बहुतांश शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे म्हणून धरणे,कालवे,तळे यांची संख्या स्वातंत्र्यानंतर वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले शिवाय शेती सुधारणा करण्यासाठी उत्तम प्रतीची बी-बियाणे अद्ययावत तंत्रज्ञान इत्यादी वर त्यांनी मत व्यक्त केले व याचा वापर करण्यासाठी सर्वांना प्रवृत्त केले कृषीला पंचवार्षिक योजनेमध्ये प्राथमिकता देण्यासाठी डॉ.देशमुख यांचे मोठे योगदान आहे. योगदानामुळेच आज कृषी ही मोठ्या प्रमाणात विकासाच्या दृष्टीने पावले उचलताना दिसत आहे.यामुळे मोठ्या

प्रमाणात आपण कृषी वर अवलंबून असलेले लहान मोठे उद्योग धंदे करत आहोत व मोठमोठ्या उद्योगांसाठी लागणारा कच्चामाल हा मोठ्या प्रमाणात शेतीमध्येच उत्पादन करण्यात भारतातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात यश आले आहे.

**2 डॉ पंजाबराव देशमुख जिल्हा कौन्सिल अध्यक्षपद**

1928 मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी जिल्हा कौन्सिलच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. यामुळे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना अतिशय आनंद झाला आणि  शेतकऱ्यासाठी आता काही उपयोगी योजना निश्चित करण्यात येतील असा सर्वांना विश्वास वाटू लागला व या विश्वासाचे डॉ. देशमुख यांनी यशस्वीरित्या पालन केले.

**अ.पाणी पुरवठा योजना-**

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी प्रथम ग्रामीण लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हाती घेतला.पाणी म्हणजे जीवन पाणी शिवाय आयुष्याची कल्पनाच होऊ शकत नाही प्रत्येक व्यक्तीला शुद्ध व स्वच्छ पाणी मिळणे आवश्यक आहे. तेव्हा त्यांचे आरोग्य उत्तम राहील परंतु या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष झालेले दिसत होते. ग्रामीण भागातील लोक कोणत्या प्रकारचे पाणी पितात याकडे तर सर्वांचे दुर्लक्ष होते. पिण्याच्या पाण्याविषयी सामाजिक बंधनांमुळे स्पृश्य व अस्पृश्य यांचे अतिशय हाल होते. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी हे दृश्य खेडोपाडी पाहिलं होते. यावर उपाय शोधण्यासाठी त्यांनी तळमळीने प्रयत्न केले व जिल्हा कौन्सिलच्या अध्यक्ष पदाच्या खुर्चीवर बसतात प्रथम पाणी पुरवठा योजना हाती घेतली यानंतर त्यांनी अमरावती इटकी व दर्यापूर च्या परिसरातील पाणीपुरवठा योजना एकमताने पास करून राबविली.

**ब. सक्तीचे प्राथमिक शिक्षण-**

शिक्षणाशिवाय कोणताच समाजात मोठा होऊ शकत नाही असे विचार डॉ. पंजाबराव देशमुख यांचे होते. महात्मा फुले पासून ते राजर्षी शाहू महाराज कर्मवीर भाऊराव पाटील याप्रमाणे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सुद्धा शिक्षण विषयक विचार स्पष्ट केले व शिक्षणाचे महत्त्व बहुजनांमध्ये सुद्धा रुजवण्याचा प्रयत्न केला.शिक्षण प्रसारणाच्या बाबतीत लॉर्ड मेकॉलेजचा झिरपणी चा सिद्धांत राज्यकर्त्यांनी स्वीकारला होता या सिद्धांतानुसार शिक्षण वरिष्ठ वर्गाचे दिले तर ते हळूहळू झिरपत कनिष्ठ वर्गात पर्यंत जाईल असे त्याचे स्वरूप होते पण हे धोरण फक्त वरिष्ठ पुरतेच मर्यादित राहिले याचा फायदा तत्कालीन राज्य करताना मोठ्या प्रमाणात झाला कारण या सिद्धांतामुळे मोठ्या संख्येने बहुजन समाजात शिक्षण देण्याची जबाबदारी फक्त नाममात्र राहिले आणि वरिष्ठ वर्गास दिल्या जाणाऱ्या शिक्षणामुळे राज्यकारभारासाठी आवश्यक तो सुशिक्षित नोकरभरती उपलब्ध होणार होता या सर्वांचा विचार डॉ. देशमुख यांना आला. अमरावती जिल्ह्या सारख्या छोट्याशा विस्तारात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करणे सोपे

नव्हते.त्याकरिता जिल्हा कौन्सिल वरील खर्चाचा बोजा वाढणार होता परंतु कशाचीही पर्वा न करता भाऊसाहेबांनी आपल्या प्रभावी व मुद्देसूद भाषणाने सक्तीचे शिक्षण योजना राबविण्यासाठी व त्यासाठी सेस नऊ पैनी वाढवायचा ठराव अविरोध मंजूर करून घेतला. त्यामुळे खेड्यापाड्यांमध्ये शाळा सुरू झालेल्या. सक्तीच्या शिक्षण योजनेमुळे विद्यार्थ्यांचा व त्यासाठी अध्यापकांची भरणा होऊ लागला यासाठी गरजवंतांना शिक्षण व आवश्यक असणाऱ्या ला नोकरी हे दोन्ही गोष्टी देशमुख यांच्या विचाराने सफल झाले. 500 लोकसंख्या असलेला सर्व गावात शाळा उघडल्या जाव्यात असा ठराव सुद्धा पारित करण्यात आला. त्यामुळे जागोजागी शाळेच्या इमारती बांधल्या. बहुजन समाजाची होईल तेवढी अधिक सेवा करणे हे त्या हे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यातील एक महत्त्वपूर्ण भाग होता. शैक्षणिक मानसशास्त्रीय दृष्टीने प्राथमिक शाळांवर स्त्री शिक्षिका निवडण्याचा उपक्रम पंजाबराव देशमुख यांनी सुरू केला कारण स्त्रिया लहान मुलांच्या भावना व अडचणी सहज जाणू शकतात व लहान मुलांशी वागण्यात कौशल्य व शांतपणा लागतो तो स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात असतो म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणामध्ये जास्त करून स्त्रियांना सहभागी केले आणखी एक कारण म्हणजे तेव्हाच्या सामाजिक परिस्थिती मुलींच्या शाळेत सर्वश्री शिक्षक असतील तर त्या शाळेविषयी पालकास जास्त विश्वास वाटतो व ती आपल्या मुलींना आनंदाने शाळेत पाठवण्यात उत्सुक असतात या दृष्टिकोनाचा विचार करून त्यांनी स्त्री शिक्षकांची मोठ्या प्रमाणात भरती करण्यास सुरुवात केली व याचा फायदा म्हणजे गावातील अनेक मुली शाळेमध्ये प्रवेशित झाल्या व स्त्रियांना सुद्धा स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी प्राप्त झाली स्त्रिया या स्वावलंबी झाल्या या विचाराने प्राथमिक शिक्षण स्त्री शिक्षण व स्त्री सबलीकरण अशा प्रकारची विचार डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी पूर्णत्वास आणले.

पंजाबराव देशमुख यांनी अमरावती जिल्ह्यात सुरू केलेल्या साक्षरता अभियानाने अमरावती जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढले सन 1956 मध्ये मध्य प्रदेश या राज्याने विविध जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण पाहण्याकरता एक सर्वेक्षण केले या सर्वेक्षणामध्ये अमरावती जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण हे सर्वात जास्त होती यामध्ये पुरुष यांचे प्रमाण 37.9 %स्त्रियांचे 13.2 % तर ग्रामीण भागात 20.8 % व शहरी भागात 39.2 % अशा प्रमाणे साक्षरतेचे प्रमाण होते. अपेक्षा नागपूर जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण हे कमी होते पुरुष साक्षरता अमरावती जिल्ह्यात 37.9 % तर नागपूर जिल्ह्यात 34.6% ही साक्षरता नागपूर पेक्षा 3.3 %अधिक होती तसेच नागपूर पेक्षा अमरावती जिल्ह्यात महिलांची साक्षरता ही 0.2 %अधिक होती अमरावतीची एकूण साक्षरता 25% तर नागपूरची 24% होती राज्याची सरासरी साक्षरता फक्त 13.5 % होती यावेळेस अमरावती जिल्ह्याची साक्षरता जवळजवळ राज्याच्या दुप्पट होती. आपल्याला डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सुरु केलेली सक्तीचे प्राथमिक शिक्षण चळवळ यशस्वी ठरली हे लक्षात येते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या मुळे प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे करण्यात आले याचा फायदा त्या काळातील सर्व समाजातील व्यक्तींना झाला.

### क. अस्पृश्यता दूर करण्याची तळमळ

हिंदू धर्मातील अतिशूद्र वैदिक धर्माने हजारो वर्षापासून बहिष्कृत केले होते. त्यांना सार्वजनिक धर्मशाळा,मंदिरे,पाणवठे, सभागृह येथे प्रवेश नव्हता अस्पृश्यता ही कायदेशीवाय जात नाही हे डॉ.पंजाबराव देशमुख यांना लक्षात आले आणि म्हणून त्यांनी जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष असताना जिल्हा कौन्सिलच्या अधिकार कक्षेत येणारी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना मोकळी करण्याचा ठराव केला. सवर्ण हिंदू अस्पृश्यांना आपल्या विहिरीतून पाणी सुद्धा भरू देतं नाही अस्पृश्यांच्या पाणी योजना या साठी एक लाख रुपये मंजूर करून जिल्हा कौन्सिलने कार्यान्वित केली. खेडोपाडी अस्पृश्य समाजासाठी विहिरी बांधून दिल्या डॉ. पंजाबराव देशमुख यांनी संपूर्ण जिल्हाभर अस्पृश्यांच्या बरोबर सहभोजनाचे कार्यक्रम जाहीर रीतीने सुरू केले यामुळे स्पृश्य-अस्पृश्य भेद मनातून दूर करण्यासाठी व आपण सर्व एकच आहोत ही भावना वृद्धिंगत करण्यासाठी पंजाबराव देशमुख यांनी प्रयत्न केले.

### ड. फिरत्या वाचनालयाची संकल्पना

डॉ पंजाबराव देशमुख जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष असताना फिरतं वाचनालयाची नवीन योजना त्यांनी जिल्हा कौन्सिल पुढे मांडले खेड्यातील साक्षर जनतेची अक्षर ओळख कायम राहावी व विविध प्रकारच्या ज्ञानाने त्यांची बुद्धी प्रल्हाद व्हावी व कुशल व्यवहारात ज्ञान वाढावे या हेतूने त्यांनी पुस्तके पुरविण्याची सोय या योजनेने करण्यात यावी असे सुचवले. वाचनालयाला 600 रुपयांची देणगी जिल्हा कौन्सिल कडून देण्यात येत होती 25 रु.याच्यावर जिल्हा कौन्सिल कडून उत्पन्न मिळणाऱ्या ग्रामपंचायतीकडूनही वाचनालया करता 5 रुपये वसूल करण्यात येत होते या वाचनालयात करिता जिल्ह्यातील प्रत्येक शाळेतील वाचनीय पुस्तके तालुका बोर्डात मागण्यात आली. जमा झालेल्या एकंदर पुस्तकाचे बारा गट पाडून व तालुक्यात तितकीच शाळांची केंद्र निर्माण करून प्रत्येक केंद्रात एक महिनाभर पुस्तके ठेवण्याची पद्धती निश्चित करण्यात आली होती यामुळे प्रत्येकाला वेगवेगळ्या विषयांची पुस्तके वाचण्यास मिळाली व त्यांचे ज्ञान अद्यावत व वृद्धिंगत ठेवण्यात मदत झाली तसेच गावातील व्यक्तींना त्यांची अक्षर ओळख कायम ठेवण्यास मदत झाली व खेड्यातील साक्षरतेचे प्रमाण काही प्रमाणात वाढले.

### इ.आरोग्य विषयक सेवा

गावा गावात बोर्डाने दवाखाने उघडले दवाखान्या वरील डॉक्टरांनी आसपासच्या खेड्यात जाऊन वैद्यकीय साहाय्य देणे तसेच आरोग्य विषयक सूचना वेळच्या वेळी करणे तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करणे यासारखी कामे आरोग्यविषयक सेवांना व डॉक्टरांकडे सोपवण्यात आली होती.

### ई.पंजाबराव देशमुख यांच्या विचारातील स्त्री पुरुष समानता-

मंत्रिपदाच्या काळामध्ये डॉ. देशमुख यांनी अनेक चांगल्या प्रथा पार पाडला भाऊसाहेबांनी दृष्टी ही सतत समानता ठेवणारी होती त्यांनी स्पृश्य-अस्पृश्य भेद कधीच केला नाही तसेच सामाजिक व शैक्षणिक जीवनामध्ये स्त्री-पुरुष

असा भेद नको असे त्यांचे मत होते जातिभेद तर मुळीच नको याचे एक उदाहरण म्हणजे नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्ये सौ कुसुमावती देशपांडे यांची प्राध्यापिका म्हणून केलेली नेमणूक. कुसुमावती बी. ए.ऑनर्स होत्या त्यांचा इंग्रजी विषयात खूप मोठे प्रभुत्व होते परंतु सिलेक्शन कमिटीने त्या महिला असल्यामुळे त्यांची नियुक्ती करण्यात येते येऊ शकत नाही असे स्पष्ट लिहिले व महाविद्यालयात महिला प्राध्यापिकेचे नियुक्ती होऊ शकत नाही असे सांगितले परंतु भाऊसाहेबांनी कुसुमावतीबाईंची नियुक्ती केली शिक्षण क्षेत्रात स्त्री-पुरुष असा भेद व्यर्थ आहे आणि तेव्हापासून कॉलेजमध्ये  प्राध्यापिका नेमण्यात जाऊ लागल्या. आज अनेक स्त्रिया महाविद्यालयांमध्ये प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत याचे सर्व श्रेय डॉ. पंजाबराव देशमुख यांना जाते असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

### 3.शेतकऱ्यांसाठी सहकारी संस्था विषयक दुरुस्ती 1931

1931 पर्यंत अनेक कारणांमुळे शेतकरी कर्जाची फेड करून न शकल्यास त्यांची गहाण शेती किंवा अन्य मालमत्ता जप्त करण्यात येत असे त्यांची शेती जप्त होऊ नये म्हणून शेतकऱ्यांना कायद्याच्या आधारे संरक्षण देणे आवश्यक झाले होते. म्हणून मंत्री असताना सरकारी स्तरावर डॉ. पंजाबराव यांनी सहकारी संस्था दुरुस्ती विधेयक सभागृहात सादर केले आणि शेतकऱ्यांची मालमत्ता जप्त करू नये या संदर्भात आपले विचार व्यक्त केले तसेच मध्यप्रांत कॉटन मार्केट विधेयक 1931 मध्ये मांडून विदर्भातील कापूस उत्पादनाच्या होणाऱ्या गैरसोय व फसवणुकीला आळा घालण्यासाठी प्रत्येक मध्यप्रांत कॉटन मार्केट विधेयक बहुमताने मंजूर करून घेतले. यामुळे येथील अनेक शेतकऱ्यांची गैरसोय वाचली व शेतकऱ्यांची आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात कमी झाले तसेच शेतीसाठी शेती गहाण ठेवून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी परत शेती गमावणे हे सुद्धा थांबले.

### 4. हिंदू देवस्थान संपत्ती विधेयक वर डॉक्टर देशमुख यांचे विचार-

डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी 1931 चाली मध्यप्रांत व वऱ्हाड कायदेमंडळा समोर हिंदू देवस्थान संपत्ती बिल मांडले देवस्थानाची संपत्ती सरकारने ताब्यात घेऊन देवस्थान नीट व्यवस्थित चालावी यासाठी काही निधी द्यावा व उर्वरित निधीचा उपयोग शिक्षण देण्यासाठी व शैक्षणिक कार्यासाठी करावा असे बिलात त्यांनी नमूद केले एक पैसा कर न लावता सुद्धा विनामूल्य शिक्षण देता येईल अशा प्रकारची आकडेवारी तयार करून त्यांनी सरकारसमोर मांडली होती परंतु  विरोधकांनी हे बिल  नामंजूर केले. हे बिल मंजूर झाले असते तर वऱ्हाडातील मंदिराचे रुपांतर विद्या मंदिरात झाले असते व सरकारचा करोडो रुपयांचा शिक्षणावरील खर्च इतर उपक्रमांमध्ये गुंतविता आला असता. संपत्ती आपणास देशात इतरांसाठी वापरू तितकाच आपल्या देशाचा अधिक वेगाने विकास घडून आनता येईल असे त्यांचे मत होते व कलम 24 मध्ये या विचाराला समाविष्ट करावे यासाठी त्यांनी विनंती केली. मंदिरा देणगीतून मंदिराकडे व संस्थांकडे जो अवाजवी पैसा ठेवलेला आहे त्या पैशाचा उपयोग देशातील शिक्षणासाठी करण्यात यावा त्यामुळे सरकारचा शिक्षणावरील होणारा पैशाची बचत होईल व समाजातील लोकांनी मंदिर व संस्थांना दान केलेल्या पैशातून

शिक्षणाचे दान हे मोठ्या प्रमाणात करता येईल यामुळे समाजामध्ये शिक्षण सर्व तळागाळापर्यंत पोहोचेल व सरकार जवळ असलेला शिक्षणासाठी चा पैसा देशाच्या इतर उपक्रमांसाठी उद्योगांसाठी उपयोगी आणता येईल अशा प्रकारचे महत्वपूर्ण विचार डॉ.पंजाबराव देशमुख यांचे होते.

## 5. भूमिहीनांना जमिनीचे वाटप करावे यासाठी प्रस्ताव-

भारतामध्ये भूमीचे असमान वितरण झाले आहे त्यामुळे ग्रामीण भागात प्रचंड प्रमाणात आपल्याला गरीबी दिसून येते भारतामधील खूप कमी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात जमिनी दिसून येतात व जास्तीत जास्त लोक हे भूमिहीन आहे ही व्यवस्था बदलणे आज काळाची गरज बनली आहे असे त्यांचे मत होते. प्रचलित भारतातील जमीनदारांकडे- सरंजामदारानकडे जी जास्तीची जमीन आहे ती शासनाने अधिग्रहित करावी व उत्पादन कार्यामध्ये समाविष्ट होणाऱ्या शेतकऱ्यांना समप्रमाणात वाटावी अशा प्रकारचे मत डॉ. पंजाबराव देशमुख यांचे होते. या विचारांवरून भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये सर्वांच्या हातात मोठ्या प्रमाणात कृषी विषयक उद्योग धंदा मिळेल व त्यामुळे देशाची आर्थिक व सामाजिक विकास होईल हे उद्दिष्ट दिसून येते.

## 6. शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महर्षी, सहकार महर्षी, त्याचप्रमाणे शिक्षण महर्षी होते शिक्षण महर्षी म्हणण्याचे कारण की त्यांनी अतिशय कष्टाने शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदव्या चांगले गुण मिळून संपादन केल्यात संपूर्ण विदर्भाचा शैक्षणिक विकास त्यांच्या वैचारिक प्रयत्नातून झाला.श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांनी विदर्भातच नाही तर दिल्ली पासून तर लंडन पर्यंत शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहाची स्थापना केली त्यामुळे कमी खर्चात शेतकऱ्यांची मुले विदर्भातच नव्हे तर संपूर्ण भारतात शिक्षण घेऊ लागले. शिक्षणाही आर्थिक विकास पूरक अशी गोष्ट आहे म्हणून शिक्षण हे सर्वांनाच प्राप्त झाले पाहिजे असा त्यांचा विचार होता व यासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था उभारल्या. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी फक्त शिक्षण संस्था काढल्या नाही तर शिक्षण क्षेत्राला महत्त्व पुर्ण मूलगामी विचार सुद्धा दिले म्हणून त्यांना शिक्षण तज्ञ किंवा शिक्षण महर्षी म्हणणे उचित ठरेल. प्राथमिक शिक्षणाची सक्ती तसेच प्राथमिक शिक्षण देण्यासाठी स्त्री शिक्षकांची भरती व महाविद्यालयात प्रथमच स्त्री प्राध्यापिकेचे नेमणूक अशा अनेक घटना शिक्षण क्षेत्रात घडल्यामुळे आजची शिक्षण प्रणाली ही विकसित झालेली दिसून येते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारत कृषक सेवक समाजातर्फे खेड्यात युवकांची शैक्षणिक शिबिरे घेऊन ग्रामसफाई भौतिक विकासावर कार्यक्रम घेण्याचे नियोजन केले त्यामुळे लाखो रुपयांची श्रमदान विकासाच्या प्रक्रियेला योगदानाच्या रूपाने प्राप्त झाले त्यांच्या भारत सेवक समाजानं शिक्षण, आरोग्य, खेड्यातील लोकांचे प्रतिव्यक्ती

उत्पन्न वाढविणे, सामूहिकरीत्या खेड्यांचा विकास करणे, खेड्यातील लोकांमधील आपसात असणारे कलह मिटविण्याचा प्रयत्न करणे, इत्यादी स्वरूपाचे कार्य केले याशिवाय त्यांनी स्थानिक विकास कार्य, आर्थिक नियोजन, युवक शिबिरे, सहकार्य सांस्कृतिक कार्यक्रम, शिशु कल्याण इत्यादी कार्य सुद्धा केली अशाप्रकारे त्यांनी शिक्षणाला जोड देऊन सामाजिक कार्य केले.

### 7. श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना-

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करण्यामागील कारण म्हणजे त्यांनी छत्रपती शाहू महाराज यांचे ऐकलेले विचार होय. छत्रपती शाहू महाराजांच्या मते हिंदुस्थानातील अखंड परिश्रम करणारा शेतकरी वर्ग आपल्याला बदलायचा आहे कारण गुलामगिरीचे व दुःखाचे मूळ कारण म्हणजे अज्ञान आहे समाजात क्रांतिकारक बदल घडवून आणायचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही शिक्षण क्रांती च्या उदरातून जगातील सर्व क्रांत्या जन्मले आहेत. सार्वजनिक शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाचे व समाजाचे परिवर्तन घडून येत नाही शिक्षणाचे असे मंदिर आहे तेथे सर्व प्रकारची जात व धर्म बंधने ते नष्ट होतात हिंदुस्थान सरकारला सक्तीच्या मोफत शिक्षणाची मागणी राजर्षी शाहू महाराजांनी केली होती हिंदुस्थानाच्या क्रांतिकारक परिवर्तनासाठी सक्तीचे मोफत शिक्षण ही पहिली गरज आहे असे त्यांनी म्हटले होते या विचारांचा डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या मनावर खूप मोठा परिणाम झाला व यानंतर डॉ.पंजाबराव देशमुख यांनी 1932 ला श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी शिक्षणासाठी वसतीगृह व शाळांची स्थापना केली. शिवाजी शिक्षण संस्थेच्या अनेक शाळांमधून विदर्भातील आणि देशपातळीवरील विद्यार्थी आज सुद्धा मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत आहेत यामुळे विदर्भातील कृषी विषयक विकास घडून आला आहे पंजाबराव देशमुख यांच्या नावाने असलेले अकोला येथील कृषी विद्यापीठ व श्री शिवाजी महाविद्यालय हे त्याचे मोठे उदाहरण आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षित केले व त्यांची नाळ मातीशी जोडलेली असेल तर तो शेतीपासून दूर जाणार नाही व शेतीचा विकास झाला तर देशाचा विकास हा नक्कीच होईल व देशाचा विकास हा आपल्या सर्व समाजाचा विकास आहे असे त्यांचे मत होते असे त्यांचे दृष्टीकोण. शिक्षण संस्थेची वाटचाल व विकास मोठ्या झपाट्याने होत आहे संस्थेच्या शाळा-महाविद्यालयांमध्ये कृषी क्षेत्राशी संबंधित असणारे विषय सुरू केले होते आजच्या कृषी शाळेच्या प्रक्षेत्रावर विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले जाते त्यांनी शिक्षण संस्थेला काही महत्त्वाच्या वैचारिक शिफारशी सुचविल्या होत्या त्या पुढीलप्रमाणे…

- 1 सरकारी कृषी क्षेत्र ऐवजी शेतकऱ्यांच्या शेतातच कृषी प्रात्यक्षिके करावीत.
- 2 काही विशिष्ट विषयाकरिता सरकारी कृषी क्षेत्रावरच अल्पकालीन शिक्षणक्रमाची सोय करावी.
- 3 प्रत्येक राज्यात कमीत कमी एक कृषी विद्यापीठ असावे अशा विद्यापीठातून कृषी क्षेत्राला पूरक संशोधन अध्यापन व विस्तार सेवा कार्य करण्यात यावे.

- 4 ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी श्रमप्रधान तंत्र विकसित करावी आणि संशोधनातील माहितीचा प्रसार करावा.
- 5 ग्रामीण भागातली आर्थिक व सामाजिक समस्या सोडवणे आणि पदवी पूर्ण तसेच पदवी तर विद्यार्थ्यांमध्ये कृषी विषयी आवड निर्माण करावी असे त्यांचे मत होते.

एवढेच नाही तर त्यांनी संस्थेच्या वतीने कृषी शाळा व जनता कृषी महाविद्यालय सुरू केले या शाळा-महाविद्यालयातील कृषीविषयक संशोधन केले जाते तसेच इंग्रजी गणित आणि विज्ञान रसायनशास्त्र वनस्पतिशास्त्र सूक्ष्मजीवशास्त्र कृषी विषयक ज्ञान कृषी अभियांत्रिकी पशुवैद्य शास्त्र अर्थशास्त्र सोबतच कायदा शास्त्र व्यवस्थापन शास्त्र शारीरिक शिक्षण माहिती तंत्रज्ञान संगणक शास्त्र प्रिंटिंग प्रेस मेडिकल रिसर्च इत्यादी विषयांवर आधारित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकवले जातात यामुळे शेतकरी पुत्रांची हित होईल व ग्रामीण विभागातील दारिद्र्य कायमचे दूर करण्यात मदत होईल हा त्यांचा उद्देश होता यामुळे गावांचा विकास होईल व गावांचा विकास झाला तर देशाचा विकास होईल हे त्यांचे सूत्र आपल्या लक्षात येते.

## 8. कृषी -समाज विकासासाठी पायाभूत उद्योग आहे.

कृषी किमान शेती ही सर्वच उद्योगांची जननी आहे कारण उद्योग किंवा औद्योगीकरणाचा मूळ शेतीतूनच होतो कारण की उद्योग आणि औद्योगिक करण्यासाठी लागणारा कच्चा मालाचे उत्पादन हे शेतीतूनच मिळते. कृषी हा औद्योगिकीकरणाचा आधार आणि आर्थिक विकासाचे भांडवल आहेत तसेच समाज विकासाचा साठी महत्वपूर्ण घटक आहे असे त्यांचे मत होते. कारण शेती केल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्या मूलभूत गरजा योग्य रीतीने पार पाडू शकेल जेव्हा व्यक्तीच्या मूलभूत गरजा पार पाडल्या जातात तेव्हाच व्यक्ती इतर समस्या दूर करण्याकडे आपले लक्ष केंद्रित करू शकतो व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या तर देशातील व समाजातील इतर समस्यांकडे व्यक्तींची लक्ष केंद्रित होईल व समाजातील इतर समस्या जशी की शिक्षण अस्पृश्यता बेरोजगारी आपल्याला दूर करता येईल. शेतीचा विकास होणे आवश्यक आहे. शेती मुळे समाज व्यवस्था टिकून ठेवण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल. कारण शेती केल्याने गावातील युवक शहराकडे जाणार नाही त्यामुळे खेडे हे ओस पडणार नाहीत व भारत हा खेड्यांचा देश आहे. म्हणजेच भारताची संस्कृती ही गावात आहे जर गाव जिवंत राहिले तर भारतीय संस्कृती आपण टिकू शकतो म्हणून गाव व गावातील शेती टिकवून ठेवणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

## 9. देश उभारणीसाठी ग्रामोद्योग आणि कुटीर उद्योगाचे महत्त्व

ग्रामीण क्षेत्रांमध्ये ग्रामोद्योग व कुटीर उद्योग ही सहज रित्या सुरु केल्या जाऊ शकतात कारण हे उद्योग कृषीला पूरक अशी आहेत कुकूटपालन गाई आणि म्हशींचे संगोपन शेळ्या मेंढ्या चे पालन टोपल्या विकणे, दोर सुतळ्या बनवणे, उद्योग मत्स्य उद्योग यासारखे उद्योग ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात करता येऊ शकतात. त्यामुळे ग्रामीण भागात

रोजगाराची समस्या दूर होईल व ग्रामीण भागाचा आर्थिक विकास साधता येईल. उद्योगांना लागणारा कच्चामाल सहजरित्या शेतीतून प्राप्त होतो. ग्रामीण भागात काही कौशल्य पूर्ण उद्योग सुद्धा सुरू करता येथील यामध्ये मातीचे भांडी बनवणे चामड्यापासून जोडे चपला तयार करणे तेलघाणी यासाठी लागणारा कच्चा माल शेतीतून मिळतो. लघु व कुटीर उद्योगांचा विकास करण्यासाठी शेतीचा निरंतर विकास होणे काळाची गरज आहे असे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे मत होते.कृषी मध्ये आधुनिक बदल घडवून आणण्यासाठी नियोजन केले पाहिजे भारतातील जास्तीत जास्त संख्या शेतीवर अवलंबून आहे म्हणून या लोकांना बाराही महिने काम मिळवण्यासाठी शेतीविषयक व्यवसायांशी संबंधित असणारे उद्योग आणि शेती यांचा समन्वय घडवून आणणे आवश्यक आहे यामुळे आर्थिक शक्तीचे विकेंद्रीकरण होणार नाही आणि श्रमिकांची शोषण थांबले जाईल तसेच राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण शक्य होईल असे मत डॉ. पंजाबराव देशमुख यांचे होते कृषीचा विकास झाल्याने लघु व कुटीर उद्योग मोठ्या प्रमाणात कार्यक्षम होतील त्यामुळे ग्रामीण भागात जास्तीत जास्त प्रमाणात उद्योग उभारले जातील व ग्रामीण भागातील लोकांचा विकास होईल.

## 10.स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री डॉक्टर पंजाबराव देशमुख

1952 च्या संसदीय निवडणुकीत डॉक्टर पंजाबराव देशमुख प्रचंड बहुमताने अमरावती मतदारसंघातून निवडून आले भाऊ साहेबांना मंत्रीमंडळात समाविष्ट करून घेण्याकडे पंडित नेहरूंचे लक्ष होते तसेच भाऊसाहेबांचे कृषिविषयक समस्यांवर अभ्यासपूर्ण व तडफदार मांडलेली मते पाहून त्यांना कृषिमंत्री पद देण्याचे ठरवले व डॉक्टर पंजाबराव देशमुख हे स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री झालेत. भारताला अन्नधान्य दृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पंजाबराव देशमुख यांना करायचे होते म्हणून देशमुख यांनी आपले सर्व लक्ष प्रथम प्रमुख पिकांवर केंद्रित केले भारतातील बहुसंख्य लोक हे तांदूळ याचे सेवन करतात म्हणून तांदूळ प्रमुखांनी असल्यामुळे तांदळाचे उत्पादन वाढवण्याचा म्हणजे पंजाबराव देशमुख यांनी स्वतः अभ्यास केला व जपानी पद्धतीने तांदूळ यांची शेती करण्यावर भर दिला व तांदळाचे उत्पादन वाढवले. अन्न व कृषी संघटनेच्या सदस्यांनी जगातून उपासमार व दारिद्र्य नाहीसे करण्याकरता संघटित प्रयत्न करावे असे त्यांनी आवाहन केले. त्याच प्रमाणे जपानी पद्धतीचा अवलंब करून भारत तांदूळ उत्पादनाच्या बाबतीत सरस ठरत होता. कृषिमंत्री असतानाच डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याकडे अरण्यखाते होते भारतीय अरण्य जोपासण्याची त्यांनी प्रयत्न केले देशाला जंगलाचा खूप मोठा प्रमाणात फायदा होतो. भारतात त्याच्या संरक्षणाकडे व संवर्धनाकडे दुर्लक्ष होत आहे हे डॉ. पंजाबराव यांच्या लक्षात आले म्हणूनच त्यांनी वन महोत्सवाला प्रोत्साहन दिले. वन महोत्सवात किती झाडे लावावी त्यापेक्षा, लागलेल्या झाडांपैकी किती जगवली व जगविल्या गेली याला अधिक महत्त्व आहे कारण त्यावरून वन संरक्षणाची व संवर्धनाची आवश्यकता लोकात किती रुजवली हे जाणता येईल असे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे मत होते.

## 11.भारत कृषक समाजाची स्थापना

1954 साले श्रीनगर येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या मेळाव्यात पंजाबराव देशमुख म्हणाले भारतीय कृषी व कृषी याबद्दल नितांत आदर वाटतो आणि शेतकऱ्याला सर्वश्रेष्ठ धन निर्माता समजतं शेतकऱ्यां करता अखिल भारतीय स्वरूपाची संघटना असली पाहिजे असे ठाम मत त्यांनी श्रीनगर येथील अधिवेशनात मांडले व त्याचाच परिणाम म्हणजे "भारत कृषक समाज"याची स्थापना झाली. भारत कृषक समाजाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून डॉक्टर पंजाबराव देशमुख यांची निवड झाली भारत कृषक समाजाचे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून कृषक समाजाच्या या नावाने मासिक काढले गेले.

भारत कृषक समाजाची उद्दिष्टे

- १ शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक इत्यादी प्रश्नांचे अध्ययन करणे.
- २ सरकार व इतर संस्थांच्या सहकार्याने शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे शिक्षण देणे तसेच कृषीविषयक उपयुक्त अशा नवनवीन प्रयोगांची माहिती करून देणे.
- ३ कृषक कल्याण अर्थ राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर कृषी विषयक धोरण आखणे.
- ४ कृषिविषयक प्रदर्शनी चर्चासत्रे संमेलने व समारंभ आयोजित करणे
- ५ भारतातील विविध राज्यातील तसेच परदेशातील शेतकऱ्यांना परस्पर भेटी गाठीची संधी प्राप्त करून देऊन त्यांच्यात परस्परांबद्दल आदर व समजूतदारपणा निर्माण करणे.
- यावरून पंजाबराव देशमुख यांची शेती व शेतकरी यांच्याविषयी असलेली आत्मीयता दिसून येते.

## 12.शैक्षणिक कार्य

योजना आयोगाने पंचवार्षिक योजनेचा अंतिम अहवालात समाविष्ट करण्यात येणाऱ्या शिक्षण या विषयावरील काही प्रकरणाचे डॉ. देशमुख यांनी अवलोकन केले त्यांना असे लक्षात आले की शिक्षण सारख्या महत्वाच्या मुद्द्याला अत्यंत कमी महत्त्व देण्यात आले आहे तसेच सक्तीचे शिक्षण ही कल्पना कोणालाच मान्य नाही आणि सध्याच्या परिस्थितीत प्राथमिक शिक्षण पद्धतीलाही अत्यंत कमी लेखले जात आहे मूलभूत शिक्षण किंवा बुनियादी शिक्षण या योजनेचा सध्या जोरदार पुरस्कार केला जात होता तो देखील काही निश्चित योजना करून किंवा व्यवहारिक आचार यांचा विचार न करता करताच केला जात आहे असे त्यांचे मत होते. भूत शिक्षण यशस्वी करावयाची असेल तर सर्वप्रथम निष्ठावान व कार्यक्षम असा शिक्षक वर्ग असणे आवश्यक आहे परंतु सद्यस्थितीत अपुरया वेतनामुळे शिक्षक मिळत नाहीत. आले तर आजच्या प्राथमिक शाळेतून कोणत्याच प्रकारचे हस्तकलांचे शिक्षण दिले जात नाही. तसेच मूलभूत शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक शोधून काढणे व त्याला पुरेसे वेतन देणे आवश्यक आहे. पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात लोक शिक्षणा संबंधित काहीच प्रावधान केलेले नसल्याने डॉ. पंजाबराव देशमुख यांना वाईट वाटले. याविषयी मत व्यक्त करताना पंजाबराव देशमुख म्हणाले एक गाव- एक शाळा व एक शिक्षक ही संकल्पना जर

राबवली तर काही अंशी आपण मुलं साक्षर करू शकतो कारण सध्य परिस्थितीत शाळेत जाणाऱ्या मुलांचे 15%मुले शाळेत जातात 80 % पेक्षा जास्त मुले शिक्षणापासून वंचित आहेत व भावी आयुष्यात त्यांना शिक्षण मिळेल असे मुळीच वाटत नाही शिक्षणाची हे प्रमाण लोकसंख्येच्या प्रमाणात लक्षात घेतल्यास 4ते 5 % एवढी आहे ग्रामीण भागातील व मागास वर्ग भागातील खेड्यांमध्ये बहुसंख्य पालकांना आपले मुलांनी शिक्षण घ्यावे असे वाटते पण तेथे शिक्षणाची योग्य सोय नाही अनेक जण त्यासाठी पैसे खर्च करण्यास तयार आहे शिक्षणाविषयी खेड्यातील लोकांचे असलेली तळमळ आणि असता यांचा योग्य उपयोग करून घेता येईल अशी योजना आपणास करणे आवश्यक आहे असे मत त्यांनी राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडे व्यक्त केले. या विषयाचा सखोल अभ्यास केला त्यांनी एक चांगली प्राथमिक शाळा व एक शिक्षक या साठी दरवर्षी 750/-शाळा रक्कम खर्च करून करू शकतो. 750 रुपये ही रक्कम सहज शक्य करता येईल कारण खेडे,राज्यशासन व केंद्र शासन या घटकांमध्ये समप्रमाणात विभाजित केल्यास प्रत्येक घटक दरवर्षी 250 इतकी रक्कम उभी करेल यामुळे प्रत्येक खेड्याला एक प्राथमिक शिक्षक मिळू शकते. शाळेसाठी स्वतंत्र इमारत असल्यावर जोर देऊ नये गावातील लोकांनी शाळेसाठी जागेची व्यवस्था करावी, प्राथमिक व माध्यमिक शाळा झाडाखाली, पावसाळ्यात मात्र मंदिरे किंवा इतर सार्वजनिक इमारती शाळेसाठी उपयोग करावा. पात्रता असेल तर कोणत्याही खेड्यातील व्यक्तीला समान परीक्षेला बसण्याची अनुमती द्यावी एकाच वर्षात एक परिक्षा यावर भर देऊ नये त्याहीपेक्षा कमी अवधीत कोणत्याही मुलाला किंवा एखादी इयत्ता पूर्ण करता यावी अशी व्यवस्था करावी. तीन समान परीक्षा सुरू करण्यात याव्या चौथ्या वर्षाच्या शेवटी पहिली प्राथमिक परीक्षा व दुसरी माध्यमिक परीक्षा आणि तिसरी तीन वर्षानंतर शालांत परीक्षा घेण्यात यावी सर्व अभ्यासक्रम 11 वर्षात 4-4-3 याप्रमाणे विभागला जावा. या योजनेमुळे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार शिक्षणाचे कार्य पार पाडून शकतील व शाळेच्या सुट्ट्या चे वेळापत्रक खेड्यातील कामांची वेळ पाहून आखावे . लहान मुला-मुलींना सोबत शिक्षण घ्यावे तसेच, प्रौढ साक्षरता वर्ग चालवण्याला प्रोत्साहन द्यावे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक विचारा वरून आपल्या असे लक्षात येते की त्यांनी जे शिक्षण विषयक विचार त्या वेळी सांगितले ते विचार आजही खूप मोलाचे आहेत कारण खेड्यांमध्ये आज अनेक शाळा उभारले गेले आहेत पण मुलांना मूलभूत शिक्षण किंवा जीवनोपयोगी शिक्षण आजही या शाळांमधून दिल्या जात नाही ज्यामुळे मोठे झाल्यानंतर त्यांना त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न कायम राहतो. यासाठी कार्यानुभव व हस्तकला यासारखी शिक्षण घेणे आवश्यक आहे त्यासाठी त्या प्रकारचा कुशल असा शिक्षक यांची नेमणूक असणे आवश्यक आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण विषयक विचार यांचा विचार जर केला तर हे विचार सर्वस्वी ग्रामीण समाजाचा विकास करणारे विचार आहेत हे लक्षात येते. डॉ. पंजाबराव देशमुख यांची ग्राम विकासाची तळमळ दिसून येते. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, विद्यापीठीय शिक्षण, स्त्री शिक्षण व प्रौढ शिक्षण याबाबत निरनिराळ्या प्रसंगी विचार व्यक्त केले आहेत पंजाबराव देशमुख यांनी आपल्या शैक्षणिक कार्यास गरीब-श्रीमंत लहान-मोठे शहरी-ग्रामीण असा कोणताही भेद केलेला नाही. त्याचप्रमाणे स्त्री -पुरुष असा भेद सुद्धा केलेला नाही. हेच विचार मनाशी धरून त्यांनी आपल्या श्री

शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये स्त्रियांच्या शिक्षणाचा वेगवेगळ्या सोयी अभ्यासक्रमाची निर्मिती केली हायस्कूल स्तरावर मुलींची कस्तुरबा कन्या शाळा सुरू केली गृह शास्त्राचा स्वतंत्र विभाग महाविद्यालयामध्ये सुरू केला ज्यास्त्रियां विधवा, अनाथ आहेत त्यांच्या करता एका वसतिगृहाची स्थापना त्यांनी अमरावती येथे केली. डॉ.पंजाबराव देशमुख यांचे राष्ट्रनिर्माण साठी चे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे हे दिसून येते.

## ❖ सारांश-

डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी केलेल्या कार्यामुळे शेतकऱ्यांचे हित जोपासले गेले आहेत. त्यांचे स्वप्न होते की कास्तकार शिकला पाहिजे शिक्षण खेड्यापर्यंत पोचवले शेतकऱ्यांची मुले उच्चशिक्षित झाली आणि ती होत आहेत. आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्ये जी साक्षरता आपल्याला पहावयास मिळते त्याची मूळ पंजाबराव देशमुख यांच्या कृतीत रुजलेले आहे. शेतकरी व्यवसायात व्यापारात फार उंचीवर पोहोचलं नसला तरीदेखील लहान-मोठे व्यापार करण्याची हिम्मत करताना दिसत आहे. शेतकरी गावाच्या विकासात सहभागी झाला आहे. कृषी महाविद्यालयाचे आणि कृषी विद्यापीठाचे संशोधन गावाकडे पर्यंत पोहोचत आहे. त्या संशोधनामुळेच शेतकरी नवनवीन प्रयोग करण्यात पुढाकार घेत आहेत. अधिक उत्पादन शेतकरी बांधव नवनव्या तंत्रज्ञानाचा आणि बी-बियाणे याचा उपयोग करताना दिसून येतात. संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयाची सेवा सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करीत आहे. ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे कार्य मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. हे कार्य फक्त ग्रामीण भागात पुरतेच नाही तर शहर, राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा होत असताना दिसत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केलेल्या कार्यामुळे आज समाजातील प्रत्येक विभागातील प्रत्येक व्यक्ती मग तो कोणत्या जाती,धर्म, पंथ, भाषा कोणीही असो तो शिक्षण घेताना दिसत आहे. शिक्षण व स्त्रीशिक्षण याला महत्त्व दिले आहे. स्त्री आणि पुरुष हा भेद डॉ. पंजाबराव देशमुख यांना मान्य नव्हता,या विचाराने सफलता समाजामध्ये शिक्षण खात्यात अनेक स्त्रिया काम करताना दिसत आहेत.

गावागावांमध्ये पाणी पुरवठा मोठ्या प्रमाणात होत आहे त्यासोबतच शेतीलाही मुबलक प्रमाणात पाणी मिळत आहे यामुळे शेतकरी हा सधन समृद्धीकडे वाटचाल करत आहे. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केलेल्या सामाजिक कार्य,शैक्षणिक कार्य, कृषी विषयक कार्य, राजकीय कार्य, देश उभारणीसाठी व देश घडवण्यासाठी त्यांचे खूप मोठे योगदान आहे आहे हे दिसून येते.

**संदर्भ**

1.नागपुरे एन. पी., डॉक्टर पंजाबराव यांची विविध दर्शन, दैनिक लोकसत्ता, मुंबई.

2.सावरकर सुदाम/रा.ब.सूर्यकार, भाऊसाहेब उर्फ डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य, श्री भा.रा. लौंढे पब्लिशर्स, अमरावती,1964

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

3. देशमुख कल्पना, डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान, प्रदीप मुळे प्रकाशन नागपूर, 1997

4. कोलते वि.भी." विदर्भीय जनतेचे हृदय सम्राट डॉक्टर पंजाबराव देशमुख" दौलतराव गोळे प्रकाशन, अमरावती1996

5.https://www.majhimarathi.com/dr-panjabrao-deshmukh-information-in-marathi/

6. https://shodhganga.inflibnet.ac.in

# राष्ट्रनिर्मितीमध्ये महिलांचा अविरत संघर्ष आणि योगदान

डॉ. तक्षशिला मोटघरे
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ

प्रस्तावना:

देशपातळीवरचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा राष्ट्रनिर्मिती ही संकल्पना व्यापक अर्थाने विचारात घ्यावी लागते. याठिकाणी आपण महिलांच्या स्वातंत्र्य आणि समतेच्या दृष्टिकोनातून बघितलंतर प्रतिगामी काळात पुरोगामी , विचारसरणीचे कार्य करणाऱ्या आद्यशिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ज्यांनी , देशभरात स्त्री शिक्षणाची ज्ञानज्योत लावण्याचे कार्य निरंतरपणे केले आहे. त्यामुळे आज विविध क्षेत्रात स्त्रियांची प्रगती झालेली आहे, ते सावित्रीबाईच्या कार्याचे फलित असून त्यांनी भारताला शिक्षणप्रवणव विज्ञाननिष्ठ बनवून महिला सक्षमीकरणाचे स्वप्न सावित्रीबाईनी बाळगले होते.

परतुं आजही महिलांच्या समस्याचे स्वरूप देशकाल परिस्थितीपरत्वे वेगवेगळे असले तरीही महिलांना समस्या नाही अशी परिस्थिती कुठेही नाही. जेंव्हाराष्ट्रीयत्वाचा आपण विचार करतो .तेव्हा महिला विकास विचारात घ्यावा लागतो , त्यातुलनेत आजही महिला विकास हा अतिशय अल्प आहेआणि आजही महिला त्यांच्या मुलभूत अधिकारांचा पूर्णपणे .उपभोग घेऊ शकत नाही

उद्देश :

१राष्ट्रनिर्मिती कार्यामध्ये महिलांचा अविरत स .ंघर्ष अभ्यासणे.

२.राष्ट्रनिर्मिती कार्यामध्ये महिलांचे योगदान अभ्यासणे .

➢ स्वातंत्र्यपूर्वकाळातील महिला संघर्ष :

स्वातंत्र्यपूर्व काळातब्रिटिशांचे जेव्हा आपल्या देशावर राज्य होते, तेव्हा पुरुषांच्या समवेत महिलादेखील स्वातंत्र्यलढ्यात पुढे आल्यात, यात राणी लक्ष्मीबाईचे नाव अग्रस्थानी असून ,सामाजिक लढा आणि चळवळीचा विचार केल्यास सरोजनी नायडू, सुचेता कृपलानी,विजयालक्ष्मी पंडित अशा अनेक महिलांनी आपल्या क्षमतेचे आणि दृढनिश्चयाचे प्रदर्शन केलेले आहे.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मोठ्या प्रमाणात राजकीय व सामाजिक स्तरावर आंदोलने झालीत आणि त्यातही सामान्य महिलांनी आपल्या असामान्य कृतीतून विशेष योगदान दिले. महिलांच्या सुधारक व प्रगतिशील कृतिशील विचारांमुळे पूर्णवेळ राजकीय व सामाजिक सांस्कृतिक स्तरावर समाजातील विविध समस्यांवर चळवळीच्या माध्यमातून आंदोलने उभारली.भारतामध्ये स्वातंत्र पूर्व काळामध्ये महिलांचा सामाजिक दर्जा उंचविण्याच्या दृष्टीकोनातून महिला सबलीकरणासाठी राजाराम मोहन रॉयमहात्मा ,लोकमान्य टिळक ,महर्षी धोंडो केशव कर्वे ,सावित्रीबाई फुले ,महात्मा फुले, य,बाबासाहेब आंबेडकर.डॉ,राजश्री शाहू महाराज ,गांधीासारख्या स्त्री –पुरुष समानतेचा वारसा जपणाऱ्या असंख्य समाजसुधारकांच्या प्रयत्नातूनच महिलांची प्रगती होतांना दिसते.

➢ स्वातंत्र्योत्तरकाळातील महिला संघर्ष :

स्वातंत्र्योत्तरकाळ हा महिलांच्या प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकण्याच्या, त्यांच्या विकासनाच्यादृष्टीने महत्वाचा कालखंड समजला जातो. एक व्यक्ती म्हणून त्यांचे अस्तित्व हे सामाजिकदृष्ट्या विचारात घेतल्या जाऊ लागले त्यात .इंदिरा गांधी ,किरण बेदी, सुषमा स्वराज, प्रतिभाताई पाटील, ममता बॅनर्जी, मायावती इ.चे नाव विचारात घ्यावे लागतील.

च्या दशकात स्वातंत्र् 80 ते 1970य मुक्तीच्या, विचारांच्या, स्त्रीवादी अभ्यासाच्या आधारे कार्य करणाऱ्या अनेक संघटना उभ्या राहिलेल्या असल्याने, परिणामी राजकीय महिला नेत्यासोबत ,अनेक सामाजिक महिलाकार्यकर्त्यांनी यात आपले योगदान दिलेले आहेत.

➢ महिलांचा मतदानासाठीचा संघर्ष:

भारतातील महिलांचे स्थान अभ्यासतांना इतर देशातील महिलांविषयीचा अभ्यास केला असता त्यांना , साधा मतदानाचा हक्क बजावण्याकरिता देखील संघर्ष करावा लागला. न्यूझीलंड या देशाने ला महिलांना 1993 सप्टेंबर 9

.सर्वप्रथम अधिकार दिला अमेरिकेला 144 वर्ष  लागली तर, ब्रिटनमधील महिलांना  100वर्ष संघर्ष करावा लागला. या तुलनेत भारतीय महिलांना देशाला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर मतदानाचा अधिकार मिळालेला आहे. तरीही डॉफोबर्स.लिहितात“,ब्रिटीश सरकारने अल्पसंख्याकांना अधिकार म्हणून त्यांना मतदानाचा अधिकार दिला परंतु महिलांच्या बाबतीत मात्र वेगवेगळी कारण समोर करून महिलांना मतदानाचा अधिकार नाकारला."

असंघटित महिलांचे योगदान व चळवळ :

भारतातील  अधिकांश महिला या कुटुंबाच्या जबाबदारी सांभाळून  घरी काम करतात त्यामुळे स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांचे प्रमाण खूप जास्त दिसून येते. बिगर शेती क्षेत्रात काम करणाऱ्या %31.7 महिला या घरातून काम करतात, त्याच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण फक्त  %11टक्के आहे. एकंदरीत या सर्व महिलांचा हातभार हा राष्ट्रनिर्मितीकरिता आहे हे विसरून चालणार नाही.

स्त्रियांच्या चळवळीचे विश्लेषण करतांना अग्निहोत्री आणि मुझुमदार म्हणतात“ ,भारतातील स्त्रियांची चळवळ हा राजकीय व विकासाच्या प्रक्रियेत समान पातळीवर सहभागी होण्यासाठी नागरिकांच्या दाव्याचे पुनप्रतिपादन करण्याचा : हा प्रयत्न स्त्रीचळवळीला सनातनी व प्रतिगामी शक्तीशी प्रत्यक्ष सामना  .अनेक भराभर वाढणाऱ्याप्रयत्नापैकी एक प्रयत्न आहे करण्याच्या परिस्थितीत आणून ठेवतो”.

महिलांचा राजकीय क्षेत्रातील प्रवेश:

देशाच्या विकासाच्या पाश्वर्भूमीचा अभ्यास केला तर,महिलांचा सर्वांगीण विकास होणे अत्यावश्यक आहे. राष्ट्रउभारणीच्या कार्यात आणि राजकीय क्षेत्रात महिलांना प्रतिनिधित्वासोबत आरक्षण दिल्यास, आदिवासी, ग्रामीण नागरी, विकास साधला जाईल म्हणून शासनाने महिलांचे % 33 आरक्षण वाढवून % 50 आरक्षण करून दिले आहे. याचा परिणाम समाजामध्ये सकारात्मक दिसून आला .

त्याकरिता महिलांनी आता समोर येऊन आपली क्षमता समजून, त्यातील अडथळयांचा स्वतः अभ्यास करून, त्यांना दूर करण्याची गरज आहे. आता ती वेळ आली आहे की, प्रत्येक स्त्रीने स्वतःलाच  रोल मॉडेल बनवून महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी करण्याची गरज व सक्रिय भूमिका तयार करावी लागेल.

महिला साक्षरता व शिक्षण सेवा:

जेंव्हा आपण देशविकास निर्मिती मधील बांधणीचा विचार करतो, तेव्हात्या देशाच्या साक्षरतेचे प्रमाण हे अभ्यासणे गरजेचे आहे.त्यामुळे तेथील निरक्षरते मागील प्रमाण आणि कारणे अभ्यासणे गरजेचे ठरत असून त्याचे निर्मूलनही करावे लागते  यासंदर्भात .महिलांचे साक्षरतेचे प्रमाण हे देखील विचारात घेणे आवश्यक आहे कारण सुशिक्षित महिलाही कौटुंबिक शैक्षणिक,सामाजिक आणि राष्ट्रीय स्तरावर आपले योगदान अधिक सजगपणे देत असते.

कुटुंबव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा  विचार केल्यास महिलांचे  स्थान, कर्तुत्व, भूमिका आणि मूल्यसंवर्धनामध्ये त्यांची भूमिका अभ्यासल्यास पुरुषांच्या तुलनेत अधिक कृतीशील आहे. त्यामुळे आता समाजाने म्हणजेच पुरुषांनी हे मान्य करावयास हवे की महिलांनी समायोजन करण्याचे नाकारले तर सामाजिक व सांस्कृतिक मूल्य कोलमडून पडतील, म्हणून महिलांना कौटुंबिक स्तरावर समानता प्रदान करून, पुरुषांनी मानसिकरित्या हे सत्य  स्वीकारून प्रत्यक्षरीत्या हे बदल वर्तणुकीत घडवून आणावे लागेल. तरच कुठे आदर्श समाजाची पाने- मुळे हे रुजतील व भविष्यात त्याचे सकारात्मक फळ दिसतील.

भारतातील महिलांची सद्यस्थिती :

सद्यस्थितीत महिला म्हणजे चूल आणि मूल ही संकल्पना बदलत चाललेली दिसून येते. पण तरीही पुरुषवर्गानी महिलांची शक्ती आणि सामर्थ्याची दखल घेऊन कौटुंबिक व सामाजिक स्तरावर त्यांना समानता प्रदान केली पाहिजे . सोबतच महिलांनी स्वतःच्या कार्यशक्तीबद्दलची जाणीव ठेवून, आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि आपल्या राष्ट्रासाठी काय करावयास हवे? हे देखील विचारात घेणे महत्त्वाचे आहे.

मार्टिन ल्यूथर यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास“,महिला म्हणजे कुटुंबातील मातृशक्ती म्हणून जरी पाहिले जात असले, तरी त्यांचे स्थान घरात आहे परंतु महिलांनी स्वतः लक्षात घ्यावयास हवे की, त्यांच्यापासून निर्मिती झालेले अपत्य, भविष्यात त्यांची कार्य, राष्ट्राच्याबांधणीकरिता, भवितव्य घडविण्याकरिता महत्त्वाची भूमिका बजावत असते, त्यामुळे जरी सामान्यपणे त्यांच्याकडे दुय्यम दर्जाच्या दृष्टीकोनातून बघत असले तरीतिची पाल्य, घडण्यामागील भूमिका व आदर केलाच पाहिजे.”

परंपरेने महिलांवर वर्षानुवर्षे कौटुंबिक व धार्मिक निर्बंध लावून त्यांना सिमित वातावरणात ठेवले, पण आता मात्र त्या त्यांच्या परीसीमेच्या बाहेर निघत आहेत तरीही.हे सत्य नाकारता येत नाही की अशा महिलांची संख्या अल्प आहे. आजही मूठभर महिला अत्युच्च ठिकाणी पोहोचल्या आहेत.

भारतीय समाजात स्त्री याकरिता स्त्री,पुरुष प्रस्थापित व्हावी -पुरुष समानतेच तत्व मान्य करून अनेक क्रांतिकारी पाऊल शासनाने उचललेले आहेत्यात स्त्रियांना कोणत्याही क्षेत्रात शिक्षण व नोकरी करण्याचे स्वातंत्र्य व संधी उपलब्ध . राजकीय व सामाजिक दृष्ट्या प्रभावरित्या आपले मत प्रकट करून आप ,महिलांनी आर्थिक .करून दिलेली आहेली योग्यता सिद्ध करता यावी याकरिता आपले सरकार प्रयत्नशील दिसून येतेया अनुषंगाने स्त्रियांनी विविध क्षेत्रात आपली प्रगती . .साधून घेतलेली आहे

**निष्कर्ष .:**

१. भारतीय स्वरांत्र्य लढ्यात राष्ट्रीयत्वाची भावना जपत महिलांचे राजकीय व सामाजिक स्तरावरील आंदोलनात योगदान हे विशेष होते.

२. देशातील महिलांना त्यांच्या मूलभूत अधिकारासोबत मतदानाचा अधिकार प्राप्त करण्यासाठी देखील संघर्ष करावा लागला .

३. देश विकासामध्ये महिलांचे राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधित्वामुळे त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली असून आता त्यांना महिला अत्याचार निर्मूलनाविषयी बाजूमांडता येऊ शकत आहे.

४ . भारतातील अधिकांश महिला या कुटुंबातच राहूनच स्वयंरोजगार करीत आहे म्हणजेच पर्यायाने त्या कार्यामध्ये , .सहयोग करीत आहे

५. सुशिक्षित महिला या राष्ट्रीय स्तरावर आपले योगदान पुरुषांच्या तुलनेत, सामाजिक, शैक्षणिक कौटुंबिक अधिक सजगपणे बाजावू लागलेल्या आहेत पण तरी देखील त्यांचे प्रमाण हे अल्प आहे.

**सारांश :**

राष्ट्रनिर्मिती ही व्यापक संकल्पना असून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तरकाळामध्ये महिलाकरिता सामाजिक व राजकीय स्तरावर जी आंदोलने झाली. त्यात महिलांचे विशेष योगदान होते. १९७० ते ८० च्या दशकात स्वातंत्र मुक्तिच्या प्रगतिचे स्त्रीवादी अभ्यासाच्या आधारे कार्य करणाऱ्या अनेक महिला संघटना विचाराच्या उभ्या राहिल्याने सांविधनातमहिलन करिता विशेष हक्क व अधिकार त्यांना प्राप्त होऊनही भारतीय प्रगतीचे व्दार उघडल्या गेले नाही. आज भारतीयसम त्यांना विकासाच्या प्रवाहत आणले असूनही आज स्त्री पुरुष समानता प्रस्थापित व्हावी याकरिता शाशन प्रयत्नशील दिसून येते. साधस्थितीत महिलांनी स्वत:लाच रोल मॉडेल बनऊन महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी करणे. म्हणूनच त्याची गरज आहे. आजच्या सुशिक्षित महिलांनी समाजाचे प्रतिनिधित्व करून इतरही महिलाना प्रवृत्त करण्याचे कार्य करून जगाला दाखवून दिले पाहिजे की महिला या शैक्षणिक, सामाजिक, वैयक्तिक, व्यावसायिक व राजकीय क्षेत्रातील स्पर्धेत उतरल्यास त्या कुठेही कमी नाही.

संदर्भ :

- वासनिक , भाऊ,'*महान क्रांतिकारी सावित्री,*'श्रावस्ती प्रकाशन , नागपूर .

- जवळेकर , प्रवीण, *'महिलांचे वास्तव जीवन'*, आदित्य प्रकाशन , वर्धा.
- सोलापुरे ,राजशेखर , '*महिला विकास: प्रश्न –पैलू-प्रयास'*, अरुणा प्रकाशन, लातूर.
- छेवमावकर, एस. जी., (२०१४),'*सामाजिक चळवळी परंपरागत आणि आधुनिक'*, साईनाथ प्रकाशन , नागपूर.
- राष्ट्र निर्मितीत महिलांची भूमिका <https://www.wikimitra.com/role-of-womens-in-nation-developement-essay-in-marathi/>
- आव्हाड,भास्करराव (17 Jun 2019) भारतीयस्त्रीचेयोगदान <https://maharashtratimes.com/editorial/column/indian-womens-contribution/articleshow/69812321.cms>
- किरण मजूमदार खंबीर महिलांमुळेच आर्थिकस्थिती सुधारेल <https://divyamarathi.bhaskar.com/news/strong-women-will-only-improve-their-financial-status-126287539.html>
- https://zeenews.india.com/marathi/world/new-zealand-has-given-women-right-vote-first-time/384124


***************************

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्र निर्माणामध्ये भारतीय महिलांचा सहभाग

डॉ. अस्मिता आर. ठोंबरे
म. ज्योतीबा फुले समाजकार्य
महाविद्यालय, चिखली रोड,
बुलढाणा . 443001

**सारांष :–**

स्वातंत्र्यानंतर 75 वर्षानी देष बांधणी या मुद्याचे अध्ययन केले असता देष बांधणी मध्ये देषामध्ये असणाऱ्या मुलभूत सुविधा जसे की रस्ते, पाणी, विज, दळणवळणाची साधने बाजारपेठा, संरक्षण सिध्दता, आरोग्य सुविधा यांचा समावेष होतो. सोबतच एका सक्षम व सुदृढ लोकषाही असलेल्या देषाची बांधणी करायची असेल तर देषातील नागरिक कुटुंबव्यवस्था, समाजरचना, सामाजिक आरोग्य यांच्याकडे विषेष लक्ष द्यावे लागेल. स्वातंत्र्यपूर्वी काळामध्ये स्वातंत्र्यलढयात भारतीय महिलांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहेच. स्वातंत्र्यानंतर पिढयान पिढया मानसिक गुलामगिरीची सवय असलेल्या भारतीय महिलांनी सर्वच क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेली आहे. मग ते क्षेत्र शैक्षणिक, आरोग्य असो किंवा उद्योजकतेचे असो महिलांना संधी मिळाल्यास त्या संधीचा योग्य फायदा घेवून प्रगतीचा पल्ला गाठतातच, भारतीय संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याचा फायदा घेवून भारतीय स्त्रिचा सर्वांगिण विकास होत आहे. महिलांनी अधिक प्रगत होणेकरिता महिलांना त्यांच्यामध्ये असणाऱ्या उर्जेची जाणीव व्हावी अतिषय परिश्रमाने प्रामाणिकपणे देष आपले कुटूंब आहे या कुटूंबवत्सल भावनाने देष निर्मितीच्या कामामध्ये स्वतःला झोकून देवून काम केल्यास देषाची प्रगती निष्चितच होणार आहे.

**प्रस्तावना :–**

भारताला स्वातंत्र्य मिळून 74 वर्ष पूर्ण झाले आहेत. स्वातंत्र्यापूर्वीचा भारत आणि स्वातंत्र्यानंतरचा भारत यामध्ये बदल झाला आहे. स्वातंत्र्यपूर्वी स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्य मिळविण्याकरिता दिलेले योगदान, सत्याग्रह, मोर्चे, निषेध, प्रसंगी प्राणांची आहूती या त्यांच्या लढयामुळे भारतीय लोकांना स्वातंत्र्यचा सुर्य पाहायला मिळाला आहे. यामध्ये भारतीय स्त्रियांनी सुध्दा महत्वाची भूमिका बजावली होती. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने स्त्रियांच्या संदर्भात अनेक कायदे केलेत स्त्रियांना संरक्षण देण्याची भूमिका स्विकारली म्हणून केवळ चूल आणि मुले यामध्ये अडकलेली स्त्री वैमानिक बनून अवकाषात झेप घेवू लागली. स्त्रियांच्या बाबतीत सकारात्मक दृष्य दिसत असले तरी पुरूषप्रधान भारतीय समाजव्यवस्था असल्याने स्त्रियांना अनेक अडचणींचा सामना करीत स्वतःचे अस्तित्व निर्माण करायचे आहे. स्वअस्तित्वाबरोबरच देषबांधनीमध्ये आपले योगदान द्यायचे आहे.

**उद्देष :–**

1. स्वातंत्र्यलढयामध्ये स्त्रियांचा सहभाग अभ्यासणे.
2. राष्ट्र निर्माणामध्ये षिक्षण क्षेत्रात स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.
3. राष्ट्र निर्माणामध्ये भारतीय कुटूंबव्यवस्थेत स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.
4. राष्ट्र निर्माणामध्ये स्त्रियांचे लोकप्रतिनिधी म्हणून सहभाग अभ्यासणे.

**गृहीतके :–**

1. स्वातंत्र्य लढयामध्ये स्त्रियांचे योगदान आहे.
2. षिक्षण क्षेत्रात भारतीय स्त्रियांची महत्वाची भूमिका आहे.
3. भारतीय कुटूंबव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान दुय्यम आहेत्र
4. लोकप्रतिनिधी म्हणून भारतीय स्त्रियांना अल्प सहभाग मिळतो.

**तथ्य संकलन :–**

प्रस्तुत संषोधनाकरिता तथ्य संकलनाच्या द्वितीयक स्त्रोत पध्दतीचा वापर केला आहे. यामध्ये पुस्तके, मासिके, शोधनिबंध व वेबसाईट याचा वापर करण्यात आला आहे.

**भारतीय स्वातंत्र्य लढयातील भारतीय स्त्रियांचे योगदान :–**

भारतीय स्वातंत्र्यलढयात इंग्रजांच्या विरोधात सन 1857 मध्ये झाषीची राणी लक्ष्मीबाई यांनी लढा दिला होता. मॅडम भिकाजी कामा हयांनी 22 ऑगस्ट 1907 रोजी स्टुगर्ड (जर्मनी) येथे इंग्रजांच्या विरोधात झेंडा फडकवला होता. सरोजनी नायडू यांनी सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला होता. गुजरातच्या सरलादेवी साराभाई हयांनी परदेषी मालाची होळी तसेच गुजरातमध्ये आंदोलन सर्वसामान्यापर्यंत

पोहोचविल्याचे कार्य केले. गांधीजींच्या प्रेरणेने सर्व धर्मातील देषी विदेषी स्त्रियांनी स्वातंत्र्य लढयात सहभाग घेतला होता. आंदोलनाचा जो एक स्वतंत्र कार्यक्रम होता त्यामध्ये सूत कातणे, खादी विणणे, स्वदेषीचा प्रचार करणे, अस्पृष्यता निर्मूलन, साक्षरता अभियान इ. कार्यक्रम भारतीय स्त्रियांनी स्विकारले होते. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत हजारो स्त्रियांनी सहभाग घेतला होता.

**षिक्षणामधे भारतीय स्त्रियांचा सहभागः–**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर सरकारने स्त्रि–षिक्षणाकडे विषेष लक्ष दिले . आचार्य नरेंद्र देव हयांच्या अध्यक्षतेखालील कमिटीने स्त्रिषिक्षनावर विषेष भर दिला . स्त्रियांना व्यावसायिक षिक्षण देणारी नार्मल स्कुल सरकारने काढली . दुर्गाबाई देषमुख 1958 हयांच्या अध्यक्षतेखालील कमिटीने स्त्रि–षिक्षणास अधिक प्राधान्य स्त्रि षिक्षणाचा विषेष विभाग निर्माण करावा. शिक्षणाकरिता असलेल्या बजेट मधे स्त्रि षिक्षणाकरिता 10 कोटी रुपये अधिक खर्च करावे. खेडयातील मुलीच्या शिक्षणावर विशेष भर दयावा अशा महत्वाच्या सुचना केल्या होत्या . स्त्री शिक्षण विकास कार्यक्रमाअंतर्गत षिष्यवृत्ती , मोफत षिक्षण , उपस्थितीसंबंधी षिष्यवृत्ती , मोफत गणवेष , अभियांत्रिकी , कला , वाणिज्य , वैद्यक क्षेत्रात स्त्रियांसाठी सहषिक्षणाची तरतुद करण्यात आली . सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत 2002 व 2009 मध्ये 6ते14 वर्ष वयाच्या सर्व मुला–मुलींना मोफत षिक्षण दिल्या जाते . 2001 च्या जनगणनेनुसार 53.67 प्रौढ स्त्रिया साक्षर होत्या तर सन 2011 च्या जनगणेनुसार 64ः स्त्रिया साक्षर होत्या. राष्ट्रीय साक्षरता अभियान यावर विषेष भर देण्यात आला आहे . स्त्रि शिक्षणामुळे कुटुंब नियोजन लोकसंख्येला आळा घातल्या जाईल . शैक्षणिक दृष्टया मागास भागात कस्तुरबा गांधी निवासी शाळा उघण्यात आल्या . 3500 कस्तुबा महिला विदयालयातुन 2012 मध्ये 3.6लाख मुली षिक्षण घेत होत्या . उच्च षिक्षणाची आकडेवारी पाहिली असता केंद्रीय मनु"यबळ विभागाने ;All India higher Education Survey) प्रसारित केलेल्या अहवालात षिक्षणाची सांख्याकी नुसार आजही बि. ए 38ः बीएस्सी 16ः या पारंपारिक अभ्यासक्रमांना महत्व देणा–या विदयार्थ्यांची संख्या अधिक आहे . इंजिनियरिंग शाखेत षिक्षण घेणा–या प्रमाण 14.1 आहे . देशातील 77.8 महाविदयालये खाजगी संस्थाची आहेत . त्यापैकी 64.2 महाविदयालये विना अनुदान तत्वावर आहेत त्यामधे 3.57 कोटी तरुण – तरुणी उच्च षिक्षण घेत आहेत . त्यामुळे मुलाचे प्रमाण 1.9 कोटी असून मुलीचे प्रमाण 1.67 कोटी आहे. 18 ते 23 वयोगटात होतो. उच्चषिक्षण घेणा–या मुलीचे प्रमाण 24.5 आहे . तर मुलांचे प्रमाण 26 आहे . यावरुन 75 तरुण तरुणी अजुनही षिक्षण घेत नाही असा . भारतामधे जवळपास 900 विदयापीठे आहेत तर अमेरीकेत 2500 विदयापीठे आहेत . यावरुन लोकसंख्येचा विचार केल्यास भारताला मोठा पल्ला गाठायचा आहे . भारतामधे उच्च षिक्षित तरुणींची संख्या मोठी जेवढी जास्त वाढेल . त्यामुळे एक ज्ञानपूर्ण भारत निर्माण होण्यास मदत होईल . याकरिता तरुणींनी अडचनींचा बाऊ न करता षिक्षण घेण्यास तयार असले पाहिजे व 'ाासनाने सुध्दा विदयार्थीना योग्य ते संरक्षण , सोयी सुवीधा पुरवून उच्च षिक्षण घेण्यास प्रेरीत केले पाहिजे .

**भारतीय कुटूंबव्यवस्थेत स्त्रियांचा सहभागः–**

भारतीय समाजात कुटूंबव्यवस्था केंद्रस्थानी आहे. भारतीय संस्कृतीमध्ये जे–जे काही पवित्र उदत्त आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागाने साध्य झालेले आहे. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांच्या कल्पकतेमुळेच झाली आहे. तसेच त्यांचा त्याग व वाटा पुरू"ाापेक्षा कधीही मोठा आहे. स्त्रियांवर सर्व सांस्कृतिक जबाबदाऱ्या व्रत, वैकल्ये, लादून पिढयान पिढया त्यांच्यावर अन्याय करण्यात आला आहे. स्त्रियांनी त्यांच्यावर लादण्यात आलेली सांस्कृतिक मूल्ये स्त्रि–पुरूष समानतेच्या भावनेतून जोपासली नाही तर सांस्कृतिक मूल्ये नाहीषी सुध्दा होवू 'ाकतात. खऱ्या अर्थाने भारतीय समाजाची संस्कृतीची शाष्वत मूल्ये ही स्त्रि–पुरूष समानता यावर अवलंबून असली पाहिजे. भारतीय कुटूंबव्यवस्थेत स्त्रि हा कुटूंबाचा कणा असते. अपत्यांना जन्म देणे त्यांचे पालनपोषण, घरातील सर्व कामामध्ये सहभागी होणे, वृध्दाची सेवा, कुटूंबाचे आरोग्य सांभाळणे, अर्थार्जन करणाऱ्य महिलांना दोन्ही पातळीवर परिश्रम घ्यावे लागतात. भारतीय समाज पुरूषसत्ताक असल्याने भारतीय समाजात पुरूषांनी घरकामात मदत करणे कमीपणाचे समजले जाते. पुरूषांचा पुरूषी अहंकार कधी जागृत होईल व स्त्रियांना कधी अपमानीत व्हावे लागेल हे सांगता येत नाही. भारतीय समाजात स्वातंत्र्यानंतर 75 व"ाानी सुध्दा स्त्रियांचे स्थान दुय्यमच आहे याला काही प्रमाणात हजारो वर्षापासून गुलामीची सवय मनाषी भिनल्यामुळे व आजूबाजूचे वातावरण स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात स्त्रियांचे स्थान अधिकच निम्न आहे. शेतातील कामे घरातील कामे, आरोग्याकडे दुर्लक्ष, अनेक अनिष्ट सामाजिक रूढी, परंपरा यामुळे स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. स्वातंत्र्यानंतर स्त्रियांसाठी अनेक सुधारणा झाल्या. स्त्रि षिक्षणाचे महत्व घटनाकारांना होते. त्यामुळे स्त्रि–पुरूष समानता माननारे अनेक कायदे केल्या गेले. वडिलांच्या संपत्तीत मुलीला हक्क मिळाला. परंतु बऱ्याचदा आपले माहेर टिकवून ठेवण्यासाठी स्त्रियांना आपले हक्क सोडून द्यावे लागतात. कुटूंबव्यवस्था टिकवून ठेवण्याची जबाबदारी स्त्रियांवरच लादण्यात येते. यामध्ये स्त्रियांचे शारीरिक, मानसिक शोषण होते. परंतु आता काही प्रमाणात चित्र बदलत असलेले दिसते. स्त्रिया अर्थार्जन करीत आहेत त्यांना कुटुंबामध्ये निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे.

कोणत्याही समाजाचा मध्यबिंदू हे कुटूंब असते. स्त्रियांनी कुटूंबव्यवस्था टिकविण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणे गरजेचे आहेच परंतु तिला कुटूंबातील पुरूषांनी सुध्दा बरोबरीचा दर्जा देवून सहचारिणी म्हणून कुटूंबव्यवस्थेचा पाया मजबूत करण्यास महत्वाचा वाटा होणे आवष्यक आहे.

### राष्ट्निर्मितीत भारतीय स्त्रियांचा लोकप्रतिनिधी म्हणुन सहभाग :–

स्वातत्र्यत्तोर काळामधे अनेक स्त्रियांनी लोकप्रतिनिधी म्हणुन चांगली भुमिका निभावली आहे . 1974 मधे भारतीय स्त्रियांचे समाजातील स्थान याकरिता नेमलेल्या समितीने ज्वूंतके मुंनसपजल नावाने आपला अहवाल प्रसिध्द केला. त्यामधे राजकारणामध्ये स्त्रियांचे अस्तिच नाममात्र असल्याचे दिसुन आले . त्यकरिता स्थानिक स्वराज्य संस्थामधे महिलांना आरक्षण दयावे अधी षिफारस करण्यात आली होती . महाराष्ट्ामधे सन 1994 पहिले महिला धोरण , सन 2001 ला दुसरे महिला धोरण सन 2014 मधे तिसरे महिला धोरण जाहीर करण्यात आले . भारतीय राजकारणात महिला खासदारांची स्थिती अभ्यासली असता पहिल्या लोकसभेत 10 महिला खासदार होत्या . भारतीय संविधानामधे स्त्रियांना समान अधिकार कलम 14 अन्वये समान संधी कलम 16अन्वये समान वेतन कलम 39 डी याची हमी दिली आहे . अलीकडच्या काळात महिलांमधे राजकारना विषयी जागृती होत आहे . मतदार म्हणुन स्त्रियांचा सहभाग वाढला आहे परंतु लोकप्रतिनिधी म्हणुन स्त्रियांना मिळणारी संधी अत्यंत अल्प आहे . स्थानिक स्वराज्य संस्थामधे महिलांना 50: आरक्षण दिल्यामुळे त्यामुळे आता स्थानिक पातळीवर महिलांचा लोकप्रतिनिधी म्हणुन सहभाग वाढत असला तरी केंद्र व राज्य पातळीवर महिलांचा सहभाग अत्यंत कमी आहे . याकरिता सर्वच राजकीय पक्षांनी महिलांना समान संधी देवून लोकप्रतिनिधीत्व करण्याची संधी उपलब्ध करुन दयायला हवी . महिलानी नुसत्या सहया करण्यापुरते मर्यादित न राहता आपल्या अधिकराचा व निर्णय शक्तीचा वापर करुन राजकारनाला पारदर्षक पातळीवर आणुन ठेवावे .

### निष्कर्ष :–

1) भारतीय स्वातंत्र्य लढयात भारतीय महिलांनी भाग घेवून स्वातंत्र्य मिळवून देण्यास पुढाकार घेतला होता. स्वातंत्र्यानंतरही भारतीय महिला रूढी, प्रथा, परंपरा टिकवून ठेवत आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजीय क्षेत्रात सहभागी झाल्या आहेत. राश्ट्र निर्माणामध्ये महत्वाच्या भूमिका बजावत आहेत.
2) शैक्षणिक क्षेत्रामध्ये राष्ट्र निर्माणामध्ये शैक्षणिक क्षेत्राचे अतिषय महत्वाचे योगदान आहे. यामध्ये स्त्रियांनी सहभाग घेतला आहे. स्वातंत्र्यापूर्वी स्त्रियांची शैक्षणिक स्थिती आणि स्वातंत्र्य नंतरची याचा आलेख चढता आहे. कलाक्षेत्र, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्रात महिला मोठया प्रमाणात आहेत. सुषिक्षित स्त्रिमुळे कुटूंब सुषिक्षित होते त्यापासून एका चांगल्या राष्ट्राची निर्मिती होवू शकते.
3) कौटुंबिक क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग अभ्यासला असता स्त्रि ही कुटूंबाचा कणा असते. विवाहानंतर भारतीय स्त्रिया आपल्या कुटूंबातील सदस्यांना सांभाळत असतात. समाजामध्ये सक्षम कौटुंबिक कुटुंबामुळे सक्षम समाजाची व राष्ट्राची निर्मिती होते. भारतीय स्त्रिया यामध्ये मोलाची जबाबदारी स्विकारत आहेत.
4) राजकीय क्षेत्रात महिलांची जबाबदारी व त्यांना मिळणारी संधी अभ्यासली असता असे दिसून येते की, जगामध्ये सर्वात मोठी लोकषाही असणाऱ्या भारत देषामध्ये स्त्रयांना लोकप्रतिनिधी म्हणून मिळणारी संधी अल्पप्रमाणात आहे. राज्याच्या व देषाच्या पातळीवर सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी पुरूषाएवढेच स्त्रियांना सुध्दा प्रतिनिधित्व देणे गरजेचे आहे. स्त्रियांवर विष्वास व जबाबदारी दिल्यास तसेच तिला सरंक्षण दिल्यास राजकीय क्षेत्रात सुध्दा ती आपली भूमिका योग्य तऱ्हेने बजावू शकते.

### सूचना व षिफारषी :–

भारत हे लोकषाही असणारे राष्ट्र आहे. स्त्रि–पुरूष समानता असणारे संविधान या देषाला लाभलेले आहे. पुरूषा इतकाच महत्वाचा वाटा स्त्रियांचा राष्ट्र निर्माणामध्ये आहे. म्हणूनच स्त्रि हा समाजाचा वंचित घटक आहे. त्या घटकाला सक्षम बनविणे आवष्यक आहे. तिला योग्य संधी, सुरक्षा व सोयी देणे गरजेचे आहे. या सर्व गोष्टींचा फायदा घेवून स्त्री मजबूत असा भारत म्हणजेच शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रातील निर्माण करण्यास नक्कीच सहभागी असेल.

### संदर्भ :–

आगलावे प्रदीप 'सामाजिक संषोधन पध्दती व तंत्रे' साईनाथ प्रकाषन नागपूर
https://vishwakash.marathi.gov.in
http.//www/pmc gov.in
https://www.tarunbharat.net
https://mr.m.wikipedia.org.
https://hi/m.wikipedia.org.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा.लक्ष्मण बापूराव नैताम
समाजशास्त्र विभाग
बॅ.बाळासाहेब खर्डेकर महाविदयालय वेंगुर्ला
जि.सिंधुदुर्ग

## प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतीप्रवाहाचे कृतिशील विचारवंत व नेते होते. 20 व्या शतकातील महान विचारवंत, कायदेपंडीत, थोर समाजसेवक, दुरदृष्टी राजकारणी म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी झाला. त्यांचे वडील लष्करात सुभेदार म्हणून नोकरीस होते. 1907 मध्ये मॅट्रीकची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या एलफिस्टन कॉलेजात प्रवेश घेतला पण तेथेही जातीच्या अमानुषवृत्तीने त्यांना त्रास दिला. 1912 मध्ये त्यांनी पदवी संपादन केली. भारतीय समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र असे चार वर्ण होते. त्यामुळे उच्च जातींनाच शिक्षणाची संधी होती. त्याकाळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजातच झाला होता. त्यामुळे अस्पृश्यतेचे चटके त्यांना लहानपणापासूनच बसत आले होते. समाजाकडून होणारा विरोध अवहेलना सहन करतच त्यांनी आपले भारतातील शिक्षण संपवले.

आधुनिक भारताचा जडणघडणीत त्यांचे योगदान खूप मोठे आहे. भारतातील दोन दलित व उपेक्षित वंचित घटक, जाती, जमाती त्याचबरोबर अस्पृश्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, तसेच राजकीय जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामाजिक सबंधाची पूनर्रचना मानवी मुल्यांच्या अनुषंगाने करण्यात, कोटयावधी दलित जनतेच्या मनात स्वाभिमान जागृत करण्यात व शतकानुशतके उपेक्षित असणाऱ्या समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे श्रेय त्यांच्याकडेच जाते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारताच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व्यवस्थेवर कायमचा ठसा उमटविणारे सामाजिक, आर्थिक, आर्थिक लोकशाही भारतात यावी यासाठी सतत धडपडणारे भारताचे पहिले कायदेमंत्री व विचार मांडणारे व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

## अध्ययनाचे उद्दिष्ट्ये :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदानाचे अभ्यास करणे हे संशोधनाचे उद्दिष्टे आहे.

संशोधन आराखडा : प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आला. प्रस्तूत संशोधन हे दुय्यम साधनांवर आधारित आहे. पुस्तके, नियतकालिके, इंटरनेट इत्यादी.

## *भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान* :

***सामाजिक* :**

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेली चळवळ म्हणजे जात, वर्ग व वर्ण अंताची चळवळ होय. समाजात सामाजिक न्याय ही संकल्पना प्रस्थापित करण्याची ही चळवळ होती. समतेची जाणीव समाजात निर्माण करून, समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्याचे कार्य या चळवळीने केले. भारतात प्राचीन काळापासून सामाजिक विषमता आहे. हिंदू धर्मावर आधारीत असलेल्या समाजव्यवस्थेत चार प्रमुख जाती व अनेक उपजाती निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे भारतीय समाजाची एकात्मता नष्टं झाली आहे. इ.स.* 1920 *पासून डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचा चळवळीचा प्रारंभ होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक जीवनात* 1920 *पासून प्रामुख्याने भाग घेऊ लागले होते.*

***बहिष्कृत हितकरणी सभा* :**

1920 *ते* 1923 *या काळात मुकनायक या परिक्षकाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व त्यासाठी संघटीत होण्याची गरज स्पष्ट करण्यासाठी जनजागृती करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरूवात केले होते. मुंबई येथील दामोदर हॉल, परळ येथे* 20 *जूलै* 1924 *रोजी बहिष्कृत हितकरणी सभा या नावाची संस्था स्थापन केली.*

***जातीव्यवस्थेसंदर्भात विचार* :**

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातिव्यवस्थेसंबंधी विचार अतिशय स्पष्ट होते. जातीव्यवस्था अशास्त्रीय आहे तिचा उगम देखील अविवेकी, अशास्त्रीय आहे. जातिव्यवस्था आंतरविवाहास विरोध करते, जातिव्यवस्थेमुळे समाजाचे विघटन झाले. श्रेष्ठ, कनिष्ठ भेद निर्माण होऊन एकमेकांत व्देषाची भावना निर्माण झाली. आम्ही पौराणीक ग्रंथाना प्रमाण मानत असल्यामुळे जातिव्यवस्थेकडे बुध्दीप्रामाण्यवादी दृष्टीकोनातून पाहिले जात नाही याची त्यांना खंत होती.*

***अस्पृश्यता* :**

*डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेच्या विरोधात होते. त्यांनी अस्पृश्यतेचा उगम, चालीरीती, व्यवहार यांचे सविस्तर विश्लेषण त्यांच्या 'द अनटचेबल' या ग्रंथात केले आहे. हे पुस्तक* 1948 *मध्ये प्रसिध्दं झाले. अस्पृश्यता ही कृतीने व कायदयाने समाप्त करता येते. सामाजिक कृतीने म्हणजे अस्पश्यांनी त्यांच्या जीवनपध्दतीत आमुलाग्र बदल करावा. राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न करावा. पारंपारिक थोपवलेली कामे करणे सोडून दयावीत. कायदयाचा दृष्टीकोनातून विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे मत मांडले की सर्व शासकीय पातळीवर अस्पृश्यांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे.*

***महाड चवदार तळयाचा सत्याग्रह* :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी जो व्यापक लढा उभारला त्याची सुरूवात महाड येथील चवदार तळयाच्या सत्याग्रहाने झाली. महाड या गावातील तळाचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना बंदी होती. तेथील स्थानिक शासकीय प्रशासनाने एक ठराव करून ते तळे अस्पृश्यांसाठी खुले केले परंतू तरी ही तथाकथीत संपूर्ण हिंदूनी या तळयावर पाणी भरण्यास अस्पृश्यांना विरोध केला. त्यामुळे महाड येथे सत्याग्रह करून त्या तळयाच्या पाण्यावर अस्पृश्यांचाही हक्क आहे. याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना जाणीव करून दिली.

**धर्मविषयक विचार :**

धर्म माणसाच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक आहे. धर्मामुळे आत्मसमाधान मिळते यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माची आवश्यकता मान्य केली. फक्त यासाठी एकच अट त्यांनी लावली की, धर्मात उच्च – निचता नसावी, स्वातंत्र्य आणि समानतेला स्थान असावे. धर्माने सर्व माणसांना सारखे समजावे हा त्यांचा धर्माकडे पाहण्याचे दृष्टीकोन होता.

**मनुस्मृतीचे दहन :**

मनस्मृती या हिंदू धर्मग्रंथाने जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेचे समर्थन करून पर्यायाने सामाजिक विषमतेला व त्यावर जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होतातेव्हा सामाजिक विषमता व उच्च भेदभाव याचे समर्थन करणाऱ्या या ग्रंथाचा प्रतिकारात्मक निषेध करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 25 डिसेंबर 1927 रोजी ममुस्मृतीचे जाहिररित्या दहन केले.

**काळाराम मंदिर सत्याग्रह :**

हिंदू धर्मातील उच्च वर्णीयांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क ही नाकारला होता, याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले की, हिंदूत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे. तितकीच अस्पृश्यांची ही आहे म्हणून मंदीर प्रवेशाचा हक्क मान्य झाला पाहिजे. त्याचबरोबर सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या कार्याचा एक भाग म्हणून नाशिक येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मार्च 1930 रोजी आपल्या हजारो अनुयांयासमवेत काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. दलित अस्पृश्यांची मंदिर प्रवेशाची मागणी अत्यंत धर्म, न्याय आणि ज्या सत्याग्रहाच्या आले आहेत तो सत्याग्रह म्हणजे पिढयांनपिढयांचा दुराग्रहाचा एक अपरिहार्य पडसाद आहे. म्हणून काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे विशेष महत्व आहे.

**राजकीय विचार :**

भारताला राजकीय हक्क देण्यासाठी ब्रिटीश सरकारने 1927 मध्ये सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली तिलाच सायमन कमिशन म्हणून ओळखले जाते. महाडच्या सत्याग्रहानंतर लगेचच या सायमन कमिशन समोर अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी करण्याची संधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मिळाली हे कमिशन 1928 मध्ये भारतात आले. काँग्रेसने या समितीला असहकार्य करायचे असे ठरविले होते. बहिष्कृत हितकारिणी सभेच्या

*वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या समितीला दोन खलिते दिले त्यातील एक म्हणजे अस्पृश्यांच्या हक्कांसाठी व दुसरे म्हणजे मुंबई प्रांतात कोणते राजकीय हक्क दयावेत यासंबंधी होते.*

***पहिली गोलमेज परिषद* :**

*सायमन कमिशनने भारताला राजकीय हक्क देण्यासाठी सुचविलेल्या शिफारसी हिंदी राजकीय पक्षाने व इंग्लंडच्या सर्व राजकीय पक्षाने नाकरल्या.*

***दुसरी गोलमेज परिषद* :**

*दुसरी गोलमेज परिषद ही* 7 *सप्टेंबर ते* 10 *डिसेंबर* 1931 *या दरम्यान लंडन येथे आयोजित केली होती. या परिषदेत कॉंग्रेसचे प्रतिनिधीत्व महात्मा गांधी यांनी केले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधीत्व केले.* 8 *ऑक्टोंबर* 1931 *ला अल्पसंख्यांकाच्या प्रश्नाबाबत महात्मा गांधीजींच्या धोरणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध केला. या बाबीवरून महात्मा गांधी आणि डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. अस्पृश्य आणि शिखांना स्वतंत्र्य मतदार संघ दिले पाहिजेत ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मागणी होती. ती मागणी महात्मा गांधीना मान्य नव्हती.*

***पूणे करार* :**

*दुसऱ्या गोलमेज परिषेदत महात्मा गांधीजींनी वेगळा मतदार संघ दिल्यास त्याला प्राणपणाने विरोध करेल असे स्पष्ट केले होते. अस्पृश्यांचा प्रश्न हा प्रामुख्याने नैतिक व धार्मिक आहे. स्वतंत्र मतदार संघ निर्माण केल्यास अस्पृश्यांचा परिस्थितीत कसलाच फरक पडत नाही असे त्यांचे मत होते. ब्रिटनचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी* 20 *ऑगस्ट* 1932 *ला आपला जातीय निवाडा जाहीर केला. या ब्रिटीश सरकारच्या जातीय निवाडयाने अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मान्य केला होता. अशा प्रकारच्या स्वतंत्र मतदार संघ केवळ अस्पृश्यांसाठीच होता असे ही नाही तर तो मुस्लीम, हिंदी, ख्रिस्ती, युरोपियन, ॲग्लोइंडियन, शीख यांच्यासाठीसुध्दा मंजुर केला होता. परंतू ब्रिटीश सरकारने अस्पृश्यांसाठी जेव्हा स्वतंत्र मतदार संघ निर्माण केला. या विरोधात महात्मा गांधीजींनी प्राणांतिक उपोषण केले. या प्रश्नांवर आणि महात्मा गांधीजींच्या उपोषणावर देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती.*

*दुसऱ्या गोलमेज परिषेद काहीही निष्पन्न न झाल्यामुळे भारतात परत गेल्यावर महात्मा गांधीजी आणि कॉंग्रेस कायदेभंगाची चळवळ सुरू करतील या भीतीने ब्रिटीशांनी व गांधीजी सह प्रमुख नेत्यांना पकडून कारागृहात टाकले होते. त्यामुळे महात्मा गांधीजींचे उपोषण पूण्यातील येरवडा काराग्रहात सुरू होते.* 24 *सप्टेंबर* 1932 *रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधीजी यांच्यात समझोता होवून एक करार करण्यात आला. त्यालाच पूणे करार म्हणून ओळखले जाते. या*

करारामुळे अस्पृश्यांना कायदे मंडळात राखीव जागा मिळाल्या व स्वतंत्र मतदार संघाची मागणी सोडून दयावी लागली त्याच दिवशी 24 सप्टेंबर 1932 गांधीजींच्या उपोषणाची समाप्ती झाली.

**राजकीय हक्क विषयक योगदान :**

भारतीय राज्यघटना समितीने 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना केली. या समितीत के.एम.मुन्शी, गोपाल स्वामी अय्यंगार, अल्लाडी कृष्ण स्वामी अय्यर, सैयद शांदुल्ला, एन. माधवराव, डी.पी. श्वेतान व बी.आर.राव घटनात्मक सल्लागार होते. भारतीय संविधान तयार करण्यात मसुदा समितीची प्रमुख व महत्वपूर्ण भुमिका असल्याने समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर आली. या समितीने विविध राज्यघटनांचा अभ्यास करून भारतीय राज्यघटनांचा आराखडा तयार केला.

26 जानेवारी 1950 रोजी प्रजासत्ताक बनले. संविधानाने भारताला एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक घोषित केले. नागरिकांना न्याय, समानता, बंधुत्व आणि स्वातंत्र्याची हमी दिली. भारतातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास जाती उपेक्षित वंचित घटकांना राज्यघटनेत सामाजिक, शैक्षणिक राजकीय आरक्षण दिल्यामुळे सर्व वंचित घटकांना शिक्षणाची संधी मिळाली. वेगवेगळया क्षेत्रात आरक्षणामुळे नोकरी करू लागले. राजकीय क्षेत्रात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधान सभा, लोकसभा या सर्व राजकीय क्षेत्रात प्रतिनित्व मिळत आहे. पुरूषाबरोबरच महिलांना देखील प्रतिनिधीत्व मिळत आहे. समानतेचा तत्वावर समाज निर्मिती म्हणजे केवळ पुरूषात समानता नव्हे तर स्त्री पुरूष समानता होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे कायदामंत्री असताना त्यांनी हिंदू कोड बिल 5 फेब्रुवारी 1951 ला सादर केले होते. स्त्रियांना संपत्तीचा अधिकार मुलांप्रमाणे वडिलांच्या संपत्तीत समान अधिकार व घटस्फोटची तरतूद व दत्तक घेण्यासाठी पतीला पत्नीची संमती घेणे आवश्यक त्याच बरोबरच मुलगी देखील दत्तक घेता येते. स्त्रियांच्या गुलामगिरीत आळा घालण्यासाठी त्यांनी मुलभूत उपाय योजना या विधेयकात केली होती. यात त्यांच्या उद्देश म्हणजे अशा प्रकारची समाजरचना निर्माण करणे जी सामाजिक न्यायाच्या तत्वावर उभी असेल. भारतीय राजकीय व्यवस्था व लोकशाहीस पुरक अशा पायावर उभी असेल हा त्यामागे त्याचा हेतू होता.

**निष्कर्ष :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतातील राष्ट्रउभारणीसाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी घटकांमधील अतिशय महत्वाचे योगदान आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देखील त्यांचे जे कार्य आहे. या कार्याचा आधारावरच भारतीय समाजाची राजकीय जडणघडण होत असल्याचे दिसून येते. म्हणूनच भारतातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, जमाती व उपेक्षित वर्गासाठी त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून जे विविध कायदे केलेत

*त्याचा लाभ समाजातील सर्व घटकांना होत आहे. म्हणूनच आधुनिक जागतिकीकरणाच्या काळात देखील भारतीय समाजाची पायाभरणी ही उत्तम झाल्याचे दिसून येते.*

***संदर्भ सुची*** **:**


1. *समाजशास्त्र / सेट / नेट पेपर 3 रा - प्रा. मनोहर तोटरे विदयाभारती प्रकाशन लातूर*
2. *भारतीय राजकीय विचारवंत - प्रा.वाय.बी. कुलकर्णी विदयाभारती प्रकाशन लातूर*
3. *सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र - बी.एम.कऱ्हाडे*
4. *प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी - प्रा.डॉ. दिलीप खैरनार डायमंड पब्लिकेशन पूणे.*
5. *आधुनिक भारतीय विचारवंत - प्रा.डॉ.पी.डी.देवरे प्रा.एस.एम.विसपूते प्रशांत पब्लिकेशन पूणे.*
6. *सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी - प्रा. अविनाश डोळस डॉ. शरणकुमार लिंबाळे ग्रंथनिर्मिती केंद्र यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठ नाशिक*


# “स्त्री मुक्ति चळवळी”

प्रा. पांडुरंग रुस्तुम पाचपुते
(सहा.प्राध्यापक)
श्रीमती.पी.डी.पाटील समाजकार्य महाविद्यालय,खड़की (बु) अकोला.

**सारांश:-**

सामाजिक 'स्त्रीमुक्ती चळवळी' ह्या समाजाच्या बहुसंख्य स्त्रियांच्या आवश्यकतेची पूर्ती करण्याच्या दृष्टीने समाजात उदयास येतात.स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या उत्थानासाठी स्त्री-मुक्ती चळवळी झालेल्या आपणास पहावयास मिळतात. तसेच आधुनिक काळातदेखील अनेक श्री मुक्ती चळवळी उदयास आल्या. आज भारतीय समाजामध्ये वेगवेगळ्या स्त्रीमुक्ती चळवळी चालू आहेत, या स्त्री मुक्ती चळवळीमध्ये सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, स्त्री कवयित्रीचे योगदान, तसेच स्वातंत्र्य लढ्यामध्ये स्त्रियांचा सहभाग आणि प्रत्यक्षात स्त्रियांकरिता स्त्रियांच्या विकासाकरिता करण्यात आलेले कायदे तसेच स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे काय या सर्वाचा आढावा सदरील संशोधन पेपरमध्ये करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना:-**

भारतीय प्राचीन संस्कृतीचा विचार केला तर स्त्री च्या जीवनावर व्यक्तिगत तसेच सार्वजनिक स्तरावरील विविध घटकांचा मोठा परिणाम घडून आलेला दिसतो. भारतीय समाजात कुटुंबाला मोठे स्थान असल्यामुळे पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीला हीन लेखले गेले. पुरुषापेक्षा स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले. पुत्र व्हावा असे सर्वांना वाटे. त्यासाठी विविध विधी केल्या जात. परंतु मुली जन्माला येणे हे दुर्भाग्याचे लक्षण मानले जाई. केवळ वरिष्ठ वर्गातील मुलींनाच शिक्षणाचा अधिकार होता. सती, वियोग, जोहार यासारख्या चाली रूढ होत्या. पतीच्या निधनानंतर स्त्रीला आपल्या मुलांवर अवलंबून राहावे लागे. पुत्र प्राप्ति शिवा आहे हे लोक व परलोकातील कल्याण प्राप्त होऊ शकत नाही असा दृढ समज होता. सामाजिक दृष्ट्या विवाह व अपत्य प्राप्ती हेच स्त्री जीवनाचे कर्तव्य मानले

जात होते. स्त्रीला घराच्या चार भिंतीआड समाजापासून विकासापासून शिक्षणापासून दूर ठेवले गेले. स्त्रियांना विविध नियमात बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला गेला होता. स्त्रीने एकांतात बसूनही घरातील छोटेसे काम ही स्वतंत्ररीत्या करू नये. स्त्री ही पूर्णपणे पिता-पुत्र-पती यांच्यावरच अवलंबून असावी या सर्व बंधनामुळे स्त्री ही मानसिक दृष्ट्या इतकी खोलवर गेली होती की ती फक्त समाजाने लादलेली 'चुल' आणि निसर्गाने लाभलेले 'मुल' या चाकोरीयुक्त कार्यप्रणाली मध्येच जगू लागली.

प्रामुख्याने जगातल्या सर्वच समाजात स्त्रियांचे दुय्यम म्हणजे नगण्य स्थान असल्याचे दिसून येते. स्त्रियांच्या दुय्यम स्थानामुळे तिच्यावर होणारा अत्याचार,अन्याय,अवहेलना यांच्या जाणिवेतून स्त्रियांची चळवळ सुरु झाल्याचे दिसून येते ही स्त्रियांची चळवळ ही प्रामुख्याने तिच्या पारंपारिक भूमिकेच्या बदलासाठी आहे. तिच्यावर जे बाईपणलादले जाते. त्यातून तिला मुक्त होऊन पुरुषाप्रमाणे स्वतंत्र आणि समतेच्या हक्कासाठी धरलेला आग्रह आहे. वेगवेगळ्या देशात स्त्रियांच्या चळवळी चालू आहेत स्त्रियांची चळवळ ही कोणत्यातरी विचारधारेशी जोडली गेली आहे. वर्तमान काळात स्त्रियांच्या विकासासाठी त्यांच्यावर होणारा अत्याचार सुरक्षितता या सर्वांसाठी कायद्याने प्रयत्न केले असले तरी हे सर्व स्त्री चळवळीचे फलित आहे. १२व्या शतकात कर्नाटकात बसवेश्वरांनी स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय असे सर्व प्रकारचे हक्क प्रदान करून दिले त्यांचे स्त्रीविषयक कार्य पाहिले असता स्त्री मुक्ती चळवळीचे ते आद्य प्रणेते ठरतात. तसेच याच शतकात महाराष्ट्रात चक्रधर स्वामींनी स्त्रियांचे पुरुषाबरोबरीचे स्थान मांडले.

भागवत संप्रदायात मुक्ताबाई,जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, यांना मानाचे स्थान होते जनमानसावर त्यांचा प्रभाव होता. नंतर जिजाबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई, ताराबाई, उमाबाई दाभाडे या पराक्रमी स्त्रियांचा प्रभाव जाणवतो.१९ व्या शतकातील महात्मा फुले यांचे स्त्री विषयक विचार व कार्य अतिशय महत्त्वाचे ठरते. स्त्रियांसाठी असलेल्या जाचक तरुणींना त्यांनी विरोध करून त्याचा उपाय म्हणून स्त्री शिक्षणात सुरुवात करून तळागाळातील स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. फुले यांच्या कार्याचा प्रभाव शाहू महाराजांवर झाला आणि स्त्रियांसाठी अनेक महत्वपूर्ण कायदे केले. १९व्याशतकातील स्त्री चळवळीने समाजसुधारणेच्या संदर्भात स्त्री स्वातंत्र्याची भूमिका घेतली. यात स्त्रियांचे कुटुंबातील स्थान रूढी परंपरेच्या नावाखाली होणारे अन्याय, अत्याचार,सतीप्रथा, वेश्या व्यवसायास प्रवृत्त होईल अशा आत्मघाती विचार करणाऱ्या स्त्रियांचा उद्धार करण्यासाठी सतीची चाल बंद करणे विधवा-पुनर्विवाह बाल विवाहाला विरोध, विधवा केशवपन आस विरोध या सारख्या चळवळींना सुरुवात झाली. यात राजाराम मोहनरॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी समाजसुधारकांनी समाजाचा कडवा विरोध पत्करून सुधारणा घडवून आणण्यास प्रसंगी कायदे करून घेतले.

**स्त्रीवादी चळवळीचे दोन टप्पे:-**

**१ ) स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री चळवळ**

**२ ) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ**

**( १ ) स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री चळवळ:-**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या विविध भागात समाजाच्या पुनर्रचनेसाठी चळवळी झाल्या त्यात सतीची चाल नष्ट करण्यापासून ते विधवांचा पुनर्विवाह, स्त्रियांचे शिक्षण इत्यादी अनेक विषय होते. हे प्रश्न फक्त स्त्रियांच्या चळवळीचे म्हणून उचललेगेले नाहीत, तर समाजाला आधुनिक बनविण्यासाठी त्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक होते. म्हणून त्या संदर्भात चळवळी झाल्यात. त्यात सतीबंदीचा कायदा– १९३२, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी१८४८मध्ये भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. १९४९मध्ये पुण्यातील उस्मानशेट यांच्या वाड्यात शाळा सुरू केली. १८५१मध्येरास्ता पेठेत मुलींची शाळा सुरू केली. १८५२मध्येवेताळ पेठेत स्टेशनच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. १८५५मध्ये शेतकरी व शेतमजूर स्त्री-पुरुषांसाठी रात्रीची शाळा सुरू केली. १८५३मध्ये बाल हत्या प्रतिबंधकगृह व प्रसूती गृह सुरू केले. १मे१८८२लापुणे येथे आर्यमहिला समाजाची स्थापना झाली. त्याच वर्षी ताराबाई शिंदे लिखित "स्त्री पुरुष तुलना" हे जळजळीत भाषेतील पुस्तक प्रकाशित झाले. १८८७मध्ये रखमाबाईंनी दादाजी ह्या आपल्या नवऱ्याशी संसार करण्यास नकार दिला व त्यासाठी सहा महिने तुरुंगवासाची तयारी दर्शविली. त्याच वर्षी आनंदीबाई जोशी ह्या भारतातील पहिल्या स्त्री डॉक्टर झाल्यात. १८९१मध्ये संमतीवयाचा कायदा पास झाला. १९१६मध्ये हे महर्षी करवे द्वारा स्वतंत्र महिला विद्यापीठाची

स्थापना करण्यात आली. सर्वप्रथमस्त्री संस्थांना एकत्र आणण्याचा प्रयत्न रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली १९०४ मध्ये भरलेल्या मुंबई येथील अखिल भारतीय परिषदेत झाला.

अशाप्रकारे अनेकपुरुष सुधार व स्त्रियांनी शिक्षणाकरिता उत्थानाकरिता वैयक्तिकरित्या व संस्थांमार्फत कार्य केलेले दिसते.

**( २ ) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ:-**

भारतीय समाजात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांच्या स्थितीत उल्लेखनीय परिवर्तन झालेत. तरीही जगातील सर्व देशातील महिलांचा विचार केला तर भारतीय महिलांसारखी दयनीय अवस्था दुसऱ्या कोणत्याही देशातीलस्त्रीची नाही. आरोग्य शिक्षण रोजगार या आघाड्यांवर तिची पिछेहाट झाली असल्यामुळे हाती आलेले संपूर्ण राजकीय हक्क निरर्थक बनले होते. कारण सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही. म्हणूनच डॉक्टर आंबेडकरांसारख्या समाज सुधारकांनी स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कांपासून वंचित करणाऱ्या व परिणामी निम्न आर्थिक दर्जा देण्यास कारणीभूत ठरणाऱ्या परंपरागत धार्मिक व सामाजिक दोन्ही विरुद्धचे आंदोलन स्वातंत्र्य युद्धा बरोबरच सुरू केले होते. दीर्घकालीन परंपरांनी बधीर झालेल्या स्त्री मनाला चेतन करण्याचे सामर्थ्य शिक्षण आतच आहे हे फुले कर्वे आणि डॉक्टर आंबेडकरांनी हेरले होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा मोठा सहभाग होता. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री स्वातंत्र्यलढा लढली याचा एक सुप्त परिणाम असा झाला की स्त्रियांतील हिनत्वाची भावना कमी झाली आत्मविश्वास वाढला. आरंभीच्या काळातील स्त्री मुक्ती चळवळीचे स्वरूप तसेच सोम्य वाटत असले तरी या चळवळीला भक्कम पायावर उभी करण्याचे कार्य याच काळातील आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण प्रौढ मतदान पद्धती स्वीकारली . भारतीय राज्यघटनेने स्त्रियाना पुरुषांबरोबर चा सामाजिक दर्जा दिला. स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आल्या. मुख्य म्हणजे हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीचे कुटुंबातील स्थान तिचा वैचारिक दर्जा यासारख्या बाबींच्या संदर्भात स्पष्ट व पुरोगामी धोरणाचा स्वीकार केला गेला. तसेच स्त्री मुक्ती संदर्भात अनेक कायदे सुद्धा करण्यात आले.

**संत कवयित्रींचे योगदान:-**

मध्ययुगीन महाराष्ट्रात स्त्रियांचा दर्जा सुधारण्याच्या संदर्भात व स्त्री चळवळीचा मागोवा घेताना संत कवयित्रींनी सुद्धा मोलाची भर घातली. संत कवित्री ने आपले काव्य, अभंग, ओव्या यातून मानवी जीवनाची मूल्ये व स्त्री जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविले स्त्रियांच्या दुःखमय जीवनाचे वर्णन त्यांनी केले.समाज हिताची व समाज शिक्षकाची भूमिका त्यांनी स्वीकारली आणि स्त्री जीवनाच्या विकासाला मोठे योगदान दिले.

महदंबा ही महानुभाव पंथाचे आद्य पुरुष चक्रधरस्वामी यांच्या शिष्या.महंदबेने पोवाळा, पूर्वार्ध व उत्तरार्ध, रुक्मिणी व कर्मकांड ओव्या इत्यादी स्वरूपात साहित्यनिर्मिती केली .महंदबेने स्त्री जीवन व सामान्य स्त्रियांच्या उद्धारासाठी मोठे योगदान दिले. ज्ञानदेवांची धाकटी बहीण मुक्ताई हिने ताटीच्या अभंगाद्वारे अध्यात्मिक गोष्टी तत्त्वज्ञान यांचा प्रसार केला. तिने मानवी स्वभावातील अहंभाव सोडून देण्याची शिकवण सर्वांना दिली. संत जनाबाई ही तर क्रांतिकारी कवित्री म्हणून ओळखली जाते.शुद्र दासी म्हणून जीवन जगलेल्या संत जनाबाईने भारतीय स्त्रियांना कर्तुत्वाने आत्मोन्नती करण्यासाठी अध्यात्म वादाचा मार्ग स्त्रियांनी अवलंबण्याविषयीचा आदर्श घालून दिला. बहिणाबाईंच्या अभंगातून तत्कालीन भारतीय समाजजीवनाच्या विविध पैलूंचे वर्णन आढळते. अध्यात्मिक ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचे विवेचन त्यांनी केले समाजात कनिष्ठ शुद्रांचा दर्जा असलेल्या स्त्रियांना आत्मोन्नतीसाठी व आत्म विकासासाठी धैर्य नम्रता शुद्ध चारित्र्य इत्यादी गुणांची गरज असते हे त्यांनी त्यांच्या स्वतःच्या उदाहरणावरून समाजाच्या निदर्शनास आणून दिले.

**स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचा सहभाग:-**

गांधीजींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियांना सहभागी करून घेतले परदेशी मालावर बहिष्कार टाकणे,सूत काढणे,कापड विणणे,निरनिराळ्या सभांना जाणे, प्रभातफेरी काढणे, अनिष्ट प्रथांचे निर्मूलन,कायद्यात सुधारणा घडून आणणे इत्यादी प्रकारची कार्ये

स्त्रीयांनी पार पाडली. यात सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, अरुणा असफ अली,प्रा.उषा मेहता, हंसा मेहता इत्यादींचा समावेश होता १९३१ मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.

१९७५मध्ये युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे केले आणि पुन्हा स्त्री चळवळींना प्रेरणा मिळाली. कारण पाश्चिमात्य स्त्रीवादाशी येथील स्त्री चळवळीचा संपर्क आला यानंतर भारतात महिलांच्या राजकीय संघटना, स्वायत्त संघटना, जनवादी आंदोलन इत्यादी स्त्री चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांचे अनेक प्रश्न जसे, हुंडाविरोधी चळवळ, प्रसारमाध्यमांतील स्त्रीची प्रतिमा, पाठ्यपुस्तकातील लिंगभेदावर आधारित अभ्यासक्रम, सौंदर्यस्पर्धा, कौटुंबिक अत्याचार, महागाई विरुद्ध आंदोलन, मद्यपान विरोधी चळवळ, परितक्त्या, महिला आरक्षण, नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या इत्यादी महिला संदर्भित प्रश्न चळवळीच्या माध्यमातून हाताळण्यात आले. स्त्री साहित्य, स्त्री अभ्यास केंद्र, पथनाट्य हेदेखील स्त्री चळवळीत महत्वपूर्ण योगदान देत आहेत.

**निष्कर्ष**:-

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये व स्वातंत्र्योत्तर कालावधीमध्ये स्त्री-मुक्ती चळवळीमध्ये स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग तसेच, स्त्रियांच्या उत्थानासाठी भारतीय समाज सुधारक व धाडसी विरांगणा आणि साहित्याच्या माध्यमातून कविता, पोवाडे यांच्या माध्यमातून कवयित्री बहिणाबाई चौधरी संत जनाबाई, मुक्ताई यांच्या ताटीचे अभंग,ओव्या इत्यादी स्वरूपातून भारतीय व महाराष्ट्रीय स्त्रियांचा विकास साधण्यासाठी आधुनिक काळात देखील स्त्रीमुक्ती चळवळी सातत्याने सुरू आहेत यातून स्त्रियांचे अधिकार आणि हक्क निश्चितच प्राप्त होतात. एकूणच स्त्रियांच्या विकासामध्ये"स्त्री मुक्ती चळवळीचे" योगदान अतिशय मोलाचे आहे.

**संदर्भ**:-

१ ) प्रा. सौ. सुनंदा भद्रशेटे, प्रा. ब.बी शेख,'भारतातील सामाजिक आंदोलने' अरुण प्रकाशन लातूर.
२ ) डॉ. बी. एम. कऱ्हाडे, 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र' पिंपळापुरे अँड पब्लिशर्स नागपूर.
३ ) डॉ. प्रकाशस. बोबडे, 'कोलाज'( आर्थिक विकास व सामाजिक चळवळी) मंगेश प्रकाशन.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाज सुधारणा बाबतचे विचार

**डॉ. आर. एम. सरपाते**
श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय,
अमरावती

- **प्रस्तावना:—**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजसुधारणेचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. भारतात जातीव्यवस्था ही हिंदु समाजासमोर एक समस्या आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून वर्ण व जातीव्यवस्था रूढी परंपरेने चालत आलेल्या आहेत. यामध्ये सुधारणा करण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न झाला. परंतु यामध्ये समाजसुधारकांनी आपल्या स्वजातीच्या कुलाचाराच्या शुद्धीकरणापलिकडे न जाता कार्य केल्याने त्यामध्ये सुधारणा होवू शकल्या नाहीत. याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, सामाजिक सुधारणेचा जप करूनही या समाजसुधारकांना समाजातील जातीभेद, स्पर्शास्पर्श भेद नष्ट करता आला नाही. ही त्यांची मर्यादा होती. याला कारणीभूत हिंदू समाजव्यवस्थेची अंतर्गत रचना होती. या रचनेचा एतद्देशिय जीवनावर प्रभाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जीवन जगत असतांना वाईट अनुभव आले होते. हिंदू समाजात जातीव्यवस्था असल्याने त्यात माणसाला गुलाम बनविले होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या सुधारणेसाठी आपले अखंड आयुष्य वाहून घेतले. तेव्हा या शोध निबंधामध्ये त्यांच्या कार्याचा उहापोहा घेतलेला आहे.

- **जाती निर्मूलनाविषयीचे विचार :—**

प्राचीन काळापासून भारतीय समाजरचना ही वर्णव्यवस्थेवर आधारित होती. त्यामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र यांचा समावेश होता. या समाजरचनेत बदल करणे काळाची गरज आहे असा समाजशास्त्रीय विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडला. हिंदू धर्माविषयी ते म्हणतात, 'या धर्मात माणुसकीने वागण्याची मनाई आहे. हिंदू धर्मात पशूंचा स्पर्श चालतो. पण अस्पृश्य माणसाचा स्पर्श चालत नाही. अशाप्रकारची समाजरचना बदलल्याशिवाय प्रगतीच्या मार्गावर जाता येणार नाही.

आंतरजातीय विवाहाद्वारे जाती निर्मूलन होवू शकते असे त्यांचे मत होते. रक्त संबंधाच्या भावनेतून वेगळेपणाची भावना निर्माण होते. सामाजिक जीवनात जोपर्यंत जातीव्यवस्था नव्हती तोपर्यंत या धर्मास खूप महत्व होते. परंतु जातीभेद निर्माण झाला तेव्हापासून या धर्मात जे महत्व होते ते संपुष्टात आले आहे. यापुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, हिंदू धर्मशास्त्राचे जोखड झुगारून टाकल्याशिवाय यामधील जाती नष्ट होणार नाहीत व हे कार्य केवळ समाजसुधारकच करू शकतात. हिंदू धर्मशास्त्रात रूढी व परंपरा जातीसंस्था विवेक व नीतीश विसंगत असूनही लोकांच्या मनाला शास्त्रांनी गुलाम केल्यामुळे लोक विचार करीत नाहीत. अशाप्रकारे जातीभेद हे कधीही न संपणारे आहेत. परंतु ते संपविणे काळाची गरज आहे. असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले आहेत.[१]

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य :—**

शिक्षण ही काळाची गरज आहे. हे शिक्षण सर्व मनुष्यांना मिळाले पाहिजे. असे ठाम मत डॉ. बाबसहेब आंबेडकर यांनी मांडले. आजपर्यंत येथील स्त्रिया व शुद्र लोकांना समाजाने शिक्षणापासून वंचित ठेवले आहे. तसेच स्त्रिया या पुरूषांच्या गुलामगिरीत जीवन जगत आहेत. तेव्हा या गुलामगिरीतून मुक्त व्हायचे असेल तर स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते.

अस्पृश्यांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हिकारिणी सभेची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९२८ मध्ये दोन विद्यार्थी वसतिगृहे काढून दलित समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या कार्यास सुरूवात केली होती. नंतर त्याच वर्षी त्यांनी 'डिस्प्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी' (अस्पृश्य समाज शिक्षण संस्था) स्थापन केली. त्याद्वारे त्यांनी प्रत्येक जिल्हयातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांना हायस्कुलचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना करावी व तेथे अस्पृश्य विद्यार्थ्यांची मोफत राहण्याची व जेवणाची सोय करावी. म्हणजेच गरीब, होतकरू व हुशार मुलांना शिक्षण घेता येईल. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे बहुतेक प्रत्येक जिल्हयात कार्यकर्त्यांनी विद्यार्थी वसतिगृहे स्थापन केली. आज समाजात जो शिक्षणाचा प्रसार झालेला, हे त्याचेच मूळ आहे.[२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसामान्य लोकांना शासनसंस्थेत उच्च जागा मिळविण्यासाठी उच्च शिक्षण मिळणे गरजेचे आहे हे ओळखले होते. म्हणूनच त्यांनी मजूरमंत्री असतांना सन १९४६ मध्ये मध्यवर्ती इंग्रज सरकारचे महत्वपूर्ण सहकार्य घेवून 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' या नावाची शिक्षणसंस्था स्थापन केली. याच संस्थेच्या वतीने दि. २० जून १९४६ रोजी मुंबईत 'सिद्धार्थ कॉलेज' नावाचे महाविद्यालय स्थापन केले. आज हे सिद्धार्थ कॉलेज प्रसिद्ध आहे.[३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणून औरंगाबाद येथे सन १९५० मध्ये 'मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामुळे या भागातील स्पृश्य अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय झाली.[४]

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणप्रसाराच्या आणि ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने अस्पृश्य बांधवांना व स्त्रियांना शिक्षण मिळावे यादृष्टीने प्रयत्न केलेले दिसतात. त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या शिक्षणसंस्थेची स्थापना करून तिच्यातर्फे महाविद्यालये सुरू केली.

- **मंदिर प्रवेश विषयीचे विचार :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी जे प्रयत्न केले होते त्यामध्ये संघटितपणा आणून एक सामाजिमक क्रांति घडवून आणण्यासाठी तसेच अस्पृश्यांनी आपल्यावर लादण्यात आलेल्या अन्यायकारी सामाजिक बंधनातून मुक्त होण्यासाठी आणि आपली सामाजिक,राजकीय व आर्थिक प्रगती करून आपल्या सामाजिक क्रांतीची जोरदार सुरूवात करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी मंदिर प्रवेश सत्याग्रह योजना आखली होती. तिचा उद्देश अस्पृश्य लोकांनी मंदिरात प्रवेश करून जी गोष्ट सिद्ध करून द्यावयाची आहे ती ही, की त्यांच्या प्रवेशाने देवालय भ्रष्ट होत नाही किंवा मंदिरातील मूर्तीला स्पर्श केला

असता तिचे पावित्रय कमी होत नाही. म्हणूनच त्यांनी महाड, अमरावती पर्वती व माशिक या ठिकाणी मंदिर सत्याग्रह चळवळ सुरू केली.

हिंदू मंदिर प्रवेशाची चळवळ ही अस्पृश्यांच्या सामाजिक गुलामगिरीच बंधने तोडण्यासाठी केलेली चळवळ होती. सत्याग्रहाद्वारे निर्धारपूर्वक करण्यात आलेल्या या प्रयत्नामागे माणूस म्हणून आपला हक्क प्रस्थापित करण्याची प्रेरणा होती. एकदा हिंदूच्या मंदिरात प्रवेश मिळाला तर आपणास हिंदूच्या हृदयात प्रवेश मिळेल 'या मंदिर प्रवेशाने आमचे प्रश्न सुटणार नाहीत पण मानाने, अब्रुने राहावयास मिळणार आहे की नाही हे पहावयाचे आहे' डॉ. बाबासाहेबांचे मंदिर प्रवेशाबाबतचे विचार होते. अस्पृश्यांच्या या चळवळीला स्पृश्यांनी उत्तर दिले की, अस्पृश्यांनी घरीच निराकाराचे ध्यान करावे, परमेश्वराचे नामस्मरण करावे किंवा अस्पृश्यासाठी स्वतंत्र मंदिरे बांधावीत. डॉ. आंबेडकरांनी याला सडेतोड उत्तर दिले. मंदिर प्रवेशामागे पूजर करण्याचा प्रमुख उद्‌देश नसून, त्यांच्या प्रवेशाने मंदिर भ्रष्ट होत नाही किंवा मूर्ती अपवित्र होत नाही हे सिद्ध करावयाचे आहे. स्वतंत्र मंदिरे बांधणे हा अस्पृश्यता निवारणाचा मार्ग नाही. अस्पृश्यता निवारणयचा योग्य मार्ग म्हणजे आहेत त्या सार्वजनिक व्यवस्था सर्वांना खुल्या करणे हा होय.[५]

- **महाड येथील चवदार तळे :—**

महाड येथील चवदार तळे पाणी सत्याग्रहाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित मुक्ती लढयाचे निशाण रोवले. ४ ऑगस्ट १९२३ रोजी कायदेवजा ठरावानुसार महाडच्या म्युनिसिपालिटीने सार्वजनिक पाणवठे, विद्यालये व धर्मशाळा इ. ठिकाणी 'मुक्त संचाराला' मान्यता देणारा ठराव पास केला. तथापि अस्पृश्यांनी स्पृश्यांच्या भितीने चवदार तळयावर जावून पाणी पिण्यचे धाडस केले नव्हते. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या बहुसंख्य अनुयायासह महाडच्या तळयावर जावून पाणी पिण्याचे धाडस केले. ही घटना २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी त्यांनी महाड येथे सत्याग्रह परिषद घेतली आणि पारंपारिक मक्तेदारी मोडण्यात आली.[६]

- **मनुस्मृतीचे दहन :—**

महाड येथे भरलेल्या 'सत्याग्रह परिषदेतच' हिंदू समाजाचा धर्मग्रंथ असलेल्या 'मनुस्मृतीचे' दहन करण्याचा निर्णय घेतला गेला. कारण शूद्र जातींचा उपमर्द करणारी, त्यांची प्रगती खुंटवणारी, त्यांचे आत्मबल नष्ट करून त्यांची सामाजिक, राजकीय व आर्थिक गुलामगिरी कायम करणारी वचने या ग्रंथात होती. तसेच या ग्रंथात उच्च—नीच भेदभाव यांचे समर्थन करणारी वचने या ग्रंथात होती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसह २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती ग्रंथाचे जाहिर दहन केले.[७]

- **निष्कर्ष :—**

जातीभेद व जातीव्यवस्था हेच हिंदू धर्म व हिंदू समाजाच्या अनर्थाचे मूळ कारण कसे आहे त्यावर त्यांनी परखड विचर मांडले आहेत. त्यांचे हे विचार पाहिले असता असे दिसून येते की, त्यांनी जातीव्यवस्थेचा गाढा अभ्यास केलेला आहे. हिंदू

समाजातील श्रेष्ठ–कनिष्ठता, स्पृश्य–अस्पृश्यता, पवित्र–अपवित्र, सोवळे–ओवळे या कल्पनाचे चिंतन केले आहे. जातिभेदामुळे प्रतिष्ठीत हिंदू अरेरावाकडे अनियंत्रित सत्ता गेली तर त्यापासून गरीबांचे हित होईल की नाही याविषयी चिंता व्यक्त केली.

अस्पृश्य समाजाची परंपरागत सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी त्यांना जागृत करणे आवश्यक होते. समाज शिक्षित झाल्यासच त्याची उन्नती होऊ शकेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी प्रारंभीपासूनच या समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कार्यावर भर दिला. संधीचा योग्य उपयोग केल्यास अस्पृश्य व्यक्तीही उच्च विद्याविभूषित होते हे तत्व त्यांनी आपल्या उदाहरणाने समाजासमोर मांडले. अस्पृश्य समाजास शिक्षणाने जागृत करून त्यांना आपल्या हक्काविषयी जागृत केले. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेची स्थापना करून शैक्षणिक कार्य सुरू केले होते. तर 'पिपल एज्युकेशन सोसायटची' स्थापना करून उच्च शिक्षणाची सोय स्पृश्य–अस्पृश्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली. विद्यापीठाचा दर्जा कसा असावा याविषयीचे विचारही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या कार्यावरून त्यांची शिक्षणाविषयीची महती लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. डॉ. आंबेडकर बी. आर. जातिभेद निर्मूलन, मराठी अनुवाद, सुगम प्रकाशन, नागपूर
२. खरात शंकरराव (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य, पुणे
३. गायकवाड ज्ञानराज काशीनाथ, महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, रिया पब्लिकेशन्स् कोल्हापूर
४. प्रा. पाटील एन. डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

# राष्ट्रउभारणीमध्ये महिला चळवळीचे योगदान

विषेष संदर्भः स्वातंत्र्यपुर्व काळातील चळवळी

डॉ. माधुरी झाडे
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोषल वर्क, वर्धा.

**सारांषः**

समाज जीवनामध्ये परंपरावादी मुल्यांषी बांधिलकी जपणारे लोक हे चळवळीपासून फारकत घेतात तर ज्या लोकांना आपला हक्क, अधिकारांविषयी समाजातील समस्यांविषयी तसेच अन्याय अत्याचाराविषयी तिव्रतेने जाणिव होते. यासोबतच प्रस्तावित व्यवस्थेमध्ये बदल झाला पाहिजे असे ज्यांना वाटते अषा व्यक्ती प्रत्यक्षात जाणिव जागृती करून संघटणात्मक बांधनी करतात आणि उदिष्टाभिमूख क्रिया करू लागतात. अषा अधिकांष संख्या असलेल्या लोकांच्या वर्तनास म्हणजेच समूहवर्तनास सामाजिक चळवळ म्हणतात.

भारतातील स्त्री चळवळीला खऱ्या अर्थाने एकोनिसाव्या शतकात सुरूवात झाली परंतू या कालखंडमध्ये अनेक स्त्री चळवळीचे नेतृत्व हे पुरूष वर्गाकडे असलेले दिसून येते समाजसुधारणा घडविणाऱ्या चळवळीमध्ये प्रथमता स्त्री षिक्षणाचा पाया रोवला गेला. स्त्रियांना षिक्षणाच्या संधी उपलब्ध करूण देण्याकरिता सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतीराव फुले यांचे अथक परिश्रम आहे. या

दाम्पत्यांनी अनेक हालअपे''ठा सहन करून स्त्रियांना षिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

1910 .– 20 च्या दषाकामध्ये राष्ट्रिय पातळीवर स्त्रियांचे संघटन उभे राहीले. 1975 मध्ये ॲनिबेझंट यांच्या नेतृत्वाखाली 'भारतीय स्त्री संघटनेची' (Indian Women's Association) स्थापना झाली. यानंतर स्वराज्याच्या चळवळीमध्ये स्त्रियांनी मोठया प्रमाणात सहभागी व्हावे असे आव्हान करण्यात आले. त्याला खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

डाव्या चळवळीतील विचारवंत मंडळी कार्यव्यवस्थेला शोषणाचे मुळ मानतात. वर्गव्यवस्थेच्या जाणीवेकडे वृंदा करात सकारात्मक दृष्टिने पाहतात. त्यांच्या मते, भारतातील स्त्री चळवळीत सुरूवातीपासून स्त्रियांच्या दुय्यमत्वाच्या व्यापक आर्थिक, सामाजिक संदर्भ आणि राज्यसंस्थेला धोरणाषी असलेल्या संबंधाचे भान होते.

भारतामध्ये स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्यानंतर ज्या ज्या चळवळी उभ्या राहिल्या त्या प्रत्येक चळवळीमध्ये महिलांचे महत्वपुर्ण योगदान राहीलेले आहे. मग त्या चळवळी सुधारणात्मक, सुरक्षात्मक, सामाजिक, आर्थिक, राजकिय, आदिवासी, कामगार, दलीत, पर्यावरणात्मक ,पुर्णवसनात्मक, समताधिष्ठित इत्यादी कुठल्याही स्वरूपाच्या असोत. काही चळवळीचे नेतृत्व पुरूषांनी केले असले तरी महिलांचा मोठया प्रमाणात सहभाग होता तर काही चळवळीचे नेतृत्व स्वतः महिला करीत होत्या. चळवळी हया समाजाचा पर्यायाने देषाचा विकास साध्या करण्याच्या दृष्टिने महत्वपुर्ण असतात त्यामुळे राष्ट्रउभारणीमध्ये महिला व महिला चळवळींचे फार मोठे योगदान आहे.

सामाजिक चळवळींचा इतिहास फार प्राचिन आहे. अगदी प्राचीन काळापासून सामाजिक चळवळींचे अस्तीत्व आपणास दिसून येते. समाजामध्ये जसजसे परीवर्तन होत जाते त्यासोबतच नविन प्रष्न देखील उदयास येतात आणि म्हणूनच या नवनविन प्रष्नांची सोडवनूक करण्याकरिता नवनविन चळवळी उदयास येतात. उदा. मोठया प्रमाणात होऊ घातलेल्या औद्योगिकरणामुळे पर्यावरण संदर्भित चळवळी, विस्तापित लोकांच्या पुर्नवसनासंबंधी चळवळी उदयास आल्या. एकाधिकरषाही/राजेषाही शासनव्यवस्थेपेक्षा लोकषाही शासनव्यवस्थेमध्ये चळवळींना अधिक बळ मिळत असते. औद्योगीकरणामुळे दळणवळणाच्या साधनांमध्ये झालेली वाढ, षिक्षणाचा मोठया प्रमाणात झालेला प्रचार आणि प्रसार, विचार स्वातंत्र्य, उदारमतवादी धोरण आणि लोकांमध्ये झालेल्या जाणिव जागृतीमधून विषे''ातः महिलांमध्ये चळवळीचे प्रमाण वाढले आहे. सामाजिक चळवळी हया सामाजिक सुधारणांची जुळलेल्या आहे स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये एक व्यापक पार्ष्वभूमी त्यांना लाभलेली आहे.

समाज जीवनामध्ये परंपरावादी मुल्यांषी बांधिलकी जपणारे लोक हे चळवळीपासून फारकत घेतात तर ज्या लोकांना आपला हक्क, अधिकारांविषयी समाजातील समस्यांविषयी तसेच अन्याय अत्याचाराविषयी तिव्रतेने जाणिव होते. यासोबतच प्रस्तावित व्यवस्थेमध्ये बदल झाला पाहिजे असे ज्यांना वाटते अषा व्यक्ती प्रत्यक्षात जाणिव जागृती करून संघटणात्मक बांधनी करतात आणि उदिष्टाभिमूख क्रिया करू लागतात. अषा अधिकांष संख्या असलेल्या लोकांच्या वर्तनास म्हणजेच समूहवर्तनास सामाजिक चळवळ म्हणतात.

सामाजिक चळवळ म्हणजे सामूहिक वर्तन होय. प्रत्येक चळवळीषी एका निष्चीत उदिष्ट, कार्यक्षेत्र, नियमावली, षिस्त, बंधने असतात. उदिष्टे साध्य करण्याकरिता कार्यक्रमाची आखणी केलेली असते. त्यामध्ये बॅनर, पोष्टर, घोषणा, ध्वज, गाणी, पोषाख, सभा, पत्रके, तत्वज्ञान इत्यादी घटकांचा समावेष असतो. नेते मंडळी आपल्याला चळवळीची भुमिका कार्यकर्त्यांना पटवून देतात आणि चळवळीचे नेतृत्व करतात.

**सामाजिक चळवळीचा अर्थः**

**हर्बर्ट ब्लुमर यांच्या मते,** "सामाजिक व्यवस्था प्रस्तापीत करण्यासाठी केलेले सांघीक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

**लुंडबर्ग व इतर यांच्या मते**, "बृहत समाजातील लोकांच्या अभिवृत्ती, वर्तन आणि सामाजिक संबंधात नियोजीत रितीने परिवर्तन घडविण्यात स्वेच्छेने गुंतलेल्या लोकांच्या प्रयत्नांना सामाजिक चळवळी म्हणतात."

**एम. एस. ए. राव यांच्या मते**, "समाजातील एका घटकाने विषिष्ट विचार प्रणालीस अनुसरून सामूहिक प्रयत्नाद्वारे समाजात आंषिक किंवा संपूर्ण परिवर्तनासाठी केलेले संघटित प्रयत्न म्हणजे साामाजिक चळवळ होय."

**जॉन विल्सन यांच्या मते**, "सामाजिक व्यवस्थेत असंस्थीकृत साधणांच्या द्वारे परिवर्तन घडवून आणणे किंवा व्यापक परिवर्तनास प्रतिकार करण्याचे जाणिवपुर्वक सामूहिक, संघटीत प्रयत्न म्हणजे सामुहिक चळवळ होय."

वरील व्याख्यांवरून आपल्या असे निदर्षनास येते की,"सामाजिक चळवळ म्हणजे प्रस्तापित समाव्यवस्थेत बदल घडवून आणण्याकरिता अनेक लोक स्वच्छेने एकत्र येतात व समाजातिल विषेषताः अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा तसेच अधिकांष लोकांचा विकास साध्य करण्याच्या दृष्टिने, संविधानिक मुल्यांचा आधार घेउन प्रयत्न करीत असतात."

संषोधनकर्ती ही एक स्त्री असून तिचा अनेक संस्था, संघटनांषी जुळलेली आहे. मागील बारा वर्षापासून ती समाजषास्त्राची प्राध्यापक आहे. त्यामुळे तिला चळवळीविषयी अधिक जाणिव आहे. याच दृष्टिकोनातून तसेच तिच्या अनुभवातून, अनेक महिला चळवळीमधिल कार्यकर्त्यांच्या मुलाखती व निरिक्षण तसेच दुय्यम स्त्रोत करीता अनेक पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, मासिके यांचा आधार घेवून प्रस्तूत विषयाची निवड करण्यात आली.

**अध्ययनाची उदिष्टयेः**

1. सामाजिक चळवळी व सुधारणात्मक चळवळीविषयी जाणून घेणे.
2. स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळीमध्ये महिलांचा सहभाग जाणून घेणे.
3. महिलांच्या संघटनात्मक चळवळीविषयी जाणून घेणे.
4. महिलांचा सुधारणात्मक चळवळीमधिल सहभाग जाणून घेणे.
5. महिलांचा राजकीय चळवळींमधील सहभाग जाणून घेणे.

**गृहितकृत्येः**

1. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये महिलांच्या स्वतंत्र संघटना नव्हत्या.
2. सुधारणात्मक व राजकिय परिवर्तनाकरिता महिला व पुरूषांनी एक्त्र चळवळी उभ्या केल्या.
3. स्वातंत्र्यानंतर महिलांनी स्वताःचे संघटन उभे केले व चळवळीमध्ये योगदान दिले.
4. राष्ट्रउभारणीमध्ये महिलांचे महत्वपुर्ण योगदान आहे.

भारतातील स्त्री चळवळीला खऱ्या अर्थाने एकोनिसाव्या शतकात सुरूवात झाली परंतू या कालखंडमध्ये अनेक स्त्री चळवळीचे नेतृत्व हे पुरूष वर्गाकडे असलेले दिसून येते समाजसुधारणा घडविणाऱ्या चळवळीमध्ये प्रथमता स्त्री षिक्षणाचा पाया रोवला गेला. स्त्रियांना षिक्षणाच्या संधी उपलब्ध करूण देण्याकरिता सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतीराव फुले यांचे अथक परिश्रम आहे. या दाम्पत्यांनी अनेक हालअपे"ठा सहन करून स्त्रियांना षिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. एकोनविसाव्या शतकामध्येच अनेक जाचक रूढी, प्रथा, परंपरा होत्या त्यांनाही बंद करण्याकरीता राजाराम मोहनरॉय सोबत अनेक स्त्रियांनी सहभाग नोंदवून या जाचक रूढी, प्रथा विरोधात कायदे करण्याकरिता सरकारला भाग पाडले व त्यामुळे या जाचक, वाईट, प्रथा, परंपरा बंद झाल्या आणि इथुनच स्त्रियांनी आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. पुढे रा"ट्रवादी चळवळीमध्ये स्त्रियांनी महत्वपुर्ण योगदान दिले. इथे आवर्जून उल्लेख करावा लागेल की, स्त्री चळवळीच्या संदर्भात समाजसुधारणा व राष्ट्रवादी चळवळीचा विचार करण्याबरोबरच कामगार चळवळ, जातीविरोधी चळवळ, अस्पृष्यता चळवळ यासारख्या भिन्न चळवळीमधून स्त्री प्रष्नांवर झालेल्या मंथनाचे, या चळवळींमधिल स्त्रियांच्या सहभागाचे योगदान लक्षात येणे महत्वाचे आहे.

स्त्रियांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याकरिता सामाजिक सुधारणात्मक चळवळींचे महत्वपुर्ण योगदान आहे. एकोणिसाव्या 'ातकातिल सामाजिक सुधारणा चळवळ प्रामुख्याने सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, यासारख्या स्त्रियांषी निगडीत प्रष्नांवर केंद्रित होती. या सोबतच सर्वात महत्वाचे म्हणजे स्त्री षिक्षणाचा प्रष्न होय. एकोणविसाव्या 'ातकातील स्त्री प्रष्नाची जडण घडण आधुनिकता आणि राजकीय सत्तेच्या संदर्भात झालेली दिसते. साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, विचारसरणीतील परस्पर संघर्ष स्त्रियांच्या प्रष्नाच्या आधारे उभारला गेला. यातून नव्याने उदयाला आलेल्या अभिजन वर्गातिल पुरोगामी नेत्यांनी स्त्रिवि"ायक रानटी व क्रुर स्वरूपाच्या प्रथा बंद करण्याकरिता सुधारणात्मक चळवळी उभारल्या.

आधुनिकता, राष्ट्रवाद आणि प्रगतीच्या नव्या विचारसरणीमध्ये स्त्रियांची प्रगती हा एक महत्वाचा निर्देषांक मानला गेला, म्हणूनच सामाजिक सुधारणा चळवळीमध्ये कायेदेषिर सुधारणांवर भर देण्यात आला. 1829 मध्ये सतिप्रथा कायदयाने बंद करण्यात आली. 1856 मध्ये विधवा पुर्नविवाहाचा कायदा करण्यात आला. 1820 ते 1850 च्या दरम्यान ब्राम्होसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज यासारख्या समाजसुधारणा संघटनांचे नेतृत्व शहरी उच्चवर्णिय उच्चजातीतिल पुरूषांकडे असले तरी त्यांच्यामुळे अनेक स्त्रियांना सुधारणांचे फायदे मिळाले याच काळामध्ये सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी मुलींकरिता शाळा काढून षिक्षणाची दालने उघडली. यामधूनच स्त्रियांना प्रगतीच्या वाटा मोकळया झाल्या परंतू फार कमी महिला विकासाच्या प्रवाहात आल्या.

स्त्रियांच्या संघटना व सहभाग :

समाजसुधारणा चळवळी व स्त्रियांकरिता फुले दांम्पत्यांनी खुले केलेले षिक्षण यामधून अनेक स्त्रिया, डॉक्टर्स, षिक्षक, वकिल आणि विचारवंत तयार झाल्या. शहरी भागामध्ये स्त्रियांच्या कल्याणासाठी अनेक संघटना सुरू झाल्या. 1905 च्या आसपास

स्त्रियांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या महिलासेवा समाज, भगीनी समाज, आर्य समाज, आर्य महिला समाज, अंजूमन–ए–ख्वाताईन–ए–इस्लाम, यमनबाई प्रसुतिगृह व बालकल्याण समितीसारख्या अनेक संघटना उभ्या राहिल्या. 1910 .– 20 च्या दषाकामध्ये राष्ट्रिय पातळीवर स्त्रियांचे संघटन उभे राहीले. 1975 मध्ये ॲनिबेझंट यांच्या नेतृत्वाखाली 'भारतीय स्त्री संघटनेची' (Indian Women's Association) स्थापना झाली. यानंतर स्वराज्याच्या चळवळीमध्ये स्त्रियांनी मोठया प्रमाणात सहभागी व्हावे असे आव्हान करण्यात आले. त्याला खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

1924 मध्ये स्त्री चळवळीतील विविध मतप्रवाह आणि विचारांचे समानत्व प्रतिनिधित्व करणारी संघटना म्हणून अखिल भारतीय महिला परिषदेचा (AIWIC) All India Women Conference ची स्थापना करण्यात आली. व या संघटनेनी समान हक्काचा आग्रह धरला. षिक्षणाच्या मागणीचा विस्तार करूण सहषिक्षणाची नविन मागणी करण्यात आली तसेच कायदेषिर सुधारणा अंतर्गत विवाह, घटस्पोट आणि मालमत्तेचे अधिकार, आर्थिक समानतेमध्ये विधवांकरिता निवृत्तीवेतन, नवऱ्याच्या उत्पन्नात बायकोचा अधिकार याबरोबरच गर्भपाताचा हक्क यासारख्या अनेक नविन मागण्या करण्यात आल्या.

1940 च्या सुमारास स्वातंत्र्याचा लढा हा तिव्र स्वरूपाचा झाला. त्यामुळे स्त्रिचळवळीपुढे देखील राजकिय स्वातंत्र्य हा महत्वपुर्ण मद्दा आला. 1946 च्या 'भारत छोडा' आंदोलनास देषभरातील हजारो स्त्रियांनी रस्त्यावर उतरून भूमिगत होवून समांतर सरकारे स्थापण्यात सहभागी होवून उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. विषेषतः बंगालमध्ये बेकायदेषीर ठरणाऱ्या कृत्यात सहभागी झालेल्या अनेक स्त्रिया आंदोलनात बळी पडल्या. स्वातंत्र्यचळवळीचा प्रभाव संपूर्ण भारतीय नागरीकांवर एवढा झाला की, स्त्री स्वातंत्र्याचा प्रष्न जवळपास सुटण्यातच जमा धरला होता. राजकीय स्वातंत्र्या बरोबरच स्त्री पुरूष समता निर्माण होईल असा आषावाद चळवळीमध्ये निर्माण झाला.

महात्मा गांधींची चळवळ व स्त्रियाः

1930 पासून गांधीजींनी ज्या चळवळी उभारल्या उदा. सविनय कायदेभंगाची चळवळ, असहकार इत्यादी या चळवळमध्ये मोठया प्रमाणात महिलांनी सहभाग घेतला. गांधीजींच्या मते, गरोदरपण व बाळंतपण या दोन प्रकियांमधून जाणाऱ्या स्त्रिया जास्त चांगल्या प्रकारे शांती आणि अहिंसेचा प्रचार करू शकतात कारण त्यांच्या मध्ये सर्व प्रकारच्या तिव्र वेदना सहन करण्याची उपजत ताकद असते.

राष्ट्रिय चळवळीत स्त्रियांकडे घराचे अस्तीत्व टिकविण्याच्या दृष्टिने पाहिले गेले. 1920 च्या सुमारास स्त्री चळवळीत स्त्रियांच्या श्रमाचे नविन भान निर्माण झाले, पण राष्ट्रीय चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांच्या श्रमाकडे दुर्लक्ष करण्यात आले. राष्ट्रिय चळवळीतमध्ये जेव्हा स्त्रियांच्या रोजगाराचा प्रष्न चर्चेला आला तेव्हा स्त्रियांचे श्रम पुरूषांच्या श्रमाच्या तुलनेने दुय्यम धरले गेले. याच काळाध्ये स्त्रियांचा कामगार चळवळीतील सहभाग लक्षनिय रित्या वाढत होता. 1928 – 29 च्या मुंबई गिरणी कामगार संपात स्त्रियांचा मोठया संख्येने सहभाग होता. भारतात 1930 नंतर कम्युनि''टांनी स्त्री प्रष्नासंदर्भात भुमिका घ्यायला सुरूवात केली. मणीबेन कारा, उषाताई अंगे, पार्वती भोर, संतोषीकुमार देवी व प्रभावती देवी या स्त्रियांनी कामगारांचे प्रतिनिधी म्हणून कार्य केले. गोदावरी परूळेकर व श्रीमती भालेराव यांनी Servants of Indian Society च्या महिला विभागाची स्थापणा केली आणि स्त्री कामगारांच्या समस्यांवर मोठे काम केले.

कम्युनिष्टांच्या चळवळी आणि स्त्रियाः

डाव्या चळवळीतील विचारवंत मंडळी कार्यव्यवस्थेला शोषणाचे मुळ मानतात. वर्गव्यवस्थेच्या जाणीवेकडे वृंदा करात सकारात्मक दृष्टिने पाहतात. त्यांच्या मते, भारतातील स्त्री चळवळीत सुरूवातीपासून स्त्रियांच्या दुय्यमत्वाच्या व्यापक आर्थिक, सामाजिक संदर्भ आणि राज्यसंस्थेला धोरणाषी असलेल्या संबंधाचे भान होते.

कनक मुखर्जीच्या मते 1930 च्या सुमारास गांधीजींची राष्ट्रीय चळवळ, साम्यवादी चळवळ आणि क्रांतीज्योती चळवळ या सर्वांचे अंतिमउदिष्ट ब्रिटिष राजवटीला उलथवून टाकणे हेच असल्यामुळे भुमिका आणि हितसंबंधाचा संघर्ष नव्हता पुढे कांग्रेसच्या ब्रिटिषांसंबंधी मवाळ व अस्थिर धोरणांमुळे अनेक स्त्रियांचा अपेक्षा भंग झाला व त्या कम्युनिष्ट चळवळींकडे वळल्या. अहिल्या रांगणेकर, कणक मुखर्जी, इला भट्टाचार्य, विमल रणदिवे यासारख्या अनेक स्त्रिया कॉग्रेसमधून साम्यवादी विचारसरणीकडे वळल्या व त्यांनी अनेक आंदोलनामध्ये सहभाग घेतला. मग ते आंदोलन कामगारांचे वा आदिवासींचे असो की भूमिहिनांचे असो यासाठी त्यांना तुरूंगवासात जावे लागले, अपार हाल अपेष्टा सोसाव्या लागल्या. 1970 च्या दषकामध्ये सुरू झालेल्या अनेक जणआंदोलनामध्ये याच चळवळीतील स्त्रियांचा मोठया प्रमाणात सहभाग होता.

'ब्रेकिंग बॅरिअर्स' (बंधने झुगारतांना) या पार्वती मेनन यांनी लिहीलेल्या पुस्तकात डाव्या विचार सरणीच्या, शोषीतांच्या विकासासाठी आयु''यभर झटलेल्या व AIDWAC (All India Democratic Women's Association) च्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतलेल्या बारा स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. या पुस्तकात समाजवादी परिवर्तनाच्या दिषेने स्त्रियांच्या मुक्तीसाठी चळवळ उभारलेल्या स्त्रियांच्या योगदानावर प्रभाव पडतो.

विमल रणदिवे आणि अहिल्या रांगणेकर या दोषी 1943 मध्ये श्रमिक स्त्रियांच्या प्रष्नावर काम करण्यासाठी स्थापन झालेल्या परळ महिला संघाच्या सभासद कार्यकर्त्या होत्या. सुषिला गोपालन या केरळ संघाच्या संस्थापक सदस्य होत्या. मल्लू स्वराज्यम यांचा आंध्रप्रदेष महिला संघाच्या स्थापनेत पुढाकार होता. या सामान्य स्त्रियांना आपआपल्या प्रांतातिल संघटन व कृतिकार्याच्या अनुभवाचा समृध्द वारसा AIDWA कामी आणला. अहिल्या रांगणेकर, कनक मुखर्जी, पापा उमानाथन अषा स्त्रियांनी अनेक आंदोलनामध्ये सहभागी होऊन विविध प्रष्नावर प्रकाष टाकला कित्येकदा तुरूंगवास भोगला. पोलीसांचे अत्याचार

सहन केले. इला भट्टाचार्यांनी आदिवासींसाठी अनेक आंदोलन केली त्यांचे संघटन घडवून आणले. सुषिला गोपालन यांनी काथ्या कामगारांसाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले. अनेक स्त्रियांनी **आंदोलनांमध्ये सहभागी होवून आपले प्राण पणाला लावले.**

**निष्कर्ष :**

वरील सर्व विष्लेषणावरून आपल्या असे निदर्षनास येते की, एक आदर्ष राष्ट्र निर्माण करण्यासाठी तसेच सर्वसमावेषक समतेवर आधारीत राष्ट्र उभे करण्याकरिता भारतातील स्त्रियांचे फार महत्वपुर्ण योगदान आहे. अगदी सुरूवातीला / स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये महिलांच्या प्रष्नावर जी संघटना उभी राहिली त्यांचे नेतृत्व जरी पुरूष वर्गाने केले असले तरी त्यामध्ये मोठया प्रमाणात स्त्रियांचा सहभाग होता. स्त्रियांच्या नेतृत्वामध्ये देखील अनेक आंदोलने करण्यात आली. कोणतेही राष्ट्र उभे करण्यासाठी समाजातील सर्व घटकांचा विचार करावा लागतो. परंतू जर समाजातील एका वर्गाकडे दुर्लक्ष होत असेल तर त्या राष्ट्राच्या विकासात अडथळे येत असतात आणि मग खऱ्या अर्थाने अषा वर्गात जाणिव जागृतीची गरज भासते ही जाणिव जागृती झाल्यानंतर अनेक प्रष्नांवर हा वर्ग उभा ठाकतो व वेगवेगळया संघटनांच्या माध्यमातून आंदोलने / चळवळी मध्ये असंख्य स्त्रियांचा सहभाग मिळत गेला व प्रस्तावित समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक सुधारणा घडत गेल्या व त्यामधुन राष्ट्राचा विकास साध्य होण्यास एक प्रकारे मदतच झाली. यासोबतच स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये देखिल स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनामध्ये मोठया प्रमाणात महिलांचा सहभाग होता. त्यामुळे स्वातंत्र्याच्या चळवळीलाही गती प्राप्त झाली. राजकिय व्यवस्थेमध्ये सुध्दा महिलांनी सहभाग घेवून एक समताधिष्टित राष्ट्र उभे करण्याकरीता सहकार्य केले. एकंदरीत कोणतेही राष्ट्र उभे करण्याकरिता महिलांचा सहभाग फार महत्वपुर्ण आहे, कारण रा"ट्राच्या लोकसंख्येत त्यांची संख्या पन्नास टक्के असते.

भारतामध्ये स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्यानंतर ज्या ज्या चळवळी उभ्या राहिल्या त्या प्रत्येक चळवळीमध्ये महिलांचे महत्वपुर्ण योगदान राहीलेले आहे. मग त्या चळवळी सुधारणात्मक, सुरक्षात्मक, सामाजिक, आर्थिक, राजकिय, आदिवासी, कामगार, दलीत, पर्यावरणात्मक ,पुर्णवसनात्मक, समताधि"ठत इत्यादी कुठल्याही स्वरूपाच्या असोत. काही चळवळीचे नेतृत्व पुरू"ांनी केले असले तरी महिलांचा मोठया प्रमाणात सहभाग होता तर काही चळवळीचे नेतृत्व स्वतः महिला करीत होत्या. चळवळी हया समाजाचा पर्यायाने देषाचा विकास साध्या करण्याच्या दृष्टिने महत्वपुर्ण असतात त्यामुळे राष्ट्रउभारणीमध्ये महिला व महिला चळवळींचे फार मोठे योगदान आहे.

**संदर्भग्रंथसुचीः**


- ✓ भागवत विद्युत (2004) 'स्त्रीप्रष्नाची वाटचाल' प्रतिमा प्रकाषन पुणे.
- ✓ मून मिनाक्षी आणि पवार उर्मिला (2000) 'आम्ही इतिहास घडवीला' सुगावा प्रकाषन पुणे.
- ✓ देव वि. रा. (2002) 'स्त्री चळवळीची वाटचाल' सुगावा प्रकाषन पुणे.
- ✓ गाडगीळ मालती (2002)'आगळे आंदोलने,वेगळे आंदोलक' सुगावा प्रकाषन पुणे.
- ✓ खडसे भा.की. (2003)'समाजषास्त्राची मुलतत्वे' हिमालया पब्लिषिंग हाउस मुंबई.
- ✓ देहाडराय स्वाती(2006)'लिंगभेदाचे राजकारण आणि जमातवाद' प्रतिमा प्रकाषन, पुणे.
- ✓ गांधी नंदिता व शहा नंदिता (1992) 'स्त्री संघर्षाची नवी रूपे' पॉप्युलर प्रकाषन पुणे..

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतातील शेतकऱ्यांच्या चळवळी

प्रा.डॉ. रावसाहेब शंकरराव ठोके
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य
महाविद्यालय खडकी,अकोला
मो. ९४२३८५१२५१

**सारांश :**

गेल्या दोन तीन वर्षापासुन भारतातील काही राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढलेले दिसते. महाराष्ट्रातील विर्दभ भागातील एखाद्या साथीच्या रोगासारखे आत्महत्येचे लोण पसरले आहे. याकरिता सरकारची चुकीची धोरणे हे एक महत्वाचे कारण असले तरी या वेतीरिक्त समाज रचनेत असेही काही विशेष बदल झाले आहे काय जे प्रत्येक्ष अप्रत्येक्ष रित्या या आत्महत्येकरिता उत्तरदायी आहेत. याचा विचार पण करावा लागेल व या संदर्भात शेतकरी चळवळीचे देखील काही दायीत्व आहे काय याचाही गंभीर पणे विचार करणे महत्वाचे ठरते. भारत हा शेतकऱ्यांचा देश आहे शेती अर्थ व्यवस्था भारतीय अर्थ व्यवस्थेचा कना आहे. वगैरे वाक्यप्रयोग इतकेंदा वापरुन झालेत कि, राज्य कर्तांना व इंतरांना देखील त्याचे फारसे काही वाटेनासे झाले आहे. स्वांतत्र्यांपुर्वी ब्रिटिशांची सत्ता असल्याने शेतकऱ्याच्या दुरावस्थेकरिता ब्रिटिश सरकार जबाबदार आहे असे म्हणुन आपण मोकळे होत होतो. परंतु आता स्वातंत्र मिळुन ७५ वर्ष पुर्ण झाली. तरी शेत व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत. आपल्या न्याय मागण्या पुर्ण होत नाहीत त्यांचा फारसा विचारही होत नाही. शेतमालास रास्त भाव मिळत नाही. असे शेतकरी वर्गास तिव्रतेने जानवत आहे. अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा एक घटक असुन देखील आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे. व विकासाच्या प्राध्यान्यक्रमांत ग्रामीण क्षेत्र व शेतीचा व्यवसाय शेवटच्या क्रमांवर आहे. याची शेतकरी वर्गास मोठी चिड आहे. व त्याच बरोबर त्यांच्या मनात विलगतेची भावना देखील दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्यांमधील आत्महत्येचे वाढते प्रमाण यांचेस निर्दशक आहे.
.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे देशाच्या एकुण लोकसंख्येत शेतीवर उपजीविका करणाऱ्या लोकांची संख्या इतर कोणत्याही व्यवसायातील लोकांच्या संख्येपेक्षा अधिक आहे. भारताच्या राज्यव्यवस्थेत शेती हे महत्वाचे क्षेत्र असुन शेतीक्षेत्रात घडणाऱ्या गोष्टींचा, बदलांचा परिणाम एकंदर अर्थव्यवस्थेवर होत असतो. स्वातंत्र्यापुर्वी ब्रिटिशांची सत्ता असल्यांने शेतकऱ्यांच्या दुरवस्थेसाठी ब्रिटिश शासन जबाबदार आहे असे आपण म्हणतो. कारण ब्रिटिशांच्या जमीन महसुलविषयक, व्यापारविषयक व उद्योगविषयक धोरणांचा एकत्रित परिणाम शेतीच्या शोषणात झाला. असह्य व जाचक करव्यवस्था, अन्यायकारक व्यापाऱ्यांच्या शर्ती व उद्योगधंद्यांना मारक ठरणारी धोरणे यामुळे आपला देश दारिद्री झाला व शेती मागसलेली राहली परंतु आता स्वातंत्र मिळुन ७५ वर्ष ओलांडली असुनही शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटलेले नाही. आपल्या न्याय मागण्या पुर्ण होत नाहीत. त्याचा साधा विचारही होत नाही. शेत मालास योग्य भाव मिळत नाही. याची जाणिव शेतकरी वर्गाला तिव्रतेने होत आहे. शेती क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक असुन सुध्दा तो दुर्लक्षिला जात आहे. विकासाच्या प्राध्यान्य क्रमात ग्रामिण क्षेत्र व शेतीचा व्यवसाय अगदी खालच्या पातळीवर आहे त्यामुळे शेतकरी वर्गात मोठी चिड आहे. त्यातुनच त्यांच्या मनात विलगतेची भावना निर्माण होते. अलीकडे होत असलेले आत्महतेचे प्रमाण त्याचे निर्दशक आहे. शेतकरी चळवळीचा मागोवा घेतांना आणखी एक महत्वाची बाब म्हणजे स्वातंत्र्यांनतंर रस्ते विकास, दळनवळनाची व संदेश वहनांची साधने या झालेल्या वाढीमुळे शेतकऱ्यांचा ही नागरिक्षेत्राशी संपर्क वाढला. नागरी क्षेत्रातील जिवन पध्दती व श्रीमंतीचा झगमगाट पाहील्या वर स्वाभाविकच तो त्यांच्या व आपल्या जिवन पध्दतीची तुलना करु लागतो ०५ –१० एक्करांच्या शेतकरी असुन कारखान्यात काम करनाऱ्या कामगारा बरोबरीचे जिवन आपण जगु शकत नाही.

**महात्माफुल्यांची शेतकरी चळवळ :**

शेतकरी चळवळीचा ईतिहास पाहल्यास त्यांची वैचारीक पार्श्वभुमी सन १८८३ मध्ये महात्मा जोतीबा फुले यांनी घेतलेल्या कार्यात आढळते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा व त्यांचा खदखदत्या असंतोषाला उत्तरदायी असनाऱ्या कारणांचा

शोध घेतांना महात्माफुलंच्या विचारांचा आढावा घेतल्या शिवाय समोर जाणे शक्य नाही. शेतकऱ्यांचा असुड या त्यांच्या ग्रंथांत त्यांच्या चिंतनशिल व दृष्ट्या विचारांचा अनुभव येतो. त्यांत शेतकऱ्यांची आर्थिक अवनंती सावकार, जमिनदान यांच्या कडुन होणारी पिडवणुक व अमानुष शोषण याचे वास्तविक चित्रन रेखाटले आहे. यांनी वापरलेल्या शुद्र हा शब्ध वर्ण व जाती वाचक असल्याचे दिसुन येत नाही कारण देशातील ८० टक्के जनता शेती व्यवसायावर अवंलंबुन असुन त्यांची अवस्था दैंनीय आहे. त्यात केवळ शेतकरी व शेतमजुराचाच अंर्तभाव नाही तर शेतीशी निघडीत बल्लुतेदार, कारागिर व स्त्रिया या सर्वांचा आंर्तभाव महात्माफुलेंच्या शुद्र या संकल्पनेत दिसुन येतो. इंग्रजानी येथे शिक्षणाची सुरवात केली त्याच बरोबर आपल्या सोईची प्रशासन व्यवस्था उभारली नवे प्रशासन आले. न्याय व्यवस्था आली रयतवारी सारख्या जमीनीच्या नविन पध्दती आल्या नविन शेतसारा पध्दती आल्या १८७० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने जमीनी वरील कराची वसुली करण्यासाठी जमीनीची लिलाव पध्दती सुरु केली. बंगाल बिहारमधील सरकारी अधिकारी, व्यापारी हे जमीन मालक बनले या नविन जमीन मालकांनी जमीनीचे भाडे वाढविले. हे नविन भाडे मिळविण्यासाठी जमीन कसणाऱ्यांची हाकालपट्टी केली. १८५७ चा उठाव म्हणजेच ब्रिटिंश अधिकारी आणि सावकार यांच्या कराचा एक भाग होतो.

**न्या.मुर्तीरानडे यांची सार्वजनिक सभा :**

१९ व्या शतकात शेतकऱ्यांच्या समस्यांचे विश्लेषण करणारे दोन दृष्टीकोन दिसुन येतात. प्रथम म्हणजे महात्माफुल्यांची शोषणावर आधिरीत समाज व्यवस्था शेतकऱ्यांच्या समस्यांकरिता कारणीभुत असल्याच्या अनुशंगाने केलेले विवचन आधि दुसरे म्हणजे न्या.मुर्ती रानड्यांनी स्थापन केलेल्या सार्वजनिक सभेने शेती मध्ये भांडवली सुधारणा व आपत्ती प्रंसंगी सरकार कडुन शेतकऱ्यांना सरंक्षणात्मक साहय्यता या मिळावी यावर भर दिला आहे. १८७७ मध्ये मुबंई परिसरात घडलेला भयंकर दृष्काळ व शेतकऱ्यां संदर्भात सरकारची भुमिका यावर न्या.मुर्ती रानडेनी कठोर टिका केली होती. जमीनदारांचा जुलुम आणि ब्रिटिशांचा जुलमी शेतसारा यामुळे शेतकरी अगतीक झाला होता वाढत्या शेतसारासोबत आर्थिक मंदी व दृष्काळांचे सावट शेतकऱ्यांसमोर उभे होते. यावर टिका करतांना रानडे म्हणतात. मुळात दोन वेळच्या खाण्याची  तादात असनारा शेतकरी शेतसारा भरणार कोठुन व त्यातही सरकारचे तो जबरीने वसुन करायचे म्हटले तर ते अन्याय कारकच आहे. समोर जावुन ते म्हणतात कि, शेतसारा म्हणजे नुस्ता जमीनीवरचा खंड नाही तर शेतकऱ्यांची मजुरी व नफ्यावर तो कर आहे. या देशात खरा जमीनदार सरकार आहे. बाकी सर्व बटईदार आहेत. भारत बंगाल व मद्रास प्रांतातील दृष्काळाची नोंद रानडे घेतात पुर्वी १०–१५ वर्षांनी कधी तरी दृष्काळ पडायचा पण आता तर दर २ – ३ वर्षांनी दृष्काळाची परिस्थिती निर्माण होते.  त्यामुळे शेतकरी मोडकळीस आला आहे. शेतकऱ्यांची क्रय शक्ती दिवसेंदिवस कमी होत आहे. व त्यासाठी सरकारी धोरनच कारणी भुत आहे. सन १८५५ मध्ये संथालांनी सावकारा विरोध्दी केलेला उठाव १८७५ मध्ये दक्षीणेत झालेली सावकांराविरोधी दंगल याच काळाच बंगालमधील कुळ्यांनी जमीनदारा विरोधी फुकलेले रण शिंगर व पंबाज मधील शेतकऱ्यांनी सावकांराविराधी थोपटलेले दंड इत्यादी उदा. दर्शवितात. कि, भारतातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष खदखदत आहे.

**समुहीक उठाव :**

सामुहीक उठाव हे शेतकऱ्यांच्या चळवळीतील महत्वाचे ठरतात या उठावा मागची शक्ती व नैतृत्व शेतकऱ्यांचेच होते. या उठावांना धार्मीक उठावा प्रमाने काही विचार प्रणाली अथवा चमतकारी नैतृत्व न्हवते. तर त्यांचे स्वरुप आकस्मित व नाट्य पुर्ण होते. त्यांचे उदीष्ट प्रामुख्याने काही विशिष्ट गाऱ्हांनी दुर करणारे हे होते. बहुतेक उठाव हे प्रथम शांतता पुर्ण सामुहीक बही  कारांच्या स्वरुपांचे होते. मात्र अत्याचारांच्या मार्गानी दडपण्यांचा प्रयत्न झाल्यावर  प्रत्युत्तर म्हणुन सशस्त्र प्रतिकारही झाल्याचे दिसुन येते त्यातील काही महत्वपुर्ण ठराव पुढील प्रमाणे आहेत. १. १७८९ मधील विष्णुपुर व विरभुममधील शेतकरी व दरोडेखोरांचे बंड २. १८०९ मधील हरियाणातील जाट शेतकऱ्यांचा उठाव ३. १८५२ मधल खांनदेश मधील शेतकऱ्यांचा उठाव ४. १८७० मधील बंगालमधील संथालांचा उठाव ५. १८७५ मधील दख्खनचे दंगे या उठावांचा प्रभाव लाखो लोकांवर पडला या बंडामध्ये लहान शेतकरी आणि खंडाने जमीन करणारे  ोतकरी प्रामुख्याने सहभागी झाले होते. ब्रिटिशांच्या धोरणामुळे होणाऱ्या आर्थिक पिळवणुकी विरोध या उठावाव्दारे शेतकऱ्यांनी आपला आवाज उठवला होतो. या उठावामागचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे जमीनदार व सावकाराकडुन होणारी पिडवणुक होय.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

**महाराष्ट्रातील काही उठाव :**

भारतात ब्रिटिश राजवट आल्यावर ज्याप्रमाणे पेशव्यांचे राज्य गेले त्याप्रमाणे आदिवासी राजाची राज्यही गेले त्यात सर्वांचा असंतोषाची प्रक्रिया ब्रिटिशविरोधी सशस्त्र उठावात झाली ते उठाव पुढील प्रमाणे होते.१. कोळी व रामोशी यांचा उठाव : सन १८२६ मध्ये पुणे जिल्ह्यात दक्षिण भारतात विर उमाजी नाईक यांच्या नैतृत्वाखाली रामोश्यांचे बंड झाले त्यांच्या परक्रमामुळे उमाजी नाईक हे लोकप्रिय झाले होते १८३७ मध्ये उमाजी नाईक ब्रिटिशांनी पकडल्यावर हे बंड थंडावले रामोश्यांचा पाठोपाठ १८३० मध्ये व १८३९ ते ४० या काळात कोळ्यांनी बंड केला. भाउ खेर, चिमणाजी जाधव व नामा दरबारे या एकेकाळच्या पेशव्यांच्या चाकरांचा या बंडात पुढाकार होता मात्र स्थानिक लोकांचा या बंडाला पाठींबा नन्हता. ब्रिटिशांनी हे बंड मोडुन काढले.

**महात्मागांधी यांच्या नेतृत्वातील शेतकरी चळवळ :**

सन १९२० मध्ये महात्मा गांधींनी सुरु केलेल्या राष्टीय चळवळीने भारतीय खेडी व शेतकरी यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधल्या गेले व महात्मा गांधींच्या राष्ट्रवादी चळवळीला प्रथंड व्यापक स्वरुप प्राप्त झाले. पुर्वीच्या नुतृत्वामध्ये व म. गांधीजींमध्ये असा मुलभूत फरक होता कि, अगदोरचे नेते प्रामुख्याने मध्यमवर्गीयांना डोळ्यांसमोर ठेवुन लढे करीत होते.टिळकांसारख्या जहाल नेत्यानेसुध्दा शेतकरी वर्गाच्या आंदोलनात्मक ताकदी कडे म्हणावे तितके लक्ष पुरविले नव्हते. ग्रामीण भागातील जनतेचे विशेष करुन शेतकरी वर्गाची ताकद महात्मा गांधींनी ओळखली होती. खरा भारत हा ग्रामीण भागात आहे. हे ओळखुन शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे विशेष रस घेवुन केवळ त्यांचे असे काही लढे लढवीले कि ज्यामुळे फार मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्टीय चळवळीच्या प्रमुख प्रवाहात सामिल झाला कांग्रस जो प्रर्यंन्त ग्रामीण जनतेच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नात लक्ष घालीत नाही. त्या प्रयन्त स्वंतत्र चळवळीस सामान्य जनतेचा पाठींबा मिळणार नाही. हे गांधीजींनी हेरले होते. कांग्रेसच्या आर्थिक धोरणात ग्रामीण जनता व शेतकरी केंद्रभागी असावा असा त्यांचा आग्रह होता. खेडे हे विकासाचे केंदे बिंदु असावे हे त्याना प्रमाणिक पणे वाटत होते व तसा त्यांचा प्रयत्न सुध्दा होतो. गांधींजीच्या नेत्त्वाखाली झालेले चम्पारण्य खेडा सत्याग्रह तसेच बारडोली सत्याग्रह महत्वाचे ठरले. शेतकऱ्यांच्या चळवळीला या सत्याग्रहाने दिशा मिळाली.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकरी चळवळी :**

आज आपल्या कडे कतीही औद्योगिक विकास झाला आणि वैश्विक खेडे निर्माण करण्याच्या जागतिकी करणाच्या विचारांचा जल्लोष सर्व स्तरांवरुन होत असला तरीही भारत अजुनही कृषीप्रधान आहे. व उपेक्षित वर्ग मोठ्या प्रमाणात शेतीवरच अंवलंबुन आहे हे वास्तव नाकारता येत नाही. जाने रात्रंदिवस शेतात कष्ट उपसावे व उत्पादन काढावे त्या शेतकऱ्यांच्या जिवनात येवढा अंधार का निर्माण झाला पुर्वी सावकार शेतकऱ्याला कर्ज देत असे आत कायद्याने नियंत्रीत केलेल्या यंत्रणा कर्ज देतात. परंतु कर्जाच्या ओजाखालुन अजुनही त्यांची सुटका झाली नाही. निसर्गाचा कोप लहरी पाउस त्यातुनच उत्पादन कमी त्यामुळे त्यांच्या मुलभुत गरजा भागवितांना होणारी दमशाट व त्यांतुनच होणारी कर्ज फेड या चर्कव्युव्हामध्ये शेतकऱ्याला जिवन नकोसे होवुन ते जिवन संपविण्याचा टोकाचा विचार करित आहेत. विर्दभातील शेतकरी आत्महत्या हे त्याचे चांगले उदा. आहे. सन १८५७ ते १९२१ या काळात शेतकरी चळवळींचा प्रारंभ झाला स्वंतत्र पुर्व काळात काही शेतकऱ्यांनी एकत्र येवुन शोषणाच्या प्रश्नावर लढा देण्याचा प्रयन्त केला. जमीन दाराच्या जुलुम व ब्रिटिशांचा जुलमीशेतसारा यामुळे शेतकरी हा अगतीक झाला. शेतकऱ्यांनी त्याविरुध्द उत्सुर्त व असंघटीत पणे आवाज उठविला शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी व त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्यांनी १९३५ मध्ये अखिलभारतीय किसान सभा स्थापन केली. या सभेने विविध प्रांतात जमीनदारांच्या जुलुमाविरुध्द लढे देवुन देशाचे लक्ष वेदले होते.

**संदर्भ :**

१. कोलाज आर्थिक विकास व सामाजिक चळवळी डॉ. प्रकाश सदाशिवराव बोबडे
२. सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र प्रा.बि.एम.कराळे
३. भारतातील सामाजिक आंदोलने प्रा. सौ.सुनंदा भद्रशेटे, प्रा.बी.बी.शेख, प्रा. बाबासाहेब भालेराव

# राष्ट्र उभारणीमध्ये पंचायत राज व्यवस्थेच्या योगदानाचे समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा.डॉ. अनिल के. ठाकरे**
भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश कला महाविद्यालय,
पिंजर, ता.जि. अकोला

**प्रस्तावना :**

भारतासारख्या व्यापक क्षेत्रफळ असणाऱ्या आणि खंडप्रय देशात मध्यवर्ती शासनाकडून अर्थात केद्र शासनाकडून देशाचा आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न करतांना अनेक प्रकारच्या अडचणी येतात. म्हणूनच सत्तेचे विकेंद्रीकरण करून गाव,पंचायत आणि जिल्हा पातळीवरून लोकांना सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि शासकीय कार्यांमध्ये समाविष्ट करून घेण्याच्या उद्देशाने भारतात पंचायत राज व्यवस्था कार्यन्वीत करण्यात आली. राष्ट्रउभारणीकरिता पश्चिमी धोरणानुसार भारताचा आर्थिक विकास करण्याचा विचार तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू प्रभावीपणे मांडला. राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेला १९५२ मध्ये प्रथम पंचवार्षीक योजनेचा शुभारंभ झाला आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामान्य जनतेला जोडण्याच्या समस्येकडे लक्ष दिले. पंडीत नेहरू यांनी राष्ट्रउभारणी करिता अत्यंत आवश्यक असलेल्या अमेरिकेतील गटविकास पद्धतीचे अनुकरण करतांना भारताला गटात विभागले. भारताच्या सर्वागिण विकासामध्ये सर्वस्तरातील लोकांना प्राधान्य देवून स्थानीक समस्या स्थानीक लोकांकडून जाणून त्यांचे निरासरण स्थानीक पातळीवर शासनाच्या मदतीने सोडविण्याचा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने भारतात सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी १९५७ मध्ये बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आणि या समितीने आपला अहवाल सादर करतांना लोकशाही विकेंद्रीकरणाची शिफारस केली. या समितीनुसार गाव, गट आणि जिल्हा स्तरावर निवडलेल्या प्रतिनिधींना विकासाची आणि नियोजनाची कार्य सोपावित. अशा प्रकारे तीन स्तरामध्ये ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची निर्मीती करून स्थानीक लोकांना आपले शासन सांभळण्याची सोपविण्यावर या समीतिने भर दिलेला दिसून येतो. १९५८ मध्ये राष्ट्रिय विकास परिषदेने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींचा स्विकार केला आणि सर्व राज्यांना अंबलबजावणी करण्याचे आदेश दिले. सर्वागिण स्तरातून राष्ट्रउभारणीच्या प्रक्रीयेतील मैलाचा दगड म्हणून पंचायत राज व्यवस्थेचा उल्लेख केल्यास वावगे ठरणार नाही. २ ऑक्टोबर १९५९ मध्ये सर्वप्रथम राजस्थानमध्ये या योजनेचा शुभारंभ करण्यात आला व संपूर्ण पंचायत राज व्यवस्था स्विकारणारे पहीले राज्य होण्याचा मान राजस्थानला आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विकास साध्य करण्याच्या दृष्टिने राजकीय नेतृत्व प्राप्त करणे, शेतीचा विकास करणे, पशुपालनाच्या व्यवसायामध्ये अमुलाग्र बदल करणे, आरोग्य आणि ग्रामसफाई, शिक्षण व समाजशिक्षण, संचार साधने, सहकारच्या क्षेत्राचा विकास करणे, लघु उद्योग आणि कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे, मागास वर्गाचा विकास करणे व आवासीय योजना प्रभावीपणे राबविण्याचे कार्य करण्यात येतात. यासर्वांचा प्रभाव राष्ट्रउभारणीमध्ये अत्यंत उपयोगी पडल्याचे दिसून येते. आणि म्हणूनच भौगोलिक व्यपकता आणि सामाजिक व सांस्कृतिक विविधता असूनही भारताचा सर्वागिण विकास पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून व्रिव गतीने होत असल्याचे दिसून येते.

अशा पद्धतीने देशाचा सर्वागिण विकास करतांना राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली प्राथमिक आणि स्थानीक पातळीवर विकास करण्याचे मार्ग पंचायत राजव्यवस्थेच्या माध्यमातून करण्यात येतात.

**शोध निबंधाचे उद्देश :**

सामाजिक समस्यांचे अध्ययन करित असतांना तथ्यसंकलनामध्ये वस्तुनि ठता असणे व तथ्यांमध्ये सुसंगता असणे अत्यंत आवश्यक आहे. तथ्यांमध्ये वास्तविकता आणण्यासाठी शोध कार्याचे उद्देश निश्चित करून त्यानुसार शोध कार्य करणे व समस्यांच्या वास्तविकतेचा शोध घेण्यास साहाय्य प्राप्त होते. प्रस्तूत शोध निबंधाचे प्रमुख उद्देश पुढील प्रमाणे ............

१) पंचायत राज व्यवस्थेचा अर्थ जाणून घेणे.

२) पंचायत राज व्यवस्थेची संरचना स्पष्ट करणे.
३) राष्ट्रउभारणीमध्ये पंचायत राज व्यवस्थेचे योगदान स्पष्ट करणे.
४) पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून झालेल्या राष्ट्रउभारणीचे वि  लेशण करणे.
५) राष्ट्रउभारणीमध्ये पंचायत राज मधील उपक्रमांचा आढावा घेणे.
६) पंचायत राज व्यवस्थेला प्रभावी करण्यासाठी उपययोजना स्पष्ट करणे.

**अध्ययन पद्धती :**

शास्त्रीय पद्धतीनुसार अध्ययन करित असतांना वस्तुनिष्ठ तथ्य संकलनाला अत्यंत महत्व आहे. सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये अनुभवजन्य तथ्य संकलनाच्या आधारावर निर्माण सिद्धांतांना सत्य समजण्यात येते व अशाच सिद्धांताचा समावेश शास्त्राच्या विकासामध्ये करण्यात येतो म्हणून कोणत्याही समस्येसंदर्भात अध्ययन करतांना तथ्यांना फार महत्व आहे. सामाजिक संशोधनामध्ये तथ्यांना महत्व असून प्रसिद्ध विचारवंत गुड आणि हॅट यांच्या मते ‘‘तथ्य एक अनुभव सिद्ध सत्यापनीय निरीक्षण आहे.’’[१] अर्थात आपल्या ज्ञानेंद्रीयांच्या माध्यमातून समस्ये संदर्भात जे ज्ञान प्राप्त होते त्यास आपण तथ्य म्हणू शकतो. म्हणूनच ज्या माहीतीची सत्यता सर्वाकडून स्वीकारली जाते त्यास आपण तथ्य म्हणतो. शोध कार्य करित असतांना प्राथमिक आणि दुय्यम तथ्य संकलनाच्या माध्यमातून तथ्य संकलित करण्यात येतात. प्रस्तूत शोध निबंधामध्ये दुय्यम तथ्यं संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला. दुय्यम तथ्य संकलनासंदर्भात लुंडबर्ग असे म्हणतात की, ‘‘प्रस्तावित संशोधनाची सुरवात करण्यापूर्वी त्या संबंधित सर्व प्रलेखीय स्त्रोतांचे नेहमीच सावधगिरीपूर्वक सर्वेक्षण केले पाहीजे.’’[२] प्रस्तूत शोध निबंधामध्ये दैनदिनी, पत्रे, आत्मचरित्र, पुस्तके, सांख्यकिय माहीती, प्रकाशित आणि अप्रकाशित दस्तावेज,वर्तमान पत्रे आदींचा तथ्य संकलामध्ये वापर करण्यात आला असून शोध कार्यामध्ये वस्तुनिष्ठता ठेवण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात आला आहे.

**पंचायत राज व्यवस्था आणि राष्ट्रउभारणी :**

भारत हा खेडयांचा देश आहे आणि आजही जवळपास ६५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहून आपला उदरनिर्वाह करतो. शेती आणि शेतीशी संबंधीत व्यवसायावर आपल्या जीवनाच्या गरजांना पूर्ण करण्याचा प्रयत्न ग्रामीण भारतात आजही होत आहेत. शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांना जनसामान्य पर्यत पोहचवून प्रभावीपणे राबविण्यासाठी १९५९ पासून पंचायत राज व्यवस्था भारतामध्ये राबविण्यात आली. भारताच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या ग्रामीण लोकांना आपला विकास करून घेण्यासाठी पंचायत राज एक सक्षम पर्याय असल्याचे निदर्शनास येते. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून राजकिय, सामाजिक, आर्थिक, सामुदायीक, व्यवसायीक, कृषी विषयक अशा सर्वागिण विकासाच्या वाटा उपलब्ध करून दिल्या आहेत. पंचायत राज व्यवस्थेच्या निर्मिती पासून राष्ट्रउभारणीचा आलेख वर्षागणीक वृद्धिंगत होत असल्याचे निदर्शनास येते. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून राष्ट्रउभारणीमधील सर्वागिण विकासाच्या विभिन्न पैलु पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) पंचायत राज आणि कृषी विकास :**

भारत हा कृषी प्रधान देष असल्यामुळे भारताच्या विकासाची गती ग्रामीण विकासाशिवाय शक्य नसल्याची जाणीव राजकीय नेत्यांना होती आणि म्हणूनच त्यांनी पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून कृषी व्यवसाय विकसीत करणारे उपक्रम राबविण्याकडे भर दिलेला दिसून येतो. तिसऱ्या पंचवार्षीक योजनेत धनधान्य स्वयंपूर्णत: आणि उद्योग विकासावर भर देण्यात आला असून २०.४ टक्के खर्च कृषी विकासावर करण्यात आला होता. पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून देशाच्या सर्वागिण कृषी विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी सिंचन व्यवस्था, किटक नाशक पुरवठा, शेतीची उपकरणे आणि खतांच्या पुरवठ्यमध्ये वाढ करून कृषी विकासाचे सर्वस्वी प्रयत्न करण्यात आले असल्याचे निदर्शनास येते.

**२) पंचायत राज आणि राष्ट्रउभारणीमध्ये लघुव्यवसायाचा विकास :**

राष्ट्रउभारणीमध्ये लघु व्यवसायांना विकसित करण्यासाठी स्थानिक पातळीवरील लोकांच्या सहभागातून लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी तिनही स्तरावर विविध प्रकारच्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत. यामध्ये पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, मत्स्योद्योग, अन्नधान्य प्रक्रिया उद्योग इत्यादी उद्योगांना विकसीत करण्याचे कार्य करण्यात आले. सर्व सतरातून आर्थिक विकासामध्ये योगदान प्राप्त करण्याच्या उद्देशांना पूर्ण करण्याचा हेतू पंचायतराज व्यवस्थेचा असल्याचे दिसून येते.

**३) पंचायत राज आणि आरोग्याचा विकास :**

पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून आरोग्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा यथोचित प्रयत्न करण्यात आलेला आहे व या हेतूने ग्रामसफाई, पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था, सांडपसण्याची व्यवस्था आणि प्रथोमपचार केंद्रांची निर्मिती करून रोग प्रतिबंधक उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. कुटुंब नियोजनासंदर्भातही स्थानिक लोकांच्या सहभागातून भरीव कार्य पंचायतराज व्यवस्थेमध्ये करण्यात आलेले दिसून येतात. पंचायत राज व्यवस्थेमध्ये राबविण्यात आलेल्या आरोग्य विकासाच्या योजनामुळे राष्ट्रउभारणीचा उद्देश सफल होण्यासाठी मोलाची मदत झाली. म्हणूनच राष्ट्रउभारणीच्या दृष्टिने पंचायत राज व्यवस्था अत्यंत महत्वपूर्ण आहे.

**४) पंचायत राज आणि शिक्षण :**

भारतीय समाजाला समस्यामुक्त करण्याच्या हेतूने शासनाने महत्वाचे निर्णय घेतांना दुर्गमअतिदुर्गम भागामध्ये शिक्षणाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी विविध योजना राबविलेल्या आपणास पाहावयास मिळतात. ग्रामीण भागात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या सोयी व तांत्रीक शिक्षणाच्या सुविधा राबविण्यात आल्या असून व्यवसाय शिक्षणाच्या सुविधाकरण्यावर भर देण्यात आला आहे. शिक्षणाच्या सुविधांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला विकासाच्या प्रवाहाशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आले आहे. त्याचा परिणाम ग्रामीण भागातून मोठ्य प्रमाणात विकासामध्ये योगदान देणाऱ्या लोकांची उपलब्धता झाली. देशाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी गाव तेथे शाळा अशा योजनांची अंबलबजावणी करण्यावर शासनाने भर दिला आहे व त्याचे परिणाम शिक्षाच्या स्तरामध्ये झालेल्या वृद्धिवरून दिसून येतात.

**५) पंचायत राज आणि राजकीय परिवर्तन :**

पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून भारतामध्ये मोठ्य प्रमाणात राजकीय परिवर्तन घडून आल्याचे आपणास पाहावयास मिळते त्यामध्ये परंपरागत नेतृत्वाची जागा सामान्य लोकांनी प्राप्त करून जनमाणसांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक भागातील समस्या शासना समोर आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सर्व स्तरातील आणि जातीगटातील लोकांना नेतृत्वाची संधी प्राप्त झाल्यामुळे सामाजिक दरी कमी करण्याकरिता व सामाजिक कल्याण साधण्याच्या हेतूने कार्य करण्याकरिता पंचायतराज महत्वाचे कार्य करत असून त्याचा परिणाम राष्ट्रिय पातळीवरील राजकीय परिस्थितीवर झालेले दिसून येतात. परंपरागत राजकिय नेतृत्वामध्ये बदल करण्यासाठी पंचायतराज व्यवस्था प्रभावी माध्यम ठरले. देशातील प्रत्येक भागातील महिलांना राजकीय क्षेत्रात सहभागी करून घेण्याच्या व स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडण्याच्या हेतुने पंचायतराज व्यवस्थेने प्रभावी कार्य केल्याचे दिसून येते. स्त्रीयांचा सर्व क्षेत्रातील सहभाग राष्ट्राच्या उभरणीसाठी अत्यंत आवश्यक आहे. याची जाणिव महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडीत नेहरू यांना होती व त्यांना अपेक्षित असणारा विकसीत भारतीय समाज निर्माण करण्याचे कार्य पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात झाले असून आधुनिक काळात सामान्य लोकांना सत्तेत सहभागी करून त्यांच्या कडून समस्या कमी करण्याचे प्रयत्न करून घेण्याच्या उद्देशांची पूर्तता काही अंशी झालेली दिसून येते.

निष्कर्ष :

१) सत्तेचे विकेंद्रीकरण करून सामान्य लोकांना आपले प्रश्न सोडविण्यासाठी पंचायतराज व्यवस्था प्रभावी साधन आहे.

२) पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून राष्ट्रउभारणी करतांना देशाचा सर्वागिण विकास होत आहे.

३) पंचायतराज व्यवस्था ग्रामीणव कृषी विकासाचे प्रभावी साधन असून राष्ट्रउभारणीचे प्रभावी माध्यम आहे.

४) पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून स्त्रिया राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग घेत असून त्याचा प्रभाव सामाजिक न्याय स्थापनेवर होतांना दिसून येत आहे.

५) पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून व्यवसायांना आणि व्यवसायीकांना नवसंजीवनी प्राप्त झालेली दिसून येते.

६) पंचायतराज व्यवस्था देशाच्या शिक्षणाचा स्तर उंचावणारी एक महत्वाचा कार्यप्रणाली ठरत असून राष्ट्रउभारणीमध्ये सिंहाचा वाटा उचलत आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) कन्हाडे बी.एम., भाास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, महाल नागपूर ४४००३२ पृ.क्र. १७२

२) तत्रैव, पृ.क्र. १८२

३) पाटील वा. भ.,पंचायतीराज्य, विद्याप्रकाशन नागपूर,

४) आगलावे प्रदिप, ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन–१ भगवाघर कॉम्लेक्स धरमपेठ नागपूर ४४००१०

५) हजारे अण्णा, माझे गाव माझे तिर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, राळेगण सिद्धी जि. अहमदनगर

६) ठोंबरे सतिश, ग्राम प्रशासन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद

७) भोळे भा. ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण

८) nagpur.nic.in/zpnagpur/Marathi/structure.

प्रा. अनिल के. ठाकरे

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत महात्मा गांधींच्या विचारांचे योगदान

**डॉ. अशिष जयराम मुठे**
**श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय,अकोला.**
ashishmutthe2900@gmail.com

**गोषवारा**

आज जगभरात गांधी विचारांची प्रासंगिकता या शीर्षकाखाली सातत्याने चर्चासत्रे, सभा व परिषदा इत्यादी आयोजित केली जातात. मार्टिन ल्युथर किंग ज्युनिअर महात्मा गांधी यांच्या विचारातून प्रेरित होऊन जगभर मानवाधिकारांची चळवळ व महत्त्व विशद करतात. कोफी अन्नान महात्मा गांधीजींच्या विचारांवर आधारित वाट धरून शांततेच्या नोबेल पारितोषिकाचा प्रवास पूर्ण करतात. नेल्सन मंडेला देखील त्याच वाटेला जाऊन आपला प्रवास पूर्ण करतात. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आपल्या शपथग्रहण सोहळ्यात गांधी विचारांच्या प्रासंगिकतेचे महत्त्व अधोरेखित करतात.आन-सान-सुकी ही एकटी महिला देशात लोकशाही आणण्यात यशस्वी होते, ती देखील स्वतःला गांधीवादी म्हणवुन घेते. वरील उदाहरणांवरून महात्मा गांधींच्या विचारांची वैश्विक स्थिती आणि दर्जा अधोरेखित होतो. भारतात आजही ही 'गांधी का मरत नाही' अशा शीर्षकाची दर्जेदार पुस्तके सुज्ञ वाचकांना भुरळ घालतात. कारण महात्मा गांधींचे विचार हे शाश्वत मूल्यांवर आधारित आहे. अत्यंत दुर्दैवाने आणि सुन्न मनाने एक जबाबदार वक्तव्य येथे नमूद करावे वाटते. ते म्हणजे, 'जगात सर्वात जास्त त्याच्याच देशात टीकेचा धनी होणारा राष्ट्रपिता म्हणजे महात्मा गांधी होय.' दुर्दैवाने भारतीय राजकारणाने महात्मा गांधींच्या विचारांचा किंवा प्रतिमेचा स्वार्थी पुरताच उपयोग केला.परंतु भारतातील राजकारण जरी आदर्श नसले तरी, येथील संविधान नक्कीच जगातील सर्वोत्तम आदर्श आहे . आणि या संविधानावर भारतीय स्वातंत्र्य लढ्याची म्हणजेच पर्यायाने महात्मा गांधींच्या सर्वस्पर्शी विचारांची सर्वाधिक छाप पडली आहे.

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्यप्राप्तीच्या संघर्षात महात्मा गांधींचे योगदान जगद्विख्यात आहे. प्रस्तुत शोधनिबंधात स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्र बांधणीच्या प्रक्रियेतील महात्मा गांधींच्या विचारांचे योगदान काय? या प्रश्नाचा मागोवा घेण्यात आला आहे. महात्मा गांधींच्या विचारांचा आवाका हा सर्वस्पर्शी स्वरूपाचा होता. सामाजिक,आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य आणि सबलीकरण, समृद्ध ग्राम (पंचायत राज ),पर्यावरण साध्य-साधनविवेक, नैतिकता, सामाजिक जीवनात सत्याचरण,राजकारणाचे धार्मिकीकरण (लोककल्याणाच्या जाणीवे साठी), सर्वधर्मसमभाव व यासम अनेक मानवी मूल्यांचा अंतर्भाव त्यांच्या विचारात व आचारात होता. "गांधींच्या आधी आधुनिक भारतातील कोणत्याही चिंतकाने त्यांच्या इतका सर्वस्पर्शी विचार केला होता असे दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण,

समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य,कायदा, शेती कोणतेही क्षेत्र असो वैयक्तिक आत्मशांती पासून विश्वशांती पर्यंत, गावापासून विश्वापर्यंत प्रचंड मोठा आवाका गांधी विचाराने व्यापला आहे.माणसाचा विचार करताना कोणतेही आयात तत्वज्ञान स्वीकारून त्यानुसार मानवी जीवनाचा अर्थ त्यांनी लावला नाही. तर माणसाची प्रगती अनेकानेक क्षेत्रांतील सुयोग्य प्रक्रियांवर अवलंबून असते त्यांच्या समग्र दृष्टीने मागोवा घेऊन त्या सर्व प्रक्रिया मानवांच्या सुखशांतीसाठी कशा परिणत होतील याचे सर्वस्पर्शी,सर्वलक्ष्यी व सर्वहितकारक विश्वमानव दर्शन देण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. त्यामुळेच जात, धर्म, पंथ, वर्ग,राष्ट्र इत्यादी भेदभाव मनात न आणता मानवाच्या भवितव्याबद्दल आस्था बाळगणारे सर्व विचारी मानव गांधींच्या विचारांमुळे प्रभावित झाले आहेत."[I] राष्ट्रबांधणी मध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारे जे घटक आहेत,ते सर्व महात्मा गांधी यांच्या उपरोक्त विचारांमध्ये समाविष्ट आहेत.

**सर्वधर्मसमभाव:**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असे बिरुद मिरवताना त्याचे श्रेय महात्मा गांधींच्या उदात्त विचारांना आपसूकच जाते.भारतासारख्या खंडप्राय देशात लोकशाहीचा प्रयोग सफल होणे हे केवळ आश्चर्यच नाही तर, अहो आश्चर्य आहे.येथे असलेली प्रचंड विभिन्नता ज्याप्रमाणे खंडप्राय भारत रुपी चित्राला विलोभनीय बनवते, त्याचप्रमाणे ती वास्तविक व्यवस्थेत समस्यादेखील निर्माण करते.विभिन्न धर्म, जाती, बोलीभाषा, खानपान पद्धती,रहन-सहन या सर्व वैविध्याला सामावून घेऊन त्यांना स्वातंत्र्य,अभिव्यक्ती, आणि संरक्षण आज या स्वतंत्र भारतात अबाधित रित्या मिळत आहे. या सर्व गोष्टींचा पाया महात्मा गांधींच्या विचारांनी रचला आणि त्या भक्कम अशा वैचारिक पायावर आज भारत रुपी उद्योन्मुख महासत्ता डौलाने उभी आहे.भारतासोबत स्वातंत्र्य झालेल्या अनेक राष्ट्रांची दुर्गती आपणासमोर आहे. धर्मा सारख्या प्रसन्न संकल्पनेने उग्र स्वरूप शेजारी राष्ट्रांमध्ये धारण केले आहे. तेच त्या देशांच्या अधोगतीचे कारण ठरले आहे व ठरत आहे. परंतु भारताच्या या राष्ट्रपित्याने या आगामी संकटांची चाहूल घेऊन आपल्या हयातीतच आपल्या राष्ट्राची वाटचाल सुकर करून ठेवली आहे.

**समृद्ध ग्राम ( पंचायत राज)**

सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास हा समाजातील अंतिम घटकाच्या उत्थानात समाविष्ट असतो.निश्चितच स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही भारताची अर्थव्यवस्था ही शेतीप्रधानच आहे. म्हणून खेड्यांची उपेक्षा करून चालणार नाही असे पुरोगामी विचार महात्मा गांधींनी तत्कालीन परिस्थितीतच मांडले. त्यांच्या याच विचारांच्या आधारावर घटनेतील भाग चार मधील मार्गदर्शक तत्वांतर्गत कलम 40 स्वीकारण्यात आले.पुढे 1992-93 मध्ये याच कलम 40 च्या आधारावर पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळवता आला(73 व 74 वी घटनादुरुस्ती). यामुळे राष्ट्रातील प्रत्येक एककाची भूमिका आणि योगदान राष्ट्रबांधणित

दिसून येत आहे. राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वावलंबन ग्रामीण जनतेत पंचायत राज व्यवस्थेने निर्माण केले. याचे सर्व श्रेय महात्मा गांधींच्या संबंधित विचारांनाच द्यावे लागेल.

"गांधींच्या स्वराज्याचा मध्यबिंदू शहरी मध्यमवर्गीय भारतीय नसून ग्रामीण शेतकरी शेतमजूर होता. ग्रामीण जीवनाचा एकजिनसीपणा आणि पायाभूत महत्त्व स्वराज्यात टिकून राहिले पाहिजे. इंग्रजी राजवटीत खेडीपाडी उद्ध्वस्त झाली, ग्रामीण कारागीर बेकार झाले, त्यांना खेड्यातून परागंदा व्हावे लागले याचे गांधींना सर्वात जास्त दुःख होते. ब्रिटिश भांडवलशाहीने येथे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले होते. 'खेड्याकडे चला' ही गांधीवादी चळवळीची मुख्य घोषणा होती. तिचा आशय कोणत्याही दृष्टीने प्रतिगामी व स्थितीवादी नव्हता. कालबाह्य झालेल्या ग्रामीण राजकीय अर्थव्यवस्थेचा जीर्णोद्धार त्यांना अभिप्रेत नव्हता. तर नव्या संदर्भात सुदृढ ग्रामीण राजकीय अर्थरचनाच या देशातील स्वतंत्र लोकशाहीला बळकट करू शकतील असा विश्वास त्यामागे होता."[२] निकोप लोकशाहीसाठी आणि त्यावर आधारित राष्ट्र बांधणीसाठी अर्थव्यवस्थेत आणि राजकारणात राष्ट्रातील सर्व एककांचा समावेश अत्यंतिक महत्त्वपूर्ण असतो. तो भारतामध्ये महात्मा गांधींच्या विचारांनी झाला.पाश्चिमात्य लोकशाही फक्त लोक नेतृत्वाचा म्हणजे लोकांना नेतृत्व मिळवून देण्यापुरताच विचार करते. गांधीप्रणीत ग्रामस्वराज्यावर आधारित लोकशाही मात्र लोककर्तृत्वाची कास धरते. लोकांची उपक्रमशीलता किंवा प्रवणता आणि निर्णय क्षमता यांना वाढ देणारी ग्रामीण प्रजासत्ताकाची व्यवस्था हीच खरी लोकशाही असते. कारण लोकांचे सहभागीत्व ही लोकशाहीची निर्णायक कसोटी असते असे गांधीवाद मानतो.

**भौतिक प्रगती आणि नैतिक अधोगती या समीकरणाचा विरोध.**

राष्ट्रबांधणीमध्ये राष्ट्रीय चरित्रांचा सर्वात मोठा वाटा असतो. राष्ट्रीय चरित्रांनी घालून दिलेल्या आदर्शावरच राष्ट्राची वाटचाल होत असते. महात्मा गांधींनी आपल्या विचारांमध्ये नैतिकतेला अनन्यसाधारण असे महत्त्व दिले. राजकीय भ्रष्टाचार आणि राजकीय गुन्हेगारी, वैचारिक मागासलेपण व पर्यायाने अधोगती या सर्व समस्यांचे मूळ नैतिक अधःपतन आहे असं महात्मा गांधी म्हणतात. महात्मा गांधींनी भौतिक प्रगतीला नाही तर आत्मिक प्रगतीला आपल्या विचारांमध्ये प्राधान्य दिले.भौतिक प्रगतीच्या आत्यंतिक हव्यासातूनच नैतिक अधोगती होते.या मतावर महात्मा गांधी अत्यंत ठाम होते. व याच आधारावर त्यांनी मार्क्सवादाचा देखील विरोध केला आहे. आज भारताला राजकीय भ्रष्टाचार व राजकीय गुन्हेगारीच्या समस्येने ग्रस्त केली आहे. परंतु या समस्यांमधून बाहेर निघण्याचा मार्ग देखील महात्मा गांधी यांच्या विचारांमध्ये आढळतो. 'द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाने आपल्या चौथ्या अहवालात शासनामध्ये नैतिकता या शीर्षकाखाली चे विचार मांडले ते गांधी विचारांवर आधारित आहे.'[३] गांधी विचारांची रुजवण ही राष्ट्रबांधीत निर्माण झालेल्या या समस्यांना समूळ नष्ट करू शकते. आज जगभर जे समीकरण प्रस्थापित झाले आहे ते म्हणजे, 'भौतिक प्रगती म्हणजे नैतिक अधोगती' हे होय. या विरुद्ध विचार मांडतांना महात्मा गांधी आत्मक्रांती, आत्मशांती सदाचार व नैतिकता या

मूल्यांना महत्त्व देतात. व या आधारावर शाश्वत विकास व्हावा अशी अपेक्षा करतात. स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधींनी दाखवलेल्या याच वाटेवर कुच करत असताना भारताने आपली वेगळी प्रतिमा आंतरराष्ट्रीय मंचावर निर्माण केली आहे. एक शांतताप्रिय देश आणि शांततेसाठी वेळप्रसंगी लढणारा देश म्हणजे भारत. या सर्व उपमांना लघुरूप म्हणून आंतरराष्ट्रीय मंचावर भारताची ओळख 'गांधीचा देश' म्हणून केली जाते हे उदाहरण पुरेसे आहे.

**सारांश**:

एकंदरीतच भारतीय संविधानावर आणि त्यावर आधारित आधुनिक भारताच्या जडणघडणीत महात्मा गांधींच्या विचारांचे अनन्यसाधारण योगदान आहे. 'गांधीचा देश' म्हणून भारताची ओळख असणे, हे त्याचे उदाहरण आहे. महात्मा गांधी यांच्या विचारांचे योगदान अधोरेखित करताना सर्वप्रथम त्यांनी त्यांच्या विचारांना आचरणात आणले व त्यामुळे गांधी वाद हे मात्र तत्त्वज्ञान न राहाता विचारसरणी बनले. ही बाब नमूद करावी वाटते. त्यांनी सत्यासाठी जो आग्रह धरला तोच आग्रह आज पुन्हा एकदा सत्यासाठी देशात धरला जावा. अशा आशयाचे वक्तव्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी केले. पुन्हा महात्मा गांधींच्या सशक्त विचारांची गरज निर्माण झाली आहे. आंदोलन करत्यांना 'आंदोलन जीवी' म्हणून हिनवले जाऊ लागले आहे. राष्ट्रद्रोहाच्या खटल्यांचा उपयोग हा अविवेकी आणि सर्रास पद्धतीने होत आहे. महात्मा गांधींच्या मार्गाने भारताने स्वातंत्र्य मिळवले आणि आज वरचा विकास आणि स्थैर्य साध्य करून दाखवले. परंतु सांप्रत काळात राजकीय उदासीनतेने राष्ट्रपित्याचा स्वप्नांवर धूळ चढली आहे. भारतीय लोकशाहीला निकोप ठेवण्यासाठी, महात्मा गांधींना सदैव स्मरणात आणि आचरणात ठेवावे लागेल.

**संदर्भ**:

1 भारदे,बाळासाहेब: गांधी विचार मीमांसा: महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे 1993 :पृ.3
2 भोळे,भास्कर: आधुनिक भारतातील राजकीय विचारवंत: पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर पृ.444
3 द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग अहवाल.

## भारतीय शेतकर्‍यांच्या समस्या आणि शेतकर्‍यांच्या चळवळी

**कु. स्वाती एम. उगेमुगे**

महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ
9403609693

कृषी हे सर्वात मोठे आर्थिक क्षेत्र आहे. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. शेती म्हणजे पिके वाढविण्यासाठी आणि प्राणी पाळण्यासाठी जमीन वापरणे. तर शेतकरी म्हणजे अशी व्यक्ती जी शेतीमध्ये गुंतलेली असते. शेतीचा इतिहास बघता अगदी मानव जन्माच्या प्रारंभापासून शेती व्यवसाय अस्तित्वात होता. त्यामुळेच शेतकऱ्यांना जगाचा पोशिंदा म्हणतात. बहुसंख्य लोक शेती आणि पशुपालन व्यवसायात गुंतलेले आहे. 2011 पर्यंत भारतातील 53 टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीशी संबंधित कामामध्ये गुंतलेली आहे. जसे शेतकऱ्याला आपले अस्तित्व सिध्द करताना अनेक संघर्षाचा सामना करावा लागला. त्याचबरोबर शेतीक्षेत्रात घडणाऱ्या प्रत्येक बदलाचा परिणाम एकंदर भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत. कारण शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. पाऊस चांगला झाल्यास पिक चांगले होते पण निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कधी पाऊस जास्त आल्याने ओला दुष्काळ तर कधी पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांना कोरड्या दुष्काळाला सामोरे जावे लागते. त्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलतात. महाराष्ट्रासारख्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आलेख वाढतांनाच दिसतो.

शेतकरी आपले प्रश्न चळवळीच्या, आंदोलनाच्या माध्यमातून समाजापुढे, सरकारपुढे मांडून न्यायाच्या अपेक्षेणे लढत असतो. समाज सुध्दा अनेकदा बघ्याची भूमिका घेतो. जवळपास 70 टक्के लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे म्हणजेच लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षा जास्त लोक हे शेती व्यवसायाशी संबंधित आहे तरीही आज शेतकरी एकटाच लढतोय !

शेतकऱ्यांचे आंदोलन, चळवळी ह्या त्यांच्या समस्येला, त्यांच्या प्रश्नांना जगापुढे मांडण्याचे माध्यम आहे. शेतकरी शेतामध्ये राबराब राबतो, अन्नधान्य पिकवितो, अनेक उद्योगासाठी कच्चा माल पुरवितो पण शेतीच्या कामासाठी केलेल्या खर्चाचा ताळमेळच बसत नाही. शेतमालाला मिळणारा भाव जर योग्य

मिळाला तर शेतकऱ्याचे अनेक प्रश्न मार्गी लागतील. पूर्वी कापसाचा भाव हा सोन्याच्या भावापेक्षा जास्त होता. कापसाला पांढरे सोने म्हटल्या जायचे पण हळूहळू कापसाचे भाव कमी होत सोन्याचे भाव वाढायला लागले. शेतकऱ्यांच्या समस्यांच्या प्रश्नांवर उपचार म्हणून शासनाने अनेक योजना, कार्यक्रम सुरु केले. अनेक शेतकरी त्याचा लाभही घेतात. पण तरीही आज शेतकऱ्यांना आंदोलन, चक्काजाम, निदर्शने करावी लागतात यावर विचार होणे आवश्यक आहे.

**उद्देश :**

1. शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा करणे.
2. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर शेतकरी चळवळीचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती :**

संशोधन पेपर करिता पुस्तके, मासिके, पेपर कात्रणे, वेबसाईट्स इ. तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

शेतकरी आंदोलन किंवा चळवळी या अचानक उदयास आलेल्या नाही. कारण त्यामागे शेती क्षेत्रामध्ये असणाऱ्या असंख्य समस्या कारणीभूत ठरतात. शेतकऱ्यांना चळवळीच्या माध्यमातून आपल्या मागण्या अत्यंत प्रभावीपणे शासनापुढे मांडल्या. शेतकरी चळवळी निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या समस्या होय. ज्यामध्ये अज्ञान, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, अंधश्रध्दा, असंघटीतपणा, शेतमालाला भाव न मिळणे, शेतमालाच्या साठवणुकीच्या जागेचा अभाव, वाढता रासायनिक खताचा वापर, शेतीपुरक व्यवसायाचा अभाव, सावकाराची वाढती दलाली, नवीन तंत्रज्ञानाचा अभाव व प्रसार, नवीन बी-बियाणे, खते-अवजारे यांचा अभाव, वडीलोपार्जीत शेतीचे लहान-लहान तुकड्यात होणारी विभागणी सर्वात महत्त्वाचे शेती प्रश्नाबाबत शासनाची असणारी उदासिनता अशा अनेक समस्या आज शेतकऱ्यांना भेडसावत आहे. यापैकी काही समस्यांचा आपण येथे अभ्यास करणार आहोत.

**शेतकऱ्यांच्या समस्या :**

**1) निसर्गावर आधारीत शेती :** भारतीय शेती ही पूर्णपणे निसर्गावर म्हणजेच पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे योग्य वेळी योग्य पाऊस पडल्यास शेतकरी शेतीतून पीक घेऊ शकतो. पण पाऊस वेळेवर न पडल्यास शेतकऱ्यांना दुष्काळाला सामोरे जावे लागते. भाजीपाला किंवा फळाची झाडे ही पूर्णपणे पावसाच्या उपलब्धतेवर अवलंबून असतात. कधीकधी जास्त पडणारा पाऊस, अवेळी पडणारा पाऊस, प्रचंड वेगात वाहणारे वारे / वादळ, योग्यवेळी खताची अथवा बियाण्याचा तुटवडा इ. कारणामुळे शेतीमध्ये उत्पादन कमी हाते तर कधी कधी शेती उत्पादनाची आवड जास्त झाल्याने किंमती ढासळतात त्यामुळे अधिक झालेले उत्पादन किंवा निसर्गाच्या कोपाला बळी पडल्यामुळे झालेली कमी उत्पादन या दोन्ही परिस्थितीमध्ये शेतकरीच नागवला जातो.

**2) जलसिंचनाच्या सुविधाचा अभाव :** भारत स्वतंत्र झाल्यानंतर शासनाने जलसिंचनाची समस्या निराकरणासाठी लहान मोठे धरणे व बंधारे बांधण्याचा कार्यक्रम राबविण्याचे ठरविले. त्याकरिता शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्यांना स्थलांतरीत करण्यात आले. त्यामुळे कित्येक शेतकऱ्यांना शेतजमीन सोडावी लागली पण अशा लहानमोठ्या धरणाची उभारणी योग्य पध्दतीने न झाल्याने जलसिंचनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता झालीच नाही. त्यामुळे जलसिंचनाच्या सुविधाचा अभाव ही सुध्दा मोठी समस्या शेतकऱ्यांची आहे.

**3) उत्पादीत शेतमालाच्या साठवणूक करण्यासंबंधी अडथळे :** शेतीतून उत्पादीत माल साठवणूक ठेवण्याची साधने प्रत्येक शेतकऱ्याकडे उपलब्ध नसतात. त्यामुळे जागेअभावी शेतकरी उत्पादीत माल बाजारपेठेत पाठवून देतो. शेतकऱ्यांकडून अनेक व्यापारी अगदी अत्यल्प मोबदला देऊन तो माल साठवून ठेवतो व योग्यवेळी तोच माल बाजारपेठेत अधिक दराने विकून स्वत:चा फायदा करुन घेतो. म्हणजेच शेतकऱ्याकडे माल साठवणूकीसाठी जागा उपलब्ध असल्यास तो योग्यवेळी योग्य मोबदला प्राप्त करु शकतो.

**4) नगदी पिक घेण्याकडे शेतकऱ्यांचा वाढता कल :** कमी कष्ट व जास्त उत्पादन मिळविण्याच्या लालसेपोटी शेतकऱ्यांचा ओढा वाढत असून प्रचंड पिक घेण्याच्या या शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीमुळे ज्याठिकाणी अशा पिकांच्या वाढीसाठी योग्य परिस्थिती आहे अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांनी एकच पिक घेण्यास सुरुवात केली. सातत्याने एकच पिक घेतल्याने शेती उत्पादनात घट होऊ लागली. उत्पादन वाढावे म्हणून शेतकरी अधिक प्रमाणात रासायनिक खताचा व तणनाशकाचा वापर करु लागला पण यामुळे शेतीची उत्पादनक्षमता कमी होऊन शेतजमिनीचा पोत बिघडू लागला आहे. शेतजमिनीच्या वाळवंटीकरणाची समस्या शेतकऱ्यांसाठी उभी ठाकली आहे.

**5) वाढती लोकसंख्या :** भारताची लोकसंख्या सातत्याने वाढताना दिसते. जमिन तेवढीच पण त्यावर आधारीत लोकसंख्या मात्र वाढली. शेतकऱ्यांना परंपरेने उपलब्ध झालेल्या शेतीजमिनीचे पुढील पिढीमध्ये विभागली गेली. म्हणजेच शेतीचे तुकडीकरण अधिक प्रमाणात झाले यामुळे अल्पभुधारक शेतकऱ्यांची संख्या वाढली अशा वाट्याला आलेल्या तुटपुंज्या शेतजमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाच्या गरजांची पुर्तता होणे अशक्य होते.

**6) शेतमाल खरेदी विक्रीतील गैरव्यवहार व मध्यस्थांचा वर्ग :** शेतमालाची खरेदी-विक्री होत असताना मालाची प्रतवारी ठरविण्याचे काम व्यापारी स्वतःच करतात. त्यांना योग्य वाटेल त्या किंमतीत माल घेतला जातो. त्याचप्रमाणे बाजारसमितीचे विविध कर देखील शेतकऱ्यांकडूनच वसुल केले जातात. त्यांच्याकडून विकत घेतलेल्या शेतमालाची पावती दिली जात नाही. थोडक्यात जो काबाडकष्ट करुन शेतामध्ये माल पिकवितो त्यालाच शेतमालाची किंमत ठरविता येत नाही.

**7) बाजारपेठेबाबत योग्य ज्ञानाचा अभाव :** विशिष्ट मालासाठी कोणती निश्चित बाजारपेठ उपलब्ध आहे, शेतमालाची योग्य किंमत कुठे मिळेल याविषयी शेतकरी अज्ञानी असतात. विशिष्ट बाजारपेठ, सरकारी गोदाम, मालाचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर निश्चित नेमके कसे कीले जाते याबाबत शेतकरी अज्ञानीच

असतात. परिणामी व्यापारी, दलाल, मध्यस्थ यांच्यावरच शेतमालाच्या दराबाबत शेतकरी अवलंबून असतो. परिणामी त्याला कधीच उत्पादीत मालाला योग्य दर मिळत नाही.

**8) शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून मूलभूत गरजा भागविणे अशक्य :** शेतकऱ्यांच्या गरजा पूर्वी मर्यादित होत्या परंतु आज वाढत्या गरजांची पुर्तता करण्याची क्षमता त्यांना शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून भागविणे अशक्य झाले आहे. शेतीसाठी लागणारी साधने, अवजारे, दळणवळणाच्या सुविधा, शिक्षण यासाठी त्याला मोठ्या प्रमाणात खर्च करण्याविना पर्याय उरला नाही. अनेक शेतकरी पारंपरिक पिकांपासून नगदी पिकांकडे वळला त्यामुळे त्याच्या गरजाही वाढल्या. आपल्या नित्याच्या गरजा भागविण्यासाठी त्याला बाजारपेठेकडे धाव घ्यावी लागत आहे आणि शेतमालाचे भाव निश्चित करण्याचे सर्व अधिकार व्यापारी व सहकारी संस्थाच्या पदाधिकारी वर्गाच्या हाती केंद्रीत झाली आहे. परिणामी तो घेत असलेल्या उत्पादनाला मिळणाऱ्या बाजारपेठेतील दरावर त्याचे कोणतेच नियंत्रण राहिले नाही. म्हणूनच आज शेतकरी मग तो प्रगत असो वा अप्रगत आज पूर्णपणे नागवला जात आहे.

**9) दारिद्र्य :** भारतीय शेतकरी हा दारिद्र्यातच जन्माला येतो, दारिद्र्यातच जीवन जगतो आणि दारिद्र्यातच मरतो असे म्हटले जाते. मुळात दारिद्र्यात असणारा शेतकरी आपल्या मुलाबाळांना उच्चशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. शेतीमध्ये नवीन तांत्रिक, आधुनिक साधनांचा उपयोग तो करु शकत नाही. त्यामुळे पारंपरिक शेती तो सुधारणा करु शकत नाही. कारण सुधारणा करण्याकरिता आवश्यक असणारे अर्थसहाय्य त्याला सहजरित्या उपलब्ध होत नाही. शासनाने काही अर्थसहाय्य दिले तरी आपल्या बेभरवशाच्या शेती उत्पादनातून त्याला त्याची परतफेड करता येत नाही. परपंरेचा पगडा असणारा शेतकरी आजही कर्ज काढून सण, समारंभ, मुलाबाळांचे लग्न, धार्मिक कार्यासाठी कर्ज काढतो किंवा उसणवार घेतो. घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करायची याचीच चिंता त्याला लागली असते. शेवटी कर्जाच्या ओझ्याखाली दबून गेलेला शेतकरी आत्महत्यासारख पाऊल उचलतो. शेतकरी स्वत: मुक्त होतो पण कुटुंब मात्र कर्जाच्या दारिद्र्याच्या विळख्यात भरडला जातो.

**10) जागतिकीकरणाचा दुष्परिणाम :** भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे श्रीमंत राष्ट्रात त्यांच्या गरजेपेक्षा जादा उत्पादित झालेला शेतीमाल सहजपणे अत्यंत कमी किंमतीत भारतीय बाजारपेठेमध्ये उपलब्ध होऊ लागला आहे. परिणामी अप्रगत तंत्रज्ञानाचा व परंपरागत पध्दतीचा अवलंब करुन भारतीय शेतकरी जो माल आपल्या शेतात उत्पादित करतो त्याला मात्र त्याने शेतमालाच्या उत्पादनासाठी केलेला खर्च भरुन निघेल इतकाही दर मिळत नाही. परिणामी शेती उत्पादन तोट्यात जाऊन त्यांच्यात दारिद्र्याची समस्या निर्माण होते.

**शेतकरी चळवळी / आंदोलने :**

19 व्या शतकाच्या पूर्वाधात वारंवार पडणाऱ्या दुष्काळानी उग्र रुप धारण केले असता सारा वसुलीची जबाबदारी असलेले महसुल अधिकारी साऱ्यात मुळीच सवलत देत नव्हते. एका बाजुला सरकार तर दुसऱ्या बाजुला लोभी सावकार या दोघांच्या कचाट्यात शेतकरी सापडला होता. 1867 साली सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी याबाबत जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र सरकारने शेतकऱ्याची असंतोषाची पर्वा न करता सारा वसुलीचा आपला हेका तसाच ठेवला. परिणामी चिडलेल्या शेतकऱ्यांनी नगर, सोलापूर, पुणे जिल्ह्यातील सावकार, गुजर, मारवाड्या विरोधात सामाजिक बहिष्कारास सुरुवात केली.

**महात्मा फुले व शेतकरी चळवळ :**

महात्मा फुलेंनी शेतकऱ्याचा असूड या ग्रंथात शेतकऱ्याच्या दयनीय स्थितीचे वर्णन केलेले आहे. सदर ग्रंथात शेतकऱ्यांची गुलामगिरी, कर्जबाजारीपणा आणि त्यांच्या स्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी कोणते उपाय करावे याचे वर्णन केले आहे.

महात्मा फुलेंनी त्या वेळच्या सरकारकडे शेतकऱ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी वसतिगृहे निर्माण करावी. दीनबंधू या वर्तमानपत्रातून लिखाण करुन शेतकऱ्यावरील अन्यायाला वाचा फोडली. इ. स. 1876-77 मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला

त्यावेळी महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी महाराष्ट्रामध्ये चळवळ सुरु केली. ह्याच चळवळी खतफोडीचे बंड म्हणून ओळखली जाते.

**कृष्णराव भालेराव व शेतकरी चळवळ :**

कृष्णराव भालेराव हे महात्मा फुले यांचे जवळचे सहकारी होते. दिनमित्र या वृत्तपत्रातून शेतकऱ्यांच्या स्थितीविषयी लेख प्रसिध्द केले. शेतकऱ्यांनी विद्येची कास धरावी मुलांना शिक्षण द्यावे कारण शेतकरी आणि कारागीर हेच खरे देशाचे आधारस्तंभ आहेत पण सावकार आणि सरकार हे दोघेही शेतकऱ्यांचे शोषण करतात, ब्राम्हणाप्रमाणेच आपणही पारंपरिक व्यवसायाचा त्याग करावा असेही त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले.

**साने गुरुजी व शेतकरी चळवळ :**

इ. स. 1939 मध्ये पूर्व खानदेशामध्ये अतिवृष्टी झाल्याने पिकाचे नुकसान झाले. त्यातून शेतकऱ्यांना शेतसारा माफ करावा यासाठी जळगावच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा नेला.

**मुळशी सत्याग्रह :**

सेनापती पांडुरंग महादेव बापट यांच्या नेतृत्त्वाखाली मुळशी सत्याग्रह झाला. टाटा कंपनीने मुळशी तालुक्यातील मुळा व निळा नदीचा संगम घडवून धरण बांधण्याचे ठरविले. धरणामध्ये मुळ गाव आणि शेती जात होती. बारामती येथे एक परिषद भरवली व त्यामध्ये शंकरराव देव, भुस्कुटे, केळकर व बापट यांनी शेतकऱ्यासह सत्याग्रह केला.

**विठ्ठल रामजी शिंदे व शेतकरी चळवळ :**

विठ्ठल रामजी शिंदे यानी इ. स. 1927 मध्ये मुंबई कायदेमंडळात गृहमंत्र्याने मांडलेल्या तुकडेबंदी व सारावाढी संबंधिच्या विधेयकास विरोध केला.

25 जुलै 1928 रोजी पुणे येथे मुंबई इलाखा शेतकरी परिषद भरली. या परिषदेचे अध्यक्ष वि. रा. शिंदे होते त्यांनी अध्यक्षीय भाषणातूनही विधेयकाला विरोध केला.

19 व्या शतकाच्या अखेरीस भारताच्या राजकारणात राष्ट्रीय कॉँग्रेसने राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्त्व करण्यास सुरुवात केली. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी चळवळीला प्रचंड स्वरुप प्राप्त झाले. महात्मा गांधींनी शेतकऱ्यांची ताकद ओळखून त्यांनी शेतकऱ्यांबरोबरच कामगार व मध्यमवर्गीय एकत्रीत लढतील असे लढे उभारले. खरा भारत खेड्यातच आहे हे ओळखून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी काही खार चळवळी सुरु केल्या. गांधीजींच्या नेतृत्त्वामध्ये झालेले खेडा चंपारण्य सत्याग्रह व बार्डोलीचा सत्याग्रह महत्त्वाचे सत्याग्रह ठरले. चंपारण्य सत्याग्रहात त्यांनी परदेशी मळेवाल्यांना बेकायदेशीर नीळ लागवडीविरोधी आणि त्यांच्याकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिळवणूकीविरुध्द लढा दिला. खेडा सत्याग्रहात सारा वसुली विरुध्द लढा उभारला तर जमिनीच्या नुकसान भरपाईचा प्रश्न मुळशी सत्याग्रहात हाताळला. अशाप्रकारे शेतकरी चळवळीला एक निश्चित दिशा देण्याचे प्रयत्न त्यांनी केले.

**सविनय कायदेभंगाची चळवळ आणि शेतकरी :**

कॉँग्रेसने कायदेभंगाची चळवळ सुरु करण्यासाठी गुजरातमधील बार्डोली तालुक्याची निवड केली. तेथे 1928 साली साराबंदीचे आंदोलन सुरु केले. या सत्याग्रहामध्ये सुरुवातीला गुजरातमधील श्रीमंत व मध्यम शेतकरी असलेला पाटीदार समाज सहभागी झाला. त्यांच्या बरोबरच अत्यंत हलाखीचे जीवन जगणाऱ्या कनिष्ठ वर्गातील शेतकरीही सहभागी व्हावा यासाठी त्यांनी अनेक जाती आणि आदिवासी समाजात चरखा, दारुबंदी असे रचनात्मक कार्यक्रम हाती घेतले. त्यामुळे पाटीदार शेतकरी व अनेक जातीतील शेतमजूर एकत्रित येऊन राजकीय कृती तयार केली. या लढ्यामध्ये जरी महात्मा गांधीची प्रेरणा असली तरी लढ्याचे नेतृत्त्व सरदर वल्लभभाई पटेल यांनी केले.

**किसान सभेचे कार्य :**

1920 मध्ये भारतात साम्यवादी चळवळीला सुरुवात झाली. 1936 मध्ये भारतीय किसान सभेची स्थापना इतर राज्यात करण्यात आली. यामध्ये मुख्यत: बिहार प्रादेशिक किसान सभेने स्वामी सच्चानंदाच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृतीचे काम मोठ्या प्रमाणावर केले होते. या सभेने जमिनदार विरोधी व कुळाच्या जमिनीवरील हक्काचे संरक्षण करणारी चळवळ सुरु केली. महाराष्ट्रात डिसेंबर 1936 मध्ये फैजापूर येथे या सभेच्या भरलेल्या अधिवेशनाला 2500 शेतकऱ्यांचा मोर्चा 200 मैल अंतर चालून मनमाडहून फैजापुरला अधिवेशनासाठी आला होता.

**स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळ :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण विकासाच्या दृष्टीने धोरण आखण्यात आले. भारतातील बहुसंख्य लोकाची उपजिविका शेतीवर निर्भर असते. त्यामुळे शेती विकासाच्या योजना राबविण्याचा प्रयत्न केला गेला तरीही बळीराजाला वारंवार प्रस्थापित सत्तेविरुध्द आपल्या हक्कासाठी संघर्ष करावा लागला. 1949 मध्ये केशवराव जेहो यांनी कामगार पक्षाची स्थापना केली व त्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न केला. 1983 मध्ये शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची स्थापना केली. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांना एका संघात आणण्याचा प्रयत्न केला. शेतकरी बाजारातील विषम व्यापार शर्तीमुळे लुटला जात आहे. म्हणून शेतमालाचे बाजारभाव बांधून द्या ही मागणी करीत चळवळी सुरु केल्या.

संघटनेचे व्यापारी व सावकार यांच्याकडून शेतकऱ्याचे होणारे शोषण थांबविण्यासाठी निपाणी येथे तंबाखू उत्पादक शेतकऱ्याचे आंदोलन घडवून आणले. विदर्भात कापूस उत्पादकांनी कापसाला योग्य भाव मिळावा यासाठी आंदोलन केले यात शेतकऱ्यांनी आमदार, खासदार, मंत्री यांच्यासाठी गावबंदी केली.

पंढरपूर येथे 1983 रोजी 60-65 हजार शेतकऱ्यांचा मेळावा भरला. शेतीमालाच्या योग्य भावाबरोबरच कृषीमूल्य आयोगाच्या बरखास्तीची मागणी केली. पंजाबमधील भारतीय किसान युनियनच्या आंदोलनात महाराष्ट्रातील दिड हजार शेतकऱ्यांनी चंदीगडला लावून आंदोलनामध्ये सहभाग घेतला.

मार्च 1980 मध्ये शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली कांद्याच्या योग्य भावासाठी पहिले मोठे रस्ता रोको आंदोलन केले. त्याचप्रमाणे या संघटनेने ऊसाच्या भावाचा प्रश्न उचलून धरत रास्ता रोको व रेल रोको आंदोलन केले. परिणामी शेतकरी वर्गाच्या अस्तित्वाची जाणीव संपूर्ण समाजात निर्माण झाली. त्यामुळे शरद जोशींना शेतकरी संघटनेचे प्रणेते म्हणून ओळखले जाते.

यानंतर शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी अनेक शेतकरी आंदोलन झाली ज्यामध्ये तंबाखू आंदोलन निपाणी (1981), दूध आंदोलन (1982), कापूस आंदोलन (1986), कर्जमुक्ती आंदोलन (1989) झाली.

राजू शेट्टी यांच्या स्वाभीमानी शेतकरी संघटनेने व सदाभाऊ खोत यांच्या रयत क्रांती आघाडीनेही संघटनेच्या बळावर कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संघटीत करुन उस दराच्या वाढीसाठी व दूध दराच्या बाबत मोठ्या प्रमाणात आंदोलने हाती घेतली. आजही प्रसंगानुरुप संघटनेच्या माध्यमातून शेतकरी विविध प्रकारची आंदोलने चालवत आहे.

**दिल्ली येथील शेतकरी आंदोलन :**

केंद्र सरकारने 20 सप्टेंबर 2020 रोजी कृषी क्षेत्राशी संबंधित तीन कायदे मंजूर केले. 1) शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) विधेयक 2020 2) शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार विधेयक 2020 3) अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) विधेयक 2020. पंजाबमधील शेतकरी कायदे मंजुर झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून आंदोलन करीत आहे.

या कायद्यांना रद्द करावे या मागणीसाठी पंजाबमधील 30 शेतकरी संघटनासह हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश आणि देशातील इतर शेतकरी संघटना मिळून साधारणपणे 400 संघटनांचा समावेश या आंदोलनामध्ये आहे. सद्या हे आंदोलन चर्चेचा विषय झाला आहे. केंद्र सरकारने केलेले कृषी कायदे हे शेतकरी हिताच्या विरोधात आहे त्यामुळे हे कायदे रद्द करावे याकरिता शेतकरी आंदोलन करीत आहे.

**सारांश :**

भारतीय समस्यांचा आढावा घेतला असता एक बाब आपल्यासमोर येते की, उदरनिर्वाहासाठी शेती व शेतीच्या उत्पादनावर अवलंबून असलेल्यांची संख्या सुमारे 65 ते 70 टक्के आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनीचे तुकडीकरण मोठ्या प्रमाणात झाले त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही. जलसिंचनाच्या सुविधा नसल्याने एकाच पिकांवर शेतकऱ्यांना अवलंबून रहावे लागत आहे. शेतमालाची साठवणूक करण्यासाठी योग्य सुविधा शेतकऱ्याकडे उपलब्ध नाही त्यामुळे बाजारपेठेतील दलाल, व्यापाऱ्यांकडून फसवणूक केली जाते. त्यामुळे शेतकरी करीत असलेल्या कष्टाला न्याय मिळत नाही. मूलभूत गरजाही भागविणे अशक्य होते. पुढचे दिवस चांगले येतील या आशेवर कर्ज काढून शेतीमध्ये कष्ट करणारा शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे. शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळावा. शेतीउत्पादनास रास्त भाव मिळावा या हेतूने अगदी पूर्वीपासूनच वेगवेगळ्या मार्गाने वेगवेगळ्या नेत्यांनी शेतकरी बांधवांना संघटीत करुन त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. आज काही प्रमाणात जागृत झालेला शेतकरी स्वत:च्या मागण्या मांडण्यासाठी रस्त्यावर उतरुन शासनासोबत भांडण्यास तयार होत आहे. शेतकऱ्यांकडून सुध्दा न्याय मिळेल पण त्यास समाजाचा, राजकीय पक्षाचा पाठिंबा मिळल्यास ! पण यासाठी थोडा वेळ जाऊ द्यावा लागेल हे वास्तव आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

social movement in india pdf.
unishivaji.ac.in/uploads/distedu/2020-21

maharashtratimes.com

कोरपे, राजाभाऊ. मराठवाड्यातील शेतकरी चळवळ. Online Marathi book

पांगुळ-बाराहाते, नंदा. भारतातील सामाजिक चळवळी. नागपूर : आर. बी. प्रकाशन.

देवगावकर, एस. जी., देवगावकर, शैलजा आणि डुमरे, जयमाला. सामाजिक चळवळी परंपरागत आणि आधुनिक. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

पांगुळ-बाराहाते, नंदा. आत्महत्या वैदर्भिय बळीराजाच्या. नागपूर : आर. बी. प्रकाशन.

# महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य एक : अध्यायन

प्रा- नवनाथ बंकट बडे
(सहाय्यक प्राध्यापक)
श्रीमती. पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय] खडकी] अकोला-

**प्रस्तावना** :भारत देशामध्ये अनेक वर्षापासून सामाजिक गुलामगिरी होती. गेल्या दीडशे वर्षाच्या कालावधीत आमच्या देशात शिक्षणाचा विकास घडवून आणण्याच्या दिशेने महात्मा फुले यांचे कार्य व शिक्षणविषयक विचार प्रेरणादायी आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक मुख्य साधन आहे. खऱ्या अर्थाने समाजाच्या जडणघडणीमध्ये शिक्षणाचा सिंहाचा वाटाआहे. ज्या समाजाला शिक्षणाचा स्पर्श झाला त्या समाजाची प्रगती झाली हा इतिहास आहे. हे सर्व खरे आहे प्रशिक्षण कोणी घ्यायचे चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे पालन करणारे कोण होते. या जातीमध्ये व्यक्ती जन्माला आलेली आहे त्या जातीच्या परिघाच्या बाहेर व्यक्तीला जाता येत नव्हते बहुजन समाजाला शिक्षण विशिष्ट समाज व्यवस्थेने नाकारले होते. म्हणजे आपण धार्मिक गुलामगिरी मध्ये राहत होतो खऱ्या अर्थाने त्याकाळी समाज व्यवस्थेचा अभ्यास करून व्यथित झालेल्या समाजाला महात्मा फुलेयांनी या मनुस्मृती विचारावर प्रहार करून उपेक्षित, शोषित, कष्टकऱ्यांना, दलित, भूमिहीन, अज्ञानीवअस्पर्शांना शिक्षणाच्या माध्यमातून केली व शिक्षणापासून मैलोन मैल दूर असणाऱ्यांना विकासाच्या प्रक्रियेत आणून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा खरा अर्थ जर कोणी तिला तो क्रांतिसुर्य महात्मा जोतिराव फुले यांनी दिला. चातुर्वर्ण व जातिभेद यांवर त्यांनी कडाडून हल्ला केला. जुने आचारविचार-, जुन्या, रूढी, कर्मकांडं, स्वर्गनरक ईश्वरी संकेत - इत्यादी समजुतीवर सर्वप्रथम आघात महात्मा फुलेंनी केला. भारतात बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी महात्मा फुले यांनी आपले पूर्णपणे जीवन अर्पित केलेसमाज परिवर्तन व विकासाच्या दृष्टीने या शिक्षणाला फार महत्त्व आहे .. शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथामध्ये त्यांनी स्पष्टपणे विचार व्यक्त केले आहेत.

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली |
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले |
वित्ताविना, शूद्र खचले |
एवढे अनर्थ, एका अविद्येने केले |

**अध्ययन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना महात्मा फुले यांचे शिक्षण विषयकविचार व कार्य या विषयाचा आढावा घेण्यासाठी संदर्भग्रंथ, विविध मासिके, दैनिके, साप्ताहिके, संकेत स्थळ इत्यादी nq;e साधनसामुग्रीचा आधार घेऊन विश्लेषण केले आहे.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.
2. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
3. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांची आणि कार्याची आजच्या सद्यस्थितीत उपयुक्त तपासणे.

- **महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार:**

1. **स्त्री शिक्षण :** पूर्वीच्या काळामध्ये स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे हा अधर्मच करणे होय. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमची उघडले जावी. म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षण कार्यास सर्वप्रथम प्राधान्य दिले स्त्रीला शिक्षण समर्थपणे जीवन जगण्यासाठी केले जावे. यांचा खरा धर्म त्यांना शिक्षण देणे हे स्त्रियांच्या मानसिक सक्षम स्त्री घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. हे ओळखून महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या पत्नीस शिक्षण घेऊन आद्य शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली आणि स्त्री शिक्षण कार्यास सुरुवात केली. आज अनेक क्षेत्रांमध्ये महिला कार्यरत आहे. त्याचे योगदान फक्त महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनाच जाते.
2. **प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत :** प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. आणि त्यामुळे हे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक होते. ही मागणी त्यांनी सन 1882 मध्ये शिक्षण आयोगापुढे शिक्षणावर अधिक भर देईल. तर नीतीच्या आणि सद्वर्तनाचे च्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होताना मुळीच अडचण येणार नाही. या विचारातून महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यावर भर दिला.
3. **प्राथमिक शिक्षकांची तरदुद :** प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केल्यास विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षिकाशिक्षक असणे आवश्यक आहे. आणि त्या करता प्रथम आवाज उठवणारे महात्मा ज्योतिराव फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. त्यामुळे या स्तरावरील शिक्षण उत्तम आणि दर्जेदार असायला हवे. प्राथमिक शिक्षकांची भरती प्रवर्गातून होणे आवश्यक आहे. अशाप्रकारे महात्मा ज्योतिराव फुले यांनी प्राथमिक शिक्षकांचा तरतुदी संबंधी विचार मांडले.
4. **ग्रामीण भागातील मुला मुलींचे शिक्षण :** भारतातील बहुजन समाज ग्रामीण भागांमध्ये राहत असल्याने त्यांच्या शिक्षणाची महात्मा फुले यांना अधिक काळजी वाटत होती.आपले बहुतांश जनता खेड्यात निवास करते तेव्हा शासनाने ग्रामीण लोकांच्याशिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. राष्ट्र निर्मितीसाठी आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी शूद्रांना शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या देशातील बहुजन समाज आजही अज्ञान व अडाणी आहे त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा एकमेव उपाय आहे.अशाबहुतांश सुधारणा शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय रास्त बोलू शकत नाही. ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर महात्मा ज्योतिराव फुले यांनी अधिक भर दिला.

5. **त्रिभाषा सूत्राचा अवलंब :** सन 1964-1966 च्या कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्राचा जरी आजच्या कालावधीत मान्यता दिली असली. तरी या अगोदर 77-78 वर्षांपूर्वी महात्मा फुले यांनी त्रिभाषा सूत्राचा अवलंब शिक्षणात करावा यावर भर दिला होता.

6. **शिष्यवृत्ती वसतिगृहाची सुविधा :** भारतातील समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. खेड्यापाड्यातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेता यावे. म्हणून वस्तीगृहाची व्यवस्था करण्याची संकल्पना महात्मा फुले यांनी मांडली. समाजातील गरीब आणि

होतकरू मुलांना शिक्षण घेता यावे. म्हणून शिष्यवृत्ती आणि वसतिगृहाची सुविधा देण्यावर महात्मा फुले यांनी अधिक भर दिला.

- **महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य :** भारतातील शिक्षणामध्ये महात्मा फुले यांचे खूप मोठे योगदान आहे. महात्मा फुले हे शिक्षण संबंधी विचार मांडून थांबले नाही. तर त्यांनी प्रत्यक्षशैक्षणिक कार्य केले.

1. **मुलींची शाळा :** महात्मा फुले यांनी सामाजिक रूढी परंपरा प्रथेला विरुद्ध बंड पुकारून पुणे येथे ऑगस्ट 1848 मध्ये बुधवार पेठेतील तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली 1851 मध्ये रास्ता पेठेत मुलींची दुसरी शाळा काढली तर 15 मार्च 1852 रोजी वेताळ पेठेत मुलींची तिसरी शाळा काढली. स्त्रिया संदर्भात महात्मा फुले यांचे कार्य पाहता त्यांना देशातील स्त्री शिक्षणाचे जनक आणि शिक्षण महर्षी म्हणून ओळखले जाते त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल 1882 मध्ये स्त्री शिक्षणाचे आद्य जनक म्हणून सरकारने त्यांचा गौरव केला.
2. **अस्पृश्यांसाठी शिक्षण :** महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणा प्रमाणेच घेतली अस्पृश्यांच्या शिक्षणालाही महत्त्व दिले होते शिक्षणाशिवाय त्यांच्यामध्ये परिवर्तन होणार नाही शिक्षणाच्या अभावामुळे त्यांचे सामाजिक आर्थिक नुकसान होत आहे त्यासाठी त्यांनी शिक्षण अठराशे 51 मध्ये पुण्यामध्ये नाना पेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढली अस्पृश्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे हे महात्मा फुले यांच्या त्यापैकीच एक होते हजारो वर्षापासून अज्ञानाच्या अंधारात कुजतात व सडतात पडलेल्या अस्पृश्यांना शिक्षणाचे दरवाजे सर्वप्रथम उघडून देण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले.
3. **हंटर शिक्षण आयोग समोरील निवेदन :** हंटर आयोगापुढे महात्मा ज्योतिराव फुले यांनी 19 ऑक्टोबर 1982 रोजी आपली शिक्षणविषयक मते मोठ्या निर्धाराने मांडली.

   अ) बारा वर्षापर्यंतच्या मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण
   आ) प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी
   इ) प्राथमिक शाळांचा कारभार शिक्षण खात्याच्या देखरेखीखाली असावा
   ई) प्राथमिक शाळेतील शिक्षक प्रशिक्षित असावे
   उ) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि वार्षिक बक्षिसांची उत्तेजन आत्मक बाबी देण्यात याव्यात
   ऊ) अभ्यासक्रमाची अमूलग्रह पुनर्रचना करणे .
   ऋ) खेड्यातील शाळांमधून जास्त उत्तीर्ण होणाऱ्या शाळातील शिक्षकांच्या पगार आखिरी यांना उत्तेजनार्थ खास भत्ता देण्यात यावा.

**निष्कर्ष :** महात्मा ज्योतिराव फुले यांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्र मध्ये शिक्षणाचा पाया घातला विचार आणि कृती मध्ये कोणत्याही प्रकारे तफावत येऊ दिली नाही स्त्रीशिक्षण तसेच प्राथमिक शिक्षण या संदर्भातील विचार आजच्या नाही तर येणाऱ्या पिढीसाठी सुद्धा अनमोल आहे शिक्षण हे तिसरे नेत्र आहे हे त्यांचे म्हणणे आज प्रत्यक्षपणे समाजात रुजलेले आहे स्त्री उन्नती बाबतच्या विचारांमुळे त्यांच्यामधला शिक्षण तज्ञ स्पष्ट होतो कल्याणकारी कार्यासाठी प्रथमता विरोध होतो आणि कालांतराने त्याची फलश्रुती दिसते असे या महापुरुषांच्या कार्याबद्दल म्हणता येईल खऱ्या अर्थाने महात्मा फुले हे स्त्री शिक्षणाचे जनक आणि शिक्षण तज्ञ या उपाध्या कडून त्यांचे समाजाला लागले योगदान स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. भास्कर लक्ष्मण भोळे, जोतीराव फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन पुणे
2. अ रा कुलकर्णी, महात्मा ज्योतिराव फुले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य, डायमंड पब्लिकेशन्स पुणे
3. प्रा तानाजी ठोंबरे, महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, लोकवांगमय गृह पुणे

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# "भारताच्या राष्ट्र उभारणीत महिलांचे योगदान"

**डॉ. कल्पना दिलीप भारंबे**
सहायक प्राध्यापक
धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचालित,
लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय,
जळगांव.

- **प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासात आणि संस्कृतीत स्त्रियांना महत्वाचे स्थान आहे. वैदिक काळात स्त्रियांना कुटूंब आणि समाजात सन्मान आणि प्रतिष्ठा होती तिला संपुर्ण स्वातंत्र्य होते. स्त्रियांना सामाजिक, धार्मिक व शिक्षण विषयक अधिकार होते परंतु कालांतराने भारतातील स्त्रियांच्या स्थितीत परिवर्तन झालेले दिसुन येते.

19 वे आणि 20 शतक भारतीय समाजजीवनाच्या दृष्टिने अतिशय महत्वाचे ठरले. 19 व्या शतकाच्या प्रारंभी भारतीय समाजजीवनात नवीन पर्वाला सुरुवात झाली आणि 20 व्या शतकात स्वातंत्र्यापाशी या पर्वात घडुन आलेल्या परिवर्तनाने पुर्णत्वाचा टप्पा गाठला. 19 व्या शतकात भारतात वैचारिक प्रबोधन घडुन आधुनिक भारताचा जन्म झाला आणि 20 व्या शतकात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने नवीनतेचा स्वीकार करुन आपला स्वतंत्र कारभार सुरु केला. या काळात घडलेल्या परिवर्तनाने भारतीय संस्कृतीत जीवनाचा कायापालट घडुन आला. या कायापालटाचे देखणे उदाहरण म्हणजे भारतीय स्त्रीजीवन होय.

या कालखंडात भारतीय स्त्री जीवनात अनेक अमुलाग्र बदल घडुन आले. स्त्रीचे व्यक्तीमत्व बदलले स्त्रीचे सामाजिक, सांस्कृतीक व कौटुंबिक दृष्टिने असणारे अस्तित्व अर्थपुर्ण बनले. स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन नव्याने तयार झाला. मुख्य म्हणजे स्त्रीला स्वतःलाच आत्मप्रतिष्ठेची जाणीव झाली. स्त्रीला स्वतःच्या व्यक्तीमत्वातील आजवर सुप्त असणाऱ्या, दबल्या गेलेल्या अनेक क्षमता अनुभूती ओळखता आल्या स्वसामार्थ्याचे भान आले आणि कतृत्वाच्या आकांक्षानी प्रस्फुरीत होवुन आत्मविश्वासाने भारतीय स्त्रीने स्वातंत्र्य प्राप्तीपाशी विविध क्षेत्रात पदार्पण केले. क्रांतीकारक चळवळी, साहित्य, संगीतादी कला समाजकारण, शिक्षण, राजकारण, प्रशासन इतकेच नव्हे तर नृत्य रंगभूमी आणि चित्रपटासारख्या क्षेत्रातही स्त्रियांनी पदार्पण केले. स्त्रीला कोणतेच क्षेत्र वर्ज्य राहीले नाही. याउलट समाजाच्या विविध क्षेत्रात कार्य करण्याची क्षमता अनेक सि्यांनी सिध्द करून अनेक वाटा स्त्रियांना कतृत्वासाठी खुल्या करुन दिल्या.

प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या राष्ट्र बांधणीसाठी सहभाग नोंदविलेलया काही निवडक कतृत्वान महिलांच्या कार्याचा वेध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

- **संशोधन पध्दती :**
  - **संशोधनाचे उद्देश :**
    1. भारताच्या राष्ट्रउभारणीत विविध क्षेत्रातील महिलांच्या योगदानाविषयी माहिती मिळवणे.
    2. भारताच्या राष्ट्रउभारणीतील महिलांच्या योगदानामुळे झालेले बदलांची माहिती मिळवणे.
  - **गृहितकृत्य :**
    1. भारताच्या राष्ट्रउभारतीत विविध क्षेत्रातील महिलांचे योगदान उल्लेखनीय आहे.
    2. भारताच्या राष्ट्रउभारणीत महिलांच्या योगदानामुळे अनेक सकारात्मक बदल घडुन आले आहेत.

- **तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोध निबंध व्दितीय स्त्रोतांच्या माध्यमातुन तथ्य संकलन करुन तयार करण्यात आला आहे.

प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात अनेक उल्लेखनीय स्त्रिया होवुन गेल्या त्यांची नोंद इतिहासात आहे. त्याचप्रमाणे भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनेक क्रांतीकारक महिलांचा देखील सहभाग होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा कालखंडा पाहता 1885 ते 1905 या कालखंडास गोखले युग म्हणतात. 1905 ते 1920 या कालखंडास टिळक युग म्हणतात. आणि 1920 ते 1947 या कालखंडाला गांधीयुग म्हणतात. हे जरी सत्य असले तरी स्वातंत्र्य चळवळीमध्ये राष्ट्र पुरुषांप्रमाणे आपल्या नेतृत्वाखाली स्त्रियांनी देखील आप आपल्या परिने चळवळी राबवल्या आहेत. क्रांतीकारक चळवळीत स्त्रियांचा सिहांचा वाटा आहे. अरुना असफअली, प्रीतीलता वड्डेवार, प्रिती बहादर, यमुनाबाई दास, सरलादेवी चौधुरानी, मॅडम मादाम भिकाजी कामा यांच्याप्रमाणे चळवळीत सामील होत्या भारताचा वीरांगना कल्पना दत्त.

- **क्रांतीवीर कल्पना दत्त :**

भारतमातेच्या अनेक बीरांगना पैकी एक नाव म्हणजे कल्पना दत्त होय. आपल्या शौर्याने आणि पराक्रमाने ब्रिटीश सैन्याला हादरवून सोडणारी एक तेजस्वी, लढवय्यी म्हणुन कल्पना दत्त चा उल्लेख करावा लागेल. बंगाल प्रांतातील चितगाव जिल्हातील शिरपुर येथे 27 जुलै 1913 रोजी त्यांचा जन्म झाला. शालेय जीवनातच त्या गर्ल्स गाईडमध्ये सहभागी झाल्या होत्या. त्यांनी छात्रीसंघ संघटनेमध्ये राहून लष्करी शिक्षण घेतले दरम्यानच्या काळात बंगाल प्रातांत सुर्यसेन उर्फ मास्टरदा

यांच्या विचारांचे वारे जोरात वाहत होते. कल्पना दत्त यांनी सुर्यसेन यांच्या कांतीकार्यात स्वतःला झोकुन दिले. सुर्यसेनच्या कांतीकारकांनी 19 एप्रिल 1930 रोजी चितगावच्या शस्त्रागारावर हल्ला करून ते लुटले. त्यामुळे इग्रजांचे धाबे दणाणले. चितगावमध्ये एका रात्री पोलीसांनी कांतीकारकांची चारी बाजुने कोडी केली. कांतीकारक वाट दिसले तिकउे पळू लागले पण तेवढयात एका गल्लीतुन पोलीसांच्या जीपावर बॅाब पडला, अजुन दोन बॉब पडले गोळ्यांचा मारा झाला. पोलिसांच्या तीन जीप्स नष्ट झाल्या अनेक पोलीस मरण पावले. पोलीसांनी प्रकाश बॉबचा वापर केला. त्या प्रकाशात त्यांना एक व्यकती पळू जाताना दिसली पोलीसांनी फैरी झाडल्या परंतु ती व्यक्ती पसार झाली ती व्यक्ती होती कल्पना दत्त पोलीसांना जेव्हा कळले. चितगावमध्ये जो हल्ला झाला होता तो कल्पनाने केल होता तेव्हा तिला शस्त्रगाराच्या हल्लयांचा मुख्य सुत्रधार आरोपी केले परंतु कल्पना मात्र पोलिसांना सापडल्या नाहीत. त्या वेशांतर करुन पोलिसांना चकवा देत असे.

19 मे 1933 मध्ये कल्पना दत्त एका सागर किनाऱ्यावरील महिरा गावात भूमीगत झाल्या होत्या. पोलिसांनी या गावाला वेढा दिला. दोन्ही बाजूने गोळीबार सुरुच होत कांतीकारका स्वतः जवळची काडतुसे संपली तेव्हा कल्पना दत्त व त्यांचे सहकारी यांना अटक झाली. 12 जानेवारी 1934 रोजी कल्पना दत्त यांच्या तीन सहकाऱ्या फासावर लटकवटले स्त्री म्हणुन कल्पना दत्त यांना आजन्म कारावसाची शिक्षा झाली. विशेष प्रयत्नामुळे 1939 मध्ये त्यांची सुटका झाली. 8 फेब्रुवारी 1995 रोजी त्यांचे निधन झाले चितगावातील कल्पना दत्तचा आमची कन्या म्हणुन गौरवाने उल्लेख करतात.

- **कांतीज्योती सावित्रीबाई फुले :**

भारतीय समाजसुधारक राजाराम मोहनरॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्री शिक्षकास गती दिली त्याप्रमाणे स्त्री शिक्षणासाठी कांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीयांसाठी शिक्षणाची कवाडे उघडली.

आधुनिक भारताच्या युग नायिका म्हणुन कांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य उल्लेखनीय आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात ज्या समाजसेविका होवुन गेल्या त्यात सावित्रीबाईंचे स्थान अविस्मणीय आहे. सावित्रीबाई फुले हया एकोविसाव्या शतकातील केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपुर्ण भारतीय कांतीच्या प्रणेत्या होत्या. समाजसुधारणेच्या क्षेत्रात सावित्रीबाईंनी स्वकर्तृत्वाने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

महात्मा जोतिबा फुले यांनी 1848 मध्ये पुणे येथे महाराष्ट्रातील मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्री शिक्षणांची महुर्तमेढ रोवली त्याच्या या शाळेत अस्पृश्यांच्या मुलींही शिकत असत स्त्रिया व अस्पृश्य यांना शिक्षण देणे हा तत्कालीन समाजाच्या दृष्टिने अक्षम्य गुन्हा होता. त्यामुळे त्यांना शाळेत काम करण्यासाठी शिक्षक मिळत नव्हता तेव्हा ज्योतीबांनी आपल्या अशिक्षित पत्नी सावित्रीबाई यांना स्वतःघरी लिहिव्या–वाचण्यास शिकविलेले व शाळेत शिक्षिकाम्हणुन नेमणुक केली त्यांना पहिल्या भारतीय शिक्षिका म्हणता येईल.

सावित्रीबाई शाळेत जात–येत तेव्हा लोक रस्त्यात उभे राहुन सावित्रीबाईंना उद्देशुन अपमानास्पद भाषा वापरत आणि निदानालस्ती करीत चिखल –शेण फेकत परंतु तरीही सावित्रीबाईंनी आपल्या अंगीवृत्ती कार्यापासुन माघार घेतली नाही.

अस्पृश्येतच्या प्रथेबाबत सावित्रीबाईंनी म्हटले आहे "सर्व मानव ही एका ईश्वराची लेकरे आहेत, हे जोपर्यंत आपणास कळत नाही तोपर्यंत ईश्वराचे खरे स्वरूप आपणास कळणार नाही". दुसऱ्या मानवास अस्पृश्य मानणे हे मनुष्यत्वाचे लक्षण नाही. म्हणुन प्रत्येक व्यक्तींने अस्पृश्यतेचा धिक्कार करणे यातच प्रत्येक व्यक्तींची, समाजाचे किंवा कोणत्याही मानवी संस्कृतीचे परम कल्याण आहे.

19 व्या शतकात पारंपारीक वातावरणात वाढलेल्या एका स्त्रीने अशा प्रकारचे विचार व्यक्त करावेत यातच सावित्रीबाईच्या मोठेपणाचे सहस्य आहे. विधवा स्त्रीयांच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी 1883 मध्ये महात्मा जोतीबाफुले यांनी एक बालहत्या प्रतिबंधक गृहे सुरू केले या बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलांचे काळजी घेण्याचे काम सावित्रीबाई करत असत या अनाथ मुलांवर त्या मातेच्या वात्सल्याने प्रेम करीत असत. या मुलांनाच त्या आपली मुले मानीत होत्या अशाच एका अनाथ मुलाला त्यांनी दत्तक घेतले होते.

28 नोव्हेंबर 1980 रोजी जोतीबा फुले यांचे निधन झाले त्यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाच्या आंदोलनाची धुरा सावित्रीबाईंनी पाहिली इ.स.1890 ते 1897 या काळात सत्यशोधक समाजाच्या सासवड येथील परिषदेच्या अध्यक्षा सावित्रीबाई होत्या. महात्मा फुले यांची वैचारीक परंपरा खंडीत न होऊ देण्याचे कार्य सावित्रीबाईंनी केले.

महाराष्ट्रात इ.स. 1877 मध्ये दुष्काळ पडला होता. सावित्रीबाईंनी या दुष्काळात होरपळलेल्या, अनाथ, आंधळ्या, पांगळ्याच्या आई झाल्या. निराधार मुलांच्या माता झाल्या. त्यांच्या या कार्यासंदर्भात फुलवंताबाई झोडगे म्हणतात. भिषण दुष्काळात सावित्रीबाईंनी जे धैर्य व दानत दाखविली त्याचे मोल जगात आजही कुणाला करता येणार नाही.

सावित्रीबाईच्या काळात ब्राम्हण विधवांच्या केशवपना विरूध्द नाभिकांना संघटीत करून त्यांचा संप घडवुन आणण्याचा कल्पक उपक्रम दिनबंधुचे संपादक कामगार नेते नारायण लोखंडे यांनी केले होते. परंतु या ऐतिहासिक संपाचे प्रेरणास्थान सावित्रीबाई फुले होत्या. नाभिकांच्या या ऐतिहासिक संपाचा वृत्तांत लंडनच्या दी टाईम्स या वृतपत्राने दि.9 एप्रिल 1890 रोजी प्रसिध्द केला. इंग्लडमधील स्त्रियांनी सावित्रीबाईंना अभिनंदनपर पत्र पाठवले पेशवेळाळापासुन अस्तितवात आलेल्या या अमानवी प्रथेला लगाम लावण्याचे धाडस सावित्रीबाईनी दाखवले.

सावित्रीबाई फुले यांचे कार्यकर्तृत्व पाहता एकोणिसव्या शतकात समाजातील दिनदुर्बल घटकांसाठी इतके महान कार्य करणारी दुसरी स्त्री झालेले नाही. महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती आंदोलनाच्या त्या खऱ्या अर्थाने अग्रनी होत्या.

- **पंतप्रधान इंदिरा गांधी :**

भारतीय राज्य घटनेच्या सरनाम्यात धर्मनिरपेक्ष व समाजवादी या शब्दांचा समावेश करणारे आणि या मुल्यांच्या रक्षणासाठी आयुष्यभर झटणारे महान व्यक्तीमत्व म्हणजे श्रीमती इंदिरा गांधी लोकप्रिय नेत्या, मुत्सददी राजकारणी, कुशल प्रशासक व कळबवर व्यक्तीमत्व म्हणुन इंदिराजींची ख्याती होती. त्या भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान होत्या. भारताचे ऐक्य व एकात्मता आबाधित राखण्यासाठी इंदिराजींनी आपल्या प्राणांचे मोल दिले. इंदिरा गांधी यांचा जन्म 9 नोव्हेंबर 1917 रोजी अलाहाबाद येथे झाला. त्यांचा लहानपणापासुन चळवळीशी संबंध आला होता. सन 1930 मधील सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळी कॉग्रेसच्या स्वयंसेवकाना सहाय्य करण्यासाठी त्यांनी लहान मुलांची वानरसेना स्थापन केली होती. 1942 च्या चले जाव आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला होत त्याबददल त्यांना तुरूगवासाची शिक्षा झाली होती.

स्वातंत्र्योत्तर काळात इंदिराजींनी भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या सक्रिय कार्यकर्त्या म्हणुन कार्य करण्यास सुरुवात केली सन 1964 मध्ये लाल बहादुर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान बनले परंतु शास्त्रीजीच्या निधनानंतर 24 जानेवारी 1966 रोजी इंदिरा गांधी यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची सुत्रे हाती घेतली आणि त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान ठरल्या.

1962 चे चिनी आक्रमण आणि 1965 मध्ये पाकिस्तानी झालेले युध्द यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर फार मोठा ताण पडला होता. देशापुढे अन्नधान्याच्या टंचाईचे संकट उभे राहिले होते. महागाई भडकत चालल्याने सामान्ये जनतेत सरकाराविषयी असंतोषच वाटु लागला होता.1967 मधील सार्वत्रिक निवडणुकीत कॉग्रेस पक्षाला अनेक प्रांतात पराभुत व्हावे लागले होते. त्यामुळे राजकीय अस्थिरतेचा धोकाही जाणवु लागला होता तथापी अशा कठीण व प्रतिकुल परिस्थितीतही इंदिरा गांधीनी अत्यंत कुशलतेने व समर्थपणे राष्ट्राच्या तसेच पक्षाच्या नेतृत्वाची धुरा सांभाळली.

**जनताभिमुख धोरण** : सन 1969 मध्ये कॉग्रेस पक्षात फुट पडली तेव्हा इंदिरा गांधीनी जनताभिमुख धोरण स्वीकारुन पुरोगामी व लोककल्याणकारी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचा धडाका सुरू केला देशातील चौदा बड्या बॅकाचे राष्ट्रीयकरण केले. संस्थानिकांचे पगार रद्द केले त्यामुळे जनतेपुढे त्यांची पुरोगामी समाजवादी प्रतिमा उभी राहिली आणि त्या देशातील सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय झाल्या.

बांगलादेशाची निर्मिती हा इंदिरा गांधीच्या राजकीय कारकीर्दीतील सर्वोच्च क्षण मानता येतो. 1971 मध्ये भारत –पाक युध्द उदभवले यावेळी पाकिस्तानचे अमेरिकेशी असलेले अलौकीक दूरदिर्शत्वाचे दर्शन घडवीत मोठ्या धुर्तपणे 1971 मध्ये सोव्हिएत युनियशी 20 वर्षाचा ऐतिहासिक असा मैत्री व परस्परसहकार्य करार घडवुन आणला. यानंतर भारत व पाकिस्तान यांच्यात युध्द सुरू झाले. भारतीय सेनेने पाकिस्तानी सेनेचा पराभव केल आणि पाकिस्तानचा संपुर्ण प्रदेश भारतीय सेनेच्या नियंत्रणाखाली आला. तेव्हा इंदिरा गांधीनी हा देश बांग्लोदशाच्या नेतृत्वाकडे सुपुर्त करून बांगला देशाच्या निर्मितीस हातभार लावला पुढे.1972 मध्ये पाकिस्तानी व्दिपक्षीय सिमला करार केला. या सर्व पार्श्वभुमिवर इंदिराजीना 1971 चा भारतरत्न हा देशातील सवौच्च नागरी सन्मान प्रदान करून गौरविले गेले.

- **आय.पी.एस. अधिकारी किरण बेदी :**

भारतीय पोलीस सेवा ;आय.पी.एस.द्ध सामाजिक कार्यकर्ते आणि टेनिसपटुच्या अधिकारी पदावर सामील होणारी भारतातील पहिली महिला म्हणजे किरण बेदी. किरण बेदी यांचा जन्म 9 जुन 1949 मध्ये अमृतसर येथे झाला.

किरण बेदी यांनी शाळेत असतांनाच नॅशनल कॅडेट कॉर्प्स ;छब्बद्ध मध्ये भाग घेतला होता. 1968 मध्ये त्यांनी एनसीसी कॅडेट ऑफीसर पुरस्कार जिंकला. किरण बेदी हया अमृतसरच्या सर्व्हीस क्लबमध्ये वारंवार जात असत जेथे वरिष्ठ नागरी सेवकांशी संवाद साधुन त्यांना सार्वजनिक सेवा करीअर करण्यास प्रेरीत केले. जुलै 1972 रोजी किरण बेदी यांनी नॅशनल ॲकडमी ऑफ प्रशासन मसुरी येथे पोलीस प्रशिक्षणाला सुरवात केली.80 पुरूषांच्या तुकडीत किरण बेदी ह्या एकमेव महिला होत्या. किरण बेदी हया पहिल्या महीला आयपीएस अधिकारी झाल्या. 6 महिन्याच्या फांऊडेशन कोर्स करतांना त्यांनी राजस्थनमधील माउंट अबु येथे आणखी 9 महिने पोलीस प्रशिक्षण घेतले आणि 1974 मध्ये पंजाब पोलीसांसोबत पुढील प्रशिक्षण घेतले.

किरण बेदी यांची पहिली पोस्टींग 1975 मध्ये दिल्लीच्या चाणक्यपुरी उपविभागात होती. त्याचवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये दिल्ली पोलिसांच्या सर्व पुरूष दलाचे नेतृत्व करणारी ती पहिली महिला बनली चाणक्यपुरी हे एक समृध्द क्षेत्र होते ज्यात संसद भवन, परदेशी दूतावास आणि पंतप्रधान आणि राष्ट्रपतींचे निवास्थान समाविष्ट होते. या क्षेत्रात चोऱ्या त्या किरकोळ प्रमाणात होत परंतु राजकीय निदर्शने नियमित होत असत जी कधी–कधी हिंसक स्वरूप धारण करत असत. 15 नोव्हेंबर 1978

रोजी निरंकारी आणि अकाली शीख यांच्या वादात 700—800 अकालीच्या तुकडीने इंडीया गेटजवळ निदर्शने केली. डीसीपी किरण बेदी यांच्या पलटनने आदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा निदर्शकांपैकी एक निदर्शक किरण बेदी यांच्याकडे एक नग्न तलवार घेवुन धावला परंतु किरण बेदी यांनी न घाबरता त्याच्या आणि इतर निदर्शकांवर छडीने वार केले आणि त्यांचे युनिट निदर्शकांना पांगवण्यात यशस्वी आले. या कारवाईसाठी किरण बेदी यांना ऑक्टोबर 1980 मध्ये यांनी डीसीपी ;वाहतुकद्ध बनवण्यात आले. तेव्हा किरण बेदी यांच्या टीमने केन वापरून अयोग्य ठिकाणी पार्क केलेली वाहने उचलली तेव्हापासुन त्यांन केनबेदी हे टोपणनाव पडले.

तिहार कारागृह ज्याला तिहार जेल आणि तिहार आश्राम असे ही म्हटले जाते. हे भारतातील आणि दक्षिण आशियातील सर्वात मोठे कारागृह आहे. तिहार जेलमध्ये तस्कर, माफीया, बलात्कारी, मारेकरी, ड्रग विक्रेते आणि दरोडेखोरांनी आणि दशहतवाद्यायांनी भरलेले होते. हिंसक आणि बिनधास्त ठिकाण म्हणुन ते कुख्यात होते.  कोणत्याही अधिकाऱ्याला तिथे तैनात होणे म्हणजे शिक्षा वाटत होते. अशा वेळी किरण बेदी यांची 1 ते 1993 मध्ये तिहार जेलच्या महानिरीक्षक म्हणुन नियुक्ती झाली. त्यापुर्वी नउ महिन्यापासुन ते पद रिक्त होते त्यांनी जेव्हा पदभार स्वीकारला तेव्हा 8000 ते 9500 पर्यंत कैदी होते.

किरण बेदींनी त्यांच्या मानवी दृष्टिकोनातुन तिहारला मॉडेल जेलमध्ये बदलण्याचा निर्णया घेतला. त्यांनी जेलमध्ये अनेक सुधारणा केल्या. कट्टर गुन्हेगारांसाठी त्यांनी वेगळ्या बॅरेक्स ची व्यवस्था केली. ते तुंरूगात त्यांचा वेळ गॅगच्या सदस्यांची भरती, अवैध विक्री आणि पैसे उकळण्यासाठी वापरत होते. या कैद्यांनी बेदी यांना न्यायालयात आव्हान दिले की त्यांना अन्यायाने वेगळे केले.

इतर कैद्यांसाठी बेदी यांनी प्रमाणपत्रसह व्यावसायिक प्रशिक्षणाची व्यवस्था केली. जेणेकरून त्यांना सुटकेनतर नोकरी मिळेल. त्यांनी कारागृहात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ आणि राष्ट्रमुक्त विद्यालये यांची केंद्र सुरु केली. कैद्यांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी योग आणि विपश्यना ध्यान वर्ग सुरु केले खेळ, प्रार्थना,सण उत्सव यासारख्या अतिरिक्त उपक्रमांचे आयोजन केले कारागृहात व्यसनमुक्ती केंद्र, बॅक, सुतारकाम आणि विणकाम युनिटसह बेकरी आणि लहान, उत्पादन युनिटची स्थापना केली. विकल्या गेलेल्या उत्पादनांमधील नफा कैद्यांचा कल्याण निधी मध्ये टाकण्यात आल्या. या तुंरुग सुधारणा कार्यक्रम बेदींनी बाहेरील लोकांचा स्वयंसेवी संस्था, शाळा, नागरीक आणि माजी कैद्यांच्या समावेश केला . त्यांच्या सुधारणांचा परिणाम म्हणुन तुरुगांत मारामारी आणि गडबड कमी झाली. अगदी कडक गुन्हेगार, ज्यांना वेगळ्या बॅरेकटच्या अलिप्त ठेवण्यात आले ते चांगले वागू लागले. बेदी यांच्या तिहार येथील सुधारणा कार्यक्रमाला जगभरात प्रशंसा मिळाली. तसेच 1994 मध्ये बेदी यांना रॅमन मॅगसेस पुरस्कार आणि नेहरु फेलोशिप देण्यात आली.

- **गानसम्राज्ञी लता मंगेशकर :**

लता मंगेशकर ज्यांना नाईटिंगेल ऑफ इंडिया म्हणुन ही ओळखले जाते. भारती चित्रपट उदयोगातील सर्वात बहुमुखी गायकांपैकी त्या एक आहेत तसेच संगीत दिग्दर्शक आहेत. लतादीदींचा जन्म 28 सप्टेंबर 1929 रोजी शास्त्रीय गायक आणि नाट्य कलाकार पंडीत दिनानाथ मंगेशकर आणि शेवंती यांच्याकडे मध्य प्रदेशातील इंदुर येथे झाला. वयाच्या पाचव्या वर्षीच लतादीदींनी संगीत शिकाणाची सुरुवात केली. सुमारे आठ दशकांच्या कारकिर्दीत लता मंगेशकर बॉलीबुडच्या आघाडीच्या महिलांच्या गायकीचा आवाज आहेत. त्यांनी एक हजारातुन अधिक हिंदी आणि 36 प्रादेशिक चित्रपटांमध्ये 5000 पेक्षा जास्त गाण्यांना आपला आवाज दिला आहे. भारतीय चित्रपट संगीतावर लतामंगेशकर यांचा अभुतपुर्व प्रभाव पडला आहे. लतादीदींनी मधुबालापासुन प्रियंका चोप्रा पर्यंतच्या अभिनेत्रींसाठी गाणी गायली आहेत.

2012 मध्ये लता मंगेशकरांनी एल.एम.म्युझिक नावाचे स्वतःचे संगीत लेबलॉच केले . त्यांच्या अलीकडच्या प्रकाशनात सौंगध मुझे इस मिट्टी की हे गाणे होते जे मयुरेश पै यांनी संगीतबद्ध केले आणि ते गाणे भारतीय सैन्य आणि भारताला श्रध्दांजली आहे.

लता मंगेशकर यांना त्यांच्या आठ दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत अनेक पुरस्कार आणि प्रशंसा मिळाली आहे.1974 मध्ये रॉयल अल्बर्ट हॉल मध्ये सादर करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या. त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार चार फिल्मफेअर, सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायक पुरस्कार असे अनेक पुरस्कार प्राप्त आहे. 1989 मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. 2001 मध्ये त्यांना भारताच्या सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न देण्यात आला. पद्मविभूषण, पद्मभूषण या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

लता मंगेशकर यांना सर्वोच्च नागरी पुरस्कार ;ऑफीसर ऑफ लिजन ऑफ ऑनरद्ध प्रदान केला. 1974 मध्ये गिनीज रेकॉर्डमध्ये भारतीय संगीताच्या इतिहासातील सर्वाधिक रेकॉर्ड केलेल्या कलाकार म्हणुन गौरव आहे. भारत सरकारने सप्टेंबर 2019 मध्ये त्यांच्या 100 व्या वाढदिवशी त्यांना डॉक्टर आफ द नेशन पुरस्काराररने सन्मानीत केले आहे.

लता मंगेशकर यांनी भारताचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या समोर ये मेरे वतन के लोगो हे देशभक्तीपर गीत गायले आणि ते ऐकुन सर्व देशातील नागरीकांच्या मनामध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती जागृत झाली. आज ही त्यांच्या आवाजातील हे गाणे ऐकल्यावर लोकांच्या अंगावर शहारा येतो आणि डोळयात पाणी येवुन राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम जागृत होते.

- **अंतराळवीर कल्पना चावला :**

अकराव्या वर्षी प्रगल्भ कल्पक, तत्वज्ञ विचारांची खोली म्हणजे ज्ञानेश्वरांचा वारसा स्वाभिमानाने मिरवणारी भारतीय वंशाची अंतराळत जाणारी प्रथम महिला म्हणजे कल्पना चावला. कल्पना चावला यांचा जन्म 17 मार्च 1962 मध्ये कर्नाल हरयाणा येथे झाला होता. आकाशातील ताऱ्यांना जवळुन भेटायचे हेच स्वप्न कल्पना अगदी लहानपणापासुन पाहत होती. संशोधन, शोध यांची माहिती जाणुन घ्यायला तिला आवडायचे अवकाशात विहरणारी विमाने, यान लॅब या सर्वांचे जगभरतले अद्यावत आधुनिक ज्ञान, शोध, प्रगती, तंत्र या माहितीचा ती संग्रह करत होती. अंतराळ आणि तेथील प्रवास याविषय पुस्तके, मासिके, पेपर इ. मधुन जिथुन शक्य होईल तिथून मिळवुन ती एकाग्रतेने वाचून काढायची कॉलेज मध्ये एरो व ॲस्ट्रो क्लबची संयुक्त सचिव होती. पुढे 1984 मध्ये अलींगटन टेक्सास विद्यापीठातुन एरोनॉटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण घेवुन त्यांनी कॉलोरॅडो विद्यापीठातुन एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातुन 1988 मध्ये डॉक्टरेट मिळवली आणि डिसेंबर 1994 साली कल्पना चावला यांची अमेरीकेतील नासामध्ये 15 व्या अंतराळवीर समुहात निवड झाली.मिशन विशेषज्ञ म्हणुन त्यांनी एसटीएस–87 वर काम केले. अवकाशात त्यांनी 376 तास व 34 मिनीटे प्रवास केला. 19 नोव्हेबर 1997 हा दिवस कल्पना चावला यांच्या आयुष्यातला एक अविस्मरणीय दिवस होत याच दिवशी त्यांनी स्पेस शटलं कोलंबियामधुन प्रत्यक्ष अंतराळ प्रवासाकरता उड्डान केले. या अंतराळ मोहीमेवर असतांना कल्पनाने आपल्या सहकारी अंतराळवीरांसोबत ग्लोव्ह बॉक्समध्ये विविध वैज्ञानिक प्रयोग केले. त्यावेळचे भारताचे पंतप्राधान आय.के. गुजराल यांनी कल्पना चावला हया भारताच्या अंतराळवीर म्हणुन आणि त्यांच्या या मोहिमेमुळे अमेरिका आणि भारताचे संबंध अधिक दृढझाले. अशा दुहेरी घटनेबद्दल कल्पना चावला यांचे अभिनंदन केले होते. कल्पना चावला आणि त्यांचे सहकारी कोलंबिया एसटीएस 107 हया स्पेस शटल ने परतीचा प्रवास करत होते हे अंतराळवीर पृथ्वीपासुन फक्त 74 कि.मी. उंचीवर होते दहाव्या मिनीटाला शटल धावपट्टीवर उतरणार होते परंतु प्रंचड मोठा आवाज झाला आणि कोलंबियाचे तुकडे झाले. या अपघातात कल्पना चावला आणि त्यांचे सहकारी अंतराळातच विलीन झाले. मला अवकाशातच ताऱ्यांच्या सहवासात असतांना मरण यावे हे कल्पना चावला यांचे स्वप्न या दुखदः घटनेने पुर्ण झाले.

कल्पनाच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी ही कधीही भरून न निघणारी होती परंतु तिच्या स्मरणार्थ अमेरिकेतील न्यूयार्क शहरात 74 स्ट्रीट या मार्गाने नाव बदलुन "74 स्ट्रीट कल्पना मार्ग" असे करण्यात आले. टेक्सास विद्यापीठातील हॉस्टेल ला "कल्पना चावला हॉल" हे नाव देण्यात आले. नासाने एक सर्वोतम संगणक तिच्या नावाने समर्पित केला. फ्लोरिडाच्या एका टेक्नॉलॉजी इन्सिट्युटमधील एक दालनास कल्पनाचे नाव देण्यात आहे. कोलंबियाच्या सात, डोंगर शिखरांपैकी एका शिखराला "चावला हील" हे नाव देण्यात आले. ॲस्टरॉइड 51826 ला कल्पना नाव दिले गेले.

भारत शासनाकडुन हवामान, अभ्यासाविषयी एक उपग्रहांची शृंखला सोडण्यात आली. त्याचे नांव कल्पना असे ठेवण्यात आले टागोर बालनिकेतन या शाळेचे नामकरण "कल्पना बालनिकेतन" करण्यात आले. अमरचित्र कथा या कॉमिक्सने कल्पना चावलांच्या जीवनावर आधारीत लहान मुलांकरता एक कॉमिक्स प्रकाशित केले आहे. श्री. संजय पुजारी यांनी कऱ्हाडमध्ये कल्पना चावला विज्ञान केंद्राची मुर्हूतमेढ रोवली. कल्पना चावलाच्या नावाने स्थापन झालेले हे भारतातले एकमेव विज्ञान केंद्र आहे. कऱ्हाड गाव आज कल्पना चावला विज्ञान केंद्राचे गाव म्हणुन ओळखले जाते आणि या विज्ञान केंद्रातुन अनेक मुले आपली स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

- **निष्कर्ष :**

वरील सर्व विवेचनावरून लक्षात येते की भारताच्या राष्ट्र उभारणीत महिलांचा फार मोठा सहभाग आहे. समाजकारण, राजकारण, कलाक्षेत्र, अशा विविध क्षेत्रातुन महिलांनी भारताच्या विकासासाठी कार्य केलेले आहे आणि आजही विविध क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत आणि भारताच्या राष्ट्र उभारणीत आपला सहभाग नोंदवत आहेत.

- **संदर्भ ग्रंथ सूची**

1. प्रतिभा हंप्रस – अवकाशस्य तारांगण– कल्पना चावला, सुनिता विल्यम्स्
2. डॉ.अनिल कोठारे – भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास
3. डॉ.स्वाती कर्वे– स्त्री विकासाच्या पाऊलखुणा
4. डॉ.वैशाली पवार – महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख
5. किरण बेदी – विकीपिडीया
6. लता मंगेशकर –विकीपिडीया

........................

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉबाबासाहेब आंबेडकरांचे योगदान.

प्रा. डॉ. राहुल दत्ता मंडणीकर
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय
दसरा चौक, कोल्हापूर

भरतीतील रूढी,प्रथा, परंपरा, , सामाजिक स्थिती, इतिहास या सगळयांचा सखोल अभ्यास करून भारत देशाला कोणत्या प्रकारची राज्यपद्धती योग्य ठरेल याचा निर्णय भरतीतील काही प्रमुख नेत्यांनी घेतलाआहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली विद्वत्ता पणाला लावून कायदेशीर तपशील घटनेमध्ये शब्दबद्ध केले. भारताच्या राजकीय स्थैर्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या दोन देणग्या प्रामुख्याने कारणीभूत ठरल्या आहेत. त्यातली पहिली देणगी आहे लोकशाहीतील विविध यंत्रणांचे अधिकार आणि त्यांचे परस्परांवरील नियंत्रण. राष्ट्राची ही संकल्पना विकसित होण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मदत झालीच, पण 'राष्ट्रीयत्वा'ची एक पूर्वअट आपल्या देशात आजूनही पूर्ण झालेली नसल्याचे त्यांनी लक्षत आणून दिले'स्वत:स राष्ट्र म्हणविणाऱ्या सर्व लोकांचा संवाद, सहभाग आणि भागीदारी यांतून आलेली सामाजिक एकोप्याची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व.' राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे, हे सामाजिक जीवनात समता आणि बंधुता यावरून ठरते. देशात आर्थिक व सामाजिक पातळयांवर मोठी विषमता असताना आणि अलीकडल्या काळात आंतर-जातीय, वांशिक आणि धर्मीय तणाव वाढत असताना 'राष्ट्र' विकसित होण्यासाठी आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्यक्षात दिसण्यासाठी आपण डॉ. आंबेडकर यांच्याकडून शिकवण घेतली पाहिजे.

'स्वातंत्र्या'ची कल्पना डॉ. आंबेडकरांची काँग्रेस व इतरांपेक्षा वेगळी होती. त्यांच्या मते, राजकीय स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याचा निव्वळ एक भाग आहे. अन्य भाग म्हणजे सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य, देण्यात 'जात' हा अडथळा असल्यामुळे आधी सामाजिक-आर्थिक समानतेच्या हक्काचे संरक्षण करणाऱ्या तरतुदी करा, मग ब्रिटिशांकडून राजकीय स्वातंत्र्य घेऊच, असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकर यांनी हा जो विषय तेव्हा लावून धरला, तो आजही महत्त्वाचाच ठरतो, कारण राज्यघटनेद्वारे अनुसूचित जातींना समान हक्क मिळूनही, त्यांना नागरिक म्हणून समान हक्क नाकारले जाण्याचे प्रसंग आजही येतात. संसदीय लोकशाहीच्या यशाचीदेखील एक पूर्वअट डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केली होती. 'एक व्यक्ती एक मूल्य' किंवा सर्वाना समान मूल्य, हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. राजकीय लोकशाहीत 'एक व्यक्ती एक मत' या नियमाने हे तत्त्व आचारणात आणले जाते. पण राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक पातळयांवरही सर्वाना समता आणि स्वातंत्र्य हवे.परंतु भारतातील जातिव्यवस्थेमुळे सामाजिक आणि आर्थिक लोकशाही नाकारली जाते आणि राजकीय लोकशाहीचे स्वरूप जातीय किंवा जाती-आधारित बनते. म्हणून राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचा, सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर भर होता.

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रि होते. १९४२-४६'साली 'पुनर्बांधणी आणि पुनर्वसन योजना तयार झाली व प्रत्यक्षात आणली. १९५१-५५ च्या पहिल्या पंचवार्षिकि योजनेने त्या योजनेचा आधार घेतला. डॉ. आंबेडकरांनी कामगारविषयक धोरण, पाणी आणि वीज,अनुसूचित जातीचे,विकासाचेही धोरण तयार केले, आजही त्या कामगारविषयक धोरणाचा आधार घेतला जातो, कोलकात्यात पहिले रोजगार – विनिमय केंद्र सुरू झाले, तेही याच धोरणामुळे. अनुसूचित जातींसाठी सरकारी नोकऱ्या व शिक्षणसंधींमध्ये आरक्षण (१९४३) हे निर्णय त्यांच्या धोरणांमुळे झाले. केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय वीज प्राधिकरण या आजही कार्यरत असलेल्या यंत्रणांची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या पाणी आणि वीजविषयक धोरणातून झाली. दामोदर, हिराकुड, शोण ही धरणे तसेच दख्खनचा पाटबंधारे विकास हे या धोरणामुळे मार्गी लागले.

डॉ.बाबासाहेबाचे विचार,त्यंनी वेळोवेळी मांडलेली मते, केलेल्या सूचना आजच्या काळात 'शिकवण' ठरतात; कारण स्वातंत्र्य, राष्ट्र, राष्ट्रवाद, लोकशाही यांविषयीच्या त्यांच्या कल्पना आज – राष्ट्रापुढे अनेक आव्हाने असताना – मोलाच्या ठरतात. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये कोणत्याही सशक्त राष्ट्रजीवनाचा आणि बळकट लोकशाहीचा पाया असतात आणि या मूल्यांचे आचरण करताना स्त्रिया, अल्पसंख्याक यांच्यासह सर्वाची समता, सर्वामधील बंधुता आणि सर्वाना चांगले जगण्याचे स्वातंत्र्य अभिप्रेत असते. सामाजिक व्यवहारांत आणि आर्थिक संधींमध्ये जर समताच नसेल आणि हिंसक प्रक्रिया घडत असतील, राष्ट्रातील एकोप्याची भावनाच कमकुवत होत राहते आणि म्हणून राष्ट्रजीवनापुढे आव्हाने उभी राहतात. आज आपण अशाच वास्तवाला सामोरे जात आहोत.

प्रस्तावन

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीतील योगदान ऐतिहासिक आणि दूरगामी परिणाम करणारे ठरले आहेत,डॉ बाबासाहेब आंबेडकरान राज्यघटनेचे शिल्पकार .क्रांतीकारकप्रज्ञासूर्य सम्यक विचारवंत आदि कार्यमुळे ,विश्वरत्न अर्थतज्ञ, डॉ बाबासाहेब आंबेडकराचे जीवन .त्यना ओळखले जात असले तरी भारताच्या आधुनिक उभारणीतील योगदान अतेंत महत्वाचे आहे एका उफळलेल्या महासागरा सारखे आहे आपल्या कारकिर्दीत त्यंनी अनेख ग्रंथाचे लिखाण केले आहेआज राष्ट्रीय अंतराष्ट्रीय परिस्थिती . देशातील पांरपार चालत आलेली जातीव्यवस्था वेगळया स्वरुपात वर डोक काढत .झपाट्याने बदलत आहे शैक्षणीक व राजकीय व्यवस्था कोलमडून जात आहेत यामुळे सामान्ये माणसे होरपळून जात आहेत अशा ,आर्थिक,सामाजिक.आहे परिस्थितीत मार्ग काढण्यसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकराचे विचार व कार्य समजून घेण्यची गरज आहे.

भारताचे अखंडत्व आणि ऐक्य या विषयी डॉ बाबासाहेब आंबेडकरानी घेतलेली भूमिका याचा विचार केला जात नाही . भारत हा अखंड राहावा भारतातील लोक ऐकतेच्या भावनेने राहावेअसे त्यना वाटत होते. ब्रिटीश सरकार जोपर्यंत या देशात आहेत तोपर्यंत सर्व सामन्य माणसाच्या हाती सत्ता येणार नाही असे त्याना वाटत होतेभारताच्या ऐक्यासाठी आपण सर्वांनी संघटनेच्या . त्यमुळे त्यानी एका वीशिस्ट वर्गाच्या स्वांतत्र्यसाठी व.बळावर आपल्या कार्याची रूपरेषा आखली पाहेजेतविचार केला नव्हताभारत हा , भारतीयांना .विविध जाती आणि धर्माचा असला तरी भारताचे त्यावरून तुकडे पडू नयेत असे डॉ बाबासाहेब आंबेडकराना वाटत होते पंरपंरा या मध्ये विविधता ,प्रथा,रूढी,भाषा .स्वशासन करता येणार की नाही या विषयी बर्याच जनाणी शंखा उपस्थित केली होती असणाऱ्या देशामध्ये हे शक्य नाही अशी भूमिका घेणाऱ्या लोकापुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय संवीधानाद्वारे संर्वाना एका छताखाली आणण्याचे कार्य केले आहेविभिन्न वंशाच्या जनसमूहांना एका राष्ट्रात अंतर्भूत करण्यासाठी एक शासन बरेचदा एकउत्तम . भारत एक.उपाय ठरू शकतेराष्ट्र व्हावे असे जर ध्येय असेल तर या ध्येयाच्या पुर्ततेसाठी स्वराज्य सर्वात महत्वाचे साधन ठरेलमात्र . .स्वराज्य हे संर्वाच्या हितासाठी असले पाहेजीत असे मत डॉ बाबासाहेब आंबेडकराचे होते

राजकीय साधनाद्वारे एकता प्रस्थापित करण्यात डॉ बाबासाहेब आंबेडकराना राजकीय क्षेत्रात यश प्राप्त झाले आहे. सामाजिक क्षेत्रातील परिस्थितीचा विचार करता अस्पृश्यता निवारण कार्यात डॉ बाबासाहेब आंबेडकराना सामाजिक क्षेत्रात फारसे बदल घडवू शकले नाहीत त्यमुळे त्यंनी आपल्या समाज बांधवांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला.ऐतिहासिक दृष्टीकोणातून विचार केल्यास डॉ बाबासाहेब आंबेडकरानी भारतात सामाजिक,धार्मिक,शैक्षणीक,आर्थिक क्षेत्रात फार मोठे परिवर्तन केले आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे आधुनिक भारताच्या निर्मितीचे आहे. परंतू त्यांना विशिष्ट जातीपूर्तीच मर्यादित ठेवण्यात आलेले आहे. त्यांना दलित, शोषितांचे कैवारी म्हणत असतांना , ते फक्त तेवढ्यापूरतीच मर्यादित नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. डॉ. आंबेडकरांचे योगदान हे भारतातील प्रत्येक क्षेत्रात आणि प्रत्येक समाज घटकांसाठी राहिलेलं आहे. परंतू त्यांच्या कार्यामागे एकच महत्वाचा उद्देश राहिलेला आहे . तो म्हणजे देशातील जाती व्यवस्था संपुष्टात आणणे . कारण जाती व्यवस्थाच या देशातील सर्व समस्यांची जननी आहे. आंबेडकरांसारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विविध पैलू प्रत्येकाने समजून घेणे गरजेचे आहे.

सामाजिक योगदान

भारतातील जाती व्यवस्थेच्या निर्मितीचा इतिहास डॉ.आंबेडकरांनी खूप जवळून अनुभवला आहे. भारतातील जातीच्या आधारावर टिकून असलेल्या व्यवस्थेने माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घेतला होता आणि तो अधिकार २१ व्या शतकात सुद्धा हिरावला जात आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेवून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना हिंदू समाजात दोन माहत्वाच्या सुधारणा करावयाच्या होत्या. त्यांना हिंदू समाजातील जातीभेद नष्ठ करावयाची होती व त्यांना अस्पृशाना अस्पृशतेच्या उच्चाटनासाठी स्पृश्याशी संघर्ष करण्यास प्रेरित करावयाचे होते.

हजारो वर्षांपासून चालत आलेली जाती व्यवस्था मनुने मनुस्मृती या ग्रंथात नियमावलीच्या रुपात तयार केली , ज्यात वर्णाधारीत नियम होते. विषमता प्रस्थापित करणारा तो ग्रंथ होता. ज्याने स्त्रीचा सन्मान केला नाही. अश्या मनुस्मृतीला डॉ. आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी दहन करून , या व्यववस्थेला मोठे आव्हान देण्याचे काम केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. आणि ज्या अस्पृश्य समाजाला गावातील सामूहिक पाण्याच्या स्रोतातून पाणी पिण्याचा अधिकार नव्हता तो पाण्याच्या स्रोत डॉ. आंबेडकरांनी सर्वांसाठी खुला केला. परंतू तो सत्याग्रह फक्त पाण्यासाठी नसून मानवाधिकारासाठीचा सत्याग्रह होता .डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, काळाराम मंदिराचे सत्याग्रह करून आम्हाला राम भक्त बनायचे नाही, तर या भारत देशात असणाऱ्या दगडी जातीव्यवस्थेला सांगायचे आहे की , आम्ही पण सजीव प्राणी आहोत. तुमच्या या मंदिरात कुत्रे, मांजरे, शेळया, मेंढ्या प्रवेश करू शकतात तर आम्ही का नाही...?? यातून हेच दिसून येते की , ही लढाई देवळात जाऊन देवाला पूजण्याची नाही तर अस्मितेची व स्वाभिमानाची लढाई होती.

डॉ.आंबेडकरांनी अनेक मंदिरांच्या प्रवेशासाठी सत्याग्रह केला . त्यात, अंबादेवी मंदिराचा सुद्धा समावेश होता. यातून ते एकच निष्कर्ष काढतात की , वर्णव्यवस्था ,जातीवाद आणि अस्पृश्यतेचे मूळ हे याच धर्मग्रंथात दडलेलं आहे. सोबतच स्त्री गुलामगिरीच्या प्रथा (सतीप्रथा,बालविवाह,विधवा पुनर्विवाहास बंदी) या कश्या जातिव्यवस्थेशी जुडलेल्या आहेत, हे सुद्धा त्यांनी स्पष्ट केले.

भारतातील शेतकरी व शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी डॉ. आंबेडकरांचे फार मोठे योगदान राहिलेले आहे. डॉ.आंबेडकरांनी कोकणातील शेतकऱ्यांचे खोतांच्या दास्यातून मुक्तता व्हावी , म्हणून फार मोठी चळवळ उभारली. १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधी मंडळात मांडले होते. १० जानेवारी १९३८ रोजी २३ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली विधी मंडळावर नेण्यात आला होता . त्यात कोकण, सातारा, नाशिक व विविध भागातील शेतकरी सामील झाले होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडन्यासाठी अनेक सभांमध्ये मार्गदर्शन करून सर्व जाती धर्माच्या शेतकऱ्यांसाठी चळवळ उभी केली.

आंबेडकरांनी शेती विषयक आखलेल्या योजनांपैकी एक महत्वाची योजना म्हणजे, दामोदर प्रकल्प. त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी, वीजनिर्मितीसाठी व पाण्यातील दळणवळणासाठी करावा , असे त्यांना वाटले. त्यांनी दामोदर नदी प्राधिकरण स्थापन करून सोन नदी, महानदी, कोसी, चंबळ आणि दक्खनमधील नद्यांचे काम हाती घेतले.

सामूहिक शेतीवर त्यांचा भर होता. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी आणि ती सुद्धा सामूहिक असावी असे त्यांचे मत होते. भारताचा शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी भारतीय लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून न राहता शेतीपूरक इतर धंद्याकडे वळावे , असे त्यांना वाटत होते. शासनातर्फे निगराणी ,कर्जरोखे,पैश्यांची परतफेड या सोबतच शेती व महत्वाचे उद्योग राष्ट्राच्या मालकीचे व्हावेत ,असे त्यांचे मत होते.

बाबासाहेबांनी शेती विषयक केलेल्या कामांपैकी महत्वाचे काम म्हणजे राष्ट्रीय सिंचन धोरण. हे धोरण त्यांनी सरकारला सुचविले होते. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे आणि पाण्यामुळेच देश जगू शकतो हे त्यांनी सांगितले होते. बाबासाहेबांच्या विचारानुसारच सरकारने दामोदर प्रकल्प, हिराकुंड प्रकल्प व इत्यादी अनेक प्रकल्प हाती घेतले होते. व्यक्ती ते राष्ट्र असा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशावर आधारित योजना त्यांनी आखल्या होत्या. शेती व शेतकऱ्यांच्या अधिकारावर गदा येऊ नये , म्हणून शेतकरी व मजुरांनी संगठीत होणे आवश्यक असल्याचे बाबासाहेबांनी वेळो वेळी सांगितले होते.

### राजकीय योगदान

डॉबाबासाहेब आंबेडकरांनी . त्यांच्या States and Minorities या ग्रंथात राज्यविषयक विचार मांडले आहेतत्यांच्या मते राज्य हे . सामिजिक,सामाजिक परिवर्तनाचे साधन असूनकल्याण हा राज्याचा मुख्य हेतू असतो .त्यांना कल्याणकारी राज्य अभिप्रेत होते. .लोकशाहीचा हेतू कल्याणकारी व्यवस्था म्हणजेच जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण हाच असतो डॉबाबासाहेब . आंबेडकरांनी उपयुक्ततावादी व कल्याणकारी राज्याची कल्पना मांडलीसंसदिय शा.सन पद्धतीचे समर्थन करताना डॉबाबासाहेब . आंबेडकर म्हणतात केवळ ब्रिटीशांचे अनुकरण म्हणून आपण संसदिय लोकशाहीचा स्वीकार केलेला नाही तर ही पद्धती अधिक संतुलित, संसदिय पद्धतीमधील सामुहिक जबाबदारीच्या तत्वामुळे सत्ताधीसावर नियंत्रण ठेवत .खुली व जबाबदार पद्धती आहे,ा येतेही शासन . .भारतासाठी ती अधिक योग्य ठरावी.पद्धती लोकशाहीला अधिकची जवळची असून हुकुमशाहिच्या धोक्यापासून दूर आहे डॉ .

बाबासाहेब आंबेडकरांना लोकशाहीची चिंता होतीभाषा व प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात संसदिय लोकशाही ,धर्म,विविध जाती. सुरक्षित करण्यासाठी त्यांनी संघराज्याला महत्व दिले.

संसदीय लोकशाहीच्या यशाचीदेखील एक पूर्वअट डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केली होती. 'एक व्यक्ती एक मूल्य' किंवा सर्वांना समान मूल्य, हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. राजकीय लोकशाहीत 'एक व्यक्ती एक मत' या नियमाने हे तत्त्व आचारणात आणले जाते. पण राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक पातळयांवरही सर्वांना समता आणि स्वातंत्र्य हवे. 'सामाजिक आणि आर्थिक लोकशाही हे राजकीय लोकशाहीच्या पेशी आणि तंतूंसारखे आहेत' असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. परंतु जातिव्यवस्थेमुळे एकतर सामाजिक आणि त्यामुळे आर्थिक लोकशाही नाकारली जाते आणि राजकीय लोकशाहीचे स्वरूप जातीय (कम्युनल) किंवा जाती-आधारित बनते. म्हणून राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचा, सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर भर होता. त्याचप्रमाणे लोकशाही बळकट करण्यासाठी अहिंसक मार्गाचा वापर ही त्यांनी पूर्वअट मानली होती. 'कोणत्याही रक्तपाताविना क्रांतिकारक बदल घडवून आणणारी शासनपद्धती म्हणजे लोकशाही', असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. परंतु आज जमावाचा हिंसाचार वाढत असताना डॉ. आंबेडकर यांची शिकवण सार्‍यांनी घ्यावी, अशी वेळ आली आहे.

राष्ट्रीय योगदान

राष्ट्राची ही संकल्पना विकसित होण्यात डॉ. आंबेडकरांची मदत झालीच, पण 'राष्ट्रीयत्वा'ची एक पूर्वअट आपल्या देशात पूर्ण झालेली नसल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले होते. त्यांचे याबाबतचे निरीक्षण असे की, 'स्वत:स राष्ट्र म्हणविणार्‍या सर्व लोकांचा संवाद, सहभाग आणि भागीदारी यांतून आलेली सामाजिक एकोप्याची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व.' राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे, हे सामाजिक जीवनात समता आणि बंधुता किती आहे, यावर ठरते. देशात आर्थिक व सामाजिक पातळयांवर मोठी विषमता असताना आणि अलीकडल्या काळात आंतर-जातीय, वांशिक आणि धर्मीय तणाव वाढत असताना 'राष्ट्र' विकसित होण्यासाठी आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्यक्षात दिसण्यासाठी आपण डॉ. आंबेडकर यांच्याकडून शिकवण घेतली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना लिहून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष योगदान दिले.देशाची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात राज्यघटनेचे विशेष योगदान आहे. राज्यघटने देशातील सर्व नागरिकांना मुलभूत हक्क आणि न्यायाची हमी दिली.आपली राज्यघटना मानवी मुल्यांचा पुरस्कार करणारी आहे.म्हणून आपल्या देशाची राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आहे.भारतीय राज्यघटनेमुळे आपला देश अस्थिर झाला नाही.देश अस्थिर करण्यचे अनेख प्रेयत्न झालेत.देशाचे विभाजन करणार्‍या खलिस्तान,गोरखल्यांड इत्यादी विघटनकरी घटना घडल्यात परुंतु देश अस्थिर झाला नाही.

डॉ. आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे राज्य-पुनर्रचनेबाबतची त्यांची भूमिका. प्रादेशिकतावाद बळावू नये, म्हणून एकच भाषा बोलणार्‍या प्रांतांचीही अनेक राज्ये असायला हवीत, अशी त्यांची सूचना होती आणि आकाराने लहान, पण आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्ये असावीत, असे त्यांचे मत होते. राज्ये आकाराने लहान असल्यास शासकता (गव्हर्नन्स)चांगली असते आणि अशी राज्ये दलित-अल्पसंख्याकांना अधिक चांगल्या प्रकारे सामावून घेणारी असतात, असा विश्वास त्यांनी मांडला होता. मराठीभाषक प्रांताची चार राज्ये व्हावीत असे त्यांचे मत होते आणि विदर्भ राज्य हे अर्थातच त्यांपकी एक होते.

डॉ. आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाची पुरेशी चर्चा सहसा होत नाही. स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असताना, 'पुनर्बाधणी आणि पुनर्वसन योजना १९४२-४६' तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१-५५ च्या पहिल्या पंचवार्षकि योजनेने त्या योजनेचा आधार घेतला. डॉ. आंबेडकरांनी कामगारविषयक धोरण आखलेच, पण अनुसूचित जातींविषयीचे धोरण आणि महत्त्वाचे म्हणजे पाणी आणि वीज यांच्या विकासाचेही धोरण त्यांनी आखले होते.त्यानी ओद्योगीकारणाचा पुरस्कार केला होता. ओद्योगीकारण हे देशातील आवशक गरज आणि देशातील स्त्रोत यावर आधारीत असले पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ ते ४६ च्या दरम्यान शाश्वत विकासाबाबत आपली भूमिका मांडली होती.

निष्कर्ष

१ आधुनिक भारताच्या जडण घडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान ऐतिहासिक आणि दूरगामी परिणाम करणारे ठरले आहेत.

२ देशाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची गरज भासत आहे.

३ भारताची अखंडता आणि एकता टिकवीन्यासाठी सामाजिक समतेची गरज आहे असे दिसून येते.

४ देशाच्या आर्थिक विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहेत.

५ देशाच्या नेतृत्वाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची गरज भासत आहे.

संदर्भ सूची

१ नरेंद्र चपळगावकर '' भारतीय संविधान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर'' श्रीविद्या प्रकाशन

२ रा.ना.चव्हाण ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शोध व बोध'' अक्षर प्रकाशन

३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर; डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १

४ डॉ.बाबासाहेब आंबेडकर; डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषने आणि विचार खंड ४ भाग १

५तत्रैव पृ २७९

६ श्रीराम निकम ; गांधी- आंबेडकर अस्पृश्यमुक्ती संघर्ष लोकवांडमय ग्रह प्रकाशन

७ Granville Austin – The Indian Constitution corner stone of a Nation Oxford University press

# ''राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान''

प्रा. जयमाला पुंडलिकराव लाडे
मिलिंद महाविद्यालय, मुळावा

**प्रस्तावना :–**

प्रस्तुत निबंध, आर्टस, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, मारेगांव आयोजित तिन दिवसीय आंतराष्ट्रीय इ. कॉन्फरन्स मध्ये प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करीत आहे.

राष्ट्रनिर्मिते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान वाखाणण्यासारखे आहे. संपुर्ण विश्वातील विद्वानामध्ये सर्वोच्च स्थानावर असलेले नाव म्हणजे डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म दिवस १४ एप्रील हा युनायटेड नेशन्सनी दिवस 'ज्ञान दिवस' म्हणुन घोषीत केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांनी जगातील सर्वात प्रतिष्ठीत विद्यापीठातून सर्वाधिक उच्च शैक्षणिक पदव्या मिळविल्या आहेत व त्या परमोच्च ज्ञानाचा उपयोग करून त्यांनी संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेचा शास्त्रशुध्द अभ्यास केलेला आहे. नुसता अभ्यासच केला नाही तर त्यांच्या ज्ञानाचा उपयोग राष्ट्राच्या उत्कर्षासाठी झाला आणि होत राहणार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे जनक, कायदेतज्ञ, समाजसुधारक, जातीयवादा विरूध्द लढणारे सेनानी, सामाजिक क्रांतिकारक, महिलांच्या हक्काचे प्रणेते, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञ, तत्वज्ञ कामगारांना तारणारे शिल्पकार, एक सृजनशिल लेखक, उत्तम वक्ते, प्रजासत्ताक भारताचे संस्थापक, बुध्द धर्माचे पुनरूज्जीवन करणारे महामानव, ज्ञानाचे प्रतिक व जगातील महान व्यक्ती अशा हया महामानवाचा राष्ट्रनिर्माणातील योगदानाचा अभ्यास करणे हाच प्रस्तुत निबंधाचा उद्देश आहे.

## संशोधनाची उद्दिष्ठे :–

१) भारतीय संविधानाचे राष्ट्रीय निर्माणात योगदानाचे महत्व अभ्यासणे.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या 'राष्ट्र' या संकल्पनेचा अभ्यास करणे.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा राष्ट्राच्या उभारणीतील योगदान अभ्यासणे.

## अभ्यास पध्दती :–

प्रस्तुत शोध निबंधाकरीता दुय्यम स्त्रोताचा आधार घेतला आहे. माहितीचे दुय्यम स्त्रोत हे, जर्नल्स, वर्तमानपत्रे, विशेषांक, आणि पुस्तके आहेत. तसेच वर्तमानपत्रे ई.

## भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर :–

संपूर्ण जगाला ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना/संविधान हे दोन्ही शब्द एकत्रित वापरले जातात. बाबासाहेब घटना समितीच्या सिमतीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. बाबासाहेबांनी ३९५ कलमी मुक्तीचा जो जाहीरनामा लिहिला त्या मुक्तीच्या जाहिरनाम्याविषयी विचार केला, तर तत्कालीन समाजव्यवस्था आणि त्या समाजव्यवस्थेत एकुणच असलेली, शोषणाची सरंजामी आणि भांडवली आणि इथल्या ९६.५ टक्के समुदायाच्या हिताची कुठेच नसलेली मांडणी, एकुणच तत्कालीन राजकीय नेत्यांच्या भूमिकेत असल्याचे दिसते, पण बाबासाहेबांनी या सगळया संघर्षाला सामोरे जात राज्यघटना लिहित असतांना २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवस केलेला जो काही संघर्ष आहे. त्या संघर्षाची निष्पती आपल्याला पूर्ण संविधानात दिसते. संविधानामध्ये बाबासाहेबांनी जी मांडणी केली आहे, त्या मांडणीचा आजच्या समकालीन परिस्थिती संदर्भात विचार केला तर आपण अधिक चांगल्या पध्दतीने बाबासाहेबांना अपेक्षित असलेली, अर्थातच बाबासाहेबांनी राज्यघटनेत मांडलेली जी काही भूमिका आहे आणि त्या भूमिकेचा विचार केला तर, स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीमध्ये आम्हाला खऱ्या अर्थाने भारतीय संविधान आणि त्या संविधानावर आधारीत असलेली समता, न्याय, बंधुता, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही, समाजवादी गणराज्याची जी भूमिका होती आणि त्यातही महत्वाची 'व्यक्तीची प्रतिष्ठा' आणि त्या व्यक्ति प्रतिष्ठेवर आधारित ही समाजव्यवस्था आहे काय? हा प्रश्न आवासून उभा आहे.

इथल्या राजकारण्यांनी राजकीय स्वार्थापोटी घेतलेल्या भूमिका केवळ संधीसाधु व स्वार्थदृष्टी असलेले राजकारणी संविधानाचा विचार करतात काय? आपण संविधान समजून घेतांना एक महत्वाचा प्रश्न आहे की तो म्हणजे धर्मनिरपेक्षतेचा! आज आपल्या देशात ज्या घटना घडत आहेत त्यावरून हे लक्षात येते आहे की एका विशिष्ट पंथाला किंवा धर्मालाच मान्य करणे व त्याचा प्रचार व प्रसार करणे सध्या 'हिंदू राष्ट्र' या शब्दाला महत्व देण्याचा प्रयत्न सुरू आहे. भारतामध्ये अनेक जाती, धर्म पंथाचे लोक एकत्रित गुण्यागोविंदाने राहत आले आहे. राज्यघटनेची सुरूवातच 'वूई द पिपल ऑफ इंडिया म्हणजेच आम्ही भारतीय लोकांनी ही राज्यघटना चालवली आहे अशी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, आपल्या देशातील जात, धर्म, पंथ, लिंग हे भेद राष्ट्रीय एकात्मतेला मारक ठरतात. आज ही परिस्थिती जवळ आली आहे असे वाटत आहे आणि भारतीय लिहतांना एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य अभिप्रेत आहे. विषमता असलेल्या देशात जर योग्य राज्यकर्ते आले नाहीत, तर देश ज्वालामुखीच्या तोंडावर आहे असे समजावे असा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना सादर करतांना दिली होती. लोकशाहीची एक जगप्रसिध्द व्याख्या आहे ती म्हणजे ''लोकांनी लोकांकरीता लोंकातर्फे लोकांसाठी चालविलेले राज्य'' बाबासाहेबांच्या मते, लोकांसाठीपेक्षा लोकांनी शब्द जास्त महत्वाचा आहे. आज चित्र असे दिसते की, सत्ता लोकांसाठी नाही तर स्वत:साठी वापरीत आहे. म्हणुन देशातील राजकीय वातावरण फार बदलले आहे. म्हणुनच तर कोरोना सारख्या संकटकालीन परिस्थितीत सुध्दा लोकसभेमध्ये 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द वगळून पंथनिरपेक्ष शब्द संविधानाच्या उद्देशिकेत समाविष्ठ केला जावा असा एक ठराव पारित करण्याची भूमिका मांडली होती.

मनुस्मृती अधारीत पंथनिरपेक्षता मान्य केली, तर राज्यघटनेतील ३९५ कलमी मसुद्यामध्ये मांडलेल्या मानवी मूल्यांना अर्थ राहणार नाही. त्यात धर्मनिरपेक्षता, समता, न्याय हे तत्व सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात सर्वांसाठी असले पाहिजे. आज आपण बघतो की, अभिव्यक्ती स्वातंत्र्य सुध्दा दाबुन टाकल्या जात आहे. कुणि काय खावे व काय खाऊ नये? हयावर निर्बंध येत आहेत. शेतकरी आंदोलनाला दाबून टाकण्याचा प्रयत्न होत आहे. शोषित, उपेक्षीत आणि वंचित वर्गावर होणारा अन्याय हे सर्व बघितले तर बाबासाहेबांना अपेक्षित असलेले सामाजिक लोकशाही असलेले राष्ट्र आहे काय? हा प्रश्न पडतो कारण आपण ज्या वर्ग आणि लिंगभेद विरहीत समाजासाठी, बाबसाहेबांनी दिलेला संघर्ष आणि बाबासाहेबांनंतर अद्यापही चालत असलेला संघर्ष त्यासाठी अनेकांनी दिलेले बलिदान, त्या संघर्ष व बलिदानाची फलनिष्पती काय होणार? हे समजुन घेणं आणि एकुणच येथे असलेल्या या सगळया षडयंत्राला बळी न पडता, समान्य माणसापर्यंत पोहचून, सामान्य माणसाला, संविधान आणि संविधानावर आधारीत असलेली समतामूलक समाज रचना आणि समाजरचनेचा मूळ गाभा असलेला आंबेडकरी विचार पोहचविणे आणि रूजविणे ही खरी तर काळाची गरज आहे. म्हणूनच बाबासाहेबांच्या विचारांचा आणि त्यावर आधारित सामाजिक, राजकीय भुमिका घेणाऱ्या साधनांचा विचार करणे गरजचे आहे. भारतीय राज्यघटना जिवंत राहिली तरच भारत एक 'राष्ट्र' म्हणुन अस्तित्वात राहिल. त्यासाठी शोधनिबंध, परिषद, प्रसारमाध्यमे हया माध्यमातून संघर्ष करणे गरजेचे आहे. कारण संघर्ष हा परिवर्तनाचा आणि व्यक्तिच्या अस्तित्वाचा आहे.

## ''राष्ट्रवाद'' आणि बाबासाहेब आंबेडकर :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादाच्या संकल्पनेत सामाजिकतीतला, विवेकनिष्ठेला महत्व आहे. बाबासाहेबांचे हया विषयावरचे चिंतन आजच्या काळातही मार्गदर्शक आहे. भारताची आधुनिक पायावरील राष्ट्र म्हणून जडण—घडण विसाव्या शतकात, १९२० ते १९५० या दशकात झाली. या काळात राजकीय स्वातंत्र्य तर मिळालेच, पण राज्यघटना, राजकीय—आर्थिक आणि सामाजिक घडी, राज्यांची पुनर्रचना, फाळणी तसेच आर्थिक विकास आणि सामाजिक विकासाच्या कृती कार्यक्रम असे सारे या काळात घडत गेले. या पायावर आधुनिक भारतीय राष्ट्राची घडण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकाराचा कार्यकाळी हाच आहे.

सामान्यत: एकोणिसाव्या शतकापासून 'राष्ट्रवाद' या संकल्पनेचा प्रभाव जगभर जाणवू लागला. 'राष्ट्रवाद' ही केवळ एक मानसिक संकल्पना असल्याचे पाश्चात्य अभ्यासक प्रो.झिरमन यांनी म्हटले आहे. अनेक देशांमधील विचारवंताना धर्म, शिक्षण, कला, साहित्य संस्कृती व इतिहासाच्या पुर्नमांडणीसाठी, 'राष्ट्रवाद' हे प्रभावी साधन वाटत होते. 'राष्ट्रवाद' हया संकल्पनेला देशकाल स्थितीनुसार अनेक परिमाणे आहेत. मात्र भारतीय समाजाच्या संदर्भात राष्ट्रवादाचे तीन अंत:प्रवाह जाणवतात. समृध्द भूतकाळ, श्रध्दा आणि अस्मिता यांची धर्मनिष्ठा गोळाबेरीज मांडणारा हिंदुत्वाची दिशा घेवून निघालेला राष्ट्रवाद हा एक प्रवाह होय. देशातील विविधतेतील एकतेवर विशेष भर देणारा उदारमतवाद वळणाचा गांधी—नेहरूंचा राष्ट्रवाद हा भारतीय राष्ट्रवादाचा दुसरा

प्रवाह होय. तर जोतीराव फुले, आगरकर आणि डॉ. आंबेडकरांच्या विचार मंथनातून प्रकटलेला 'विवेकनिष्ठ राष्ट्रवाद' हा भारतीय राष्ट्रवादाचा तिसरा अन महत्वाचा अंतप्रवाह मानला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाज व्यवस्थेच्या विषमतोलाची आणि गुण मर्यादांची प्रगल्भ जाण होती. भारतीय समाजजिवन, इतिहास, कला, संस्कृती विद्याक्षेत्रे या सर्वांचे सर्वस्पर्शी आकलन त्यांना होते. त्यांच्या मते, ''केवळ भोगोलिक आकार असलेला देश म्हणजे राष्ट्र नव्हे. समान भाषा, वंश, जात, श्रध्दा व अस्मिता म्हणजे 'राष्ट्र' नव्हे उलट 'राष्ट्र' ही एक वस्तुनिष्ठ समूहभावना आहे. ती सद्सदविवेकशक्तीची भावना आहे. वंश, भाषा भुगोल व संस्कृती या गोष्टी निखळ राष्ट्रीयत्वाच्या प्राथमिक गरजा नव्हेतच, हे त्यांनी 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या ग्रंथात पटवून दिले आहे. त्यांनी 'राष्ट्र' संकल्पनेचे विशुध्द जिवनचिंतनाची विवेकनिष्ठ अर्थवत्ता बहाल केली. मानवी समूहजिवनातील एकत्वाची व आपलेपणाची भावना हाच 'राष्ट्रवादाचा' मूलाधर आहे असे मानत. देशभरातील विविध जात धर्म, भाषा, श्रध्दा यांच्या विवेचनातून प्रकटलेली एकत्वाची भावना हे राष्ट्रवादाचे केंद्रक आहे असे ते मानत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादाला सर्वकष शोषणमुक्तीचा संदर्भ होता. देशातील शोषित समूह शोषणमुक्तीशिवाय राष्ट्रीय प्रवाहात समरस होणारच नाहीत. हे सत्य त्यांना माहित होते. त्यांना राष्ट्रवादातील धर्मसत्तेचे अधिष्ठान अमान्य होते. भारतीय जातीसंस्थेचे उच्चाटन ही भारतीय राष्ट्रवादाची पहिली पायरी असे ते मानीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकारांच्या राष्ट्रवादाला बुध्दिप्रामाण्यवादाचे तत्वगंभीर अधिष्ठान होते. प्राचीन संस्कृती, परंपरा, धर्म, वंश इत्यादिंच्या भाबड्या व अतिरंजीत गौरवातून असहिष्णुतेचा, अविवेकाचा जन्म होता. अशा असहिष्णु राष्ट्रभावनेतुन राष्ट्राचे अकल्याण होते असे बाबासाहेबांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाला महत्मा जोतिराव फुल्यांच्या राष्ट्रचिंतनाची पार्श्वभूमी लाभली होती. जोतिरावांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथात म्हटले आहे, यावरून या बळीस्थानातील एकंदर शुद्रातिशुद्रांसह भिल्लं, कोळी वगैरे लोक विद्वान होवुन विचार करण्यालायक होई तो ते सर्व सारखे 'एकमय लोक' झाल्याशिवाय (नेशन) होवु शकत नाही. जोतिवारांच्या या अवतरणात त्यांचा समताधिष्ठीत राष्ट्रवाद स्पष्ट प्रतिबिंबित झाला आहे. ''एकमय लोक'' म्हणजेच खरे राष्ट्रनिर्माण अशी जोतीराव फुल्यांची धारणा होती. जोतीरावांच्या या राष्ट्रमिमांसेचे व्यापक विकसन पुढे डॉ. आंबेडकरी राष्ट्रवादात झाले. ब्रिटीश साम्राज्यवाद, स्वातंत्र्यांची चळवळ, जगभरातील फॅसिस्टांची आंदोलने, मानवमुक्तीचे लढे अशा सगळ्या जळत्या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी विवेकनिष्ठ, समाजवादी स्वभावाच्या राष्ट्रवादाची उभारणी केली.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या राष्ट्रवादाच्या मीमांसेत राष्ट्रवादाच्या अवरोधांचीही चिकित्सा केली आहे. देशभरातील विविध भाषांच्या अस्तित्वासोबतच अवघे राष्ट्र एका भाषेतून बोलले आणि व्यक्त झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. आपल्या देशातील व्यक्तिपूजेचे अविवेकी कर्मकांड हा भारतीय राष्ट्रवादाच्या निकोप घडणीतील एक प्रमुख अवरोध असल्याचे मानत असत. डॉ. आंबेडकरांचा आंधळ्या व्यक्तिपूजेपेक्षा व्यक्तिचिकीत्सेवर अधिक भर होता. राष्ट्रापेक्षाा कुणिही महात्मा वा व्यक्ती मोठी नाही असे ते मानत. राष्ट्रनिर्माणाच्या उदात्त कार्यातील एक प्रमुख अडसर ठरणाऱ्या व्यक्तिपुजेपासून भारतीयांना सावध करतांना त्यांनी लिहले होते, 'व्यक्तिपूजा करतांना आपल्याला अधिक सावध राहिले पाहिजे. कारण आज आपल्या देशात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, ज्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी खिसेकापूंपासून सावधान' असे फलक लावले जातात. तसेच आता महापुरूषांपासून सावधान असे फलक लावण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

अशातऱ्हेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा विवेकशील, मानवतावादी, इहवादी स्वभावाचा होता. त्यांनी अध्यात्माऐवजी सामाजिक नितिला, धर्मनिष्ठेपेक्षा विवेकनिष्ठेला, वंश, जन्म, भाषा, अस्मिता या घटकांऐवजी उदात्त मानवनिष्ठेला महत्व देणारा इहवादी राष्ट्रवाद, वंशश्रेष्ठत्वाला, भाषिक अहंकारांना समूळ नकार देत समाजातील समस्तांच्या कल्याणाला गती देणारा उदात्त राष्ट्रवाद मांडला. समकालीन काळातील वैचारीक, सास्कृतिक अराजकाच्या काळात बाबासाहेबांचे राष्ट्रवादी चिंतन सर्वांसाठीच मार्गदर्शक प्रेरणादायी ठरले आहे.

अशातऱ्हेने वरिलप्रमाणे बाबासाहेबांच्या विचारातच राष्ट्रप्रेम दिसुन येते. कारण सामाजिक एकोप्याशिवाय राष्ट्राची निर्मिती होवू शकत नाही. राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे, हे सामाजिक जिवनात समता आणि बंधुता किती आहे, यावर ठरते. देशांत आर्थिक व सामाजिक पातळयांवर मोठी विषमता असतांना आणि अलिकडच्या काळात आंतरजातीय वांशिक आणि धर्मिय तणाव वाढत असतांना 'राष्ट्र' विकसीत होण्यासाठी आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्यक्षात असण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी मांडलेल्या राष्ट्रवादाची खरी गरज आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे राष्ट्रीय उभारणीत योगदान :–

खऱ्या अर्थाने प्रस्तुत शोधनिबंधात मांडलेल्या बाबासाहेबांच्या विचारातच राष्ट्राची निर्मिती होते. कारण डॉ. आंबेडकरांचे विचार व कृती न्याय, समता, बंधुता ह्यावर आधारलेली आहे. त्यामुळे हया देशातील शोषितांचे, उपेक्षितांचे, दलितांचे, वंचितांचे हक्क व अधिकार हयांचे संरक्षण होते आहे. स्त्रियांच्या उत्थान व प्रगति ही केवळ संविधानिक अधिकारामुळेच शक्य आहे. भारतीय समाजात असलेल्या सर्व घटकांचे संरक्षण करण्याची क्षमता फक्त राज्य घटनेतच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळेच जातीव्यवस्थेचे उच्चाटन, अस्पृश्यांची उन्नती, दलित चळवळीचा उदय, महिला चळवळींना भक्कम आधार त्याचबरोबर विवाह, धर्म, अर्थ, शिक्षण, राज्य हया सामाजिक संस्थामध्ये आमुलाग्र/क्रांतीकारक बदल झाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, एखाद्या राष्ट्राची प्रगती तेंव्हा शक्य आहे जेंव्हा त्या राष्ट्रातील महिलांची प्रगती होईल. आज भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात वाटचाल करीत आहेत फक्त आणि फक्त संविधानीक अधिकारामुळेच! अशातऱ्हेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीत योगदान खुप व्यापक आहेत.

## निष्कर्ष :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रत्येक विचार व कृती ही राष्ट्रीय जडणघडणीत केंद्रबिंदु आहे. डॉ. बाबासाहेबांच्या कार्यामुळे शोषितांना न्याय मिळाला. कामगारांना त्यांचे अधिकार व सवलती प्राप्त झाल्यात. जातीव्यवस्थेचे निर्मुलन होत आहे. आज अनेक चळवळींचा प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांचे विचार आहेत. मग ती शेतकऱ्यांची चळवळ असेल किंवा विद्यार्थ्यांची चळवळ किंवा महिलांची चळवळ किंवा आरक्षण संदर्भातील चळवळ असेल. अनेक आमुलाग्र बदल भारतीय समाजात होत आहेत. भारतीय समाजाच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची नितांत गरज आहे. समस्या सोडविण्यासाठी धोरणे तयार करण्याची क्षमता बाबासाहेबांच्या विचारातच आहे. कारण डॉ. बाबासाहेबांची पध्दती ही विषयाचा सखोल अभ्यास करून, कारणे ओळखून मगच उपाय शोधण्याची शिस्त होती. म्हणुनच आज ही त्यांना सुचविलेले उपाय राष्ट्रापुढील समस्यांचा सामना करण्यासाठी समर्पक ठरतात.

## संदर्भ :–

१) नितनवरे अनिल, 'बाबासाहेबांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद', ६ डिसेंबर २०१७.www.esakal.com
२) थोरात सुखदेव, 'राष्ट्रउभारणीत – डॉ. आंबेडकराचे योगदान' ७ डिसेंबर, २०१८.www.loksatta.com
३) पाटील शमीभा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भारतीय राज्यघटना आणि आजचे समाज वास्तव, २० एप्रील २०२० eprabuddhabharat.com
४) स्थुल, सविता, 'राष्टनिर्माते, ज्ञानोपासक:डॉ. बाबासाहेब आंबेडकर, B.Aadhar,डिसेंबर २०२०.
५) समाजशास्त्र 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.२०१४'

# "राष्ट्र उभारणीसाठी शिक्षण आणि राष्ट्रभाषा हिंदीचा आग्रह धरणारे लोकसेवक मधुकरराव चौधरी"

**डॉ. भारती प्रमोद गायकवाड**
सहायक प्राध्यापक
धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचालित,
लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय,
जळगांव.

• **सारांश (Abstract)**:

प्रस्तुत शोध निबंधात लोकसेवक मधुकरराव चौधरी यांच्या शैक्षणिक योगदानाबाबतचे कार्य आणि त्यांचे शैक्षणिक विचार याबाबत विवेचन करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रभाषा हिंदी प्रचार प्रसार कार्याचे देखिल स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

आरदणीय मधुकरराव चौधरी हे महाराष्ट्राच्या २० व्या शतकाच्या उत्तरार्धा मधील महत्वाचे लोकनेते होते वृत्तीने व आचरपणाने ते पूर्णत: गांधीवादी व्यक्तीमत्वाचे होते. त्याच्या जीवनात त्यांना पथप्रदर्शन करणाऱ्या महात्मा गांधी, विनोबा भावे, साने गुरुजी, दादा धर्माधिकारी, प्रा. ठाकुरदास बंग या सारख्या महान व्यक्ती होत्या. त्यामुळे त्यांचे जीवन सर्वांगाने परिपुर्ण झाले. गांधीजीच्या जीवन शिक्षणाची संकल्पना नव्या पिढीला व्यवहारोपयोगी कश्या प्रकारे करता येईल. यादृष्टिने शिक्षक आणि विद्यार्थी हे दोन महत्वाचे घटक समोर ठेवुन त्यांनी शिक्षणक्षेत्र कसे सक्षम व प्रभावशाली होवुन नव्या पिढीला ज्ञानाने परिपुर्ण कसे करता येईल याचा विचार प्राधान्याने केला होता. राष्ट्र निर्माण करण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे. शिक्षकांना अखिल मानवजातीचा शिल्पकार म्हणुन स्थान देतात कारण शिक्षक हो विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्तम काम करतात. तसेच त्यांनी आदिवासी शिक्षणालाही खुप महत्व दिले. सातपुडा पर्वतात काम करतांना शिक्षणामुळे आदिवासींचे जीवन कसे बदलत जाते याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला. ग्रामीण भागात शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणुन गावोगावी हिंडुन आपल्या सहकाऱ्या सोबत पाहणी करुन त्यांनी ग्रामीण भागात शाळा महाविद्यालये काढून स्थानिक नेतृत्वास विकासास संधी उपलब्ध करुन दिली. राज्याचे शिक्षणमंत्री असतांना प्रशासकीय दृष्ट्या सुकरता यावी म्हणुन विविध शिक्षण मंडळाची निर्मिती केली शिक्षण विषयक श्वेतपत्रिका सादर करुन अभ्यासक्रमाची पुर्नरचना केली बालकल्याणी या संस्थेची स्थापना केली. एक सुर एक ताल या कार्यक्रमाची सुरुवात केली. १९९० साली उत्तर महाराष्ट्र विद्याठाची स्थापना केली. ग्रंथलय चळवळीकडे लक्ष दिले गाव तेथे लायब्ररी ही योजना सुरु केली. त्या बरोबरच स्त्रीशिक्षण, विज्ञान शिक्षण, उत्तुंग भारत, नेतृत्व राष्ट्रीय एकात्मता, शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविले वेतनश्रेणी, सुधार, वेतन बॅकेमार्फत मिळू लागले, सेवा शाश्वती मिळाली, निवृत्ती वेतनाची सुविधा हक्क समजुन उपलब्ध करुन दिली. तसेच राष्ट्रभाषा हिंदीच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. हिंदी भाषेला विश्वभाषा म्हणुन मान्यता मिळावी यासाठी त्यांनी अथक परिश्रम केले अशा रितीने शिक्षण क्षेत्रात अनेक उपक्रम राबवुन देशाचा नागरीक हा सर्वगुण संपन्न परिपुर्ण बनावा हा त्यांचा मानस होता. शिक्षण क्षेत्रात सतत प्रयोगशिल अशा मधुकरराव चौधरी यांनी समाजास सातत्याने शैक्षणिक सामाजिक मार्गदर्शन केलेले आहे. त्यांच्या शिक्षण या संकल्पनेचा, अभ्यासक्रम, अध्ययन–अध्यापन प्रक्रिया मूल्यमापन याचा चिकित्सक अभ्यास करुन स्पष्टीकरण केलेले आहे.

**प्रास्ताविक** :

स्वातंत्र्य सेनानी धनाजी नाना चौधरी यांचे मधुकरराव चौधरी हे सुपुत्र होते. १९३६ साली आखिल भारतीय राष्ट्रीय कॉग्रेंसचे पहिले अधिवेशन फैजपुर या गावी झाले त्यावेळी बाळासाहेब मधुकरराव हे अवघ्या आठवर्षाचे होते. या अधिवेशनात छोटा स्वयंसेवक बाळ मधुकर यांना राष्ट्रपिता महात्मा गांधीकडुन अशिर्वाद मिळाला जल्दी बडा हो जा बेटा!

मधुकरराव हे छोटे क्रांतीवीर होते १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात आपल्या मावळ्यांसोबत गावोगावी जावुन त्यांनी चावड्यांवर तिरंगा फडकविला साने गुरुजीनी लिहलेल्या बुलेटीन पोहचविण्याचे काम ते आपली सेना सोबत घेवुन करीत असत त्यावेळी धनाजी नाना, विनोबा भावे, साने गुरुजी यांचे संस्कार त्यांच्या बालमनावर झाले.

उच्च शिक्षणासाठी ते वर्धा येथे गेले तेथे महात्मा गांधींच्या आणि प्रा. ठाकुरदास बंग यांच्या प्रतिभावंत सहवासाने स्नेहाने त्यांचे व्यक्तीमत्व फुलले बहरले आणि साऱ्या महाराष्ट्राला शैक्षणिक दृष्टि देण्यास समर्थ ठरले. युवा अवस्थेपासुनच त्यांना राष्ट्रनिर्माणाची ओढ होती राष्ट्रीय शिक्षणाच्या विचाराने ते भारावले होते म्हणुन वयाच्या २८ व्या वर्षी ते राजकारणात आले राज्याच्या मंत्रीमंडळात मंत्री झाले. १९६३ ते १९७२ या कालावधी मध्ये ते शिक्षणमंत्री झाले परंतु शिक्षणाची आवड आणि राष्ट्रनिर्मातीचा ध्यास असल्याने शिक्षण पध्दतीत अमुलाग्र बदल करण्यासाठी नाविण्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी शिक्षणमंत्री

मधुकरराव चौधरी म्हणतात “या काळात महिन्यातुन किमान २० दिवस मी सारखा शैक्षणिक कामासाठी राज्यभर हिंडत असे शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीशी, अध्यापकांशी, शिक्षणतज्ञांची, नेत्यांसोबत व जनसामान्यांशी मी सुसंवाद साधत होतो.”

अशा रितीने ग्रामीण भागातील तळागाळातील मुलांपर्यंत शिक्षण पोहचविणे गरजेचे आहे. म्हणुन आपल्या सहकाऱ्याबरोबर गावोगावी पाहणीकरुन शाळा, महाविद्यालये काढली. स्थानिक नेतृत्वास संधी दिली गाव तेथे लायब्ररी ही योजना सुरु केली.

शिक्षण क्षेत्रात अनेक उपक्रम राबवुन देशाचा नागरीक हा सर्वगुण संपन्न परिपूर्ण बनावा हा त्यांचा मानस होता विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबवुन कृतीशिल बनावे त्यांना मुलदयोगी शिक्षणाचे प्रशिक्षण देवुन आर्थिक सक्षम बनवावे पर्यावरण लोकसंख्या शिक्षण अंधश्रध्दा निर्मुलन राष्ट्रीय एकात्मता मूल्यशिक्षण विविध क्षेत्रातील गाईडन्स अन्ड कौन्सिलिंग करणे विद्यार्थ्यांना विविध संधी उपलब्ध झाल्या पाहीजे असे त्यांना वाटत असे.

- **संशोधन पध्दती** :
  - **अध्यनाचे उद्देश** :

    १. लोकसेवक मधुकरराव चौधरी यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

    २. राष्ट्रभाषा हिन्दीला विश्वभाषा म्हणून मान्यता मिळावी म्हणून बाळासाहेब चौधरी यांनी केलेल्या परिश्रमाची माहिती घेणे.
  - **गृहितकृत्य** :

    १. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव आणि एकात्मता निर्माण होईल या आधारावर त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले.

    २. हिन्दी या भाषेला विश्व भाषा म्हणून मान्यता मिळावी म्हणून बाळासाहेब चौधरींनी अथक परिश्रम केले.
- **तथ्य संकलन** :

सदर शोध निबंध हा लोकसेवक मधुकरराव चौधरी यांच्या शैक्षणिक कार्य व हिन्दी ला राष्ट्रभाषेचा दर्जा प्राप्त करण्यासाठी त्यांनी जे योगदान दिलेले आहे. या संदर्भातील पुस्तके सदर संशोधन लेखात वापरण्यात आली म्हणजे व्दितीय स्त्रोतावर आधारित तथ्य संकलीत करण्यात आले.

- **शिक्षण मंत्री असतांना लोकसेवक मधुकरराव चौधरी यांनी शिक्षणासंबंधी केलेले महत्वपुर्ण कार्य** :
- **श्वेत पत्रिका** –

  शिक्षण पध्दती मधील उणिवा व अडचणी लक्षात घेवुन शिक्षणाची पुनर्रचना करण्याच्या दृष्टिने स्वातंत्रोत्तर काळात शिक्षणाचा प्रसार करण्याबरोबरच गुणवत्तापुर्ण शिक्षण कसे मिळेल याकडे लक्ष केंद्रित केले गेले प्राथमिक शिक्षण समाज शिक्षणावर भर देण्यात आला. १९६४ मध्ये राष्ट्रीय पातळीवर देशातील एकुण शिक्षण व्यवस्थेत सुधारणा सुचविण्यासाठी कोठारी आयोग नेमण्यात आला. कोठारी आयोगाच्या शिफारशींचा अभ्यास करुन १९६८ मध्ये महाराष्ट्रातील शिक्षण विषयक परिवर्तनाची दिशा दिग्दर्शन करणारी महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या शिक्षणविषयक विचार आत्मसात करुन कृतीशील विचारवंत असलेल्या शिक्षणमंत्री मा. मधुकरराव चौधरी यांनी ती श्वेतपत्रिका विधिमंडळासमोर मांडली यामध्ये अधिशिक्षणाचा विस्तार करायचा व त्यातूनच गुणवत्ता, वाढीकडे जायचे, सार्वत्रिक अभ्यासक्रम हा जगाबरोबर पावले टाकता यावित यासाठी करण्यात आला. या श्वेत पत्रिकेच्या माध्यमातुन १९७० मध्ये सर्व समावेशक विचार करुन आराखडा तयार करण्यात आला यामध्ये शिक्षणाचे उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली.
- **श्वेत पत्रिकेतील काही धोरणे** :

प्राथमिक शिक्षण घराजवळ, माध्यमिक शिक्षण घरापासुन ३ ते ५ किलोमीटर अंतरामध्ये आणि उच्च शिक्षण घरापासुन १० ते १५ किलोमीटर अंतराच्या आत मिळावे. अश्या सुचना त्यात होत्या विद्यापीठ कायद्यात तशी सुधारणा करण्यात येईल. तसेच आठवी पासुन इंग्रजी असावे अशी शिफारस त्यात होती. नवसाक्षरांसाठी विकासशाळा, किसान शिक्षण योजना, मुलींसाठी शिक्षणाच्या खास सोयी उपलब्ध. १०+२+३ असा विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षणाचा आकृतीबंध राहील गणित,विज्ञान अभ्यासक्रमाचे आधुनिकीकरण केले जाईल शिक्षणाच्या सर्व पातळीवर अंतर्गत चाचणी सत्र पध्दती शिक्षण संस्थेत विकास निधी

स्थापन करण्यात येईल राज्य पातळीवर गुणवत्ता वाढविण्याच्या विविध संस्था विकासासाठी प्रयत्न होतील. जिल्हा निहाय विकास योजना तयार केल्या जातील शिक्षण विषय कायदा तयार करण्यात येईल. अश्यारितीने सर्वांच्या विचार विनीमयातुन मधुकरराव चौधरींनी वरील धोरण जाहीर केले.

- **ग्रंथालय कायदा :**

सन १९६७ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचा कायदा १ ते १९६८ पासुन लागू झाला. बाळासाहेबांना ग्रंथालयाबद्दल जिव्हाळा होता ते म्हणतात. ज्ञानगंगा लोकगंगेला जावुन मिळाली पाहिजे पुर्वी ग्रंथालये मोठ्या शहर गावांपर्यंत पसरलेली होती नव्या कायद्याने **गाव तिथे ग्रंथालय** ही घोषणाच दिली ग्रामीण भागात शाळा महाविद्यालये गेली पाठोपाठ ग्रंथालये समुध्द करण्याकरीता नियोजन केले. ग्रंथालय विकासासाठी देणगीदार दात्यांची भर घालण्यासाठी लोकांना अहवान केले. शासनाने प्रतिवर्षी २५ लाख भरावेत असे ठरले ही योजना यशस्वी झाली. नव्या काळाच्या योजना ध्यानी ठेवुन त्यांना दृष्टि ही दिली.

- **राष्ट्र उभारणी साठी विद्यार्थी :**

विविध प्रकारच्या स्पर्धा परिक्षांमध्ये मराठी युवक मागे पडतात पास होत नाही याचे कारण त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे त्यांनी प्रत्येक विद्यापीठात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केले परंतु ती कालांतराने बंद करावी लागली त्यानंतर त्यांनी युवकांसाठी युथ वेल्फेअर बोर्ड तयार केले याव्दारे प्रत्येक महाविद्यालयातुन विद्यापीठात एक विद्यार्थी प्रतिनिधी म्हणुन पाठविला जाण्याची तरतूद केली. त्यामुळे विद्यापीठाची ध्येय धोरण, अभ्यासक्रम ठरवितांना विद्यार्थ्यांच्या सहभाग महत्वाचा आहे. या उमलत्या वयात विद्यार्थ्यांची विचार शक्ती विकसित होत असते. युवकांची एक प्रचंड शक्ती आहे याचे भान मधुकररांवाना होते.

- **एक सुर, एक ताल:**

संगितकार वसंतराव देसाई यांनी महाराष्ट्र राज्यांचे संगीत संचालक म्हणुन अतिशय मोलाचे कार्य केले चांदापासुन ते बांद्यापर्यंत एक सूर एक ताल या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय गीत देशभक्ती पर गीते शालेय कविता यांना चाली लावुन शाळा –शाळांमध्ये सर्व विद्यार्थी एका सुरात गाणी म्हणत पंतप्रधान पंडीत नेहरु यांच्या समोर शिवाजी पार्कवर एक लाख विद्यार्थ्यांनी समुहगिते सादर केली आणि एक लाख उपस्थितांकडुन राष्ट्रीय गीत म्हणुन घेतले. आनंददायी शिक्षणाची संकल्पना अशा उपक्रमातुन यशस्वी होत असते एक सुर एक तालच्या माध्यमातुन महाराष्ट्रातील शाळा–शाळामधुन शिक्षकांना एक सूर एक ताल च्या माध्यमातुन महाराष्ट्रातील मुलांना समुहगानासाठी पुर्णत: तयार करण्यासाठी मा. मधुकररावांनी एक धाडसी निर्णय घेतला.

- **स्त्री शिक्षण:**

स्त्री शिक्षणासंदर्भात महाराष्ट्र विधानसभेत जे विचार मांडतात स्त्रीयांसाठी मोफत शिक्षण सर्व पातळीवर लागू केल्याने स्त्री प्रश्न सुटणार नाही त्यासाठी समाजात प्रचंड जागृती करण्याचे काम आहे. कुटूंबातील बालसंगोपन वृध्द व्यक्तींना समजुन घेण्यास त्या महत्वाची भूमिका साकारतात त्यादृष्टिने तिच्या नैसर्गिक व संपादित स्वभावास शिक्षणाची जोड दिल्यास आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात विलक्षण प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही असे मा. मधुकररावाचे मत होते. स्त्री शिक्षणाचया दृष्टिने पुरुषांची सुध्दा दृष्टिकोन प्रवृत्ती बदलली पाहिजे. स्त्री शिक्षणासाठी, स्त्री प्रबोधन व्हावे आजही शाळाबाह्य मुलांमध्ये मुलींची संख्या जास्त आहे. स्त्रीयांसाठी शिक्षणाच्या संधी निर्माण करण्याची जास्त आवश्यकता आहे.

- **बालकल्याणी संस्था:**

मा. बाळासाहेब मधुकरराव चौधरी कॅबिनेट मंत्री झाले त्यांना मलबार हिल येथे सरकारी बंगला मिळाला मुंबईतील उच्चभ्रू लोक येथे राहत असत. त्यामुळे घराघरात धुणे भांडी साफसफाई अश्या अनेक कामकरी महिला काम करीत. अशा नोकर चाकरांचीमुले दिवसभर उड्या मारणे, खेळणे भटकणे हीच काम करतांना मधुकरराव बघायचे त्यांच्या मनात विचार आला ही मुल शळेत न जाता दिवसभर उनाडक्या करीत असतात. याबाबत आपली पत्नी कुसूमताई सोबत चर्चा तयांनी केली या मुलांसाठी शाळा सुरु करण्याचे ठरले. कुसूमताई यांनी त्या मुलांना गोळाकरुन गाणे गोष्टी म्हणुण दाखविल्या आणि या संस्थेच्या माध्यमातुन बाळासाहेबांनी तेथील कामकरी महिलांच्या मुलांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. ही मुले हळू–हळू जमू लागली या मुलांच्या शिक्षणासाठी बालकल्याणी नावाची संस्था स्थापन केली.

- **शिक्षकांचे प्रश्न:**

लोकसेवक मधुकरराव चौधरी यांना शिक्षकांबद्दल आपुलकी वाटत असे. त्यामुळे शिक्षकांना नोकरीत शाश्वती असावी, कामाचे तास निश्चित केले गेले, शिक्षण कायदा याव्दारे शिक्षकांच्या दृष्टिने अंत्यत महत्वाचा निवृत्ती वेतनाचा प्रश्न सोडविला, बॅकेव्दारा पगार, सेवांतर्गत प्रशिक्षण, शिक्षण उत्कृष्ट करायचे असेल शिक्षक उत्कृष्ट हवा. त्यासाठी तो शिक्षक आर्थिक चितांमुक्त झाला पाहिजे हे धोरण त्यांनी स्विकारले. म्हणुन सर्वस्तरातील शिक्षक संघटनांशी संवाद साधला त्यांचे प्रश्न समजून घेतले शिक्षकांच्या सर्व प्रश्नांची सोडवणुक त्यांनी केली शिक्षक मित्र शिक्षणमंत्री म्हणुन त्यांचा गौरव करण्यात आला.

- **राष्ट्रभाषा प्रचार प्रसार :**

दि.२८.१२.१९३६ ला फैजपुर कॉग्रेसच्या विराट अधिवेशनात राष्ट्रभाषा हिंदीसाठी एक ऐतिहासिक प्रस्ताव मांडला गेला हमारे हिन्दुस्तान मे राष्ट्रभाषा हिन्दी जाननेवालो की संख्या बडी है, यह सम्मेलन अनुरोध करता है कि राष्ट्रीयता तथा स्थायी हितकी दृष्टिसे अपने अपने मुख्य प्रान्तीय कार्य प्रान्तीय भाषा मे और सार्वदेशिक काम राष्ट्रभाषा मे किया करे. या अधिवेशनात बाल मधुकरराव आपल्या कुशाग्रबुध्दीने संमेलनाचे धडे मनात गिरवत होते. राष्ट्रभाषा हिन्दी बद्दलचे अमाप प्रेम मधुकरराव चौधरींच्या बालमनात याच वयात रुजले गेले ह्या अधिवेशनात राष्ट्रभाषा हिन्दीसाठी जो प्रस्ताव सर्व संमतीने पारित झाला तेथूनच राष्ट्रभाषा हिन्दीची संपूर्ण भारतात मुहूतमेढ रोवली गेली.

राष्ट्रभाषा हिंदी हा मधुकररावांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय होता. देशभर हिन्दीच्या प्रचार प्रसाराचे कार्य सुरु अचानक वर्धा येथील समितीच्या सभागृहाला आग लागुन सर्व भस्मसात झाले. समितीचे सर्व सभासद हवालदिल झाले मधुकररावांनी त्यांना धिर दिला व सांगितले की हे संकट न मानता संधी समजा यातुन नवीन कामाची उभारणी करु या. राष्ट्रभाषा हिंदीच्या उन्नतीसाठी त्यांनी आले जिवन समर्पित केले हिंदी या भाषेला विश्वभाषा म्हणुन मान्यता मिळावी यासाठी अथक परिश्रम केले इ.स. १९९९ मध्ये ब्रिटनची राजधानी इंग्लंड येथे झालेल्या विश्व हिंदी सम्मेलनांची हिंदीला विश्व भाषा बनविण्यासाठी मधुकरराव चौधरी यांनी दिलेल्या योगदानासाठी त्यांना विश्व हिंदी हा पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

मधुकरराव चौधरी यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी खूप महत्वाचे योगदान दिलेले आहे. त्यामध्ये त्यांनी हम भारतीय हे सर्वांगीण विकासासाठी अभियान सुरु केले. मधुकरराव चौधरीच्या मते: आपला भारत देश हा सर्वांग सुंदर बनला पाहिजे. उत्तुंग भारत या संकल्पनेसाठी शिक्षणक्षेत्रात अनेक उपक्रम राबवुन देशाचा नागरीक हा सर्व गुणसंपन्न परिपूर्ण बनवुन भारताचा विकास झपाट्याने होईल. प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण या विभागात विद्यार्थ्यांना विविध मुलोदयोगी शिक्षणाचे प्रशिक्षण देवुन कृतीशिल बनविणे. विविध मुलोदयोगी शिक्षणाचे देवुन संपुर्ण भारत हा उत्तुंग विकासांनी भरला पाहिजे असे मधुकरराव चौधरींचे स्वप्न होते.

- **निष्कर्ष :**

१.लोकसेवक मधुकरराव चौधरी हे शिक्षणमंत्री असुन सुध्दा त्यांनी ग्रामीण भागात स्वता:जावुन शिक्षण कोणासाठी, कशासाठी या प्रश्नाची उत्तरे मनात ठेवुन प्रत्यक्षात आणण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहिले.

२. शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांना मंत्रीपदाचा कोणताही बडेजाव न करता शिक्षकांचे मित्र बनले व शासनस्तरावर शिक्षकांचे सर्व प्रश्न त्यांनी सोडविले.

३. शिक्षणमंत्री असतांना शिक्षणाच्या प्रसारा बरोबरच शिक्षणाच्या गुणवत्तेकडे लक्ष देवुन शिक्षणाच्या पुनर्रचनेचे काम देखिल मधुकररावांनी केले त्यामुळे शिक्षणाच्या आधुनिकीकरणाला चालना मिळाली.

४. लंडन येथे हिंदीची अखंड सेवा केल्या बद्दल विश्व हिंदी सन्मानाने त्यांना सन्मानित करण्यात आले हा त्यांच्या आयुष्याचा उत्कर्षबिंदु होता राष्ट्रभाषेची विशेषत: इंग्रजीच्या जन्मभुमीत आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली हा सन्मान देशाच्या राष्ट्रभाषेचा सन्मान आहे.

- **संदर्भ ग्रंथ सूची**


१. तिवारी वासुदेव, विश्व भाषा हिंदीचे भगीरथ मा. मधुकरराव चौधरी – गौरवाजंली

- चौधरी प्रभात – एक समुध्द जीवन
- जं.ग.फगरे –शिक्षण क्षेत्रातील किमयागार मा. मधुकरराव चौधरी
- सरब सोमनाथ – एक सूर, एक ताल – राष्ट्रीय एकात्मता
- काळे शंकरराव – गांधीवादी आदर्शाचे प्रतिक मधुकरराव चौधरी
- सहस्त्रबुध्दे अविनाश – मा.मधुकरराव चौधरी यांचे शिक्षण विषयक विचार
- वाबळे विश्वनाथराव – कृतीशिल सत्यशोधक
- सर्वश्रेष्ठ निस्वार्थी शिक्षणमहर्षी मा. मधुकरराव चौधरी–रटकल्ले सरस्वती

२. चौधरी प्रभात – लोकसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी शैक्षणिक जीवन
३. कामत अशोक – ना.मधुकरराव चौधरी शैक्षणिक जीवन
४. राणे के.पी.–शिक्षणतज्ञ , मधुकरराव चौधरी


........................

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# बाबा आमटेचे सामाजिक समतेचे कार्य

प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

**गोषवारा –**

विदर्भातील समाजसुधारक पैकीच एक असलेले गांधी – विनोबाच्या विचाराने प्रेरीत झालेले प्रसिध्द कुष्ठरोग समाजसेवक बाबा आमटे यांचे नाव आदराने घेतले जाते. बाबाचे मुख्य काम तरी कुष्ठसेवा असली तरी त्याच्या जीवनाचे वेगवेगळे पैलू पाहिले तर ते नक्कीच असामान्य होते. समाज सेवक, क्रांतीकारक, स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, पर्यावरणवादी, राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कर्ता, उपेक्षितांचा कैवारी, सर्वधर्म समभाव चित्रपट समिक्षक, पैलवान, संगितप्रेमी, व्रतस्थ, समतेचेपुरस्कर्ते इत्यादी अनेक पैलू[१] त्यांच्या आयुष्याचे असले तरी एक आदर्शसमाज सेवक म्हणूनच त्यांची ख्याती आहे. तेव्हा ऐतिहासीक दृष्टीने त्यांच्या कार्याचा व कर्तुत्वाचा अभ्यास या ठिकाणी आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.

त्यांनी आपल्या सामाजीक कार्याची सुरवात वरोडा या छोट्याशा गावापासुन केली. तिथे त्यांनी हरीजनासाठी व वंचितासाठी अनेक प्रयोग करून सामाजीक संघटनाही बांधल्या व त्यांच्या सुधारणांसाठी ही प्रयत्न केली. पुढे त्यांनी कुष्ठरोग्यांच्या कार्याला स्वत:ला वाहून घेतले व कुष्ठरोग्यांच्या पुर्नवसनासाठी विनोबांच्या प्रेरणेने आनंदवन या संस्थेची निर्मिती करून तिथे सामाजिक समतेसाठी अनेक प्रकल्प राबविले कुष्ठरोग्यांना माणूस म्हणून जगण्याचा मार्ग दाखविला व त्यांच्या अधिकारासाठीही लढा दिला. तसेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी देशात फिरून भारत जोडो व पंजाब यात्रेद्वारे शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एकूणनच त्यांची आपल्या या कार्यातून सामाजीक समता, बंधुता, राष्ट्रीय ऐक्य, शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**प्रस्तावना–**

भारतीय समाज व्यवस्थेत समाज सुधारकांची महत्वाचे योगदान असून समाजातील रूढी परंपरा–अंधश्रध्दा, बळीप्रथा, जाती व्यवस्था, वर्तव्यवस्था दूर करून सामाजिक समता प्रस्तापीत करण्याचे कार्य समाजसुधारकांनी केलेले दिसते. भारतीय समाजाला समाजसुधारकांची मोठी परंपरा लाभली असून त्या दृष्टीने राजाराममोहन रॉय, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, म. ज्योतीराव फुले, डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर, स्वामी दयानंद सरस्वती, राजश्री शाहू महाराज, गो. ग. आगरकर इत्यादीची नावे आधुनिककाळात अग्रक्रमाने घेता येईल.

विदर्भाच्या दृष्टीनेही रा ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेमहाराज, विनोबा भावे, बाबा आमटे, डॉ. प्रकाश आमटे, पंजाबराव देशमुख, डॉ. अभय बंग, राणी बंग, मनोहर दिवण, शिवाजी पटवर्धन इत्यादी समजासुधारकांचे योगदान मोठे आहे यादृष्टीने काही समाजसुधारकांचा व त्यांच्या कार्यातून झालेल्या सामाजीक योगदानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.

**उद्दिष्ट्ये –**

१) बाबा आमटेच्या सामाजीक कार्याचा आढावा घेणे.

२) बाबा आमटेचे कुष्ठरोग्यासाठी केलेल्या कार्याचे महत्व जाणून घेणे.

**गृहितके –**

१) बाबा आमटे समाजसुधारक होते.

२) बाबा आमटेनी सामाजिक समता निमार्ण केली.

**(१) पूर्वायुष्य –**

बाबा आमटे यांचे मूळे नाव मुरलीधर देविदास आमटे असून जन्म २६ डिसे. १९१४ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे झाला. वडील देविदास आमटे सरकारी नोकरीत उच्च पदावर असून आईचे नाव लक्ष्मीबाई ही गृहीणी होती. हिंगणघाट तालुक्यातील गोरज या गावी जमीनदारी असून ४५० एकर जमिन असल्यामुळे सांपत्तीक स्थिती उत्तम होती.[२] बाबांना आणखी सात भावंडे असून त्यांचे बालपण सुखात गेले.

घरात जमीनदारी असल्यामुळे वडीलांच्या प्रति  ठतेच्या परंपरागत कल्पना व विचार होते. तर आई ही स्वतंत्र व बंडखोरवृत्तीची असल्यामुळे तिचा प्रभाव बाबावर पडलेला दिसतो त्यामुळे एके ठिकाणी बाबा म्हणता, ‘बंडखोरीचे जंतू तिच्याच रक्तातून माझ्यात आले असावे’. वडीलांचे परंपरागत विचार असल्यामुळे त्यांच्यात नेहमी वाद चालत.[३] चाकोरीबाहेर जीवन जगणे वडीलांना पसंत नव्हते तर बाबा हे बंडखोर वृत्तीचे व चाकोरी बाहेर जीवनजगणारे असल्यामुळे उच्चनीचता, जातीभेद, विषमता याबद्दल त्याच्या मन बंड करून उलट दुसऱ्यांची दु:ख ही आपली दु:ख समजून आपल्या जवळ जे आहे ते दुसऱ्याला दिल पाहिजे हा सहानुभाती चा विचार लहानपणापासुनच त्याच्या मनात पक्का होत होता.

**(२) नागपूरातील वास्तव्य –** बाबाचे प्राथमिक शिक्षण वरोड्याला झाले कारण वरोडा व गोरज हे पाच मैलाचे अंतर आहे. पुढे वडीलांनी सरकारीनोकरीतून निवृत्ती झाल्यामुळे नागपूरला धरमपेठ परीसरात बंगला बांधल्यामुळे हायस्कूल व कॉलेजचे शिक्षण नागपूरात झाले. या नागपूरच्या वास्तव्यात बाबांना शिकारीचा छंद जडला म्हणून शिकारीची सर्व पुस्तके वाचली त्यासाठी प्राण्याच्या समोरासमोर शिकारीही केल्या.[४] सोबतच मासाहार व दारूपिणही केली कारण एखादी गोष्ट स्विकारली की त्यांच अंतिम ध्येय गाठण हा त्याचा स्वभाव होता मध्यममार्ग त्यांनी स्विकारला नाही.[५] परंतु मनाने एखादी गोष्ट नाकारीली तर पुन्हा त्यांनी त्याला जीवनभर हात ही लावला नाही. नागपूरच्या वास्तव्यात अभ्यासापेक्षा इतर विषयात त्याची रूची असून कुस्तीसाठी आखाडा, संगीत मैफीली, नृत्यलेखन कला, चित्रपट समीक्षण इत्यादी अनेक गोष्टी त्यानी केल्या व प्राविण्यही मिळविल.[६]

हायस्कूलमध्ये असतांना ११ व्या वर्षीच रविद्रनाथ टागोरांची गीतांजली वाचली त्यासाठी बंगाली भाषाही शिकून घेतली व पुढे या महाकवीला भेटण्यासाठी शांतीनिकेतलाही जाऊन आहे होते.[७] नॅट्रीक उतीर्ण झाल्यानंतर त्याना डॉक्टर बनण्याची इच्छा होती. वडीलांची इच्छा वकील बनण्याची असल्यामुळे त्यांनी आपल्या इच्छेवर पाणी सोडून ऑर्टस कॉलेजला प्रवेश घेऊन १९३४ मध्ये बी.ए. पदवी घेतली व १९३६ मध्ये कायद्याची पदवी मिळविली.[८] त्यामुळे डॉक्टर होऊन समाजाची सेवा करण्याची त्यांची

इच्छा राहीली पुढे दुर्ग या गावी माजी आमदार व वकील श्री. विश्वनाथ तामस्कर यांचे सोबत त्यांनी वकीलीचे कामही केले.[९] तेव्हा वडीलांनी फौजदारी गुन्ह्याची वकीली न करता दिवाणी दावे स्किारावे असे सांगितल्यामुळे बाबा १९४० मध्ये दुर्ग हे ठिकाण सोडून वरोड्याला वकीली करण्यासाठी आहे.[१०]

नागपूरच्या १२ वर्षाच्या वास्तव्यात कॉलेज जीवनात बाबाना क्रांतीकारकाबद्दल आकर्षण वाटल्यामुळे ते सशस्त्र क्रांतीकारकांच्या संपर्कात आले यातूनच त्याचा संबंध प्रसिध्द क्रांतीकारक राजगुरू यांच्याशी संबंध आला.[११]

**(३) वरोड्यातील सामाजिक कार्य –**

वरोड्यातील वास्तव्यात बाबाच्या जीवनात विलक्षण बदल होऊन एका नव्या जीवनाला सुरवात झाली. दिवाणी वकीलीच्या व्यवसायासाठी बाबानी वरोड्यात वकीली सुरू केली. तसेच त्यांच्या व्यवहार व आचारणातही बदल घडून आला. नागपूर दुर्गच्या वास्तव्यातील पोषाखाचा त्याग करून त्यांनी गांधी विचारांशी जवळीक निर्माण झाल्यामुळे खादीचा जाडा भरडा पोषाख वापरणे सुरू केले. घरात चरखा आणला व एकादशवृताचे पालन सुरू केले. वर्धेला गांधी व विनोबाच्या आश्राकडे त्याच्या वाऱ्या सुरू झाल्या.[१२] पूर्वीच्या आरामदायी जीवनाचा त्याग करून खादी व गांधीसाहित्याचा घेऊन त्याच्या प्रसारासाठी ते विक्रीसाठी ते गावोगावे फिरू लागले ...".[१३] जो देव दलितांच्या पोटात बसतो आणि त्याच्या डोळ्यातून डोकावतो त्यांची ओळख पटली. मी एक वकील पंधरा मिनिटांच्या बडबडांचे फी ५० रूपये घेतो व एक मजूर १२ तास खपून बारा आणे मिळवते या विचाराने मी अस्वस्थ झालो ..."[१४]

वरोड्याच्या वास्तवात बाबाच्या सुधारणाटी कार्याला खऱ्या अर्थाने सुरवात झाली व त्याची समाजवादी विचारसरणीचा प्रयत्न हवे येऊ लागला व त्या दृष्टीने त्यांच प्रयोग इथे सुरू झाले. इथे त्यांनी सहकारी तत्वावरील वकील व्यवसायाचा प्रयोग सुरू केला त्यानुसार तीन वकीलांचे एक बॅक खाते राहणार असून कोणीही केव्हाही कितीही पैकी काढू शकत होते.[१५]

तसेच वरोड्याच्या वास्तव्यात बाबानी भंगीमुक्तीची चळवळ सुरू करून समतेच्या आधारे स्वत: त्यानी भंगीचे काम करून संडस साफ केले व मैला डोक्यावर घेतला इतकेच नाही तर भंगी, विणकर, झाडूवाले यांच्या १६ संघटना उभारल्या. वंचितांच्या व उपेक्षीतांची संघटनाने भर दिली.[१६]

**(अ) श्रमाश्रमाची निर्मिती –**

आधुनिक समाज संघटित असल्याशिवाय आपले हक्क कोणत्याही समूहात बजावता योणार नाही याची बाबांना जाणीव असल्यामुळे त्यांनी वंचित व उपेक्षीताच्या संघटना बांधणीवर भर देऊन संघटनाची बांधणी केली. तसेच गांधी विनोबाच्या कल्पनेतील साम्यकुल हा विचार साकरण्यासाठी त्यांनी 'श्रमाश्रमा' ची स्थापण करून त्याद्वारे सामाजिक समानता जोपासण्याचा प्रयत्न केला.[१७] या संदर्भात बाबा म्हणतात. "गुन्हेगारांचे सरक्षण करून ताशी पन्नास रूपयात स्वत:ला विकणारी वकीली मी सोडली आणि श्रमिकांच्या श्रमाला साजेशी किंमत मिळवून देणारी वकिली मी स्विकारली".[१८]

वरोड्याच्या जीवनकाळात अनेक संघटनाशी बाबांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संबंध आला. सर्वोदयी कार्यकर्ते रा. कृ. पाटीलांनी १९४२–४३ मध्ये काढलेल्या सहकारी उपभोक्ता भांडार मध्येही सहकार्य केले. गोरक्षण संख्या वरोरडाचेही सचिवपदाची

जबाबदारी स्विकरली[१९] त्याचबरोबर विदर्भ सहकारी बॅकेवर प्रतिनिधी म्हणूनही ते निवडून आले यावरून त्यांच्यातील संघटन वृत्ती दिसुन येते. तसेच भारतीय रिझर्व बॅकेच्या सल्लागार मंडळात सहकार क्षेत्राचे प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी अधिकोषातर्फे ही त्याची निवड झाली होती.[२०]

याच काळात महात्मा गांधीच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलनाचा इशारा दिला असता संपूर्ण भारतात क्रांतीला व लढ्याला सुरवात झाली त्यात बाबांनीही उडी घेतली १९४३ साली 'वंदे मातरम' म्हटल्यामुळे त्यांना पकडण्यात येऊन २१ दिवसाच्या तुरूंगात टाकण्यात आले[२१] तसेच चिमूर क्रांती झाल्यानंतर निरपराधावर जे खटले भरण्यात आले तेव्हा ती राजगोपालाचारी व कन्हैय्यालाल मुंशी यांनी काग्रेसच्या वतीने खटला चालविला तेव्हा त्यांच्याबरोबर बाबानीही खटल्याचे काम केले.[२२] व एकदा १९४२ मध्ये वरोड्यावरून रेल्वे नागपूरला जात असता गोऱ्या सैनिकांनी एका नवदांपत्यास त्रास देण्याचा प्रयत्न केला असता बाबानी त्या गोऱ्या सैनिकांस मारहाण करून अद्दल घडविली ही बातमी जेव्हा महात्मा गांधीला कळली तेव्हा महात्मा गांधीनी 'हा तर खरा अभयसाधक' असे संबोधले.[२३] याच काळात ऑगस्ट १८ नोव्हे १९४६ रोजी त्याचा नागपूरच्या साधनाताईशी विवाह झाला.[२४]

**(ब) हरीजनासाठी कार्य**

लग्नानंतर बाबा व साधनाताई या नवदांपत्याचा सत्कार हरीजनांनी हरीजनवस्तीत घडवून आणला कारण बाबा त्या काळात हरीजनांचे नेते असून जवळपास १६ संघटना त्यांनी बांधल्या होत्या. याचकाळात बाबानी रात्री हरीजन वस्तीत जावून तिथे देशभक्ती गीते पाठ करून घेण्याचा दिनक्रमही काही दिवस चालविली यामुळे बाबावर मोठ्या प्रमाणात उच्च वर्णीयाकडून टिका ही होऊ लागली तसेच घरमालकाने त्यांना घर खाली करून देण्याची नोटिसही दिली.[२५] याशिवाय बाबानी याकाळात हरीजनांना सोबत घेऊन उपहारगृहात प्रवेश करण्याची प्रयोग केला.[२६]

**(क) सामुदायीक जीवनाचा प्रयोग –**

याच काळात बाबांनी एक श्रमाधारित सामुदायिक जीवन जगण्याचा प्रयोग सुरू केला हा प्रयोगात भंगी पासुन तर वकीला पर्यत समाजातील सर्व स्तरातील २०–२५ व्यक्ति एक येऊन प्रत्येकाने आपली रोज आठवड्याची, महिण्याची कमाई एकत्र करून एकत्र राहायचे एकत्र अन्न शिजवायचे व खायचे त्यात कुठलीही अस्पृशता व विषमता राहणार नाही असा दडंक घालून दिला होता असा हा प्रयोग रा कृ पाटील यांच्या गावाबाहेर बंगल्यात सुरू केला.[२७] जवळपास दीड वर्ष हा प्रयोग चालाल परंतु आजार आणि मानवी नियंत्रणाच्या बाहेरच्या कारणांनी पुढे हा समतेचा प्रयोगा तुटला. अशा प्रकारे तळागाळनीय उपेक्षित दलित वर्गातील स्त्री पुरूषांना एकत्र करून श्रमाधारीत सामुदायिक जीवन जगण्याचा प्रयोग बाबांनी केला.[२८]

**(ड) भंगी, कामगार, युनियन –**

१९४६–४७ मध्ये बाबा लोकसग्रहाच्या आधारावर मुन्सीपाल्टीत निवडून येऊन उपाध्यक्ष बनले व याकाळात भंगी कामगार युनियन चे ही अध्यक्ष होते.[२९] एकदा भंगी लोकांनी वेतनवाढीसाठी संप पुकारला असता बाबानी उपाध्यक्ष म्हणून त्याच्याशी

बोलणी केली तेव्हा संपकऱ्यांनी बाबाला हे घाणेरड काल आपण करू शकाल काव्य ? असा प्रश्न केला असता बाबांनी भंगीकामाचे आव्हान स्विकारून भंगीकामाचा अनुभव घेण्यासाठी पुढील ९ महिने डोक्यावर मैला वाहून नेण्याचे काम केले.[३०]

(४) कुष्ठसेवेला सुरवात व आनंदवनचा उदय

बाबानी भंग्याच्या बरोबरीने मैला वाहून नेण्याचे काम करीत असतांनाच एक दिवस पावसात नाक व एक कान गळून गेलेला तुळशीराम नावाचा कुष्ठरोगी गटारात पडलेल्या अवस्थेत बाबांना दिसला. त्या अंगावरील जखमातून अळ्या बाहेर पडत होत्या. बाबाना हे दृष्य पाहून भिती वाटली पण त्यांनी स्वत:ला सावरत व एक तरट (गोधडी) त्यांच्या अंगावर टाकून ते निघून गेले. परंतु या दृष्ट्याने त्यांना त्याच्या जगण्याची दिशा दिला.[३१] व पुढील काळात त्यांनी कुष्ठ सेवेला वाहून घेतले या संदर्भात बाबा म्हणतात, 'त्या रोग्याच्या अंगावर एक तरट टाकून त्याला उब दिल्याच्या खोट्या समाधानाने घरी आलो. पण ते चित्र डोळ्यासमोरून हटेना मनात एकच प्रश्न होता माझ्या पत्नीला, मुलांना असा रोग झाला तर ? खूप विचार केला जिथे अशी भीती तिथे प्रिती कुठली ? आणि प्रिती लोपली तर ईश्वर कसा राहिल ? कसली ही माझी अभयसाधकता ? ही भीती घालवावी, समाजाचीही भीती नष्ठ करावी म्हणून मी या कामात उतरलो.[३२]

त्यामुळे बाबांनी कुष्ठरोग कार्याला स्वत:ला वाहून घ्यायच ठरविल्यामुळे त्यानी यासंदर्भात वाचन केले व कु ठरोगाबाबतच उपचारासंबंधी प्रत्यक्ष अनुभव होण्यासाठी विनोबांच्या सांगण्यावरून ते आठवड्यातून काही दिवस मनोहर दिवण या भारतातील पहिले कुष्ठसेवक यांच्या वर्धेजवळील दत्तपूर या ठिकाणी काम करू लागले[३३] त्या अनुभवाच्या आधारावर बाबानी कुष्ठरोग्यासाठी वरोऱ्याच्या सरकारी हॉस्पीटलसमोर कुष्ठरोग तपासणी व सल्ला केंद्र त्यांनी सुरू केले.[३४] तसेच कु ठरोगाविषयी शास्त्रशुध्द माहिती मिळविण्यासाठी व अभ्यासकरण्यासाठी कलकत्याच्या 'स्कूल ऑफ ट्रापिकल मेडीसीन' येथे पं. जवाहरलाल नेहरूच्या मध्यस्तीने प्रवेश घेतला व प्रयोगाखातर त्यांनी कुष्ठरोगाचे मृत जंतू व जीवंत जंजू यांची चाचणी स्वत:च्या शरीरावर करूनही घेतली.[३५] परंतू त्याचा कुठलाच वाईट परीणाम बाबावर झाला नाही. यावरून स्वत: करावे आणि लोकास सांगावे स्वानुभव घेऊनच लोकांत जावे ही गोष्ट त्याच्या बाबतीत लक्षात येते.

पुढील काळात कुष्ठरोग निवारण्यासाठी आपले आयुष्य वाहून द्यायचे हा विचार केल्यामुळे या कामाला गती देण्यासाठी बाबानी १९४९ मध्ये महारोगी सेवा समिती स्थापन केली[३६] व कुष्ठ पीडीतावर औषधोपचार व तयांचे पुर्नवसन हे या संस्थेचे प्रमुख उद्दीष्ठ ठेवले. पुढे या संस्थेची १९५१ मध्ये रीतसर नोंदणी होऊन त्यावेळच्या मध्यप्रदेश सरकार कडून महारोगी वरोड्याजवळ ५० एकर जमिन देण्यात आली. अशा तऱ्हने पुढे पुढे येथे एक दोन झोपड्या बांधून २१ जून १९५१ रोजी या नव्या वसाहतीचे आनंदवन असे नामकरण करून आचार्य विनोबांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.[३७] सुरवातीला सहा कुष्ठरोगासह आनंदवन सुरू झाले. आनंदवनाच्या निर्मितीनंतर इथे जंगलसाफ करून राहण्यायोग्य जमिन तयार करण्यात आली. या ठिकाणी बिबटे, अस्वल, साप, बिंचु याच वावर असल्यामूळे ही जागा साफ केल्या गेली १९५४ पर्यत ६ विहीरी तयार होऊन कु ठरोग संख्या ६० पर्यत गेली. जंगले साफ होऊन तिथे शेती होऊ लागली. भाजीपाला व अन्न धान्याचे उत्पादन सुरू झाले. या काळात बाबानी (ट्रेस ॲन्ड ट्रीट) रोगी शोधून त्याच्यावर उपचार करण्याची मोहिम चंद्रपूर जिल्ह्यात हाती घेऊन घरोघरी जाऊन रोगी शोधून काढणे व

त्याच्यावर घरीच उपचार करण्यास प्रवृत्त करणे.[३८] यातून १९५७ पर्यत आनंदवन शेजारच्या ३०० मैल परीघात त्यांनी ११ उपचार केंद्रे स्थापन केली व प्रत्येक केंद्राला ते आठवड्यातून एकदा भेट देऊन रोग्यावर उपचार करीत अशाप्रकारे डॉक्टराची सेवा उपलब्ध नसल्यामुळे रोग्याच्या जखमा धुणे, त्या साफ करण, औषध देणे इंजेक्शन देणे ही सगळी कामे दत्तपूर व कलकत्याच्या प्रशिक्षणाच्या आधारावर बाबा स्वत: करीत असे.[३९] याच काळात काही परकीय देणग्या आनंदवनला मिळू लागला होत्या.

**(५) आनंदवनातील प्रकल्प / प्रयोग**

कुष्ठ कार्य हे इतर ठिकाणी चालणाऱ्या कुष्ठ संख्यातील कामापेक्षा कुष्ठसेवेची बाबाची कल्पना वेगळी होती. कु ठरूग्णाकडे कुणी दयेन पाहाव हे त्यांना अपेक्षीत नव्हत म्हणून कुष्ठरोग्यामधील माणसाचा विकास झाला पाहिजे तो एक माणूस म्हणून जीवन जगायला समर्थ बनला पाहिजे या विचारसरणीतून बाबानी कुष्ठरूग्नाला कुष्ठमुक्त करण्याबरोबरच श्रमनिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला व यातून त्यांनी कुष्ठरोग्याच्या हाताला काम देऊन त्याना योग्य कामाला प्रवृत्त करून त्यासाठी अनेक प्रकल्प व प्रयोग आनंदवनात निर्माण केले.

एकदा आस्ट्रेलीयातील 'फुड फॉर पीस' या संघटनेनी आनंदवनातील कुष्ठरोग्यासाठी गहू पाठविण्याची तयारी दर्शविली. तेव्हा बाबानी त्यांना पत्र पाठवून गहू पाठविण्या ऐवजी गव्हाचे अमाप पीक काढण्याचे विज्ञान आणि तंत्रज्ञान शिकवा असी मागणी केली होती.[४०] अशा प्रकारे पुढील आनंदवनामध्ये कुष्ठरोग्यांना स्वालबंधनाचे धडे देऊन धान्य कडधान्य भाजीपाला, फळ झाडे नगदी पीके वनौधधी फुलशेती नर्सरी गवताची शेती व शेतीला पुरक व्यवसाय त्यात मधु मक्षिका पालन, रेशिम किड पालन, गोपालन, कुकुटपालन, मत्स्यपालन असे अनेक प्रकल्प सुरू करण्यात आले.

**(अ) टिन कॅन प्रोजेक्ट –**

याचकाळात आंतराष्ट्रीय सहाकार्य आनंदवनला मिळणे सुरू झाल्यामुळे अनेक नविन प्रकल्प उभे राहिली सर्व्हिस सिव्हिल इन्टरनॅशनल या संघटनेच्या मदतीने आनंदवनात पक्क्या इमारतीचे बांधकाम सुरू झाले. तसेच श्रवायसर आउसलॅड इन्फ या संस्थेच्या मदतीने टिन कॅन प्रोजेक्ट सुरू करून आनंदवनात उद्योगशाळा सुरू झाल्या ज्यामधून खेड्यात नेहमी वापरात येणाऱ्या व उपयोग येणाऱ्या वस्तू बनविल्याचा उद्योग सुरू झाला ज्यान चाळणी, जेवणाचे डबे, कंदील या वस्तू तयार होऊ लागल्या त्यामुळे आनंदवन ही कुष्ठरोग्याची वसाहत नाही तर तेथील रोगमुक्तांनी चालविलेल उत्पादन केद्र आहे.[४१] याची कल्पना बाहेरच्या जगाला येऊ लागली या संदर्भात बाबा म्हणतात 'आनंदवन हे कुष्ठरोगाचे केद्र नाही तर मानसाला माणूस म्हणून जगवण्याचे ते केंद्र आहे. तिथे कुष्ठरोगीराहत नाही असे नाही'.[४२]

**(ब) संधीनिकतन –**

शारीरीक विकलांग असलेल्यासाठी काही तरी करावे त्यानाही काम करून जीवन जगता यावे व त्यासाठी त्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करावी हे बाबाच्या पुर्णवसनाच्या कार्यक्रमात अभिप्रेत होत म्हणून काऊंट आर्थर तार्नोव्हस्कीया जन्माने पॉलीश व इग्लंडमध्ये राहणाऱ्या पोलीओग्रस्त व्यक्तिच्या मदतीने मध्ये संधीनीकेतनची स्थापणा करण्यात आली. यात अध अपंग, विकलांग मूक, बधीर अपघातग्रस्त अशा सर्वात्र संधी निकेतन मध्ये काम करून, एखादे कौशल्य प्राप्त करण्याची अर्थाजनाची व्यवसाय

शिक्षणाची संधी देण्यात आली. या संधीनिकेतनमध्ये सुनारकाम, लोहारकाम, प्रिंटीग, श्विणकाम, चपला जोडे बनविणे, संतरंज्या गालीचे बनविणे, अस्तकला व शोभिवंत वस्तू बनविने, सूनकताई, वेतकाम, भेटकार्ड, विटा बनविणे, वेल्डींग काम इत्यादी उद्योगाचे प्रशिक्षण व शिक्षण दिले जाते एकूण स्वत:च्या पायावर उभे करून अधिक स्वावलंबी जीवन जगण्याचा मार्ग याद्वारे बाबानी विकलांगसाठी निर्माण केला.[४३] तसेच १८८५ मध्ये पावरलुम बसवून त्याद्वारे कापड निर्मितीही केल्या जात आहे.

**(क) मुक्तिसदन –**

कुष्ठरोगापासुन जे मुक्त झाले त्यांनाही सन्मानाने जगता यावे यासाठी शेती व उद्योगधंद्याचे शिक्षण त्यांना मिळावे या कल्पनेतून १७ मे १९६२ रोजी मुक्तिसदनची स्थापणा करण्यात येऊन त्याचे उद्‌घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. बाबाचे मित्र स्वित्झरलॅडचे डॉ. स्नेलमन यांनी आनंदवन ची ओळख आपल्या देशवासियांना करून देण्यासाठी एक लेख लिहिला तो लेख वाचून काही लोकांनी एक दिवसाचा उपवास करून पैसा वाचविला व तो पैसा आनंदवातील रोगमुक्ती प्रकल्पसाठी पाणविले. तो प्रकल्प म्हणजे मुक्तीसदन होय.[४४] तसेच अनेक परकीय मदन  व भारतीय राष्ट्रपतीनीही या प्रकल्पाला मदत केली. मुक्तिसदनाबाबत रा. भ. पाटील म्हणतात, ‘मुक्तिसदन हे आमट्यांच्या कर्तव्य तत्परतेचे नवे दालन आहे. येथे रोगमुक्त आपल्या नव्या जीवनाचे पान उघडतील.

**(ड) मुक्तांगण –**

आनंदवनातील कुष्ठरोगी हे नाटक व भजनाच्या माध्यमातून मनोरंजन करीत असे इतकेच नाहीतर नाटक उभे करून त्याचा २ हजार रूप्ये निधी त्यांनी राष्ट्रीय निधीला ही दिला व आम्हीसुध्दा इतराप्रमाणे जबाबदाऱ्या उचलण्यास सक्षम आहे हे दाखवून दिले. अशा अंध अपंग रूग्णासाठी त्यांची कला सादरीकरणासाठी एखादा रंगमंच असावा अशी कल्पना समोर येऊन थिएटर बनविण्यासाठी पु. ल. देशपांडे व सुनिताबाई यांनी आनंदवनाला १ लाख रूपयाची देणगी दिली व त्या वास्तूला पु. ल. नी ‘मुक्तागण’ हे नाव दिली. या मुक्तांगणात एक बदिस्त सभागृह व खुलामंच असून अनेक कार्यक्रम इथे होतात.[४५]

**(इ) मित्र मेळावा –**

१९६१ पासुन मित्र मेळावा हा सांस्कृतिक उपक्रम सुरू करण्यात येऊन त्यात महारा  ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अनेक मान्यवर येथे तीन दिवसाच्या कार्यक्रमासाठी येत येथील कृष्ठरोग्यात ते मिसळत त्याच्यासोबत कलेचा आनंद घेत प्रामुख्याने कुष्ठरोग्यातील साम्यातील अंतर कमी करणे हा यामागील मुळे हेतू होता. या प्रसंगी बालतरूची पालखी, रोगमुक्ताचे सामुदायिक विवाह, करमनुकीचे व कसरतीचे कार्यक्रम, व्याख्याने औपचारीक भेटीगाठी व चर्चा इत्यादी कार्यक्रम होत असे. या कार्यक्रमाची पुलनी महत्वाची जबाबदारी घेतली होती.[४६]

**(ई) उत्तरायण व गोकुळ –**

जेष्ठ व निवृत्ता साठी व त्यांचा अनुभवाचा व व्यक्तिमताचा फायदा मिळविण्यासाठी बाबांनी १९७९ मध्ये आनंदवनात ‘उत्तरायन’ चा प्रयोग सुरू केला.[४७] बाबाच्या मते हे जेष्ठ नागरीक ही आनंदवनाची ज्ञानपेटी (Wisdom Bank for the Institution) आहे.[४८] एकाअर्थाने हा वृध्दाश्रम असला तरी त्या वृध्दांना काहीतरी उपयुक्त कामगीरी करण्यास त्यांच्यातील सुप्त

गुणांना वाव देणे आजवर काही सर्जनशीलकृती करण्याच मनात असूनही तस करण्याची संधी मिळालेली नसते ते प्रत्यक्षात आणण्यासाठी जेष्ठ नागरीकासाठी 'उत्तरायण' ही प्रयोगशाळा आहे असे मा. गो. वैद्य म्हणत.

तसेच अनाथ व लहानपणीच टाकून दिलेल्या मुलामुलींसाठी त्याच पालनपोषण, संवर्धन व शिक्षण यासाठी 'गोकुळ' ही संख्या काढण्यात आली. एकदा वरोडा रेल्वे स्टेशनवर कुणीतर टाकून दिलेली लहान मुलगी बाबाकडे घेऊन आले. यातूनच पुढे बाबांच्या मनात ही कल्पना सुचली. यासाठी एक 'गोकुळ' नावाची इमारतही बांधण्यात आली.[४९] उत्तरायणात असलेल्या वृध्द व जेष्ठ नागरीकांनी गोकुळात असलेल्या नातवंडात मिसळावे, खेळावे तसेच नातवंडालाही जेष्ठाच्यारूपाने आजी आजोबाचे प्रेम मिळेल ही उत्तरायण व गोकुल या पुर्नवसनाच्या प्रकल्पामागील व्यापक कल्पना होती.[५०]

**(फ) कु  ठमुक्तांचे विवाह –**

कु  ठ रूग्ण मुक्त झाल्यानंतर त्यांना इतराप्रमाणे वैवाहीक जीवन जगण्याचा हक्क आहे. कुष्ठरोग हा अनुवांशिक नाहीतर रोगमुक्त झाल्यावर संधी निकेतनमधून व्यावसायिक कौशल्याचे प्रशिक्षण घेउन स्वतत्रपने नोकरी व व्यवसाय करू शकतात पण ज्यांना घर व संसार करायची इच्छा आहे अशाचे पुर्नवसन करण्यासाठी आनंदवनातील कुष्ठमुक्ताचे सामूहिक विवाह समारंभ वार्षिक मित्र मेळाव्यात बाबानी आयोजीत केले.[५१] कुष्ठमुक्ता बरोबरच अंध अपंगाचेही विवाह लावले गेले. अशा प्रकारे आनंदवनातील सामुहीक विवाह हे कुष्ठरोग्याच्या पुर्नवसनाच्या कल्पनेतील भावनिक बाजूला बळकटी देतात.[५२]

अशा प्रकारे अनेक प्रकल्प आनंदवात बाबानी राबविले ज्यात आनंदनिकेतन महाविद्यालय, कृषी महाविद्यालय हे होते. या मागील मुख उद्देश हा होता की आनंदवनातील कुष्ठरोग्याचे रचनात्मक, उत्पादक कार्य हे ते पाहतील व कुष्ठरोग्याबद्दलचे गैरसमज दूर होण्यात मदत होईल. याशिवाय 'युवाग्राम' हा तरूणाची आत्मनिभ्रर बनविण्याचा प्रकल्पही अलिकडच्या काळात सुरू करून युवकांचे रोजगाराचे प्रशिक्षण दिल्या गेले.[५३]

**(६) भारत छोडो यात्रा (१८८५) –**

१९८४ मध्ये इंदीरागांधीच्या हत्येनंतर देशभरात दंगल, स्फोट, मारामारी यांचे सत्र निर्माण झाल्यामुळे शांततेसाठी व रा  ट्रीय एकात्मतेसाठी भारत जोडो अभियान सुरू करण्याचे ठरवून बाबानी सोमनाथ येथील १८८५ मध्ये झालेल्या श्रमसंस्कार शिबिरात डिसेंबर १८८५ मध्ये भारत जोडो अभियानाचा संयुक्त जाहीर केला.[५४] या अभियानाचे प्रमुख दोन उद्देश होते. (१) राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लावणे (२) देशातील युवाशक्ती संघटीत करून राष्ट्र निर्माण कार्यासाठी रचनात्मक कार्यात तरूणांना गुंतविणे या संदर्भात बाबा म्हणतात, 'जातीयवाद प्रांतवाद आणि धर्मांधतेने जर्जर झालेल्या पिढीला वाचविण्यासाठी भारतजोडोचे आंक्रदन मी चालविले आहे.[५५]

अशा प्रकारे देशातील ११५ जणांची निवड करून त्यात १०४ तरूण व १४ तरूणी होत्या. त्यात प्रामुख्यान महाराष्ट्र तामीळनाडू आध्र, केरळ, कर्नाटक, गुजरात, आसाम, मणिपूर, पं. बंगाल, बिहार, ओडीसा, मध्यप्रदेश या राज्यातील तरूण होते. साधारणपणे ही यात्रा १०७ दिवस १४ राज्यातून जाणार असून ५०४२ किलोमीटरचा प्रवास कन्याकुमारी ते काश्मीर असा

करावयाचा होता. व ठरल्याप्रमाणे २५ डिसे. १८८५ रोजी साने गुरूजीच्या जयंती दिली यात्रा सुरू होऊन ९ एप्रिल १९८६ रोजी ती जम्मु येथे आर्न राष्ट्रीय शांतता वर्षात संपणार होता.[५६]

यात्रेच्या दैनंदिन उपक्रमात रस्त्यातील गावात सामुहीक फेरी व वृक्षारोपण, राष्ट्रीय एकाता, विषमता निर्मूलण, स्त्री मुक्ती व समानता, दलित समस्या, आरोग्य, लोकसंख्या, पथनाट्य प्रदर्शन इत्यादी माध्यमातून प्रबोधनाचे कार्यक्रम होत होते. यात्रेत सहभागी होण्यासाठी काही अटी लावल्या असून यात्रेच नेतृत्व अतुन शर्मा यांच्याकडे होते.[५७]

या प्रवासात अनेक अनुभव तरूणांना येऊन देशातील परिस्थिती, दारीद्रय, विषमता, पर्यावरणहानी इत्यादी समस्या प्रत्यक्ष जाणून घेता आल्या तसेच त्यावेळी पंजाबमधून यात्रे दरम्यान पंजाबातील अशांतता हिंसाचार, दहशत वाद याचाही अनुभव भारत जोडो च्या कार्यकर्त्यानी घेतला. या यात्रेदरम्यान राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश मोठ्या प्रमाणात दिला जाऊन काही घोषणाही तयार करण्यात आल्या.

**(७) पंजाब यात्रा – १९८६ (जुलै)**

भारत जोडो यात्रेदरम्यान पंजाबमधील असंतोष बाबाच्या लक्षात आला होता. पंजाबमध्ये फुटीटतावादी प्रवृत्तीची वाढझालेली होती तिथे देशार्तगत गटाच्या असंतुष्ठ गटाच्या कारवाय वाढून दहशतवादाला व हिंसाचार खतपाणी घटत जात होते. यातून पंजाबच्या नागडी कोना स्वतंत्र शिखिस्तानची मागणी जोर धरू लागली होती. यामुळे बाबा अस्वस्थ झाले व बाबाने पंजाबात परत शांतता निर्माण करण्यासाठी भारत जोडो आंदोलनानंतर १ जुलै १९८६ ते ९ ऑगस्ट १९८६ या काळात पंजाब भेट दिली. या भेटीत बाबानी 'शांततेतून शांतता कार्य' (पीस बॉय पीस मीशन) ही मोहीम हाती घेऊन ५० गावांना भेटी दिल्या व ८५ हिंदु व शिख कुटुंबाच्या भेटी घेतल्या. या भेटी संदर्भात बाबा म्हणतात. 'तणावपूर्ण भागात फिरूण आम्ही हिंदू शिख लोकांना धीर घ्यायची समजूत काढायचे अतिरेक्याची हिट लिस्ट होती तशी आमची हमदर्दी लिस्ट होती.[५८]

**(८) पंजाबयात्रा (सप्टे १९८६)**

पंजाब समस्या सोडविण्यासाठी बळाचा वापर करणे हा त्यावर उपाय नाही असे बाबाला वाटत होते. पण सरकार तोडगा काढायला तयार नव्हते याच काळात पंजाबची परिस्थिती आणखीच बिघडत चालती होती अशा वेळी तिसऱ्यांदा बाबानी पुन्हा प्रयत्न म्हणून काहीतर संवाद संपर्क होऊन काहीतरी हाती पडेल निदान परिस्थिती बिघडू नये या विचाने २५ सप्टेबर १९८६ रोजी पुन्हा पंजाब भेट सुरू केली.[५९]

यावेळेस बाबानी सिमेवरील चौक्यांना भेट देऊन तेथील स्थानिक नेते पुढारी बुध्दिजीवी व ज्यांना अशांतीची झळ बसली अशा कुटुबांच्या भेटी घेतल्या.

**(९)भारत जोडो अभियान– पूर्व–पश्चिम**

भारत जोडोच्या पहिल्या अभियानाच्या वेळेसन बाबानी पूर्ण–पश्चिम भारत जोडो अभियान करण्याचे संकेत दिले होते. तेव्हा पंजाब यात्रे नंतर बाबानी याबद्दल विचार करून १ नोव्हे १९८७ ते २६ मार्च १९८८ या काळात पूर्वेकडील इटानगर ते पश्चिमेकडील ओखापर्यत (गुजरात) एकुण ७५४६ किमी ची १४६ दिवसाची पूर्व–पश्चिम दुसरी भारत जोडो/ अभियान सुरू

केले. ईशान्य भारतातील सात राज्ये, सिक्किम पं. बंगाल ओरीसा बिहार उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश राजस्थान, गुजरात असा यात्रेचा मार्ग असून या सायकल यात्रे ७५ तरूण तरूणी सहभागी झाल्या होत्या.[६०]

या यात्रेच्या माध्यमातून राष्ट्रीय ऐक्यासाठी मोठे व संघटीत व राष्ट्रव्यापी प्रयत्न करायला पाहिजे याची जाणीव तरूणांना झाली अशा प्रकारे स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासात पूर्व–पश्चिम व उत्तर–दक्षिण अशा चारही दिशांना व ठिकाणांना भेटी देऊन राष्ट्र्य एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी भारत जोडो यात्रा अनेक दृष्टीने महत्वपूर्ण व अभिमानास्पद होती.

**मूल्यमापन –**

बाबा आमटे यांच्या दोन शब्दात वर्णन करायचे म्हटल तर ते भुर्तुहरी च्या शब्दात 'मनस्वी कार्यार्थी अस करता येईल.[६१] कुठलेही कार्य हाती घेतले की ते कार्य समर्पण वृत्तीने करतांना ती परीस्थिती प्रतिकुल की अनुकुलयाचा विचार न करता करत राहणे याच वृत्तीला 'मनस्वी कार्यार्थी' वृत्ती अस म्हटले जाते. बाबाच्या बाबतीत हेच दिसुन येते. त्यांनी निर्माण केलेल आनंदवन सोमनाथ, हेमलकसा सारखे प्रकल्प या वरून त्याची कामसुवृत्ती दिसुन येते.

बाबा हे कर्ते समाजसुधारक होते तर बोलके समाज सुधारक नव्हते कुठलिही सुधारणा करावयाची तर त्याचा स्वत: अनुभव घेऊन ती केली पाहीजे असा त्यांचा विचार होता. त्यामुळे हरीजनाच्या बाबतीत सुधारणा करतांना स्वत: त्यांनी भंगीकाम करून ९ महिणे डोक्यावर मैला वाहिला व तसेच वंचीतांचे नेतृत्व स्विकारून त्यांचे ते नेते झाले. याशिवाय कुष्ठरोग्याच्या कार्यातही त्यांनी कुष्ठरोगासंबंधी माहिती व प्रशिक्षण घेऊन कुष्ठरोगाची लस स्वत:वर टोचून घेतली होती. कारण यासाठी ते कु ठरोगीही बनायला तयार होते.

दलितांच्या प्रश्नाकडे त्यांनी लक्षघालून त्याच्या संघटना तयार केल्या व त्याचे हक्क त्यांना मिळवून देण्याचा प्रयत्न केला. उदा. भंगीच्या वेतन वाढीचा प्रश्न[६२] यावर ते दलितांचे कैवारी ठरतात.

दलितांच्या प्रश्नाबरोबर कुष्ठरोग अंध–अपंग, मुकबधीर या उपेक्षितांच्या समस्याकडेही त्यांनी लक्ष देऊन त्याच्या पुर्नवसनाचे अनेक प्रयोग केला. उदा. संधीनिकेतन व त्यांना आत्मनिर्भर बनवून आर्थिक स्वावलंबनाचे धडेही दिले. ज्यामुळे त्याच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन हा सकारात्मक असायला हवा.

बाबा आमटे हे समतेचे पुरस्कर्ते असून त्यांनी कधीच जातीभेद, धर्माधता मानली नाही. सर्व धर्म व जातीना आपल्या प्रयोगात व आश्रमात स्थान दिले. त्यामुळे त्यांची वृत्ती धर्मसहिष्णू होती हे लक्षात येते. हरीजन आदिवासी उपक्षित पहदलित यांना त्यांनी उभे करून समाजाच्या प्रवाहात आणण्याचे महत्वाचे काम केले व त्यांना स्वयंपूर्णता दिली. त्यामुळे ते सामाजीक जाणीव जपणारे पुढारी व पुरूष होते असे म्हणता येईल.

बाबा हे उत्कृष्ट वक्ता व कुशल संघटक होते. त्यामुळे त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली अनेक प्रयोग केले. राष्ट्रीय एकात्मतेचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनी देशातील हिंसाचार व दहशतवाद नाहीसा करण्यासाठी व शांतता आणी राश्ट्र एकात्मतेसाठी पूर्व पश्चिम व उत्तर दक्षिण अशा दोन भारत जोडो यात्रा काढून पंजाबला ही दोन भेटी देऊन तेथील दहशतवादी परिस्थितीबाबत

सरकारला अवगत केले व पंजाबचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटू शकतो हे सरकारला सांगितले. त्यासाठी त्यांनी पंजाबला शांततेच्या मार्गाने शांतता हे मिशनही राबविले यावरून त्याची भूमिका ही समाजकारणात शांतीदूताची होती असे म्हणता येईल.

बाबावर येशू, गांधी, विनोबा, साने गुरूजी यांचा प्रभाव असून ते त्यांना आपली स्फूर्ती रचाणे मानता व त्यांच्याच रचनात्मक कार्याचा वसाते पुढील काळात चालवितांना दिसतात. बाबाच्या कार्याचा अवाका प्रचंड असून ते तरूण वयात क्रांतीकारकांच्या कार्यातही सहभागी झाले होते व ते स्वातंत्र्य संग्राम सेनानीही होते. त्यामुळे बाबाच्या कार्याची दखल देऊन भारत सरकारने महाराष्ट्र सरकारने व अन्य खाजगी संस्थानिही त्यांना गौरविले तसेच विदेशातील अनेक उच्च पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले आहे. ते त्याच्या समाजसेवी कार्यामुळे त्यामुळे त्यांच्या बद्दल लिहितांना रा.ऊ.पाटील हे त्यांना विश्वामित्राचे वंशज सबोधतात[६३] तर महात्मा गांधी त्याचा उल्लेख खरा ‘अभयसाधक’ असा करतात. यावरून त्याच्या महान समतेच्या कार्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही व ते खरे ‘समाजक सुधारक’ ठरतात.

याचबरोबर बाबा उत्तम साहित्यीकही असून त्यांच्या ज्वाला आणि फुले व करूणेचा सलाम ही काव्यसंग्रहेही प्रसिध्द आहे. याशिवाय अनेक विषयावर ही बाबानी चितनात्मक लेखक केले आहे. यावरून त्याची साहित्यीक होते लक्षात येते. तसेच त्यांच्यावर अनेकांनी साहित्यही लिहीले आहे. एकूणच बाबाच्या या कार्यामुळेच व त्यांच्या या प्रयोगातील विचारामुळेच त्यांना आधुनिक संत म्हटले तर योग्य होईल.

## संदर्भ ग्रंथ –

(१) आमटे बाबा, ‘ज्वाला आणि फुले’, रसिक आंतरभारती प्रकाशन, पुणे, २००६.

(२) आमटे बाबा, ‘उज्वल उद्यासाठी’, रसिक आंतरभारती प्रकाशन, पुणे, २०१०.

(३) आमटे साधना, ‘समिधा’, पापुलर प्रकाशन, मुंबई, २००१.

(४) डॉ. आमटे विकास, ‘आनंदवन–प्रयोगवन’, समकालीन प्रकाशन, पुणे, २०१४.

(५) बापट भ. ग., ‘बाबा आमटे’, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९७.

(६) आठले चंदा, ‘आनंदवनी’, पदमगंधा प्रकाशन, पुणे, २००८.

(७) घोगरे सुचित्रा, ‘समाजभुषण बाबा आमटे’, गांधर्ववेद प्रकाशन, पुणे, २०१०.

(८) स्मरणिका, पद्मश्री बाबा आमटे, अभिनंदन समारोह, ३० सप्टें १९८५.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्रउभारणीतीलडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

डॉ. सविता भाऊराव चिवंडे
सहाय्यक प्राध्यापक
कॉलेज ऑफ सोशल वर्क, कामठी
savitachiwande@gmail.com

काही हि—यांचे अगणित पैलू असतात, त्यातील काहीच पैलू नजरेपुढे येतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक असेच हिरे होते. संविधानाचे शिल्पकार, भारतीय स्त्री—पुरूषांचे उद्धारकर्ते, कायदेपंडीत, समाजशास्त्रज्ञ, इतिहासकार, राज्यशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, शेतीतज्ञ, औद्योगीकरणाचे प्रणेते, कामगार नेता, हिंदू कोडबिलाचे प्रवर्तक, आरक्षणाचे जनक, अर्थतज्ञ,रूपयाचे भाष्यकार, लोकसंख्येचे जाणकार, संतती नियोजक,जलतज्ञ,नद्याजोड प्रकल्पाचे प्रवर्तक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जाणकारहे पैलू वारंवार जगापुढे आलीत पण त्यांच्यातील अनेक पैलूंची म्हणावी तशी चर्चा झाली नाही. बाबासाहेब एक अर्थतज्ञ होते, रूपयाचे भाष्यकार, त्यांना लोकसंख्याविषयक प्रश्नांचे प्रचंड ज्ञान होते,ते जलतज्ञ होते, 'नद्याजोड प्रकल्प' ही त्यांचीच योजना होती, शेतकरी त्यांची विदारक परिस्थितीचे विचार, बाबासाहेबांची राष्ट्रवादाची भूमिका,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टी,संरक्षण आणि परराष्ट्र धोरणाबाबतही विचारही महत्वपूर्ण होते.बाबासाहेब यांचे विचार क्रांतीकारक होते. इंग्रजी साहित्यात त्यांच्या लिखानाने मौलिक भर घातली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'राष्ट्रनिर्मितीतील योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यातीलच काही पैलूंचा उल्लेख या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :—**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची माहीत समजून घेणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एक अर्थतज्ञ व रूपयाचे भाष्यकार म्हणून असणारी भूमिका अभ्यासणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एकजलतज्ञ व 'नद्याजोड प्रकल्पाचे प्रवर्तक' म्हणून असणारी भूमिका अभ्यासणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचीराष्ट्रवादाची भूमिका अभ्यासणे.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टी, संरक्षण आणि परराष्ट्र धोरणविषयक विचार अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तत संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला गेला. तथ्य संकलनासाठी पुर्णतः दुय्यम साधनसामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

**बाबासाहेब एक अर्थतज्ञ व रूपयाचे भाष्यकार**

१९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'भारतीय रूपयाचा प्रश्न' या संशोधनातून देशातील आर्थिक व बैंकांच्या नियोजना संदर्भात भूमिका मांडली. या भूमिकेतून पुढे अर्थिक नियोजनाच्या संदर्भात भारतीय रिझर्व्ह बैंकेची निर्मिती झाली. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यांनी मांडलेल्या संकल्पना, कार्यपद्धती, मार्गदर्शक सूत्रे व एकूण धोरण यांचा मोठी प्रभाव दिसतो. बैंकांचे राष्ट्रीयकरण व्हावे ही मुळ संकल्पना बाबासाहेबांची होती त्यावर अंमलबजावणी इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना झाली. रिझर्व्ह बैंकेच्या संकल्पनेमुळे विकसनशील भारतातील बैंकाची चौकट नियंत्रणात राहिली. जागतिक मंदीच्या काळात अमेरिकेच्या दहा बैंका आर्थिक संकटात सापडल्या होत्या. जागतिक पातळीवर आर्थिक नियंत्रण करणा—या अमेरिकेलाही त्यांच्या स्वत:च्या बैंकांचे कोसळणे सांभाळता आले नाही. भारताने मात्र हे आव्हान समर्थपणे पेलले. त्यामागे बाबासाहेबांची विचारांची मांडणी होती. म्हणूनच

बाबासाहेबांच्या आर्थिक धोरणांची चिकित्सा व संशोधन करणा—या अभ्यासकाला नोबेल पुरस्कार प्राप्त होतो ही बाबासाहेबांच्या विचारांची भारत देशाला मिळालेली मोठी उपलब्धी आहे. प्रसिद्ध अर्थतज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता डॉ. अमर्त्यसेन यांनी पुरस्कार स्विकारतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थविषयक योगदानाबाबत उद्‌गार काढले की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे माझ्या अर्थशास्त्राचे जनक आहेत' यावरून असे दिसून येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थविषयक विचारानुसार वर्तमान तसेच भविष्यकाळातील जागतिक बेकारी, महागाई, गरिबी व रूपयाची अस्थिरता दुर करून जनतेचे कल्याण करता येऊ शकते.

**बाबासाहेबांचीएक जलतज्ञ म्हणून भूमिका**

एक जलतज्ञ म्हणूनही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 'राष्ट्रनिर्मितीतील योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे.१९४२ ते १९४६ या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्हाईसरॉयच्या 'एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे'चे सदस्य असतांना त्यांच्याकडे श्रम, सिंचन व उर्जा ही खाती होती. त्याच काळात त्यांनी सिंचन व उर्जा धोरणाचा पाया घातला. अर्थात सिंचन व उर्जा ही दोन्ही क्षेत्र १९३५ च्या भारत सरकार कायद्याप्रमाणे प्रांतिक सरकारकडे असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रांतिक सरकारच सहकार्य मिळवाव लागल. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या व्यवहारी शहाणपणाचा परिणाम म्हणून त्यांच्या मार्गदर्शनांन शेती व उद्योग या दोन्ही महत्वाच्या आर्थिक क्षेत्राच्या विकासासाठी अत्यावश्यक असणारी सिंचन व उर्जा ही दोन्ही महत्वाची पायाभूत क्षेत्र विकासित करण्याचा पाया घेतला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलसिंचन धोरण तीन सुत्रांवर आधारलेला होता.

- जलसंसाधन विकास करण्याकरितापाणलोट/नदीखोर क्षेत्र आधारावर सिंचन योजनांच नियोजन करतांना बहुउद्देशीय दृष्टीकोन ;डनसजप.चनतचवेमद्ध होता. उदा. शेतीसिंचन, पाण्यासाठी पाणी, जलवाहतूक, वीजनिर्मिती व काही पाणी उद्योगांसाठी आवश्यकतेप्रमाणे.
- जलप्रकल्प राबविण्यासाठी पाणलोट प्राधिकरण ;त्पअमत टंससमल नजीवतपजलद्ध ही प्रशासकीय व्यवस्था असावी.
- सिंचन व उर्जानिर्मिती संबधात राष्ट्रीय पातळीवर 'सेंट्रल वॉटरवेज', 'इरिगेशन अॅड नेव्हिगेशन कमिशन' ;ब्ॅछब्द्ध व केंद्रिय तांत्रिक विज मंडळ ;ब्ज्ठद्धही दोन्ही तांत्रिक मंडळ निर्माण करावीत.

देश सामाजिक, धार्मिक सांस्कृतीक क्षेत्रामध्ये समतावादी बनला पाहीजे देशाचा सर्वच क्षेत्रामध्ये विकास झाला पाहीजे म्हणून डॉ. बाबासाहेबांनी आपली संपूर्ण हयात खर्ची घातली. त्यासाठी त्यांनी अतिशय परिश्रम घेऊन प्रत्येक क्षेत्राचे नियोजन लावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम, जलसिंचन आणि उर्जा खात्याचे कॅबिनेट मंत्री असतांना दामोदर खोरे आणि महानदी विकास प्राधिकरणास मंजूरी दिली. त्याअंतर्गत पश्चिम बंगाल राज्यामध्ये देशातल सर्वात मोठे हिराकुड धरणास डॉ. बाबासाहेबांनी मान्यता दिली. सोबतच उर्जावाटपासाठी ग्रिड पद्धतीचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच मांडला. आजचे नॅश्नल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन हा त्याचाच भाग आहे. आज भारताच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगीक विकासाला चालणा देणा—या प्रकल्पात दामोधर खोरे प्रकल्प व हिराकुंड प्रकल्प महत्वपूर्ण भूमिकेत आहेत.

**हिराकुड धरण**

ओरिसातील महानदी ही सर्वात मोठी नदी आहे. या नदीला सतत महापूर येत असल्यामुळे महीनदीमुळे मोठया प्रमाणात प्राणहानी व वित्तहानी होत असते. त्यासाठी १९३८ मध्ये ओरिसातील पूर चौकशी समिती स्थापन करण्यात आली. या चौकशीने अनेक वेळा अहवाल सादर करूनही सरकारने त्याची दखल घेतली नाही. परंतु ओरिसाचे तत्कालीन नेते श्री. एस. के. मेहताब यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली ८ नोव्हेंबर १९४५ रोजी एक परिषद आयोजित केली. परिषदेच्या अध्यक्षिय भाषणात बाबासाहेब म्हणतात की, अतिरिक्त पाण्याचे जलनियोजन केले तर अतिरिक्त पाणी राष्ट्राची संपत्ती बनते. यासाठी या महानदीवर हिराकुड प्रकल्प उभारणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. लगेच या प्रकल्पाला मान्यता मिळाली व १९४५ ते १९५७ या कालावधीत हे काम पूर्ण झाले.

**भाक्रानांगल प्रकल्प**

भारतातील जलस्त्रोतांचा व जलसंपदेचा विकास कामाकरिता उपयोग करून घेणे सोबतच नदीच्या खो—यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या व्यापक पार्श्वभूमिवर सतलज नदीवर १९४८मध्ये भाक्रानांगल धरण बाधण्यास सुरूवात झाली. आणि १९६३ मध्ये भाक्रानांगल धरणाचे काम पूर्ण झाले. सिंचन व जलविद्युत निर्मितीसाठी उभारलेला प्रकल्प ७४०फुट उंच असलेला संपूर्ण सिमेंट कॉंक्रिटमध्ये बांधला गेला आहे. जलविद्युत निर्मितीची मोठी क्षमता असणारे आशिया खंडातील पहिले व जागतिक पातळीवरील दुसरे धरण आहे. सोबतच पुराचे पाणी वळवून, साठवून ठेवण्यासाठी भाक्रानांगल धरणाच्या खालच्या बाजूस जवळपास तेरा किलोमिटर अंतरावर नांगल धरण बांधले आहे. विद्युत निर्मिती व कृषी क्षेत्राचा विकास हा उद्देश समोर ठेवून बाबासाहेबांनी हा प्रकल्प यशस्वीतेकडे नेला.

**दामोदर खोरे प्रकल्प**

दामोधर खोरे हा बहुउद्देशिय प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महत्वपूर्ण योगदान आहे. पश्चिम बंगालमधील दामोरधर नदीच्या पूरामुळे अनेक प्रकारची अनेक नैसर्गिक आव्हाणांना तोंड द्यावे लागत होते. त्यात अनेक प्रकारची प्राणहानी, पर्यावरणाची व वित्तहाणी होत असे. त्यामुळे या नदीला दु:खाची नदी म्हणूनही ओळखले जाते. तेव्हा दामोधर नदीच्या नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी अमेरिकेतील अेनेनसी व्हॅली अॅथॉरिटीच्या धरतीवर दामोधर खोरे हा बहुउद्देशीय प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. दामोदर खोरे प्रकल्पाचा उद्देश केवळ महापूर थांबवणे एवढाच नव्हता तर त्यामध्ये विद्युतनिर्मिती, सिंचनासाठी पाण्याचा पुरवठा, जलवाहतुक आणि औद्योगिक वापरासाठी पाणी यांचाही समावेश होता. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या राजकिय प्रतिभेचा ज्ञानाचा आणि बौद्धिक कौशल्याचा सर्वस्वी वापर करून राज्य सरकार प्रांत सरकारांना जलविद्युत प्रकल्प विकासाचे राष्ट्रीय धोरण स्विकारण्यास भाग पाडले. अशाप्रकारे बहुउद्देशिय दामोधर नदीखोरे योजना तयार करण्यापासून ते ती मंजूर करणे व पूर्ण करण्यापर्यंतचे काम बाबासाहेबांनी केले.

**बाबासाहेब'नद्याजोड प्रकल्पाचे प्रवर्तक'**

पाण्याच्या बाबतीत बाबासाहेब फार गंभीर होते. बाबासाहेबांनी पाणीप्रश्नावर उपाय म्हणून 'नदी जोडो हा लोकहितार्थ विचार देशापुढे मांडंला. व्हॉइसरॉयच्या मंत्रीमंडळात असतांना त्यांनी नद्याजोड प्रकल्पाची कल्पना मांडली. बिहारमध्ये १९४३ मध्ये भीषण पूर आला. कित्येक गाव नष्ट झाली. हजारो घरे पुरात वाहून गेलीत. आलेल्या पुराने बंगाल आणि भारताचा संपर्क तुटला. पुढे बंगालमध्ये आलेल्या दुकाळाने हजारो लोक मरणपावली. तेव्हा या नदीवर दामोदर धरण बांधण्याची कल्पना बाबासाहेबांनी मांडली. बिहार, ओरिसा आणि बंगालला जीवनदान दिले.

पावसात वाहून जाणा—या पाण्याचे नियोजन व्हावे या दृष्टीतून या वैज्ञानिकदृष्टया सक्षम प्रकल्पाची योजना मांडली होती. देशातील सर्व प्रदेशांना मुबलक प्रमाणात पाणी मिळावे म्हणून बारमाही वाहणा—या नद्यांचा प्रवाह वळवून ज्या प्रदेशांमध्ये पाणी नाहीत त्या भागातील नद्यांना जोडाण्यात म्हणजे सर्व प्रांतांना पाणी मिळून संपूर्ण देशातील शेती, उद्योग तसेच जनतेच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होईल आणि संपूर्ण देशाचा विकास होईल. आज देशातील काही भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत आहे. आज महाराष्ट्र नव्हे तर भारतात दुष्काळाने थैमान घातले आहे. माणूस पाण्यासाठी वणवण फिरत आहे. पशुपक्षी पाण्यावाचून तडफडत आहे, पुरामुळे अख्खी गावच्यागाव वाहून जात आहे, लोकांचे जिवन उद्वस्त होत आहे, शेतीला पाणी नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहे. तेव्हाच बाबासाहेंबाच्या 'नदीजोड प्रकल्पाला' शासनाने गांभीर्याने घेऊन त्याची अंमलबजावणी केली असती तर आज पाण्याची टंचाई भासली नसती. आज मराठवाडा तहानलेला राहीला नसता.

**बाबासाहेबांची राष्ट्रवादाची भूमिका**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जमीण सुधारणेचे पुरस्कर्ते होते. १९१८ मध्ये त्यांनी लहान जमीनधारणेच्या प्रश्नांची चिकित्सा केली व शेतीच्या उत्पादकता फक्त आकारावर नव्हे तर मशागतीसाठी भांडवल व श्रम किती सधनतेने वापराल याला महत्व असतं, हे स्पष्ट केल. म्हणजे शेतीची प्रगती करण्यासाठी औद्योगिकीकरण करून शेतीवरच्या श्रमशक्तीचा भार कमी करण आवश्यक असल्याची भूमिका होती. यासोबतच सामुदायिक शेती उत्पादन वाढविण्याची आवश्यकता असल्याची भूमिका व्यक्त केली. सोबत महार वतन व खोत या व्यवस्था रद्द करण्यासाठी कमालीचे प्रयत्न केले. यासोबतच त्यांनी जमिनीच्या राष्ट्रीयकरणाचा पुरस्कार केला. शेतक—यांच्या गटांनी सहकारी तत्वावर शेतजमीन मशागतीसाठी द्यावी असा त्याचा विचार होता. बाबासाहेबांनी राज्घटनेची रचना करतांना महत्वाचे उद्योग सरकारी मालकीचे व व्यवस्थेचे असावेत, मुलभूत पण बाकी उद्योगही सरकारी व्यवस्थेने किंवा प्रमंडळांनी चालवावेत व शेती हा सरकारी उद्योग असावा. अधिक कार्यक्षम आकारात अशी जमीण गावक—यांना सहकारी पद्धतीनं कसण्यास द्यावी अशा तरतुदी करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक भारतीयांचा आत्मसन्मान व्हावा, कोणालाही जाती—धर्माच्या नावावरून अपमानित केले जाऊनये, तसेच प्रत्येकाची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारावी म्हणून देशाच्या सर्व सार्वजनिक कंपण्यांचे राष्ट्रीयकरण व्हावे आणि देशातील सर्व समाजाच्या व्यक्तींना उघोग—व्यवसायात सामावून घेऊन देशाच्या विकासामध्ये त्यांना सहभागी करून घ्यावे असे त्यांचे मत होते. तसेच येथिल शेतीचे राष्ट्रीकरण व्हावे आणि ग्रामीण भागातील सर्व जाती—जमातीच्या लोकांना शेती व्यवसायांमध्ये सामिल करून घ्यावे. शेती आणि उघोग यांच्यामध्ये देशातील सर्व समाजाचे लोक सामावल्यामुळे सर्व समाजाची आर्थिक स्थिती सुधारेल तसेच प्रत्येक समाजाची माणसे एकत्र आल्यामुळे आपाआपासातील जातीयता नष्ट होऊन सामाजिक एकता निर्माण होईल. तसेच अखंड भारत निर्माण होईल अशी डॉ. बाबासाहेबांच्या 'राष्ट्रवादाची' भूमिका होती. अशाप्रकारे बाबासाहेबांनी कोणत्याही एका समाजासाठी कार्य केले नाही तर संपूर्ण देशवासीयांच्या हितासाठी अहोरात्र कार्य केले

**बाबासाहेबांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टी**

आजच्या बदलत्या व राजकिय व जागतिकिकरणाच्या प्रक्रियेमुळे आंरराष्ट्रीय घडामोडीत जे बदल होत आहे त्या बदलत्या पार्श्वभूमिवर व सुरक्षाविषयक धोरणाबाबत बाबासाहेबांनी काही मूलभूत संकल्पणा मांडल्या होत्या. त्या आजही कशा महत्वाच्या आहेत हे पाहणे गरजेचे आहे. जुलै १९४१ साली ब्रिटीश सरकारने कार्यकारी मंडळाची पुनर्रचना व सदस्यांची वाढ करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कार्यकारी मंडळात संरक्षण सल्लागार समितीत निवड केली. त्यावेळी बाबासाहेबांनी दुस—या महायुद्धाच्यावेळी समितीची जबाबदारी स्वीकारून भारताच्या संरक्षण व सुरक्षेबाबत आपले विचार मांडले. १९३९ नाझी जर्मनीने पोलंडवर कब्जामिळवल्यावर दुस—या महायृद्धाला सुरूवात झाली होती. त्यावेळी बाबसाहेबानी असे सुचविले की भारतानं आपल्या सुरक्षेसाठी, जागतिक सुरक्षेसाठी नाझी जर्मनीचा विरोध करावा. तसेच ब्रिटिश सरकारने गोलमेज परिषदांमध्ये जी भारताच्या सुरक्षिततेची हमी दिली त्याची पूर्तता करावी. शिवाय गोलमेज परिषदेमध्ये आपले विचार व्यक्त करतांना बाबासाहेब म्हणाले की, भारतात चांगले सुदृढ प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावे यासाठी भारतीय युवकांना ठरावीक वयानंतर लष्करी शिक्षण सक्तीचे करावे सोबतच लष्करी भरती करतांना सर्व जाती—धर्माच्या लोकांना लष्करात सामावून घेतले पाहीजे. लष्करी शिक्षणाव्दारे भारतीय युवक सुदृढ व परिपक्व तयार होतील व त्याव्दारे प्रशासकिय व लष्करीदृष्टया सक्षम नागरिक तयार होतील. म्हणून बाबासाहेबांनी लष्करी शिक्षणाचा आग्रह धरला. बाबासाहेब आंबेडकरांनी लष्करी शिक्षणाची मागणी गोलमेज परिषदेत मांडून भारताच्या उज्वल भविष्याची मुहुर्तमेढ रोवली. पण दुदैवाने या राष्ट्रीय सुरक्षिततेच्या महत्वाच्या दृष्टीकोणाविषयी चर्चा झाली नाही.

**दुस—या राजधानिची मागणी**

बाबासाहेबांनी आर्थिक,सामाजिक धार्मिकतेबरोबरोच देशाचे दळणवळण याही संदर्भात प्रभावी मार्गदर्शन केले आहे. बाबासाहेबांनी भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने भारताची दिल्लीशिवाय दुसरी राजधानी असावी असे स्पष्ट मत होते. स्वातंत्त्यानंतर

राज्य पुनर्रचनेच्या वेळी भौगोलीक आणि संरक्षणाच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरेल. दिल्लीला पर्याय म्हणून हैदराबादचा उल्लेख केला. नागपूरचेही संदर्भ आले पण स्वातंत्त्योत्तर काळात नागपूर विकसित शहर नव्हते. हैद्राबाद हे शहर भारताच्या सर्वशहराच्या थोडयाफार प्रमाणात मध्यवर्ती असल्याकारणाने व त्याचे सामाजिक व सुरक्षाविषयक महत्व असल्यामुळे हैदाबादचा विचार व्हावा यावर बाबासाहेबांनी गंभीर चर्चा केली होती. बाबासाहेब दुस—या राजधानीची मागणी करण्यासाठीची कारणे देतांना म्हणतात की, दोन राजधानीमुळे उत्तर भारत व दक्षिण भारत यांच्यातील जो क्षेत्रिय व वांशिक वाद आहे तो कमी होईल, शिवाय दिल्ली हे चीन व पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्यासमोरचे सर्वात जवळचे शहर आहे. म्हणून दक्षिणेकडील हैद्राबाद व सिकंदराबाद तसेच शेजारील प्रांताचे एकत्रिकरण करून त्यांचे प्रमुख प्रशासकीय विभाग निर्माण करून त्या ठिकाणी दुस—या राजधानीची स्थापना करावी जेंणेकरून भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने व प्रशासकीय कामे लवकर होतील. त्यामुळे उत्तर—दक्षिण भारतातील दरी कमी होऊन देशात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होईल. बाबासाहेब म्हणतात की, राष्ट्रीय युद्धनीतीचे धोरण हे राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाबाबतचे धोरण असते. त्याधोरणात अंतर्गत आणि बर्हिगत धोरणांचा विचार केला गेला पाहिजे. जसे— दहशतवाद, काश्मीर प्रश्न, घुसखोरी, नक्षलवादी चळवळ, आंरराज्यीय पाणी प्रश्न, अंतर्गत सीमावाद, प्रांतवाद, भाषावाद इत्यादी अनेक प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेशी निगडीत आहेत. आणि या प्रश्नांनी जर उग्ररूप धारण केले तर तेच प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेसाठी आव्हाण ठरतात. म्हणून बाबासाहेबांनी प्रादेशिकवाद टाळण्यासाठी ' एक भाषा, एक राज्य' हे सुत्र सुचविले. पण त्यांची मागणी मान्य न करता राज्य पुनर्रचना आयोगाने 'एक राज्य, एक भाषा' हे सुत्र स्विकारले. आज भारताला स्वातंत्त्य प्राप्तहोऊ इतके वर्ष होऊनही सीमावाद, प्रादेशिकवाद, भाषावाद, पाणीवाद, विभागीय विकासाचा असमतोल राष्ट्रीय भावणेला आव्हाण देत आहे.

**बाबासाहेबांचेराष्ट्रभाषाविषयक विचार**

देशाची एक राष्ट्रभाषा असावी आणि ते स्थान हिंदी भाषेला असावे असे बाबासाहेब म्हणत. एकुण लोकसख्येच्या अंदाजे ४८ टक्के लोकसंख्या हिंदी भाषा बोलणा—यांची आहे आणि त्यांचे वास्तव्य मोठया प्रमाणात देशाच्या उत्तर भागात आहे. एवढया मोठया संख्येत हिंदी भाषा बोलणा—यांचा समावेश उत्तर प्रदेंश, मध्यप्रदेश, बिहार या केवळ तीन राज्यांत झाला. त्या तुलनेत दक्षिणेतील राज्ये छोटी झाली. त्यामुळे 'एक भाषा एक राज्य' असे असावे. प्रशासनाच्या दृष्टीने ते सोईचे होईल. एक भाषा बोलणा—यांच्या विशालकाय राज्यांची विभागणी करून लहान लहान राज्यांत त्यांचे रूपांतर करण्यात यावे. प्रादेशिक भाषा जर केंद्र आणि राज्य यातील संपर्क भाषा झाली तर प्रथम भारतीय आणि शेवटीही भारतीय ही भूमिका घेवून भारताला ख—या अर्थाने एक राष्ट्र म्हणून निर्माण करण्याचे स्वप्न आपल्याला साकार करता येणार नाही. संपर्क भाषा म्हणून काही काळासाठी हिंदीसोबत इंग्रजीचा उपयोग व्हावा म्हणून पण कायम स्वरूपात केवळ हिंदी भाषाच असावी असे बाबासाहेब म्हणत होते.

**बाबासाहेबांचेसंरक्षण आणि परराष्ट्र धोरण**

संरक्षण आणि परराष्ट्र धोरणाबाबतही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अत्यंत स्पष्ट होती. काश्मीर प्रश्नाविषयीपण त्यांची भूमिका अतिशय स्पष्ट होती भारताशेजारी अण्वस्त्रे असणारी चीन व पाकिस्ताण ही दोन राष्ट्रे आहेत. त्यामुळे भविष्यात आपल्या सुरक्षिततेपुढील पुन्हा नवीन आव्हाने आणतील. म्हणून बाबासाहेबांनी काश्मीर प्रश्नाविषयी म्हणाले की, काश्मीर प्रश्न लोकसंख्या, स्थलांतर व कायमची फाळणी या तीन विभागात करून तसेच काही ठिकाणी जनमत घेऊन कायमचा निकालात काढावा. पण दुर्दैवाने तसे होऊ दिले नाही. तसे झाले असते तर आज काश्मीर प्रश्नामुळे गेल्या काही वर्षापासून सामान्य नागरिक, अधिकारी व हजारो सैनिक आज मृत्युमुखी पडले नसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक व सुरक्षाविषयक सुचविलेल्या धोरणांची अंमलबजावणी सुरूवातीच्या म्हणजेच राष्ट्रउभारणीच्या काळात झाली असती तर आज जे काही अंतर्गत व बर्हिगत सुरक्षितेच्या प्रश्नांनी उग्र रूपधारण केले नसते.

देशाच्या सुरक्षेसाठी बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेत भारत देशाची एकता व अखंडता टिकविण्यासाठी कलम ३५२, ३५६ व कलम ३६० अशी तीन कलमे समाविष्ट केली. ही तीनही कलमे आणीबाणी विषयक आहेत. राष्ट्रपतींना आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

- ३५२ कलम—जेव्हा परकिय राष्ट्रांपासून जेव्हा भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होतो तेव्हा याचा वापर केला जातो.
- ३५६ कलम—एखाद्या राज्यात राजकिय अस्थिरता निर्माण होत असेल किंवा दुसरे कोणतेही राज्य फुटीरतावादी भूमिका घेत असेल तर त्यावेळेस केंद्रसरकार या कलमाचा वापर करून आणीबानी जाहिर करू शकते.
- ३६० कलम— जेव्हा राष्ट्रीय आर्थिक संकट निर्माण होते जेव्हा ते संकट दूर करण्यासाठी राष्ट्रपती या कलमाचा वापर करतात.

यापैकी ३५६ कलम राष्ट्राची एकता व अखंडता निर्माण करण्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. ३५६ कलमामुळेच जम्मू—काश्मीर, पंजाब व उत्तरपूर्व राज्ये आज भारतात एकसंघ आहे. त्याचसोबत बाबासाहेबांनी या कलमांबाबतचा धोकाही सांगिंतला आहे. यात केंद्रसरकारची भूमिका महत्वाची असल्याचे सांगीतले. तत्कालीन परिस्थितीतून राज्यघटनेतील ३७० वे कलमाची तरतुद त्यांनी नाईलाजाने स्विकारली खरी, पण त्यातही हे तात्पूरते असून कालातंराने ते निष्प्रभ होत जावे अशी व्यवस्था नमुद करण्याची काळजीही घेण्याची जागरूकता बाबासाहेबांनी बाळगली होती. राज्यघटनेत राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्राची सुरक्षा विषयी बोलतांना बाबासाहेब म्हणतात की, एक नागरिकत्व व एक न्याय प्रक्रियेमुळे राष्ट्राची सुरक्षितता चांगल्याप्रकारे टिकवता येते. एक नागरिकत्वामुळे सर्व लोकांना समान कायदे लागू होतात. एक सशक्त राष्ट्र उदयास आणावयाचे असेल तर इतर वाद टाळून भारताच्या राष्ट्रहितास महत्व देण गरजेचे असल्याचे म्हटले आहे.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे'राष्ट्रनिर्मितीतील योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वरी योगदानाविषयी फारसी चर्चा झालेली दिसत नाही. दामोधर नदीखोरे योजनेप्रमाणे हिराकुड नदी योजना, सोने नदी खोरे योजना या सर्व योजनांचे प्रारूप तयार करण्याचेही काम बाबासाहेबांनी केले. देशात स्वातंत्त्योत्तर काळात जरी हे प्रकल्प उभारण्यात आले असले तरी या योजनांची पायाभरणी १९४२ ते १९४६ च्या दरम्यान बाबासाहेबांनी केली होती. या सर्व प्रकल्पामुळे पुरांचे संकट टळलीत. सोबतच लाखो शेतक—यांच्या शेतीसाठी जलसिंचनाची व्यवस्था देखिल झाली. या सिंचन व उर्जा प्रकल्पाच्या विकासाचे महत्व गरिबांच्या दृष्टीकोनातून देखील आहे. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर हे दूरदृष्टीचे अर्थतज्ञ व जागतिक व्यवस्थापनाचे गुरू होते.आजही बाबासाहेबाचे राष्ट्रीय सुरक्षाविषयक विचार राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय राजकारणात उपयुक्त आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तीमत्व ख—या अर्थाने महासागरासारखे उत्तुंग होते. ते समाजपरिवर्तनाचे 'क्रांतीकारक प्रज्ञासुर्य' होते. एक उत्तम शिक्षणतज्ञ, एक निष्णात बॅरिस्टर, सांप्रदायिक सद्‌भावना व सहिष्णुतेचे प्रेरक, स्त्री पुरूष समानतेचे पुरस्कर्ते, अर्थशास्त्रज्ञ, कायदातज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ ,मानववंशशास्त्रज्ञ असे असामान्य अव्दितीय व्यक्तीमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. यांचे जीवन चरित्र हे आधुनिक भारताच्या इतिहासाचे एक महान पर्व आहे. बाबासाहेबांचे राष्ट्र, राज्य, धर्म, मानवतावाद, महिला सबलिकरण, कृषीविकास, जलसंरक्षण, जलसंवर्धन, अर्थनिती, विश्वमानवी कल्याण या संदर्भातील विचार व योगदान समाजाला हजारो वर्षापर्यंत मार्गदर्शक राहणार आहे.

**संदर्भ : —**

दैनिक महाराष्ट्र टाइम्स् , दि. १३ एफ्रिल २०१६,पेज नं ११
मूलनिवासी, दि. ०२ एफ्रिल २०१६, पेज नं २
दैनिक महाराष्ट्र टाइम्स् , दि. १४ एफ्रिल २०१६
दैनिक महाराष्ट्र टाइम्स् , दि. ०३ आक्टोबर २०१४
मूलनिवासी, दि. २३ मार्च २०१६,

दैनिक सकाळ, दि. १४ एफ्रिल २०१३,
दैनिक लोकमत, दि. १४ एफ्रिल २०१३,
कदम विशाल, आई संस्कार फाऊडेशन, उद्गीर जि. लातूर प्रज्ञासुर्य, २०१६
किर धनंजय,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन , मुबई, १९८९.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र भाषणे: खंड—१,क्षितिज पब्लिकेशन, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लघुलेख/ भाषणे (संख्या १०), संकलन— सदाशिव कांबळे, २०१७
भारतीय संविधान, भारत सरकार विविध न्याय मंत्रालय, २००६
कसबे रावसाहेब,डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना: सुगावा प्रकाशन, पुणे, २०१४
गायकवाड ज्ञानराज, महामानव: डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २०१३
थोरात सुखदेव, बाबासाहेब आंबेडकर, जल व विद्यूत भूमिका व योगदान

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय एकात्मता

**प्रा.डॉ.उल्हास एन.राठोड**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शिवरामजी मोघे महाविद्यालय,केळापूर (पांढरकवडा)
जि. यवतमाळ

**प्रस्तावना—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील महू येथे झाला.भारतीय संविधानाचे निर्माते आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री भीमराव आंबेडकरांना उपेक्षित वर्गाचे उध्दारक आणि एक कर्मठ व्यक्तीच्या रुपात ओळखले जातात. ते जन्मतः तथाकथित अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजात जन्मले असले तरी स्वभावतः ते उच्च कोटीचे क्षत्रीय आणि बौध्दीक दृष्टीने उच्च कोटीचे ब्राम्हण होते. मानवतेचे पुजारी, अनन्य देशप्रेमी, उच्च कोटीचे विद्वान, महान विधीवेत्ता, विवेकी, न्यायशील, संविधानाचे महापंडित, लेखक, पत्रकार, दलित शोषित, पिडित मानवतेचे पग्रबल पक्षकार, उच्च कोटीची सौम्यता व सज्जनता तसेच दीनहिनांच्या प्रतीअसीम प्रेमभावना असणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तीत्त्व आणि कतृत्त्वापासून कुणीही अपरिचित असणारा नाही.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आता केवळ एक नाव राहिले नसून तो एक विचार झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही आज चळवळ बनली आहे. जी समाजकारण, राजकारणासोबतच हजारो परवर्तिशील तरुणांना हालाखीच्या परिस्थितीला योग्य आवाक्याबाहेर असेल आणि प्रस्थापित व्यवस्थाही आपल्या विरुध्द असेल तर या दोन्ही पातळीबाहेर असेल आणि प्रस्थापित व्यवस्थाही आपल्या विरुध्द असेल तर या दोन्ही पातळीवर सर्वांगीण सकारात्मक बदल हा केवळ शिक्षण, संयम आणि सचोटीनेच करता येऊ शकतो हे डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले आहे. आंबेडकर पूवोत्तर काळात भारतीय समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्यावर आधारित असल्याचे दिसते. त्यामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण असून जीवन जगत असतांना व्यक्तिला केवळ समाजाने आखून दिलेल्या चौकटीतच रहावे लागते. कारण वर्णव्यवस्था ही भारतीय समाजव्यवस्थेचा आधार होती. याचारही वर्णांची उत्पत्ती साक्षात विराट ब्रम्हाच्या अनुक्रमे मुख, बाहू, मांडी आणि पायातून झाली असे मनुस्मृतीत मनुने लिहिले आणि हजारो वर्षे त्याच अनुक्रमाने या वर्णांची सामाजिक बांधणी करण्यात आली. भारतीय सामाजिक विचारांचे उगमस्थान या मनुस्मृतीतच दिसून येते. कारण हजारो वर्षे भारतीय संस्कृतीने या मनुस्मृतीचे मुकपणे पालन केले. चातुर्वर्ण्यावर आधारलेली ही समाजव्यवस्था ईश्वरप्रणीत असून यामध्ये बदल करताच येऊ शकत नाही हा विचार लोकांच्या मनात पक्का रुजवण्यात मनु यशस्वी झाला. मनुपूर्वी वेद, ऋग्वेदांनीही वर्णास मान्यता दिल्याचे आढळते. वेद, उपनिषदे, स्मृति, पुराणे, रामायण, महाभारत या हिंदू धर्मग्रंथानुसार मनु याने त्याच्या वर्णानूसारच वर्तन करणे हाच त्याचा धर्म होता. मनुस्मृतीने वर्णव्यवस्थेवर शिक्का मोर्तब करुन करुन चातुर्वर्ण्याचे समर्थनच केले होते. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या वर्णांतर्गत असणाऱ्या जातींना सवर्ण आणि या वर्णाच्या बाहेर असणाऱ्या अस्पृश्य, आदिवासी या जमातींना अवर्ण ठरविण्यात आले. म्हणजेच देव, धर्म, कर्मकांड, धर्मग्रंथ इत्यादींच्या नावाखाली एका लहानशा स्वार्थी समाजगटाने हजारो वर्षे या वर्ण, अस्पृश्य समाजावर अन्याय अत्याचाराला दाद मागण्यासाठी कोणतीही अधिकृत अशी समाजमान्य व्यवस्था नव्हती. यांचा जनम जणू फक्त उर्वरित तिन्ही वर्णांच्या जाचाला निमुटपणे सहन करण्यासाठीच झाला होता.

**शोधनिबंधाची उदिष्टये**

- राष्ट्रीय एकात्मतेसंबधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अभ्यासणे.
- डॉ बाबासाहेबांच्या राष्ट्रीय एकात्मतेसंबधी विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन हे तथ्य संकलनाच्या द्वितीयक सामग्रीवर आधारीत आहे. प्रस्तुत शोधनिंधासाठी प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासावरील विविध पुस्तके, पाक्षिके, मासिके, गौरव ग्रंथ इत्यादी सामग्रीचा आधार घेतला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या जीवन कार्यावरील विविध प्रकाशित आणि अप्रकाशित ग्रंथाचा आढावा घेतला आहे.

**रा ट्रीय एकात्मता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

राष्ट्र निर्मितीच्या व राष्ट्र सशक्तीकरणाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय एकात्मतेची भावना अतिशय महत्त्वपूर्ण घटक आहे. भारतीय संविधानातून ते प्रतित होते. संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात आपण एक राष्ट्र बनले पाहिजे असा संकेत करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, आपण राष्ट्र आहोत अशी जर कोणाची समजूत असेल तर तो एक भ्रम ठरेल. हजारो जातीमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल. सामाजिक व मानसिक दृष्टयादेखील आपण राष्ट्र संज्ञेस पात्र नाही हे जितक्या लवकर जाणून घेता येईल तितके ते फायदेशिर होईल. कारण त्यानंतर मग राष्ट्र ही संज्ञा प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारी साधने व मार्ग शोधण्यास आपण उद्युक्त होऊ. यावरुन आपण एकराष्ट्र बनले पाहिजे असाच त्यांचा संकेत असल्याचे दिसते. डॉ. आंबेडकरांना व्यक्तीची प्रतिष्ठा एकात्मका यांचे आवश्वासन देणारी बंधुता हवी होती. घटनेच्या मूळ उद्दीष्ट पत्रिकेत बंधुभाव हा षब्द नव्हता, परंतु मसूदा समितीने त्याचा अंतर्भाव सरनाम्यात केला. याचे संपूर्ण श्रेय डॉ. आंबेडकरांच्या विश्लेषणाचाच द्यावे लागेल. राष्ट्रीय एकात्मतेसाठी केंद्रशासन बलवान असावे असे त्यांना वाटत होते. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताच्या स्वातंत्र्यांच्या पूर्वसंध्येला जवळपास सहाशे लहान मोठी संस्थाने भारतात विलीन झाली होती. विलीन झालेल्या संस्थांचे विलीनीकरण मजबूत व्हावे आणि त्यांच्यात विभक्तीकरणाची प्रवृत्ती वाढू नये म्हणून भारताची मध्यवर्ती सत्ता मजबूत असणे गरजेचे होते. '१९३५ च्या कायद्यात केंद्रसरकार बलिष्ठ व्हावे' अशी त्यांची इच्छा होती.

एखादे राष्ट्र किती बलवान, एकात्म आणि सक्षम आहे यावरुन ते किती सुरक्षित व कल्यणकारी असू शकते याची कल्पना येते. यादृष्टीने राष्ट्रीय एकात्मता मजबूत करणारे अनेक अनुच्छेद भारतीय राज्य घटनेत समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामध्ये 'अनुच्छेद १ मध्ये भारताचे वर्णन'युनियन ऑफ स्टेटस् 'राज्याचा संघ' असे केले आहे. म्हणजेच भारत हे एकसंघ रा ट्र असावे अशीच डॉ. आंबेडकरांची इच्छा असल्योच दिसते. 'अनुच्छेद ५ अनुसार या राज्याच्या संघाच्या प्रारंभापासूनच कोणालाही त्याचे नागरिक व्हायचे असेल तर त्या व्यक्तीचे संघराज्याशी भूभौतिक नातेसंबंध असणे आवश्यक आहे. ते मग जन्माने असो, वंशपरंपरेने असो अथवा त्या भूभागातील निवासी म्हणून असो. 'अनुच्छेद ३२५ अनुसार सर्व नागरिकांची कोणताही भेदभाव न करता एक सामुदायिक यादी असेल. संपूर्ण देशासाठी एक संघीय निर्वाचन आयोग, एकात्म न्यायपालिका आणि एक महावित्त लेखापरिक्षक असेल. संपूर्ण देशासाठी एकच लोकसेवा आयोग असेल. राष्ट्राध्यक्ष सर्व घटक राज्यांच्या राज्यपालांची, न्यायधीशांची नेमणूक करील. एक भाषा, एक जीवनपध्दती, एक धर्म हे राष्ट्रीयत्वाचे आधार आहेत. एका भा ेत बोलून भारताचे ऐक्य वाढवण्याचे धोरण प्रत्येकापुढे पाहिजे. असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी भारतीय राज्यघटनेत त्यांनी अनुच्छेद ३४३ (१) अनूसार संपूर्ण संघराज्याची राजभाषा, सबंध देशासाठी एक संघीय निर्वाचन आयोग, एकात्म न्यायपालिका, एक महावित्त लेखापरिक्षक, एकच लोकसेवा आयोगाची निर्मिती केली. या गोष्टी राष्ट्राची एकात्मा वाढविण्यासाठी मदत करतात. भारतीय राज्यघटनेत अशी अनेक कलमे आहेत जी राष्ट्रीय एकात्मतेस हातभार लावतांना दिसतात.

**जातिअंताची चळवळ परिदृढ करण्याची गरज**

डॉ. आंबेडकरांनी १९३६ ते १९५६ पर्यंत आपली हयात जातिअंतासाठी खर्ची घातलेली पहावयास मिळते. जातिअंताशिवाय समाजात बंधुभाव वाढीस लागणार नाही असे त्यांचे म्हणणे होते व ते खरे आहे. मात्र डॉ. आंबेडकरोत्तर कालखंडामध्ये जातिअंताची चळवळ सक्षमपणे पुढे येणारा त्यांचा अनुयायी वर्ग कमी पडतांना दिसतो.

जातिच्या वैमनस्यातून अनेक दलित हत्याकांड महारा  ट्रात घडलेले पहावयास मिळतात. आज संगणकीय युगामध्ये सामाजिक समता निर्माण झालेली पहावयास मिळत नाही. उलट जमातवादी शक्ती सामाजिक समरसतेचा प्रचार जोमात करातांना पहावयास मिळतात व त्यांना दलित साहित्यिक व राजकीय नेतृत्व बळी पडलेले दिसून येतात. समाजात बंधुभाव निर्मितीसाठी रक्तसंकर महत्वाचा ठरतो. तसे झाले तर समाजात समता, बंधुता निर्माण होईल. म्हणून आज जातिअंताची चळवळ परिदृढ करण्याची गरज आहे.

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर एन. शिवराज यांनी म्हटले होते की, 'डेड आंबेडकर इज मोस्ट डेंजरस दॅन अलाइव्ह' म्हणजे मृत आंबेडकर हे जिवंत आंबेडकरांपेक्षा जास्त धोकादायक आहेत. आज त्याची प्रचिती आल्यावाचून राहत नाही. आज कोणत्याही निवडणूकीत स्वकीय आणि परकीय यांना त्यांचे नाव घेतल्याशिवाय पर्यायच उरला नाही.

समता, बंधुता व समाजाची स्थापना करण्याचे उद्दिष्ट राज्यघटनेने जाहिर केले. त्याचा भाग म्हणून आपण कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारली.

**भारतीय राज्यघटना : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अनमोल देणगी**

स्वतंत्र भारताची सार्वभौम जगप्रसिद्ध अशी राज्यघटना लिहून त्या घटनेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिल्पकार ठरले असून घटनेने आपणास सर्व प्रकारची ताकत दिली आहे. या घटनेच्या आधारे भारत देश कसा चालविला जातो याचे दर्शन घडते आणि म्हणून संपूर्ण देशाला मार्गदर्शन करणारी, नियंत्रित करणारी, संपूर्ण देशाचा विकास घडवून आणणारी, देशातील माणसांना माणुसकीचे, मान सन्मानाचे आणि नैतिकतेचे दर्शन घडविणारी राज्यघटना संपूर्ण जगाला आदर्शवत अशी ठरणारी, देशातील सर्व जाती, धर्म, पंथ, लिंग भेद इत्यादीपासून संरक्षण देणारी राज्यघटना बाबासाहेबांच्या हातून लिहिली गेली आहे.

भारतीय राज्यघटनेमुळे भारतातील सर्व नागरिकांचे जीवन उजळून निघाले आहे, निघत आहे. घटनात्मक सर्व अधिकार संविधानामुळे आज सर्वांना मिळाले आहेत. भारतीय संविधान हे सर्व खाजगी, सार्वजनिक व मित्र क्षेत्राला मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे आहे. मुलभूत अधिकार, समानता, अनुसूचित जाती—जमाती, जनजाती, धार्मिक, अल्पसंख्याक, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी उपाययोजना करणारे संविधान आहे.

शिक्षण, आरोग्य, संरक्षण, व्यवसाय, कंपनी, विद्यापीठ, न्यायालये, संसद, संघटना इत्यादी ठिकाणी संविधानाची मार्गदर्शक तत्वे व त्यातील तरतुदीनुसार नियोजन, संघटन, नियंत्रण, संदेशवहन, प्रशासन निर्माण करणारे आपले संविधान आहे. संविधानामुळे भारतीय राज्यव्यवस्थेला सुदृढ, सक्षम, समर्थ बनवून प्रचंड ऊर्जा व शक्ती लाभली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड मेहनत घेऊन भारतीय संस्कृती व विचारधारा विचारात घेऊन रात्रंदिवस काम करुन एक उत्तम, आदर्श लवचिक ग्रंथ ते स्वत: आजारी असताना देखील दोन वर्षे ११ महिने व सतरा दिवस सातत्याने, समतोल विचाराची कल्याणकारी संविधान देशाला अर्पण केली आहे.

भारताचा वैधानिक, औद्योगिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक संस्कार, संस्कृती व मुल्यविषयक असा सर्वांगीण विकास गतिमानतेने होणे, भारत सर्वार्थाने स्वावलंबी बनविणे, भारतातील कुपोषण, दारिद्र, शोषण व विषमता नाहीशी होणे, रोजगार निर्मिती करणे, जगातील इतर देशांना प्रगतीसाठी प्रचंड मदत करण्याची क्षमता निर्माण करणे आणि भारत देश संपूर्ण जगाचा शांततामय व कल्याणकारी व विकसनशील देश बनविण्याकडे घटनात्मक तरतुदींचा विचार करुन आज संविधानाच्या तत्वावर देशाने उचललेले अत्यंत महत्त्वाचे पाऊल प्रेरक ठरत आहे.

समाजाची पुनर्रचना, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायव्यवस्था या तत्वावर व्हायला हवी. जातीभेदाचे निर्मुलन होऊन सर्वांना समान संधी मिळावी हे बाबासाहेबांचे जीवनकार्य होते. शिक्षणाची कवाडे सर्वांना खुली व्हावेत यासाठी त्याचा आटोकाट पर्यंत होता. तो आज आपणास सफल होताना दिसत आहे. समताधिष्ठीत समाजरचना स्थापन होऊन सर्वांना मानवी हक्क प्राप्त व्हावेत हे महात्मा फुलेंचे गृहीतक होते व त्यांच्या विचारांचा वारसा बाबासाहेबांनी स्वीकारुन तो समृद्धही केला.

**सारांश–**

भारतीय संविधानाने सर्व मानसे कायद्यापुढे समान आहेत हे तत्व स्वीकारलेले आहे. त्यामुळे कायदा सर्व जनतेला तसेच नगरसेवकापासून ते आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री आदी सर्व लोप्रतिनिधींना कायद्याचे पालन एकसारखेच करावे लागते. कायद्यापुढे सर्व समान असतात आणि त्यांना समान नागरी अधिकार असतात, व्यक्तींनी जर काही बेकायदेशिर कृत्य केल्याचे सिध्द झाले तर त्या दंडनीय अपराधास पात्र ठरतांना दिसत आहे. उदा. एका मातब्बत राजकीय नेत्याला भ्रष्टाचाराच्या आरोपावरुन शिक्षा होऊ शकते. हे कोटयावधी रुपयाच्या पशूखाद्य गैरव्यवहार प्रकरणी रांची न्यायालयाने राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांच्या विरुध्द दिलेल्या निर्णयामुळे सिध्द झाले आहे. तसेच नुकताच सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता यांच्या विरोधात दिलेल्या निर्णयावरुनही पुन्हा एकदा हे सिध्द झाले आहे. जयललिता यांनी स्त्रोतापेक्षा अधिक मालमत्ता जमा केल्याचे प्रकरण उघडकीस आले आणि त्यांच्यावरील आरोप सिध्द होऊन शिक्षा झाल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या लोकप्रतिनिधीत्व अंमलबजावणीचीही कार्यवाही होऊन शिक्षा झालेल्या त्या पहिल्या मुख्यमंत्री ठरल्या आहेत. अर्थात या निर्णयाविरुध्द त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली असली तरी कायद्यापुढे सर्व समान आहेत हे संविधानाने स्वीकारलेले तत्व आज सर्वांना सारख्याच पध्दतीने लागू केले जाते याचीच प्रचिती येते.

सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे त्यांचे अलौकिक व्यक्तिमत्व होते. मानव स्वंयपूर्ण व भयमुक्त झाला पाहिजे हा बाबासाहेबांचा आग्रह होता, त्यांनी दिलेल्या प्रेरणेमुळेच मानवी जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे हे विसरता कामा नये आणि म्हणून ज्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होऊ शकत नाही.

**संदर्भ ग्रंथ**

- लुलेकर प्रल्हाद (२०११), अनंत पैलूंचा सामाजिक योध्दा : दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि. ५, पहिला मजला नम: शिवाय अपार्टमेंन्ट्स, ५२५, नारायण पेठ, मोदी गणपती पुणे.
- डाहाट धनराज (२०११), डॉ. बाबासाहेब आंबेडकर :भाषणे आणि विचार खंड–५, संकेत प्रकाशन, नागपूर.
- खरात शंकरराव (२००९), डॉ. बाबासहोब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, इंद्रयणी साहित्य २७३, शनिवार पेठ, पुणे–४११०३०.

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

प्रा. सुधीर वि. बानुबाकोडे
राज्यषास्त्र विभाग प्रमुख
डॉ. ष्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय,
षेंदुरजनाघाट, ता. वरूड, जि. अमरावती

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या ज्ञानसुर्याने भारतभर आंणि भारताबाहेरही विसावे षतक प्रकाषमान केले. आपल्या देषात हजारो वर्षे चातुवर्ण्याच्या आणि जातीयतेच्या घाणीत, चिखलात रूतलेल्या कोटयावधी लोकांना त्या ज्ञानसुर्याच्या विचारकिरणांनी मुक्त केले, वर काढले आणि स्वच्छ केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार स्वीकारणा—या समाजाच्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला. कुत्र्या—मांजरापेक्षा किंवा किडे—मुंग्यांपेक्षाही जे हिन आणि अस्तित्वहीन जीवन जगत होते. त्यांना माणूसपणाचे हक्क प्राप्त झाले. ही सर्व किमया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य,कर्तृत्वाने, चळवळीने केली.

भारतातील चैतन्यहीन अस्पृष्य समाजात चैतन्य निर्माण करण्याचा, त्यांच्यामध्ये नवी उर्जा निर्माण करण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने व चळवळीने केला. भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याची मिळालेली संधी त्यांनी व्यर्थ न घालविता त्या मिळालेल्या संधीचा पुरेपुर फायदा उचलला आणि भारताच्या सांसदीय लोकषाहीला बळकटी आणणारा, देषाच्या ऐक्याला पुरक असलेला विचार त्यांनी भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केला. भारतात सामाजिक, आर्थिक समानता निर्माण व्हावी, प्रत्येक नागरिकांना व्यक्तीस्वातंत्र्य प्राप्त व्हावे, आपल्या देषात जातियता नष्ट होऊन राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावी, सर्वांना समान न्याय व संधी मिळावी हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनभर केलेला आहे. आपला देष ख—या अर्थाने राष्ट्र व्हावा, देषात समताधिष्ठीत समाज रचना निर्माण व्हावी, प्रत्येक भारतीयांच्या मनात राष्ट्रवाद निर्माण व्हावा आणि राजकीय स्वातंत्र्याची गोड फळे सर्व स्तरातील जनतेला चाखावयास मिळावी असा त्यांच्या प्रयत्न होता. माणूस त्यांच्या विकासाचा केंद्रबिंदू होता. त्यांनी सर्वांना हक्काची जाणीव करून देतांना समाज व देषाच्या प्रती असलेल्या कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे.

**डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रउभारणीचे कार्ये :**

**1 कृषिविषयक क्षेत्रातील योगदान :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कृषिविषय सुधारणा आणि षेतक—यांच्या प्रष्नांबाबत मांडलेले विचार आजही महत्वपुर्ण आहे. तसेच केंद्रीय मंत्री असतांना पाणी आणि विजेच्या नियोजनाबाबत त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. बाबासाहेबांनी देषाच्या सर्वागींण विकासाचे स्वप्न पाहिले आणि ते साकारण्यासाठी निष्ठेने प्रयत्न केले. त्यामध्ये विविध तांत्रिक संस्थांची निर्मिती, जलसंसाधनाचे संवर्धन, दामोधर नदी प्रकल्प, महानदी खोरे विकास प्रकल्पांअतर्गत हिराकूड धरणाची निर्मीती, सोननदी प्रकल्प,जलविद्युत प्रकल्प, नदीखोरे विकास, सिंचन व विद्युत षक्ती तसेच आंतरराज्यीय नद्यांचे जाळे इ. भूमिका व धोरण उल्लेखनिय आहे. व या सा—या गोष्टी राष्ट्रीय प्रगतीच्या नाडया आहेत. त्यांच्यासाठी उर्जा व जलसंपदा या खात्यांनी जोरदार कामे केल्याषिवाय भारत विकासामध्ये मुंसडी मारू षकणार नाही याचे भान देषाला देणारे ते पाहिले राष्ट्रनेते होते. देषाला 'जलसाक्षरता' आणि उर्जा साक्षरता' याचे धडे 1942 ते 1946 या काळात त्यांनी दिले. त्यांची ही दुरदृष्टी आपण 'गांभीर्यान ओळखू षकलो असतो तर आज आपल्याला बेकारी दिसली नसती किंवा षेतकरी आत्महत्या करतांना दिसला नसता.

**2 नदीजोड प्रकल्पाचे मुख्य प्रवर्तक : —**

षेतीच्या विकासांसाठी सिंचनव्यवस्था आणि विजेची अत्यंत आवष्यकता आहे. ही व्यवस्था षासनाने षेतक—यांना उपलब्ध करून देणे त्यांचे कर्तव्यच आहे. त्यादृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 3 जानेवारी 1945 रोजी यासंबधी एक योजना सुचविली होती. षासनाच्या अंतर्गत सेंट्रल टेक्नीकल पॉवर बोर्ड' आणि सेंट्रल वॉटर वेज इरिगेषन ॲण्ड नॅव्हीगेषन कमिषन' या संघटनाच्या अंतर्गत 'नदीजोड प्रकल्प' कार्यान्वीत करण्याचा आणि पुरामुळे जे देषाचे प्रचंड नुकसान होते, त्यातून सुटका करण्यासाठी देषातील प्रमुख नद्यांना जोडण्याच्या प्रकल्प डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहिर केला होता. त्यामुळे पुराचे पाणी वाया जाणार नाही आणि त्या पाण्याचा कृषिसिंचनासाठी उपयोग करून घेता येईल. परंतु हा कार्यक्रम स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही पुर्ण झालेला नाही. त्याचा परिणाम षेती व षेतक—यावर होतांना दिसत आहे.

**3 ग्रामीण विकास व औद्योगिकीरणातील योगदान :**

देषाच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण आणि आधुनिकीकरण आवष्यक असले तरी त्याचे प्रमाण ग्रामीण भागात कमी झाल्यास लोकांचा लोंढा गावांकडुन षहराकडे येणे अटळ असते आणि विकासाचा वेग औद्योगिकदृष्टया प्रगत व विकसित राष्ट्रांनाच कायम ठेवणे षक्य असल्याने लोकसंख्येची कृषिवरिल अवलंबिता घटवून ती औद्योगिक तसेच पुरक क्षेत्रात समायोजित करणे आवष्यक असते. हे हेरूनच भाताला भेडसावणा–या समस्यांकडे समग्र दृष्टिकोनातून पाण्याची दृष्टी बाबासाहेबांनी आपणास दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते ग्रामीण भागात नुसतेच रस्ते, पिण्याचे स्वच्छ पाणी, मलनिस्थारनाची सोय, दुचाकी–चारचाकी वाहनांची संख्या वाढणे हे ग्रामीण विकासाचे लक्ष नाही. नागरी सुविधांची वाढ आणि जीवन जगण्याचा स्तर वाढणे आवष्यक आहे. ग्रामीण भागात नुसता राबराब राबविणारा षेतकरी आणि श्रमिक वर्ग हा षेवटी चांगले जीवन जगण्याच्या मुल्यांपासून वंचित राहू नये ही त्यांची विवंचना होती. त्यामुळे कष्टांच्या रहाटगाडग्यातून त्याची मुक्ती करण्यासाठी तसेच वर्षेभर रोजगार उपलब्ध होण्यासाठी औद्योगिकीकरणाला चालना देवून कृषिक्षेत्रातील श्रमाचा भार कमी करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. त्या श्रमाचे समायोजन उद्योगाच्या क्षेत्रात केले जाणे अत्यंत आवष्यक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

**4 रिझर्व बॅकेच्या स्थापनेत महत्वपूर्ण भूमिका :**

भारतात रिझर्व बॅकेची स्थापना 1935 मध्ये झाली. या बॅकेच्या जडणघडणीत बाबासाहेबांचा खुप मोलाचा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्षनाखाली या बॅकेच्या कामाकाजाची रूपरेषा तयार झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या अर्थकारणाचा अभ्यास करून काही धोरण तयार केले होते. त्यानुसार त्यांनी आरबीआय च्या कार्याची रूपरेषा तयार करून हिल्टन यंग कमिषन समोर ठेवली. भारतीय अर्भव्यवस्था नियंत्रणात आणण्यासाठी रॉयल कमिषन नेमण्यात आले. जेव्हा या कमिषनचे सदस्य भारतात पाहणीसाठी आले तेव्हा या कमिषनच्या प्रत्येक सदस्याकडे बाबासाहेबांचे जेम च्तवइसमउ व ि जीम त्नचमम दृ प्जे वतपहपद ंदक पजे `वसनजपवद हे पुस्तक होते. अषाप्रकारे डॉ बाबासाहेबांच्या मार्गदर्षनाखाली रॉयल कमिषनच्या अखत्यारित बॅकेचे कामकाज सुरू झाले.

**5 वित्त आयोगाच्या स्थापनेत पुढाकार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री असतांना 1951 मध्ये तात्वीक आधारे त्यांच्या 'इव्होल्युषन ऑफ प्रोव्हिन्षियल फायनान्स इन ब्रिटिष इंडिया' या प्रबंधाचा आधार घेवून भारतीय वित्त आयोगाची स्थापना केली.

**6 षिक्षण क्षेत्रातील योगदान :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्चविद्याविभूषित षिक्षणतज्ञ होते. 'षिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो ते प्राषन करेल. तो वाघासारखा गुरगूरल्याषिवाय राहणार नाही' असे त्यांनी म्हटले आहे. यावरून ते षिक्षणाला किती महत्व देत होते हे लक्षात येते. त्यांच्या मते हजारो वर्षापासून षिक्षण नाकारलेल्या कनिष्ट जातीमध्ये अज्ञान व निरक्षरता होती. डॉ. आंबेडकरांनी कनिष्ट जातीच्या लोकांनी त्यांच्या मुलामुलींना षाळेत पाठवावे यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. या मुलांना षिष्यवृत्ती, गणवेष, भोजन व निवारा अषा सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या अनुयायांना 'षिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा संदेष दिला.

**त्यांच्या षैक्षणिक संस्था**

1. 20 जुलै 1924 – बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थपना.
2. 14 जुन 1928 – दलित षिक्षण संस्थेची स्थापना
3. 8 जुलै 1945उ – पीपल्स एज्युकेषन सोसायटीची स्थापना
4. इ.स. 1946 – सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय,मुंबई
5. इ.स. 1950 – मिलींद महाविद्यालय, औरंगाबाद
6. इ.स. 1953 – सिद्धार्थ वाणिज्य व अर्थषास्त्र महाविद्यालय, मुंबई
7. इ.स. 1956 – सिद्धार्थ विधी महाविद्यालय, मुंबई

सध्या देषभरात या संस्थेची 30 पेक्षा जास्त महाविद्यालये आहेत.

**7 हिंदुकोड बिलाच्या माध्यमातून महिलांसाठी कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोडबिलाच्या माध्यमातून राष्ट्रबांधणीचे कार्य व्यापक प्रमाणात केलेले दिसुन येते. ते म्हणतात की, ज्या देषात 50 टक्के स्त्रिया स्वतत्र नसतात तो देष अर्धा अधिक गूलाम असतो. त्यामुळे भारताला ख–या अर्थाने स्वतंत्र राष्ट्र म्हणून उभे करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. आजच्या बदलत्या परिस्थितीत महिला

स्वातंत्र्याची चर्चा विज्ञान, तंत्रज्ञान, पोलिस, षिक्षण इत्यादी क्षेत्रात महिलांचा जो सहभाग आहे. त्यामगे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार व कर्तृव आहे. त्यांच्या योगदानामुळेच आज भारतीय स्त्रिया अनेक मोठया पदावर विराजमान झाल्या आहेत. श्रीमती इंदिरा गांधी व श्रीमती प्रतिभाताई पाटिल आपल्या देषाच्या अनुक्रमे प्रधानमंत्री,राष्ट्रपती बनल्या ही किमया बाबासाहेबांच्या सविधानाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे कैवारी नव्हते तर ते समस्त भारतीयांचे आधारस्तंभ होते, आधुनिक भारताचे ते निर्माते होते.

**8 धान व लोकषाही तत्वाच्या माध्यमातुन राष्ट्रबांधणी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारताच्या नव्या उभारणीचे एक महान वैभव बनले होते. जगातील आदर्ष समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी लोकषाही षासनाचा स्वीकार केला. त्यासाठी एक व्यक्ती,एक मत,एक मुल्य आणि त्यांची एकच किंमत हा सिद्धांत दिला. ही राजकीय लोकषाही असली तरीही त्यांचे रूपांतर सामाजिक व आर्थिक लोकषाही मध्ये व्हावे असे त्यांना वाटत होते. तरच जगापुढे भारत टिकेल अन्यथा अडचणीत येईल यासाठी त्यांनी जगाला 'षोभेल आणि भारताला आधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगिण विकास कसा करता येईल अषी राज्यघटना राष्ट्राला अर्पण केली. 21 व्या षतकात देषाला विकासाच्या दिषेने वाटचाल करावयाची असेल तर डॉ. बाबासाहेबांच्या विचाराला पर्याय नाही असे मला वाटते.

**9 भारतातील जातिव्यवस्थेचे उच्चाटन करण्यात मिळालेले यष :**

डॉ. आंबेडकरांच्या कार्यामुळे भारतीय समाजात सुमारे 5000 वर्षापासून प्रचलित असलेल्या जातीव्यवस्थेत बदल सुरू झाले. विषमतेवर आधारलेल्या जाती व्यवस्थेच्या जागी समतेवर आधारलेली लोकषाही व्यवस्था प्रस्थापित होण्यास चालना मिळाली. सामाजिक संस्थातही परिवर्तन सुरू झाले बाबासाहेबांच्या पुर्वगामी विचारामुळे दलितांनी बलुता पद्धतीचा त्याग केला. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा चेहरा–मोहरा बदलला जे लोक षिक्षणामुळे वंचित होते त्यानी षिक्षण घेणे सूरू केले.

**10 अस्पृष्यांची उन्नती घडविण्यात महत्वपुर्ण भुमिका :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे अस्पृष्यांना त्यांच्यावर होणा–या अन्यायाची जाणीव झाली परिणामी त्यांच्यात आत्मविष्वास आणि आत्मविष्कार निर्माण झाला. आपणच आपल्या विकासासाठी लढले पाहिजे याची जाणीव त्यांना झाली अस्पृष्यांच्या हक्कांना घटनात्मक ज्या विषेष तरतुदी केल्या त्यामुळे अस्पृष्यांच्या हक्कांना घटनात्मक वैधता प्राप्त झाली. भारत सरकारच्या विविध समाज कल्याणकारी योजनांचे मोठे श्रेय डॉ. आंबेडकरांच्या कार्यास जाते. आंबेडकरांच्या प्रयत्नामुळेच अस्पृष्यांना षिक्षण संस्था, कायदेमंडळ, पंचायतराज व्यवस्था, सरकारी नोक–या इत्यादीमध्ये आरक्षण मिळाले.

**11 निर्भीड पत्रकारीतेतून राष्ट्रबांधणी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रभावी पत्रकार व संपादक होते. वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजोन्नती व राष्ट्रबांधणी करण्यासाठी त्यांनी पाच वृत्तपत्रे सुरू केली. त्यांच्या मते, कोणतेही चळवळ यषस्वी होण्यासाठी व त्यातुन राष्ट्रोन्नती घडवुन आणण्यासाठी वर्तमान पत्राची आवष्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. डॉ. आंबेडकरांनी 'मुकनायक' हे पहिले पाक्षिक काढले, त्यानंतर 1924 मध्ये बहिकृत भारत हे वर्तमानपत्र सुरू केले. 1928 मध्ये समता वृत्तपत्र सुरू केले. 1930 मध्ये जनता तर 4 फेबुवारी 1956 मध्ये प्रबुद्ध भारत हे वर्तमानपत्र सुरू केले. वर्तमान पत्राच्या माधमातुन त्यांनी स्पृष्य व अस्पृष्यांना जागृत करून राष्ट्रबांधणीचे कार्य केले.

## सारांष

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आधुनिक भारताच्या जडणघडणीतील योगदान ऐतिहासिक आणि दुरगामी परिणाम करणार ठले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राज्यघटनेचे षिल्पकार, द्रष्टे नेते,वंचित घटकांना न्याय मिळवून देणारे क्रांतीकारक,अर्थतज्ञ, प्रज्ञासुर्य, सम्यक विचारवंत इत्यादी कायामुळे त्यांना ओळखले जात असले तरी देषाच्या जल,विद्युत कृषिक्षेत्रात, षेतक–यांच्या प्रष्नांच्या सोडवणूकीसाठी दिलेले त्यांचे योगदान राष्ट्र उभारणी व राष्ट्र बांधणीमध्ये त्यांचे योगदान अतुलणीय आहे.

## निष्कर्ष

1)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण जीवणभर राष्ट्रउभारणीचे कामात स्वतःला झोकून दिल्याचे दिसुन येते.

2) भारतात पुरूष प्रधान धर्मसंस्कृतीने स्त्रीयांना नाकारलेले अधिकार हिंदुकोड बिलाच्या माध्यमातून मिळवून दिल्याचे लक्षात येते.

3) डॉ. बाबासाहेबांच्या निर्भिड पत्रकारितेमुळे एकप्रकारची षिस्त वर्तमान पत्रामध्ये निर्माण झाली त्यातुनही राष्ट्रउभारणीच्या कार्यास मदत झाली.

4) आपल्या समाजबाधवांना कुत्र्या–मांजरापेक्षा ही हीन जीवन जगत होते. त्यांना माणूसपणाचे हक्क मिळवून देवून राष्ट्रबांधणीच्या कार्यात मोठे यष प्राप्त केल्याचे निदर्षनास येते.

5) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृषि क्षेत्रात सुचविलेल्या योजना, नदीजोड प्रकल्पाचे सांगीतलेले महत्व, जलसाक्षरता उर्जासाक्षरतेचे महत्व आजही देषाच्या विकासामध्ये असल्याचे दिसून येते.

6) ग्रामीण विकासात नागरी सुविधेचे महत्व अधोरेखित करून राष्ट्र उभारणी व राष्ट्रबांधणीमध्ये ग्रामीण विकासाला देखील महत्व आहे हे सांगीतलयाचे निदर्षनास येते.

7) डॉ. आंबेडकरांची षिक्षण विषयक भूमिका तळमळीची व परिवर्तनवादी असल्यामुळे आधुनिक भारत घडविण्यात त्यांना यमिळाल्याचे दिसुन येते.

**संदर्भ ग्रंथ**

1) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विषेषांक 2017 – ‘ संपादक, षेतकरी मासिक, आनंद प्रकाषन जळगाव पृ.क्र. 16,20,30

2) दैनिक लोकसंत्ता – संपादकीय अग्रलेख दि.20/09/2021 रोजी पाहिले ूण्सवोंजजंण्बवउ

3) दैनिक महाराष्ट्र टाइम्स – संपादकीय अग्रलेख 10 फेब्रुवारी 2018

4) दैनिक सकाळ – 20 सष्टेबर 2021

5) ीजजचे रूध्ूण्उरींचंचमतण्बवउ 20ध्09ध्2021 रोजी पाहिले.

6) भारतीय षिक्षणाचे बहुजनीकरण – वास्कर आनंद

7) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे व विचार, खंड क्र. 1 स्त्री – संपादक, डॉ. धनराज डाहाट खंड क्र. 2, पृ. 43, खंड क्र. 4, पृ. 25

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्रकवि मैथिलीषरण गुप्त के काव्य में सामाजिक, सांस्कृतिक चेतना

**डॉ. निभा षांतीलाल उपाध्याय**
**सहयोगी प्राध्यापक**
**हिन्दी विभाग – श्रीमती रा.दे.गो.महिला महाविद्यालय, अकोला**

**सारांष** :–राष्ट्रीय चेतना के कवि मैथिलीषरण गुप्त आधुनिक काल के सुप्रसिध्द कवि माने जाते है। महात्मा गांधीजी ने उनके साहित्यीक योगदान व राष्ट्रप्रेम की भावना से ओत प्रोत साहित्य को दृष्टिगत रखते हुए उन्हें राष्ट्रकवि का सम्मान दिया उनके साहित्य में राष्ट्रीय चेतना के साथ साथ सामाजिक व सांस्कृतिक चेतना भी विद्यमान है। गुप्तजी को साहित्य प्रेम विरासत में मिला। उनके पिता सफल साहित्यकार रहे उनसे उन्हें साहित्य सृजन की प्रेरणा मिली। गुप्तजीका जीवन पुर्णतः आजादी के आन्दोलन को समर्पित रहा वे गांधी विचार धारा से प्रभावित रहे, जिसकी झलक उनके साहित्य में विद्यमान है। इन्होंने सत्य अहिंसा, न्यायप्रेम, त्याग, सेवा, समर्पण के भाव से ओत प्रोत काव्य की रचना की जो समाज के लिए सामाजिक चेतना का स्रोत रही। गुप्तजी अपने काव्य के माध्यम से राष्ट्रप्रेम की अविरल धारा बहाने लगे जिसमें सामाजीक समरसता व भारतीय संस्कृतिकी अजस्त्र धाराए साथ साथ बहने लगी।

काव्य की दृष्टी से ''राष्ट्रकवि मैथिलीषरण गुप्त के काव्य में सामाजिक सांस्कृतिक चेतना की दृष्टी से वह न राम भक्त है न लक्ष्मण का और न साकेतवासी भरत, काही वह तो उर्मिला का भक्त है।'' नन्ददुलारे वाजपेयी : आधुनिक साहित्य और हिन्दी साहित्य बीसवी षताब्दीगुप्तजी भारतीय संस्कृति के समर्थ पुजारी थे इनकी काव्य धारा इसी संस्कृति की निष्ठा से अधिक प्रसाधित है ।

भारतीय संस्कृतीका सुंदर चित्रण भारत – भारती में दिखाई देता है।

भू लोक का गौरव, प्रकृति का लीला स्थल यहॉ? पृ. 4
फैला मनोहर गिरि हिमालय और गंगाजल जहॉ।
सम्पूर्ण देषों से अधिक किस देष का उत्कर्ष है?
उसका कि जो ऋषिभूमि है, वह कौन? भारत वर्ष है।
भारत – भारती पृ. 11

इस तरह कवि मैथिलीषरण गुप्तजी ने भारत भारती में भारत वर्ष का गुण गौरव को भारतीय संस्कृति के साथ चित्रीत किया है। उनके काव्य में सामाजिक सांस्कृतिक चेतना विद्यमान है जो अजर अमर साहित्य होने के साथ ही सामाजिक समरसता का केन्द्रबिन्दू है।जिसमें सामाजिक समरसता के एवं भारतीय सांस्कृतिक की अजश्र धराए साथ साथ बहने लगी। साकेत गुप्तजी द्वारा रचित एक ऐसा महाकाव्य है जिसमें सामाजिक सांस्कृतिक चेतना के स्वर सवत्र विद्यमान है। उर्मिला के सम्पूर्ण जीवन गाथा को साकेत के माध्यम से कवि ने समाज के सम्मुख रखा। साकेत में रामकथा के साथ ही उर्मिला को भी विषिष्ट स्थान मिला, लक्ष्मण के वियोग में उर्मिला ने विरह में अपना जीवन कैसे व्यतीत किया इसका सम्पूर्ण उल्लेख मिलता है। उर्मिला के त्याग, सेवा, समर्पण, प्रतिव्रता, धर्म का पालन व उनके गुणों को कवि ने अपने इस महाकाव्य में प्रस्तुत किया है। जो इस साहित्य को अमर साहित्य बनाती है। इस सन्दर्भ में आचार्य उंददुलारे वाजपेयी, जी कहते है – साकेत ''एक मानवतावादी आदर्ष रचना है।'' गुप्तजी का संपूर्ण साहित्य सामाजिक सांस्कृतिक चेतना का साहित्य है ।

**प्रस्तावना** :– आधुनिक हिन्दी काव्य–जगत के सुप्रसिध्द कवि मैथिलीषरण गुप्तजी राष्ट्रकवि, के रूप में साहित्यजगत में विख्यात है। आपके काव्य में राष्ट्रीय चेतना के साथ – साथ, सामाजिक सांस्कृतिक चेतना भी विद्यमान है।

संस्कृति का स्वरूप साहित्य में सर्वाधिक सामर्थ्यपूर्ण तरीके से अभिव्यंजित भी होता है साहित्य की विविध विधाओं में संस्कृति के प्रभाव को देखा जा सकाता है।

जिस तरह सूर्य के प्रकाष से संसार प्रकाषित होता है। उसी प्रकार साहित्य के प्रकाष से समाज का अंधकार दूर होता है।

अतः साहित्य को समाज का अभिन्न अंग माना जाता हैं जो समाज की दषा सुधार कर दिषा देने का सामर्थ्य रखती है। आदर्ष समाज की स्थापना में साहित्य का महत्वपुर्ण स्थान होता है।

साहित्य से ही समाज का उत्थान संभव है। साहित्य और समाज का गहरा सम्बंध है। साहित्य में मानव जीवन के अतीत का वर्णन, वर्तमान का चित्रण व भविष्य के लिए प्रेरणादायी विचारों का आलोक विद्यमान होता है। इस दृष्टि से राष्ट्रकवि मैथिलीषरण गुप्तजी का काव्य सामाजिक सांस्कृतिक चेतना का केन्द्रबिन्दू कहा जा सकता है।

गुप्तजी के काव्य में भारतीय संस्कृती का विराट स्वरूप दिखाई देता है। वही उनके काव्य में सामाजिक चेतना के स्वर भी प्रस्फुटित होते है। इस संदर्भ में दिनकरजी कहते हे –''गुप्तजी के काव्यों के भीतर से भारत की प्राचीन संस्कृती एक बार फिर से जवान हो गई है।''

**डॉ. नगेन्द्रजी कहते है :–**''गुप्तजी राष्ट्रकवि थे, सच्चे राष्ट्रकवि। उनमें भारतीयता ओतप्रोत है राष्ट्रीयता में भी उनका क्षेत्र है – संस्कृति। वे भारतीय संस्कृती के कवि है। यह उनका सबसे बडा गौरव है और यही उनकी प्रमुख विषेषता है। इस तरह हम कह सकते है्। गुप्तजी के काव्य में सांस्कृतिक चेतना विद्यमान है।''

गुप्तजी के काव्य में सामाजिक चेतना भी विद्यमान हैवे अपने काव्य के माध्यमसे समाज में व्याप्त सामाजिक विषमता पर सिधे प्रहार करते है और मानवतावादी भावो को व्यक्त कर सामाजिक समरसता बढाणे का प्रयास किया –

नर को ईष्वरता प्राप्त कराने आया,
सन्देष यहॉं मै नही स्वर्ग का लाया।
भूतल को ही मै स्वर्ग बनाने आया।

इस तरह गुप्तजी यह मानते है कि काव्य के माध्यम से सामाजिक चेतना जगाया जा सकता है। मानव को मानवतावादी विचारो से जोडकर रखा जा सकता है।

गुप्तजी के काव्य में सामाजिक, सांस्कृतिक चेतना के बिन्दू पर प्रकाष डालने से पूर्व संक्षिप्त जीवन परिचय आवष्यक है! अतः

**जीवन परिचय एवम् प्रमुख रचनाए :–**कवि मैथिलीषरण गुप्तजी का जन्म सन 1886 इ.वी. श्रावण षुक्ल तृतीया को चिरगांव झॉसी मे हुआ। पितासेठ रामचरणजी गुप्त थे। स्वभाव से वे विनम्र किंतु स्वाभीमानी थे। गुप्तजीने आजीवन साहित्य सेवा की, इनकी मृत्यु सन 1964 इ.वी. मे हुई।

गुप्तजी ने मौलिक व अनुदित दोनो प्रकार के साहित्य की रचना की, गुप्तजी के राष्ट्रीय सामाजीक रचनाओं में प्रमुख रूप से भारत भारती, स्वदेष.संगीत, वैतालिक, किसान, अजीत, पंचवटी, साकेत, व्दापर, यषोधरा, विष्णुप्रिया, अनद्य, रंग मे भंग, मौर्य–विजय, काबा और कर्बला, जयद्रथ वध साकेत आदि है। बंगला, संस्कृती, फारसी भाषा के साहित्य जगत में अधिक ख्यातीप्राप्त किया है। भारत भारती के व्दारा कवि जनता को नव जागरण का संदेष देते हुए राष्ट्रप्रेम की भावना को विकसित करने का कार्य किया। उनमे व्याप्त राष्ट्रप्रेम के लिए महावरी प्रसाद व्दिवेदीजी ने इसे युगांतकारी रचना कहा था। कृषी प्रधान देष की जनचेतना का स्वर किसान मे मुखरीत हुआ है।

**संषोधन प्रविधी – विवेचनात्मक एवम् विष्लेष्णात्मक ।**

गुप्तजी के काव्य में सामाजिक चेतना को हम निम्न बिन्दूओ के तहत स्पष्ट कर सकते है।

गुप्तजी युग की बदलती विचारधारा को समझते थे। किंतु इसके साथ ही वे भारत के अतीत गौरव के प्रति श्रध्दा भाव रखते थे। साकेत, व्दापर, पंचवटी, जयद्रथ वध सभी में आधुनिक युग सन्दर्भो की छाया मिलती है। जो पुराने और नये की समन्वयात्मक दृष्टि है।

1. **त्याग बलिदान व समर्पण की महत्ता :–**

उर्मिला के व्यवहार का चित्रण कर इस कवि ने साकेत में उर्मिला के माध्यम से सम्पूर्ण समाज को त्याग व समर्पण की महत्ता बताई है।

उर्मिला के त्याग व आदर्ष को स्वयं सीता ने भी स्वीकार किया है। वे कहती है ।

सास ससुर की स्नेहलता, बहन उर्मिला महाव्रता।
सिध्द करेगी वही यहॉं, जो मै भी कर सकी कहॉं।। पृ. 71 –

इस तरह साकेत में कवि ने आदर्ष परिवार के लिए प्रेम और स्नेह के साथ रहने का भाव व्यक्त करते हुए त्याग व समर्पण का महत्व बताया है।

2. **मानवता की प्रतिष्ठा :–**

मानव जीवन तभी सार्थक होता है जब एक मनुष्य दूसरे के काम आए, एक–दूसरे के सुखः दुख को समझे और मानवीय मुल्यों को समझे यही भाव को कवि अपनी मनुष्यता कविता में व्यक्त करते है –

वही पषु प्रवृत्ती है कि आप आप ही चरे।
वही मनुष्य है कि जो मनुष्य के लिए मरे।।
अखंड आत्म भाव जो असमी विष्व में भरे।

वही मनुष्य है कि जो मनुष्य के लिए मरे।।

**3. सेवा सुश्रुषा :–**

कवि अपने काव्य में सेवा का महत्व प्रतिपादित करते हुए उर्मिला के सेवाभाव को इन पंक्तियों में व्यक्त करते है।
वीरों का यह योग भला क्यों खोउंगी मै अपने हाथो घाव तुम्हारें धोउंगी मैं।– पृ. 97 – साकेत

**4. कर्म की महत्ता :–**

कवि ने कर्म को जीवन की सफलता का आधार बताया है। वे अपने काव्य के माध्यम से कर्मठता को
आषावादी विचारो के साथ जोडते हुए चेतना जगाने का प्रयास किया है। उनके यही भाव निम्न पंक्तियों से प्रकट होते है।

अपने सहायक आप हो, होगा सहायक प्रभु तभी,
बस चाहने से ही किसी को, सुख नही मिलता कभी।
कर, पद, हृदय, दृग, कर्ण, तुमको ईष ने सबकुछ दिया,
है कौन ऐसा काम जो तुमसे न जा सकता किया? भारत –भारती पृ . 145
सच्चे प्रयत्न कभी हमारे व्यर्थ हो सकते नही, संसार भर के विघ्न भी उनको डुबो सकते नही।

**5. षिक्षा की महत्ता :–**

षिक्षा राष्ट्र विकास की आधार षीला होती है। षिक्षित राष्ट्र में विकास की गति तीव्र होने लगती है। अतः आज सभी ओर षिक्षा का महत्व बढ रहा है। कवि ने अपने निम्न पंक्तियों में षिक्षा की महत्ता को प्रतिपादित किया है।

**जैस :–** सबसे प्रथम कर्तव्य है षिक्षा बढाना देष में,
षिक्षा बिना ही पड रहे हैं आज हम सब क्लेष में।
षिखा बिना कोई कभी बनता नही सत्पात्र है,
षिक्षा बिना कल्याण की आषा दुराषा मात्र है। भारत – भारती पृष्ठ 159

**6. एकता की महत्ता :–**

कविने अपने काव्य में संपूर्ण देषवासियों को एकजुट होकर रहने की प्रेरणा दी है। अनेकता में एकता ही हमारे राष्ट्र की विषेषता है। यही कवि के निम्न पंक्तियों ने विद्यमान है।

आओ, मिले सब देष – बान्धव हार बन कर देष के,
साधक बने, सब प्रेम से सुख –षान्तिमय उद्देष के।
क्या साम्प्रदायिक भेद से है ऐक्य मिट सकता अहो!
बनती नही क्या एक माल विविध सुमनों की कहो? भारत – भारती पृ. 144

इस तरह कवि अपने काव्य के माध्यम से देष वासियों में सामाजिक चेतना जगाते है। जो कल भी आवष्यक था आज भी और आगे भी रहेगा।

**सांस्कृतिक चेतना के बिन्दू**

भारतीय संस्कृति विष्व की सर्वश्रेष्ठ सांस्कृति के रूप में जानी जाती है। यह विविधता में एकरूपता का रंग लिए है संस्कृति का स्वरूप अत्यंत व्यापक है। हमारी बोली – भाषा, रहन – सहन, तीज – त्यौहार, हमारे उत्सव, हमारे प्राकृतिक सौन्दर्य, नदी, पर्वत, पठार, मैदान, फल–फूल, वृक्ष सबका विराट स्वरूप संस्कृति में समाहित है। इस सन्दर्भ मे

**1. दिनकर जी मानते है –**

'संस्कृति सभ्यता की अपेक्षा महीन चीज होती है यह सभ्यता के भीतर उसी तरह रहती है जैसै दूध में मक्खन और फुल में सुगन्ध।'– हजारी प्रसाद व्दीवेदी के उपन्यासो में सांस्कृतिक चेतना पृ. 25

**2. आचार्य व्दिवेदीजी मानते है :–**

'सभ्यता समाज की बाहय व्यवस्था का नाम है और संस्कृति अन्दर के विकास का।'

**3. भगवतचरण उपाध्याय :–**

'सभ्यता भौतिक विकास की जय यात्रा है और संस्कृति विचार, विष्वास, रूचि, कला और आदर्ष की दुनिया है।'–हजारी प्रसाद व्दिवेदी के उपन्यासो में सांस्कृतिक चेतना पृ. 25

इस तरह विभिन्न विद्वानों के मतानुसार संस्कृति का स्वरू व्यापक है। और इस व्यापक रू में कवि गुप्तजी ने अपने काव्य के माध्यम से चेतना जगाया है। जिसे हम निम्न बिन्दूओ के तहत देख सकते है।

1. **भारत की श्रेष्ठता का गुणगाण :–** भारत वर्ष की श्रेष्ठता का गुणगाण कवि इस तरह करते है,
भू लोक का गौरव, प्रकृति का पुण्य लीला–स्थल, कहॉ,
फैला मनोहर गिरि हिमालय और गंगाजल जहॉ।
सम्पूर्ण देषो से अधिक किस देष का उत्कर्ष है?
उसका कि जो ऋषि भूमि है, वह कौन? भारत वर्ष है। भारत – भारती पृ. 15

2. **कला और संगीत की महत्ता :–** कवि गुप्तजी ने भारत –भारती में अपने देष की कला संस्कृति का चित्रण किया है। जैसे :– निज रूप से भी दूसरे जन जिस समय अज्ञान थे,
हम उस समय प्रभुमूर्ति का प्रत्यक्ष करते ध्यान थे।
आती सु–चेतनता जिन्हें सुनकर जडों मे भी अहो।
आई कहा से गान में वे राग – रागिनिया कहो?
है सब हमारी ही कलाऍ ललित और मनोहारी। –भारत – भारती पृ. 46

3. **वेदो की महिमा का वर्णन :–** कवि गुप्तजी भारतीय संस्कृति के उपासक थे वे विष्व के सम्पूर्ण ज्ञान का आधार वेदो को ही मानते थे अतः वे इस भाव को अभिव्यक्त निम्न पंक्तियो में करते है –
विख्यात चारों वेद मानो चार सुख के सार है,
चारो दिषाओं के हमारे वे जय – ध्वज चार है।
वे ज्ञान – गरिमागार है, विज्ञान के भाण्डार है,
वे पुण्य – पारावार है, आचार के आधार है। भारत – भारती पृ. 33

4. **राष्ट्रीयता एकात्मता मे राष्ट्र भाषा व साहित्य का महत्व :–**कवि ने ज्ञान के आलोक का साहित्य भारतीय साहित्य को माना इसके साथ ही राष्ट्रीय एकता में राष्ट्र – भाषा हिन्दी की महत्ता को स्वीकार किया क्योंकि भारत जैसे राष्ट्र में जहॉ विविध बोली एवं भाषाओं का प्रयोग होता है वहॉ हिन्दी हमें एकता के सूत्र में पिरोने का कार्य करती है। अतः कवि कहते है –
साहित्य का विस्तार अब भी है हमारा कम नही,
प्राचीन किन्तु नवीनता में अन्य उसके सम नही।
फैला यहीं से ज्ञान का आलोक सब संसार में,
जागी यही थी जग रही जो ज्योति अब संसार में।भारत – भारती पृ. 32
अपनी मातृभाषा के प्रति सम्मान व्यक्त करते हुए कवि कहते हे –
करो अपनी भाषा पर प्यार,
जिसके बिना मुक रहते तुम रूकते सब व्यवहार। – राष्ट्रवाणी – गुप्तजी पृ. 65
वही राष्ट्रभाषा हिन्दी के प्रति मंगल कामना करते हुए कवि यह भाव व्यक्त करते है –
मानस – भवन में आर्यजन, जिसकी उतारे आरती,
भगवान। भारतवर्ष में गुंजे हमारी भारती। – भारत – भारती पृ. 9

इस तरह कवि के काव्य में यत्र –तत्र सांस्कृतिक चेतना विद्यमान है।

**निष्कर्ष** :–निष्कर्ष के तौर पर हम कह सकते है की, आजादी से पूर्व व आजादी के बाद समय चाहे जो भी हो गुप्तजी का काव्य सामाजिक, सांस्कृतिक चेतना जगाने का कार्य कर रहा है। आपके काव्य की भाषा सहज, सरल व प्रभावषाली है जो जन सामान्य को समझ में आ सकती है।

सचमुच आपका साहित्य सम्पूर्ण मानव जाति के हृदय में विष्व बंधुत्व तथा आषा और विष्वास का दीप जलाने वाला अजर अमर साहित्य है। हम सब के लिए प्रेरणा स्रोत है। यह साहित्य युगो – युगोतक जन जीवन का मार्ग प्रषस्त करती रहेगी।

**संन्दर्भ :–**

1. राष्ट्रवाणी, भारत – भारती, साकेत –मैथिलीषरण गुप्त
2. राष्ट्रीय चेतना के कवि मैथिलीषरण गुप्त – डॉ. अर्जुन षतपथी, मधुसुदन षहा
3. हजारीप्रसाद व्दिवेदी के उपन्यासों मे सांस्कृतिक चेतना – डॉ. षिवषंकर त्रिवेदी

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीत योगदान

प्रा.सौ.सुहास चंद्रशेखर नागापूरे/शिवणकर
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला वाणिज्य महिला महाविद्यालय,बल्लारपूर
9588404317
Email. Suhasnagapure18@gamil.com

## सारांश

आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या उभारणीत असलेले योगदान हे अतुलनिय आहे. जो पर्यत एखाद्या प्रदेशातील जनतेला आर्थिक, सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सगळयाच पातळयांवर न्यायपूर्ण संधी मिळत नाही, समतेची, बंधुत्वाची वागणूक मिळत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने ते राष्ट्र हे राष्ट्र मानता येणार नाही. डॉ.आंबेकरांनी खऱ्या अर्थाने भारताला एक समर्थ राष्ट्र म्हणून घडविण्यासाठी केलेले कार्य मोलाचे आहे. सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील बाबासाहेबांचे कार्य या देशाला प्रगतीपथावर नेणारे राहीले आहे. संविधानाच्या रूपाने अधिकार व कर्तव्याची जाणीव करून देणारे दिशादर्शन बाबासाहेबांनी केले आहे. बाबासाहेबांनी या देशाला एक चलन दिले, एक नागरिकत्व दिले, सर्वांना समान अधिकार मिळवूण दिला, कामगारांच्या हिताची जपणूक केली, वंचित, दलित, दिनदुबळयांच्या उत्थानाचे कार्य केले. महिलांच्या हक्कांसाठी, न्यायासाठी प्रयत्न करतांना 'हिंदू कोड बिल' आणले. कृषी,जल व विज व्यवस्थापन आदीबाबतचे मौलिक व कृतीशिल दिशादर्शन केले. धर्मनिरपेक्ष भारताच्या उभारणीचा पाया बाबासाहेबांनीच रचला. आरक्षणासारख्या आयुधाच्या आधारे दिनदुबळया दलित मागास समाजाला प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली. देशाच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वकष प्रयत्न बाबासाहेबांनी केले. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी समर्थ राष्ट्राच्या उभारणीत सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक क्षेत्रात दिलेला योगदानाचे अध्ययन करण्यात आले आहे.

बिजसंज्ञा : संविधान, समर्थ राष्ट्र, धर्मनिरपेक्षता, हिंदू कोड बिल, समता, न्याय

**प्रस्तावना :**

प्रथम मी भारतीय आहे अशी राष्ट्रवादाची भूमिका घेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार तसेच दिनदु:खिताचे कैवारी, विचारवंत, समाज सुधारक, न्याय प्रक्रियेचे प्रणेते, आयुष्यभर समता, स्वातंत्र्य, न्याय आणि राष्ट्रहितासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहुन नेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे खरे राष्ट्रनिर्माते. भारताला राज्यघटनेच्या माध्यमातून एक राष्ट्र म्हणून संघटीत करण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी केले.

बाबासाहेब आंबेडकराचे प्रत्येक विचार हे देशहिताचेच आहेत. आजही वर्तमान परिस्थितीतील आंतरराष्ट्रीय संबंध असतील, नवे आर्थिक धोरण असेल, वाढत्या लोकसंख्येबाबतचा प्रश्न असेल, कामगारांचे प्रश्न असतील, स्त्रियांचे स्थान

त्यांचा दर्जा, अधिकार, हक्क असे कितीतरी विषय असतील जे बाबासाहेबांच्या विचारात दिसून येतात म्हणूनच त्यांना राष्ट्रनिर्मितीचे खरे प्रणेते म्हटले जाते. त्यांच्या विचारांना बाजूला ठेऊन राष्ट्रनिर्मितीचा विचारच करू शकत नाही.

भारताला राष्ट्र म्हणून घडविण्यात जाती व्यवस्था हा एक प्रमुख अडसर आहे. हा अडसर दुर करण्यासाठी त्यांनी संपूर्ण जीवन अर्पन केले. त्यासोबतच स्त्रियांच्या उन्नतीसाठी देखील प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांचे उद्धारक नसून अस्पृश्य, मागासवर्ग, स्त्री, शेतकरी, शेतमजुर, कामगार या सर्वांचेचे उध्दारक आहेत. त्यांचे प्रभावी कार्य म्हणजे भारताला देलेली अमुल्य देणगी देशाचे संविधान आहे. जे समता, स्वातंत्र्य, न्याय बंधुता, या प्रमुख तत्वावर आधारित आहे. या सर्व घटकांचा विचार केला तर राष्ट्रनिर्माता म्हणून त्याचे योगदान सर्वश्रेष्ठ आहे. बाबासाहेबांनी अखंड भारत देशाची नवी इमारत उभी केली. कोणताही मोबदला न स्विकारता देशहिताचे काम निस्वार्थपणे केले. इतके हे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजासाठी व राष्ट्रासाठी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला आपल्या सामाजिक विचारातून जगण्याची प्रगल्भ दृष्टी दिली. एक समाज दुसऱ्या समाजाविरूध्द उभा न राहता सहकार्याच्या भावनेतून, आपल्या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक न्याय मिळवायला पाहिजे असा संदेश त्यांनी दिला होता. सामान्य माणूस जुलुम जातीयता, गुलामगिरी, असुरक्षितता, दारिद्रय, सांस्कृतिक विषमता यात अडकू नये म्हणून आरक्षणाची तरतूद केली. मात्र स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतरही बदल दिसत नाही. भारतात सामाजिक न्यायाला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण भारतात प्रचलित सामाजिक अन्यायाला जगात तोड नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विचारशिलतेतून, अनुभवातून भारतातील कामगार, दलित, शोषीत, पीडीत, आदींना लोकशाही राष्ट्राला प्रेरक अशी 'माणुसकीचे सौंदर्य फुलविणारी' जगातील सर्वात मोठी लिखीत राज्यघटना दिलेली आहे. कारण माणूस म्हणून जीवन जगायला न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही वैश्विक मुल्ये गरजेची असतात असा व्यापक दृष्टीकोन त्यांचा होता.

भारताची आधुनिक राष्ट म्हणून खरी जडणघडण १९२० ते १९५० च्या दशकांत झाली. या काळात राजकीय स्वातंत्र्य तर मिळालेच पण त्याच वेळेला देशाची फाळणी, राज्यघटनेची निर्मिती, देशाची राजकीय, आर्थिक आणि सामाजिकदृष्टया जडणघडण, राज्यांची पुर्नरचना, तसेच आर्थिक विकास आणि सामाजिक विकासाचा कृती—कार्यक्रम अस सगळ त्या काळात घडत गेलं. सुमारे ४० वर्षाच्या (१९१६—१९५६) काळात डॉ. आंबेडकर ज्ञानदान आणि नेतृत्व करीत होते, राष्ट्राच्या उभारणीत योगदान देत होते. समस्या सोडविण्यासाठी धोरणे सुचविण्याची त्यांची पध्दती समकालीन नेत्यांपेक्षा निराळी होती. विषयाचा सखोल अभ्यास करून कारणे ओळखून मगच उपाय शोधण्याची शिस्त त्यांच्यात होती. म्हणूनच त्यांनी सुचविलेले उपाय हे आजही राष्ट्रापुढील समस्यांचा सामना करण्यासाठी समर्पक ठरतात. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समर्थ राष्ट्राच्या उभारणीत सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे अध्ययन करण्यात आले आहे.

उद्दिष्टे —

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्र उभारणीतील योगदानाचा अभ्यास करणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध कार्याचा आढावा घेणे.

2

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम माहितीवर आधारित असून दुय्यम स्त्रोतांच्या आधारे माहितीचे संकलन केले आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालीके, वर्तमान पत्रातील लेख, वेब साईटवरील विविध लेख आदींचा आधार घेतलेला आहे.

**डॉ. आंबेडकरांची स्वातंत्र्याची आणि राष्ट्राची संकल्पना**

डॉ. आंबेडकर स्वातंत्र्य लढयात सहभागी होते. सन १९३०–३२ च्या पहिल्या गोलमेज परिषदेत ब्रिटीशांना त्यांनी सांगीतले की,'' केवळ स्वराज्यातील राज्यघटनेमुळेच दलित वर्गास राजकीय सत्ता सहभागाची संधी मिळू शकते. तसे न झाल्यास आमच्या लोकांना मुक्ती मिळणार नाही.'' त्यांच्यामते राजकीय स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याचा निव्वळ भाग झाला. अन्य भाग म्हणजे सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य, आधी सामाजिक–आर्थिक समानतेच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या तरतुदी करा, मग ब्रिटिशांकडून राजकीय स्वातंत्र्य घेऊच, असे त्याचे मत होते. ''स्वत: राष्ट्र म्हणविणाऱ्या सर्व लोकांचा संवाद, सहभाग आणि भागीदारी यांतून आलेली सामाजिक एकोप्याची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व होय.'' राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे हे सामाजिक जीवनात समता आणि बंधुता किती आहे यावरून ठरते. जोपर्यंत समाजातील तळागळातील माणूस आत्मगौरवाने उभा राहात नाही तोपर्यंत हा देश उभा राहात नाही. केवळ थोर पुरूषामुळे देश मोठा होत नसतो. तर देश मोठा होण्यासाठी सर्वसामान्य माणसाचा स्तर मोठा व्हावायला हवा. सर्वसामान्य माणसाच्या मनात आत्मविश्वास, आत्मगौरव असावा लागतो. आपल्या समाजाविषयी आणि राष्ट्राविषयी प्रत्येक व्यक्तिच्या मनात पराकोटीचे प्रेम असायला हवे. डॉ. बाबासाहेबांचे राष्ट्रउभारणीतील सर्वात मोठे काम कोणते असेल तर ते म्हणजे त्यांनी समाजातील सर्वात खालच्या श्रेणीत असलेल्या मानसाला जागे केले.

डॉ. आंबेडकरांनी संसदीय लोकशाहीच्या यशाबद्दल देखील एक पूर्वअट स्पष्ट केली 'एक व्यक्ती एक मुल्य' किंवा सर्वांना समान मुल्य, हे लोकशाहीचे मुलभूत तत्व आहे. या राजकीय लोकशाहीत 'एक व्यक्ती एक मते' या नियमाने हे तत्व आचरणात आणले जाते. परंतु राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक पातळयावरही सर्वांना समता आणि स्वातंत्र्य हवे तसेच राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी आंबेडकरांनी सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर भर दिला. त्याचप्रमाणे लोकशाही बळकट करण्यासाठी अहिंसक मार्गाचा वापर केला. ''कोणत्याही रक्तपाताविना क्रांतीकारक बदल घडवून आणणारी शासनपध्दती म्हणजे लोकशाही.'' असे त्याचे मत होते. परंतु आज जमावाचा हिंसाचार वाढत आहे म्हणून सगळयांनी डॉ. आंबेडकरांच्या या शिकवणीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**हक्करक्षणासाठी कृती–कार्यक्रम :**

लोकशाहीत अल्पसंख्यांकासाठी काही हक्क संरक्षण उपाय असावेत, यासाठी डॉ. आंबेडकरांनी दिलेले योगदानही तितकेच महत्वाचे आहे. शासन संस्था धार्मिक बहुसंख्येच्या बळावर सुरू राहणे टाळण्यासाठी त्यांनी तीन संकल्पना पूढे आणल्या.

3

१. बहुसंख्यांक व अल्पसंख्याक यांच्या प्रतिनिधीत्वाचा समतोल.

२. महत्वाच्या मुदयांवरील निर्णय सर्वानुमते करणे.

३. बहुमताच्या पक्षाइतकाच अल्पमतातील पक्षांनाही मंत्रिमंडळ निवडीचा अधिकार डॉ. आंबेडकर यांनी शासनसंस्थेला धार्मिक बहुसंख्याकतावादाचा धोका असण्याची शक्यता विचारात घेतले होती, म्हणून त्यांनी या सुचना केल्या होत्या.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मनिरपेक्षता :**

आजची परिस्थिती जर बघितली तर धर्माच्या नावाखाली जी धार्मिक सांप्रदायिकता वाढत आहे ती अतिशय चिंताजनक आहे. म्हणून बाबासाहेबाच्या धर्मनिरपेक्ष विचारांची आज गरज आहे. वर्तमान समाज व्यवस्थेत भारतीय संसदेत आणि संसदेच्या बाहेर धर्मनिरपेक्षताच्या संकल्पनेची मोडतोड होत आहे. धर्मनिरपेक्षता ही संकल्पना अनेक धर्माशी संबंधित आहे. मुळ सेक्युलर या इंग्रजी शब्दाचा धर्मनिरपेक्षता असा न घेता, सर्वधर्म समभाव असा घेतला जातो. सर्वधर्म समभाव म्हणजे सर्व धर्माचा सारखाच आदर राखणे, सन्मान करणे होय. धर्मश्रेष्ठ की राजा श्रेष्ठ, धर्म श्रेष्ठ, की राज्य श्रेष्ठ हा वाद विकोपाला जात होता. राज्य किंवा सरकार आणि शिक्षण यापासून धर्म वेगळा ठेवणे म्हणजे धर्मनिरपेक्षता अशी साधीसोपी त्यांनी व्याख्या केली. धर्मनिरपेक्षता म्हणजे आधुनिकतेकडे वाटचाल ही संकल्पना घेऊन पुढे जगभर चळवळी उभ्या राहिल्या. बाबासाहेबांचे धर्मनिरपेक्षता याबाबत विचार पाहत असतांना बाबासाहेबांनी धर्मातर का केले हयाचाही विचार करणे अनिवार्य आहे. वास्तविक पाहता बाबासाहेबांना धर्मातर करून त्यांना धर्मयुध्द छेडायचे नव्हते तर समता, स्वातंत्र्य, बंधुभावाची, न्यायाची हमी देणाऱ्या भारतीय संविधानाशी सुसंगत अशी समाजाची पुर्नरचना करायची होती. त्यासाठीच राष्ट्रातील संघर्ष हा प्रासंगिक असतो.

**डॉ. आंबेडकर आणि समता :**

डॉ. आंबेडकरांनी जीवनात समतेला सर्वोच्च स्थान दिले. तसेच ते समतेचे मोठे पुरस्कर्ते होते म्हणून देशात समता आणण्याकरिता त्यांनी महाडचा सत्याग्रह, नाशिक येथील मंदिर सत्याग्रह यासारखे सत्याग्रह करून भारतातील अस्पृश्य वर्गाला समान पातळीवर नेण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. अस्पृश्यांना सर्वांनी जवळ करावे व अस्पृश्यांनी देखील भेदभाव करू नये असे त्यांनी वारंवार सांगीतले. भारतीय संविधानातही स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय याकरिता विशेष कलमाची तरतुद करून त्यांनी समतेशिवाय एकसंघ भारत राष्ट्राची निर्मिती होवू शकत नाही म्हणून त्यांनी ब्रिटीश व कॉंग्रेसला अस्पृश्यांच्या सुधारणेकरिता वेळोवेळी प्रयत्न करून समतेचा पुरस्कार केला.

**डॉ. बाबासाहेबंचे स्त्री उन्नती विषयक विचार :**

कोणत्याही समाजातील स्त्री–पुरूष हे दोनही घटक अतिशय महत्वाचे आहे. परंतु भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना नेहमीच मागे ठेवण्यात आले. त्याबरोबर समाजातील रूढी, परंपरा, प्रथा, यामुळे देखील स्त्रीची प्रगती झाली नाही. परंतु स्त्रियांचा विकास झाला नाही तर कोणत्याही राष्ट्राची उन्नती होणार नाही यांचा विचार बाबासाहेबांनी केला. राष्ट्रनिर्माणाच्या योगदानात स्त्रियांचा महत्वाचा वाटा असतो म्हणून स्त्रियांचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास होय असे त्यांचे म्हणणे होते.

भारतीय स्त्रियांना हजारो वर्षाच्या भिषण अंधकारातून बाहेर काढयासाठी म्हणजेच महिलांच्या उन्नतीसाठी जे हिंदू कोड बिल तयार केले त्या विधेयकाच्या मसुद्याला जोरदार विरोध झाला. आज केरळमध्ये (मंदीर प्रवेशाबाबत) अशाच प्रकारचा विरोध दिसून येतो. हे हिंदू कोड बिल मांडण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची क्रांतीकारी भूमिका होती. हे बिल संमत करण्यासाठी बाबासाहेबांना फार संघर्ष करावा लागला. हिंदू कोडबिलाचा उद्देश हिंदू पारंपारिक कायदयात एकरूपता आणून त्याचे आधुनिकरण करणे हा होता. डॉ. आंबेडकर म्हणाले की, हे बील हिंदू धर्मशास्त्रावर आधारित हिंदू हिंदू न्याय जिवन जगण्यासाठी त्यांच्यासाठी प्रशस्त मार्ग आहे.

प्राचिन काळ असो वा अर्वाचिन, कोणत्याही काळाने स्त्रीला न्याय दिला नाही. सहनशिलता आणि संयम हे स्त्रीचे दुसरे नाव आहे. पण स्वत:वर होत असलेल्या अन्यायाची जाणीव होवूनही न्यायासाठी न लढणे म्हणजे अन्याय सहन करणे होय असे बाबासाहेब म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रीचं दयनिय स्थितीस कारणीभूत ठरलेलया हिंदू धर्माच्या रूढी, रिती आणि परंपराचा सखोल अभ्यास केला. भारतीय संविधानाद्वारे स्त्रीला सर्वागीण विकास करण्याची संधी व समान हक्क दिले. हिंदू कोड बिलाच्या रूपाने भारतीय स्त्रीला तिचे मुलभूत हक्क मिळवून दिले. हया बिलाद्वारे हिंदू परंपरेने निर्माण केलेली सामाजिक असमानता, भेदभाव आणि क्रुर रीती, पंरपरेने हिंदू भारतीय स्त्रीला नाकारलेले हक्क देऊन स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान मिळवून दिले. आंबेडकरांनी विवाह वारसासोबत दत्तक विधान, उत्तराधिकार, घटस्फोट, पोटगी आदी गोष्टीचा या बिलात समावेश करून सर्वसमावेशक अशा प्रकारे हिंदू कोड बिल तयार केले. स्त्री ही पूरूषाइतकाच महत्वाचा घटक आहे म्हणून तिला अधिकार मिळावेत हा शुध्द दृष्टीकोन बाबासाहेबांचा होता. तरीपण या बिलास विरोध झालाच १९५१ मध्ये हे बिल पास होऊ शकले नाही पण कालांतराने हिंदू कोड बिलाचे महत्व लक्षात घेऊन कोडबिलाचा काही भाग मंजुर करण्यात आला. त्यामध्ये १) १९५५ विशेष विवाह कायदा २) १९५५ हिंदू विवाह कायदा ३) १९५६ हिंदू उत्तराधिकार कायदा. ४) १९५६ हिंदू दत्तक ग्रहण आणि निर्वाह कायदा. अशा प्रकारे विविध कायदे संमत करण्यात आले. तसेच राज्यघटनेच्या १५व्या कलमानुसार स्त्री–पूरूष समतेचा पुरस्कार केला. राज्यघटनेमुळेच आज महिलांना सर्व प्रकारचे अधिकार प्राप्त झाले.

**डॉ. बाबासाहेबांचे जातीनिर्मूलन विषयक विचार :**

भारतीय समाज व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग म्हणजे जातीव्यवस्था होय. या सुंदर देशाला लाभलेला दुर्धर रोग म्हणजे अस्पृश्यता होय, जे राष्ट्रीय एकात्मतेसाठी धोकादायक आहे. म्हणून डॉ. आंबेडकरांनी समताधिष्ठीत समाज निर्माण करण्यासाठी जातीव्यवस्थेचे निर्मूलन संबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासंबंधी विचार व्यक्त करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात की, ज्या धर्मशास्त्रांनी जातीव्यवस्थेच्या कल्पना बिंबावल्या त्या धर्मशास्त्राच्या जाचातून लोकांना मुक्त करणे आवश्यक आहे. ज्या धर्मग्रंथावर त्यांचा विश्वास आणि श्रध्दा आहेत, तो विश्वास आणि धार्मिक वृत्ती प्रथम नष्ट करावी लागेल. त्यानंतरच लोक आंतरजातीय विवाहास तयार होतील. डॉ. बाबासाहेबांच्या मते जोपर्यंत जातीवर आधारित समाजरचनेचा पाया बदलविल्या जाणार नाही तोपर्यंत कोणतीही उन्नती संभव नाही. बाबासाहेबांनी घटना तयार

5

करतांना असे सांगीतले की, भारत हा जातीजमातीचा समुह आहे. जातीप्रथा व सामाजिक विषमतेमुळे बहुसंख्य जातीजमातीमधील लोक विकासाच्या आणि माणुसकीच्या हक्कापासून वंचित राहले आहे. भारतीय समाजात जातीव्यवस्थेमुळे विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत. कारण जाती पध्दतीची उभारणी ही मुळातच विषमतेच्या आधारावर झाली आहे. जी व्यवस्था सामाजिक विषमतेचा पुरस्कार करते त्या व्यवस्थेकडून सामाजिक समता, बंधुत्व, स्वातंत्र्य आणि न्याय मिळेल याची आपेक्षा करणे चुकीचेच ठरेल. म्हणून डॉ. बाबासाहेब म्हणतात की, जातीव्यवस्था ही सामाजिक गोष्टींना भावनेची जोपासना करण्यामध्ये अडथळा निर्माण करते. कारण जातीसंबंधी भावना एकतेच्या विरोधी असते. त्यामुळे भारतीय समाज एक संघ किंवा राष्ट्र बनू शकत नाही.

**कामगार नेता डॉ. आंबेडकर :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या समस्या जाणून घेऊन अनेक आंदोलन केले व अनेक परिषदेमध्ये कामगारांच्या समस्या सरकारच्या लक्षात आणून दिल्या. स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना करून त्या अंतर्गत कामगारांच्या हिताचा विचार ब्रिटीशांनी करावा असे अनेक प्रयत्न त्यांनी केले. मनुष्याच्या इच्छेविरूध्द त्यांना काम करण्यास भाग पाडणे म्हणजे त्यंना गुलाम बनविणे होय. युनायटेड स्टेट्सच्या घटनेत म्हटल्याप्रमाणे गुलामगिरी म्हणजे अनैच्छिक दास्य होय. डॉ. आंबेडकरांनी अनेक संप व आंदोलनाच्या माध्यमातून कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. संप म्हणजे कामगाराचा आपण कोणत्या अटीवर नौकरी करण्यास तयार आहोत हे सांगायचे स्वातंत्र्य असलेला हक्क होय.

**डॉ. आंबेडकरांचे शेती विषयक विचार :**

भारत हा कृषीप्रधान देश असतांना शेतकऱ्यांची स्थिती वाईट होत चालली आहे. म्हणजे काही राज्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. ज्यांच्या आधारावर संपूर्ण समाजाचे पोट भरते तोच जर उपाशी राहत असेल तर ही अतिशय चिंतनाची बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर फार मोठे अर्थतज्ञ होते. त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या संदर्भात सखोल अभ्यास केला होता. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी परिषदा घेतल्यास मुंबई विधी मंडळावर शेतकऱ्यांचा मोर्चा देखील नेला होता, डॉ. आंबेडकरांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्याबाबत अर्थशास्त्रीय दृष्टीकोणातून लेख लिहीलेत आणि शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत प्रत्यक्ष कार्य केले, लहान जमीनधारक क्षेत्रे ही भारतातील शेती समोरील एक अतिशय गंभीर समस्या आहे. शेतकऱ्यांकडे आधिच कमी जमीनधारणा आहे. त्यातही ही शेतजमीन वेगवेगळया ठिकाणी विखुरली आहे. त्यामुळे साधनसंपत्तीचा योग्यप्रकारे उपयोग करण्यात अडचणी निर्माण होतात. अशा लहान जमीनधारणा क्षेत्रांची उत्पादकता कमी असते. भारतातील शेतकऱ्यांकडे सरासरी जमीन धारणेचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे बहुतेक जमीनधारकांना त्या जमीनीतून कुटूंबाची गरज भागविण्याइतपत पुरेसे उत्पन्न मिळू शकत नाही.

6

**आर्थिक विकास धोरण – डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ.आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाची पुरेशी चर्चा होत नाही. स्वातंत्र्यपूर्ण कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असतांना ''पुनर्बांधनी आणि पुर्नर्वसन योजना १९४२–४६ साली तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१–५५ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेने त्या योजनेचा आधार घेतला. डॉ. आंबेडकरांनी कामगार विषयक धोरण आखलेच, पण अनुसुचित जाती विषयीचे धोरण आणि महत्वाचे म्हणजे पाणी आणि विज यांच्या विकासाचेही धोरण त्यांनी आखले होते. आजही त्या कामगार विषयक धोरणाचा आधार घेतला जातो, कोलकत्त्यात पहिले राजगार विनिमय केंद्र सुरू झाले. तेही याच धोरणामुळे अनुसूचिम जातीसाठी सरकारी नौकऱ्या व शिक्षणसंधीमध्ये आरक्षण हे निर्णय त्यांच्या धोरणांमुळे झाले. केंद्रीय जलआयोग आणि केंद्रीय वीज प्राधिकरण या आजही कार्यरत असलेल्या यंत्रणांची सुरूवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाणी आणि वीज विषयक धोरणातुन झाली. दामोदर, हिराकुड, शोण ही धरणे तसेच दखखनचा पाटबंधोर विकास हे या धोरणामुळे मार्गी लागले.

एकटया व्यक्तीचे इतके मोठे योगदान, हा राष्ट्रनिर्माणासाठी मोठा सहयोग आहे. राष्ट्रवाद, देशप्रेम यांची उच्च पातळी गाठल्या खेरीज आणि प्रमाणिकपणा असल्याखेरीज इतके मोठे काम होत नसते. देशातील साऱ्या वंचितांसाठी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महानायक आहेतच.

**समारोप :**

अशाप्रकारे बाबासाहेबांनी राष्ट्राची संकल्पना, हक्क संरक्षणाची, जातीव्यवस्था, अस्पृष्यता, धर्मनिरपेक्षता, समता, स्त्री उन्नती विषयक विचार, कामगार नेत्यासंबंधीचे विचार, शेतीविषयक विचार, आर्थिक विकास धोरण इ. समाजशास्त्रीय अध्ययन करून अनेक ग्रंथ लिहले. चळवळी उभारण्या त्यामुळेच आज माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी मिळत नाही. बाबासाहेबांच्या जातीनिर्मुलनाच्या चळवळीमुळे अनुसूचित जाती, जमातींना मिळालेल्या आरक्षणामुळे त्यांच्यात शैक्षणिक व आर्थिक सुधारणा होत आहे. त्यामूळे राष्ट्रनिर्माणास सहाय्य ठरते. अशा तऱ्हेने बाबासाहेब आंबेडकर हे आयुष्यभर समता, स्वातंत्र्य, न्याय आणि राष्ट्रहितासाठी झगडत राहिले. आणि राष्ट्रातील सर्व घटक सशक्त करून बलवान आणि सामर्थ्य संपन्न बनवून सुखी–संपन्न राष्ट्राची उभारणी केली. म्हणून त्यांचे राष्ट्र उभारणीत विशेष योगदान आहे.

7

संदर्भग्रंथ सुची :

१. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई चौथी आवृत्ती.

२. नगराळे गणपतराव शंकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वरत्न कसे व्यक्तीमत्व आणि कर्तृत्वद, सुधीर प्रकाशन वर्धा, तृतीय आवृत्ती २०१२.

३. डॉ. कसबे रावसाहेब, डॉ. बाबासाहेब आणि भारतीय राज्यघटना, उषा वाघ सुगावा प्रकाशन पुणे पाचवी आवृत्ती २०१४.

४. वीरकर विलास,''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील कार्य'' सम्राट, ८ डिसेंबर २०१५.

५. डॉ. सुर्या अनिल,'प्राचीन अर्वाचिन भारतीय स्त्री आणि हिंदू  कोड बिल' सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे २०१०.

६. कांबळे मधु,''डॉ. बाबासाहेब आणि धर्मनिरपेक्षता'','लोकसत्ता ६ डिसेंबर २०१५.

***

8

# सामाजिक परिवर्तन और कबीर

**प्रा. लक्ष्मण किसनराव पेटकुले**
(हिंदी विभागाध्यक्ष)
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

मनुष्य सामाजिक प्राणी है और समाज के बाहर मनुष्य का कोई अस्तित्व नहीं है। समाज मनुष्य के उन्नति के लिए महत्वपूर्ण भूमिका अदा करता है। समाज में रहकर ही मनुष्य स्वयं, परिवार और समाज की उन्नति के लिए कार्य करता है। किंतु प्राचीन काल से आज तक हर दौर में समाज में कुछ ऐसी विकृतियाँ मनुष्य ही निर्माण करते आये हैं, जो समाज व्यवस्था के लिए घातक साबित हुए हैं। समाज में घर कर बैठे इन विकृतियों को दूर करने का प्रयास तत्कालीन संत, महात्माओं और समाज सुधारकों अपने–अपने तरीके से किया है। अतः समाज परिवर्तन का दायित्व अपने सीर पर लिया।

हम बात कर रहे हैं मध्ययुगीन काल की मध्यकाल को ही हिंदी साहित्य इतिहास में 'भक्तिकाल' के नाम से भी जाना जाता है। मध्ययुगीन काल में भारत पर चारों और लगभग मुगलों का साम्राज्य स्थापित था। तात्पर्य इस देश के हिंदुओं में असुरक्षितता की भावना मन में उत्पन्न होना स्वाभाविक था। क्यों कि मुगल साम्राज्य ने तलवार की बल पर धर्मपरिवर्तन को बढ़ावा दिया। परिणामतः भारतीय समाज में हिंदू और मुसलमान ऐसा भेद उत्पन्न हुआ। साथ ही यहाँ की समाज में जाति प्रथा, अंधश्रद्धा, रूढ़ी परंपराएँ, वंशवाद, सामंती व्यवस्था, आडंबर, छुआछूत, अनियंत्रित राज्यव्यवस्था, स्त्री चरित्र का हनन आदि कई विकृतियाँ समाज में व्याप्त थी। ऐसी स्थिति में समाज को एक ऐसे मार्गदर्शक की आवश्यकता थी जो बिना भेद–भाव किये। समाज के हर धर्म को, हर जाति को, हर तबके को सही दिशा निर्देश दें। भक्तिकाल में अपने विचारों से समाज में परिवर्तन लाये ऐसे कई संत और महात्माओं का जन्म हुआ जिसमें संत तुलसीदास, संत कबीर, संत सूरदास, जायसी, संत मीराबाई, संत नामदेव, संत गुरु नानक, दादू दयाल, रैदास, आदि इन सारे संतों ने समाज की उन्नति के लिए, समाज परिवर्तन के लिए निःस्वार्थ रूप से कार्य किया। भले ही इन संतों के मार्ग अलग–अलग थे। संत कबीर का अविर्भाव इसी कल में हुआ जो समाज परिवर्तन के लिए उनका योगदान अनन्यसाधारण है।

कबीर एक विद्रोही और अपने फक्कडपन के लिए जाने जाते हैं। समाज में जो अनर्गल, अवांछित बातें थी उसका पुरजोर उन्होंने विरोध किया। जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, रूढ़ी, परंपरा, अडंबर आदि समस्याओं पर हिंदू और मुसलमानी दोनों धर्मों को फटकार लगाते हुए कहा है . . . . .

''अरे इन दोहुन राह न पाई।
हिंदू अपनी करें बढ़ाई गागर छवन, न देई।
वेश्या के पाहन–तर सोने यह देखो हिंदू आई।
मुसलमान के पीर औलिया, मुर्गी मुर्गा खाई।
खाला केरी बेटी ब्याहै, घरहि में करै सगाई।''

कबीर समाज में व्याप्त दुर्गतियों पर सिधे–सिधे प्रहार किया हैं। उनके साहित्य में समाज सुधार एवं समाज परिवर्तन के कईं बिंदु परिलक्षित होते हैं। जो निम्नलिखित रुप में है।

**1) राम रहीम एकता का प्रतिपादन :**

कबीर कवि बाद में थे पहले वे समाज सुधारक थे। तत्कालीन समाज में जो हिंदू–मुस्लिमों का एक–दूसरे के प्रति जो तिरस्कार की भावना थी, हिंदू–मुस्लिमों में धर्मभेद की खाई थी। इस खाई को दूर कर मानवतावाद

को अपने साहित्य में बढ़ावा दिया है। कबीर का मानना है कि हिंदू–मुस्लिम जब एक ही प्रकार से उत्पन्न हुए हैं और मृत्यु पाते हैं। जीवन में एक ही प्रकार से प्राण संचार और रक्त संचार होता है फिर रहन–सहन और धार्मिक मान्यताएँ कृत्रिम है। इसीलिए हिंदू–मुस्लिम एकता का प्रतिपादन करते हुए मूर्तिपूजा का विरोध कर एकेश्वर वाद को मान्यता दी।

**2) जाति–प्रथा का खंडन :**

कबीर काल में समाज में बड़े पैमाने पर जाति प्रथा और छुआछूत का प्रचलन था। यह प्रचलन एक स्वस्थ समाज के लिए घातक है, यह कबीर ने पहचान रखा था। ऊंची–नीच, स्पृष्य–आस्पृष्य आदि का कबीर के जीवन में कोई महत्व नहीं था इसीलिए उन्होंने जाति व्यवस्था का खुलकर विरोध करते हुए कहा हैं कि

''ऊँचे कुल में जन्मिया, करनी ऊँची ना होय।
सुर्बरन कलष सुरा भरा, साधू निंदा सोय।।''

**3) मूर्ति–पूजा का विरोध :**

कबीर एकेश्वावाद के समर्थक थे। वे निर्गुण–निाकार ब्रह्म की उपासना करते थे। उनके राम यह दशरथ पुत्र न होकर निर्गुण–निराकार थे। उन्होंने पूर्ति–पूजा का खुलकर विरोध किया। उनका मानना था की पत्थर की मूर्ति पूजने पर भगवान नहीं मिलते इससे अच्छा तो पत्थर की चक्की है जिससे हम अनाज पिसवाकर आटा बनाते हैं। इसी संदर्भ में सामान्य इंसान को समझते हुए कबीर कहते हैं

''पाहन पूजै हरि मिलैं तो मैं पूजूं पहार।
घर की चाकी कोई ना पूजै पीस खाय संसार।।''

**4) जीव हिंसा का विरोध :**

कबीर जीव हिंसा के घोर विरोधी थे। उनका मानना था की इस धरती पर जो भी जन्म लेता है, उन्हे जीवन जीने का पूरा अधिकार है। अपनी जीव्हा के स्वाद के लिए किसी प्राणी को मार काटकर अपनी भूख मिटाना यह इस बात से कबीर को चीड़ थी इसीलिए हिंदुओं में 'ाक्तों और मुसलमानों में कुर्बानी देने वालों को कबीर निडर होकर फटकारते हुए कहा

दिन में रोजा रहत हैं राति हनत है गाँय।
यह तो खून बंदिगी कैसें खुशी खुदाय।।
बकरी पाती खात है ताकी काढ़ी खाल।
जे जन बकरी खात हैं तिनके कौन हवाल।।

**5) हिंदू–मुस्लिम पाखंड का खंडन :**

कबीर ने हिंदू और मुसलमान धर्म में व्याप्त पाखंडियों का खुलकर विरोध किया है। हिंदू धर्म में व्याप्त तीर्थाटन, तिलक, माला फेरनेवाले पाखंडियों को अपने दोहों के माध्यम से विरोध किया वे हिंदुओं की इस पाखंडता का विरोध करते हुए कहा कि

''माला फेरत जुग गया गया ना मनका फेर
कर का मन का डारि के मनका मनका फेर।।''

जिस प्रकार से कबीर ने हिंदुओं को फटकारा उसी तरह मुसलमानों को भी फटकारते हुए कहा है –

अरे इन दोउन राह न पाई।
मुसलमान के पीर औलिया मुरगी मुरगा खाई।
खाला केरी बेटी ब्याहैं घर ही में करै सगाई।।
हिंदू अपनी करै बड़ाई गागर छुअन न देहीं।

वेश्या के पायन तर सोये यह देखो हिंदूआई।।

**समारोह :**

कबीर अपने समय के कवि बाद में पहले समाज सुधारक थे। तत्कालीन सामाजिक समाज में कई समस्याएँ उत्पन्न हुई। इन समस्याओं से आम जनमानस त्रस्त था। ऐसी स्थिति में कबीर का जन्म लेना किसी चमत्कार से कम नहीं था। कबीर ने समाज में बदलाव लाने के लिए यहाँ के हिंदू–मुसलमान धर्म में व्याप्त अंधश्रद्धा, रूढ़ी–परंपरा, जातिभेद, धर्मभेद, पायांड अवडंबर आदि पिकृतियों का खुलकर विरोध किया। निष्कर्षतः कबीर के विचार आज भी प्रासंगिक है क्यों कि जो समस्याएँ कबीर के काल में विद्यमान थी वही समस्याएँ आज भी कम होती नजर नहीं आती।

**संदर्भ :**

1) कबीर : साधना और साहित्य, डॉ. प्रतापसिंह चौहान, ग्रंथम प्रकाशन, रामबाग, कानपुर.

2) कबीर परिचय तथा रचनाएँ, संपा. सुदर्शन चोपड़ा, सरस्वती विहार हिंदी पॉकेट बुक्स प्रा. लिमिटेड, जे जोरबागन लेन, नई दिल्ली.

3) कबीर साहिब की सखियाँ, डॉ. बीरपाल सिंह कश्यप, गजेंद्र सिंह, साधना पब्लिकेशन, दिल्ली.

4) संत वचनावली, डॉ. रामेश्वर प्रसाद सिंह, अनुपम प्रकाशन, पटना.

5) कबीर और जायसी का रहस्यवाद और तुलनात्मक विवेचन डॉ. गोविंद त्रिगुणाम, साहित्य सदन देहरादून.

6) मध्यकालीन नवजागरण काल और संत साहित्य, डॉ. मंजुला पाण्डेय, समता प्रकाशन, कानपुर–देहात.

# राष्ट्रीय विकासात लोकशाहीची भूमिका

**सचिन आर. वानखेडे**
सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ
wankhedesachin2011@gmail.com

## सारांश :

जगातील बऱ्याच देशांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला आहे.विकसित, विकसनशील, अविकसित अशा वेगवेगळ्या प्रकारे राष्ट्राचे विभाजन झाले असले तरी प्रत्येक देशात लोकशाहीला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते.चीनच्या राजकीय व्यवस्थेचे वर्णन जनतेची लोकशाही असे केले.आशिया व आफ्रिका खंडातील देशांनी राजकीय विकासात लोकशाहीला मुख्य आधार मानले आहे.तर काही देशांनी लोकशाहीला आपली जीवनपद्धती मानले आहे. साम्यवादी, हुकूमशाही देश सुद्धा स्वत:ला लोकशाहीवादी मानतात. लोकशाहीचा विकास ग्रीक नगर राज्यात झालेला दिसतो. त्या नगर राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती, त्यावरून लोकशाही प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली संकल्पना आहे.मध्ययुगात अधिक लोकसंख्या आणि वाढत्या राज्याच्या आकारामुळे तेथे अस्तित्वात असलेल्या प्रत्यक्ष लोकशाहीचे रूपांतर हे अप्रत्यक्ष लोकशाहीमध्ये झाले.त्यामुळे जगातील विविध देशांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लोकशाहीचा स्वीकार केला आहे.लोकशाहीचा मुख्य उद्देश देशात शांतता, सुव्यवस्था, कायदा, अधिकार, राष्ट्रीय हित साध्य करणे हा आहे.लोकशाहीमध्ये मानवी अधिकाराचे जतन केले जाते.जात, धर्म, भाषा, लिंग इत्यादी आधारावर कोणताही भेदभाव न करता समानता प्रस्थापित केली जाते.राष्ट्रामधील सामाजिक, आर्थिक विषमता नष्ट करते.म्हणजे लोकशाहीमुळे देशात असणारी भिन्नता नष्ट करून एकता निर्माण करण्याचे कार्य केले जाते.

लोकशाहीत सत्तेच्या विभाजनावर भर दिला जातो.सत्ता केवळ मूठभर लोकांच्या हातात केंद्रित नसून सत्तेत अधिकाधिक लोकांचा सहभाग असतो.लोकशाहीमध्ये लोकसहभागाला अधिक महत्व आहे.त्यामुळे राष्ट्रीय विकासात जनतेचा हातभार लागतो.निवडणूक, राजकीय पक्ष, दबाव गट, संघटना, अधिवेशने, इत्यादींमुळे लोकांना राजकीय शिक्षण मिळते. जगातील प्रत्येक राष्ट्रामध्ये राजकीय जागृती होणे ही आजच्या काळाची गरज आहे.त्याशिवाय त्या देशाचा विकास जनतेचे जीवनमान, जनता आणि शासन यांतील समन्वय साधता येणार नाही. जगातील कोणत्याही देशाच्या विकासासाठी इतर शासनपद्धती पेक्षा केवळ लोकशाही शासनप्रणालीच महत्वाची आहे. बहूमताचे शासन, राजकीय पक्ष, उत्तम नेतृत्व, लोकशाहीवरील विश्वास, स्वतंत्र वृत्तपत्रे, जागृक नागरिक, इत्यादी घटकांमुळे देशात लोकशाही कायम राहण्यास सहकार्य करते. राष्ट्रांमध्ये निर्माण झालेली संकटकालीन परिस्थिती, युध्द, आक्रमण, गरिबी, दारिद्र्य, बेरोजगारी, इत्यादी परिस्थितीतून मुक्तता लोकशाहीमुळेच मिळू शकते.आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्राराष्ट्रांमधील असलेले परस्पर संबंध सुध्दा लोकशाहीमुळेच सुरळीत झाले असे म्हणता येईल.

## मुळ शब्द :

राष्ट्रनिर्मिती, राष्ट्रीय विकास, लोकशाही, जबाबदार शासन, सत्ता संतुलन, जनतेचे सार्वभौमत्व, राजकीय जागृती, अधिकार, कर्तव्य, कल्याणकारी शासन.

## प्रस्तावना :

'लोकशाही' ही संकल्पना जगप्रसिद्ध आहे.' त्यामुळे लोकशाही हा शब्द अपरिचीत आहे, असे म्हणून चालणार नाही. लोकशाही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात असून ग्रीक शास्त्रज्ञ आणि राज्यशास्त्राचा जनक 'ॲरिस्टॉटल' यांच्या ग्रंथात लोकतंत्र शासन प्रकाराचा उल्लेख असतांना दिसतो. लोककल्याणकारी व्यवस्था म्हणून लोकशाहीचा अनेक विचारवंतांनी समर्थन केले.त्यामुळे लोकशाहीचा अर्थ वेगवेगळ्या विचारवंतांनी स्पष्ट केला आहे.प्राचीन ग्रीक विचारवंत **'हिरॉडोटस'** यांनी लोकशाहीची

पहिली व्याख्या केली.त्यांच्या मते – **“लोकशाही ही अशी शासन पध्दती आहे ज्यात राज्याची सर्वोच्च सत्ता लोकांच्या हाती असते.”**[1]

लोकशाहीला इंग्रजीत ‘Democracy’ या नावाने ओळखले जाते. ‘Democracy’ या इंग्रजी शब्दाची निर्मिती ग्रीक भाषेतील ‘Demos’ म्हणजे लोक/जनता आणि ‘kratia’ म्हणजे सत्ता या शब्दांपासून तयार झालेला आहे. प्रजेची सत्ता म्हणजे लोकशाही अशी व्याख्या ग्रीकांनी केली.

अशा प्रकारे विविध लेखकांनी लोकशाहीचा अर्थ स्पष्ट केला असला तरी लोकशाही म्हणजे लोक कल्याणकारी, मानवी हक्कांचे संरक्षण करणारी प्रणाली आहे, असे म्हणता येईल.

## अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोध निबंधाकरीता वर्तमानपत्रातील प्रकाशीत लेख, मासिके व संदर्भग्रंथांचा आढावा घेतला आहे.शोध निबंधाच्या मांडणीकरीता वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

## लोकशाही विकास :

लोकशाहीचा जन्म प्राचीन ग्रीक रोमन राज्यांमध्ये झाला.त्यावेळेस तेथे प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रकार इ.स.पूर्व 5 व्या शतकात अस्तित्वात होता.या लोकशाहीमध्ये लोकांचे अधिकार मर्यादीत स्वरूपाचे होते.इ.स. पूर्व 407 मध्ये अथेन्स येथे सर्व नागरिकांसाठी समानतेच्या तत्वाचा स्वीकार करण्यात आला.‘लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य’ हे तत्व मान्य केल्या गेले.लोकांचे राज्य असलेल्या राजकीय व्यवस्थेत क्रमवार इक्लेशिया (Ecclesia), बोऊल (Boule), सार्वजनिक कोर्ट अशा तीन प्रमुख संस्था होत्या.प्रथम संस्थेला कायदानिर्मिती, आंतरराष्ट्रीय क्षेत्रासंबंधीत अधिकार होते.दुसरी संस्था अथेन्सच्या दहा जमातीचे प्रतिनिधित्व करीत असे. तिसऱ्या संस्थेत नागरिकांना आपल्या केसेस स्वत: लढण्याचा अधिकार होता. त्यामुळे लोकशाहीत कायद्यासमोर समानता हे तत्व लागू केले.ग्रीसच्या स्वामीत्वासाठी अथेन्स,

स्पार्टा यांच्यात युध्द झाले.त्या युध्दास पोलिर्नेशियन या नावाने ओळखले जाते.हे उदाहरण सांगण्याचे कारण की, राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याच्या हेतूने राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये संघर्ष युध्द होत होते.स्पार्टामध्ये अतिशय उंच प्रतिची लोकशाही होती. तेथील जनता स्वतःला सैनिक मानत असे. नागरिकांना तेथे सैनिक शिक्षणाची व्यवस्था करण्यात येत असे.जे सैनिक कार्यात सहभागी होतील, त्यांनाचनागरिकत्व, मतदानाचा अधिकार मिळत असे. ही निवड श्रीमंत, श्रेष्ठ कुटुंबामधूनच होत होती.मात्र स्पार्टाच्या नागरिकांना राजावर टिका-टिपण्णी करण्याचा अधिकार होता.

सुरूवातीला रोममध्ये असलेली पारंपारीक राजेशाही नष्ट करण्यात आली.त्याऐवजी तिथे जनसत्तेची स्थापना केली आणि जुन्या कायद्याची पुनर्रचना करण्यात आली.त्यालाच '12 टेबल्स' या नावाने ओळखले जाते.या 'बारा टेबल्स' मध्ये प्लेब लोकांचे काही अधिकार मान्य करण्यात आले.यावरून असे म्हणता येईल, रोमच्या विकासात लोकशाहीचे निश्चित योगदान आहे.कायद्यसमोर समानता असलेली 'बारा टेबल्स' ही संकल्पना रोमनने तयार केली.त्यामुळे कनिष्ठ वर्गाच्या लोकांना सर्वप्रथम कायदेशीर अधिकार, हक्क मिळाले.अशा तर्‍हेने रोमन लोकांनी लोकशाहीच्या विकासासाठी महत्वाचा हातभार लावला.मात्र तेथील लोकशाही आधुनिक लोकशाहीसारखी नव्हती.कारण जनमताला राज्य कारभारात किंमत नव्हती.

प्राचीन भारतातील लोकशाहीचे स्वरूप नैतिकतेवर आधारित होते.स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांना प्राचीन शासन प्रणालीत महत्वाचे स्थान होते. महाभारत, रामायण, बौध्द धर्म, शांतीपूर्व, ऋग्वेद, जैन धर्मग्रंथ, शुक्र नीती, कौटिल्याने राजा-प्रजा संबंधी प्रस्तुत केलेले विचार हे प्राचीन भारतातील लोकशाहीची मुळे होती असे म्हणता येईल. मध्ययुगात लोकशाही तेवढ्या प्रमाणात विकसित झाली नाही.मात्र लोकशाही संबंधित अनेक संकल्पनांचा उदय या काळात झाला.समानतेचा लोकशाहीवादी विचार याच काळात रूजला.या काळातील लोकशाहीच्या विकासासाठी अनेक घटना कारणीभूत ठरल्या आहेत. उदा.विटेन जेमोट किंवा विटान, मॅग्नाकार्टा (1215), पीटीशन ऑफ राईट्स (1628), हेबियस कॉपर्स

(1679), इत्यादी बाबी लोकशाही विकासास कारणीभूत आहे.'कायदा सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे' हे तत्व इंग्लंडच्या मॅग्नाकार्टा सनदेतून मान्य करावे लागेल. दडपणशाही विरोधी लढण्यात ही सनद जनतेच्या हक्कांची प्रतिक बनली.मॉडल पार्लमेंटमध्ये (1265) मोठ्या शहरातील प्रतिनिधींना लंडन येथे बोलावून क्रातीकारी सुधारणांवर चर्चा, विचारविनिमय होत असे.ही लोकशाही विकासाची खरी मुळे आहेत.

मध्ययुगात लॅन्डसमिन्डे हे स्वीत्झर्लंडमध्ये सार्वभौम संस्था होती.ती आजही कार्यरत आहे.यामुळे कॅन्टॉन्सच्या नागरिकांना विशिष्ट ठिकाणी सहभागी होण्याचा अधिकार होता.हात वरती करून मदतान केले जात असे.एकंदरीत लॅन्डसमिन्डे या सर्वाभौम संस्थेमुळे लोकशाहीचा मार्ग सुकर झाला असे म्हणता येईल.आधुनिक काळात नवनविन संकल्पना उदयास आल्या, असे म्हणता येईल.रॉबर्ट वॉलपोल हे इंग्लंडचे पहिले पंतप्रधान होते.त्यांनी कॅबिनेट बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवून अधिकारी, मंत्र्यांच्या नेमणूका करण्याचे अधिकार पंतप्रधानाकडे घेतले होते.त्यामुळे इंग्लंडमध्ये मंत्रीमंडळाच्या सार्वभौमत्वाचे तत्व अस्तित्वात आले.स्लेव्हरी ॲक्टमुळे इंल्गंडमधील गुलामगिरी नष्ट करण्यात आली आणि 1880 मध्ये मतपत्रीकेव्दारे गुप्त मतदान पध्दती स्वीकारण्यात आली.मानवी हक्क विधेयक (Bill of Rights) मध्ये मानवी अधिकारांना संरक्षण देण्याची तरतूद केली आहे. यामुळे संसदेचे अधिवेषण बोलविणे, निवडणूकीमध्ये सहभागी होणे आणि संसदेमध्ये आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य जनतेला देण्यात आले व राज्याचे अधिकार मर्यादित करण्यात आले.

बहुमत तत्वाचा स्वीकार, लिखित संविधान, व्दिसदनात्मक कॉंग्रेस, पक्षपध्दती, बील ऑफ राईट्स, 15 व्या घटना दुरूस्ती, इत्यादी बाबी अमेरिकन लोकशाही विकासास कारणीभूत आहे. फ्रेंच राज्यक्रांती, मानवी हक्काचा जाहीरनामा-1789, सार्वत्रिक पुरूष मतदानाचे तत्व-1884, इत्यादींमुळे फ्रान्सच्या राजकीय स्थितीत बदल झाले.हा लोकशाहीतील इतिहासाचा महत्वाचा टप्पा होता.

पहिल्या महायुध्दानंतर युरोपमधील अनेक देशात लोकशाहीच्या तत्वास मान्यता देण्यात आली, उदा. फिनलँडमध्ये-सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, रशियामध्ये केरेन्स्कीच्या नेतृत्वात उदारमतवादी लोकशाही, लेनींनच्या नेतृत्वात साम्यवादी शासन, ब्रिटनमध्ये स्त्री-पुरूषांना मतदानाचा अधिकार, अमेरिकेची 19 वी घटना दुरूस्ती, इत्यादी.

भारताला सन 1947 ला स्वातंत्र्य मिळाले.त्यानंतर भारताचे एक लिखित संविधान तयार करण्यात आले, त्यालाच भारतीय लोकांच्या अधिकारांचे लिखित दस्तऐवज म्हटले जाते.जगात अधिक लोकसंख्या असलेले लोकशाही राष्ट्र म्हणून भारताचा उल्लेख करण्यात आला.उदा. सांसदीय शासन पध्दती, संघराज्य पध्दती, संविधानीक प्रस्तावना, मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे, घटनात्मक उपायांचा अधिकार, इत्यादी तत्वे भारतीय लोकशाही निर्माण करण्यास कारणीभूत ठरते.आशिया, आफ्रिका खंडातून मुक्त झालेल्या अनेक देशांनी लोकशाही स्वीकारली.परंतु काही काळातच त्या राष्ट्रांमध्ये हुकूमशाही प्रस्थापित झाली, उदा.पाकिस्तान, श्रीलंका.जगातल्या 12 राष्ट्रांपैकी 192 देशांत लोकशाही शासन पध्दती स्वीकृत केली आहे.

## लोकशाहीच्या यशाकरीता आवश्यक घटक :

लोकशाहीच्या यश-अपयशासाठी जनतेने काही घटकांचा अवलंब करूनलोकशाहीला जीवंत ठेवण्यास सहकार्य केले पाहिजे.लोकशाहीत शिक्षणाला महत्व आहे.कारण शिक्षणामुळे जनतेला आपले अधिकार, कर्तव्याची जाणीव होते.योग्य प्रतिनिधी निवडून देण्यास व योग्य शासन निर्माण करण्यास औपचारीक व अनौपचारीक अशा दोन्ही पध्दतीचे शिक्षण देणे आवश्यक आहे.जनतेमध्ये प्रामाणिकता, परस्पर सहकार्य, भावनिकता, राष्ट्रप्रेम, इत्यादी गुण असेल तरच अधिकार व कर्तव्याचे जाणिवपूर्वक पालन होते.प्रो. हार्न शॉ म्हणतो की, “लोकशाहीत प्रामाणिकपणा व प्रतिष्ठेबाबतची उंच भावना असली पाहिजे.”[2] विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षाच्या ध्येय-धोरणावर टिका, चर्चा करते आणि राष्ट्रीय विकासासाठी योग्य निर्णय

घेण्यास सत्ताधाऱ्याला भाग पाडतात. कोणत्याही देशाची राज्यघटनाही लिखित असो की अलिखित असो, मात्र प्रत्येक राज्यघटनेत मुलभूत अधिकारांचा केवळ उल्लेख करणे शक्य नाही तर त्या मुलभूत अधिकारांना न्याय संरक्षण असले पाहिजे. ज्या देशाच्या राज्यघटनेत मुलभूत अधिकारांची हमी दिली जात असेल, त्याच देशात लोकशाही यशस्वी होवू शकते.मुद्रण, लेखन, भाषण स्वातंत्र्य, संघटना, वर्तमानपत्रे, ऑनलाईन माध्यमे, इत्यादींव्दारे लोकमत निर्माण केले जाते.ही माध्यमे लोकशाहीला मजबूत करण्यास मदत करते.

महात्मा गांधीजींचे स्वप्न होते की, 'खेड्याचा विकास तर देशाचा विकास', या तत्वानुसार सत्तेमध्ये खेड्यांचा वाटा असला पाहिजे. त्यासाठी ग्रामिण स्तरावर, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. जनसहभाग हा लोकशाहीचा मुख्य आधार आहे.राजकीय पक्ष, दबाव गट, सामाजिक संघटना, इत्यादींव्दारे लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण केली जाते.म्हणजेच भ्रष्टाचाराला बळी न पडता योग्य प्रतिनिधी व खंबीर नेतृत्व करणारे प्रतिनिधी जनतेव्दारे निवडून दिले जातात.

## राष्ट्रीय विकासात लोकशाहीची भूमिका :

जगातील बहुसंख्य देशांनी लोकशाहीला लोकप्रिय मानले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सत्तेचे विकेंद्रीकरण, लोककल्याणकारी शासन, व्यक्तिवादाची प्रतिष्ठा व शांततेला स्थान, इत्यादी लोकशाहीची वैशिष्ट्ये असली तरी हुकूमशाहीपेक्षा लोकशाहीमध्ये लोकांच्या अधिकारांना स्थान दिले जाते. लोकशाही राष्ट्रामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमता नष्ट करून समानता प्रस्थापित केली जाते.लोकशाही ही लोकहितासाठी कार्य करणारी शासनपध्दती आहे.त्यामुळे नागरिकांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.लोक आपल्या इच्छेनुसार प्रतिनिधी निवडून देतात, मात्र लोकांच्या इच्छेनुसार प्रतिनिधींना

शासन कारभार करणे आवश्यक असते.परंतु प्रतिनिधी आपली हुकूमशाही निर्माण करीत असेल तर त्या प्रतिनिधींना पदमुक्त करण्याचा अधिकार जनतेला आहे. जबाबदार शासन पध्दतीमुळे प्रत्येक प्रतिनिधी आपल्या कार्याचा लेखाजोखा जनतेला देतो. लोकांच्या इच्छेचीकदर राज्यकर्त्यांनी करावी.सध्याच्या स्थितीत निवडणूकीत जातीय आधारावर केले जाणारे राजकारण राष्ट्रात भिन्नता निर्माण करते.लोकशाहीमध्ये जातीय राजकारणाला स्थान न देता आपल्या राष्ट्राविषयी प्रेमभावना तयार केली जाते.लोकशाहीत राष्ट्रीय भावना, श्रध्दा, उपासना, विचार, अभिव्यक्ती, इत्यादींचा विचार केला जातो.प्रथम फ्रान्सच्या लोकांचे तिथल्या शासनाप्रती प्रेम नव्हते, परंतु फ्रेन्च क्रांतीनंतर लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली.

लोकशाही म्हणजे प्रजातंत्रीय शासन, लोकांचे शासन होय. लोकांच्या इच्छेनुसार निर्माण झालेल्या शासनव्यवस्थेत बदल करण्यासाठी कठीण मार्ग स्वीकारण्याची गरज नसते.शासकीय बदल हा निवडणूकीच्या माध्यमातून, शांततेच्या मार्गाने स्थापित केला जातो.लोकशाहीत बहुमताचे शासन असल्यामुळे राष्ट्रामध्ये स्थिरता असते.बहुमताचे सरकार लोकांनी निश्चित कार्यकाळासाठी निर्माण केल्यामुळे शासकीय योजनांची अंमलबजावणी योग्य पध्दतीने व शांततेने होऊ शकते.जिथे अल्प मताचे किंवा हुकूमशाहीचे शासन असते, तिथे स्थिरता नसते.स्थिरता असणाऱ्या देशांचे भवितव्य प्रकाशात आहे, असे म्हणता येईल.लोकशाहीमध्ये लोकांच्या सहभागाला वाव असते.निवडणूक, अधिवेशने, राजकीय पक्ष, संघटना, दबावगट, इत्यादी माध्यमांव्दारे लोकशासन कार्यात सहभागी होते.जनतेला आपले प्रश्न, समस्या सरकारसमोर मांडण्याचा अधिकार मिळतो.सार्वभौम सत्ता ही जनतेकडे असल्यामुळे जनभागीदारीमध्ये स्त्री-पुरूष अशा कोणत्याही आधारावर भेदभाव केल्या जात नाही.जनसहभागामुळे व्यापक राष्ट्रहीत व सामाजिक हित साधता येते.हुकूमशाहीमध्ये जनतेला सहभागी होण्याची संधी नसते व आपले मत सुध्दा सादर करता येत नाही.

ज्याप्रमाणे राष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी व्यक्तींमध्ये समान भाषा, रूढी-परंपरा, समान धर्म, लोकांची समान मानसिकता, राष्ट्रीयता, राष्ट्रप्रेम व आत्मियता इत्यादींची गरज असते, त्याचप्रमाणे लोकशाहीमध्ये आदर्श नागरिकांचे उत्तम चारित्र्य, नैतिकता, सहनशीलता, सहकार्य वृत्ती, इत्यादी गुणांव्दारे लोकशाहीचा विकास गतीने होतो. भ्रष्टाचार, स्वार्थीपणा, अंधविश्वास, अशिक्षितपणा, व्यक्तिपूजा, इत्यादी दोष देशातून नष्ट करता येतो.लोकशाही शासन व्यवस्थेत व्यक्तित्वाच्या प्रतिष्ठेला स्थान असल्यामुळे देशाची प्रतिष्ठा कायम असते.राजेशाहीमध्ये राजाची निवड वंशपरंपरेच्या आधारावर केली जाते, पण लोकशाहीमध्ये बहुमत प्राप्त राजकीय पक्ष सत्तेवर येतो.यामुळे राष्ट्रीय विकासाचे कार्य गतीने होते.काही देशांत न्यायव्यवस्था आहे.परंतु देशाच्या विकासात लोकशाही अग्रेसर करण्यासाठी स्वतंत्र न्यायपालिका असली पाहिजे. म्हणजे न्यायदानाचे कार्य समानतेच्या आधारावर करून नि:पक्ष न्यायदान लोकशाहीतच निर्माण करता येते.

## निष्कर्ष :

हुकूमशाही शासनापेक्षा लोकशाही शासन श्रेष्ठ आहे.कारण लोकशाही देशात जबाबदार शासन व्यवस्था निर्माण करते.कोणत्याही देशात युध्द व संघर्ष, आक्रमण न करता शांतता, एकतेच्या मार्गाने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रश्न, समस्या सोडविण्यास लोकशाहीचा मार्ग महत्वाचा ठरतो.म्हणजे आपल्या देशाचे भवितव्य आपणच घडवू शकतो, अशी भावना लोकशाहीत निर्माण केली जाते.लोकांवर आधारलेली व्यवस्था म्हणजे लोकशाही होय. लोकशाहीमध्ये लोकशक्तीला अधिक महत्व असते.लोकशक्ती वाढली तर लोकशाही बलशाही होते.म्हणून इतर शासन पध्दतीपेक्षा लोकशाही शासन राष्ट्रविकासाच्या दृष्टिने महत्वाचे आहे.

## समारोप :

आजचे जग लोकशाही व साम्यवादी अशा दोन गटांमध्ये विभागले आहे. स्वत:चे वर्चस्व निर्माण करण्यासाठी त्या गटात विविध प्रकारची स्पर्धा सुरू असते. बदलत्या परिस्थितीनुसार लोकशाहीची वाटचाल वेगवेगळ्या दिशेने वळतांना दिसते.लोकशाहीत काही दोष असले तरी देशात शांतता, सुव्यवस्था, कायदा कायम ठेवण्यास लोकशाहीचा मार्गच स्विकारणे योग्य आहे.

## संदर्भ सूची :

1.प्रा. दि.वा. इंदापवार – 'राजकीय सिध्दांतवाद',
श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ-125.

2.प्रा. शांताराम कृ. भोगले – 'प्रमुख देशाची शासन पध्दती',
विश्वभारती प्रकाशन, नागपूर.

3.प्रा. चिं. ग. घांगरेकर – 'राज्यशास्त्राची मुलतत्वे',
श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर.

4. डॉ. अल्का देशमुख – 'भारतीय लोकशाही प्रक्रिया',
श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2014, पृष्ठ-3.

5. डॉ. प्रशांत विघे – 'लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणिसुशासन',
डॉ.धर्मेन्द्र तेलगोटे श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर.

6. डॉ. विजय देव – 'राजकीय संकल्पना आणि सिध्दांत',
डॉ.शरद गोसावी डायमंड प्रकाशन, पुणे – 2015.
डॉ. संज्योत आपटे

7. डॉ. फाडिया बी.एल. – 'राजनिती विज्ञान',
प्रतियोगीता साहित्य सिरीज',
साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा.

~~~~~~
~~~~~~

# साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध

**प्रा. प्रफुल्ल विलासराव काळे, संगीत विभाग, यशवंत महाविद्यालय, वर्धा,**

**प्रस्तावना** : साहित्य आणि संगीत यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. समाजामध्ये चालत आलेल्या सर्व चालिरीती, प्रथा परंपरा मांडणारा म्हणजे थोडक्यात साहित्य हा समाजाचा आरसा आहे. संगीत कला म्हणजे साहित्य कलेत येणाऱ्या सर्व गोष्टींची भावनिक अभिव्यक्ती होय. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानव कोणत्या ना कोणत्या मार्गाने अभिव्यक्त होण्यासाठी प्रयत्नशील आहे. भाषा जन्मापूर्वी टाळ्या वाजवणे, पशु-पक्षांचे आवाज काढणे, एका वस्तूने दुसऱ्या वस्तूवर आघात करणे अशा अनेक गोष्टींच्या सहाय्याने मानव अभिव्यक्त होत होता. त्यानंतर भाषा तयार झाली. लेखनकला अस्तित्वात आली. वेगवेगळ्या लिपी पद्धती तयार झाल्या. साहित्य निर्माण झाले. याच साहित्याला त्यात असणाऱ्या सांगीतिक गुणधर्मामुळे संगीताच्या माध्यमातून अभिव्यक्त करून त्याचा प्रगल्भ परिणाम समाजावर होतो याची प्रचिती मानवाला आली. मानवाच्या जीवनात लयबद्धता असणे अत्यंत आवश्यक आहे. लयबद्धता हि सांगीतिक संज्ञा आहे. त्या संज्ञेचा अर्थ असा की एका विशिष्ट लयीत / चालीत, स्वरात जीवन व्यतीत करणे. लय / लयतत्त्व / लयात्मकता म्हणजे त्या विशिष्ट गोष्टीला (सजीव तसेच अस्तित्वात असलेल्या प्रत्येक गोष्टीला) प्राप्त होणारा आकार होय. लयीमुळे सुबकता प्राप्त होते. साहित्य, चित्रण, शिल्प, संगीत किंवा संपूर्ण ललित कलांमध्ये लय / लयतत्त्व असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यात लय नसेल तर कोणताही रस न उत्पन्न झाल्यामुळे ती गोष्ट निरस भासते. साहित्य आणि संगीत या दोहोंमध्ये असलेला लयबद्धतेचा गुणधर्म समान आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध सविस्तर पाहणार आहोत.

**साहित्य** : साहित्याची सर्वसामान्य पद्धतीने व्याख्या करावयाची झाल्यास ती पुढीलप्रमाणे करता येईल- मानवाचे जीवन, चित्रण, विवरण, त्याभोवती घडणाऱ्या घटना अशा अनेक गोष्टींची भाषिक पद्धतीने होणारी मांडणी म्हणजे साहित्य होय. मानवी जीवनामध्ये येणाऱ्या भाव-भावना, अध्यात्म अशा विविध अंगणी घडविलेले सर्जनशील, वैचारिक, कल्पनात्मक, वास्तव अशा भिन्न-भिन्न स्तरांवरचे सर्वांगीण, सम्यक दर्शन साहित्यातून वाचकांस प्रतित होते. "Literature, in its broadest sense, is any written work. Etymologically, the term derives from Latin litaritura / litteratura "writing formed with letters," although some definitions include spoken or sung texts. More restrictively, it is writing that possesses literary merit. Literature can be classified according to whether it is fiction or non-fiction and whether it is poetry or prose. It can be further distinguished according to major forms such as the novel, short story or drama, and works are often categorized according to historical periods or their adherence to certain aesthetic features or expectations (genre)."[1] कोणत्याही साहित्यामध्ये गद्य-पद्य रचना आणि त्यांचे अनेक प्रकार असल्याचे दिसून येते. साहित्यामध्ये लेखन महत्त्वाचे आहे. "कोणत्याही लेखन परिस्थितीत तिचा खास विशेष अधिक खोलवरच्या पातळीवर अवतरत असतो."[2] सर्वप्रथम शारीरिक हालचाली तसेच विविध मार्गांचा उपयोग करून मानव आपापसात संभाषण करत असे. कालांतराने विकास होत गेला आणि भाषेची निर्मिती झाली. पुढे अजून विकास झाल्यानंतर बोली म्हणून असणाऱ्या या भाषेला लिखित स्वरुपात मांडण्यासाठी लिपी पद्धती तयार झाली आणि साहित्याची निर्मिती झाली.

**संगीत** : संगीत म्हणजे समाजाच्या आत्मिक भाव-भावना अभिव्यक्त करणारे प्रभावी साधन होय. संगीताच्या माध्यमातून अध्यात्म, आरोग्य, विज्ञान, मनोरंजन तसेच सामाजिक एकता अशा अनेक गोष्टी मानवाला साध्य करता येतात. संगीत हे चराचरात वसलेले आहे. लय आणि स्वर हे संगीताचे मुख्य घटक आहेत. यावरच संगीताचा पाया रचला जातो. संगीत म्हणजे मानवी देहातून उत्पन्न होणारी अत्यंत प्रभावी कला आहे. लयतत्त्व आणि स्वरतत्त्व यांचे दर्शन संपूर्ण ब्रम्हांडामध्ये होते. दिवसाचे प्रहर, धबधब्याच्या आवाज, पक्षांचे आवाज, नाड्यांचे तसेच हृदयाचे ठोके, रक्ताभिसरणाची प्रक्रिया अशी अनेक लयतत्त्व आणि स्वरतत्त्व उदाहरणे दैनंदिन जीवनात पाहायला मिळतात. "पं. अहोबल के अनुसार - गीतं वादित्र नृत्यानाम त्रयं संगीतमुच्यते."[3] गायन, वादन आणि नृत्य तिन्ही कलांच्या समूहाला मिळून संगीत असे म्हणतात. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या या संगीतामध्ये प्रात्यक्षिक आणि सैद्धांतिक ज्ञान असलेले अनेक सांगीतिक साहित्य / ग्रंथ याचे अनेक पुरावे सापडतात. संगीत श्रवण केल्यामुळे आजार बरे होतात. आध्यात्मिक विकास होण्यासाठी संगीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सर्वसामान्य व्यवहारांमध्ये सुद्धा सांगीतिक गुणधर्म असलेली लय अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक सजीव विशिष्ट लयीत, चालीत, स्वरात दिनचर्या व्यतित करीत असतो. दोन सजीवांमध्ये असलेले सुव्यवस्थित लयतत्त्व हे योग्य व्यवहार,संभाषण घडवते. पण जर त्यांमध्ये लयतत्व साधता आले नाही तर भांडण, तंटे उत्पन्न होतात. त्यामुळे स्वरतत्व आणि लयतत्व यांचा संगीतामध्ये तसेच दैनंदिन जीवनात असलेले महत्व दिसून येते.

**साहित्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध:** ज्याप्रमाणे साहित्यामध्ये आधी भाषेचा विकास झाला, लेखनकला विकसित झाली आणि वेगवेगळ्या लिपी पद्धती विकसित झाल्या, त्याचप्रमाणे संगीतामध्ये सुद्धा आधी गायन, वादन, नृत्य या कला विकसित झाल्या आणि मग त्यांची लिपी पद्धती विकसित होत गेली, शास्त्र विकसित होत गेले. थोडक्यात सांगायचे झाले तर कोणतीही कला आधी अस्तित्वात येते आणि त्यानंतर त्यांचे साहित्य, शास्त्र बनते.

साहित्य आणि संगीत यांचे जवळचे नाते दर्शविण्यासाठी ललित कला या घटकाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. 'ललित' या शब्दाचा अर्थ सुंदरता असा होतो. याच पद्धतीने ललित कला या सुंदरतेची अभिव्यक्ती करणाऱ्या कला होत. "ललित कला म्हणजे भावना व्यक्त व उद्दीपित करण्याकरिता स्वतंत्रपणे व विचारपूर्वक, तालबद्ध, गती किंवा ध्वनी किंवा नियमबद्ध आकृती काढण्याचे नियम पाळून केलेली आणि प्रत्यक्ष उपयोगाची दृष्टी न ठेवता केवळ चिरकालिक निरपेक्ष आनंद पुष्कळांना प्राप्त करून देण्यासाठी अधिकाधिक उत्तम केलेली, मनुष्याची उत्तम कृती होय."[4]या ललित कलांमध्ये पाच कलांचा समावेश दिसून येतो, ज्या कलांपासून उत्पन्न होणाऱ्या सौंदर्याचा परिणाम मानवी मनावर अत्यंत खोलवर होतो आणि चिरकाल टिकतो.त्या पाच ललित कला पुढीलप्रमाणे:- १)संगीत २)साहित्य ३)वास्तु ४)चित्र ५)शिल्प इत्यादी. या कलांमध्ये संगीत आणि साहित्य यांचा समावेश विशेष आहे. संगीताचा इतर प्रत्येक कलेशी घनिष्ट असा संबंध आहे. तरीसुद्धा संगीत ही कला इतर ललित कलांच्या तुलनेत सर्वश्रेष्ठ ठरते. इतर ललित कलांना कोणत्या ना कोणत्या साधनांची, माध्यमांची आवश्यकता असते. "शोपेन होवर का कहना है - केवल संगीत हि ऐसी कला है जो श्रोतओंसे सीधा संबंध राखती है. इसे किसी भी मध्यम कि आवश्यकता नही होती."[5] ललित कलांमधील चित्रण, वास्तु, शिल्प या कलांमधून जे भाव व्यक्त होत नाहीत ते साहित्यातून होतात. साहित्य कलेला सुद्धा मर्यादा आहेत. सर्व भाव-भावना पोहचविण्यासाठी साहित्याला जिथे मर्यादा येतात तिथून पुढे संगीत कला कार्यरत होते. संगीत हि अमूर्त अशी कला आहे. साहित्यातील कलाकृतीला श्रोत्यांपर्यंत पोहचविण्यासाठी त्याति भाव-भावना अभिव्यक्त करण्यासाठी संगीत ही सर्वश्रेष्ठ कला आहे. साहित्य आणि संगीत यांमध्ये समान असणारा असणारा गुण म्हणजे त्यांमध्ये असणारी लयात्मकता.कोणत्याही कलेला निरस होण्यापासून वाचवायचे असेल तर त्यात लयात्मकता असणे अत्यंत आवश्यक आहे. अक्षर, शब्द, ओळ, गद्य-पद्य या सर्वांमध्ये स्वर, लय, लयतत्त्व, लयात्मकता असणे आवश्यक आहे. हेच स्वरतत्त्व, लयतत्त्व म्हणजे संगीताचा प्राणतत्व आहे. "Music arises when irregular sounds are made regular indiscriminate sounds periodic."[6]म्हणजे सांगीतिक ध्वनी हा नित्य आणि सुव्यवस्थित असतो. संगीतामध्ये कानाला ऐकू येणारा सांगीतिक ध्वनी म्हणजे श्रुती होय. अशा २२ श्रुती संगीतात आहेत. श्रुतीला आईचा तर लयीला पित्याचा दर्जा संगीतात देण्यात येतो. यावरून संगीत आणि साहित्य किंवा इतर कोणतीही ललित कलांमध्ये लयतत्त्व अत्यंत महत्वपूर्ण आहे. साहित्यातील गद्य-पद्य अधिक परिणामकारक होण्यासाठी किंवा श्रोत्यांपर्यंत पोहचविण्यासाठी संगीत कलेची जोड असेल तर ते सांगीतिक साहित्य लोकमनावर अधिराज्य गाजविणारे ठरते. भाषा-साहित्य याला प्रांतवार रचना या दृष्टीने पाहिल्यास मर्यादा येतात. प्रत्येक राज्याची भाषा-साहित्य हे सर्वसाधारणपणे त्या त्या राज्याच्या भाषेमध्ये असते. पण ज्यावेळी साहित्य संगीतामध्ये बद्ध होते तेव्हा त्या परप्रांतीय साहित्याचा अर्थ जरी कळाला नाही तरी त्या साहित्यातील रसात्मकता संगीत कला श्रोत्यांच्या अंतर्मनापर्यंत पोहचविते. अर्थ न समजणारे

साहित्याचा गाभा संगीतातून अभिव्यक्त होतो आणि त्याच्या उलट प्रांतीय भाषा-साहित्य आणि संगीत यांच्या मिलाफातून तयार झालेली कलाकृती अजरामर होऊन मानवी मनावर राज्य करते. संतांचे साहित्य, साहित्यातील गद्य-पद्य पक्ष यांना सांगीतिक जोड मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ही गोष्ट संताना माहिती होती. याच कारणामुळे संतांनी, समाजसुधारकांनी साहित्याला गेय स्वरूप दिले म्हणजेच समाजामध्ये सर्वसामान्यांना एकत्रित करण्यासाठी, समाजसुधारणेच्या दृष्टीने साहित्य आणि संगीत यांची सांगड घालून जनजागृती करण्याचे कार्य यशस्वीपणे पार पाडले. संतसाहित्य, कीर्तन, अभंग, भजन, साहित्यातील गद्य-पद्य हे सर्व त्यांच्यात असलेल्या लयात्मकता या सांगीतिक गुणामुळे अजरामर होतात. म्हणजेच साहित्याची परिणामकारकता वृद्धिंगत करून जनसामान्यापर्यंत पोहचवून चिरकाल स्मरणात ठेवण्यासाठी संगीत ही कला आत्यंतिक महत्त्वाची भूमिका बजावत असते. वाग्गेयकार हि संकल्पना संगीतामध्ये प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. "श्रीपाद बंडोपाध्याय के अनुसार वाग्गेयकार का अर्थ है वाक अर्थात पद्य और गेय अर्थात स्वर. इन दोनो शब्दो का संयुक्त रूप हि वाग्गेयकार है."[7] सांगीतिक स्वर, लय आणि साहित्य यांचा अभ्यास असणारा व्यक्ती म्हणजे वाग्गेयकार होय. वाग्गेयकाराला शब्द, साहित्य, व्याकरण, अलंकार, छंद, रस, भाव तसेच संगीत कलेतील गायन, वादन, नृत्य, लय, स्वर, ताल, कला अशा प्रकारे साहित्यिक आणि सांगीतिक दोन्ही गोष्टींचा अभ्यास असणे आवश्यक आहे. यावरून साहित्य आणि संगीत यांचा असलेला घनिष्ट संबंध दिसून येतो.

**निष्कर्ष :**

- साहित्य आणि संगीत यांमध्ये लयात्मकता हा गुणधर्म आहे.
- साहित्य परिणामकारक होण्यासाठी संगीत महत्त्वाची भूमिका बजावते.
- साहित्य आणि संगीत यांचा घनिष्ट संबंध आहे.
- साहित्याला समाजापर्यंत पोहचवून जनजागृती करण्यासाठी संतांनी, समाजसुधारकांनी त्यांच्या साहित्याला गेय / सांगीतिक रूप दिले आहे.
- वाग्गेयकार हि संकल्पना साहित्य आणि संगीत यांमध्ये समन्वय साधते.
- साहित्य आणि संगीत यांचा मिलाप जनसामान्यांच्या चिरकाल स्मरणात राहतो.

**संदर्भ :**

8. Introduction to Literature pdf by Dench Jamie, Lumen learning and IVY tech College, 2015, page no. 1
9. रानडे अशोक, संगीत विचार, पोपुलर प्रकाशन, मुंबई, २००९, पृष्ठ क्र. १५१
10. कुमार अशोक, संगीत रत्नावली, अभिषेक पब्लिकेशन, चंडीगड, २०१८, पृष्ठ क्र. २
11. पुरोहित बळ, हिंदुस्थानी संगीत पद्धती मुलतत्त्वे आणि सिद्धांत, विजय प्रकाशन, नागपूर, २००४, पृष्ठ क्र. ३
12. वसंत, संगीत विशारद, संगीत कार्यालय, हाथरस, २०१०, पृष्ठ क्र. ५६०
13. Kumar Raj, History and Cultural series, Essays on Indian Music, Discovery Publishing House, New Delhi, 2003, page no. 22
14. कुमार अशोक, संगीत रत्नावली, अभिषेक पब्लिकेशन, चंडीगड, २०१८, पृष्ठ क्र. २९९

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारताच्या विकासात सहकारी चळवळीचे योगदान

**डॉ. श्याम सोमवंशी**
**महात्मा फुले महाविद्यालय, भातकुली जि. अमरावती**
**ईमेल आय. डी. – somwanshishyam38@gmail.com**

## प्रस्तावना :-

"भारतातील सहकारी चळवळ ही जगातील सर्वात मोठी सहकारी चळवळ असून देशातील एकूण ग्रामीण भागातील ९९% खेड्यांपर्यंत सहकारी चळवळ पोहचली आहे. विशेष पाहता जगातील विकसीत देश असो की विकसनशील असो. अशा सर्व देशामध्ये सहकारी चळवळीची भूमिका महत्वाची आहे. विकसीत देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त असले तरी समाजामध्ये आर्थिक विषमता दिसून येते (गरीब आणि श्रीमतं) आणि म्हणून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक व्यक्तींना सहाय्य करण्याच्या दृष्टीने सहकारी संस्था तिथे उपयुक्त ठरत आहे. तसेच विकसनशील देशातील लोकाचे उत्पन्न कमी असते बचतीचे प्रमाण अल्प असते त्यामुळे त्या देशात भांडवलाची मोठ्या प्रमाणात निर्मीती होऊ शकत नाही. त्यामुळे देशातील आर्थिक विकासाची गती अपेक्षेएवढी ठेवता येत नाही अशा ह्या महत्वाच्या समस्यांवर शेती मात करण्याचा एक महत्वाचा मार्ग म्हणून सहकार संस्था ठरतात आणि हा मार्ग आपल्या देशाने स्विकारला आहे.

## शेतीच्या दृष्टीने आर्थिक नियोजन :-

भारतातील ६८% जनता ही ग्रामीण भागात असून त्यांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे अशा ह्या ग्रामीण भागातील शेतीवर नियोज अवलंबून असणाऱ्या शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व्यक्तींच्या विकासासाठी, ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकाराचा अवलंब केल्याने देशाच्या विकासाला जलद गतीने चालना मिळेल हा दृष्टीकोन समोर ठेवून ग्रामीण भागात सहकारी चळवळीचा विकास, झाला पाहिजे ह्या दृष्टीने आपल्या देशात आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून सहकारी चळवळीला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे नियोजनाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीच्या विकासास प्राधान्य दिले त्यामुळे तिला एक स्वतंत्र असे महत्व प्राप्त झाले आणि भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या बेचाळीसाव्या आणि छेचाळीसाव्या कलमात असे नमूद करण्यात आले की, ग्रामीण भागात वैयक्तीक किंवा सहकारी संस्थाच्या साहाय्याने कुटीर उद्योग वाढीसाठी शासनाने प्रयत्न करावा आणि समाजातील दुर्बल घटकांच्या विशेष म्हणजे अनुसूचित जाती जमाती इत्यादीच्या आर्थिक निष्ठेची जोपासना करण्याकरीता शासनाने प्रयत्न करावा घटनेच्या त्या मार्गदर्शक तत्वाच्या पार्श्वभूमीवर विचार करता सहकारी हे सामाजिक, आर्थिक विकास व समाजीक न्याय प्रस्थापित करण्याचे एक साधन आहे आणि त्यानुसार देशातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व्यक्तीच्या शेतकऱ्याच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी नियोजनबद्ध पद्धतीने सहकारी संस्था जोमाने कार्य करीत आहे.

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :-

भारतातील सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्राचा अत्यंत महत्वाचा सहभाग आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळ 80 वर्षापासुन अस्तित्वात आहे. भारतीय सहकारी चळवळीला योग्य दिशा देण्याचे मोलाचे कार्य महाराष्ट्राने केलेले आहे असे म्हटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही. महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा विकास घडवुन आणण्यासाठी वैकुंठलाल मेहता, डॉ. धंनजयराव गाडगीळ, पद्मश्री विखे पाटील, विठ्ठलदास ठाकरसी, आर. जी. सरैय्या, वामनराव वर्दे, डॉ. डी. जी. कर्वे, तात्यासाहेब केळकर यांच्या सारख्या समाज सुधारक प्रगतीशील उद्योगपति आणि व्यापारी व्यक्तिचे समर्थ नेतृत्व सहकारी चळवळीस लाभले यांच्या प्रयत्नातुन अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर, लोणी येथील सहकार क्षेत्रातील देशातील पहिला साखर कारखाना 1948 साली काढण्याचे श्रेय महाराष्ट्र राज्यास मिळाले.

**भारताचे नवीन आर्थिक धोरण :-**

भारताचे नविन आर्थिक धोरणाचा अवलंब केल्या पासूनमध्ये १९९१ पासून जागतीकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या आर्थीक धोरण पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला वाव दिला आहे घ्या प्रत्यक्ष थेट परकीय गुंतवणूकीमुळे सहकार क्षेत्रावर उद्योगावर काही चांगले आणि काही वाईट परिणाम सुद्धा दिसून येताहेत परंतु सध्याच्या खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी संस्थेची गरज ही अत्यंत महत्वाची आहे अलीकडच्या काळात जागतीक आर्थिक पेच प्रसंगाला तोड देण्याची ताकद सहकारी संस्थेमध्ये आहे ती सक्षम आणि टिकाऊ आहे.

**सहकार चळीवळीचे लाभ :-**

**कमी व्याजाने कर्ज पुरवठा :**

पूर्वी कर्ज पुरवठा सावकार करत असत. त्यांच्या व्याजाचा दर 25 टक्के पासून से 100 टक्के पर्यंत होता, त्यामुळे होतकरी कर्जबाजारी राहत, आज सहकारी पतसंस्थेमार्फत कर्जवाटप केले जाते. त्या व्याजाचा दर 12 ते 14 टक्के आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक थांबण्यास मदत झाली.

**आधुनिक पध्दतीने शेती :**

आधुनिक बी-बीयाणे, अवजारे, तंत्रज्ञान, इ. सहकारी संस्थामार्फत शेतकऱ्यांना मिळतात. शेतमालाला योग्य भाव मिळतो. त्यांचा माल सरकार विकत घेते. षेतमाल साठवण्याची सहकारी सोय आहे. त्यामुळे मालाची नासधूस होत नाही. पूर्वी बैलजोडी नसल्याने शेत-नांगरणी थांबत होती. आता शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने शेती करता येते.

**ग्रामीण नेतृत्वात वाढ** :

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या पसरल्या आहेत. या लोकाशाहीच्या तत्वावर आधारीत आहे "एक व्यक्ती एक मत" या तत्वामुळे ग्रामीण नेतृत्वात वाढ झाली आहे.

**अल्प उत्पन्न गटातील लोकांना मदत :**

कर्ज उपलब्ध झाले आहे. त्यामुळे जमीन घेणे, घर बांधणे, जोडधंदे करणे, आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर करणे शक्य झाले आहे. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांच्या विकसात हातभार लागला.

**रोजगारीत वाढ :**

सहकारी संस्थाच्या निर्मितीमुळे आजूबाजूच्या परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला. त्यामुळे बेकारी कमी होऊन अनेकांचे आर्थिक प्रश्न सुटण्यास मदत झाली. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक व्यावसायाच्या अवतीभोवती रहायला लागले.

**लोकांच्या गुणवत्तेत वाढ :**

सहकारी संस्थामुळे शेतकऱ्यांना शिक्षण मिळायला लागले. त्यामुळे त्यांच्यात चांगल्या सवयी आणि चांगल्या गुणांची जोपासना होण्यास मदत झाली. अनाठायी खर्चाला आळा बसला. लोकांमध्ये बचतीची सहकार्याची भावना वाढीस लागली.

**अन्नधान्याची नासाठी थांबली :**

धान्य ठेवण्यासाठी गोदामांची सोय झाली. फळे साठविण्यासाठी शीतगृहे निर्माण झाली. खरेदी - विक्रि योग्य प्रमाणात झाली वाहतूक व्यवस्थेत वाढ झाली. त्यामुळे पूर्वी अन्नधान्याची होणारी नासाडी थांबली उदा. दुध बारा तासात विकण आवश्यक असते. मात्र आता सहकारी दुग्ध संस्थातून विशिष्ट प्रक्रियेच्याद्वारे ते साठवून विकते जाते.

**सहकारी चळवळीच्या समस्या :**

१. सहकारी चळवळीत उत्स्फूर्त पुढाकाराचा अभाव दिसून येतो.
२. मोठया प्रमाणात असलेली निरक्षर जनता मूलभूत सहकारी तत्वाबाबत अज्ञानी असल्याचे आढळते.
३. थकबाकी वसुलीचा प्रश्न ही एक मोठी व गंभीर समस्या आहे. त्यामुळे अनेक प्राथमिक पतसंस्था धोक्यात आल्या आहेत.
४. सहकारी क्षेत्रासाठी प्रामाणिक, निष्ठावंत व सामाजिक जाणीव असलेले बिनराजकिय नेतृत्व आढळत नाही.
५. सहकारी चळवळीमध्ये शिखर व संघ संस्था या 'पालक संस्था' आहेत सदस्य संस्थांच्या विकासाची संपूर्ण जबाबदारी या शिखर व संघ संस्थाकडे असते, पण प्रत्यक्षात या संस्था आपल्या सदस्य संस्थांच्या आर्थिक हिताकडे दुर्लक्ष करतांना आढळून येतात.
६. अकार्यक्षम व्यवस्थापन असल्यामुळे बऱ्याच वेळा अध्यक्ष व कार्यवाह यांच्याकडे अधिकाराचे केंद्रीकरण होते.
७. अपुरे भांडवल सहकार क्षेत्रातील एक मोठी समस्या आहे त्यामुळे काही सहकारी संस्था आर्थिकदृष्टया दुर्बल बनल्या आहेत.
८. सदोष कर्जव्यवहारचे प्रमाण जास्त असल्यामुळे कर्जाचा दुरूपयोग व थकबाकीचे प्रश्न निर्माण होतात.
९. हे सहकारी चळवळ अयशस्वी होण्याच्या कारणांमध्ये सदोश देखरेख व नियंत्रण-व्यवस्था हे एक कारण महत्वाचे ठरते.

**निष्कर्ष :-**

आपल्या देशामध्ये सहकारी चळवळीची भूमीका ही अत्यंत महत्वाची असून देशाच्या विकासाच्या दृष्टीने कार्य करीत आहे. आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या उत्पादनात वाढीसाठी महत्वाची भूमिका बजावत असतांना आजच्या 6 आधुनिक जागतिकीकरणाच्या स्थितीत सहकारी संस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली असली तरी तिला चांगले भवितव्य असून जागतिकीकरणाच्या

आव्हानाचा मुकाबला करून उपलब्ध संधीचा लाभ घेऊन आपले महत्वाचे उद्दीष्ट पार पाडतील आणि देशात आर्थिक व सामाजीक विकासात महत्वाची भूमिका बजावतील यात तीळ मात्र शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) डॉ. रूपा शहा, डॉ.बी. जी. दामजी, सहकाराचा विकास फडके प्रकाशन, कोल्हापूर जून २००५

२) डॉ. वाळके, डॉ. भोर, डॉ. बारहाने, डॉ. मोरे, सहकार, सेठ प्रकाशन केंद्र ठाणे, मे २००७

३) प्रा. चौगुने, प्रा. पठाण, सहकाराची मुलतत्वे कॅन्टीनेन्टल प्रकाशन पुणे १९८०

४) अर्थ संवाद, त्रैमासिक जाने-मार्च २०११

५) अर्थ संवाद, त्रैमासीक जुलै-सप्टे. २०१३, ऑक्टो-डिसे. २०१३

६) डॉ. तुके सहकारचे सिद्धांत आणि इतिहास, द्वारका प्रकाशन, पुणे ऑक्टो. १९९२

७) डॉ. पाटील, व्हि. बी. सहकाराचा इतिहास व सिध्दांत - के. सागर पब्लीकेशन 2007

८) सहकारी व्यवस्थापन प्रा.कुलकर्णी.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या श्रमिक उत्थानविषयक योजना ; एक दृष्टीक्षेप

प्रस्तावना : डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधूनिक भारताचे शिल्पकार आहेत. त्यांचे उत्तुंग कार्य देशाच्या जडणघडणीत अतिषय मोलाचे ठरले आहे. देशाची राज्यघटना लिहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कर्तृत्वाच्या ठशाची अमिट छाप देशाच्या इतिहासावर उमटविली आहे. अर्थतज्ज्ञ, जलउर्जातज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, इतिहासकार, समाजशास्त्रज्ज्ञ, मुरब्बी नेते, ग्रंथकार, प्राध्यापक, परराष्ट्र धोरणकर्ते, कायदेपंडित, कृषितज्ज्ञ, संरक्षणतज्ज्ञ, मजुरांचे कैवारी, झुंझार संपादक, कृतिशील वक्ते, वकिल, धर्मसुधारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे भाग्यविधाते ठरले आहेत.

## विषयाची मांडणी :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या उभारणीत अतिषय महत्वाचे योगदान आहे. दलितोद्धार व संविधान निर्मितीसोबतच गोरगरिब कष्ठकऱ्यांशी निगडीत कामगार चळवळीतील त्यांचे कार्य उल्लेखनिय राहिले आहे. ब्रिटीश सरकारमध्ये मजूरमंत्री म्हणून त्यांनी लाखो कामगारांच्या उज्वल भविष्याचा पाया रचला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची तत्कालीन ब्रिटीश सरकारने सुद्धा विशेष दखल घेतली होती.

## *श्रमिकांप्रती सरकारचे उत्तरदायित्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, श्रमिकांना योग्य तो मोबदला दिला पाहिजे. श्रमिकांकरीता योग्य श्रममूल्य आणि सेवाशर्ती निर्धारित करण्याचे कर्तव्य तथा श्रमिकांचे उत्तरदायित्व स्वतः सरकारने स्विकारावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रम संमेलन व स्थायी श्रम समिती या दोन यंत्रणांची स्थापना केली आहे.

## *संसदीय लोकशाही व श्रमिक वर्ग

डॉ. आंबेडकर यांच्या मते, सर्व राजकिय संस्था दोन वर्गात विभाजित झाल्या आहेत. एक वर्ग शासनाचा आणि दुसरा वर्ग शोषितांचा. श्रमिकांनी शासन यंत्रणेवर ताबा मिळविण्याची आवश्यकता आहे.

## *कामगार युनियनला मान्यता

मजूरमंत्री असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ नोव्हेंबर १९४३ रोजी भारतीय श्रमिक संघटना (सुधारणा) बिलावरील केंद्रीय विधीमंडळातील चर्चेनूसार, कामकार युनियन किती महत्वाची आहे हे मांडले.

त्यानूसार, केंद्र सरकारने कामगार संघटनांचे नवे विधेयक बनविले व अशा संघटनांना मान्यता प्रदान केली.

## *कोळसा खाणीतील स्त्री-कामगारांचा प्रश्न

भूमिगत कोळसा खाणीत स्त्री कामगारांना प्रतिबंध करण्याबाबत निर्णय काढून टाकण्याविषयी केंद्रीय विधीमंडळात १९४४ मध्ये सांगोपांग चर्चा करण्यात आली. डॉ. आंबेडकरांच्या मते, पूरूष कामगारांना मजुरीचा जो दर दिला जातो, तोच दर स्त्री कामगारांनाही दिला जाईल, याची दक्षता सरकारने घेतली असून ही बाब अत्यंत महत्वाची आहे. स्त्री-पूरूषांना समान वेतन हे महान तत्व प्रथमच स्विकारण्यात आले आहे.

## *भारतातील मजूरांची परिस्थिती

मार्च १९४४ मध्ये डॉ. आंबेडकरांनी शासनाचे मजूर धोरण जाहीर केले. मजूरांच्या नेमणूकीच्या अटी निश्चीत करण्याची जबाबदारी यावेळी सरकारने स्विकारली.

## *मजूरांकरिता राखीव जागा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, भारताच्या राज्यघटनेत कामगारांचे जे विशेष हक्क नमूद केले जातील त्यात राजकिय हक्कांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. मध्यवर्ती कायदेमंडळात ५० टक्के व प्रांतिक कायदेमंडळात ३० टक्के जागा राखून ठेवल्या पाहिजेत.

## *कामगारांच्या पगारी सुट्या

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या पगारी सुट्यांविषयीचे परखड मत मांडले. पगारी सुट्यांचे त्यांनी चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे. अ. सुट्यांची संख्या ब. सुट्टी मिळवण्याचा हक्क कसा प्राप्त होतो क. सुट्यांवरील मर्यादा ड. सुट्टीच्या काळातील पगार

## *सरकारची श्रमिकांप्रतीची कर्तव्ये

२६ नोव्हेंबर १९४५ रोजी भारताचे मजूरमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नवी दिल्ली येथे आयोजित ७ व्या श्रमिक परिषदेचे अध्यक्षपद स्विकारले. ही परिषद पुढे भारतीय श्रमिक परिषद म्हणून संबोधली गेली. या परिषदेत त्यांनी सरकारच्या श्रमिकांप्रती असलेल्या कर्तव्याचा ताळेबंद सादर केला.

## *कामगारांना संपाचा अधिकार

कामगार कल्याणाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिषय कळकळ होती. म्हणून त्यांनी कामगारांना सं

पाचा अधिकार दिला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रमिक उत्थानासाठी आखलेल्या योजना**

१. रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाची स्थापना (employment exchange)

२. कर्मचारी राज्य विमा (employees state insurance)

३. श्रमीकांचे कामाचे तास १२ वरून ८ करणे (working hours 12 to 8)

४. महिलांना प्रसुती व बालसंगोपन अवकाश (maternity leaves)

५. कामगार संघटनांना मान्यता (compulsory recognisation for trade union)

६. महागाई भत्ता (dearness allowance DA)

७. पगारी सुट्या (paid holidays)

८. कायदेशीर उपोषणाचा अधिकार (legal strike act)

९. आरोग्य विमा (health insurance)

१०. भविष्य निर्वाह निधी (provident fund)

११. श्रमीक कल्याण कोष (labour welfare fund)

१२. श्रमिकांसाठी तांत्रिक प्रशिक्षण योजना (technical training scheme for labour)

१३. श्रमीक आयोगाची स्थापना (establishment for labour comission)

वरील योजना आखून बाबासाहेबांनी यथोचित अमलबजावणी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सदैव तत्पर राहिले.

**संशोधनाची उदिष्ठ्ये :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या श्रमिक धोरणाचा अभ्यास करणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या श्रमिकांच्या जीवनशैलीत सुधारणा घडविणाऱ्या व्यापक दृष्टीकोनाची

समीक्षा करणे.

३. श्रमिक उत्थानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आखलेल्या विविध कल्याणकारी योजनांची चिकित्सा करणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगार हितार्थ योजनांची प्रासंगिकता तपासणे.

५. श्रमिकांना पेन्शन, भत्ते, सुट्या, भविष्यनिर्वाह निधी, मजूर कल्याण कोष व कामाचे तास आदी योजनांचे सखोल अध्ययन करणे.

## गृहितके (hypothesis)

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे श्रमिक उत्थानविषयक धोरण व ध्येय ही कामगारांचे समग्र जीवनमान उचांवणारी होती.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अभूतपूर्व परिश्रम घेत श्रमिकांना त्यांचे सनदशीर हक्क मिळवून दिले.

३. श्रमिकांचे कामाचे तास कमी करून समान वेतन व सुविधा दिल्याने त्यांना न्याय मिळाला.

४. श्रमिकांना उपोषणाचा हक्क व नियमित सुट्या आणि भविष्यनिर्वाह निधी योजना लागू करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या उज्वल भविष्याची मूहूर्तमेढ रोवली.

५. श्रमिकांचे आरोग्य उत्तम राहावे म्हणून विशेष कामगार रूग्णालये स्थापन करणे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतीकारी निर्णय आजही परिस्थितीसापेक्ष आहे.

६. स्त्री-पूरूषांना समान वेतन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महान तत्व श्रमिकांमधील भेदभाव मोडित काढण्यात मैलाचा दगड सिद्ध झाले आहे.

७. श्रमिकांना सामाजिक सुरक्षीतता आणि विधीमंडळात प्रतिनिधीत्व देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले प्रयत्न मोलाचे आहेत.

संशोधक

अरविंद बाबूराव हटकर

अर्थशास्त्र विभाग,

डॉ. बा. आ. म. वि. औरंगाबाद.

---------------------------------

## संदर्भ ग्रंथ सूची

१. समग्र बाबासाहेब - आवृत्ती मार्च २०१६ - लेखक - बाळासाहेब मगाडे

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे व खंड, महाराष्ट्र शासन

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतातील दारिद्रय निर्मूलन

प्रा.डॉ.मनिषकुमार काशिनाथ कायरकर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला वाणिज्य महिला महाविद्यालय,बल्लारपूर

## सारांश

दारिद्रयाची समस्या ही एक प्रमुख व तितकीच गंभीरतेने चिंतन करायला लावणारी समस्या आहे. भारतात दारिद्रयाचा प्रश्न हा सातत्याने चिंतेचा व चिंतनाचा विषय राहिला आहे. गेल्या दोन वर्षातील कोव्हिड १९ या महामारीमुळे तर दारिद्रयचा प्रश्न हा आणखीनच गंभीर झाला असून या महामारीच्या काळात दारिद्रय रेषेखालील लोकांच्या संख्येत अंदाजे १५०—१९९ मिलीयन लोकांची अधिकची भर पडण्याचा अनुमान आहे. दारिद्रय ही अशी अवस्था आहे, ज्या अवस्थेत बहुसंख्य लोकांना आपल्या अन्न,वस्त्र,निवारा यासारख्या जीवनावश्यक गरजासुध्दा पूर्ण करता येत नाही. दारिद्रय हेच दारिद्रयाचे कारण व परिणाम असल्यामुळे एखादया समाजाच्या व देशाच्या वाटयाला आलेले दारिद्रय हे एखाद्या दुष्टचक्राप्रमाणे असते. दारिद्रय ही एक आर्थिक व सामाजिक घटना असून तिचा विषमतेशी संबंध असलेला दिसून येतो. दारिद्रयाचा मानवाच्या आरोग्यावर, कार्यक्षमतेवर, उत्पादकतेवर व पर्यायाने उत्पन्नावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे दारिद्रयाचे निमूर्लन ही अनिवार्यता बनली आहे. दारिद्रय निर्मूलनाच्या संदर्भातील प्रयत्नांमुळेच १९९३—९४ ते २०११—१२ या काळात भारतातील दारिद्रयाचे प्रमाण हे ४५.३ टक्क्यांवरून २१.९ टक्क्यांवर आले आहे. यात ग्रामीण भागातील दारिद्रयाचे प्रमाण ५०.१ टक्क्यांवरून २५.७ तर शहरी भागातील ३१.८ वरून १३.७ टक्क्यांपर्यंत घटले आहे. तेंडूलकर समितीच्या अंदाजानुसार भारतात १९९३ ते २००४ या काळात दारिद्रयाचा दर हा १७.८९ टक्क्यांपर्यंत तर २००४ ते २०११ या काळात ४१.१३ टक्क्यांपर्यत कमी झाला. SDG India Index Baseline Report 2018 प्रमाणे सन २०११ मध्ये भारताची २१.९२ टक्के लोकसंख्या ही दारिद्रय रे ेखाली होती. प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील दारिद्रयाची स्थिती, कोरोना महामारीचा दारिद्रयावर होणारा परिणाम आणि दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम याबाबत अध्ययन करण्यात आले आहे.

बिजसंज्ञा : दारिद्रय, विषमता, कोव्हिड १९ महामारी, दुष्टचक्र, दारिद्रय निर्मूलन

---

**प्रस्तावना :**

आज जगाला ज्या अनेक समस्यांनी त्रस्त केले आहे त्यात दारिद्रयाची समस्या ही प्रमुख समस्या आहे. भारत सुध्दा यापासून अलिप्त नाही. अगदी प्राचिन काळापासून आतापर्यंत भारतात दारिद्रयाचे अस्तित्व सातत्याने अनुभवले गेले आहे. दारिद्रय ही अशी अवस्था आहे की, ज्या अवस्थेत मानवाला आपल्या अत्यावश्यक गरजा भागविणे सुध्दा कठिणप्राय होऊन बसते. प्रतिव्यक्ती उत्पन्न,खर्च व राहणीमान हे दारिद्रयाचे निर्देशक घटक आहेत. '' ज्या अवस्थेत समाजातील काही घटकांना अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण,आरोग्य यासारख्या जीवनावश्यक वस्तू मिळविणे अशक्य होते ती अवस्था दारिद्रयाची असते.''

भारतीय नियोजन मंडळाने ६ व्या पंचवार्षिक योजनाकाळात दारिद्रयाची व्याख्या करतांना म्हटले आहे की, ज्या व्यक्तीस ग्रामीण भागात प्रतिदिन प्रतिमाणसी किमान २४०० उ मांक आणि शहरी भागात प्रतिदिन प्रतिमाणसी किमान २१०० उष्मांक प्राप्त होत नाही ती व्यक्ती दारिद्रयात आहे असे समजावे.

प्रसिध्द भारतीय अर्थतज्ञ डॉ.अमर्त्य सेन यांच्यामते '' एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय.''

जागतिक बँकेच्या निकषाप्रमाणे ''प्रतिव्यक्ती प्रतिदिन एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्न प्राप्त करणाऱ्या व्यक्तीस दारिद्रयरे ेखालील व्यक्ती समजावे.''

एकूणच सुस्थितीपासून पूर्णपणे वंचित असण्याची स्थिती म्हणजे दारिद्रय होय. दारिद्रय हे कोणत्याही देशाच्या प्रगतीला मारकच असते. दारिद्रयात खितपत पडलेली जनता ही सुख व समाधान यापासून वंचित असते.'' ज्या समाजातील बहुसंख्य सदस्य हे गरीब व दयनीय अवस्थेत असतात तो समाज संपन्न व आनंदी असूच शकत नाही.''(ॲडम स्मिथ १७७६) दारिद्रय आणि विषमता यांचा अतिशय जवळचा संबंध असून वर्तमान काळात वि मतेत वाढ होत असल्याचे दिसून येते. एका अभ्यासानुसार जगातील ८० टक्के लोकसंख्या ही अशा देशात वास्तव्याला आहे जिथे उत्पन्नातील विषमता फार अधिक आहे. जगातील अतिगरीब अशा ४० टक्के लोकांच्या वाटयाला जागतिक उत्पन्नाचा केवळ ५ टक्के हिस्सा असून अतिश्रीमंत अशा केवळ २० टक्के लोकांकडे जागतिक उत्पन्नाचा ७५ टक्के वाटा केंद्रित झाला आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील दारिद्रय आणि दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम याविषयी चर्चा केली असून हा शोधनिबंध दुय्यम माहितीवर आधारित आहे. विषयाशी संबंधित दुय्यम साधनसामुग्री ही विविध मार्गाने मिळविली आहे. यामध्ये आर्थिक पाहणी अहवाल,रिझर्व बँकेचा अहवाल,निती आयोगाचा अहवाल, वेबसाईट वरील विविध लेख, संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके इत्यादींचा उपयोग केलेला आहे.

**भारतातील दारिद्रयाचे मापन व दारिद्रयाची रेषा :**

स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ.दादाभाई नौरोजी यांनी आपल्या "Poverty and Un-British Rule in India" या पुस्तकात १८६७—६८ च्या किंमतींच्या आधारे दारिद्रय रेषेबाबतचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला. स्थलांतरित कुलींसाठी त्यांच्या प्रवासादरम्यान आवश्यक आहाराच्या खर्चावर आधारित हा अंदाज होता,ज्यात १६ रूपये ते ३५ रूपये प्रतिव्यक्ती प्रतिवर्ष हे खर्चाचे प्रमाण लक्षात घेतले होते. १९३८ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय नियोजन समितीने १५ ते २० रू.प्रतिव्यक्ती प्रतिमहिना हे प्रमाण ठरविले. भारतात प्रथमत: १९७९ मध्ये टास्क फार्सच्या शिफारशीनुसार ' किमान गरजा आणि प्रभावी उपभोग्य मागणी' यावर आधारित 'दारिद्रय रेषा' ही संकल्पना मांडण्यात आली. टास्क फोर्स द्वारा वय,लिंग आणि कार्य या आधारावर शहरी व ग्रामीण भागासाठी आवश्यक असलेल्या उष्मांकाबाबत तज्ञांच्या मार्गदशनानुसार प्रमाण निश्चित करून दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण ठरविले जाते. यानुसार ग्रामीण भागाकरिता २४०० तर शहरी भागाकरिता २१०० उष्मांकाचे प्रमाण निश्चित केले असून या पेक्षा कमी उष्मांक प्राप्त करणाऱ्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात केला जातो.

'जागतिक बहुआयामी दारिद्रय निर्देशांक'(Global Multidimentional Poverty Index) नुसार भारताचा त्या चार देशांमध्ये समावेश केला जातो ज्या देशानी MPI चे मुल्य अर्ध्यावर आणले आहे. सन २००६ ते २०१६ या कालावधीत भारतात बहुआयामी गरिब लोकांच्या संख्येत लक्षणीय घट झाली. गेल्या दहा व ांच्या काळात अंदाजे २७३ मिलीयन लोक या गरिबीतून वर आले आहेत. जगातल्या जवळपास १०० देशांमध्ये MPI च्या आधारे दारिद्रयाचे मापण केले जाते. शिक्षण,आरोग्य आणि राहणीमान या तीन आयामांच्या अंतर्गत शालेय शिक्षण, मुलांची नोंदणी, बालमृत्यू, पोषण, विज, पिण्याचे पाणी, स्वच्छता, निवारा, स्वयंपाकाकरिता इंधन, मालमत्ता अशा दहा निर्देशकांच्या आधारे MPI चे मापन केले जाते. GMPI 2020 अहवालानुसार जगातील १०७ देशामध्ये भारत हा ०.१२३ या MPI गुणांकासह ६२ व्या क्रमांकावर होता. भारतातील २७.९ टक्के लोकसंख्या ही बहुआयामी दारिद्रयात असलेली दिसून आली. ज्यापैकी ३६.८ टक्के ही ग्रामीण तर ९.२ टक्के ही शहरी लोकसंख्या आहे. अर्थातच भारतातील विविध राज्यांमध्ये याबाबत बरीच विविधता दिसून येते.

भारतात नियोजन आयोगाच्या (आता निती आयोग) माध्यमातून दारिद्रयवि यक आकडेवारी जाहीर केली जाते. सन २०११—१२ करीता नियोजन आयोगाने तेंडूलकर दारिद्रय रेषेवर आधारित गरिबीची आकडेवारी जुलै २०१३ मध्ये जाहीर केली आहे. भारतातील दारिद्रयाबाबतचा अंदाज वेळोवेळी गठीत केलेल्या अभ्यास समितींनी/आयोगांनी वेळोवेळी जाहीर केला आहे.

**भारतातील दारिद्रयाची प्रवृत्ती :**

भारतातील दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्यासाठी पंचवार्षिक योजनांमध्ये विविध कार्यक्रम राबविण्यात आले तथापी अजूनही भारतातील दारिद्रयाचे प्रमाण बरेच आहे.

तालिका क्र.१

**भारतातील दारिद्रयाचे प्रमाण (तेंडूलकर पध्दती प्रमाणे)**

| वर्ष | दारिद्रयाचे प्रमाण % | | | गरीबांची संख्या लाखात | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण % | ाहरी % | एकूण % | ग्रामीण | ाहरी | एकूण |
| १९९३—९४ | ५०.१ | ३१.८ | ४५.३ | ३२८९.६ | ७४६.५ | ४०३६.१ |
| २००४—०५ | ४१.८ | २५.७ | ३७.२ | ३२६६.६ | ८०७.६ | ४०७४.२ |
| २००९—१० | ३३.८ | २०.९ | २९.८ | २७८२.१ | ७६४.७ | ३५४६.८ |
| २०११—१२ | २५.७ | १३.७ | २१.९ | २१६६.६ | ५३१.२ | २६९७.८ |

स्त्रोत : निती आयोग

तालिकेवरून असे दिसून येते की, गेल्या काही दशकांमध्ये भारतातील दारिद्रयाच्या प्रमाणात घट होत आहे. १९९३—९४ या व ाात भारतातील दारिद्रयाचे प्रमाण ४५.३ टक्के होत ते २०११—१२ मध्ये २१.९ टक्क्यांपर्यंत कमी झालेले आहे. तेंडूलकर पध्दतीप्रमाणे १९९३—९४ ते २०११—१२ या काळात दारिद्रयात घट होण्याचे प्रमाण हे प्रतिव ाि १.३ टक्के असे राहिले आहे.

**कोव्हिड १९ महामारी व दारिद्रयातील वाढ :**

कोव्हिड १९ या जागतिक महामारीचा संपूर्ण जगाबरोबरच भारतीय अर्थव्यवस्थेवरही परिणाम जाणवू लागला आहे. या महामारीच्या काळात केल्या गेलेल्या टाळेबंदीमुळे मागणी अभावी अनेक उद्योग,व्यवसाय,व्यापार बंद पडले.परिणामत: अनेकांचा रोजगार हिरावला गेला. रोजगाराअभावी उपासमारीची वेळ अनेकांवर आली. बेरोजगारीच्या प्रमाणात पर्यायाने गरिबांच्या संख्येतही मोठया प्रमाणात वाढझाली. ज्या GDPतील दरवाढीमुळे दारिद्रयाच्या प्रमाणात घट झाली त्याच दारिद्रयात कोरोनामुळे वाढझाल्याचे दिसून येते. अमेरिकेतील प्यू रिसर्च सेंटरने प्रकाशित केलेल्या अहवालात असे म्हटले आहे की, कोरोना महामारीमुळे भारतातील जवळपास ३ कोटी २० लाख लोक हे मध्यमवर्गीयातून बाहेर फेकले गेले आहे. जवळपास ७ कोटी ५० लाखाने गरिबांच्या संख्येत वाढझाल्याचेही या अहवालात म्हटले आहे.

**पंचवार्षिक योजनांमध्ये दारिद्रय निर्मूलनाचे प्रयत्न :**

दारिद्रय निर्मूलन हा प्रत्येकच पंचवा िक योजनेचा भाग राहिला आहे. भारतातील दारिद्रयाबाबत गंभीरपणे विचार करायला १९६० —६१ च्या सुमारास सुरूवात झाली. चौथ्या पंचवार्षिक योजनेत जलद आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायावर भर देतांना ‘गरीबी हटाव’ ची घो ाणा देण्यात आली. पाचव्या योजनेत ‘किमान गरजा कार्यक्रम’ राबविण्यात आला. यात गरिबांच्या किमान गरजा निश्चित करून देशातील दारिद्रय निर्मूलनाचा ठोस प्रयत्न करण्यात आला. सहाव्या योजनेत तर दारिद्रय निर्मूलन हा योजनेचा मुख्य गाभाच होता. लोकांचे जीवनमान उंचावणारे अनेक कार्यक्रम या योजनाकाळात राबविण्यात आले. उत्पन्न व संपत्ती यातील वृध्दीबरोबरच त्याच्या समान वितरणावरही लक्ष केंद्रित करण्यात आले. हे सर्व कार्यक्रम सातव्या योजनेतही सुरू ठेवण्यात आले. या काळात NREP,RLEGP,IRDP सारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्यात आली. आठव्या योजनेत जवाहर रोजगार योजना,पंतप्रधान रोजगार योजना यासारख्या योजनांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व पर्यायाने दारिद्रय निर्मूलनावर भर देण्यात आला. पुढेही १२ पंचवार्षिक योजनेपर्यंत अशाच विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती,जीवनमान उंचावणे,दारिद्रयाचे प्रमाण कमी करणे यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले.

**भारतातील दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम :**

भारतातील दारिद्रय निर्मूलनाच्या संदर्भात वेळोवळी वेगवेगळया योजना अंमलात आणून दारिद्रयाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न सातत्याने झाला आहे. सध्या राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान,एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम तसेच महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना आदी योजनांसह जवळपास १८ सरकारी योजना कार्यान्वित आहेत. दारिद्रय निर्मूलन, उपजीविकेची साधने तसेच किमान वेतन असणाऱ्यांना रोजगार संधी उपलब्ध करून देणे ही त्यांची प्रमुख उद्दिष्टये आहेत. या योजना दारिद्रय निर्मूलनाच्या कार्यक्रमाशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संबंधित आहेत.

**१) म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :**

२ फेब्रुवारी २००६ पासून ही योजना संपूर्ण देशाकरिता लागू करण्यात आली. संपूर्ण वर्षभरात ग्रामीण भागात अकुशल श्रमिकांना किमान १०० दिवसाच्या रोजगारीची हमी देऊन त्यांची क्रयशक्ती वाढविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. यातून लोकांचे राहणीमान सुधारण्यास तसेच गरीब व श्रीमंत यातील दरी कमी करण्यास मदत होईल ही अपेक्षा आहे. या योजनेच्या माध्यमातून अनेकांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. या योजनेंतर्गत २०१६—१७ मध्ये ५८०६३ कोटी रूपये तर २०१७—१८ मध्ये ६४२८० कोटी रूपये खर्च झाले.यामध्ये मजुरीवर झालेल्या खर्चाचे प्रमाण अधिक आहे.

**२) दिनदयाल अंत्योदय योजना— राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

ही योजना म्हणजे १९९९ मध्ये सुरू करण्यात आलेल्या स्वर्णजयंती रोजगार योजनेचे बदललेले रूप आहे. सन २०११ मध्ये स्वर्णजयंती रोजगार योजनेचे 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती' असे नामकरण करण्यात आले. पुढे याचे दिनदयाल अंत्योदय योजनेत विलीनीकरण करण्यात आले. गरिबांना कौशल्यविषयक प्रशिक्षण देऊन शेती क्षेत्रातील गरीब श्रमिकांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे व त्यांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**३) दिनदयाल अंत्योदय योजना— राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती अभियान :**

२४ सप्टेंबर २०१३ रोजी सर्व जिल्हयाच्या मुख्यालयी आणि २०११ च्या जनगणनेप्रमाणे १ लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व शहरामध्ये ही योजना लागू करण्यात आली. १९९७ साली सुरू झालेली केंद्रसरकार पुरस्कृत स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना या योजनेत विलीन करण्यात येऊन दिनदयाल अंत्योदय योजना— राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती अभियानअसे नामकरण करण्यात आले. प्रामुख्याने शहरी भागातील बेराजगार युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**४) प्रधानमंत्री आवास योजना :**

केंद्रसरकारद्वारा २२ जून २०१५ रोजी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे २०२२ पर्यंत प्रत्येक व्यक्तीला त्याचे स्वतःचे घर उपलब्ध करून देणे हा आहे. आर्थिकदृष्टया कमकुवत आणि मध्यमवर्गीय तसेच ज्यांच्याकडे स्वतःचे घर नाही अशांना या योजनेचा फायदा होणार आहे. या योजनेअंतर्गत जवळपास २० दशलक्ष स्वस्त घरांच्या निर्मितीचे लक्ष आहे. या योजनेअंतर्गत ९ जून २०२१ रोजी ११२.४ लक्ष घरांच्या निर्मितीला मंजुरी दिली असून यापैकी ८२.५ लक्ष घरांच्या निर्मितीला प्रत्यक्ष सुरूवात करण्याची तयारी करण्यात आली आहे. PMAY(G) योजनेंतर्गत ग्रामीण भागात २०१६—१७ ते २०१८—१९ या वर्षामध्ये ३२७५५२ घरांचे बांधकाम करण्यात आले. ज्याकरिता एकूण ५५६.३८ कोटी रूपयांचा खर्च झाला. २०१९—२० या आर्थिक वर्षात ३४०० कोटी रूपये खर्च करून २ लाख घरांच्या निर्मितीचे लक्ष्य होते.

**५) राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम :**

१५ ऑगस्ट १९९५ ला राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत गरीबांकरिता सामाजिक सहाय्यता करण्यासाठी एक राष्ट्रीय धोरण ठरविण्यात आले. केंद्रसरकार पुरस्कृत या योजनेत सामाजिक पेन्शनच्या स्वरूपात वृध्द,विधवा,दिव्यांग व्यक्तीस आर्थिक सहाय्यता प्रदान केली जाते. वर्तमानात या कार्यक्रमांत इंदिरा गांधी राष्ट्रीय

वृध्दावस्था पेंशन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेंशन योजना,इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेंशन योजना, राष्ट्रीय पारिवारीक लाभ योजना तसेच अन्नपूर्णा योजना समाविष्ट आहे.

**६) प्रधानमंत्री जनधन योजना :**

केंद्रसरकार पुरस्कृत ही योजना २८ ऑगस्ट २०१४ पासून प्रत्यक्षात आली. गरिबांना आर्थिक सहाय्यता उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली. दिवसेंदिवस यातील खातेधारकांची संख्या वाढतच असून २०१५ मध्ये १४.७२ कोटी असलेली खातेधारकांची संख्या ऑगस्ट २०२१ पर्यत ४३.०४ कोटी इतकी वाढली आहे. या योजनेचा महिलांना सर्वाधिक लाभ मिळाला असून ६७ टक्के जनधन खाते हे ग्रामीण आणि अर्धशहरी भागातील आहे. विशेष म्हणजे ८६ टक्के खाती ही प्रत्यक्षात आजही चालू असून कोव्हिड १९ लॉकडाऊनच्या काळात प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत महिला खातेधारकांच्या खात्यांमध्ये ३०,९४५ कोटी रू. जमा करण्यात आल तर जवळापास ५.१ कोटी खातेधारकांच्या खात्यांमध्ये विविध योजनांतर्गत सरकारने प्रत्यक्ष लाभ परिवर्तीत केले आहेत. या योजनेंतर्गत १ लाख रूपयांपर्यंत अपघात विम्याची सुध्दा सुविधा आहे.

**७) प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना :**

या योजनेला ९ मे २०१५ ला सुरूवात झाली. सामाजिक सुरक्षा योजने अंतर्गत एका वर्षाकरिता धारकांना विम्याचे सुरक्षा कवच पुरविण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे.या योजनेत दर वर्षी पॉलीसीचे नुतनीकरण करावे लागते याकरिता विम्याचा हप्ता म्हणून ३३० रू. विमाधारकाच्या बँक खात्यातून कपात केले जाते. विशेष म्हणजे पॉलीसी धारकाच्या मृत्यूनंतर कुटूंबाला याचा लाभ मिळू शकतो. यात २ लाखापर्यंतचा विमा लाभ दिला जातो.

**८) प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना :**

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ९ मे २०१५ पासून अस्तित्वात आली असून ही एकप्रकारे अपघात विमा पॉलीसी आहे. अपघातामुळे मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास विमा राशीकरिता मागणी करता येते. १७ ते ७० वर्ष वयोगटातील व्यक्ती याचा लाभ घेऊ शकतात. याकरिता बँकेत खाते असणे आवश्यक आहे. १२ रूपये प्रती वर्ष प्रिमीयम राशी विमाधारकाला भरावी लागते. या योजने अंतर्गत विमाधारकास २ लाख रूपयांपर्यत अपघात विम्याचा लाभ मिळू शकतो तर आंशिक रूपाने अपंगत्व आल्यास (एक डोळा, हात किंवा पाय गमवल्यास) १ लाख रूपयांपर्यंत लाभ दिला जातो. ही योजना बँक खात्याशी जोडलेली असल्यामुळे विमाधारकाच्या बँक खात्यातूनच विम्याच्या हप्त्याची कपात होत असते.

**९) अटल पेन्शन योजना :**

९ मे २०१५ पासून सुरू करण्यात आलेल्या या योजने अंतर्गत १००० रूपयांपासून तर ५००० रूपयांपर्यत पेन्शन मिळू ाकते. भारतातील असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांकरिता अटल पेन्शन योजना असून वयाच्या ६० वर्षांनंतर ग्राहकाच्या योगदानाप्रमाणे १००० रूपयांपासून ते ५००० रूपयांपर्यंत पेन्शनची हमी असते.

**१०) अंत्योदय अन्न योजना :**

केंद्र सरकारद्वारे २५ डिसेंबर २००० रोजी अंत्योदय अन्न योजना सुरू करण्यात आली. प्रामुख्याने गरीब कुटूंबियांना तसेच दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना ३५ किलाग्रॅम गहू व तांदूळ स्वस्त दरात उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. लाभार्थीला ३५ किलोग्रॅम गहू २ रूपये प्रती किलोग्रॅम आणि तांदूळ ३ रूपये प्रतिकिलोग्रॅम दराने उपलब्ध करून दिले जाते. २००३ मध्ये या योजनेचा विस्तार करतांना दिव्यांगाचा यात समावेश करण्यात आला. दिव्यांगांना पंतप्रधान गरीब कल्याण अन्नयोजनेत आणि आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रती व्यक्ती ५ किलाग्रॅम अतिरिक्त मोफत धान्य वितरीत करण्याचे राज्य सरकारांना निर्देश देण्यात आले आहे.

**११) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान :**

राष्ट्रीय विकास परिषदेच्या शिफारशीप्रमाणे २००७ मध्ये केंद्रसरकार पुरस्कृत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान सुरू करण्यात आले. या अभियानाचा परिणाम म्हणून गहू,तांदूळ डाळीच्या उत्पादनात लक्षणीय वाढझाली. ११ व्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घेऊन १२

व्या योजनेत गहू,तांदूळ,कडधान्य,भरडधान्य पिकांचाही समावेश करण्यात आला. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना बियाणांचे वितरण करणे,एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन,एकात्मिक कीड व्यवस्थापन,वैयक्तिक शेततळे, पंप संच, पाईप, विविध प्रकारची कृषी अवजारे आदींकरिता सरकारकडून अनुदान रूपाने आर्थिक मदत केली जाते.

**१२) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना :**

सर्व ऋतूंमध्ये सर्व गावांना जोडणाऱ्या योग्य रस्त्यांची निर्मिती करणे या मुख्य उद्देशासह २००० मध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सुरू करण्यात आली. या योजनेला केंद्र सरकारचे १०० टक्के वित्तीय सहाय्य होते मात्र २०१५–१६ पासून केंद्र व राज्याच्या ६०/४० टक्के या वित्तीय भागीदारीच्या आधारे ही योजना राबविली जात आहे. विशेष म्हणजे रस्त्यांच्या निर्मितीनंतर पुढील पाच वर्षे अनिवार्यपणे त्यांच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी ही राज्यांची आहे.

**१३) स्वर्ण जयंती शहरी स्वरोजगार योजना :**

स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने केंद्र सरकारने १ डिसेंबर १९९७ रोजी देशातील शहरी व अर्धशहरी भागाकरिता ही योजना लागू केली. शहरी व निमशहरी क्षेत्रातील बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना क्रियान्वित करण्यात आली. या मध्ये दारिद्रय रेषेखालील आणि ज्यांचे शिक्षण ९ व्या वर्गापर्यंत झालेले आहे अशा १८ ते ४५ वर्षे वयोगटातील व्यक्ती याचा लाभ घेऊ शकतात. कौशल्य विकास व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आधारे स्वयंरोजगाराची क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून केला जातो. २४ सप्टेंबर २०१३ पासून या योजनेची पुनर्ररचना करण्यात आली असून आता राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती अभियान या नावाने ही योजना ओळखली जाते.

**१४) स्वर्ण जयंती ग्रामीण स्वरोजगार योजना :**

ग्रामीण भागातील दारिद्रयात वास्तव्य करणाऱ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १ एप्रिल १९९९ ला ही योजना लागू करण्यात आली. या योजनेचे वित्तीय निर्धारण सुध्दा केंद्र व राज्यात ७५/२५ अशाच स्वरूपाचे आहे. आर. राधाकृष्णन समितीच्या शिफारशीनुसार ३ जून २०११रोजी या योजनेचे रूपांतरण राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात करण्यात आले.

**१५) पंतप्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना :**

ऑगस्ट २००८ मध्ये केंद्र सरकारच्या सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्यावतीने पंतप्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना सुरू करण्यात आली. ग्रामीण व शहरी भागातील गरजू लोकांना तथा सुशिक्षित बरोजगारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे,बेरोजगार युवकांना व पारंपारिक कारागिरांना एकत्रित करून स्थानिय पातळीवर स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे तथा ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे बेरोजगार युवकांचे स्थलांतरण थांबविणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टये आहेत.

**निष्कर्ष :**

दारिद्रय निर्मूलनासंदर्भात प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या विविध योजना कार्यान्वित केल्या गेल्या हे खरे असले तरी या योजनांमधील निधीचे गैरव्यवस्थापन, विविध राज्यांमध्ये होणारे निधीचे असमान वाटप, योजनांवि ायीच्या माहितीचा अभाव आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रशासनाची याविषयांची अनास्था अशा विविध उणिवांमुळे या योजना अपेक्षित यश प्राप्त करू शकल्या नाहीत असेच दिसून येते. इतकेच नाही तर सरकारी योजनांमधील उणीवा दूर करण्यासाठी आणि ग्रामीण रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच महिलांच्या सक्षमीकरणासाठी म्हणून विशेषत्वाने सुरू केले गेलेले बचत गटासारखे उपाय सुध्दा प्रभावहीन ठरले आहे.त्यामुळे भारतातील दारिद्रय निर्मूलनासाठी सातत्याने प्रयत्न होऊनसुध्दा दारिद्रयाचा प्रश्न आजही एक चिंतनीय समस्या म्हणूनच उभा आहे. भारताला शाश्वत विकास साध्य करावयाचा असेल तर दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमातील प्रशासकीय दोष दूर करावे लागतील.

संदर्भ सूची :

१रू द्रदत्त आणि सुंदरम, (१९९८) भारतीय अर्थव्यवस्था,एस.चांद ॲन्ड कंपनी,नई दिल्ली
२. य ोजना मासिक ऑक्टोबर २०१३
३. Kumar, D., & Singh, P. (2018). A study of poverty alleviation programmes in India. International Journal of Applied Research,
४. Kumari, L. (2013). Poverty Eradication in India : A study of National Policies , Plans and Programs. Journal of Arts, Science & Commerce ,
५. Sreedhar, M. (2017). Poverty Alleviation Programmes in India. International Journal of Science and Research (IJSR), 1127-1132.
६. An Analysis of Poverty Alleviation Programmes in India with Special Reference to Sustainable Development Goals - Apoorva Vermaa, Dr. Saurabh Manib (https://papers.ssrn.com/sol3/JELJOUR_Results.cfm?form_name=journalbrowse&journal_id=3566603)
७. Deendaayal Antyodaya Yojana. (2018, October).
८. https://www.indiabudget.gov.in/economicsurvey/
९. http://mohua.gov.in/pdf/5c80e2225a124Handbook%20of%20Urban%20Statistics%202019.pdf
१०. http://mospi.nic.in/sites/default/files/publication_reports/India_in_figures- 2018_rev.pdf
११. Statistical Information on Poverty in India (yourarticlelibrary.com)
१२. https://rural.nic.in/sites/default/files/WorkingPaper_Poverty_DoRD_Sept_2020.pdf
१३. https://rural.nic.in/sites/default/files/WorkingPaper_Poverty_DoRD_Sept_2020.pdf
१४. https://rbidocs.rbi.org.in/rdocs/Publications/PDFs/14TABLE9AA846828C16454182612FF9B7172C0F.PDF
१५. https://www.adb.org/sites/default/files/publication/28698/poverty-data-implications.pdf
१६. https://www.niti.gov.in/sites/default/files/2019-04/Annual-Report-English.pdf
१७. https://niti.gov.in/planningcommission.gov.in/docs/plans/planrel/fiveyr/12th/pdf/12fyp_vol1.pdf
१८. https://www.indiabudget.gov.in/budget_archive/es2004-05/chapt2005/chap103.pdf
१९. https://en.wikipedia.org/wiki/Pradhan_Mantri_Awas_Yojana
२०.https://www.newsnation.in/india/news/india-reduces-its-poor-population-to-half- lifts271-million-out-of-poverty-in-10-years-report-230904.html

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# कोळसा खनिज उद्योगाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान

संशोधक विद्यार्थी
सागर शंकर बरशेट्टीवार
आचार्य पदवी, अमरावती विद्यापीठ
प्रा. डॉ. करमसिंग रा. राजपूत
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
(आचार्य पदवी मार्गदर्शक)
लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी

**प्रस्तावना :**

भारत हा जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था आहे, क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत देशाचा जगात ७ वा क्रमांक असून लोकसंख्येत २ रा क्रमांक लागतो. भारतात केवळ २.४ क्षेत्रफळात जगामधील १७ टक्के लोकसंख्या राहते. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येबरोबरच ऊर्जा साधनांची आणि खनिजांची मागणी सूध्दा उत्तरोत्तर वाढत आहे. भारत हा कृभीप्रधान देश असला तरी, आज भारतात औद्योगिकीकरणाला वेग आला आहे. त्याबरोबरच खनिजसंपदा आणि ऊर्जासाधनांचाही प्रभाव भारतीय अर्थव्यवस्थेत दिसू लागला आहे.

खनिज संसाधनामध्ये अशी शक्ती आहे की, जिच्यामूळे कोणताही देश औद्योगिकरणाच्या वाटेवर जलद गतीने प्रगती करू ाकतो, पण ज्या देशाजवळ खनिजाचे मुबलक साठे उपलब्ध राहत नाही ते देश पुर्णत: दुसऱ्या देशावर निर्भर राहतात. आणि विदेशातून खनिज संपदा आयात करतात. लोहखनिज आणि कोळसा असे खनिज आहे ज्यावर इंग्लंडने औद्योगिक क्रांती घडवून आणली आणि जगामध्ये औद्योगिकीकरणाला सुरूवात झाली. म्हणजेच कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत कोळसा आणि लोखंड हे त्या देशाच्या उद्योग व्यवस्थेचे आधार स्तंभ मानले जाते. बाकी खनिज जसे मॅगनीज, तांबे, सीसा, जस्त, टिन, निकेल, कोबाल्ट, सल्फर, पेट्रोलियम, थेरियम, युरेनियम इत्यादी. खनिजे सुध्दा राष्ट्रविकासाकरिता महत्वपूर्ण आहेत. सोने, चांदी, हिऱ्यासारख्या समृध्द मुल्यवान धातू खनिजापासून मिळवता येतात. खनिज सामान्यत: अस्थिर असतात. आणि एकदा वापर झाल्यानंतर पुन्हा त्या खनिजांना पूर्नजीवित करता येत नाही.

भारतासारख्या विशाल लोकसंख्या असणाऱ्या देशात कोळसा हे खनिज औद्योगिक दृष्ट्या महत्वपूर्ण असे खनिज असून भारतात पर्याप्त मात्रा मध्ये उपलब्ध आहे. कोळसा बहुमुखी खनिज आहे. ज्यात रसायन, विस्फोटक, रंग, उर्वरक, इत्र, प्लास्टीक इत्यादी विभिन्न घटक आढळतात. आणि विभिन्न गैस, विजनिर्मिती परिवर्तीत करता येते. तसेच इंधनासाठी घरामध्ये सुध्दा तो वापरला जातो. एन्थेसाईट बिटूमिनस आणि लिग्नाईट हे कोळश्याचे प्रकार आहेत.

भारतात १७७४ पासून कोळसा उत्खननास सुरूवात झाली भारत जगातील चीन नंतर दुसरा सर्वात मोठा कोळसा उत्पादक देश असून २०१८ मध्ये भारताने विक्रमी ८०५ मि. मैट्रीक टन. कोळश्याचे उत्पादन केले होते.

भारतात जवळपास ऊर्जानिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात कोळश्याचा वापर केला जातो. सोबतच ऊर्जेची वाढती मागणी लक्षात घेता. उच्च प्रतीचा कोळसा विदेशातून आयात केला जातो. म्हणजेच भारत कोळसा उत्पादनाबरोबरच सर्वात मोठा उपभोक्ता सुध्दा देश आहे. असे यावरून दिसून येते. भारतात दरवर्षी ३० टक्के कोळसा आयात करण्यात येतो. भारतातील औद्योगिकीकरणामुळे खुप मोठ्या प्रमाणात उद्योगांना कोळसा लागतो त्यामुळेच भारत Non-Coking coal ची आयात दरवर्षी करतो.

भारतातील धनबाद शहरात सर्वात जास्त कोळश्याचे उत्पादन होते. त्यामुळेच या शहराला Coal Capital of India असे म्हटले जाते. कोळसा खान उत्पादनावर भारत सरकारचे अधिकार आहे आणि देशात CIL (Coal India Limited) च्या माध्यमातून विविध स्तरात कोळसा उत्पादनाचे (CIL) काम करत आहे. भारतात विजेची निर्मिती करण्यासाठी सर्वात जास्त कोळसा खनिजाचा वापर केल्या जातो.

भारतात २०१९–२० या व र्षात ९४२.६३ मि. मेट्रीक टन एवढा कोळसा उपभोग झाला. त्यामधील ७२.९३ टक्के घरगुती उत्पादनाद्वारे आणि बाकी आयात केल्या गेला. CAG च्या अहवालानुसार मागच्या दशकामध्ये ५.२८ टक्के एवढी उपभोग क्षमता वाढली आहे.

भारतात कोळश्याच्या उत्पादन करण्याच्या कंपन्यामध्ये Coal India, सिंगरेनी कोलेरीज टाटा लोहा व इस्पात जिंदल लोहशक्ती बंगाल, सेम्पटा कोल माईन्स मेघालय, कोल इंटेग्रेटेड कोल माईनिंग, हिंडालको झारखंड, स्टेट मिनरल्स Corporation Indian Iron and Steel Company इत्यादी आहे. झारखंड, उडिसा, छत्तीसगढ, पं. बंगाल, म. प्रदेश, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, जम्मू कश्मीर, आसाम, उत्तर प्रदेश, या ठिकाणी कोळसा खाणी आहेत.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन लेख कोळसा खनिज उद्योगाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान या विषयावर असून प्रस्तुत संशोधन द्वितीय संमकावर आधारीत असून तो वर्णनात्मक आहे. उपलब्ध माहितीचे विश्लेषण तुलनात्मक रित्या करून निष्कर्ष काढण्यात आले आहे. या संशोधनाचा कालावधी २००५ ते २०२० असा १५ वर्षाचा घेतला आहे. ज्या संदर्भ साहित्याचा वापर लेखासाठी करण्यात आला आहे. त्याची संपूर्ण माहिती शेवटी संदर्भ ग्रंथात देण्यात आली आहे.

**उद्‌देश :**

भारतीय अर्थव्यवस्थेतील कोळसा खनिजाच्या उत्पादन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

कोळसा खनिजावर आधारीत उद्योग व्यवस्थेचा व रोजगार अभ्यास करणे.

**परिकल्पना :**

भारतीय अर्थव्यवस्थेत कोळसा खनिजाचे योगदान महत्वपूर्ण आहे.

कोळसा खनिजाची मागणी आणि उपभोग सतत वाढत आहे.

**कोळसा खनिजाचा इतिहास**

सुमारे ३००० वर्षापूर्वी चिनी लोक तांबे आणि लोह धातू गळविण्यासाठी दगडी कोळशाचा वापर करीत होते. सॉलोमन राजाच्या कारकिर्दीत म्हणीच्या पुस्तकात कोळशाचा उल्लेख आहे. त्यावेळेस चे सोनार आणि लोहार कोळशाचा वापर करीत होते.

ब्रिटनमधील रोमन लोकांच्या घरांच्या अवशेषात सुध्दा कोळश्याची राख सापडते. तसेच मार्को पोलो यांनी कोळश्याला १२९८ मध्ये जळणारे खडक असे म्हटले आहे. १३ व्या शतकाच्या मध्यात इंग्लंडमध्ये कोळशाचे खाणकाम मोठ्या प्रमाणात सुरू झाले होते. जेम्स वॉट यांनी रिचमंड (व्हर्जिनिचा) येथे कोळशाची पहिली खाण सुरू झाली १७९३ मध्ये ॲंथ्रेसाईलची पहिली खाण सुरू केली.

भारतात कोळश्याचा वापर प्राचीन काळापासून करण्यात येत आहे. पण युरोपीयांच्या आगमनानंतरच खाणकाम आणि कोळसा व्यापाराची सुरूवात झाली. १७७४ साली बीरभूम व पाचेत या जिल्ह्यात कोळसा प्रथम सापडला १८२० साली पहिली खाण रानीगंज (पं. बंगाल) येथे सुरू झाली. १८३९ साली कोळश्याचे उत्पादन ३६ हजार झाले होते.

**भारतातील कोळसा उत्पादन आणि आयात खनिजाचे**


१८५४ साली पूर्व भारतीय रेल्वे स्थापन झाल्यानंतर कोळशाची मागणी वाढू लागली आणि उत्पादन वाढले. पुढे ताग उद्योगामूळे कोळश्याच्या मागणीत वाढझाली. १९०६ साली ९९ लाख टन उत्पादन झाले त्यापैकी सर्वात जास्त कोळसा ८८टक्के बंगालमधून निघाला आजपर्यंत कोळश्याच्या उत्पादनात आणि वापरात सतत वाढझालेली आपल्याला दिसून येते, दरवर्षी भारतात ७ कोटी टनाहून जास्त कोळसा उत्पादित होत आहे.

Coal India Limited ही जगातील आणि देशातील सर्वात मोठी कोळसा खाण कंपनी आहे. कोळसा उत्खननाचे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत आहे.

भारतीय कंपन्या फार मोठ्या प्रमाणात थर्मल कोळशाची आयात करतात जर देशात कोळश्याचे उत्पादन वेगाने वाढल्यास आपले कोळश्याचे अवलंबीत्व कमी होवू शकते पण काही प्रमाणात आता आपले अवलंबीत्व कमी झाले आहे. CIL या कंपनीने २०१५–१६ या आर्थिक वर्षात ५३६ दशलक्ष टन कोळश्याचे उत्पादन केले आहे. आधीच्या वर्षात हे उत्पादन ८२ दशलक्ष टन होते. दरवर्षी ८.५ टक्के दराने कोळसा उत्पादनात वाढ होत आहे. देशांतर्गत कोळसा उत्खननात कोल इंडियाचा हिस्सा ८० टक्के आहे. २०१९ पर्यंत कोल इंडियाचा उत्पादन १ अळी टनापर्यंत नेण्याचे उद्दीष्ट असेल.

| **Inventory of Geological Resources of Indian Coal (upto a depth of 1,200 meters) as on 01-Apr-2017** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Category** | **Proved** | **Indicated** | **Inferred** | **Total** | **% Share** |
| Coking (billion ton) | 19 | 14 | 2 | 35 | 11% |
| Non Cooking Including Tertiary Coal (billion ton) | 124 | 125 | 31 | 280 | 89% |
| **Total (billion ton)** | **144** | **139** | **33** | **315** | **100%** |
| **% share** | **46%** | **44%** | **10%** | **100%** | |

Coking Coal आणि Non – Coking Coal अशा प्रकारच्या खनिजांची भारतीय उद्योगात मागणी असून Non-Coking Coal ची ८९ टक्के मागणी भारतातील प्रमुख स्टील, लोह पोलाद उद्योगात मागणी आहे तर त्या तुलनेत Coking Coal ची मागणी कमी दिसून येते. त्यामुळे विदेशातून ही मागणी आयाती द्वारे पूर्ण केलेली आहे. ती आपल्याला वरील को टकाद्वारे दिसून येईल.




Source : “As per the Coal Vision 2030”

वरील आलेखावरून लक्षात येते की, वर्षानुवर्षे कोल खनिजाची मागणी सतत वाढत असून उत्पादनाबरोबरच कोळश्याच्या आयाती मध्ये सुध्दा वाढझाली आहे.

**भारतातील कोळसा खनिजाचे साठे**

भारतात खुप मोठ्या प्रमाणात कोळसा उत्पादन क्षेत्र आरक्षीत असून जगामध्ये भारत हा चवथ्या क्रमांकाचा कोळसा खनिजाचा साठा असलेला देश आहे. March २०२० च्या माहितीनुसार भारतात ३४४ बिलीयन metric ton (379 million short tons) एवढा कोळ:श्याचा साठा आरक्षित होता. भारतातील झारखंड, छत्तीसगढ, ओडिसा प. बंगाल, मध्यप्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, या ठिकाणी सर्वात जास्त

आरक्षित कोळसा खनिजाचा साठा असून हे क्षेत्र गोंडवाना क्षेत्र म्हणून ओळखल्या जाते. भारतात जवळपास ९०% कोळसा गोंडवाना क्षेत्रात आरक्षित असून बाकी १०% कोळसा तृतीयक क्षेत्रात उपलब्ध आहे असे आढळून येते.


खालील तक्त्याद्वारे आपण कोळसा उत्पादन क्षमता राज्यवार पाहू ाकतो.

| अनु. क्र. | राज्य | कोळसा खनिजाचा साठा | खाणीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | झारखंड | ८५.६०२ | गोंडवाना क्षेत्र |
| २ | ओडिसा | ८४.६५२ | |
| ३ | छत्तीसगढ | ६९.४३२ | |
| ४ | प. बंगाल | ३२.९३७ | |
| ५ | मध्यप्रदेश | २९.२८५ | |
| ६ | तेलंगणा | २२.२२५ | |
| ७ | महाराष्ट्र | १२.७२८ | |
| ८ | आंध्रप्रदेश | १,६०७ | |
| ९ | बिहार | २,७५१ | |
| १० | उत्तर प्रदेश | १,०६२ | |
| ११ | मेघालय | ०.५७६ | तृतीय क्षेत्र |
| १२ | आसाम | ०.५२५ | |
| १३ | नागालॅंड | ०.४४६ | |
| १४ | सिक्कीम | ०.१०१ | |
| १५ | अरूणाचल प्रदेश | ०.०९ | |

**Source : Coal wikipedia**

**कोळसा खनिज उद्योग आणि रोजगार**

भारतात कोळसा खाणकाम क्षेत्रात जवळपास ६०० कोळसा कंपन्या कार्यरत आहे आणि या खाणीत देशभरातील ५ लाख कामगार कार्यरत आहे. त्यासोबतच अप्रत्यक्षपणे सुध्दा खुप मोठ्या प्रमाणात उत्पादन, वितरण, विपनन आणि परिवहन क्षेत्रात खुप मोठ्या प्रमाणात रोजगार आहेत. या सोबतच कोळसा खनिजावर आधारित अनेक उद्योग आहेत त्यात विजनिर्मिती लोह, पोलाद उद्योग, स्टील उद्योग, सिमेंट उद्योग, विटभट्टी आणि अनेक इतर उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची संख्या फार मोठी असून CIL Coal India Limited ही कंपनी कोळसा उत्पादनाचे कार्य करीत आहे. Coal India Limited च्या २०२० वर्षीच्या आकडेवारीनुसार CIL मध्ये भारतात २७२४४५ एवढे कर्मचारी कार्यरत होते आणि एवढ्या मोठ्या प्रमानात कामगारांना काम देणारी CIL भारतातील प्रमुख कंपनी आहे.




Source : https://www.statista.com/statistics/244518/number-of-employees-at-coal-india-limited/

वरिल आलेखावरून भारतात कोळसा खणन उद्योगात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा असून २००३ पासून तर २०२० पर्यंत त्यांची माहिती दर्शविण्यात आली आहे. वाढत्या खाजगीकरणामुळे दिवसेंदिवस कर्मचारी संख्या कमी झाल्याचे दिसून येत आहे.

**निष्कर्ष :**

वरील वि याच्या अभ्यासावरून असे लक्षात येते की, भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेला विकसीत अर्थव्यवस्था बनविण्यासाठी देशातील खनिज संसाधनाची महत्वपूर्ण भूमिका असून, त्यापैकी कोळसा खनिज भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचे इंजिन म्हणून कार्यरत आहे, देशातील उर्जा शक्ती, लोह पोलाद उद्योग, विजनिर्मिती, स्टील उद्योगात कोळसा खनिजाचे विशेष योगदान आहे. त्याच बरोबर देशातील कोळसा उद्योगाच्या आधारावरच अनेक रोजगारंची निर्मिती झाली असून त्यात स्थायी रोजंदारी तत्वावरील आणि असंघटीत कामगार मोठ्या प्रमाणात कार्य करतांना दिसून येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील कोळसा खनिजाचे महत्व अनन्यसाधारण असून भारतीय अर्थव्यवस्थेतील कोळसा खनिजाचे योगदान भवि यातील जागतीक सामर्थ्याचे प्रतिक मानता येईल.

**संदर्भ सूची :**

१) आगलावे, प्रदिप : सामाजिक संशोधन पध्दती.
२) दातार, बी. एन. : मजुरांचे अर्थशास्त्र.
३) कोळंबे, रंजन : भारतीय अर्थव्यवस्था.
४) रेगे, रूपा : खाणीत कोळसा जगाला वळसा, लोकसत्ता.
५) लोकसत्ता : देशात कोळश्याचे विक्रमी उत्पादन १६ एप्रिल २०१६.
६) vikaspedia : दगडी कोळसा
७) Wikipedia
८) Coal India limited – panel discussion
९) www.des.com
१०) https://www.statista.com

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# दारिद्र्याचे मापन आणि उपाययोजना

**डॉ. नितीन ज्ञानदेव चौधरी**
सहायक प्राध्यापक व प्रमुख अर्थशास्त्र विभाग
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला

प्रस्तावना

भारतात दारिद्रय  ही मोठी सामाजिक तसेच आर्थिक ज्वलंत समस्या आहे. या समस्येचे निर्मूलन होणे ही आज काळाची गरज बनली आहे. दारिद्र्य आणि मानवी विकास यामध्ये प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष संबंध असल्याचे दिसून येते. त्यामुळे देशातील सर्वसाधारण व्यक्ती हा मानवी विकासापासून व मूल्याधिष्ठित जीवनापासून वंचित आहे. जे लोक आपल्या दैनदिन जीवनात जीवनमानाची किमान पातळी गाठू शकत नाही त्यांना दरिद्री किंवा गरीब संबोधले जाते. पण जीवनाची किमान पातळी कोणती व त्या किमान पातळीवर जीवन जगण्यासाठी दरडोई किती उत्पन्नाची आवश्यकता आहे या संबंधी अनेक तज्ञांमध्ये एकमत असल्याचे दिसून येत नाही.

**संशांधनाची उद्दिष्ट्ये:**

1. दारिद्र्य संकल्पनेचे अध्ययन करणे व कारणे शोधणे.
2. दारिद्र्य मापनाच्या विविध समित्यांचा अभ्यास करणे.
3. दारिद्र्य निर्मूलनाकरिता उपाययोजना सूचविणे.

**अध्ययनाची गृहितकृत्ये:**

1. दारिद्र्य देशातील सर्वात मोठी समस्या आहे.
2. भारतात द्रारिद्र्याच्या प्रमाणात घट होत आहे.
3. दारिद्र्य मापनाच्या पध्दतीत काळानुसार बदल झाले आहेत.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनात द्वितीय तथ्य सामग्रीच्या आधारावर शोधनिबंध लिहण्यात आला आहे. यात संदर्भ ग्रंथ, संदर्भित पुस्तके, शासकीय अहवाल, दैनिक वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेटच्या माध्यमातून माहिती संकलित करून तथ्यांचे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणातून संशोधन विषयाचे उद्देश व स्वरूप अभ्यासण्यात आले आहे.

**दारिद्र्य संकल्पनेचा अर्थ:**

भारतात दारिद्र्याच्या संदर्भात ज्या व्याख्या करण्यात आल्या आहेत त्यामध्ये व्यक्तीच्या जीवनाच्या सामान्य पातळी ऐवजी जीवनाच्या किमान पातळीवर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. म्हणजेच व्यक्तीचे किमान राहणीमान लक्षात घेवून ज्यांना किमान गरजही भागविता येत नाहीत अशा व्यक्तीचा उल्लेख दारिद्र्य रेषेखाली यतो.

“दारिद्र्य व्यक्ती अशा आहेत ज्यांचे जीवनमान दरडोई उत्पन्नाच्या कमी उत्पन्न आहे. ज्यातून कमीत कमी गरजांचा उपभोग होतो अशा व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली येतात.” (एम.एल. दंतवाल)

“जेव्हा व्यक्ती आपल्या सर्वसामान्य गरजा योग्य प्रमाणात भागऊ शकत नाहीत ती स्थिती दारिद्र्यपूर्ण स्थिती समजावी.” (अॅडम स्मिथ)

भारतातील दारिद्र्याची स्थिती:

भारतात दारिद्र्यरेषेबाबत अध्ययन स्वतंत्र्यपूर्व काळापासून होत आहे. अर्थशास्त्राचे भारतीय जनक दादाभाई नौरोजी यांनी त्याच्या 1901 मध्ये लिखित ''भारतात दारिद्रय आणि अन ब्रिटिश राजवटी'' या पुस्तकात देशातील दारिद्र्याबाबत उल्लेख केला होता. 1936 मध्ये राष्टीय नियोजन समितीने अविभाजित भारतातील दारिद्र्याबाबत कल्पना दिली होती मात्र या समितीमार्फत मिळालेली सांख्यिकीय माहिती अधिकृत मानली गेली नाही. स्वातंत्र्यानंतर सुध्दा भारत सरकारने विविध समित्यांची नेमणुक करून देशातील दारिद्र्य मोजण्याचे कार्य पार पाडले.

भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी स्वातंत्र्यानंतर दारिद्र्य रेषा या संकल्पनेचा वापर करण्यात येतो. ही दारिद्र्य रेषा उपभोग खर्चाच्या आधारावर ठरविली जाते. दारिद्र्य रेषा ठरविण्यासाठी एका व्यक्तीमागे एका महिन्याच्या उपभोग खर्चाचा एक न्यूनस्तर निश्चित केला जातो. त्याला मासिक प्रतिव्यक्ती उपभोग खर्च (MPCE) असे म्हटले जाते. MPCE चे आकडे निश्चित करण्यासाठीNSSO (National Sample Survey Office) च्या घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षणाची आकडेवारीचा उपयोग केला जातो. दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येतील प्रमाणाला दारिद्र्य प्रमाण Poverty Ratioअसे म्हणतात.

दारिद्र्याचे मापन करीत असताना प्रामुख्याने निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य यामध्ये मापन केले जाते. सापेक्ष दारिद्र्याचे मापन करताना लोकसंख्येतील श्रीमंत व गरीब यांची तुलना करून एक सरासरी काढली जाते. या सरासरीपेक्षा कमी उत्पन्न असणाÚया लोकसंख्येचे प्रमाण विचारात घेतले जाते. तर निरपेक्ष दारिद्र्याचे मापन करताना कॅलरीमूल्य हे मानक ठरविले आहे. म्हणजेच निर्धारित कॅलरीमूल्य प्राप्त होत असेल तर ती व्यक्ती दारिद्र्यरेषेच्या वर आहे असे म्हटले जाते.

भारतात निरपेक्ष पध्दतीने दारिद्र्याचे मोजमाप केले जात. स्वतंत्र्यपूर्व कालावधित भारतात विविध समित्यांच्या मार्फत दारिद्र्याचे मोजमाप केले गेले. ज्यामध्ये दादाभाई नौरोजी यांनी 15 ते 35 रूपये प्रतिवर्ष, नियोजन आयोगाने 1938 मध्ये 15 ते 20 रूपये प्रति महिना तर बाॅम्बे प्लान अंतर्गत 1944 मध्ये 75 रूपये प्रति वर्ष अशा प्रकारे मापन करण्यात आले. मात्र स्वातंत्र्यानंतर भारतात विविध तथ्य संकलन व माहितीच्या आधारावर दारिद्र्याचे मापन केले गेले. 1960-61 मध्ये पी.डी. ओझा यांच्या कृतिदलाने दरडोई खर्चाचा विचार करून दारिद्र्याचे मापन केले. त्यांच्या मापनानुसार 1960-61 मध्ये ग्रामीण भागात रूप्ये 8 ते 11 व शहरी भागात रूप्ये 15 ते 18 ही पातळी निर्धारित केली गेली. यावरून देशात 44 टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली असलेली आढळून आली.

व्ही.एम. दांडेकर आणि निळकंठ रथ यांनी 1960-61 मध्ये दरडोई खर्चाचा विचार करून दारिद्र्याचे मापन केले. त्यांच्या मापनानुसार 1960-61 मध्ये ग्रामीण भागात रूपये 22.50 व शहरी भागात रूपये 15 ते 18 ही पातळी निर्धारित केली गेली. यावरून देशात 41 टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेशेखाली असलेली आढळून आली.

मिन्हास यांनी दरडोई खर्चाचाच विचार करून दारिद्र्याचे मापन केले. त्यांच्या मापनानुसार 1969 मध्ये देशात 50.6 टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेशेखाली असलेली आढळून आली.

पी.के. बर्धन यांनी यानी खर्चाची पातळी वापरतांना महागाई ठरवित असताना शेतमजुरांसाठीच्या किंमत निर्देशांकाचा वापर केला. त्यांच्यामते, 1968-69 मध्ये ग्रामीण भागात 44 टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेशेखाली असलेली आढळून आली.

भारतात दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी 1979 मध्ये डॉ. वाय.के. अलघ यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन आयोगाने एक कृती दल निर्माण केला. या कृती दलाने दारिद्र्याचा निकश म्हणून दारिद्र्याची टोपली ही संकल्पना सूचविली होती. या टोपलीमध्ये अन्न हा घटक घेण्यात आला. दोनही वेळचे अन्न न मिळवू न शकनारा गरीब समजावा असे सूचविले.

भारतात दारिद्र्यरेषेची आखणी करण्यासाठी 1971 पासून दांडेकर आणि रथ समितीचा उष्मांक उपभोग मानकाचा आधार घेण्यात येत होता. मात्र नियोजन आयोगाच्या 2005 मधील तेंडुलकर समितीने दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासाठी राहणीमानाचा स्वीकार केला. तेंडुलकर समितीच्या उपभोग खर्च मानकानुसार 2009-10 मध्ये 29.8 टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती.

24 मे 2012 रोजी नियोजन आयोगाने पुन्हा दारिद्र्यरेषेचे अध्ययन करण्यासाठी श्री. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली. या समितीने 30 जून 2014 रोजी आपला अहवाल सुपूर्द केली. या समितीने दारिद्र्यरेषा मापनामध्ये अन्ना बरोबर शिक्षण, कपडे, निवारा आणि वाहन खर्च या चार घटकाबरोबरच इतर घटक विचारात घेतले आहेत. या रंगराजन समितीने दारिद्र्यरेषा मापनाकरिता एन.एस.एस.ओ. (NSSO) च्या 68 व्या सव्हेचा वापर केला आहे व या सव्हेनुसार MMRP (Modifide Mixed Recall Period) च्या आधारावर मोजमाप केले आहे.

रंगराजन समितीने 2011-12 मध्ये खर्चाची पातळी ग्रामीण भागात 2400 कॅलरी ऐवजी 2155 कॅलरी हा नवीन निकष घेतला आहे. 2155 एवढी कॅलरी मिळविण्यासाठी 554 रु., चार आवश्यक घटकांवर 141 रु. आणि इतर घटाकांवर 277 रु. मासिक दरडोई खर्च करावा लागतो. म्हणजेच ग्रामीण भागात दरडोई 972 रु. मासिक खर्च किंवा 32 रु. प्रतिदिन खर्च ही दारिद्र्यरेषा ठरविण्यात आली आहे.

तसेच शहरी भागात अन्न या घटकासाठी या समितीने 2100 कॅलरी ऐवजी 2090 कॅलरी हा निकष घेतला आहे. 2090 कॅलरी मिळविण्यासाठी 656 रु. चार आवश्यक घटकांवर 407 रु. आणि इतर घटकांवर 344 रु. मासिक दरडोई खर्च करावा लागतो. म्हणजेच शहरी भागात दरडोई 1407 रु. मासिक खर्च किंवा 47 रु. प्रतिदिन खर्च ही दारिद्र्यरेषा ठरविण्यात आली.

या निकषानुसार 2011-12 मध्ये भारतात एकूण 29.5 टक्के दारिद्र्य होते तर ग्रामीण भागात 30.9 टक्के असून शहरी भागात 26.4 टक्के होते.

त्याचप्रमाणे महाराष्ट्रात ग्रामीण भागात 2155 कॅलरी मिळविण्यासाठी 1078.34 रु. मासिक खर्च येतो तर ग्रामीण भागात 2090 कॅलरी मिळविण्यासाठी 1560.38 रु. खर्च येतो. यानुसार ग्रामीण भागात 22.5 टक्के दारिद्र्य तर शहरी भागात 17 टक्के दारिद्र्यरेषेखाली लोक आहेत.

**भारतातील दारिद्याची स्थिती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. - | आयोग | वर्ष | भारतातील दारिद्र्याचे प्रतिशत प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण | शहरी | एकूण |
| 1 | भारतीय नियोजन आयोग | 1973-74 | 56.4 | 49 | **549** |
| 2 | | 1977-78 | 53.1 | 45.2 | **51.3** |
| 3 | | 1983 | 45.6 | 40.8 | **44.5** |
| 4 | | 1987-88 | 39.1 | 38.2 | **38.9** |
| 5 | | 1993-94 | 37.3 | 32.4 | **36** |
| 6 | | 1999-2000 | 27.1 | 23.6 | **26.1** |
| 7 | | 2004-05 | 28.3 | 25.7 | **27.5** |
| 8 | तेंडुलकर समितीच्या अहवालानुसार | 2004-05 | 41.8 | 27.5 | **37.2** |
| 9 | | 2009-10 | 33.8 | 20.9 | **29.8** |
| 10 | | 2011-12 | 25.7 | 13.7 | **21.9** |
| 11 | रंगराजन समितीच्या अहवालानुसार | 2009-10 | 39.6 | 35.1 | **38.2** |
| 12 | | **2011-12** | **30.9** | **26.4** | **29.5** |

स्रोत: नियोजन आयोग अहवाल जून2014

**नीति आयोग कार्यदल:**

दारिद्र्याचे मापन हे आजही सरकार समोरचे मोठे आव्हान बनलेले आहे. यासाठी देशात विविध समित्या, कार्यदल निर्माण झाले. परंतु यावर उपाय शोधता आला नाही. यातच 16 मार्च 2015 रोजी केंद्र सरकारने दारिद्र्याची सुधारित व्याख्या निर्माण करणे आणि दारिद्र्य निर्मूलनासाठी टास्क फोर्सची (Task Force on Elimination of Poverty in India) निर्मिती केली. यामध्ये स्वतः नीती आयोगाचे उपाध्यक्ष श्री. अरविंद पनगारिया या कार्यदलाचे अध्यक्ष होते. या कार्यदलाचे प्रमुख उद्दिष्ट दारिद्र्याची कार्यत्मक व्याख्या करणे, दारिद्र्य निर्मूलनाचा आराखडा बनविणे, दारिद्र्य निर्मूलनाचे धोरण सूचविणे, दारिद्र्य निर्मूलनाकरिता विविध कार्यक्रमांची आखणी करणे असे होते.

या कार्यदलाने 21 मार्च 2016 ला Eliminating Poverty- Creating Jobs & Strengthening Social Programe Occasional Paper-2 हा अहवाल प्रकाशित केला. या अहवालाने मात्र दारिद्र्य निर्मूलनाकरिता कोणत्याही शिफारशी सूचविल्या नाहित. रंगराजन समिती व तेंडूलकर समितीच्या आकडेवारीवरील तथ्यांवर भाष्य करताना प्रस्तुत अहवाला दारिद्र्य निर्मूलनाचे धोरण काय असावे याबाबत मत प्रकट केले. ज्यामध्ये रोजगारक्षम, शास्वत आणि तिव्र आर्थिक वाढ करणे, दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रम प्रभावी करणे, कृषी विकास दुसरी हरित क्रांती या सारखे उपाय सूचविले होते.

**दारिद्र्य निर्मूलनाकरिता उपाययोजना:**

**1.रोजगार निर्मितीवर भर:**

औद्योगिकीकरणाच्या निर्मितीमुळे रोजगाराच्या संधीत वाढ झाली पाहिजे. केवळ उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग उच्च व मध्यम वर्गाला उपयोगात आणता येतील. अशाच वस्तूंचे उत्पादन करतात. दारिद्र्य दूर करण्यासाठी मूलभूत उद्योगांचा अधिकाधिक विस्तार व्हावयास पाहिजे. मध्यम उद्योग, कुटीर उद्योग, लघु उद्योग, ग्रामोद्योग यांना अधिक प्रोत्साहन देण्याचे धोरण आखून किमान कौशल्य व्यवसायभिमुख असावेत असे उपायात्मक रोजगार निर्माण करणे व दारिद्र्यता नष्ट करणे.

2. ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू करणे:

विविध शहरांमध्ये होणारे लोकसंख्येचे कंेद्रीकरण त्वरित थोपविले गेले पाहिजे. ग्रामीण भागातच नवीन उद्योग स्थापले तर ग्रामीण भागातील नागरिकांचे स्थलांतर थांबविता येईल.

3. वितरणात्मक न्याय:

दरडोई उत्पन्नात वाढ झाली म्हणजे दारिद्र्याची समस्या कमी झाली असे नाही. भारत अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण झाला तरीही भूकबळी समस्या संपली नाही. त्यांच्या बरोबर उत्पादनात वाढ झाली पाहिजे. उत्पादित वस्तू, धन, विकासाचे फायदे समाजातील सर्वात खालच्या स्तरापर्यंत म्हणजे तळागळापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी वितरणात्मक न्याय हा आधार असणारे धोरण स्विकारणे आणि आमलात आणणे आवश्यक आहे.

4. ग्रामीण भागात शेतीसाठी नवीन सुविधांची माहिती देणे.:

लहानशेतकऱ्यांपर्यंत सिंचनसोई व खते, बी-बियाणांचा पुरवठा होईल याची दक्षता घेणे, अशा शेतकऱ्यांची उत्पादन साठवण, वितरणविषयक व्यवस्था करणे.

5. काळ्या धनाची समाप्ती:

कर चुकवेगीरी व गैरहिशोबी मालमत्ता तसेच उद्योगपती, व्यापारी, उच्च पदस्थ व्यावसायिक इत्यादी कडून भ्रष्ट व गैरफायदेशिर त्यांचा पैसा वापरला जातो. तोच जर पैसा रोखीच्या स्वरूपात दर्शनिक झाला तर त्यांच्या मिळणारा कर हा दारिद्र्याच्या निर्मूलन कार्यक्रमा उपयोगी ठरतो मग काळ्या धनाची समाप्ती होणे आवश्यक आहे.

6.योजनांची यशस्वीरित्या अंमलबजावणी:

दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजना यशस्वी होण्यासाठी त्यांचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. दारिद्र्यरेषेत येणारे कोण अशा प्रमाणिक तत्त्वानुसार गरजूवंत व्यक्तीला विभिन्न शासकीय योजनांचा लाभ झाल्यावर नक्कीच दारिद्र्य निर्मूलन होवू शकते.

7.पैशाच्या स्वरूपात योग्य वेतन:

शेतमजुर, वेठबिगार ग्रामीण भागात गुरे राखणे, लाकुडफाटा गोळा करणे, शेतीची राखण करणे या स्वरूपाची जी कामे करतात त्या प्रत्येक कामाची पाहणी करून प्रत्येक कामाचा पैशातील रोजगार निश्चित करणे, पैशाच्या स्वरूपातच वेतन देणे सक्तीचे करणे.

जोपर्यंत दारिद्र्याची वास्तविक आकडेवारी शासनाकडे प्राप्त होणार नाही तोपर्यंत शासन स्तरावर कोणती योजना आखावी हे कळणार नाही. याकरिता दारिद्र्याचे मापन करण्याकरिता जनगणना प्रमाणे दारिद्र्याचे मापन होणे गरजेचे आहे. आज तेंडूलकर समिती पासून रंगराजन समिती, नीती आयोग यांनी समग्र स्तरावर दारिद्र्याचे मापन करण्यापेक्षा सूक्ष्म स्तरावर केल्यास दारिद्र्याची वास्तविक आकडेवारी काढता येवू शकेल आणि त्या आधारावर उपाययोजना करता येतील.

प्रस्तुत संशोधनामध्ये भारतातील दारिद्र्याची समस्या अभ्यासण्यात आली तसेच दारिद्र्य मापनाच्या विविध समितीचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच दारिद्र्य मापनात वेळोवळी झालेले बदल येथे नमुद करण्यात आले आहेत.

**सारांश:**

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

देशातील दारिद्र्य मापनाच्या विविध समित्या फक्त दारिद्र्यांबाबत आकडेमोड करीत आहेत. मात्र या दारिद्र्य निर्मूलन करण्याकरिता उपयुक्त उपायांची अंमलबजावणी करण्याचे मार्ग मात्र सुचवू शकले नाही. त्यामुळे दारिद्र्य हा एक न सुटनारा प्रश्नच राहला आहे असे म्हणावे लागेल.

रंगराजन समितीचा अहवालातील बारकावे विचारात घेतल्यास या समितीने ज्या घटकांचा आधार घेवून ही आकडेवारी मांडली आहे त्या प्रत्येक घटकाचा व दारिद्र्य यांचे सखोल अध्ययन करून तो घटक सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सहज पोहचून देशातील दारिद्र्याचे प्रमाण प्रत्यक्षात कमी करणे शक्य होईल.

संदर्भ ग्रंथसूची:

1.दत्त गौरव आणि अश्विनी महाजन, भारतीय अर्थव्यवस्था-दत्त एवं सुन्दरम, एस.चन्द एण्ड कंपनी प्रा. लि. नई दिल्ली, 52 वी आवृत्ती, 2014

2.देसले डॉ.  डॉ  किरण, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग 1 दिपस्तंभ प्रकाशन, जळगांव, 2014

3.देसाई डॉ. आणि . भालेराव डॉ., भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, 2013

4.आर्थिक सर्वेक्षण 2013-14, भारत सरकार

5. Report Of The Expert Group To Review The Methodology For Mesurement Of Poverty, Government Of India Planing Commission, June 2014

6.मासिक बुलेटीन युनिक ॲकेडमी, सप्टेंबर 2014, अंक 6, वर्ष 1

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारने शिक्षणावर केलेल्या खर्चाचे विश्लेषणात्मक अध्ययन

अभिषेक संजय पद्मावार
लोकमान्य टिळक महाविद्यालय,
वणीजि. यवतमाळ

डॉ. करमसिंग रा.राजपूत
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोकमान्य टिळक महाविद्यालय,वणीजि.यवतमाळ

---

**सारांश :**

भारत हा एक अविकसित देश आहे. अल्पविकसित देशाची कारणे पाहिल्यास आपल्याला दिसून येते की प्रति व्यक्ति आय, अल्प उत्पादन साक्षरतेचे प्रमाण कमी भांडवलाची कमतरता हे सर्व लक्षणे आपल्याला दिसून येते. व कोणत्याही देशाच्या विकास करावयाचा असल्यास आपल्याला त्यामध्ये शिक्षण, आरोग्य, राहणीमान दर्जा या गोष्टीचा विकास झाला पाहिजे. जोपर्यंत शिक्षण, आरोग्य व राहणीमान दर्जा याचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार म्हणून आपण भारतामध्ये शिक्षणावर कसा प्रकारे खर्च केला जातो व त्याचा कसा परिणाम होतो याचा अभ्यास करणार आहे.

भारतामध्ये विविध जाती व धर्माचे लोक राहतात. व त्यांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी जास्त आहे. आपण यामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याकरिता केंद्र सरकारने शिक्षणावर केलेल्या खर्चाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणार आहे. आपण यामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र सरकार कोणकोणत्या योजना आहे, त्याच्याकरिता सरकार कशाप्रकारे खर्च करतात.आणि त्यांच्या अनुसूचित जातीच्या समाजावर काय परिणाम होतो याचे अध्ययन या शोधनिबंधात करण्यात आले. विद्यार्थ्यावर केलेल्या खर्चाचा देशाच्या विकासात कशा प्रकारे त्याचा फायदा होतो व त्यामुळे देशामध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण कशा प्रकारे वाढ होते हे या लेखातून स्पष्ट करण्यात आलेआहे.

**शब्दसंकेत** :भारतीय संविधान, शोषण, शिक्षण, जबाबदारी, बेरोजगारी.

## प्रस्तावना:

जगात सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतीय लोकशाही कडे पाहिले जाते. लोकशाहीच्या कारभार राज्यघटनेनुसार चालतो. देशात समता, स्वतंत्रता, बंधुता व न्याय प्रस्थापित करणे हे राज्यघटनेचे उद्दिष्ट आहे. लोकशाहीचे यश आर्थिक व सामाजिक समस्येवर अवलंबून असते. संविधानाच्या भाग 4 मधील मार्गदर्शन तत्वानुसार कमकुवत वर्गाच्या विकासासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्याच्या विकासाचे विशेष प्रयत्न केल्याशिवाय सामाजिक आर्थिक विकास होणार नाही म्हणून शासनाने अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय लोकांचे साठी राखीव जागांची तरतूद राज्यघटनेत केलेली आहे. तथापि सर्व अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना शासकीय नोकरीत सामावून घेणे शक्य नाही. म्हणून अशा जातीच्या कुटुंबांना स्वावलंबी बनवण्यासाठी, त्यांना स्वतंत्र व्यवसाय करता यावा, त्याच्या आर्थिक, सामाजिक शैक्षणिक स्तर उंचावला जावा या हेतूने केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अनेक योजना सुरू केलेल्या आहेत.

भारताचीअर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भारताचा 2021-22 चा अर्थसंकल्प 3483256 कोटी रुपये खर्च करण्याचा प्रस्ताव आहे. व त्यामध्ये शिक्षणावर होणारा खर्च 2021-22 च्या अर्थसंकल्प नात शिक्षणासाठी 93224 कोटी रुपये खर्चाची तरतूद केली आहे. हे तरतूद एकूण बजेटच्या 2.67 टक्के आहे.केंद्राने 15000 आदर्श विद्यालय (मॉडेल शाळा) लेहनमधली नवीन केंद्रीय विद्यापीठ यामध्ये चांगल्या समन्वयाची नोंद अनुदानात विकसित अनुदान विकसित करण्याची

घोषणा केली केली असतानाही शिक्षणासाठी वाटपात सुमारे 6 टक्के कपात केली आहे. 2021-22 च्या अर्थसंकल्पात प्रस्तावानुसार शिक्षण मंत्रालयाने वाटप 99311कोटी रुपयांवरून 93224 कोटी रुपये करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाला मागील अर्थसंकल्पातील 59845 कोटी रुपयाच्या तुलनेत 54873 रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर उच्च शिक्षण विभागाचा वाटप 39466 कोटी रुपयांवरूनरु 38350 कोटी रुपये करण्यात आली आहे.2017 18 पासून सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण अंतर्गत योजनाचा भौतिक आणि आर्थिक परिणामाचे निरीक्षण करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. अनुसूचित जातीसाठी विकास कृती योजना (DAPSC) पूर्वी अनुसूचित जातीच्या उपायोजना (SESP) संबंधित 41 केंद्रीय मंत्र्याच्या संदर्भात अनुसूचित जातीच्या कल्याण (ASWC) साठी वाटप आणि विभाग अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी सरकार निधी देतो. 2019-20 मध्ये 72936.29 कोटी रुपये निधी देण्यात आला होता व 2020-21 मध्ये वाढ होऊन 83256.65 कोटी रुपये करण्यात आले ही वाढ 14.15 टक्के इतकी होती.

### संशोधनाची उद्दिष्टे:

१) भारतातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता शिक्षणावर केंद्र सरकारने केलेल्या खर्चाचे अध्ययन करणे.

२) भारतातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता केलेल्या खर्चामुळे त्यांच्या शैक्षणिक स्तरांमध्ये झालेल्या बदलाचे अध्ययन करणे.

३) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यावर खर्च केल्या जाणाऱ्या केंद्र सरकारच्या योजनाचे अध्ययन करणे.

### संशोधनाची गृहिते:

१)भारतातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता केंद्र सरकारने केलेल्या खर्चात वाढ होत आहे.

२) भारतात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील प्रमाणात वाढ होत आहे.

३) केंद्र सरकारने मान्य केलेल्या खर्चाचा अनुशेष पूर्ण केला जात नाही.

### संशोधन पद्धती:

संशोधनाकरिता वर्ष 2016 ते 2020 या चार वर्षाच्या कालखंडाची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधना मध्ये प्रामुख्याने विश्लेषणात्मक, वर्णनात्मक आणि सर्वेक्षनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याकरिता असणाऱ्या योजनाचे अध्ययन करण्यात आले आहे. यामध्ये विविध लिखित साहित्य, विविध पुस्तके, मासिके ,शासकीय प्रकाशने, संदर्भ ग्रंथ इत्यादी साधनाचा आधार घेण्यात आलेला आहे.

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यासाठी असणाऱ्या विविध योजना आणि खर्च :

### 1)अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता.

ही योजना केंद्र सरकार कडून सुरू करण्यात आली आहे. ०१/०७/२०१२ राबवली जात आहे. यामध्ये केंद्र सरकार 60 टक्के व राज्य सरकार 40% द्वारे राबवली जाते. या योजनेमध्ये ची सुधारणा ०६/०९/२०१९ मध्ये करण्यात आली आहे. वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० मध्ये या चार वर्षाच्या कालखंडात किती शिष्यवृत्ती दिली आहे. हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

| अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती | | | |
|---|---|---|---|
| वर्षे | बजेट वाटप रु. (कोटी मध्ये) | केंद्रीय सहाय्य रु. (कोटी मध्ये) | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) |
| 2016-17 | 550.00 | 506.15 | 20.20 |
| 2017-18 | 50.00 | 62.82 | 22.82 |
| 2018-19 | 125.00 | 115.40 | 26.30 |
| 2019-20 | 355.00 | 352.89 | 28.09 * |

*reported by States/UTs as on 31.12.2020

वरील सारणीवरून असे निदर्शनात येते की, 2016 17 मध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती 550 कोटी मान्य झाली होती व 506कोटी रुपये वाटप करण्यात आलेत होती व 20.20 लाख विद्यार्थ्यांना त्याचा लाभ झाला होता. व त्याच प्रमाणे 2017-18,2018-19,2019-20 मध्ये त्याची मान्यता अनुक्रमे 50.00,125,355 कोटी रुपये मान्य झाले व त्यांचे वाटप अनुक्रमे 62.85,115.40,352.89 कोटी रुपये झाला व त्याचा लाभ अनुक्रमे 22.82,36.30,28.09 लाख व्यक्तींना देण्यात आले आहे. या कालावधीमध्ये शिष्यवृत्ती मध्ये घट होताना स्पष्ट होत आहे. व लाभार्थ्यांची संख्या वाढत असल्याचे दिसून येते.

### २)अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती.

भारत सरकारची प्रमुख योजना आहे. यामध्ये अनुसूचित जातीच्या शैक्षणिक समक्षीकरण करण्यासाठी 1944 पासून कार्यरत आहे. ही केंद्र सरकार प्रायोजित योजना आहे. यामध्ये  केंद्र सरकार हे राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना मदत  जारी केली जाते. यामध्ये 2016 -17 ते 2019-20मध्ये मध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना किती शिष्यवृत्ती मिळाली हे पुढील पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

| अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षे | बजेट वाटप (कोटी मध्ये) | सुधारित अंदाज (कोटी मध्ये) | केंद्रीय सहाय्य (कोटी मध्ये) | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) |
| 2016-17 | 2791.00 | 2820.70 | 2798.76 | 58.62 |
| 2017-18 | 3347.99 | 3347.99 | 3414.09 | 59.25 |
| 2018-19 | 3000.00 | 6000.00 | 5928.15 | 60.29 |
| 2019-20 | 2926.82 | 2690.00 | 2711.30 | 52.80 ** |

** reported by States/UTs as on 31.12.2020

वरील सारणीवरून असे निदर्शनात येते की, 2016-17 मध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती 2791 कोटी मान्य झाली आहे व त्यामध्ये 2820.70 वाढ झाली आहे.2798.76 कोटी वाटप करण्यात आले आहे व 58.62 लाख व्यक्तींना त्याचा फायदा झाला आहे. त्यानंतर 2017-18,2018-19,2019-20 यामध्ये अनुक्रमे 3347.99,3000,2926.82 कोटी रुपये मान्य करण्यात होती त्यानंतर त्यामध्ये काही सुधार करण्यात आले ते अनुक्रमाने 3347.99,6000,2690 कोटी रुपये करण्यात आले व त्याचा वाटप अनुक्रमे 3414.09,5928.15,2711.30 देण्यात आले आहे व त्याचा लाभ अनुक्रमे 59.25,60.29,52.80 लाख व्यक्तींना त्याचा फायदा झाला आहे. यावरून आपल्याला असे लक्षात येते की 2018 19 पर्यंत

त्याच्यामध्ये वाढ झाली आहे पण 2019 20 यामध्ये त्यामध्ये घट झाली आहे विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये घट झाली आहे हे हेच यावरून स्पष्ट होते.

### ३) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय फेलोशिप

या योजनेचे उद्दिष्ट अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना एम.फिल कडे व पीएचडी विज्ञान, सामाजिक विज्ञान यामध्ये शिक्षण घेण्यासाठी आर्थिक सहाय्यता होण्यासाठी त्यांना फेलोशिप देण्यात येते व यामध्ये आपण 2016-17 ते 2019-20 मध्ये किती व्यक्तींना फेलोशिप मिळाली याची माहिती आपल्याला पुढील प्रमाणे स्पष्ट करता येते.

| अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय फेलोशिप | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्षे | बजेट वाटप (कोटी मध्ये) | केंद्रीय सहाय्य (कोटी मध्ये) | फेलोशिप | | एकून |
| | | | पुरुषस्त्रि | | |
| 2016-17 | 200.00 | 196.00 | 1340 | 660 | 2000 |
| 2017-18 | 230.00 | 225.40 | 1065 | 935 | 2000 |
| 2018-19 | 300.00 | 255.81 | 1455 | 856 | 2311 |
| 2019-20 | 360.00 | 246.66 | 872 | 1507 | 2379 |

* As on 18-12-2020

वरील सारनीवरून असे निदर्शनात येते की, 2016 17 मध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय फेलोशिप 200 कोटी रुपये मान्य केले होते. व त्याच्यातली प्रत्यक्षपणे 196 कोटी वाटप करण्यात आला व त्याचा लाभ 2000 विद्यार्थ्यांना मिळाला. त्याचप्रमाणे अनुक्रमे 2017-18,2018-19,2019-20 मध्ये 230,300,360 कोटी रुपये मान्य करण्यात आले व त्याच्यातील अनुक्रमे 225.40,255.40,246.66 कोटी रुपये वाटप करण्यात आला व त्याचा लाभ अनुक्रमे 2000,2311,2379 व्यक्तींना देण्यात आलेल आहे. आपल्याला असे लक्षात येते की यामध्ये सरकारने मान्य केलेल्या रुपया तूं त्यांना वाटप केलेल्या पैशामध्ये कमी आहे.

### निष्कर्ष:

वर्ष 2016 -17 ते 2019-20 या कालखंडातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना करिता केंद्र सरकारने केलेल्या खर्चाचे अध्ययन केले असता असे निदर्शनास येते की, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व विद्यार्थ्यांनी खर्चात घट झाली आहे व विद्यार्थी संख्या वाढली आहे. पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती विद्यार्थ्यावरील खर्चात वाढ होत दिसत आहे व विद्यार्थी संख्येत वाढ होते. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय फेलोशिपमध्ये खर्चात वाढ होत आहे व विद्यार्थी संख्येत वाढ झाली आहे. त्यामध्ये तिन योजनांमध्ये सरकारने मान्य केलेल्या खर्चाचा पुरेपुर खर्च केला जातो की नाही याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे निदर्शनात आले आहे.

### संदर्भ ग्रंथसूची :

**1)**काकडे विजय (1997), “विदर्भ विभागातील माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या एक चिकित्सक अभ्यास” पीएच.डी शोध प्रबंध, अमरावती विद्यापीठ, अमरावती.

2)घाटोळे रा.ना. (2000):“समाजशास्त्रीय संशोधन तत्व पद्धती” श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर.

3) बोधनकर सुधीर व अलोणी विवेक (2003), “सामाजिक संशोधन पद्धती”, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर.

4) गुप्ता लक्षता (2006), “भारतीय समाज ओर शिक्षा” वंदना पब्लिकेशन, नई दिल्ली.

5) भारतीय अर्थसंकल्प 2021-22.

6) Annul Report 2022-21,Department of justice & Empowerment Ministry of Social justice & Empowerment Government of India.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भूमिहीन अनुसूचित जातीच्या आर्थिक विकासात कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमानी योजनेची भूमिका

भिमराव परमेश्वर वाघमारे
एम.ए. एम.फिल.अर्थशास्त्र विभाग ल
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## * प्रस्तावना :

पूर्वीपासूनच अनुसूचित जातीच्या लोकांची, सामाजिक, आर्थिक परिस्थिती दयनीय असल्याची दिसून येते. त्यांचे वास्तव्य गावाच्या बाहेर असे. गावाच्या कोणत्याही सांस्कृतीक, धार्मीक कार्यात त्यांना स्थान नव्हते. पूर्वीच्या काळी त्यांच्या वास्तव्याला मांगवाडा, महारवाडा, चांभारवाडा म्हणून ओळखले जायचे. काळाच्या ओघात सद्या थोडा बदल झाला असला तरी. ग्रामीण भागात जातीयता काही प्रमाणात मानली जाते. महत्मा फुले, शाहूमहाज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पासून प्रेरणा घेवून या जाती शैक्षणिक दृष्ट्या जागतृ होत आहेत. आजही त्यांच्या रोजगारासाठी शासनाने ठोस पावले उचललेली नाहीत. कायमस्वरुपी रोजगारासाठी समाज सातत्याने सरकारकडे आपला हक्क मागत असतो. १९९१ मध्ये सरकारने गायरानधारकांच्या नावाने जमिन करण्याचा आध्यादेश काढला. त्यात मराठवाड्यातील ८७२३० गायरान धारक कुटूंब असल्याचे नोंदविले गेले. त्या पेक्षा दुप्पट गायरानधारकांना ७११२ जमिन मिळाली नाही. जमिन सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत राज्य सरकारने १६ कोटी ३० लाख हेक्टर जमिन ताब्यात घेतली. यातील बऱ्याच जमिनी जमिनदारांनी स्वत:कडे ठेवल्या कॉ. पानसरे यांनी १९६२ साली जमिन बळकाव अंदोलन केले होते. कारण सरकार श्रीमंताच्या मागण्या मान्य करतो गरिबांच्या नाही. कर्मवीर दादासाहेब स्वाभीमान व सबलीकरण योजने अंतर्गत माराठवाड्यात २०१६ पर्यंत सरकारने विकत घेतलेल्या जमिनी पैकी केवळ १६ टक्के जमिनी वाटप केल्या आहेत. महाराष्ट्रात या योजनेचा लाभ १२९५ लाभर्थ्यांना दिला आहे. यावरून शासनाची जमिन वाटप करण्याची उदासिनता दिसून येते. राज्यात एकूण लोकसंख्येच्या सुमारे १० ते १५ टक्के लोकांना कसण्यासाठी स्वत:ची जमिन नसल्यामूळे जगण्याचा कोणताच अधिकार नाही. त्यामूळे त्यांना मजुरी करुन जिवन जगावे लागते.

दारिद्र्य रेषेखालील भूमिहीनांच्या सबलीकरणाचा एक भाग म्हणून सरकारने कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभीमान योजना सुरु करण्यात आली. मात्र यंत्रनेतील असंवेदनशीलतेमूळे तिला मरगळ आली आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलिकरण व स्वाभीमान योजना २००४ सुरु करण्यात आली आहे. शासनाने भूमिहीन शेतमजुरांना कायमस्वरुपी उत्पादनाचे साधन मिळावे म्हणून जमिनीची वाटप करण्यात आली आहे. या योजनेत कायम शेतमजुरी करणाऱ्यास शेतमातल देवून स्वाभीमान आणि शेतमजुरांच्या स्थालंतर थांबवण्याचे सामार्थ्य या योजनेमध्ये आहे. सर्वच कल्याणकारी यंत्रणेच्या अपयशात अमलंबजावणी यंत्रणेची असंवेदनशीलता वारंवार दिसून येते. जमिनीला सोन्यापेक्षा जास्त भाव आला आहे. त्याबात कसलाही विचार न करणारे मंत्री ही केवळ कागदोपत्री योजना जिवंत ठेवून भूमिहीनांच्या तोंडा पाने पुसत आहेत. त्यामूळे सदर योजना तळाला जात आहे. २००४—०५ मध्ये या योजनेअंतर्गत २० कोटींची तरदूत होती. प्रत्यक्षात मात्र १४ कोटी रुपये खर्च झाले. २००९—१० पर्यंत या योजनेसाठी ११५ कोटी रुपायांची तरतूद केली असताना ६.९३ कोटी खर्च झाला. सर्वच जिल्ह्यातील निधी अर्खचित राहिला याचा अर्थ सदर योजना विफल होत आहे. जमिन खरेदी विक्रीच्या व्यवाहारत शिरलेल्या अधिकाऱ्यांनी पूर्ण महाराष्ट्रात जमिनीचे भाव आभाळाला भिडवले आहेत. म्हणून भूमिहीनांना खरेच स्वाभीमानी व स्वालंबी बनवायचे असेल तर ताबडतोब असेल तर ताबाडतोब जमीनी बाजार भावाने खरेदी करण्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे प्रतिवर्षी किमान २०० कोटीची आवश्यकता करणे आवश्यक आहे.

मानवाला जिवन जगण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या गरजा असतात. त्याच प्रमाणे आपली वाटचाल करुन आपल्या गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करत असतो. जेव्हा गरजांची पूर्तता होत नाही तेंव्हा समस्या निर्माण होतात. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अनुसूचित जातीच्या विकासासाठी किंवा त्यांचा रोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी कर्मवीर दादासाहेब सबलीकरण व स्वाभामानी योजना राबविण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजुर कुटूंबाना ४ एकर जिरायात,कोरडवाहू किंवा २ एकर बागायती जमिन वाटप करण्यात येते. अनुसूचित व नवबौध्द कुटूंबाला उदरर्निवाहाचे साधन उपलब्ध नसल्याने त्यांना रोजगार हमी मध्ये किंवा प्रस्थापित

लोंकाच्या शेतीमध्ये मजुरी करावी लागते. परिणामी त्यांच्या उत्पादनाचे स्त्रोत वाढवावे व त्यांच्या राहनिमानात बदल व्हावा व मजुरी वरील अवलंबीत्व कमी होऊन त्यांना कायमस्वरुपी उत्पादनाचे साधन निर्माण व्हावे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. योजनेचा लाभ मिळालेल्या लाभर्थ्यांची आर्थिक व सामाजिक स्थितीत बदल झााला आहे का हे तपासणे आवश्यक आहे.

**संशोधन अभ्यासाचे महत्व :**

महाराष्ट्रातील सर्व जाती—जमातीतील दुर्बल घटकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक आणि सांस्कृतीक विकासाची गेल्या ५० ते ६० वर्षापासून वाटचाल सुरु आहे. ही वाटचाल समाजिक न्यायाचे दिशेने होत आहे. मागील काही कालावधीचा विचार केला तर काही धारेणात्मक निर्णय,विषय, दुरदृष्टी नियोजन आणि घेतलेल्या भूमिकाकडे पाहता राज्य शासनानाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत अनेक योजना समाजातील दुर्बल घटकासाठी राबविण्यात आल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात मुंबई उपनगर व मुंबईनगर सोडता सदरिल योजना ही महाराष्ट्रभर राबविण्यात आली आहे. त्यामध्ये मराठवाड्यात या योजनेची अमलबंजावणी झालेली दिसून येते. मराठवाड्यात सातत्याने पाण्याची प्रश्न उद्‌भवला आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्यात रोजगारांच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध झालेल्या आहेत. लोकांना रोजगारांसाठी दुसऱ्यांच्या शेतावर कामाला जावे लागते. अशा लोकांना कायमस्वरुपी रोजगार मिळावा म्हणून सदरील योजनेचा प्रारंभ २००४—०५ मध्ये करण्यात आला आहे. मराठवाड्यातील वेगवेळ्या जमीनीच्या बाबतच्या समस्या शासनासमोर मांडण्यासाठी हा संशोधनिबंध विषय निवडण्यात आला आहे. मराठवाड्यातील अनुसूचित जातीची सद्यस्थिती व त्यांच्या विकासासाठी राबवलेल्या कर्मवीर दादासाहेब गायकावाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेचा अभ्यास करणे महत्वाचा आहे. लाभर्थ्यांची जमिन मिळण्यापूर्वीची स्थिती व जमिन मिळाल्यानंतरची स्थिती समाजिक, आर्थिक जिवनावर काय परिणाम झाला आहे. हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात अनुसूचित जातीची संख्या मोठी आहे. भारताचा विकास करायवायचा असेल तर अनुसूचित जातीचा विकास करणे आवश्यक आहे. यामूळे प्रस्तुत शोध निबंधातअनुसूचित जातीच्या परिस्थितीचा अभ्यास करुन त्यात कोणत्या आडचणी येतात हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**उदिष्ट्ये :**

१) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबीलकरण व स्वाभिमान योजनेचा अभ्यास करणे.

२) अनुसूचित तातीपैकी कोणत्याा जातीतील व्यक्तींना या योजनेचा लाभ जास्त प्रमाणात झााला आहे याचा अभ्यास करणे.

३) लाभार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे.

४) अपात्र लाभर्थ्यांच्या अडचणी समजावून घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक, तुलनात्मक, अन्वेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**प्राथमिक स्त्रोत :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत म्हणून अनुसूची, निरीक्षण खुलीचर्चा इत्यादींचा वापर
केला आहे.

**द्वितीस स्त्रोत:**

द्वितीय स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ मासिके, सप्तीहिके, नियतकालीके, वर्तमानपत्रे, जनगणना अहवाल, संकेतस्थळाच्या माध्यमातून माहिती संकलित केली आहे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबीलकरण व स्वाभीमानी योजनेच्या लाभर्थ्यांची माहिती अनुसूचिद्वारे घेण्यात आली आहे. सन २००४—०५ पर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यात १२५ मंजुरी अर्ज आहेत. त्यापैकी ११२ अर्जदरांनी जमिन वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत १३ लाभर्थ्यांना जमिन वाटप करण्यात आली नाही. या १३ वंचित लाभार्थ्यांना भेटून त्यांचे प्रश्न समजावून घेण्यात आले आहे. शासनाला वेळोवेळी अर्ज विनंती करुन देखिल शासनाचे अधिकारी टाळाटाळ करत असल्याचे व गांभीर्याने नसल्याचे वंचित लाभार्थ्यांनी कळवले आहे. १३ लाभर्थ्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असताना देखिल त्यांना अद्यापही जमिन का देण्यात आली नाही असा प्रश्न समाज कल्याण सबंधीत अधिकऱ्यांना विचारला असता शासनाने सदरील योजनेचा निधी हा जमीनीच्या रेडीरेकनर पेक्षा कमी असल्याने जमीनीची उपलब्धता होत नसल्याचे समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून कळविण्यात आले आहे. जमिनीच्या रेडीरेकनरच्या दराप्रमाणे जमीन उपलब्ध

झाल्यास सदरील लाभर्थ्यांना रितसर जमिन वाटप करण्यात येईल. असे संबधित समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून कळवण्यात आले आहे.

**जातीनीहाय लाभर्थ्यांची संख्या :**

सदरील योजनेच्या सर्वेक्षणासाठी जातीनिहाय लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये चार जातीय समुहातील लाभार्थी निवडण्यात आली आहे. महार, मातंग, चांभार, ढोर, या चार जाती आहेत.

**जातीनिहाय लाभार्थी**

| .अ. क्र | लाभार्थ्याची जात | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महार/बौध्द | ७७ | ७७ |
| २ | चर्मकार | ५ | ५ |
| ३ | मतंग | १७ | १७ |
| ४ | ढोर | १ | १ |
| | **एकूण** | १०० | १०० |

संदर्भः सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट २०२१

वरील तक्त्यावरुन आपल्याला दिसून येते की, ७७ टक्के लाभार्थी हे महार/बौध्द या जातीचे आहेत. तर ५ टक्के लाभर्थी हे चर्मकार या जातीचे आहेत. १७ टक्के लाभार्थी हे मातंग या जातीचे आहेत. १ टक्के लाभार्थी हे ढोर जातीचे आहेत. सर्वाधिक लाभर्थी महार/बौध्द या जातीचे आहेत.

**जातीनिहाय लाभर्थ्यांची शैक्षणिक स्थिती :**

सदरील योजनेच्या लाभर्थ्यांचा अभ्यास करत असताना लाभर्थ्यांची शैक्षणिक स्थिती तपासणे आवश्यक ठरते. चार जातीय समुहातील लाभर्थ्यांचे शिक्षण कुठपर्यंत झाले आहे. तसेच शिक्षणामूळे लाभार्थ्यांचा सार्वगीन विकास झाला आहे किंवा नाही हे समजण्यास मदत होते.

जातीनिहाय लाभर्थ्यांची शैक्षणिक स्थिती

| अ.क्र | लाभार्थ्यांची जात | शैक्षणिक स्थिती | | | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | |
| १ | महार/बौध्द | ४० (५२) | ३१ (४०) | ०६ (०८) | १०० |
| २ | चर्मकार | ०१ (२०) | ०३ (६०) | ०१ (२०) | १०० |
| ३ | मातंग | ०९ (५३) | ०८ (४७) | ०० | १०० |
| ४ | ढोर | ०० | ०१ (१००) | ०० | १०० |
| | एकूण | ५० | ४५ | २८ | १०० |

टीप : कंसातील आकडे हे प्रत्येक जातीची स्वतंत्र टक्केवारी दर्शवितात

संदर्भः सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट २०२१

वरिल तक्त्यावरुन आपल्याला दिसून येते की, महार/बौध्द या जातीतील ४० म्हणजेच ५२ टक्के लाभार्थी हे निरक्षर आहेत. तर ३१ म्हणजेच ४० टक्के लाभार्थ्यांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. ६ म्हणजेच ८ टक्के लाभर्थ्यानी आपले माध्यमीक शिक्षण पूर्ण केले आहे. चर्मकार या जातीतील १ म्हणजे २० टक्के लाभार्थी हे निरक्षर आहेत. तर ३ म्हणजेच ६० टक्के लाभर्थ्यांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. १ म्हणजेच २० टक्के लाभर्थ्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. मातंग याजातीतील ९ म्हणजेच ५३ टक्के लाभार्थी हे निरक्षर आहेत. तर ८ म्हणजेच ४७ टक्के लाभर्थ्यांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. ढोर या जातीतील १ म्हणजेच १०० टक्के लाभार्थ्यांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमानी योजने अंतर्गत जमीन मिळण्यापूर्वी असलेली जमीन**

सदरील योजनेच्यापूर्वी लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध होती किंवा नव्हती हे तपासणे महत्वाचे ठरते. जमीन नसल्यामूळे लाभार्थ्यांना नोकरी किंवा व्यवसायावर अवलंबून रहावे लागत असे. किंवा दुसऱ्याच्या शेतावर कामगार म्हणून काम करावे लागत असे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभामानी योजनेअंतर्गत जमीन मिळण्यापूर्वी असलेली जमीनीचा तपशील

| अ.क्र | लाभार्थ्यांची जात | कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभामानी योजनेअंतर्गत जमीन मिळण्यापूर्वी असलेली जमीनीचा तपशील | | संख्या |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १ | महार/बौध्द | १५ (१९) | ६२ (८१) | ७७ |
| २ | चर्मकार | ०० | ०५ (१००) | ५१०० |
| ३ | मातंग | ०२ (१२) | १५ (८८) | १७ |
| ४ | ढोर | ०० | ०१ (१००) | ०१ |
| एकूण | | १७ | ८३ | १०० |

टीप : कंसातील आकडे हे प्रत्येक जातीची स्वतंत्र टक्केवारी दर्शवितात

संदर्भ: सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट २०२१

वरील तक्त्यावरुन दिसून येते की, कर्मवीर दादासाहेब गायकावाड सबलीकरण व स्वाभीमानी योजनेअंतर्गत जमीन मिळण्यापूर्वी महार/बौध्द या जातीतील १५ म्हणजेच १९ टक्के लाभार्थ्यांकडे जीमन होती. तर ६२ म्हणजेच १२ टक्के लाभार्थ्यांना जीमन होती तर १५ म्हणजेच ८८ टक्के लाभार्थ्यांना जमीन नव्हती. ढोर या जातीतील १ म्हणजेच १०० टक्के लाभार्थ्यांना जमीन नव्हती. चर्मकार या जातीतील ५ म्हणजेच १०० टक्के लाभार्थ्यांना जमीन नव्हती.

**लाभार्थ्यांना मिळालेल्या जमीनीचा प्रकार :**

योजनेच्या माध्यामातून लाभार्थ्यांनी कोणत्या प्रकारची जमीन मिळाली आहे. हे संशोधनिबंधाच्या दृष्ठीने महत्वाचे ठरते. चांगल्या सुपिक प्रकारची जमीन लाभार्थ्यांना मिळाल्यास त्याचे उत्पन्न वाढेल अन्यथा डोंगराळ भागात लाभार्थ्यांना जमीन मिळाल्यास त्याचे उत्पन्न कमी होईल.

जतीनिहाय लाभार्थ्यांना मिळालेल्या जमिनीचा प्रकार दर्शविणारा तक्ता

| अ.क्र | लाभार्थ्यांची जात | लाभर्थ्याला मिळालेल्या जमिनीचा प्रकार | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जमीन डोंगार उतारावर आहे. | खडकाळ | मुरमाड | पडीक | इतर | |
| १ | महार/बौध्द | ११ (१४) | ०५ (०६) | १८ (२३) | २० (२६) | ०१ (२५) | ७७ |
| २ | चर्मकार | ०० | ०० | ०३ (६०) | ०१ (२०) | ०१ (२०) | ५ |
| ३ | मातंग | ३ (१८) | ०२ (१२) | ०३ (१८) | ०३ (१८) | ०६ (२०) | १७ |
| ४ | ढोर | ०० | ०० | ०० ०० | ०१ (१००) | ०० | ०१ |
| एकूण | | १४ | ०७ | २४ | २५ | ०१ | १०० |

टीप : कंसातील आकडे हे प्रत्येक जातीची स्वतंत्र टक्केवारी दर्शवितात

संदर्भ: सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट २०२१

वरिल तक्त्यावरुन दिसून येते की, महार/बौध्द ११ म्हणजेच १४ टक्के लाभार्थ्यांना जमीन ही डोंगराच्या उतारवर मिळालेली आहे. तर ५ म्हणजेच ६ टक्के लाभार्थ्यांना खडकाळ स्वरुपाची जमीन मिळाली आहे. तर १८ म्हणजेच २३ टक्के लाभार्थ्यांना मुरमाड स्वरुपाची जमिन मिळाली आहे. तर २० म्हणजेच २६ टक्के लाभार्थ्याना पडिक स्वरुपाची जमिन मिळाली आहे. तर १ म्हणजेच २० टक्के लाभार्थ्यांना अन्य स्वरुपाची जमिन मिळाली आहे.

मातंग या जातीतील ३ म्हणजे १८ टक्के लाभार्थ्यांना डोंगर उतारवार जमीन मिळाली आहे. तर २ म्हणजेच १२ टक्के लाभधारकांना खडकाळ स्वरुपाची जमिन मिळाली आहे. तर ३ म्हणजेच १८ लाभार्थ्यांना मुरमाड स्वरुपाची जमीन मिळाली आहे. तसेच ६ म्हणजेच ३४ टक्के लाभार्थ्यांना अन्यस्वरुपाची जमीन मिळाली आहे. ढोर या जातीच्या १ म्हणेजच १०० टक्के लाभार्थ्यांना अन्य स्वरुपाची जमिन मिळाली आहे.

जातीनिहाय लाभार्थ्यांचे योजनेच्या माध्यमातून जमिन मिळण्यापूर्वीचे जमिनमिळण्यापूर्वीचे उत्पन्न

| अ.क्र | लाभार्थ्यांची जात | लाभार्थ्यांचे जमिन मिळण्यापूर्वीचे उत्पन्न | | संख्या |
|---|---|---|---|---|
| | | ३०००० हजार रु ते ५०००० रु | ६०००० ते ९०००० हतार रुपये | |
| १ | महार/बौध्द | ४३ (५६) | ३४ (४४) | ७७ |
| २ | चर्मकार | ०३ (६०) | ०२ (४०) | ५ |
| ३ | मातंग | ०९ (५३) | ०८ (४७) | १७ |
| ४ | ढोर | ०० | ०१ (१००) | ०१ |
| एकूण | | ५५ | ८३ | १०० |

टीप : कंसातील आकडे हे प्रत्येक जातीची स्वतंत्र टक्केवारी दर्शवितात

संदर्भ: सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट २०२१

वरिल तक्त्यावरुन आपल्याला दिसून येते की जातीनिहाय योजनेच्या माध्यामतून जमिन मिळण्यापूर्वीचे उत्पन्न किती होते. हे लक्षात येते. महार/बौध्द या जातीतील ४३ म्हणजेच ५६ टक्के लाभार्थ्यांचे जमीन मिळण्यापूर्वीचे उत्पन्न ३० ते ५० हजार रुपायांच्या दरम्यान होते. तर ३४ म्हणेजच ४४ टक्के लाभार्थ्यांचे उत्पन्न हे ६० ते ९० हजारांच्या दरम्यान होते. तर चर्मकार या जातीच्या लाभार्थ्यांचे ३ म्हणेजेच ६० टक्के लाभार्थ्यांचे उत्पन्न हे ३० ते ५० हजार रुपायांच्या दरम्यान होते. तर २ म्हणजेच ६० लाभार्थ्यांचे उत्पन्न हे ६० ते ९० हजार रुपयांच्या दरम्यान होते. मातंग या जातीतील ९ म्हणजेच ५३ टक्के लाभार्थ्यांचे उत्पन्न हे ३० ते ५० हजाराच्या दरम्यान होते. तर ८ म्हणजेच ४७ टक्के लाभार्थ्यांच्या उत्पन्न ६० ते ९० हजार रुपायांच्या दरम्यान होते. ढोर या जातीतील १ म्हणजेच १०० टक्के लाभार्थ्यांचे उत्पन्न हे ६०ते ९० हजाराच्या दरम्यान होते.

**लाभार्थ्यांचे जमीन मिळाल्यानंतरचे उत्पन्न :**

सदरील योजनेच्या आगोदर उत्पन्न व योजना मिळाल्या नंतरचे उत्पन्न विचारात घेणे आवश्यक ठरते. या करिता उत्पन्नाच्या तीन पातळ्या ठरविण्यात आल्या आहेत. उत्पन्नाची पहिली पातळी ३०ते ५० हजाार दुसरी उत्पन्नाची पातळी ६० ते ९० हजार तिसरी उत्पन्नाची पातळी १ लाख २० हजार ते २ लाख अशा प्रकारे ठरविण्यात आल्या आहेत.

लाभार्थ्यांचे जमिन मिळाल्यानंतरचे उत्पन्न

| **अ.क्र** | लाभार्थ्यांचे जमिन मिळाल्यानंतरचे उत्पन्न | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| | ३०००० ५०००० | ६०००० ९०००० | १२०००० २००००० | |
| १ | १६ | १४ | ३१ | ५१ |
| **एकूण** | १६ | १४ | ३१ | ५१ |

संदर्भ: सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट २०२१

वरील तक्त्यावरुन आपल्याला दिसून येते की, जमीन मिळाल्यानंतर १६ टक्के लाभार्थ्यांचे उत्पन्न ३० ते ५० हजाराच्या दरम्यान आहे. तर १४ टक्के लाभर्थ्यांचे उत्पन्न हे ६०ते९० हजाराच्या दरम्यान आहे. तर ३१ टक्के लाभार्थ्यांचे उत्पन्न १. २० लाख ते २ लाखापर्यंत आहे.

**लाभार्थ्यांनी योजना सुलभ करण्यासाठी केलेल्या सूचना :**

सदरील योजनेसाठी लाभार्थ्यांनी योजनेसाठी सूचना करणे आवश्यक आहे. यामूळे योजनेत सूलभता आणाता येईल. या अनुषंगााने लाभार्थ्यांची मते विचारात घेतली आहे.

लाभार्थ्यांच्या अनुषंगाने सदरील योजनेत बदल करुन काय सुलभता आणता येईल या बद्यल सुलभा आणता येईल याबद्यल माहिति दर्शविणारा तक्ता

| अ. क्र | योजनेच्या संदर्भात लाभार्थ्यांना केलेल्या सूचना | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था करावी | १८ | १८ |
| २ | शेतीसाठी लागणारे अवजारे विकसीत करावेत | ०९ | ०९ |
| ३ | शासनाने बैलजोडी,बी बीयाणे उपलब्ध करुन द्यावेत | १५ | १५ |
| ४ | व कसण्या योग्य जमीन द्यावी | २६ | २६ |
| ५ | कर्ज उपलब्ध करुन द्यावी | १२ | १२ |
| ६ | अन्य प्रगतीचा आढावा घेऊन योजनेत सुधारणा कराव्यात | २० | २० |
| | एकूण | १०० | १०० |

संदर्भः सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट २०२१

वरील तक्त्यावरुन आपल्याला दिसून येते की, योजने संदर्भात लाभार्थ्यांनी सुचना केल्या आहेत. १८ टक्के लाभार्थ्यांना वाटते की, शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था करावी. तर ९ टक्के लाभार्थ्यांना वाटते की, शेतीसाठी लागणारी अवजारे विकसीत करावे. तर १५ टक्के लाभार्थ्यांना वाटते की, जमीनी बरोबर शासनाने बैलजोडी बी—बीयाणे उपलब्ध करुन द्यावेत. तर २६ टक्के लाभार्थ्यांना वाटते की, शासनाने कसण्यायोग्य जीमन द्यावी. तर १२ टक्के लाभार्थ्यांना वाटते की, शासनाने जमीन कसण्यासाठी कर्ज द्यावे. तर २० टक्के लाभार्थ्यांना वाटते की, अन्य प्रगतीचा आढावा घेवून शासनाने योजनेत सुधारणा कराव्यात.

**सारांश :**

योजनेतील लाभार्थ्यांचा झालेल्या आर्थिक , सामाजिक, घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. कर्मवीर दादासाहेब गायकावाड व सबलीकरण व स्वाभीमान योजनेतील लाभार्थ्यांना जमीन मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या आर्थिक विकासात बदल झाल्याचे दिसून येतो. काही लाभार्थ्यांना कसण्यायोग्य जमिन नसताना देखील त्यामध्ये मशागत करुन उत्पादन वाढवले आहे. योजनेअंतर्गत मिळालेल्या जमिनी या मुरमाड आहेत. लाभार्थ्यांना पीक कर्ज घेतले आहेत. एकंदरीत या योजनेमूळे अनुसूचित जातींना आर्थिक दिलासा मिळाला आहे. शासनाने योग्य नियोजन करुन लाभार्थ्यांच्या सुचना लक्षात घेऊन योग्य पाऊल उचलायला पाहिजे.

**निष्कर्ष**

१ योजनेतील लाभार्थी हे अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील असल्याने ते महार,चर्मकार, मातंग, ढोर पोटजातीत मोडतात त्यामधून महार/नवबौध्द जाती लाभार्थी मोठ्या प्रमाणात आहेत.

२ कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमान योजनेअंतर्गत दारिद्र रेषेखाली भूमिहीन अनुसूचित जाती व नवबौध्द कुटूंबाना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांना कसण्यासाठी १०० टक्के अनुदानीत निधी उपलब्ध करुन द्यावा. असा शासन निर्णय आहे. या निर्णयाचा विचार करुनच जमिनी वाटप करण्यात आल्या आहेत.

३ कायम उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध व्हावेत हा या योजनेचा उद्देश होता. मात्र पूर्ण पणे कायमस्वरुपाचे उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध झाले नाहीत.

४ सुरवातीच्या काळात योजनेला मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला नंतर योजनेच्या निधीला टाळाटाळ होताना दिसत आहे.

५ सदरील योजना ही केवळ जीमन वाटप करण्यापूरतीच मर्यादीत राहिली असून अनुसूचित जातीच्या कुटूंबातील भूमिहीन शेतमजुरांच्या

सबलीकरणाचा व स्वाभीमानाचा खरा भाग म्हणून कोणतेही इतर प्रयत्न या योजनेत झालेला दिसून येत नाही.

६ कर्मवीर दादासाहेब गायकावाड सबलीकरण व स्वाभीमान ही योजना सर्वच लाभार्थ्यांच्या दृष्टीकोनातून फायदेशीर तरी ही ही योजना आणखी संपली नाही हे लक्षात घेतले पाहिजे. जमिन कसण्यासाठी शासनाकडून लाभार्थ्यांना विविध बाबींची पूर्तता होत नाही.

संदर्भ सूची :


1. Ambedkar B.R (1968) : "Annitiilation of Caste with a reply to mahatma Gandhi, and Castes in India : Their mechanism genesis, and development", Bheem ptrika Publications, Jalndhar city P. 3738.
2. घाटोळे रा.ना २००३, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
3. नागपूर युनिक फ्युचर्स २०१०
4. Anand Sugandhe,Vinod Sen (2015) ; " Scheduled Castes in Maharashtra: Struggle and Hardles in their Socio-Economic Development" Dalit Studies Journal of Indian Research Vol-3 No-3 July- September-2015, P.57
5. पुणे शासन निर्णय, सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य विशेष साहय्य विभाग क्रमांक जीमन २०१२/५५५/प्र.क्र/३अ.जा.क्र/मंत्रालय मुंबई दि.१३मार्च २०१८
6. सर्वेक्षण पाहणी ऑगस्ट 2020

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राजर्षी शाहू महाराज – एक राष्ट्रपुरूष

*प्रा. डॉ. डी.डी.जोंधळे*
*(इतिहास विभाग प्रमुख)*
*श्री बा.दे.पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.*

---

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करण्यात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजर्षी शाहू महाराज बद्दल स्पष्ट म्हटले होते. शाहूराजा नुसता मराठा नव्हता, ब्राम्हणेतरही नव्हता. तर तो नव युगातला सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरूष होता.

राष्ट्र निर्मितीच्या मार्गात आपला मुख्य अडथळा आपल्यावर इंग्रजांनी लादलेले पारतंत्र्य हा मानला गेला आणि म्हणून हे पारतंत्र्य नष्ट करून देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी ज्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले त्या सर्वांना आपण राष्ट्रपुरूष मानत आलो.

पण आता देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर ५० वर्षाचा या कालखंडात आम्हाला सामाजिक स्वातंत्र्याचे महत्व वाटू लागले. आणि मग म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर यासारख्या महान व्यक्तींनी सामाजिक स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य पाहून आपण त्यांना ‘ राष्ट्रपुरूष ’ म्हणून मानू लागलो आहोत. याचा अर्थ असा की, राजकीय स्वातंत्र्याची चळवळ चालविणा–या नेत्यांना जसे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करावयाचे होते. उलट सामाजिक स्वातंत्र्यासाठी लढणा–या नेत्यांचा स्वातंत्र्याचा संकल्पनेचा आबाका सर्वस्पर्शी होता. दुस–या शब्दात दोन्ही पक्षाच्या नेत्यांना एक बलवान, एकात्म, एकसंघ राष्ट्र निर्माण करायचे होते. त्यासाठी दोन्ही पक्षांतील नेत्यांना सर्व हिंदी बांधवांनी एक होवून लढा दिला पाहिजे असे वाटत होते. पण एकाचा लढा राजकीय स्वातंत्र्यासाठी होता, तर दुस–याचा लढा सामाजिक स्वातंत्र्यासाठी होता, या दोन्ही लढयासाठी ‘ राष्ट्रीय एकात्मता ’ ही दोन्ही पक्षांची पहिली गरज होती.

या पार्श्वभूमीवर राजर्षी शाहू छत्रपतींनी राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यासाठी कोणते विचार मांडले व त्यानुसार कोणती कृती केली. ते पाहणे उदबोधक ठरले.

राजर्षी शाहू महाराजांच्या दृष्टिने राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात प्रामुख्याने चार मोठे अडथळे होते. ते असे

१. धर्मभेदातून निर्माण होणारी विद्वषी भावना.
२. वर्णभेद अथवा जाती भेदातून निर्माण होणारी विषमतेची भावना.
३. अस्पृश्येतून निर्माण होणारी अमानुषतेची भावना.
४. बहूजनाच्या निरक्षरतेतून निर्माण होणारी अज्ञानपणाची भावना.

यापैकी अस्पृश्यतेची प्रथा आता कालबाहय व इतिहास जमा झालेली असली तरी धर्मभेद , जातीभेद व अज्ञान या तीन मुख्य शत्रुंना आपण अद्यापही नष्ट करू शकलेलो नाही. या स्थितीत शाहू छत्रपतींचे विचार आजही आपणांस मार्गदर्शक ठरतात.

## शाहू आणि धर्मविद्वेषनिर्मूलन

आपल्या देशामध्ये हिंदू आणि मुस्लिम हे दोन मोठे समाज आहे. इतिहासात ते कधी एकत्र तर कधी एकमेकांविरूध्द उभे राहिलेले दिसतात. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिने हिंदू–मुस्लिम ऐक्य या बावीस महाराजांच्या मते फार महत्व होते. महाराजांच्या राज्य रोहनानंतर सन १८९४ साली पुण्यातील ‘ सार्वजनिक सभेने ’ महाराजांचा सत्कार केला. त्या सत्काराला उत्तर देतांना त्यांनी नुकत्याच मुंबई, पुण्यात झालेल्या हिंदू मुस्लिम दंगलीचा उल्लेख करून म्हटले होते की, ‘‘ या दोन समाजात सलोखा आणि शांतता निर्माण केली जावी. हिंदू व मुस्लिम या दोन्ही समाजातील नेत्यांनी या दृष्टिने प्रयत्न केले असतीलच, पण त्याचबरोबर सार्वजनिक सभेच्या नेतेमंडळांनी सलोखा व्हावा म्हणून प्रयत्न करावेत.’’

म्हणजे हिंदू मुस्लिम एकतेचा विचार आपल्या कारकिर्दीच्या प्रारंभापासून या राज्याच्या मनात ठाण मांडून बसला होता, हे स्पष्ट आहे. महाराजांना सर्व जातीजमातींचा उध्दार करावयाचा होता. मुस्लिम समाज या देशातील भारतीय समाजाचे अविभाज्य अंग असून तेही अंग प्रगत झाले पाहिजेत या दृष्टिने त्यांनी आपल्या अधिकाराचा पुढे उपयोग केलेला दिसतो. आपल्या राज्यातील सर्वधम, वर्ण हे बंधुभावाने एकमेकांच्या साहचर्याने एकमेकांत गुंतले तर हिंदू मुस्लिम ऐक्य घडून येईल, अशी त्यांना खात्री होती.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिने हिंदू मुस्लिम ऐक्य ही गोष्ट आजच्या घडीला एक काळाची गरज बनली. शाहू महाराजांनी १०० वर्षापूर्वी ती जाणली होती. ते आपल्या देशाचे भविष्य, भवितत्व घडवित होते. पण आम्ही याचे महत्व जाणू शकलो नाही.

महाराष्ट्रातील मराठा व मुसलमान या दोन समाजात एक धर्म सोडला तर चालीरितीत फारसा फरक नाही, ही बाब निदर्शनास आणतांना शाहू महाराज म्हणतात, ‘‘ मुसलमान हे नेहमी मराठा प्रमाणे क्षात्रकर्म करीतात, त्यांच्या चालीरिती ही बहूतेक मराठाप्रमाणेच आहे. मराठयांचा फौजेत

मोठ–मोठे मुसलमान सरदार होते. त्याच प्रमाणे मुसलमानाच्या फौजेत मराठे सरदार होते. हल्ली इंग्रजांच्या फौजेत मराठे व मुसलमान खांदयाला खांदा लावून लढले.'' अशाप्रकारे मुसलमान समाज हा या देशात कोणी परका नसून तो इथल्या बहूजन समाजाचा एक भाग आहे. हे समाज म्हणावर ठसविण्याचा प्रयत्न ाहू महाराजांनी केला.

**राजर्षी शाहू आणि जातिभेद निर्मुलन**

आपल्या देशातील समाज प्रथम धर्मभेदाने व नंतर त्या धर्मातील जातीभेदांनी अनेक लहान मोठया विभागात वाटला गेला होता. जातीभेदांची तिव्रता इतर सर्वच धर्मापेक्षा हिंदू धर्मात अधिक होती. हिंदू धर्मात जातीची जी उतरंड होती तिच्यात प्रत्येक वरची जात खालच्या जातीला कनिष्ठ दर्जाची समजत होती. हिंदू धर्मातील लोकांना एखादेवेळी धर्म बदलता येत होता पण जात बदलता येत नव्हती. अशा या जाती व्यवस्थेसंबंधीत महाराजा म्हणतात......

'' हिंदूस्थानाशिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्याला जात नाही. परंतु दुर्दैवाने हिंदूस्थानात मात्र जातीभेद इतका तीव्र आहे की, मांजर, कुत्रे किंबहूना शेणापेक्षा देखील कमी अशाप्रकारे आम्ही आपल्या देशबांधवास व भगिनीस वागविले व अजूनही आम्ही गैरशिस्त पुढारी करतो. म्हणून गरीब लोक अहमदाबाद, अमृतसर सारख्या ठिकाणी व मागे मुंबईस झालेल्या दंग्यासारख्या प्रसंगी बळी पडतात. तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातीभेद मोडून आम्हास मनु यप्रमाणे वागवतील असे पुढारी आम्हास पाहिजेत.''

अशा या जातीभेदाचे मुख्य कार्य जातीद्वेष निर्माण करणे हेच आहे. त्यातून निर्माण होणा–या देशविघातक परिणामांची चर्चा करताना शाहू महाराज म्हणतात,

' जातिभेदाचे कार्य जातिद्वेष हे आहे. जातिद्वेष हा हिंदूस्थानचा पुराणा रोग आहे. त्यासाठी जातिभेद मोडून आपण सर्व एक होऊ या.'' पुढे ते म्हणतात की, हिंदूस्थानास जी गुलामगिरी आज हजारो वर्षे भोगावी लागत आहे, तिचे प्रधान कारण जातिभेद हे आहे. जातिभेद व अस्पृश्यता हा हिंदू समाजावरील कलंक असून सामाजिक विषमता व पारतंत्र्यास तो कारणीभूत आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

जातिभेद मोडण्याची सुधारणा खालून वर अशी न होता, ती वरून खाली अशी झाली पाहिजे. असे प्रतिपादन करताना महाराज म्हणतात, '' जपानमधील जातिभेदाचा बिमोड होण्यास मोठे कारण उच्च वर्गाच्या सामुराई लोकांनी सुरूवात केली हेच आहे. तसे झाले नसते तर जपानची स्थिती सुधारली नसती. जातिभेद मोडण्याचे प्रयत्न केवळ खालच्या वर्गाकडून सुरू झाल्यास त्याचे परिणाम अनर्थावह होण्याचा संभव आहे. तेच काम उच्च म्हणविणा–या लोकांकडून प्रथम झाल्यास, हे स्वार्थत्यागाचे उदाहरण इतर सर्व जातींना बोधप्रद होईल.''

महाराजांच्या मते आंतरजातीय विवाह हा जातिभेदाचे निर्मूलन करण्याचा प्रभावी मार्ग होता. १९१७ साली भारत सरकारने पटेल बिलावर आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला. पटेल बिलाचा जाहिर पुरस्कार करताना महाराजांनी म्हटले होते की, '' या देशाची उन्नती लवकर किंवा उशिरा होणे, हे येथील जातिभेद ज्या प्रमाणात नाहीसा होईल, त्यावर अवलंबून आहे. हा जातिभेद नाहीसा होण्यास भिन्नभिन्न जातींचे शरीरसंबंध विस्तृत प्रमाणावर होणे फार जरूर आहे..... असले विवाह कायदेशीर ठरले पाहिजेत व त्यापासूनच्या संततीस औरस संततीचे सर्व हक्क मिळाले पाहिजेत.''

स्वत: महाराजांनी आपल्या संस्थानात १९१९ साली आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा लागू केला. एवढेच नव्हे तर कोल्हापूर व इंदूर या दोन संस्थानांच्या दरम्यान १०० आंतरजातीय विवाह ठरवून त्यापैकी २५ आंतरजातीय विवाह–घडवूनही आणले. महाराजांच्या भगिनी चंद्रप्रभाबाई यांचा इंदूरचे राजपुत्र यशवंतराव होळकर यांच्याशी झालेला ' धनगर–मराठा विवाह' हा यातील प्रमुख आंतरजातीय विवाह होता.

**राजर्षी शाहू आणि अस्पृश्यतानिर्मूलन**

अस्पृश्यता हे जातिभेदाचेच एक हिडीस स्वरूप होते. शाहू महाराजांनी जातिभेदाबरोबरच या प्रथेच्या निर्मुलनासाठी मोठा संघर्ष केलेला दिसतो. अस्पृश्य समजल्या गेलेल्या या मागासलेल्या जातींना माणूस म्हणून त्यांच्या नैसर्गिक हक्कांची जाणीव निर्माण करून देत असताना, अस्पृश्यता ही हिंदू धर्मास केवढी शरमेची बाब आहे, याचे स्पष्टीकरण करताना ते म्हणतात.

'' आपल्या धर्मात जातिभेदामुळे जो उच्चनीचपणा आलेला आहे, अशा प्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवरील कोणत्याही दुस–या धर्मात नाही. जातिभेदाचे अत्यंत हिडीस स्वरूप जर कोठे असेल तर इतर जातीकडून तुम्हाला ज्या रीतीने वागविण्यात येते त्याा रीतीत दिसून येते, तुम्ही आमचे बंधू असता तुम्हाला अस्पृश्य म्हणून लेखून मांजरे, डुकरे–कुत्री यापेक्षाही तुम्हाला नीचपणाने वागविण्यात येते, ही किती लज्जेची गोष्ट आाहे बरे! ही अस्पृश्यता अलीकडे केव्हा तरी मध्येच घुसडून दिली असली पाहिजे. कारण या नासिकसारख्या क्षेत्राच्या ठिकाणी अनादीकालापासून महार लोकांच्या स्नानाचे कुंड इतर जातीच्या कुंडामध्ये आहे. अर्थात त्या ठिकाणी अनादी कालापासून स्पर्शास्पर्शाचा विधिनिषेध असणे शक्य नाही. असे असता हल्लीच्या व्यवहारात तुम्हाला आम्ही अस्पृश्य म्हणून दूर ठेवतो, ही किती शरमेची गोष्ट आहे.''

अस्पृश्य समजली जाणारी व्यक्ती ही चारचौघासारखी माणूसच आहे, हे महाराज आपल्या कृतीने पटवून देत होते. तथाकथित अस्पृश्य लोकांना सभ्य गृहस्थाप्रमाणे वागवा. म्हणून महाराज नुसता उपदेश करीत नव्हते, तर त्यांना खास आदेश काढून माणूसकीला काळिमा लावणारी ' हजेरीची' आणि ' वेठबिगवारीची' ची पध्दत बंद केली. तसेच महार लोकांना शतकानुशतके गुलामगिरीत टाकणारे ' महारवतन ' खालसा केले. एवढेच

नव्हे तर आपल्या राज्यात कायद्याने अस्पृश्यता नष्ट केली. त्याा अन्वये सरकारी कार्यालये. शाळा दवाखान्यासारखी सार्वजनिक ठिकाणे. सार्वजनिक विहिरी व पाणवठे अस्पृश्यांना खुले केले. त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्यांना आपल्या राजवाडयातही नोकरीत घेतले. याशिवाय त्यांना माहूत, कुत्तेवान, हुलेस्वार, पोलिस, ड्रायव्हर म्हणून सरकारी नोकरीत घेतले. काहींना सनदी वकील बनवले. तर काहींना खास शिष्यवृत्या देऊन तलाठी म्हणून नेमले.

हे सर्व करीत असता महाराजांना हे दाखवून द्यायचे होते की, ज्याला समााज अस्पृश्य म्हणून हीन समजतो ते लोक बुध्दीने, कर्तबगारीने व हुशारीने इतरांहून काही कमी नाहीत. त्यांची हीन स्थिती ही केवळ त्यांच्यावर लादलेल्या अस्पृश्यतेमुळे आलेली आहे: ती आपल्यासारखीच माणसे असून गुणांत किंचितही कमी नाहीत.

३० मे १९२० रोजी नागपूर येथील ‘ अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण ’ परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात महाराज म्हणाले होते, ‘‘ अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाही; तुम्हास अस्पृश्य माणणा—या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुध्दिमान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटकावच आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क तरी समसमान खास आहेतच. ‘‘ अशा उद्‌गारातून अस्पृश्य समाजाबद्दल महाराजांच्या मनात केवढा सद्‌भाव होता, हे दिसून येते, म्हणून डॉ. आंबेडकरांनी ‘‘ त्यांच्यासारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता. व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हास शंका आहे.’’ असे उद्‌गार काढले होते.

येथे महाराजांनी अस्पृश्य समाजास हिंदी राष्ट्राचे घटक अवयव असे संबोधिले आहे, हे फार महत्वाचे आहे. हिंदी रा ट्राचा असा हा एक अवयव दुबळा व हीन दर्जाचा बनून राहिला तर राष्ट्र कसे उभे राहणार आणि राष्ट्रिय एकात्मता तरी कशी साध्य होणार, अशी महाराजांची भूमिका स्पष्ट आहे.

**संदर्भग्रंथसुची**

१. राजर्षी शाहू छत्रपति, सौ. वसुधा ज. पवार, सुमेरू प्रकाशन, टिळकनगर, डोंबिवली पूर्व,
२. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, संपादक डॉ. जयसिंगराव पवार.
३. राजर्षी शाहू छत्रपती, एक समाज क्रांतिकारक राजा, डॉ. धनंजय किर.
४. राजर्षी शाहू छत्रपतिचे निवडव आदेश.
५. राजर्षी शाहू व त्यांचे कार्य, यावरील राष्ट्रीय चर्चासत्रांत वाचलेला शोधनिबंध.
६. क्रांतिसुक्ती— संपादक डॉ. एस.एस.भोसले.
७. रयतेचा राजर्षी शाहू महाराज— डॉ. आर.एम.कोंडेकर अरूना प्रकाशन ,लातूर.
८. लोकराजा शाहूमहाराज व्यक्तीमत्व आणि विचार, डॉ. धनंजय किर, सुधीर प्रकाशन, वर्धा.
९. राजर्षी शाहू छत्रपति जीवनकार्य, महाराष्ट्र, इतिहास प्रबोधनी कोल्हापूर.

# ताराबाई शिंदे यांचा "स्त्री—पुरूष तुलना" मधुन स्त्री मुक्तिचा हुंकार

**प्रा. डॉ. गजानन लिंबाराव सोडनर**
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
मारेगांव, जि. यवतमाळ

**प्रस्तावना:**

भारत देशात स्त्री मुक्तीच्या संदर्भात अनेक समाज सुधारकांनी कार्य केले आहे. परंतु तरी सुध्दा स्त्रीयांना स्वातंत्र्याची पहाट पाहण्यासाठी प्रचंड दिवस वाट पहावी लागली. परंतु स्त्री मुक्तीच्या संदर्भात सर्वप्रथम व्यापक विचार ताराबाई शिंदे यांनी मांडले. सदर संशोधनपर निबंधामध्ये तत्कालिन समाज व्यवस्थेच्या गुलामगिरीतुन स्त्री मुक्त व्हावी, तिला अधिकार मिळावे यासाठी ताराबाई शिंदे यांनी तत्कालीन रूढी परंपरांना विरोध करून सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. हे करत असतांना त्यांनी पुरूषप्रधान संस्कृती विरूध्द आपल्या 'स्त्री—पुरूष—तुलना' या ग्रंथामधून कशाप्रकारे समाज परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. ह्याची सखोल मांडणी या निबंधातून केली आहे.

आज आपण राष्ट्र विकासाच्या उन्नतीच्या, प्रगतीच्या अनेक गो टी करतो. परंतु त्याच बरोबर आपण राष्ट्रविकासाच्या प्रगतिच्या काही कसोट्यांचा सुध्दा अभ्यास केला पाहिजे. एखाद्या देशाची प्रगती ही त्या देशातील नागरीकांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याच्या अधिकारावरून ठरते असे मानले जाते. तर यावरून राष्ट्र विकासामध्ये स्वातंत्र्यास अधिक महत्व दिल्या गेल्याचे दिसते.

परंतु आपल्या भारत देशाचा १९ व्या शतकापर्यंतचा सिंधू संस्कृती व पूर्ववैदिक काळ सोडला तर पुढे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर क्रमाक्रमाणे प्रचंड बंधने लादल्या गेली व शवेटी १९ व्या शतकापर्यंत स्त्रीचे अस्तित्व चुल आणि मुल ऐवढेच मर्यादित राहीले होते. त्यांचे स्वातंत्र्य पूर्णपणे पुरूष प्रधान संस्कृतीने हिरावून घेतले होते. आणि म्हणूनच स्वातंत्र्याविना स्त्री हा राष्ट्रविकासाच्या मार्गातील फार मोठा अडथळा होता.

ताराबाई शिंदे यांच्या काळात स्त्री ही पुरूषांच्या अधिकारात मर्यादित स्वातंत्र्य उपभोगत होती. परंतु उच्च कुळातील स्त्रियांवर अनेक सामाजिक बंधने होती. ती बंधने स्त्रियांना गुलामगिरीत टाकणारी होती. त्याकाळातील स्त्रियांवर गुलामगिरी लादणारे पुढील घटक होते.

**१) जातीव्यवस्था :**

भारतीय समाज जाती व्यवस्थेमध्ये विभागलेला होता. उच्च जाती कनिष्ट जातींना हिनलेखत जातींमध्ये रोटी बेटी व्यवहार नव्हता

**२) शिक्षणाचा अभाव**

तत्कालीन भारतीय समाजामध्ये पुरूषांमध्येच शिक्षणाचे अत्यल्प प्रमाणे होते. स्त्री शिक्षणापासून पूर्णपणे वंचित होती. त्यामुळे समाजात अनेक दोष होते व ते प्रगतिच्या मार्गातील अडथळा ठरत होते.

**३) अस्पृश्यता**

अस्पृश्यता हा मानवजातीवरील कलंक होता. तरी सुध्दा ह्या काळात अस्पृश्यता पाळली जात होती. अस्पृश्यता पाळल्यामुळे फार मोठा वर्ग स्वातंत्र्यापासून दुर होता.

**४) सामाजिक रूढी परंपरा**

त्याकाळात अनेक दोषपूर्ण सामाजिक रूढी परंपरा पाळल्या जात होत्या. बाल विवाह, जरठ कुमारीका विवाह, सती पध्दत, केशवपन, विधवा पूर्नविवाह ह्या पध्दती स्त्री स्वातंत्र्यावर बंधन आणणाऱ्या व त्यांना गुलामीत ठेवणाऱ्या होत्या. ह्या पध्दतींमुळे स्त्रीयांची प्रगती होवू शकली नाही.

**५) स्त्रियांकडे बघण्याचा समाज दृष्टीकोण**

भारतामध्ये पुरूष प्रधान संस्कृतीचा फार मोठा पगडा होता. स्त्रीयांना पुरूषांपेक्षा जन्मजातच कमी लेखल्या जाई. स्त्री केवळ शृंगाराची पुतळी आणि 'नरकमार्गस्थ दिपीका' आहे असे मानले जाई स्त्रीने पतिव्रत्य हाच आपला परम धर्म समजावा अशा स्त्री विषयक दृष्टिकोणामुळे स्त्री गुलाम बनली होती.

सत्यशोधक चळवळीमध्ये प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या पुरूषांबरोबर सत्यशोधक विचाराने कार्य करणाऱ्या स्त्रिया होत्या. त्यामध्ये ताराबाई शिंदे यांचे नाव अग्रस्थानी होते. भारतामध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी सर्वप्रथम वैचारिक मांडणी करणारी स्त्री म्हणजे ताराबाई शिंदे होतं. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (१८३१ ते १८९७) यांच्या नंतर स्त्री लेखिका म्हणून ताराबाई शिंदे १८५०–१९२०, यांनाच लक्षात घ्यावे लागेल. सन १८८२ साली ताराबाई शिंदे यांनी स्त्री व पुरूषांमध्ये साहसी कोचा? हे स्पष्टकरून दाखविण्याकरीता 'स्त्री–पुरूष–तुलना' हा ग्रंथ रचला. त्याचबरोबर या ग्रंथामध्ये स्त्रियांवरील पारंपारिक बंधने व स्त्रियांच्या मुक्ती संबधी विचार मांडले आहेत.

**'स्त्री–पुरूष–तुलना लिहण्याचा ताराबाई शिंदेचा उद्देश:**

ताराबाई शिंदे यांनी आपल्या निबंध वजा पुस्तकात प्रामुख्याने समस्त स्त्री जातीवर घेतल्या जाणाऱ्या पारंपारिक आक्षेपांचा परामर्श घेतला आहे. स्त्रिया ह्या हक्काच्या गुलाम नाहीत. त्यांना विकासाची संधी मिळाली पाहिजे, पुरूष प्रधान संस्कृतीत त्यांना ह्या गुलामगिरीतुन अज्ञानातुन मुक्त केले पाहिजे; त्या दृष्टीने समस्त पुरूष जातीला उपदेश करण्याच्या उद्देशाने ताराबाईनी हा निबंध लिहिला आहे. त्यांनी अतिशय स्पष्ट व निर्भिडपणे आपले विचार मांडले आहेत.

त्या लिहितात, "मी निरंतर मऱ्हाटमोळ्याचे अटकेतील, गृहबंदीशाळेतील मतिहीन अबला असून, हा माझा पहिलाच प्रयत्न असल्याने निबंधात असंगत, तुटक मजकूर, अगदी मऱ्हाटशाही जाडी, भरडी व अतिशय कडक भाषा आहे. तर रोज पुरूषाचे साहस, धाडस, दगाबाजी इकडे कोणीच लक्ष न देता, स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात, हे पाहुन माझे मन अगदी खळबळून तळमळून गेले त्यामुळे मला निर्भिड होऊन तसेच खडखडीत लिहावे लागले संदर्भ [१]

**'स्त्री–पुरूष–तुलना' ग्रंथाचे स्त्री मुक्तिच्या दृष्टीने महत्व**

आज जिकडे तिकडे स्त्री मुक्तिची भाषा बोलली जात आहे. स्त्रियांच्या अनेक संघटना स्त्री हक्कासाठी सर्वत्र कार्यरत आहेत. स्त्री मुक्तिच्या अनेक चळवळी चालल्या आहेत. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य अधिकार मिळावे यासाठी हे घटक प्रयत्न करीत आहे. तसे पाहिले तर स्त्रिया कुठल्याही दृष्टीने कमी नाहीत. त्यांना संधी मात्र मिळायला पाहीजे, असे आज बोलल्या जात असल्याचे आपण पाहतो. स्त्रिया कोणत्याही असो सर्वदृष्टीने काम करण्यास लायक असतांना त्यांना कमी प्रतिची कामे दिली जातात. हजारो वर्षापासून त्यांना अबला म्हणून वागविले जात आहे. त्यांना पायाची दासी करून ठेवले आहे. देव, धर्मग्रंथ आणि शास्त्र ह्या सर्वांनी स्त्रीला बंधनात अडकवून तिला शिक्षणापासून वंचित केले गेले. विधवा विवाहावर बंधन घातली. जबरदस्तीने सती जावयास लावले, तिला रूढींनी परंपरांच्या बंधनात करकचून बांधून ठेवले. पती वारला तर पत्नीने विधवेचे जीवन जगावे. परंतु पत्नी वारल्यानंतर नवरोजी १० व्या दिवशीच पुन्हा बोहल्यावर बसावयास तयार ह्या अशांनी अनेक चालिरीतीत स्त्रियांना जणू गुलाम करून ठेवले होते. ऐवढे दु:ख सहन करून ही स्त्री हे सर्व मुक्तपणे सांगू शकत नव्हती. तिने हे निमुटपणे सहन केले पाहिजे. हा जणु विधिलिखित नियम ह्या अन्यायाविरूध्द हजारो वर्षापासुन कोणत्याही स्त्रीने वाचा फोडली नव्हती. ताराबाई शिंदे यांनी नेमके हेच हेरले. त्यांनी या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम १३०–१३४ वर्षापूर्वी आपल्या ह्या 'स्त्री–पुरूष–तुलना' पुस्तकातून केले. ह्याला हवेतर बंड म्हणा पण हा बंडखोर विचार ताराबाई शिंदे यांनी दिला आहे. तो ही अशावेळी की जेव्हा स्त्रियांवर वाचनाची ही बंदी होती. स्त्रियांनी वाचले की, ताटात किडे पडतात अशा अंधश्रध्दा असतांना आणि पडदाशिन देशमुख

घराण्यातील स्त्रियांना बाहेर पडायला बंदी असतांना आश्चर्य हे की असा बंडखोर विचार मांडणाऱ्या ताराबाई एका मराठा देशमुख घराण्यातील होत्या आणि म्हणूनच ह्यात ताराबाईंचे मोठेपण सिध्द होते.[२]

वैचारिक व स्त्रियांच्या उन्नतीसाठी मिळणाऱ्या प्रेरणेमुळे 'स्त्री–पुरूष–तुलना' या पुस्तकाचे स्त्रीनमुक्तीच्या दृष्टीने प्रचंड महत्व आहे. स्त्री धर्म म्हणजे काय? हे सांगतांना ताराबाई शिंदेनी अतिशय मार्मिक धारदार व उपरोधिक शब्दात आपले मत व्यक्त केले "निरंतर पतीची आज्ञा पाळणे त्यांच्या मर्जीप्रमाणे वागणे, त्यांनी लाथा मारल्या, शिव्या दिल्या, दारू पिऊन, फितुरी चहाडी करून, खजिना लुटून, लाच खाऊन जरी घरी आले तरी स्त्रीने जसे काही कृभण महाराजच गवळ्यांचे घरी दूध चोरून चंद्रवलीला कलंक लावून आलेत असे समजून त्यांची मोठ्या हसतमुखाने देवा सारखी पुजा करावी", अशा या मुळात सामाजिक कल्पना आहेत. असे त्यांचे मत होते"[३]

हे सांगतांना त्या पुढे म्हणतात स्त्री जातीविषयी अभिमान आणि स्त्री धर्म तसेच पतिव्रत्य व अर्धांगिनी गृहलक्ष्मी ह्या रचना मुळातच स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या आहेत ऐवढी विभूषणे त्यांना देवून पुरूषांनी त्यांना बंदिस्त केले जणु असेच मत ताराबाई शिंदे यांचे आहे.

**पुरूषी वर्चस्वाबरोबरच स्त्री स्वभावाचे चित्रण**

स्त्रीयांवर जे पुरूषीवर्चस्व आहे त्याबद्दल बोलतांना ताराबाई शिंदे ह्या हिंदू धर्म ग्रंथ भारतीय समाजव्यवस्थेतील, कुटुंबपध्दती, रूढी, परंपरा ह्यांमुळेच स्त्रियांवर पुरूषी वर्चस्व निर्माण झाल्याचे त्या अधोरेखित करतात. पुरूष जसे स्त्रीजातीत दुर्गन आहेत ते समाजासमोर मांडतात त्यांना ताराबाईंनी आपल्या लेखनीतुन उत्तर दिले. त्यांनी सुध्दा पुरूषांच्या अनेक दोषांचे वर्णन केलेले आहे. स्त्री पुरूषांमध्ये स्त्री जातच श्रेष्ठ असल्याचे ते सांगतात त्यासाठी त्या लिहितात "या स्त्रीजातीतील सावित्रीतरी आपल्या पतीचा प्राण परत आणण्याकरीता यमदरबारात जाऊन आली. पण पुरूषांमध्ये कोणीतरी आपल्या बायकोच्या प्राणाकरीता यमदरबारात तर नाहीच पण उगीच त्या दरबाराचे वाटेवर तरी गेलेला कुठे ऐकण्यात आलेला आहे काय? तर जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या अपराध्या प्रमाणे अरण्यवासात का राहु नये बरे? एक बायको मेली की, तिचे दहावे दिवशीच दुसरी करून आणावी, असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे. तो दाखवा बरे! जशी स्त्री तसेच पुरूष स्त्री जातीचे महत्त्व सांगत असतांनाच त्या समाजातील अंधश्रध्दा, खुळ्या समजुती, अज्ञानामुळे स्त्रीया ह्या श्रध्दांना कशा बळी पडतात. त्या पुरूषी वर्चस्वाबरोबरच स्त्री स्वभावात अचूक दोष दाखवितात.

"एखाद्या स्त्रीचा नवरा ज्या वेळेस मृत होतो, त्या वेळेस ती फार दु:ख सागरात बुडून तिला फार संकटे सोसावी लागतात. मरेपर्यंत सारा काळा वैधव्यात काढावा लागतो; इतकेच नव्हे तर पूर्वी कित्येक सती देखील जात असत. परंतु पुरूषाला तिच्याविषयी दु:ख होऊन तो कधी 'सता' गेलेला ऐकिला आहे काय ?[४]

महात्मा ज्योतीबा फुले यांनी ताराबाई शिंदेच्या कार्याची आपल्या 'सत्सार २' या ग्रंथात दखल घेतल्याचे दिसते. फुले लिहीतात 'बहुतेक भर्ते आपल्या स्त्रियांसमत पाहिजेल त्या चावट चेष्टा करून नीच कर्मे आचरू लागल्यामुळे कित्येक कृलीन पतिव्रतास्त्रियांस अत्यंत वैषम्य वाटून त्या अज्ञानी व निर्मळ असल्यामुळे अमर्याद कोपते पावून त्यांचे मनात दुष्कर्मरूपी समुद्राच्या अतिभयंकर लाटा उद्‌भवतात. त्यांचे निवारण व्हावे या पित्यर्थ त्यांनी पुरूष मंडळीस हा अतिउत्तम बोध केला आहे"

महात्मा फुलेंनी त्या काळात ताराबाईंच्या कार्याचा पुरस्कार केला आहे.

**तत्कालीन सामाजिक दोष निवारण्या साठीचे लिखान**

ताराबाई शिंदेनी स्त्री मुक्तीचा लढा आपल्या लिखाणातुन सुरू केला होता. हे करत असतांना त्यांनी त्या काळातील सामाजिक रूढी, परंपरा यावर सुध्दा कडक शब्दात टिका केली. त्यांना त्या काळात रूढ असलेला जरठकुमारी विवाह मान्य नव्हता त्यावर त्या म्हणतात "रंगेल म्हातारे, वृध्द हजार दोन हजार देवून मध्यस्था मार्फत बालिकेशी विवाह लावतात. त्यांच्या मृत्यूनंतर त्या स्त्रीची दुर्दशा सुरू होते. या ठिकाणी त्या शास्त्रकर्त्यांवर सुध्दा टिका करतात त्या म्हणतात त्यांनी स्त्रियांवर अनेक बंधने घातली परंतु पुरूषांना मात्र पुर्नविवाह न करण्याचे नियम लागू केले नाही ?"

ताराबाई शिंदेच्या मते भारतीय धर्मग्रंथांनी येथील पितृप्रधान संस्कृतीने स्त्रीला आपले गुलाम बनविले आहे, जर स्त्रीची प्रगती खऱ्या अर्थाने करावयाची असेल तर तिला सर्वांगांनी स्वातंत्र्य देवून सर्वच क्षेत्रात तिला भागिदारीने सहभागी करून घेतले पाहिजे. स्त्री बंधने लादणाऱ्या खुळचट व अंधश्रध्दा जोपासणाऱ्या परंपरा मोडीत निघाल्या पाहिजे असे त्यांचे मत होते. पुरूषी अहंकाराबद्दल त्यांनी आपल्या लेखणीतुन पुरूषांनाअनेक प्रश्न विचारले आहेत. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचा मतितार्थ जर पुरूष मंडळींनी समजून घेवून आपले आपणच सुधारले तर स्त्रीपुरूष समानता आल्याशिवाय राहणार नाही.

**निष्कर्ष:**

ताराबाईनी समाजाच्या राक्षसी व जटील रूढी परंपरांवर कडक शब्दात लेखणी चालविली त्यांनी पुरूषी अहंकाराला अनेक प्रश्न विचारून तुम्हाला तिला गुलाम करण्याचा काय अधिकार आहे असे विचार प्रतिपादित केले. त्यांनी मांडलेले विचार हे निश्चितच स्त्री मुक्तिचा एका स्त्रीने दिलेला तो हुंकार होता असेच म्हणावे लागले. त्यांच्याच कार्यापासून प्रेरणा घेवून पुढे स्त्री मुक्तीची चळवळ सुरू झाली.

**संदर्भ:**

१) पवार जयसिंगराव (संपा.), प्रकाशक वसंतराव फाळके अखिल भारतीय सत्यशोधक समाज ३२ वे राष्ट्रीय अधिवेशन, सातारा, २००४ पृष्ठ क्र. १३, १४

२) चौधरी नागेश, ज्योती कोमटकर, नुतन माळी (संपा.), सत्यशोधक विशेषांक, प्रकाशक, नगेश चौधरी, नागपूर, १९९५, पृष्ठ क्र. ४३.?

३) खोले विलास (संपा.), स्त्री–पुरूष–तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९९, पृष्ठ क्र. ९४–९६.

४) उपरोक्त, खोले विलास (संपा.), स्त्री–पुरूष तुलना, पृष्ठ क्र. ६८.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

**डॉ. कैलाश फुलमाळी**
इतिहास विभाग प्रमुख
रेणुका कॉलेज
बॅक ऑफ इंडिया जवळ, बेसा– नागपुर–३७
Email : fulmali.kailash@gmail.com
Mobile No-7972985559

**सारांश :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोणताही राजकीय वारसा नसताना आणि कौटुंबिक स्थिती हलाखीची असतानाही त्यांनी आपल्या कर्तुत्वाने आपल्या नावाचा गजर जगभर केला आहे. डॉ. आंबेडकर व्दारा निर्मित संविधानाचे जगभर कौतुक केले जात आहे. त्यांच्या अफाट कार्य कर्तृत्वाला तोड नाही. आधुनिक भारताच्या निर्मितीत डॉ. आंबेडकरांचे योगदान अविस्मरणीय, अतुलनीय व अनन्यसाधारण असल्यामुळे सदर शोधनिबंधामध्ये राष्ट्र उभारणीतील डॉ. आंबेडकरांच्या योगदानाची माहिती देऊन, निष्कर्ष काढण्यात येत आहे.

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. भारतामध्ये सामाजिक आणि आर्थिक समता नांदावी हा त्यांच्या जीवनाचा ध्यास होता. स्वातंत्र, समता आणि बंधुत्व यांच्या पायावरच यशस्वी लोकशाहीचा डोलारा उभा राहू शकेल, यावर त्यांचा ठाम विश्वास होता आणि त्यासाठी त्यांनी आपलं आयुष्य वाहून घेतलं होतं. भारतातील पीडितांच्या आणि दलितांच्या मुक वेदनांना आवाज आणि अस्मिता प्राप्त करून देणारा द्रष्टा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. इतकेच नव्हे तर जगामध्ये सुद्धा त्यांच्या कार्याची प्रशंषा केली जाते. भारतातील अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन त्यांना आपल्या आर्थिक विचाराचे जनक म्हणतात. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने त्यांना **'सिम्बॉल ऑफ नॉलेज'** या किताबाने नावाजलेले आहे. एवढेच नाही तर कोलंबिया विद्यापीठात त्यांचा पुतळा बसवून राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. केंब्रिज विद्यापीठाने जगभरातील १०० अभ्यासकांचा सर्वे करून जो रिपोर्ट सादर केला त्यात डॉ. आंबेडकरांचा चौथा क्रमांक लागला आहे. अर्थशास्त्र विषयात विदेशातील उच्च पदव्या प्राप्त करणारे ते पहिले भारतीय होते. भारत सरकारनेही डॉ. आंबेडकरांच्या अफाट कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाला त्यांना भारताचा सर्वोच्च पुरस्कार **'भारतरत्न'** देऊन, त्यांचा यथोचित गौरव केला आहे. भारतीय रिझर्व बँकेची स्थापना, विद्युत प्रकल्प, नदी जोडो योजना, कामगारांना पेन्शन व आवश्यक त्या योजना तसेच स्त्रियांना मान सन्मान व विविध सरकारी योजना देऊन पुरुषांच्या बरोबरीने स्थान देणे, देशाच्या एकता व अखंडतासाठी संघर्ष करणे त्याचबरोबर बहुजन समाजाच्या उध्दाराकरीता संविधानामध्ये केलेल्या उपाययोजना हे सर्व त्यांचे कार्य राष्ट्र उभारणीत अत्यंत महत्वपूर्ण होते असे संशोधकाला वाटते.

**भारतीय रिझर्व बँकेची निर्मिती :**

आज जगात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. भारताच्या आर्थिक व्यवस्थेचा कना असलेल्या आणि भारताच्या वित्तीय स्थितीच्या नियंत्रणाची मुख्य भूमिका निभावणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या उभारणीत आणि निर्मितीमागील भूमिका डॉक्टर आंबेडकरांची होती. बँकेच्या वित्तीय नियंत्रणामुळेच जगातील विकसित राष्ट्रात आर्थिक मंदी असली तरी त्याची विशेष अशी झळ भारताला बसली नाही.[१] भारतीय अर्थव्यवस्था स्थिर असण्यामागे रिझर्व बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. वित्तीय विनिमयाचा दर काय असावा याचा आधारही डॉक्टर आंबेडकरांचा 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा लिखित ग्रंथच आहे.

**प्रभावी विरोधी पक्षाची भूमिका :**

१९३७ मध्ये डॉ. आंबेडकरांनी महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून प्रभावी विरोधी पक्ष म्हणून अनेक विधायक आणि रचनात्मक कार्यात भाग घेऊन अनेक विधेयके मांडली. महार वतन विधेयक, भारताच्या वाढत्या लोकसंख्येवर उपाय आणि शिक्षणाविषयी शासनाच्या धोरणाविषयी आपले मूलगामी विचार मांडले. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून त्यांनी शेतकरी व मजुरांच्या अनेक समस्यांना वाचा फोडली. व्दितीय महायुद्धात डॉ. आंबेडकरांनी लोकशाही राष्ट्राच्या बाजूनी आपले समर्थन जाहीर केले. लोकशाही शासन व्यवस्था जिवंत राहायलाच पाहिजे, यातच जगाचे व भारताचे भविष्य सुरक्षित आहे हे त्यांचे ठाम मत होते. याउलट मार्क्सवादी संघटनाची दुबळ्या व कमजोर राष्ट्रांना गिळंकृत केलेल्या रशिया व चीनचे समर्थन केले. तर उजव्या विचारांच्या संघटनांनी जर्मनी व इटली या हुकूमशाही राष्ट्रांच्या बाजूनी आपले समर्थन जाहीर केले.[२] पुढे हुकूमशाही राष्ट्रांचा पराभव होऊन लोकशाही राष्ट्रांचा विजय झाला. यावरून डॉक्टर आंबेडकरांची वैचारिक प्रगल्भता आणि दूरदृष्टीची आपल्याला कल्पना येईल.

**मजूर मंत्री म्हणून केलेले कार्य :**

डॉ. आंबेडकरांची इंग्रजी प्रशासनात मजूर मंत्री म्हणून नियुक्ती झाली. या कार्यकाळात त्यांनी कामगार कल्याणाची अनेक कार्य केली. मजुरांच्या कामाचे तास बारा तास वरून आठ करण्यात आले. मध्यंतरी जेवणाकरिता सुट्टीची व्यवस्था करण्यात आली. काम करताना अपघात झाल्यास त्यांच्या विम्याची व्यवस्था केली. रात्री पायीवर महिलांना कामावर घेण्यास मज्जाव करण्यात आला. स्त्रियांना प्रसूती रजा मंजूर करून घेतल्या, इतकेच नव्हे तर दर दहा वर्षांनी वेतन आयोग स्थापन करण्याची सोय केली. वर्षातून दोनदा क,।. वाढविण्यात यावा याची व्यवस्था केली. इतकेच नव्हे तर सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना योग्य तो मोबदला, सोबतच पेन्शन दिली जावी अशी तरतूद केली.[३]

**विद्युत निर्मितीला प्रोत्साहन :**

डॉ. आंबेडकरांनी जल व विद्युत नियोजनावर भरीव काम केलेले आहे. भविष्यात विद्युत तुटवडा विचारात घेऊन त्यांनी नदी जोड प्रकल्प राबवून कृषी करीता पाणी आणि विद्युत निर्मितीला प्रोत्साहन दिले. कोळसा वापरून वीज निर्मिती करणे भारताला परवडणारे नाही. म्हणून त्यांनी पाण्यावरून विद्युत निर्मिती ला विशेष महत्व दिले. डॉ. आंबेडकरांनी भाक्रा धरण, हीराकुंड दामोदर व्हॅली प्रकल्प यासारखे अनेक धरणे बांधून भविष्यातील विद्युत तुटवडा आणि हरित क्रांतीचे स्वप्न पाहिले होते.[४]परंतु येणाऱ्या

सरकारने त्याचे महत्त्व ओळखले नाही. त्यामुळेच आपल्या शेतकऱ्यांना आज आत्महत्या कराव्या लागतात. कारण जो प्रदेश कोरडवाहू शेती पूरक आहेत,तेथेच मोठ्य प्रमाणात आत्महत्या होताना दिसून येते. भारतात हरित क्रांती पंजाब प्रांतात झाली. कारण बाबासाहेबांनी बांधलेली धरणे ही पंजाब प्रांतातच होती. त्यामुळेच पंजाब प्रांतातील कोणताही शेतकरी आत्महत्या करीत नाही. आज भारतासमोरील अनेक आव्हाना पैकी विद्युत तुटवडा हा प्रश्न गंभीर रूप धारण करीत आहे. अनेक राज्यांमध्ये लोड शेडींग करण्यात येते. लोडशेडिंगमुळे शेतकरी आपल्या ओलिताखालील जमिनीला पाणी देऊ शकत नाही. यावरून हे दिसून येते की डॉ. आंबेडकरांनी भविष्यातील भारता पुढील समस्यांचे सखोल आकलन केले होते.

**सशक्त भारतीय संविधानाची निर्मिती :**

१९४० च्या सुरुवातीला सत्ता हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू झाली. इंग्लंडच्या प्रधानमंत्री याने भारतीयांना अल्टिमेशन दिले की, जून १९४८ पर्यंत इंग्रज भारतीयांच्या हातात सत्ता सोपवून निघून जातील.[५] तेव्हा भारतात हंगामी सरकारची स्थापना करण्यात येऊन संविधान निर्मितीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. मुस्लिम लीगने स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राकरिता प्रत्यक्ष कृती दिन साजरा केला. सविधान समितीला सहकार्य केले नाही. परंतु डॉ. आंबेडकरांनी आपले परम विश्वासू कार्यकर्ते श्री जोगेंद्र नाथ मंडल यांच्या मदतीने बंगाल प्रांतातून निवडणुकीला उभे राहून संविधान सभेवर निवडून गेले.[६] संविधान सभेतील राष्ट्रीय एकात्मते वरील त्यांच्या भाषणाने प्रभावित होऊन कॉंग्रेसमधील अनेक दिग्गज नेत्यांनी डॉ. आंबेडकराची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्तीला मान्यता दिली.
मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून संविधानाचा कच्चा मसुदा आपले एक सहकारी **बी एन राव** यांच्या मदतीने त्यांनी पूर्ण केले.[७] डॉ. आंबेडकर पुढे भारतीय संविधानाचे शिल्पकार ठरले. भारताचे संविधान जगातील सर्वोत्कृष्ट संविधान आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली असली तरी, भारतातील विविध समाजगटांना सोबत घेऊन भारत परकीय संकटांचा सामना करीत विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. तर आपल्या बाजूच्या पाकिस्तानात आतापर्यंत कित्येकदा लष्करी राजवट लागलेली आहे हे आपण बघितले आहे. भारतातील विविध समाज गटांच्या मूलभूत हक्क व अधिकारांचे संरक्षण करण्यात आणि राष्ट्राची एकता व अखंडता कायम ठेवण्यात भारतीय लोकशाही परिपक्व होत आहे, ते केवळ सशक्त भारतीय संविधानामुळे होय, हे आपल्याला विसरता येत नाही.

**हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणातील योगदान :**

संस्थानिकांचे विलीनीकरण करून एकसंघ भारत निर्माण करण्याचे कार्य सरदार पटेल करीत असताना, त्यांना हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करू नये तर पोलीस कारवाई करण्याचा महत्त्वपूर्ण सल्ला डॉ. आंबेडकरांनी दिला.[८] त्यामुळेच त्यामुळेच पाकीस्तानने कोणतीही कारवाई केली नाही व विदेशी राष्टांचे सहकार्य सुध्दा त्यांना मिळाले नाही. हे हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणातील डॉ. आंबेडकरांचे फार मोठे योगदान राहिलेले आहे.

**हिंदू कोड बिल :**

हजारो वर्षापासून ज्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्री व शूद्रांची अवहेलना केली होती, त्यातून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी समान नागरी कायद्याच्या अंतर्गत हिंदू कोड बिल तयार करून स्त्रीमुक्ती स्वातंत्र्याचा या बिलाच्या रूपाने जाहीरनामा मांडला. या कायद्यानुसार स्त्रियांना पुरुषाबरोबरचे अधिकार देण्यात आले होते. वडिलोपार्जित संपत्तीत तिला वाटा देण्यात आला. घटस्पोट घेण्याचा हक्क देण्यात आला. पोटगीचा हक्क मागण्याचा अधिकारही देण्यात आला. दत्तक व वारस नियुक्त करण्याचा हक्क देण्यात आला. परंतु सनातन्यांच्या विरोधामुळे हे बिल पास होऊ शकले नाही. तेव्हा डॉ. आंबेडकरांनी कायदामंत्रि पदाचा राजीनामा दिला.[९]

**धम्मक्रांती:**

डॉ. आंबेडकरांचे सर्वात विधायक कार्य म्हणजे स्पृश्य हिंदुंच्या बरोबरीने अस्पृश्यांनाही समतेचे अधिकार देण्यात यावे. या करीता त्यांनी अनेकदा विनंती अर्ज आणि जनआंदोलने केल्यानंतरही कोणतेही बदल घडून आले नाही. शेवटी राष्ट्रीय एकात्मतेचा विचार लक्षात घेऊन आणि गडगंज संपत्तीचे ढिगारे घेऊन इतर धर्मीय उभे असतानाही बौद्ध धम्माच्या चरणी स्थिरावले. जगाच्या इतिहासात एकाच वेळी पाच लाख लोकांनी धर्मांतर करण्याची ही एकमेव घटना आहे. ही धम्मक्रांती महाराष्ट्रातील नागपूर येथे १४ ऑक्टोंबर १९५६ ला झाली.[१०] या क्रांतीने अस्पृश्यांच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणले आहे. अस्पृश्य समाजाने गेल्या ६० वर्षात जी कमालीची प्रगती करून दाखविली आहे. साठ वर्षापूर्वी हाच समाज कुत्र्या मांजरा पेक्षाही निकृष्ट प्रतीचे जीवन जगत असून, उकिरडयावरील फेकलेल्या पत्रावळीवरील खरकटे खाण्यासाठी आपसात भांडणारा हा समाज, आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुढे वाटचाल करतो आहे. याचे कारण म्हणजे बाबासाहेबांनी या समाजाला दिलेला बौद्धधम्म रुपी बाळकडू होय.

**राष्ट्रीय एकात्मता :**

१७ मे १९२९ रोजी डॉ.आंबेडकरांनी आपल्या लेखात म्हटले होते की, ‘‘आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती जनतेच्या मनात एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची होय. आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदू, मुसलमान, सिंधी वा कानडी अशी भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमत: भारतीय व नंतरही भारतीयच आहोत, अशी भावना निर्माण केली पाहिजे’’.[११] असा देशभक्त व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणारा पुन्हा होणार नाही. असे संशोधकाला वाटते.

**निष्कर्ष :**

डॉ. आंबेडकरांचे भारतीय रिझर्व्ह बॅंक निर्मितील योगदान अव्दितीय असे आहे. त्यामुळेच आज आपला देश आर्थिकदृष्टया भक्कम दिसून येतो. तसेच डॉ. आंबेडकरांनी विरोधी पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडलेली आपल्याला दिसून येते. स्वातंत्र मजुर पक्षाच्या माध्यमातून त्यांनी सरकारच्या अनैतिक धोरणावर जोरदार प्रहार केले. यातून आजच्या विरोधी पक्षाने प्रेरणा घेवून शोषक न बनता जनतेच्या हक्कासाठी लढा दयावा असे संशोधकाला वाटते.

मजुरमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांनी अत्यंत महत्वपूर्ण कार्य केलेले दिसून येते. त्यांच्यामुळेच आज कर्मचारी वर्ग विविध सेवांचा लाभ हक्काने घेत आहे. तसेच डॉ. आंबेडकरांनी जल व विद्युत नियोजनावर भरीव काम केलेले आहे. नदी जोड प्रकल्प व धरण

बांधकाम व पाण्यापासून विद्युत निमिर्ती या त्यांच्या कार्यांपासून प्रेरणा घेतल्यास भविष्यात भारताला कधीही पाण्याची व विजेची कमतरता भासणार नाही. इतकेच नव्हे तर संपूर्ण भारतात हरितक्रांती घडून येईल असे मला वाटते.

भारतातील विविध समाज गटांच्या मूलभूत हक्क व अधिकारांचे संरक्षण करण्यात आणि राष्ट्राची एकता व अखंडता कायम ठेवण्यात आज भारतीय लोकशाही भक्कमपणे उभी आहे, ते केवळ आणि केवळ डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या सशक्त भारतीय संविधानामुळे होय, याची आपल्याला वेळोवेळी प्रचिती येते. तसेच हिंदू कोड बिल तयार करून स्त्रीमुक्ती स्वातंत्र्याचा या बिलाच्या रूपाने जाहीरनामा प्रस्तुत करून स्त्रि—पुरूष समानता स्थापीत करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केलेला दिसून येतो.

डॉ. आंबेडकरांनी नागपूरच्या भूमीवर पाच लाख अनुयायासह बौद्ध धर्माचा स्वीकार करून केवळ अस्पृश्यांच्याच नाही तर संपूर्ण भारतीय जनतेला लाचार, दैववादी, अन्यायी अशा मानसिकतेतून बाहेर काढले. सोबतच स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वाचा स्वीकार करून आपली व आपल्या समाजाची प्रगती करता येऊ शकते यासाठी मार्ग तयार केला. तसेच त्यांच्या या धम्मक्रांतीमुळे भारत देशाकडे संपूर्ण जग एका वेगळ्या दृष्टीने बघतो. भारताचे जगामध्ये जे काही महत्त्व आहे, ते केवळ बौद्ध धम्म व त्याच्या विचार प्रणालीमुळे आहे हे आपणास विसरून चालणार नाही. असे संशोधकाला वाटते.

डॉ. आंबेडकर यांनी संविधानाच्या प्रस्तावनेतच लिहीले आहे की, व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता याचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या दृष्टीने सारासार विचार केला तर डॉ. आंबेडकर हे एकता व एकात्मता जपणारे होते, हे सिध्द होते. वरिल निष्कर्षावरून हे सिध्द होते की, भारतीय राष्ट्र उभारणीतील डॉ.आंबेडकर यांचे योगदान अव्दितीय असे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. मुठाळ प्रा. राम, भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, अंशुल पब्लिकेशन, नागपुर, १९९८, पृष्ठ क्र २४

२. गायकवाड प्रा. यादव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि कार्य, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २००७, पृष्ठ क्र. ५७

३. दहाड डॉ. धनराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषण आणि विचार खंड —४, संकेत प्रकाशन नागपूर, २०१२ पृष्ठ क्र ९२

४. मुंनगेकर भालचंद्र, डॉ. आंबेडकर यांचे भारतीय शेती विषयक विचार, (फडके य. दि. संपादकीय) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई महाराष्ट्र १९८३, पृष्ठ क्र ८०

५. अग्रवाल आर., भारतीय संविधान का विकास, एस चांद प्रकाशन, दिल्ली २०१७, पृष्ठ क्र. ६९

६. पाटणकर मनीषा (संपादक), लोकराज्य, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई, ऑक्टोंबर २०१६, पृष्ठ क्र. ३२

७. फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री विद्या प्रकाशन पुणे १९८५, पृष्ठ क्र. १०५

८. जोगी डॉ. सुनील, दलित समाजाचे पितामह—डॉ. भीमराव आंबेडकर, डायमंड बुक्स प्रकाशन दिल्ली २०१५, पृष्ठ क्र. ९७

९. सुरवाडे विजय, समकालीन सहकार्यांच्या आठवणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय ग्रुप मुंबई २०१४, पृष्ठ क्र. ७९

१०. खैरमोडे चांगदेव भगवानराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री विद्या प्रकाशन पुणे १९८८, पृष्ठ क्र ८७

११. कित्ता, पृष्ठ क्र. ८९

डॉ. मंगला गोरे
इतिहास विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूर

अहिंसा व मानवतेचे पुजारी म्हणून जगात ओळखले जाणारे म. गांधीजी यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, देशासाठी त्यांनी केलेला त्याग, त्यांनी वापरलेले सत्य अहिंसेचे शस्त्र, त्यांची देशाबद्दलची तळमळ याला इतिहास साक्षी आहे. देशाला ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त करणे म्हणजे शासनव्यवस्था आपल्या हातात घेणे इतकाच स्वातंत्र्याचा अर्थ अभिप्रेत नव्हता. देशाला सर्वच दृष्टीने स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविणे यासाठी गांधीजींनी प्रयत्न केलेले आहे. प्राचीन काळापासून शेती हा भारतिय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अर्थातच शेतीप्रधान असलेल्या देशाचे आर्थिक धोरणही शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित असेल तरच देश प्रगती करू शकतो. हे सत्य गांधीजींनी केव्हाच ओळखले होते. खेडी आत्मनिर्भर झाली तरच सुराज्याकडून स्वराज्याची कल्पना साकारता येईल. त्याकरिता म.गांधींनी ग्रामसभेचे माध्यम सुचविले होते. त्यांचा भांडवलशाहीला विरोध होता. त्यांचे देश स्वावलंबनाविषयी असलेले व्यापक विचार अमुल्य आहे. आज जागतिकीकरणाच्या लाटेतही त्यांच्या विचाराने देशाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यास हातभार लागेल.

**संशोधनलेखाचा उद्देश :**

म. गांधींच्या विचारातील आर्थिक पैलुंचा अभ्यास करून जागतिकीकरणाच्या संदर्भात त्याची उपयुक्तता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनलेखासाठी प्रकाशित व अप्रकाशित साधनाद्वारे माहिती गोळा करून माहितीचे विश्लेषनात्मक वर्णन करणार आहे.

**स्वतंत्र्य आंदोलनाच्या नेतृत्वाची धुरा व काँग्रेसची सूत्रे म. गांधीजींकडे**

लो. टिळकांचा मृत्यु झाला आणि भारतीय काँग्रेसची सूत्रे म.गांधीजींकडे आली. त्यांनी सर्वप्रथम गरिबी निर्मुलन, आर्थिक स्वावलंबन स्त्रियांचे समान हक्क सर्वात महत्वाचे स्वराज्यासाठी देशभरात आंदोलन सुरु केले.ब्रिटीश सरकारचे भारतीयांप्रती असलेले उद्दाम धोरण व तत्कालीन परिस्थिती पाहून म. गांधीजींनी असहकार आंदोलन सुरु केले. असहकार म्हणजे ब्रिटिशांना शासन कार्यात कोणत्याही प्रकारचे सहकार्य करायचे नाही. असा अर्थ असला तरीही स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण ही या आंदोलनाची चतुसूत्री होती. या चतुसूत्रीमध्येच म. गांधीजींचे स्वराज्यासोबतच आर्थिक विचारही दडलेले आहे.

माझ्या स्वप्नातले स्वराज्य हे गरिबांसाठीचे स्वराज्य आहे. गरिबांनाही जीवनावश्यक गरजा आहे. स्वराज्य पूर्ण तेव्हाच म्हणता येईल? जेव्हा माझा प्रत्येक गरीब आत्मनिर्भर होईल". म. गांधीजींच्या या वाक्यांमधून सर्वांगीण विकासावर त्यांचा कटाक्ष होता, हे स्पष्ट होते.

**श्रमाच्या भाकरीचा सिद्धांत**

गांधीजींवर लिओ टोलस्टोयच्या यांच्या लिखाणाचा प्रभाव होता. शेतकरी, कष्टकरी या घटकांना नेहमीच उपेक्षित ठेवले आहे. त्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला दिला जात नाही. जे गरजेपेक्षा जास्त धन, संपत्ती गोळा करतात राजकीय सत्तेचा दुरुपयोग करतात त्यांच्या विरोधात लढा उभारणे काळाची गरज आहे असे टोलस्टोय यांना वाटत होते. हेच विचार गांधीजींसाठी प्रेरणादायी ठरले होते. भांडवलदार हा सुद्धा अन्नावरच जगतो, पैशावर जगात नाही. रात्रंदिवस कष्ट करून अन्न पिकवितो व आपणास जागवितो त्याचे भयंकर हाल होतात. हाच श्रमाच्या भाकरीचा सिद्धांत आहे. मानवाची मुलभूत गरज अन्न आहे. अन्न पिकविणारा म्हणजेच जगाचा पोशिंदा हा शेतकरी आहे. त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळालीच पाहिजे. ही जबाबदारी सरकारची आहे. हे टोलस्तोय यांचे मत गांधीजीना भावले होते. शेतकऱ्यांच्या माफक गरजा जेव्हा पूर्ण होतील, जेव्हा त्यांच्या मालाला योग्य भाव मिळेल तेव्हाच त्याच्या श्रमाचा सन्मान होईल.

**ग्रामोद्योगातून औद्योगिक क्रांती**

भारताला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवायचे असेल तर गावातील तरुणाच्या हाताला काम मिळावे त्याकरिता रोजगारांच्या संधी उपलब्ध व्हायला पाहिजे म्हणून गांधीजींनी खादीचा प्रसार व प्रचार सुरु करून सुतकताई सुरु केली. परिणामी खादीचा प्रसार तर झालाच सोबतच सर्वत्र स्वयंरोजगारांची सोय उपलब्ध झाली. बघता बघता सुतकताई हा ग्रामोद्योग बनला. हेच आत्मनिर्भरतेचे लक्षण आहे. ब्रिटीश सरकारला भारत एक विशाल बाजारपेठ वाटत होती. भारतातील कच्चा माल स्वस्त दराने इंग्लंडमध्ये नेऊन तेथील कारखान्यात तयार होणारा पक्का माल भारतात दाम दुपटीने विकत असत. त्यापासून होणारा आर्थिक फायदा ब्रिटिशांनाच होत होता.

गांधीजींनी सुरु केलेल्या स्वदेशी चरखा आंदोलन, सुतकताई यामुळे ब्रिटीशांचे नफ्याचे भीषण चक्र मोडले. सुतकताईपासून तयार झालेल्या सुताचे हातमागावर कापड तयार होत असे. त्यामुळे काम करणार्यांना काम मिळाले. कापड विक्रीतून पैसे मिळू लागले. याच प्रेरणेतून भारतीय उद्योगपतींनी भारतासाठी लागणारी उत्पादने भारतात तयार व्हावी म्हणून कारखाने सुरू केले. हा स्वदेशीचा मंत्र गांधीजींनीच दिला. टाटा, बिर्ला, बजाज या कुटुंबीयांनी भारतात उद्योग सुरु केले त्यामुळे गांधीजींचे स्वदेशीचे स्वप्न साकार होऊ लागले.

**मिठाचा सत्याग्रह**

ब्रिटिशाविरुद्ध लढतांना सत्याग्रहाचे शस्त्र गांधीजींनी प्रथमच यशस्वीपणे वापरले. गांधीजीच्या विचारातील पैलू उलगडतांना त्यांच्या विचारातील अर्थनीती दिसून येते. मग ती अर्थनीती मिठाच्या सात्याग्रहातुनही दिसून येते. ब्रिटिशांनी अत्यंत जीवनावश्यक असलेल्या मिठावर कर लावून सर्वसामान्य जनतेला जगणे नाकारले होते. हि भावना समाजातील तळागाळापर्यंत पोहचविण्यात गांधीजी यशस्वी झाले. दिनांक ६ एप्रिल १९३० रोजी त्यांनी दांडी येथिल समुद्रकिनार्यावर मीठ उचलून मिठाचा कायदा मोडून ते सर्वसामान्य लोकांना उपलब्ध करून दिले, त्यामुळे ब्रिटीशांचे आर्थिक गणित कोलमडले. ग. दि. माडगुळकरानी आपल्या कवितेत, उचललेस तू मीठ मुठभर साम्राज्याचा खचला पाया असे म्हटले आहे, यावरून मिठाच्या सत्याग्रहाचा परिणाम स्पष्ट होतो.

**गांधीजींचे ग्रामस्वराज्य –**

भारत हा खेडयाचा देश आहे,८० टक्के ग्रामीण जनतेचे जीवन सामाजीक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या कमकुवत आहे.स्वावलंबन व आत्मनिर्भरतेचा मुलमंत्र ग्रामस्थांना दिला तरच ग्रामीण विकास साधणे शक्य होईल.ग्रामीण भागातील शेतकरी कष्ट करून धान्य पिकवितात पण ते स्वयंपूर्ण नाहीत, कारण शेतात पिकणाऱ्या धान्यावर प्रक्रिया

करणारे उद्योग शहरी भागात आहे. त्यामुळे खरेदी विक्री करणार्या दलालाच फायदा होतो. गांधीजींनी 'यंग इंडिया' मधून ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली. राष्ट्राचा शेवटचा घटक म्हणजे गाव आहे. शेतातून येणाऱ्या उत्पादनाशी संबधित उद्योग गावातच असेल तरच खेडी स्वयंपूर्ण होतील. गांधीजींचे हे विचार काळाची गरज होती,व आजही आहे. शेतकऱ्याच्या श्रमाला सन्मान मिळाला, शेतमालाला योग्य भाव मिळाला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. राष्ट्राचा विकास दर वृदिंगत होईल.

**ग्रामसभा : ग्रामीण विकासाचे साधन**

वैदिक काळापासून ग्रामपंचायत हा प्रशासनाचा महत्वाचा घटक राहिलेला आहे. महात्मा गांधीच्या मते, "खेडयाचा उध्दार, ग्रामोध्दार हाच खरा देशाचा उध्दार आहे". भारतीय स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व करतांना महात्मा गांधीच्या मनात स्वयंपूर्ण आणि सहकारी ग्रामरचनेवर आधारलेले पंचायतराज स्थापन करण्याच्या कल्पनेचे बीजांकुरण झाले होते. भारतातील खरी जनता खेडयात राहते, म्हणून विकास आणि सुधारणेची सुरवात खेडयातूनच झाली पाहिजे असे गांधीजीचे मत होते. सद्दपरिस्थितीत प्रत्यक्ष राज्यघटनेमध्ये गांधीजीच्या विचाराचा परिणाम मार्गदर्शक तत्वात दिसून येतो. ग्रामसभेच्या निर्मितीमुळे ग्रामीण विकासाची स्वतंत्र वाटचाल सुरू झालेली आहे.

ग्रामसभेच्या माध्यमातून खेडयांचा सर्वांगीण विकास होऊन शेतकरी, मजूर, व्यावसायीक, विद्यार्थी, आबाल वृध्द यांच्या समस्यांचे निराकरण होऊ शकते. खेडयातील संकुचित वृत्ती बदलून सुधारवादी व विकासवादी वृत्ती निर्माण होऊ शकते. गावात एकतेच्या संकल्पनेतून विकासाकडे मोठी झेप घेता येते. योजना-नियोजन-कृती- विकास ही संकल्पना ग्रामसभेमुळे प्रत्यक्षात पूर्णत्वास येत आहे. ग्रामसभेची कार्यपध्दती ग्रामविकासाचे साधन ठरु पाहत आहे.

**निष्कर्ष**

म. गांधीचे आर्थिक विचार आधारभूत ठरवून प्रत्येक राज्य आपली अर्थव्यवस्था सुदृढ बनवू शकतो. भारताच्या आधुनिकीकरणाचा विचार करतांना ग्रामीण विकास हा केंद्रबिंदू असायला हवा. देशपातळीवर ज्याप्रमाणे अर्थव्यवस्थेत बदल झाला तसाच बदल ग्रामपातळीवर होणे आवश्यक आहे. भारताला महासत्ता बनविण्यासाठी देशाचा केंद्रबिंदू असलेल्या ग्रामीण विकासाच्या विविध पैलूचा विचार करून स्वयंनिर्णय,धोरण, योजना या सर्व घटकांची अंमलबजावणीझाली तरच खऱ्याअर्थाने ग्रामीण विकास साधता येईल. शेतीव्यवसायाचे व श्रमाचे नवीन प्रयोग करून नवनिर्मीती झाली पाहीजे. कुटीर उद्योगाला प्रोत्साहन देऊन सर्वागीण विकासाचा केलेला विचारच आदर्श व स्वावलंबी ग्रामाची संकल्पना प्रत्यक्षात साकार करू शकते. भारत हा ग्रामसत्ता ते महासत्ता बनू शकेल. गांधीजींचे देश स्वावलम्बनाचे स्वप्न पूर्ण होईल

संदर्भ ग्रंथ सूची;

1. Prabhu R. K. and Rao U.R.- The Mind of Mahama Gandhi. Navjeevan Publishing House.ahamdabad (1997)

2. Bhattachrya D. Mahatma Gandhi and the Sustainable Development Goals. The Daily star (2019)

3. बंग, प्रा. के. आर. : भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ - महाराष्ट्र राज्य मंगेश प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती 2005

4.https://wwwgandhifoundation.net...

5. आपटे पां.श्री.- म. गांधी- दर्शन अ.वि..गृह प्रकाशन ६२४ सदाशिव पेठ पुणे १९४८

6. कन्नमवार मा सा.- भारताचा थोर भिक्षेकरी : गांधी गांधी विचार प्रकाशन मंडळ नागपूर.१९५९

7. लोकमत वृत्तपत्र 6 डिसेंबर २०१९ लेख प्रा. बी.वाय कुलकर्णी
8. लोकमत वृत्तपत्र 7 जानेवारी 2020 लेख डॉ. जगदीश कदम

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतीय नारी द्वारा राष्ट्र निर्माण के प्रयास और स्वदेशी आन्दोलन

डा० नुज़हत फ़ातिमा
असिस्टेंट प्रोफेसर मध्यकालीन इतिहास विभाग
हमीदिया गर्ल्स डिग्री (पी० जी०) कॉलेजए प्रयागराज संघटक महाविद्यालय, इलाहाबाद विश्वविद्यालय

प्रस्तुत शोध पत्र विश्लेषणात्मक पद्धति पर आधारित है। इसमें तत्कालीन उर्दू पत्रिकाएं जो महिलाओं द्वारा प्रकाशित अथवा महिलाओं की पत्रिकाएं थीं, प्राथमिक स्रोत के रूप में उनसे जानकारी प्राप्त की गई है। इन उर्दू पत्रिकाओं में 'स्वदेशी आन्दोलन' से जुड़ी नारियों की आन्दोलन में सक्रिय भागीदारी और रचनात्मक कार्यों से संबंधित रिपोर्टिंग है। यह पत्रिकाएं तत्कालीन साहित्यिक, प्रमाणिक एवं ऐतिहासिक दस्तावेज हैं।

**प्रस्तावना** : अंग्रेज़ों की आर्थिक शोषण नीति एवं 'फूट डालो और राज करो' की नीति के फलस्वरुप भारतीय जनता में रोष उत्पन्न हो गया था। अंग्रेज़ों की दमनकारी शोषण नीति के प्रतिक्रिया स्वरूप भारत में 'स्वदेशी आन्दोलन' का प्रचार एवं प्रसार आरम्भ हुआ। भारतीय समाज के प्रत्येक वर्ग की नारियों ने पूर्ण उत्साह के साथ 'स्वदेशी आन्दोलन' को सफल बनाया और देश भर में अपनी रचनात्मक गतिविधियों के माध्यम से एक अनोखी क्रान्ति का प्रादुर्भाव किया। इस विषय में भारतीय नारी ने राष्ट्र निर्माण का जो सपना देखा था उसे अपने विद्वता, परिश्रम तथा दूरदर्शिता से साकार किया। वर्तमान काल में भी जीवन के प्रत्येक क्षेत्र में हम 'स्वदेशी' एवं रचनात्मक कार्यों के माध्यम से एक आत्मनिर्भर भारत निर्माण कर सकते हैं।

26 जून 1943 ई० की उर्दू पत्रिका 'तहजीब–ए–निस्वां' में श्रीमती आबाद अहमद खाँ साहेबा का यह भाषण वर्तमान पीढ़ी की महिलाओं और बालिकाओं के मार्गदर्शन हेतु अत्यन्त महत्वपूर्ण भाषण सिद्ध होगा। इसकी एक–एक पंक्ति में जो प्रेरणा है उससे लाभ अर्जित किया जा सकता है। वह नारी को मानसिक गुलामी व हीन भावना से निकाल कर उन्हें आर्थिक स्वतन्त्रता के व्यवहारिक गुणों को उजागर करती हुए कहती हैं :

''आर्थिक स्वतन्त्रता प्राप्ति हेतु सबसे पहला शस्त्र शिक्षा है, जो मस्तिष्क को चमकाने के अतिरिक्त मानव पर आने वाली प्रत्येक विपदाओं तथा प्रत्येक आवश्यकता में सहायक सिद्ध होती है। केवल इसी से लाभ उठाकर महिलाएं आवश्यकता पड़ने पर अपने को संभाल सकती हैं। प्रारम्भिक शिक्षा सभी के लिए आवश्यक है इसके बाद जितना सम्भव हो शिक्षा को जारी रखना चाहिए, परन्तु इसके साथ–साथ बहुत से हुनर ऐसे भी हैं जो औरतों को अच्छी प्रकार से सीखने चाहिए। उदाहरणार्थ नर्सिंग, डॉक्टरी, कम्पाउन्डरी, वकालत ऐसे वर्तमान उद्योगों धंधे जिन्हें महिलाएं सरलतापूर्वक सीख सकें और अपने उद्योग धंधों को उपयोगी बना सकें। सिलाई, कढ़ाई, नए प्रकार के व्यंजन बनाना, नवीन आदर्शों के अंतर्गत बच्चों के लालन–पालन का कार्य, घर की सफ़ाई व सजावट कम समय और कम ख़र्च में पूरा करने का गुण, अनुपयोगी वस्तुओं को उपयोगी बनाने का ढंग, हिसाब किताब के घरेलू और कारोबारी तरीके, शॉर्टहैंड, टाईप और दफ़तरों के ऐसे काम जो महिलाएं सरलतापूर्वक कर सकती हैं। यह सब कार्य अध्यापन करने के साथ–साथ योग्यतानुसार बालिकाओं को प्रशिक्षित किया जा सकता है। इसमें कई प्रकार के कार्य ऐसे हैं जो हर बालिका के पाठ्यक्रम में अनिवार्य होने चाहिए तथा कई आवश्यकतानुसार अलग से होने चाहिए।

हुनर सीखने के अतिरिक्त यह भी आवश्यकता है कि शिक्षा केवल पुस्तक के ज्ञान पर आधारित और प्रदर्शन हेतु न हो अपितु व्यवहारिक हो, चाहे मानद वेतन के साथ। जिससे महिला प्रतिकूल परिस्थितियों में मोर्चा लगे यंत्र की तरह अनुपयोगी न हो। गृहस्थ जीवन को खुशहाल बनाने के उसे परिश्रम की आवश्यकता न भी पड़े तो भी उसका घर उसके हुनर, प्रतिभा तथा अनुभव से लाभ उठाएं और आवश्यकता पड़ने पर उसे काम करने में कठिनाई न हो।''[1]

आगे अपने भाषण में श्रीमती आबाद अहमद ने महिलाओं के सशक्तिकरण की बात करते हुए कहा :

''संपन्न परिवार के माता पिता और अन्य लोग भी दहेज देने का ढंग बदलें। सर्वप्रथम उन्हें आवश्यकतानुसार शिक्षा दिलाएं और दहेज में प्रदर्शन पर ख़र्च होने वाले धन को बालिका के किशोरावस्था तक पहुँचने पर अपनी इच्छा के साथ उसके अधिकार में दे

दें। यदि वह सम्पत्ति के रूप में हो तो उसकी देखभाल का गुण सिखाएं। यदि नक़दी के रूप में हो तो उसे किसी अनुचित कारोबार में लगाएं कि समय आने पर वह किसी दूसरे पर बोझ न बने। या दहेज देने से कहीं अच्छा होगा जो रूढ़िवादी परम्पराओं की भेंट हो जाए, उसे कोई काम न हो और दूसरों के सामने असहाय होकर हाथ न फैलाए. . . . .।''[2]

इसी प्रकार महिलाओं ने आत्मनिर्भर राष्ट्र के निर्माण में महत्वपूर्ण भूमिका निभाई। स्वदेशी का केवल प्रचार एवं प्रसार ही नहीं किया अपितु घरेलू उद्योग को ही बढ़ावा दिया। मुस्लिम महिलाओं द्वारा अखिल भारतीय मुस्लिम महिला उद्योग की प्रदर्शनी का दसवीं वार्षिक सम्मेलन आगरा में हुआ, जिस की अध्यक्षा श्रीमती बिरजीस दुलहन साहेबा क़ाजमी थीं। यह प्रदर्शनी24अक्टूबर, 1942ई० में होना तय पाई थी। इस प्रदर्शनी में महिलाओं को उद्योग धंधों के प्रति जागरूकता उत्पन्न करना तथा उन्हें आत्मनिर्भर बनाना था। इस प्रकार की प्रदर्शनी में सोने तथा चाँदी के परितोषक तथा प्रमाण पत्र प्रदान किए जाते थे।[3]

बड़ोदा में 'स्वदेशी आन्दोलन' को समर्थन देने वाली महिलाओं ने बहुत बड़ा सम्मेलन किया। इस सम्मेलन मे मुसलमान, मराठी, पारसी तथा गुजराती महिलाएं सम्मिलित थीं। इस सम्मेलन में स्वदेशी वस्तुओं के प्रचार हेतु एक छोटी सी प्रदर्शनी भी लगाई गई थी जिसकी अध्यक्षा श्रीमती शमसुद्दीन सुलेमान जी थीं। इस सम्मेलन में श्रीमती हरलेकार, श्रीमती श्रद्धा मेहता, बी० ए० और कई महिलाओं ने अपने ओजस्वी भाषण दिए और कहा कि हिन्दुस्तान का कल्याण स्वदेशी के माध्यम से ही होगा। इसलिए इस देश की माताओं, पत्नियों और बहनों को अपने कर्तव्यों का वहन करना चाहिए।[4]

चौबेपुर जिला कानपुर2अक्टूबर को एक कृषि एवं औद्योगिक प्रदर्शनी का आयोजन होने वाला है। वहां और वस्तुओं के अतिरिक्त हथकरघे (हैंडलूम) और मोजे, बनियान आदि बुनने की मशीनें भी दिखाई जाएंगी। जिन लोगों की वस्तुएं उत्तम होंगी उन्हें सोने चाँदी के पारितोषिक और प्रमाण पत्र दिए जाएंगे। प्रत्येक सूबे के हिन्दुस्तानी कारीगरों को अपनी–अपनी वस्तुओं और उद्योग संबंधी वस्तुओं को लेकर पहुँचें और अवसर का लाभ उठाना चाहिए। प्रदर्शनी आयोजक हर वस्तु के रक्षक और ज़िम्मेदार होंगे। इन वस्तुओं की प्रदर्शनी के साथ निवेशकों की प्रदर्शनी भी होगी यदि कोई आवश्यक जानकारी चाहिए तो प्रदर्शनी की समिति के सचिव से पत्राचार किया जाए।[5]

राष्ट्र निर्माण में ऐसी महिलाओं के योगदान भी सराहनीय हैं जो सम्पन्न परिवार से थी उन्होंने विदेश जाकर उच्च शिक्षा प्राप्त की, विदेशों से अनुभव प्राप्त कर अपने भारत देश के उत्थान में महत्वपूर्ण सहयोग दिया। ऐसी ही एक मुस्लिम महिला के विषय में 10 सितंबर, 1930ई० के 'तहजीब–ए–निस्वां' में अपने लेख में अलीगढ़ की सिकन्दर जहाँ बेगम लिखती हैं :

''बहुत ख़ुशी की बात है कि मिस हमीद मुहम्मद साहेबा भी बी० ए० डी० टी० जिनको यू० पी० गवर्नमेंट ने पश्चिम शिक्षा पद्धति सीखने हेतु विलायत जाने की छात्रवृत्ति दिया । अब अपनी शिक्षा समाप्त करके सफलता प्राप्त कर वापस आई। हमीद जहाँ बेगम पहली मुस्लिम महिला है जो ऑक्सफोर्ड विश्वविद्यालय से शिक्षा पद्धति का डिप्लोमा लेकर वापस आई हैं।

आपने अपने इंग्लैंड प्रवास के मध्य कई शिक्षण संस्थाओं की शिक्षा पद्धति और कार्यप्रणाली का ध्यान पूर्वक अध्ययन किया। यदा–कदा पब्लिक स्कूलों में व्यवहारिक शिक्षा देकर व्यावहारिक अनुभव प्राप्त किया है। उन्हें वहां के बच्चों और बच्चियों के स्वभाव एवं गुणों पर विचार करने का भी बहुत अवसर प्राप्त हुआ है। आपके काम की बहुत प्रशंसा हुई है। इसके अतिरिक्त हमीद जहाँ बेगम ने फ्रांस, इटली, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, स्वीडन और स्कॉटलैंड भ्रमण किया है। और वहाँ के लोगों की परिस्थितियों की जानकारी प्राप्त किया है। आशा है कि वर्णित महिला अपने अनुभवों तथा लोगों से बहनों को लाभ उठाने का अवसर देंगी।''[6]

1934 ई० में भी भारतीय नारी राष्ट्र निर्माण में महत्वपूर्ण योगदान दे रही थी। इसका प्रमाण हमें तत्कालीन साप्ताहिक उर्दू पत्रिका 'तहजीब–ए–निस्वां', आगरा की शहजाद जहाँ बेगम के एक महत्वपूर्ण लेख 'औरतों के लिए पेशे' से प्राप्त होता है जिसमें वह लिखती हैं :

''आजकल इस बात की बड़ी आवश्यकता हो रही है कि महिला और पुरुष दोनों मिलकर कमाएं ताकि परिवारिक जीवन में जो कठिनाई धन की कमी होती है। उनमें कमी हो जाए। यह आवश्यकता बढ़ती जाएगी।

हिन्दुस्तान में महिला जगत जागरूक हो चुका है। और घर–घर उन्नति रूपी सूर्य की किरने पहुँच अन्धकार को दूर कर रही हैं। फिर भी बहुत से घर ऐसे हैं जहाँ विद्या का प्रकाश अच्छी प्रकार नहीं पहुँचा है। बेचारी महिलाएं नहीं जानती कि वह किन व्यवसाय के माध्यम से अपना रोजगार प्राप्त करें। जिन बहनों को लिखने पढ़ने का अवसर प्राप्त हुआ है, वह पढ़ लिख कर उस्तानीगीरी या डॉक्टरी का व्यवसाय अपनाते हैं। जो बहने सुलेखन जानती हैं वह छापाख़ानों से काम मँगवा कर घर में बैठकर लिखती और पैसा कमाती हैं। जिल्दें बांधने का काम भी महिलाएं घर बैठे करती हैं। सिलाई करके और गोटा बना कर मजदूरी पाती हैं। मैंने कई निर्धन पर्दे वाली महिलाओं को बड़िया तोड़ कर बेचते देखा है। अधिकतर महिलाएं गुड़िया के जूते बनाती हैं, कई मोतियों के अभूषण बनाकर बेचती हैं। कई मुर्गियां पाल कर अंडे बेचती हैं।

कुछ पर्दानशीन महिलाएं देशों के घर मेट्रन का काम करके वेतन पाती हैं। जिनमें विद्वता है वह लेख लिखकर पुस्तक तैयार करके वह रोजी कमाती हैं। कुछ है नाक के शीशे घिसकर परिश्रमिक पाती हैं। अधिकतर औरतों को जूतों का बॉक्स बनाते हुए भी मैंने देखा है। जो औरतें पर्दा नहीं करती वह अधिकतर होटलों या बड़ी दुकानों पर हिसाब किताब का काम करती हैं। पुस्तकालयों में अधिकतर काम करती हैं। टिकट कलेक्टर का काम भी महिलाएं करती हैं। मैंने कई मुसलमान महिलाओं को बाजा बजाने की नौकरी करते देखा है। कुछ महिलाएं नर्स का काम करती हैं और बच्चे खिलाती हैं। खाना बनाने का काम भी महिलाएं करती हैं। परन्तु महिलाओं को चाहिए कि कोई काम करते समय इस बात का ध्यान रखें कि वह इस के योग्य भी हैं। बहुत सी महिलाएं कपड़े रंगने का काम करती हैं। बहुत सी महिलाएं पर्दानशीन घरों की औरतों के सौदा ख़रीद कर लातीहैं। जिसके बदले में इनसे कुछ पैसे पा जाती हैं।''[7]

भारत नारी को जीवन संघ र्ष का पाठ पढ़ाते हुए उन्होंने अन्य उदाहारण प्रस्तुत किए :

''एक अच्छा परिवार का समय ख़राब हुआ और निर्धन हो गया तो उस परिवार की बालिकाएं नेवाड़ (पलंग बुनने की पट्टी) बनाया करती थीं। रात को बालिकाओं की बूढ़ी मां नेवाड़ बाजार में ले जाकर बेच दी थी उसी से घर का ख़र्च पूरा होता था।

चरख़ा कातना भी अच्छा पैसा है, कपड़े बुन्ना भी बुरा नहीं, सूत खोलने का रिवाज भी बहुत है, गोटे की वस्तुएं महिलाएं बनाकर बेचती हैं। इन सभी व्यवसायों में से अपनी दशानुसार अपना कर इसकी उन्नति हो सकती है।''[8]

यह लेख वर्तमान समय की महिलाओं के लिए अत्यन्त महत्वपूर्ण प्रेणना दायक लेख है। जिसमें दी गई सलाह व्यवहार में लाई जा सकती है।

दिल्ली से प्रकाशित होने वाली उर्दू पत्रिका जो महिलाओं की आवाज़ उठाने वाली पत्रिका थी और उसका नाम भी 'आवाज़–ए–निस्वां' था अर्थात महिलाओं की आवाज़। इस उर्दू पत्रिका में 29दिसम्बर, 1941 ई० को कोकनाडा के टाउन हाल में 'अखिल भारतीय महिला सम्मेलन' के सोलहवें अधिवेशन जिसमें श्रीमती विजय लक्ष्मी पंडित को अध्यक्ष बनाया गया उसकी पूरी रिपोर्ट है। इस सम्मेलन में महाराजा ऑफ पीठपुरम, युवराज पीठपुरम तथा युवरानी पीठपुरम भी सम्मिलित थें। अपने अध्यक्षीय भाषण में श्रीमती विजय लक्ष्मी पंडित ने अपने अध्यक्षीय भाषण में द्वितीय विश्व में भारत को युद्ध में झोंक देने से जो वातावरण बना था उस ओर इशारा करते हुए उन्होंने अपने भाषण में भारतीय महिलाओं को अपने कर्तव्यों के प्रति सजग तथा सचेत करते हुए उन्होंने कहा :

''. . . . . इस सम्मेलन को संकीर्ण दृष्टिकोण से नहीं अपितु वास्तविक मुद्दे और पृष्ठभूमि पता करने के बाद विचार करना चाहिए। युद्ध अज्ञानता में नहीं आरम्भ होते। यह कई नीतियों का आवश्यक परिणाम हुआ करते हैं यह युद्ध और दूसरी नीतियों का परिणाम है . . . . .''[9]

जनवरी 1942 में ऑल इण्डिया विमेंज कॉन्फ्रेंस शाखा मद्रास का सम्मेलन हुआ, जिसकी अध्यक्षता बेगम अमीरुद्दीन बी० ए० (ऑनर्ज) एम० बी० ई० की अध्यक्षीय भाषण अंग्रेज़ी में था। वह अंग्रेज़ी भाषा की प्रसिद्ध वक्ता थी। उनका लक्ष्य विमेंज कॉन्फ्रेंस की सफलता, हिन्दू महिलाओं हेतु कानूनी शर्तें, हिन्दुस्तानी महिला आन्दोलन की विशेषताएं, महिलाओं के प्रतिनिधित्व की आवश्यकता तथा परिवार में असहमति उत्पन्न होने के डर निराधार है इत्यादि मुद्दों पर आधारित थी। उनके भाषण से स्पष्ट होता

है कि महिलाओं ने अपने अस्तित्व को पहचान लिया था और इस प्रकार के सम्मेलनों ने महिला जगत 'स्व' की पहचान कर ली थी। राष्ट्र निर्माण के प्रति सजग थी। बेगम अमीरुद्दीन के भाषण का कुछ भाग उदाहरणार्थ प्रस्तुत है जो उस वातावरण में महिलाओं की महत्ता पर प्रकाश डालता है :

''. . . . . किसी महिला को पब्लिक कामों में भाग लेने से केवल इस कारण नहीं रोकना चाहिए कि वह औरत है। इस बात की सार्थकता न केवल तर्क से सत्यापित की जा सकती है, अपितु इसकी सच्चाई का प्रमाण व्यवहारिक संसार में भी मिल सकता है। महिलाओं को क्लर्की या इस प्रकार के दूसरे व्यवस्थाओं में पुरुषों के समान अधिकार देना ही पर्याप्त नहीं है। महिलाओं को उच्चतर विभागों में प्रतिनिधित्व की आवश्यकता है। हमें आवश्यकता है हिंदुस्तान के सूबे और केंद्रीय विधानसभा में औरतों को अपना प्रतिनिधि भेजने का अधिकार दिया जाए। किसी व्यक्ति को यह भरम न होना चाहिए कि हम पद प्राप्त करने में पुरुषों का मुक़ाबला करना चाहती हैं। हमारी माँग यह है कि सभी महत्वपूर्ण दलों में औरतों को कम से कम एक प्रतिनिधि आवश्यक लिया जाना चाहिए।''[10]

नए राष्ट्र निर्माण में महिलाओं का कितना महत्वपूर्ण योगदान हो सकता इस ओर इशारा करते हुए बेगम अमीरुद्दीन ने अपने अध्यक्षीय भाषण में महिलाओं में मौजूद विशेष मानवीय गुणों को पुरुषों को अपनाकर शांति व्यवस्था को स्थापित करने का प्रयास करना इस बात पर बल दिया :

''यह बात याद रखने के काबिल है कि पुरुष और महिला समाज के दो महत्वपूर्ण तत्व  हैं। उनमें से कोई भी एक दूसरे से बुरा या अच्छा नहीं है, अपितु दोनों एक दूसरे पर आधारित हैं। मानव जीवन के यह दोनों तत्व वर्तमान जीवन शैली को अच्छी बनाने के लिए अपनी पूरी कोशिश कर रहे हैं। वर्तमान सभ्यता के दोष इसी बात में छुपे हैं कि वर्तमान सभ्यता को एक मर्दाना रूप दे दिया गया और महिलाओं को नजरअन्दाज कर दिया गया है उस पर भी यह कि इसमें तबाही की भावना  काम कर रही है। दुर्भाग्य से सभी मानव इससे ग्रसित हैं। संसार का भविष्य इस समय गौरवशाली हो सकता है जबकि संधि का वह समझौते की भावना जो अब तक केवल महिलाओं तक ही सीमित थी,  पुरुषों में भी फैल जाए और यह दोनों इतिहास को गौरवशाली बनाने में एक दूसरे को पूरा पूरा सहयोग दें।''[11]

**उपसंहार** : राष्ट्र निर्माण के प्रति 'स्वदेशी आन्दोलन' से जुड़ी महिलाएं तत्कालीन विषम परिस्थितियों के बावजूद इतनी सजग थीं कि उन्होंने अपनी प्रतिभा, दूरदर्शिता, कमठता और परिश्रम से नए राष्ट्र के निर्माण में महत्वपूर्ण योगदान दिया था। अत: इस शोध पत्र लिखने का यही कारण है कि वर्तमान काल की महिलाएं इन महिलाओं से प्रेरणा लेकर देश के नवनिर्माण के लिए वरदान साबित हो सकती है तथा भारत देश को उन्नति के शिखर पर ले जाने में उनका सहयोग आद्वितीय सिद्ध होगा।

**सन्दर्भ सूची :**

1. तहजीब–ए–निस्वां, लाहौर, 26 जून 1943 ई० जिल्द 37, पृ० स० : 406-407
2. पूर्ववत
3. अख़बार, तहजीब–ए–निस्वां, 45वीं जिल्द 1942 दारुल पंजाब लाहौर पृ० स० : 615
4. पैसा अख़बार 10, 10 नवम्बर 1906, जिल्द 20, पृ० स० :12
5. पैसा अख़बार, 15 सितम्बर 1906, जिल्द 20,  पृ० स० : 9
6. तहजीब–ए–निस्वां, लाहौर, जनाना हफ़्तावार अख़बार, 10 सितम्बर, 1932 ई०, पृ० स० : 890-91
7. तहजीब–ए–निस्वां, उर्दू पत्रिका, लाहौर, 9 जून 1934 ई० जिल्द 37, पृ० स० : 525-26
8. पूर्ववत
9. आवाज़–ए–निस्वां, देहली, जनवरी 1942, जिल्द 13, पृ० स० :7
10. पूर्ववत पृ० स० : 34
11. आवाज़–ए–निस्वां, देहली, जनवरी 1942, जिल्द 13,  पृ० स० : 34

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रवादाची भूमिका

# Role of nationalism in Indian Independence Movement.

डॉ.शिवाजी सोमला पवार
एम.ए.,पीएच.डी.
संशोधन—मार्गदर्शक,इतिहास विभाग
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर जि.नांदेड

**प्रस्तावना :—**

इ.स.१४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टॅन्टीनोपल जिंकून घेतले.युरोपातील राष्ट्रांचा आशिया खंडाशी भूमार्गाचा असलेला संबंध संपुष्टात आला.युरोपियन मानवाने जलमार्गाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.पोर्तुगीज खलाशी वास्को—द—गामा १४९८ मध्ये भारताच्या पश्चिम किना—यावरील कालिकत या ठिकाणी उतरला.तेव्हा तेथिल राजा झामोरीनने त्यांना व्यापाराविषयक अनेक सवलती दिल्या. पोप अलेक्झांडर सहाव्या याने "माहिती असलेले जग आणि माहिती नसलेले जग" अशी विभागणी करून स्पेन आणि पोर्तुगाल या दोन राष्ट्रांना नव्या जगाचा शोध घेण्याची परवानगी दिली.युरोपातून भारतात येणा—या राष्ट्रांत पोर्तुगीज, डच,फ्रेंच व ब्रिटिशांचा मुख्यत्वेकरून समावेश होतो. फ्रेचांनी कंबोडिया, लाक्षोस व व्हिएतनाम या प्रदेशास "इंडोचायना" असे संबोधले, तर जावा, सुमात्रा, बाली या प्रदेशास "इंडोनेशिया" म्हटले आहे. इंडिया, इंडोचायना, इंडोनेशिया असा युरोपियनांचा पूर्वेकडचा अनुक्रमे प्रवास होता". फ्रान्सचा प्रवासी "बर्नियर लिहितो, त्या काळात "भारत देश ही एक अशी विहीर होती, की ज्या ठिकाणी जगातील सोने. चांदी येऊन एकत्रित होत होते. परंतु त्यामधून सोने—चांदी बाहेर जाण्यासाठी कोणताच रस्ता नव्हाता. भारताच्या या धनसंत्तीने प्रभावित होऊन युरोपातील देश भारताशी व्यापार करण्यासाठी आकर्षित झाले. इ.स.१६०० मध्ये स्थापन झालेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीस ब्रिटनची झाले. इ.स.१६०० मध्ये स्थापन झालेल्या "ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीस" ब्रिटनधी "महाराणी एलिझाबेथ" हिने ३१ डिसेंबर १६०० शेती पुर्वेकडील देशाशी व्यापार करण्याची सनद दिली. भारताशी ष्व्यापार करून जास्ती जास्त आर्थिक फायदा मिळविणे हाच होता. या काळात भारतात अनेक लाहन—लहान राजवटी होत्या. यामधूनच राजकीय अस्थिरता फायदा घेत ब्रिटिशांनी फोर्तुगीज, डच, फ्रेंच यांच्या व्यापारी संघर्ष सुरू झाला. फ्रेंच—इंग्रजी कर्नाटकचे पहिले, दुसरे, तिसरे युध्द, प्लासीची लढाई, बक्सारची लढाई, टिपूसुलतानशी युध्द, ब्रिटिश — मोगल संघर्ष,इंग्रज.मराठा युध्द, नेपाळशी युध्द, १८५७ चे स्वातंत्र्य युध्द, या संघर्षातून सामाजिक व धार्मिक सुधारणा आंदोलन, भारतीय राष्ट्र वादा उदय, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस, जहाल राष्ट्रवादाचा उदय, होमरूल चळवळ, असहकार चळवळ, सविनय कायदेभंगाची चळवळ, क्रांतिकारी चळवळ, मुस्लिम संप्रदायाचा उदय,भारताचा घटनात्मक विकास, शेतकरी आणि कामगार चळवळ अशा विविध बाबीतून भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रवादाची भूमिका उदयास आली. राष्ट्रीय चळवळीत सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ॲलन ऑक्टोव्हिअम हयुम, दादाभाई नवरोजी, फिरोझाशहा मेहता, न्या.महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, बाळ गंगाधर टिळक, लाला लजपत राय, ब्रिपिनचंद्रपाल ॲनी बेझर, अरविंदघोष, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, डॉ.आनंदीबाई जोशी, आंनदीबाई कर्वे, पार्वतीबाई आठवले, जनाक्का शिंदे, डॉ.रखमाबाई राऊत,सावित्रीबाई फुले. अशी मातबर मंडळी या देशस्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेवून देशाला मवाळवादी, जहालवादी, क्रांतिकारक,

स्त्रीशक्ती,समाजसुधारक, यांनी राष्ट्रउभारणीत महत्वांची भूमिका बजावली म्हणून स्वातंत्र्य चळवळ उदयास येऊन देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले.

*** संशोधनाची उद्दिष्टये :—**

१. युरोपियन व्यापा—यांच्या आगमनापुर्वीची भारतातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा
२. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन सत्ता कशी स्थापन केली यांचा आढावा घेता येईल.
३. भारतात राष्ट्रवादाचा उदय होऊन इ.स.१८८५ मध्ये राष्ट्रीय कॉग्रेसची स्थापना झाली.
४. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसने ब्रिटिश सत्तेच्या विरोधात भारताच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ सुरू केली.
५. १९ व्या शतकाचा पूर्वाध हा आधुनिक भारताच्या इतिहासातील धार्मिक, सामाजिक व राजकीय प्रबोधनाचा उष:काल मानला जातो.
६. उग्र राष्ट्रवादाचा उदय व विकास यातून क्रांतिकारी चळवळीचा उदय.
७. भारतीय स्वातंत्र्यासाठी विविध राष्ट्रीय चळवळीचा आढावा घेता येईल.
८. राष्ट्रीय चळवळीतील पुढा—यांची व्यक्तिचित्रे व त्याचे योगदानाचा आढावा.
९. १९व्या शतकातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान.
१०. भारताच्या घटनात्मक विकासाची सविस्तर माहिती घ्यावयाची आहे.
११. स्वातंत्र्य चळवळीत शेतकरी आणि कामगार यांची भूमिका पाहाता येईल.

*** ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील कामगिरी:— (इ.स.१९५७—१८५७):—**

इ.स.सोळाव्या शतकात भारत देश हा धनसंपन्न देशी होता. त्यांच्या धन संपत्तीची चर्चा दुरदुरच्या देशात होऊ लागली होती.भारताच्या या धन संपत्तीने प्रभावित होऊन युरोपातील देश भारताशी व्यापार करण्यासाठी आकर्षित झाले.सर्व प्रथम प्रोर्तुगाल चा युरोपियन देशाने भारताशी व्यापारी संबंध प्रस्थापित केले.यानंतर डच,इंग्रज आणि फ्रान्स हे देश व्यापारासाठी भारतात आले.इ.स.१६०० साली स्थापन झालेल्या “ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीस “ब्रिटनची” महाराणी एलिझाबेथ” हिने ३१ डिसेंबर १६०० रोजी पुर्वेकडील देशाशी व्यापार करण्याची सनद दिली.भारताशी व्यापार करून जास्तीत जास्त आर्थिक फायदा मिळविणे हा या कंपनीचा मूळ हेतू होता.येथील शासन व्यवस्थेत हस्तक्षेप करणे हा त्यांचा उद्देश नव्हता. परंतु भारतातील राजकीय अस्थिरतेचा व दुर्बलतेचा फायदा घेऊन कंपनीने येथील शासन व्यवस्थेत हस्तक्षेप सुरू केला आणि अल्पाबधितच त्यांने संपूर्ण देशावर आपला अधिसत्ता निर्माण केली.[१] या घडमोडीत पोर्तुगाल—डच—ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापारी विकास व प्रभाव (१६००—१७७४), ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील उद्योगधंदे : भारतातील ब्रिटिश—फ्रेंच संघर्ष — (१६६३—१७६३),ब्रिटिश सत्तेची स्थापना व विस्तार (१७५६—१८१८),बंगालवर तांबा—१७६४, प्लासीची लढाई—१७५७,बक्सारची लढाई—१७६४,बंगालमधील दुहेरी शासनव्यवस्था व त्यांचे दुष्परिणाम, कंपनीने साम्राज्यविस्तारासाठी लॉर्ड वेलस्ली.१७९८—१८०५, पर्यंत राहून तैनाती फौजी उभारली. या फौजेच्या बळावर हैद्राबादच्या निजामाशी तह १७९८, अवध राज्याशी तह—१८०१, कर्नाटक राज्य खालसा—१८०१, तंजावर व सुरत खालसा—म्हैसूरच्या राज्यावर नियंत्रण —१७९९, मराठयांशी संघर्ष , त्यांनंतर लॉर्ड हेस्टिंग्ज (१८१३—१८२३),

इंग्रज—मराठा तिसरे युध्द होऊन मराठी सत्तेचा शेवट — १८१३—१८२३, इंग्रज— मराठा तिसरे युध्द होऊन मराठी सत्तेचा शेवट १८१८ मध्ये झाला.नेपालशीयुध्द —१८१४,पेठा—यांचा बंदोबस्त, शिंदे व गायकवाडाशी तह—१८१८, राजपुताण्यातील राज्यावर वर्चस्व व मध्यभारत आणि गुजरातवर वर्चस्व प्रस्थापित केले.[२] लॉर्ड हेस्टिंग्जच्या सुधारणा हया जमीन महसूल विषयक सुधारणा, न्याय क्षेत्रातील सुधारणा, शैक्षणिक सुधारणा, वृत्तपत्राांना स्वातंत्र्य,पामर व कंपनीचे प्रकरण यातून भारतीयांना प्रत्यक्षअप्रत्यक्ष कायदा झाला.जॉन ॲडम्स, लॉर्ड विलियम बेंटिक (१८२८—१८३५) या काळात अंतर्गत धोरणात बेंटिकने आर्थिक सुधारणा, न्यायविषयक सुधारणा, लोककल्यानकारी सुधारणा शैक्षणिक सुधारणा, सतीप्रथा बंद केली. ठगटोळयांचा नाश, नरबळीची प्रथा बंद केली, कन्या वध बंद केली, धार्मिक स्वातंत्र्य,स्त्रीयाचा व्यापारं बंद केला, शेतक—यासाठी योजना आखली यातूनच भारतीय सुधण्यान झाले. लॉर्ड डलहौसी (१८४८—१८५६), यांकाळात सिंधवर तांबा—१८४३, पंजाबर तांबा १८४९, ब्रम्हेदशाचे ब्रिटिश साम्राज्यात विलिनीकरण—१८५२, दत्तक वारसा ना मंजूर, पेन्शन व पदव्या समाप्त, तंजावर खंडणी न दिल्याने व—हाड प्रात खालसा, सिक्किम खालसा,अवध प्रांत खालसा—१८५६, त्यांने लस्करी सुधारणा ,, प्रशासकी सुधारणा, व्यापार विषयक सुधारणा, रेल्वे, पोस्ट , तारायंत्राची सुरूवात, सार्वजनिक बांधकाम विभागाची स्थापना, शिक्षण विषयक सुधारणा, प्राचीन स्मारकांचे संरक्षण, पुनर्विवाहास मान्यता, वारसा हक्कास मान्यता या बाबी भारताच्या हितापेक्षा त्रास दायक असल्यामुळे १८५७ चा स्वातंत्र्य युध्द घडून आले. परंतु येथून ब्रिटिशांनी आपला राजकीय सत्ता भारतावर गांजवली त्यामुळे भारतीय समाजात राष्ट्रवादाची भावना जागृत झाली.[३]

*** भारतीय राष्ट्रवादाचा उदय व विकासः—**

ब्रिटिशांची अन्यायी व आत्याचारी राजवट उलथून टाकण्यासाठी भारतीय लोकांनी इ.स.१८५७ मध्ये स्वातंत्र्यउठाव केला.परंतु हा उठाव ब्रिटिशांनी निर्दयीपणे मोडून काढला. इ.स.१८५७ चे भारतीय लोकांनी ब्रिटिशांविरूध्द केलेले पहिले स्वातंत्र्ययुध्द होते. भारतीयांचे उठाव मोडण्यात ब्रिटिशांना यश मिळाले असले तरी त्यांना लोकांमधील असंतोष दूर करता आला नाही. या उलट ब्रिटिशाविरोधी संघटनात्मकरित्या आंदोलन करण्याची आवश्यकता वाटू लागली. त्यामुळे राष्ट्रीय कॉग्रेस व राष्ट्रवादाचा उदयाकडे वाटचाल सुरू झाली होती. १९व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच भारतात धार्मिक व सामाजिक चळवळीला प्रारंभ झाला. म्हणून आधुनिक भारताच्या इतिहासात १९व्या शतकाचा पूर्वार्ध धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जागृतीचा उषःकाल मानला जातो.[४] या काळात ब्राम्हो समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, प्रार्थना,सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी, भारतीय सेवक समाज यासारख्या धार्मिक संघटनांचा उदय झाला. या धर्म संघटनांनी समाजातील रूढी, परंपरा, चालिरिती, अंधश्रध्दा,कर्मकांड,बालकन्यवंध,विधवाचे प्रश्न, या विरूध्द चळवळ सुरू केली. राजा राममहोन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, महादेव गोविंद रानडे, गो.ग.आगरकर, अरविंद घोष, गो.कृ.गोखले, मोहमंद अली जीना, वि.दा.सावरकर, मो.क.गांधी, डॉ.बी.आर.आंबेडकर, राममनोहर लोहिया, रमाबाई रानडे, सावित्रिबाई फुले, पंडिता रमाबाई ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई कानिटकर, डॉ.रखमाबाई राऊत, जनाक्का शिंदे, डॉ.आनंदीबाई जोशी, आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई आठवले असे अनेक समाजसुधारकांनी धार्मिक पुनरूज्जीवनाची मोहिम सुरू केली. यामुळे विविध समाजसुधारकांनी धार्मिक पुनर्जागरण समाज प्रबोधनाचे महान कार्य केले.[५]

१८५८ च्या भारत सरकार कायद्यानुसार शासन सुरू केले म्हणून भारतीयांत असंतोष निर्माण होऊन बंडाचे निशान उभारले.ब्रिटिशांनी सत्तेचे केंद्रीयकरण, पाचात्य शिक्षण व संस्कृतीचा प्रभाव, इंग्रजी शिक्षण, ब्रिटिशाचे साम्राज्यवादी धोरण, भारताचे आर्थिक शोषण, वंशभेदाचे धोरण, भारतीय वृत्तपत्रावर बंदी, भारतीय साहिहत्यावर बंदी, दळणवळणाच्या साधना वाढ, मध्यम वर्गाचा उदय, इललबर्ट बिलावरील वाद, जागतिक राजकारणाचे बदलते संदर्भ, अशा प्रकारे ब्रिटिशांचे परिस्थितीच्या दडपणातून स्वीकारलेले उदारमतवादी धोरणही भारतीयांच्या राष्ट्रवादी संघटनास काही प्रमाणात कारणीभूत ठरते.[६]

*** भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रीय चळवळीची वाटचाल:— (इ.स.१८८५—१९०५)**

इ.स.१८३७ मध्ये द्वारकानाथ टागोर यांनी “लॅण्डहोल्डर्स असोशिएशन” ही संघटना स्थापना केली होती. परंतु जॉर्ज थॉम्पसन या टागोर कुटुंबांशी निकटचा संबंध असलेल्या ब्रिटिश इसमाने लंडन येथे ब्रिटिश इंडिया सोसायटी ही संस्था १८३९ मध्ये स्थापन केली होती.इ.स.१८५१ मध्ये या दोन्ही संस्थाचे एकत्रीकरण करून “ब्रिटिश इंडिया असोशिएशन” ही संस्था उदयास आली.हरिश्चंद्र मुखर्जी यांनी “हिंदू पॅट्रियट” या पत्रकातून ब्रिटिश सरकारवर .कठोर टीका केली होती.[७] त्यात सनदी सेवा समतीच्या तत्वावर खूल्या कराव्यात, कायद्याच्या क्षेत्रात वर्णभेद असू नये, प्रत्येक प्रांतात सरकार नियुक्त व लोकनिर्वाचित सदस्यांचे एक प्रतिनिधिक मंडळ असावे.पुढे मंद्रास नेटिव्ह असोशिएन—१८५२, ईस इंडिया असोशिएन—१८६६,पूना असोशिएन—१८६७, पुणे सार्वजनिक सभा—१८७०, बॉम्बे असोशिएन—१८५२, बॉम्बे प्रेसिडेन्सी असोशिएन—१८८५, मद्रास महाजन सभा—१८८४, इंडिया लीग १८७५,इंडिया असोशिएन—१८७६, ॲलन ऑक्टोव्हिअन हयुम व त्यांची भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापने बाबत भूमिका हयुम यांच्या मते “ब्रिटिशांच्या राजवटीविषयी भारतीयांची मते अजमावण्याचे कॉंग्रेस हे एक प्रभावी साधन आहे.”[८] सामाजिक सुधारणा करून व देशाची प्रगती सरकारच्या मदतीने सनदशीर मार्गाने घडवून आणणे हे या संघटनेचे ध्येय होते. लॉर्ड नॉर्थब्रुक, जॉन ब्राइट व लॉर्ड रिपन यांच्या प्रोच्छानाने व लॉर्ड डफरींच्या सहकार्याने इ.स.१८८५ मध्ये पुण्याला घेण्याचे ठरले परंतु कॉल—याची सार्थामुळेही हे अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये स्थापन केले. या अधिवेशनात ७२ प्रतिनिधी उपस्थित होते.[९] इ.स.१८८५ ते इ.स.१९०५ पर्यंतच्या राष्ट्रीय कॉंग्रेसचा कालखंड हा मवाळ कालखंड म्हणून ओळखला जातो.या कालखंडात न्यामूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता, दाराभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, उमेशचंद्र बॅनर्जी, कॉटन आणि ॲलन ओ. हमूत यांनी केला. त्यांची कार्यपध्दती अशी होती की, उदारमतवादी विचार, सातत्याने त्याच त्या मागण्याचा पुनरूच्चार, ब्रिटिश राजसत्तेशी एकनिष्ठा, ब्रिटिशांच्या न्यायबुध्दीवर विश्वास, सनदशीर मार्गावर विश्वास, क्रमाक्रमाणे होणा—या सुधारणावर विश्वास, या मार्गाचा अवलंब केला. परंतु मवाळवादयाना महनावे तेवढे यश प्राप्त होत नसल्याने त्यातून जहाल गट दयास आला.[१०]

*** जहाल राष्ट्रवादाचा उदय व विकास :— (इ.स.१८९३—इ.स.१९०७)**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या इतिहासातील इ.स.१८९३ ते इ.स.१९०७ हा कालखंड कॉंग्रेसमधील उग्र. अर्थात जहाल राष्ट्रवादाच्या उदथाचा व कार्याचा काळ समजला जातो. कॉंग्रेसमध्ये अनेक सुशिक्षित तरूणांनी उत्साहाने भाग घेतला होता. या सुशिक्षित तरूणांची विचारप्रणाली आणि कार्यपध्दतीतून जहाल राष्ट्रवादाचा उदय आणि विकास झाला. इ.स.१९०७मध्ये सूरत येथील अधिवेशनात जहाल गटाचे नेते महाराष्ट्रातील लोकमान्य टिळक, पंजाबचे लाला लजपतराय, बंगालचे अरविंद घोष व बिपीनचंद्र पाल होते.[११] जहाल गटाचे प्रमुख नेतृत्व लोकमान्य टिळक यांच्या कडेच होते. सरकारपुढे मांडण्यासाठी अर्ज,

विनंत्या, प्रस्ताव, शिष्टमंडळे या मार्गाचा अवलंब केला. मवाळांच्या अशा धोरणामुळे लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय व अरविंद घोष या सारख्या अनेक तरूणांनी नाराजी व्यक्ती केली. त्यामुळे जहाल विचारसरणीच्या कॉंग्रेसच्या बाहेर पडून लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्रा राष्ट्रीय चळवळ उभारण्याचे कार्य केले. इ.स.१८९३ नंतर कॉंग्रेसमध्ये आसलेल्या तरूणांमध्ये कॉंग्रेसच्या उदारमतवाद धोरणावर विश्वास राहिला नाही.कॉंग्रेसच्या ध्येयधोरणांबाबत अनिश्चितता, कॉंग्रेसची अयशस्वी कार्यपध्दत, कॉंग्रेसच्या मागण्यांकडे सरकारचे दुर्लक्ष, ब्रिटिश सरकारच दडपशाहीचे धोरण, लॉर्ड कर्झानची दडपशाही नीती व अदूरदर्शीपणाचे परराष्ट्र धोरण, बंगालची फाळणी, भारताची आर्थिक पिळवणूक, आंतरराष्ट्र घटनांचे परिणाम, विदेशातील भारतीयांना हीन वागणूक, नैसर्गिक आपत्तीकडे सरकारचे दुर्लक्ष, धार्मिक पुनरुज्जीवनाची चळवळीतून प्रखर राष्ट्रवादाचा जन्म झाला.[१२]

*** क्रांतिकारी चळवळ :—**

भारतीय स्वातंत्र्यांच्या चळवळीत चार प्रवाह प्रामुख्याने दिसून येतात १) मवाळवादी २) जहालवादी ३) क्रांतिकारकवादी ४) गांधीवादी या चारही प्रवाहांची विचारसरणी, साधने, स्वरूप, महत्व व कार्यपध्दती एकमेकांपासून संपूर्णतः भिन्न होती. आत्यंतिक राष्ट्रवादी भावनेने पेटून उठलेले तरूण, त्यांनी दहशतवादी व क्रांतिकारकवादी मार्गाचा अवलंब केला होता.ते सशस्त्र लढा, त्याग, बलिदान व हिंसा या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही, म्हणून १८५७ उठाव हा क्रांतिकारकांना दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरला. सावरकर, नेहरू, अशोक मेहता, सुभाषचंद्र बोस यांनी या उठावास “स्वातंत्र्याचा पहिला संग्राम” म्हटले होते.[१३] हा उठाव ब्रिटिशाने मोडून काढल्यामुळे तरूणांच्या मनात ब्रिटिशांप्रति, असंतोषाची भावना निर्माण झाली. झाशीचीराणी, तात्याटोपे, बहादूरशहा जफर, नानासाहेब पेशवे ही जनतेची स्फूर्तिस्थाने बनली.राष्ट्रभक्ती निर्माण करणारे साहित्य, राष्ट्रभक्ती निर्माण करणारे वृत्तपत्रे, ब्रिटिशांचे वंश द्वेषाचे धोरण, भारताचे आर्थिक शोषण, बंगालची फाळणी, पाश्चात्य शिक्षण पध्दती, आंतरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव, प्लेग व दुष्काळाकडे दुर्लक्ष, लाल—बाल—पाल यांचे लिखान व भाषणे यातून क्रांतिकारकांना मिळालेली स्फूर्ती, जहाल—मवाळांचा मार्ग, कार्यपध्दती क्रांतिकाराकांना पसंत नव्हती.राष्ट्र ही आपली माता आसल्याने तिच्या स्वातंत्र्यासाठी परकियांची सत्ता नष्ट करणे व भारतभूमी स्वतंत्र करणे हे क्रांतिकारकांचे अंतिम उद्दिष्ट होते.महाराष्ट्रात क्रांतिकारक चळवळ वासुदेव बळवंत फडके, सेनापती बापट, विष्णू गणेश पिगळे, चाफेकर बंधू, अनंत लक्ष्मण कान्हेरे, वि.दा.सावरकर तर बंगालमधील क्रांतिकारक चळवळ वीरेंद्रकुमार घोष, भुपेंद्रनाथ दत्त हे अग्रणी होते. अनुशीलन समिती, खुदिराम बोस, चित्तगावकट, सुर्यसेन प्रीतीलता वड्डेवार, बिना दास,शांतीघोष, सुनीती चौधरी, रासबिहारी घोष यांनी चळवळ उभारली.तसेच पंजाबमधील सशस्त्र क्रांतिकारकांची चळवळ ही पंडित रामसिंह कुक्का, काकोरीकट, भगतसिंग व बटुकेश्वर दत्त, लाहोर कर, जतींद्रनाथ दास, कन्हैयालाल दत्त बालमुकंद, चंद्रशेखर आझाद, मदनलाथिंग्रा, यशपालसिंग, उधमसिंग यांनी ही चळवळ पंजाब प्रांतात चालविले.क्रांतिकारी चळवळ मद्रास प्रांतात ही, तसेच क्रांतिकारकांने भारतातच नव्हे तर भारता बाहेर म्हणजे इंग्लंड, मध्ये पंडित श्यामजी कृष्ण वर्मा, वि.दा.सावरकर, श्रीमती मादाम कामा तर अमेरिकेत तारकनाथ दास व डॉ.खानखोजे, लाला हरदयाळ व गदर चळवळ, कॅनडा, अफगणिस्तान, जर्मनी, या देशांतही ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्यासाठी राष्ट्रवादयांनी आपली भूमिका वेगवेगळया माध्यमाने वापर केली.[१४]

*** महात्मा गांधीच्या नेतृत्वाखलील राष्ट्रवादी चळवळ :— (इ.स.१९२० ते १९४७)**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे.लो.टिळकाच्या मृत्युनंतर १९२० पासून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीकडे आले. व भारतीय स्वातंत्र्यलढयातील गांधीजी ही एकमेव व्यक्ती होय की, जिचे नाव संपूर्ण भारतात व जगातील सर्व देशांतील जनतेपर्यंत जाऊन पोहोचले होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहहेत. स्वातंत्र्ययोध्दे, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राजकीय विचारवंत, अस्पृश्योद्वारक, धर्मवक्ते, अर्थतज्ञ, स्त्रीयाबद्दलाचे विचार, वगैरे, सत्य, अहिंसा, सत्यागृहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्याविरूध्द दिलेला लढा हा मानव समाजाच्या इतिहासातील एक अपूर्व लढा मानावा लागेल.[१५] गांधीजीवर थोरो, रस्कीन, टॉलस्टॉय यांच्या विचारांचा प्रभाव तर त्यांचावर संप्रदाय, धर्मग्रंथ व धर्मगुरू यांची एकसुरी छाप दिसत नाही. मानवजातीच्या उध्दाराचा अहिंसा हा एकमेव मार्ग आहे. तर सत्यागृह संकल्पना ही गांधीजीची विश्वविचाराला दिलेली देणगी आहे. गांधीजीनी अहिंसात्मक आोलनाच्या मार्गासाठी असहकार चळवळ—१९२०, सविनय कायदेभंग—१९३०, हरताळ, उपोषण, बहिस्कार, हिजरत या मार्गाचा अवलंब करून राष्ट्रीय चळवळ ब्रिटिशांच्या विरूध्दात भक्कम केली. तसेच रौलेट ॲक्टविरूध्द सत्यागृह, जालियनवाला बाग हत्याकांड, खिलाफत चळवळ, बार्डोली सत्यागृह, चौरीचौराची घटना, स्वराज्य पक्ष, सायमन कमिशन, नेहरू रिपोर्ट, लाहोर अधिवेशन—१९२८, धारसाना व वडाळा येथील सत्यागृह, दांडीयात्र—१९३०,गोलमेज परिषदा, गांधी—आयर्विन करार—१९३१, रॅम्से मॅकडोनाल्ड यांचा जातीय निवाडा, पुणे करार—१९३२, भारत घोडा आंदोलन — १९४२, या बाबीमुळे सरकारचे नीतिधैर्य खचले, कारण लष्कर, नौदल हे स्वातंत्र्य चळवळीला अनुकुल बनले होते. फेब्रूवारी १९४६ मध्ये मुंबईत नौदल सैनिकांचे बंड झाले. या परिस्थितीची दखल घेवून ब्रिटनचे पंतप्रधन ॲटली यांनी २० फेब्रुवारी १९४६ रोजी भारत सोडून जाण्याचा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. लॉर्ड माउंटबॅटनने भारताच्या फाळणीची एक योजना ब्रिटिश सरकारची मान्यता घेऊन ३ जून १९४७ रोजी भारताच्या फाळणीची योजना जाहीर केली. १४ ऑगस्ट १९४७ रोजी सिंध , बलुचिस्तान, वायव्यसरहदप्रांत, सिल्हेट विभाग, पूर्णबंगाल व पश्चिम बंगाल, यांचे मिळून बनलेले पाकिस्तान हे एक स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र भारतीय उपखंडात उदयास आले.[१६]

*** सुरेद्रनाथ बॅनर्जी :— (इ.स.१८४८ ते १९२५)**

भारताच्या राष्ट्रवादी चळवळीचे जनक म्हणून सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे नाव आधुनिक भारताच्या इतिहासात ठळक अक्षरांत लिहिले जाते. पाठशाळेतील प्राथमिक शिक्षणाचे धडे संपवून केवळ ॲग्लो—इंडियनांसाठीच असलेल्या डोवेटन कॉलेजात सुरेंद्रनाथांनी पदार्पण केले. १८६३ साली मॅट्रिकची परीक्षा प्रथम श्रेणीत पास करून त्यांनी ज्यूनिअर शिष्यवृत्ती मिळवली.१८६८ साली ते बी.ए.झाले. वडिलांना त्यांना भारतीय सनदी सेवेची (आय.सी.एस) परीक्षा देण्यासाठी इंग्लंडला पाठविले. १८७१ साली सिलहर येथे सहायक मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांची नेमणूक झाली. उच्चपदांवर हिंदी माणसाला पाहून गो—या लोकांनी खोटे—नारे आरोप लावून त्यांच्याविरध्द काहूर उठवले. त्यांचा खटला कलकत्तास व्हावा व शाासनाने आपल्याला बचावासाठी वकील द्यावा या सुरेंद्रनाथाच्या दोन्ही मागण्या डावलण्यात आल्या. आयोगाने त्यांना दोषी ठरवले. हि प्रेरणा घेवून त्यांनी वकिलीची सनद मिळवली. परंतु सरकारने त्यांना पदच्यूत केल्यामुळे त्यांना न्यायासनासमोर वकिली करता येणार नाही असे सांगण्यात आले. या दोन घटनाचा मनावर खूप खोल परिणाम झाला. आपण गुलामगिरीतील हिंदी नागरीक आहोत म्हणून,

आणि त्यापेक्षा आपण अशिक्षित व असंघटित आहोत म्हणून या अन्यायाला, अपमानाला व अत्याचाराला आज आपणास तोंड द्यावे लागत आहेत याची त्यांना तीव्रतेने जाणीव झाली.[१७]

याच वेळी बंगालमधील समाजसुधारक ईश्वरचंद्र विद्यासागरर यांचे लक्ष सुरेंद्रनाथांकडे गेले आणि १८७६ साली इंग्रजीच्या प्राध्यापकाची जागा मिळाली.१८८२ साली स्वत:ची एक शाळा स्थापन केली. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सुरेंद्रनाथयांनी वृत्तव्यवसायात व राजकीय क्षेत्रातही पदार्पण केले. १८७६ साली “इंडियन असोशिएशन” नावाची संस्था स्थापन केली. ब्रिटिशांच्या अन्याया विरूध्द भारतीय सुशिक्षित तरूणांना त्याविरूध्द लढण्यास संघटित करावे हा त्याच्या उद्देश होता. १८८४ साली कलकत्याला नॅशनल कॉन्फरन्सचे आयोजन त्यांनी केले. कॉग्रेसमध्ये प्रवेश केल्यापासून १९१८ पर्यंत कॉग्रेसचे एक सर्वसामान्य पुढारी होते. त्यांनी “इंद्यिडयन नॅशनल लिबरल फेडरेशन,” नावाची संघटना स्थापन केली.१९२२साली ते बंगालच्या विधिमंडळावर निवडून आले. व काही काळ त्यांना मंत्री म्हणून कामही केले. सुरेंद्रनाथांच्या जीवनातील १८७८ ते १९०७ हा काळ त्यांच्या लोकमान्यतेचा काळ होता. वंगभंगविरोधी चळवळीच्या श्रीगणेशा त्यांनीच केला. स्वदेशी, बहिष्कारांचा मंत्र खेडोपाडी पोहचवले. सुरेंद्रनाथांची लेखणी अतिशय प्रभावी होती. बंगाली या वृत्तपत्रातील त्यांचे अग्रलेख या दृष्टिने वाचनीय आहेत. A Nation in Making या आत्मचरित्रात्मक ग्रंथात समकालीन भारतीय परिस्थितीचे दर्शन घडले. सनदशीर राजकीय चळवळीचे जनक व राष्ट्रीय प्रारंभीचे आघाडीचे पुढारी म्हणून आधुनिक भाारताच्या इतिहासातील त्यांचे स्थान अढळ आहे.[१८]

*** ॲलन ऑक्टेव्हिअन हयूम : (इ.स.१८२९— १९१२)**

न्याय अधिकार मिळवून देण्याच्या हेतूने झटणारे जे मूठभर ब्रिटिश अधिकारी भारतात होते, त्यापैकी ॲलन हयूम हे एक आहेत.ब्रिटिश सनदी सेवेतील बव्हॅशी ब्रिटिश अधिकारी मंडळी कट्टर साम्राज्यवादी, वर्णश्रेष्ठत्वाच्या दंभामुळे सर्व भारतीयांना तुच्छ लेखणारी सतत लष्करी दडपणाखाली भारतीयांना ठेवायला पाहिजे असे मताचे असत. भारतीयांना न्याय देणे आवश्यक आहे असे राज्यकर्त्यांना बजाविणारी, एवढेच नव्हे तर निवृत्तीनंतर भारतीयांच्या कल्याणासाठी झटणारी व त्यामुळे स्वकीयांचा रोष ओठवूनन घेणारी हयुमसारखी मंडळी ब्रिटिश नोकरशाहीत अपवादात्मक होती. पित्याप्रमाणेच तेहे ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेत १८४८ साली दाखल झाले.[१९] १८५७ च्या उठावाच्या वेळी संयुक्त प्रांतातील इटावा जिल्हयात अधिकारी म्हणून ते काम करीत परंतु ब्रिटिश सत्ता कायम टिकविण्याच्या प्रयत्न केला असला तरी भारतीयांनाच्या कल्याणाविषयी त्यांची तळमळ त्यांनी वरिष्ठ अधिका—यांना पाठविलेल्या अनेक पत्रांतून व्यक्त होताना दिसते.इ.स.१८७० ते १८७९ या दरम्यान केंद्र सरकारच्या गृहमंत्रयाचे सचिव म्हणून काम करीत असतांना निरनिराळया प्रांतातील अधिका—यांनी पाठविलेले अहवाल त्यांना वाचायला मिळाले.१८७० पासून देशातील निरनिराळया भागातं ते लहानसहान उठाव होत होते, ते जनतेतील असीम असंतोषाची द्योतक आहेत अशी त्यांची पक्की समजूत झाली. भारतीयांच्या अडचणीची, तक्रारीची व आशा आकांक्षाची दखल घेऊन, त्याचे न्याय अधिकार त्यांना देण्यास ब्रिटिश सरकारने मागे पुढे पाहूनये असे त्यांचे ठाम मत बनले.[२०] भारताचा औद्योगिक व आर्थिक करूनच ब्रिटिश सत्तेला भारतात दृढता, व स्थैर्य लाभेल असे ते वारंवार प्रतिपादन करीत १८८२ साली निवृत्त होताच आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने त्यांनी विधायक कार्याला आरंभ केला. सुशिक्षित भारतीय तरूणांना क्रियाशील बनवावे म्हणून त्यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. १मार्च १८८३ रोजी कलकत्ता विद्यापीठातील पदवीधारांना उद्देशून लिहिलेल्या एका अनावृत

पत्रात हयूमनी म्हटले, “आपण सर्व सुख व चैनीच्या त्याग करून सार्वजनिक कार्यासाठी एकत्र आले पाहिजे, देशाचा विकास करण्यासाठी पन्नास सुशिक्षित तरूण पुढे आल्यास देशाच्या विकासाचा प्रगतीचा मार्ग सुकट होईल,” १८८४ साली त्यांनी“ इंडियन नॅशनल युनियन संघटना” स्थापन केली. सामाजिक सुधारणा करणे देशाची प्रगती सरकारच्या मदतीने सनदशीर मार्गाने घडवून आणने हे या संघटनेचे ध्येय होते. हयूमच्या विचाराला लॉर्ड नॉर्थब्रुक, जॉन ब्राईट व लॉर्ड रिपन यांनी उत्तेजन दिले.[२१] लॉर्ड डफरिन यांच्याशी चर्चा केल्यानंतर हयुमने सर्वाच्या विचाराने पुण्याला १८८५ साली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन घेण्याचे निश्‍चित केले. या अधिवेशनाचे यजमानपद “बॉबे प्रेसिडेन्सी असो शिएनन” स्वीकारले फिरोजशहामेहता, व्या.तेलग, दादाभाई नौरोजी, पंडित मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, पंडित मदन  मोहन मालविया, गोपाळकृष्ण गोखले, उमेचंद्र बॅनर्जी, दिनशा वॉच्छा, नरेंद्रनाथ सेन, गिरिजाभूषण मुखर्जी, न्या रानडे, डॉ.भांडारकर, आगरकर, रंगया नायडू, जी सुब्रम्हण्यम अययर, वीर राघवाचार्य, गंगाप्रसाद वर्मा, आनंदा वार्लू, या हिंदी नेत्याशिवाााय विल्यम विडरबर्न, युलर्नार्टन या युरोपियन व्यक्तीनीही अधिवेशनात सहभाग घेतला होता. २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोळुदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये अधिवेशनास सुरूवात झाली. या अधिवेशनाचे अध्यक्षपद मुंबईचे गव्हर्नर लॉर्डर यांना स्वीकारण्यासाठी निमंत्रित केले होते. परंतु लॉर्डरे यांनी लॉर्ड डफरिनच्या सल्लयामुळे अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारले नसल्यामुळे डब्ल्यु, सी बॅनर्जी यांना अध्यक्षपद देण्यात आले.[२२] अशारीतीने राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात ७५ प्रतिनिधी भाग घेतला होता. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्य, चळवळीत राष्ट्रवादाची भूमिका वरील सर्व मान्यवरांनी निभावली.

*** दादाभाई नवरोजी: (इ.स.१८२५—१९१७)**

भारतातील राष्ट्रीयदृष्टया जागृत करण्यात दादाभाईचा वाटा सगळयात महत्वाचा होता. भारतीय राष्ट्रवादाला आर्थिक समीक्षेची जोड देऊन त्यांनी बिनतोड युक्तिवाद केले. १८५० पासून सहप्राध्यापक, प्राध्यापक, ज्ञानप्रसारक सभेचे कार्यकर्ते, रास्त गोफ्तारचे जनक, बॉम्बे असोसिएशनच्या संस्थापकापैकी एक अशा भूमिकांमधून त्यांनी देशाची सुरूवातीला सेवा केली. ब्रिटिश शासनाच्या आर्थिक परिणामांची शास्त्रीय पध्दतीने मीमांसा करून , त्याचे रक्तशोषक स्वरूप भारतीयांपुढे व राज्यकार्त्यापुढे निर्भीडपणे मांडण्याचे मौलिक कार्य दादाभाईनी केले. व भारतीय राष्ट्रवादाला अर्थकारणाचा भक्कम आधार मिळवून दिला.काळाच्या ओघाबरोबर पुढे आलेल्या नव्या तरूण पिढीच्या आशा आकांक्षाशी समरस होऊन “स्वराज्याचा” मंत्रही त्यांनी भारतीयांना दिला. या त्याच्या कार्याबद्दल “आधुनिक भारताचे पितामहं” (The Grandold Man) या बिरूदाने त्यांच्या केला जाणारा गौरव निश्चितच औचित्यपूर्ण ठरता”.[२३] कामा कंपनीचे प्रतिनिधी म्हणून इंग्लडला गेल्यावर त्यांनी तेथील आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला व भारतीयांस उद्योगधंदे काढण्यास प्रवृत्त केले. यातूनच जमशेटजी टाटा यांनी प्रेरणा घेऊन पोलाद उद्योगाचा पाया घेतला. १८७१ चे इंग्लंडमधील वित्त समितीसमोरील त्यांचे भाषण, १८८० चे फॅमिन कमिशनला सादर केलेले निवेदन, १८९५ सालची वेल्बी कमिशनपुढील त्यांची साक्ष गाजली. १९०६ मध्ये त्यांच्यातील मवाळ कार्यकर्ता जहाल विचारसरणीकडे झुकू लागला. वंगभंगावर टीका करून त्यांनी स्वदेशी व बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सुतीवर भर दिला. कॉंग्रेसच्या १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनात “चळवळ करा, चळवळ करा, अखंड चळवळ करा.” असा जनतेला मंत्र दिला. [२४] देशाची विपन्नावस्था नाहीशी करण्यास  “ स्वराज्य ” प्राप्ती हा एकच मार्ग असल्याचेही स्पष्ट

शब्दात सांगितले. ब्रिटिशांनी चालविलेल्या भारताच्या द्रव्याप हरणाचा सिध्दांत प्रथम मांडून राष्ट्रवादाला आर्थिक संदर्भ प्राप्त करून देणारे, आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे, दारिद्रयाचे शास्त्रीय विश्लेषण करून न थांबता त्यावर विधायक तोडगा सुचविणारे, आर्थिक दौर्बल्य व राजकीय अन्यायाविरूध्द झगडणारे व मवाळांना व जहालानाही सारखेच श्रध्देय वाटणारे, परकीय शासनावर प्रखर टीका करून त्यांचा विवके जागृत करून पाहणारे व स्वबांधवाना धर्मनिरपेक्षतेची, संघटनेची व चळवळीची दीक्षा देणारे दादाभाई भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रवर्तक ठरतात. मुंबईत दादाभाईचा ८१ वा वाढदिवस साजरा होत असतांना केलेल्या भाषणात नामदार गोखल्याने त्यांच्या समर्पित जीवनाचा आवर्जून उल्लेख केला. व त्यांचे “मधुर पवित्र्य साधेपणा, सात्विक सहनशीलता, उदात आत्मविस्मृती, उच्च देशाभिमान व उच्च ध्येयासाठी घेतलेले कष्ट पाहिले की आपण अलौकिकासमोर उभे आहोत असे वाटते.[२५]”

*** फिरोझशहा मेहता : (इ.स.१८४५—१९१५)**

फिरोझशहा मेहता हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या प्रमुख नेत्यापैकी एक होते. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सुरूवातीच्या किंवा पहिल्या कालखंडातील नेत्यामध्ये त्यांचा अंतर्भाव होतो. मुंबई ही त्यांची प्रारंभीची कर्मभूमी, येथूनच त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याला सुरूवात झाली. मुंबईच्या राजकीय वर्तुळात त्यांचा बराच प्रभाव होता. कॉंग्रेसच्या स्थापनेपासून तो त्यांच्या मृत्युपर्यंत ते कॉंग्रेसशी संबंधित होते. एम. ए.ची पदवी संपादन केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला रवाना झाले. त्या ठिकाणी त्यांच्या दादाभाई नौरोजी, जमशेटजी टाटा, उमेशचंद्र बॅनर्जी, बद्रुद्दीन तययबजी या सारख्या प्रसिध्द भारतीय व्यक्तीशी स्नेह जमला. या संबंधांचा पुढील काळातील राजकीय व सामाजिक जीवनात त्यांना खूपच फायदा झाला. वकिली व्यवसायापुरते न ठेवता त्यांनी सार्वजनिक कार्याकडे लक्ष देण्यास सुरूवात केली. १८८४—८५ मध्ये मुंबईच्या महानगर पालिकेवर त्यांची निवड झाली होती. चार वेळा मुंबईचे महापौर होण्याचा मान मिळाला. सन १८९४ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या सी.आय.ई हा किताब देऊन गौरव केला. मुंबई शहरातील अनेक सामाजिक व सार्वजनिक संस्थाशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते.[२६]

कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबई येथे २८ डिसेंबर १८८५रोजी भरले होते. या अधिवेशनात उपस्थित राहिलेल्या प्रमुख नेत्यांपैकी एक होते. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या १८९० च्या कोलकत्ता येथील अधिवेशनाचे आणि १९०९ च्या लाहोर अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणूनही त्याची निवड करण्यात आली होती. मवाळमतवादी नेत्याप्रमाणे फिरोझशहांचाही ब्रिटिश राजकर्त्यांच्या न्यायबुध्दीवर विश्वास होता. इंग्रजी सत्तेमुळे आधुनिक युगात प्रवेशही भारताला हितकारकच होते. सनदशीर व घटनात्मक मार्गाने आपण आपल्या अडीअडचणी सरकारपुढे मांडून त्या सोडवून घेण्याचा प्रयत्न करावा असे त्यांनी म्हटले होते. कॉंग्रेस १९०७ च्या सुरत अधिवेशनात संघटनेमध्ये फाटाफुट होऊन जहालगट कॉंग्रेसमधून बाहेर पडला. या गटाला कॉंग्रेसमध्ये पुन्हा प्रवेश देऊ नये, असे मत होते.ब्रिटिश राजवटीच्या काळात वर्णभेदाच्या धोरणाचा मोठया प्रमाणावर अवलंब केला जात होता. भारतीय लोकांना त्यांचयापैकी दुयम लेखले जात होते.इंग्रज सरकारच्या या वर्णभेदी धोरणाला फिरोजशहा मेहतांनी प्रखर विरोध केला. फिरोझशहा मेहता हे वृत्तपत्र स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. वृत्तपत्रस्वातंत्र्यावर नियंत्रण घालण्याच्या उद्देशाने सरकारने संमत केलेल्या प्रेस ॲक्टवर त्यांनी टीका केली होती. सन १९१३ मध्ये त्यांनी “दि बॉम्बे क्रॉनिकल” या नावाने वृत्तपत्र केले आणि त्याद्वारे आपले विचार निर्भीडपणे लोकांपुढे मांडले. भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या सुरूवातीच्या काळात तिला लोकाभिमुख बनविण्याच्या कामात फिरोझशहा मेहता यांनी महत्वपुर्ण वाटा उचलला होता.[२७]

*** न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (इ.स.१८४२—१९०१)**

१९व्या शतकाच्या अखेरच्या चतुर्थात महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या कार्याला व राजकीय जागृतीला प्रेरणा देणारी महत्वाची व्यक्ती होती ती म्हणजे न्यायमूर्ती रानडे ! सी.वाय.चिंतामणी यांनी आपल्या “इंडियन पॉलिटिक्स सिन्स म्युटिनी” या ग्रंथात “अतिशय” बुध्दिवान, अत्यंत परिश्रमी, गाढा विद्वान गंभीर तत्वचिंतक व प्रखर राष्ट्रभक्त” या शब्दात रानडयांचे गुणवर्णन करून त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्टये स्पष्ट केली आहेत. या रानडे यांच्या लिखाणाला प्रारंभ १८६२ साली प्रकाशित झालेल्या “इंदूप्रकाशातील लेखाने” झाला.१८७० मध्ये महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात त्यांनी पदन्यास केला. याच कालावधीत चिपळुणकर, टिळक, आगरकर, गोखले इत्यादीची कर्तृत्व पुण्यात आकार घेऊ लागले होते. महाराष्ट्रातील अनेक सार्वजनिक संस्थाच्या स्थापनेत त्यांचा प्रमुख सहभाग होता. प्रार्थना समाज, सार्वजनिक सभा, भारतीय सामाजिक परिषद इ.विविध संस्थाशी त्यांचा निकटचा संबंध होता. इंग्रजी सत्ता म्हणजे भारताला लाभलेली ईश्वरी वरदानच होय, असे ते समजत असत. भारतीय जनतेला आधुनिक ज्ञान व विज्ञान यांचा परिचय इंग्रजांनीच करून दिला. न्या. रानडे यांनी हिंदुस्थानात प्रागतिक सनदशीर राजकारणाचा पाया घालण्याचे कार्य केले.[२८] हिंदी अर्थकारणाचा व हिंदी औद्योगिक उन्नतीच्या चळवळीचा पाया घालण्याचे श्रेयही न्या.रानडे यांनाच दिले हाते.भारतातील दारिद्रयाच्या प्रश्न, शेतीव्यवसायावरील लोकांची संख्या, देशी उद्योगाचा—हास, शेती व नवेउद्योगधंदे, लोकसंख्येचे वाढ, या बाबी त्यांनी मांडल्या. समाजसुधारणेच्या चळवळीसंबंधात रानडे यांनी अव्वल इंग्रजी अमदानीतील दुस—या पिढीचे नेतृत्व केले होते. मानवाची प्रतिष्ठा उचावण्यासाठी प्रयत्न करणे ही समाजसुधारणेची सुरूवात होय. आपल्या समाजात संकुचित वृत्ती, जातिभेद, उच्चनीचता, ऐहिक जीवनाविषयीची उदासीनता यासारखेदोष निर्माण झाल्यामुळे समाजाची मोठया प्रमाणावर अवनती झाली आहे. समाजाची विकास घडून आणायाच्या असेल तर राजकारण, अर्थकारण, धर्मकारण व समाजकारण यांचे विचार केले पाहिजे.[२९] त्यांत बुध्दिप्रामण्याऐवजी दया, न्याय, परोपकार इ.भावना प्रधान होत्या. प्रार्थनासमाज (३१ मार्च १८६७), सार्वजनिक सभा (२ एप्रिल १८७०), भारतीय सामाजिक परिषद —१८८७, जातिप्रथेचे उच्चाटन, आंतरजातीय विवाह, विवाहाच्या वयोमर्यादेत वाढ, बहुपत्नीकत्वाच्या प्रथेस आळा, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण,जाति—बहिस्कृत लोकांच्या सुधारणा, हिंदू‘मुसलमानाच्या मतभेद, तसेच वक्तृत्वेम्तेजन सभा, नेटिव्ह जनरल लायब्ररी, फिमेल हास्कूल, वसंत व्याख्यानमाला इ.स्थेत सहभाग घेतला.मुंबई १८६५ मध्ये स्थापन झालेल्या विधवाविवाह उत्तेजक मंडळ मंडळ चे ते एक प्रमुख सभासद होते. न्या.रानडे यांचा इतिहासाचाही मोठा व्यासंग होता. त्यांनी मराठी सत्तेचा उत्कर्ष (Rise of the Maratha Power) हा ग्रंथ लिहून अत्यंत आमुल्य होता.[३०]

*** गोपाळ कृष्ण गोखले (इ.स.१८६६—१९१५) :.**

१९व्या शतकाच्या अखेरी पुण्याच्या सार्वजनिक व राजकीय क्षितिजावर ज्या दोन तेजस्वी राष्ट्रपुरूषांचा उदय झाला.कोल्हापूरच्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात जनमाला आलेल्या गोखल्यांनी वयाच्या १८व्या वर्षी पदवीधर होताच सरकारी सेवेत न शिरता समाज सेवेच्या तळमळीमुळे शाळा मास्तर म्हणून आपल्या व्यावसायिक जेवनाला आरंभ केला. लवकरच त्यांची फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाली. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक तर १८८७ मध्ये सभेचे चिटणीसही होते. सुधारक या पत्राचे ते सहसंपादक म्हणून कार्य केले. वयाच्या १९व्या वर्षी १८९७ साली वेल्बी कमिशनपुढे आर्थिक परिस्थितीविषयी माहिती सादर करण्यास डेक्कन सभेतर्फे त्यांची इंग्लंडला रवाना झाली.[३१] १८८९

सालापासून अखंड कॉग्रेसची संबंध होता. १८९५ साली ते कॉग्रेसचे चिटणीस, तर १९०५ साली कॉग्रेसचे अध्यक्ष बनले. वयाच्या २४व्या वर्षे ते प्रांतिक विधिमंडळाचे तर ३६व्या वर्षी केंद्रीय कायदेमंडळाचे सदस्य बनले. देशसेवेला वाहून घेणा—या तरूणाची पिढी तयार करावी म्हणून १९०५ साली त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. देशसेवेचा पायंडा त्यांनी स्वत: घालून दिला. १८९५ मध्ये ती सभा टिळकांच्या हाती गेल्यानंतर ते रानडयांनी स्थापन केलेल्या डेक्कन सभेत दाखल झाले.[३२] अर्थशास्त्र, राज्यशास्त्र,तर्कशास्त्र,समाजशास्त्र इ.विषयांचे त्याचे गाढ अध्ययन होते. तर्कशुध्द म्हणून प्रतिपक्षाला नामोहरम करणारी असत. त्यांच्या सौम्य, सात्कि,प्रवृत्तीचा, विशुध्द चारित्र्याचा व नि:स्वार्थ सेवावृत्तीचाही प्रभाव त्यांच्या श्रोतृवृंदावर पडे. १९०२ ते १९१२ च्या काळावधीत अर्थसंकल्पावर त्यांची जी बारा भाषणे झाली.त्यांत त्यांनी शिक्षण, शेती, उद्योग,महसूल पध्दती शासकीय सेवा, लष्करावरील खर्च इ.महत्वाचे विषय हाताळले. प्राथमिक शिक्षण, शिक्षणप्रसारासाठी केंद्र, स्वराज्य संस्थांना अनुदान, शेतक—याचे दारिद्रय, शेतसारा, कृषीविकास व भूतारण बॅका स्थापन, कालवे, बंधारे, लोककल्याणीची कामे, तांत्रिक शिक्षणसंसाि, लहान.मोठे उद्योग, अशा अनेक विद्यायक सूचना त्यांनी केल्या. १९०९ सालच्या मोर्ले—मिंटो कायद्याचे, त्यातील उणीवा असूनही समर्थन केले. राजकीय विचार इंग्रजी सत्तेविषयीची मते, सनदशीर मार्गाचा अवलंब, स्वदेशी चळवळीस पाठींबा, विकेंद्रीकरण व स्वयंशासनाचे पुरस्कर्ते, राजकारणाचे अध्यात्मीकरण, सामाजिक कार्य, भारत सेवा समाज, शुध्दचाविरत्र व नीतिमुल्ये, लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य अशी मानाची पदे भूषविली. गोपाळ कृष्ण गोखले यांचे पाहिले चरित्र “महात्मा गोपाळ कृष्ण गोखले” हे १९१६—१७ च्या दरम्यान आसामी भाषेत प्रसिध्द झाले. आसामी भाषेतील इतिहासकार व लेखक डॉ.सुर्यकुमार भुंया यांना या चरित्र लेखनाचे श्रेय दिले जाते.[३३]

*** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक : (इ.स.१८५६—१९२०).**

हल्लीच्या काळी त्यांच्याइतका लोकोत्तर पुरूष कोणीच झाला नाही.कदाचित गांधी त्यांच्या बरोवरीला येतील, पण बुध्दिमत्ता व राजकारणातील मार्मिकता हे गुण टिळकांच्या अंगी अधिक प्रमाणात वसत होते.सर व्हॅलेंटीन चिरोल.लोकमान्य टिळक हे भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसमधील जहादमतवादी गटाचे प्रमुख नेते होते. हिंदी राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते किंवा सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रवर्तक म्हणून ते ओळखले जातात. “हिंदी असंतोषाचे जनक” म्हणूनही त्यांना संबोधण्यात आले होते. त्यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्हयातील चिखली येथे झाला. सन १८७२ मध्ये मॅट्रिक,, १८७७ मध्ये बी.ए., १८७९ मध्येएलएल बी. झाले. ब्रिटिशांच्या पारंतंत्र्यातून मातृभूमीची सुटका करण्यासाठी लोकजागृतीच्या आणि राष्ट्रेनद्वाराच्या कार्यात स्वत:ला वाहून घेण्याचा निश्च केला.[३४] १ जानेवारी १८८० रोजी पुणे येथे “न्यु इंग्लिश स्कुल,” इंग्रजी भाषेत मराठा, (२ जानेवारी१८८१),मराठी भाषेत केसरी (४जानेवारी१८८१), २४ ऑक्टोबर १८८४ रोजी पुणे येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापना,२ जानेवारी १८८५ रोजी फर्ग्युसन कॉलेज सुरू करण्यात आले. सन १८९४ मध्ये गणेशोत्सव, १५ एप्रिल १८९६ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा उत्सव साजर केला. पुण्यातील प्लेगच्या साथीदरम्यान परक्या इंग्रज सरकारने केलेल्या अत्याचाराचा बदला म्हणून दामोदर व बाळकृष्ण चापेकर या बंधूनी २२ जून १८९७ रोजी प्लेग कमिशनर रॅडची हत्या केली. त्यांनी “केसरीतून सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय”? हा खरमरीत अग्रलेख लिहिला.सन १९०७ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या सुरत येथे भरलेल्या अधिवेशनात जहाल व मवाळ गंटातील संघर्ष विकोवाला पोहोचला. मवाळ गटाने जहालची कॉग्रेस संघटनेतून हकालपट्टी केली. २४ जून १९०८ रोजी टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला भरण्यात आला. २२ जुलै १९०८

रोजी त्यांना सहावर्षाची शिक्ष ठोठावण्यात येऊन त्यांची ब्रम्हादेशातील मंडालेल्या तुरूंगात रवानगी करण्यात आली. या सहावर्षाच्या प्रदीर्घ तुरूंगवासातून १७ जून १९१४ रोजी सुटका झाल्यानंतर टिळकांनी पुन्हा राजकीय कार्याला सुरूवात केली.२८ एप्रिल १९१६ रोजी टिळकांनी मुंबई प्रांतात होमरूल लींगची स्थापना केली. इंग्रज सरकारच्या अन्यायी व पक्षपाती धोरणांविरूध्द आवाज उठविण्यात टिळक नेहमीच आघाडीवर राहिले.[३५] लोकमान्य टिळकांनी स्वदेशी, बहिस्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सुत्री कार्यक्रमाचा पुरस्कार केला.लोकमान्य टिळक हे हिंदी राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्राचीन भारतीय वैदिक संस्कृती, सनातन हिंदू धर्म व धर्मग्रंथ आणि भारताचा गौरवशाली इतिहास व परंपरा हे हिंदू राष्ट्रवादाचे प्रमुख आधार होत. असे त्यांचे म्हणणे होते. त्यांना अभिप्रेत असलेल्या राष्ट्रवादाचे सांस्कृतिक राष्ट्रवाद असेहीवर्णन केले जाते. भारतात राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्याच खर्ची घातले. या देशातील सर्व सामान्य जनतेला राजकीदृष्टया जागृत करून तिला परकीय सत्तेच्या विरोधात उभे करण्याचे अत्यंत कठीण कार्य त्यांनी केले. म्हणूनच भारतीय असंतोषाचे जनक ही उपाधी त्यांना मिळाली.[३६]

*** लाला लजपत राय : (इ.स.१८६५–१९२८).**

थोर जहालवादी नेते लाला लजपतराय यांना पंजाबचा सिंह म्हणून उल्लेख जातो. लोकमान्य टिळकांच्या तोडीचे कार्य पंजाब प्रांतात केले. सरकारी नोकरीवरीला लाथ मारून स्वत:ला दशकार्याला काढून घेतले. त्यांना सरकारने अनेक वेळा अटक केली. त्यांच्या जहालवादी विचारामुळे अनेक तरूण भारावून गेले. आर्य समाजाचे तत्वज्ञान व मॅझीनीचा त्यांच्यावर प्रभाव होता. म्हणून त्यांनी स्वत:ला देशसेवेसाठी वाहून घेतले. लाला लजपतराय यांनी १८८८ पासून राष्ट्रीय राजकारणात प्रवेश केला. राष्ट्रीय चळवळ सामान्य लोकांपर्यंत पोहचली पाहिजे तेव्हाच शासन हादरेल असा त्यांचा विश्वास होता. पंजाबमधील अशांततेला प्रामुख्याने ते कारणीभूत आहेत असा सरकारचा दृढ समज होता. यामुळे १९०७ साली सहा महिण्यासाठी हदपार करण्यात आले. यावेळच्या तरूंगवासात त्यांनी The Story of my Deportation हे पुस्तक लिहिले Young India दयानंदाचे चरित्र व आर्यसमाजावरील पुस्तक ही त्यांची ग्रंथसंपदा होय. पहिले महायुध्द सुरू होताच सरकारची वक्रदृष्टी आपल्याकडे वळणार म्हणून ते अमेरिकेला निघून गेले. तेथे लाला जिंनी इंडियन

“होमरूल लीग व इंडियन इन्फॉरमेशन ब्युरो” या संस्था स्थापन केल्या. यंग इंडिया, द पिपल, पंजाबी या वृत्तपत्राच्या सहायाने आपला विचार लोकांपर्यंत पोहचवून जनजागृती केली. छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी दयानंद सरस्वती यांचा इतिहास व संस्कृती कशी महान आहे हा संदेश लोकापर्यंत पोहचवला.[३७]

ललाजीनी जाणून पंजाब प्रांतातील तरूणात जनजागृतीचे कार्य हाती घेतले. नवतरूणांना नवराष्ट्रवादाचा मंत्र सांगितला, ते म्हणतात “युवकानो तुमचे रक्त सळसळणारे आहे, देशाला तुमची गरज आहे. त्यासाठी तुम्ही सर्वस्वी अर्पण करा. जगातील प्रत्येक क्रांती युवकांच्या बळावर लढली गेलेली आहे. तेव्हा देशंहित डोण्यासमोर ठेवून आपण या राष्ट्रहिताचा कार्याला सहभागी व्हावे.” १९२८ मध्ये भारतात सायमन कमीशन आले. देशात सर्वत्र निषेध करण्यात आला. तेव्हा म्हणतात “ज्यांनी सायमनची नियुक्ती केली त्यावर माझा विश्वास नाही, सायमन हुषार असले तरी त्यांना येथील राजकारण व देशाचा इतिहास त्यांना माहित नाही म्हणून ते अपात्र आहेत.” ३० ऑक्टोबर १९२८ रोजी त्यांनी लाहोर येथे

सायमन विरोधी निर्दशने केली तेव्हा त्यांच्यावर लाठी हल्ला केला त्यात ते जामी झाले. त्यातच त्यांचा १७ नोव्हेंबर १९२८ रोजी मृत्यू झाला. याचा फार मोठा परिणाम पंजाबातील चळवळीवर झाला.[३८]

*** बिपीनचंद्र पाल : (इ.स.१८५८—१९३२).**

ज्हालवादी विचारसरणीतील तिसरे व्यक्तीमत्व म्हणजे बिपीनचंद्र पाल होत. महाराष्ट्र, पंजाब प्रमाणेच बंगालचे नेतृत्व बिपीनचंद्र पाल यांनी केले.या थोर पुरूषाचा जन्म ७ नोव्हेंबर १८५८ रोजी सिलहट जिल्हयातील पाईल येथे झाला. इटलिचा स्वातंत्र्य सैनानी मॅझिनी, गॅरिबाल्डी यांच्या देशभक्तीने बिपीनचंद्र पाल प्रभावीत झाले. त्यामुळे त्यांना स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या स्वातंत्र्याची चळवळ लागली, कलकत्याच्या उच्च शिक्षण घेत असतांना सुरेंद्रनाथ बॅनर्जीच्या भावनोत्तेजक भाषणांचा व लिखाणाचा त्यांच्या संवेदनाक्षम मनावर फार प्रभाव पडला.स्वतंत्रवृत्तीच्या बिपीनचंद्रांनी वृत्तपत्र लेखणाला प्रारंभ केला. शिक्षकी पेशापेक्षा त्यांना वृत्तपत्रलेखनातच अधिक रस वाटू लागला. न्यू इंडिया वंदे मातरम, स्वराज्य पारदर्शक, बंगाल पब्लिक ओपिनियन, हिंदू रिव्हयु इ.मधून लेखन केले. आपल्या लेखनातून संपूर्ण स्वातंत्र्याच्यी मागणी केली. ब्रिटिश राज्यकर्ते भारतीयांचे कल्याण करतील हे कदापी खरे नाही: लोकमान्य टिळकांच्या नि:शस्त्र प्रतिकारच्या चळवळीस बिपीनचंद्रनी पाठींबा दिला. बंगालच्या फाळणीस कडाडून रिोध केला. सुधारणा व स्वातंत्र्य भारतीयांना मिळायला पाहिजे असे त्यांचे मन बनले. बंगालमध्ये सार्वजनिक कालीकापूजा उत्सव सुरू केला. तेव्हा विचारांची देवानघेवाण होऊन जहाल विचारांच्या प्रसाराला उदय झाला. बिपीनचंद्र पाल म्हणजे बंगालमधील एक धगधगती मशाल होते. अशा थोर पुरूषाचा २०मे १९३२ रोजी मृत्यु झाला. त्याच्या मृत्युबरोबर बंगालमधील एक पर्व संपले. त्यांच्या विचाराची धुरा पुढे बकिमचंद्र चटर्जीनी सांभळली.[३९]

*** डॉ.ॲनी बेझंट : (सन १८४७—१९३३):**

भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात ज्या काही मूठभर ब्रिटिश नागरिकांचे सहायय लाभले. त्यात श्रीमती डॉ. ॲनी बेझांट यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे.१९१४ ते १९२० च्या कालावधीत त्या राष्ट्रीय चळवळीत आघाडीला तर होत्याच, शिवाय जनजागृतीच्या कार्यात जहाल नेत्यांच्या खांद्याला खांदा लावून त्या कार्य करीत होत्या.१८४७ साली इंग्लंडमध्ये जन्माला आलेल्या ॲनी बेझटचे बालपण काहीसे कष्टातच गेले. वयाच्या २० व्या वर्षी विवाह झाल्यानंतरही त्यांना फारसे सुख मिळाले नाही. म्हणून त्यांनी सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला. इंग्लंडमधील आगपेटयांच्या कारखान्यात काम करणा—या मुींच्या हक्कासाठी त्यांनी दिलेल्या यशस्वी लढयामुळे कुशल संघटन दिसून आले. सन १९१४ साली त्यांनी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले. त्यांनी १९१४ साली “कॉमनवील” हे साप्ताहिक आणि “न्यू इंडिया” हे वृत्तपत्र सुरू केले. १९१६ साली त्यांनी होमरूल लीगची स्वत:च स्थापना केली.१९१७ सालच्या कांग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांना देण्याचा निर्णय कॉग्रेसने घेतला. १९१८ सालच्या मॉरेग्यु— चेम्सफर्ड अहवालाबाबत ते इंग्लंडला शिष्टमंडळात अंतर्भाव होता.१९१९ पासून टिळकांशी मतभेद होऊन लागल्यानंतर ते राष्ट्रीय आंदोलनाबाहेर फेकल्या होत्या.रजनी पाम दत्त यांनी India Today and Tomorrow या ग्रंथात, श्रीमती बेझाट यांनी भारतीय राष्ट्रीय आंदोलनाला ब्रिटिश साम्राज्यप्रती एकनिष्ठेच्या मार्गावर टिकवून धरण्याचा प्रयत्न केला.असे विधान केले आहे. परंतु आपल्या ओजस्वी भाषणानी देशाच्या विभिन्न भागात होमरूलचा मंत्र पोचविणारी धडाडीची कार्यकर्ती म्हणून त्याचे स्थान वैशिष्टयपूर्ण ठरते. त्याचे वृत्तपत्रीय लेख व How India Wrough for freedom, India the Shall be, India Bound or fee या त्यांच्या ग्रंथातून भारतीय राष्ट्रवादी चळवळीबाबतची त्यांची भूमिका स्पष्ट होते.[४०]

*** अरविंद घोषः (सन १८७२—१९५०):—**

अरविंद घोष हे एक क्रांतिकारक नेते, प्रखर राष्ट्रवादी व्यक्तिमत्व, कवी, दृष्टे तत्वज्ञ, श्रेष्ठ अध्यात्मवादी, थोर मानवतावादी अशा विविध नात्यांनी आपणास परिचित आहेत. भारतीय संस्कृतीचे अभिमानी आणि विश्वबंधुत्वाचे पुरस्कर्ते म्हणून ते ओळखले जातात. अरविंद घोष यांचे वडील कृष्णधन घोष यांच्यावर पाश्चात्य जीवनपध्दतीचा विशेष प्रभाव होता.आपल्यामुलावर पाश्चात्य जीवनपध्दतीचे संस्कार व्हावेत म्हणून लहानपणीच तीन मुलाना इंग्लंडला शिक्षणासाठी पाठविले. इंग्लिश, ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, जर्मनी इत्यादी परकीय भाषांचा ज्ञान होता. आय.सी.एस परीक्षेला बसले होते परंतु १८९३ मध्ये भारतात परत आले. इंग्लंडमध्ये असतांनाच त्यांनी भारतीय स्वातंत्र्यांसाठी आयुष्यभर झागडण्याची शपथ घेतली होती. भारतीय क्रांतिकारकानी स्थापन केलेल्या काही क्रांतिकारी संघटनांशीहीं त्यांच्या संबंध आला होता. बंगालमधील काही क्रांतिकारी गटांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारीही त्यांनी उचलली. लॉर्ड कर्झानयाने १९ जुलै १९०५ रोजी अधिकृतरित्या बंगालच्या फाळणीचा निर्णय जाहीर केला.१६ ऑक्टोबर १९०५ रोजी फाळणीची प्रत्यक्ष अमलबंजावणी केली गेली.  या घटनेचे सर्व देशभर तीव्र प्रतिसाद उमटले. १९०६ या वर्षी “वंदे मातरम” या वृत्तपत्राचे सहसंपादक म्हणून कार्य करण्यास त्यांनी सुरूवात केली. सरकारच्याय अन्याय व पक्षपाती धोरणावर “वंदे मातरम” मधून जोरदार टीका चालविली. याच सुमारास अरविंदाचे धाकरे बंधू बारिद्रकुमार घोष यांनी “युगांतर” तर विवेकानंदाचे बंधू भूपेंद्रनाथ दत्त यांनी संध्या नावाचे वृत्तपत्रत्र सुरू केले. युगांदर व संध्या या वृत्तपत्रांनी क्रांतिकारीत विचारांच्या प्रसारावर भर दिला. अनुशीलन समिती सारख्या क्रांतिकारीक संघटना अस्तित्वात आल्या.इंग्रज सरकारने १९०७ मध्ये त्यांच्यावर खटला भरला. या खटल्यात अरविंदाना एक वर्षाच्या तुरूंगवासाची शिक्षा झाली.[४१]

अरविंदानी आध्यात्मिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. त्यांनी म्हटले होती की, “भारतीय राष्ट्रवाद हा आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. भारत हा देश कधीही मृतप्राय नव्हता. तो जिवंत असून त्याला स्वत:साठी व मानवजातीसाठी खूप काही करावयाचे आहे, भारताची चिरंतन शक्ती जागृत झाली असून ती आपल्या राष्ट्रधर्माचा शोध घेत आहे.” अरविंदाना भारतीय संस्कृतीविषयी अतिशय अभिमान होता. अरविदाच्या मते, इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीमुळे भारताची नैतिक अवनती झाली आहे. अरविंदांनी राष्ट्राला एक धर्म मानले होते. भारतीय स्वातंत्र्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सशस्त्र क्रांतिच्या मार्गाचा अवलंब त्याने सशस्त्र क्रांतिचा अवलंब करणेही समर्थनीय ठरते. इंग्रजानी भारतावर लादलेल्या राजकीय गुलामगिरीमुळे अरविंद घोष यांनी इंग्रजी सत्तेविरूध्द संघर्ष करण्याची भूमिका घेतली असली तरी ख—या अर्थाने ते मानवतावादी विचारवंत होते. जगातील सर्व लोकांनी आपापसातील भेदाभेद विरूसन बंधुत्वाच्या नात्याने एकत्र येण्यातच मानवतातीचे कल्याण आहे. विश्वबंधुत्वाचे किवा वैश्विक एकात्मतेचे पुरस्कर्ते होति. ५ डिसेंबर १९५० रोजी नश्वर देहाचा त्याग करून आध्यात्मिक राष्ट्रवादाचा हा प्रणेता अनंतात विलीन झाला.[४२]

**निष्कर्ष :—**

इ.स.१६०० मध्ये इंग्लंडची राणी एलिझाबेथने “ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला” पूर्वेकडील राष्ट्रांत व्यापार करण्याची सनद दिली. १७५७ च्या प्लासीच्या युध्दाने भारतात ब्रिटिशांच्या सत्तेची मूहूर्तमेढ रोवली गेली. १७५७—१८५७ या शंभर वर्षात रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंगज, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिग्ज, लॉर्ड डलहौसी वगैरे ब्रिटिश ग.ज.नी भारतात ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराचे काम पूर्ण केले. लॉर्ड डलहौसीने संस्थाने खासला केला. ब्रिटिश सत्तेविरूध्द भारतीयांना मनात जो राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक

व लष्करी असंतोष होता त्याची प्रतिक्रिया म्हणजे १८५७ चा उठाव होय. १८५८ साली ब्रिटिश साम्राज्याचा घटक देश बनला. त्यानंतरच्या सुमारे सहा दशकांच्या कालावधीत एकीकडे ब्रिटिश सासम्राज्यवादी सत्तेची मूठ भारताभोवती आवळत होती. तर दुसरीकडे भारतात नवी आधुनिक मूल्ये रूजू लागली. भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि त्यातून निर्माण झालेला भारताचा स्वातंत्र्यलढा हा केवळ ब्रिटिशां विरूध्दचा लढा नव्हता. साम्राज्यवादी प्रकृतीविरूध्दचा तो एक व्यापक संघर्ष होता. आर्थिक व सांस्कृतिक शोषणच्या साम्रज्यवादी धोरणाविरूध्द भारतीय जनता उभी राहिली या कालखंडात जे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक बदल कळत.नकळत घड गेले त्यातून आजच्या भारताची उभारणी झाली.

भारतामध्ये प्रांत, भाषा, पंथ, जात याबाबतींत फार मोठी विविधता आहे. या विविधतेमुळे एकीकडे भारत समृध्द बनलेला आहे, तर दुसरीकडे या विविधतेतून परस्पर विरोध व संघर्षही निर्माण झालेले दिसतात. भारतात राष्ट्राला आवश्यक असलेली इतिहासाची व संस्कृतीची एकात्मता आहे. या एकात्मतेच्या वैशिष्टयपूर्ण जाणिवेतून भारतीय राष्ट्रवादाचा उदय झाला. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाला भाारतातील वैचारिक जागृती प्रामुख्याने कारणीभूत झाली. त्यात भारतातील धार्मिक चळवळी, थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य, ब्रिटिशांविरूध्दचा असंतोष, सत्तेचे केंद्रीयकरण, पाश्चात्य शिक्षण व संस्कृतीचा प्रभाव, इंग्रजी शिक्षण, ब्रिटिनचे साम्राज्यवादी धोरण, लॉर्ड लिटनचे प्रतिगामी धोरण, भारताचे आर्थिक शोषण, वंशभेदाचे धोरण, इंग्रजांचे पक्षपाती धोरण, भारतीय वृत्तपत्राचे कार्य, भारतीय साहित्यिकांची कामगिरी, दळणवळणाच्या साधनांत वाढ, मध्यम वर्गाचा उदय, इलबर्ट बिलावरील वाद, जागतिक राजकारणाचे बदलते संदर्भ, बंगालमधील राजकीय संघटना, इंडिया असो सिएशन, द—बॉबे असोसिएशन, पूना सार्वजनिक सभा, भारत सेवक समाज, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची स्थापना, जहाल राष्ट्रवादाचा उदय व विकास, होमरूल चळवळ, सुरत अधिवेशन, असहकार चळवळ, जालियनवाला बागेतील हत्याकांड, हंटर कमिशन, खिलाफत चळवळ, स्वराज्य पक्ष, सविनय कायदेभंगाची चळवळ, सायमन कमिशन, लॉर्ड आयर्विनची घोषणा, दांडीयात्रा,गोलमेज परिषदा, जातीय निवाडा, क्रिप्स योजना, छोडो भारत चळवळ, वॅवेल योजना, क्रांतिकारी चळवळीचा उदय, भारताचा घटनात्मक विकास, शेतकरी आणि कामगार चळवळ, यातून प्रेरणा प्राप्त झाली. राष्ट्राच्या उभारणीत राष्ट्रीय कॉग्रेसचे नेते. गोपााळ कृष्ण गोखले, न्या.रानडे, फिरोझाशहा मेहता, दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ॲलन ऑक्टोव्हिअम हयुम, महात्मा गांधी, या नेत्यांनी ब्रिटिशांच्या राज्यशाहीला विविध मार्गाने स्वातंत्र्याचा लढा दिला. यातूनच जहाल राष्ट्रवादाचा उदयात लोकमान्य टिळक लाला लजपतराय, अरविंद घोष, बिपीनचंद्रपाल, यांनी देश स्वातंत्र्याचा लढा दिला. ब्रिटिश राजवटीला विरोध करण्यासाठी सशस्त्र उठाव केला. त्यातून क्रांतिकारी चळवळ उदयास आली. या चळवळीत उमाजी नाईक, दौलतराव नाईक, रामोशाचे बंड, चितुरसिंग नाईक, भिल्लाचे उठाव, गौड जमातीचा उठाव, हटकरांचा उठाव, कोळयांचे उठाव, पंजाबमधील क्रांतिकारी उठाव, बंगालमधील उठाव, आझाााद हिद सेना, भारतीय कौन्सिल कायदा, शेतकरी व कामगार चळवळ, उदयास येऊन, भारतीय स्वातंत्र्याचा कायदा हा माउंटबॅटन योजनेवर आधारित होता. हा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने १८ जुलै १९४७ रोजी मंजूर केला. जो कायदा म्हणजेच १९४७ चा भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. १५ ऑगस्ट १९४७ रोजी विलायत सरकार या कायद्यानुसार भारतावरील सत्ता सोडून ती वरील दोन्ही राष्ट्रांकडे सोपवीली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रवादीची भूमिका या संशोधन कार्यातून मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**संदर्भसूंची :—**

(१) डॉ.अनिल,कठारे,आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, जून १९९८, पृष्ठ १५.
(२) डॉ.सुमन वैद्य, डॉ.शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै १९९८,
पृष्ट ३९.
(३) कित्ता, ४१
(४) डॉ.अनिल कठारे, भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन,जळगाव, १ जानेवारी २०१३, पृष्ट९.
(५) प्राचार्य, डॉ.एस.एस.गाठाळ, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जून २०१५, पृष्ट ८१.
(६) पुर्वोक्त, पृष्ट ११.
(७) डॉ.एस.एस.गाठाळ, भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जुलै २००४, पृष्ट २०५.
(८) पुर्वोक्त,पृष्ट ७६
(९) डॉ.एस.जी.जाधव, भारताचा इतिहास, संस्कृती पुस्तकालय, नांदेड ४जून २००५, पृष्ट १०१.
(१०) डॉ.अनिल कठारे, (संपादक) आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, ५ जून २०१५, पृष्ट ९१.
(११) कित्ता, ९३
(१२) एस.एल.नागोरी, कान्ता नागोरी, आधुनिक भारत का संपूर्ण इतिहास, सबलाईम पब्लिकेशन्स, जयपूर,२००३,पृष्ट १११.
(१३) डॉ.अनिल कठारे, ब्रिटिशकालीन भारताचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४, पृष्ठ ३८३.
(१४) डॉ.रमेश वरखेडे (अध्यक्ष), आधुनिक भारताचा इतिहास, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापइभ, नाशिक, जुलै २०१३, पृष्ट —१३.
(१५) प्रा.अशोक भवरे, आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, २ ऑक्टोबर २००६, पृष्ठ १०७.
(१६) बी.एल.ग्रोवर, एन.के.बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि.नवी दिल्ली, २००३, पृष्ट ३७५.
(१७) डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुर ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर, जून २००३, पृष्ट १८९.
(१८) डॉ.सुमन वैद्य, डॉ.शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै २००४, पृष्ट ४००.
(१९) कित्ता — पृष्ठ ४०४.
(२०) डॉ.अनिल कठारे, महाराष्ट्राचा समग्र इतिहास, कल्पनी प्रकाशन, नांदेड १५ ऑग २०१७, पृष्ठ
(२१) आधुनिक भारताचा इतिहास पुर्वोक्त, पृष्ट ८८
(२२) पुर्वोक्त, पृष्ट ८९.

(२३) प्रा.गणेश राऊत, प्रा.ज्योती राऊत, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड, पब्लिकेशन्स, पुणे, २०१४, पृष्ट ५८.

(२४) आधुनिक भारतीय राजकीय विचार, पुर्वोक्त, १६४.

(२५) विद्याधर महाजन, आधुनिक भारत का इतिहास, एस.चन्द एण्ड कंपनी लि.दिल्ली, २००१, पृष्ट ५८६

(२६) व्ही.एस.क्षीरसागर (संपादक), महाराष्ट्रातील समाजसुधारक, साहित्यक भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती, के.सागर पब्लिकेशन्स, पुणे.२०२० पृष्ट २८९.

(२७) कित्ती, पृष्ट २८२.

(२८) डॉ.अनिल कठारे, महाराष्ट्रातील समाज सुधारक, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जानेवारी २००४, पृष्ट—८९.

(२९) कित्ता — ९१

(३०) व्ही.एस.क्षीरसागर, महाराष्ट्रातील समाजसुधारक, के.सागर पब्लिकेशन्स, पुणे. २०१५, पृष्ट ३०१.

(३१) डॉ.साहेबराव गाठाळ, आधुनिक भारतीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जून १९९९ पृष्ट १४७.

(३२) कित्ती, पृष्ट १४९.

(३३) कित्ता — पृष्ट १६०.

(३४) भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, पुर्वोक्त,१३०

(३५) आधुनिक भारताचा इतिहास,पुर्वोक्त ४९५.

(३६) प्रा.रं.ना.गायधनी, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,यशवंतराव चव्हाण म.मु.वि. नाशिक,सप्टें २०१९, पृष्ट १८.

(३७) डॉ.अनिल कठारे, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, ५ जून २०१५, पृष्ट ९८.

(३८) कित्ता — ९९.

(३९) डॉ.भास्कर भोळे, पुर्वोक्त, पृष्ट २८७.

(४०) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पुर्वोक्त — १०९.

(४१) महाराष्ट्रातील समाजसुधारक
, पुर्वोक्त, ३२३.

(४२) आधुनिक भारताचा इतिहास,, डॉ.सुमन, डॉ.कोठेकर, पुर्वोक्त, पृष्ट ४२४.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# [illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible], [illegible]-443201 [illegible]

[illegible] :-

[illegible] .1818 [illegible]

[illegible] 1884 [illegible] 1887 [illegible]

[illegible] 1895 [illegible] 30 [illegible] 1907 [illegible] 1930 [illegible] 1955 [illegible]

[illegible] 19 [illegible]

## 1)[illegible] :-

[illegible]

## 2)[illegible] :-

19 [illegible]

**3)[illegible] :-**

[illegible] .1845 [illegible] 60 [illegible]

**4)[illegible] : -**

[illegible] ‘[illegible]’ [illegible] 1907- [illegible]

**[illegible]) [illegible] :-**

[illegible]

[illegible]:-

1) 19 [illegible]

2) [illegible]

3) [illegible]

4) [illegible]. [illegible]

5) [illegible]. [illegible]

6) [illegible].

[illegible] :-

1) [illegible], [illegible].

2) ‘[illegible]’[illegible].

3) [illegible] : [illegible].

4) [illegible]. [illegible] : [illegible] :- [illegible]

5) [illegible] :- [illegible]

6) [illegible] :- [illegible]

7) [illegible] :- [illegible]

8) [illegible] :- [illegible]

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे ऐतिहासिक विश्लेषण

प्रा. युगंधरा यशवंत शिवणकर
सहा- प्राध्यापक
राजकुंवर महिला महाविद्यालय वणी,
ता. वणी.जि. यवतमाळ
yugandharayshiwankar@gmail.com
9588661907

भारतात प्राचीन काळापासुन वर्णव्यवस्था चालत आलेली आहे. पुर्व वैदिक काळात वर्णव्यवस्था ही लवचिक होती.गुणानुसार त्याचा वर्ण ठरत असे.त्यामुळे सहजपणे वर्ण हे बदलीत असत.मात्रउत्तर वैदिक काळात ही वर्णव्यवस्था जातीय व्यवस्थेत रुपांतरीत झाली.या जातीव्यवस्थेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर पायऱ्या नसलेली बहुमजली इमारत म्हणून संबोधत होते.अगदी त्याच प्रमाणे पुर्व वैदिक काळात या जातीव्यवस्थेत असलेली लवचिकता कायमची समाप्त झाली. परिणामी जातिव्यवस्था ही अतिशय कठोर बनली.यामध्ये अस्पृष्यांना कोठेही स्थान नव्हते त्याना चारही वर्णामध्ये कुठेही स्थान नसल्यामुळे त्यांची अतिशय दयणीय अवस्था होती.

विषमतापुर्ण समाजव्यवस्थेला आव्हान देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.त्यांनी मानवमुक्तीचा लढा उभा केला या लढ्यामध्ये त्यांना अहोरात्र झटावे लागले आम्ही हिंदु धर्माचे घटक असुन सुद्धा आम्हाला जनावरापेक्षा ही हीन वागणुक दिली जाते.हा विचार समाजधुरीधरांना पटवुन द्यावा लागला.मात्र त्यांच्या प्रयत्नांना अपयश आले.हिंदु धर्माप्रमाणे ईश्वराचे अस्तित्व मान्य केल्यास ईश्वराने सर्वाना समान लेखावे.असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.ईश्वराचा निवास मंदीरामध्ये असल्यामुळे अस्पृष्यांना सुद्धा मंदीरामध्ये प्रवेशाची गरज जाणवत होती.मात्र प्रतिगामी सणातणी विचारसरणीच्या मंडळींनी अस्पृष्यांच्या मंदीर प्रवेशास सक्त विरोध केला.परिणामी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मानवमुक्तीचा लढा उभा करावा लागला. या मानव मुक्तीच्या लढ्यामध्ये मंदीर प्रवेश सत्यागृहास अनण्य साधारण महत्व आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा लढा अविस्मरणीय ठरलेला आहे. त्यांनी हिंदु धर्मामध्ये शिरलेला दोषाला पुर सावरण्याचा प्रयत्न केला. कारण अस्पृष्यांना मंदीर प्रवेश बंदी आणि अस्पृष्यता ही क्रुरता होती.येथे सामाजिक न्याय दूरपर्यंत दिसत नव्हता अस्पृष्य ही माणसे आहेत तेसुद्धा हिंदु धर्मीय आहेत स्पृष्य हिंदुंना जसा मंदीर प्रवेश आहे.तसाच मंदीर प्रवेशाचा अधिकार अस्पृष्यांना असावा. तो सामाजिक न्यायासाठी तिथे नाकारला गेलेला आहे सामाजिक न्यायासोबत स्वातंत्र्य, समता, बंधुता नाकारली जात

होती. या सर्व घटकांचा अभ्यास करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मंदीर प्रवेश सत्यागृहाचे शस्त्र उपसलेले दिसुन येते त्यांनी अमरावती अंबादेवी मंदीर पार्वती मंदीर पुणे, नाशिक येथील काळाराम मंदीर प्रवेशाकरीता सत्याग्रह केले.

डॉ.भीमराव रामजी आंबडेकर यांचा जन्म १४ ऐप्रिल १८९१ ला महु येथे झाला.त्यांचे वडील सैन्यात नोकरी करीत होते.त्यांना ७ नोव्हेंबर १९०० रोजी सातारा हायस्कूल मध्ये इंग्रजीच्या पहिल्या इयत्तेत दाखल करण्यात आले.त्यांनी १९०७ साली मॅट्रीक्रची परीक्षा उत्तीर्ण केली.त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी बडोद्याच्या श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांनी शिष्यवृत्ती दिली.३ जानेवारी १९०८ रोजी त्यांनी एलिफस्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.१९१२ च्या नोव्हेबर महिण्यात ते बि. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढील उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेतील कोलंबिया विद्यापिठात गेले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृष्यतेची दाहकता लहानपणीच सोसावी लागली.आपणास शाळेत वेगळे का बसविण्यात येते?काही शिक्षक आपल्या वह्या पुस्तकांना हातं का लावित नाहीत?दापोलीवरून गोटेगावास जाण्यास बैलगाडी का मिळु शकली नाही?हे प्रश्न त्यांना लहान वयातच निर्माण झालेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ साऊथवते कमि दयणीय शनला साक्ष देवुन केलेला दिसुन येतो.या निमित्ताने त्यांनी अस्पृश्यांची स्थिती व शासणाचे धोरण जवळुन बघितले म्हणुन त्यांनी अस्पृष्यांनासंघटीत करुन लढा चालविण्याचे प्रयत्न केले.सर्व प्रथम दक्षिण महाराष्ट्रातील कागल संस्थानातील माणगांव येथे २१ व २२ मार्च १९२० रोजी बहिष्कृत वर्गाची परिषद भरविली.या परिषदेचे अध्यक्ष भिवराव रामजी आंबेडकर हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणुन करविर संस्थांन छत्रपती राजर्षी शाहु महाराज हे होते.या परिषदेला जवळ जवळ ५००० लोक जमले होते.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात अस्पृश्यांच्या उध्दारासाठी सामाजिक व राजकीय हक्काचे जोरदार समर्थन केले. त्यानंतर १९२० ला नागपुर येथे अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद भरविण्यात आली. हि परिषद ३०, ३१ मे आणि १ जून १९२० या दरम्यान भरली.या परिषेदच्या अध्यक्ष्यस्थानी राजर्षी छत्रपती शाहूमहाराज हे होते.याच ठिकाणी डिप्रेस्ड क्लास मिशनच्या अस्पृश्य उध्दार कार्यावर शंका व्यक्त करण्यात आलेली दिसुन येते.त्यानंतर महाडचा सामाजिक क्रांतीचा लढा उभारण्यात आला.हा लढा २० मार्च १९२७ ला उभारण्यात आला.त्यालाच आपण चवदार तळयाचा सत्याग्रह असे संबोधतो. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या घटनेचा उल्लेख हा 'महाडचा धर्मसंगर' अशा शब्दात केलेला आहे कारण या महाड येथे जिल्हा कुलाबा बहीस्कृत परीषद, चवदार तळयाचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन हया तीन घटना एकाच वेळी करण्यात आल्यात. त्यामुळे त्यांच्या या प्रारंभिक सामाजिक कार्यामुळे अस्पृष्यांना आपल्या हक्काची जाणीव झाली होती. त्यांना सामाजिक न्याय, विषमता व समता या बाबींची परिभाषा सुध्दा लक्ष्यात आलेली असावी.

## अमरावती येथीला अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह

अमरावती येथील अंबामातेचे मंदीर प्राचिन असून संपुर्ण भारतात प्रसिद्ध आहे.आजही या ठिकाणी नवरात्रमध्ये नऊ दिवस मोठी यात्रा भरते.यादेवीला जागृत देवी म्हणुन मानल्या जाते. मंदिराच्या निर्मीतीबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. इ. स. १८७० च्या गॅझेट मध्ये अंबादेवी मंदिराचा उल्लेख हजारो वर्षापुर्वी बांधल्याचा मिळतो या मंदिराला कधी महानुभाव पंथाचा मठ म्हणुन किंवा बौद्ध धर्माचे विहार म्हणुन सुद्धा आपले हक्क मांडतांना दिसुन येतात. तर याच ठिकाणाहुन भगवान श्रीकृष्णाने कौंडीण्यापुरची राजकन्या रुख्मिणी हिचे हरण केल्याचे म्हटल्या जाते.यावरुन या मंदिराची प्राचीनता लक्षात येते.त्यामुळे या मंदिरात श्रद्धाळुची सतत रेलचेल असते.मात्र या मंदिरात फक्त स्पृश्यांनाच प्रवेश होता अस्पृश्यांना नव्हता.

सामाजिक समतेच्या प्रस्थापने साठी आणि अस्पृश्तेच्या उच्चाटनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वज्रनिर्धाराने जी मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू झाली याच चळवळीने महाराष्ट्र नव्हे तर संपुर्ण भारत ढवळून निघाला.ही सामाजिक क्रांतीची नांदी होती.त्यामुळे अंबादेवी मंदीर प्रवेश सत्याग्रह अत्यंत महत्वपुर्ण घटना आहे.

अमरावती येथील अस्पृश्यांनी १९२५ पासुनच ही मंदीर प्रवेशाची चळवळ सुरू करण्याचा मानस, केला होता.माधोराव गोविंदराव मेश्राम यांनी नेतृत्व आपल्याकडे घेवुन मंदिराच्या पंचकमेटीकडे सतत अर्ज ठराव व विनंती अर्ज पाठवुन मंदिर प्रवेशाची परवानगी मागीतलेली होती.परंतु अंबादेवी संस्थानाने त्याला केराची टोपली दाखविलेली होती.त्यामुळे ही जबाबदारी श्री.दादासाहेब पाटील. डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, नानासाहेब अमृतकर या स्पृष्य मंडळीनी या अस्पृश्यांच्या चळवळीला उचलून धरले. त्यांनी मंदीर प्रवेशाचा तगादा लावला त्या करिता ठराव निवदेने याचा आधार घेतला मात्र तरीही अपयशआल्याने २८ ऑगस्ट १९२७ ला एक भव्य मिरवणुक काढुन बॅरिस्टर तिडके यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेण्यात आली. या सभेत अनेक ठराव घेण्यात आलेत. मात्र यश न आल्यामुळे १३ व १४ नोव्हेम्बर १९२७ ला इंद्रभुवन थिएटर अमरावती येथे डॉ.बाबासाहेब आबेडकरांची जाहीर सभा घेण्यात आली त्यानंतर मात्र या सत्याग्रहाला गती प्राप्त झालेली दिसुन येते.

अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रहातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण म्हणजे सामाजिक न्यायचा जाहीरनामा ठरला ते म्हणतात. आपणही माणसं आहोत. आपणास इतरांप्रमाणे समानतेने, समान न्यायाने जगण्याचे स्वातंत्र्य आपणास मिळविले पाहिजे.त्यासाठी प्राणाची बाजी लावण्याची वेळ आली तर चालेल पण आपण आपले हक्क मिळविले पाहिजे.हे सुत्र त्यांच्या सपुर्ण भाषणातून अभिव्यक्त होताना दिसतात.

ते आपल्या अध्यक्षिय भाषणात म्हणतात. अस्पृश्य हे हिंदूच आहेत.

' न जानपदिक दुखमेवु शोचि तुमर्हाति |
अशोच्नप्रति कर्वित यादि पश्चेदुपकममा'

जे दु:ख सार्वजनिक आहे, त्याचा शोक करीत बसणे योग्य नाही त्यासाठी रडत बसता त्याच्या प्रतिकारार्थ आपणाला इलाज सुचेत तर तो ज्ञानी पुरूषाने करावा.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणांने संपूर्ण स्पृश्य व अस्पृश्य वर्ग हा जागृत झाला होता.त्यानंतर ठराव पास करण्यात आलेत. या ठरावामध्ये अस्पृश्यकरिता मंदीर खुले करण्याचा महत्वपुर्ण ठराव पास करण्यात आला.

डॉ बाबसाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या परिषदेतील ठरवाला स्पृश्यमंडळींनी कडाडून विरोध केला. मात्र काही स्पृश्यांनी याला पुर्णत: पाठींबा दिला यामुळे हा सत्याग्रह कार्यरत राहीला.

## पुणे येथील पार्वती मंदिराचा सत्याग्रह

पर्वती हे पुण्यात असणारे एक छोटेसे खेडे होते.या खेडयातच ही पर्वती नावाची टेकडी होती.या टेकडीच्या माथ्यावर मंदिर आहे.एकदा असे झाले की, बाळाजी पेशवाच्या आईसाहेब म्हणजे कांशीबाई यांना इसबगोलाची बाधा झाली तेव्हा त्यांनी अनेक उपाय केलेत. मात्र त्यांना यश आले नाही. मात्र त्यांनी पर्वतिच्या वरच्या देवीची आराधना केली देवी त्यांच्यावर प्रसन्न होऊन त्यांच्या आजार दूर झाला त्यामुळे त्यांचा मुलगा नानासाहेब पेशवे यांनी या मंदिराचा जिर्णोध्दार करुन मंदिरांची नवीन इमारत बांधली.त्या मंदिराच्या दिवाबत्तीला नैवैद्याची सोय करुन दिली.अशा प्रकारे या मंदिराचे बांधकाम इ.स. १४७९ जा पुर्ण झाले.या जागृत देवस्थानामध्ये स्पृष्यांना प्रवेश होता मात्र अस्पृश्यांना प्रवेश बंदी होती.पेशवाईनंतर हे मंदिर ब्रिटीश शासकाच्या ताब्यात असले तरी त्याचा कारभार हा पंचकमेटीकडेच होता त्यामुळे डॉ बा. आंबेडकरांनी या मंदीर प्रवेश सत्याग्रहास प्रारंभ केलेला असावा.

पंचकमेंटीला निवेदेन, अर्ज, विनंत्या करुन सुध्दा अस्पृश्याकरीता मंदीर खुले केले जात नव्हते त्यामुळे पुण्याचे, जिल्हाअधिकारी गुल्ड, आय.सी.एस.डि मॅ.यांच्याशी चर्चा करण्यासाठी 9 October 1929 ला शिवराम जानबा कांबळे, राजभोज व गाडगोळ यांचे शिष्टमंडळ गेले. त्यांना सत्याग्रहाची परवानगी घेवून 13Oct. 1929 रोजी दसऱ्याच्या दिवशी सत्याग्रहाला सुरवात केली स्पृष्य मंडळीनी त्याला कडाडून विरोध केला परिणामी सत्याग्रह हा पोलिसांच्या विरोदपणात सुरू झाला या सत्याग्रहात 4000 ते 5000 लोकांच्या जनसमुदाय सहभागी झालेला होता.

पुणे येथील पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रहाला मोठया जोमाने सुरुवात झाली मात्र त्याला स्पृश्य मंडळींनी कडाडून विरोध केला.त्यामुळे सत्याग्रहींच्या तुकड्या करणात आल्यात. पोलीसांचा कडक पहारा ठेवण्यात आला मात्र तरीही सत्याग्रह सुरुच होता.तेव्हा त्या सत्याग्रहाला अनेक ठिकाणाहून पाठींबा घोषीत करण्यात आला.या पाठींब्यामध्ये मद्रास येथील अस्पृश्य मंडळीनी परळ येथील अस्पृश्य मंडळीनीभरभरून पाठिंबा घोषीत केला.एवढेच नव्हे तर तत्कालीन सर्व वर्तमानपत्रांमध्ये सत्याग्रहाच्या बाजुने व विरोधात प्रतिक्रीया मोठया प्रमाणत उमटलेल्या दिसतात.

## नाशिक येतील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह

नाशिक येथील काळाराम मंदीर संपुर्ण भारतात प्रसिद्ध आहे.मर्यादा पुरूषोत्तम प्रभु रामचंद्र यांचे हे मंदीर तत्कालीन काळात जागृत देवस्थान मानले जात असे.संपुर्ण काळया पाषाणामध्ये असलेले हे मंदीर स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे.या नाशिकला कुंभमेळा भरत असल्यामुळे संपुर्ण भारतातून मोठया प्रमाणात यात्रेकरू व भावीक येत असत.त्याचप्रमाणे येथील रामकुंड सुध्दा प्रसिद्ध असुन त्याला पवित्र मानल्या जाते.त्यामुळे या मंदिराला ऐतिहासीक महत्व होते.

नाशिक येथील मंदीर प्रवेश सत्याग्रह करण्याकरीता पुर्वतयारी म्हणून ऑक्टोबर १९२९ ला मुंबई येथे डॉ.बा.आंबेडकरांनी महत्वपूर्ण सहकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती.या बैठकीला नाशिक येथुन दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वात मोठया प्रमाणात कार्यकर्ते व पदाधिकारी, उपस्थीत होते.त्यानंतर पतितपावनदास वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली सत्याग्रह समितीची स्थापना करण्यात आली. तसेच केशव नारायण देव यांना सुध्दा अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली तर सत्याग्रह समितीच्या उपाध्यक्ष पदाची जबाबदारी पांडुरंग शिवाजी सबनिस यांच्याकडे तर सचिव म्हणून भाऊराव कृष्णराव गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली होती.

मंदीर प्रवेश सत्याग्रह समितीची स्थापना झाल्यानंतर काळाराम मंदीराचे मुख्य पुजारी श्री.गणेश रामचंद्र यांना दादासाहेब गायकवाड यांनी लेखी सुचना दिली.या सुचनेनुसार त्यांनी कळविले की, आम्ही अस्पृश्य लोक मंदीर प्रवेश करुन श्री.रामचंद्राचे दर्शन घेणारे आहोत. जर आपण सवर्ण हिंदुनी विरोध केल्यास आम्ही निश्चितच सत्याग्रह करु.मंदिराच्या पुजाऱ्यांनी ५ महीन्यानंतर ९ नोव्हेंबर १९२९ ला कोहीनुर वृत्तपत्रातुन उत्तर दिले की, आम्ही आपणास मंदीर प्रवेश देणार नाही.आपण तरी आग्रह केल्यास त्याचा प्रतिकार केल्या जाईल त्यामुळे नाशिक काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह निश्चित झाला.

२ मार्च १९३० ला मंदीर प्रवेश सत्याग्रहाकरिता संघटीत झालेल्या अस्पृष्यांनीसभा नाशिकच्या महारवाड्यातील आजच्या भीमचौकात घेण्यात आली.डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचे सकाळी १०.०० वाजचा आगमन झाल्यानंतर त्यांच्या नावाचा मोठा जयजयकार व उदघोष करणात आला.डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी यावेळी लोकांमध्ये जागृती करणारे भाषण केले.दुपारला सत्याग्रहींची मिरवणुक आयोजित करण्यात आली होती.मात्र नाशिकचे जिल्हाधिकारी श्री.गार्डन यांनी १४४ कलम लागु केले.त्यामुळे सत्याग्रहींचा भ्रमनिरास झाला होता.मात्र डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी रणरणत्या उन्हात कोणत्याही गोष्टींची तमा न बाळगता १६००० सत्याग्रहींची मिरवणुक काळाराम मंदीराकडे नेली.या मोर्चाचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत: केले मात्र मंदिराचे सर्व दरवाजे मंदिराच्या पंचकमेटीने बंद केल्यामुळे सत्याग्रहींनी बैठा सत्याग्रह सुरु केला.

३ मार्च १९३० ला सकाळी ९ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रहींना संबोधीत करून मोर्चा राममंदीराकडे नेला आणि मंदीराच्या चारही दरवाजाच्या समोर धरणे दिलेत. या सत्याग्रहामुळे मंदीराची पंचकमेटी हादरुन गेली. पोलीस भेदभाव करीत असल्याची तक्रार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २४ मार्च

१९३० ला गव्हर्नरला पत्र देवून केली. त्यामुळे २६ मार्च १९३० ला आयुक्त घोसाळ साहेबांची बदली झालेली दिसून येते हा सत्याग्रह १२ एप्रिल १९३५ पर्यंत कार्यरत होता मात्र या सत्याग्रहास यश येत नसल्यामुळे चे बघुन सत्याग्रहाची केलेली दिसून येते.

## संदर्भग्रंथ सूची


१) अत्रे आचार्य - 'कर्हेचे पाणी' परचुरे प्रकाशन, मुंबई, आ. आ. जाने., २०१२

२) उग्ग -'ती स्मारक समिती की मारक समिती' प्रकाशन-मंत्री, दीक्षाभूमीसंरक्षणसमिती, नागपूर.

३) इंगळे, व. न. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार' भाई उध्द्वराव पाटील प्रकाशन, म.सा.सं.मं. मुंबई प्र. आ. सप्टेंबर, २००३.

४) कीर,धनंजय-'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौ.आ.डिसें.,२००६.

५) केळकर, भा.कृ.(संपा.)- 'यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व्' प्रकाशन, सचिव, म. रा.सा.सं.मं., व्दि, आ. २०१०.

६) कोसारे, एच.एल.- 'विदर्भातील दलित चळवळींचा इतिहास' ज्ञानप्रदिप प्रशासन, नागपूर, प्र.आ. १९८४.

७) कोचे, तु.का.- 'आंबेडकरी चळवळी आणि भूमिहीनांचा सत्याग्रह' सिध्दार्थ प्रतिष्ठान, नागपूर, प्र. आ. १९९१.

८) कांबळे, यादवराव - 'सामंतशाहीतून भूदास भूमिहीनांची मुक्ती एक आंबेडकरवादी दृष्टीकोन' प्रज्ञा-प्रबोध प्रकाशन, सांगली, २००७.

९) खरात, शकरराव (संपा.)- 'कर्मवीर भाऊराव कृष्णाजी उर्फ दादासाहेब गायकवाड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रे' ठोकळ प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६१.

१०) खरात, शंकरराव (संपा.)- 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे' इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, १७ ऑक्टों., २०१०

११) खैरनार, प्राचार्य, जे.जे.- 'सत्याग्रही दादासाहेब' क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले प्रकाशन, काळा मारोती चौक, येवला.

१२) खैरमोडे,चां.भ.-'डॉ.बाबासाहेब आंबेडकर खंड-३'सुगावा प्रकाशन,पुणे,ऑगष्ट, २००३.

१३) खैरमोडे, चां. भ. - 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर खंड-६' सुगावा प्रकाशन, पुणे

१४) गवई, डॉ.वामन -'आंबेडकरी चळवळीचा शक्ती संघर्ष' प्रकाशक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ कंटेम्परारी स्टडीज, अमरावती, प्र.आ. १० सप्टें., २०१०.

१५) गणवीर, रत्नाकर (संक.)- 'विलायतेहून डॉ.बाबासाहेबांची पत्रे' नेहा प्रकाशन,नागपूर ति.आ., २१ ऑक्टोंबर, २००७.

१६) गडकरी,माधव-'संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी' मनोविकास प्रकाशन,मुंबई.

# भारतीय राष्ट्रवादाच्या जडणघडणीमध्ये भारतीय भाषिक वृत्तपत्रांचे योगदान

डॉ. प्रमोद ना. घ्यार
इतिहास विभागप्रमुख
कला वाणिज्य महिला महाविद्यालय,
बल्लारपूर जि. चंद्रपूर

---

सारांश :–

ब्रिटीशकालीन देशी वृत्तपत्रांनी समाजातील अंधश्रध्दा, जुन्या चालीरीती, परंपरा यांच्यावर जोरदार टिका करून समाजाला जागृत करण्यासाठी, त्यांना शिक्षित करण्यासाठी महत्वाचे कार्य केलेले दिसून येते. राष्ट्रवादाच्या जडणघडणीमध्ये विविध भाषिक देशी वृत्तपत्रांनी महत्वाची भुमीका बजावलेली दिसून येते. या वृत्तपत्रांनी भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात सर्वसामान्यांपर्यंत आपले विचार पोहचवून लोकांमध्ये देशभक्ती, राष्ट्रवाद व राष्ट्रप्रेम निर्माण केले. लो. टिळकांनी केसरी व मराठा वृत्तपत्रातून ‘स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच’ अशी घोषणा केली. त्यांनी आपल्या लेखनिने इंग्रज सरकारला घाबरवून सोडले. अनेक वृत्तपत्रांनी सामाजिक सुधारणांवर भर देवून सुधारणा घडवून आणल्या. तर काही वृत्तपत्रांनी ज्ञानप्रसाराचे कार्य

केले. इंग्रजांच्या अन्याय व अत्याचाराविरोधात अनेक वृत्तपत्रांनी टिका करून जनमत जागृत करण्याचे कार्य केले. अश्याप्रकारे भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात जनतेमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करून लढण्यासाठी सिध्द करण्याचे कार्य विविध देशी भाषीक वृत्तपत्रांनी केले. त्याचा परिणाम भारतात जागोजागी इंग्रज सत्तेविरूध्द चळवळी व आंदोलने होवून शेवटी ब्रिटीशांना भारतातील सत्ता सोडून जावे लागले व भारताला स्वातंज्य मिळाले.

**प्रस्तावना :—**

जे देश परकियांच्या गुलामगिरीत होते, तिथे राजकीय आणि सामाजिक जागृती होवून स्वतंत्रता आंदोलने झालीत. या जागृती मागे तत्कालीन साहित्य व वृत्तपत्रांची भूमीका महत्वाची आहे. भारतामध्येसुध्दा ब्रिटीशांची गुलामगिरी झुगारून टाकण्यासाठी स्वतंत्रता चळवळी व आंदोलने सुरू झाले. तेव्हा लोकांमध्ये राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आधुनिक विचारसरणीचा प्रसार होवून राष्ट्रवादाचा उदय व्हावा म्हणून त्या काळातील वृत्तपत्रांनी महत्वाची भूमीका बजाविली आहे. भारतीय समाजात जुन्या चालीरीती, परंपरा, रितीरीवाज, अंधश्रध्दा दुर करून भारतीय समाज आधुनिक पाश्चात्य ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण यांच्याशी परिचीत व्हावा व समाज सुधारून राजकीयदृष्टया तो एक व्हावा यासाठी त्याकाळातील वृत्तपत्रे धडपडत होती. भारतीय समाजसुधारकांनी, विव्दानांनी व राजकीय नेत्यांनी विविध भारतीय भाषांमध्ये वृत्तपत्रे प्रकाशीत करून लोकांना जागृत केले. राष्ट्रीय आंदोलनाच्या मुख्य प्रवाहामध्ये लोकांना सामील करून संपुर्ण भारतात राष्ट्रीय आंदोलन प्रखर बनले. यासाठी बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, पं. इश्वरचंद्र विद्यासागर, राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, दादाभाई नौरोजी, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. अनेक समाजसुधारक व नेत्यांनी वेगवेगळया भाषांमध्ये वृत्तपत्रे प्रकाशीत करून त्याव्दारे जनतेला जागृत केले व त्यांना राष्ट्रीय आंदोलनात सक्रीय करण्याचे काम तत्कालीन वृत्तपत्रांनी केले व भारताला स्वातंज्य मिळवून दिले.

**संशोधनाची उद्दीष्टये :—**

१) भारताच्या राष्ट्रीय आंदोलाच्या काळात वेगवेगळया भाषांमध्ये प्रकाशीत झालेल्या वृत्तपत्रांचा अभ्यास करणे.

२) भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात महत्वपूर्ण भुमिका बजावणाऱ्या देशी वृत्तपत्रांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके :—**

१) भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात वृत्तपत्रांची भूमीका महत्वाची आहे.

२) जनतेला जागृत करून भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रवाहात सामील करण्यासाठी देशी वृत्तपत्रांचे भरपूर योगदान आहे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोध निबंधाच्या लिखाणाकरीता दुय्यम साधनांचा आधार घेतलेला असून यामध्ये भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात सुरू झालेल्या वृत्तपत्रांची माहिती संकलीत केली. तसेच त्या अनुषंगाने ज्या साहित्यात त्याचा उल्लेख आलेला आहे अश्या साहित्याचा व वर्तमानपत्रातील लेखांचा आधार घेतलेला आहे.

ईस्ट इंडीया कंपनीचे भारतात शासन प्रस्थापीत झाल्यानंतर इंग्रजांनी भारतीयांचे शोषण सुरू केले. सोबतच ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार सुरू केंल्याने अनेक भारतीयांनी ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला. ईस्ट इंडीया कंपनीतील भ्रष्टाचार व अयोग्य शासनव्यवस्था यामुळे असंतुष्ट इंग्रजांनी त्याविरोधात वृत्तपत्रांमधून

लिखाणाला सुरूवात केली. यामध्ये जेम्स ऑगष्टस हिकी या इंग्रज व्यक्तीने बेंगाल गॅझेट हे पहिले वृत्तपत्र २९ जानेवारी १७८० रोजी भारतात संरू केले. त्याने कंपनी सरकारशी संघर्ष सुरू झाल्यावर वृत्तपत्र स्वातंञ्याचा पुरस्कार केला. तसेच वृत्तपत्रांचे स्वातंञ्य समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. कंपनीमधील गैरव्यवहार समोर आणणे हा हिकीचा उद्देश होता. यासाठी त्याला एक दोनदा दंड व शिक्षासुध्दा भोगावी लागली. अश्याप्रकारे भारतात वृत्तपत्र प्रकाशनाला सुरूवात झाली. सुरूवातीला इंग्रजी भा तील यंग इंडीया गॅझेट ( नोव्हेंबर १७८० ), कलकत्ता गॅझेट ( फेब्रुवारी १७८४ ), मद्रास कुरीअर ( मे १७८५ ), बॉम्बे हेरॉल्ड ( १७८९ ), बॉम्बे गॅझेट ( १७९१ ), बॉम्बे कुरीअर ( १७९२ ) ही वृत्तपत्रे सुरू झालीत. इंग्रजी भाषा बहुजन समाजाला अपीरिचीत असल्याने वृत्तपत्रांमधील विचार त्यांच्यापर्यंत पोहचत नव्हते. तेव्हा भारतीय समाजसुधारकांनी व राष्ट्रीय आंदोलनातील नेत्यांनी आपले विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी भारतीय भाषांमधून वृत्तपत्रे प्रकाशीत करायला सुरूवात केली. सर्वसामान्यांपर्यंत आपले विचार पोहचवून त्यांना राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रवाहात आणले. अश्याप्रकारे संपूर्ण भारतात राष्ट्रीय आंदोलन तिव्र झाले.

**भारतीय भाषांमधील वृत्तपत्रे व त्यांचे योगदान :—**

**मराठी भाषिक वृत्तपत्रे :—**

दर्पण हे मराठी भाषेतील प्रकाशीत होणारे पहिले साप्ताहिक असून याची सुरूवात ६ जानेवारी १८३२ मध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबई येथे केली. यांना मराठी वृत्तपत्राचे जनक म्हटल्या जाते. भारतीयांना पाश्चात्य ज्ञानाचा परिचय व्हावा, देशाची प्रगती होवून देश समृध्द बनावा, तसेच मराठी लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करणे हा यामागील उद्देश होता. या वृत्तपत्रात इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांचा उपयोग केल्या गेला. सुरूवातीला हे वृत्तपत्र पाक्षिक म्हणून प्रकाशीत झाले. मे १८३२ मध्ये याचे रूपांतर साप्ताहिकात झाले. महाराष्ट्रातील प्रबोधनाची सुरूवात या वृत्तपत्राने झाली.

संपूर्ण मराठी भाषेत प्रकाशीत होणारे वृत्तपत्र मुंबई समाचार हे असून त्याची सुरूवात ४जुलै १८४० ला मुंबई येथे झाली. भाऊ महाजन यांनी १८४० मध्ये प्रभाकर हे साप्ताहिक सुरू करून पाश्चात्य शिक्षण, ज्ञान, विज्ञान, व तंत्रज्ञानाची ओळख भारतीयांना व्हावी व भारतीय समाज ज्ञानसंपन्न व्हावा हा यामागील उद्देश होता. याच वृत्तपत्रातून लोकहितवादींची शतपत्रे क्रमशः प्रकाशित होवू लागली. सुधारणेचे परखड समर्थन करणारे त्यांचे लेख प्रकाशित होवू लागले. सोबतच या वृत्तपत्रातून भाऊ महाजन यांनी स्वधर्म, स्वभाषा व भारतीय संस्कृतीचा पुरस्कार केला.

ज्ञानप्रकाश हे मराठीतील पहिले दैनिक असून याची सुरूवात १८४९ मध्ये साप्ताहिकाच्या स्वरूपात कृ णाजी त्र्यंबक रानडे यांनी केली. पुढे १९०४ मध्ये याचे रूपांतर दैनिकात होवून या वृत्तपत्राने जनतेला अनेक प्रकारची माहिती दिली. सोबतच सुशिक्षीत वर्गातील मद्यपानाची सवय, वेश्यागमन, व्यभिचार यावर जोरदार टिका केली. १८९५ च्या पुण्यातील कॉंग्रेस अधिवेशनाची माहिती राष्ट्रसभा समाचार या शिर्षकाखाली जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे महत्वपुर्ण कार्य केले.

इंग्रज राजवटीच्या काळात ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार खूप जोरात सुरू केला. हे करीत असतांना त्यांनी ज्ञानोदय (१८४१) व ज्ञानसिंधु (१८४२) या वृत्तपत्रातून हिंदु धर्मातील चालीरिती, अंधश्रध्दा,

अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा यावर टिका केली. युरोपियन संस्कृती श्रेष्ठ आहे, या संस्कृतीचा भारतात प्रसार करून सोबतच ख्रिश्चन धर्माचा कसा प्रसार करता येईल यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. तेव्हा पुण्यातील काही विव्दानांनी एकत्र येवून मिशनऱ्यांच्या प्रचाराला शह देण्यासाठी जुलै १८५२ मध्ये विचारलहरी नावाचे मासिक सुरू केले. कृष्णशास्त्री चिपळूणकर सारखे विद्वान याचे संपादक असल्याने हा प्रतिहल्ला प्रभावी व परिणामकारक ठरला. १८५३ मध्ये भाऊ महाजन यांनी धुमकेतू हे साप्ताहिक व ज्ञानदर्शन हे त्रैमासिक सुरू केले. त्यांनी उदार धर्मवि  ायक विचार त्यातून मांडले. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रबोधन, समाज जागृती व सुधारणा घडवून आणण्यासाठी या दोन्ही वृत्तपत्रांचा उपयोग झाला. इंग्रजांच्या शोषक आर्थिक नितीचे सुध्दा विवेचन त्यांनी यातून केले.

विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी १८५४ मध्ये निबंधमाला हे मासिक पुण्यामध्ये सुरू करून यातून त्यांनी स्वदेशी, स्वधर्म व स्वभाषेचे जोरदार समर्थन केले. त्यांना पाश्चात्य विचारसरणीवर आधारीत समाजसुधारणा व पुरोगामी विचार मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी या मासिकातून म. फुलेंच्या सामाजिक कार्यावर व विचारांवर जोरदार टिका केली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांनी एकत्र येवून महाराष्ट्रीयन जनतेमध्ये राजकीय व सामाजिक जागृती घडवून आणण्यासाठी मराठीतून केसरी व इंग्रजीतून मराठा ही वृत्तपत्रे १८८१ मध्ये सुरू केली. आगरकरांनी केसरीचे तर टिळकांनी मराठाचे संपादन केले. आगरकरांचे टिळकांशी मतभेद झाल्यानंतर केसरी व मराठा या दोन्ही वृत्तपत्रांचे संपादन टिळकांनी केले. या वृत्तपत्रांनी राजकीय, सामाजिक व धार्मीक वि  ायांची मीमांसा करून लोकजागृतीचे कार्य केले. इंग्रज सरकारवर उघडपणे टिका करण्याचे कार्य टिळकांनी या वृत्तपत्रांमधून केले. दुसरीकडे आगरकरांनी समाजसुधारणेवर भर दिला. टिळकांशी मतभेद झाल्यानंतर आगरकरांनी १८८८ मध्ये सुधारक हे वृत्तपत्र सुरू करून समाजसुधारणेविषयी आपले परखड विचार त्यातून मांडले त्यांनी बुध्दीप्रामाण्य व व्यक्तीस्वातंत्र्यावर भर दिला. त्यांनी स्त्रीशिक्षण, विधवा पुर्नविवाह संमतीवय कायदा, शिक्षणपध्दती, सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा याविषयी जनसामान्यांपर्यंत आपले विचार पोहचवून आधुनिक महाराष्ट्र घडविण्यात हातभार लावला.

**हिंदी भाषिक वृत्तपत्रे :—**

पहिले हिंदी भाषीक साप्ताहिक उदन्त मार्तंड पं. युगलकिशोर शुक्ल यांनी ३० मे १८२६ रोजी सुरू केले. १८२९ मध्ये राजा राममोहन रॉय यांनी हिंदी भाषेतून वंगदूत हे वृत्तपत्र सुरू केले. पहिले हिंदी दैनिक समाचार सुधादर्पण कलकत्ता येथे १८५४ ला सुरू झाले. बनारस अखबार हे हिंदी साप्ताहिक जानेवारी १८५४ पासून सुरू झाले, परंतु यामध्ये उर्दू शब्दांचे प्रमाण अधिक असल्याने त्याला शुध्द हिंदी वृत्तपत्र म्हणता येणार नाही. १८५० मध्ये बनारस याठिकाणी सुधाकर हे पहिले हिंदी भाषेतील वृत्तपत्र प्रकाशित होवून त्याचे संपादक तारामोहन मित्र होते. भारतेन्दु हरिश्चंद्र यांनी कवि वचनसुधा हे मासीक १५ ऑगष्ट १८७४ ला सुरू केले. पुढे त्याचे पाक्षिकात रूपांतर होवून नंतर ते साप्ताहिकामध्ये प्रसिध्द होवू लागले. भारतेन्दुंना हिदी वृत्तपत्रसृष्टीचे राममोहन रॉय म्हटल्या जाते. त्यांच्यमुळे या वृत्तपत्राला स्थिरता व लौकीक प्राप्त झाला.

भारतीय राष्ट्रीय आंदोलनातून दैनिक वृत्तपत्रांचा जन्म झाला. हिंदुस्थान हे पहिले हिंदी दैनिक लंडनमध्ये सुरू झाले. पूढे ते उत्तरप्रदेशात कालाकांकर येथे स्थलांतरीत झाले. पंडीत मदनमोहन मालवीय त्याचे काही काळ संपादक

असल्याने या वृत्तपत्राची लोकप्रीयता खूप वाढून ते १९१० पर्यंत सुरू होते. विसाव्या शतकाच्या पहिल्या वीस वर्षात हिंदी वृत्तपत्रे आणि साहित्यातून सामाजिक व धार्मीक प्रश्नांकडे विशेष लक्ष पुरविल्या गेले. याशिवाय शिक्षण, शेती व व्यापार या क्षेत्रासाठी काम करणारी काही वृत्तपत्रे होती. हिंदी प्रदीप, मराठी केसरीचे रूपांतर असलेले हिंदी केसरी ( १९०७ ), आग्रा येथून प्रसिध्द होणारे कर्मयोगी ( १९१० ), पंडीत मदनमोहन मालवीय यांचे अलाहाबाद येथून प्रसिध्द होणारे अभ्युदय ( १९०७ ), कानपूरवरून प्रकाशीत होणारे प्रताप ( १९१३ ) ही मोजकी वृत्तपत्रे राजकारणावर चर्चा करण्यात आघाडीवर होती. तसेच स्वातंञ्यता आंदोलनास चालना देण्यात अग्रेसर होती.

आपल्या राजकीय विचारसरणीचा व तत्वज्ञानाचा प्रसार करण्याकरीता म. गांधीनी सरकारी परवान्याशिवाय सत्याग्रह हे साप्ताहिक ७ एप्रिल १९१९ पासून सुरू केले. सोबतच यंग इंडीया इंग्रजीतून व नवजिवन गुजराथीमधून ही नियतकालीके १९१९ पासून त्यांच्या संपादनाखाली प्रकाशीत होवू लागली. ११ फेब्रुवारी १९३३ रोजी हरीजन हे इंग्रजी व हिंदी साप्ताहिक त्यांनी सुरू केले. यामध्ये महादेव देसाई, किशोरलाल मशरूवाला, काका कालेलकर व नरहरी पारेख यांच्यासारखे नामवंत लेखक लेखन करीत होते.

**बंगाली भाषिक वृत्तपत्रे :—**

देशी भाषांमधील वृत्तपत्रांचा प्रारंभ बंगालमध्ये झाला. १८१६ साली गंगाधर भट्टाचार्य या व्यक्तीने बंगाल गॅझेट हे वृत्तपत्र बंगाली भाषेत सुरू केले. श्रीरामपूर ( कलकत्ता ) येथे ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी २३ मे १८१८ रोजी समाचार दर्पण हे साप्ताहीक सुरू करून त्यातून ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे, हिंदु धर्मावर टिका करणे व सरकारी कामकाजावर टिका करण्याचे कार्य सुरू केले. १८२१ मध्ये समाचार चंद्रीका हे साप्तहीक बंगालमधील समाजसुधारकांनी सुरू करून त्यातून त्यांनी सामाजिक प्रश्नांना हात घालून पुराणमताभिमानी दृष्टीकोन मांडला. भवानीचरण बॅनर्जी व राजा राममोहन रॉय यांनी संवाद कौमुदी हे साप्ताहीक ४ डिसेंबर १८२१ मध्ये सुरू केले. यातून त्यांनी बालविवाह, सतीप्रथा, केशवपन या अनिष्ट चालीरीतींचा विरोध करून सामाजिक प्रबोधनाला सुरूवात केली. सोबतच त्यांनी इंग्रजी शिक्षणाचे जोरदार समर्थन केले. मिरत उल अखबार हे फारशी भाषेतील साप्ताहीक रॉय यांनी १८२२ मध्ये सुरू करून त्यातून त्यांनी सतीप्रथेविरूध्द लिखाण केले. त्यानंतर त्यांनी प्रेस ॲक्ट विरोधात हे वृत्तपत्र बंद केले. १८६१ मध्ये निलदर्पण या नाटकामधून इंग्रज निळ मळेमालकांचा भारतीय मजूरांवर होणारा अन्याय व अत्याचार दाखविण्यात आला. यामुळे संपूर्ण बंगालमध्ये खळबळ उडून या नाटकाच्या प्रकाशकावर खटला दाखल होवून त्याला शिक्षा झाली. या खटल्याचे पडसाद बंगाली वृत्तपत्रांमधून उमटले. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी १५ नोव्हेंबर १८५८ रोजी सोमप्रकाश हे साप्ताहीक बंगाली भाषेत सुरू केले. देवेन्द्रनाथ टागोर बंगाली भाषेत तत्वबोधीनी पत्रिका हे मासिक ( १८४३ ), केशवचंद्र सेन यांनी सुलभ समाचार हे साप्ताहीक ( १८७८ ), मोतीलाल घोष यांनी बंगाली भाषेत अमृतबझार पत्रीका ( १८६८ ) इ. वृत्तपत्र सुरू केले. १८७८ च्या वर्नाकुलर प्रेस ॲक्टच्या निर्बंधांमधुन वाचण्यासाठी अमृतबझार पत्रीकेची भाषा ही इंग्रजी करण्यात आली. स्वराज्य पक्षाचे मुखपत्र फार्वड हे इंग्रजी भाषेमधुन देशबंधू चित्तरंजन दास यांनी सुरू केले. मौलाना अक्रम खान यांनी आझाद ( १९२६ ), फझलुल हक यांनी नवयुग ( १९४१ ), हसन सुऱ्हावर्दी यांनी इतेहाद या बंगाली भाषीक वृत्तपत्रांमधून बंगालमधील मुस्लीमांचा राजकीय दृष्टीकोन प्रभावीपणे मांडला.

**अन्य भाषिक वृत्तपत्रे :—**

उर्दु भाषेतील पहिले साप्ताहिक जाम ए जहान्नुमा २७ मार्च १८२२ रोजी प्रकाशीत झाले. मुंबई समाचार गुजराती भाषेतील साप्ताहीक १ जुलै १८२२ रोजी फर्दुजनी मर्झबान यांनी सुरू केले. १८३२ मध्ये त्याचे दैनिकात रूपांतर होवून ते अद्यापही सुरू आहे. १८३३ मध्ये मद्रास येथे तामीळ व तेलगु भाषांमध्ये दोन वृत्तपत्र सुरू होवून त्या वृत्तपत्रांना सरकारी मदत मिळत होती. दिल्लीतील पहिले वृत्तपत्रांनी पर्यंत दिल्लीमध्ये आठ उर्दु वृत्तपत्रे सुरू झालेंली होती. मद्रास येथे जामे उल अखबार हे साप्ताहिक १८४० मध्ये रहमतुल्ला यांनी सुरू केले तर लाहोर येथे मुन्शी हसमुखराय यांनी कोहीनुर हे साप्ताहिक १४ जानेवारी १८५० रोजी सुरू केले. लखनौ येथे अवध अखबार या नावाने नवलकिशोर यांनी १८५८ मध्ये साप्ताहिक सुरू केले. भरघोस पृ ठे व उच्च दर्जाची निर्मीती यामुळे हे वृत्तपत्र अतिशय लोकप्रिय होते. पंडीत रतननाथ सरशार १८७८ मध्ये याचे संपादक झाले. त्यांची फिसान ए आजाद ही उर्दुतील सर्वोकृष्ठ कादंबरी याच वृत्तपत्रातून क्रमशः प्रसिध्द झाली. १८७७ पासून लखनौ मधून नियमीत प्रसिध्द होणारे अवध पंच हे नियतकालीक विनोद व व्यंगचित्रांसाठी प्रसिध्द होते. या वृत्तपत्राचे संपादक सय्यद सज्जाद हुसेन हे स्वतःहा उत्कृष्ठ विनोदी लेखक तसेच प्रखर राष्ट्रीय बाण्याचे व प्रसंगी सरकारला धारेवर धरणारे निर्भीड टिकाकार होते.

कॉग्रेस व मुस्लीम लीगच्या स्थापनेनंतर थोर देशभक्त, प्रभावी वक्ते व पत्रकार मौलाना अबुल कलाम आझाद यांनी लोकजागृतीच्या उद्देशाने अल् हिलाल् हे साप्ताहिक १ जून १९१२ रोजी कलकत्ता येथे सुरू केले. हे वृत्तपत्र राजकीय प्रश्नात कॉग्रेसचा पाठपुरावा करीत होते. सामाजिक व धार्मीक समस्यांविषयी त्यांचे पुरोगामी धोरण होते. ' मुसलमानांचा गोवधाचा हट्ट हा जातीय शांततेला विघातक आहे ' असे विधान या वृत्तपत्राने १९१३ साली केले होते. बातम्यांसोबत छायाचित्र छापणारे हे पहिले उर्दु वृत्तपत्र होते. प्रखर राजकीय टिकेमुळे इंग्रज राज्यकर्त्यांच्या रोषाला बळी पडून हे वृत्तपत्र बंद करावे लागले.

अश्याप्रकारे भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात विविध भाषांमधील देशी वृत्तपत्रांनी समाजजागृती व राजकीय जागृती करून भारतीयांना राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रवाहात आणले. भारताला ब्रिटीशांच्या गुलामगीरीतून मुक्त करण्यासाठी स्वतंत्रता आंदोलन करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

**संदर्भ सूची**

१) रायकर सिताराम, — कृष्णराव भालेकर समग्र वाङमय, महात्मा फुले समता प्रतिष्ठान प्रकाशन
२) अकलूजकर प्रसन्नकुमार, — मराठी वृत्तपत्रसृ टीचे अंतरंग, श्रीविद्या प्रकाशन, पुणे २०००
३) हिवराळे सुखराम,— लोकपत्रकार डॉ. आंबेडकर, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर

———————————————————————————————————

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# चंद्रपूर जिल्ह्यातील दलीतांच्या चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन

**डॉ. मिलिंद बळीरामजी भगत**
मार्गदर्शक
एम.ए., एम.फील., पीएच.डी., नेट
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर
मो. 8788204052
E-mail : milindbhagat95@gmail.com

**प्रविण गौतमराव वाळके**
संशोधक
IHLRSS, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर
मो. 9604767606
E-mail : pravin.walke14@gmail.com

**सारांश -**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेनी प्रेरित होऊन 1920 पासूनच चंद्रपूर जिल्ह्यात दलितांच्या चळवळी निर्माण झाल्या होत्या. 1920 मध्ये अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर येथील राजर्षी छत्रपती शाहक्त महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याने प्रभावीत होऊन चंद्रपूर जिल्ह्यातील मंडळींनी चळवळीला सुरुवात केली. वरोरा येथील सभेत किसन फागो बन्सोडे यांनी सवर्ण हिंदू इतकेच बरोबरीचे हक्क मिळाले पाहीजे असा संदेश दिला. चंद्रपूर येथे महारांनी कार्तिक एकादशीला चोख्यांची दिंडी काढली. दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळी डॉ. आंबेडकर हेच अस्पृश्यांचे नेते आहेत असी तार चंद्रपूर येथून लंडनला रॅम्से मॅक्डोनाल्ड यांना पाठविली. 1931 मध्ये कोरेगाव येथे 15 हजार दलित स्त्री-पुरुषांची सभा झाली. महार समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी 1932 मध्ये मध्यप्रांतीय दलित परिषद, चांदा येथे झाली. पंचमंडळाच्या माध्यमातून दलित विद्यार्थ्यांसाठी 1932 मध्ये वस्तीगृह साकारले. 1933 मध्ये चंद्रपूर येथे महात्मा गांधींच्या सभेत देवाजी खोब्रागडे यांनी भाषण दिले.पुणे कराराला पाठींबा दर्शविण्यासाठी चांदा तालुका परिषद 1934 मध्ये सावली येथे झाली. 1935 च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नाशिक जिल्ह्यातील येवला अधिवेशनाला चांदयातील कार्यकर्त्यांचा सहभाग होता. 14 आक्टोबर 1956 ला नागपूरला धर्मांतर झाल्यानंतर 16 ऑक्टोबर 1956 ला चंद्रपूर येथे बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या सहकार्यानी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 3 लाख लोकांना बौध्द धम्माची दिक्षा दिली. यावेळी माईसाहेब ह्या सुध्दा डॉ. बाबासाहेबांसोबत होत्या. त्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यात बोरगांव येथे बॅर. राजाभाऊ खोब्रागडे यांनी दिक्षा समारोह घेतला. बाबासाहेबांचे सुपूत्र यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते बोकडडोह येथे धम्मदिक्षा सोहळा पार पडला.

**बीजशब्द -** चळवळ, परिषद, ठराव, सभा, कार्यकर्ते, अधिवेशन, धर्मांतर, धम्मदिक्षा, बौध्द धम्म.

**प्रस्तावना -**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्णव्यवस्थेतील काळाकुट्ट अंधार अनुभवला होता. दलीत समाजाला सवर्णांच्या सामाजीक, धार्मिक, आर्थिक व राजकीय गुलामगीरीतून मुक्त करायचे होते. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्यायाची पेरणी करायची होती. यासाठी डॉ. आंबेडकरांनी चळवळ उभारली चळवळीच्या क्रांतीची ज्योत प्रज्वलीत केली. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य जनतेच्या मनात स्वाभिमान जागृत केला. अस्पृश्यांच्या मनात प्रचंड उर्जा निर्माण केली. या क्रांतीकारी विचारांची पीढी शहरापासून खेड्यापर्यंत चळवळ सांगत सुटली. आणि या चळवळीची प्रेरणा घेऊन अनेकांनी स्वतह्ला समाजकार्यात झोकून दिले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित झालेली ती पिढी झपाटल्यागत डॉ. आंबेडकरांचे स्वप्न साकरण्यासाठी झटत होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरीत होऊन चंद्रपूर जिल्ह्यात चळवळी निर्माण झाल्या. चळवळीमूळे दलीत समाजात मानवी अधिकारांची जाणीव झाली आणि सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक चळवळी निर्माण झाल्या. चळवळीमूळे बाबासाहेबांनी चंद्रपूर येथे 16 ऑक्टोबर 1956 ला 3 लाख लोकांना बौध्द धम्माची दिक्षा दिली. ही एक अव्दितीय महान क्रांती होय.

**उद्देश -**

1) चंद्रपूर जिल्ह्यातील धर्मांतराची वाटचाल समजून घेणे.
2) चंद्रपूर जिल्ह्यातील विवीध दलीत हक्कांचे आंदोलने व चळवळी समजून घेणे.
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील लोकांचा सहभाग समजून घेणे.
4) धर्मांतराच्या घोषणेमूळे चंद्रपूर जिल्ह्यातील लोकांचे ऐक्य समजून घेणे.
5) खेड्यातील लोकांनी स्वयंस्फुर्तीने घेतलेले धम्मदिक्षा समारंभ समजून घेणे.

**अखिल भारतीय बहिष्कृत परिषद नागपूर - 1920 -**

1920 मध्ये मानवमुक्तीच्या ध्यास घेतलेला मोठ्या दिलाचा राजना राजर्षि छत्रपती शाहक्त महाराज यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय बहिष्कृत परिषद नागपूर येथे 30 मे रोजी झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परिषदेला हजर होते. ही परिषद यशस्वी करण्यासाठी चंद्रपूरवरून श्री. पत्रुजी भिवाजी खोब्रागडे आणि देवाजी भिवाजी खोब्रागडे, शिवराम जानबा कांबळे, कदम, शिवनकर इत्यादी मंडळी परिषदेला आली होती. ही परिषद यशस्वी करण्यात पत्रुजी भिवाजी खोब्रागडे यांचा सिंहाचा वाटा होता.

**वरोरा येथील सभा -**

नागपूर येथील परिषदेपूर्वी गुरुवर्य किसन फागो बन्सोडे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथे एक सभा आयोजीत केली होती. त्यामध्ये वरिष्ठ जातीशी हातघाई करुन सुध्दा बरोबरीचे हक्क मिळविले पाहिजेत. असा संदेश आपल्या भाषणातून दिला. त्याच परिषदेत महारांनी दारुपिणे, अस्वच्छ राहणे याबाबतीत कानउघडणी करणारी भाषणे झाली.

वरोरा येथील नारायण पेटकर यांनी प्रत्यक्ष कृतीतूनच अस्पृश्यता निवारण करता येते असा संदेश दिला. आपण जर हिंदू आहोत तर सर्व धार्मिक हक्क आपणास मिळले पाहिजेत ते आपण हिंदूकडून ओढून, हिसकावून घेतले पाहिजेत, अशी त्यांची धारणा होती. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची कल्पना मांडली परंतू अस्पृश्यांना गणपती मांडण्याचा अधिकार नव्हता ते मिळविण्यासाठी नारायण यांनी गणेश मुर्तीची घरी प्रतिष्ठापणा केली. परंतू हिंदूंच्या पोटात दुखू लागले. ह्या महारास हा अधिकार कुणी दिला ? असे प्रश्न विचारू लागले. परिणामी पुढे कोर्टात केस दाखल केली त्यानंतर नारायण यांची निर्दोश मुक्तता झाली.

**चंद्रपूर येथील चोख्यांची दिंडी -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकच्या काळाराम मंदीरात प्रवेश मिळविण्यासाठी सत्याग्रह केला. त्यानंतर चंद्रपूरातील जनमानसात सुध्दा आम्हालाही अधिकार मिळाला पाहिजे अशी जनभावना निर्माण झाली. आपल्याला हिंदूचे हक्क मिळावे अशी भावना प्रबळ होवू लागली. चंद्रपूरच्या विठ्ठल मंदीरात महारांना प्रवेश नव्हता. कार्तिक एकादशीला विठ्ठलाचा रथ ओढला जाई आम्ही हिंदू धर्मात आहो तर हा रथ ओढण्याचा हक्क आम्हालाही आहे. तो आपण बजावलाच पाहिजे असा संत दमडुबूवा व विठोबा रंगारी या वारकरी संप्रदायाच्या भक्तांनी केली.

त्यानंतर महार लोकांनी दिंडी काढली. त्या दिंडीला चोख्यांची दिंडी असे म्हटले जाई. सवर्णांना हे कळताच त्यांनी या महार लोकांना अडवण्याचा व चोप देण्याचा प्रयत्न केला परंतू इंग्रज अधिकारी डी. एम. जी. साहेबांनी मध्यस्थी केली.

**चंद्रपूर येथून रॅम्से मॅक्डोनाल्ड यांना तार -**

दुसऱ्या गोलमेज परिषदेच्यावेळी अस्पृश्यांचे खरे नेते कोण असा प्रश्न निर्माण झाला. म. गांधी आपणच अस्पृश्यांचे पुढारी आहोत अशी बतावणी करत. यावेळी आंबेडकर हेच खरे अस्पृश्यांचे नेते आहेत अशा तारा देशाच्या विविध भागातून लंडन येथे पाठविण्यात आल्या. चांदयावरून देवाजी खोब्रागडे यांनी गोलमेज परिषदेचे अध्यक्ष रॅम्से मॅक्डोनाल्ड यांना तार पाठविली. यावरुन चांदा हे चळवळीसाठी जागृत असल्याचे दिसून येते.

**कोरेगाव (वडसा) येथील 1931 ची सभा -**

चांदा जिल्ह्यातील कारेगाव मुक्कामी दि. 8 व 9 मार्च 1931, सोमवार व मंगळवार या दोन दिवशी श्री स्वामी ब्रम्हानंद, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेला किसना फागो बन्सोडे, विश्रामजी सवाई, मुल, रेवाराम कवाडे, एल. एन. हरदास ही मातब्बार मंडळी अतिथी म्हणून हजर होते. त्यावेळी सभेला 15,000 हजार स्त्री-पुरूष हजर होते. त्यामध्ये सामाजिक सुधारणेबाबत काथ्याकुट्ट होऊन ठराव पारित करण्यात आला.

**मध्यप्रांतीय दलीत परिषद चांदा - 1932 -**

महार समाजाला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीवर विचार विनीमय करण्यासाठी 29 जुन 1932 रोजी नागपूरचे तुलाराम साखरे, एम.एल.सी. यांचे अध्यक्षतेखाली

मध्यप्रांतीय दलीत परिषद घेण्यात आली. येथे संपन्न झालेल्या या अधिवेशनास नाशिकचे पतीतपावन बाबा, म. कालिचरण नंदागवळी, किसन फागो बन्सोड, वीर लक्ष्मण गंभीर नारयणे, दौलतराव बारसे, दशरथ पाटील, कामठी, बाब हरदास, एल.एन. यांनी उपस्थित राहक्तन मार्गदर्शन केले. या परिषदेचे स्वागताध्यक्ष श्रीमंत देवाजी खोब्रागडे, जनरल सक्रेटरी गोविंदराव भिवाजी खोब्रागडे, कोषाध्यक्ष सिताराम कृष्णाजी कवाडे हे होते.

**पंचमंडळाची निमिर्ती-1933 -**

1933 मध्ये चांदा येथे दादमहल वार्डात एक पंचमंडळ तयार करण्यात आले. यात विविध प्रकारचे कार्यक्रम घेत येत. याच पंचक मंडळात विचार विनिमय होऊन बाहेर गाववरून शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय व्हावी म्हणून वस्तीगृह सुरु करण्याची कल्पना आली व त्यातून चोखामेळा वस्तीगृह साकारले. या वस्तीगृहामुळे जिल्ह्याच्या शैक्षणिक व सांस्कृतिक विकासास अधिक चालना मिळाली.

**महात्मा गांधी यांची चंद्रपूर मधील सभा -**

14 नाव्हेंबर 1933 साली चंद्रपूर येथे महात्मा गांधी यांचे आगमन झाले. टिळक मैदान येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधीच्या आयोजित सभेत देवाजी खोब्रागडे यांनी भाषण केले. या सभेला भंगी समाज मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

**चोखामेळा चांदा तालुका परिषद 1934 -**

1934 साली 31 मे व 1 जुन या दोन दिवशी सावली येथे चोखामेळा चांदा तालुका परिषद घेण्यात आली. श्री. विक्रम बुटांनी शेंडे मालगुजार हे अध्यक्षस्थानी होते. परिषदेला चांदा, ब्रम्हपूरी, हिंगणघाट, आरमोरी इत्यादी ठिकाणावरुन मंडळी आली होती. परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. गोविंद भिकमचंद हे होते. या परिषदेत 20 ठराव पारीत करण्यात आले होते. त्यामध्ये 1. पुणे करारास पाठींबा देणे., 2. स्थानिक संस्थांच्या किंवा सरकारी नोकऱ्यात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देणे., 3. सार्वजनिक विहीरी, तलाव अस्पृश्यांसाठी खुली करणे., 4. मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रसार करणे., 5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यास पाठींबा देणे., 6. अनिष्ठ रुढींचा त्याग करणे., 7. जनता वृत्तपत्राचा प्रचार-प्रसार करणे. असे ठराव करण्यात आले. त्यावर देवाजी भिवाजी खोब्रागडे, राघव कांबळे, बुधा सुकाजी तोडे, ल.के. देशपांडे, बळवंत अप्पलवार यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

**1935 च्या येवला अधिवेशनात चांदयातील कार्यकर्त्यांचा सहभाग -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह झाला. तसेच मुखेड, पुण्यातील पार्वतीवरील सत्याग्रह झाले. काळाराम मंदिर सत्याग्रह 5 वर्षे 7 महिणे 11 दिवस चालला. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 13 नोव्हेंबर 1935 रोजी येवला येथे धर्मांतराची घोषणा केली होती. या अधिवेशनात भाग घेण्यासाठी देवाजी बापु खोब्रागडे यांच्या नेतृत्वात अनेक कार्यकर्ते गेले होते. त्यात ज. गो. संत गुरुजी, संभाजी रंगारी, ॲड. रामचंद्र कांबळे इत्यादी प्रमुख कार्यकर्ते हजर होते. त्यानंतर चंद्रपूर

जिल्ह्यात अनेक दलित चळवळींनी गती घेतली. अनेक कार्यकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत सहभागी होऊन संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात धार्मिक परिवर्तनाच्या कार्यात सहभागी झाले. याची फलश्रृती होऊन पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चंद्रपूर येथे धम्मदिक्षा दिली.

**चंद्रपूर येथे ऐतिहासिक धम्मदिक्षा सोहळा -**

चंद्रपूर येथे धर्मांतराचा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर टाऊन हॉलमध्ये बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी एक सभा घेतली. त्यात एक स्वागत समिती तयार झाली. त्याचे अध्यक्ष देवाजी बापु खोब्रागडे, उपाध्यक्ष गोविंदराव खोब्रागडे, ज. गो. संत गुरुजी, पत्रुजी लहुजी खोब्रागडे होते. सहसचिव लुलाराम फुलझेले, खेमदेव रंगारी, हिरामन मुन, कोषाध्यक्ष सिताराम कृष्णाजी कवाडे या समितीत 22 पुरुष व 8 स्त्रीया सदस्य होत्या.

16 व 17 आक्टोबर असे दोन दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मांतराच्या निमित्यानी चंद्रपूरला मुक्कामी होते. नागपूर वरुन मुल मार्गाने बाबासाहेब चंद्रपूरला आले. त्यांची प्रकृती निट नसल्यामुळे मुलच्या रेस्ट हाऊसवर त्यांनी थोडी विश्रांती घेतली, थोडे जेवन घेतले आणि तिथून प्रस्थान करुन सायंकाळी 4 वाजता सर्किट हाऊस चंद्रपूर येथे दाखल झाले. दिक्षाभूमीचा परिसर जनतेने फुलून गेला होता. सध्याच्या वरोरा नाका चौक ते नगिनाबाग पर्यंत पुरुष-स्त्रीया, लहान मुले असा जनसागर दिसत होता. आपल्या लोकांकडे पाहून बाबासाहेबांचे अंतह्रकरण भाराऊन गेले होते. बाबासाहेबांनी आपल्या जनतेकडे पाहून हात उंचावला नंतर ते खुर्चीवर बसले तर माईसाहेब सतत त्यांच्या हाताच्या नाडीचे ठोके बघत होत्या. व्यासपिठावर तथागत गौतमबुध्दाच्या प्रतिमेसमोर अगरबत्त्या आणि मेणबत्त्या लावण्यात आल्या होत्या. 'अत्त दिप भवह्र' असा संदेश देण्यात आला. लोकांनी दिक्षा घेण्याकरीता पांढरी शुभ्र वस्त्रे परिधान केली होती. बाबासाहेबांनी त्रीशरण, पंचशिल आणि 22 प्रतिज्ञा दिल्या व धम्मदिक्षा दिली. या सोहळयात बाबासाहेबांची प्रकृती अस्वस्थामुळे भाषण केले नाही. या समारोहात जवळ जवळ 3 ते 4 लक्ष लोकांनी बाबासाहेबांच्या हस्ते बौध्द धम्माची दिक्षा ग्रहण केली.

17 आक्टोबरला दुुपारी 2 वाजता देवाजी खोब्रागडे यांनी बाबासाहेबांना आपल्या निवासस्थानी नेले, चहापाण झाले. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या मातोश्री इंदिराबाई यांनी मोठ्या भक्तीभावाने पांढरी बनारस साडी आईसाहेबांना भेट म्हणून दिली.

**बोकडडोह व बोरगाव धम्मदिक्षा सोहळा -**

या धर्मांतरानंतर अनेक गावी दिक्षा समारंभ झाले. डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वानानंतर प्रेसिडीयमने धम्मदिक्षा देण्याचा अधिकार दादासाहेब गायकवाड, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे व ॲड. हरिदास आवळे यांना दिला होता. गोंडपिपरी तालुक्यातील बोरगाव येथे बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या हस्ते दिक्षा समारंभ झाला.

नागभिड तालुक्यातील बोकडडोह येथे यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते दिक्षा समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी नागभिड तालुक्यातील अनेकांनी बौध्द धम्माची दिक्षा घेतली.

**निष्कर्ष -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची दखल घेऊन चंद्रपूर जिल्ह्यातील नेते व कार्यकर्त्यांनी दलीत चळवळी राबविल्या. दलीत चळवळीतून समाजजागृतीचे कार्य घडून आले. बाबासाहेबांच्या चळवळीची अनुभूती चंद्रपूर जिल्हातील लोकांनी घेऊन ऐतिहासिक धम्मदिक्षेमूळे बौध्दांच्या जीवनशैलीत अमूलाग्र बदल घडून आला. त्यांनी जूने व्रतवैकल्ये, धारणा सोडून शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत केले. आज चंद्रपूर जिल्ह्यात बौध्दांच्या घरी शिक्षणामुळे डॉक्टर, इंजिनीअर, प्राध्यापक, वकील, शिक्षक हा सारा दलीत चळवळीचा आणि धर्मांतराचा प्रताप आहे. लोकांनी धर्मांतराचा अन्वयार्थ लक्षात घेतला त्यांनी आपल्या वर्तनात बदल केला. भिमरायाच्या आगमनाने एक नवा इतिहास घडला.

**संदर्भ सूची -**

1. नागदेवते धर्मराव - शौर्यगाथा भिमसैनिकांची, चंद्रपूर, 2012
2. खोब्रागडे फुलचंद - चंद्रपूर जिल्हा आंबेडकरी चळवळ, चंद्रपूर, 2015
3. खोब्रागडे फुलचंद - समता सेनानी, सौरभ प्रिटींग प्रेस, नागपूर
4. गोडबोले वामनराव - बोधिसत्व डॉ. आंबेडकरांच्या धम्मदिक्षेचा अविस्मरणीय इतिहास, सुप्रिया प्रकाशन, नागपूर, 1998\
5. गेडाम डॉ. टी.जी. - धम्मदिक्षेचा इतिहास, प्रबुध्द भारत पुस्तकालय, नागपूर, 2016.

# भारतीय राष्ट्रवादाची स्वातंत्र्यलढयातील भूमिका

प्रा.डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे
इतिहास विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व
महाविद्यालय, वाशिम

राष्ट्रवाद ही संकल्पना आधुनिक काळात जन्माला आल्याचे मानले जाते. जगामध्ये जर्मनी हे आधुनिक अर्थाने राष्ट्र म्हणून प्रथम उदयास आल्याचे मानले. जाते. १८१५ मध्ये नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपमध्ये नेपोलियनच्या अधिपत्याखालून मुक्त झालेल्या प्रदेशाची व्यवस्था लावण्यासाठी व्हिएन्ना कॉग्रेस भरली. आणि या व्हिएन्ना कॉग्रेसने नुकसान भरपाई आणि वारसा हक्क अशा दोन आधारावर युरोपची व्यवस्था लावली. ज्यामध्ये युरोपमधील नेपोलियन पूर्वीच्या व्युवस्थेत असलेल्या राजघराण्यांची सत्ता

पुनर्रस्थापित करण्यात आली. १७८९ मध्ये फ्रान्समध्ये जन्मास आलेल्या क्रांतीने राजेशाही व्यवस्था उलथून टाकली होती. आणि त्याजागेवर समतेवर आधारीत अशी नवी व्यवस्था जन्मास घातली होतीकृलोकांचे राज्य आले होते. मात्र याच लोकशाहीच्या मार्गाने नेपोलियने पुन्हा एकदा फ्रॉन्समध्ये राजेशाही आणली. नेपोलियनने जिंकलेल्या लढायांमुळे तो जनतेच्या गळयातील ताईत बनला आणि जनतेने हसत हसत नकळत आपले स्वातंत्र्य नेपोलियनच्या चरणी अर्पण केले. युरोपचा प्रदेश जिंकल्यानंतर विजीत प्रदेशातही नेपोलियने लोकभाववनेची कदर न करता आपल्याला अनुकूल राज्यव्यवस्था निर्माण केली. अर्थात याच त्याच्या कृत्याचा परिणाम युरोपात नेपोलियनच्या विरोधात राष्ट्रवाद जागृत होण्यात झाला. नेपोलियनच्या पाडावानंतर १८१५ च्या व्हिएन्ना कॉंग्रेसनेही लोकांची निराशा केली. प्रातिनिधीक लोकशाहीला केराची टोपली दाखविण्यात आली. मात्र नेपोलियनने विजीत प्रदेशात त्याने फ्रान्समध्ये ज्याप्रमाणे कायद्याचे राज्य प्रस्थापित केले होते त्याचप्रमाणे त्याने युरोपमध्येही अशीच व्यवस्था राबविली यामुळे युरोपमध्ये राष्ट्रवादी भावनेला बळ मिळाले व त्यानंतर जर्मनी, इटलीसह अनेक राष्ट्रराज्याचा जन्म झाला. खरे तर राष्ट्र जन्मास येण्यासाठी केवळ लोकांमध्ये एकत्वाची भावना आवश्यक असते व ती भावना कोणत्याही कारणाने बनली असली तरी चालते केवळ 'आपण सर्व एक आहोत एवढी एक भावना राष्ट्र म्हणून जन्मास येण्यास कारणाभूत ठरत असते.

भारत हा एक खंडप्राय देश होता आणि खंडप्राय देश आहेही.. वास्तविक ब्रिटिश भारतात येण्यापूर्वीचा भारत हा विविध राज्यामध्ये विभागलेला होता. इथे अनेक राज्ये होती. वेळप्रसंगी त्यांच्या सीमा विस्तारत होत्या वा आकुंचन पावत होत्या. मात्र या सर्वामध्ये एकजिनसी पणा होता तो भारतीय संस्कृतीचा. भारत खंडामध्ये भलेही अनेक राज्ये असतील तरी भारतीयांची अशी एक संस्कृती होती आणि या अर्थाने भारत हा प्राचीन काळापासून 'राष्ट्र' या संकल्पनेत बसत होता. ब्रिटिशांनी भारताचा बहुतांश भाग काबीज केल्यानंतर मात्र भारताचा आधुनिक अर्थाने 'राष्ट्र' म्हणून उदय व्हायला सुरूवात झाली. भारतीय राष्ट्रवादाचा खरा उदय हा १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामापासून झाला. प्रथमच व्यापक पातळीवर भारतीयांनी एकत्र येऊन एखाद्या परकीय सत्तेचे जोखड फेकून देण्याचा सामुहिक प्रयत्न केला होता. अशाप्रकारची दोन उदाहरणे आपल्याला इतिहासात पहावयास मिळतात. एक इब्राहिम लोदीच्या पराभवानंतर राणा सांगाच्या नेतृत्वात एकत्र येऊन परकीय असलेल्या बाबराच्या विरोधात भारतीय राज्यकर्त्यांनी दाखवलेली एकी आणि दुसरे मुहम्मद घोरीचा पाडाव करण्यासाठी तराईनच्या लढाईत पृथ्वीराज चव्हाणाच्या नेतृत्वात एकत्र आलेले भारतीय राज्यकर्ते या दोन प्रसंगामधून भारत हे एक राष्ट्र म्हणून पूर्वीच अस्तित्वात होते हे सिद्ध होते. मात्र १८५७ मध्ये ब्रिटिशांच्या विरोधात भारतीयांनी केलेला उठाव हा आधुनिक अर्थाने वेगळा आहे. या पहिल्या दोन प्रसंगामध्ये भारतीय राज्यकर्त्यांनी एका परकीय आणि परधर्मिय सत्तेविरोधात एकत्र येऊन लढा दिला होता. १८५७ मध्ये लढा हा परकीय सत्ते विरूद्ध होता आणि ब्रिटिशांचा धर्मही भारतीयांच्या धर्माहून वेगळा होता. म्हणजे त्यावेळी भारतामध्ये मुस्लिम हे राज्यकर्ते या अर्थाने होते आणि बहुसंख्य प्रजा ही हिंदू होती. या दोन्ही धर्माहून ब्रिटिशांचा धर्म वेगळा होता; परंतु उठावाचे स्वरूप लक्षात घेतले तर हा उठाव काही धार्मिक स्वरूपाचा नव्हता. त्या पाठीमागची काही कारणे धार्मिक होती हे जरी खरे असले तरी तो उठाव मुख्यत्वे राजकीय स्वरूपाचा होता आणि ब्रिटिशांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी झालेला उठाव होता.

१८५७ च्या उठावाचा विचार केला तर अनेक बाबी आपल्याला राष्ट्रवादाच्या उदयासाठी पोषक असल्याच्या दिसतात. जसे या उठावात हिंदू आणि मुस्लिम खांद्याला खांदा लावून सहभागी झाले होते आणि ब्रिटिशांना या देशातून पिटाळून लावण्याच्या उद्देशाने एकत्र आले होते. या उठावात केवळ राज्यकर्ते सहभागी झाले नव्हते. तर सामान्य जनता, शेतकरी, कारागीर व बेकार झालेले सैनिक असे समाजातले सर्व घटक सहभागी झाले होते. हा उठाव सार्वत्रिक असल्याने संपुर्ण देश एकप्रकारे ब्रिटिशांच्या विरोधात एकत्र आल्याचे चित्र निर्माण झाले होते. अशाप्रकारे देशाला राष्ट्रभावनेने एकत्र आणण्याचे कार्य या राष्ट्रीय उठावाने केले होते. १८५७ च्या संग्रामात सहभागी लोकांकडे हा उठाव यशस्वी झाल्यानंतर पुढे काय याचे नियोजन नव्हते तरीही राष्ट्रवादी भावनेने स्फूलींग म्हणून आपण या उठावाकडे पाहिले पाहिजेत. इंग्लंडचा कॉन्झर्वेटीव्ह पक्षाचा नेता या संसदेत बोलताना म्हणाला, 'केवळ चरबीयुक्त काडतुसामुळे साम्राज्ये मोडीत निघत नाहीत.हा उठाव एकाएकी घडून आला नाही, तर त्यामागे संघटित प्रयत्न होते'१' १८५७ च्या पराभवानंतर ब्रिटिशांकडून भारतीय लोकांना जी सूड भावनेची वागणूक मिळाली आणि ज्या दमनकारी पद्धतीने त्यांनी

उठावातील लोकांशी व्यवहार केला त्यामुळे भारतीयांना राष्ट्रभावनेने एकत्र येण्यास भाग पाडले. १८५७ पूर्वीच भारतात आलेल्या रेल्वेने भारतीय राष्ट्रवादाला पोषक वातावरण तयार केले. इंग्रजी राजवटीपूर्वी भारत हा विभिन्न राजसत्ताच्या अमंलाखाली होता. मौर्य, गुप्त वा मुघलांचा काळ सोडला तर संपुर्ण भारतावर कोणत्याही एखाद्या राजघराण्याचा एकछत्री अमंल कधीच नव्हता. याही सत्तांना संपूर्ण भारतावर कधीच राज्य प्रस्थापित करता आले नाही. या खंडप्राय देशावर खऱ्या अर्थाने एकछत्री अमंल प्रस्थापित करण्यात ब्रिटिशच यशस्वी झाले. त्यांच्या अधिपत्याखाली भारत राजकीय दृष्टया एक बनला ज्याचा फायदा राष्ट्रवादाच्या उदयासाठी झाला. ब्रिटिशांनी या देशात लागू केला समान कायदा, आणलेले आधुनिक शिक्षण आणि सर्वत्र सारखी असणारी प्रशासकीय यंत्रणा या बाबी भारतामध्ये राष्ट्रवादाच्या वृद्धीसाठी कारणीभूत ठरल्या. भारतामध्ये येवून गेलेले लिटन सारखे प्रतिगामी व्हाईसराय आणि रिपनसारख्या उदारवृत्तीच्या व्हाईसरायने आणलेल्या सुधारणा या दोन्हीही बाबी भारतीय राष्ट्रवादाच्या उदयासाठी कारणीभूत ठरल्या. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात देशात सर्व.त्र उदयास आलेल्या विविध सामाजिक व राजकीय संस्था व संघटनानी भारतीय राष्ट्रवादामध्ये महत्वाची भर घातली. भारतात घडून आलेल्या प्रबोधनाच्या चळवळीनेही याबाबती महत्वाची भूमिका बजावली. परदेशात जाऊन आलेल्या तरुणांना पाश्चात्य लोकंशाही व्यवस्थेचा परिचय झाला. तिथल्या व्यक्तीस्वातंत्र्याची जाणीव झाली आणि आपल्या देशात अशाप्रकारची व्यवस्था यावी अशी आशा त्यांच्या मनात स्वाभाविकपणे निर्माण झाली. या सर्व बाबी भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीस कारणीभूत ठरल्या. भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीचा परिपाक म्हणून आपण भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेकडे पाहिले पाहिजे ती कॉंग्रेसच पुढे राष्ट्रवादाच्या वाढीसाठी महत्वाचा घटक बनली.

भारतीय स्वातंत्र्यलढयामध्ये भारतीय राष्ट्रवादाने महत्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय राजकारणात निर्माण झालेला जहाल गट व क्रांतीकारी गट हा राष्ट्रवादाच्या उदयाचा परिणाम होता. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या निर्मितीनंतर सुरूवातीची जवळपास दहा वर्षे कॉंग्रेस मवाळांच्या प्रभावात वावरत होती. मात्र लोकमान्य टिळकांच्या प्रभावाने कॉंग्रेसमध्ये जहाल गट उदयास आला. पुण्यामध्ये प्लेगच्या साथीमध्ये ब्रिटिशांच्या आततायी वागणूकीने प्रभावीत होऊन चाफेकर बंधुनी रॅंड क्लिफचा वध केला आणि एकप्रकारे क्रांतीकारी कार्याचा श्रीगणेशा झाला. भारतीय स्वातंत्र्यलढयातील क्रांतीकारी चळवळीचे ढोबळमानाने दोन भागात विभागजन करता येते. पहिल्या महायुद्धापूर्वीची क्रांतीकारी चळवळ आणि पहिल्या महायुद्धानंतरची क्रांतीकारी चळवळ. पहिल्या महायुद्धापूर्वीची क्रांतीकारी चळवळ ही चाफेकर बंधुपासून सुरू होते. या चळवळीवर सावरकरांचा प्रभाव होता. ब्रिटिशांनी प्लेगच्या साथीच्या रोगाची केलेली हाताळणी, बंगालमधील राष्ट्रीय चळवळ दडपूण टाकाण्यासाठी बंगालची केलेली फाळणी, कर्झनचे प्रतिगामी व दुराग्रही धोरण या भारतातील घटनासोबतच सॅडोवाच्या युद्धात ॲबेसिनीया या छोटया राष्ट्राने युरोपीयन राष्ट्र असलेल्या इटलीचा केलेला पराभव, जपानमधील मेईजी क्रांती, जपान या आशियाई राष्ट्राने रशियासारख्या बलाढय युरोपीयन राष्ट्राचा केलेला पराभव या आतंरराष्ट्रीय घटनांचा भारतीय राष्ट्रवाद चेतविण्यामागे हात होता.

मॅडम भिकाई कामा यांनी २२ ऑगस्ट २००७ मध्ये स्टुटगार्ड येथे झालेल्या 'आतंरराष्ट्रीय सोशॉलिस्ट परिषद 'मध्ये भारताचा ध्वज म्हणून जो ध्वज फडकावला होता त्यामध्ये हिंदू , मुस्लिम आणि बौद्ध धर्माच्या प्रतिकांचा समावेश होता.[२] भारतीय राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्ष होता ही बाब त्यातून अधोरेखित होत होती. पुढे भारताची धार्मिक आधारावर विभागणी झाली. त्यासाठी द्विराष्ट्र सिद्धांत मांडला गेला. परंतु भारतातून विलग झालेला पाकीस्थान जरी धार्मिक राष्ट्र म्हणून उदयास आले तरी भारत मात्र धर्मनिरपेक्ष राष्ट्र राहिले. भारतातील सर्वात मोठा आणि स्वातंत्र्यलढयात अग्रणी असलेली राष्ट्रीय सभा नेहमी धर्मनिरपेक्ष विचारसरणीची राहिली आहे. १८५७ पासून ज्या राष्ट्रवादाने भारतामध्ये जन्म घेतला तो राष्ट्रवाद अशा प्रकारे धर्मनिरपेक्ष विचारसरणीचा होता. भारतात राज्य करावयाचे असेल तर येथील मुख्य असलेले दोन धार्मिक समुह आपापसात भांडले पाहिजे हे ब्रिटिशांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी नियोजनबद्धपणे या दोन समाजात धार्मिक तेढ उत्पन्न केली. त्यांनी त्यासाठी मुस्लिम समुदायात असुरक्षिततेच्या भावनेचे बीजारोपन केले. वास्तविक भारतावर जरी काही शतके मुस्लिमांनी राज्य केले होते. तरी भारतातील कोणत्याही दोन सत्तामध्ये केवळ धार्मिक आधारावर संघर्ष झाल्याचे फारसे दिसत नाही. मात्र इंग्रजांच्या कुटनितीने भारताला विभाजनाचा सामना करावा लागला.

भारतीय राष्ट्रवादाचा भारतीय स्वातंत्र्यसंग्रामावरील प्रभाव तपासतांना आपल्याला लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीचा विचार करावा लागतो. स्वदेशी, बहिस्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य अशी ती चत:सूत्री होती. या चारही कार्यक्रमामध्ये राष्ट्रवादाचे प्रतिबिंब आहे. स्वदेशी आणि बहिस्कार हया एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यातरी त्यातून जहाल राष्ट्रवादाचे दर्शन घडते. परका माल म्हणजे इतर राष्ट्रातून आलेला माल आणि स्वदेशी म्हणजे आपल्या लोकांनी बनवलेला माल अशी त्याची सरळ व्याख्या करता येईल परंतु बाबी देशवासियांना समान धाग्याने बांधत होत्या. भारतातील पहिल्या महिला डॉक्टर श्रीमती आनंदीबाई जोशी यांनी अमेरिकेतून आपल्या दिराला लिहिलेल्या पत्रामध्ये स्वदेशीचा उल्लेखकेला आहे. सरकारी नोकरीवर पाणी सोडण्याचा सल्ला देतांना आपणही पोष्टातील नोकरी केवळ देशप्रेमापोटी नाकारल्याचे त्या म्हणतात.[३] यावरून या काळात राष्ट्रवादाची भावना कशी जनसामान्यापर्यंत पोचली होती हे आपल्या लक्षात येते. आहे. म्हणजे या काळात भारतातील राष्ट्रवादाची भावना केवळ सुशिक्षीत पुरुष वर्गापुरती मर्यादीत न राहता ती सामान्य नागरिकापासून तर स्त्रियांपर्यंत पोचली होती. जगाचा विचार केला तर तसाही हा काळ संपूर्ण जगामध्ये राष्ट्रवाद उफाळून येण्याचा काळ होता आणि भारत आणि भारतातील स्वातंत्र्यलढा त्याला अपवाद ठरू शकणार नव्हता. चतु:सूत्रीतीलराष्ट्रीय शिक्षण हाही राष्ट्रवादाच्या निर्मितीतील महत्वाचा भाग होता. राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये राष्ट्रीय शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण असते. जगातील बहुतेक हुकूमशहांनी आपली हुकूमशाही टिकावी म्हणून नेहमी शिक्षणातून नीतिशास्त्र, राज्यशास्त्र हे विषय शिक्षणातून वगळले होते. इंग्रजांची सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर त्यांनी या ठिकाणच्या लोकांना भारताचा जाज्वल्य इतिहास शिकवण्याऐवजी पाश्चात्यांचे गोडवे गाणारा इतिहास शिकविला. देशी भाषांऐवजी लोकांना इंग्रजी भाषेचे शिक्षण दिले याचा परिणाम असा झाला की, भारतीयांना आपल्या देशाच्या संस्कृतीबद्दल हीन भावना निर्माण झाली. खरे तर ब्रिटिशांचा मुलत: हेतूही तोच होता. याचा विचार करता भारतीयांना राष्ट्रीय शिक्षण देणे अत्यंत गरजेचे होते. जेणेकरून आपला देश व आपली संस्कृती याबाबतची अस्मिता भारतीयात जागृत होईल.

महात्मा गांधीच्या नेतृत्वात पुढे जी स्वातंत्र्य चळवळ लढली गेली त्या चळवळीतही बहिस्काराची जागा असहकाराने घेतली होती. राष्ट्रीय शिक्षण आणि स्वदेशी ही तत्वेही या चळवळीत अंगीकारण्यात आलेली होती. या पहिल्या महायुद्धानंतर ज्या क्रांतीकारकांनी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला त्यांच्याही विचाराला एक तात्विक अधिष्टान होते. जसे भगतसिंगासारखे देशभक्त शोषणरहीत समाजनिर्मितीचे स्वप्न पाहत होते. भगतसिंह तर त्याच्या अखेरच्या वर्षामध्ये एक नास्तिक व्यक्ती बनले होते.[४] तथापि त्यांच्यामध्ये राष्ट्रनिष्ठ अजोड होती. याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहीजे की, राष्ट्रवादासाठी धर्माचा आधार घेण्याची गरज नाही हेच त्याच्या विचारावरून लक्षात येते. भगतसिंगानी जवळपास सर्वच धर्मांची चिकित्सा करून नास्तिकता स्वीकारली होती. मार्क्सवाद व साम्यवाद जिथे धर्मासोबतच राष्ट्रवादही नाकारतात तिथे भगतसिंह मात्र नास्तिकवाद स्वीकारुनही राष्ट्रवादी राहतात इथेच आपल्या देशातील धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे गमक दडलेले आहे. भलेही धार्मिक आधारावर आपल्या देशाचे तीन तुकडे झालेत तरीही यापुढे आपल्या देशावर असा दुर्दैवी प्रसंग येवू नये म्हणून आपल्या देशातील धार्मिक विद्वेष व जातीयता राष्ट्रीयतेवर भारी पडू नये म्हणून आपल्या देशातील राष्ट्रवादाचा अभ्यास प्रांसगिक ठरतो.

संदर्भ :

1- किर डॉ. धनंजय, भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.२९२.

2- ीजजचेरूध्ध्मदण्ूापचमकपंण्वतहध्ूापध्ठीपांपरपक्रब्ध्ं

3- कानिटकर काशीबाई , डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ति. श्रेयस आ.२००२, पृ.७९

4- भगतसिंह , मै नास्तिक क्यो हुँ ! पृ. ७७

# स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळीचे योगदान

**प्रा. विजय देविदास वाकोडे**
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभागप्रमुख
श्री, ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव
ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर

**सारांश**

प्राचीन काळापासून भारतावर सतत परकीय आक्रमणे झाली, परंतु ईस्ट इंडिया कंपनी व इंग्रजांच्या आक्रमणाने भारतावर अनेक क्षेत्रात परिणाम झाले. ब्रिटिशांची जुलमी राजवट, प्रचंड प्रमाणात आर्थिक लूट व साम्राज्यवादी धोरण यामुळे अनेक राजकीय व सामाजिक विचारवंत पुढे आले व त्यांनी प्रबोधन केले.ह्यामुळे राष्ट्रवाद निर्माण होऊन राजकीय चळवळीला चालना मिळाली.इ.स. 1857 ते 1947 या काळात भारतीय राष्ट्रीय चळवळ ही व्यापक चळवळ असून भिन्नभिन्न विचारप्रणाली व विविध विचारधारेने प्रभावित होऊन अनेक आंदोलने झाली. स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळ ही आर्थिक विकासाबरोबर,आर्थिक विचार प्रणालीवर आधारित औद्योगिकरण्याच्या मार्गाने भारताचा विकास व प्रखर राष्ट्रवाद निर्माण होण्यास मदत झाली.राष्ट्रीय चळवळ सुरू करण्यासाठी देशव्यापी राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करण्याची गरज होती ही जाणीव निर्माण झाली.राष्ट्रीयत्वाची भावना आणि राष्ट्र म्हणून स्वतंत्र जाणीव निर्माण होऊन जनता जेव्हा संघटित होते तेव्हा राष्ट्रीय चळवळीचे पहिले पाऊल पडते व ते म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय. सुरुवातीला राष्ट्रीय काँग्रेस एक पक्ष म्हणून नव्हे तर चळवळ म्हणून अस्तित्वात आली.या चळवळीचे मुख्य हेतू वसाहतवादाच्या विरोधातील राष्ट्रीय विचारसरणी विकसित करून तिचा प्रसार करणे होय यातूनच स्वदेशी चळवळची निर्मिती झाली.भारतीयांना वसाहतवादी आर्थिक वर्चस्व व शोषण याची पूर्ण जाण झाली होती. वसाहतवादाच्या विरोधात भारतात अनेक उठाव , आंदोलन झाले त्यात राष्ट्रीय चळवळीच्या प्रगतीमध्ये स्वदेशी चळवळीचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

**की वड्र्स**स्वदेशी,राष्ट्रवाद,चळवळ,औद्योगीकरण, बहिष्कार.

**संशोधनाचा उद्देश**

1) भारतातील उद्योगधंदे व औद्योगीकरण या विषयी माहिती मिळविणे.

2) वसाहतवादाच्या आर्थिक शोषणा विषयी माहिती मिळविणे.

3)स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळ विषयी माहिती मिळविणे.

4) भारतातील प्रखर राष्ट्रवाद व स्वदेशी चळवळीचा प्रसार या विषयी माहिती मिळविणे.

**गृहीतकृत्ये**

1) स्वदेशी चळवळीने भारतातील उद्योगधंदे व औद्योगिकीकरणाला चालना मिळाली.

2) स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळीचे योगदान महत्त्वाचे आहे.

3)स्वदेशी चळवळीने राष्ट्रवादाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

4)विविध प्रांतात स्वदेशी चळवळीचा प्रसार झालेला होता.

**संशोधन पद्धती**

या शोधनिबंधा करिता विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला असून याविषयी निगडित साधनांचा वापर केला आहे. या साधनात प्राथमिक व द्वितीय साधनांच्या तसेच वृत्तपत्रे, मासिके,नियतकालिके,संशोधन पत्रिका,विविध संदर्भ ग्रंथ,संकेतस्थळाचा आधार घेऊन तथ्य संकलन केले आहे.

**विषयवस्तु**

ब्रिटिशपूर्व काळात भारतात अनेक उद्योगधंदे आणि हस्तव्यवसाय प्रस्थापित झालेले होते. राजधान्यांची ठिकाणे आणि व्यापारी केंद्रे निरनिराळ्या उद्योगाकरिता प्रसिद्ध पावलेली होती. ज्यावेळी युरोपात उद्योगधंद्यांची प्रगती झालेली नव्हती त्या काळात भारतात औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रात प्रगत झालेला असा देश असल्याचे मान्य केले जात होते.1770 ते 1870 या काळात उद्योगधंदे व हस्त उद्योग यांच्या उत्तरोत्तर ऱ्हास होत गेला.सुरुवातीला ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानातील उपयुक्त असणाऱ्या उद्योगधंद्यांची प्रगती घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले होते परंतु हिंदुस्थानाची औद्योगिक प्रगती झाली तर ती ब्रिटनच्या आद्योगिक प्रगतीस मारक ठरेल आणि ब्रिटनच्या व्यापारावर ही अनिष्ट परिणाम होईल.इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित होऊ लागली आणि इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याने इंग्लंड मधील उद्योगधंद्यांची उत्पादनक्षमता वाढली आणि उत्पादन कमी खर्चात करता येऊ लागले या उत्पादनाशी हिंदुस्थानातील पारंपारिक पद्धतीने चालविलेल्या उद्योगधंद्यांना आणि व्यवसायिकांना टक्कर देणे शक्य झाले नाही यामुळे भारतातील उद्योगधंद्यांच्या ऱ्हास झाला.1800 ते 1850 ह्या काळात अनुउद्यौगीकरणाचा काळ असे म्हणतात.

ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानातून ब्रिटनमध्ये आयात केल्या जाणाऱ्या कापडासारख्या पक्क्या वस्तूंवर जबर आयात कर लादून आणि ब्रिटनमधून हिंदुस्थानात आयात होणाऱ्या वस्तू वर नाममात्र आयात कर बसविण्यास कंपनी सरकारला भाग पाडून भारतीय उद्योग आणि व्यवसाय नष्ट करण्याचे धोरण स्वीकारले. हिंदुस्थानातून येणाऱ्या मालाच्या आयातीवर ब्रिटनच्या सरकारने जे कर बसविले होते त्यात प्रत्येक वेळी पाच टक्के वाढ केली. 1883 च्या कायद्यानुसार आयातीवर किमतीनुसार 18% एवढा सरसकट आयात कर लागू केला. त्यानंतरच्या काळातही या करारात सतत वाढ होत1885 या काळात कपड्यांवरील आयात कर 40 टक्क्यांनी वाढून 85 टक्क्यावर नेला. श्री.रमेशचंद्र दत्त यांनी म्हटले की,"भारतातील उद्योगधंदे नष्ट करण्याच्या दृष्टीने, ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेल्या राजकीय सत्तेचा हेतुपूर्वक वापर करण्यात आला".[1]तसेच अनेक भारतीय राष्ट्रीय नेत्यांनी व अर्थतज्ञ यांनी संपत्तीचे अपहरण,द्रव्य अपहरण याविषयी वेगवेगळे अंदाज दिले आहेत. पावलोव्ह अंदाज सांगतात की 1930 च्या सुमारास इंग्रज साम्राज्यवाद्यांनी भारतातून फक्त शुल्कापोटी 13 कोटी ते 14 कोटी पौंड्स पळविले.ह्या रकमेतून भारत दरवर्षी भिलाईसारखे तीन पोलाद कारखाने सुरू करू शकत होता.[2]

स्वदेशी ही संकल्पना भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत राष्ट्रवादाच्या विकास होण्यासाठी महत्त्वाची ठरली होती.स्वदेशी आंदोलन म्हणजे परदेशी मालावर बहिष्कार घालण्यासाठी छेडलेले आंदोलन होय. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या विशिष्ट राजकीय व आर्थिक परिस्थितीत त्याला चालना मिळाली कारण अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात यूरोपमध्ये, विशेषतः इंग्लंडमध्ये, औद्योगिक क्रांती सुरू होऊन नव्या कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर तयार होणाऱ्या मालाला बाहेर बाजारपेठा मिळविणे आवश्यक होते. त्यातून कारखानदार कच्च्या मालासाठी परदेशांतील बाजारपेठा काबीज करू लागले.

साहजिकच यूरोपीय राष्ट्रांत, विशेषतः ग्रेट ब्रिटनमध्ये कच्च्या मालाची उगमस्थाने व बाजारपेठा हस्तगत करण्यासाठी संघर्ष उद्भवला. त्यातून ग्रेट ब्रिटनमधून पक्का माल ( उदा., कापड ) भारतात येई व येथून कवडीमोल किंमतीला कच्चा माल (कापूस) ग्रेट ब्रिटनला जाई. तेव्हा या कापडावर बहिष्कार टाकण्याची मोहीम लोकहितवादी, सार्वजनिक काका, दादाभाई नवरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनी सुरू केली आणि स्वदेशी माल—विशेषतः खादीचे कापड — वापरण्यासाठी आग्रही भूमिका स्वदेशी आंदोलनाद्वारे व्यक्त केली.

1906 मध्ये तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी केली त्याविरुद्ध बंगालमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. टिळकांनी या प्रश्नाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून दिले. ब्रिटिश शासनाविरुद्धची चळवळ तीव्र झाली पाहिजे,अशी जाणीव काँग्रेसच्या बहुतेक पुढाऱ्यांना झाली. कलकत्ता येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात (1906) दादाभाई नवरोजी यांनी अध्यक्षपदावरून स्वदेशीचा पुरस्कार केला आणि अधिवेशनात संमत झालेल्या ठरावातही 'स्वदेशी' व 'बहिष्कार' यांचा अंतर्भाव करण्यात आला. या आंदोलनात जमीनदार व वकिलांसोबत विद्यार्थी, शेतकरी, दुकानदार, एतद्देशीय सैनिक, पुजारी, नाभिक, परीट इत्यादींनी सहभागी होऊन परदेशी मालावर बहिष्कार केला आणि त्यांनी परदेशी कापड, मीठ, साखर इत्यादींवरील बहिष्कार करायला प्रारंभ केला.

इंग्रजांनी भारतातील कच्चामाल स्वस्तात नेवून पक्का माल पुन्हा भारतातच महाग किंमतीत विकून एकीकडे नफाखोरी आणि दुसरीकडे भारतीय उद्योगांना संपविण्याचे जे दुहेरी शोषण चालविले होते त्याकडे ज्या नेमक्या द्रष्ट्या महापुरूषांनी जनतेचे लक्ष वेधले त्यामध्ये लोकमान्य टिळक होते. त्यामुळे स्वदेशीचा पुरस्कार आणि विदेशी मालाचा बहिष्कार असा दुहेरी कार्यक्रम त्यांनी दिला होता. मँचेस्टरची धोतरे बंद करण्यापुरती आजची चळवळ नाही, तर आम्हास गोऱ्यांचे सर्व हक्क मिळावेत व त्यांनी ते न दिल्यास त्यांच्याकडून आम्ही अडवून घ्यावे, म्हणून आजची स्वदेशी चळवळ निघाली आहे. असे बेळगावच्या गणेशोत्सवातील सभेत स्वदेशीतून स्वराज्य या विषयावर बोलताना सांगितले होते.[3]

**लोकमान्य टिळक यांचा केसरी अग्रलेखात स्वदेशी चळवळ विषयी मत**

स्वदेशी चळवळ म्हणजे केवळ सुखाचा मार्ग नव्हे; त्यात थोडी गैरसोय आहे व ती लोकांनी सोसली पाहिजे. आता कोणी असे म्हणतील,की किमती जास्त चढल्याने पूर्वी इतका माल घेण्यास जास्त खर्च करावा लागेल; व तसा खर्च करण्यास प्रत्येकास सामर्थ्य नाही, ही गोष्ट खरी आहे; पण ज्यास अशा रीतीने सामर्थ्य नाही त्याने विलायती मालापेक्षा थोडा कमी स्वदेशी माल तितक्याच किमतीत खरेदी करून त्यास त्यांत आपला निर्वाह करता येण्यासारखा आहे. उदाहरणार्थ, कापडच घेऊ, दरसाल एका कुटुंबास वीस रुपयांचा विलायती कपडा लागतो, तर याच वीस रुपयांत जितका देशी कपडा येईल तितका घेऊन काही वर्षे त्यास जास्त खर्च न करिता निर्वाह करता येणार नाही असे नाही. कारण देशी कपडा विलायतीपेक्षा थोडा अधिक टिकाऊ असतो, हे प्रसिद्ध आहे. अशा दृष्टीने विचार केला म्हणजे विशेष खर्च न होता पण थोडीशी झीज सोसून स्वदेशी चळवळीस सर्वांना मदत करता येणार आहे. यात कोणाचेही नुकसान नाही व काही अशक्यही नाही. जी गोष्ट सरकार परकीय नसते तर त्याने केली असती, तीच आपल्यास करावयाची आहे. यात अडचणी पुष्कळ आहेत; पण त्या सर्व निश्चयाने उद्योग केल्यास हळूहळू नाहीशा होण्यासारख्या आहेत. नुकसानीची भीती व्यर्थ आहे, इतकेच नव्हे तर केव्हाही झाले तरी यापासून हितच होणार आहे. सारांश 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' असे जे याबद्दल मागे आम्ही लिहिले आहे ते अक्षरशः खरे आहे व आम्हास अशी उमेद आहे, की लोक या योगाचा अवलंब करण्यात कदापीही मागे येणार नाहीत. स्वार्थाने किंवा अन्य कारणाने मधून मधून काही आक्षेपक,

लोकांस या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतील. पण हे प्रयत्न मायावी आहेत असे समजून, त्यास भीक न घालता आमच्या लोकांनी अंगीकृत कार्य तडीस न्यावे, अशी त्यांस आमची आग्रहपूर्वक विनंती आहे.बाळगंगाधरटिळक('केसरी'चा अग्रलेख (१२डिसेंबर १९०५)[4]

बंगालमधील विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने स्वदेशी चळवळीत भाग घेतला.त्यांनी स्वदेशी आचरणात आणली;तिचा प्रचार केला.परदेशी कापड विकणाऱ्या दुकानदारांना समोर निदर्शने केली. सरकार विरोधी चळवळीच्या एक आवश्यक भाग म्हणून आत्मशक्ती आणि स्वयंपूर्णते वर भर देण्यात आलेला खास भर हा स्वदेशी चळवळीचा एक महत्त्वाचा पैलू होता. स्वदेशी चळवळीत जमीनदार, कनिष्ठ,मध्यम वर्गीय व महाविद्यालतीन विद्यार्थी फार मोठ्या प्रमाणात सहभागी झाले.स्त्रिया प्रथमच घरातून बाहेर पडून मिरवणुका व निदर्शनांत भाग घेऊ लागल्या.लोकमान्य टिळकांनी देशातील विदेशी वस्तूंचा वापर टाळण्याबरोबरच स्वदेशी उत्पादकांना ठामपणे उभे करण्याचाही विचार केला. त्यासाठी पैसाफंडाची कल्पना आणून त्यामधून काच कारखाना, डालडा फॅक्टरी, कापड गिरण्या उभारण्याची कल्पना आणली. टिळकांनी शेतकरी आणि कष्टकरी यांचा विचार अतिशय बारकाईने केला होता. टिळक म्हणत देश म्हणजे शेतकरी, देश म्हणजे काबाडकष्ट करणारी जनता. शेतकरी हा देशाचा कणा आहे, राष्ट्राचा आत्मा आहे असे सांगणारे लोकमान्य पहिले पुढारी. या काबाडकष्ट करणाऱ्यांची आर्थिक स्थिती जोपर्यंत सुधारत नाही तोपर्यंत देशाची परिस्थिती सुधारली असे म्हणता येणार नाही.

स्वदेशी**आणि बहिष्कार आंदोलन**परकीय वस्तूंची विक्री करण्यावर बहिष्कार व परदेशी कापडचे सार्वजनिक ठिकाणी होळी करणे, बंगालच्या सर्व भागांत तसेच देशभरातील अनेक महत्त्वाच्या शहरात हि चळवळ दिसून आली.स्वदेशी चळवळीचा एक प्रमुख भाग म्हणजे बंगालमधील विद्यार्थ्यांनी फक्त स्वदेशीचाच स्वीकार केला नाही, तर परदेशी कापड विक्रीच्या दुकानांचाही विरोध केला.महिलांनी परदेशी बांगड्या आणि परदेशी भांडी वापरण्यास नकार दिला, धोबीनी परदेशी कपडे धुण्यास नकार दिला,परदेशी साखर असलेले पदार्थ नाकारले.परदेशी वस्तूंचा वापर, खरेदी आणि विक्री करणारे लोक सामाजिक बहिष्कारांच्या अधीन होते.स्वदेशी मालाचावापर वाढविण्यासाठी आणि परदेशी वस्तूंचा बहिष्कार करण्यासाठी शहरे आणि गावांमध्ये कित्येक सभा आयोजित केल्या गेल्या.स्वदेशी चळवळीत मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर लोकांचे लोकसंवर्धन करत होते.पारंपारिक लोकप्रिय उत्सव, लोक रंगमंच स्वरूप आणि 'यात्रा' (उत्सव) जनतेपर्यंत पोहचण्याच्या साधन म्हणून वापरल्या जात होते. 'आत्मनिर्भरता' हे स्वदेशी चळवळीचे एक महत्त्वाचे पैलू होते म्हणून विविध क्षेत्रांमध्ये,विशेषतः शिक्षण आणि रोजगाराच्या गरजा पुरवण्याकरिता व्यावसायिक उद्योगांमध्ये'आत्मनिर्भर' होण्याचे प्रयत्न केले गेले होते.

**महात्मा गांधी आणि स्वदेशी चळवळ**

महात्मा गांधीजींच्या काळात स्वदेशी चळवळ ही असहकार चळवळ म्हणून ओळखली गेली. नागपूर अधिवेशनात काँग्रेसने असहकार कार्यक्रमावर प्रचंड बहुमताने शिक्कामोर्तब केल्यानंतर काँग्रेस नेते प्रचार कार्याला लागले. देशाच्या सर्व भागांचा दौरा करून ठिकठिकाणी सभा घेऊन असहकाराच्या कार्यक्रमाचे स्वरूप व महत्त्व ते सामान्य जनतेला पटवून सांगू लागले यामुळे अशिक्षित त्यांचे शिक्षण मोठ्या प्रमाणावर होऊ लागले.पीजी व इतर सहकाऱ्यांच्या मदतीने असहकार कार्यक्रमाची लोकप्रियता इतकी वाढली की पन्नास लक्ष्यावर स्वयंसेवकांची नोंदणी झाली आणि एक कोटी

रुपयांच्या लोकमान्य स्वराज्य फंड गोळा करण्याचा संकल्प एका वर्षाच्या आतच सिद्धीस गेला. यातून सुमारे वीस लाखावर चरखे वाटले गेले.ज्येष्ठ नेत्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकला,विद्यार्थ्यांनी शैक्षणिक संस्थांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला ब्रिटिश सरकारने दिलेल्या सन्मानाच्या उपाधी व पदव्या यांचा त्याग केला.[5]असहकार चळवळीत स्वदेशी वस्तूंना उत्तेजन देण्यात आले.परदेशी कापडाची होळी करण्यात आली.सूतकताई व वीणकामाला महत्त्व देण्यात आले.त्यामुळे मोठ्या प्रमाणात हिंदुस्थानात खादीची निर्मिती झाली.खादी विकण्यासाठी खादी केंद्र उघडण्यात आली.त्यामुळे इंग्लंडवरून येणाऱ्या कापडावर फार मोठा परिणाम झाला.मॅचेस्टरच्या गिरण्या बंद पडतात की काय अशी भीती इंग्रजांना वाटू लागली.कायदेभंग चळवळी मध्येही विदेशी वस्त्रावर बहिष्कार, विदेशी कपड्यांची होळी हे महत्वाचे सूत्र या चळवळीचे होते.[6] जसजसा हा परदेशी कपडा बाजारात येऊ लागला तसतशी सुती कपड्याची मागणी कमी होऊ लागली. शेकडो विणकरी आपला रोजगार गमावून बसले. पण या बिकट प्रश्नातून वाट काढली ती महात्मा गांधींनी. स्वतः चातीवर सूत कातून आणि सुती कपड्याचा स्वीकार करून महात्मा गांधींनी या एतद्देशीय कपड्याला पुनर्जीवन दिले. परकीय प्रांतांमधून आलेल्या कपड्यावर किंवा इतर वस्तूंवर बहिष्कार घालून स्वदेशी वस्तूंकडे वळावे या गांधीजींच्या आग्रहामुळे प्रेरित होऊन लाखो लोकांनी पुनश्च खादीचा स्वीकार केला.गांधीजींनी परदेशी वस्तू, विशेषतः इंग्रजी वस्तूंवर बहिष्कार घालण्यासाठी स्वदेशी धोरणाची मागणी केली. ते म्हणाले की, सर्व भारतीयांनी इंग्रजांनी बनवलेल्या कपड्यांऐवजी आपल्या स्वतः च्या लोकांनी हाताने तयार केलेली खादी घालावी.त्याने पुरुष व स्त्रियांना दररोज सूत फिरण्यास सांगितले. त्याशिवाय ब्रिटनच्या शैक्षणिक संस्था व न्यायालयांवर बहिष्कार घालण्याची, सरकारी नोकरी सोडावी व ब्रिटीश सरकारकडून मिळालेला सन्मान व सन्मान परत करण्याची विनंतीही महात्मा गांधींनी केली

**स्वदेशी आंदोलन आणि महिला**

महात्मा गांधीजींनी परदेशी कापड व दारूची दुकाने यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते.स्त्रियांनीही या चळवळीत त्यांनी प्रमुख भूमिका पार पाडावी, असे आवाहन गांधीजींनी केले होते.यानुसार घराबाहेर न जाणाऱ्या स्त्रिया, नेहमी बुरखा वापरणाऱ्या स्त्रिया,तरुण माता व विधवा,अविवाहित मुली अशा सर्व जणी दारूच्या व परदेशी कापडाच्या दुकानांसमोर आणि अफूच्या अड्डाबाहेर उभे राहून रात्रंदिवस शांतपणे निदर्शने करीत होते. या आंदोलनात स्त्रियांनी ही प्रमुख भूमिका बजावली.महात्मा गांधीजींनी 1921 मध्ये पुण्यात सभा घेतली त्यात सत्यभामाबाई कुवळेकर व इंदिराबाई देवघर यांच्या नेतृत्वाखाली चारशे ते पाचशे स्त्रिया या सभेसाठी उपस्थित होत्या. जमलेल्या स्त्रियांना गांधीजींनी सूतकताईच्या संदेश दिला.गांधीजींनी दिलेल्या संदेशानुसार पुन्हा स्त्रियांनी सूतकताई कमिटी स्थापन केली.सत्यभामाबाई महात्मा गांधीजींच्या विचाराने इतक्या भारावून गेल्या की त्यांनी सोन्याच्या चार बांगड्या आंदोलनाच्या मदतीसाठी तर दिल्याच पण अखंड खादी वापरण्याची शपथही घेतली.अनेक स्त्रिया या सूतकताईच्या संदर्भात निर्भय बनविले होते.सूतकताई म्हणजे परदेशी मालावर बहिष्कार होय या दृष्टिकोनातून अनेक स्त्रियांनी सूतकताई करण्यास सहभाग घेतलेला होता.[7]

**सारांश**

औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक यांपैकी एक व अनेक किंवा सर्व दिशेने विचार केला, तरीही स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोग ही पूर्णपणे सिद्ध होतात, ही गोष्ट आता सर्वांच्या प्रत्ययास आली

आहे.स्वदेशीचा विचार हा स्वातंत्र्याचा कृतीशील हुंकार होता. मात्र स्वराज्य मिळाल्यानंतर ७२ वर्षानंतरही स्वदेशी चळवळ अजून गतीमान करण्याची गरज निर्माण झाली आहे. अगदी जागतिकीकरण आणि खुल्या अर्थव्यवस्थेचे गोडवे गातानाही स्वदेशी ही संकल्पना अजून आवश्यक ठरते आहे. स्वराज्याच्या काळात देशाची उभारणी करताना आत्मनिर्भर भारत हा विचार लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी कल्पनेचाच कालसुसंगत अविष्कार आहे हे लक्षात घेतले पाहिजे. या चळवळीत मुसलमान शेतकऱ्यांच्या पाठिंबा मिळाला नाही.स्वदेशी चळवळीमध्ये परिणामकारक संघटना व पक्ष यंत्रणा यांचा अभाव होता.स्वदेशी उद्योग अधिक सक्षम व्हावेत म्हणून स्वदेशीचा आपण जाणीवपुर्वक स्वीकार केला पाहिजे. समाज धुरीणांचा स्वदेशीचा आग्रह आणि आधुनिक तंत्रज्ञानाने प्रभावित झालेले तज्ञ यांची मते परस्पर विरोधी असल्याने व सरकारने उदारीकरणास उदार आश्रय दिल्याने सर्व सामान्य माणूस पुरता गोंधळून गेला आहे व प्रवाहपतिताप्रमाणे नव्या तंत्रज्ञानाच्या भुलभलैयात आपले स्वत्व व हित विसरला आहे. समाज सुधारकांनी स्वदेशीचा पुन्हा नारा द्यावा आणि तशी सामाजिक चळवळ पुन्हा सुरू करावी असे वाटते.

**संदर्भसूची**

1) गोखले आर. एम. भारताचा आर्थिक इतिहास,भाग 1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान नं.82

2) ग्रोवर बी एल, बेल्हेकर एन के, आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद आणि कंपनी, रामनगर नवी दिल्ली,2003 पान नं 522

3) धारूरकर दिलीप,टिळकांची स्वदेशी संकल्पना आणि आत्मनिर्भर भारत, विश्व संवाद केंद्र,पुणे द्वारा प्रकाशित

4)बाळ गंगाधर टिळक'केसरी'चा अग्रलेख

5) वैद्य सुमन, शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, द्वितीय आवृत्ती1997 पान नं.4

6)शाह जी बी, वाघ डी एन,भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती 2018 पान नं123 ते130

7) https://marathibhau.com/mahatma-gandhi-information-in-marathi/

# मेलघाट वनपरिक्षेत्र में कुपोषणग्रस्त आदीम जनजीवन तथा विशेष रूप से प्रभावित महिला एवं बालक : कारण एवं उपाय

**डॉ. निता गिरी**
सहायक प्राध्यापक, गृहअर्थशास्त्र विभाग, या. द. व. ना. कला, वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती

**प्रस्तावना :-**

हर क्षेत्र के आदीम जनमानस का जीवन अनादीकाल से संघर्षमय रहा है। इसके कई कारण आज के प्रगत युग में तुलनात्मक आधार पर अभ्यासने का प्रयास शोधकर्ता करते है। पहाडी परिवेश, संपन्न वनसंपदा, मनोहारी निसर्ग इ. से. परिपूर्ण इन परिवेशों में सदीयों से जीवन व्यापन करनेवाले मानवी समूह का सामाजिक स्तर अत्यंत निर्मल एवं निकोप रहा है। कथाकथीत आधुनिक समाज के परिमानों से परे इन आदीम मानवी समूह का जीवन मुलरूप से आनंददायी एवं परस्पर पुरक रहा है।

**भारत में आदिवासी एवं उनका निवास :-**

भारत विविध धर्म, जनजातियाँ, भाषा, एवं पंथो का देश है। भारतीय संस्कृति एंव समाजजीवन विविधताओं से विभूषित है। स्वतंत्रता के बाद भारत ने आर्थिक नियोजनद्वारा देश को विकसित करने का संकल्प किया। इस वजह से अनेक संदर्भो में देश ने वैश्विक स्तरपर उच्चांक प्राप्त भले ही किया हो परंतु देश के दुर्गम इलाकों में रहनेवाली आदिम जनजाती आज भी समाज जीवन, सांस्कृतिक जीवन, आर्थिक एवं शैक्षणिक जीवन इ. में विशेष रूप से सुधारित नहीं हुयी है।

**महाराष्ट्र के आदिवासियों का परिचय :-**

महाराष्ट्र राज्य की भौगोलिक परिसीमा ३,०७,७१३ लाख चौ.कि.मी. है। जिसमें ५०,७५७ लाख चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजना अंतर्गत आता है। राज्य के कुल क्षेत्र से यह प्रमाण १६.१९% है। २००१ की जनगणनानुसार महाराष्ट्र

1

राज्य की कुल जनसंख्या ९,६८,७९,००० इतनी है। तो आदिवासियों की जनसंख्या ८५,७,०० इतनी है। महाराष्ट्र की कुल जनसंख्या से जिसका प्रमाण ८.८५% है। देश में आदिवासी जनसंख्या के संदर्भ में महाराष्ट्र का चौथा क्रमांक है।

**अनुसंधान क्षेत्र का परिचय :-**

अमरावती जिला विदर्भ में सांस्कृतिक एवं शैक्षणिक दृष्टि से महत्त्वपूर्ण जिला है। पुरातन काल में इसे 'इंद्रपुरी' भी कहा जाता था। अंबादेवी का प्राचीन मंदिर शहर में स्थित होने से अमरावती शहर को 'अंबानगरी' भी कहा जाता है। अमरावती जिले का कुल क्षेत्रफल १२,२१२ चौ.कि.मी. इतना होकर आदिवासी क्षेत्रफल ४,०१२ चौ.कि.मी. इतना है।

अमरावती जिले में कुल १९९६ गांव है। उनमें आदिवासी क्षेत्रांतर्गत कुल ३५० गाव / कस्बे है। अमरपावती जिले की कुल लोकसंख्या में से आदिवसी जनसंख्या का प्रमाण १८.४५% है। तो अमरावती जिले की लोकसंख्या का महाराष्ट्र की कुल जनसंख्या से प्रमाण ०.२६% है। धारणी और चिखलदरा इन दो प्रांतों में आदिवासी लाकसंख्या अधिक होने से प्रस्तुत अनुसंधान अध्ययन हेतू कार्यक्षेत्र के रूप में इन दो तालुकास्तरीय गावों का चयन किया गया है।

**शोधकर्ता के उद्देश :-**

१. मेलघाट वनपरिक्षेत्र में निवासी आदीम मानवी समूह का जातीनिहाय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तथा आरोग्यविषयक सर्वेक्षण.
२. मेलघात वनपरिक्षेत्र के आदीम निवासीयों में संक्रमित कुपोषण का सर्वेक्षण.
३. कुपोषण के मुल कारणों का अभ्यास.
४. कुपोषण के निवारण हेतू उपाययोजना :- १) आरोग्यविषयक जनजागृती अभियान २) पोषक आहार की शास्त्रीय रचना ३) जीवनशैली में अनुकूल परिवर्तन ४) अंधश्रद्धा निर्मूलन

2

५. सामाजिक सांस्कृतिक तथा आरोग्य विषयक ठोस उपाययोजनाओं का अवलंब.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन कार्य में निम्नलिखित संशोधन पत्रती का अवलंब कर शोधकार्य को अधिक प्रभावशाली रूप से समाजपयोगी बनाने का प्रयास किया गया है।

१. भारत वर्ष के आदीम जनजातीय समूह से संबंधित संदर्भ ग्रंथोंका वाचन तथा विवेचन.
२. मेलघाट निवासी आदीम जनजातीयोंका सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व्यावसायकि तथा आरोग्य विषयक सर्वेक्षण।
३. मेलघाट निवासीयों में भगत, भूमका, वैदू इत्यादी वैद्यकीय सेवा कर्मीयोंकी भूमिका तथा जनमानसपर उनका प्रभाव।
४. मेलघाट निवासीयों में प्रचलीत अंधश्रद्धा कारण तथा जनजागृती।
५. मेलघाट निवासीयों के उत्थान हेतू प्रस्तावित सरकारी योजनायें तथा इन्हे कार्यान्वीत करनेवाली राजकीय प्रशासकीय तथा स्थानिक यंत्रणाओं की प्रतिबद्धता।
६. मेलघाट निवासीयों के उत्थान हेतू कार्यरत सामाजिक संघटनओंकी भूमिका।

**सिमाऐ :-**

शोध में केवल महिलाओं और बच्चों में कुपोषण की समस्यापर ध्यान केंद्रीत करने की सीमा है, इसमें अन्य सामाजिक समस्याओं को शामील नही किया गया है जो वर्तमान अध्ययन के दायरे में नहीं है।

**स्वास्थ्य देखभाल करने में सामाजिक, सांस्कृतिक अवरोध :-**

दुर्गम आदिवासी क्षेत्रों में सामाजिक व सांस्कृतिक रूढि-मान्यताओं के आधार पर कम/छोटी उम्र में बालिका विवाह / बालविवाह, गर्भवती महिलाओं को संपूर्ण व पोषक आहार की अनुपलब्धता, उसी प्रकार इस क्षेत्र के बालकों में शोचा समस्याएँ, निमोनिया, कुपोषण जैसी समस्याएँ आए दिन शुरू रहती है। ऐसी तीव्र एवं गंभी समस्याओं की ओर ध्यान देना या उसकी अवहेलना करना... परिणामत: बच्चों में शारीरिक कमजोरी, कुपोषण एवं दुर्बलता व रोगतिकारक शक्ति की कमी होना जैसे गंभीर परिणाम दिखायी देते है।

**आदिवासी क्षेत्र में आरोग्य केंद्रो मे उपलब्ध आरोग्य / स्वास्थ्य सेवाओं के कार्यान्वयन में बाधाँए :-**

प्राथमिक आरोग्य / स्वास्थ्य केंद्रो पर चिकित्सओं व कर्मचारी वर्ग की स्वास्थ्य स्तर पर अनुपस्थिती उसी प्रकार शासकीय अधिकारी वर्गो की इन समस्याओं के प्रती उपेक्षा इत्यादी सभी लाभार्थी रूग्ण / मरिजों के लिए बाधाएँ बनता है और समयानुसार योग्य उपचार व उपायोजना में क्रियान्वययन नहीं हो पाता है।

**आदिवासी क्षेत्रों में स्थानिय राजनेताओं और अधिकारी वर्गो के स्वार्थवश सरकारी योजनाओं की उपेक्षा :-**

साधारणत: इन क्षेत्रों में, ग्राम स्वच्छता, साफ पेययुक्त जल की उपलब्धता आदि की ओर अधिकारी वर्गो की स्वार्थवश की गयी उपेक्षा, परिणामस्वरूप दुषित जल, ग्राम स्वच्छता आदि कर्मियों के कारण इन क्षेत्रों कों अतिसात, मलेरिया आदि विविध समस्याएँ निर्मित होती है और विविध रोगों का प्रादुर्भाव बढ़ता ही जाता है।

उपरोक्त समस्याओं का अतिदुर्गम क्षेत्रों में योग्य समय पर निराकरण नही हो पाता और परिणामस्वरुप बीमारियों और स्वास्थ्य संबंधी समस्याएँ बढ़ती ही जाती है।

4

**संदर्भ :-**

१. वैश्विक पोषण रिपोर्ट २०२० (Global Nutrition Report २०२०) (Global Nutrition Targets)

२. Malnutrition and Dental Caries : A Review of Literature, २००५, W J Poster Karger.com

३. मेळघाटातील कुपोषण व शासकीय आरोग्य सुविधांचा भौगोलिक अभ्यास, प्रा. आनंद भुगे, २०१९

४. भारतीय जनगणना अहवाल २०१५-२०२०

५. अमरावती जिल्हा आरोग्य अहवाल.

६. Childhood Malnutrition in India (२६th April २०१९) Abhishek Singh

७. Child Nutrition in Maharashtra Report of Yashoda (२००५)

८. Megha Bala

९. भारताच्या कुपोषण समस्येवर एक उपाय : ३१st August २०२१, शिल्पा इनामदार

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# मानवी जीवनाचा आधारस्तंभ - कॅल्शियम

**प्रा. डॉ. स्वप्ना एस. देशमुख**

**गृहअर्थशास्त्र विभाग,**

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा. विद्यालय,

पुसद, जि.यवतमाळ

कुटूंबातील व्यक्तींच्या वृत्तीतील चिडचिडेपणा, पाठ दुखणे, ऊसण भरणे, कंबर दुखणे, मासिक पाळीचा त्रास, दातांच्या व दाढीच्या तक्रारी या सर्व प्रकारात कॅल्शीयम म्हणजेच आजीच्या बटव्यातील चुना या महत्वाच्या खनिजाची भुमिका अतिशयम महत्वाची आहे. म्हणुनच कॅल्शीयमला मानवी जीवनाचा आधारस्तंभ म्हटले आहे. गृहीणीला तसेच खुप कष्ट करणाऱ्या महिलांना देखील हे सांगीतले तर समजायला थोडा वेळच लागतो. सर्वसाधारणपणे कॅल्शीयम फक्त दुधातुन मिळत असते हेच सर्वसामान्यांना माहित असते. परंतु फक्त दुध पिऊनच जमत नाही, तर दुधाबरोबर जेवणातील इतर पदार्थ अन्न स्वरुपात पोटात गेले नाही तरत्या कॅल्शियमचा संपुर्ण उपयोग शरीराला मिळणार नाही बसंपुर्ण माहिती असेल तरच हे लक्षात येईल की, या महत्वाच्या खणिजाची गरज मुलांइतकीच घरातील पुरुषाला, गृहिणीला, वृध्दव्यक्तींना एखाद्या आजारपणामुळे खुप दिवस अंथरुणात रहाव लागल्यास ऑपरेशन नंतर, कॅल्शियमची गरज फार काळजीपुर्वक पुर्ण करावी लागेल हे समजेल तसेच एका सुक्ष्मपेशीच्या फलनापासुन किंबहुना गर्भपुर्वअवस्थेपासुन, गर्भावस्था, दुग्धसृजनकाळ, वाढीच्या काळात कॅल्शियमची गरज असते हे कळाव या उद्रदेशाने मानवी जीवनाचा आधारस्तंभकॅल्शियम “मानवी जीवनाचा आधारस्तंभ-कॅल्शियम” या महत्वपुर्ण विषयावर अभ्यास करण्यात आला.

### संशोधन क्षेत्राची निवड :-

प्रस्तुत अध्ययनासाठी यवतमाळ जिल्यातील पुसद येथील श्रीमती वस्त्सलाबाई नाईक महाविद्यालयाच्या बी.ए.-भाग-2 विद्यार्थिनींच्या कुटूंबाची निवड करण्यात आली आहे.

### संशोधन विषयाची उदिष्टये :-

1. विद्यार्थिनींना कॅल्शियम या महत्वपुर्ण घटकांविषयी सविस्तर माहिती व्हावी.
2. जीवनचक्राच्या सर्वच अवस्थेत कॅल्शियमची गरज असते याबाबत जागृती व्हावी.
3. कॅल्शियमच्या अभावाची कारणे, लक्षणे, परिणाम, कार्ये, याबाबत माहिती व्हावी.
4. समाज पर्यायाने देश सुदृढ होण्याकरीता प्रत्येक व्यक्तीच हातभार लागावा.
5.

### नमुना निवड व आकार :-

यवतमाळ जिल्हयातील पुसद येथील श्रीमती वत्सलाबाई नाईक महाविद्यालयातील 50 विद्यार्थिनींची नमुना म्हणुन निवड करण्यात आली. बहुतांश विद्यार्थिनी ग्रामीण भागातील आहे.

### तथ्य संकलनाची पध्दती/ व साधने :-

तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने प्रश्नावली पध्दत व ऑनलाईन पध्दतीने मुलाखत पध्दतीचा समावेश करण्यात आला.

### संशोधनाची गृहितके :-

1) विद्यार्थिनींना व त्यांच्या आईंना कॅल्शियमची प्राप्तीस्थाने याबाबत, अज्ञान आहे.
2) विद्यार्थिनींच्या आणि स्त्रियांच्या समतोल आहाराकडे दुर्लक्ष केल्या जाते.
3) प्रत्येक व्यक्तिच्या शरीराच्या वाढीसाठी कॅल्शियम आवश्यक आहे याबाबत अज्ञान आहे.
4) मासिक पाळी आलेल्या मुलींना कॅल्शियमची अधिक गरज आहे याबाबत अज्ञान आहे.

### तथ्यांचे विश्लेषण :-

मानवी जीवनाचा आधारस्तंभ कॅल्शियम या बाबत विद्यार्थिनींना विचारणा केली असता पुढील तथ्य निदर्शनास आले.

1. आपल्याकडे अजुनही स्त्रिया आणि मुली यांच्याबाबतीत जेवणात निष्काळजीपणा करण्याची पध्दत आहे.
2. मुलांची आणि पुरुषांची त्या तुलनेत चांगली काळजी घेतली जाते.
3. मासिक पाळी आलेल्या मुलींना कॅल्शियमची अधिक गरज आहे याबाबत अज्ञान आहे.
4. चाळीसीच्या वयात स्त्रिया व कंबरदुखी हे अतुट नाते आहे, असे विद्यार्थिनींच्या आईच्या स्वास्थाबाबत विचारणा केली असता दिसले.
5. घरी बाळाला दुध पाजणारी माता असल्यास फक्त बाळांतपणानंतर एक ते दिड महिणाच तिची आहाराबाबत विशेष काळजी घेतली जाते. त्यातही प्रसुती नंतर सुरवातीच्या दिवसात तिला फक्त वरणाच पाणी व पोळीच दिली जाते हे लक्षात आले.
6. घरातील वृध्द व्यक्तिंना दात व हाडे याबात अनेक समस्या आहे.
7. वाढीच्या वयातील मुले-मुली यांना मान फिरवल्यास आवाज येतो. जास्त चालल्यास पाय दुखतात असे निदर्शनास आले.
8. ग्रामीण भागात 6 महिण्यानंतर बालकाला लगेचच आदर्श असा पुरक आहार दिला जात नाही असे लक्षात आले.

प्रस्तुत तथ्ये जाणुन घेतल्यानंतर प्रस्तुत गृहितके सत्य असल्याचे सिध्द झाले. शरीराच्या रासायनिक घटनेमध्ये ज्या मुलभुत द्रव्यांची गरज असते. त्यातील ही खनिज द्रव्ये होत. वेगवेगळया प्रकारची 22 खनिज द्रव्ये शरीरात आढळतात. ही सर्व खनिजद्रव्ये शरीराच्या घटनेमध्ये जैविक स्वरुपात उपयोगी पडतात. ही खनिजद्रव्य पेशींच्या अंत:बाह्य परिसर क्षारप्रधान ठेवीत असतात आणि त्यांच्या व्दारेच शरीरात चैतन्य खेळत असते. डॉ. शुल्शर आपल्या बाराक्षर चिकीत्सेत खनिजतत्वांचे महत्व सांगतांना म्हणतात "Health and strength can be maintained only so long as the system is properly supplied with these minerals (Cell Workers or tissue builders)

कॅल्शियम कार्बोनेटच्या रुपाने तसेच फॉस्फेट, क्लोराईड व सल्फेटच्या स्वरुपातही शरीरात आढळतो. शरीरातील 99% कॅल्शियम हे हाडे व दातांमध्ये उपस्थित असते. उरलेले 1% कॅल्शियम कोमल तंतु रक्त व इतर द्रवपदार्थात असते.

### कॅल्शियचे कार्य :-

(1) हाडे व दातांच्या निर्मितीकरीता कॅल्शियम आवश्यक आहे. हाडांच्या मजबुतीकरीता, दुरुस्तीकरीता कॅल्शियम महत्वपुर्ण भुमिका बजावते.

(2) मासपेशींचे आकुंचन- प्रसरण होऊन क्रियाशील राहण्यास मदत करतात.

(3) ह्रदयाचे ठोके नियमित होण्याकरीता कॅल्शियम महत्वपुण ठरते.

(4) शरीराची वाढ व विकास होण्याकरीता कॅल्शियम आवश्यक आहे.

(5) शरीरातील इतर खनिज द्रव्यांचे कॅल्शियममुळे समतोल राखला जातो.

### कॅल्शियमच्या अभावाचे लक्षणे व परिणाम :-

#### लहान मुलांमध्ये दिसणारी कॅल्शियम अभावाची लक्षणे :-

ज्या गर्भवती मातांच्या आहारामध्ये कॅल्शियमचा अभाव राहिला तर त्या मुलांचा पुढेही नीट विकास होऊ शकत नाही. अशा मुलांनश मुडदुस होतो, चिडखारे होतात. सतत रडणे ही लक्षणे उदभवतात. भुक न लागणे. खाल्लेले ओकुन टाकणे, लघवी केल्यानंतर त्या जागेवर खडुच्या रंगासारखे डाग पडणे, वारंवार अपचन व जुलाब होणे, दातांची उगवण उशिरा होणे इत्यादी लक्षणे उद्रभवतात. या लक्षणांनी युक्त मुलांचा मृत्यदरही सर्वात उंच असतो.

#### स्त्रियांमध्ये दिसुन येणारी कॅल्शियम अभावाची लक्षणे :-

- गर्भाशय स्त्री बीज ग्रंथी आणि संबंधित अंत:स्त्रांवाच्या निर्मितीमध्ये कॅल्शियमचे फार महत्व आहे. तरुण मुलींच्या आहारात जर कॅल्शियमचा तुटवडा असला तर तारुण्याचा विकास होत नाही. अनियमित पाळी, अधिक स्त्राव होणे, कळा घेणे इत्यादी लक्षणे प्रगट होतात.
- ऑस्टिओमलेशिआ (हाडे सछिद्र व ठिंसुळ होणे) स्तनामध्ये दुध निर्मीती न होणे, चित्त एकाग्र होणे ही लक्षणे कॅल्शियमच्या अभावाचीच होत.
- वृध्दावस्थेत हाडे व सांधे दुखतात वृध्द व्यक्तिला Osteoporosis नावाचा रोग होतो. या वयात हाडे तुटल्यास बरे होण्यास अधिक काळ लागतो. सांधे दुखतात.
- शरीरात सर्व अन्नघटकाची सांगड न जुळल्यामुळे तसेच भोजनातील चुकीच्या मेळामुळे, साखर व औषधींच्या दुरुपयोगामुळे अनैसर्गिक कॅल्शियम सेवन केल्यामुळे किंवा कॅल्शियमचे प्रमाण अधिक झाल्यामुळे, नको असलेला कॅल्शियम मुत्रपिंडाच्या माध्यमाने तसेच शौच्छाव्दारे उत्सर्जित होत असतो. याप्रकारे कॅल्शियमचे होणारे उत्सर्जन शरीरावर नियंत्रण कार्य करणाऱ्या ग्रंथीच्या आधीन असते. कॅल्शियमचा अभाव शरीरात निर्माण झाला तर शरीरात वेगवेगळी रोग लक्षणे प्रगट होतात. पचन व्यवस्था बिघडते. हाडांचा विकास थांबतो. त्वचा काळवंडते, मांसपेशीमध्ये व ज्ञानतंतुमध्ये फाजील उत्तेजना निर्माण होते. कॅल्शियमच्या अभावामुळे बरेचदा शरीरात फाजील चरबीचा संचय होतो तसेच वाजवीपेक्षा जास्त थंडी वाजते. मानसिक संतुलन बिघडते. मृत्युची अवास्तव भिती, थंड घाम सुटणे इत्यादी लक्षणे उद्भवतात.
- कॅल्शियम व जीवनसत्व (ड) च्या अभावाने कधी कधी लहान मुले रडता रडता श्वास रोकतात. रडण्याच्या क्रियेत कॅरोटीड रक्तवाहिणीवर दाब पडती आणि रक्तप्रवाह नीट होत नाही व आपोआप श्वास रोखला जातो व मुले मुर्छित होतात. लहान मुलांमधील हे एक जीव घेणे लक्षण आहे.

**उपाययोजना :-**

रक्तवाहिण्यांची लवचिकता, त्वचेचा आरोग्यदायी विकास तसेच पांढऱ्या पेशींच्या निर्मितीसाठी म्हणजेच संरक्षक दल सुदृढ करण्यासाठी आणि शरीराच्या पेशी सहजासहजी कुजु नयेत म्हणुन या खनिजद्रव्यांची आवश्यकता आहे.

जठर, लहान आतडे व पाचक द्रव्यांच्या सक्रियतेवरच कॅल्शियमचे अधिकाधिक शोषण होऊ शकते. त्यांच्या जोडीला जीवनसत्व ब, क, ड आणि फॉस्फरसचीही आवश्यकता असते. म्हणुन आहारात दिर्घकाळापर्यंत सर्व अन्नघटकांची जोड असायला हवी.

डायबिटीस, ह्रदयविकार, क्षयाचा विकार, आकडी येणं वगैरे अनेक आजारात औषधयोजना सुरु असल्यास शरीरात बऱ्याच अन्नघटकांची कमतरता होते यात कॅल्शियमचीही कमतरता होते. कधी-कधी निरुपद्रवी वाटणाऱ्या बद्दकोष्ठता दुर करण्याच्या गोळया, झोपेच्या गोळया, अँटीॲसीड गोळया, डायूरेटीक औषध तसेच

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

मदिरापान हे सर्व प्रकार कॅल्शियमची कमतरता निर्माण करतात. तसेच आपल्या जेवणाचे प्रकार म्हणजे तेल, तुप, तळलेले प्रकार, साखर, मीठ यांची रेलचेल, भाजीचा अभाव होणार नाही याची काळजी घ्यावी अशावेळी उपाययोजना करुन म्हातारपणा द्याव्या लागणाऱ्या कित्येक दुख:द प्रसंगांना तोंड देणं टाळता येईल. वयात येणाऱ्या मुलींवर लक्ष देतांना तिचा सर्व अन्नघटकांनी तसेच कॅल्शियम या महत्वपुर्ण घटकांनी संपुर्ण असणाऱ्या आहाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

गर्भधारणेनंतर तर कॅल्शियमच्या पुरवठयाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शेवटच्या तीन महिण्यात 1000 ते 1200 मि.ग्रॅ. कॅल्शियमची रोज आवश्यकता असते. एरवी सामान्य माणसाला 400 ते 1200 मि. ग्रॅम कॅल्शियम रोज हवा असतो. अशावेळी कॅल्शियमच्या तुटवडयामुळे मातेच्या हाडामध्ये असलेला कॅल्शियम झिरपु लागतो आणि मुलांच्या संगोपणास उपयोगी पडतो. परंतु मातेचे आरोग्य मात्र कायमचे अधु बनते. विशेषत: मध्यमवर्गीय कुटुंबातील मातांना अलिकडे मणक्याचा त्रास, सांधेदुखीसारखा त्रास सारखा होत आहे. मध्यमवर्गीय कुटुंबियांनी चहा, साखर, मिष्ठान्न, तळलेल्या वस्तु तसेच इतर शानशौकिच्या वस्तुवर होणाऱ्या खर्चात कपात करुन त्यातील काही रक्कम मोड आलेले कच्चे धान्य, गाजर, काकडी, कोबी, टोमॅटो इत्यादीवर खर्च केल्यास सामाजिक आरोग्य निश्चितच सुधारण्यास मदत होईल. सतत वाढणारी रुग्णसंख्या, इस्पितळांची संख्या यावर आळा घालता येईल.

कॅल्शियम मिळविण्याकरीता त्याची प्राप्तीस्थाने जाणुन घेणे महत्वाचे आहे. कढीपत्ता, कडवेवाल, फुलकोबी, बदाम, सुखे अंजीर, पुदीना, पालक, मेथीची पाने, गाजराची पाने, शेवग्याची पाने, नाचणी, धान्याचा आहारात समावेश करावा. यापैकी शेवग्याच्या झाडाविषयी बऱ्याच लोकांच्या मनात अप्रियता आहे. परंतु वैज्ञानिक संशोधनामध्ये असे आढळुन आले की, हया झाडाच्या स्वस्त पानामध्ये इतर सर्व खादय पदार्थाच्या तुलनेत जास्त खनिजद्रव्य आढळतात. शेवग्याचा पाल्याच्या 1 कप रसात जीवनसत्व (अ) ची प्राप्ती 9 अंडयाच्या बरोबरीची, 80 कप गाईच्या दुधाबरोबरची असते. तसेच व्हिटॅमिन (सी) व कॅल्शियमबाबतही आहे. 300 ग्रॅम रसामध्ये सर्वच आवश्यक अमायनो ॲसिडची प्राप्ती करता येते.

गर्भवती मातेने हया पानांचा रस नियमित घेतल्यास कुठल्याही टॉनिकची गरज पडत नाही. तसेच मज्जासंस्था व हाडांची निर्मिती चांगली होते. या रसाचा नियमित सेवन केल्यास माता व मुलांचा विकास भराभर होतो. तसेच रातआंधळेपणा, स्मरणशक्तीचा अभावा, उचकी आणि गर्भपाताची सवय इत्यादी मध्ये उपयोगी आहे.

लहान मुलांना व वृध्दांना नाचणीसत्व देणे अतिशय आवश्यक आहे. वयाच्या 6 व्या महिण्यापासुनच बाळाला पुरक आहार देतांना कॅल्शियम, लोह, जीवनसत्व, प्रथिनयुक्त आहार द्यावा. मोठयांना नाचणीची भाकरी सुध्दा देता येईल तसेच कुटूंबातील सर्वच व्यक्तिंकरीता आंबट पदार्थात चिमुटभर खायचा चुना घालुन तो जेवणात

मिसळावा. उदा. ताकात चुना मिसळुन ते ताक पीठ भिजवण्यास वापरावे किंवा चिंचेत चुना मिसळुन ते पाणी आमटीत टाकावे.

लहान मुलांना अकारण उदभवणारा डायरीया हा कॅल्शियमच्या कमतरतेमुळे असु शकतो. कारण रेनिज या दुधाच्या पचनासाठी आवश्यक असणाऱ्या एन्झाइमची कार्यशक्ती कॅल्शियमवर अवलंबुन असते अशावेळी आईला भरपुर कॅल्शियम देणं आवश्यक आहे.

सुर्य नमस्काराव्दारे जीवनसत्व (ड) सहजा सहजी मिळण्याची व्यवस्था आपल्या ऋषींनी सांगीतली आहे. कोवळया सुर्य किरणातील अल्ट्राव्यायलेट रेंज त्वचेवर पडल्यास 7 डिहायट्रो कोलेस्ट्रॉल नावाचे रासायनिक द्रव क्रियाशील होते. त्यातुन जीवनसत्व (ड) आपोआपच प्राप्त होते. कॅल्शियमच्या शोषणाकरीता जीवनसत्व (ड) आवश्यक असते.

**संशोधन व तज्ञांची मते :-** डॉ. सतीश मुथा यांच्या मते, चाळीस वर्षाच्या सुमारास स्त्रियांच्या शरीरात बऱ्याच महत्वाच्या घडामोडी होतात. इस्ट्रोजन हे संप्रेरक कमी होत असते. यामुळे हाडातील कॅल्शियमचे प्रमाणे कमी होऊन तिथे पोकळी निर्माण होते. यालाच ऑस्टिओपोरोसिस म्हणतात. पुर्वीपासुन हाडांची मजबुती व घनता समाधानकारक असेल तर या कमतरतेचा विशेष प्रभाव पडत नाही. परंतु अशक्तपणा, कॅल्शियमचा अपुरा पुरवठा, सततचे गर्भारपण, शारीरिक व्यायामाचा अभाव या सगळयामुळे 70 ते 80 टक्के स्त्रियांमध्ये हाडांची घनता समाधानकारक नसते. चाळीसीनंतर ऑस्टिओपोरोसिसमुळे मणक्यामध्ये सुक्ष्म फ्रॅक्चर होऊन कंबरदुखी निर्माण होऊ शकते. एखाद्या बारीकश्या धक्क्यामुळे मणक्यात फ्रॅक्चर होऊन ते दाबले जातात व त्यामुळे कुबड निर्माण होऊ लागते.

**डॉ. ललिता देवधर यांच्या मते :-** स्त्रियांचे आयुर्मान झपाटयाने वाढत आहे. 1950 मध्ये स्त्रियांची सरासरी आयुमर्यादा 47 वर्ष आणि 2000 मध्ये ती 78 वर्षे या गतीने वाढत गेली. 2015 मध्ये समाजातील 46 टक्के स्त्रिया चाळीसीच्या वर आहेत. म्हणजे स्त्रियांच्या रजोवृत्तीनंतर त्या जवळजवळ 1/3 आयुष्य जगतात. आयुष्याच्या या कालखंडात सुसहय, सुखद व चांगल्या प्रतींचे आयुष्य जगण्याच्या दृष्टीने अधिक जागरुक होणे गरजेचे आहे.

कॅन्सरच्या कारणासंबंधी जी जी संशोधने होत आहे किंवा झालेली आहेत त्यातील शास्त्रज्ञ डॉ. एलकेल्स यांच्या म्हणण्याप्रमाणे शरीरातील पेशींमध्ये योग्य प्रमाणात कॅल्शियम असल्यास त्यामध्ये कॅन्सरची लागण होऊ शकत नाही. विविध प्रकारच्या रुग्णांच्या अनुभवावरुन त्यांनी हा निर्णय जाहीर केलेला आहे. शरीराच्या ज्या पेशीसमुच्चयामध्ये कॅन्सर वाढतो. त्या पेशींमध्ये कॅल्शियमचा अभावच दिसुन आला आहे. शेवटी निष्कर्ष देतांना डॉ. अमन आपल्या "मेडिसेनल सिक्रेटस ऑफ युवर फुड" मध्ये म्हणतात, "Thus there are indications that oneway another calcium and cancer do not agree."

"Health from soil" या पुस्तकात सुचविले आहे की, सुपीक मातीतुन निर्मित फळांच्या व भाज्यांच्या रसातुन पोषण प्राप्त करु शकतो व आरोग्य नीट ठेवु शकतो. म्हणुन ज्या शेतात आणि व आरोग्य नीट ठेवु शकतो.

म्हणुन ज्या शेतात आपण उत्पादन करतो तेथे रासायनिक खते न वापरता शेणखत व कंपोस्ट खतांचा उपयोग करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :-**

कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिच्या शरीराचा आधारस्तंभ कॅल्शियम हा अभ्यास करतांना तथ्याचे परिणाम जाणुन घेतल्यानंतर विद्यार्थिनींना उपाययोजना सुचविण्यात आल्या. प्रत्येक व्यक्तिच पहिल स्वप्न आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ति सुदृढ व आरोग्यसंपन्न असावं. या कोविड-19 च्या भयावह काळात तर आपण सर्वच खुपच धास्तावलेल होतो. या परिस्थितीतुन सावरत असतांना आपल्या कुटुंबातील प्रत्येक घटकाची काळजी घेणे अनिवार्य आहे. त्यांच्या समतोल आहारातुन प्रत्येक अन्नघटकाची पुरवणी होणे गरजेचे आहे. तसेच शरीराचा आधारस्तंभ असलेला कॅल्शियम हा घटक तर आपल्याला सहज उपलब्ध असणाऱ्या पदार्थातुन आपण प्राप्त करु शकतो. डॉ. काशीबाई अवसरे यांच्या "बाळाची चाहुल" या पुस्तकातल एक उदाहरण येथे उधृत करावसं वाटतं. प्रयोग करतांना नेहमी उंदरावर प्रयोग करतात या उंदराच्या मादया निसर्गत: स्वत:च्या शरीराची कशी काळजी घेतात हे या एका प्रयोगाच्या आधारे लक्षात आल आहे.

प्रयोगासाठी अकरा मादया वेगवेगळया पिंजऱ्यातुन ठेवल्या होत्या. त्या पिंजऱ्यात साखर दुधात असणारं केसिन नावाच प्रथिन, ऑलिव्ह ऑईल, मीठ कॉडलिव्हर तेल, यीस्ट गव्हाच्या मोडापासुन काढलेल इत्यादी जीवनसत्वयुक्त तेल आणि पाणी असे वेगवेगळया भांडयातुन सर्वांना सारखेच देण्यात आले होते. गर्भधारणेपुर्वी, गरोदरपणी, पिलांना पाजत असतांना पंचविस दिवसापर्यंत व पुढे पाजण बंद झाल्यावर कित्येक आठवडयापर्यंत या मादया काय खातात याची नोंद ठेवण्यात आली. संबंध प्रयोगाचा आढावाचा घेतल्यानंतर असे लक्षात आले की, उंदराची मादी जेवढ नेहमी कॅल्शियम घेते त्याच्या तीस चाळीस पट कॅल्शियम ती गरोदरपणी व पिल्यांना पाजत असतांना घेत होती. पाजन कमी केल्यावर हे प्रमाण हळुहळु कमी होऊन मुळपदावर येत त्याचबरोब साखरेच प्रमाण अगदी कमी होते. त्यामानान प्रथिनयुक्त जीवनसत्व आणि खनिजांनी भरपुर असे पदार्थ पुष्कळच घेतले गेले. उंदराच्या मादयांनी स्वयंप्रेरणेने घेतलेले आणि शरीरपोषणासाठी डॉक्टरांनी निश्चित केलेले पदार्थ यांचा तंतोतंत मेळ बसला. आपण सर्व या मुक्या प्राण्यापासुन निश्चितच बोध घेऊ शकतो व आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिला समतोल आहार देऊन, कटाक्षाने कॅल्शियचा विचार करुन आहार देऊ स्वास्थ निरामय ठेवुन देशाच्या विकासात हातभार लावु शकतो.

**संदर्भसुची**

1. डॉ. श्री. बालाजी तांबे - फॅमिली डॉक्टर, सकाळ पेपर्स लिमिटेड, बुधवारपेठ पुणे.
2. प्रा. शोभा वाघमारे - आहारोपचार आणि सामुदायिक पोषण, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
3. डॉ. मीना काळेले - पोषण आणि आहारशास्त्र, पिंपळापुर ॲण्डकंपणी पब्लिशर्स, नागपुर.
4. डॉ. मालती कारवारकर - वंशवेल, मेनका प्रकाशन

# माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांमधील पोषण जागृकता अभ्यासणे

प्रा. डॉ. लता ज. वाघेला,
प्रोफेसर,
लो.बा. अणे महिला महाविद्यालय,
यवतमाळ
Email-latawaghelaII@gmail.com

## सारांश :

कोरोना महामारीने कोणत्याही देशाला सावरण्याची संधी दिली नाही. या संकटाला तोंड देण्याची जगातील कुठल्याच देशाची कोणतीच तयार नसल्यामुळे याला सामोरे जाणे हे एक जागतिक आवाहन ठरले आहे. या जागतिक संकटापासून स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न प्रत्येक देशात सुरू आहे. यावर अजूनपर्यंत कोणताच औषधोपचार जगासमोर नसल्याचे दिसून येते. कोरोना त्यामुळे पासून संरक्षण करण्यासाठी मानवाची रोग प्रतिकार क्षमता वाढविणाऱ्यासाठी पोषक आहाराशिवाय पर्यात नाही तसे तर भारतीय खाद्य संस्कृतीचा परिचय जागतिक स्तरावर सर्वांना माहित आहे. परंतु माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम भारतीय परपंरागत आहारावर ही झाल्याचे दिसून येते. अलीकडे किशोर भुखेसाठी नाही तर चवीसाठी खाणे पसंत करू लागला. त्यामुळे 'रेडी टु इट' ची पध्दत सुरू झाली. त्याचा परिणाम आज भारतातील बाल्यावस्थेपासूनच सुरू झाला आहे. परंतु आजचा बालक भारताची उद्याची पिढी असल्यामुळे त्यांना आजपासूनच पोषक आहाराचे महत्तव समजून सांगितल्या शिवाय भविष्यातील कोरोना महामारी सारख्या परिस्थितीला ते यशस्वीरित्या तोंड देऊ शकणार नाही. म्हणून किशोरावस्थेच्या सुरूवातीच्या काळातील बालकांना पोषक घटकाबाबत कीतपत माहिती आहे हे जाणून घेतल्या शिवाय त्यांना समतोल व पोषक आहाराचे महत्त्व पटवून सांगता येणार नाही. भारताच्या उज्ज्वल भविष्याची सुरूवात ही बालकाच्या उत्तम आहारातून आरोग्य आणि यातून देशाच्या भावी पिढीचा व्यक्तीमत्त्व विकास साधण्यास फायदेशीर ठरेल भारता सारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशाच्या भवितव्यासाठी "माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना मधील पोषण जागृरकता अभ्यासणे" देशहिताचे ठरेल.

## प्रस्तावना -

बालक ही राष्ट्राची मौलिक मानवीय साधनसंपत्ती असून राष्ट्राचे भवितव्य विकसीत व सुदृढ बालकावर अवलंबून असते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. महिला व बालकांच्या विकासासाठी शासनाच्या आणिा सेवाभावी संस्थांच्या आणि निरनिराळया यंत्रणांच्या वतीने बहुविध योजना कार्यान्वित केल्या गेल्या आहे. परंतु विविध कारणामुळे त्या योजना ज्यांच्यासाठी तयार केल्या जातात त्यांच्या पर्यंत

त्या पोहचत नाही किंवा अंशत: पोहचतात, म्हणून आजही देशातील एकूण लोकसंख्या 30% लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. याचा गंभीर परिणाम त्यांच्या आरोग्यावर होताना दिसतो. इतर देशांच्या तुलनेत आजही भारतामध्ये बालमृत्यूचे प्रमाणा 48% असुन, अमेरिकेत 10% तर इंग्लंडमध्ये फक्त 6% आढळून येते.

वास्तविकत: बालकाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी ही प्राथमिकत: कुटुंब संस्थेवर असते. कारण बालकाच्या विकासाची खरी सुरुवात ही कुटुंबातच होत असते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातून त्याच्या किती गरजा, किती  प्रमाणात पूर्ण होतात त्यावर विकास व सर्वांगीण विकास अवलबून असतो. याबाबत शासनाचेही अनेक प्रयत्न दिसून येतात. कारंतु माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाबाबत कुटुंब, समाज, शासन सर्वांचे दुर्लक्ष झालेले दिसून येते कारण या सर्वांच्या मते मुल्ेें आता मोठी झाली त्यांच्या आहार विषयी विशेष काळजी करण्याचे कारण नाही घरात जे अन्न तयार होते ते त्यांना पोषक असेलच असे वाटते. त्यामुळे त्यांच्या आहाराविषयी विशेष काळजी घेतली जात नाही. खरे तर या वयात अद्याप शारीरिक विकास हा सुरुच असतो. त्यामुळे जो पर्यंत सवयी कुमारावस्थेत जात नाही तोपर्यंत त्याला आहाराबाबतच्या योग्य सवयी लावणे, पोषक आहराबाबतवे ज्ञान देणे. स्वच्छता आरोग्य आहारातील खाद्य पदार्थाचे महत्व त्यांचे शारीरिक कार्य, मानसिक कार्य, बौध्दिक कार्य, सामाजिक व सांस्कृतीक कार्य अवलंबुन असते. याबाबत मार्गदर्शन करणे अतिशय गरजेचे आहे. म्हणून त्यांना कुपोषणाबाबतची माहिती देऊन पोषक आहाराचा अभाव, आजार, गरीबी, अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छ वातावरण, आहाराबाबतचे गैरसमज, रुढी, परंपरा, ही कारण समजावून सांगणे तितकेच महत्वाचे ठरते. आजच्या फास्टफुडच्या युगात माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची पोषक आहारा बाबतची बाबतची मानसिकता बदलणे काळाची गरज आहे. ही कारणे जर दूर करून त्यांची मानसिकता बदलायची असेल तर प्रथम त्यांच्या आहाराबाबतच्या सवयी, पोषक आहाराबाबतचे ज्ञान यांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांच्या मानसिकतेत बदल करता येणार नाही. जो पर्यंत मानसिकता बदलणार नाही तो पर्यंत कुटुंब, समाज व शासन प्रयत्न करणार नाही आणि थोड फार प्रयत्न सुरू असतील ते ही निष्फळ ठरतील, म्हणून माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांकडून ही माहिती घेऊन त्या विषयी  त्यांना पूढे मार्गदर्शन करून त्यांच्यासाठी योजना करण्याच्या शिफारशी शासनाकडे करणे या करीता लहान मोठया स्तरावर सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. हा मुख्य उद्देश लक्षात घेऊन या विषयाची निवड अभ्यासासाठी करण्यात आली.

## वाङ्मयालोकन :

**Samntray P and Pradhan S. (2004)** her study revealed that educational background, income of the family were directly proportional to the knowledge of the children. They found that the fundamental knowledge of the children regarding nutrition was very poor To improve this, four games were developed in relation to the different foods. Their classification nutrient content and the deficiency diseases, healthy foods and they were taught through these games From this study of nutrition education through games it was found that games are the effective method for imparting nutrition education.

**Zubaida K. D. Kanchana, P. Ashlesha (2007).** The present study was aimed to find eating habits and nutrition beliefs among belonging to low and middle income group. They found that there was no significant difference in the consumption of vegetarian and non vegetarian foods among the girls and boys of both low and middle income groups. The student from low income group are not aware of different kinds of food items and they consume only the food which are of low cost irrespective of their effect on health.

**Gupta Shavika (2004)-** A study on development and validation of Adolescent Food Habits Cheaklist (AFHC) for assessing healthy eating behaviour among affluent 99 adolescent (12-14 years) was conducted in two public schools of Delhi. She found that the scores showed significant correlations with intakes of various nutrients. The AFHC composite score correlated significantly (Cr=0.401 Pd" 0.05) with Healthy Eating Index that was based on dietary guide lines. AFHC can be used as a quick and technical simple tool for assessing healthy eating habits among adolescents

वरील विविध अभ्यासातून असे दिसते की, मुलाचे पोषक आहाराबाबतचे ज्ञान, त्यांच्या सवयी, घेत असलेल्या आहाराचा त्यांचा आरोग्यावर होणारा परिणाम, आर्थिक परिस्थितीचा परिणाम ही त्यांच्या आहाराबर होताना दिसून येतो. याच्याशी संबंधित आणखी अभ्यासाच्या दृष्टीने संशोधनाकरीता या विषयाची निवड करण्यात आली, याची उदिष्टये खालील प्रमाणे

## संशोधनाची उद्दिष्टये -

1. माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांचा पोषक आहार व त्यातील पोषक घटकाबाबत असलेली माहिती जाणून घेणे.
2. माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना पोषक आहार आणी आरोग्य यांच्या संबंधाबाबत असलेली माहिती जाणून घेणे
3. माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या आहारविषयक आवडीनिवडी आणी सवयी बाबत जाणून घेणे.
4. माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांमध्ये पोषक आहाराबाबत जागरूकता निर्माण करण्याबाबत उपाय सुचविणे

## गृहितके

1 माध्यमिक शालेय विद्यार्थाना पोषक आहाराबाबत व पोषक घटकांबाबत विशेष माहिती नाही.

2 माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना पोषक आहार व आरोग्यातील संबंधाबाबत थोडयाफार प्रमाणात माहिती आहे.

3 माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी व सवयी पोषक आहाराच्या दृष्टीने योग्य नाही

4 माध्यमिक शालेय विद्यार्थानमध्ये पोषक आहाराबाबत जागरुकता निर्माण करण्याची गरज आहे.

## संशोधन क्षेत्र -

या विषयाच्या अभ्यासाकरीता यवतमाळ शहरातील मागासवस्तीतील नगरपरिषद अतर्गत येणाऱ्या शाळेतील 4 ते 7 व्या वर्गात शिकणाऱ्या 200 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

## अध्ययन पध्दती –

ऑनलाईन प्रश्नावली पध्दतीचा वापर माहिती संकलनासाठी करण्यात आला.

## निष्कर्ष -

संबंधीत सर्वेक्षणाच्या अभ्यासातून असे दिसून येते की, माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना पाषक आहाराबाबत थोडी फार प्राथमिक स्वरुपाची माहिती आहे, परंतु रोजच्या आहारातील खाद्य पदार्थांपासून मिळणाऱ्या पोषक घटका बाबतची शास्त्रशुध्द माहिती नसल्याचे आढळून आले. आहारातील पोषक घटकापैकी प्राथमिक स्वरुपाचे प्रथिन, लोह, कॅलशियम, आयोडीन, जिवनसत्व अ व क इतक्याच पोषक घटकाबाबत थोडीफार माहिती असुन इतर पोषक घटकाबाबत त्यांना काही माहिती नसल्याचे दिसून आले. . थोडी फार असलेली माहिती ही त्यांना दूरदर्शनातील जाहिरात व प्रसारमाध्यमातून मिळाल्याचे आढळून आले.

आरोग्यासाठी आवश्यक असणारे पोषक घटक आहारातील कोणत्या खाद्यपदार्थापासन मिळतात, त्याचे कार्य काय आहे, त्यांच्या अभावी आरोग्यावर काय दुष्परिणाम होतो याबाबत त्यांना प्रसारमाध्यमातील जाहिरातील दाखवतात तेवढीच माहिती असल्याचे निदर्शनास आले. जसे टुथपेस्टमधील कॅलशियम, आयोडाईज मीठ हेल्थडींक्स इ. कुपोषणाबाबत त्यांना काहीच माहिती नसल्याचे दिसून आले.

माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या पोषक आहार, त्यातील पोषक घटक, त्याचां पुरवला करणारे पदार्थ, त्यांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम याबाबत त्यांना माहिती नसल्यामुळे त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयी, आवडीनिवडी, आरोग्याला पोषक नसल्याचे आढळून आले. काही विशिष्ट प्रकारची तृणधान्य, कडधान्य, भाज्या व फळाचा आहारात वापर दिसून आला. दुध व दुधाचे पदार्थ अती अल्प

प्रमाणात असुन फक्त 4% मुलेच दुध घेतात बाकी 80% मुले चहा घेताना आढळले. त्यांना फास्टफुड म्हणजे पॅकींगचे गाडीवाल्या जवळचे पदार्थ जास्त आवडतात. खाऊसाठी दिलेले पैसे यावर खर्च करतात असे दिसून आले. फक्त 20% मुले घरून डबा आणतात, बाकीचे मुले शाळेत दिले जाणारे पदार्थ खातात. मुलांच्या खाण्यापिण्याबाबतची चौकशी घरी फक्त आईच करते.

उपायोजना :

वरील निष्कर्षावरून असे निदर्शनास येते की, माध्यमिक. , शालेय व शासकीय स्तरावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## कौटुंबिक स्तरावर उपायोजना :

1. आहाराबाबत स्वस्त व ऋतुमानानुसार मिळणाऱ्या भाज्या, फळांचा वापर करावा. विशेषत: गोडलिंब, कोथींबीर, गाजर, लाल भोपळा, बोर, पेरु, आवळा इ.
2. गुळाचा वापर जास्त करावा.
3. मिश्र पिठातून व सोयाबीनच्या पीठापासून तयार होणाऱ्या विविध पदार्थाचा वापर करावा
4. मिश्र डाळी, मिश्र कडधान्याचा वापर करावा. थंडीच्या दिवसात बाजरी, गुळ, मेथी भाजी, शेपुभाजी इ.चा भरपुर वापर करावा.
5. सोयाबीन पासून दूध तयार करून ते मुलांना देणे, एकाच पदार्थाचा वापर विविध पदार्थ तयार करण्यासाठी करावा, म्हणजे आहारात रूची वैचित्र्य निर्माण करावे.
6. मुलाना पालकांनी हातखर्चाला पैसे देऊ नये. खाण्यापिण्याबाबत चांगल्या सवयी लावाव्यात. प्रत्येक खाद्यपदार्थाचे महत्व समजावून सांगावे.

## शालेय स्तरावर उपायोजना :

1. शाळेतून विद्यार्थ्यांना आहारातील पोषक घटकयुक्त पदार्थाची यादी द्यावी. अन्न व पोषक घटकांचे महत्व सांगणारे विविध खेळ तयार करुन प्रदर्शन लावून छोटे छोटे प्रोजक्ट देऊन त्यांना माहिती पुरविणे.

2. पालक सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या पालक मातेला, कमी किंमतीत पोषक व अन्न तयार करण्याबाबतचे प्रात्यक्षिक द्यावे. सकस व्यंजन स्पर्धा या सारखे उपक्रम राबवून त्यांना शालेय कार्यक्रमात सहभागी करुन घ्यावे. त्यांच्या आहारबाबतचे अज्ञान व गैरसमज दूर करावे.
3. प्रत्येक महिन्यात होणाऱ्या आरोग्य तपासणीचा अहवाल पालकापर्यंत पोहचवून त्याच्या शंकाचे समाधान करावे. त्यांना शासकीय मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.
4. वारंवार पोषक आहार,आरोग्य, स्वच्छता बाबत जागरुकता निर्माण करण्याच्या दृष्टीने व्याख्यान, मार्गदर्शन, प्रश्न मंजुषा, प्रदर्शनी, विविध स्पर्धांचे आयोजन व सकस आहाराचे वाटप करावे
5. सेवाभावी संस्थांच्या व शासनाच्या मदतीने मुलांना शाळेतून कसे जास्तीत जास्त पोषक घटक व त्यांची माहिती पोहचवता येईल हा प्रयत्न केल्या जावा.
6. शालेय अभ्यासक्रमात, आहार,आरोग्य, पोषण, स्वच्छता, पोषक घटक त्यांचे कार्य अथवा दुष्परिणाम या बाबत शास्त्रशुध्द माहिती पुरवावी. काही विषयाचे प्रात्यक्षिक ज्ञान द्यावे, म्हणजे ती माहिती जास्त प्रभावी ठरते.

## शासकीय स्तरावर उपायोजना :

1 शासन यंत्रणा अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना विविध आरोग्य व आहारविषयक सुविधा पुरवाव्यात.
2 पालकसभेमध्ये विविध कमी किंमतीच्या पाककृतीचे प्रात्यक्षिक देणाऱ्या विषय तज्ञाची शिबीर आयोजीत करावी.
4. पालकांना अर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी रोजगार उपलब्ध करून देण्यास मदत करावी जर एखाद्या बचत गटाला काम दिल्यास 10-12स्त्रियांना रोजगार मिळवुन कुटबाचा आहारीय दर्जा वाढवण्यास मदत होईल.
5. रक्तगट, सिकलसेल, हिमोग्लोबिन तपासणी करून योग्य ती औषध सुविधा उपलब्ध करून देणे.
6. शाळेत मिळणारा पोषक आहारात विविधता, स्वच्छता वाढेल असा प्रयत्न शासनाद्वारा करण्यात यावा.
7. स्वच्छतेचे नियम ठरवून द्यावे. व्यायाम, योगावर भर द्यावा.

8. शासनाच्या योजना ज्यांच्यासाठी आहे. त्यांच्या पर्यंत त्या पोहचतात की नाही यांची अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी.
9. पालकांच्या कडून येणाऱ्या सूचनांचे स्वागत करावे.
10. सेवाभावी संस्थांच्या मदतीने सकस आहाराचा पुरवठा करणे, विविध स्तरावर माहिती पुरवणे. मातांसाठी प्रदर्शनी, मार्गदर्शन, प्रात्यक्षिक मेळाव्याचे आयोजन करणे,

## मूल्यमापन :

संशोधनाच्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना पोषक आहार, त्यातील पोषक घटक ते पुरविणारे खाद्यपदार्थ, त्यांची दैनिक आवश्यकता त्याचा पुरवठा करणारे स्थानिक, स्वस्त पदार्थांचा वापर करून आहाराचा दर्जा उंचावण्याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. पोषक आहाराचा आरोग्यावर होणारा दुष्परिणाम, आहार, आरोग्य, स्वच्छता बाबतच्या चांगल्या सवयी लावुन आवडीनिवडीत बदल करून जागरुकता निर्माण करणे, देशाच्या सुदृढ नागरिक निर्मितीसाठी गरजेचे आहे. पोषक आहाराबद्दल माहिती असलेल्या पदार्थांचा त्यांना वापर करता येत नाही कारण पालकांच्या आर्थिक परिस्थितीचा मुलांच्या आहार व आरोग्यावर परिणाम होतो तसेच सर्व विद्यार्थी मागासवस्तीत राहणारे असून (बी.पी.एल.), दारिद्रय रेषोखालील कुटुंबाचे असून त्यांचे पालक रोजमजुरी करणारे असल्यामुळे त्यांना या पदार्थांचा उपयोग करता येत नसल्याचे निदर्शनास येते म्हणून त्यांना सकस आहाराबाबत शास्त्रशुध्द माहिती देऊन व वरील उपायोजना करून त्यांच्यामध्ये पोषक आहाराबाबत जागरुकता निर्माण करणे काळाची गरज आहे. त्याशिवाय मागासवस्तीतील कुपोषणाचे प्रमाण कमी होणार नाही. यासाठी कौटुंबिक, शालेय व शासकीय स्तरावर उपायोजना सुचवून माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांचा आहार व आरोग्याचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करता येईल..

## संदर्भ ग्रंथसूची:

1. D. Kanchana, Zubaida Azeem and P. Ashlesha, "Sex Difference in Dieting Trends, Eating Habits and Nutrition Beliefs Among. Adolescents", 39 National Conference 15-17 Nov. 2007, NIN Hyderabad, Pg. No. 103..
2. Gupta Shavika, “Adolescent Food Habil checkins. : Developers and Validation of a Measure for Healthy Eating Benaviour" - XXXVI Annual Meet 5,6, Nov. 2004,NSI, CFTRI My sore, page no.30.
3. Kulsum A. Lakshmi J. Januna Prakash, "Determining Factors for Dietary Adequacy of Nine School. Children Residing in a slum Area" XXXVI Annual Meet 5,6, Nov. 2004 Mysore -NSI, CFTRI Pg. No. 95.

**4.** प्रा.महाजन भा.ie., योजना मासिक, मार्च 2005, पृ. क्र. 78

**5.** प्रा.रसाळ आर.जी., महाराष्ट्रातील कुपोषण समस्या आणि उपाय योजना, नोव्हेंबर 2006, पृ. क्र. 23

**6.** ग्रामगीता, राठोड एम. के., (प्रकाशाक) (1 मे 2000) ग्रामनिर्माण पंचक चौदावा अध्याय, ग्राम आरोग्य ओवी नं. 77,93, पृ. क्र. 154, 155, संकलन संपादक, माधव राजगुरू.

**7.** Samantray P. and Pradhan S., "Impact of Nutrition Education Through Games to School Children", XXXVI Annual Meedt 5,6, Nov. 2004, NSI, CFTRI Mysore, Pg. No. 57

**8.** मागासलेल्या क्षेत्रातील मुलांवर कुपोषणाचा होणारा परिणाम आणि उपाय, एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र न्यु आर्टस्, कॉमर्स ऍन्ड सायन्स कॉलेज, वर्धा, पृ. क्र. 58, 89.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# पोषक आहाराच्या अभावामुळे 0 ते 6 वर्ष वयोगटातील बालकांमध्ये वाढणारे कुपोषणाचे परिणाम

डॉ. सुजाता ब. सबाने (झाडे)
विभाग प्रमुख गृह अर्थ शास्त्र
श्री. शिवाजी कला व वाणिज्य
महाविद्यालय, अमरावती.

## प्रस्तावना :

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत 6 वर्षाखालील मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने सर्व सेवा देत असतांना ग्रामीण पातळीवरील अंगणवाडी हा केंद्रबिंदू असून सेविका व मदतनीस यांचे मार्फत विविध सेवा देण्यात येतात अंगणवाडी सेविकांची कार्यतत्परता लोकांच्या सेवेमध्ये सहभागी इत्यादी बाबी व कार्यक्रम लोकाभिमुख होण्यासाठी महत्त्वाचे आहे त्याकरिता आदर्श अंगणवाडी केंद्र विकसित करणे गरजेचे आहे. 0 ते 6 वर्ष वयोगटातील मुलांना पोषण आहार व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे. बालमृत्युचे प्रमाण,बालरोगाचे,कुपोषणाचे शाळा गळतीचे प्रमाण कमी करणे.

## विषयाची निवड :

अमरावती जिल्ह्यामध्ये अनेक वर्षापासून आदिवासींच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक समस्याबाबत आदिवासी संघटनाकडून अनेकदा धरणे, मोर्चे व उपोषण करून सुद्धा येथील कार्यालयाकडून कोणत्याही समस्या सुटलेल्या नाहीत. एवढेच नव्हे तर येथील निगरगट्ट अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अमरावती जिल्ह्यात बालमृत्युची समस्या निर्माण होऊन हजारो आदिवासी मुलांचे बळी गेलेले आहेत. येथील आदिवासी करिता अनेक वर्षापासून सेवाभावी वृत्तीत काम करणाऱ्या व येथील अधिकाऱ्यांना समस्या विषयी योग्य उपाययोजना सुचविणाऱ्या निष्पाप आदिवासी युवक, कर्मचारी व शेतकरी यांच्यावरच हे अधिकारी खोटे गुन्हे दाखल करून आदिवासी संघटनेचा आवाज दडपून टाकण्याचे धोरण अवलंबीत आहेत. असा हा अन्याय थांबविण्यासाठी आणि खऱ्या आदिवासींना न्याय मिळावा याकरिता एकात्मिक योजना १९८२-८३ पासुन या भागात राबविण्यात येत आहे असे असुनही कुपोषणाचा प्रश्न गंभीर बनत चाललेला आहे.

एकात्मिक बालविकास योजना केंद्र सरकार पुरस्कृत असुन चिखलदऱ्याच्या एकुण १८१ गावात अंगणवाडी द्वारे राबविली जात आहे. ही योजना राबवितांना नेमक्या अडचणी कुठे वयेत आहे ते समजावून घेणे. आवश्यक आहे. योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी लक्षात आलेल्या

आवश्यक सूचना महत्वपूर्ण ठरतील, व ही योजना व ही योजना यशस्वीपणे राबविल्या गेली तर गावाची लहान मुले, जी उद्याची पिढी आहे, त्यांचे आरोग्य उत्तम राहण्यास, शारीरिक,मानसिक पर्यायाने देशाचा विकास होण्यास मदत होईल. या सर्व बाबी लक्षात घेऊन प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

## उद्दिष्टे :

0 ते 6 वर्ष वयोगटातील मुलांचा पोषण आहार व आरोग्य विषयक दर्जा सुधारणेव मुलांना योग्य शारीरिक,मानसिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे.

## संशोधन पद्धती:

सत्याचे आकलन होण्यासाठी सामाजिक संशोधन पद्धती एक जवळचा मार्ग आहे काल पी आर सन 1911 कोणतेही विज्ञान शाखेत नवीन तत्वे अथवा नवीनच ते शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे यांचे पुन्हा पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला व पद्धतशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय. प्रस्तुत विषयाच्या संदर्भात अभ्यास करताना अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तहसील ची निवड करण्यात आलेली आहे.

## परिणाम व चर्चा:

ऑल इंडिया इस्टिट्यूट ऑफ सायन्सने 1981 मध्ये ग्रामीण विभागात एक पाहणी केली.त्यानुसार ग्रामीण विभागात 77 टक्के मुले व आदिवासी भागातील 22 व 27 टक्के मुले तिसऱ्या व चौथ्या श्रेणीच्या कुपोषणाचे बळी होते. (टंडन19981)

**0 ते 3 वर्ष व 3 ते 6 वर्ष वयोगटातील मुलांच्या पोषणाच्या स्थितीनुसार अंगणवाडीचे विभाजन**

| अ. क्र. | अंगांवडीतील कुपोषण | अंगणवाडी | |
|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी |
| 1 | कुपोषण नसलेली | 01 | 10.00 |
| 2 | कुपोषण कमी प्रमाणात | 01 | 10.00 |
| 3 | कुपोषण मध्यम प्रमाणात | 03 | 30.00 |
| 4 | कुपोषण जास्त प्रमाणात | 05 | 50.00 |
| | **एकूण** | **10** | **100.00** |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनात येते की 50% अंगणवाड्यांमध्ये पोषण जास्त प्रमाण 30 टक्के अंगणवाडीमध्ये मध्यम प्रमाण व 10 टक्के अंगणवाडीमध्ये कुपोषण कमी प्रमाणात व 10% अंगणवाडीमध्ये नसल्याचे आढळते.

**नवजात बालकाचा मृत्युदर (2004 - 06)**

| अ. क्र. | 0 ते 1 वयोगटातील बालकांचा जन्म | 2004 - 05 | 2005 - 06 | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आरोग्य विभागानुसार | संशोधंनकर्ती नुसार | आरोग्य विभागानुसार | संशोधंनकर्ती नुसार |
| 1 | जिवंत जन्म | 188 | 188 | 114 | 114 |
| | 7 दिवशच्याआत मृत्यू | 004 | 005 | 005 | 006 |
| | 7 दिवस ते 1वर्षा मध्ये मृत्यू | 007 | 009 | 002 | 004 |
| | आय. एम. आर. | 58.51 | 74.46 | 61.40 | 87.71 |

वरील तकत्यावरून असे दिसून येते की, आरोग्य विभागाद्वारे मिळालेल्या 2004 - 05 मध्ये बाळमृत्युचे प्रमाण 58.81% आहे. संशोधनकर्तीला मिळालेल्या महितीनुसार बाळमृत्यु दर 74.46% आहे.

2005 - 06 आरोग्य मध्ये आरोग्या विभागाद्वारे मिळालेल्या महितीनुसार बालमृत्यू दाराचे प्रमाण 61.40 व संशोधनकर्तीच्या मते 87.71 आहे. आरोग्या विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीपेक्षा संशोधनकर्तीच्या मते मिळविलेल्या महितीपेक्षा बालमृत्यूदर हा जास्त असल्याचे दिसून येते.

अभ्यासक्षेत्रातील पोषनाची स्थिति व बालमृत्यू दाराच्या प्रमाणावरुण असे दिसून येते की, पोषण आहार व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे, बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण कमी करणे एकात्मिक बालविकास योजनेच्या या दोन उद्दिष्टांची पूर्तता होत नसल्याचे आढळून आले.

जन्म ते सहा वर्षे वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे व प्रमाण कमी करणे ही एकात्मिक बालविकास सेवा योजनेची महत्वाची उद्दिष्टे आहेत. बालमृत्युचे अभ्यासक्षेत्रातील योजनेच्या या उद्दिष्टांची पुर्तता प्रत्यक्षात पडताळुन पाहण्यासाठी अंगणवाडीच्या पोषणाचा दर्जा व बालकाच्या मृत्युदर हा आरोग्य विभागाकडून मिळालेली माहिती व संशोधकाने (२००४-२००६) या कालावधीत संकलीत केलेल्या माहितीनुसार तक्ता वर्गीकृत करण्यात आली आहे.

**0 ते 3 वर्ष वयोगटातील मुलांच्या पोषणाच्या दर्जानुसारनिवडलेल्या अभ्यास क्षेत्रातील आरोग्य विभाग व संशोधनकरतींनी मिळविलेया माहितीचे तुलनात्मक विभाजन**

| पोषणाचा दर्जा | 2004-5 | | 2005-06 | |
|---|---|---|---|---|
| | आरोग्य विभाग चिखलदरा मार्फत मिळविलेली टक्केवारी | संशोधनकरतींनी मिळविलेली टक्केवारी | आरोग्य विभाग चिखलदरा मार्फत मिळविलेली टक्केवारी | संशोधनकरतींनी मिळविलेली टक्केवारी |
| सर्वसाधारण | 40.77 | 20.00 | 47.79 | 27.59 |
| ग्रेड I | 33.17 | 41.50 | 28.87 | 38.50 |
| ग्रेड II | 18.60 | 23.00 | 15.83 | 24.00 |
| ग्रेड III | 06.33 | 10.00 | 05.23 | 05.50 |
| ग्रेड IV | 00.83 | 05.50 | 02.28 | 04.50 |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनात येते की 50% अंगणवाड्यांमध्ये पोषण जास्त प्रमाण 30 टक्के अंगणवाडीमध्ये मध्यम प्रमाण व 10 टक्के अंगणवाडीमध्ये कुपोषण कमी प्रमाणात व 10% अंगणवाडीमध्ये नसल्याचे आढळते.

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की अभ्यास क्षेत्रांमधील आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून 0 ते 3 वर्षाच्या वयोगटातील दोन हजार चार ते पाच या वर्षातील सर्वसाधारण बालकांचे प्रमाण 40.77 टक्के तर ग्रेड I मध्ये 33.70 टक्के ग्रेट II मध्ये 18.60 टक्के ग्रेट III मध्ये 6.63% व ग्रेड IV मध्ये 0. 83 टक्के याप्रमाणे निदर्शनात आले.

वरील तक्त्यावरून असे निदर्शनात येते की 50% अंगणवाड्यांमध्ये पोषण जास्त प्रमाण 30 टक्के अंगणवाडीमध्ये मध्यम प्रमाण व 10 टक्के अंगणवाडीमध्ये कुपोषण कमी प्रमाणात व 10% अंगणवाडीमध्ये नसल्याचे आढळते.

## निष्कर्ष:

0 ते 3 वर्षे गर्भवती व स्तनदा यांना मिळणाऱ्या सेवांची उपयोगिता 50 %च्या वर आहे. अंगणवाडीच्या सेवांची उपयोगिता 15 ते 45 वर्षे महिलांकरिता 50 टक्के पर्यंत आहे. 0 ते 3 वर्षे वयोगटातील 80% मुले पूरक पोषण आहाराचा लाभ घेतात. 3 ते 6 वर्षाची 90%मुले पूरक पोषण आहार घेतात. 75% गर्भवती पूरक पोषण आहाराचा लाभ घेतात आणि 70% टक्के स्तनदा या पूरक पोषण आहाराचा लाभ घेतांना दिसून आले. आरोग्य व पोषण शिक्षण आरोग्य तपासणी व औषधांचा पुरवठा नियमित होत नाही. तसेच आहाराचे वितरण चार महिने बंद पडल्यामुळे पावसाळ्यात 0 ते 3 वर्षे वयोगटातील कुपोषणाचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले.

## सूचना व शिफारशी:

कमी वयात विवाह दोन अपत्यांमध्ये अंतर व दोन पेक्षा जास्त पत्ते याबाबत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

प्रसुती करणाऱ्या दाईंना प्रसूतीच्या वेळी उपचार करण्याचे प्रशिक्षण देण्यात यावे.

शासनाने रोजगार उपलब्ध करून त्यांच्या मुलांची संगोपनाची लोक जबाबदारी त्यांच्यावर वरच सोपवावी म्हणजेच त्या मुलांचे संगोपन करणे ही शासनाची जबाबदारी आहे हा दुराग्रह दूर करावा.

## संदर्भ सूची (BIBLIOGRAPHY):


1. Bhatnagar, B. S. and Singhal, A. 1984. Knowledge, attitude and expectation of women participation towards ICDS. Indian Journal of Extension Education, 6.
2. बोधनकर व आलोणी, १९९९. सामाजिक संशोधन पद्धती श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर. भांडारकर, पु.ल. १९७६, सामाजिक संशोधन पद्धती मा.वि. मंडळ, नागपुर,
3. Panjape, R.K. and Bhagwat, R. 1986. Perception and participation of the community in ICDS in Maharashtra state, 8.
4. Adhish, S.N. et al. 1989. Cities on research ICDS, An overview. Vol. 1 (1975-85), National Institute of Public co-operations and Child Development, New Delhi, 298.
5. Agrawal, D.K. 1982. Infant feeding practices and environmental hazards during weaning.Baroda Journal of Nutrition, No. 9:185-189.

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# मानवी जीवनात पोषणाची भूमिका - एक चिंतन

**डॉ. वैशाली मेश्राम**
गृहअर्थशास्त्र विभाग,
बाबाजी दाते कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, यवतमाळ

मानवी जीवन हे फार गुंतागुंतीचे असते. मानवी शरीरात विविध अवयव आपआपले कार्य करीत असतात. हे कार्य सुरळीत चालण्यासाठी प्रत्येक अवयवाला आवश्यक असणारा पोषक घटक मिळणे अत्यंत आवश्यक असते, अन्यथा त्या अवयवाचे काम सुरळीत चालत नाही.

आयुष्याची जडणघडण ही योग्य आहारावर अवलंबून असते. म्हणजेच गर्भावस्थेत जर सकस व पौष्टिक आहार मातेला मिळाला तर अर्थातच बाळ सुदृढ जन्माला येतो व तो दिर्घायुषी, आरोग्यदायी जीवन जगुन एक चांगले व्यक्तिमत्व घडवित असतो. म्हणून मानवी विकास हा पुर्णतः योग्य पोषणावर अवलंबून असलेला दिसून येतो. पोषण पक्रियेत अन्नाचे फक्त सेवनच अपेक्षीत नसून त्याचे पचन व शोषण आणि त्याद्वारे प्रत्येक अवयवाला आवश्यक घटकाचा पुरवठा होणे अपेक्षित आहे, तरच त्या घटकाच्या सेवनाला उत्तम पोषक घटक संबोधले जाईल. पोषण हे अश्या प्रकारच्या प्रक्रियांची श्रृंखला आहे, जी मानवी शरीर सुदृढ ठेवण्यास मदत करते. वाढ व विकासासाठी पोषणाची अत्यंत आवश्यकता असते. म्हणजेच पोषण ही एक क्रियाशिल प्रक्रिया असून त्यामुळे व्यक्ति ही सतत क्रियाशील राहून कार्यमग्न राहते. त्याच्या शरीराची पुन:निर्मिती करण्यासाठी आणि ऐच्छीक व अनैच्छीक क्रिया सुरळीत चालण्यासाठी अन्नाचे पचन, शोषण व अभिसरण होवून त्यातून पोषक घटक मिळणे आवश्यक असते.

## उद्दिष्ट्ये :

1) पोषणाचे महत्व समजून सांगणे.
2) पोषणाच्या अभावाचे दुष्परिणाम सांगणे.
3) पोषणाची शास्त्रोक्त माहिती पोहचविणे.
4) जीवनसत्वाची माहिती पोहचविणे.
5) योग्य पोषणाकरीता असलेल्या विविध बाबींचे ज्ञान पोहचविणे.

## पोषण म्हणजे काय :

WHO ने केलेल्या व्याख्येनुसार आरोग्य म्हणजे रोग व शारीरिक दुर्बलतेचा अभाव नव्हे तर शारीरिक, मानसिक व सामाजिक स्वास्थ्य म्हणजे आरोग्य होय. पोषण व आरोग्य हे एकमेकांशी सहसंबंधीत असतात. पोषण निट झाले तर आरोग्य उत्तम राहते. उत्तम पोषण हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग समजला जातो. शरीराला मिळणाऱ्या पोषणावर शरीरसौष्ठव, आरोग्य पुनर्निर्मिती कार्य तसेच वाढ व विकास अवलंबून असतो. पोषण आहाराचे नियोजन करतांना व्यक्तीचे वय, लिंग, शरीर स्थिती (गर्भावस्था, दुग्धसर्जन काळ, इ.), कामाचे स्वरूप, आजारपण यांचा विचार करावा लागतो.

## पोषक घटका अभावी होणारे दुष्परिणाम :

पोषक अन्नाची निवड करतांना योग्य पोषक घटकाची निवड केल्या गेली नाही तर आहारविषयक सवयी पोषणावर प्रभाव करतात. शेतमजुर, नोकरी करणाऱ्या स्त्रिया पोषणाबाबत पुरेसे लक्ष देत नाहीत. त्यामुळे विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. पोषणाअभावी विशेषतः शेतमजुरी करणाऱ्या स्त्रीयांमध्ये आजारांची लक्षणे आढळतात. प्रौढांमध्ये कॅल्शिअम व जीवनसत्वाच्या कमतरतेने अस्थिमृदूता, वाक येणे, पाठीच्या कण्यात विकृती, पाय-सांधे दुखणे, इ. आजार आढळतात. जीवनसत्व 'अ' च्या कमतरतेने डोळे व त्वचेचे रोग झालेले आढळतात. रातांधळेपणा, त्वचेवर पुरळ, तसेच त्वचारोग झालेले आढळतात. जीवनसत्व 'ब' च्या कमतरतेने बेराबेरी, अशक्तपणा तसेच स्नायुंची ठिसुळता आढळून येते.

जीवनसत्व 'क' च्या कमतरतेने प्रामुख्याने स्कर्व्ही हा रोग होतो. यामध्ये रक्तस्त्राव जास्त प्रमाणात होणे, हिरड्यांमधून रक्त येणे, दात सैल पडणे अशी लक्षणे दिसून येतात.

लोहाची कमतरता रक्तक्षयाला आमंत्रण देते. यामुळे बाळ व माता मृत्युचे प्रमाण जास्त असते. तसेच अकाली प्रसुती, शिशुचे वजन कमी अशी लक्षणे दिसून येतात. आयोडीनच्या कमतरतेने गॉइटर हा घशाचा रोग होतो. थायरॉईड ग्रंथीतील थॉमरॉक्सीन स्त्रावाच्या निर्मितीसाठी आयोडीन आवश्यक आहे.

वरील दुष्परिणाम टाळण्यासाठी पोषणदर्जा सुधारणे आवश्यक असते. "पोषणाचा दर्जा सुधारणे म्हणजे अनेक अन्नगटांची एकत्र गुंफण करून पाहिजे त्या पोषण मूल्यांचे कमी-अधिक प्रमाणात संघटन करणे आणि आरोग्यवर्धकता त्या खाद्यपदार्थातून प्राप्त करणे, म्हणजे अन्नाचा पोषणदर्जा सुधारणे होय." यासाठी खालील प्रक्रिया प्रामुख्याने केल्या जातात.

1) मोड आणणे (Germination)
2) खमिरीकरण (Fermantation)
3) पूरक पदार्थाचा पुरवठा (Supplementation)

4) पर्यायी पदार्थ (Substitution)

5) समृद्धीकरण आणि सुदृढीकरण (Fortification and Enrichment)

पोषण मूल्यांचा दर्जा वरील प्रक्रीयेद्वारे वाढवून पोषक घटक घेतल्यास आजाराला काही प्रमाणात आळा घातला जातो. अन्न तयार करतांना वनस्पतीज आणि प्राणित खाद्यपदार्थांचा आवश्यकतेनुसार, रूचीनुसार आणि सोयीनुसार उपयोग केला पाहिजे. खाद्यपदार्थातील मुळ घटकांचे प्रमाण भिन्न भिन्न आणि विविध असते. ज्यावेळी अन्न शिजविल जाते, त्यावेळी या मुळ घटकांची एकमेकांवर क्रिया प्रक्रिया होत असते. त्यामुळे पदार्थास चव, वास व रंग प्राप्त होतो. यामुळे पदार्थ रूचकर बनविणे, पोषक घटक कायम ठेवणे, त्यातील जंतूंचा नाश करणे, या सर्वांचा विचार करून पदार्थ तयार केला जातो. अन्न शिजविण्याच्या क्रियेशी रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवजंतूशास्त्र तसेच कला यांचा संबंध येतो.

म्हणून मानवी जीवन सुदृढ राहण्यासाठी कॅलरी, प्रथिने, कॅल्शिअम, लोह, थायमीन, तृणधान्ये, डाळी, पालेभाज्या, कंदमुळे व दुग्धाचा समावेश आहारामध्ये असावा.

विविध आरोग्यविषयक समस्येने ग्रासलेल्या बऱ्याच महिला असून औषधोपचार न घेता किरकोळ तक्रारी समजून त्याकडे दुर्लक्ष करतांना निदर्शनास आले. अश्यावेळी त्यांना आर्थिक दृष्टीने परवडेल असा पौष्टीक आहार तसेच निरोगी स्वास्थ्याविषयी जागरूक असणे महत्वाचे वाटते, तरच खऱ्या अर्थाने मानवी जीवन सक्षम बनेल.

## निष्कर्ष :

1) पोषणाचे महत्व काम करणाऱ्या स्त्रीयांना माहित नाही.

2) योग्य पोषणाअभावी होणाऱ्या विविध दुष्परिणामाला सामोरे जावे लागते.

3) महिलांना पोषणाची शास्त्रोक्त माहिती नव्हती.

4) विविध जीवनसत्वाअभावी होणारे रोग त्यांना माहिती नव्हते.

5) विविध आजार, दुर्बलता यामुळे समाज खिन्न अवस्थेत दिसून आला.

## शिफारशी :

1) महिलांना आहारासंबंधी शास्त्रोक्त ज्ञान आहे.

2) शासनातर्फे, सामाजिक संस्थेव्दारे पोषणाचे महत्व पटवून देण्याकरीता शिबीरांचे आयोजन करावे.

3) विविध माध्यमांव्दारे पोषक घटकांच्या कमतरतेचे दुष्परिणाम समजून सांगून महत्व पटवून सांगावे.

4) पोषक आहाराचे वाटप करावे.

5) सहकारी पातळीवर विविध कार्यक्रम घेवून महिलांना उत्तम आरोग्य जपण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

~~~~~~
~~~~~~

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्र निर्माण में महात्मा गांधी के आर्थिक विचारों का योगदान

**सबीहा नूरी**

**अतिथि प्रवक्ता, मध्यकालीन इतिहास विभाग**

**हमीदिया गर्ल्स पी0 जी0 कॉलेज संबंध इलाहाबाद विश्वविद्यालय, प्रयागराज, उत्तर प्रदेश**

**Email – sabeehanoori123@gmail.com**

**Mobile No. 7860101858**

## प्रस्तावना

महात्मा गांधी के सिद्धांतों आदर्शों और राजनीतिक गतिविधियों ने मुझे सर्वाधिक प्रभावित किया है। भारतीय इस महान हस्ती, जिसने अपने विचारों से विश्व मानवता को एक नई दिशा एवं नई रोशनी प्रदान की पूरी तरह कृतज्ञ है। आज भी उनके आदर्शों शिक्षाओं एवं प्रयोगों की प्रासंगिकता पूरी तरह कायम है। आज के संदर्भ में भी राष्ट्र निर्माण के लिए गांधी का सत्य, अहिंसा, साध्य और साधनों का उपयोग तथा मानव में चारित्रिक गुणों का विकास आदि की सशक्त जरूरत है।1

**शोध पत्र में वर्णनात्मक शोध पद्धति का प्रयोग किया गया है।**

**अर्थ रचना ऐसी होनी चाहिए कि किसी को भी**
**अन्न और वस्त्र के अभाव की पीड़ा ना सहनी पड़े।**
**महात्मा गांधी**

आधुनिक आर्थिक विचारधारा पश्चिम की देन है वहां हुई औद्योगिक क्रांति के बाद १८ वीं सदी के उत्तरार्ध में इसकी रूपरेखा बनी,गांधी जी के आर्थिक विचारों को अगर हम ठीक से समझना चाहे तो पश्चिम की इस आर्थिक विचारधारा से उत्पन्न धारणाओं से मुक्त रहकर ही ऐसा किया जा सकता है। गांधीजी के आर्थिक विचारों का अध्ययन उनके नैतिक सिद्धांतों और आदर्शों की दृष्टि से तथा उस समय भारत में जो स्थिति विद्यमान थी और आज भी है उस को ध्यान में रखकर ही किया जा सकता है। **2**

गांधी जी कहते हैं सच्चा श्रम वही है जिससे कोई उपयोगी वस्तु उत्पन्न हो, उपयोगी वह है जिससे मानव जाति का भरण पोषण हो, भरण पोषण वह है जिससे मनुष्य को यथेष्ट भोजन वस्त्र मिल सके जिससे वह नीति के मार्ग पर स्थिर रहकर अजीवन सत्कर्म करता रहे, इस दृष्टि से विचार करने से बड़े.बड़े आयोजन बेकार माने जाएंगे संभव है, कि कल कारखाने खोलकर धनवान होने का मार्ग ग्रहण करना पाप कर्म मालूम हो पैसा पैदा करने वाले बहुतेरे मिलते हैं पर उसका यथा विधि उपयोग करने वाले कम पाए जाते हैं जिस धन को पैदा करने में जनता तबाह होती  हो वह धन निकम्मा है आज जो लोग करोड़पति हैं वह बड़े.बड़े और अनितिमय संग्रामो के कारण  करोड़पति  हैं वर्तमान युग के अधिकांश युद्ध का मूल कारण धन का लाभ ही दिखाई देता है। **3**

गांधीजी आर्थिक दृष्टि भी अन्य विचारों की तरह सत्य व अहिंसा की बुनियाद पर आधारित है। **इसी अहिंसा दृष्टि को उनके आर्थिक विचारों का स्रोत कहा जा सकता है।** गांधीजी ने आधुनिक पूंजीवादी व्यवस्था में लालच शोषण सत्ता और हिंसा में सीधा संबंध देखा, जो माननीय समाज में अलगाव को बढ़ावा दे रहे थे पश्चात औद्योगिकी भौतिकवादी सभ्यता के कटु आलोचक थे। वे मशीनीकरण व्यक्तित्वलोप तथा नौकरशाही के विरोध में थे जो की आधुनिक वृहद आर्थिक एवं सामाजिक संरचना के आयाम थे **गांधीजी की आर्थिक विचारों में समानता का आधार समस्त श्रम के सामान महत्व में है।** समस्त शोषण दमन और वर्ग विभाजन की जड़ में शरीर श्रम की अनुपस्थिति निहित है शरीर श्रम माननीय व गैर माननीय श्रम के बीच की खाई को पाटकर कर सामाजिक आर्थिक व्यवस्था में अलगाव और अकेलेपन की समस्याओं से निजात दिलाता है। महात्मा गांधी ने आधुनिक अर्थशास्त्र की विभिन्न आधारों पर आलोचना की उनका विरोध अर्थशास्त्र की मूल बुनियाद से ही था कि वह नैतिकता को अपने में समाहित नहीं करता है, उनकी दृष्टि में जो अर्थशास्त्र नैतिकता को अपने में समावेश नहीं करता वह पाप युक्त है, **गांधीजी के लिए मनुष्य होने का अर्थ ही नैतिक होना है** और उस अर्थशास्त्र को भी खारिज करते हैं जो व्यक्तियों के नैतिक उत्कर्ष या पतन से अपना कोई संबंध नहीं रखता है। गांधी जी ने आधुनिक अर्थव्यवस्था के इस स्वरूप को अच्छी तरह देखा और समझा था इसलिए उन्होंने उपभोग को ही सत्याग्रही उपभोग बनाया यह अवधारणा अपरिग्रह से भी पुष्ट होती है। अपरिग्रह एक व्यक्तिगत मूल्य नहीं है बल्कि सामाजिक गुण भी हो जाता है एक हिंसक व्यवस्था में सत्याग्रह करने का गुण यह अपरिग्रह अपनी आवश्यकताओं को तो पूरा करता है परंतु कृतिम मांगो आवश्यकताओं से खुद को अलग करता है।4

ग्राम स्वराज गांधीजी के आजीवन शोध का परिणाम है जो भारत के लाखों भूखों मरने वाले लोगों के साथ एक रूप हो गए थे, उन्होंने भारत की सारी बुराइयों के रामबाण उपाय के रूप में ग्राम स्वराज्य की योजना हमारे सामने रखी है यह सारे संसार के लिए भी परिणामकारी सिद्ध हो सकती है।

1830 में भारत के ब्रिटिश गवर्नर सर चार्ल्स मेटकाफ अपने ग्राम समाज का निम्नलिखित शब्दों में वर्णन किया था, यह ग्राम समाज छोटे.छोटे प्रजातंत्र हैं जिन्हें अपनी आवश्यकता की लगभग हर वस्तु अपने भीतर ही मिल जाती है और जो विदेशी संबंधों से लगभग स्वतंत्र होते हैं, ऐसी परिस्थितियों में भी टिके रहते हैं जिनमें दूसरी हर वस्तु का अस्तित्व मिट जाता है ग्राम समाज का यह संघ जिनमें से प्रत्येक समाज अपने आप में एक छोटा सा स्वतंत्र राज्य होता है उनके सुख का बहुत बड़ी हद तक साधन बनता है और उसके अंतर्गत वह बड़ी मात्रा में स्वतंत्रता और स्वाधीनता का उपयोग करते हैं उपर्युक्त वर्णन में भारत की ग्रामीण अर्थव्यवस्था की प्रशंसा की गई है।5

हर एक गांव को अपने पांव पर खड़ा होना होगा अपनी जरूरतें पूरी कर लेनी होंगी ताकि वह अपना सारा कारोबार स्वयं चला सके, यहां तक कि वह सारी दुनिया से अपनी रक्षा स्वयं कर सके।6 खादी का मतलब है देश के सभी लोगों की आर्थिक स्वतंत्रता और समानता का आरंभ हरे की संपूर्ण स्वदेशी की भावना बढ़ानी चाहिए, **खादी इति का अर्थ है जीवन के लिए जरूरी चीजों की उत्पत्ति और उनके बंटवारे का विकेंद्रीकरण** अर्थात के गांधी जी के खादी द्वारा सभी को आर्थिक रूप से आत्मनिर्भर बनाना चाहते थे। 7

**खादी का मुख्य काम है हर गांव को अनाज और कपड़े के बारे में आत्मनिर्भर बनाना।** 8 देश की आर्थिक नीति ऐसी होनी चाहिए कि जहां कच्चा माल पैदा होता है। वही उससे संबंध रखने वाले उद्योग भी चलें आर्थिक और राजनीतिक दृष्टि से इसी को स्वदेशी आंदोलन कहा जाता है।9

स्वदेशी धर्म इस युग का महान धर्म है, और आज व्यापार उद्योग में आगे बढ़े हुए देश और एक देश में भी व्यापार उद्योग में आगे बढ़े हुए वर्ग दूसरे पिछड़े देशों और वर्गों का शोषण कर रहे हैं, और शोषण करने वालों वाले देश और वर्गों में भी अंदर ही अंदर जो धात स्पर्धा चल रही है उसके कारण दुनिया में आज सब कहीं युद्ध की स्थिति खड़ी हुई दिखती है। **दलित और शोषित वर्गों तथा देशों के लिए इससे बचने का एकमात्र उपाय स्वदेशी धर्म ही है**।10

गांधीजी कहते हैं मैं मशीनों का कतई हिमायती नहीं हूं जो या तो बहुत से लोगों को गरीब बना कर मुट्ठी भर लोगों को अमीर बनाती है, या अनेक लोगों के उपयोगी श्रम को अकारण विस्थापित कर देती है। मशीनीकरण वहां ठीक है जहां काम की तुलना में काम करने वालों की कमी है उस स्थिति में जबकि काम की अपेक्षा उपलब्ध श्रमिकों की संख्या ज्यादा हो जैसे कि भारत में है मशीन बुराई ही पैदा करती है। हमारे सामने समस्या यह नहीं है कि हम अपने गांव में रहने वाले लाखों करोड़ों लोगों को आराम किस प्रकार पहुंचाएं हमारी समस्या तो यह है कि हम उनके खाली समय के उपयोग के साधन ढूंढे जो साल में 6 महीने के कार्य दिवसों के बराबर बैठता है , **अर्थात गांधीजी मशीनों के विरोधी नहीं थे बल्कि श्रमिकों को विस्थापित कर के उन्हें बेरोजगार बना देने से चिंतित थे**।11

मेरा विरोध यंत्रों के लिए नहीं है बल्कि यंत्रों के पीछे जो पागलपन चल रहा है उसके लिए है आज तो जिन्हें मेहनत बचाने वाले यंत्र कहते हैं उनके पीछे लोग पागल हो गए हैं उनसे मेहनत जरूर बचती है लेकिन लाखों लोग बेकार होकर भूख से मरते हुए रास्तों पर भटकते हैं समय और श्रम की बचत तो मैं भी चाहता हूं परंतु किसी खास वर्ग की सारी मानव जाति की होनी चाहिए।12

आर्थिक समानता के लिए काम करने का मतलब है, पूंजी और मजदूरी के बीच के झगड़ों को हमेशा के लिए मिटा देना इसका अर्थ यह होता है कि एक ओर से जिन मुट्ठी भर पैसे वाले लोगों के हाथ में राष्ट्र की संपत्ति का बड़ा भाग इकट्ठा हो गया है उनकी संपत्ति को कम करना और दूसरी ओर से जो करोड़ों लोग आधा पेट खाते और नंगे रहते हैं उनकी संपत्ति में वृद्धि करना, जब तक मुट्ठी भर धनवानो और करोड़ों भूखे रहने वालों के बीच बेइंतेहा अंतर बना रहेगा तब तक अहिंसा की बुनियाद पर चलने वाली राज व्यवस्था कायम नहीं हो सकती। आजाद हिंदुस्तान में देश के बड़े से बड़े धनी लोगो के हाथ में हुकूमत का जितना हिस्सा रहेगा उतना ही गरीबों के हाथ में भी होगा और तब नई दिल्ली के महलों और उनकी बगल में बसी हुई गरीब मजदूर बस्तियों के टूटे फूटे झोपड़ों के बीच जो दर्दनाक फर्क नजर आता है वह एक दिन को भी नहीं टिकेगा अगर धनवान लोग अपने धन को और उसके कारण मिलने वाली सत्ता को खुद राजी खुशी से छोड़कर और सब के कल्याण के लिए सबके साथ मिलकर बरतने को तैयार ना होंगे तो यह समझिए कि हमारे देश में क्रांति हुए बिना ना रहेगी।13

**गांधीजी के अनुसार इंसान की कमाई का उद्देश्य केवल भौतिक सुख पहना नहीं है बल्कि अपना नैतिक या रूहानी विकास करना है बल्कि गांधीजी ने अर्थशास्त्र के क्षेत्र में भी मानवीय आदर्शों और मानव कल्याण हेतु सत्य और अहिंसा का प्रतिपादन किया।**

गांधी जी ने अर्थ के क्षेत्र में सेवा नीति एवं सीमित आवश्यकताओं पर आधारित अहिंसा मूलक आर्थिक विचारों को प्रस्तुत किया जिसमें समानता का लक्ष्य एवं श्रम निष्ठा प्रधान थी।

आर्थिक समानता का सच्चा अर्थ है जगत के सब मनुष्यों के पास एक समान संपत्ति का होना यानी सब के पास इतनी संपत्ति का होना जिससे वह अपनी कुदरती आवश्यकताएं पूरी कर सके।14

गांधीजी कहते हैं कि मैं भारत का उत्थान इसलिए चाहता हूं कि सारी दुनिया उससे लाभ उठा सके, मैं यह नहीं चाहता कि भारत का उत्थान दूसरे देशों के नाश की नीव पर हो मेरे लिए देश प्रेम और मानव प्रेम में कोई भेद नहीं है दोनों एक ही है मैं देश प्रेमी हूं क्योंकि मैं मानव प्रेमी हूं मेरा देश प्रेम वर्जनशील है।15

**हमें सत्य और अहिंसा को केवल व्यक्तिगत व्यवहार के**
**लिए ही नहीं, वरन संपूर्ण समुदायों और राष्ट्रों के व्यवहार**
**का सिद्धांत बनाना है।**

**महात्मा गांधी**

**उपसंहार**

राष्ट्र निर्माण में गांधीजी की भूमिका अतुलनीय है अपने पूरे जीवन वह समावेशी समता मूलक और विविधताओं से भरे समाज के पक्ष में थे। सामाजिक और आर्थिक शोषण से लड़ने के लिए लोगों को मजबूत बनाने की दिशा में काम किया समाज को कमजोर करने वाली बुराइयों को भरपूर चुनौती दी गांधीजी दूरदर्शी थे और पुरुषार्थ में विश्वास करते थे उनका जीवन दर्शन आज भी सही मार्ग पर चलने के लिए प्रेरणा देता है।

गांधी जी ने ग्रामीण विकास पर खासतौर से जोर दिया वह गांव को आत्मनिर्भर बनाना चाहते थे उनका कहना था, भारत गांव या शहरों में नहीं कस्बों में बसता है ग्रामीण अर्थव्यवस्था को पोषने के लिए उन्होंने खादी हथकरघा हस्तशिल्प और पर जोर दिया कुटीर उद्योगों पर भी जोर दिया और लोगों से ग्रामीण उत्पादन बढ़ाने की अपील की महात्मा गांधी खादी को ग्रामीण विकास का केंद्र बिंदु मानते थे उनका विचार था मजबूत ग्रामीण अर्थव्यवस्था दो बुनियादी लक्ष्यों को पूरा करेगी वह जानते थे कि केंद्रीय अर्थव्यवस्था की बुराइयों को ठीक करने का एक ही रास्ता है और वह है विकेंद्रीकरण इसी के द्वारा धन और शक्ति को चंद हाथों में जाने से रोका जा सकता है।

## संदर्भ

1. महात्मा गांधी, ग्राम स्वराज्य, संस्करण : 2011, पब्लिकेशन, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली . 1, 5
2. महेश प्रसाद सिंह, गांधी के सपनों का भारत, पब्लिकेशन, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली - 2
3. डॉ0 जे0 सी0 कुमारप्पा, गांधी अर्थ विचार, प्रकाशक, सर्व सेवा संघ प्रकाशन राजघाट, वाराणसी 221001- 3
4. शंभू जोशी एवं मिथिलेश, गांधी दृष्टि के विविध आयाम, राजकमल प्रकाशक नई दिल्ली - 4 6,8,14
5. महात्मा गांधी, हिंद स्वराज संस्करण : 2017 पब्लिकेशन, शिक्षा भारती -12
6. महात्मा गांधी, मेरे सपनों का भारत, राजपाल एंड संस, कश्मीरी गेट, दिल्ली 110002 - 15

7. आर के प्रभु तथा यू आर राव, महात्मा गांधी के विचार] नेशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली 110016 द्वारा प्रकाशित -11
8. गांधीजी, रचनात्मक कार्यक्रम उसका रहस्य और स्थान, मुद्रक और प्रकाशक विवेकजितेंद्र भाई देसाई, नवजीवन मुद्रणालय अहमदाबाद 380014, पहली आवृत्ति 1946 .7,13
9. कि॰ घ॰ मशरूवाला, गांधी विचार दोहन, मुद्रक और प्रकाशक, नवजीवन मुद्रणालय अहमदाबाद 380014, संस्करण. 1964 .9,10

# रत्नाकर मतकरी यांच्या नाटकातून घडणारे समाजदर्शन

*डॉ. प्रवीणा नागपूरकर*
*मराठी विभाग प्रमुख*
*महिला महाविद्यालय नंदनवन नागपूर.*

आधुनिक काळात मराठी वाङ्मयाच्या बहुतांश प्रकारात आपली लेखनमुद्रा उमटविणाऱ्या लेखकांमध्ये रत्नाकर मतकरी हे नाव अग्रभागी आहे. एकांकिका, बालनाट्य, प्रायोगिक नाटक, आणि व्यावसायिक नाट्यलेखन अशा सर्व विभागात मतकरींनी वैविध्य जपत वैशिट्यपूर्ण लेखन केले आहे. नाटक या सांघिक कलेतून मतकरींनी वर्तमान जीवनातील अनेक सामाजिक, आर्थिक राजकीय मानसिक प्रश्न या माध्यमाद्वारे प्रेक्षक, वाचक समीक्षक यांच्या समोर ठेवलेत.

मतकरींच्या 'वाऱ्यावरचा मुशाफिर' मध्ये घराणे व घराण्याचा लौकिक, श्रीमंती सौन्दर्य यांच्या अतिरेकी अहंकाराने कुटूंबाचीच धूळधाण होते. घरात आईवडील व दोन मुले असतात पण त्या सर्वांची ओळख न्या. नंदगडकर यांच्या नावाने असते. कारण नंदगडकरांना माणसांची मन जपणे ही बाब कधी पटलीच नाही. श्रीमंतीच्या जोरावर हवी ती सुखे आणि मान मराबत मिळतो या विचारांनी त्यांना पुरते घेरले आहे. त्यामुळे मानवी मन, कौटुंबिक संबंध, जिव्हाळा, आपुलकी, प्रेम हे त्यांना कधी समजलेच नाही. थोडक्यात बेजबाबदार आणि बेमुर्वत वागण्याचे भयानक परिणाम असे संपूर्ण घराला भोवतात. तेव्हा कमीतकमी घरातल्या कर्त्या पुरुषांनी समजदारीने, विवेकाने आपली जबाबदारी सांभाळावी हेच महत्वाचे. वरपांगी प्रतिष्ठेने मिळणारा लौकिक हा कायम टिकणारा नसतो. त्यामुळे त्याच्या किती अधीन व्हावे हाही विवेक असायला हवा.

समाजात पांढऱ्या पोषाखातली, पण काळ्या मनाची कुटीलवृत्तीची माणसे कायम अवतीभवती असतात. पण नात्यांच्या मनोहर मखराखाली चालणारी ही कारस्थाने आपल्या लक्षातच येत नाही, हे वागणं वरपांगी, गोड, फसवं आहे हे लक्षातच येत नाही. अशी कुठलीही शंका न येता व्यक्ती सहज जीवन जगत असतो. कधीकधी अगदी जीवाभावाचा म्हणणारा जो सखा तोच केवळ संपत्तीसाठी कसा केसाने गळा कापतो. हे करायला माणुसकी, प्रेम नैतिक मूल्य या कशाचीही चाड यांना नसते म्हणून नात्यांवर असा आंधळा विश्वास ठेऊन आयुष्यभराची, प्रेमाची , मनाची, स्त्रीपणाची विटंबना करून घेण्यापेक्षा आधीच सतर्क राहणे केव्हाही चांगलं.

सत्ता आणि पैसा याच्या जोरावर मनमानी करीत दलित पीडितांची सतत पिळवणूक चालत आली आहे. मूल्य नैतिकता तर गुंडाळूनच ठेवली आहे. मतकरींचे लोककथा ७८ हे नाटक तर त्याच्या आगळ्यावेगळ्या शैलीमुळे फारच गाजलेले आहे. यात ग्रामीण भागातील जनजीवनाचा वेध घेतला आहे. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या वर्तनाने सर्वसामान्यांचे, गोरगरिबांचे जीवन अक्षरशः पायदळी तुडवल्या जाते, जगणंच नाकारल्या जाते अशा कवडीमोल जीवनाचे चित्रण मतकरींनी रेखाटले आहे.

सर्व समाजाची संवेदनाच गोठून गेलेल्या या समाजाला जागे करण्याचा प्रयत्न यातून केला आहे. क्षणोक्षणी जात असलेला माणुसकीचा बळी पाहून येणारी अस्वस्थता मतकरींनी उपस्थित केलेल्या प्रश्नातून जाणवल्या शिवाय राहत नाही. सत्ताधारी वर्गाची मुजोर हुकूमशाही, अन्याय सहन करणे किंवा अन्यायाला तोंड देण्यासाठी

एखादा मसीहा जन्माला येण्याची वाट पाहण्यापेक्षा ही वृत्ती नष्ट करायला ही अपेक्षा मतकरींनी यातून सुचविली आहे.

अनेक मिश्र घडामोडींनी भरलेला एक जाणता कालखंड म्हणजे जीवन ! ध्येयवादी आणि धाडसी व्यक्तींचे आयुष्य हे सर्वसामान्यांपेक्षा निश्चितच वेगळे असते . त्यांच्या मते संसार ही फार शुल्लक बाब असते असे असले तरी शेवटी ध्येयाच्या, कर्तव्याच्या आणि ओघाओघानेच येणाऱ्या प्रतिष्ठतेच्या मागे धावून थकलेल्या या जीवाला खरी विश्रांती, मनशांती हि घरीच मिळते. पण हे सत्य जेव्हा जाणवते तोपर्यंत बराच काळ उलटून गेलेला असतो पुलाखालून बरच पाणी वाहून गेलेले असते त्यामुळे समोर उभ्या ठाकलेल्या परिस्थितीत तो व्यक्ती काहीच करू शकत नाही. पण हि त्या एकट्याची कथा आणि व्यथा नसते तर त्याच्या कुटुंबीयांची व्यथा ठरते कारण तेही त्यात भरडले जातात. मतकरींचे दुभंग हे नाटक अशाच एका सत्यघटनेवर आधारित आहे. एकाचवेळी दोन स्त्रियांशी संसार करणाऱ्या पुरुषाची मानसिक भावनिक आणि शारीरिक ससेहोलपट चालली असते आणि याची परिणती शेवटी संसार विस्कटण्यात होते. चहुबाजूनी येणारा ताण, अवहेलना सहन करताना जीवन नकोसे होते सर्वत्र बेपर्वा वागण्याचे परिणाम हे भयानच असतात त्यामुळे अशी वेळच येऊ न देणे हेच खरे.

'माझं काय चुकलं?' हे असेच एका चिरंतन प्रश्नाला घेऊन येणारे नाटक. सासू सुनेतला पारंपरिक आग्रही संघर्ष यात रेखाटला आहे . मुळात हे नातेच खूप विरोधी आहे. एकाच पुरुषावर मालकी हक्क दाखवण्याच्या भाषेतून या तणावाला तोंड फुटते . आणि पाहता पाहता हा संघर्ष पराकोटीला पोहोचतो . इतका की तो मुलगा आणि सून एकमताने आत्महत्येचा निर्णय घेतात व अमलातही आणतात . यात नेमका मुलगा मृत्युमुखी पडतो व सून वाचते एवढेच नव्हे तर तिच्या पोटात वाढणाऱ्या गर्भाला काहीच इजा होत नाही .रोजच्या जीवनातल्या या सर्वसामान्य घडामोडींच्या आधारेच मतकरींनी मानवी स्वभावाचे भिन्न भिन्न नमुने साकारले आहेत . आपल्या कर्तृत्वाचा टेम्भा मिरवणारी सासू मुलाच्या मृत्यूनंतर मात्र बदलते हा बदल घडण्यासाठी मुलाचा मृत्यू आवश्यक होता का? त्यापलीकडे जाऊन आपली मानसिकता बदलली पाहिजे हे मतकरी सूचकपणे सांगतात.

मानव क्षणिक सुखाच्या मागे लागतो. त्याच्या या अविवेकी वागण्याचे परिणाम त्यांना जन्मभर वाहावे लागतात. तोही त्यांचा काही दोष नसताना.'जोडीदार' या नाटकातून अनौरस संतती या नाजूक विषयावरचा प्रश्न मतकरींनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडला आहे. कुटुंब हि संस्था स्त्री आणि पुरुष यांच्या सहजीवनातून विकसित होते. " अ हैप्पी मॅरेज इज फॉलिंग इन लव्ह अगेन अँड अगेन विथ द सेम पार्टनर " हि सुखी संसाराची व्याख्या फार सूचक आहे संसारातील स्त्री पुरुषाच्या स्थानाचे त्यांच्या सहजीवनाचे गमक यातून सुचवितात. आनंदी जीवनाची गुरुकिल्ली इतर कुठे नसून फक्त नि फक्त आपल्या मनोवृत्तीवर, खिलाडू वृत्तीवर अवलंबून असते.

अशा अनेक प्रश्नांच्या जोडीला मतकरींनी अजून एक सामाजिक प्रश्न विचारात घेतला ।पौगंडावस्थेतील आंतरिक भावनिक आणि मानसिक दृष्ट्या होणारा संभ्रम 'खोल खोल पाणी' या नाटकातून हा नाजूक विषय विचारात घेतला आहे. तर 'स्पर्श अमृताचा' नाटकातून कुष्ठरोग आणि त्याबद्दलची समाजाची धारणा याबद्दल फार महत्वाचे चिंतन आले आहे.

कुष्ठरोगी हा पूर्णपणे बरा होऊ शकतो व इतर चारचौघांसारखा जीवन व्यतीत करू शकतो हे सांगतानाच समाजाच्या मानसिकतेकडे लक्ष वेधतात याबाबत प्रत्यक्ष जे या समस्येतून जातात त्यांचे अनुभव फार बोलके असतात, चिंतनीय असतात. शरीराला झालेली हि जखम दुरुस्त होईल पण मनाला झालेल्या जखमेचं काय**?** या आजाराला समाज पूर्वग्रहदूषित नजरेने बघतो अगदी पुर्वजन्म पापपुण्य या संकल्पनेशी जोडतात त्यामुळे हे सर्व गैरसमज नातेसंबंधांवर परिणाम करतात. अशा या सामाजिक समस्येचा विचार या नाटकातून आलेला आहे.

असाच एक ज्वलंत प्रश्न म्हणजे हुंडाबळी होय**.** लेखकाने 'अग्निदिव्य' या नाटकातून हि समस्या समाजासमोर मांडली आहे**.** हि समस्या केवळ स्त्री पुरुष कुटुंब**,** समाज यापेक्षा समाजाच्या मानसिकतेशी संबाधित आहे. मुलगी लहान असतांना होणारे कोडकौतुक पण वयात येताच तिच्याकडे एक जबाबदारी म्हणून बघणे तिचे लग्न करून दिले की आपण त्या जबाबदारीतून मुक्त झालो मग तिचे सासर त्रास देणारे असेल तर तिचं नशीब म्हणून दुर्लक्ष करणे हे कसे चुकीचे आहे हे लेखकाने अतिशय प्रभावीपणे मांडले आहे**.** यामध्ये पालकाची भूमिका एक बाजू दर्शविते**,** पण ती मुलगी प्रत्यक्ष शिकलेली असतानाही स्वतःच्या मुक्तीचा प्रयत्न का करीत नाही ?आणि या यातना पासून सुटका करून घेताना माहेरशिवाय अन्य पर्याय नसतात का? शिवाय पालकांनी मुलीसाठी स्थळ बघत असताना तेथील सर्व माहिती काढणे किती आवश्यक आहे, तसेच समाज काय म्हणेल हा विचारच सोडून द्यायला हवा. समाजाच्या धाकाने अनेक कुप्रथा जोपासत बसतो तेही चुकीचे आहे हे सर्वानी उदार मनाने स्वीकारायला हवे तरच हे बदल होऊ शकतील व या प्रथा नामशेष होतील.

संघर्ष हा नाटकाचा आत्मा आहे. मतकरींनी आपल्या सर्व नाट्य कृतीद्वारे बदलत्या सामाजिक परिस्थितीचा**,** विचारांचा**,** परिचय करून देण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. प्राधान्याने मध्यम वर्गीयांना भेडसावणाऱ्या सामाजिक समस्या जसे हुंडापद्धती**,** जरठ कुमारीचा प्रश्न**,** सत्ताधाऱ्यांचा बळी ठरणारा सामान्य माणूस**,** स्त्री पुरुषांचा भावनिक मनोव्यापार**,** कुष्टरोगबद्दलचा समाजाचा दृष्टिकोण**,** सतेच्या अहंकारातून स्त्रियांचे होणारे शारीरिक व मानसिक शोषण या समस्यांना जनतेसमोर आणीत असतांनाच त्याविषयी आपली भूमिका कोणती? हा प्रश्न ते वाचकांच्या मनात निर्माण करतात. याशिवाय काही कौटुंबिक विषयात मानवी नातेसंबंधातील हळुवारपणा**,** प्रेम**,** विश्वास**,** कुटुंबाची अपरिहार्यता हेही सामाजिक प्रश्न त्यांनी निर्माण केलेत त्यावर त्यांनी चिंतनही केले. हे त्यांचे हे समाजाभिमुख विचार वाचकांनाही अंतर्मुख करून सोडतात हेही तितकेच खरे आहे.

**संदर्भ साधने**

**१) संपा. डॉ. नाईक राजीव आणि इतर –'रत्नाक्षरं' रत्नाकर मतकरी : व्यक्ति आणि साहित्य, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, मार्च २००६**
**२) संपा . जोग . रा . श्री . आणि इतर प्रदक्षिणा खंड १ अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा, कॉनटीनेन्टल प्रकाशन, विजया नगर पुणे १९४१**
**३) जोगळेकर सुषमा – आधुनिक मराठी नाटक : आशय आणि आकृतिबंध, श्री (गोकुळ मासिक), सदाशिव पेठ, पुणे १९९६**

४) देशपांडे वी. भा. मराठी नाटक रंगभूमी पहिले शतक, व्हीनस प्रकाशन पुणे ३०, १९८८
५) देशपांडे अ. ना. आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, सं. कृ. पाध्ये व्हीनस प्रकाशन पुणे, १९५८

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# स्त्री भ्रुण हत्या आणि सामाजिक स्थिती

**प्रा. डॉ. पुनम चौधरी (देशमुख)**

इंदिराबाई मेघे महाविद्यालय, अमरावती

संत ज्ञानेश्वरांनी वर्णलेली वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना प्रत्यक्षात येत आहे. भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री ही कुटूंबात दुय्यम दर्जाची वाहक आहे. स्त्रियांना स्वातंत्र्य आहे त्या शिकतात, नोकरी करतात, व्यवसाय करतात, नाव मिळवितात हे चित्र आशादायी असुन याची दुसरी बाजु काळी कट्ट आहे. स्त्रीच्या अस्तित्वावरच घाला घालण्याची प्रथा सध्या चालु आहे. विकासामुळे माणसाचे जीवनमान उंचावत असले तरी विकास महिलांना जीवंत ठेवणार की नाही असा प्रश्न भ्रुणहत्तेची वाढती संख्या पाहुन निर्माण होतो. ही समस्या प्राचीन काळापासून आहे. स्त्रियांना दडवून ठेवण्याचे निरनिराळे तंत्र समाजात हजारो वर्षापासून अवगत आहेत. स्त्रीचा विकास व्हावा समाजाची, कुटूंबाची एक घटक म्हणून प्रतिष्ठा मिळावी, स्त्रीला समान अधिकार मिळावेत यासाठी अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. त्यासाठी नवीन कायदे करण्यात आले. तरीही सर्व सामान्याने स्त्रीच्या परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही.

कोणत्याही राष्ट्राची निर्मिती करण्यासाठी महिलांची भूमिका महत्वपूर्ण असते. भारत बालक बालीकांच्या रुपामुळे अंकुरीत राष्ट्राचे उज्वल भविष्य निर्माण करण्यामध्ये महिलांचा हात असतो. भारतीय समाजामध्ये पितृसत्ताक समाजाच्या संरचनेने स्त्रियांना दुय्यम ठेवून सामाजिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतिक व वैवाहिक क्षेत्रात तिला हक्क, सत्ता व अधिकारापासुन वंचित ठेवण्यात आले. त्यातुन लिंगविषमता,हुंडा, भ्रुणहत्या यासारख्या समस्या निर्माण झाल्या. स्त्री पुरुषांमध्ये नैसर्गिक भेदाशिवाय कोणताच भेद नसतो. परंतू पुरुष प्रधान समाजव्यवस्था स्त्रियांचे सामाजिक विभेदीकरण करुन समाजीकरणाद्वारे तिला स्त्री बनविल्या जाते. लिंगानुसार पुरुषांचा दर्जा श्रेष्ठ तर स्त्रीयांचा दर्जा कनिष्ठ समजल्या जातो. अशा प्रकारची स्त्री पुरुषांमध्ये असलेला भेद म्हणजे विषमता होय.

स्त्री भ्रुण हत्येमुळे स्त्रियांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे हे प्रमाण असेच चालत राहीले तर समाजातील या पुरुषांना आपली अर्धांगिनी मिळणार नाही. त्यामुळे अनेक पुरुषांना एका स्त्रीसोबत वैवाहीक जीवन घालवावे लागेल. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. त्यातुनच एडस् सारख्या रोगांचा व इतर गुप्त रोगांचा प्रसार होईल. स्त्रियांच्या घटत्या प्रभावाचा परिणाम गुन्हेगारीवर होईल. उदा. अपहरण, बलात्कार, वेश्या व्यवसाय व गुन्हेगारी प्रवृत्तीला चालना मिळेल सर्व समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होईल.

लोकशाही ही मानवतावादावर आधारीत आहे. परंतू लोकशाही असलेल्या या देशात स्त्री नको मानव या नात्याने न बघता तिच्या जन्माचा अधिकार नाकारणे जन्माआधीच गर्भात हत्या करणे हे लोकशाहीस बाधक ठरेल. त्यामुळे समाजातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास होईल.

## उद्दिष्टे

1. स्त्री भ्रुण हत्येच्या कारणांचा शोध घेणे.
2. स्त्री भ्रुणहत्येवर उपाययोजना करणे.

- **स्त्री भ्रुणहत्तेची कारणे**

## सामाजिक

आपली पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे आजही सुनेला गर्भधारणा झाली हे कळताच कुटूंबातील वडिलधाऱ्याची इच्छा असते की, पहिला मुलगाच जन्माला आला पाहीजे. पुर्वपार चालत आलेली रुढी, परंपरा, अंधश्रध्दा व संकुचीत मनोवृत्तीपासुन समाज अद्याप परावृत्त झाला नाही. मुलगी म्हणजे जन्मभर डोक्याला ताप ही मानसिकता अद्यापही बदललेली नाही. मुली ही परक्याचे धन म्हणून तिच्या शिक्षणावर, वाढवण्यावर होणारा खर्च व्यर्थ आहे. तर शिल्लक राहणारा पैसा तिच्या हुंड्यासाठी खर्च करता येईल ही मानसिकता झाली आहे.

## साक्षरता

भारतात स्त्री निरक्षरतेचे प्रमाण अधिक जास्त आहे. साक्षरतेचा विचार केला तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण 65 टक्के आहे. तर पुरुषाचे प्रमाण 82 टक्के आहे. आपल्या समाजात मुलींना घरकाम व घरातील लहान मुलांचा सांभाळ करावा लागतो. त्यामुळे बालहक्कापासुन सुध्दा मुलीं वंचित राहिल्या.

## हुंडापध्दती

भारतात कायद्याने जरी हुंडा देणे घेणे बंद असला तरी अनेक समाजात मुलींच्या लग्नात हुंडा दिल्या शिवाय लग्नच होत नाही. कायद्यातुन पळवाट काढण्याकरिता हुंडा घेण्याच्या नवनवीन पध्दती अंमलात येत आहे. मान्य केलेला हुंडा किंवा वस्तु न दिल्यास मुलींचा मानसिक व शारीरिक छळ होतो.

## गुन्हेगारी

भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत आहे. पश्चात्य देशाप्रमाणेच भारतात देखील महिलांचा अपमान, अत्याचार आणि लैंगिक शोषणाच्या अनेक घटना घडत आहेत. घराबाहेर पडणारी स्त्री सुरक्षित घर परत येईल की नाही याची चिंता पालकांना असते.

## वैवाहीक दर्जा

जेव्हा मुलगी तारुण्यात पदार्पण करते तेव्हा तिच्यावर अनेक बंधने लादण्यात येतात तीच्या हातून कोणत्याही प्रकारची अनैतिक चूक घडू नये व कुटूंबाची बदनामी होऊ नये म्हणून कमी वयातच लग्नाची घाई केल्या जाते. राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाच्या एका अहवालानुसार देशातील 20 ते 24 वर्ष वयोगटातील 44.5 टक्के मुलींचे लग्न ही वयाच्या 18 व्या वर्षापुर्वीच झाले आहेत.

## सांस्कृतिक

मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही परंपरावादी कल्पना आजही आपला समाज उराशी बाळगते. अग्नी देणे, श्राध्द करणे, पिंडदान करणे यासारखे विधी करतो. म्हणून भारतीय सांस्कृतीत पुत्र प्राप्तीला प्रथमस्थान आहे. ' मुलगा म्हातारपणाची काठी 'म्हतारपणी आपली देखभाल करण्यासाठी व आपले पालनपोषण करण्यासाठी मुलगाच असावा. अश्या पारंपारीक विचार व चालीरिती सोडण्यास आपला समाज अद्यापही तयार झाला नाही.

## स्त्री भ्रुण हत्येचे परिणाम

- स्त्री भ्रुण हत्येचे प्रमाण असेच राहिले तर समाजाला भविष्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल.
- मुलांना लग्नाकरीता मुली मिळणार नाही.
- मुलींची विक्री खरेदी सुरु होईल.
- मुलींची पळवापळवी वाढेल.
- लैंगिक गुन्हेगारीत वाढ होईल.
- पुढील काळात मुलीगी हुंडा मागेल व हुंडापध्दती सुरुच राहील.

## उपाययोजना

- हुंडापध्दती सारखी अनिष्ठ प्रथेच्या विरोधात प्रचार करुन महिला सबलीकरण करणे. हुंडा विरोधी कायद्याचे काटेकोर पालन करणे.
- चांगल्या आरोग्य सेवा लोकांपर्यंत पोचविणे व यात वाढ करणे.
- डॉक्टर्स वैद्यकीय व्यवसायीक यांनी नैतिकतेने कर्तव्याचे पालन करावे.
- स्त्री भ्रुण हत्येविरुध्द तक्रार सहज सोप्या पध्दतीने नोंदविता यावी.
- प्रसार माध्यमांनी या विषयाची सत्यपरिस्थिती व गंभीरता लोकांसमोर आणावी.
- सामाजिक संस्थांनी या विषयाचे गांभीर्य लोकांपर्यंत पोचविणे.
- महिलांचे समाजातील स्थान, एकुण महिलांची आकडेवारी, शिक्षणाचे प्रमाण, सेक्स रेशो यांचे वेळोवेळी परिक्षण करण्यात यावे.
- रविवार दि. 6मे 2012 रोजी अमिर खानने दुरचित्रवाणीवर साद केलेल्या 'सत्यमेव जयते ' कार्यक्रमासारखे कार्यक्रम सादर करुन जनजागृती करणे आवश्यक आहे.

## संदर्भ


- भारतीय समाज व संस्कृती रविद्रनाथ मुखर्जी
- w.w.w.iheu.org/Female Feticide in .India.
- राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग अहवाल.
- सत्यमेव जयते अमिर खान .


# संत नामदेव यांचे साहित्य आणि सांप्रदायिक कार्य

प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे
गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय,

उमरखेड जि. यवतमाळ

**प्रास्ताविक**

संत— साहित्य हे भारताचे भव्य सांस्कृतिक संचित आहे. या साहित्याने भारतीय मनाचे पोषण केले आहे. काश्मीरपासून कन्याकमारीपर्यंतच्या भूभागांत जे भक्त भागवत आणि संत महात्मे होऊन गेल, त्यांनी आपल्या भक्तिरस संपन्न काव्यवाहिणीतून लोकजीवनाचे भरण—पोषण केले. 'उपासनेला दृढ चालवावे,' सदाचाराचे स्वाध्याय सांगावेत, पाप्त परिस्थितीची आव्हाने ओळखून लोकमानसात चैमन्य फुलवावे, स्वबांधवाना उदात्त जीवननिष्ठेची शिकवण द्यावी आणि लौकिकाच्या विलोभनातून पारलौकिकाच्या पावन प्रदेशात त्यांना आपल्याबराबर घेऊन जावे, अशा श्रेष्ठ उद्दिष्टांनी संतानी साहित्य साधना केली.

ज्ञानेश्वरांच्याच काळात थोर भागवतभक्त म्हणून गाजलेल्या पंढरपूर येथील नामदेवांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सगुण भक्तीचा लडीवाळपणा व निर्गून निराकारांचे ज्ञान यांचा मोठा मनोहर मिलाफ नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. महाराष्ट्रात नव्हे, तर सर्व भारतात अनेकदा तिर्थयात्रा करून कीर्तन – भक्तीच्या द्वारे विठ्ठल भक्तीचा प्रसार करणारे नामदेव हे भागवत धर्माचे फार मोठे प्रचारक मानावे लागतात.

हिंगोली जिल्हयातील नरसी हे नामदेवाचे मूळगाव. शिपी व्यवसाय करणारे दामाशेठ आणि गोणाई हे नामदेवाचे आई—वडील. पंढरपूरच्या विठ्ठल प्रेमाने आकर्षित झालेल्या या जोडप्याने नरसी हे गाव सोडून शके १९८० च्या सुमारास पंढरपूर येथे कायम वास्तव्य केले. तेथेच १९९२ मध्ये नामदेवाचा जन्म झाला. या संदर्भात स्वत:च्या चरित्रपर अभंगात नामदेवाने लिहिले आहे.

माझे जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणे । लिहिले त्याची खुण सारू ऐका।।
अधिक ब्याण्णव गणित अकरा शते । उगवता आदित्य रोहिणीसी ।।
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार । प्रमोद संवत्छर शालिवाहन शक ।।

जर या प्रमाणे 'नामदेवाचा जन्म शके १९९२ साली प्रमोद संवत्सरातील कार्तिक शुक्ल एकादशीला रविवारी झाला', असे मान्य केल्यास पंचांगाप्रमाणे नामदेवाची जन्म तारीख ही २६ ऑक्टोबर १२७० ही येते. खुद्द नामदेवानेच आपल्या जन्माबद्दल लिहून ठेवलेले असल्याने या तारखेबाबत विवाद असण्याचे कारण नाही.

नामदेवाचे वडील दामाशेठ हे शिंप्यांचे व्यवसाय करीत असत. तत्कालीन समाजव्यवस्थेत शिंपी हा शुद्रच गणला जात असे. आपल्या कुळ, व्यवसायाबद्दल नामदेव लिहितात.—

सिंपीयाचे कुळी जन्म माझा झाला। परी हेतू गुंतला सदाशिवीं ।।
रात्रीमाजीं सिवी दिवसामाजी सिवी। आराणूक जीवी नोव्हे कदा ।।

यांप्रमाणे वडिलांची शिंप्याचा व्यवसाय पुढे नामदेवाकडे जसा आला तसाच वडिलांच्या विठ्ठल भक्तीचा वसाही त्यांच्याकडे आला. अगदी बालपणापासूनच नामदेवाला विठ्ठल भक्तीची आवड लागलेली होती. विठ्ठलभक्तीत दंग झालेल्या नामदेवाचे लक्ष व्यवसायाकडेही लागत नाही. असे पाहून आईवडिलांनी त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षी राजाई ह्या गोविंदशेठच्या मुलीबरोबर त्यांचे लग्न लावून दिले. पुढे त्यांना नारायण, महादेव, गोविंद आणि विठ्ठल असे चार मुलं आणि लिंबाई नावाची मुलगी झाली. या शिवाय आणूबाई बहीण आणि दासी जनी सदस्य देखील त्यांच्या कुटुंबात होते. आपल्या परिवारा संबंधाने नामदेव लिहीतात—

गोणाई राजाई दोघी सासू सूना । दामा नामा जाणा बाप लेक ।।
नारा विठा गोंदा महादा चवघे पुत्र । जन्मले पवित्र त्याचे वंशी।।
लाडाई गोडाई येसाई साखराई । चवघी सुना पाही नामयाच्या ।।
लिंबाई ती लेक आणूबाई बहीण । वेडीपिशी दासी त्याची जनी ।।

एवढ्या मोठ्या संसाराची जबाबदारी सोडून नामदेव विठ्ठल भक्तीत लीन झाले. आई, वडील, पत्नी यांनी नामदेवांना घरसंसारात रमण्याविषयी अनेक वेळा सांगूनही काही फायदा झाला नाही.

शके १२१२ मध्ये नामदेव व ज्ञानेश्वर यांची भेट झाली. तो पर्यंत नामदेवांच्या विठ्ठल भक्तीची पताका महाराष्ट्राभर कीर्तीमान झाली होती. वीस वर्ष वयाच्या नामदेवाने पांडुरंगाला महासमन्वयक माणून भागवत धर्माची अर्थात वारकरी संप्रदायाची स्थापना केव्हाच केली होती. म्हणून आळंदी येथे शके १२१२ साली ज्ञानेश्वरादी सर्व भांवंडानी नामदेवाचे मोठेपण लक्षात घेऊन त्यांना श्रध्दापूर्वक नमन केले. परंतु नामदेवाने प्रतिनमस्कार केला नाही. हे पाहून खिन्न झालेल्या ज्ञानेश्वर भगिणी मुक्ताबाईने त्याची निर्भर्त्सना केली.

पुढे औंढा नागनाथ या गावी नामदेव आले असता विसोबा खेचर या संताची व त्यांची भेट झाली. महादेवाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपलेल्या विसोबा खेचर यांनी 'जेथे देव नाही तेथे माझे पाय ठेव' असा उपदेश करून जळी—स्थळी, काष्टी — पाषाणी सर्वत्र देवाचा संचार असल्याचे तत्त्वज्ञान दिले.

तिहीं त्रिभुवनीं आपण व्यापुनीं। आनंदे कोंदोनी राहीयेला।।
श्रीगुरूची पाय जीवें न विसंबत । मनोवृत्तिसहित ओवाळीले।।
डोळीयांचे डोळे उघडिले जेणें । आनंदाचे लेणे लेवविलें ।।
जन्ममरणाचे तोडीले साकडे। कैवल्यचि पुढे दावियेले।।
कैवल्याचा गाभा विटेवरी उभा । दिसे दिव्य शोभा पांडुरंग ।।
नामा म्हणे माझी भक्ती हे माउली । कृपेची साउली केली मज।।

हे विसोबा खेचरच नामदेवाचे गुरू. या गुरूने दगडाच्या देवावर पाय ठेवून सर्वत्र देवाच्या व्याप्तीचा अनुबोध नामदेवांना जसा दिला तसाच —

पाषाणाचा देव बोलेचिना कधी । हरि भवव्याधि कैसे घडे।।
दगडाची मुर्ति मानिला ईश्वर । परि तो साचार देव भिन्न।।
प्रस्ताराचा देव बोलता भक्तांतें । सांगते ऐकते मूर्ख दोघे।।
द्वादशीचे गांवी जाहला उपदेश । देवाविण ओस स्थळ नाही।।
तो देव नामया हृदयी दाविला । खेचराने केला उपकारू हा।।

या प्रबोधनाने संपृक्त होऊन नामदेव ज्ञानदीप जगी लावण्यासाठी देशभराच्या यात्रेला निघाले ज्ञानयोगी ज्ञानेश्वर या यात्रेत त्यांच्या सोबत होते. पंढरपुराहून कऱ्हाड तऱ्हेगाव मार्गे नर्मदातीरावर आणि पुढे पश्चिम प्रभास, पट्टण, सोमनाथ तीर्थ, व्दारका, मथुरा, गया, वाराणसी, कुरूक्षेत्र अशी यात्रा करून ही संतमंडळी बिकानेर जवळ आली. तेथे पाचपन्नास मैलाच्या वालुकामय प्रांतात वाटचाल करतांना दोघांनाही खूप तहान लागली. तृषेने व्याकुळ झालेल्या अवस्थेत एका अतिशय खोल विहिरीच्या तळाला असलेले पाणी त्यांना दिसले. ज्ञानदेव हे योगी असल्याने आपल्या योग सामर्थ्याच्या जोरावर लघमासिद्धीचा अवलंब करून सुक्ष्म देह धारण करून त्यांनी विहीरीत उतरून तृष्णा शांत केली. नामदेव हे केवळ विठ्ठलभक्त होते. त्यांना योगसाधना येत नव्हती. तेव्हा त्यांनी दोन्ही डोळे बंद करून मनात विठ्ठलाचे स्मरण केले. त्याबरोबर विहिरीची पाणी उचंबळून वर आले आणि झऱ्या सारखे वाहू लागले.

तव गडगडीत कुप उदकें वोसंडला। कल्पांती खवळला सिंधु जैसां।।

तेव्हापासून त्या निर्जल ठिकाणी ती विहीर सदोदित भरलेली आहे. त्या विहीरीला 'नामदेव कुवा' असेच नावही आहे. आता तो प्रख्यात तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.

नामदेव —ज्ञानदेवाची ही यात्रा पुढे कोलादजीवरून शके १२१७ साली महाराष्ट्रात परतली व शके १२१८ च्या आशाढ एकादशीला ही संतमंडळी पंढरपूरात आली. या यात्रे निमित्य मावंद्याचे मोठे जेवण झाले. त्यासाठी निवृत्तीनाथ, सोपानकाका, चोखामेळा, बंका, जाल्हो सुतार, सेना न्हावी असे नाना जातीजमातीचे संत एकत्र आले होते. त्या दिवशी चंद्रभागेच्या तीरावर सर्व संतांनी एकत्रित जेवन करून जाती—वर्ण व्यवस्थेला तिलांजली देऊन वारकऱ्यांनी सामाजिक समता सिद्ध केली. नामदेवाच्या पहिल्या यात्रेचे हे मोठे फलित होते.

या नंतर नामदेवाने एकटयाने १२१८ च्या सुमारास दक्षिण भारताची यात्रा केली. त्यानंतर १२२० ते १२२६ या सात वर्षात सर्व भारतभर यात्रा केली. नामदेवाच्या या यांत्राचा परिणाम देशभरातील साहित्यातून दिसून येतो. राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब, हिमाचल प्रदेश, सौराष्ट्र, कर्नाटक, म्हैसूर अशा अनेक राज्यांमधून नामदेवाने यात्रा करून तेथल्या बोली भाषेत काव्य लेखन केले आहे.

मराठी वाङ्मयाच्या आरंभ काळातच निर्माण झालेल्या नामदेवाच्या कवितेत आजच्या मराठी साहित्याचे अनेक प्रवाह आढळतात. काव्य, आख्यान, कथा, चारित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन अशा आजच्या मराठी साहित्य प्रकारांची सुरुवात नामदेवाने आपल्या अभंगरूपी काव्यातून तेव्हाच केलेली दिसून येते. आत्मनिष्ठ स्फुट भावरूप कवितेबरोबरच वस्तूनिष्ठ स्वरूपाची कविताही नामदेवाने लिहीलेली आहे. कृष्णकथा आणि रामकथेच्या विस्तारपुर्वक विवचनाबरोबरच दशावतार वर्णन, श्रियाळाख्यान, हरिचंद्राख्यान, ध्रुवाख्यान यासारख्या आख्यानकाव्यातून रसपूर्ण, ओजस्वी काव्याबरोबर घाटदार कथाही आलेली आढळते. ज्ञानदेवाची आदी, तीर्थवळी आणि समाधी या तीन प्रकारातून ज्ञानेश्वराचे काव्यमय चरित्र लेखनही नामदेवाने केलेले आहे. स्वत:च्या आत्मोन्नतीसाठी तळमळणाऱ्या नामदेवाने समाजाच्या मानसिक, सामाजिक दंभावर प्रहार करत आपल्या अभंगामधून उपदेशही केला आहे. हा उपदेश सांसरिकासाठी जसा आहे तसाच तो मुमुक्षूंना व साधकांनाही आहे. असे असले तरी कुठल्याही अधिकाराच्या उच्चपदावरून प्रचारात्मक पातळीवर केलेला उपदेश नामदेवाच्या अभंगातून दिसत नाही. तर समाजाच्या वास्तव दर्शनातून दिसणाऱ्या स्थितीतून समाजाच्या मानसिक सामाजिक उन्नतीसाठीची तळमळ असे या उपदेशाचे स्वरूप आहे.

नामदेवाची एकूणच कविता पाहता मंगलाचरण, बालक्रिडा, कृष्णलिला, रामकथा माहात्म्य, पंढरी माहात्म्य, भक्त वत्सलता, शिवस्तुती, नाम महिमा, गंगा माहात्म्य, संत माहात्म्य, ज्ञानेश्वरी आदी, तीर्थवळी, ज्ञानेश्वरी समाधी, सोपानदेवाची समाधी, निवृतीनाथाची समाधी, नामदेव चरित्र, आत्मसुख प्राप्तीविषयी, आत्मनिवेदन, आत्मज्ञानप्रती, उपदेश, दशावतार वर्णन, भुपाळया आरत्या अशा स्वरूपात दिसून येते. यातील केवळ उपदेशात्मक स्वरूपाच्या कवितेतील अभंगाचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे.

भूतीचे मार्दव ं। सांगे कोंबाची लवलव।
तैसे आधार गौरव । सकुलीन जनांचे ।।
झाड जानावे फुलें । मानस जानावे बोलं। भोगें जानावें केलें। जन्मांतरीचे ।।
लोभ जानावा उभय दृष्टीं। क्रोध जाणावा कली अवसरा।।
परद्वारिणी जाणावी उण्या उत्तरा। कुश्चळी घरोघरी हिंडतसे।।

मृदंग जाणावा गंभीर नांदे। गाणें जाणावें सुसवरे शब्दें।।
ओंकार जाणावा अक्षरभेदें। शहाणा श्ब्द ओळखावा।।
विष्णूदास नामा करी विनंती। या उत्तराची न मानावी खंती।।
केशवाचा पसाद आहे माझे चित्ती। देवा काय करिसी ते न कळे।।

खरा वैष्णव कसा असतो, हे सांगताना नामदेवांनी प्रस्तुत अभंग लिहिला आहे. ते म्हणतात, अंकराचा लुसलुशीतपणा हा जमीनीचा मृदूपणा असतो. सदाचार हा कुलवंताचा थोरपणा असतो. फुलाच्या गंधापरून झाड ओळखावे. माणसाच्या बोलण्यावरून त्याचे मत जाणून घ्यावे. गतजन्मीच्या पापपुण्याचे या जन्मी बरे वाईट भोग आपल्या नशीबी येतात.

तेराव्या शतकातील नामदेव यांनी भक्तीपंथाचे लोण पंजाबात नेऊन पोहचविले होते. आपल्या संप्रदायाचा प्रसार महाराष्ट्राबाहेरही करण्याचे श्रेय नामदेवांनाच आहे. ज्ञानदेव, नामदेव आणि इतर संत मंडळी तीथयात्रेच्या निमित्तने दौरा काढला होता. या तीर्थ यात्रेला ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्व आहे. या यात्रेचे नेतृत्त्व नामदेवाकडे होते. या यात्रेमध्ये प्रथम या संत मंडळींनी महाराष्ट्र आणि गुजरात येथील तीर्थयोना भेटी देऊन ते उत्तरेकडे वळले. गोकुळ, वृदावन, मथुरा,काशी, प्रयाग, वगैरे क्षेत्रे करून त्यांनी आपला मोर्चा नंतर पंजाबकडे वळविला. या त्यांच्या यात्रेची सविस्तर हकिकत आणि संतमंडळीचे अनुभव दुदैवाने आज उपलब्ध नाहीत. ते जर उपलब्ध असते तर तत्कालीन सामाजिक स्थितीवर बराच प्रकाश पडला असता. ही यात्रा म्हणजे संताच्या वैष्णव संप्रदायाच्या प्रचाराची मोहिम होती. हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागात जाऊन आपल्या संप्रदायाची बीजे त्यांनी पेरून ठेवली. पुढच्या दोन— तीन दशकांत अनेक पंथ निघाले. त्यांना या संत यात्रेपासून स्फूर्ती मिळाली असली पाहिजे. जेथे जेथे संत जात होते तेथे तेथे जनतेचा शेतकऱ्यांचा, कारागिरांचा समुदाय त्यांच्या भोवती जमा होत असे; त्यांचा उपदेश ग्रहण करित असे, त्यांच्या या यात्रेचा बहुजन समाजात फार बोलबाला झाला असला पाहिजे. तसेच प्रचाराचे मुख्य कार्य नामदेवावरच पडले असावे. कारण नामदेवांनी स्मृती कित्येक शतके परप्रांतीयांच्या अंत:करणात ताजी होती. नामदेवानंतर सुमारे शंभर वर्षांनी गुजरातेत होऊन गेलेला नरसी मेहता आपल्या 'हरमाळे'त मोठ्या आदराने उल्लेख करतो. कबीराने नामदेव व त्यांच्या कुटुंबातील मंडळी यांच्यावर गौरवपूर्ण कवणे लिहिली आहेत. शिखांच्या 'ग्रथसाहेबा'त नामदेवांनी रचलेली जवळ जवळ शंभर हंदी पदे समाविष्ट आहेत. १६०० च्या सुमारास होऊन गेलेल्या नाभादासाने आपल्या भक्तमालेत नामदेवांचे चरित्र भक्तिभावाने गोविले आहे.

नामदेव पंजाबात एकंदर  अठरा वर्षे राहिले होते व तेथे त्यांचा शिष्यपरिवार पसरला होता अशी माहिती कै. पांगारकरांनी उजेडात आणली आहे. पंजाबात गुरुदासपूर जिल्ह्यात घुमान येथे नामदेवांची एक समाधी आहे. त्यावरून पंजाबात नामदेवाचे कार्य किती प्रभावी होते. याची कल्पना येते. इतर प्रांतात जे भक्तिपंथाचे उठाव झाले त्याला, त्याला प्रेरणा देण्याचे कार्य नामदेव आणि संतयात्रा यांनी केले. मराठी संत मंडळाचे तत्त्ववेत ज्ञानदेव होते, तरी खरे प्रणेते नामदेवच होय. त्यांच्या वैष्णव संप्रदायात ज्ञानदेव उशिरा म्हणजे १२९१ च्या सुमारास उघडपणे सामील झाले. म्हणू नामदेवांना मराठी संत मंडळाचा म्हणणे सार्थ होईल. तसेच ते महाराष्ट्रातील आद्य कीर्तनकार आणि आद्य अभंगकार होऊन गेले.

संत नामदेव ज्ञानेश्वर समकालीन होते; मात्र ज्ञानेश्वराच्या मानाने त्यांना उदंड आयुष्य लाभले. त्यांचा जीवनकाळ इ.स. १२७० ते १३५० असा मानला जातो. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेवांचा सहवास फार अल्पकाळ म्हणजे अहुधा त्यांच्या तीर्थयात्रा आणि समाधिकाळापर्यंतच संत नामदेव हे त्या काळाच्या दृष्टीने शुद्र समाजातील होते; मा. ते पंढरीच्या पांडुरंगाचे परमभक्त होते. ज्ञानेश्वरीच्या वाङ्मय निर्मितीचा जो हेतू होता. तोच संत नामदेवांच्या साहित्यामागेही होता.

' नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' ही त्याची प्रतीज्ञा. स्वाभविकच त्यांना पांडुरंगाची भक्ती, तिच्या ज्ञानाचा दिवा समाजाच्या अंतीम टोकापर्यंतच्या लोकांपर्यत पोहचवायचा होता. ते बहुजन वर्गातील होते आणि त्यांचे जगण्याचे उद्दिष्टही असे व्यापक आल्याने स्वाभाविकच त्यानुसार त्यांच्या कीर्तनाची त्यांच्या अभंगाची भाषा निर्माण झाली. ती थेट श्रोत्यांच्या अंतहृदयापर्यत जाणारी असून तीमधील

जिव्हाळा आणि माधुर्य विलक्षण आहे. या भाषेतील सरलत्व आणि सहजत्व मनाला भिडणारे आहे. ते जनसामान्यांपैकी होते आणि त्यांचे उद्दिष्टही त्यास भक्तीमार्गाने वळविण्याचे होते. त्यामुळे त्यांनी भाषाही जनसामान्यांची स्वीकारली. नव्हे ती त्यांची भाषाच होती. '' संतानीही जनसामान्यांशी हृदयसंवाद करण्यासाठी लोकवाणीचं माध्यम स्वीकारलं. यामुळेच ते अभिजनांच्या सीमित परिघात न राहता सामान्य मानसाच्या जीवनाला व्यापून गेल.''

'नामयाची वाणी अमृताची खाणी' असे म्हटले जाते. संत नामदेव हा पंढरीचा आर्तभक्त होता. भ्क्ती म्हणजे प्रेम. तो पंढरीचा प्रेमा आहे. म्हणूनच त्यांच्या अभंगातील भाषेचा शब्दांचा त्यांच्या अभिव्यक्तीचा गोडवा अलौकिक म्हणावा लागतो.

'गाईन तुझो नाम हृदयी धरूनी प्रेम।
हाची नित्य धर्म सर्व माझा।।'

ज्याची भक्ती करावयाची आहे त्याच्याशी एकरूप राहावे लागते. त्यावर उत्कट प्रेम करावे लागते. त्याच्या प्रेमामुळे मुखातून गाणे झरते. तिथे मग अहंभावही शिल्लक राहत नाही. हा भक्तीभाव म्हणजे प्रेम नव्हे. सर्वस्व अर्पण करणे ही प्रेमभावाची परिणती आहे. ती नामदेवांच्या अभिव्यक्तीत दिसून येते.

'आम्ही दैवाचे दैवाचे। वास पंढरीरायाचे
टाळ दिंडी घेऊनी हाती। केशवराज गाऊ प्रीती।।'

प्रेमभावाचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे भक्तीच्या किंवा प्रेमाच्या विषयाचे अखंड चिंतन करणे. नामस्मरण केवळ टाळ कुटणे नव्हे. म्हणूनच संतानी नामस्मरणाला जे तात्त्विक रूप दिले ते अपरिहार्य म्हणता येईल. नामस्मरणाचा विचार पचविणे सर्व सामान्यांना शक्य होते म्हणून ज्ञानदेव — नामदेवांनी त्यांच्या मनात नामसामर्थ्याचा विश्वास निर्माण निर्माण केला. हा प्रेममार्ग सर्वांना आकलनीय होता. त्यात विशुद्ध भक्तीचा पुरस्कार होता. तेच नामदेवांनी पुरस्कारिले आणि त्याचाच प्रचार— प्रसार केला; मात्र त्यांनी केवळ मूर्तीत देव पाहिला नाही. तो त्यांना सर्वांमध्ये दिसला. म्हणूनच—

'विठ्ठलाचि घ्यावो, विठ्ठलाची गावो विठ्ठलचि पाहो, सर्वांभूती।'

अशी त्याची व्यापक भूमिका होती. विशाल अंत:करण होते. एवढेच नव्हे तर, ते अत्यंत मृदू कोमल भाषेत व्यक्त होत होते. त्यांच्या अभंगातील माधुर्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्वही लोभस वाटते. अशा या संताने वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान पंतजाबपर्यंत नेले.

संत नामदेवांनी उत्तर भारतात अपूर्व धर्मकार्य केले. 'भारत के संत महात्मा' या ग्रंथात रामलाल म्हणतात' संत नामदेव कुछ देनों तक पंजाब प्रांत मे रहकर कृष्णभक्ती का प्रचार किया था। उन्होंने असंख्य जीवेम का, अपने सत्संग और पांडुरंग भक्तीसे कल्याण किया।'

चौदाव्या शतकात वारकरी संप्रदायाची विचारधारा आणि कार्यपद्धती यांचे महत्त पंजाब, सयुंक्त प्रांत, राजपुताना अशा उत्तरेकडील प्रांताना पटवून देण्याचे श्रेय नादेवांना दिले पाहिजे भागवतधर्मीय भक्तिमार्गाचा महिमा उत्तर भारतातील बांधवाना समजून सांगणारे संत नामदेव हे पहिलेच महात्मे होत. नामदेव कबीर यांच्यापासून प्रेरणा घेऊन गुरुनानक यांनी यांनी शीख संप्रदायाची स्थापना केली.पुढे याच शीख संप्रदायातील लोकांनी आपल्या चळवळीला राजकीय स्वरूप दिले.

संत नामदेवांची अशी स्मारके उत्तर भारतात नामदेव मंदिराच्या रुपाने किंवा त्यांच्या प्रतीक समाधिच्या रूपाने पाहावयास मिळतात. उत्तर भारतात आपल्या नामदेवांनी अनेक प्रांतातून संचार केला. तिथल्या भक्तजनांना नामदेवांनी आपल्या कार्यांनी प्रभावित केले. संत नामदेवांच्या धर्मकार्याच्या आणि संस्कृती संवर्धनाच्या प्रभावखुणा उत्तरेतील या स्मृतीस्थळातून आजही श्री विठ्ठलभक्तीचा महामंत्र जागवित आहेत. उत्तर भारतात नामदेवांनी जी कामगिरी बजावली, तिच्याविषयीच्या कृतज्ञता उत्तर भारतीय संतानी पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे.

जागे, सुक, उद्धव, अक्रूर। हणवत जागे लै लंगूर।
संकर जागो चरण सेव । कलि जागे नामा, ।। — कबीर
नामदेव कबीर, त्रिलोचन, सदना सेन तरे।

कह रविदास सुनौ रे संतो, हरि जीवेम समै रे ।। — रैदास
तौ लोकबेद अरु कलियुग मिलिकहि भगति रसातल देत।। — पीपाजी
नामा, कबीर सुकौन थे कुन रॉका बॉका।
भगती समानि सब धरानि ताजि कुल काना का।। — रज्जन
नमदेव, कबीर,जुला हो, जब रैदासतिरे।
छादू बेगि बार नहि लागौ हरिसों सबै सरै ।। — दादू
जेंही घर नाम , कबीरा, पहुँचे करि तनमन धीरा।
अतिहि समछिम होय, जाई मिले ब्रह्मकू सोई।। — तुलसीदास

राघोबादादा पेशवे यांची अटकेपर्यंत स्वारी पंजाबात आज नामशेष झाली आहे; परंतु संत नामदेवांचे अनुयायी सांप्रतकाळी पंजाबमध्ये आहेत. 'बाबा नामदेवजी की मुखबानी' शीख बांधवाच्या पवित्र गुरुग्रंथात समाविष्ट झालेली आहे. या मुखबानीस मानाचे स्थान लाभले आहे. अृताच्या खाणीप्रमाणे रससंपन्न असलेली नायाची वाणी उत्तर भारतात अजरामर झाली आहे. वारकरी संप्रदायाची स्थापना करून वैष्णवांच्या भगवा पताका खांद्यावर घेऊन भारतभर समतेचा प्रचार करून संत नामदेवाने वयाच्या ८० व्या वर्षी आषाढ वद्य १३ शके १२७२ रोजी पंढरपूर मुक्कामी देह ठेवला.

**संदर्भ ग्रंथः**

१) ।। नामा म्हणे।। लेखक, हे. वि., स्नेहल प्रकाशन, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९९
२) महाराष्ट्रातील संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य, बा. र. सुंठणकर, लोकवाङ्मय गृह, तिसरी आवृत्ती, डिसेंबर २००८
३) मराठी संतवाङ्मयातील परमार्थ मार्ग, लेखक, प्रा. डॉ. गुरुदेव रानडे — सुधारित दुसरी आवृत्ती १९९३
४) पंजाबातील नामदेव — लेखक, शंकर पुरुषोत्तम जोशी प्रकाशन १९४०
५) अक्षरगाथा, संपादक , डॉ. मा. मा.जाधव, मराठी भाषा विशेषांक, वर्षः चौथे, अंकः तिसरा १० आक्टो. २०१३
६) मराठी प्राचीन वाङ्मयाचा इतिहास , प्र.न. जोशी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १५ आक्टोबर २००२
७) नामदेव : आध्यात्मिक चरित्र व ज्ञानदीप, ग. वि. तुळपुळे, प्रकाशक— राजीव— रतन लाड ट्रस्ट, मुंबई, द्वितीयावृत्तीः १८ मार्च १९९५
८) पंजाबातील नामदेव— लेखकः शंकर पुरुषोत्तम जोशी, प्रकाशक, केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ— सदन, बनाम हॉल लेन, गिरगाव, मुंबई, १९४०
९) संत — संकीर्तन, डॉ. हे. वि. इनामदार, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती ०२ सप्टेंबर २००१

# संत साहित्य व परिवर्तन

प्रा डॉ अनंत सूर्यभान सूर्यकार
मराठी विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ

संत साहित्य किंवा संतवाणीस अनेकांनी श्कल्पतरूश असे म्हटले आहे. येथे मागितले ते मिळते. जशी भावना तसे फळ. जे या कल्पतरूपासून न उद्धारता मार्गक्रमण करतात. ते खरोखर अभागीच होत . संतवाणीचे गुणवर्णन करताना त्यांनी दाखवलेला मार्गच तेवढा श्रेष्ठ होय अशी भावना न ठेवता संपूर्ण मानवजातीला त्यांनी सोप्या भाषेत व्यवहारधर्म म्हणून मानवी गुणांची श्रेष्ठता बिंबवण्याचा सतत प्रयत्न केला . याउलट ज्यांनी असा प्रयत्न केला नाही ते खऱ्या अर्थाने संतच नव्हेत. कोणत्याही देशातील लोकोत्तर संतांचे चरित्र आपण पाहिले तर लोककल्याणाची कळकळ हा त्यांचा ठळक गुण दिसून येईल . या अज्ञानी जनांना त्यांनी योग्य मानवधर्म शिकविला. स्वामी विवेकानंद म्हणतात - **"चुरचुरीत वाणी झिरझिरीत राहणी"**ह्या गोष्टी तात्कालिक प्रभाव पाडतात असे आपण पाहतो, पण ज्या जगन्मान्य लोकांना आपण पूज्य मानतो त्यांच्यामध्ये ह्या गोष्टीचा संपूर्ण अभाव आपणास दिसून येईल.साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हाच खऱ्या संतांचा धोपट मार्ग आपणास दिसून येईल.

संतकवी म्हणजे भारतातील संस्कृत आणि प्राकृत भाषेतील एक प्रचंड ज्ञानकोशच आहे. म्हणूनच समर्थ म्हणतात

**"आता वंदू कवीश्वर । हे तो शब्दसृष्टीचे ईश्वर ॥**
**झाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ॥"**

सामान्य माणसाला त्यांच्या प्रकांड पांडित्याशी किंवा सखोल तत्त्वज्ञानाशी फारसे कर्तव्य नसते. तसे पाहिले तर संतकवींच्या काव्यात प्रसाद, शब्दचमत्कृती पदलालित्य, रागदारी, संगीतगुण आणि नादमाधुर्य ह्या गोष्टी दिसतातच पण ह्याच बरोबर त्यांनी जे प्रचंड समाज कार्य केलेय लोकशिक्षण आणि लोकजागृती केली तेही नजरेत भरते.हे करताना त्यांनी भोंदूपणाचे बुरखे फाडले, वाईट चालीरीतींवर कोरडे ओढले. आणि कुठल्याही क्षणिक आणि भौतिक मोहाला बळी न पडता निर्मळ आणि सात्विक भक्तिरसाची निर्मिती केली

**"जीन खोईया तिन पाईया । गहरे पानी पैंठ ॥ मै बौरी खोजन चली। गई किनारे बैंठ ॥ "**

ज्यांनी शोधले त्यांना गवसले. त्यासाठी खोल पाण्यात शिरावे लागते पण माझ्यासारखे मूढजन नुसते किनाऱ्यावर बसूनच अपेक्षा करतात, त्यांना तत्त्व काय गवसणारꠓ

**"पाखियामाजी मोरू । रुखीयामाजी कल्पतरू । भाषामाजी मानथोरू । मराठिया॥ "**

धर्ममार्तंडांच्या खोट्या संस्कृत बंबाळ विद्वत्तेचा उपहास करण्याचे धाडस ह्या संतांनी व संतसाहित्याने दाखविले. मायबोलीला उच्च स्थान प्राप्त करून दिले आणि त्याद्वारे सामान्य माणसाला ज्ञानाचा मार्ग मोकळा करून दिला. वेद, पुराणे, उपनिषदांचे खोल ज्ञान त्यांनी साध्या भाषेत सांगितले.

**"वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ॥ "**

कर्मकांडाचे अवास्तव स्तोम त्यांनी थांबविले. खोट्या धर्मभोळया समजुती फोल ठरविल्या. लोकप्रिय भजने, भारुडे, श्लोक, मुक्तछंद काव्य, कविता ह्यामध्ये संतांनी आपले हृदय ओतले आणि समाजामध्ये ते लोकप्रिय करविले.

**परिवर्तनवाद व वारकरी संप्रदाय**

समाजातील कोणताही बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे तर सामाजिक कृतींचे व आंतरक्रियांचे आकृतिबंध मूल्य सांस्कृतिक फलिते आणि प्रतीके या आविष्कारासह होणाऱ्या बदलांना सामाजिक परिवर्तन असे म्हणतात वारकरी संप्रदाय हा परिवर्तनवादी संप्रदाय आहे. हिंदू धर्मामध्ये असलेल्या अनेक भक्ती संप्रदायापैकी प्रमुख असा संप्रदाय आहे. या संप्रदायाची व्याप्ती जरी मर्यादित दिसली तरी तिच्या अधिष्ठात्री देवतेचे स्वरूप विशाल आहे. अनुयायांमध्ये ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकारामादी दिगंत कीर्तीचे श्रेष्ठ महानुभाव संत असून त्यांनी निर्मिलेले वाङ्मयही जागतिक वाङ्मयास भूषणभूत होणारे आहे. हे वाङ्मय केवळ महाराष्ट्राचे अमूल्य धन आहे असे नव्हे तर अखिल जगताचा अमोल ठेवाच आहे. या थोर भक्तिपंथाचा इतिहास, तत्त्वज्ञान, आचारधर्म व शिकवणूक समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. महाराष्ट्रामध्ये उगम पावलेली वारकरी संप्रदायरूपी जीवनगंगा शतकानुशतके जिवन्तपणे वाहात आहे.

**"संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥**
**ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥**
**नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ॥**
**जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ॥**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥ "**

ज्ञानदेवांनी पाया घातला याचा अर्थ संप्रदाय सुरु केला असा नव्हे तर पूर्वीच्या भक्तिपंथास वैचारिक अधिष्ठान दिले व त्याला व्यवस्थित रूप दिले. विठ्ठल भक्ती - संप्रदायाचा आद्य प्रवर्तक पुंडलिक होय. तुकोबांच्या शिष्या बहिणाबाई यांनी तुकोबांच्या वरील अभंगाच्या पाच ओळीस जोडून सहावी ओळ लिहिली आहे.

**"बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केले वोजा ॥ "**

वारकरी संप्रदाय हा शुद्ध भक्तिमार्गाचे स्वरूप सांगून त्याचा प्रसार करणारा संप्रदाय आहे. वारकरी संप्रदायाचे प्रमुख कार्य धार्मिक क्षेत्रातील असून त्याचे सामाजिक व वाङ्मयीन कार्य आनुषंगिक आहे. वारकरी संप्रदायात गीता व भागवत हे ग्रंथ पूज्य मानले आहे. वारकरी संप्रदायाचे उद्धिष्ट गीता व भागवतात सांगितलेली श्रेष्ठ प्रेमभक्ती व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनात उदय होऊन योग्य रीतीने विकसित व्हावी हेच आहे म्हणून वारकरी भक्तिमार्गास भागवत धर्म असेही म्हणतात. वारकरी संप्रदायाची कामगिरी म्हणजे परंपरागत धर्मविषयक भ्रामक समजुतीची पूर्ण छाननी होय. भ्रामक समजुतीवर आधारलेल्या आचारांचा व साधनांचा निषेध केला, अधिकार भेदाचा निषेध केला. दुसऱ्या बाजूने धर्माला योग्य बोध देऊन सरळ साधी पण जीवनास अत्यंत कल्याणकारी संप्रदाय परंपरा निर्माण केली. रूढीवादी जनांना तोंड देऊन बहुजन समाजाच्या हृदयामध्ये स्थान मिळविले. धर्माच्या नावाखाली दांभिक आचरण करणाऱ्यांचा त्यांनी कडक निषेध केला.

**"प्रवृत्ती निवृत्तीचे आटोनिया भाग ।**
**उतरिलें चांग रसायन ॥ "**

सामान्य धर्म म्हणजे नीतिधर्माचा संतांनी पाठ पुरावा केला आहे. संतांनी कर्मकांड स्वरूप धर्मावरच हल्ला करून जीवनाचा खरा व भक्तीचा जिव्हाळा असणे हेच सांगितले आहे.

समर्थ रामदास सतराव्या शतकातील शिवकालीन संत आणि राष्ट्रसंत तुकडोजी हे विसाव्या शतकातील आंग्लकालीन संत. समर्थ व राष्ट्रसंत हे आपापल्या काळातील युगपुरुष होते असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. यवनी सत्तेचा काळ असून समाज जीवनात आत्यंतिक धर्मग्लानी निर्माण झाली होती. रूढी परंपरांच्या प्रवाहात समाज जीवन पार बुडून गेले होते. कर्मठपणाचे अवास्तव स्तोम व स्वातंत्र्यविषयाची उदासीनता उत्कटत्वाने जाणवत होती.

हिंदू मुसलमान मध्ये दंगे पेटविण्याचा ब्रिटिश प्रयत्न करीत होते. ब्रिटिशांचा हा कावा ओळखून तुकडोजी महाराजांनी हिंदू मुसलमान यामधील वैमनस्य दूर करण्याचा प्रयत्न केला. समाज जीवनात स्वार्थ, स्पर्धा, सत्ता, द्वेष, खोटेपणा, काळाबाजार, भ्रष्टाचार यांना ऊत आला होता. ज्ञानदानाच्या पवित्र नावाखाली शिक्षणसंस्थातही गल्लाभरू प्रवृत्ती बळावली होती. या वातावरणाचा युवा पिढीवर परिणाम होऊन त्यातूनच गुंडागर्दी चे वातावरण वाढीस लागले होते.

**"व्यक्ती स्वार्थ बोकाळला । जो तो मनाचा राजा झाला ॥**
**वेगवेगळया प्रलोभनी गुंतला । समाज सारा ॥ "**

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकोबा, समर्थ रामदास व राष्ट्रसंत तुकडोजी या संतांनी स्वतःच्या उज्ज्वल चारित्र्याने आणि तेजोमय त्यागाने सद्धर्म प्रसाराचे कार्य आपोआप घडवून आणले आहे. अशा जीवनाच्या कर्मयोग्यांचा सहवास सूर्यासारखा सतत संजीवनप्रत, प्रकाशमय, उत्साहवर्धक असतो. देशातील अनाचार,दुराचार मित्थ्याचार, अत्याचार यांचे वातावरण टीका करून नष्ट होऊ शकत नाही. सदाचार संपन्न लोकांची संख्या वृद्धिंगत होत गेली की, सामाजिक अधःपतनाचा अंधार घालविण्यासाठी वेगवेगळया प्रयत्नांचे प्रयोजन उरणार नाही म्हणूनच अशा सदाचार संपन्न प्रवृत्तीचा परिपोष करणाऱ्या संत साहित्यातील सुवर्णकण समाजापुढे येणे आवश्यक आहे. तेराव्या शतकापासून सतराव्या शतका अखेर पर्यंतचा काळ हा मराठी वाङ्मयाचा सुवर्णकाळच होय. या काळात ज्ञानदेवादि भावंडे त्यांच्या सभोवतालची नामदेव, चोखोबादि संतांची प्रभावळ, तदनंतरचे भानुदास, एकनाथ, तुकोबा आणि निळोबा आदी संत यांच्या अमृत मधुर वाणीचे निनाद छंदोबद्ध झाले. जनहृदयात तिने शुद्ध प्रेमधर्माचे व उदात्त नीतिमत्तेचे नंदादीप पाजळले. विशाल वाङ्मय सरितेने वारकरी संप्रदायाच्या वृक्षाचे पोषण करून तो फळाफुलांनी समृद्ध केला.

सतराव्या शतकात महाराष्ट्रात परकीय सत्तेमुळे समाजाच्या अस्मितेला धोका उत्पन्न झाला असताना पुरुषार्थ जागृतीचे कार्य समर्थांच्या दासबोधाने केले. विसाव्या शतकात भारतीय पारतंत्र्याच्या व स्वातंत्र्याच्या काळात जनजागृतीचे महत्कार्य तुकडोजी महाराजांच्या साहित्याने केले.

**निष्कर्ष**

१. लोक कल्याणाची कळकळ हा ठळक गुण दिसतो.
२. संत कवींच्या काव्यात प्रसाद, शब्दचमत्कृती, पदलालित्य, संगीत व नादमाधुर्य इत्यादी गोष्टी दिसतात.
३. सात्विक भक्तिरसातून भोंदूपणाचे बुरखे फाडले.
४. धर्म भोळ्या समजुती खोट्या ठरविल्या.
५. जागतिक कीर्तीचे अमूल्य वाङ्मय निर्माण केले.

६. धार्मिकतेबरोबर सामाजिक व वाङ्मयीन कार्य केले.
७. लोककल्याणकारी संप्रदाय निर्माण करून बहुजनांच्या हृदयात स्थान मिळविले.
८. रूढी प्रवाहात समाज जीवन बदलून गेले होते त्यांना प्रवाहात आणून स्वातंत्र्याविषयीची जाणीव निर्माण करून दिली.
९. संतांनी स्वतःच्या उज्वल चारित्र्याने सद्धर्मप्रसाराचे कार्य केले.
१०. संतांची वाङ्मय हे परिवर्तनवादी असताना सुद्धा आजचे लोकजीवन धर्मांध प्रवृत्तीकडे वळलेले दिसतात.

**संदर्भ ग्रंथ**

१. पाच भक्तिसंप्रदाय गोसावी.रा.र -, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास नसिराबादकर.रा.ल .डॉ -, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. मानवतेचे पुजारी राष्ट्रसंत तुकडोजीरघुनाथ कडवे.प्रा -, राष्ट्रसंत तुकडोजी साहित्य प्रचार मंडळ, वर्धा.
४. राष्ट्रसंत आणि काही विचारवंत बाळ पद्व -ाड, विजया प्रकाशन रेशीम बाग, नागपूर.
५. समर्थ रामदास संत तुकडोजी तौलनिकदर्शन राजीव प्रकाशन .राम घोडे.डॉ.प्रा -, यु ९, लक्ष्मी नगर, नागपूर.
६. साहित्य शक्ती मनोहर रोकडे.डॉ -,, गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज आश्रम.
७. संतवाणी मधुरा संतवाणी चतुरा सपकाळ.ना.प्र.डॉ-, मनोहर मुद्रणालय, नागपूर २७.
८. वारकरी संप्रदाय उदय व विकास भालचंद्र बहिरट-, व्हीनस प्रकाशन, पुणे .

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# समताधिष्ठित राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

डॉ. टी. एस. राठोड
समाजकार्य महाविद्यालय, बडनेरा
९९२२०८५८६७

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तसेच विख्यात कायदेपंडीत, प्रभावी वक्ते, उत्तम लेखक, कर्ते समाजसुधारक, समस्त दलित बांधवांना आत्मोधार, आत्मसन्मान प्राप्त करून देणारे, भगवान बुध्द, संत कबीर, महात्मा जोतिराव फुले हे प्रेरणा स्तोत असणारे दलित जनतेत नवचैतन्य निर्माण करणारे मनुवादी गुलामगिरीचे जोखड फेकून देणारे मानवतेचा उपासक प्रकाशपूत्र, ज्ञानसाधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठीच समर्पीत केले. सर्वप्रथम भारतीय व शेवटी भारतीयच ही भूमिका शेवटपर्यंत स्वीकारली. दलितांच्या उध्दारासाठी शिका, चेतवा, संघटीत व्हा असा संदेश त्यांनी दिला. त्यासाठीच त्यांनी दलित समाजाला जागृत करून चळवळ केली. दलित समाजविषयी त्यांनी सर्वार्थाने बांधीलकी स्वीकारली. राजकीय, धार्मिक, सामाजिक जीवनातही दलितांच्या कल्याणासाठीच चिंता वाहिली. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक चळवळीत 'माणूस' हा केंद्रबिंदू मानला. या आपल्या भारतात माणसाला कधीच कोणत्याच कालखंडात केंद्रबिंदू मानलेले नव्हते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत धर्मकर्त्यांनी, ग्रंथकारांनी या धर्मशास्त्रकर्त्यांनी जातीला अनन्य साधारण महत्त्व दिले. धर्माला. जातीला, जाती समूहाला जाती समाजाचा केंद्रबिंदू मानले. धर्माला, धर्मशास्त्राला अग्रस्थानी ठेवले. रूढी, परंपरेला श्रेष्ठ मानले आणि त्यामुळे माणसाची किंमत, माणसाचे महत्त्व याला मातीमोल केले. माणसाच्या आशा, आकांक्षा पूर्णपणे दफन करून टाकल्या. भारतात माणसाची, त्याच्या गुणाची, कर्तृत्वाची पूजा करण्यापेक्षा दगड, पशु–पक्षी, झाडे–पाला याची पूजा धर्माने आणि रूढी परंपरेने करायला शिकविले. धर्मापुढे, धर्मशास्त्रापुढे रूढी, परंपरोमुळे अस्पृश्य म्हणून मानलेला माणूस पशुपेक्षाही हीन झाला. माणसासारख्या माणसाला अस्पृश्य म्हणून हीन लेखले म्हणूनच भारताची नेहमीच पिछेहाट झाली.

डॉ. बाबासाहेबांच्या मते अस्पृश्यता निर्मूलन तेव्हा होईल जेव्हा

१. अस्पृश्य मुळचे कोण? आणि ते अस्पृश्य कसे बनले या ग्रंथात स्पष्टीकरण देताना अस्पृश्यतेचा उगम या दोन गोष्टीमुळे झाला.

√ बौध्द धर्माबद्दल तिरस्कार हे अस्पृश्यतेचे मूळ आहे.

√ गोमास भक्षण हेच अस्पृश्यतेच्या उत्पत्तीचे कारण आहे.

अस्पृश्यतेची कल्पना फक्त हिंदू धर्मातच आहे असे नाही. हिंदू धर्माप्रमाणे ती इतर धर्मातही आढळते. त्यात प्रामुख्याने यहुदी धर्म, पारसी धर्म यांचा समावेश होतो.

मृताला शिवले असता

विटाळशीमध्ये स्त्रिया असतात

जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था हा भारताला लागलेला एक महारोग आहे. बाबासाहेबांना लहाणपणापासूनच जातीव्यवस्था, अस्पृश्यता व त्या काळातील विषमतेवर आधारलेल्या समाज व्यवस्थेबद्दल चीड निर्माण झाली होती. ते खालच्या जातीत जन्माला आल्यामुळे त्यांना अनेक अपमानकारक प्रसंगांना तोंड द्यावे लागले. प्रत्येक ठिकाणी त्याला अस्पृश्यतेचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांनी मनाशी ठाम निर्धार केला की आपलं सर्व आयुष्य दलिताच्या उध्दारासाठी समर्पीत करतील व त्यातुनच त्यांनी स्वत:च अस्पृश्यतेविरूध्द चळवळ सुरू केली. या क्रांतीकारी चळवळीमुळेच डॉ. आंबेडकर अस्पृश्योधारक म्हणून प्रसिध्द झाले. जाती व अस्पृश्यता निवारण करण्याची प्रेरणा डॉ. आंबेडकरांना 'बुध्दचरीत्र' या पुस्तकातून मिळाली होती. जन्माने कुणीही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ होत नाही. जो तो आपापल्या परीने कर्मानेच श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत असतो. ही बुध्दाची शिकवण त्यांनी आत्मसात केली होती. यातूनच त्यांनी जाती व अस्पृश्यतेसंबंधी प्रखर विचार मांडले. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता विरोधी व दलितोध्दाराचे कार्ये मुकनायक व बहिष्कृत या साप्ताहिकातून लेख लिहून सुरू केले. त्यांनी आपल्या प्रखर लिखाणातून व विचारातून दलितांच्या दु:खाला वाचा फोडली व दलिताच्या सर्वांगीण विकासासाठी स्वत:ला वाहुन घेतले. बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना करून अस्पृश्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व जागृती निर्माण करणे, त्यांना न्याय मिळवून देणे यासाठी भरीव प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकरांच्या मते जातीव्यवस्था ही अशास्त्रीय, अविवेकी आहे. जात ही केवळ नकारार्थी काम करणारी योजना आहे. काही व्यक्ती जाती व्यवस्थेचे समर्थन श्रम विभागणीसाठी आवश्यक मानतात. त्यांच्या मते श्रमविभागणी आवश्यक आहे. पण ती जन्माबरोबर होऊ नये. ती थोपवली जाऊ नये. ती कायम अपवर्तनीय असू नये. प्रत्येक व्यक्तीस त्याची पूर्ण क्षमता वापरण्याची संधी मिळाली पाहिजे. डॉ. बाबासाहेबांच्या मते जात हा हिंदू धर्मातील सगळ्यात मोठा दोष आहे. ती एक मानसिक स्थिती असून तिचा उगम माणसाच्या मनात होऊन त्यातून उच्च निचतेची कल्पना निर्माण झाली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराची भारतातील जाती संबंधीची निरीक्षणे

१. भारतातील जातीव्यवस्था ही श्रम विभाजण्याच्या तत्वानुसार निर्माण झाली नसून जातीव्यवस्थेमुळे श्रमिकांचे निरनिराळ्या जातीत विभाजन झाले आहे.

२. भारतातील जातीव्यवस्था ही मनुष्यात असणाऱ्या गुणावर आधारीत नसून गुणाचे स्वरूप हे नैसर्गिक असते त्यामुळे ती अनैसर्गिक आहे.

३. भारतातील जातीव्यवस्था ही पूर्व कर्माशी पूर्वजन्माशी जोडण्यात आला आहे. खरेतर ह्या म्हणण्याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. पाप, पुण्य, पूर्वसंचीत ह्या गोष्टी काल्पनिक आहेत.

४. जातीव्यवस्थेला / धर्माचा आधार असला तरी बुध्दीचा किंवा तर्काचा कोणताही आधार नाही.

५. भारतातील जाती संस्था ही मानवनिर्मित असून तिचे स्वरूप कृत्रीम आहे.

६. भारतातील जातीव्यवस्थेमुळे समाजाचे विघटन होऊन समाजातील सामाजिक संबंध बिघडले. त्यामुळे सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य निर्माण होऊ शकले नाही.

७. भारतातील जाती जन्माच्या आधारावर ठरविल्या जात असल्यामुळे व त्या जातीतून बाहेर पडता येत नसल्याने जात बदलविता येत नसल्याने जातीचाच व्यवसाय करावा लागल्यामुळे व्यक्तीच्या कर्तबगारीला पायबंद बसतो.

८. व्यक्तीचा दर्जा जन्माने ठरत असल्यामुळे त्यांना समान संधी व स्वातंत्र्य मिळत नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जातीमधील भेद नष्ट करण्याचे उपाय**

१. जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह रूढ करणे यासाठी कोणत्याही व्यक्तीचा अथवा कृत्रीम साधनाचा उपयोग न करता प्रत्येक स्त्री पुरूषाला हिंदू धर्माच्या मानसिक दास्यातून मुक्त केले पाहिजे.

२. भारतातील जातीसंस्था नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकर हिंदू धर्मात परीवर्तीत करण्याचा सल्ला देतात. भारतीय समाजाला अंधश्रध्दा, रूढी, परंपरा याच्या कचाट्यातून मुक्त करावे.

३. जातीव्यवस्थेचे वर्चस्व कमी करण्यासाठी त्यांनी बुध्द धर्माचा स्वीकार करण्यावर भर दिला.

४. अस्पृश्याला संघर्षाशिवाय आपले हक्क मिळणार नाही. त्यांनी साध्यापेक्षा साधन महत्त्वाचे मानून स्वत:च्या हिंमतीवर स्वातंत्र्य, समता, न्याय खेचून घेण्यावर भर दिला. अस्पृश्यांनी जाती व्यवस्थेची बंधने तोडून खऱ्या अर्थाने न्याय मिळविण्यासाठी उच्च शिक्षण घेऊन स्वत:चे व संपूर्ण दलिताचे सांस्कृतिक परीवर्तन घडवून आणण्यावर आर्थिक/स्थितीत बदल करण्यावर भर दिला.

५. जातीव्यवस्थेची तिव्रता कमी करण्यासाठी दलिताचे हीत संबंधाची जपणूक करण्यासाठी त्यांनी 'मजूर पक्ष' तसेच All India Scheduled Cast Federation ची स्थापना केली.

६. अस्पृश्यता जातीव्यवस्था धार्मिक अंधश्रध्दा यापासून भारतीय समाजाची मुक्तता करून त्याची उभारणी मुक्त बुध्दीवादावर करण्यावर भर दिला.

७. जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी राष्ट्रीय परिवर्तनावर भर दिला.

**अस्पृश्यांना प्रेरणा :**

अस्पृश्यतेच्या समस्येबाबत निरक्षर, साधेभोळे कित्येक वर्षापासून गुलामगिरीत जीवन जगणारे रूढी, परंपरेनुसार वागणारे अशा या लोकांतील अज्ञान दूर करणे एक मोठे आव्हान बाबासाहेबा समोर होते. पेशवे काळामध्ये समाजाची विभागणी ब्राह्मण, शूद्र आणि अतीशूद्र या तीन घटकामध्ये झाली. जातीव्यवस्था ही तत्कालीन समाजव्यवस्थेचा प्रमुख आधार होता. अस्पृश्यांना अस्पृश्यतेच्या नावाखाली अतिशय अपमानकारक वागणूक दिली जात असे. महार, मांग, चांभार व डोर ह्या लोकांची वस्ती गावापासून दूर ठेवण्यात येत असे. त्यांना शिक्षणाचा अधिकर नव्हता व्यक्ती स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करून ध्येयवादी

आंबेडकरांनी कठोर परिश्रम घेऊन ज्ञानसाधना केली. या ज्ञान साधनेचा उपयोग भारतीय जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था यांच्या जीवन पध्दतीतून अस्पृश्याची झालेली पिळवणूक त्यांच्यावर झालेला अन्याय अत्याचार यांना समर्थपणे तोंड देण्याचे ठरविले.

हिंदू धर्माप्रमाणेच अस्पृश्यांना देखील धार्मिक, सामाजिक, समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने बाबासाहेबांनी १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, १९३० साली नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी केलेला सत्याग्रह. याशिवाय अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ असावे यासाठी त्यांनी लढा दिला. यातूनच पुणे कराराचा जन्म झाला. भारताचे संविधान लिहिताना घटनेत अस्पृश्यता प्रतिबंधक कायदा समाविष्ट करून तशी तरतुद करण्यात आली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दलित अस्पृश्यासह सनातनी हिंदू धर्माचा त्याग करून समातावादी बौध्द धर्माचा स्वीकार केला आणि अस्पृश्याच्या येणाऱ्या अनेक पिढ्यामध्ये आत्मविश्वास व ताकद निर्माण केली व त्याच्यासाठी शिक्षणाची बिजे रूजविण्यास सुरूवात केली. शिक्षण घेतल्यामुळे अज्ञान कमी होईल तसेच अस्पृश्याचा विकास होण्यासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था, वसतिगृहे ह्याची उभारणी करून अस्पृश्यांना योग्य न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षि शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रम करून त्यांना अन्यायाच्या विरूध्द लढण्यासाठी संघटीत केले. महार ही अस्पृश्यामधील सर्वात मोठी जात असून त्यांना समाजात अतिशय हीन वागणूक दिली जात होती. त्यांना राजकीय स्तरावर योग्य न्याय मिळविण्यासाठी त्यांनी मुकनायक, बहिष्कृत भारत, प्रबुध्द भारत अशी वृत्तपत्रे काढून त्यात अस्पृश्याच्या अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य केले. आपल्या जातीय बांधवांना राजकीय स्तरावर न्याय मिळविण्यासाठी अनुसूचित जाती संघ स्थापन करून त्याच्या विकासासाठी शैक्षणिक सोयी व सक्ती, राखीव जागा याची घटनेत तरतुद केली. कायद्यानुसारच अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास व्हावा म्हणून विविध शैक्षणिक उपक्रम व सुविधा पुरविल्या जाऊ लागल्या त्यामुळे त्यांच्यात नवचैतन्य निर्माण होऊन त्यांच्यात जागृती झाल्याचे दिसून येते.

**अस्पृश्य व त्यांची उत्पत्ती** :

तत्कालीन हिंदूच्या सर्वोच्च ग्रंथ 'मनुस्मृती' मध्ये काल्पनिक पध्दतीने अत्यंत हीन पध्दतीने अस्पृश्य जातीचा उदय झाल्याचे प्रतिवादन केले व आश्चर्य म्हणजे स्वत:ला ब्राह्मम समाजणाऱ्या तत्कालीन बुध्दीवान लोकांनी ते मान्यही केले. परंतु डॉ. आंबेडकरांच्या मते, प्राचीन काळी टोळ्या टोळ्यांनी समाज उदरनिर्वाहाकरिता भटकत होता. अर्थात भटक्या जातीच्या टोळ्या अस्तित्वात होत्या. उत्क्रांतीच्या प्रवाहात कृषी आणि पशुपालन अवस्थेत यापैकी काही भटक्या टोळ्या स्थायी होत गेल्या. शेती आणि पशुंच्या माध्यमातून जेव्हा संपत्तीसंचय होण्याच्या प्रक्रियेत काही आदिम टोळ्या मात्र भटकतच राहिल्या. भटकंती करणाऱ्या टोळ्या आणि स्थायी झालेल्या टोळ्या ह्या कधीही शांत राहिलेल्या नसून आपसात धान्य, गुरे चोरण्याकरिता, स्त्रिया पळविण्याकरिता युध्द करीत राहिले. भटक्या टोळ्यांना, भटक्या टोळ्यांशी युध्द करण्यापेक्षा स्थिर झालेल्या जातीसोबत युध्द करीत राहिले. अशा टोळी युध्दामध्ये कोण्याही एका टोळीचा संपूर्ण नाश होण्या ऐवजी तिचा पराभव होऊन तिची वाताहत होत

असे. पराभूत टोळीची वाताहत होऊन तिचे लहानलहान गट निर्माण होत असत. अशा पराभूत लहान लहान गटांना जगणे अशक्य होत असल्यामुळे त्यांनी स्थायी झालेल्या जमातीशी शरणागती पत्करून वाटले त्या अटीवर त्याच्या शेजारी (गांव कुसाबाहेर) वस्ती करून कायमचे स्थिर होण्याचा प्रयत्न केला. यामधूनच गावकुसाबाहेर अस्पृश्याच्या वसाहती (महारवाडे) अस्तित्वात आल्याचा सिध्दांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वस्तुनिष्ठ पध्दतीने मांडला.

प्रथम स्थायी झालेल्या टोळ्यांना सुध्दा भटकंती करणाऱ्या टोळ्याचा एकमेकावर स्वाऱ्या करण्याचा त्रास असह्य होत असे. युध्दात हारल्या गेलेले वाताहत झालेले एकटे, दुकटे पडलेले काही लोक एकत्रित येऊन प्रथम स्थायी झालेल्या लोकासोबत आश्रयस्थान व स्वरक्षणाच्या हेतुने एकत्रित येऊन काही कराराच्या आधारावर गावाच्या बाहेर वस्ती करून राहू लागले. यामध्ये गावातील (सवर्ण) व गाव कुसाबाहेरली (अवर्ण म्हणजे अस्पृश्य) या दोघाचाही फायदा झाला. दोन्ही मिळून इतर युध्द करणाऱ्या भटक्या टोळ्याशी संघर्ष करीत असल्यामुळे युध्दात विजयी होण्याची शक्यता अधिक असेल. गावकुसाबाहेरील म्हणजेच अस्पृश्य समाजाने सवर्णाची सेवा करायची व सवर्णांनी अस्पृश्याची रक्षा करण्याची व उदरनिर्वाहाची सोय करावी अशा प्रकारच्या एकमेकावर अवलंबून असण्यामधूनच अस्पृश्य जातीचा उदय झाला असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिपादन केले.

**जातीव्यवस्थेचे निर्मूलन :**

भारतातील जातीव्यवस्था जोपर्यंत नष्ट होणार नाहीत इथल्या प्रत्येक व्यक्तीला जोपर्यंत समान हक्क मिळणार नाही तोपर्यंत भारतातील कुठल्याही समाजाचा विकास होऊ शकत नाही असे डॉ. आंबेडकरांचे ठाम मत होते. हिंदू समाजातील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी पहिले पोटजाती नष्ट करायला पाहिजे असे त्यांचे मत होते. जातीव्यवस्था निर्मूलनाचा उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह होय असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. आंतरजातीय विवाहामधून रक्त संबंधाचे विविध जातीची माणसे परकेपणाची भावना विसरून एकत्रीत येतील व आनंदाने जीवन व्यतीत करतील असे त्यांना वाटत होते. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती—जमाती, मागासवर्ग, अल्पसंख्यांक आणि ॲग्लोइंडियन यांना इतर वरीष्ठ वर्गाच्या बरोबरीला आणण्यासाठी घटनात्मक तरतुदी केल्याचे दिसून येते. ज्या तरतुदीनुसार वरील उल्लेखीत वर्गांना राजकीय आरक्षण, नोकरीतील आरक्षण, शैक्षणिक सवलती विविध सामाजिक, सांस्कृतिक व कायद्याने संरक्षणात्मक अधिकार प्राप्त झाले. भारतीय राज्यघटनेच्या भाग—३ मधील कलम १४, १५, १६, १७, १९, २३, २५, २९, ३० आणि भाग—४ मधील मार्गदर्शक तत्त्वे यातील कलम ३८, ३९, ४०, ४१, ४६ आणि १६ मधील विशेष उपबंध यामधील कलम ३३०, ३३२, ३३५, ३३८, आणि ३४० नुसार विविध जातीसाठी हक्काच्या तरतुदी केलेल्या आहेत.

बहिष्कृत भारताच्या २१ डिसेंबर १९२८ च्या अंकात डॉ. आंबेडकर यांनी हिंदूचे धर्मशास्त्र या नावाने एक अग्रलेख लिहून या समाजाच्या एकीकरणात केवळ जातीभेद हा मोठा अडथळा आहे. या जातीभेदामुळे हिंदू समाजाची वृत्ती रखडली आहे असे प्रतिपादन केले. माझा आदर्श समाज स्वतंत्र, समता, बंधुत्व, न्याय यावर आधारलेला असे या समाजरचनेत समाजातील सर्वच व्यक्ती समाविष्ट असतील असे मत मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की, व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे उद्योग करण्यात विरोध करणे म्हणजे गुलामगिरी प्रवृत्तीस प्रोत्साहन देणे होय.

ॲनहिलेशन ऑफ कास्ट या ग्रंथातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अत्यंत मूलभूत व क्रांतीकारी स्वरूपाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत विविध तरतुदी करून संपूर्ण भारतीय समाज, जातीपातीचे बंधने तोडून एकसंघ व्हावा याकरिता प्रयत्न केले. परंतु आजही समाजामध्ये जातीयता (जातीभेद) असल्याचे दिसून येते. राज्यघटनेने सामाजिक न्याय व जरी प्रस्थापित झाला असला तरी घटनात्मक तरतुदीची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याने खैरलांजी सारखी प्रकरणे आजही पुरोगामी असलेल्या महाराष्ट्रात घडत असल्याचे दिसून येते. जोपर्यंत इथल्या लोकांची मानसिकता बदलणार नाही तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारही त्यांना पटणार नाही.

**संदर्भग्रंथ सूची :**

*आंबेडकर, बी. आर. भारतीय राज्यघटना.*

*आंबेडकर, बी. आर. अस्पृश्य मूळचे कोण. नागपूर : नेहा प्रकाशन.*

*निंबाळकर, वामन (२००६). डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा. : प्रबोधन प्रकाशन.*

*मून, वसंत. समतेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर : वसंत मून प्रकाशन नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया.*

*भोळे, भा. ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार. नागपूर : अॅन्ड कं. पब्लिशर्स.*

*चंकीडापूरे, बि. पी. गौतम बुध्द जीवन आणि त्याचे तत्त्वज्ञान. नागपूर : विदर्भस्तरीय धम्म संसद.*

# सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक योगदान

प्रा. डॉ. संजय भगत
समाजशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा ज्योतीबाफुले महाविदयालय,
अमरावती

**प्रस्तावणा :**

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात व भारत देशाात नाव घेण्यासारख्या ज्या समकालीन स्त्रीया आढळतात त्यामध्ये सावित्रीबाई फुले यांचे कार्य तुलनेने कितीतरी पटीने मोलाचे व क्रांतीकारक असे आहे. म्हणुन त्या भारताच्या समाजक्रांती कार्यातील आद्य क्रांतीकारक ठरतात.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जाने १८३१ साली सातारा जिल्हयातील नायगाव येथे झाला सावित्रीबाई फुले यांच्या वडीलांचे नाव खंडोजी नेवासे पाटील होते. ते शेती करत, त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई होते. खंडोजी व लक्ष्मीबाई यांना चार अपत्ये होते. सावित्रीबाई या सर्वात मोठया होत्या. त्यांचे आई वडील त्यांना लहानपणी सारु असे म्हणत होते. सावित्रीबाई फुले यांचे लग्न ज्योतीबा फुले यांच्याशी १८४० साली झाले. ज्योतीबा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना लिहायला व वाचायला शिकविले. १५ मे १८४४ साली पुणे येथे पहिली मुलींची शाळा काढली. त्या काळात मुलींना शिक्षण घेण्यास मज्जाव होता. स्त्रीयांचा आवाका फक्त चुल आणि मुल एवढाच होता. अशा परिस्थीत मुलींची शाळा काढणे, त्यांना शिकवीणे हे सोपे काम नव्हते. सावित्रीबाई व ज्योतीबा फुले यांनी या कार्यासाठी खुप कष्ट केले. शेण, दगड यांचा मारा सहन केला. सावित्रीबाई फुले यांच्या सोबतीला सगूणाबाई व त्यांची मैत्रिण फातिमा शेख होत्या. फातिमाने शिक्षण घेतले, ती शिक्षीका झाली. पडद्यामागून बाहेर आली. परंपरेची चौकट तीने तोडली. सावित्रीबाईंनी मुलींची शाळा सुरु केली, त्या शाळेमध्ये फातिमा ही पहिली प्रशिक्षीत शिक्षीका झाली.

पुणे परिसरातील शाळेचे व्यवस्थापन सावित्रीबाई पाहत होत्या. शिक्षीका, मुख्याध्यापिका आणि संचालिका म्हणुन त्यांची जबाबदारीने कार्य केले. स्त्री शिक्षणाचे एक नवे युग त्यामुळे सुरु झाले. शाळेत येणाऱ्या मुलींना सावित्रीबाई मनापासुन शिकवीत असत. सतत अभ्यासाचे आझे पडू नये म्हणून त्यांना कथा कहाण्या आणि इतर शौर्याच्या गोष्टी सांगत असत. मुलींना त्या खेळ शिकवीत असत. त्यांना खावू देत असत आणि मुलींनी आनंदाने राहावे, त्यांना शाळेत यायला आवडावे म्हणून त्या सतत प्रयत्न करीत असत. मुलींनाही आपल्या बाईबद्दल प्रेम व आपुलकी वाटत असे. मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा, म्हणून त्या धडपड करीत असत. एखादी मुलगी सतत तिन चार दिवस शाळेत आली नाही, तर तीच्या घरी जावून तिची चौकशी करीत असत. आणि आजारी असल्यास तीच्या औषधपाण्याची सोय करीत असत. तिच्या पालकांना धिर देत असत. त्यांना थोडीफार आर्थिक मदतही करीत होत्या. त्यामुळे गोरगरिबांच्या वस्तीत सावित्रीबाईचे प्रेमाणे स्वागत होत असे. त्यांनी एक प्रेमळ शिक्षीका असा नावलौकीक मिळविला होता. त्याचा परिणाम म्हणजे, लोक स्वत:हून आपल्या मुलींना शाळेत पाठवू लागले.

शैक्षणिक कार्य :

सावित्रीबाई फुले केवळ शिक्षीकाच नव्हत्या तर, शिक्षणतज्ञही होत्या, त्यांनी शिक्षणाचे काही प्रयोग केले. शुद्रातीशुद्र मुलींच्या शाळेत त्या स्वत: आणि फातिमा शेख या मुस्लिम शिक्षीका शिकवीत असत. तर ब्राम्हण मुलीच्या शाळेत ब्राम्हण शिक्षीका शिकवीत असत. वर्षाच्या शेवटी मुलींची चाचणी घेतली तेव्हा शुद्र मुलींपेक्ष ब्राम्हण मुली सरस ठरल्या. तेव्हा सावित्रीबाई फुले यांनी असा मुलभूत विचार मांडला की, शुद्र आणि अतिशुद्र मुलींचा विकास व्हायला हवा असेल, तर त्याच समाजातील शिक्षीकांची नियुक्ती करावी. म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षणाचे कार्य होवू शकेल. दीन दलीतांच्या मुलांना केवळ लिहीणे आणि वाचणे शिकविण्यापेक्षा त्यांच्या कपडा लत्याचे, पोटा पाण्याचे आणि आरोग्याचे प्रश्न सोडविणेही तितकेच महत्वाचे आहे.हा विचार त्यांनी मांडला. '' प्रौढ शिक्षण '' रात्रीची शाळा त्यांचा हा प्रयागही उल्लेखनीय होता. शाळेत येणाऱ्या मुलींची क्षमता, त्यांच्या कुटूंबाचा शैक्षणिक इतिहास, त्यांचे पर्यावरण यांचा अभ्यास करुन त्यांनी त्या मुलींनासाठी वेगळा अभ्यासक्रम तयार केला. शिक्षक हा प्रशिक्षीत असावा यावर त्यांचा व ज्योतिबा फुले यांचा कटाक्ष होता. सावित्रीबाई फुले यांनी त्यादृष्टीने एक अध्यापक विद्यालय सुरु केले. शिक्षण हे त्यांना समाज जागृतीचे व समाजक्रांतीचे महत्त्वाचे साधन वाटत होते. विद्या संपादन करण्यासाठी परंपरेच्या विरोधात उभे राहायला हवे, असा विचार त्यांनी मांडला.

**अस्पृश्यांसाठी कार्य :**

पेशव्यांनी पुण्यामध्ये पेठा – पेठयांमध्ये पाण्याचे हौद बांधले होते. या हौदावर नेहम गर्दी असे. कोणी पाणी भरत असे , कोणी आंघोळ करीत असे, तर कुणी धुणी धुत असे, एखादी जवळच राहणारी बाई भांडी सुध्दा घासत असे, पण तेथे महार, मांगांना पाणी भरु दिल्या जात नव्हते. अस्पृश्यांच्या स्पर्शाने पाणी बाटते अश्या समजुती होत्या. नगर पालिका अस्पृश्यांची काहीच सोय करीत नव्हती. त्यामुळे महार, मांगांची बायका, पोरे हातात मडकी घेवून ''पाणी वाढा हो दादा'' '' पाणी दया हो माई '' अश्या विनविण्या करीत असत. भर दुपारी पाय चटचटा भाजत असतांना छोटी मुले पाण्यासाठी व्याकुळ होत अंगावरचा घाम पुसत पाण्यासाठी गयावया करीत पण कोणालाही त्यांना पाण्या दयायला फुरसद होत नसे. ज्योतीबा आणि सावित्रीबाई यांना त्यांची हि परवड पाहवत नसे, म्हणुन त्या दोघांनीही ठरविले की आपल्या वाडयातील आपल्या मालकलीचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करायचा. गंजपेठेतील सार्वजनिक हौदाजवळ जावून त्यांनी तेथे पाण्यासाठी तळमळणाऱ्या अस्पृश्यांना आपल्या वाडयात नेले. आणि त्यांनी पाणी भरण्यास परवानगी दिली. आणि अस्पृश्यांना सांगीतले आजपासुन माझ्याप्रमाणे हा हौद तुमचाही आहे. दिवसभरात केव्हाही या आणि लागेल तेवढे पाणी खुशाल घेवून जा. स्वच्छता राखा म्हणजे झालं. तेव्हापासुन तो हौद अस्पृशांसाठी खुला झाला. सावित्रीबाईमध्ये दया, क्षमा, करुना हे गुण असल्यामुळे भुकेलेल्यांना अन्न व तहाणलेल्यांना पाणी देणे हे त्यांनी ब्रिद मानले. आणि ममतेने त्यांनी दलितांच्या मुलांवर माया केली.

**बालहत्याप्रतिबंधक गृह व अनाथ बालबालिकाश्रमातील कार्य :**

१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतर पुण्यातील उच्च वर्णीय ब्राम्हणाने विधवा विवाह शास्त्र संमंत नाही असा प्रचार चालविला होता. त्यामुळे बालहत्या व भृणहत्या वाढीस लागली होती. बालहत्या आणि विधवा विवाह धर्माने त्याज्य मानला आहे. याला शास्त्राधार नाही असे ज्योतीबांचे विचार होते. म्हणुन त्यांनी १८५३ साली बालहत्याप्रतिबंधक गृहाची स्थापना केली. फेब्रुवारी १८७१ ज्ञानप्रकाश मध्ये असे प्रकाशित करण्यात आले की, एका परोपकारी सदगृहस्ताने गरोदर स्त्रिया आणि मुले यांना आश्रय देण्यासाठी एक स्वतंत्र घर बांधले आहे. हि संस्था काढुन त्या गृहस्ताने समाजातील अनेक स्त्रियांना छळापासुन वाचविले आहे. सावित्रीबाई फुले यांनी काशिबाई नावाच्या ब्राम्हण विधवेस आपल्या घरी आश्रय देवून तिच्यावर बहिणीप्रमाणे प्रेम केले. व तिच्या मुलाला दत्तक घेतले व आपल्या मुलाप्रमाणे मानले. सावित्रीबाइला स्वत:चे अपत्य नव्हते तथापी त्या माउलीने आपल्या दयाळु उदार स्वभावाला अनुसरुन त्या सर्व अर्भकांचे अत्यंत प्रेमाणे व वात्सल्याने संगोपण केले. हे तिचे कार्य म्हणजे भारतातील स्त्रीयांच्या जिवणातील एक युग प्रवर्तक अशीच घटना होती.

**दुष्काळनिवारणार्थ कार्य :**

१८७६ साली महाराष्ट्रात भिषन दुष्काळ पडला होता. पावसाअभावी नदया, नाले आटले होते. झाडाच्या काटल्या उरलया. गुरे – ढोरे चारा पाणी न मिळाल्याने व्याकुळ होवून प्राण सोडत होती. मानसे जनावरांचा कोंडा खावून जिव जगवत होती. पोर जगावीत म्हणुन गोर गरिब धान्याच्या मोबदल्यात मुले विकु लागली. हि परिस्थिती पाहुन ज्योतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आपल्या मित्राच्या मदतीने अन्नछत्रे उघडले. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते वर्गनी गोळा करीत होते. अन्नछत्राचे नियोजन करण्यात व प्रत्यक्ष अन्न शिजवुन त्यांचे गोर गरिबांना वाटप करण्यास थोर माता सावित्रीबाई पुढे आली व तिने अत्यंत प्रेमाणे अनेक लहान मुलांना आईसारखे भरविले. त्यांना जिवनदान दिले. या दुष्काळात सावित्रीबाईंनी ज्योतीबांच्या बरोबरीने मोलाचे कार्य केले.

**प्लेगच्या साथीत केलेले कार्य :**

१८९७ मध्ये पुण्यामध्ये प्लेग नावाच्या साथीच्या रोगाने धुमाकूळ घातला होता. लोक पुणे सोडून जात होते. लोकांनी सावित्रीबाईना पुणे सोडण्याची विनंती केली परंतु त्या तयार झाल्या नाही. यातुन उद्‌भवनारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेगपिडीतांसाठी पुण्याजवळ असलेला ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरु केला. एक दिवस एक प्लेग ग्रस्त मुलाला आश्रमात आणण्याची कोणतीही व्यवस्था होवू शकली नाही त्यामुळे त्या स्वत: त्या मुलाला आपल्या खादयांवर घेवून आश्रमात आणले आल्या स्वत:ची प्रकृतीची पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यासांठी काम केले. दुदैवाने त्या स्वत:च प्लेगच्या भिषण रोगाच्या बळी पडल्या आणि १० मार्च १८९७ रोजी पुण्यात त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई आज आपल्यात नसल्यातरी त्यांचे कार्य आपल्याला सदैव प्रेरणा देत राहील.

सदर्भ :

१) डॉ. गिरीश खारकर – महात्मा फुले यांचे अखंड – एक चिकीत्सा
सुगण प्रकाशन, खोलापूरी गेटजवळ, अमरावती

२) डॉ. सारनाथ सौंदळकर – सावित्रीबाई फुले – एक समग्र वाडमय
सारनाथ प्रकाशन, धार रोड, परभणी

३) डॉ. सरोज आगलावे – ज्योतीराव फुले – सामाजिक तत्वज्ञान
सुगावा प्रकाशन, पुणे

४) डॉ. यशवंत मनोहर – मी सावित्री
योगसाक्षी प्रकाशन, नागपूर

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# घाटंजी तालुक्यातील आदिवासी बालकांमधील कुषोषणाचा अभ्यास

डॉ. कविता आर किर्दक
एस.पि.एम.सायन्स व गिलाणी कला वाणिज्य महाविद्यालय
घाटंजी जि. यवतमाळ,
Mail : kirdakkavita339@gmail.com
9657150770

**गोषवारा :**

भारत हा विकसनशील देश आहे. देशाला गरीबी, दारीद्रय व बेकारी प्रमाणेच कुपोषण ही लागलेली किड आहे. आदिवासी लोकांमध्ये बालकात कुपोषणाचे प्रमाण अधिक आढळते. बालकाच्या जन्माच्या पुर्वी पासूनच म्हणजे गर्भधारणे पासूनच मातेला समतोल आहार मिळत नसल्याने बालकात कुपोषण आढळते. कुपोषण होण्याची शारिरीक, आर्थीक व सामाजीक कारणे आहेत. प्रामुख्याने पोष्टीक आहाराचा अभाव, अज्ञान, अंधश्रध्दा रूएीपरंपरा, इत्यादींचा समावेश त्यात होतो.

**प्रस्तावणा :**

आपल्या देशात गरीबी, दारीद्रय व बेकारी या जशा बिकट समस्या आहेत त्याच प्रमाणे कुपोषण सुद्धा एक बिकट समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या फक्त आपल्या देशापुर्तीच मर्यादीत नाही तर तो जागतीक प्रश्न सुध्दा आहे. ज्या ज्या भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे, त्या त्या भागात ग्रामसेवक, प्राथमिक आरोग्य केंद्र, सामाजीक संघटना, स्वयंसेवी संस्था कुपाषण निर्मुलनासाठी कार्य करीत असतात. तरी देखील ही समस्या कायम आहे.

आजचे बालक उद्याचे भावी नागरीक आहे. देशाचे आधार स्तंभ आहेत. यांच्याच हातात राष्ट्राचे भविष्य आहे. म्हणूनच या बालकांचे संगोपन योग्य रितीने व्हायला हवे, त्यांच्या सर्व गरजा पुर्ण व्हायला हव्यात, परंतू आदिवासी लोकांमध्ये या बाबत उदासीनता दिसून येते. त्यांना गरीबीमुळे आपल्या पाल्यांकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. आई वडीलांना रोज मजूरी करावी लागते, त्यासाठी ते दिवसभर घराबाहेर असतात आणि मुलांकडे दुर्लक्ष होते. इतकेच नाही तर अंध्श्रध्दा, अज्ञान, रूढीपरंपरा आर्थिक परिस्थिती व्यवसनाधीनता यामुळे आदिवासी मुलांमध्ये कुपोषनाचे प्रमाण वाढलेले दिसते.

**कुपोषण :**

जेव्हा शारिरीक आवश्यकतेनूसार काही घटक अजीबात मिळत नाही. तर काही घटक कमी किंवा जास्त प्रमाणात मिळतात, त्यांचे परिणाम शरिरावर दिसतात त्याला कुपोषण म्हणतात. (डॉ. आशा देऊस्कर)

**उद्दिष्टे :**

१. घाटंजी तालुक्यातील आदिवासी बालकांच्या पोषण व आहारासंबंधी माहीती प्राप्त करणे.
२. पालकांच्या आर्थीक सामाजीक व शैक्षणीक समस्यांविषयी माहीती प्राप्त करणे.
३. कुपोषणावरील उपाय सुचविणे.
४. आदीवासींच्या अंधश्रध्दा, रूढी परंपरा या विषयी माहीती जाणून घेणे.

गृहीतकृत्ये :

१. अपुऱ्या आहारामुळे कुपोषणणाची समस्या निर्माण होते.

२. अंधश्रध्दा, अज्ञान रूढी परंपरेमुळे कुपोषणाची समस्या निर्माण होते.

**संशोधन क्षेत्र** : घाटंजी तालूक्याची संशोधन क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली.

**अध्ययन पध्दती** : प्रस्तूत संशोधनाकरीता प्रश्नावली मुलाखत पध्दतीचा वापर करण्यात आला.

**नमुना निवड** : १ ते ५ वयोगटातील १०० बालकांचे वय व वजन पडताळून बघण्यासाठी अंगणवाडीत वजन काट्याचा तसेच वाढीच्या तक्त्याचा उपयोग करण्यात आला.

**माहीतीचे प्रस्तृतीकरण** : घाटंजी तालुक्यातून निवडलेल्या १०० बालकांमधून ६० मुले व ४० मुली आहेत. त्यात कुपोषीत बालक ०६ आहेत, तर साधारण बालके ९४ आहेत. कुपोषीत बालकांमध्ये ०४, मुले व ०२ मुली आहेत. तर साधारण बालकांमध्ये ६० मुले व ३४ मुली आहेत. संकलीत माहीतीच्या आधारे मुर्लीपेक्षा मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. या मागील कारणांचा शोध घेतल्यानंतर असे निदर्शनास आले की, दोन बालकांच्या वयामधील अंतर फारच कमी असल्यामुळे अपत्यांचे व्यवस्थीत संगोपन केले जात नाही.

आदिवासी स्त्रीया बालकांच्या संगोपनाबाबत उदासीन दिसतात. जन्म ते १ वयोगटात कुपोषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते. मातांना गर्भवती असतांना योग्य व पोषक आहार मिळत नाही. नवजात बालकाला प्रत्येक दिवशी प्रत्येक किलो वजनाला १२० कॅलरिजची गरज असते. साधारणत: १ वर्षाच्या बालकाला १०००कॅलरीज रोज लागतात. परंतू घाटंजी तालूक्यातील आदिवासी बालकांना मातेचे पुरेशे दूध मिळत नाही. याच कारणामुळे मुलांची आहाराची गरज पुर्ण होत नाही. गर्भावस्थेत मातेला सर्व अन्न घटकयुक्त आहार मिळत नाही. अंधश्रध्दा दारीद्रय व्यसनाधिनता यामुळे समतोल आहार मिळ नसल्यामूळे ती बाळाचे पोषण करू शकत नाही.

लॉकडाऊन पूर्वी मातेला व बालकांना आहार मिळत होता परंतू या कोविड–१९ च्या काळात शाळा बंद असल्यामूळे आहार मिळू शकला नाही. या कारणाने कुपाषणाचे प्रमाण वाढल्याचे अभ्यासात निदर्शनात आले आहे.

आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाणही बरेच कमी आहे. मुलींची लग्ने सुध्दा कमी वयातच केली जातात. त्यामुळे मातेला लवकर गर्भधारणा होऊन मुल जन्माला येते. बाळाच्या गरजेनूसार आहार, वैदयकीय सेवा मिळत नाही. म्हणूनही कुपोषणग्रस्त मुले आढळतात असे मुलाखतीतून स्पष्ट झाले आहे.

निष्कर्ष:

१. आदिवासी लोकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता आढळत नाही.

२. रूढी चालीरीती, अंधश्रध्दा, अज्ञान यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे.

३. अपुऱ्या वैदयकीय सोयी, शिक्षणाचा अभाव, यामुळे सुध्दा कुपोषणाचे प्रमाण वाढते.

४. महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामूळे आहाराबाबत ज्ञान नसते.

**शिफारशी :**

१. आदिवासींचे संख्या जास्त असलेल्या भागात शिक्षणाच्या व वैदयकीय सेवा पुरविणे.

२. शिक्षणाच्या माध्यमातून आदिवासींना आरोग्य शिक्षण देणे.

३. अंधश्रध्दा, रूढी परंपरा, अज्ञान, व्यसनाधीनता इत्यादी विषयावर मार्गदर्शन करणे.

४. स्त्रीयांचा आरोग्य विषयक दर्जा सुधारणे.

५. अन्न, अन्न घटक त्याचा शरिराला उद्योग या बाबत मार्गदर्शन करणे.

**संदर्भग्रंथ सुची:**

१. तारणेकर मिनाक्षी — आहार आणि पोषण, दत्तासण प्रकाशन नागपूर.

२. गोंगे सुलभा फरकाडे त्रिवेणी — बालविकासाची मुलतत्त्वे, पिंपळापूरे प्रकाशन नागपूर.

३. डॉ. महाजनी स्नेहा — आहारशास्त्राची मुलतत्त्वे, मंगेश प्रकाशन नागपूर.

४. आगलावे डॉ. प्रदिप — भारतीय समाज प्रश्न व समस्या

Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# राष्ट्रविकासात महिलांचे योगदान

**प्रा. डॉ. माधुरी ना. कोकोडे**
विभागप्रमुख, गृहअर्थशास्त्र
श्री गोविंदप्रभू कला व वाणिज्य महाविद्यालय, तळोधी
(बाळापूर) जि. चंद्रपूर 441221 (म.रा.)
E-mail :- mn.kokode@gmail.com

**सारांश**

भारत हा प्राचीन काळी मातृप्रधान देश होता. मुलांना मातेच्या नावावरून ओळखले जायचे उदा.राधेय,कौणतेय .त्यानंतर कालांतराने स्त्रीला कुटुंबात दुय्यम स्थान प्राप्त झाले कारण पुरुषप्रधान संस्कृती उदयासआली .या काळात स्त्रियांवर अनेक अत्याचार होऊन तिची दयनीय अवस्था झाली होती. परंतु अशाही परिस्थिती काही महिला होऊन गेल्यात व आहेत की ज्यांनी सर्व महिलांचे शोषण व त्यांच्या भावनांचा खेळ मांडणाऱ्या समाजाला वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला. आणि सामाजिक आर्थिक औद्योगिक अशा अनेक क्षेत्रात स्वतःचे अस्तित्व स्वतःची ओळख निर्माण केली. स्त्रियांच्या समाज सुधारणा चळवळीतून ,स्त्री शिक्षणाचा प्रसार व प्रचार यामधून अनेक डॉक्टर, वकील ,शिक्षक, विचारवंत व पत्रकार निर्माण झाल्या .वर्तमान काळात महिला भारतात आणि भारताबाहेर मोठ्या पदांवर कार्यरत आहेत तसेच स्वतःचा रोजगार यशस्वीपणे सांभाळून इतरांना रोजगार देत आहेत .राष्ट्रकुल स्पर्धा ,राजकारण ,आर्थिक क्षेत्रात व शिक्षण क्षेत्रात महिला मोठ्या पदावर कार्यरत आहेत.संशोधन क्षेत्रातही महिलांची कामगिरी अमोलिक आहे. कुटुंब व्यवस्था ,समाजव्यवस्था ,राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर अवलंबून असते .याचाच अर्थ स्त्री ही पुरुषांच्या मार्गातील धोंड नसून संसार रुपी रथाचे एक महत्वपूर्ण चाक आहे. राष्ट्र विकासात महिलांचे योगदान हा संशोधनात्मक विषय वर्णनात्मक विवेचनात्मक संशोधन प्रकारातून इथे मांडण्यात आला.या संशोधनात्मक विषयातून येणाऱ्या नवीन पिढीला आत्मविश्वास मिळून प्रेरणा मिळेल व जागृती निर्माण होईल.

**बिजशब्द** राष्ट्र ,विकास ,महिला, योगदान

**प्रस्तावना**

स्त्री जगज्जननी आणि मातृस्वरूप आहे. ती कुटूंबाचा आधार आहे. त्यामुळे राष्ट्र उभारणीचा पाया घरातच आहे. राष्ट्र हे नव्याने घडत नाही ते अनादीकाळापासून अस्तित्वात आहे. पण या राष्ट्रावर अनेक परकीय आक्रमणे झाली. नंतर ब्रिटीशांचे राज्य होते. अशा परिस्थितीत कुटूंबव्यवस्था, ग्रामव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, अर्थव्यवस्था कोलमडल्या त्यामुळे या राष्ट्राचे पुनरूत्थान करणे, पुनर्निर्मिती करणे गरजेचे होते. धर्म हा राष्ट्राचा प्राण आहे. स्त्री आणि पुरूष हे धर्माचे पालन करणारे दोन घटक आहेत. या दोन घटकांचे कुटूंब, समाज, परिवार, राष्ट्र आणि विश्वाच्या कल्याणासाठी, विकासासाठी फार मोठे योगदान असते. त्यात महिलांमधील मोठी कार्यशक्ती, संवेदनशिलता, समर्पन, ध्येय आणि क्षमा राष्ट्र उभारणीत, राष्ट्र विकासाचा मोठा आधार आहे.

हिंदू धर्मामध्ये मुळात स्त्रिला देवता मानले आहे. भारतीय संस्कृतीने तीला मानाचे स्थान दिले आहे. परंतु नंतरच्या काळात मात्र स्त्रिचा सन्मान, आदर याला दुय्यम स्थान दिले होते. याचाच अर्थ अनादिकाळापासून भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांपेक्षा पुरूषांना अधिक महत्व दिले गेले आहे. राजा महाराजांच्या काळापासून स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तू, फक्त "चूल आणि मूल" या पुरतीच मर्यादित होती. घरातील कोणतेही अधिकार किंवा निर्ण्य घेण्याचा स्त्रिला अधिकार नव्हता पण जबाबदाऱ्या मात्र सर्व वेळोवेळी तिने पूर्ण कराव्यात ही अपेक्षा स्त्रीकडून केली जात होती. अशी परिस्थिती असतांना त्यातही काही अशा महिला होऊन गेल्यात की, ज्यांनी सर्व महिलांचे शोषण, त्यांच्या भावनांचा खेळ मांडणाऱ्या समाजाला वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला. सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला आणि राष्ट्र विकासात मोलाचे योगदान दिले. "जी स्त्री सुशिक्षीत होईल आणि त्याहून महत्वाचे आर्थिक स्वायत्तत: मिळवेल ती अन्यायाचे जोखड फेकून देणारच." हे महात्मा जोतिराव फुले यांनी सांगितले १७९२ मध्ये मेरी कलस्टनक्राफ्ट यांनी स्त्रियांच्या हक्काचे समर्थन

केले. सुमारे अडीचशे पानांच्या ग्रंथामुळे स्त्रिवादाचा जन्म झाला. मुख्य म्हणजे स्त्रियांच्या अतिरेकी भावूकतेचे व भावनाशिलतेचे पडघम पिटणाऱ्या परंपरेला ही महिला अतिशय यशस्वीपणे समोर गेली. स्त्रियांनी स्त्रियांच्या हक्कासाठी आजवर दिलेल्या लढ्याचा आढावा आपण घेतला तर असे लक्षात येते की, स्त्रियांची गेल्या अनेक शतकातील वाटचाल ही राष्ट्र विकासाच्या दृष्टीने मोलाची आहे. उदाहरणादाखल ही माहिती घेऊन त्यावर अभ्यास करून या संशोधन पेपरच्या माध्यमातून वर्तमानातील समाजातील महिलांना जाणीव करून देणे व जागरूकता निर्माण करणे हाच उद्देश आहे.

**उद्दिष्टे**

१) राष्ट्र विकासातील महिलांचे योगदान याबाबत माहिती घेणे.

२) राष्ट्र विकास व विविध क्षेत्रातील महिलांचे योगदान याचा संबंध जाणून घेणे

३) वर्तमान काळातील महिलांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तूत विषयाचा वर्णनात्मक, विवेचनात्मक संशोधन प्रकारातून अभ्यास करण्यात आला.

**माहितीचे विश्लेषण**

स्त्री ही स्वतंत्र अग्नितेची, विचारांची, अभिव्यक्तीची वर्तणूकीची आणि अधिकाराची आहे. पुरूषाप्रमाणे कुटूंब जीवनात, समाज जीवनात, राष्ट्रजीवनात तिला अत्यंत मानाचे स्थान आहे. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रिला मानाचे स्थान आहे. वैदीक काळात स्त्रिला पूज्य मानत होते. तिचा सन्मान व आदर केला जात होता. अथर्ववेदामधील उल्लेखानुसार वैदीक काळातील स्त्री पराक्रमी, विर व सबला होती याचे दाखले आहेत. परंतु पुढे मध्यंतरीच्या काळात ही परिस्थिती बदलून "चूल आणि मूल" एवढेच कार्य स्त्रिच्या वाट्याला आले. तिच्या शिक्षणावरच बंदी नाही तर संपूर्ण स्वातंत्र्य हिरावून घेतले होते. पण क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्रिशिक्षण हाती घेतले. हिमालयाच्या उंचीचे विचार ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्यात सामावलेले होते. १८४८ मध्ये पूणे येथे

मुलींसाठी पहिली शाळा काढून महाराष्ट्रात सर्वप्रथम स्त्रिला शाळेचा दरवाजा उघडून दिला. ज्योतिबा व त्यांची अर्धांगीनी सावित्रीबाई फुले या दोघांनी मिळून सर्वप्रथम अस्पृश्य शिक्षण आणि स्त्रिशिक्षणाच्या समर्थनार्थ आवाज उठविला. पारंपारिक चौकट मोडून समाजपरिवर्तनाची कास धरली. या दोन्ही उभयतांनी प्रतिगामी समाजाचा तिव्र विरोध पत्करून समाजव्यवस्थेत बदल केला. आज समाज जीवनात इतका बदल झाला की, प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने किंबहूणा काही ठिकाणी पूरूषांपेक्षाही पुढे स्त्रियांनी पाऊल टाकले आहे. इ.स.१८८५ते १९४७ हा कालखंड  अतिशय गौरवशाली राहीला.२० व्या शतकात . राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या प्ररणेतुन वरिष्ठ वर्गापासुन ते सामान्य वर्गातील स्त्रिया चळवळीमध्ये सहभागी झाल्या .राजकारण ते समाजकारणाकडे वळल्या.क्रांतीकारी चळवळी,सत्याग्रह ,असहकार चळवळ यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने सहभाग घेतला.

राष्ट्र विकासातील स्त्रियांचे योगदान याबाबत अभ्यास करतांना असे लक्षात येते की, समाजातील स्वतःचे न्यायस्थान जगभरात कुठेही भारतातील महिलांना पुरूषांप्रमाणे मिळाले नाही. परंतु स्त्रियांच्या संघर्षाच्या आणि त्यातून त्यांनी साधलेली प्रगती याचा अभ्यास आपल्याला साक्ष देते. उदाहरणार्थ १९५० मध्ये प्रेम माथूर यांनी भारतातील पहिली व्यावसायिक महिला वैमानिक होण्याचा मान मिळाला. १९५२ च्या ऑलम्पिक स्पर्धांमध्ये पूरूष व महिलांना एकत्र खेळण्याची संधी मिळाली. भारत देशाच्या पहिल्या पंतप्रधान इंदिरा गांधी, पहिल्या मुख्यमंत्री सुचिता कृपलानी यांना हा मान मिळाला. मदर टेरेसा यांना शांततेचा नोबेल पुरस्कार, भारतातील पहिली राष्ट्रपती महिला प्रतिभाताई पाटील, भारतातील पहिली महिला गवर्नर श्रीमती अरूणधती भट्टाचार्य, गानसम्राज्ञी लता मंगेशकर ज्यांना भारतरत्न हा किताब मिळाला. अशा या आत्मविश्वासाने हिरीरीने पुढे सरसावलेल्या कर्तृत्ववान स्त्रियांची ओळख म्हणजे त्याग, श्रद्धा, नम्रता व सुजाणपणा या गुणांनी ओतप्रोत भरलेली आहे.  लक्ष्मीबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांच्या पावलावर पाऊल ठेवत मिरा बोरवणकर, सुनिता विल्यम् पी. टी. उषा, अंजू जॉर्ज, कल्पना चावला, सानिया मिर्झा, सिंधू या महिला आपापल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवत आहेत व

येणाऱ्या उमलत्या पिढीला प्रेरणा देत आहेत. पोलीस सहकारी दल, रिक्षा चालक, ट्रक चालक, पेट्रोल पंपवर, फायर ब्रिगेड, कंडक्टर, ख्ेळाडू ,पत्रकारीता असे अनेक कार्य यशस्वीपणे पार पाडत आहेत. संशोधन क्षेत्रातही महिलांची कामगीरी अतुलनीय आहे.

**महिलांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान**

महिलांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान जाणून घेत असतांना त्यांचे सामाजिक स्थानाचे सहजच दर्शन घडते. एकिकडे भारतातील स्त्रियांचे कुपोषण, अत्याचार हा आजदेखील पूर्णपणे थांबलेले दिसत नाही ही शोकांतिका आहे. परंतु अशाही परिस्थितीवर मात करत महिलांची आर्थिक क्षेत्रातील भूमिका ही अत्यंत महत्वपूर्ण आहे. सार्वजनिक क्षेत्रात भारतातील महिलांचे रोजगाराचे प्रमाण वाढत आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्या तरी एकूणच महिलांचे प्रमाण मात्र कमी आहे. जास्तीत जास्त महिला खाजगी क्षेत्राकडे अधिक प्रमाणात वळलेल्या दिसतात. वर्तमान परिस्थितीत विविध मोठमोठ्या कारखान्यांमधून, उद्योगांमधून तसेच विदेशी कंपन्यांमधून महिला कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. भारतीय तंत्रज्ञ महिला विदेशात कार्यभार सांभाळत आहेत. म्हणजेच उत्पादन निर्मिती आणि उत्पन्न निर्मिती यात महिलांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**महिलांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान**

सामाजिक क्षेत्रात तर पुरातन काळापासून महिलांचा पुढाकार दिसून येतो. ज्या काळात स्त्रिशिक्षण म्हणजे फार मोठे पाप समजले जायचे. त्या काळात समाजाचा तिव्र विरोध पत्कारून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये पहिली मुलिंची शाळा सूरू केली.१८५३ मध्ये बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना केली. १०० वर्षापूर्वी बुलढाण्याच्या ताराबाई शिंदे यांनी स्त्रि-पुरूष समानता हे पुस्तक लिहीले आणि

समाजाला स्त्रि-पुरूष समानतेचे महत्व पटवून दिले. आजसुद्धा भारतीय महिला सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत.

भारताच्या सामाजिक चळवळीमधील ठळक नाव म्हणजे मेधा पाटकर नर्मदा बचाव आंदोलनासारख्या एका दरीखोऱ्यातल्या मोठ्या धरणाला विरोधाच्या मुद्यावर चाललेल्या आंदोलनाचं नेतृत्व करत आहेत. वयाच्या १६ व्या वर्षी उमलत्या वयात वसिमा हुरजूक यांचा कमरेपासूनचा खालचा भाग लुळा पडला असतांना प्राप्त परिस्थितीत मानसिक बळ आणि चिकाटीच्या जोरावर स्वत: उभ्या झाल्या आणि हजारो अपंग, विकलांग महिलांसाठी मायेचं छत्र निर्माण करून त्यांना स्वावलंबी सक्षम बनविण्यासाठी आपल्या "हेल्पर्स ऑफ द हॅन्डीकॅप" या संस्थेच्या माध्यमातून त्यांना स्वावलंबन शिकविले. त्यांच्या पंखांना बळ दिले.अनांथाची माय सिंधूताई सपकाळ ,२०११ मध्ये मैग्सेसे पुरस्कार विजेत्या निलिमाताई मिश्रा अशा अनेक राष्टविकासातील हिरकण्यांची उदाहरण देता येतील.

**महिलांचे राजकीय क्षेत्रातील योगदान**

राजकीय क्षेत्रात प्राचीन काळापासून महिलांचे योगदान दिसून येते आणि आजही सक्रीयतेने वसा पुढे चालत आहे. वैदिक काळात मैत्रेय व गार्गी यांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग चर्चेत होता. १८५० साली झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने मेरी झॉशी नही दुंगी म्हणत इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला आणि स्वत:च्या प्राणाची आहुती दिली. पुण्यातील अहिल्याबाई होळकर यासुद्धा एक यशस्वी राज्यकर्त्या होत्या. त्यांनी आपल्या राज्य कारभाराचा संपूर्ण भारतावर कायमचा ठसा उमटविला.

वर्तमान काळातही स्त्रियांनी राजकारणात आपली वेगळी छाप उमटविलेली दिसते. पहिल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राजकारणात खंबिरपणे भारताचे नेतृत्व केले. तसेच उत्तरप्रदेशच्या माजी मुख्यमंत्री सुचिता कृपलानी, मायावती, तामिळणाडूमधील जयललीता व पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे राजकारणातील कार्यकर्तृत्व पुरूषांपेक्षा कुठेही कमी नाही. आजही सरपंच,आमदार,खासदार अनेक राजकिय पदे महिला यशस्वीपणे सांभाळत आहेत.

**महिलांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान**

एक स्त्री शिकली म्हणजे संपूर्ण कुटूंब शिकते म्हणून कुटूंबात स्त्रिशिक्षणाला फार महत्व आहे. स्त्रिशिक्षण हा कोणत्याही समाजजिवणच्या समृध्दिचा आणि प्रगतिचा मापदंड होय. वेदकाळात स्यिांना मान होता.त्यांना मुलांच्या बरोबरीने शिक्षण घेता येत होते. गागी मैतेय व वाचक्नवी यांचे योगदान फार मोठे आहे. मध्ययूगीन काळात स्त्रिशिक्षणात पिछेहाट झाली तरिही बाबर बादशहाची कन्या गूलबदन बेगम यांनी हुमायुननामा हा ग्रंथ लिहिला व तो एक ऐतिहासिक दस्ताऐवज ठरला.१९०९ मध्ये रमाबाई रानडे यांनी सेवासदन संस्था काढुन स्त्रिच्या सर्वागिण विकासात व राष्ट्रकार्यात फार मोठा हातभार लावला.

२० व्या शतकात स्त्रिशिक्षणात बरीच सुधारणा झाली. २१ व्या शतकात तर विविध शाखामधील शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे. आणि त्यातून डॉक्टर, इंजिनिअर, आयएएस ऑफिसर, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, वैमाणिक,संशोधिका पोलिस अधिकारी, संगणकतज्ञ ,व्यवस्थापक प्राचार्या, प्राध्यापिका, शिक्षिका अशा अनेक पदावर कार्यरत आहेत. अगदी कुलपती ते कुलगूरू पासून ते संचालक अशा शिक्षणातील प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार केल्यास असे लक्षात येते की, राष्ट्र विकासात महिलांचे योगदान अतुलणीय, अमौलिक आहे.

**निष्कर्ष्**

स्त्रियांची गेल्या अनेक शतकातील वाटचाल ही राष्ट्र विकासाच्या दृष्टीने मोलाची आहे. आजही भारतातील स्त्रियांचे कुपोषण, विविध प्रकारे अत्याचार हा पूर्णपणे थांबलेले दिसत नाही ही शोकांतिका आहे अशा संघर्षाला खिंबरपणे तोंड देत स्वसंरक्ष्ण करीत २१ व्या शतकात . विविध क्षेत्रात महिलांचे प्रमाण वाढत आहे. उदा. डॉक्टर, इंजिनिअर, आयएएस ऑफिसर, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, वैमाणिक,संशोधिका पोलिस अधिकारी,

संगणकतज्ञ ,व्यवस्थापक प्राचार्या, प्राध्यापिका, शिक्षिका अशा अनेक पदावर कार्यरत आहेत. महिला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तुत्वाने अस्तित्वाने राष्ट्र विकासात मोलाचे योगदान देत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) शिक्षण संक्रमण – मार्च २०१२

२) ग्रामगीता – वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

३) महिला धोरण २०१४ – महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासन

४) http://lib.unipune.ac.in.>jspui>bifstream

५) www.kalnirnay.com>blog>

६) www.pmc.gov.in

७) महाराष्ट्र टाईम्स, –१९ नोव्हेंबर २०१८

# “स्त्री मुक्ति चळवळी”

प्रा. पांडुरंग रुस्तुम पाचपुते
(सहा.प्राध्यापक)
श्रीमती. पी. डी. पाटील समाजकार्य महाविद्‌यालय, खड़की (बु) अकोला.

**सारांश :-**

सामाजिक 'स्त्री मुक्ती चळवळी' ह्या समाजाच्या बहुसंख्य स्त्रियांच्या आवश्यकतेची पूर्ती करण्याच्या दृष्टीने समाजात उदयास येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या उत्थानासाठी स्त्री-मुक्ती चळवळी झालेल्या आपणास पहावयास मिळतात. तसेच आधुनिक काळातदेखील अनेक श्री मुक्ती चळवळी उदयास आल्या. आज भारतीय समाजामध्ये वेगवेगळ्या स्त्रीमुक्ती चळवळी चालू आहेत, या स्त्री मुक्ती चळवळीमध्ये सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, स्त्री कवयित्रीचे योगदान, तसेच स्वातंत्र्य लढ्यामध्ये स्त्रियांचा सहभाग आणि प्रत्यक्षात स्त्रियांकरिता स्त्रियांच्या विकासाकरिता करण्यात आलेले कायदे तसेच स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे काय या सर्वांचा आढावा सदरील संशोधन पेपरमध्ये करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :-**

भारतीय प्राचीन संस्कृतीचा विचार केला तर स्त्री च्या जीवनावर व्यक्तिगत तसेच सार्वजनिक स्तरावरील विविध घटकांचा मोठा परिणाम घडून आलेला दिसतो. भारतीय समाजात कुटुंबाला मोठे स्थान असल्यामुळे पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीला हीन लेखले गेले. पुरुषापेक्षा स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले. पुत्र व्हावा असे सर्वांना वाटे. त्यासाठी विविध विधी केल्या जात. परंतु मुली जन्माला येणे हे दुर्भाग्याचे लक्षण मानले जाई. केवळ वरिष्ठ वर्गातील मुलींनाच शिक्षणाचा अधिकार होता. सती, वियोग, जोहार यासारख्या चाली रूढ होत्या. पतीच्या निधनानंतर स्त्रीला आपल्या मुलांवर अवलंबून राहावे लागे. पुत्र प्राप्ति शिवा आहे हे लोक व परलोकातील कल्याण प्राप्त होऊ शकत नाही असा दृढ समज होता. सामाजिक दृष्ट्या विवाह व अपत्य प्राप्ती हेच स्त्री जीवनाचे कर्तव्य मानले जात होते. स्त्रीला घराच्या चार भिंतीआड समाजापासून विकासापासून शिक्षणापासून दूर ठेवले गेले. स्त्रियांना विविध नियमात बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला गेला होता. स्त्रीने एकांतात बसूनही घरातील छोटेसे काम ही स्वतंत्रीत्या करू नये. स्त्री ही पूर्णपणे पिता-पुत्र- पती यांच्यावरच अवलंबून असावी या सर्व बंधनामुळे स्त्री ही मानसिक दृष्ट्या इतकी खोलवर गेली होती की ती फक्त समाजाने लादलेली 'चुल' आणि निसर्गाने लाभलेले 'मुल' या चाकोरीयुक्त कार्यप्रणाली मध्येच जगू लागली.

प्रामुख्याने जगातल्या सर्वच समाजात स्त्रियांचे दुय्यम म्हणजे नगण्य स्थान असल्याचे दिसून येते. स्त्रियांच्या दुय्यम स्थानामुळे तिच्यावर होणारा अत्याचार, अन्याय,अवहेलना यांच्या जाणिवेतून स्त्रियांची चळवळ सुरु झाल्याचे दिसून येते ही स्त्रियांची चळवळ ही प्रामुख्याने तिच्या पारंपारिक भूमिकेच्या बदलासाठी आहे. तिच्यावर जे बाईपण लादले जाते. त्यातून तिला मुक्त होऊन पुरुषाप्रमाणे स्वतंत्र आणि समतेच्या हक्कासाठी धरलेला आग्रह आहे. वेगवेगळ्या देशात स्त्रियांच्या चळवळी चालू आहेत स्त्रियांची चळवळ ही कोणत्यातरी विचारधारेशी जोडली गेली आहे. वर्तमान काळात स्त्रियांच्या विकासासाठी त्यांच्यावर होणारा अत्याचार सुरक्षितता या सर्वांसाठी कायद्याने प्रयत्न केले असले तरी हे सर्व स्त्री चळवळीचे फलित आहे. १२ व्या शतकात कर्नाटकात बसवेश्वरांनी स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय असे सर्व प्रकारचे हक्क प्रदान करून दिले त्यांचे स्त्रीविषयक कार्य पाहिले असता स्त्री मुक्ती चळवळीचे ते आद्य प्रणेते ठरतात. तसेच याच शतकात महाराष्ट्रात चक्रधर स्वामींनी स्त्रियांचे पुरुषाबरोबरीचे स्थान मांडले.

भागवत संप्रदायात मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, यांना मानाचे स्थान होते जनमानसावर त्यांचा प्रभाव होता. नंतर जिजाबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई, ताराबाई, उमाबाई दाभाडे या पराक्रमी स्त्रियांचा प्रभाव जाणवतो. १९ व्या शतकातील महात्मा फुले यांचे स्त्री विषयक विचार व कार्य अतिशय महत्त्वाचे ठरते. स्त्रियांसाठी असलेल्या जाचक तरुणींना त्यांनी विरोध करून त्याचा उपाय म्हणून स्त्री शिक्षणात सुरुवात करून तळागाळातील स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. फुले यांच्या कार्याचा प्रभाव शाहू महाराजांवर झाला आणि स्त्रियांसाठी अनेक महत्त्वपूर्ण कायदे केले. १९ व्या शतकातील स्त्री चळवळीने समाजसुधारणेच्या संदर्भात स्त्री स्वातंत्र्याची भूमिका घेतली. यात स्त्रियांचे कुटुंबातील स्थान रूढी परंपरेच्या नावाखाली होणारे अन्याय, अत्याचार, सतीप्रथा, वेश्या व्यवसायास प्रवृत्त होईल अशा आत्मघाती विचार करणाऱ्या स्त्रियांचा उद्धार करण्यासाठी सतीची चाल बंद करणे विधवा-पुनर्विवाह बाल विवाहाला विरोध, विधवा केशवपन आस विरोध या सारख्या चळवळींना सुरुवात झाली. यात राजाराम मोहनरॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी समाजसुधारकांनी समाजाचा कडवा विरोध पत्करून सुधारणा घडवून आणण्यास प्रसंगी कायदे करून घेतले.

**स्त्रीवादी चळवळीचे दोन टप्पे :-**

**१ ) स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री चळवळ**

**२ ) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ**

**( १ ) स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री चळवळ :-**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या विविध भागात समाजाच्या पुनर्रचनेसाठी चळवळी झाल्या त्यात सतीची चाल नष्ट करण्यापासून ते विधवांचा पुनर्विवाह, स्त्रियांचे शिक्षण इत्यादी अनेक विषय होते. हे प्रश्न फक्त स्त्रियांच्या चळवळीचे म्हणून उचलले गेले नाहीत, तर समाजाला

आधुनिक बनविण्यासाठी त्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक होते. म्हणून त्या संदर्भात चळवळी झाल्यात. त्यात सतीबंदीचा कायदा - १९३२ , महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. १९४९ मध्ये पुण्यातील उस्मानशेट यांच्या वाड्यात शाळा सुरू केली. १८५१ मध्ये रास्ता पेठेत मुलींची शाळा सुरू केली. १८५२ मध्ये वेताळ पेठेत स्टेशनच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. १८५५ मध्ये शेतकरी व शेतमजूर स्त्री-पुरुषांसाठी रात्रीची शाळा सुरू केली. १८५३ मध्ये बाल हत्या प्रतिबंधकगृह व प्रसूती गृह सुरू केले. १ मे १८८२ ला पुणे येथे आर्य महिला समाजाची स्थापना झाली. त्याच वर्षी ताराबाई शिंदे लिखित “स्त्री पुरुष तुलना” हे जळजळीत भाषेतील पुस्तक प्रकाशित झाले. १८८७ मध्ये रखमाबाईंनी दादाजी ह्या आपल्या नवऱ्याशी संसार करण्यास नकार दिला व त्यासाठी सहा महिने तुरुंगवासाची तयारी दर्शविली. त्याच वर्षी आनंदीबाई जोशी ह्या भारतातील पहिल्या स्त्री डॉक्टर झाल्यात. १८९१ मध्ये संमतीवयाचा कायदा पास झाला. १९१६ मध्ये हे महर्षी करवे द्वारा स्वतंत्र महिला विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. सर्वप्रथम स्त्री संस्थांना एकत्र आणण्याचा प्रयत्न रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली १९०४ मध्ये भरलेल्या मुंबई येथील अखिल भारतीय परिषदेत झाला.

अशाप्रकारे अनेकपुरुष सुधार व स्त्रियांनी शिक्षणाकरिता उत्थानाकरिता वैयक्तिकरित्या व संस्थांमार्फत कार्य केलेले दिसते.

**( २ ) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ :-**

भारतीय समाजात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांच्या स्थितीत उल्लेखनीय परिवर्तन झालेत. तरीही जगातील सर्व देशातील महिलांचा विचार केला तर भारतीय महिलां सारखी दयनीय अवस्था दुसऱ्या कोणत्याही देशातील स्त्रीची नाही. आरोग्य शिक्षण रोजगार या आघाड्यांवर तिची पिछेहाट झाली असल्यामुळे हाती आलेले संपूर्ण राजकीय हक्क निरर्थक बनले होते. कारण सामाजिक स्वातंत्र्या शिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही. म्हणूनच डॉक्टर आंबेडकरांसारख्या समाज सुधारकांनी स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कांपासून वंचित करणाऱ्या व परिणामी निम्न आर्थिक दर्जा देण्यास कारणीभूत ठरणाऱ्या परंपरागत धार्मिक व सामाजिक दोन्ही विरुद्धचे आंदोलन स्वातंत्र्य युद्धा बरोबरच सुरू केले होते. दीर्घकालीन परंपरांनी बधीर झालेल्या स्त्री मनाला चेतन करण्याचे सामर्थ्य शिक्षण आतच आहे हे फुले कर्वे आणि डॉक्टर आंबेडकरांनी हेरले होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा मोठा सहभाग होता. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री स्वातंत्र्यलढा लढली याचा एक सुप्त परिणाम असा झाला की स्त्रियांतील हिनत्वाची भावना कमी झाली आत्मविश्वास वाढला. आरंभीच्या काळातील स्त्री मुक्ती चळवळीचे स्वरूप तसेच सोम्य वाटत असले तरी या चळवळीला भक्कम पायावर उभी करण्याचे कार्य याच काळातील आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण प्रौढ मतदान पद्धती स्वीकारली . भारतीय राज्यघटनेने स्त्रियाना पुरुषांबरोबर चा सामाजिक दर्जा दिला. स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आल्या. मुख्य म्हणजे हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीचे कुटुंबातील स्थान तिचा वैचारिक दर्जा यासारख्या बाबींच्या संदर्भात स्पष्ट व पुरोगामी धोरणाचा स्वीकार केला गेला. तसेच स्त्री मुक्ती संदर्भात अनेक कायदे सुद्धा करण्यात आले.

**संत कवयित्रींचे योगदान** :-

मध्ययुगीन महाराष्ट्रात स्त्रियांचा दर्जा सुधारण्याच्या संदर्भात व स्त्री चळवळीचा मागोवा घेताना संत कवयित्रींनी सुद्धा मोलाची भर घातली. संत कवित्री ने आपले काव्य, अभंग, ओव्या यातून मानवी जीवनाची मूल्ये व स्त्री जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविले स्त्रियांच्या दुःखमय जीवनाचे वर्णन त्यांनी केले.समाज हिताची व समाज शिक्षकाची भूमिका त्यांनी स्वीकारली आणि स्त्री जीवनाच्या विकासाला मोठे योगदान दिले.

महदंबा ही महानुभाव पंथाचे आद्य पुरुष चक्रधरस्वामी यांच्या शिष्या. महंदबेने पोवाळा, पूर्वार्ध व उत्तरार्ध, रुक्मिणी व कर्मकांड ओव्या इत्यादी स्वरूपात साहित्यनिर्मिती केली .महंदबेने स्त्री जीवन व सामान्य स्त्रियांच्या उद्धारासाठी मोठे योगदान दिले. ज्ञानदेवांची धाकटी बहीण मुक्ताई हिने ताटीच्या अभंगाद्वारे अध्यात्मिक गोष्टी तत्त्वज्ञान यांचा प्रसार केला. तिने मानवी स्वभावातील अहंभाव सोडून देण्याची शिकवण सर्वांना दिली. संत जनाबाई ही तर क्रांतिकारी कवित्री म्हणून ओळखली जाते. शुद्र दासी म्हणून जीवन जगलेल्या संत जनाबाईने भारतीय स्त्रियांना कर्तुत्वाने आत्मोन्नती करण्यासाठी अध्यात्म वादाचा मार्ग स्त्रियांनी अवलंबण्याविषयीचा आदर्श घालून दिला. बहिणाबाईंच्या अभंगातून तत्कालीन भारतीय समाजजीवनाच्या विविध पैलूंचे वर्णन आढळते. अध्यात्मिक ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचे विवेचन त्यांनी केले समाजात कनिष्ठ शुद्रांचा दर्जा असलेल्या स्त्रियांना आत्मोन्नतीसाठी व आत्म विकासासाठी धैर्य नम्रता शुद्ध चारित्र्य इत्यादी गुणांची गरज असते हे त्यांनी त्यांच्या स्वतःच्या उदाहरणावरून समाजाच्या निदर्शनास आणून दिले.

**स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचा सहभाग** :-

गांधीजींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियांना सहभागी करून घेतले परदेशी मालावर बहिष्कार टाकणे ,सूत काढणे, कापड विणणे, निरनिराळ्या सभांना जाणे, प्रभातफेरी काढणे, अनिष्ट प्रथांचे निर्मूलन,कायद्यात सुधारणा घडून आणणे इत्यादी प्रकारची कार्ये स्त्रीयांनी पार पाडली. यात सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, अरुणा असफ अली,प्रा.उषा मेहता, हंसा मेहता इत्यादींचा समावेश होता १९३१ मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.

१९७५ मध्ये युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे केले आणि पुन्हा स्त्री चळवळींना प्रेरणा मिळाली. कारण पाश्चिमात्य स्त्रीवादाशी येथील स्त्री चळवळीचा संपर्क आला यानंतर भारतात महिलांच्या राजकीय संघटना, स्वायत्त संघटना, जनवादी आंदोलन इत्यादी स्त्री चळवळीच्या

माध्यमातून स्त्रियांचे अनेक प्रश्न जसे, हुंडाविरोधी चळवळ, प्रसारमाध्यमांतील स्त्रीची प्रतिमा, पाठ्यपुस्तकातील लिंगभेदावर आधारित अभ्यासक्रम, सौंदर्यस्पर्धा, कौटुंबिक अत्याचार, महागाई विरुद्ध आंदोलन, मद्यपान विरोधी चळवळ, परितक्त्या, महिला आरक्षण, नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या इत्यादी महिला संदर्भित प्रश्न चळवळीच्या माध्यमातून हाताळण्यात आले. स्त्री साहित्य, स्त्री अभ्यास केंद्र, पथनाट्य हेदेखील स्त्री चळवळीत महत्वपूर्ण योगदान देत आहेत.

**निष्कर्ष**:-

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये व स्वातंत्र्योत्तर कालावधीमध्ये स्त्री-मुक्ती चळवळीमध्ये स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग तसेच, स्त्रियांच्या उत्थानासाठी भारतीय समाज सुधारक व धाडसी विरांगणा आणि साहित्याच्या माध्यमातून कविता, पोवाडे यांच्या माध्यमातून कवयित्री बहिणाबाई चौधरी संत जनाबाई, मुक्ताई यांच्या ताटीचे अभंग, ओव्या इत्यादी स्वरूपातून भारतीय व महाराष्ट्रीय स्त्रियांचा विकास साधण्यासाठी आधुनिक काळात देखील स्त्रीमुक्ती चळवळी सातत्याने सुरू आहेत यातून स्त्रियांचे अधिकार आणि हक्क निश्चितच प्राप्त होतात. एकूणच स्त्रियांच्या विकासामध्ये "स्त्री मुक्ती चळवळीचे" योगदान अतिशय मोलाचे आहे.

**संदर्भ** :-

१ ) प्रा. सौ. सुनंदा भद्रशेटे, प्रा. ब.बी शेख, 'भारतातील सामाजिक आंदोलने' अरुण प्रकाशन लातूर.
२ ) डॉ. बी. एम. कऱ्हाडे, 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र' पिंपळापुरे अँड पब्लिशर्स नागपूर.
३ ) डॉ. प्रकाश स. बोबडे, 'कोलाज'( आर्थिक विकास व सामाजिक चळवळी) मंगेश प्रकाशन.

# भारतातील आर्थिक सर्वसमावेशकता आणि आव्हाने

**प्रा.डॉ.सुनिल एन. ढेरे.**
**कला व वाणिज्य महाविद्यालय.**
**बोरी अरब ता. दारव्हा. जि. यवतमाळ**

## प्रस्तावना

आर्थिक सर्वसमावेशकता ही देशाचा शाश्वत आर्थिक व सामाजिक विकास घडवत असते. वंचितांना स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशाने त्यांचे जीवनमान उंचावण्याचा हेंतु त्यात असतो. वंचितांना आर्थिक निर्णयात योग्य व अयोग्य हे समजून देण्याचा उद्देशही त्यात असतो.कमी उत्पन्न गटाच्या लोकांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग वाढवला जातो. त्यांना आर्थिक सेवा उपलब्ध करुन देउन हे शक्य असते.

आर्थिक सर्वसमावेशकता समिती (भारत सरकार २००८) आर्थिक सर्वसमावेशकतेची व्याख्या करतांना म्हणते की, लोकांना आर्थिक सेवा वेळेवर व पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देणे म्हणजे आर्थिक सर्वसमावेशकता होय.यात कर्ज उपलब्धता हा महत्वाचा घटक असतो. वंचितांना कमी दराने कर्ज उपलब्ध करणे यात आवश्यक असते. त्यामुळे आर्थिक सर्वसमावेशकता म्हणजे कमी उत्पन्न गटाच्या लोकांना समान संधी उपलब्ध करुन देत त्यांना सर्व आर्थिक सेवा विना विलंब उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया होय. आर्थिक सर्वसमावेशकता ही युध्दपातळीवर साध्य करायला हवी. त्यात विशिष्ट कालावधी ठरवुन घेतला पाहीजे. विकास व तंत्रज्ञान यांचा वापर करुन गरिबांना कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी यात दोन प्रकारचे समर्पित निधी असले पाहिजेत.

## संशोधनाचा उद्देश—

१. आर्थिक सर्वसमावेशकता म्हणजे लोकांना आर्थिक सेवा वेळेवर व पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देणे.
२. कमी उत्पन्न गटाच्या लोकांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग वाढविने.
३. कर्ज उपलब्धता हा महत्वाचा घटक.
४. वंचितांना कमी दराने कर्ज उपलब्ध करणे बाबत अभ्यास.
५. कमी उत्पन्न गटाच्या लोकांना समान संधी उपलब्ध करुन देत त्यानां सर्व आर्थिक सेवा विना विलंब उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया बाबत अभ्यास.

## गृहीतके—

**१**. भारतातील अर्थव्यवस्थेवर बॅकीग क्षेत्राचा प्रभाव मोठया प्रमाणावर आहे.
२. राष्ट्रीय विकासाचा बॅकिंग क्षेत्रावर परिणाम होउन विविध आव्हाने निर्मान झाली आहेत.
३. असंघटीत क्षेत्रातील गरीबांना बॅकाचा फायदा मिळाला.
४. ई—पैशाचा वापर हा शहरी भाग व ग्रामीण भागातील सुशिक्षिततापुरता मर्यादित आहे.

**आर्थिक सर्वसमावेशकता—ऐतिहासिक घडामोडी —** आर्थिक सर्वसमावेशकतेत भारत अग्रेसर आहे. त्याला पुर्वेतिहास आहे.भारतात आर्थिक सर्वसमावेशकता ही स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या १९५५ मधील राष्ट्रीयीकरणानंतर झाली. त्यानंतर १९६७ मध्ये सामाजिक बॅकिंगची चर्चा सुरु होउन नंतर १४ खाजगी बॅकाचे १९६९ मध्ये राष्ट्रीयीकर करण्यात आले. त्यात ज्यांना बॅकिग सुविधा नाही त्यांना म्हणजे कमकुवत गटाना ती उपलब्ध करुन देण्याचा हेतु होता. त्यात ग्रामीन भागात बॅकिंग सुविधा देण्याचे अपेक्षित होते. अग्रक्रमाने कर्ज देण्याची कल्पना १९७४ मध्ये महत्वाची ठरली. त्यात बॅकिंग सुविधा नसलेल्या भागात सरकारी बॅकांची सेवा सुरु झाली. १९८० मध्ये आणखी आठ बॅकांचे राष्ट्रीयीकरण झाले व ग्रामीण तसेच दूरस्थ भागात त्यांची सेवा वाढू लागली. तेव्हापासून बॅकाच्या कर्जाला नवी दिशा व गती मिळाली. २००५ पासुन भारत सरकार व रिझर्व बॅक ऑफ इंडिया तसेच नॅशनल बॅक फॉर अग्रीकल्चर अॅड रुरल डेव्हलपमेन्ट म्हणजे नाबार्ड यानी आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी प्रयत्न सुरु केले.त्यात स्वमदत गट बॅकांच्या सलग्नतेने सूरु झाले. व्यवसाय सुलभीकरणासाठी प्रतिनिधी नेमले गेले. नो युवर कस्टमर म्हणजे केवायसी निकष, इलेक्टॉनिक निधी हस्तातंरण, मोबाईल तत्रंज्ञान वापर,शून्य शिल्लक खाती, आर्थिक साक्षरता या गोष्टीना महत्व आले. त्याशिवाय ग्राहक सेवा केंद्रं, कर्ज समुपदेशन केंदें,किसान पतपत्रे, राष्ट्रीय पेन्शन योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या नवी सुकल्पनाची भर त्यात पडली.अनेक योजना असूनही अजून बॅकिग सेवांचा प्रसार अपेक्षेइतका नाही.पंतप्रधानानी पदग्रहण केल्यानंतर १५ ऑगस्ट २०१४ रोजी भाषणात प्रत्येक घरासाठी बॅकिग खत्यावर भर दिला होता. प्रधानमंत्री जनधन योजनेत बचत खाते,गरजाधिष्ठित पतपुरवठा,रकमा अदा करण्याची सेवा, विमा,पेन्शन या सर्व सुविधा वंचित व कमकुवत गटाना देण्याचा उद्वेश होता.सरकारणे आर्थिक सर्वसमावेश्सकतेसाठी मुद्रा योजना म्हणजे मायक्रो युनिटस डेव्हलपमेंट रिफायनान्स एजन्सी सुरु केली.त्यात छोटया उद्योजकांना पतपुरवठयावर भर आहे.तसेच २०१५ मध्ये प्रधानमंत्री जनधन योजनेत ९५टक्के लोकांची बॅक खाती सुरु झाली. अटल पेन्शन योजना ही वयस्कर व्यक्तींच्या आर्थिक सुरक्षेसाठी वरदान ठरली. त्यात असंघटित क्षेत्रातील गरिबांना फायदा मिळाला. जीवन ज्योती विमा योजनेत एक वर्ष विमा संरक्षण असुन त्यात वर्षाला नूतनीकरण होते. जीवन विमा,सुरक्षा विमा योजना यात मृत्यू व अपघाती अपगंत्व आर्थिक संरक्षण दिले आहे.प्रधानमंत्री जनधन योजना महत्वाची असून ती सूरु झाल्यानंतर ४ एप्रिल २०१८ अखेर एकुण ३१.४ कोटी खाती उघडली गेली. त्यातील १८.५ कोटी खाती ही ग्रामीण भागातील आहेत तर १२.९ कोटी खाती ही शहरी भागातील आहेत त्यातही १६.६ कोटी खाती महिलांची आहेत.एकुण व्यावसायिक बॅकात २०२० अखेर ८९०१३.५ कोटीच्या ठेवी आहेत.

**आव्हाने —**

१. **सर्व खाती चालू नाहीत** — प्रधानमंत्री जनधन योजनेतील सर्व खाती चालू नाहीत. कारण त्यात ठेवण्यासाठी खातेदाराकडे पैसे नाहीत. शिवाय खात्यात कमी शिल्लक असलेली खाती सुरु ठेवणे परवडणारे नसते. कारण तंत्रज्ञानाची आधुनिकता त्यात वापरुन त्युाना सुविधा देणे त्या पैशात शक्य नसते.

२. **आर्थिक साक्षरतेचा अभाव** – ग्रामीण लोकांमध्ये आर्थिक साक्षरता नाही. त्यामूळे आर्थिक संस्थांनी दिलेल्या सेवाबाबत जागरुकता नाही.

३. **खात्याची जास्त संख्या**– जनधन खात्याची संख्या इतकी जास्त आहे की, त्यांचे नियत्रंण करण्याकरीता तंत्रज्ञान व संस्थापक पायाभुत सुविधा आवश्यक आहे. इ पेमेंट पद्वत वापरण्याची गरज आहे.

४. **मनुष्यबळ व्यवस्थापन** – पुरेसे तंत्रकुशल मनुष्यबळ यात आवश्यक असून त्यांचा समावेश संस्थात्मक कर्मचा–यात झाला पाहीजे.

५. **सुरक्षा परिस्थिती** – इलेक्ट्रानिक व्यवहारात सुरक्षितता हा मुद्या आहे. कारण दूरस्थ भागातील खात्यातुन हे व्यवहार अपेक्षित आहेत.

६. **व्यवहारात असुलभता** – व्यवहारात सुलभता नसल्याने बॅकाकडुन कर्जे लोक घेत नाही.

७. **तंत्रज्ञानाचा व्यापक वापर** –बॅकीग व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर वाढला पाहीजे. एटीएम सेवेने काही उद्दिष्टे साध्य झाली असली तरी डेबिट कार्डचा वापर कमी आहे. तीस टक्के लोकांकडे डेबिट कार्ड आहे.

८. **मागणी** – कमी उत्पन्न गटात मालमत्ताधारण क्षमता फार नसते. व्यवहाराचें मुल्य परवडत नाही. त्यामुळे आर्थिक उत्पादने गेरसोयीची ठरतात. ग्रामीण समाजाला डोळयासमोर ठेउन आर्थिक उत्पादने तयार केली जात नाही. त्यामुळे वंचीत व ग्रामीण लोकांना अर्थ्सवयवस्थेत कमी स्थान मिळते.

९. **तंत्रज्ञान वापराची किंमत व जोखीम–** माहीती तंत्रज्ञानाचा वापर खर्च वाढवनारा असतो शिवाय त्यात आर्थिक फटकेही लोंकाना असू शकतात,क्कारण माहीतीची चोरी, व्यक्तीगततेचा भंग असे अनेक मुद्रे विंताजनक आहेत.

१०. **सायबर सुरक्षा** – पंतप्रधान जनधन योजनेत तीन वष्रात ३१ कोटी नविन खाती सुरु झाली. ऐंन्सी टक्के लोकांना प्रथमच खाते उघडता आले. केवायसी निकष शिथिल करण्यात आलयाने यात सायबर सुरक्षेला धोका आहे.

भारतात पुढील दहा वर्षतील परिस्थिती पाहता खालील मुद्रे विचारात घेता येतील.

१. भारतीय अर्थव्यवस्था ही शेती व ग्रामीण व्यवसायाशि जास्त निगडित असून ६६ टक्के लोक अजुनही ग्रामीण भागात राहतात.

२. भारतात जगाची १६ टक्के लोकसंख्या राहते पण जगातील केवळ ४ टक्के जलसाधने भारतात आहेत.

३. जमीनीची टंचाई निर्माण होत जाईल कारण लोकसंख्या वाढत जाईल औद्योगिकीकरणाने अन्नधान्य व कृषी उत्पादन यावर ताण येंउन त्यांचा खर्च वाढेल.

४. ३१ मार्च २०१४ अखेर १२३ कोटी बॅक ठेवी खाती होती त्यात पोस्ट कार्यालयातील २८ कोटी तर जनधन योजनेतील ३१ कोटी खात्यांची भर पडली. मुद्रा बॅकींगला उत्तेजन देत आहे.

५. जिथे बॅका नाहीत तिथे जनधन खात्यामुळे आर्थिक उलाढाल वाढणार आहे.पण व्यवसायीक बॅकाना दूरस्त भागात सेवा देण्याचा खर्च जास्त येणार आहे.

**निष्कर्ष व शिफारशी** – आर्थिक सर्वसमावेशकतेने आर्थिक स्त्रोत ग्राहकाना परवडणा–या दरात मिळतील. आर्थिक सर्वसमावेशकतेची प्रक्रिया गुतागंतीची आहे. त्यासाठी नियत्रंकाची व्यवस्थाही करावी लागणार आहे. डिजिटलायझेशन आवस्यक आहे. पण त्यांचे विश्लेषणही करावे लागेल. कारण भारतात अनेक भाषा असुन साक्षरता कमी म्हणजे सत्तर टक्केच आहे. इंग्रजीचा वापर जास्त होतो पण इंग्रजी १० टक्के लोकांना कळते. इलेक्ट्रानीक उपकरणात इंग्रजी आकडेच वारले जातात. त्यामुळे डिजिटल बॅकिगमध्ये इंग्रजीचा वर चष्मा अधिक आहे. डिजिटल उपकरणात इंग्रजीचा वापर अधिक असतो त्यामुळे अडचणी येतात. भारतात ३०टक्के म्हणजे ४० कोटी लोक दारीद्ररेषेखाली राहतात. त्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेत रुळणे सोपे नाही. ग्रमीण भागात व्यवहार कमी असतात. त्यामुळे छोटया दुकानदारानां डिजिटल यत्रंना बसविने परवडणार नाही. इतर पैशाचा वापर हा शहरी भाग व ग्रामीण भागातील सुशिक्षितांपुरता मर्यादित आहे. त्यामुळे भारतात डिजिटल अर्थव्यवस्था राबवंताना त्यातील समश्यावर एक समिती नेमायला हवी. त्यातून पुढचा असाराखडा निश्चित करता येइल. देशात शंभर शहराची स्मार्ट सिटीसाठी निवड झाली आहे. तेथे काही तंत्रज्ञान सुविधा दिल्या जातील तसेच प्रकल्प डिजिटल अर्थव्यवस्था वापरण्यासाठी सुरु करावे लागतील. पंतप्रधान जनधन योजणा यशस्वी झाली तरी आता सुक्ष्म व ग्रामीण क्षेत्रात बॅकिंग नियमांची आवस्यकता आहे. रिझर्व बॅकेने १९३४ मध्ये काही नियम बॅकिग व्यवस्थेसाठी केले होते. व्यवसायीक बॅकानी आर्थिक सर्वसमावेशतेचे नियत्रंण व देखरेख आता नाबार्डकडे देण्याची गरज आहे. कारण त्या संस्थेकडे चार दशकाचां अनुभव गाठीशी आहे.

## संदर्भसुची–

१. भारतीय वित्तीय प्रणाली, लेखक– प्रा. कोलते,पिपंहापुरे पब्लिशर्स, नागपुर.
२. योजना मासिक. मे २०१९.
३ www.lokmat.com.
४. आधुनिक बॅकिंग आणि वित्तीय पध्दती.– प्रा. श्याम साळुंखे , प्रा. विजय माटे.

————————समाप्त————

International Multidisciplinary E-Conference On Contribution of Various Aspects In Nation Building

Date : 11th to 13 th October 2021

Organised by

Department of [ English, Marathi, Sociology, History, Commerce, Home Economics, Chemistry, Botany and Mathematics ]
Shetkari Shikshan Sanstha's
Arts, Commerce & Science College, Maregaon Dist. Yavatmal, Maharastra, India


Publisher

Technoscience Academy

Website : www.technoscienceacademy.com
Email: info@technoscienceacademy.com